# महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतरांचा इतिहास

## खंड २

## १९०१ - १९५० (भाग २)

लेखक

**रमेश नारायण वरखेडे**

सह–लेखक

**नितीन रिंढे**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

➢ **पुस्तकाचे नाव :** महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतरांचा इतिहास खंड २
(इ. स. १९०१ ते १९५०) भाग २

➢ **लेखक :** डॉ. रमेश वरखेडे

➢ **प्रथमावृत्ती :** २०२३

➢ **आयएसबीएन :** ९७८-९३-९३५९९-९४-०

➢ **प्रकाशक :**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

➢ **मुखपृष्ठ :** गांधी हत्येच्या वार्तेचे पडसाद : क्रिशेन खन्ना,
प्रोग्रेसिव्ह आर्ट ग्रुप (१९४८)

➢ © **प्रकाशकाधीन :**

➢ **मुद्रक :**
व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
मुंबई ४०० ००४.

➢ **किंमत : रु. ३४४.५०**

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतरांचा इतिहास
## खंड २ : १९०१ - १९५० (भाग २)

# अनुक्रम


**६. सामाजिक – सांस्कृतिक स्थित्यंतरे**

६.१ पूर्वकथन ७०९
६.२ सामाजिक सुधारणेच्या चळवळी ७११
६.३ लिंगभावात्मक विषमता व स्त्रीसुधारणेच्या चळवळी ७१४
६.४ जातिभेदात्मक विषमता ७६०
६.५ अस्पृश्य समाजाची पुनर्घटना ८१४
६.६ धार्मिक पुनर्घटनेचा विचार ८६१
६.७ आदिवासींची पुनर्घटना ८८०
६.८ सांस्कृतिक जीवन ८९३
६.९ इतिकथन ९११

**७. साहित्य आणि समाज**

७.१ पूर्वकथन ९१९
७.२ टिळकयुगाचा प्रभाव ९२०
७.३ साम्यवादाचा प्रभाव ९२५
७.४ गांधीवादाचा प्रभाव ९३९
७.५ हैद्राबाद संस्थानातले वाङ्मयीन प्रवाह ९५३
७.६ सामाजिक वास्तव : स्त्री-पुरुष संबंधांविषयी बदललेले दृष्टिकोण ९५५
७.७ ग्रामीण वास्तवाचे वाङ्मयीन आकलन ९७२
७.८ वैचारिक साहित्यातील अंत:प्रवाह ९८०
७.९ इतिकथन ९८३

**८. वाङ्मयीन संस्कृतीतील स्थित्यंतरे**

८.१ पूर्वकथन ९८९
८.२ मागील शतकाचा वारसा ९९०
८.३ नव्या वाङ्मयीन संस्कृतीचा उदय ९९४
८.४ परिघावरील / बंडखोर साहित्यप्रवाह १०१२
८.५ वाङ्मयीन संस्कृतीचे घटक १०१९
८.६ इतिकथन १०९१

**९. नाट्यकलेतील स्थित्यंतरे**

| | |
|---|---|
| ९.१ पूर्वकथन | १०९३ |
| ९.२ नाटक मंडळ्यांचे युग १९०१ ते १९३५ | ११०३ |
| ९.३ मराठी नाट्याभिरूची आणि प्रेक्षकांचा प्रतिसाद | ११२८ |
| ९.४ १९३० पर्यंतचे महत्त्वाचे नाटककार | ११३२ |
| ९.५ मराठी संगीत रंगभूमीची अखेर | ११४५ |
| ९.६ मराठी रंगभूमीचे नवे रूप : १९३३ ते १९५० | ११५२ |

**१०. संगीतविश्वातील स्थित्यंतरे**

| | |
|---|---|
| १०.१ पूर्वकथन | ११५९ |
| १०.२ महाराष्ट्रावरचे संगीत संस्कार | ११६१ |
| १०.३ महाराष्ट्रातील हिंदुस्थानी संगीताच्या परंपरा | ११७६ |
| १०.४ महाराष्ट्रीय मध्यमवर्गातील संगीतकलेचा प्रसार | ११९० |
| १०.५ इतिकथन | १२०२ |

**११. चित्रकलेतील स्थित्यंतरे**

| | |
|---|---|
| ११.१ पूर्वकथन | १२०५ |
| ११.२ औपचारिक शिक्षणक्रम आणि चित्रकलेतील नवे प्रवाह | १२०६ |
| ११.३ आधुनिकवादी चित्रकला | १२१० |
| ११.४ चित्रकलेचे नवे तंत्रज्ञानाधारित आविष्कार | १२१४ |
| ११.५ छापील चित्रांचे विस्तारते जग | १२२१ |
| ११.६ 'ओलेती' चित्राविषयीचा वाद | १२२६ |

**१२. उपसंहार** १२२९

**परिशिष्टे -**

| | |
|---|---|
| ०१. कालपट | १२३९ |
| ०२. संदर्भ सूची | १२८६ |
| ०३. विषय सूची | १३११ |
| ०४. व्यक्ती सूची | १३४६ |


संपादकीय नोंद –

**प्रस्तुत खंडातील ८, ९, १० व ११ या प्रकरणांचे लेखन डॉ. नीतीन रिंढे यांनी केले आहे.**

# ६

# सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतरे

## ६.१. पूर्वकथन :

आधुनिक महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींची वैचारिक पायाभरणी आणि संस्थात्मक जडणघडण एकोणिसाव्या शतकातच सुरू झाली होती. राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासूनच काँग्रिसच्या अधिवेशनाला जोडून सामाजिक परिषद घेण्याची परंपरा न्या. रानडे यांनी सुरू केली होती. मात्र पुढे या सामाईकतेला तडा जाईल अशी आततायी भूमिका काही काँग्रेस पुढाऱ्यांनी घेतल्याने ही परंपरा खंडित झाली. इ. स. १९०० साली सातारा येथे झालेल्या सामाजिक परिषदेच्या अधिवेशनातील न्या. रानडे यांचे भाषण हे अखेरचे भाषण होते. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांपर्यंत *'आधी सामाजिक की आधी राजकीय'* हा वाद महाराष्ट्रातल्या चर्चाविश्वात केंद्रस्थानी राहिला होता. या काळात राजकीय स्वराज्य प्राप्तीच्या उद्देशाने लोकजागृती करण्याकरिता गणेशोत्सव, शिवजयंतीचे उत्सव साजरे केले जात होते. राजकीय चळवळीचे पुढारपण करणारा हा वर्ग समाजसुधारणेच्या बाबतीत मात्र उदासीन होता; किंबहुना अशा उत्सवांतून सुधारकांच्या कामांची टिंगल टवाळी करण्याची संधी घेतली जात असे. ब्रिटिश सरकारची भूमिका धार्मिक समजुती व रूढीपरंपरांमध्ये ढवळाढवळ न करण्याची होती, त्यामुळे कायद्याचा आधार घेऊन सामाजसुधारणेची चळवळ चालविणे हे सोपे काम नव्हते. सामाजिक परिषदेच्या पुढाऱ्यांनीही उच्च जातीच्या हिंदू कुटुंबाच्या सुधारणांपलीकडे सर्वजातीय सामाजिक सुधारणांची व्यापक भूमिका घेऊन कृतिकार्यक्रम न केल्याने सुधारकांच्या लढाईचा प्रवाह कुंठित झाला होता. [१] हा पूर्वसंदर्भ लक्षात घेऊन विसाव्या शतकातील परिवर्तनवादी प्रवाहांचा आढावा येथे घ्यावयाचा आहे. तसेच १९ व्या शतकातील समाजसुधारकांनी बालविवाहबंदी, विधवांचे केशवपन, संमतीविना झालेले लग्न रद्द करण्याचा बायकोचा हक्क, पुनर्विवाहविधी, देवाला मुली वाहणे, विधवांच्या अनौरस मुलांचा प्रश्न इत्यादी सामाजिक प्रश्नांवर

जनजागरणाचे कार्य सुरू केले होते. या कामात सुधारकांना सनातन्यांकडून होणाऱ्या टीकेला तोंड द्यावे लागत होते. विसाव्या शतकातील सुधारकांनी समाजसुधारणेच्या कामात येणाऱ्या अशा विविध अडथळ्यांवर कशी मात केली, सुधारणेच्या चळवळींची संघटनात्मक बांधणी व वैचारिक मशागत कशा पद्धतीने केली याचा तपास येथे करावयाचा आहे. सामाजिक सुधारणेच्या चळवळीत अनिष्ट कुलाचारांच्या रूढी-प्रथांचे सामाजिक वळण बदलण्याचे एक मोठे आव्हान होते; त्यासाठी पारंपरिक कुलाचारांना संपूर्ण नकार द्यायचा की नव्या मूल्यदृष्टीतून कुलाचारांची पुनर्घटना करावयाची, हा पेच सुधारकांनी कसा सोडवला व त्यात त्यांना कितपत यश आले ही तपासाची एक दिशा असणार आहे. जातिभेद, अस्पृश्यता इत्यादी देशाचारातील अनिष्ट प्रथा आणि समजुती बदलण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न यांचा येथे तपास करावयाचा आहे. थोडक्यात, समाजातील अंधश्रद्धा आणि अपसमजुती यांच्याविरोधात सुधारकांनी चालविलेल्या लढाईचे विविध पैलू लक्षात घ्यावयाचे आहेत. कुलाचार आणि देशाचार या उभय अंगांनी सामाजिक सुधारणेच्या चळवळीतील अंत:प्रवाहांचा व कार्यपद्धतींचा येथे तपास करावयाचा आहे. या अनुषंगाने समाजाचे ज्ञानसंधारण करण्यासाठी कोणकोणते प्रयत्न झाले याचाही मागोवा घ्यावयाचा आहे.

महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना करण्यासाठी झालेल्या सुधारणावादी चळवळींखेरीज सांस्कृतिक जीवनातील बदलाच्या अन्य प्रेरणा-प्रवृत्तींचाही येथे तपास करावयाचा आहे. पाश्चिमात्य शिक्षण व युरोपीय संस्कृतीच्या प्रभावातून झालेले बदल, देशांतर्गत राष्ट्रीय नेत्यांच्या प्रभावळीतून झालेले सांस्कृतिक बदल; दुष्काळ, साथीचे रोग अशा नैसर्गिक आपत्ती किंवा मानवनिर्मित दंगली, मेळावे, गणेशोत्सव, मोहरम, इत्यादी सार्वजनिक उत्सवांमुळे, सभा-संमेलनांमुळे समाजाच्या आचार-विचारात व जीवनशैलीत कोणते बदल झाले याचाही येथे मागोवा घ्यावयाचा आहे. शिवाय वसाहतवादाविरुद्ध राजकीय स्वातंत्र्याची लढाई आणि सामाजिक सुधारणांच्या चळवळी यांच्यातल्या परस्परानुबंधांचाही मागोवा घ्यावयाचा आहे. ह्या तपासाचा आराखडा स्थूलमामाने पुढीलप्रमाणे असणार आहे.

१. कुलाचारातील बदलांसाठी झालेले प्रयत्न : बालविवाह, पुनर्विवाह, हुंडा, कन्याविक्रय, लग्नात होणारा वारेमाप खर्च, अप्रयोजक विधी इत्यादी विवाहासंबंधीच्या चालीरिती बदलण्यासाठी झालेले प्रयत्न; विवाहासंबंधी केले गेलेले कायदे व त्या अनुषंगाने झालेल्या सामाजिक चर्चांचा मागोवा घेण्यात येईल. विधवांचे केशवपन, स्त्रियांची पडतपोशी, विवाह व धार्मिक सण-उत्सवात वेश्यांचे नाच-गाणे, गर्भाधान, होलिकोत्सव व अन्य सुख-दु:खाच्या प्रसंगी मद्यपानाची योजना इत्यादी अनीतिप्रवर्तक चाली वा रूढी हद्दपार करण्यासाठीच्या प्रयत्नांचा मागोवा घेण्यात येईल.

२. लिंगभेदात्मक विषमता हटविण्यासाठी व स्त्रियांना व्यावसायिक संधी खुल्या करण्यासाठी करण्यात आलेले उपक्रम, स्त्रियांचे सामाजिक स्थान उंचावण्यासाठी स्त्रीशिक्षणासाठी झालेले प्रयत्न, सभा-संमेलनात स्त्रियांचा सहभाग इत्यादी अंगांनी केल्या गेलेल्या प्रयत्नांचाही मागोवा घेतला जाईल.
३. सार्वजनिक जीवनातील देशाचारात जातिभेद, स्पर्शास्पर्शाच्या समजुती व रोटीबेटी व्यवहाराबाबतच्या अनिष्ट प्रथांचे निर्मूलन करण्यासाठी झालेल्या चळवळींचा मागोवा घेण्यात येईल.
४. धर्मशास्त्रे ईश्वरप्रणीत असून त्यात त्यात बदल करण्याचा आपल्याला अधिकार नाही हा अंधविश्वास व पूर्वकालीन चालीरीतींचा दुराभिमान समाजात नांदत असल्यामुळे धार्मिक पुनर्घटना करताना सुधारणावाद्यांसमोर निर्माण झालेले पेच व त्यांनी पुढे आणलेले पर्याय यांचा मागोवा घेण्यात येईल. यात धर्म व जातीच्या आधारे होणाऱ्या राजकीय फाटाफुटीचा तसेच जाती-धर्माच्या ऐक्यासाठी केल्या गेलेल्या प्रयत्नांचाही तपास अभिप्रेत आहे.
५. विदेशी व भिन्नधर्मीय लोकांविषयी तिरस्कार, इंग्रजी विद्या व आचारविचारांपासून फटकून राहाण्याची प्रवृत्ती यामुळे निर्माण झालेले सामाजिक गंड; भौतिक जीवनातील बदल, विदेशी संस्कृतीचा व युरोपीय ज्ञानाचा परिचय, राष्ट्रीय जीवनातील विभूतींच्या प्रभावाचे परिणाम इत्यादींमुळे झालेले परिवर्तन; औद्योगिक क्रांती व महायुद्धांमुळे बदललेले सामाजिक व्यवहार व जीवनशैलीतील विविध बदलांचे स्वरूप समजावून घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

समाजातील अंधश्रद्धा आणि अपसमजुती यांच्याविरोधात सुधारकांनी चालविलेल्या लढाईचे अनेक पैलू या काळात पुढे येताना दिसत होते. धर्मसत्तेचा पगडा, जातिभेदाची उतरंड असलेली सामाजिक संरचना व पुरुषसत्ताक मूल्यदृष्टी हे महाराष्ट्राच्या स्वभावधारणेचे अंगभूत घटक राहिले असल्याने तपासाचा सुकाणू या मुद्द्यांभोवती फिरत राहील हेही इथे गृहीत धरले आहे. तत्कालीन वृत्तपत्रे व नियतकालिकांतील चर्चाविषय, सामाजिक सुधारणा मंचांचे अहवाल, भाषणे, वृत्तांत इत्यादी माध्यमांतून सामाजिक अभिसरणाची स्पंदने जाणून घेण्याचा प्रयत्न इथे अभिप्रेत आहे. रूढिदासांकडून होणाऱ्या संभाव्य विटंबना व बहिष्कारादि प्रकारांमुळे सुधारकांची होणारी घालमेल याविषयीचे अनुभवही जाणून घ्यावयाचे आहेत.

## ६.२. सामाजिक सुधारणेच्या चळवळी :

विसाव्या शतकाचा पूर्वार्ध हा राजकीय स्वातंत्र्य चळवळीने भारलेला कालखंड असला तरी सामाजिक सुधारणावाद्यांचा पक्षही निरनिराळ्या मार्गांनी सामाजिक सुधारणांची लढाई लढत होता. सुरुवातीच्या काळात परंपरा व आधुनिकतेतल्या अंतर्गत

खडखडाटाचे प्रतिध्वनी प्रसंगोपात्त उमटताना दिसत होते. न्या. रानडे यांच्या मृत्यूपत्रावरूनही अशा प्रकारच्या काही परस्परविरोधी प्रतिक्रिया उमटल्या होत्या. न्या. रानडे यांनी आपले नाव पश्चात चालावे म्हणून कुटुंबाच्या मांडीवर दत्तक देण्याची योजना आपल्या मृत्यूपत्रात करून ठेवली होती. त्यावर लोकमान्य टिळकांनी *'हे मृत्यूपत्र अस्सल हिंदू थाटाचे'* असल्याची टीका केली होती. रानड्यांसारखा व्यापक, मार्मिक दृष्टीचा समाजसुधारक शेवटी हिंदू वळणावर गेला, इतकेच नाही तर दत्तकाची भ्रामक कल्पनाही चालवू लागला म्हणून केसरीच्या पत्रलेखकाने लो. टिळकांची टीका यथार्थ असल्याची प्रतिक्रिया नोंदवली होती. 'निपुत्रिक नरकात जातो' ही जुनी कल्पना, पण रानडे काही जुन्या विचारांचे नव्हते; शिवाय पत्नी अशिक्षित असती तर गोष्ट वेगळी होती. रानडे स्त्रीपक्षाचे कैवारी असताना अमुकच मुलगा दत्तक घ्यावा असा पक्षपात व जबरदस्ती पत्नीवर त्यांनी का करावी? औरस आज्ञाधारक निघेल हे तरी कशावरून?' असे प्रश्न या पत्रलेखकाने उपस्थित केले होते. (केसरी, १५ एप्रिल १९१३) सुधारक विचारवंतांची ही परंपराशरणता सार्वजनिक टीकेचा विषय होणे स्वाभाविकच होते. सुधारकांवर ख्रिस्ती मिशनऱ्यांचा प्रभाव असल्याची तत्कालीन हिंदू लोकांची मानसिकता झाल्याने सुधारणेच्या प्रत्येक कृतीकडे धार्मिक अस्मितेच्या दृष्टिकोनातून पाहाण्याची प्रवृत्ती होऊ लागली होती. १७ जुलै १९०० रोजी मिरजेस भास्करराव सदाशिवराव गोवंडे यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला. त्यांच्या सोबत त्यांची पुनर्भर्तृका भगिनी, पत्नी व दोन मुलांनीही ख्रिस्ती धर्मात प्रवेश केला. या बातमीवर केसरीच्या एका पत्रलेखकाने आपली प्रतिक्रिया देताना लिहिले होते की, " धर्माची सुधारणा करावयाची असल्यास पुनर्विवाह वा धर्मांतर हे आचारविचार उपयोगी पडणार नाहीत, तर आपल्या धर्माचा अभिमान बाळगून विचार परिवर्तन करायला हवे. . समाजव्यवस्थेने घातलेली बंधने एखादवेळेस सैल करणे वेगळे किंवा अजिबात झुगारणे वेगळे. हल्लीचे सुधारक ते झुगारण्याचे काम करीत आहेत. अशा अनावृत्त आचाराने सुधारणेचे पाऊल पुढे पडणार नाहीच उलट सुधारकच लोकांना आवडेनासा झाल्याचे होईल." (केसरी १० जुलै १९००) सुधारणावादी विचारप्रवाहांना अनुसरणाऱ्या समाजसुधारकांच्या कार्यशैलीकडे, तसेच त्यांच्या सामाजिक भूमिका आणि व्यक्तिगत वर्तनव्यवहारातील फटी शोधण्याकडे तत्कालीन माध्यमे किती लक्ष्य ठेवून होती, याचा अंदाज या प्रतिक्रियांतून बांधता येतो. एकीकडे बुद्धिवादी विवेकाची आस आणि दुसरीकडे कौटुंबिक सुरक्षा आणि स्वास्थ्यासाठी चालणारी मानसिक घालमेल या द्वंद्वातून जाताना सुधारकांच्या व्यक्तिगत जीवनातली सामाजिक परिवर्तनाची लढाई किती बिकट होती, हे लक्षात येते.

उतावळ्या सुधारकांचे पोशाखादिकांचे वेडगळ प्रकार व मद्यमांसादिकांचे सेवन हे प्रकार रूचत नसल्यानेही सामाजिक सुधारणांविषयी जनसामान्यांना आस्था वाटत

नव्हती. (केळुस्कर, १९७७, पृ. १३७-१३९) १९१६ साली आगरकरांच्या मृत्यूला २१ वर्षे पूर्ण झाली, तेव्हा त्यांच्या स्मरणार्थ मुंबईतल्या स्त्रीसुधारणेच्छू समाजसुधारकांनी उत्सव-भोजन करून तो दिन साजरा केला. मासिक मनोरंजनने विशेषांक काढला. केसरीकारांनी या उत्सव समारंभाची दखल घेऊन त्याविषयीचा आपला अभिप्राय व्यक्त करताना म्हटले होते, "आगरकरांचे तर्कचक्र राजकीय, सामाजिक, शिक्षणविषयक बाबतीत अप्रतिहत चालत होते. तसे त्यांच्या स्मरणार्थ जमलेल्या परवाच्या सभेतील फारच थोड्यांचे चालत असेल. कोणी स्त्रीसुधारणेच्छु तर कोणी प्रार्थना समाजिस्ट, कोणी विधवा विवाहेच्छु तर कोणी एकेश्वरी, कोणी सरकारी पेन्शनर तर कोणी राष्ट्रीय जेवण जेवणारे – जातिभेद मोडणारे; या केवळ सुधारणांत त्यांचा एकवीस वर्षांनी का होईना उदो उदो झाला, कारण सगळा आगरकर त्यांना पचवता आला नसता. रुचेल ते प्रत्येकाने उचलले आहे म्हणूनच आदरपूर्वक केलेल्या या सन्मानाबद्दल समाधान वाटत आहे." (केसरी, ४ जुलै १९१६) यातली औपरोधिक मल्लिनाथी सोडली तर सुधारकांचा वारसा पुढे नेणारी मंडळी आगरकरांइतकी प्रखर बुद्धिवादी व तर्कसंगत नसली तरी आपापल्या परीने क्रियाशील होती, हे लक्षात येते.

१९२० नंतर मात्र राजकीय हक्क आणि सामाजिक सुधारणा या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याचा विचारप्रवाह पुढे येत होता. सामाजिक सुधारणा हे कर्तृत्वक्षेत्र बनविले पाहिजे असे काही लोकांना वाटू लागले व त्यांना सामाजिक धुरिणांकडून मान्यताही मिळू लागली. महर्षी कर्वे यांच्या विधवापुनर्वसन व स्त्रीशिक्षणाच्या कार्याला 'केसरी' परिवारातील न. चिं. केळकर यांनी पाठिंबा दिला. गांधीजींनी स्त्रियांना राष्ट्रीय चळवळीत सहभागी होण्याचे आवाहन केले. सामाजिक प्रश्न आणि राजकीय वर्तनव्यवहार एकमेकांशी संलग्न आहेत अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचीही भूमिका होती. ('बहिष्कृत भारत',३ फेब्रुवारी १९२८) १९३६ साली लाहोरला जात-पात-तोडक मंडळाच्या वार्षिक परिषदेच्या अध्यक्षपदावरून भाषण देण्याकरिता लिहिलेल्या 'जातिप्रथेचे विध्वंसन' या भाषणाच्या संहितेत सामाजिक प्रश्नांची व्याप्ती राजकीय संविधान निर्मितीशी कशी निगडित आहे हे डॉ. आंबेडकर यांनी स्पष्ट केले होते. 'धर्म, सामाजिक दर्जा व संपत्ती ही सर्व सत्तेची व प्राधिकाराची उगमस्थाने असल्याने सामाजिक व धार्मिक प्रश्नांचा संबंध राजकीय संविधानाशी असतो' हे या भाषणातले प्रमुख आशयसूत्र होते. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाची बीजे प्युरिटनांच्या धार्मिक चळवळीत होती, अरबी राजकीय सत्तेची बीजे प्रेषित महंमदाच्या धार्मिक क्रांतीत होती, चंद्रगुप्ताने घडवून आणलेल्या राजकीय क्रांतीला बुद्धाच्या धार्मिक-सामाजिक क्रांतीची पार्श्वभूमी कारणीभूत होती, महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांनी घडवून आणलेल्या राजकीय क्रांतीआधी संतांनी घडवून आणलेल्या धार्मिक-सामाजिक सुधारणांची पार्श्वभूमी होती. धार्मिक-

सामाजिक सुधारणेच्या चळवळींचा व राजकीय क्रांतींचा परस्पर अनुबंध किती घट्ट आहे, याविषयीच्या उदाहरणांची ही मालिकाच त्यांनी या भाषणातून कथन केली होती. 'सामाजिक सुधारणेला मित्र थोडे व टीकाकार फार' हे खरे असले तरी राजकीय हक्कांची लढाई आणि सामाजिक सुधारणांसाठी करावयाची चळवळ सामाईकपणे चालवली पाहिजे अशी डॉ. आंबेडकरांची धारणा होती. (आंबेडकर, २०१४, पृ. २४-२८) यावरून राजकीय चळवळीचा लंबक आता सुधारणावादाकडे झुकू लागला असल्याची चिन्हे दिसू लागली होती.

## ६.३. लिंगभावात्मक विषमता व स्त्री-सुधारणेच्या चळवळी :

विसाव्या शतकाची पहिली दोन दशके महाराष्ट्राचे सामाजिक जीवन वसाहतवादी राजवटीच्या विरोधात जनमत संघटित करणाऱ्या राष्ट्रवादी चळवळीने भारलेले होते. सामाजिक सुधारणेच्या विचारांकडे अजूनही काहीसे उपेक्षेनेच पाहिले जात होते. अशा नकारात्मक पार्श्वभूमीवर अधूनमधून स्त्रीप्रश्नांना सार्वजनिक चर्चाविषयांच्या केंद्रस्थानी आणण्याचे प्रयत्न होत होते. सार्वजनिक जीवनात स्त्रियांचा सहभाग वाढविण्यासाठी वनिता मंडळे, विधवाश्रम व स्त्रियांचे क्लब स्थापन करण्यात आले. स्त्रियांचा आत्मविश्वास जागविण्यासाठी त्यांच्यात साक्षरता प्रसार, भाषण कौशल्य व आर्थिक स्वावलंबनासाठी कार्मिक कौशल्यांचे शिक्षण देणाऱ्या संस्थात्मक व्यवस्था निर्माण करण्याचे प्रयत्नही झाले. या संस्थात्मक व्यवस्थांच्या माध्यमातून स्त्रियांच्या सामाजिक पुनर्घटनेला आकार देणाऱ्या शाश्वत पर्यायांविषयी विचारमंथन सुरू झाले होते.

भारतीय समाजव्यवस्थेत सामाजिक आचारधर्म, नीतिमूल्ये आणि मानदंड यावर पुरुषसत्ताक मूल्यव्यूहाचा पगडा असल्याने स्त्रिया नेहमीच समाजाच्या निम्नस्थानी राहिल्या आहेत. लिंगभेदात्मक विषमतेमुळे स्त्रियांना राजकीय, आर्थिक वा सामाजिक सत्तेत कधीच बरोबरीचा वाटा मिळाला नाही. स्त्रीला वैधव्य प्राप्त झाले, आणि पुढे काही दिवसांनी जर तिचे शरीर सुटले तर तिला 'रांडमांस' आले असे म्हणत. तसे होऊ नये म्हणून त्या एकभुक्त रहात. दररोज पायली पायलीचे दळण करीत. मुलगी लग्नाळू झाली की तिचे मीठ तोडीत. (जोशी,२०१७, पृ. १०५) अशा पारंपरिक विचारधारणांमुळे होणारी स्त्रियांची उपेक्षा व अवहेलना थांबविण्यासाठी १९ व्या शतकात सामाजिक प्रबोधनाचे एक नवे पर्व सुरू झाले होते. ख्रिस्ती मिशनरी, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज यांचा या सुधारणा प्रकल्पात पुढाकार होता.१८७१ साली पुण्यात सरस्वतीबाई जोशी (सार्वजनिक काकांच्या पत्नी) आणि सरस्वतीबाई गोवंडे (सदाशिवराव गोवंडे यांच्या पत्नी) यांनी 'स्त्री विचारवती सभेची स्थापना करून वक्तृत्व स्पर्धा, सार्वजनिक हळदीकुंकवाचे समारंभ असे भगिनीभाव वाढविणारे उपक्रम सुरू केले होते. १८८० सालापासून डॉ. भांडारकर यांची कन्या सौ. गंगूताई भंडारे यांनी प्रार्थना समाजाचा उपक्रम म्हणून स्त्रियांच्या सभा

घेण्यास सुरुवात केली; स्त्रियांसाठी विचारप्रवर्तक भाषणे व निबंधस्पर्धांचे आयोजन केले. सत्यशोधक समाजाच्या अध्यक्ष या नात्याने सावित्रीबाई फुले १८९० ते १८९७ या काळात स्त्री-सुधारणांचे काम करीत होत्या. पंडिता रमाबाई यांनी 'आर्य महिला समाज' (१८८२) व 'शारदा सदन' (१८८९) या संस्थांची स्थापना स्थापना केली होती. पंडिता रमाबाईंच्या स्त्री सुधारणा चळवळीचे समाजाकडून सर्वसाधारणपणे स्वागत होत होते. असे असले तरी या चळवळीला ख्रिस्ती मिशनऱ्यांकडून धर्मांतराचे परिमाण दिले जात असल्याने नापसंतीच्या प्रतिक्रियाही उमटत होत्या. पं. रमाबाई यांनी 'शारदासदन' पुण्याहून केडगावला नेल्यानंतर बंगलोर, म्हैसूर इत्यादी ठिकाणी व्याख्याने दिली. हिंदू विधवांनी आपली उन्नती साधण्यासाठी जातिभेद झुगारून दिले पाहिजेत, असे आवाहन त्या करीत. हे वृत्त प्रसिद्ध करताना 'केसरी'ने म्हटले होते की, "पं. रमाबाईंचा हिंदू धर्माबद्दलचा सूर, ख्रिस्ती धर्माबद्दलची व विधवा स्त्रियांबद्दलची कळकळ यावर उपाय म्हणून 'शारदासदन'ची आवश्यकता यातून प्रकटलेले पांडित्य दुराग्रही व हिंदुत्वास बाधक आहे." (केसरी, १ जाने. १९०४) दुष्काळाची पर्वणी साधून पं. रमाबाई केडगावच्या विधवांस थापा देऊन ख्रिस्ती धर्माची भलावण करत असल्याचा आरोपही स्फुट लेखातून केला जात होता. (केसरी, १२ जाने. १९०४) १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात नवसाक्षर स्त्रियांसाठी 'स्त्रीभूषण' (१८५४), 'स्त्रीज्ञानप्रदीप' (१८६९), 'अबलामित्र' (१८७६), 'स्त्रीबोध चिंतामणी' (१८८१), 'आर्यभगिनी' (१८८६), 'गृहिणी' (१८८७), 'स्त्रियांची मैत्रीण' (१८८८), 'स्त्रीशिक्षण चंद्रिका' (१८९९) अशी काही नियतकालिकेही सुरू झाली होती. मात्र सुधारकांच्या वा अभिजनांच्या घरातून शिकू लागलेल्या पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, सावित्रीबाई फुले, आनंदीबाई जोशी, काशीताई कानीटकर यासारख्या स्त्रियांचा अपवाद वगळता अजूनही स्त्रियांची स्थिती फारशी बदललेली नव्हती.

**रमाबाई रानडे यांचे कार्य :**

१८८७ पासून न्या. महादेव गोविंद रानडे यांच्या सामाजिक परिषदेने स्त्री-सुधारणेच्या विषयाला अग्रक्रम दिला होता. १९०१ साली न्या. रानडे यांचे निधन झाले. त्यानंतर १९०३ ते १९२३ या काळात न्या. ना. गो. चंदावरकर हे सामाजिक सुधारणा परिषदेचे अध्यक्ष होते. या संस्थेने १९०५ पासून दरवर्षी महिला परिषद घेऊन जनजागृतीचे काम केले. परिषदेने मुंबईत हिंदू स्त्रियांसाठी वसतिगृह स्थापन केले व 'विधवांचा निवारा' अशी या संस्थेची ओळख निर्माण केली. न्या. रानडे यांच्या सामाजिक सुधारणा चळवळीची पताका खांद्यावर घेऊन रमाबाई रानडे यांनी पुण्यात १९०२ साली 'हिंदू लेडिज सोशल क्लब' स्थापन करून आपल्या कामाला सुरुवात केली. यापूर्वी १८९६ साली मुंबईत असा क्लब त्यांनी सुरू केला होता. पुण्यातल्या लेडिज क्लबच्या माध्यमातून रमाबाईंनी निराधार विधवांना स्वत:च्या पायावर उभे राहाता यावे यासाठी

शिवणकाम व प्रथमोपचाराचे शिक्षण देणारे वर्ग सुरू केले. १९०३ साली हिंगण्याच्या बालिकाश्रमाच्या कामातही त्यांनी आपला सहयोग दिला. १९०४ साली मुंबई सरकारच्या विनंतीवरून रमाबाईंनी येरवडा तुरुंगाचे मानद अधीक्षकपद स्वीकारले व गुन्हेगार स्त्रियांना साक्षर करण्याचे व त्यांच्या मनोवृत्तीत सकारात्मक बदल घडवून आणण्याचे काम अंगीकारिले. कैदी स्त्रियांना सदाचारपर सोपे अभंग आळवायला व त्यातला आशय समजावून घ्यायला शिकविले. या उपक्रमामुळे तुरुंगवासीनींणा विरंगुळ्याचे व मनोन्नतीचे नवे साधन उपलब्ध झाले. १९०४ साली स्थापन झालेल्या 'भारत महिला परिषदे'च्या अध्यक्षस्थानावरून बोलताना रमाबाईंनी स्त्रियांच्या सामाजिक सुधारणांविषयीचा आपला दृष्टिकोन जाहीर केला. सर्व जाती धर्माच्या महिलांनी महिला परिषदेच्या माध्यमातून एकत्र येऊन धार्मिक सलोखा निर्माण करावा; आपापल्या जातीतील गुणदोषांची चिकित्सा करून इतरांकडून शिकण्यासारखे काय आहे, याचे चिंतन करावे; स्वत:चा आत्मविकास करून पतीला पूरक होईल अशी सांसारिक जबाबदारी निभवावी असा संदेश त्यांनी दिला. अनाथ मुलींनी शहरात गृहशिक्षणाचे वर्ग चालवावेत; आंधळ्यांसाठी व बहिऱ्या-मुक्यांसाठी शाळा चालवाव्यात; निराश्रित म्हाताऱ्यांसाठी सेवा संस्था सुरू कराव्यात अशी एक नवी दिशा त्यांनी या अध्यक्षीय भाषणातून सुचित केली. दुसऱ्याचे दु:ख पाहून कळवळा उत्पन्न होणे हा स्त्री-स्वभावाचा धर्मच आहे, त्याला अनुसरून स्त्रियांनी आजारी व दीन दुबळ्यांची सेवा-सुश्रुषा करावी, मुलींच्या शाळेत जाऊन पिण्याच्या पाण्याची, आडोशाची सोय, स्वच्छता या बाबतीत लक्ष घालावे; आपल्या सुनांना शाळेत घालावे, असा हितोपदेशही केला. (जोगळेकर, १९९१, पृ. ५८-६२)

१९०८ साली मुंबईत बेहरामजी मलबारी व दयारामजी गिडुमल यांनी सर्वजातीय महिलांसाठी 'सिस्टर्स ऑफ इंडिया' संस्था स्थापन केली होती. या संस्थेची शाखा पुण्यात उघडण्याचे रमाबाई रानडे यांनी ठरविले. पुणे शहर व कॅम्पमधील हिंदू, पारशी, ख्रिश्चन, मुस्लिम स्त्रियांची सभा घेऊन सर्व संमतीने २ ऑक्टोबर १९०९ रोजी पुण्यात 'सेवासदन'ची शाखा स्थापन केली. उच्च वर्णीय स्त्रियांनी 'सेवासदन'मध्ये येऊन निम्न जातीतील स्त्रियांना कशिद्याचे- कलाकुसरीचे, शिवणकामाचे, पारिचारिकेचे (नर्सिंग) व अन्य कार्मिक कौशल्यांचे शिक्षण द्यावे यासाठी रमाबाईंनी या संस्थेच्या माध्यमातून पायाभूत काम सुरू केले. विधवांविषयीचे सामाजिक पूर्वग्रह दूर होण्याच्या दृष्टीने त्यांना प्रशिक्षित करून स्वावलंबी बनविण्याचा हा प्रकल्प सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला एक नवे आयाम देणारा ठरला. रमाबाई रानडे यांच्या कार्याने प्रभावित झालेल्या गोपाळ कृष्ण देवधर यांनी 'सेवासदन'मध्ये महिलांना आरोग्यसेवेचे प्रशिक्षण देण्याची योजना कार्यान्वित केली. 'सेवासदन' मधून प्रशिक्षित झालेल्या दोन महिलांना १९११ साली पुण्याच्या ससून हॉस्पिटलमध्ये 'पारिचारिका' म्हणून पूर्ण वेळ सेवेत सामावून घेण्यात

आले. या यशानंतर ससून मेडिकल कॉलेजच्या प्रमाणपत्र शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या महिलांसाठी सेवा सदन संस्थेने वसतिगृहाची सुविधा निर्माण केली. १९१२ साली ११ विधवांसह १२ महिला या वसतिगृहात रहात होत्या. त्या काळातली ही एक लक्षणीय घटना होती. 'सेवा सदन'ने पुण्यात उभारलेल्या 'परिचारिका क्वार्टर'ला नंतर 'देवधर नर्सेस हॉस्पिटल 'असे नाव देण्यात आले. १९१२ साली 'सेवासदन'मधील महिलांनी तयार केलेल्या कलाकुसरीच्या वस्तूंचे एक प्रदर्शन पुण्यात भरविण्यात आले. या माध्यमातून विधवा व निराश्रित स्त्रियांच्या कर्तबगारीचा व आत्मविश्वासाचा एक नमुनादर्श समाजापुढे ठेवण्यात आला. १९१४ पासून प्राथमिक शाळेत शिकविण्यासाठी महिलांना प्रशिक्षित करण्याचे वर्ग सुरू करण्यात आले. नागपूर आणि मद्राससह इतर बारा शहरांमध्ये 'सेवा सदन''च्या शाखा उघडण्यात आल्या. १९१२ साली गुजरात व काठेवाडात पडलेल्या दुष्काळात मदतकार्यासाठी आणि १९१७-१८ साली पुण्यात एन्फ्लुएंझाच्या साथीत रुग्णांच्या सुश्रुशेसाठी 'सेवासदन'च्या महिला पुढे सरसावल्या. सामाजिक कार्यात काम करणाऱ्या महिलांकडे पहाण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलण्यासाठी याची मदत झाली. रमाबाईंच्या 'सेवासदन'चा लौकिक हळूहळू विस्तारत गेला व स्त्री-सुधारणेच्या उपक्रमांकडे पहाण्याचा सामाजिक दृष्टिकोनही निकोप होऊ लागला. १९१७ साली 'बालगंधर्व नाटक मंडळी'ने 'सेवासदन'च्या मदतीसाठी पुण्यात केलेल्या नाट्यप्रयोगाला स्त्री-पुरुष एकत्र व सरमिसळून बसले होते, ही या बदलाची एक महत्त्वाची खूण होती. (जोगळेकर, १९९१, पृ. ८०) या लोकप्रियतेमुळे महाराष्ट्रात इतरत्रही सोलापूर, नगर, बारामती, अलिबाग इत्यादी ठिकाणी 'सेवासदन'च्या शाखा उघडण्यात येऊन या उपक्रमाचा विस्तार झाला. १९२४ साली रमाबाईंच्या निधनापर्यंत एक हजाराहून अधिक स्त्रिया प्रशिक्षित होऊन स्वावलंबी झाल्या होत्या.

१९१८ साली मुंबई इलाख्याच्या कायदे कौन्सिलने म्युनिसिपालिटींनी मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीने व मोफत द्यावे, असा कायदा केला होता. हा कायदा मुलींनाही लागू करावा म्हणून रमाबाईंनी सेवासदनच्या व कर्वे संस्थेतील महिलांच्या जोडीने पुण्याच्या पेठे पेठेत सभा घेऊन व मिरवणूका काढून लोकमत जागृतीची मोहीम चालविली. म्युनिसिपल कौन्सिलच्या अध्यक्षांकडे महिलांचे शिष्टमंडळ नेऊन त्यांनी आपली मागणी समर्थपणे मांडली. मुला-मुलींना एकदमच सक्तीचे शिक्षण सुरू करण्यासाठी प्रसंगी कर बसवायलाही हरकत नाही, अशी रमाबाईंची भूमिका होती. 'सुबोधपत्रिके'ने या जनजागृती मोहिमेविषयी लिहिले होते, "मुलींच्या सक्तीच्या शिक्षणाविषयी खुद्द स्त्रियांमध्ये किती जागृती झाली आहे, हे स्त्रियांच्या ह्या जंगी मिरवणुकीतील दोन हजार स्त्रियांचा समूह पाहून कळते. कोण तो उत्साह ! दोन हजार स्त्रिया भर रस्त्यातून पुण्यासारख्या ठिकाणी हातात पताका घेऊन फिरतात. लोकांकडून

विडंबना करून घेतात, त्या सर्व केवळ मौजेसाठी काय? पुण्याच्या स्त्री-शिक्षणाच्या विरोधकांनी हे खूप समजून असावे की, मुलींच्या सक्तीच्या शिक्षणाचा प्रश्न त्यांच्या हातून आता निसटला आहे. तो स्त्रियांनी आपल्या हाती घेतला आहे!" (सुबोधपत्रिका २४-२-१९२०/ जोगळेकर,१९९१, पृ. ९१)

रमाबाई रानडे यांनी विधवा व निराधार स्त्रियांना कार्मिक कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन त्यांचा आत्मविश्वास जागवला, स्वत:च्या पायावर उभे राहून स्वावलंबी बनण्याची दीक्षा दिली. त्यांच्या बौद्धिक आणि आत्मिक विकासासाठी महर्षी कर्वे, काशीबाई कानिटकर, न. चिं. केळकर इत्यादी वक्त्यांची उद्‌बोधक व्याख्याने आयोजित केली. वाचनालय सुरू करून चांगली पुस्तके वाचायला प्रवृत्त केले. कीर्तन, स्नेहसंमेलन आयोजित करून स्त्रियांमधला परस्परांतला भगिनीभाव जागवण्यावर भर दिला. १९१७ साली पुण्याच्या फर्गसन महाविद्यालयाच्या परिसरात यशस्वी विद्यार्थिनींच्या बक्षिस-वितरण समारंभात सोवळ्या गतभर्तुका पारितोषिक स्वीकारण्यास आल्या तेव्हा काही पुरुष श्रोत्यांनी कुत्सितपणे हसून टाळ्या वाजवल्या, तेव्हा रमाबाईंनी त्यांच्या असभ्य वागणुकीबद्दल कडक समज दिली. पुरुषांनी स्त्रियांकडे पहाण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठी रमाबाई किती दक्ष होत्या हे यावरून दिसते. विसाव्या शतकाच्या पहिल्या दहा-पंधरा वर्षात स्त्रीशिक्षणाची चळवळ जोर धरत होती. उच्च शिक्षित स्त्रियांचा सन्मान करण्याची प्रवृत्ती वाढीस लागल्याचे चित्र दिसत होते. अमरावतीचे मोरो वि. जोशी वकील यांची कन्या नागूताई मुंबईच्या वैद्यकीय महाविद्यालयातून १९०७ साली एल. एम. एस. परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर लंडनला चार वर्षांचा आयर्लंड व डब्लीन विद्यापीठाचा वैद्यकीय शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी रवाना झाल्या. आनंदीबाई जोशींनंतर परदेशातून वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून आलेल्या त्या दुसऱ्या महिला डॉक्टर होत्या. नागूताईंनी भूल न देता भोसले राणीसाहेबांच्या पोटाची शस्त्रक्रिया करून आपल्या वैद्यकीय पारंगततेची चुणूक दाखवून दिली होती. अशा उच्च विद्याविभुषित डॉ. नागूताई जोशी यांचा नागपूरला राजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली भव्य नागरी सत्कार करण्यात आला. या सभेत सरोजिनी नायडू, मथुराबाई द्रविड, मिसेस घारपुरे यांची भाषणे झाली व सरकारने हिंदुस्थानातील महिलांना वैद्यकीय शिक्षणात प्रवेश देण्यास राखीव जागा ठेवून अग्रक्रम द्यावा व हिंदुस्थानबाहेरही शिक्षण घेण्यास पाठवावे असे आवाहन करण्यात आले. (केसरी, १८ नोव्हें. १९१३)

**धोंडो केशव कर्वे (१९५८-१९६२) यांचे कार्य :**

विसाव्या शतकाच्या प्रारंभी महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्रियांना व विशेषत: विधवांना शिक्षणाच्या माध्यमातून स्वावलंबी व स्वाभिमानी जीवन जगण्याचा नवा मार्ग प्रशस्त करून सामाजिक सुधारणा चळवळीला एक नवे परिमाण प्राप्त करून दिले. महिलांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी त्यांनी प्रथम पुण्याजवळ हिंगणे येथे शैक्षणिक संकूल

स्थापन करून पुढे संपूर्ण भारतात स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी एक आंतरजाल उभे केले. १८९१ साली विधूरत्व आल्यानंतर १८९३ साली त्यांनी स्वजातीतील विधवेशी लग्न करण्याचा निर्णय घेतला. पुण्यातल्या तत्कालीन कर्मठ सनातनी सामाजिक जीवनात अशा प्रकारे विधवेबरोबर पुनर्विवाह करणे हे तसे मोठे धाडस होते. त्यानंतर त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य हिंदू विधवांच्या पुनर्वसनाच्या कामात व्यतीत केले. यापूर्वी महाराष्ट्रात विष्णूशास्त्री पंडित यांच्या पुढाकाराने स्थापन झालेली विधवा पुनर्विवाहाची संघटनात्मक चळवळ १८७६ साली त्यांच्या निधनानंतर थंडावली होती; महर्षी कर्वे यांनी १८९३ साली ही चळवळ पुनरुज्जीवीत केली. डॉ. रा. गो. भांडारकर यांच्या अध्यक्षतेखाली ह्या संस्थेचे काम सुरू करून स्वत: कर्वे यांनी संस्थेच्या सचिवपदाची जबाबदारी अंगावर घेतली. यापूर्वी एकोणिसाव्या शतकात २५ जुलै १८५६ रोजी विधवा पुनर्विवाह कायदा संमत झाला होता, संस्थेने २५ जुलै हा दिवस 'विधवा पुनर्विवाह दिन' म्हणून साजरा करायला सुरुवात केली. १८९६ साली कर्व्यांनी पुण्यात केवळ एका मुलीचा प्रवेश करून एका छोट्याशा झोपडीत विधवांसाठी आधाराश्रम स्थापन केला. नंतर हा अनाथ बालिका आश्रम त्यांनी हिंगण्याला स्थलांतरित केला. पंडिता रमाबाई यांच्या बंद झालेल्या 'शारदा सदन'ची पोकळी यामुळे भरून निघाली. स्त्रियांना स्वबळावर चरितार्थ चालविण्यासाठी लागणारे व उपजिविकेसाठी स्वतंत्रपणे व्यवसाय करण्याचे कुठलेच शिक्षण मिळत नसल्याने विधवा स्त्रियांच्या वाट्याला येणारी दुर्दशा महर्षी कर्वे यांना जाणवली होती. यातून मार्ग काढण्यासाठी दायी प्रशिक्षण व शिक्षक प्रशिक्षणाचे वर्ग चालवून त्यांनी विधवांना स्वत:च्या पायावर उभे राहाण्यासाठी सक्षम बनविले. सुरुवातीला ब्राह्मण कुळातील विधवांना संस्थेत प्रवेश दिला जाई; कालांतराने सर्व जातीय विधवा व सधवा स्त्रियांच्या शिक्षणासाठी आश्रमाची व्याप्ती वाढविण्यात आली. त्यामुळे या उपक्रमाला भरघोस प्रतिसाद मिळून २५ वर्षांत लाभार्थी मुलींची संख्या ५०० पर्यंत पोहचली. मुलींचे बालविवाह होऊ नयेत यासाठी त्यांना शिक्षणात गुंतविणे आवश्यक आहे, ही सामाजिक गरज लक्षात घेऊन त्यांनी निवासी महिला विद्यालय सुरू केले. मुलींना परीक्षार्थी न बनवता चांगल्या गृहिणी, चांगल्या माता आणि चांगले शेजारी बनविण्याचे मातृभाषेतून शिक्षण देऊन उशिराने लग्न करण्यासाठी प्रोत्साहित करणे ही उद्दिष्टे ठेवून या विद्यालयातील शिक्षणक्रमांची आखणी करण्यात आली.

१९०८ साली मध्ये महर्षी कर्वे यांनी समाजासाठी कुठलेही वेतन न घेता निरपेक्षपणे काम करणाऱ्या चार पुरुष आणि अकरा स्त्रिया अशा पंधरा सहकाऱ्यांसह एका 'निष्काम-कर्मठा'ची स्थापना केली. १९१५ साली मुंबईत झालेल्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेत त्यांनी जपानी विद्यापीठाच्या धर्तीवर महिला विद्यापीठ स्थापन करण्याची योजना मांडली. ॲनी बेझंट, महात्मा गांधी, चंदावरकर आणि डॉ. भांडारकर यांनी या योजनेचे

समर्थन केले. १९१६ साली महिला विद्यापीठ स्थापन झाले व पहिले कुलगुरू म्हणून डॉ. भांडारकर यांनी जबाबदारी स्वीकारली. युरोपातल्या सफ्रेजेट आंदोलनात सक्रिय असलेल्या मार्गारेट कझिन्स या आयरिश महिलेसही महिला विद्यापीठाच्या नियामक मंडळात सहभागी करून घेण्यात आले. कुठल्याही सरकारी मदतीशिवाय स्थापन झालेले भारतातले हे पहिले स्वायत्त विद्यापीठ होते. विद्यापीठाच्या उभारणीच्या काळात मुंबईचे उद्योगपती सर विठ्ठलदास ठाकरसी यांनी पुरेसा निधी उपलब्ध करून दिला. नंतर या विद्यापीठाचे नामकरण श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ असे करण्यात आले. कालांतराने हे विद्यापीठ पुण्याच्या एरंडवणा येथे हलविण्यात आले. महर्षी कर्वे यांनी याच काळात पुणे, मुंबई या शहरांखेरीज अमरावती, इंदूर, ग्वाल्हेर, जालंदर व गुजरातेत मुलींची हायस्कूले सुरू करण्याची मोहीम हाती घेतली. १९३१ पर्यंत महाराष्ट्र आणि गुजरातेत कला महाविद्यालये, ट्रेनिंग स्कूल्स, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मिळून २४ संस्था महिला विद्यापीठाशी संलग्न झाल्यात. माध्यमिक शाळात २५०० विद्यार्थिनींनी आणि महाविद्यालयीन शिक्षणासाठी १२५ विद्यार्थिनींनी या व्यवस्थेचा लाभ घेतला.

**हिंगण्याच्या शाळेतले अनुभव :**

बाळूताई खरे (विवाहानंतर मालतीबाई बेडेकर) आणि कृष्णाबाई मोटे या दोन्ही बहिणी पुण्याजवळ शिरूर-घोडनदीच्या. वडील ख्रिस्ती मिशनच्या शाळेत चित्रकला शिक्षक होते; न्या. रानडे व प्रार्थना समाजाशी त्यांचा परिचय असल्याने घरात सुधारणावादी वातावरण होते. व्हर्नाक्युलर फायनलची परीक्षा पास झाल्यावर १९१४ साली वयाच्या ११ व्या वर्षी कृष्णाबाई आणि १९१७ साली वयाच्या १२ व्या वर्षी बाळूताई खरे आण्णासाहेब कर्व्यांच्या हिंगणे शिक्षण संस्थेत शिकण्यासाठी गेल्या. या दोघींनी त्यांच्या बालपणीच्या व हिंगणे आश्रमातील शिक्षणाच्या आठवणी लिहिल्या आहेत. कृष्णाबाई मोटे यांनी लिहिले आहे की, "त्यावेळच्या पुण्यात हिंगणे आणि हुजूरपागा या दोन संस्थांमध्ये मुली शिकत असत. ब्रिटिशधार्जिण्या सरकारी नोकरांच्या मुली हुजूरपागा शाळेत शिकत, तर स्वराज्यप्रेमी लोकांच्या मुली हिंगण्याला शिकत. न. चिं. केळकरांची मुलगी कमलाबाई देशपांडे हिंगण्याला शिकत होती, तर रँग्लर परांजप्यांची मुलगी शकुंतलाबाई परांजपे हुजूरपागा शाळेत शिकत होती. हिंगण्याला सर्व जातीच्या मुली एकत्र रहात; मात्र जातीप्रमाणे जेवणाच्या पंक्ती वेगवेगळ्या असत. स्वयंपाकाचा आणि वाढण्याचा अधिकार फक्त ब्राह्मणांच्या मुलींचा. इतर मुलींच्या वाढण्याच्या पाळ्या नसत. .. ब्राह्मणांमध्येही कोकणस्थ आणि देवरुख्यांची पंगत वेगळी असे. जेवणाच्या पंक्तीतला भेदाभेद हुजूरपागेच्या शाळेत नव्हता." हिंगण्याच्या शाळेतला एक प्रसंग कृष्णाबाई मोटे यांनी सांगितला आहे : "आमच्याबरोबर शिकायला एक आठ-

दहा वर्षांची मुलगी होती. तिचं लग्न झालेलं होतं. पण माहेर सासरच्यांनी लहान म्हणून शिकायला ठेवली होती. परकर पोलकंच नेसणारी होती. एके दिवशी आम्ही सगळ्या सागरगोटे खेळत बसलो होतो. तिची आई तिला भेटायला आली. आईनं एकदम तिचं कुंकू पुसलं आणि रडत म्हणाली, 'अगं तुझं नशीब फुटलं गं !' आम्हाला काही कळेना. आम्ही पहात राहिलो. तिच्या आईनं रडत ओरडत सांगितलं, 'अहो तिचा नवरा मेला.' (खडपेकर, १९९१, पृ. १४२) यावरून कर्व्यांच्या आश्रमात शिकायला येणाऱ्या मुली कोणत्या सामाजिक पर्यावरणातून येत होत्या याची कल्पना येते.

बाळूताई खरे यांनी लिहिले आहे की, "त्या काळात स्त्री-सुधारणेचा वेग मुंगीच्या पावलानेच होत होता. १९२१ मध्ये साऱ्या हिंदुस्थानात दुय्यम शाळेत बारा-साडेबारा 'हजार मुली होत्या. यावरून पुण्याला दुय्यम शिक्षण घेणाऱ्या मुली किती थोड्या होत्या, हे लक्षात येईल. कन्या शाळेत इंग्रजी पहिलीत ७० मुली असल्या तर त्यातील जेमतेम ३-४ मुली मॅट्रिकपर्यंत पोहोचत. त्यात प्रौढ विधवाच जास्त. बाकी कुमारिका मुली १२-१३ व्या वर्षी शाळा सोडण्याच्या मार्गावर असत..कन्याशाळेत ज्या मुली शिक्षण घेत होत्या, त्यापैकी बऱ्याच चातुर्मासात, व्रते-वैकेल्ये म्हणून आणि एरवी घरची अडचण म्हणून शाळा चुकवीत.. मुलगी वयात येण्याआधीच लग्ने ठरविण्याची घाई असे.. मुलीची अब्रू म्हणजे काचेचे भांडे. हे भांडे जास्तीत जास्त बंदोबस्तात ठेवले जाई. फिरायला जाणे, मन मानेल तो पोषाख करणे, उडता पदर, छाती आणि पाठ दाखवित असलेला ब्लाउझ कल्पनेतही कुणी आणला नव्हता. घरातील कामाधामाचे, सोशिकपणाचे, अबोल सेवेचे सारे शिक्षण देऊन मुलीला गृहकृत्यदक्ष केले जाई. शाळेत न जाणाऱ्या मुली किंवा स्त्रिया वाचू शकत. पण त्यांनी वाचायचे ते पोथीपुराणे, कहाण्या हे धर्मग्रंथ. खऱ्या धर्माची ओळख स्त्रीजातीला होण्याचा संभव नसे." (शिरूरकर, १९७६, पृ. दहा-अकरा) या पार्श्वभूमीवर "हिंगण्याचं वातावरण अगदी मोकळं पण शिस्तीचं! .. मुली मोकळेपणी हुतूतू, लंगडी, खो खो खेळत होत्या. फिरायला जात होत्या. हे इतरत्र घडत नव्हतं.बाईबद्दलच्या शालीनतेच्या व्याख्येत धावणं, पळणं इ. गोष्टी बसत नव्हत्या." (खडपेकर,१९९१, पृ. १५६) "हिंगण्याचे विद्यार्थीदशेतले दिवस सुंदरच होते. .. संस्थेत शिक्षक आणि मुली यांचे घरगुती संबंध होते. मुलींनी खूप वाचावं, विचार करावा, चर्चा कराव्या असं शिक्षकांना वाटे. .. हिंगण्याला दर आठवड्यात 'ज्ञानाभिलाषिणीसभा, हा उपक्रम होता. त्या सभेत बोलण्यासाठी मुलींच्या पाळ्या असत." (कित्ता, पृ. १६५)'

महर्षी कर्वे व समकालीन सुधारकांच्या प्रयत्नांतून शिकून पुढे आलेल्या मालतीबाई बेडेकर, कृष्णाताई मोटे, पार्वतीबाई आठवले इत्यादी नवशिक्षित स्त्रियांनी या काळातल्या उपेक्षित स्त्रियांच्या दु:खाला वाचा फोडण्यासाठी लेखन केले. लिंगभावात्मक विषमतेमुळे स्त्रियांच्या वाट्याला येणारी उपेक्षा हा या लेखनाचा केंद्रबिंदू होता. तत्कालीन स्त्रियांच्या

दुःखभोगाच्या हकिगती, तसेच स्त्रीजीवनाच्या धारणा व समजुतींचा दस्त म्हणून या लेखनाला ऐतिहासिक मूल्य आहे. विसाव्या शतकात नवी नियतकालिके सुरू करण्यात काही स्त्रियांनी पुढाकार घेतला होता. सौ. मनोरमा मित्र संपादित 'महाराष्ट्र महिला' (१९०१), सौ. सरूबाई संपादित 'सौभाग्यभांडार' (१९०१), सौ. ताराबाई नवलकर संपादित'स्वदेशभगिनी' (१९०२), सौ. सरस्वती वैद्य संपादित 'प्राचीप्रभा' (१९०७), सौ. गोदूताई शिंदे संपादित 'सुबोधिनी' (१९१३), सौ. सीताबाई सावंत संपादित 'गृहिणीरत्नमाला' (१९१६), तारा टिळक व पिरोज अभ्यंकर संपादित 'गृहलक्ष्मी' (१९२७) इत्यादी नियतकालिकांची यादी पाहिली तरी नवशिक्षित स्त्रियांच्या प्रगतीचा लंबक कसा विस्तारू लागला होता याची कल्पना येते. या नियतकालिकांतून प्रसिद्ध होणाऱ्या लेखनातून स्त्रीजीवनविषयक वास्तवाची समीक्षा व नव्या परिवर्तनाविषयी अपेक्षित असलेल्या धारणा शब्दबद्ध होत होत्या. उदाहरणार्थ, पुरुषसत्ताक समाजरचनेवर भाष्य करणारे आणि या बंधाच्या जोखडातून बाहेर पडण्याची प्रेरणा जागवणारे एक ब्रिदवाक्य ताराबाई नवलकर यांच्या 'स्वदेशभगिनी'च्या दर्शनीपृष्ठावर छापलेले असे :

"स्त्रिया पुरुषांची असती खेळणी ती / बालकांच्या जणू बाहुल्या की हाती
काळ येईल निश्चये तुम्हा सांगे / मुक्त होऊ एकल्या ज्ञानमार्गे"

स्त्रियांना ज्ञानमार्गातूनच बंधमुक्तीचा मार्ग सापडेल असा विश्वास या ब्रिदवाक्यातून दिसून येतो. महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना स्त्री-पुरुष समानतेच्या मूल्यांवर अधिष्ठित असावी असा एक डोळस आग्रह या नियतकालिकांतील लेखनांतून व्यक्त होताना दिसतो. 'प्राचीप्रभा' या नियतकालिकातील 'स्त्री-शिक्षणवाद' (१९०९) या लेखातून एका वाचक भगिनीने स्त्री-पुरुष शिक्षणात भेद करता कामा नये, अशी भूमिका मांडली आहे. तिच्या मते स्त्री-पुरुषांचा सहयोग परस्परांना उपयोगी पडणारा, आपापसातला दुरावा कमी करणारा व्हावयाचा असेल तर दोघांच्या शिक्षणातही समतुल्यता राखली पाहिजे. (खडपेकर, १९९१, पृ. ६) स्त्रीला पुरुषाप्रमाणे मूलभूत स्वातंत्र्य असावे की पतीच्या सावलीतले गृहापुरते मर्यादित स्वातंत्र्य हवे यावरही चर्चा झालेली आहे. 'प्राचीप्रभा'च्या नोव्हेंबर १९०९ च्या अंकात सावित्रीबाई शीलकर यासंदर्भात लिहितात की, "सृष्टीचा क्रम असा आहे की, पुरुषांनी बाहेरची जास्त श्रमाची कामे करून पैसा अडका घरात आणावा आणि बायकांनी घरातल्या छायेत राहून त्याचा काटकसरीने योग्य उपयोग करावा." याउलट काही स्त्री-वाचक पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना स्वातंत्र्य हवे अशी अपेक्षा व्यक्त करीत होत्या. या वाचक पत्रांतून स्त्रियांनी लिहिले होते की, "ज्याप्रमाणे आपले पती चोहोंकडे फिरून स्वतंत्र रीतीने व्यवहार करतात तेच स्वातंत्र्य आम्हां स्त्रियांस असावे. पतीच्या वर्चस्वामुळे आमच्या समाजाची अती नीच अशी दारिद्र्यदशा झाली आहे. कारण उघडच आहे की संसारगाड्याचे पतिरूप चाकच फिरणारे पण स्त्रीरूपी चाक हे निव्वळ

धोंड्यासारखे स्थिर. तेव्हा दारिद्र्य नको असेल तर पुरुषांसारखेच स्त्रियांनाही स्वातंत्र्य असावे." 'गृहिणीरत्नमाला'च्या संपादक सीताबाई सावंत यांनी या विषयावर आपले मत प्रतिपादन करताना 'स्त्रियांनी पुरुषांच्या बरोबरीचे स्वातंत्र्य न मागता गृहांतर्गत स्वातंत्र्यापुरताच आपल्या स्वातंत्र्याचा परिघ मर्यादित ठेवावा' असा सल्ला दिला होता. (खडपेकर, कित्ता, पृ. ९-१०) विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत तरी स्त्री स्वातंत्र्याच्या वा स्त्री-सबलीकरणाच्या विचारमंथनाचा पैस अजून फारसा विस्तारला नव्हता, असे लक्षात येते.

**विवाहासंबंधीच्या सुधारणा :**

विवाहविधींविषयीच्या सामाजिक धारणा बदलणे हे कठीण काम या शतकातील सुधारकांनी अंगावर घेतले होते. विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन-तीन दशकात हिंदू धर्मशास्त्रातील विवाह विधींची चिकित्सा करणाऱ्या चर्चा सुरू होत्या. बालविवाहाकडून प्रौढ विवाहपद्धतीकडे होणाऱ्या सामाजिक धारणांतील बदलाच्या खुणाही वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेल्या काही वृत्तांतांवरून वाचता येतात. अकाली वैधव्य प्राप्त होणाऱ्या बालविधवांच्या अवहेलनांची समीक्षा करताना एकनाथ अमृतराव चौधरी यांनी लिहिले होते की, अविवाहित पुरुषांच्या सोयीसाठी वेश्या निर्माण करणारी ही प्रथा आहे. त्या काळात पावणेपाच लाख वेश्या असल्याची नोंदही त्यांनी केली आहे. 'आपल्याकडे बालविधवांना ब्रह्मचर्याची दीक्षा देऊन सृष्टिकर्माच्या विरुद्ध वर्तन करावयास भाग पाडतात, त्यामुळे खूप मोठी राष्ट्रीय हानी होते. यामुळे भावी काळात जन्माला येणाऱ्या संततीचा अगोदरच प्राण घेतल्यासारखे होते" ('विधवांचा कैवारी, १९२६). भ्रूणहत्येपेक्षाही जास्त हिंसक घटना म्हणून लेखक या घटनांची समीक्षा करतो. अशा घातक विवाहप्रथा बंद करण्यासाठी समाजजागरण करण्याचे आणि सुधारणावादाला पोषक असे आदर्श विवाह घडवून आणण्याचे प्रयत्न या काळात होऊ लागलेले दिसतात.

२९ जून १९१० रोजी २१ वर्षे वयाचे सांगलीकर श्रीमंत चिंतामणराव आप्पाजीराव व अमरावतीचे मोरो जोशी यांची १८ वर्षांची विदुषी कन्या कमळाबाई यांचा विवाह हा खरा प्रौढ विवाह होता. प्रौढ विवाहाचे महाराष्ट्रातील हे पहिलेच उदाहरण असल्याने चिं. वि. वैद्य यांनी केसरीत पत्र प्रसिद्ध करून या सुधारणेची प्रशंसा केली होती. "स्त्री शिक्षणाची आवश्यकता व प्रौढ विवाहाने समाजाचा किती फायदा होतो हे सांगणारे पुष्कळ असतात, परंतु आचरणाने उपयुक्तता कबूल करण्याचेच नव्हे तर लोकांच्या गैरसमजुतीने उत्पन्न झालेल्या धर्मभोळ्या कल्पनांस बळी न पडता त्रास सोसून सोदाहरणाने दाखवून देणारे समाजाग्रणी म्हणून उभयतांसही धन्यवाद द्यायला हवेत." वैद्यांनी 'खरा प्रौढ विवाह म्हणजे शिक्षण संपवून गृहस्थाश्रम स्वीकारणारा पुरुष योग्य आणि विवाहकाल व ऋतु प्राप्त झाल्यावर स्त्री योग्य' असा प्रौढ विवाहाचा अर्थही स्पष्ट केला. मात्र आपल्याकडे घड

मुलाचा अभ्यास नाही व धड मुलीची शारीरिक वाढ पुरी नाही असे असता विवाह खुशाल साधले जातात यावर टीकाही केली होती. (केसरी, ५ जुलै १९१०)

चिं. वि. वैद्य यांच्या या पत्रावर उलटसुलट प्रतिक्रिया उमटल्यावाचून राहिल्या नाहीत. वि. ना. म. या नावाने एका पत्रकर्त्याने अशा विवाहात उपयुक्ततेचे अधिकार कुणी ठरवायचे असा प्रश्न करून वैद्यांच्या लेखावर आक्षेप नोंदवला. सामाजिक शास्त्राचा अधिकार शंकराचार्यांना सुद्धा नसता श्री. वैद्य यांनी तो श्रेष्ठ कुटुंबातील म्हणून सांगलीकरांस दिला हे योग्य नव्हे, असे या पत्रकर्त्याचे मत होते. प्रौढ विवाहाने धार्मिक आचार-विचारात स्वैराचार शिरेल अशी भीतीही या पत्रकर्त्याने व्यक्त केली होती. (केसरी, १९ जुलै १९१०) गं. गु. काळे या पत्रलेखकाने या चर्चेत भाग घेताना प्रौढ विवाहाचे समर्थन करून समाजधुरिणांच्या विचारार्थ प्रश्न उपस्थित केला होता की, "वैदिक लग्नाचे वेळी वधू रजस्वला असत. शिवाय त्यांना तीन रात्रीनंतर परवानगी असे. पुढे एक वर्ष ब्रह्मचर्य असे... आजही आपण त्याच मंत्रांनी बालविवाह लावतो.. हे आमचे अज्ञान नव्हे काय?" प्रौढ वधूस ऋषि 'वीरपुत्रा प्रसवणारी हो' असा वर देत, म्हणून बलिष्ट प्रजा निपजत असे, हा दाखलाही आपल्या मताच्या पुष्टीसाठी त्यांनी नमूद केला होता. (केसरी, ६ फेब्रु. १९१२) १९२९ साली बालविवाहाला पायबंद घालणारा (सारडा) कायदा झाला, तेव्हा कायदेशीर मार्गाने हक्कसंरक्षणाची एक नवी आशा स्त्री वर्गात पल्लवीत झाली होती.

१९२० साली विवाहातल्या जुन्या रूढी दूर व्हाव्यात यासाठी 'विवाह' नामक एक प्रबोधनपर पुस्तिका मो. वि. शिंगणे यांनी लिहून प्रसिद्ध केली होती. या पुस्तिकेतून विवाहयोग्य कन्या कोणती, विवाहयोग्य मुला-मुलीस मधुपर्क, लज्जाहोम, सप्तपदी इत्यादींचे ज्ञान कसे आवश्यक असते इथपासून विवाह झाल्यावर स्त्रीची योग्यता कशी असावी, पतीबरोबर तिची वागणूक कशी असावी इत्यादी विषयांवर मार्गदर्शन केले होते. १९२८ साली प्रसिद्ध झालेल्या द. वा. निमकर यांच्या *'हिंदू लग्नसंस्था'* या पुस्तकातून बालविवाह, विधवाविवाह याबाबत सनातन्यांच्या कर्मठ विचारांचेच समर्थन केले होते. हिंदू धर्मशास्त्रात विवाह संस्कारात 'सप्तपदी'ला महत्त्व असून ती झाली नाही तर विवाह पुरा होत नाही अशी समाजधारणा होती. या अनुषंगाने रा. भि. जोशी यांनी 'आमच्या विवाहविधीवरून सुचलेले विचार' नामक लेखमाला लिहिली. या लेखमालेत त्यांनी सप्तपदी,विवाहहोम पूर्तता, सप्तर्षिदर्शन, गुरुवर्य व आप्तांची आशीर्वचने यांचे निवडक मंत्र उद्धृत करून त्यातला मथितार्थ विशद केला होता आणि विवाहविधीसंबंधी काही सकारात्मक सूचनाही केल्या होत्या :

१. सप्तपदी मंत्राचा अर्थ लक्षात येण्यासाठी वधू-वर उभयता प्रौढ असायला हवेत.
२. प्राचीन आर्य गृहिणीला उच्च स्थान असे, त्यांना हलके लेखीत नसत, ती स्थिती आता राहिलेली नाही. ख्रिस्ती विवाहपद्धतीतही स्त्री स्वतंत्र नाही, तिला नवऱ्याची

सेवा आजन्म करीन अशी शपथ घ्यावी लागते. विवाहविधीतले हे वाक्य काढून टाकण्यासाठी इंग्लिश स्त्रिया पार्लमेंटात हक्क मिळवण्याचा प्रयत्न करीत आहेत; हा कायदेशीरपणाचा घटकही लक्षात घेणे गरजेचे आहे.

३. मुलामुलींना लग्नाचे संबंधी म्हणण्यात येणारे मंत्र समजावून सांगायला हवेत. निव्वळ मानापानाचे करार नकोत. निदान चार-आठ दिवस अगोदर विवाहेच्छुंनी ते समजून घेणे अगत्याचे आहे. (केसरी, २५ जून १९१२)

परंपरेचे सातत्य टिकवताना जरूर तेथे बदल करीत जाण्याची परिवर्तनक्षमता असली तर सांस्कृतिक संघर्षातले घर्षण अंगावर येत नाही, अशा आशयाची मर्मदृष्टी या लेखनातून पुढे येते होती.

**हुंडा पद्धती मोडण्याचे प्रयत्न :**

हुंडा पद्धती संपुष्टात यावी याविषयीही या काळात बरीच चर्चा झाली. बापाजवळ हुंडा देण्यासाठी पैसे नसल्याने स्नेहलता नावाच्या एका तरुणीने पित्यास दोष न देता स्वत:ला जाळून घेण्याची घटना १९१४ साली बंगाल प्रांतात घडली. या घटनेच्या तीव्र प्रतिक्रिया उमटल्या, निषेध सभा झाल्या. 'अॅन्टी डॉवरी लीग' नावाची संस्था स्थापन झाली. स्नेहलतेचा पुतळा उभारण्यासाठी स्त्रियांनी आपले सौभाग्यालंकार स्त्रीसुधारणा फंडास दान केले. महाराष्ट्रातही या घटनेचे पडसाद उमटले. पुण्यात फर्ग्युसन कॉलेजात विद्यार्थ्यांनी सभा घेऊन हुंडापद्धतीनिर्मूलनाचा ठराव पारित केला; महाविद्यालयाच्या ग्रंथालयात स्नेहलतेची तसबीर लावण्यात यावी असाही ठराव करण्यात आला. (केसरी ३ मार्च १९१४) कायद्याने हा प्रश्न सोडविता येईल का? याविषयीही चर्चा सुरू झाल्या. मोर्लेसाहेबांना कायदा करून वंगभंग रद्द करता येतो तशी हुंडाबंदी करणे शक्य नाही; ही समस्या सोडविण्यासाठी समाजधारणाच बदलायला हव्यात असा विचार या काळात पुढे येताना दिसतो. केवळ सभा घेऊन, पुतळा उभारून अथवा शपथा घेऊन असे प्रश्न सुटत नसतात; त्यासाठी तरुणांपेक्षा आईबापांनीच हुंडा देण्याघेण्याविषयी कणखरपणे प्रतिज्ञाबद्ध झाले पाहिजे, अशा आशयाचे विचार मांडले जाऊ लागले. हुंडा देणे-घेणे हे धार्मिकदृष्ट्या पाप कसे आहे, यावरही विश्लेषक भाष्य केले गेले. 'केसरी'कारांनी 'हुंड्यावर बहिष्कार' या अग्रलेखात या प्रश्नाचा उहापोह करून बालविवाह, पुनर्विवाह, कुमारिकांचे प्रश्न यासंबंधीच्या सर्व प्रथा मोडीत काढण्यासाठी काही पायाभूत उपाय सुचविले होते :

१. मुली सुज्ञ कराव्यात, त्यांना शिक्षण देऊन लग्नाची वये वाढवावीत.
२. पोटजातीत विवाह करून मुला-मुलींचे पसंतीचे क्षेत्र वाढवावे.
३. स्त्रियांनी दागिन्यांची हाव सोडावी.
४. लग्न धार्मिक विधीने व हौसेने करावे; पण त्यात करार वा अटींचे ओझे लादू नये.
५. व्याह्याव्याह्यात स्नेहभाव वाढवावा. (केसरी, ३ मार्च १९१४)

'केसरी'तून अनेक पत्रलेखकांनी या अग्रलेखावर आपली मते मांडली. दलाल नावाच्या पत्रलेखकाने कोमटी लोकांतील हुंडापद्धतीची वेगळी तऱ्हा कथन केली. गरीब वा श्रीमंत कोमटी लोकांत मुलींची लग्ने श्रीमंताशीच व्हावी यासाठी धडपड चाललेली असते; मात्र त्यांच्याकडे मुलीला हुंडा द्यावा लागत नाही, उलट मुलाच्या बापाकडून वधूपिता हुंडा घेतो. दोन अपत्ये झाल्यावर हुंड्याची रक्कम व घेतलेले सोने मुलीस परत करण्याची रीत आहे. त्यामुळे श्रीमंतांची लग्ने विनासायास होतात; परंतु गरीब, सुशिक्षित व कुलीन तसेच रहातात. परिणामत: स्वजातीतल्या वा अन्य जातीतल्या मुली विकत आणण्याचे प्रकार सुरू झालेत. हा कन्या विक्रयाचा प्रकार थांबविण्यासाठी ब्राह्मणांच्या हुंड्याइतकाच हाही प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत, असे हा पत्रलेखक म्हणतो. (केसरी, १७ मार्च १९१४) अनेक अंगांनी हुंडा प्रश्नाची चर्चा सुरू असतानाच या प्रथेला मोडता घालण्याचेही प्रयत्नही महाराष्ट्रात झालेले दिसतात. फर्ग्युसन कॉलेजातील श्रीपाद भट या तरुणाने पाच हजार रुपयांचा हुंडा न स्वीकारता परस्परांनी खर्च वाटून घेऊन लग्न करण्याचा धडा घालून दिला.

विवाहाच्या पारंपरिक रुढी-चालीरीती मोडीत काढण्याचे असे विचारमंथन सुरू असताना समाजातल्या काही सुधारणावाद्यांच्या घरात मात्र परंपरा गिरविण्याचेच काम सुरू असल्याचे चित्र होते. प्रार्थना समाजाचे डॉ. रा. गो. भांडारकर यांनी त्यांच्या महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या कन्येचा विवाह विलायतेत उच्च शिक्षण घेत असलेल्या मुलाशी लावून दिला; मात्र प्रार्थना समाजाने स्वीकारलेल्या प्रतिमापूजनाच्या आधुनिक विवाहपद्धतीऐवजी जुन्या शास्त्रोक्त पद्धतीचाच अनुनय केला. न्या. रानडे यांचे दत्तकपुत्र नारायणराव यांचाही विवाह जुन्या पारंपरिक पद्धतीनेच झाला. सुबोधपत्रिकेने याबद्दलची नापसंती स्पष्ट शब्दांत व्यक्त केली होती.

**पुनर्विवाहाविषयीच्या धारणा :**

सामाजिक जीवनात एकपत्नीव्रताचा मूल्यादर्श प्रमाण मानला जात असल्याने कुणी पुनर्विवाह केल्यास त्या काळी समाजात निषेधाच्या प्रतिक्रिया उमटत असत. पुनर्विवाहाच्या घटनेवर टीपाटिप्पणी ही व्हायचीच. सर परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या गतभर्तृका कन्येशी झालेल्या पुनर्विवाहावरून अशा चर्चा झाल्या होत्या. १९१० साली श्री. पावगी यांनी 'आर्यांच्या लोकमताविषयी आदर' नामक लेख लिहून या पुनर्विवाहास रामशास्त्री, काशीचे पंडित व पेशव्यांची संमती होती, असे म्हटले होते. त्यावरून 'केसरी' पत्रात वाद सुरू झाला. वासुदेवशास्त्री खरे यांनी पावगींच्या विधानाला आक्षेप घेऊन ही कपोलकल्पित दंतकथा असल्याचे म्हटले. सदर पुरावा निगुडकरांच्या ग्रंथावरून घेतल्याचा खुलासा पावगींनी केला. वि. का. राजवाडे यांनीही निगुडकरांच्या चरित्रातील सामुग्री नीट तपासून घेतलेली नसल्याने पावगींनी केलेले विधान हे वस्तुस्थितीस धरून

नसून एक दंतकथाच असल्याचा खुलासा प्रसिद्ध केला. (केसरी, २३ एप्रिल १९१२) १९११ साली पुनर्विवाहाच्या प्रश्नावर अ. म. चौबळ यांचे 'पुनर्विवाहशास्त्रादि विचार' नामक पुस्तक प्रसिद्ध झाले. या पुस्तकात श्रुति-स्मृतींचा अढावा घेऊन पुनर्विवाहाविषयी नवा विचार मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला. पुनर्विवाहास प्रतिकूल असणाऱ्या धर्माधिकाऱ्यांनी अंतर्मुख होऊन सुधारणेच्या विचारांकडे उदारदृष्टीने पहावे या उद्देशाने पुस्तकाची मांडणी करण्यात आली होती.

१९१३ साली फर्ग्युसन कॉलेजातील प्राध्यापक गोविंद चिमणाजी भाटे यांनी वयाच्या २६ व्या वर्षी गजराबाई नामक मराठा समाजातील विधवेबरोबर पुनर्विवाह केला होता. त्याविषयीची चर्चा पुण्यात 'ज्ञानप्रकाश', 'केसरी' या पत्रांतून सुरू होती. (केसरी ८ एप्रिल १९१३) प्रा. भाटे यांचा हा तिसरा विवाह होता, तोही आंतरजातीय होता. शिवाय मराठा समाजात पुनर्विवाहाची चाल नसताना झाला होता. त्यामुळे केवळ अपत्यप्राप्तीसाठी भाटे यांनी हा विवाह केला असल्याचे बोलले जात होते. गजराबाईंना वयाच्या १४ व्या वर्षीच वैधव्य आले होते, त्यामुळे तिला शिक्षणासाठी अनाथ बालिकाश्रमात ठेवले होते. तिथे चार-पाच वर्षे शिक्षण घेतल्यानंतर गजराबाईला दिल्ली येथे सुईणीचे प्रशिक्षण घेण्यासाठी पाठविण्यात आले. हे शिक्षण पूर्ण झाल्यावर तिने आग्रा येथे बायकांसाठी असलेला सब असिस्टंट सर्जनचा शिक्षणक्रम पूर्ण केला. १४ वर्षे वयाच्या एका विधवेने वैधव्यप्राप्तीनंतर एवढा शैक्षणिक पल्ला गाठणे ही त्या काळातली निश्चितच कौतुकाची बाब होती. स्त्रीशिक्षणाकडे आणि विधवा पुनर्विवाहाकडे पाहण्याचा दृष्टिकोण निकोप होण्यासाठी अशी उदाहरणे पुढे येऊ लागली होती, हे विशेष महत्त्वाचे आहे.

त्यावेळच्या चर्चाविश्वात सुधारक व पाखंडी असा कलगीतुरा चालत असे. पुण्यात वेदशास्त्रसंपन्न का. वा. लेले यांनी वयाच्या ४५ व्या वर्षी दुसरे लग्न केले. त्यावर 'ज्ञानप्रकाश' पत्रातून टीका झाली. या टीकेला उत्तर देताना का. वा. लेले यांनी आप्पाजी द्रविड यांच्या दुसऱ्या लग्नाचा दाखला देऊन सुधारकांनी दुसरे लग्न केल्यास पहिले आड येत नाही, हे कसे? असा प्रतिप्रश्न करून सुधारकांचे लेख छापणाऱ्या 'ज्ञानप्रकाश'वर आगपाखड केली. लेले यांनी आपल्या दुसऱ्या लग्नाचे समर्थन करताना म्हटले होते की, "विधुरांनी विवाह न करता देशकार्य करावे हे उत्तम; परंतु मी समर्थ नाही. श्री. राजवाडे किंवा प्रो. जिनसीवाले प्रमाणे कडकडीत ब्रह्मचर्य कठीण. शिवाय ढोंग माहीत नाही." त्यांनी पुढे असेही म्हटले होते की, "लहान मुलीशी लग्न करणे मी अयोग्य मानतो. तरी धर्माविरुद्ध जाण्याचे धैर्य माझ्यात नाही. वय ५० च्या पुरुषाने वय २० च्या मुलीजवळ लग्न करणेही निंद्यच. धर्मशास्त्र नसते तर ४० वर्षांच्या शुद्ध स्त्रीशी मी लग्न केले असते, म्हणून निरुपायास्तव लहान मुलीशी द्वितीय विवाह लावणे भाग पडले." (केसरी, २९/०८/१९११)

१९४० च्या सुमारास प्रथम पत्नी व मुले हयात असताना कादंबरीकार ना. सी. फडके यांनी त्यांच्यापेक्षा वीस वर्षे वयाने लहान असलेल्या कमल दीक्षित या मुलीबरोबर लग्न केले व पुण्याच्या प्रो. हर्षे यांनी वेणूताई पानसे यांच्याशी विवाह केला. या 'यशवंती विवाहा'चा निषेध करण्यासाठी कोल्हापूरात करवीर भगिनी मंडळाने व पुण्यात वनिता समाज संस्थेने निषेधाच्या सभा आयोजित केल्या होत्या. विवाहविषयक रूढी-प्रथांबाबत सुरू असलेल्या सामाजिक स्थित्यंतरांतले अंतर्गत खडखडाट या चर्चांवरून लक्षात येतात.

**विधवापुनर्वसन :**

अकाली येणाऱ्या वैधव्यामुळे येणारी हताशा घालविणे, घरात आणि समाजात होणारी उपेक्षा टाळणे हा तत्कालीन विधवांसमोरचा मोठा प्रश्न होता. विधवांच्या वाट्याला येणारी असह्य सामाजिक उपेक्षा सोसण्यापेक्षा सती जायला समाजाने परवानगी द्यावी अशी याचिका १९२० साली एका भगिनीने नाशिकच्या हिंदूधर्मपरिषदेसमोर दाखल केली होती. (दिवेकर, १९३०, पृ. ३२). या खटल्याच्या पार्श्वभूमीवर विधवांच्या पुनर्वसनाचा सामाजिक प्रश्न ऐरणीवर आलेला होता. बालविधवांपासून प्रौढ विधवांपर्यंत विधवांची वयोगटानुसार उपलब्ध असलेली पुढील वर्गवारी पाहता पुनर्वसनाच्या प्रश्न एकसारखा नव्हता हे लक्षात येते.

**हिंदुसमाजातील विधवांची संख्या :**

| वयोगट | संख्या |
|---|---|
| १ ते ५ वर्षे | ११,८९२ |
| ५ ते १० वर्षे | ८५,०३७ |
| १० ते १५ वर्षे | २,३२,१४७ |
| १५ ते २० वर्षे | ३,९६,१७२ |
| २० ते २५ वर्षे | ७,४२,८२० |
| २५ ते ३० वर्षे | ११,६३,७२० |
| ३० ते ३५ वर्षे | १८,१८,३६३ |
| ३५ ते ४० वर्षे | १६,९६,७०६ |

(दिवेकर, १९३०, पृ. १९)

विधवांच्या वाट्याला येणारे एकाकीपण घालविण्यासाठी आणि त्यांचे सामाजिक पुनर्वसन करण्यासाठी त्यांना साक्षर बनवणे ही प्राथमिक गरज होती. त्यासाठी अमेरिकेतल्याप्रमाणे प्रौढ्साक्षरतेच्या 'चांदण्यातल्या शाळा' (Moonlight Schools) काढाव्यात; अल्पशिक्षित विधवांना कार्मिक कौशल्यांचे शिक्षण देऊन स्वावलंबी बनवावे अशा प्रकारचा विचार पुढे येत होता. बहुतांश विधवांना घरगुती कामातच रस घ्यायला आवडते, हे लक्षात घेऊन त्यांच्यासाठी सूत कातणे, कशिदा काढणे, मुलांसाठी खेळणी तयार करणे, चित्रे काढणे, तसबिरांना चौकटी बसविणे, पायमोजे-गळपट्टे विणणे, जानवे तयार करणे, उदबत्त्या वळणे, मसाले-लोणची-पापड करणे इत्यादी पूरक कौशल्ये शिकवून घरगुती उद्योग करण्याचे मार्ग प्रशस्त करावेत अशा प्रकारच्या विधायक सूचना व उपक्रम पुढे येताना दिसत होते. अधिक शिकलेल्या विधवांना अध्यापन व वैद्यकीय क्षेत्रातील प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून द्याव्यात असा विचार शिक्षणक्षेत्रातील धुरीण करीत होते. महर्षी कर्वे यांच्या हिंगण्याच्या आश्रमातून, महिला विद्यापीठाच्या माध्यमातून असे काही प्रयत्न सुरू झाले होते.

विधवांच्या पुनर्वसनासाठी काही स्थायी स्वरूपाच्या उपाययोजना पुढे आणण्याचेही प्रयत्न सुरू होते. उदाहरणार्थ, नवऱ्याच्या मृत्यूनंतर विधवांना उदरनिर्वाहासाठी येणारी अडचण दूर करण्याच्या हेतूने 'बॉम्बे विडोज् पेन्शन फंड' स्थापन झाला. नवऱ्याकडून दरमहा थोडी रक्कम घेऊन नवऱ्याच्या पश्चात विधवेस दरमहा पाच रुपयांपासून पन्नास रुपयांपर्यंत पेन्शनची सोय करण्याची ही योजना अर्थातच लोकाश्रयास पात्र ठरली होती. लग्नसमारंभासारख्या मोठ्या खर्चिक कार्याचे वेळी काही रक्कम बाजूला ठेवून ती पैसा फंड, राष्ट्रीय शिक्षण या संस्थांना द्यावी असाही प्रघात पडू लागला होता. ग्वाल्हेरचे केतकर यांनी पुणे येथे १९ मे १९०७ रोजी झालेल्या विवाहाबद्दल पैसा फंडास १० रुपये व विजापूरकर यांनी १५ रुपये देणगी देऊन या उपक्रमाचा नमुनादर्श घालून दिला होता. (केसरी १८ जून १९०७) मुंबईस बॅ. जयकर प्रभृतींच्या पुढाकारातून 'श्रद्धानंद रेस्क्यू होम' स्थापन करण्यात आले होते व तेथे जवळपास ७५ महिलांची पुनर्वसनव्यवस्था करण्यात आली होती.

विधवा किंवा विधुरांच्या पुनर्वसनाचा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी हिंदुसमाजातील वानप्रस्थाश्रमाच्या संकल्पनेचे पुनरुजीवन करावे असाही एक विचार या काळात मांडण्यात येत होता. विधवा, विधूर व समाजातील वयस्क लोकांनी समाजावर आपले ओझे टाकण्यापेक्षा रात्रीच्या शाळा काढून, कौन्सिलात झगडण्यापर्यंत जे जे शक्य असेल ते सामाजिक काम अंगावर घेऊन कार्यरत राहिले पाहिजे. सार्वजनिक कार्यात काम करू इच्छिणाऱ्या अशा वानप्रस्थाश्रमीयांकरिता प्रशिक्षण संस्था उभाराव्यात अशा आशयाचा एक नवा विचार या काळात पुढे येत होता. (दिवेकर, १९३०, पृ. २१-२२२)

**विवाहविषयक कायदे :**

मराठी माणसाची लैंगिक व वैवाहिक जीवनाची समज वाढविण्यासाठी 'समाजस्वास्थ्य' नामक एक महत्वाचे मासिक या काळात र. धों. कर्वे चालवित होते. विवाहसंस्थेसंबंधी हिंदुस्थानातील कायदे, रूढी-परंपरा, तसेच फ्रेंच, अमेरिका, रशिया, इंग्लंड इत्यादी देशांतील विवाहविषयक कायदे व रूढी-परंपरा यांचा तौलनिक विचार समाजापुढे मांडून ह्या मासिकाने सामाजिक प्रबोधनाची एक वेगळी वाट प्रशस्त केली होती. विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, स्त्री-पुरुषांच्या कामजीवनाचे विविध पैलू यांची विज्ञाननिष्ठ दृष्टीतून चर्चा या मासिकातून होत असे. स्त्री व पुरुष यांची नीती निरनिराळ्या मापांनी मोजण्याचे तत्त्व सर्वत्र असल्याने विवाहविषयक कायदे आणि मानदंड यावर पुरुषसत्ताक नीतीचाच प्रभाव सर्वत्र आढळून येत होता. विवाहासंबंधीचे कायदे कोणत्याही देशांत समाधानकारक नसल्याचे एक अभ्यासपूर्ण निरीक्षण या चर्चांतून आधोरेखीत होत होते. महाराष्ट्रातही बहुतांश विवाह हे वधू-वरांच्या पसंतीने न होता पालकांच्या पसंतीने होत असत. विवाहसंस्कारात एकमेकांशी एकनिष्ठ राहाण्याची घेतलेली प्रतिज्ञा स्त्री अक्षरश: पाळत असे; पुरुष मात्र लग्नाची पहिली पत्नी हयात असताना दुसरे लग्न करायला मोकळा असे. पुरुषाला वाटेल तितक्या स्त्रियांशी एकाच वेळी लग्न करता येत असे; पण एक नवरा जिवंत असताना स्त्रीला दुसरे लग्न करता येत नसे; एवढेच नव्हे तर त्या जिवंत नवऱ्याजवळ राहाण्याची स्त्रीची इच्छा नसेल तर तिला घटस्फोट मागता येत नसे. याचे कारण सर्व जगभर कायद्याच्या दृष्टीने स्त्री म्हणजे नवऱ्याच्या जंगम इस्टेटीचाच भाग समजण्यात येत असे. स्त्रियांस स्वत:चे पोट भरण्याची ताकद बहुधा नसल्यामुळे विवाह हा स्त्रियांचा धंदाच होऊन बसला आहे व त्यांस स्वातंत्र्याची किंमतही कळत नाहीशी झाली आहे, असे निरीक्षण कर्व्यांनी नोंदवले आहे. विवाहाचे मूळ प्रयोजन काय, याचीही कर्व्यांनी विविध अंगांनी चर्चा केली आहे. त्यांच्या मते प्रजोत्पती हाच केवळ विवाहाचा उद्देश असत नाही, असू नये; किंवा 'एकच प्याला' नाटकातील सिंधू म्हणते त्याप्रमाणे 'असे पति देवचि ललनांना' असा पती-पत्नीत देव-भक्त किंवा स्वामी-सेवक संबंध कल्पिणेही अस्वाभाविकच आहे. पती-पत्नी संबंध प्रेमाचा, मैत्रीचा, जिव्हाळ्याचा असला पाहिजे. मात्र हल्लीच्या विवाहसंस्थेच्या मुळाशी स्त्रीच्या शरीरावरचा पुरुषाचा जो अमर्याद हक्क आहे, तो स्त्री-पुरुषांच्या निरामय सहजीवनातला मोठा अडसर बनला आहे. विवाहविषयक कायद्यांमध्ये सुधारणा करताना हा अमर्याद हक्क नाहीसा करण्याला प्राधान्य दिले पाहिजे, असा त्यांचा अभिप्राय आहे. (कर्वे, १९३१, पृ. १२४) कर्व्यांच्या मते विवाह हा दोन व्यक्तींमध्ये होणाऱ्या इतर कोणत्याही करारासारखा एक करार असतो; व अन्य करारांप्रमाणे दोघांपैकी एकाच्या खुषीने हा विवाहाचा करारही मोडता आला पाहिजे. मात्र समान हक्क देण्याची पुरुषांची व घेण्याची स्त्रियांचीही तयारी नाही,

हीच यातली खरी अडचण आहे. विवाहबंधनांचा हा जुलूम नाहीसा होण्यासाठी स्त्री-पुरुषांना सांपत्तिक स्वातंत्र्य मिळणे जरूरीचे असल्याचे मत त्यांनी मांडले होते. पोटाकरिता लग्न करणे जोपर्यंत स्त्रियांना जरूर पडत आहे, तोपर्यंत त्यांची गुलामगिरी संपणे शक्य नाही असे त्यांना वाटत होते. (कर्वे, १९३१, पृ. २५, १०४, १२३- १२४)

एतद्देशीयांच्या धार्मिक-सामाजिक प्रथा-परंपरांमध्ये हस्तक्षेप न करण्याचे धोरण असल्याने विवाहविषयक कायदे संमत करण्याविषयी इंग्रज सरकार फारसे उत्सुक नसे. तरीही विसाव्या शतकात भारतीय सुशिक्षितांच्या प्रयत्नाने काही कायदे संमत झाले. १९११ साली बाबू भूपेंद्रनाथ यांनी वरिष्ठ कायदेमंडळात *'विशिष्ट विवाहाचा कायदा'* या नावाचे विधेयक मांडले होते; त्या अनुषंगाने महाराष्ट्रात मिश्र विवाह, अनुलोम विवाह पद्धती याविषयावर विचारमंथन सुरू झाले. भूपेंद्रबाबूंच्या प्रस्तावित विधेयकापूर्वी १८७२ चा 'सिव्हिल मॅरेज ॲक्ट' अस्तित्वात होता. परंतु बदललेल्या परिस्थितीत या कायद्याचा फेरविचार व्हायला हवा अशी एक प्रतिक्रिया या नव्या विधेयकामुळे उमटू लागली होती. हिंदू धर्मातील विवाहपद्धतीत वधूचे वय, वर्ण, जाती, पिंडसंबध याविषयीचे कडक निर्बंध होते. १८७२ च्या कायद्यात सपिंड निर्बंधास सर्वाधिक महत्त्व दिले गेले होते. बाबू भूपेंद्रनाथांच्या विधेयकात सवर्णत्व व रूढ चाली उल्लंघण्यावर भर होता. अर्थातच सनातन्यांचा त्याला विरोध होता; मात्र त्यात कायद्याने लग्न करणारास 'काडीमोडी'चा अर्थात घटस्फोटाचा अधिकार दिला असल्याने सुधारकांना त्यावर टीका करण्याचे काही प्रयोजन नव्हते. 'केसरी'कारांनी या विषयावर ८ ऑगस्ट १९११ रोजी अग्रलेख लिहून बसूंच्या बिलाचे समर्थन केले होते. बिल वादग्रस्त असले तरी त्वेश येण्याचे कारण नाही असे म्हणून केसरीकारांनी बिलास विरोध करणाऱ्यांना प्रश्न विचारला होता की, "मद्यपान, अभक्षभक्षण इत्यादीतून अहिंदुत्व दर्शन घडते ते अंगीकारणाऱ्यांनी बसूंच्या बिलास विरोध का करावा ते कळत नाही. १८७२ चा कायदा राहू देणे व बसूंच्या बिलाकडे दुर्लक्ष करणे म्हणजे अनवस्था प्रसंग होय' असा केसरीकारांचा अभिप्राय होता.

पत्रलेखकांनी बसूंच्या विशिष्ट विवाहाच्या कायद्याच्या अनुषंगाने प्रतिक्रिया द्यायला सुरुवात केली. पुढारलेल्या पारशी समाजाने या बिलाच्या विरोधात सरकारात अर्ज दिला आहे, तेव्हा हिंदुंनीही बिलाचे उच्चाटन केले पाहिजे असे मत सी. के. दामले या पत्रलेखकाने मांडले. (केसरी, १५ ऑगस्ट १९११) विजातीय विवाह शास्त्रसंमत आहेत का? मिश्र विवाह समाजात प्रचलित नाहीत त्याची कारणे काय असावीत? जाती, पोटजाती कशा निर्माण झाल्या, त्याची कारणे काय इत्यादींचा विचार करून अनुलोम विवाह प्रशस्त व प्रतिलोम विवाह निंद्य असल्याचे एका पत्रलेखाने सांगितले. 'मि. बसूंच्या बिलाचा हेतू पोटजातींचे एकीकरण हाच असून राष्ट्रधर्म वाढावा असाच आहे. त्याचा हिंदू समाजाने फायदा करून घ्यावा, असे या पत्रलेखकाचे मत होते. (केसरी, ३ ऑक्टो. व

१० ऑक्टो. १९११) बसू बिलाला विरोध करण्यासाठी मुंबईत आबाजी खरे यांच्या अध्यक्षतेखाली एक सभा घेण्यात आली. या सभेत युरोपातील लग्ने व आपल्याकडील लग्ने यांची तौलनिक चर्चा झाली. युरोपात लग्न म्हणजे ठराव-करार मानला जातो, आपल्याकडे त्याच्या उलट परिस्थिती आहे. त्यामुळे आपल्या धर्मात काडीमोड नाही. पोटजातीत रोटी बेटी असूनही काडीमोड मान्य नाही. त्यामुळे या बिलाने हिंदू धर्माचे मूळच जाऊ पहात असल्याने हे बील मान्य करू नये असा या सभेत ठराव करण्यात आला. शिवाय रजिस्टर लग्नाने लग्नातील पवित्रपणा व गंभीरपणा नाहीसा होतो म्हणून अशी लग्ने घातकच होत असे विचार मांडण्यात आले. (केसरी ८ ऑक्टो. १९११) नंतरच्या काळात र. धों. कर्वे यांनीही 'समाजस्वास्थ्य' मासिकातून घटस्फोटाच्या कायद्याची प्रस्तूतता सिद्ध करणारी बाजू मांडली. त्यांच्या मते घटस्फोटाच्या कायद्याला विरोध करणारे लोक एकतर पुराणमताभिमानी किंवा दुराग्रही असतात. केवळ एखादी गोष्ट वेदांत किंवा स्मृतीत नाही असे म्हणणाऱ्या मनुष्याने आपला मेंदू गहाण ठेवलेला असतो, अशी तिखट प्रतिक्रिया त्यांनी नोंदवली होती. भागीदाराबरोबर न राहाण्याची इच्छा हेच कारण घटस्फोटाला पुरेसे समजले गेले पाहिजे व कोणते कारण विवाह मोडण्यास पुरेसे आहे हा विचार समाजाने प्रत्येक व्यक्तीवरच सोपवला पाहिजे. (कर्वे, १९३१, पृ. १०१-१०२)

१९१८ साली ना. विठ्ठलभाई पटेल यांनी वरिष्ठ कायदेमंडळात हिंदू-हिंदूत संकर (मिश्र) विवाहाचे विधेयक आणले, त्यावरून महाराष्ट्रात विवाहसुधारणेविषयी नव्याने विचारमंथन सुरू झाले. शंकराचार्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत सगोत्र सप्रवर विवाह निषिद्ध असल्याचे म्हटले गेले व या विधेयकाचा निषेध करण्यात आला. हे विधेयक हिंदुस्थानातील ब्राह्मणांच्या मुळाशी घाव घालणारे ठरेल अशी प्रतिक्रिया पुढे आली व युरोपियनांची री न ओढता हिंदुधर्मशास्त्राचा पूर्ण विचार करून पटेल बिलास विरोध केला पाहिजे यावर या सभेत एकमत झाले. (केसरी,२६ नोव्हें. १९१८) याउलट पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत रा. सा. जाधव यांनी 'गोत्राची अडचण फक्त ब्राह्मणांनाच असते, क्षत्रिय, वैश्य यांना पुरोहिताचे गोत्र चालते हे सांगून गोत्राच्या अडचणीमुळे हुंड्याचे मान वाढले असून सामाजिक प्रगतीस अडथळा येत असल्याचे वास्तव कथन केले. त्यांच्या मते सगोत्र विवाह ठेवावा, परंतु सपिंड नको. (केसरी, १ जून १९१५) बिलास संमती दर्शविण्यासाठी पुण्याच्या सुधारक सभेत काही आगंतुकांनी शि. म. परांजपे, गद्रे यांची भाषणे सुरू होताच गोंधळ घातला. (केसरी, २४ डिसें. १९१८) करवीर मठाचे श्री. शंकराचार्य यांच्या अध्यक्षतेखाली पटेल बील पास होऊ नये म्हणून २० नोव्हेंबर १९१८ रोजी दुसरी सभा झाली. प्रश्न धर्मसत्तेचा असल्याने ती राजाच्या हाती जाऊ नये हा विचार प्रमाण मानून विधेयक मागे घेण्याची सूचना करण्यात आली. (केसरी २६ नोव्हें.

१९१८) पुणे येथे मारवाडी समाजाची सभा होऊन सरकारने हिंदू विवाहपद्धतीत लक्ष घालू नये, असा ठराव करण्यात आला. अशा प्रकारच्या सभा पाचोरे, धारवाड, राजापूर, हुबळी येथेही झाल्या. पुणे येथे क्षत्रिय, माळी, कासार, शिंपी, महार, वीरशैव, लिंगायत ज्ञातीच्या वेगवेगळ्या सभा आयोजित केल्या गेल्या. मुंबई, जुन्नर, हनगळ (धारवाड), गोकाक येथेही निषेध सभा झाल्या व व्हाइसरॉयना लेखी खलिता पाठविण्यात आला. (केसरी, ४ फेब्रु. १९१९)

'केसरी'कारांनी मात्र या विषयावर अग्रलेख लिहून बिलाचे समर्थन केले. हे बील बसूंनी आणलेल्या बिलापेक्षा वेगळे असून हिंदू-मुसलमान वा पारशी वा ख्रिस्ती यांच्या संकर विवाहाचे नसून हिंदू-हिंदूंच्या संकर विवाहासंबंधीचे आहे, हे सर्वप्रथम लक्षात घ्यावे हे स्पष्ट करून केसरीकारांनी आपली भूमिका विशद केली. हिंदूंच्या निरनिराळ्या जातीतील विवाह शास्त्रसंमत नसले तरी कायदेशीर समजले जावेत यासाठी हे बील आवश्यक असल्याचे केसरीकारांचे मत होते. हिंदू समाजात अनेक पोटजाती आहेत, त्यांच्यात रोटीव्यवहार चालतात, पण बेटी व्यवहार होत नाहीत. अगदी देशस्थ-कऱ्हाडे-कोकणस्थ यांच्यातही बेटीव्यवहार होत नाहीत. ना. पटेल यांच्या विधेयकामुळे संकर विवाहामुळे संकर जाती निर्माण होतील, परंतु पुढील पिढीस संकीर्ण का होईना 'हिंदुत्व' मिळण्याचे त्यात प्रयोजन असावे यासाठी विवाहविधीत धर्मसंस्कारांचे आवश्यकत्व असावे, अशी केसरीकारांनी सूचना केली होती. (केसरी, १७ सप्टें. १९१८) १९२२ साली प्रसिद्ध झालेल्या कृ. के. गोखले यांच्या *'हिंदू स्त्रियांची कायदेशीर दुर्दशा'* या पुस्तकातून स्त्रियांच्या कायदेशीर हक्कांची विस्ताराने चिकित्सा करण्यात आली व स्त्री-सुधारणेच्या दृष्टीने अनेक कायदे करण्याची आवश्यकता कशी आहे, यावर प्रकाश टाकण्यात आला. माधवराव बागल यांनी *'लग्न : बंधन की तुरुंगवास'* या पुस्तकातून घटस्फोटाच्या कायद्याचा पुरस्कार केला.

**'मुरळी/ देवदासी'प्रथा बंद करण्याचे प्रयत्न :**

जेजुरी, सावंतवाडी इत्यादी भागात लहानपणीच मुलींना देवाला वाहण्याची प्रथा होती. देवाला वाहिलेल्या या देवदासी मुलींना 'मुरळी' म्हणत. मात्र पुढे या खंडोबाच्या मुरळ्या, सावंतवाडीतील देवळ्या, भाविणी, देवदासी, वेश्या व्यवसायाकडे वळत. प्राचीन काळापासून चालत आलेल्या हिंदुस्थानांतील वेश्यावृत्तीचा धर्माशी असलेल्या अनुबंधांचा शोध र. धों. कर्वे यांनी घेतला होता. त्यात त्यांना आढळून आले की, जननेंद्रियांस देव समजण्याची कल्पना आशियामध्ये लोकप्रिय होती व जननेंद्रियांस प्रामुख्य असलेल्या मूर्ती सर्वत्र आढळत. कुमारिकांचे कौमार्य हरण करण्याचे काम प्रथम या मूर्तीकडे असे व तेच काम पुढे मूर्तीच्या पुजाऱ्यांकडे आले. नंतर देवस्थानास पैसा मिळविण्याकरिता कुमारिकांना वेश्याकर्म करण्याची सुरुवात झाली व यातील काही हिस्सा त्यांच्या

आईबापांसही मिळत असे. (कर्वे, १९३१, पृ. ३७) मुरळींना वेश्याव्यवसायाकडे वळविणाऱ्या या धार्मिक प्रथा कायद्याने बंद करण्यास ब्रिटिश सरकार राजी नव्हते. सामाजिक संस्थांनी पुढे येऊन देवदासींचे पालकत्व स्वीकारावे व त्यांना या दुराचारापासून दूर राहण्यास प्रवृत्त करावे असा विचार काही मिशनऱ्यांनी मांडला; त्यादृष्टीने संस्था स्थापन करण्यासाठीही त्यांनी पुढाकार घेतला. या प्रयत्नांना डॉ. भांडारकर यांनी पाठिंबा दिला व देवदासींच्या पुनर्वसनसंस्थेचे उपाध्यक्षपदही स्वीकारले. काशीराम गोडबोले, का. बा. मराठे, मि. काम्पबेल यांचीही नावे त्यात समाविष्ट होती. गणेशखिंडीत न्या. चंदावरकर, कुप्पुस्वामी यांच्या उपस्थितीत सभा होऊन या कामासाठी फंड गोळा करण्यात आला. मिशनऱ्यांकडून हे काम बिनबोभाटपणे होणे शक्य नाही अशी सर्वसाधारण समजूत होती; त्यामुळे या उपक्रमाचे उत्स्फुर्त स्वागत होण्याऐवजी सामाजिक टीका मात्र झालेली दिसते. (केसरी, २० ऑगस्ट १९०७) हिंदू मुलींचे संरक्षण करण्यास संस्थेत मिशनरी सेक्रेटरी कशाला? भांडारकर सोडल्यास इतर सर्व वयस्कर असल्याने त्यांच्या हातून कार्य होणे कठीणच, देवदासींचे पालकत्व हिरावून घेतल्यास त्या कोणाच्या ताब्यात देणार? मिशनऱ्यांच्याच ना?.. प्रसंगोपात्त या संस्थेत बचावलेल्या मुलींना ख्रिस्ती करण्यापेक्षा आहे ती स्थिती वाईट नाही' (केसरी, ३०जुलै १९०७ व १३ ऑगस्ट १९०७) अशा प्रतिक्रिया देऊन मूळ समस्येकडे गांभीर्याने पाहण्याचे टाळण्याचीच प्रवृत्ती दिसून येत होती.

**'संकेतगृहां'चा प्रश्न :**

स्त्री-पुरुषांचे विवाहबाह्य संबंध, लैंगिक जीवनातील समस्या, वेश्यागृहे यासंबंधीच्या चर्चा सार्वजनिकरित्या वृत्तपत्रादि माध्यमांतून होऊ लागल्या होत्या. 'समाजस्वास्थ्य' मासिकातून र. धों. कर्वे यांनी याबाबतीत मोठा पुढाकार घेतला होता. मुंबईत फोरास रोड, फॉकलंड रोड व त्या बाजूच्या इतर भागामधून पायी किंवा ट्राममधून जाणाऱ्या माणसांचे लक्ष वेधून घेणाऱ्या वेश्या वस्त्या होत्या. तिथल्या खिडक्यांतून आणि गजाआडून पुरुषांची मने आकर्षून घेणाऱ्या वेश्यांचे पोषाख, हावभाव, भाषा यांचे जे दर्शन होत असे, त्याचा संदर्भ घेऊन कर्व्यांनी मुंबई-पुण्यासारख्या शहरांतील संकेतगृहांच्या प्रस्तुततेची चर्चा उपस्थित केली होती. त्यांच्या मते कामेच्छा पूर्ण करून घेणे हा प्रत्येक मनुष्याचा हक्क आहे व कोणत्याही समाजाची आर्थिक, धार्मिक किंवा रूढीविषयक स्थिती जर या हक्काच्या आड येत असेल तर ती अवश्य बदलली पाहिजे. वयात आलेल्या कोणत्याही स्त्री-पुरुषांना स्वत:च्या शरीराचा हवा तसा उपयोग करण्याची मोकळीक असली पाहिजे. अर्थात कोणत्याही स्त्रीस तिसऱ्याच एखाद्या व्यक्तीने आपल्या शरीराचा विक्रय करण्यास भाग पाडता कामा नये, ही गोष्ट बहुतेक देशांत मान्य केलेली आहे. किंबहुना वेश्यांतही त्यांच्या मर्जीविरुद्ध समागम केल्यास तो बलात्काराचा गुन्हा होतो. अशा खुल्या वैचारिक

भूमिकेतून र. धों. कर्वे यांनी वेश्याव्यवसायाची सामाजिक बाजू तपासली होती. त्यांच्या मते वेश्यागृहांकडे रुग्णालये, वा व्यायामशाळांप्रमाणे शारीर स्वास्थ्याच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. किंबहुना सरकार वा म्युनिसिपालिटी यांनी प्रसुतिगृहांप्रमाणेच समाजहित सांभाळणारी सार्वजनिक 'संकेतगृहे' बांधावीत. या संकेतगृहांमध्ये स्नानगृहे, स्वतंत्र मोरी, शौचकूप, स्वच्छ चादरी-पांघरुणे असलेले पलंग, संभाषण करता येईल असे दिवाणखाने, वाचनालये, रेडिओ, नामांकित चित्रांच्या प्रतिकृती इत्यादी सोयी असाव्यात. या संकेतगृहातून संततिनियमन व गुप्त रोगापासून बचाव करण्याची माहिती देणारे डॉक्टर व तशी साधने विकत मिळण्याची सोय हवी. ही संकेतगृहे इतकी स्वच्छ, प्रसन्न आणि खुल्या मानसिकतेची असावीत की एखाद्या विवाहितास सुटीच्या दिवशी बायकोला राणीच्या बागेत किंवा अपोलो बंदरावर फिरायला न्यावे तसे कामेच्छा तृप्तीसाठी एखाद्या रात्रीपुरता संकेतगृहातील एखादी सुंदर खोली भाड्याने घेऊन राहाण्यास योग्य वाटावे. (कर्वे, १९३१, पृ. ७९-८०) स्त्री-पुरुष संबंधांची सामाजिक बाजू इतक्या मोकळेपणाने प्रथमच मराठी मासिकांतून चर्चिली जाऊ लागली होती.

**स्त्रियांच्या शारीरिक असतेपणाचे सामाजिक पैलू :**

स्त्रियांना पुरुषांप्रमाणे व्यायाम वा कसरतीची गरज नसल्याचा अपसमज दूर करण्याचा प्रयत्न सर्वप्रथम बडोदे संस्थानात प्रो. माणिकराव या व्यायामशिक्षकाने केला. बडोदे संस्थानात मुलांसाठी जशा व्यायामशाळा सुरू करण्यात आल्या होत्या तशा मुलींच्या शारीरिक सुधारणांसाठी 'आरोग्य मंदिर' स्थापन करण्यात आले होते. कु. नजीरबी उस्मान शेख हिची या आरोग्य मंदिराची व्यवस्थापिका म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. पुण्यातही हा प्रयोग सुरू व्हावा या उद्देशाने जाणीव-जागृती करण्याचे प्रयत्न झाले. १९१९ साली बडोद्याच्या शेख बाईंनी पुण्यात सेवा सदन, महिला विद्यापीठ या संस्थांना भेटी देऊन मुलींना व्यायामाची आवश्यकता कशी आहे हे सप्रयोग दाखवून दिले होते. स्त्रियांच्या नैसर्गिक धर्मास व्यायामाने बाधा पोचत नाही हे पटवून देणारी प्रात्यक्षिके त्यांनी दाखविली होती. साधी कवायत, पिंगा, झिम्मा, फुगडी, लंगडी, गोफ विणणे हे खेळ शास्त्रीय पद्धतीने चालू ठेवल्यास स्त्रियांची शारीरिक क्षमता वाढण्यास साहाय्य होईल असा हितोपदेश त्यांनी केला. (केसरी, १४ ऑक्टो. १९१९)

गो. म. चिपळूणकर यांनी 'स्त्रीजीवनावर प्रकाश' या पुस्तकातून स्त्रियांच्या शारीरिक व मानसिक क्षमतांविषयी असणाऱ्या समजुतींविषयीचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यात त्यांनी म्हटले होते की, "शारीरिक व मानसिक मेहनतीच्या कामांपासून स्त्रियांच्या नाजुक प्रकृतीला जास्त त्रास होतो, हा निव्वळ भ्रम आहे. दळणकांडण, धुणे, विहिरीतून पाणी काढणे, पाण्याच्या घागरी व मुले कडेवरून नेणे वगैरे कामे करणारी स्त्री खर्डेघाशी कारकुनापेक्षा खात्रीने जास्त मेहनत करते." (कर्वे, १०३१, पृ. १४६) र. धों. कर्वे यांच्या

'समाजस्वास्थ्य' मासिकातून या पुस्तकाचे स्वागत करण्यात आले होते. स्त्रियांच्या शारीरिक क्षमता कमी असतात म्हणून त्यांना मॅट्रिकच्या परीक्षेत इतर विषयांऐवजी गायन, ड्रॉईंग, शिवण व गृहोपयोगी शास्त्रे हे वैकल्पिक विषय घेण्याची परवानगी असावी असा युक्तिवाद त्या काळात केला जात असे; त्याचा प्रतिवाद करताना समाजस्वास्थ्यकारांनी 'अमुक विषय मुलांचे व अमुक विषय मुलींचे हा दृष्टिकोणच मुर्खपणाचा' असल्याची टीका केली होती. पुरुषही उत्तम गवई, चित्रकार, शिंपी व स्वयंपाकी होऊ शकतात, त्यामुळे स्त्रियांच्या शारीर दौर्बल्यावरून व पुरुषांच्या स्नायुबलावरून शिक्षणाच्या विषयांच्या निवडीचा परिघ मर्यादित करणे योग्य राहाणार नाही, अशी भूमिका कर्व्यांच्या टीकेमागे होती. स्त्री-पुरुष समतेच्या प्रश्नात स्त्रियांचे शरीर हा अडसर नसून ते तिचे सामर्थ्यस्थळ आहे, असा विचार कालांतराने स्त्रीवादी चळवळीत पुढे आला, त्या पार्श्वभूमीवर मराठी मासिक-पुस्तकांतून सुरू झालेल्या या चर्चांना ऐतिहासिक मूल्य प्राप्त झाले आहे.

स्त्रियांना आपल्या शारीर प्रकृतीच्या दृष्टीने धर्मग्रंथात सांगितलेली उपोषणे उपयुक्त असतात, अशी समजूत हिंदू समाजात प्रचलित होती. शरीराचे जितके हाल करावे तितके पुण्य लाभते या कल्पनेवर हिंदूंच्या धर्माज्ञा बसवलेल्या होत्या. 'लंघनचिकित्साशिक्षक' या ग्रंथातून ल. ना. जोशी यांनी या परंपरांचे स्त्रियांची शारीर प्रकृती आणि आरोग्यसुरक्षेच्या अंगाने बुद्धिवादी समर्थन करण्याचा प्रयत्न केला होता. 'आमच्या स्त्रियांना पुरुषांच्या इतके श्रम व व्यायाम होत नाहीत व खुल्या हवेत हिंडायला फारसे सापडत नाही, त्यामुळे त्यांना अपचन व बद्धकोष्ठतेची व्यथा होण्याचा संभव फार यास्तव त्यांनी जास्त उपवास व व्रतवैकल्ये' करावीत (कर्वे, १९३१, पृ. ७४) हा ल. ना. जोशी यांचा युक्तिवाद पुरुषी मूल्यदृष्टीतून स्त्रियांना दुय्यमत्व बहाल करण्याच्या सामाजिक मानसिकतेतून आलेला होता, हे स्पष्ट दिसते. ह्या पार्श्वभूमीवर स्त्रियांनी व्यायामाची कास धरावी, पोषक आहार करावा यासाठी बडोद्यात सुरू झालेल्या व्यायामशाळांचे महत्त्व अधिकच लक्षात येते.

स्त्रियांचा लज्जाभाव व त्यांनी शरीराचे कोणते भाग लज्जास्पद समजावेत यासंबंधी प्रचलित असणाऱ्या तत्कालीन समजुती दूर करण्याचा प्रयत्न 'समाजस्वास्थ्य' मासिकाने सुरू केला होता. विनय किंवा लज्जा हा स्त्रियांचा स्वाभाविक गुण नसून तो त्यांच्यात सामाजिक परिस्थितीमुळे उत्पन्न होतो असे मत र. धों. कर्व्यांनी या मासिकातून मांडले होते. त्यांच्या मते मुलींमध्ये स्वाभाविक रीतीने लज्जा उत्पन्न होत नसून आया मुलीस लाजण्यास शिकवतात. विनय हा सामाजिक गुण असल्याने जोपर्यंत स्त्री दुसऱ्याच्या, विशेषत: पुरुषांच्या दृष्टीस पडत नाही, तोपर्यंत विनयाचा प्रश्नच उपस्थित होत नाही. यासंबंधीचे सर्व निर्बंध पुरुषांच्या वर्चस्वाचा परिणाम होत; किंबहुना पडदा, बुरखा वगैरे जाचक नियम केवळ पुरुषांच्या दराऱ्यामुळेच पाळले जातात. शरीराचे कोणते भाग कोणत्या वेळी लज्जास्पद समजावे याबद्दल निरनिराळ्या देशात निरनिराळ्या समजुती

आढळतात. हिंदुस्थानात डोके, हात व पाय याशिवाय बहुतेक शरीर झाकण्याचा प्रघात दिसतो. मात्र अश्लीलतेच्या व विनयाच्या कल्पनांस फाजील व्यापकता देणे अत्यंत हास्यास्पद असल्याचे मत कर्व्यांनी मांडले होते. स्त्रीपुरुषांच्या परस्पर आकर्षणामुळे परस्परांचे अनावृत शरीर पाहण्याची दोघांची इच्छा असणे स्वाभाविक आहे. ही इच्छा नैसर्गिक असल्यामुळे ती दाबण्याचा जितका प्रयत्न करावा तितकी ती अधिक प्रबळ होते. नग्न पुतळे व चित्रे लोकांस विशेष आवडतात यातील इंगित हेच आहे. त्यांच्या मते 'विनय म्हणजे एक सामाजिक ढोंग आहे. मनुष्यास वेड लागल्यास त्याच्या मनावरचा सामाजिक दाब नाहीसा होतो, व त्याबरोबर लज्जाही नाहिशी होते.. ज्या स्त्रियांची विनयशीलतेबद्दल विशेष ख्याती असते त्यांस वेड लागले असता त्या इतरांपेक्षा जास्त बीभत्स होतात." (कर्वे, १९३१, पृ. ४-५) स्त्रियांच्या शारीर असतेपणाविषयीच्या समजुती व सामाजिक भ्रमांचे पटल दूर करण्याचा प्रयत्न विसाव्या शतकाच्या महाराष्ट्रातील बुद्धिवाद्यांनी सुरू केला होता, याचे हे उदाहरण आहे.

संततीनियमनाच्या संदर्भात म. गांधीनी मांडलेल्या ब्रह्मचर्याच्या संकल्पनेवरही र. धों. कर्वे यांनी आपल्या नियतकालिकांतून दुसरी बाजू पुढे आणण्याचे काम केले. विवाहित स्त्री-पुरुषांनी संततीच्या हेतूनेच समागम करावा, एरवी करू नये अशा आशयाचे विचार गांधीजींनी मांडले होते. त्यावर श्रीकृष्ण भगवान म्हणतात, 'फलाची अपेक्षा केल्याशिवाय कर्म कर, आता म. गांधी खरे की भगवद्गीता खरी?' अशी मिश्किल प्रतिक्रिया नोंदवून कर्व्यांनी ब्रह्मचर्य शास्त्रीय नसून अत्यंत अनैसर्गिक असल्याचे मत मांडले होते. ब्रह्मचर्य हा संततिनियमन करण्याचा मार्ग नाही; सुखाच्या संसाराला योग्य प्रमाणांत व योग्य प्रकारच्या इंद्रियसुखाची अत्यंत जरूर असते, त्यामुळे संततिनियमानासाठी ब्रह्मचर्याऐवजी आधुनिक प्रतिबंधक साधनांचा वापर करावा, असा सल्ला ते समाजबांधवांना देतात. (कर्वे, १९३१, पृ. २४, १३५, १५२)

स्त्रीशरीरासंबंधीच्या सामाजिक संकेतांचे जोखड अभिरुचिसौंदर्याच्या निकोप वाढीतला अडसर असल्याचे या नव्या बुद्धिवाद्यांना प्रकर्षाने जाणवू लागले होते. स्त्रियांनी नाटक-सिनेमात काम करू नये या समजुतीमुळे पुरुषांनाच स्त्रीपात्रांच्या भूमिका कराव्या लागत. अशा सामाजिक बंदिस्त कल्पनांचा पगडा असलेले विचार २८ मे १९२८ रोजी नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षीय भाषणातून गिरिजाबाई केळकर यांनी मांडले होते. स्त्रीनटांच्या रंगभूमीवरील अवतरणाला आक्षेप घेताना त्यांनी म्हटले होते की, "स्त्री म्हणजे देव्हाऱ्यातील देवता.. कोणत्याही देवळांतील देवता कधी बाहेर पडली आहे काय? ह्या पवित्र वस्तूला नाना रूपांत, नाना वेषांत जगापुढे उभे करायला तुम्हांस योग्य वाटते का? त्यांच्यात जर कोणी पतीत असेल, कोणाला उदरनिर्वाहाचे साधन मिळवणे भाग असेल, तर त्याकरता दुसऱ्या तजविजी करा, पण त्यांना नाटककंपन्यांत नटी होण्याची लालूच

दाखवू नका. . स्त्रियांच्या साह्याशिवाय आपली रंगभूमी चालली पाहिजे व त्यात उत्तम नागरिक नट झाले पाहिजेत." (कर्वे , १९३१, पृ. ८०-८१) नाटकांतील शृंगार रसाविषयी व शृंगारकाव्याविषयीही गिरिजाबाई केळकरांचे मत सनातनी समजुतींना जवळ जाणारे होते. एकंदर नाटकांत जे नवरस आहेत, त्यातील एक शृंगार जर थोडा कमी केला तर नाटकाची कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही, असे मत त्यांनी या नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षीय भाषणातून मांडले होते. इतकेच नाही तर हिंदी चिजा शृंगारमय असतात, त्या सोडून कोणत्याही श्रोत्यासमोर म्हणता येतील अशा मराठी चिजा स्वत: गायकांनी रचाव्यात, अशी सूचनाही त्यांनी केली होती. गिरिजाबाई केळकर यांच्या या मतांवर आपली प्रतिक्रिया नोंदवताना र. धों. कर्वे यांनी लिहिले होते की, 'स्त्रियांस शृंगार आवडू नये अशी त्यांची कदाचित इच्छा असेल, परंतु तो आवडतो ही वस्तुस्थिती आहे.. शृंगारमय नाटकांना स्त्रियांच्या झुंडीच्या झुंडी जातात, हे वास्तव आहे. शिवाय आपल्या नाटकांतून शृंगाराची पेरणी करणारे कालिदास, भवभूती हे नाटककार मुर्ख होते काय, असा प्रश्नही त्यांनी विचारला होता. (कर्वे, १९३१, पृ. १०२) स्त्रियांकडे बघण्याची पुरुषी मूल्यदृष्टी आणि अभिरुची संकल्पनांतील स्थित्यंतराची ही उदाहरणे या चर्चा-संवादातून पहायला मिळतात.

हिंदू समाजातील पुरुषसत्ताक मूल्यव्यवस्थेत स्त्रियांचे स्थान कायमच दुय्यम स्थानी राहिले आहे, याची पूर्ण जाणीव असूनही हिंदू कुटुंबात स्त्रिया ह्याच कुटुंबाच्या एकात्म सहजीवनाच्या आधारस्तंभ आहेत; असे महर्षी शिंदे यांचे आकलन होते. 'द रोमान्स ऑफ सोशल रिफॉर्म इन इंडिया' निबंधात त्यांनी हिंदू कुटुंबातील सूनबाई या विषयावरचे फार मौलिक चिंतन मांडले आहे. त्यांचे असे निरीक्षण आहे की, हिंदू कुटुंबात सर्वात दुर्लक्षणीय व दलित असणारी सून विवाहानंतर संसार करताना हळू हळू कुटुंबाची पालनकर्ती देवता बनण्याची तयारी सुरू करते. कालची भातुकली खेळणारी अल्लड बालिका व्यवस्थितपणे सभ्यतेने वागणारी पत्नी बनते. स्वत:च्या सुखाची पर्वा न करता सर्वांनंतर झोपायला जाते आणि सर्वांआधी कामाला जुंपते. कुटुंबात स्वत:चे स्थान निर्माण करते. महर्षी शिंदे यांच्या मते हिंदू लग्न म्हणजे केवळ स्त्री-पुरुषाने एकत्र राहाण्याचा सामाजिक करार नसून एक पवित्र संस्कार आहे. स्त्रियांच्या आत्मत्यागाला आणि आत्मसमर्पणाला हा मूल्यसंस्कार कारणीभूत आहे. मात्र असे असले तरी पुरुषसत्ताक हिंदू समाजरचनेत स्त्रीजीवनाची इतिकर्तव्यता वंशवृद्धीपुरतीच सीमीत आहे. वंशवृद्धी झाली की तिची कारकीर्द संपुष्टात येते. लग्नविधीत बोहल्याच्या बाजूला केळ्यांचा घड असलेले झाड बांधलेले असते, ते एका अर्थाने हिंदू स्त्री जीवनाचे रूपक आहे. (शिंदे, २०१८, पृ. ७-८) अशा पारंपरिक सांस्कृतिक मूल्यसंस्कारांच्या पार्श्वभूमीवर आधुनिक सुधारणावादी मूल्यांची रूजवण करण्याचे काम किती आव्हानात्मक होते याची

कल्पना येते. समाजसुधारकांनी केवळ बौद्धिक प्रवचन-प्रबोधन करून हे कार्य साधणार नाही, त्यासाठी दीर्घकालीन संस्कारक्षम उपक्रमांतून उत्क्रांत होत जाईल अशा कृतिकार्यक्रमांची जोड द्यावी लागेल याचे भान महर्षी शिंदे व त्यांच्या पिढीतील सुधारकांना होते.

**महिला परिषदांची चळवळ :**

विसाव्या शतकात महाराष्ट्रातील स्त्रियांमध्ये जाणीव जागृती होऊ लागली होती. सार्वजनिक व्यासपीठावर येऊन आपापल्या भूमिका ठामपणे मांडण्यासाठी त्या पुढे येऊ लागल्या होत्या. पुण्यात हुजुरपागा शाळेत लेडी बॅरेट यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत रमाबाई रानडे, काशीताई कानिटकर, अनुसया भट, हिराबाई पद्मनजी, वाराणशीबाई विंचूरकर, राधाबाई पुरंदरे, खंबायतच्या बेगम साहेब, मिस सोराबजी, मिसेस तुमान कासमशहा इत्यादी स्त्रियांनी मराठी, गुजराती, इंग्रजी व उर्दू भाषांतून भाषणे करून आपली मनोगते व्यक्त केली होती. (केसरी २८ जाने. १९१३) १९०१ साली बडोदा स्त्रीवर्धक सभेत निरनिराळ्या ठिकाणी वनिता समाज स्थापन करण्याची योजना पुढे आली. १४ ते १६ सप्टेंबर १९०१ रोजी मुंबईच्या सामाजिक परिषदेत स्त्रियांना शिक्षण देण्याची अहर्निश खटपट करावी, असा ठराव पारित करण्यात आला. रमाबाई रानडे यांच्या पुढाकाराने महिला परिषदांचा प्रारंभ झाला. २९ डिसेंबर १९०४ रोजी मुंबईत रमाबाई रानडे यांच्या अध्यक्षतेखाली पहिली भारतीय महिला परिषद आयोजित करण्यात आली होती, त्यातल्या रमाबाईच्या भाषणाचा वृत्तांत यापूर्वी नोंदविला आहेच. या परिषदेत काशीबाई कानिटकर यांनी 'आम्हांस रांगोळ्या शिकवू नका, तर मानसिक उन्नती करणारे शिक्षण द्या' अशी मागणी केली. काशीबाई हेर्लेकर यांनी योग्य विद्या मिळाली तरच स्त्रियांना गृहिणी, सचिव, सखी या नात्यांची योग्यता प्राप्त होईल या मुद्द्यावर भर दिला. वेणूताई नामजोशी यांनी समाज आणि देशहितासाटी विधवांना शिकविण्याचे महत्त्व सांगण्यावर भर दिला. परदेशात सामाजिक कार्य करणाऱ्या सिस्टर्स असतात, तशा आपल्याकडेही तयार झाल्या पाहिजेत अशी स्त्रीशिक्षणाची एक नवी दिशा रमाबाई रानड्यांनी सुचविली. परिषदेत स्त्रीशिक्षणाचा प्रसार, बालविवाहबंदी, केशवपन, हुंडापद्धती, जरठकुमारी विवाह, अनेक पत्नीत्व या रूढींचा निषेध, विधवाविवाह, अनाथ बालिकागृहांची स्थापना इत्यादी सुधारणांचे ठराव पारित करण्यात आले. मासिक मनोरंजनचे संपादक का. र. मित्र यांनी या परिषदेचे स्वागत करणारा लेख प्रसिद्ध करून स्त्रियांमध्ये होत असलेल्या राष्ट्रीय जागृतीचे कौतुक केले. टिळकांच्या 'केसरी'ने मात्र 'गेल्या नाताळातील सामाजिक गडबड' नावाचा लेख लिहून या परिषदेच्या सामाजिक उपयुक्ततेविषयी आताच भाकित करणे योग्य नसल्याची प्रतिक्रिया दिली. या लेखात ते लिहितात की, "आमच्या स्त्रियांची उन्नती-अवनती आमच्या पुरुषांच्या उन्नती किंवा अवनतीवर अवलंबून आहे आणि

जोपर्यंत पुरुषांची उन्नती झालेली नाही, तोपर्यंत स्त्रियांनी आपल्या उन्नतीस लागणे आमच्या मते अशक्य आहे." (कर्वे स्वाती, २०१५, पृ. ३४)

'स्त्रियांस राजकारण फारसे समजत नाही' असा एक सर्वसाधारण समज दृढ होता. 'केसरी'त एका पत्रकर्त्याने 'स्त्रिया व राजकारण' या विषयी उहापोह करताना जपान व इराणमधील स्त्रियांच्या कर्तबगारीचा दखला देऊन म्हटले होते की, 'स्त्रियांमध्ये राष्ट्राची चित्शक्ती असते; त्या राष्ट्राच्या प्रश्नात मन घालतात तेव्हा त्यांना राष्ट्राचे विचार कोठे वळत आहेत हे कळते.' रशिया व जपानच्या युद्धात जपानी स्त्रिया घरातूनच लढत होत्या. रशिया इराणास कर्जाखाली मारणार हे लक्षात आल्यावर त्याच्या प्रतिकारार्थ इराणी स्त्री पुढे सरसावली. स्त्री स्वयंसेवकांनी पैसे जमवण्याची मोहीम चालवून येत्या अंदाजपत्रकात कर्जाचा मागमूस राहाणार नाही यादृष्टीने चळवळ चालवली आहे. तेहरानमधील स्त्रियांनी आपले उंची जवाहीर फंडास द्यायची कृती केली आहे. (केसरी१२ जुलै १९१०) याच काळात महाराष्ट्रातही अशा प्रकारे स्त्रिया राष्ट्रीय प्रश्नांवर विचार करू लागल्या होत्या. महिला परिषदेत स्त्रियांचा सहभाग वाढू लागला होता आणि व्यापक स्वरूपाच्या सामाजिक- राष्ट्रीय विषयांवर विचारमंथन करण्यास व संघटितपणे काम करण्यास पुढे सरसावू लागल्या होत्या. १९१५ साली मुंबई इलाख्यात स्त्रियांनी युद्ध फंडासाठी वर्गणी गोळा करण्याची व रणांगणावर पाठविण्यासाठी अन्न, कपडे इत्यादी वस्तू जमा करण्याची मोहीम चालविली होती. मुंबईत झालेल्या स्त्रियांच्या वार्षिक सभेत सर्व धर्माच्या स्त्रिया भेदभाव विसरून समाजरक्षणाच्या कामासाठी झटत असल्याबद्दल लॉर्ड विलिंग्डन यांनी या स्त्रियांचे कौतुक केले होते. सरोजिनी नायडू यांनीही सभेत भाषण करून महिलांच्या संघटित कामाची प्रशंसा केली होती. (केसरी ३१ ऑक्टो. १९१५) ३१ डिसेंबर १९१५ रोजी मुंबईत शारदादेवी यांचा अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत हिंदू स्त्रियांसाठी विशिष्ट अभ्यासक्रमाची तरतूद असलेल्या शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देण्याबाबत व्हाईसरायना अर्ज पाठविण्याचा ठराव करण्यात आला. या सभेत काशीताई कानिटकर, मालती कर्वे, विद्यागौरी रमणभाई या स्त्रियांचीही भाषणे झाली. (केसरी ११ जाने. १९१६) १९१७ साली भारतमंत्री मॉंटेग्यू यांना निवेदन देण्यासाठी मद्रास येथे हिंदी स्त्रियांचे एक शिष्टमंडळ जाणार होते. त्यात सरोजिनी नायडू, ॲनी बेझंट यांच्याबरोबर महाराष्ट्रातून नागूताई जोशी, सरलादेवी चौधरी इत्यादी स्त्रिया सहभागी झाल्या होत्या. (केसरी. ११ डिसें. १९१७)

स्त्रियांना मताधिकार देण्याचा प्रश्न २७ जुलै १९२१ रोजी मुंबईच्या प्रांतिक कायदेकौन्सिलपुढे चर्चेला आला होता. राजकारणाचे क्षेत्र हे स्त्रियांच्या नैसर्गिक गुणांचा लोप करणारे असल्याने स्त्रियांना मताधिकार देऊन राजकारणात उतरवू नये अशा मताचे बरेच सदस्य होते. ना. हेवर्ड, खानबहादुर मुट्टो, सी. एम. बेकर, जहांगिर पेटिट इत्यादींचा

या विरोधकात समावेश होता. तसेच स्त्री-पुरुषांसाठी कायदे समान असतील तर हक्कही समान असावेत असा युक्तिवाद करणारेही काही सदस्य होते. र. पु. परांजपे, नौरोसजी डुमासिया, सी. एम. गांधी, गुलाम हुसेन हिदायतुल्ला हे या सकारात्मक विचारांचे पाठीराखे होते. एच. सी. लॉरेन्स यांनी सभागृहात रमाबाई रानडे यांच्या कर्तृत्वाचा गौरवपूर्ण उल्लेख करून स्त्रियांना मताधिकार देण्याच्या मुद्‌द्याचे प्रभावी समर्थन केले. आपल्या भाषणात ते म्हणाले होते, "ह्या कौन्सिलात केव्हा तरी स्त्रियांचा सभासद म्हणून प्रवेश होईल ह्या घटनेची काही वक्त्यांना चिंता व भीती वाटत आहे. पण मला त्यात काही भीतिप्रद वाटत नाही. मला जर स्त्रियांपैकी कोणत्या एका नावाचा उल्लेख करावयाचा झाला, तर मी म्हणेन जगात असे विधिमंडळ असू शकेल, की ज्याला ह्या शहरात सुप्रसिद्ध असलेल्या श्रीमती रमाबाई रानडे यांचे सभासदत्व बहुमानास्पद वाटणार नाही? त्यांची सल्लामसलत हितावह होणार नाही?" (जोगळेकर,१९९१, पृ. ९४)

राजकारणाबरोबरच सामाजिक उद्धाराच्या उपक्रमांची मात्रा वाढविण्यासाठी महिला संघटितपणे पुढे येऊ लागल्या होत्या, हे यापूर्वी रमाबाई रानडे यांच्या कार्याचा परिचय करून घेताना आपण पाहिले होते. १९२० ते १९५० या काळात अशा सुधारणा कार्यक्रमांसाठी महिलांमध्ये जागृती घडविण्याच्या कामात महिला परिषदांचा फार मोठा वाटा राहिला आहे. सोलापूरला एप्रिल १९२० मध्ये रमाबाई रानडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या प्रांतिक महिला परिषदेत महिलांसाठी स्वतंत्र ट्रेनिंग कॉलेजे आणि खेड्यातल्या स्त्रियांसाठी शिवणकामासारखे शिक्षण देणाऱ्या उद्योगशाळा सुरू करण्याची मागणी करण्यात आली. (केसरी १३ एप्रिल १९२०) १९२३ साली पुण्यात प्रा. गो. चिं. भाटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सामाजिक परिषदेत स्त्रियांच्या मिळकतीचा कायदेशीर हक्क, स्त्रियांना मतदानाचा हक्क, बालसंगोपन व मातृरक्षणासंबंधीचे ठराव संमत करण्यात आले. डिसेंबर १९२३ मध्ये पुण्यात गंगूबाई खेडकर यांच्या अध्यक्षतेखाली 'आदि हिंदू महिला परिषद' भरली होती. या परिषदेत विठ्ठल रामजी शिंदे व जनाक्का शिंदे यांच्या सामाजिक कार्याबद्दल अभिनंदाचा ठराव पारित करण्यात आला. शिवाय सक्तीच्या शिक्षणाची अंमलबजावणी करण्याबाबत व प्रत्येक आदि स्त्रीने आपल्या मुलाला शाळेत पाठविण्यासाठी प्रतिज्ञाबद्ध होण्याचे ठराव पारित करण्यात आले. याच महिन्यात झालेल्या हिंदी राष्ट्रीय सामाजिक परिषदेत जानकीबाई साठे, जानकीबाई भट, काशीताई देवधर यांनी सक्रिय सहभाग घेतला व पतीच्या निधनानंतर स्त्रीचा कुंकू लावण्याचा अधिकार हिरावून घेऊ नये अशा आशयाचा ठराव संमत करण्यात आला. ९ जानेवारी १९२४ रोजी पुण्यात गंगूताई साळवे यांच्या अध्यक्षतेखाली मातंग समाजातल्या स्त्रियांची परिषद झाली. या परिषदेत प्रागतिक पक्षाने स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळवून द्यावा, असा ठराव पारित करण्यात आला. २७

डिसेंबर १९२४ रोजी बेळगाव येथे सरोजिनी नायडू यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या भारतीय महिला परिषदेत बालविवाह प्रतिबंधक कायदा व स्त्रियांचा पितृगृहातील व पतिगृहातील मालमत्तेचा अधिकार यासंबंधीचे ठराव पारित करण्यात आले. (कर्वे स्वाती,२०१५, पृ. ४४-४५)

१९२७ साली ॲनी बेझंट यांच्या अध्यक्षतेखाली 'अखिल भारतीय महिला परिषद' स्थापन करण्यात आली. या परिषदेच्या संस्थापक सदस्यांमध्ये महाराष्ट्रातल्या अनुसयाबाई काळे यांचा समावेश होता. अनुसयाबाई काळे यांनी याआधी 'नागपूर भगिनी मंडळा'चीही स्थापना केली होती. अनुसयाबाईंच्याच पुढाकाराने ५ जानेवारी १९२७ रोजी पुण्यात पहिली अखिल भारतीय महिला परिषद आयोजित करण्यात आली. बडोद्याच्या महाराणी चिमणाबाई गायकवाड अध्यक्ष आणि सांगलीच्या महाराणी स्वागताध्यक्ष होत्या. परिषदेच्या सचिव मार्गरेट कझिन्स यांनी परिषदेचा हेतू व स्त्रीशिक्षणाच्या पुनर्विचाराची गरज स्पष्ट केली. शारीरिक, मानसिक, भावनामय, नागरिक व धार्मिक अशा पाच दिशांनी स्त्रियांची उन्नती घडवून आणण्याची योजना करावी असे त्यांनी सुचविले. महाराणी चिमणाबाईंनी स्त्रीशिक्षणाचा विचार सामाजिक प्रश्नांशी जोडून करायला हवा यावर भर दिला. स्त्रियांच्या व्यक्तिमत्वविकासासाठी बालविवाह व पडदा पद्धतींचा अडसर आधी दूर झाला पाहिजे, हे त्यांच्या भाषणाचे मध्यवर्ती आशयसूत्र होते. संमती वयाची मर्यादा कमीत कमी १६ वर्षांची ठेवली पाहिजे व त्यासाठी असेंब्लीत संमतीवयाचे विधेयक आणणाऱ्या सर हरसिंग यांना पाठिंबा दिला पाहिजे, अशी भूमिका चिमणाबाईंनी मांडली. असेंब्लीत या विषयाची तरफदारी करण्याकरिता शिष्टमंडळ पाठविण्याचाही परिषदेत ठराव करण्यात आला. अण्णासाहेब कर्वे यांनी मुंबई विद्यापीठाचा मॅट्रिकचा अभ्यासक्रम सर्वसाधारण स्त्रियांच्या दृष्टीने कसा उपयुक्त नाही यावर भाष्य केले. परिषदेत एकूण सात ठराव पारित झाले, त्यात मुला-मुलींच्या शिक्षणक्रमात शारीरिक, मानसिक, धार्मिक वाढ होण्याच्या दृष्टीने पुनर्रचना करावी, शाळा-कॉलेजातून शारीरिक शिक्षण व नैतिक शिक्षण सक्तीचे करावे, मातृपदाचे ध्येय व गृहसौंदर्य वाढविण्याच्या दृष्टीने शिक्षणात योग्य ते बदल करावेत, हस्तव्यवसायाचा अभ्यासक्रमात समावेश करावा, उपयुक्त अशी क्रमिक पुस्तके तयार करावीत इत्यादी ठरावांचा समावेश होता. (कर्वे स्वाती,२०१५, पृ. ५७-५८)

१९२७ च्या परिषदेनंतर महाराष्ट्रात महिला मंडळांच्या स्थापनेला गती मिळाली. पुणे-मुंबईपासून रत्नागिरी व खानदेशपर्यंत जवळपास ८५ शाखा निघाल्या. आठ हजाराहून अधिक स्त्रिया सभासद झाल्या. १९३० साली पुण्यात यशोदाबाई भट, सत्यभामाबाई कुवळेकर, चंपूताई आगरकर यांच्या पुढाकारातून 'महाराष्ट्र भगिनी मंडळा'ची व येवले येथे राधाबाई आपटे यांच्या पुढाकारातून 'वनिता स्वदेशी संघा'ची

स्थापना झाली. डॉ. एन. एस. हार्डिकर यांच्या पुढाकारातून १९३१ साली 'राष्ट्र सेविका दल' स्थापन होऊन त्याच्या शाखा काढण्यात आल्या. १९३१ साली कमलाबाई देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली विदर्भ प्रांतिक महिला परिषद झाली. १९३३ साली मुंबईत विद्यागौरी नीलकंठ यांच्या अध्यक्षतेखाली कामगार स्त्रियांच्या परिषदेत स्त्री कामगारांच्या प्रश्नांवर व्यापक चर्चा झाली. १९३५ साली धुळे येथे चंद्रावती होळकर यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त खानदेश परिषद झाली; त्यात स्त्रियांचा दत्तक घेण्याचा हक्क, वारसा हक्क यावर चर्चा झाली. हुंडा दिल्यास हुंड्याची रक्कम मुलीच्या नावे बँकेत ठेवावी अशीही एक विधायक सूचना पुढे आली. १९३६ च्या महाराष्ट्र प्रांतिक अधिवेशनात रा. ब. राजा यांच्या 'अस्पृश्यता निवारक बिला'ला स्त्रियांनी पाठिंबा दिला. १९३८ साली भुसावळ येथे स्त्री शिक्षण परिषदेत शिक्षक महिलांच्या प्रश्नांची व्यापक चर्चा झाली. शिक्षिकेला बाळंतपणापूर्वी दीड महिना व बाळंतपणानंतर दीड महिना पगारी रजा मिळावी, मुलींच्या शाळेत गायन, शिवणकाम यासाठी स्वतंत्र शिक्षिका असावी, मुलींना व्यायामासाठी स्वतंत्र जागा असावी इत्यादी ठराव करण्यात आले. १९३९ साली गंगूताई पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली किर्लोस्करवाडी येथे झालेल्या महाराष्ट्र प्रांतिक अधिवेशनात जिल्हा पातळीवर गृहउद्योग स्थापन करून स्त्रियांना उदरनिर्वाहाची संधी देण्याचा ठराव संमत करण्यात आला. १९४० सालच्या सातारा येथे झालेल्या प्रांतिक परिषदेत पतिपत्नींच्या मिळकतीवर समान हक्काचा ठराव व मुलींना लैंगिक शिक्षण देण्याची मागणी करण्यात आली. प्रथम पत्नी व मुले हयात असताना कादंबरीकार ना. सी. फडके यांनी त्यांच्यापेक्षा वीस वर्षे वयाने लहान असलेल्या कमल दीक्षित या मुलीबरोबर लग्न केले व पुण्याच्या प्रो. हर्षे यांनी वेणूताई पानसे यांच्याशी विवाह केला, या *यशवंती विवाहा*चा निषेध करण्यासाठी कोल्हापूरात करवीर भगिनी मंडळाने व पुण्यात वनिता समाज संस्थेने निषेधाच्या सभा आयोजित केल्या. १९४४ सालच्या पंढरपूर परिषदेत द्विभार्याप्रतिबंधक कायदा करण्याची मागणी पुढे आली. २६ जानेवारी १९४७ रोजी नगर जिल्ह्यात करंजी येथे कमल भागवत यांच्या अध्यक्षतेखाली शेतकरी महिलांची परिषद झाली. सुमारे पाचशे शेतकरी महिला परिषदेत सहभागी झाल्या होत्या. या परिषदेत स्त्रियांच्या हक्कांचा जाहिरनामा मांडण्यात आला. गावोगावी महिला मंडळे स्थापन करून महिला साक्षरतेची मोहीम चालविण्याचा निर्धार करण्यात आला. खेड्यातील रेशनिंगव्यवस्थेतल्या सुधारणा, प्रत्येक खेड्यात बाळंतपणासाठी आवश्यक सोयी, प्रत्येक स्त्रीला मताधिकार असावा इत्यादी मागण्यांचे ठराव करण्यात आले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर २७ ते २९ ऑक्टोबर १९४७ या काळात खानदेशात चोपडा येथे कमलाबाई देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली प्रांतिक परिषद झाली. या परिषदेत काळा बाजार व साठेबाजीला आळा बसण्यासाठी अन्न समित्यांवर स्त्री प्रतिनिधी असाव्यात

अशी मागणी करण्यात आली. १९४७ साली डिसेंबर महिन्यात मुंबईत नोकरदार महिलांची परिषद झाली. या परिषदेच्या निमित्ताने विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या महिलांच्या मुलाखती घेऊन महिलांच्या प्रश्नांसंबंधी माहिती संकलीत करण्यात आली; त्यातून स्त्री-पुरुषांना मिळणाऱ्या कामाच्या मोबतल्यातली तफावत प्रकर्षाने पुढे आली. अनेक गैरसोयींना तोंड देत १२ ते १६ तास काम करणाऱ्या नर्सेसना तुटपुंजा पगार दिला जातो हे लक्षात आले. या परिषदेत पारित करण्यात आलेल्या ठरावांत स्त्री कामगारांना स्वत:ची संघटना करण्याचा अधिकार असावा, अधिकारी वर्गाकडून स्त्रियांना जाच होऊ नये यासाठी खबरदारी घेणारी यंत्रणा सरकारने निर्माण करावी, कामाच्या ठिकाणी स्त्रियांसाठी स्वतंत्र संडास, शिशुगृहे व विश्रांतिगृहे असावीत, स्त्रियांना प्रसूती काळात पगारी रजा व निवृत्तीनंतर म्हातारदामाची तरतूद इत्यादी मागण्यांचा समावेश होता. १९४८ साली यमुनाबाई किर्लोस्कर यांच्या अध्यक्षतेखाली सातारा येथे झालेल्या परिषदेत किर्लोस्करबाईंनी आपण प्रत्येक बाबतीत सरकारवर विसंबून राहू नये याची स्त्रियांना जाणीव करून दिली. याच वर्षी वर्धा येथे भरलेल्या परिषदेत चंद्रकला हाटे यांनी यापुढे स्त्रियांनी नागरिक म्हणून तयार होण्याची गरज आधोरेखीत केली, शिवाय संयुक्त महाराष्ट्राचा ठरावही पारित केला. १९४८ चे महाराष्ट्र प्रांतिक परिषदेचे अधिवेशन नाशिकला अनुसयाबाई काळे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या अधिवेशनात संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेखेरीज जातिवाद संपविण्यासाठी जातीय संस्थांवर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली.१९४९ साली मुंबईत स्त्रियांचे 'गृहरक्षिका' (होमगार्ड) शिबीर घेण्यात आले,व स्त्रियांना अग्निशमनाचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. १९५० साली इंदिरा मायदेव यांच्या अध्यक्षतेखाली कऱ्हाड येथे महाराष्ट्र प्रांतिक परिषदेचे २३ वे अधिवेशन झाले. या परिषदेत द्विभार्या प्रतिबंधक कायदा सर्व जातीधर्मांना लागू करण्यात यावा, वृत्तपत्र-मासिकांत प्रसिद्ध होणाऱ्या स्त्रियांच्या अश्लील चित्रांवर बंदी घालण्यात यावी, लोकशिक्षण समितीवर स्त्री प्रतिनिधींना स्थान द्यावे इत्यादी ठराव पारित करण्यात आले. १९५० साली मुंबईत लक्ष्मीबाई नाईक निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली 'महिला शारीरिक शिक्षण परिषद' आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत ११ निबंध वाचण्यात आले. एस. एस. सी. परीक्षेत शारीरिक शिक्षण हा ऐच्छिक विषय ठेवण्याचा ठराव करण्यात आला. १९५० साली महागाईच्या निषेधार्थ पुण्यात शांता मुखर्जी-भालेराव व कमल गांधी यांच्या नेतृत्वाखाली दोन हजार स्त्रियांनी मोर्चाही काढला होता. (कर्वे स्वाती, २०१५, पृ. ७४-९८) विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात शहरी व ग्रामीण भागातील सर्व जाती-वर्गातील स्त्रियांचा सार्वजनिक जीवनात मुक्त वावर सुरू झाला होता व समग्र स्त्रीवर्गाच्या समस्या सोडण्यासाठी संघटित लढा उभारण्याची क्षमताही मराठी स्त्रियांमध्ये निर्माण झाली होती, हे या विविध परिषदांतल्या वृत्तांतांवरून लक्षात येते.

**मराठा समाजातील स्त्री-परिषदा :**

मराठा समाजातही स्त्रियांमध्ये सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी जनजागृती करण्याकरिता महिला परिषदांचे आयोजन करण्यात येऊ लागले होते. १९०६ साली मराठा समाजाची पहिली शिक्षण परिषद झाली. त्यात स्त्रियांच्या उन्नतीसाठी प्रयत्न झाले पाहिजेत असा विचार पुढे आला. त्यानंतर १९२९ साली कोल्हापूरला 'करवीर इलाखा महिला परिषद' स्थापन झाली. १९३३ साली मुंबईत 'मराठा भगिनी समाज' स्थापन झाला. १९३८ साली पुण्यात आनंदीबाई शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली मराठा महिला परिषदेचे पहिले अधिवेशन झाले. सुधारणांचा प्रारंभ घरापासूनच केला पाहिजे, हे त्यांच्या अध्यक्षीय भाषणाचे सूत्र होते. तेथून पुढे दरवर्षी मराठा महिला परिषदेची अधिवेशने होऊ लागली. १९३९ साली मालतीबाई शिरोळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या परिषदेत त्यांनी सुशिक्षित पती आणि अडाणी पत्नी यामुळे मराठा समाजाचा जीवनक्रम रुक्ष व हिणकस झाला असून त्यात बदल घडवून आणण्यासाठी मराठा स्त्रियांची शिक्षणात प्रगती होण्याच्या दिशेने प्रयत्न झाले पाहिजेत, असे विचार मांडले. १९४८ सालच्या परिषदेत कोल्हापूरच्या इंदुमतीदेवी यांनी मराठा समाज खेड्यात पसरला असल्याने सुशिक्षित महिलांनी खेडोपाडी जाऊन काम केले पाहिजे, असे आवाहन केले. (कर्वे स्वाती, २०१५, पृ. ८२-८३)

**जैन समाजातील स्त्री सुधारणा :**

जैन समाजातही सामाजिक सुधारणांचे वारे वाहू लागले होते. २७ डिसेंबर १९०७ ते १ जानेवारी १९०८ या काळात निपाणीजवळील सत्त्वनिधी येथे दक्षिण महाराष्ट्र जैन सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला जोडून कुसुमावतीबाईसा यांच्या अध्यक्षतेखाली जैन स्त्रियांसाठी स्वतंत्र अधिवेशन घेण्यात आले. त्यात गोदूबाई जैन यांनी स्त्रीशिक्षणाचा ठराव मांडला. पुढे याच गोदूबाई जैन यांनी पुण्यात जैन माहेश्वरी स्त्रियांसाठी वसतिगृह स्थापन केले. यानंतर ३० मार्च १९०८ रोजी रतलाम येथे झालेल्या जैन महिला परिषदेत बालविवाह, कन्याविक्रय, जरठकुमारी विवाह या रुढींवर बंदी घालण्याचा ठराव पारित करण्यात आला. १९१२ साली सोलापूर येथे सुमतीबाई शहा यांनी 'जैन श्राविका संघा'ची स्थापना केली. (कर्वे स्वाती, २०१५, पृ. ४३) ३०-३१ जानेवारी १९१६ रोजी मुंबईत खुशालदास शहा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जैनांच्या सामाजिक परिषदेत धर्म, भाषा, मिरवणुकी, लग्ने, उत्तरक्रिया यात पैशाचा चुराडा होतो तो शिक्षणाच्या कामी लावून लोककल्याणाचा मार्ग प्रशस्त करावा असा विचार पुढे आला. त्या अनुषंगाने दहा-पंधरा वर्षांच्या मुलांना भगवी वस्त्रे नेसवून जबरदस्तीने ब्रह्मचारी बनविण्याची प्रथा बंद करण्याचा, तसेच बालविवाहाची चाल मोडण्याचा ठराव पारित करण्यात आला. (केसरी, ११ जाने. १९१६)

१९१७ साली जैन समाजधुरिणांनी महर्षी आण्णासाहेब कर्वे यांची भेट घेऊन अनाथ बालिकाश्रमात जैन मुलींसाठी निवासी वसतिगृह व ट्रेनिंग कॉलेज काढण्यासाठी अनुमती द्यावी, अशी विनंती केली. २० जून १९१७ रोजी कर्व्यांनी गोदूताई जैन यांना पत्र पाठवून हा प्रस्ताव मान्य असल्याचे कळविले. त्यानंतर लगेचच जानेवारी १९१८ ला हिंगणे येथील महिला आश्रमात 'श्राविकाश्रम' अर्थात 'जैन बालिकाश्रम' स्थापन करून सामाजिक सुधारणेचे पुढचे पाऊल टाकण्यात आले. सोलापूरचे हिराचंद गांधी व सांगलीच्या जैन मंडळाने गोदूताईंना या उपक्रमासाठी आर्थिक मदतीचे आश्वासन दिले. (केसरी, ३ जुलै १९१७, १६ ऑक्टो. १९१७ व ८ जाने. १९१८) १९३० नंतर जैन समाजाच्या दहा-पंधरा परिषदा झाल्या. १९३३ साली सरलाबाई नाईक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जैन महिला परिषदेत सुशिक्षित महिलांनी बालविवाह, गोषा पद्धती, लग्नातील पारंपरिक पोशाखांचा डामडौल यांचा विरोध करण्यासाठी पुढे सरसावले पाहिजे असे आवाहन करण्यात आले. तसेच हुंड्याचे पैसे मुलीच्या नावे बँकेत ठेवावेत अशी सूचनाही करण्यात आली. १९४२ साली जैन विदर्भ महिला परिषदेत सुमतीबाई शहा यांनी जैन स्त्रियांनी साहित्य, कलांचे शिक्षण घेऊन ज्ञानी व्हावे यावर भर दिला. १९४५ साली केशरबाई शहा यांनी सोलापूर येथे सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांचा स्वतंत्र मेळा घेऊन स्त्री-संघटनेच्या कामाला एक वेगळे परिमाण देण्याचा प्रयत्न केला. १९४६ च्या दक्षिण महाराष्ट्र जैन परिषदेत सुमतीबाई शहा यांनी शिक्षण व धर्मप्रसाराच्या कामासाठी सत्याग्रही स्त्री सेना स्थापन करण्याची संकल्पना मांडली. (कर्वे स्वाती, २०१५, पृ. ८१-८२) जैन स्त्रियांमध्ये रचनात्मक कार्यासाठी संघटनकौशल्य वाढविण्याचा दृष्टिकोण पुढे येऊ लागल्याचे या परिषदांच्या ठरावांवरून लक्षात येते.

**वंचित जातिसमूहाच्या स्त्री-परिषदा :**

१९२० नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दलित मुक्ती आंदोलनाचा प्रसार होऊन महाराष्ट्रातील वंचित जातिसमूहांत जाणीव जागृतीचे वारे वाहू लागले होते. त्यातून सामाजिक-राजकीय प्रश्नांसाठी सार्वजनिकरित्या मेळावे, सभा घेतल्या जाऊ लागल्या. दलित स्त्रियांही अशा सार्वजनिक चळवळीत सहभागी होऊ लागल्या. १९२७ साली महाडच्या चवदार तळ्याच्या ससत्याग्रहात अस्पृश्य महिलांची मोठी उपस्थिती होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य स्त्रियांनी आपले राहाणीमान सुधारण्यासाठी व मानहानीकारक प्रथा सोडून देण्यासाठी महिलांचे विशेष प्रबोधन केले होते. १९२७ साली मध्यप्रांतात महार परिषद भरली होती, तिथे एका विधवा महिलेने इंग्रज सरकारने कॉंग्रेसचे दारूबंदीसाठी करण्यात येणारे पिकेटिंग बंद केले म्हणून सरकारचा निषेध करणारा ठराव मांडला होता. जानेवारी १९२८ मध्ये मुंबईत वेणूताई सीताराम शिवतरकर यांच्या पुढाकाराने 'महिला मंडळ' स्थापन झाले. त्याच वर्षी अमरावतीलाही 'अस्पृश्य

महिला समाजा'ची स्थापना झाली. २९ जानेवारी १९२८ रोजी मुंबईत रमाबाई आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली दलित स्त्रियांची परिषद आयोजित करण्यात आली. १९३० साली दलित कॉंग्रेस अधिवेशनात स्त्रियांचेही अधिवेशन भरविण्यात आले. १९३२ साली पुण्यात गीताबाई पवार यांच्या पुढाकाराने महिला मंडळ स्थापन झाले. १९३२ च्या कामठी परिषदेत विरेंद्राबाई तीर्थंकर यांची प्रांतिक महिला संघटक म्हणून नियुक्ती झाली. १९३३ च्या नागपूर परिषदेत वेणूताई भास्कर यांनी नर्सचे काम मिळण्यासाठी ख्रिश्चन होण्याची अट घातली गेल्याचा स्वत:चा अनुभव कथन करून अशा प्रकारच्या तडजोडी करण्यापेक्षा जातीत राहून सुधारण्यासाठी प्रतिज्ञाबद्ध होण्याचा मनोदय बोलून दाखविला. जून १९३६ मध्ये मुंबईला दामोदर हॉलमध्ये वेश्या, मुरळ्या व जोगतिणींची परिषद भरली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे परिषदेत मार्गदर्शनपर भाषण झाले व आरोग्य, स्वच्छता, शिवणकाम, भरतकाम याचे स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी कार्यक्रम आखण्याचे ठरविण्यात आले. १९३६ सालच्या वऱ्हाड प्रांतिक अस्पृश्य महिला परिषदेत अस्पृश्य स्त्रियांचा राजकीय जीवनात प्रवेश व्हावा व त्यांचे सामाजिक स्थान उंचावे यादृष्टीने काही महत्त्वाचे ठराव पारित करण्यात आले. अस्पृश्य महिलांसाठी प्रांतिक कौन्सिलमध्ये तीन जागा राखीव ठेवाव्यात, ऑनररी मॅजिस्ट्रेट म्हणून अस्पृश्य समाजातील महिलांची नियुक्ती करावी, सरकारी शाळांतून अस्पृश्य समाजातील मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळावे, शिक्षण पूर्ण होईपर्यंत पालकांनी मुलींचे लग्न करू नये, मुलींसाठी वसतिगृहे सुरू करावीत इत्यादी ठराव करण्यात आले. १९३७ च्या परिषदेत शारदाबाई नागडी यांच्या अध्यक्षतेखाली 'रमाबाई आंबेडकर महिला समाजा'ची स्थापना झाली. अंजनीबाई देशभ्रतार व सखूबाई मेश्राम यांनी त्यासाठी पुढाकार घेतला होता. रात्रशाळा सुरू करण्याचे धोरणही ठरविण्यात आले. एप्रिल १९४० मध्ये उमरेड येथे सुलोचनाबाई डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या परिषदेत असेंब्लीत अस्पृश्य स्त्रियांना प्रतिनिधित्व देण्याची मागणी करण्यात आली. २० जुलै १९४२ रोजी नागपूरला सुलोचनाबाई डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या महिला परिषदेला डॉ. बाबासाहेब आंबेडकरही उपस्थित होते. या परिषदेत अडीच हजार महिला सहभागी झाल्या होत्या. परिषदेत अनेक महत्त्वाचे ठराव पारित झाले. लोकल बोर्डात स्त्रियांना प्रतिनिधित्व मिळावे, मजूर स्त्रियांना २१ दिवस रजा, १ महिना हक्काची पगारी रजा व पेन्शन योजना लागू करण्यात यावी, दलित स्त्रियांनी कुटुंब नियोजनाचा पुरस्कार करावा; विशिष्ट परिस्थितीत दलित स्त्रियांना घटस्फोट घेता यावा याची कायदेशीर तरतूद करण्यात यावी, प्रांतिक सरकारने शंभर मुलींचे वसतिगृह सुरू करावे व उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या देण्याची तरतूद करावी इत्यादी मागण्या करण्यात आल्या. १९४५ साली मुंबईत भरलेल्या परिषदेत निराधार अस्पृश्य स्त्रियांसाठी सरकारने उद्योग सुरू करावेत व सैनिकी शिक्षणात महिलांना स्थान

द्यावे अशी मागणी करण्यात आली.

**मुसलमान स्त्रियांचे प्रश्न :**

मुसलमानांमध्ये स्त्री शिक्षणाच्या बाबतीत अद्याप फारसा प्रचार झालेला नव्हता. कलकत्त्यास दोन मुसलमानी स्त्रियांनी मुसलमान मुलींसाठी शाळा काढल्याची एक वार्ता त्यावेळी महाराष्ट्रात येऊन पोहचली होती. पुण्यात २८ डिसेंबर १९१५ रोजी बंडगार्डनला न्या. अब्दुल रहीम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मुसलमानी शिक्षण परिषदेत मुसलमान स्त्रियांच्या शिक्षणाच्या प्रश्नावर चर्चा झाली. मुसलमान स्त्री शिक्षिकांचा अभाव हा एक मुख्य अडसर असल्याचे त्यावेळी लक्षात आले. शिवाय पडदा पद्धतीमुळे मुलींना शाळेत पाठवायला लोक तयार होत नाहीत असाही एक मुद्दा होता. हे सर्व लक्षात घेता मुसलमान मुलींसाठी पुण्यात 'पडदा स्कूल' काढावे असा विचार या शिक्षण परिषदेतून पुढे आला. (केसरी ४ जाने. १९१६)

बहुपत्नीत्वाची चाल हा मुसलमान स्त्रियांच्या जीवनातला एक महत्त्वाचा अडसर होता. हिंदूंमध्येही बहुपत्नीत्वाची चाल होती. स्त्री-पुरुष समतेच्या मूल्याला हरताळ फासणारी ही चाल कायद्याने बंद करण्याचा निर्णय झाला होता; परंतु तो फक्त हिंदू समाजापुरता मर्यादित होता. मुसलमानांना हा कायदा लागू होत नसल्याने मुस्लिम स्त्रियांवर होणारा अन्याय दूर होऊ शकत नव्हता. ह्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी मुंबई प्रांताच्या विधिमंडळात आठल्ये गुरुजींनी एकपत्नीत्वाचा अधिनियम सर्व धर्मीयांना लागू करण्याची सूचना आणली. मात्र मुस्लिम संघटनांनी त्याला कडाडून विरोध केला व इतरांनीही त्याला पाठिंबा न दिल्याने हा ठराव बारगळला. ('अनामिकाचे अंतरंग', साधना, २८ नोव्हें.१९६४) माणुसकी डावलणाऱ्या मुस्लिम समाजातील प्रथा घालविण्यासाठी सर्वांना समान नागरी कायदा लागू करायला हवा, तरच अशा प्रथांना मिळणारे धार्मिक संरक्षण दूर होऊ शकेल असा विचार यानिमित्ताने स्फुट स्वरूपात का होईना महाराष्ट्रात सुरू झाला होता.

**समाजवादी स्त्रीवाद :**

१९३७ साली वा. का. किर्लोस्कर यांनी एंगल्सच्या 'Origin of the family' या समाजवादी विचारधारेच्या ग्रंथाचा 'विवाह संस्थेचा इतिहास' या नावाने मराठी अनुवाद प्रसिद्ध केला. स्त्री-प्रश्नांकडे स्वतंत्र सामाजिक प्रश्न म्हणून पाहण्याची एक नवी मर्मदृष्टी या ग्रंथाने दिली. १९३९ च्या सुमारास राष्ट्रीय सभेतही समाजवादी विचारधारेच्या विचारांचा प्रभाव होता. या समाजवादी विचारधारेतूनच राष्ट्राचा नियोजनबद्ध विकास करण्याची आदर्श संकल्पना पुढे आली. पं. जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन समिती स्थापन करण्यात आली. नियोजित विकास कार्यक्रमांत स्त्रियांच्या कोणत्या हक्कांचा समावेश करायला हवा याविषयी सूचना करण्यासाठी नेहरूंनी स्त्रियांची

एक समिती नेमली. या समितीने Women's role in planned Economy' नामक अहवाल प्रसिद्ध केला होता. या अहवालात स्त्री-पुरुष समतेचा जोरदार पुरस्कार करण्यात आला होता. स्त्री-पुरुष समानतेच्या तत्त्वाचा अचूक संदेश संप्रेषित करण्यासाठी नवे प्रतीक चिन्ह सुचविण्यात आले होते. पारंपरिक प्रतीक-चित्रात पुरुष पुढे उभा व मागे स्त्री मुलास हातात घेऊन त्याला अनुसरते असे चित्र होते; हे चित्र बदलून दोघेही सारख्याच उत्साहाने प्रगतीचा मार्ग अवलंबीत आहेत व मुलाला दोघांनी हात दिला आहे, असे नवे प्रतीक-चिन्ह सुचविण्यात आले. शिक्षण आणि वैद्यकीय क्षेत्राखेरीज स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने गृहसंरक्षक दल, विमान व्यवसाय इत्यादी व्यापक कार्यक्षेत्र उपलब्ध व्हावे, नागरी हक्कांत स्त्री-पुरुष समतेचे मूल्य पाळावे इत्यादी सूचना करण्यात आल्या होत्या. (संत दु. का. २००३, पृ. १०५)

१९४० साली कमलाबाई टिळक यांचे *स्त्रीजीवनविषयक काही प्रश्न'* हे पुस्तक प्रसिद्ध झाले. या पुस्तकातून भारतीय स्त्रियांचे पारंपरिक जीवन आणि पाश्चिमात्य स्त्रियांची आधुनिक जीवनसरणी यातल्या अंतराची चर्चा करण्यात आली. शिवाय स्त्रीशिक्षण, बालविवाह, विवाहविच्छेदन, संततिनियमन, स्त्रियांचे कायदेशीर हक्क, स्त्रियांच्या संदर्भात उपस्थित केले जाणारे नैतिकतेचे प्रश्न याविषयी उहापोह करण्यात आला. वा. वि. जोशी यांनीही एका स्वतंत्र पुस्तकातून *'हिंदू स्त्रियांच्या कायदेशीर हक्क विस्ताराची योजना'* मांडली. व्यक्ती म्हणून स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने सर्व अधिकार प्रदान केले पाहिजेत अशी या लेखकाची भूमिका होती. या पुस्तकाची मांडणी स्त्रियांच्या हक्कांचा जाहीरनामा अशा स्वरूपाची होती. के. बा. गजेंद्रगडकर यांनी १९४४ साली *'हिंदू कायद्यात स्त्रियांचे स्थान'* हे पुस्तक लिहून स्त्री-सुधारणेच्या भूमिकेतून कोणकोणते कायदे पारित झाले पाहिजेत, त्यांचे स्वरूप काय असावे याची चर्चा केली आहे. स्त्रियांच्या सामाजिक सुधारणांसाठी कायद्याचे अधिष्ठान आवश्यक असल्याचा एक महत्त्वाचा दृष्टिकोन या पुस्तकांतून आधोरेखित केला जात होता. थोडक्यात समाजवादी विचारसरणीच्या प्रभावाने स्त्री-पुरुष समतेचे मूल्य रुजविण्याचा प्रयत्न या कालखंडातील विचारवंत करू लागले होते.

**गांधीजींचा स्त्रीविषयक दृष्टिकोन :**

१९४४ साली *'गांधीजींचे स्त्रियांशी हितगूज'* हे पुस्तक प्रकाशित झाले. या पुस्तकातून तसेच 'हरिजन' पत्रातून वेळोवेळी प्रसिद्ध झालेल्या लेख-टिपणांतून गांधीजींच्या स्त्रीविषयक तत्त्वज्ञानाची काही मूलभूत सूत्रे पुढे आली :

१. स्त्री-शक्तीचे समर्थन : गांधीजींच्या मते स्त्रिया आणि पुरुष यांची तुलना केल्यास स्त्री अधिक बलशाली आहे. पुरुषांच्या बरोबरीने कार्य करण्याची तिची क्षमता असून समान दर्जाची स्वामिनी आहे. ती स्वयंसिद्धा आहे, स्वशक्तिमान आहे, अहिंसामूर्ती

आणि त्यागमूर्ती आहे. संयम, सहनशक्ती, चिकाटी, त्याग, कष्टाळू वृत्ती, प्रेम व सहृदयता हे स्त्रीचे अंगभूत गुणविशेष आहेत.

२. <u>सापेक्ष समानता</u> : स्त्री-पुरुषांच्यात सर्व प्रकारची बरोबरीची समानता आहे किंवा असायला हवी असा गांधीजींचा मुळीच आग्रह नाही. प्रत्येकाची आपापली बलस्थाने असतात, काही क्षेत्रे अशी आहेत की जी पुरुषांसाठी अशक्य कोटीतील आहेत. मानवी उत्कर्षाला पोषक असणारे गुण हे तिचे एक स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व आहे. ती कुठल्याही अर्थाने गुलाम नाही, ती स्वयंसिद्धा आहे. विवाहामुळे पुरुषांना स्त्रियांचे स्वामी बनता येते, तसा स्त्रियांनाही स्वामिनी बनण्याचा अधिकार आहे. विवाह हा दोन आवश्यकतांतून निर्माण झालेला असल्याने स्त्री-पुरुष दोघांचे अधिकार समानपणे चालले पाहिजेत. विवाहाचे पावित्र्य आणि सामाजिक स्थैर्यासाठी लागणारी नियमबद्धता यातून नैतिक कर्तव्यनिष्ठेला गांधीजी महत्त्व देतात.

३. <u>स्त्रीत्वाची अहिंसात्मक ताकद</u> : अपत्यवात्सल्य, प्रीतिभावना, त्याग हे स्त्रीचे सहज मनोधर्म असल्याने युद्धासारख्या आपत्तींचाही प्रतिकार करण्याची अहिंसात्मक क्षमता तिच्यात आहे.

४. <u>आर्थिक स्वातंत्र्य</u> : स्त्रियांच्या दास्याचे मूळ तिच्या आर्थिक दास्यात आहे, म्हणून कायद्याने तिला आर्थिक स्वातंत्र्य देऊन स्त्री-पुरुष समता आणावी या समाजवादी विचारधारेपेक्षा गांधीजींचे विचार अंशत: वेगळे होते. आर्थिक स्वातंत्र्य याचा अनिर्बंध स्वातंत्र्य असा अर्थ गांधींना अभिप्रेत नाही. नैसर्गिक विशिष्टता व श्रमविभागणीचे तत्त्व मान्य करून स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा विचार केला पाहिजे; स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्यामुळे कुटुंबपद्धती नष्ट होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे इत्यादी मर्यादांचे भान गांधीजींच्या भूमिकेत होते.

५. <u>लैंगिक सहजीवन आणि संततिनियमन</u> : कामविषयक तृष्णा हीच मानवाची एकमेव तृष्णा नाही, अशी गांधीजींची ठाम समजूत असल्याने स्त्रियांना भोगवस्तू बनविणाऱ्या पुरुषाच्या लालसाप्रियतेला मर्यादा घालणारा व स्त्रीत्वाचा दर्जा व मान राखणाऱ्या संयमाचा विचार त्यांना अधिक महत्त्वाचा वाटतो. संततिनियमनाच्या बाबतीत लैंगिक जीवनातली सुरक्षितता आणि संयम यांचा पुरस्कार करण्यावर ते भर देतात. (संत दु. का. २००३ पृ. ११२-११६)

महात्मा गांधी यांनी हिंदुस्थानातील स्त्रियांना त्यांच्यातल्या 'स्त्री-शक्ती'ची जाणीव करून दिली. स्वातंत्र्यलढ्यात आणि दारूबंदीच्या आंदोलनात उतरण्याचे स्त्रियांना आवाहन केले आणि अनेक स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने गांधीजींच्या चळवळीत सक्रिय झाल्या. गांधीजींच्या चरित्रकार अवंतिकाबाई गोखले चंपारण्य सत्याग्रहात आणि १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीत उतरल्या. सभा व मोर्चेबंदीचा हुकूम मोडून व पोलिसांच्या

दंडेलीला न जुमानता त्यांनी मुंबईच्या आझाद मैदानावर मोर्चा नेला. १९३० आणि १९३२ साली त्यांनी कारावासही भोगला. मुंबईत त्यांनी 'हिंद महिला समाज' स्थापन केला. मजूर वस्तीतल्या स्त्रियांसाठी आणि महिलांच्या कल्याणासाठी त्यांनी सेविकेच्या भूमिकेतून योगदान दिले. गांधीजींच्या प्रेरणेतून मुंबईत 'देशिसेविकासंघ' आणि 'हिंदुस्थानी सेविकादल' या दोन संघटना मोर्चे काढण्यात, प्रभातफेऱ्या काढण्यात अग्रेसर असत. तुरुंग अपुरे पडत इतक्या संख्येने स्त्रिया मोर्चात सहभागी होत असत. १९४२ च्या आंदोलनात अरुणा असफअली, मृणालिनी देसाई, अनुसया लिमये, अहिल्या रांगणेकर या स्त्रिया आघाडीवर होत्या. डॉ. उषा मेहता यांनी भूमिगत रेडिओस्टेशन चालविले होते.

स्त्रीच्या ठायी व्यक्तिजाणीव निर्माण होण्यासाठी आणि तिला नैतिक व सनदशीर मान्यता मिळण्यासाठी आवश्यक असणारी सामाजिक-सांस्कृतिक प्रक्रिया निरनिराळ्या राजकीय-सामाजिक चळवळी व विविध संस्थांच्या माध्यमांतून उत्क्रांत होत गेल्याचे आतापर्यंतच्या आढाव्यावरून लक्षात येते. स्त्रियांची समाजातील 'अबला' अशी प्रतिमा पुसट होत जाऊन तिची 'सबलत्वा'ची, 'स्वयंसिद्धे'ची नवी प्रतिमा महाराष्ट्राच्या समाजजीवनात स्थिरावू लागली होती, असा सर्वसाधारण निष्कर्ष काढता येतो.

**स्त्रीजीवनातील पिढीगणिक बदल :**

१९ व्या शतकातील पहिल्या पिढीतील स्त्री-सुधारणेच्या मर्यादित विचारांपासून १९५० ला स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेतल्या स्त्री-पुरुष समानतेच्या पुरस्कारापर्यंत निरनिराळ्या टप्प्यांवर स्त्रीजीवनात आमूलाग्र बदल होत गेलेले दिसून येतात. सामाजिक-सांस्कृतिक बदलांची ही प्रक्रिया फार संथ होती. सामाजिक-सांस्कृतिक बदलाच्या प्रवाहांना सामाजिक स्वीकृती मिळून नव्या वाटा अद्याप मळल्या नव्हत्या. स्त्रीजीवनातील बदलांच्या या पाऊलखुणा विसाव्या शतकात प्रसिद्ध झालेल्या स्त्रियांच्या आत्मकथनातून वाचता येतात. त्यावरून पिढीगणिक महाराष्ट्राच्या स्त्रीजीवनात कसकसे बदल होत गेले याची कल्पना येते. अशा काही निवडक दस्तांच्या आधारे या बदलांचा तपास येथे केला आहे.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील पुण्याच्या जीवनरहाटीचे वर्णन सरस्वतीबाई अकलूजकर यांनी केले आहे : "पुण्यात शहराच्या मध्यभागी बरीच मध्यमवर्गीय ब्राह्मणमंडळी राहत. मॅट्रिकपर्यंतचं इंग्रजी-मराठी शिक्षण झालेले लोक यांपैकी काही कुटुंबातून या वेळी दिसत. पुरुषांनी ग्रॅज्युएट होणं ही लोकांच्या दृष्टीनं अजून अपूर्वाईचीच गोष्ट होती. त्यामुळं जुन्या-नव्याचं एक गमतीशीर मिश्रण कपड्यालत्त्यापासून –भाषेपासून खाण्यातल्या पदार्थांपर्यंत सगळीकडं दिसायचं. धोतर, रुमाल, उपरणं किंवा पगड्या यांच्या जोडीनं नवे, पूर्ण सुटाबुटातले आणि डबल काच्याचं धोतर नेसून सायकलवरून

इकडं-तिकडं हिंडणारे फॅशनेबल पुरुष बऱ्याच ब्राह्मण घरांतून असायचे. पण बायका मात्र अजूनही नऊवारी लुगडी अणि डोक्यावरून किंवा दोन्ही खांद्यांवरून पदर घेतलेल्याच असायच्या. त्यांच्या अंगातल्या चोळीची जागा पोलकी आणि मनगटापर्यंत लांब बाह्यांच्या पोलक्यांनी घेतली होती. अनेकींच्या पायांत कोणतंच पादत्राण नसे. बायकांनी अनवाणी हिंडण्यात नम्रता आहे असाही समज असायचा." शहरातल्या ब्राह्मण बायकांनासुद्धा खेड्यातल्याप्रमाणंच घरातली पुष्कळ कामं असत. सडा-सारवण, झाडलोट, पाणी भरणं, तांब्या-पितळेची जडशीळ मोठमोठी भांडी घासणं, चुली सारवून स्वयंपाकाची सगळी तयारी करून घेऊन स्वयंपाक करणं, देवाधर्माचं बघणं, मुलाबाळांचं करणं, वर्षभरासाठी लागणाऱ्या अनेक पदार्थांची बेगमी करणं, त्यांना वेळच्या वेळी उन्हं दाखवणं, दुपारच्या वेळी शिवण-टिपण करणं, संध्याकाळी रॉकेल भरून घरात ठिकठिकाणी कंदील, चिमण्या असे निरनिराळ्या आकारांचे दिवे लावणं, रांगोळी लावून त्यांच्या काचा स्वच्छ ठेवणं-बायकांची असली ही एकेक कामं दिवसभरात संपता संपायची नाहीत. कुटुंबं खूप मोठी असत. सभोवती घराला घर लागून रहाणारा समाज. कुणाच्याही दाराला पडदे नसत. त्यामुळे कुणाच्या आयुष्याला खाजगीपण नसे. कुठल्या घरातल्या सासुसूना एकमेकींशी कशा वागतात, नवरा-बायकोचं पटतं की नाही, घरात छंदीफंदी कोण आहे, अशा गोष्टींबाबत सर्वांचं एकमेकांवर बारीक लक्ष असे. त्यामुळे लहान-मोठे कौटुंबिक कलह माणसं मुकाट्याने सोसत. "सोवळ्या-ओवळ्याची बंधनं या काळात थोडी थोडी कमी होऊ लागली होती; पण केशवपन केलेल्या वृद्ध बायका बऱ्याच दिसायच्या. घराघरांत त्या असायच्या.. त्यांच्यासाठी येणारा न्हावी अगदी मुकाट्यानं मागच्या अंगणातून येऊन जायचा. बायकांची चार दिवसांची अडचण हासुद्धा अगदी हळू आवाजात बोलावं असाच एक विषय! या दिवसात त्या आपल्या मुलांसाठी सोवळ्या-ओवळ्यात चालणारी लोकरीची अंगडी टोपडी विणत बसलेल्या असायच्या. एरवी सवड मिळाली तर त्या रुद्रगाठीचे रुमाल, पडदे विणायच्या."(अकलूजकर, २०००, पृ. ९५-९९)

पार्वतीबाई आठवले (१८७०-१९५५) यांच्या आत्मकथेतून विसाव्या शतकाच्या आरंभकाळातल्या स्त्रीजीवनाचे वास्तव कसे होते याचे काही नमुने पहायला मिळतात. वयाच्या ११ व्या वर्षी लग्न, १५ व्या वर्षी अपत्यप्राप्ती, २० व्या वर्षी वैधव्य! १९०२ साली हिंगण्याला कर्व्यांच्या आश्रमात दाखल झालेल्या पार्वतीबाईंनी आपल्याला वैधव्य प्राप्त झाले त्यावेळच्या प्रसंगाविषयी लिहिले आहे की, " जुन्या रीतीप्रमाणे पुरुष मरताच मला सोवळे करण्यात आले. कारण केस व बांगड्या शवाबरोबरच गेल्या पाहिजेत अशी त्यावेळी समजूत होती.. तरुण विधवांचे केशवपन १५ दिवसांनी करण्यास नापित मोठ्या आनंदाने तयार असतात. परंतु ५०/६० वर्षांच्या वयातील विधवांचे वपन करण्यास मुंबईसारख्या ठिकाणीदेखील नापित मिळणे कठीण जाते. आज विधवांची स्थिती

पालटली आहे असे पुण्या-मुंबईचे लोक म्हणतात, पण निरनिराळ्या खेड्यापाड्यांतून आज वपन केलेल्या हजारो विधवा पहावयास सापडतात. त्यातल्या अनेक विधवा अल्पवयी असतात. हल्लीच्या वपन केलेल्या व न केलेल्या संन्यासिनी आपापल्या कौटुंबिक नातलगांच्या सान्निध्यात राहतात व त्यांना तरुण संसारिकांचे विलासी चाळे पाहावयास मिळतात. हे पाहून तरुण विधवांच्या मनाची कशी स्थिती होत असेल, हे तरुण विधवांच्या जन्मास जाऊन अनुभवल्याखेरीज कळणार नाही." (आठवले,२०१३, पृ. २३-२७) १९०५ साली सामाजिक परिषदेत भाषण करताना पार्वतीबाईंनी विधवांच्या दु:स्थितीवर भाष्य करताना म्हटले होते की, या स्थितीचे निराकरण वर्षांतून एखाद्या शहरी भरविल्या जाणाऱ्या 'सोशल कॉन्फरन्स'ने होईल असे वाटत नाही. " आम्ही विधवा संन्यास घेतो; परंतु गृहस्थांची घरे आमच्या संन्यासवृत्तीला कामी येत नाहीत. त्यांचे विलास दिवसेंदिवस वाढतच चालले आहेत. आज या गृहस्थांच्या घरी नाही भजन, नाही पूजन. पूर्वी हे दोनदा जेवीत असत, तर आज दिवसातून चारदा जेवीत आहेत. चहा, कॉफी यांचे पेले दिवसभर धुता धुता आम्ही दमलो. आजच्या स्त्रीशिक्षणाचा पाहिजे तसा चांगला परिणाम होत नाही. स्त्रियांचा पोलके, बंड्या असा धेडगुजरी पोशाख बनला आहे. त्यांची फुग्यांची जाकिटे पाहिली म्हणजे गरती बायका कोणत्या व एरवीच्या कोणत्या ते ओळखता येत नाही... सारांश, आम्हास गृहस्थांच्या घरी ठेवणार तर वसिष्ठांसारखे गुरू द्या. आमच्यासाठी विधवागृहे तरी बांधा किंवा तुमची घरे पवित्र आश्रम करा." (केसरी १० जानेवारी १९०५) परमार्थ साधनेच्या नावाखाली सुरू असलेल्या विधवांच्या गुलामगिरीविषयीचा अनुभव कथन करताना पार्वतीबाई आठवले लिहितात, "विधवांना अनेक अडचणींपैकी सक्तीने देण्यात येणारी संन्यास दीक्षा ही एक मोठी अडचण होय. .. उडुपी येथे मध्यवस्तीच्या मठांत विधवांचे वपन अगदी लहानपणापासून करतात, विधवांना रात्रीचे भोजन करण्याची परवानगी नाही, अंगावर वस्त्रही पुरते अंग भरून नसते. तिकडील विधवा आपली वपन केलेली डोकी संन्याशाप्रमाणे उघडी टाकतात व मग फिरतात. या विधवांनी धार्मिक क्षेत्रात शिरून आपले आयुष्य घालवावे व आपली उन्नती घडवून आणावी, अशी तेथील लोकांची अपेक्षा असते; पण खरोखरी त्यांची उन्नती किती होते हा प्रश्न आहे. तेथील श्रीकृष्णाच्या देवळात रात्रीच्या आरतीला विधवांनी जमावे असे प्रघात आहेत. आरती झाल्यावर तेथे प्रसाद म्हणून फळाकरिता ओंजळ ओंजळ खडीसाखर, लाह्या वगैरे त्यांना देण्यात येतात. हा प्रसाद घेऊन क्षेत्रांतील ओवऱ्यांतच त्या खात बसतात व तेथेच बहुतेक त्या निजतात. रात्रीच्या वेळी संन्यासीही देवळात वस्तीला असतात. .. विधवांची देवळात निजण्याची निराळी व्यवस्था करावयास हवी. ती तशी केलेली नसते. .. क्षेत्रांतून देवधर्म करीत हिंडणाऱ्या विधवा स्त्रियांची स्थिती फार अनुकंपनीय आहे. त्यांना 'धड ना प्रपंच ना परमार्थ' अशी स्थिती आहे. आफ्रिकेत हिंदी

लोकांची गुलामगिरी नाहिशी करण्याकरिता ज्याप्रमाणे महात्मा गांधी,अँड्रयुज व नामदार शास्त्री अशी मोठमोठी माणसे खटपट करीत आहेत, त्याप्रमाणेच हिंदुस्थानातील क्षेत्रांच्या ठिकाणी परमार्थ साधनाच्या नावाखाली चालू असलेली विधवांची गुलामगिरी नाहिशी करण्याकरिता सुधारकांची चळवळ आता सुरू झाली पाहिजे. केवळ सामाजिक परिषदा व ठराव यांनी हे काम न भागविता निरनिराळ्या क्षेत्रांच्या ठिकाणी विधवाश्रमासारख्या संस्था स्थापन करण्याची जरूरी फार आढळून येत आहे. (आठवले, २०१३, पृ. २३-२४)

**१९२० नंतरचा काळ :**

१९२० नंतर महाराष्ट्रात ब्राह्मणेतर मध्यमवर्गीय सुशिक्षितांची संख्या वाढली. शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील संस्थांची भरभराट होऊन खालच्या मध्यम वर्गातील सुशिक्षित स्त्रियांची नवी पिढी उदयाला आली. मात्र स्त्रीजीवनात मूलभूत परिवर्तन झाले नाही. पुणे शहरात "आळीपाळीनं येत गेलेल्या प्लेग, कॉलरा, इन्फ्लुएन्झा, विषमज्वर या आजारांच्या साथीत १९२०-२५ पूर्वी आणि त्या आसपासही फार तरुण माणसं गेल्यानं विधुर पुरुष आणि विधवा स्त्रिया अगदी घरोघर असायच्या. त्यात पुरुषांना दुसरं-तिसरं लग्न तरी करता यायचं; पण विधवाविवाह फार थोडे व्हायचे. या वेळी स्त्रियांच्या शिक्षणाची बऱ्यापैकी सोय झाल्यानं, थोडंफार शिकायचं आणि प्राथमिक शाळेत शिक्षिका व्हायचं ही नवी दिशा त्यांच्या जगण्याला मिळाली होती. रस्त्यानं खाली मान घालून आणि अंगभर पदर घेऊन अशा विधवा शिक्षिका मोठ्या कानकोंडेपणानं शाळेला जाता-येताना दिसायच्या. त्यांच्या डोळ्यांतले उदास भाव आणि कुंकू नसलेलं कपाळ बघण्याची सर्वांना जशी सवयच झालेली होती... शिकणाऱ्या मुलींकडं, त्यांच्या वागण्या-बोलण्याकडं लोकांचं फार बारीक लक्ष असे. कोण मुलगी पातळाचा पदर किती आखूड घेते किंवा किती लांब काढते, कुंकू किती लहान-मोठं लावते यांचीही चर्चा बायकापुरुष आपापसात भरपूर करीत. पुरुषांना स्त्रियांच्या शिक्षणाचं कुतूहल वाटे आणि भयही वाटे. त्यामुळं थोड्या जास्ती शिकलेल्या आणि मिळवू लागलेल्या बायकाही आपण लग्न करावं की नाही, अशा मानसिक पेचात असत." (अकलूजकर, २०००, पृ. ९८-९९)

या काळातील सामाजिक परिवर्तनाविषयी लिहिताना बाळूताई खरे (मालतीबाई बेडेकर) यांनी लिहिले आहे की, "त्या काळात प्रौढविवाह, विधवाविवाह हे अतिशय अल्प प्रमाणात का होईना पण समाजाने पचवायला सुरुवात केली होती... मुलींच्या लग्नाचं वय थोड्या प्रमाणात का होईना वाढलेलं दिसत होतं. शिकणाऱ्या कुमारिकांची आणि विधवांची संख्याही अल्प प्रमाणात वाढत होती. विकेशांचं प्रमाणही कमी होत चाललं होतं. न्हाणवलीच्या मिरवणुका इ. बंद झाल्या होत्या. १९२३ मध्ये संध्याकाळी तुळशीबागेत सोवळ्या बायकांचा लोंढा रस्त्यामधून जाताना दिसे. १९३० च्या सुमारास सोवळ्या बायकांचं प्रमाण खूपच कमी झालं होतं. हिंगण्याच्या कॉलेजमध्येही थोड्याच

मुली शिकत होत्या. .. १९२३ सालानंतर काही मुली नर्सिंगकडे, क्वचित मेडिकल कॉलेजातही जायच्या मार्गाला लागल्या. या सर्वांवर समाजाचं टीका करणं, नावं ठेवणं चालू होतंच. शिक्षिका होणं, नोकरी करणं हे सुद्धा समाजाला आवडत नव्हतं. नर्सिंग करायला जाणाऱ्या स्त्रिया बिघडतात असंच समाज समजे." तरी सुधारणा होत होत्या. फर्ग्युसन कॉलेजात, हुजूरपागेत प्रौढ कुमारिकांची संख्या वाढत होती. एवढंच नव्हे तर फर्ग्युसनमध्ये जाणाऱ्या प्रौढ मुलींचे प्रेमविवाहही ठरत होते... प्रेमविवाह ठरला, झाला किंवा मोडला की सगळ्या पुण्यात तो चर्चेचा विषय असे. त्या काळात कित्येक प्रौढ मुली आजन्म अविवाहित राहिल्या. शांताबाई बापट, वेणूताई पानसे, चंद्राबाई कर्नाटकी, सुलभाबाई पाणंदीकर ही त्यापैकी काही नावं. .. काही अविवाहित स्त्रियांची कोंडी जाणवत असे. पुरुषांमध्ये त्यांना मोकळेपणाने मिसळता येत नसे, कारण लोकापवादाची भीती सतत होती. बायकांमध्येही त्यांना मिसळता येत नसे. बऱ्याच बायकांचे बोलण्याचे विषय नेहमी नवरा-मुलंबाळं, त्यांचं खाणंपिणं, कपडेलत्ते याबद्दल असत. दोघींना समान विषयच नसे. बदलातून नवे प्रश्न निर्माण होत होते. पण समाजात काहीतरी स्थित्यंतर घडत होते." (खडपेकर,१९९१, पृ. १५८-१६५)

आपल्या आई-वडिलांच्या संसाराला हातभार लावण्यासाठी त्यावेळच्या लग्नाच्या वयाच्या मर्यादा उल्लंघून अनुसयाबाई उर्फ आनंदीबाई मराठे ही मराठा समाजातली तरुणी अविवाहित राहाते. परिचारिकेचा व्यवसाय स्वीकारून ती हे सेवाव्रत पत्करते. मासिक 'मनोरंजन'मध्ये गोष्टी लिहिणाऱ्या या तरुणीचा 'मराठा मित्र'चे उपसंपादक शिवराम शिर्के यांच्याशी लेखनाभिरुचीतूनच परस्पर परिचय होऊन भावबंध जुळत गेला व त्याची परिणती त्या दोघांच्या लग्नात झाली. १९१३ साली झालेल्या या विवाहाला देशस्थ-कोकणस्थ अशा प्रादेशिक अस्मितेच्या मुद्द्यावरून दोघांच्या घरातून विरोध होता. त्यामुळे या लग्नानंतर कोकणी मराठ्यांनी शिर्के पती-पत्नींवर बहिष्काराचे अस्त्र उपसण्याला कमी केले नाही. आधुनिक शिक्षणाने जीवनाकडे पाहाण्याच्या कक्षा विस्तारत होत्या, पण सामाजिक परंपरांचे जोखड मात्र अजून उतरत नव्हते. त्यामुळे या काळात प्रेमविवाह जुळत असले तरी ते अपवादात्मकच होते. आनंदीबाई शिर्के (१८९२-१९८६) यांनी 'सांजवात' या आत्मकथनातून तत्कालीन वास्तवाचे हे अनुभव नोंदवले आहेत.

फर्ग्युसन कॉलेजात शिकणाऱ्या कवी अनिल उर्फ आत्माराम रावजी देशपांडे आणि कुसुमावती देशपांडे यांनी १९२२ ते १९२९ या काळात परस्परांना लिहिलेली प्रेमपत्रे 'कुसुमानील' नामक पुस्तकाच्या माध्यमांतून प्रसिद्ध झाली आहेत. दोघांची वये फॉर्मेटिव्ह स्टेजमधली; दोघांमध्ये जगण्यासंबंधी काही ध्येयवाद होता. मात्र लौकिकदृष्ट्या दोघांचेही सामाजिक स्थान सारखे नव्हते. आत्मारामजी तरुण, देखणे, सुशिक्षत ब्राह्मण असले तरी सांपत्तिकदृष्ट्या गरीब होते. त्यामुळे कुसुमावती जयवंत हिच्या पालकांचा विवाहाला

विरोध होता. कुसुमावतीही रूपगुणसंपन्न, शिक्षण , पैसा-अडक्यात कमी नव्हती, पण 'प्रभु' ज्ञातीतली म्हणून देशपांडे कुटुंबियांचा लग्नाला विरोध होता. मात्र या दोन नकारांच्यामध्ये प्रियकर-प्रेयसीचा ठाम होकार होता. 'लग्न हा केवळ शरीरसंबंध नसून दोन स्त्री-पुरुषाचा व्यक्तिगत भावबंध आहे' ही मूलभूत जाणीव या प्रेमपत्रांतून व्यक्त झाली आहे. स्त्री-पुरुषातल्या नात्यातला हा बंध नव्या मानवी सममूल्यांच्या उदयाची आरंभखूण म्हणून लक्षात घ्यावा लागतो.

वधू-वरात वयाचे भरपूर अंतर असलेले विषम विवाह अजूनही या काळात होत होते. १९२९ साली आनंदीबाई विजापुरे या १३ वर्षांच्या मुलीचा तिच्याहून २७ वर्षांनी मोठ्या असलेल्या बिजवराशी विवाह झाला होता. देवलांच्या नाटकातील 'शारदे'च्या विवाहाची आठवण करून देणारा हा प्रसंग होता. आनंदीबाईंनी त्यांच्या 'अजुनी चालतेची वाट' या आत्मचरित्रात या विवाहाविषयी स्वत:च लिहिले आहे की, "सूट-पँट घालणारा, साहेबी टोपी घालणारा, फाडफाड इंग्रजी बोलणारा तरुण ऐटबाज नवरा हवा असे लहान वयातही वाटे. .. घरच्या अडचणींमुळे ज्याच्याशी पती म्हणून गाठ पडली तो अगदी विरुद्ध. धोतर नेसणारा, डोक्यावर संपूर्ण टक्कल, पोटाचा घेर वाढलेला, ठेंगणा, अंगाने जाड, वर्णाने काळा, चाळीशीचा उंबरा ओलांडलेला" नवरा मिळाला. ह्या बाईंच्या अंगी उपजत कलागुण असल्याने १९२६ ते १९४७ या काळात किर्लोस्करवाडीत त्या पोहायला शिकल्या, त्यांनी पुढाकार घेऊन क्रिकेट टीम काढली, टेनिस खेळात प्राविण्य संपादन केले, नाटकात कामे केले. नवऱ्याबरोबर संसार केला, पण त्याच्या सहवासात कधी त्या सुखावल्या नाहीत. १९५० नंतर बंडखोरी करून मुंबईत १४ वर्षे विवाहबाह्य जीवन जगण्याचा पर्याय निवडला. स्त्रिया आपली घुसमट दूर करून हळू हळू आपले पर्यायी विश्व शोधण्यास पुढे सरसावू लागल्या होत्या याचे हे सूचक चित्र आहे.

या कालखंडात स्त्रियांच्या हक्कांविषयीचा बैद्धिक विचारविमर्श मात्र वाढला होता. स्त्रीप्रश्नांची चर्चा करणारे ग्रंथ प्रसिद्ध होऊ लागले होते. काही ग्रंथकारांनी सनातन प्रथा-परंपरांचे समर्थन केले, मात्र अनेकांनी सुधारणावादी विचारप्रवाहांच्या बाजूने मतप्रदर्शन करणारे लेखन केले. गोविंदराव कानिटकर यांनी जॉन मिलच्या 'सब्जेक्शन ऑफ वुमन' या पुस्तकाचा अनुवाद प्रसिद्ध करून सुधारणावादी विचारधारेला प्रेरणा देणाऱ्या बीजग्रंथाची मराठीत उपलब्धी करून दिली. १९१९ साली इंदिरा केळकर यांनी 'हिंदी स्त्रीचे राजकीय स्थान' या विषयावर पुस्तक लिहून स्त्रियांची राजकीय सामिलकी वाढविण्याचा मुद्दा पुढे आणला. १९२५ साली बाळकृष्ण गोपाळ बाळ यांनी 'विधवा संकट निवारण' या पुस्तिकेतून विधवांच्या केशवपनासाठी स्त्री-नापितांची योजना करावी, असा पर्याय सूचित केला. १९२९ साली श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी 'मायाविवाह' नावाचे नाटक लिहिले. या नाटकाविषयी एका पत्रात लिहिताना त्यांनी म्हटले होते की, "हल्लीच्या स्त्री स्वातंत्र्याच्या

काळात स्त्रियांवर बलात्काराचे, फसवणुकीचे प्रसंग येणे अपरिहार्य आहे.. या नाटकाचा विषय कितीही अप्रिय असला तरी तो नाटकरूपाने लोकांपुढे येणे जरूरीचे होते. मृत्यूपत्र, बलात्कार, नोंदणी कायद्याद्वारे विवाह इत्यादी आर्य संस्कृतीस परके वाटणारे प्रकार या नाटकात असल्यामुळे व प्रतिनायक फारच दुष्ट दाखविला गेल्यामुळे नाटक फारसे लोकप्रिय होण्याचा फारसा संभव नाही." (कोल्हटकर,पृ. २४६) यावरून स्त्रियांच्या संदर्भातल्या नव्या सुधारणा आणि कायद्यांविषयी तत्कालीन समाजमनात अजून आधुनिक जाणिवा रूजल्या नव्हत्या हे लक्षात येते.

याच सुमारास *'स्त्रियांच्या हक्कांची सुधारणा'* या पुस्तकाच्या माध्यमातून बाळूताई खरे आणि का. न. केळकर यांनी स्त्रियांना कोणते हक्क मिळणे आवश्यक आहे याची साद्यंत मीमांसा केली. विवाहसंस्था व पुरुषसत्ताक समाजरचनेतील स्त्रीचे स्थान याविषयीचे परखड चिंतन बाळूताई खरे (उर्फ मालतीबाई बेडेकर) यांनी १९३०-४० च्या दशकात विविध लेखांतून मांडले आहे. त्यांच्या मते स्त्री आणि पुरुष यांच्या विवाहाविषयीच्या धारणा सारख्या नसतात; स्त्रियांसाठी विवाह हे त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन असते. त्यासाठी ती आपल्या पतीवर अवलंबून असते. पुरुषांच्या दृष्टीने विवाह हा करार असतो. हा करार मोडण्याचे त्याला स्वातंत्र्य असते. स्त्रियांना आर्थिक परावलंबित्वामुळे असे स्वातंत्र्य नसते. त्यामुळे नवरा कसाही असो, बाहेरख्याली असो, व्यसनी असो, तिला मारूनमुटकून त्याच्याशी संसार करावाच लागतो. पितृसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्रीला केवळ भोगवस्तू आणि वंशनिर्मितीचे साधन एवढेच मूल्य असते. तिचे घरकाम, मातृत्व याचे काहीही मोल नसते. याविषयीची खंत व्यक्त करताना मालतीबाई बेडेकर लिहितात, "मुलांच्या अगर वंशाच्या उन्नतीला किती स्त्रियांचे जीवापाड कष्ट कारण झाले असतील; पण इतिहासात आईच्या कष्टांचा इतिहास तिच्या कष्टांच्या मानाने नेहमी अलिखितच राहतो. .. पुरुषांच्या श्रमांचे मोल पैशाच्या स्वरूपात दिसते. पाच तास काम करून पन्नास रुपये घरात आणणारा पुरुष हा पहाटे चार वाजेपासून रात्री दहा वाजेपर्यंत घरात काबाडकष्ट करणाऱ्या स्त्रीच्या मानाने अधिक महत्त्वाचा समजला जातो." (खरे बाळूताई, १९३६, पृ. १३-१४) यावर बाळूताई खरे यांनी बडोदेस संस्थानाप्रमाणे हिंदुस्थानातील सर्व स्त्रियांना मिळकतीचे सर्व हक्क प्रदान करण्याचा उपाय सुचविला होता. इतकेच नाही तर स्त्री-पुरुषांच्या वैवाहिक नात्यात समता प्रस्थापित करण्यासाठी पुरुषाचे 'मालकत्व' आणि स्त्रीचे 'दास्यत्व' ही भेदमूलक विषमतेची समाजधारणाच बदलायला हवी. त्यासाठी स्त्रियांनाही पुरुषांप्रमाणे पुनर्लग्नाचा कायदेशीर हक्क द्यावा, तिला घराबाहेर पडून सामुदायिक उत्पादनप्रक्रियेत सहभागी होऊन अर्थोत्पादनाच्या समान संधी खुल्या करून द्याव्यात, राष्ट्रकार्यात स्त्री-पुरुषांचा बरोबरीने सहभाग असेल अशा प्रकारच्या राजकीय-सामाजिक जीवनाच्या सहयोगी

संरचना विकसित कराव्यात अशा विधायक पर्यायांची मांडणी त्यांनी आपल्या लेखनातून केली आहे. (खरे बाळूताई, १९३१, पृ. ३०५-३०७; १९४३, पृ. १७०-१७२)

कृष्णाबाई मोटे यांनी पिढीगणिक बदललेले स्त्रीवास्तव दर्शविणारी काही निरीक्षणे नोंदविली आहेत. विसाव्या शतकाच्या प्रारंभकाळात बायकांना लग्न आणि मुलं याखेरीज दुसरं विश्व नव्हतं. नंतर शिक्षिका म्हणून बायका दिसू लागल्या. १९१८ साली पुण्याला बायकांचं ऑलिम्पिक झालं होतं... ऑलिम्पिकमध्ये टेनिस होते, खो खो होता. सायकलिंग होते. सायकलिंगमध्ये कर्नल कुकडेंच्या मुलीला बक्षीस मिळालं होतं". (खडपेकर, पृ.१४४) १९२५ च्या सुमारास उमरावतीला कृष्णाबाई मोटे या पहिल्या ब्राह्मण स्त्रीने सोशल वर्कर म्हणून काम करायला सुरुवात केली होती. तोपर्यंत ख्रिस्ती मिशनरी बायकाच केवळ या व्यवसायात काम करायच्या. पारिचारिकेचा व्यवसाय शरीरजन्य अस्वच्छतेशी, घाणीशी संबंधित असल्याने तो हलका समजला जाई. त्यामुळे त्याही क्षेत्रात अँग्लो इंडियन, ख्रिस्ती, पारशी स्त्रियाच काम करीत. नंतरच्या काळात विधवा, परित्यक्ता व उपेक्षित समाजातल्या स्त्रियाच हे काम स्वीकारू लागल्या. पांढरपेशा स्त्रिया शिक्षिका किंवा नर्सिंगच्या व्यवसायाकडे वळल्या. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत जसजसे नवे उद्योग व रोजगार तयार होऊ लागलेत तसतशा कष्टकरी स्त्रिया बांधकाम, विडी-उद्योग, कापडगिरण्यांत काम करू लागल्या. १९३९ साली काँग्रेस सरकार आल्यानंतर परिस्थिती बदलू लागली. कामगारकल्याणाच्या विषयाला प्राधान्य मिळू लागलं. परिणामत: नोकरी करणाऱ्या बायकांसाठी पाळणाघर सुरू झालं. कारखान्यातल्या बायकांनी दिवसभर मुलं तिथं ठेवावी, त्यांना पाजण्यासाठी पाळणाघरात (क्रेशमध्ये) यावं अशा सुविधा उपलब्ध झाल्या.

राजकीय क्षेत्रातही महिला आघाडीवर होत्या. सावरकरांच्या 'अभिनव भारत' संघटनेतले कार्यकर्ते तुरुंगात असताना या क्रांतिकारकांच्या बायकांची संघटना बांधण्याचे काम नाशिकला स्वा. सावरकर यांची वडिल वहिनी येसू सावरकर यांनी केले होते. या 'आत्मनिष्ठ युवती संघा'तल्या स्त्रियांनी स्वदेशीचा प्रसार केला. विदेशी बांगड्यांचा चुडा भरणे सोडून दिले व देशी बनावटीच्या काचेच्या बांगडया घालण्याचे अवलंबिले. सरकारने बंदी घातलेल्या विनायकांच्या कवितांचे पठण करून देशभक्तीचा प्रचार केला. मुंबईच्या भिकाई रुस्तुम कामा लंडनला जाऊन श्यामजी कृष्ण वर्मा व स्वा. सावरकर यांच्या 'अभिनव भारत चळवळी'त सक्रिय झाल्या. फ्रान्समध्ये राहून भारतीय क्रांतिकारकांना मदत केली. जर्मनीत समाजवादी परिषदेत स्वतंत्र भारताचा झेंडा फडकविला. १९४२ च्या आंदोलनात भूमिगतांच्या तुफानदलात खानदेशातील लीला पाटील कप्तान होत्या. या दलातील महिला स्वयंचलित शस्त्रे चालवित, हेरगिरी करून गुप्त बातम्या काढून आणित. हैद्राबाद मुक्तिसंग्रामात तारा परांजपे, करुणा चौधरी, आशा वाघमारे, सुशीला भालेराव,

कमल देशपांडे इत्यादी महिला सक्रिय होत्या. होमगार्डचे शिक्षण घेतलेल्या दगडाबाई देवराव पाटील स्वत: पिस्तूल आणि जांबिया घेऊन निजामविरोधी लढ्यात घोड्यावरून फिरत असे. तिने महिलांची सेना उभारून सरहद्दीवर पोलिस चौक्या जाळल्या होत्या. रझाकारी फौजेचा प्रतिकार करताना पुंजाबाई बुजर्गे ठार झाल्या रझाकारांच्या गोळीबारात बाळूबाई पानसरे, लक्ष्मीबाई मयेकर, गोदावरी टेके या महिला हुतात्मा झाल्या. (रोहिणी गवाणकर / प्रधान ४, २००७, पृ. १२२-१४०)

**द्वितीय महायुद्धोत्तर काळ :**

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात महाराष्ट्रातील बरेच पुरुष युद्धावर गेले, अर्थक्षेत्रात मनुष्यबळाचा तुटवडा भासू लागला. अशा वेळी स्त्रिया सार्वजनिक कार्यस्थळी जाऊन पुरुषांच्या बरोबरीने कामाचा वाटा उचलू लागल्या. शिक्षिका, परिचारिका, रेशन दुकाने, बँका, विमा, रेडिओ, सिनेमा अशा विविध उद्योगव्यवसायातली कामे करण्यासाठी पुढे सरसावल्या. बिस्किटे तयार करण्यापासून विड्या वळण्यापर्यंत कौशल्याची कामे करू लागल्या, शिवाय कांद्या-बटाट्याचे काप करणे, तंबू शिवणे अशी स्त्रियांना सरावाची असलेली कामेही त्या करीत राहिल्या. युद्धजन्य परिस्थितीमुळे मध्यमवर्गीय तरुण स्त्रियांच्या जीवनात एक मोठे परिवर्तन घडून आले. "जेथे युद्धापूर्वी कधी स्त्रीचा चेहराच दिसावयाचा नाही, दिसलाच तर एखाद्या अँग्लोइंडियन किंवा हिंदी ख्रिस्ती टाइपिस्ट तरुणीचा, त्याहून निराळा असला तर पारशिणीचा, तेथे आता सारे ऑफिसच वेण्यापदरांच्या कारकूनांनी गजबजून गेल्यासारखे दिसू लागले. .. सर्वसाधारणपणे नोकरी करू पाहणाऱ्या स्त्रियांपैकी ९५ टक्के मुली आपल्या कुटुंबांना या ना त्या तऱ्हेने या महागाईच्या दिवसात हातभार लागावा म्हणून नोकरीत शिरल्या आहेत. (मोटे, १९७६, पृ. १७-१९)

युद्धकाळातील बदललेल्या स्त्रीजीवनाची सांस्कृतिक फलश्रुती नोंदवताना कृष्णाबाई मोटे लिहितात की, संसार, मूल, नोकरी या तिहींचा मेळ बसविताना स्त्रियांची व्यवसायाकडे बघण्याची दृष्टी बदलत गेली. बापाचा संसार चालावा म्हणून मुली अविवाहित राहून नोकरी करू लागल्या किंवा जाती-धर्माबाहेर लग्न करून आसरा मिळवू लागल्या. अर्थात 'गृहिणी व माता म्हणून घरची कामे आणि नोकरी म्हणून बाहेरचे काम यांची सांगड घालताना स्त्री कर्मचाऱ्यांची तारांबळ उडे . पण तरीही आपण काहीतरी करू शकतो, आपलेही समाजात लहानसे का होईना स्थान आहे, ही भावना सुखद असे. (कित्ता, पृ.३५- ४३) घरकाम सांभाळून उद्योगव्यवसायासाठी बाहेर पडणाऱ्या स्त्रियांचा दुहेरी ताण सुसह्य होण्यासाठी मालतीबाई बेडेकर यांनी काही उपायही सुचविले होते : नोकरी करणाऱ्या महिलांना कपडे व भांडी धुण्याची यंत्रे पुरवावीत, स्टेनलेस स्टीलच्या भांड्यांचा वापर वाढवावा. इतकेच नाही तर सरकारने नर्सरी स्कूल्स काढून,

शिशुसंगोपनगृहे उघडून कामावर जाणाऱ्या स्त्रियांचा ताण हलका करण्याची जबाबदारी निभावावी, अशा अपेक्षाही मालतीबाई बेडेकर यांनी व्यक्त केल्या होत्या . (बेडेकर मालतीबाई, १९४५, पृ. ४१७-४१९)

त्या काळात नोकरी करणाऱ्या मुलींकडे पाहाण्याचा दृष्टिकोन कसा होता, याचे निरीक्षण कृष्णाबाई मोटे यांनी नोंदवले आहे : "एवढ्या मुली तरुण वयात अशा बाहेर कामे करू लागल्या, तर त्यांचे कसे व्हावयाचे? पूर्वी मॅट्रिक मुलीला १५, २० रुपयाला कोणी विचारीत नव्हते, आता तीच मुलगी ८०, ९० रुपये मिळवते. खुशाल पुरुषाबरोबर वागते, हॉटेलात टिफिन, चहा घेते. अशी स्वतंत्रतेची चटक लागलेली व स्वत:ची किंमत पैशात जोखू शकलेली मुलगी आता पुढे लग्न करून घरात नीट संसार करील का? पोरं बाळं यांचं करणं, घरातलं काम करणं, नवऱ्याचा संसार नीट करणं हिला जमेल का? की उनाड मैनेप्रमाणे आयुष्य काढणेच हिला अधिक मानवेल? इत्यादी एक दोन का हजार प्रश्न घरी व बाहेरही ऐकू येतात. थोडक्यात 'मिळवती मुलगी', 'मिळवती बायको', म्हणजे एक बोचणारा प्रश्न म्हणून समाजापुढे उभा राहू लागला." (मोटे, १९७६, पृ. १८)

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात स्त्रीपरिवर्तनाच्या चळवळीत फारशी एकसंधता आढळत नाही. काही उच्चशिक्षित महिलांमध्ये पाश्चात्य जीवनशैलीचे उथळ अनुकरण करण्याची प्रवृत्ती वाढत होती. बऱ्याच मध्यमवर्गीय व कनिष्ठवर्गीय स्त्रिया शिकून नोकरी करू लागल्या असल्या तरी अर्थार्जनामुळे त्यांना आपल्या कर्तृत्वाचा स्वतंत्र ठसा उमटवता आला होता, असे दिसत नाही. आपल्या सांसारिक जीवनकलहातच बहुतांश स्त्रिया अडकलेल्या दिसून येतात. कंदिलाच्या काचा कशा पुसायच्या, केर कसा काढायचा, कुंचा आडवा धरायचा की उभा, देशावरच्या पोहे करण्याच्या पद्धतीपेक्षा कोकणात कांडलेले पोहे उकळीच्या पाण्याने धुवून करण्याची पद्धत कशी वेगळी असते, असल्या प्रश्नांतच त्यांची बरीच शक्ती खर्च होत असे. शिकल्या सवरल्या असल्या तरी मध्यमवर्गीय पारंपरिक चौकटीतून बाहेर न आल्याने विटाळशेपणात घ्यावयाच्या शास्त्रीय ज्ञानाविषयीचे वा गर्भधारणेविषयीचे अज्ञानही अजून पुरते दूर झाले नव्हते. (करंदीकर सुमा, २००२, पृ. १६,२५,४२) स्वातंत्र्योत्तर काळात मात्र स्त्रियांच्या सामाजिक बदलांचा नवा टप्पा सुरू होतो, या बदलांच्या अंत:प्रवाहांची चर्चा पुढच्या तिसऱ्या खंडात करणार आहोत.

## ६.४. जातिभेदात्मक विषमता :

जगातल्या कुठल्याही राष्ट्रात कोणत्या ना कोणत्या प्रकारची सामाजिक विषमता नांदत असते आणि समाजाचे आर्थिक व सामाजिक स्तरभेद अस्तित्वात असल्याचे दिसून येते. ॲरिस्टॉटलने समाजाचे श्रीमंत, मध्यम व गरीब असे त्रिस्तरीय वर्गीकरण सुचविले होते. हे त्रिस्तरीय सामाजिक स्तरभेद सर्वत्र आढळून येतात :

१. प्रभुत्वस्थानी असणारे लोक : अशा धुरीण वर्गातले लोक संख्येने अल्प असले तरी समाजाचे वर्तमान आणि भविष्य घडविण्याची सूत्रे या गटाकडे असतात.
२. वरकड लोकसमूह : भौतिकदृष्ट्या स्वावलंबी व राजकीय वा अन्य प्रतिष्ठित सत्तास्थानांच्या स्पर्धेपासून दूर असणारे.
३. कंगाल लोक : आर्थिकदृष्ट्या कमकुवत, खालावलेल्या राहाणीमानात जीवन कंठणारे, बौद्धिक क्षेत्रापासून दुरावलेले.

कार्ल मार्क्सने उत्पादनपद्धती व उत्पादनसंबध यानुसार समाजात वर्गभेद तयार होतात असे म्हटले होते. मार्क्सच्या मते शेतीच्या क्षेत्रात जमीनदार आणि भूदास, हस्तव्यवसायात महाजन आणि कारागीर, औद्योगिक क्षेत्रात मालक आणि कामगार अशी आर्थिक हितसंबंधांवर आधारलेली विषमता आढळून येते. मॅक्स वेबरने मालमत्ता, सत्ता आणि सामाजिक स्थान किंवा दर्जा यानुसार सामाजिक स्तरभेद अस्तित्वात असतात, असे म्हटले होते. त्याच्या मते मालमत्तेच्या विषम धारणांतून वर्ग निर्माण होतात, सत्तेच्या विषम वाटपातून राजकीय पक्ष निर्माण होतात, आणि दर्जा किंवा प्रतिष्ठेच्या समजुतीतून सामाजिक थर निर्माण होतात. मात्र हा दर्जा जन्मजात प्राप्त होत नसून अर्जित असतो अशी वेबरची धारणा होती, त्यामुळे व्यक्तीला स्वकौशल्यांच्या जोरावर आपला सामाजिक वर्ग बदलता येण्याचे स्वातंत्र्य होते. (मेल्विन ट्युमिन, १९८३, पृ. ९)

भारतीय समाजव्यवस्थेत मात्र स्तरभेद हे कर्माने नाही, तर जन्माने तयार होतात. हिंदू लोक ही वर्गवारी 'वर्णव्यवस्था' या संकल्पनेतून मांडतात. पुरुषसूक्तातल्या रूपकात्मक वर्णनाप्रमाणे पुराणपुरुषाच्या मुखापासून ब्राह्मण, हातापासून क्षत्रिय, मांड्यांपासून वैश्य व पावलांपासून शूद्र जन्माला आले. शूद्रांनंतर अंत्यज नामक लोकांचा क्रम लागतो. समाजाची सेवा करणाऱ्या ह्या सेवकवर्गाला गावकुसाबाहेर राहावे लागते. अत्यंजांमध्ये साळी, सोनार, शिंपी, सुतार, तेली कुंभार, न्हावी, लोहार, धोबी, चांभार, गारुडी, टोपल्या विणणारे बुरुड, मासे पकडणारे कोळी, शिकार करणारे पारधी व भिल्ल, खलाशी, असे व्यवसायजन्य लोक व ज्यांचा स्पर्श दूषित मानला जातो असे महार-मांगादि अस्पृश्य लोक शूद्र जातीत मोडतात. याशिवाय यवन व म्लेच्छ या अहिंदूंनाही अस्पृश्य लेखले जाते. (अल्बेरुनी, २०००, पृ. ६८-६९) वि. का. राजवाडे यांनी हिंदू समाजातील जातीयतेचे स्वरूप स्पष्ट करताना लिहिले होते की, "एतद्देशज अनार्य असोत की बहिर्देशज अनार्य असोत, हिंदुस्थानात त्यांना कायमचे रहावयाचे म्हणजे जात बनूनच त्यांना हिंदू समाज राहू देत असे. .. जात बनल्याशिवाय नागरिकत्वाचे किंवा ग्रामस्थाचे हक्क मिळत नसत; म्हणजे स्थानिक स्वराज्याच्या वा साम्राज्याच्या छत्राचा आश्रय मिळत नसे. .. अशी जाती देशात फार काल राहिली, एथील अभिजन बनली व हिंदू समाजाचे सामान्य धर्म पाळू लागली, म्हणजे त्या जातीला हिंदू हे अभिधान प्राप्त होई.

नंतर त्या जातीचा जो देव असेल त्याची स्थापना हिंदूंच्या नेहमीच्या तेहतीस कोटी देवतामंडळात होऊन, पूर्ण हिंदुत्वाचा शिक्का त्या जातीवर कायमचा मारला जाई." (नवभारत, ऑगस्ट १९५७)

हिंदूधर्मातील जातिसंस्थेची उतरंड जन्माने ठरत असते; कर्तृत्वाच्या बळावर वरच्या वर्गात जाण्याचा उर्ध्वगामी प्रवास या व्यवस्थेला मंजूर नाही. जपानमध्ये आपल्याकडच्या अतिशूद्रांप्रमाणे जन्मजात 'हीनैन' म्हणजे 'माणसाबाहेरचा' समजला जाणारा वर्ग होता; १८७१ साली जपानच्या बादशहाने फर्मान काढून सामाजिक स्तरभेद करणाऱ्या 'इटा व हीन-इन' या संज्ञा रद्द केल्या व लोकांच्या दर्जा-धंद्याप्रमाणे लोकगणती करण्यात येईल असे घोषित केले. तेव्हापासून जपानातील जातीय विषमतेचे मूळ उखडले गेले. भारतातही जातिभेदात्मक विषमतेचा उच्छेद झाल्याखेरीज राष्ट्रीय ऐक्यभाव वाढणार नाही अशी समजूत वाढू लागली. विसाव्या शतकात याविषयी विचारमंथन व सामाजिक संघटनाबांधणीचे प्रयोग सुरू झाले. जातिसंस्थेच्या माध्यमातून ब्राह्मणशाहीने धर्मसंस्थेचे मतलबी अर्थनिर्णयन करण्याच्या दीर्घकालीन परंपरेला आव्हान देणे ही सोपी गोष्ट नव्हती. यापूर्वी शंकराचार्यांनी भारताचे सांस्कृतिक ऐक्य घडवून आणण्याचे प्रयत्न केले होते, पण त्याचे स्वरूप वैचारिक होते; दैनंदिन समाजजीवनात भावनात्मक ऐक्यभावाचा समतामूलक आचारधर्म रूजविण्यात या प्रयत्नांना फारसे यश आलेले नव्हते. जातिभेदाच्या उच्च-नीच भावाची उतरंड कायम होती. पुरोहित वर्गाकडून ब्राह्मणेतर जातींना मिळणारी वागणूक अवमानकारक होती. ब्रिटिश वसाहतवादाविरुद्ध सुरु झालेल्या संघर्षातही हा सामाजिक समतेच्या लढाईचा मुद्दा दुय्यम स्थानी गणला जात असे. आधी सामाजिक की आधी राजकीय या वादात आधी सामाजिक म्हणणारे सुधारक अल्पसंख्यच ठरत होते.

नाटककार राम गणेश गडकरी यांनी एकदा पांडुरंग क्षीरसागर यांच्याशी बोलताना 'खरंच, स्वराज्य कशाला हवे?' असा प्रश्न केला होता. गडकऱ्यांच्या मते 'स्वराज्य म्हणजे हिंदुस्थानातल्या प्रत्येक लहानथोर व्यक्तीला हे आपलं स्वतःचंच राज्य आहे असं वाटलं पाहिजे.' पण स्वराज्यप्राप्तीनंतर प्रत्येकालाच हे म्हणता येईल का, याविषयी गडकऱ्यांना शंका होती. पांडुरंग क्षीरसागरांशी झालेल्या वार्तालापात ते म्हणाले होते की, "त्याचं कारण असं की, स्वराज्य हाती आल्यावर आजची स्थिती पाहता, ब्राह्मण किंवा उच्च वर्णात हेच लोक आपली सत्ता चालवू पाहणार, असं इतर अशिक्षित व जातीजातींत विषम भाव पाहणाऱ्या लोकांना वाटू लागणार. आजच पहा ना! आगगाडीत आपल्या बाकावर एखादा अस्पृश्य बसला तर ब्राह्मण लोकांना ते खपत नाही. दोघांवरही इंग्रजांचं राज्य असताना ही स्थिती! मग ब्राह्मणांच्या हाती स्वराज्य आल्यावर तुम्हाला असं वाटतंय की, ते आपल्या अस्पृश्य बांधवांना समतेनं वागवितील? मग असलं हे स्वराज्य हवं तरी

कशाला? अशा राज्यात सर्व जातींतल्या लोकांना काय सारखे अधिकार मिळणार आहेत? मग तुम्हीच सांगा पाहू. स्वराज्य मिळून त्यापासून आपल्या गरीब बांधवांना काय फायदा आहे? माझे असे मत आहे की, सर्व जाती कौन्सिलमध्ये बसण्याच्या योग्यतेच्या होतील तेव्हाच स्वराज्य मिळावे. म्हणजे आपले स्वत:सिद्ध हक्क मिळविण्याला ते पात्र होतील." (क्षीरसागर पांडुरंग , १९३०, पृ. ३१) महाराष्ट्रातल्या समाजजीवनात जातीय भेदमूलकता किती भिनलेली होती, आणि ही भेदमूलकता संपविली पाहिजे याची जाणीव महाराष्ट्राच्या चर्चाविश्वात कशी रूजू लागली होती, याचा प्रातिनिधिक नमुना म्हणून गडकऱ्यांच्या ह्या प्रतिक्रियेकडे पाहिले पाहिजे. महाराष्ट्रातील राजकारणात व समाजकारणात या अनुषंगाने सुरू असलेल्या विचारमंथनाचा व चळवळींचा इथे मागोवा घ्यावयाचा आहे.

विसाव्या शतकातील महाराष्ट्रातल्या जातींची संख्यात्मक नोंद १९३१ च्या जनगणना अहवालातून मिळते. तत्पूर्वी १९०१ च्या जनगणनेपासून पोटजातींची माहिती घेणे बंद झाले होते. १९३१ सालचा महाराष्ट्राचा भूप्रदेश मुंबई इलाखा, मध्यप्रांत, वऱ्हाड आणि हैद्राबाद संस्थानांतर्गत मराठवाडा असा विभागला गेला होता; या सर्वांची एकत्रित लोकसंख्येची जातनिहाय टक्केवारी अशी होती :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ब्राह्मण : ४. ०४ | सोनार : १. ०८ | शिंपी : ०. ५६ | कोळी : १. ५ | महादेव कोळी : ०.५३ |
| लिंगायत : २. ० | मराठा : २४. ९ | कुणबी : ८. ५७ | माळी : ३. ५ | सुतार : ०. ९३ |
| साळी : ०. ४४ | कोष्टी : ओ. ४८ | महार : ९. ४८ | धेड : १. ९१ | मातंग : २. ५ |
| मादिग : १. २१ | तेली : २. १८ | धनगर : २. ५५ | भिल्ल : १. ६ | |

कुणबी आणि मराठा यातली भेदरेषा तशी पुसटच होती; परंतु केवळ शेतीवरच उपजीविका असणारे कुणबी आणि शेतीबरोबरच शिपाई पेशा किंवा पाटिलकीचे अधिकार असणारे ते मराठे अशी स्थूलमानाने वर्गवारी अभिप्रेत होती. माळी समाज कांदा, मुळा भाजी व फुलशेती करीत.

**जातिनिहाय संस्थाबांधणीचे प्रयत्न :**

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात जातिकेंद्री समाजरचनेत सामाजिक शुद्धीकरणाची प्रक्रिया सुरू करण्याची निकड नवसुशिक्षितांना प्रकर्षाने जाणवू लागली होती. लोकहितवादी, म. फुले, गोपाळ गणेश आगरकर, राजारामशास्त्री भागवत इत्यादी सुधारकांच्या लेखनातून आणि कृतिकार्यक्रमांतून या विचारमंथनाला सुरुवात झाली होती. जातीमुळे व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य राहात नाही, व्यावसायिक ज्ञान व कौशल्ये मर्यादित राहातात, त्यामुळे कुलभेदापेक्षा गुणभेदाच्या निकषांना मानणारी समाजव्यवस्था अस्तित्वात असायला हवी; त्यासाठी हिंदूंचा नवा धर्मग्रंथ तयार करावा आणि सामाजिक

सुधारणांचा प्रारंभ ब्राह्मणांच्या सुधारणांपासून करावा अशा आशयाची मांडणी लोकहितवादींनी धर्मसुधारणेच्या १५ कलमांतून केली होती. (शतपत्रे, पत्र क्र. ६४, कलम ९, १२) म. फुले यांनी शूद्र व अतिशूद्र यांना मानवी हक्कांपासून दूर ठेवण्यास कारणीभूत झालेल्या ब्राह्मणांना जातिभेदनिर्मूलनाच्या लढाईतला पहिल्या क्रमांकाचा शत्रू ठरवले होते. धर्मग्रंथातील ब्राह्मणांची लबाडी उघड करण्याची व ब्राह्मणेतरांचे संघटन करण्याची मोहीम म. फुले यांनी सुरू केली होती. आगरकरांनी " आम्हीच नीच मानलेल्या महारांची स्थिती सुधारून त्यांची व वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मणांची एक पंगत झालेली जर आम्हास पाहता आली तर आम्ही स्वत:स मोठे कृतार्थ मानू" असे समताधिष्ठित नवसमाजाचे स्वप्नही रेखाटले होते. राजारामशास्त्री भागवतांनी जातिभेदनिर्मूलनासाठी वर्णसंकर आणि आंतरजातीय विवाहांचा मार्ग प्रशस्त करण्याचा सल्ला दिला होता. (भागवत राजारामशास्त्री, १९७९, पृ. ३९, ४७) १८९३ साली दापोली येथे गोपाळबुवा वलंगकर यांनी सैन्यातून निवृत्त झाल्यावर 'अनार्य दोष परिहारक मंडळी' स्थापन करून अस्पृश्यांच्या जीवनात ऊर्जितावस्था आणण्यासाठी प्रयत्न केले होते. १८५७ च्या बंडानंतर सरकारने अस्पृश्यांना लष्करभरतीपासून वंचित ठेवले होते; हा अन्याय दूर करण्यासाठी वलंगकरांनी न्या. रानडे यांच्या सहकार्याने 'अनार्य दोष परिहारक मंडळी'च्या वतीने सरकारात अस्पृश्य लोकांची सैन्यभरती करण्यात यावी यासाठी अर्ज केला होता. सामाजिक सुधारणा केल्याशिवाय काँग्रेसने राजकीय सुधारणांची मागणी करण्यात काही अर्थ नसल्याचा स्पष्ट अभिप्रायही या मंडळीच्या माध्यमातून व्यक्त करण्यात आला होता.

महात्मा फुल्यांच्या मृत्यूनंतर १९ व्या शतकात सुरू झालेली सत्यशोधक चळवळ काही काळ थंडावली होती. मधल्या काळात सत्यशोधक चळवळीने चालविलेल्या 'दीनबंधू' पत्रातून काही समाजजागृतीपर लेखन होत होते. त्यानंतर जातबांधवांच्या परिषदा घेण्याचे उपक्रम सुरू झाले. शिवराम जानबा कांबळे यांनी २४ नोव्हेंबर १९०२ रोजी पुण्याजवळ सासवड येथे ५१ गावच्या महार समाजाची सभा घेतली. या सभेत १५८८ महारांच्या सह्या-अंगठे घेऊन महारांना लष्करी व पोलिस सेवेत नोकरीची संधी द्यावी, त्यांना शिक्षण द्यावे असा अर्ज सरकारात दाखल करण्यात आला. १९०३ साली विदर्भातील किसन फागू बंदसोडे यांनी 'सन्मार्गबोधक निराश्रित समाज' स्थापन केला होता. हिंदू समाजात मनुष्यत्वाचा, समतेचा व स्वातंत्र्याचा हक्क मिळवणे आणि अस्पृश्य समाजात सुधारणा घडवून आणणे ही संस्था स्थापण्यामागची भूमिका होती. अस्पृश्य मानलेल्या सर्व जातीत विद्येचा प्रसार करणे, अपेय व अभक्ष्य वर्ज्य करणे, धर्मांतरास विरोध करणे हा या संस्थेच्या कृतिकार्यक्रमाचा आराखडा होता. त्यानुसार किसन फागूंनी स्वत: एक हजार रुपयांची गुंतवणूक करून वाचनालय सुरू केले, अस्पृश्यांना उद्योगप्रवण

बनविण्यासाठी हातमागावर लुगडी, धोतरजोडे व कापड विणण्याची साधने असलेली उद्योगशाळा सुरू केली. १९०७ साली अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केली. किसन फागूंसोबत क्रियाशील असलेले कालिचरण नंदागवळी यांनीही १९०९ साली गोंदियाला शाळा सुरू केली. लोकमत संस्कारित करण्याकरिता कालिचरण नंदगवळी यांच्या सहकार्याने किसन फागू यांनी १९१३ साली 'विटाळ विध्वंसक' नावाचे पत्रही सुरू केले. किसन फागूंनी स्वत:ची पत्नी तुळसाबाई यांनाही महार समाजाच्या कार्यकारी मंडळात सहभागी करून सक्रिय केले. १९१७ साली मुंबईत झालेल्या अस्पृश्य वर्गाच्या सभेत नंदागवळी यांनी अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांचे समर्थन केले. (इंगळे रामचंद्र, १९९२, पृ. ९-१०)

१९०४ साली शिवराम कांबळे यांनी पुणे येथे अस्पृश्यांना दु:स्थितीतून बाहेर काढण्यासाठी 'श्री शंकर प्रासादिक सोमवंशीय हितचिंतक मित्र समाज' नावाची संस्था स्थापन केली. १ जुलै १९०८ रोजी त्यांनी पुण्याहून 'सोमवंशीय मित्र' नामक मासिक प्रकाशित करून जनजागृतीचे काम सुरू केले. ५ एप्रिल १९१० रोजी जेजुरीस पनवेलचे महार जहागिरदार सुभेदार गंगाराम कृष्णाजी भातनकर यांच्या अध्यक्षतेखाली 'सोमवंशीय परिषद' आयोजित करून अस्पृश्यांच्या प्रश्नांची सार्वजनिक चर्चा सुरू केली. (खरात,२०१७, पृ. १०-११) पुण्यास रे मार्केटसमोर झालेल्या मद्यपान निषेधाच्या सभेत लो. टिळक आणि कृ. प्र. खाडिलकर यांच्या जोडीने शिवराम कांबळे यांनीही मद्यपानामुळे होणाऱ्या सामाजिक हानीची चिकित्सा करणारे भाषण केले होते. रा. कांबळे यांच्या कार्याचा महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी यथोचित गौरव केला होता.

१९१२ साली केळूस्कर व सी. के. बोले यांच्या पुढाकाराने 'मराठा ऐक्येच्छु सभे'ने मागासलेल्या हिंदू जातींच्या हितार्थ मुंबईच्या टाऊन हॉलमध्ये परिषद आयोजित केली होती. या परिषदेच्या माध्यमातून निरनिराळ्या मागास जातीच्या प्रतिनिधींना एकाच मंचावर एकत्र अणण्याचा प्रयोग करण्यात आला होता. (केळूस्कर, १९७७, पृ. १४३-१४५) या विद्याप्रसारक मंडळीचे कार्यवाह कृष्णराव केळूस्कर यांनी अस्पृश्य मुलांना विद्यादानासाठी साहाय्य करण्यासाठी पुढाकार घेतला, तेव्हा 'मराठा' ह्या नावाखाली कोणत्या जातीचा समावेश करावा असा प्रश्न 'मराठा ऐक्येच्छु सभे'त उपस्थित झाला होता; त्यावेळी 'इंदुप्रकाश'च्या १६ मार्च १९२० च्या अंकात केळूस्करांनी एकंदर मागासलेल्या जातींचा समावेश 'मराठा' संज्ञेत करावा असे सभेचे मत असल्याचा खुलासा प्रसिद्ध केला होता.( मराठा शिक्षण परिषदेच्या कार्याचा स्वतंत्र आढावा 'शैक्षणिक परिवर्तने' या प्रकरणात घेण्यात आला आहे, तो पहावा.) विसाव्या शतकाच्या पहिल्या तीन दशकात मराठा शिक्षण परिषदेखेरीज माळी शिक्षण परिषद, रामोशी परिषद, धनगर परिषद अशा जातिपरिषदा संघटित व्हायला प्रारंभ झाला होता. सत्यशोधक समाजाचे

पुढारी अशा जातिपरिषदांना मार्गदर्शन करीत असत. उदाहरणार्थ, माळी शिक्षण परिषदेस कृष्णराव भालेकरांची, रामोशी परिषदेला सावित्रीबाई रोडे व तात्यासाहेब रोडे यांची, धनगर परिषदेला बारामतीकर हरी पिराजी धायगुडे यांची प्रेरणा लाभली होती.

**सत्यशोधकांची चळवळ :**

ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचे सुकाणू प्रारंभी सत्यशोधक चळवळीच्या कार्यकर्त्यांकडे होते. १८७३ साली म. जोतीबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून जातिनिष्ठ समाजरचना मोडून समताधिष्ठित समाजाच्या पुनर्संघटनेची वैचारिक मूहर्तमेढ केली होती. धार्मिक अंधश्रद्धा व अनिष्ट रूढीपरंपरांमुळे सर्वसामान्य माणसांचे होणारे शोषण रोखणे, भिक्षुकशाहीच्या विरोधात जनमत जागृती करणे, सावकारी व सरकारी लाचलुचपतीच्या व्यवहारांतून होणारी पिळवणूक थांबविण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये जाणीव जागृती करणे, अस्पृश्यांना बहिष्कृत ठरविणाऱ्या पारंपरिक लोकसमजुती दूर करणे यासाठी सर्वव्यापी लोकशिक्षणाची चळवळ संघटित करणे हे सत्यशोधक समाजाच्या स्थापनेमागचे ध्येय होते. फुल्यांच्या मृत्यूनंतर ही चळवळ थंडावली होती; मात्र १९१० साली मुंबईत विठ्ठल रामजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन सत्यशोधक समाजाची पुन:स्थापना करण्यात आली. शिखांनी 'गुरु'चे पद बंद करून 'खालसा' नामक सभेची स्थापना केली किंवा गोसावी-निरंजन संप्रदायिकांनी 'महंत' हे पद नाकारून नियामक मंडळाची योजना स्वीकारली त्याप्रमाणे सत्यसमाज परिषदेनेही नियामक मंडळ स्थापन केले. १९११ साली स्वामी रामय्या व्यंकय्या आय्यावारू यांच्या अध्यक्षतेखाली पहिले नियामक मंडळ संघटित करण्यात आले. तसेच सत्यशोधक समाज म्हणजे नवीन धर्म नव्हे, हेही स्पष्ट करण्यात आले. सत्यशोधक हा हिंदू धर्म सोडणारा आहे असा गैरसमज करून देण्यास शत्रूस फावेल, हा धोका ओळखून या चळवळीने जाणीवपूर्वक आपल्या नामकरणात 'धर्म' शब्द टाळून 'समाज' शब्दाची योजना केली. (माळी, २०००, पृ. ८७) "ईश्वराची ओळख करून देण्यात उपाध्याय किंवा धर्मगुरू असल्या मध्यस्थाची जरूरी नाही, हे तत्त्व मान्य आहे तो सत्यसमाजी" ही व्याख्या संमत करण्यात आली. (माळी, कित्ता, पृ. ९२) अज्ञान व अंधश्रद्धांचे सामाजिक पटल दूर करून निम्नवर्गीय समाजात ज्ञानाची तृष्णा निर्माण करण्यासाठी सामाजिक चळवळ संघटित करणे व जातीय तेढ निर्माण करणाऱ्या ब्राह्मणशाहीविरोधात लढा देणे हे पुन:स्थापित सत्यसमाजाचे ध्येय निश्चित करण्यात आले. सत्यशोधक समाजाच्या नियमितपणे परिषदा घेऊन चळवळीला चालना देण्यात आली. सत्यसमाज परिषदेच्या अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी रात्री सत्यशोधकीय जलशाचा कार्यक्रमही होत असे. जलशाच्या मध्यंतरात समाजप्रबोधनात्मक विषयांवर भाषणेही होत.

सत्यशोधक समाजाने महाराष्ट्रात निरनिराळ्या ठिकाणी कार्यकर्त्यांची फळी उभी

करण्यासाठी व्यूहरचना आखली. २३ मार्च १९१३ रोजी ठाणे येथे झालेल्या सत्यशोधक समाज परिषदेचे स्वागताध्यक्ष हरिश्चंद्र नारायण नवलकर यांनी या कार्यपद्धतीचे वर्णन करताना म्हटले होते की, "सत्यशोधक समाज हा सायपर्स आणि मायनर्स पलटणी प्रमाणे आहे; या पलटणीचे मुख्य काम असे असते की, लढाईस सैन्य निघाले म्हणजे त्या सैन्यास जंगलातून जाण्याचा रस्ता तयार करावयाचा, रस्त्यात आलेली झाडे तोडून टाकावयाची, नदी नाले आडवे झाल्यास त्यावर पूल बांधावयाचे, त्याप्रमाणे सत्यशोधक समाज हा सुधारणेचा मार्ग तयार करीत आहे. सुधारणेच्या मार्गात जे अडथळे येत आहेत, ते दूर करीत आहे. लोकात विद्येची अभिरुची उत्पन्न करीत आहे आणि आपल्यामध्ये ज्या वाईट चाली आहेत, त्या काढून टाकण्याकडे लोकांच्या मनाची प्रवृत्ती करीत आहे. सुधारणारूपी सैन्याचा मार्ग आम्ही तयार करीत आहोत." (गजमल माळी, २०००, पृ. १५८)

१७ एप्रिल १९११ रोजी पुण्यात झालेल्या पहिल्याच अधिवेशनात अध्यक्ष स्वामी रामय्या आय्यावारू यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून पुरोहितशाहीमुळे होणाऱ्या धार्मिक शोषणाची सर्वांगीण मीमांसा केली. वास्तविक ईश्वरोपासनेसाठी कुठल्याही मध्यस्थाची गरज नसते; परंतु धर्मकृत्ये करण्यास फुरसत नसल्याने ते दुसऱ्याकडून करून घेण्याची प्रवृत्ती जडावली व त्यातून पुरोहिताची संकल्पना अवतरली. श्रमविभागणीच्या तत्त्वानुसार यात प्रथमदर्शनी काही दोष दिसत नसला तरी त्याचे बीज आळसात असल्याने ही प्रवृत्ती निषेधार्हच आहे. धार्मिक विधी करण्याचे तंत्र आत्मसात करून त्या नैपुण्याच्या जोरावर उपाध्यायांनी या व्यवसायात जम बसविला. त्यातून स्थूलमानाने ईशपूजन वगैरे धर्मकृत्ये करणारा व दुसऱ्याकडून धर्मकृत्ये करवून घेणारा असे दोन वर्ग पडत गेले. वास्तविक काम करवून घेणारा मालक व काम करणारा सेवक अशी ही वर्गवारी होती. त्या अर्थाने ब्राह्मण पुरोहितांचे काम नोकराचे म्हणजे हलक्या दर्जाचे ठरते. राजारामशास्त्री भागवत यांनी म्हणूनच क्षत्रियाची पायरी वरची व ब्राह्मणाची खालची असे म्हटले होते. जैन लोकांतही उपाध्यायाची किंमत श्रवकांच्या मानाने फारच कमी समजली जाते. इतकेच नाही तर ब्राह्मणांमध्येही भिक्षुकाचा दर्जा गृहस्थापेक्षा कमी समजला जातो. "देवपुजा करून श्रीमंत यजमानाच्या पंक्तीस जेवणारांची योग्यता, त्या घरच्या आचारी पाणक्यापेक्षा फारशी जास्त नसते" असे पुरोहितशाहीचे सामाजिक मूल्यांकन रामय्या आय्यावारू यांनी केले. मात्र उपाध्याय व यजमान या दोन घटकांची परिणती पुढे जातीय भेदभावात होऊ लागल्याने समाजात अंतर्गत दुरावा व दुहीचे वातावरण निर्माण झाले. उपाध्याय वर्ग हा मूळचा सेवक असूनही श्रेष्ठ होऊन बसला. त्यामुळे यजमानास गुलामाची स्थिती आली. जोतीबा फुल्यांनी धर्मकृत्ये करण्यास स्वजातीचा अथवा परजातीचा अशा कुठल्याच पुरोहिताची गरज नाही हे आवर्जुन

सांगितले होते. मात्र जोतीबांचे अनुयायी म्हणविणाऱ्यांनी जोतीबांचा कटाक्ष ब्राह्मणवर्गावर आहे अशी समजुत करून घेऊन पुरोहिताच्या कामासाठी ब्राह्मणांना वगळले म्हणजे झाले, असा ग्रह करून घेतला व ब्राह्मण पुरोहिताऐवजी स्वजातीचा उपाध्याय पुढे करण्याची प्रवृत्ती पुढे आली. "दलाल – मग तो स्वजातीचा किंवा परजातीचा असो – हा समाजहितास बाधक आहे. त्यामुळे ब्राह्मणेतरांमध्ये स्वजातीचा पुरोहित होण्याचे बीज पेरले जाता कामा नये; .. ऊसाच्या पिकात टारफुला उगवला असता सर्व पिकाचा नाश करतो, तसा हा पुरोहित असतो. याकरिता वेळीच सावध होऊन या गोष्टीचा बंदोबस्त केला पाहिजे" असा इशारा आय्यावारू यांनी आपल्या समाजबांधवांना दिला. (माळी गजमल, २०००, पृ. ८१-८७)

पुरोहितशाहीचा सामान्यजनांना कसा फटका बसत होता याची काही उदाहरणे सत्यशोधक समाजाच्या अधिवेशनातून चर्चिली जात होती. सत्यशोधक पद्धतीने पुणे जिल्ह्यातील भावडी (ता. खेड) येथे एका परलोकवासी स्त्रीची क्रिया करण्यात आली. याप्रसंगी कोणासही दक्षिणा वाटण्यात आली नाही. यावरून एका ग्रामजोश्याने आपला वंशपरंपरागत हक्क बुडाला म्हणून खेडच्या मुन्सफ कोर्टात दावा दाखल केला होता. लग्नविधीत ब्राह्मण पुरोहिताला डावलले म्हणून ओतुरच्या सत्यसमाजीय बाळाजी पाटील यांच्याही विरोधात नुकसानभरपाईचा दावा दाखल करण्यात आला होता. अशा खटल्यांच्या निकालपत्रातील न्यायाधीशांनी दिलेले काही निवाडे नाशिकच्या १५ एप्रिल १९१२ च्या सत्यसमाज परिषदेत अध्यक्ष डॉ. संतुजी रामजी लाड यांनी वाचून दाखविले होते. एका निकालपत्रात म्हटले होते की, "वतनदार जोशास न बोलाविता ब्राह्मण जातीच्या दुसऱ्या उपाध्यायाकडून किंवा आपल्या जातीच्या उपाध्यायाकडून धर्मविधी करवून घेतले तर जितकी दक्षिणा विधी चालविणाऱ्यास दिली असेल तितकी रक्कम ग्रामजोशास यजमानाने दिली पाहिजे." ओतुर खटल्याच्या निकालपत्रात न्या. नानावटी यांनी म्हटले होते की, "हिंदू धर्मशास्त्रात लग्नाचे जे विधी सांगितले आहेत, ते करण्यात येतील तेव्हा, किंवा ब्राह्मणेतर जातीचे धर्मविधी ज्या प्रकारे व्हावेत असे मि. मंडलिक यांनी आपल्या ग्रंथात लिहिले आहे, ते केले असतील तेव्हा, वादीला नुकसान मागता येईल. परंतु तंट्याचे लग्नाचे वेळी त्यापैकी कोणतेही विधी करण्यात आले नसल्याने वतनाच्या हक्काने वादी जोशी यास नुकसान मागता येत नाही. " या दोन निवाड्यांचा आधार देऊन डॉ. संतुजी लाड यांनी सत्यशोधक समाजबांधवांनी वेदोक्त वा पुराणोक्त पद्धतीने पूजा करण्याची हाव सोडून दिली पाहिजे, असे आवाहन केले. प्रत्येकाने आपले धर्मविधी स्वत: करावेत, जरूर लागल्यास मदत घ्यावी, पण त्याबद्दल दक्षिणा, शिधा, अहेर वगैरे काही देऊ नये व घेऊ नये असेही आवाहन केले. (गजमल माळी,२०००, पृ. १२१-१२३)

देवभोळेपणा आणि अज्ञानामुळे निर्माण झालेल्या समाजातील अंधश्रद्धा दूर झाल्या तरच पुरोहितशाहीमुळे होणारे शोषण संपेल अशी भूमिका सत्यसमाज परिषदेतून मांडली जात होती. ठाण्याच्या २३ मार्च १९१३ च्या सत्यशोधक समाजाच्या परिषदेचे अध्यक्ष प्रो. महादेव गणेश डोंगरे यांनी म्हटले होते की, "जेथे जेथे ज्ञानासंबंधी गाढ अंध:कार आहे, तेथे तेथे पराकाष्ठेचा धर्मभोळेपणा आणि उपाध्याय कपटनाट्य (भटांचे डावपेच) यांचे विलक्षण प्राबल्य असते. देवभोळेपणा आणि भटांचे डावपेच या उभयतांचा अपवित्र संयोग झाला म्हणजे, त्यापासून नीतिभ्रष्टतेची उत्पत्ती होते. प्रकाश हा नीतीचे संरक्षण करणारा पोलिस आहे. धर्मभोळेपणा आणि भटांचे डावपेच यांचे प्राबल्य हे दोन मनुष्यांचे महाशत्रू आहेत; त्याच्या बरोबर प्रकाशाचे युद्ध झाले म्हणजे त्यात प्रकाशाचा जय होतो." (माळी गजमल, २०००, पृ. १५८) १९१५ सालच्या सत्यशोधक समाज परिषदेत अध्यक्ष अण्णा बाबाजी लठ्ठे यांनीही याच विचारांचा पुरस्कार केला. "मनोविकार प्रदिप्त करण्यास धर्मविषयक समजुती फार उपयोगी असतात; आणि मनोविकार हे तर विचारशक्तीचे सर्वात बलिष्ठ शत्रू होत. यामुळे धर्माच्या क्षेत्रात हुशार लोकांना आपले बुद्धिकौशल्य दाखविण्यास, बुद्धीच्या जादूचे खेळ खेळण्यास चांगले फावते.. या क्षेत्रात असलेली नजरबंदी करण्याची सोय, आपण नेहमी लक्षात ठेवली पाहिजे." (माळी गजमल, २०००, पृ. २८५) अशा प्रकारे पुरोहितशाहीविरोधात जनजागरण करून समाजात विवेकनिष्ठा रुजविण्यासाठी सामाजिक प्रबोधनाचे काम सत्यशोधक मंचाच्या माध्यमातून केले जात होते.

विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन-तीन दशकात ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाने महाराष्ट्रातले सार्वजनिक जीवन गढूळ झाले होते. नाशिकसारख्या ठिकाणी ब्राह्मणी धर्माचा व ब्राह्मणी वर्चस्वाचा पगडा इतका जबरदस्त होता की, त्यामुळे सत्यशोधक समाजाच्या कामासाठी पुढे यायला मंडळी धजावत नव्हती. याविषयीची कैफियत १५ एप्रिल १९१२ रोजी नाशिकच्या सत्यसमाज परिषदेत स्वागताध्यक्ष सावळाराम दगडूजी घोलप यांनी मांडली होती. (माळी, २०००, पृ. १०७) ब्राह्मणांच्या या भेदमूलक वृत्तीवर प्रकाश टाकताना प्रि. गोळे यांनी म्हटले होते की, ".. ब्राह्मण कोणत्याही दुसऱ्या जातीच्या उन्नतीस मदत करीत नाही व म्हणूनच कोणत्याही जातीची ब्राह्मणाबद्दल असावी तशी पूज्यबुद्धी नाही. हिंदुस्थानातील शेकडो धंदे आज बुडत आहेत, त्यांचा पुनरुद्धार करण्याऐवजी नवीन धंदे लोकांस शिकविणे हे बुद्धीचे एक काम आहे; परंतु तेल्यास, घिसाड्यास, सोनारास, रंगाऱ्यास किंवा इतर कोणत्याही जातीस कोणत्या ब्राह्मणाने मदत केली आहे ? उलट त्यास तुच्छ मानून त्यापासून ब्राह्मण दूर दूर राहात आहेत." (गोळे, १८९५, पृ. १५) लग्नविधी वा अन्य कुठलाही धार्मिक विधी करण्याचा जन्मजात हक्क आपलाच आहे असे समजून ब्राह्मण पुरोहिताला न बोलावता असे विधिकर्म कुणी केले

तरी त्याची दक्षिणा मात्र आपल्यालाच मिळाली पाहिजे असा यांचा दावा असतो. ब्राह्मणांच्या या प्रवृत्तीवर भाष्य करताना परिषदेचे अध्यक्ष डॉ. संतुजी लाड म्हणाले होते, "आपणास कराराप्रमाणे एक रत्तल मांस मिळाले पाहिजे, असा हट्ट धरणाऱ्या 'शायलाक' प्रमाणे या ब्राह्मणांचे हृदय पाषाणाचे आहे." (माळी,२०००, पृ. ११९) सत्यसमाज परिषदेने जातीय तेढ न वाढवता समाजबांधणी करावी हा मुद्दा स्पष्ट करताना डॉ. संतुजी लाड यांनी नाशिकच्या १९१२ च्या सत्यसमाजाच्या परिषदेत म्हटले होते की, "ब्राह्मणांतही भिक्षुकी करणारेच आमच्याशी विरोध करतात.. बाकी जे अस्सल ब्राह्मण आहेत, त्यांचा सत्यशोधकांचे कामात विरोध नाही; ते उलट मदत करतानाही आढळतात." (माळी, कित्ता, पृ.११६) सत्यशोधक समाजात ब्राह्मणेतर पुरोहित तयार होऊन त्यांतून पुन्हा एकदा स्वजातीतून नवा धार्मिक दलालांचा वर्ग तयार होऊ नये याची काळजी घेण्यावरही परिषदेच्या नेतेगणांचा कटाक्ष होता. जगद्‌गुरू म्हणविणारे आचार्य, महंत वगैरे संस्था निरुपयोगी झाल्याचे या धुरिणांचे मत होते.

आपली कोणतीही सुधारणा न्यायी इंग्रजी सत्तेखालीच होणे शक्य आहे, अशी सत्यसमाजाची धारणा होती. त्यामुळे सत्यशोधकांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध चाललेल्या कुठल्याही जहाल-मवाळ राजकीय चळवळीशी संबंध ठेवू नयेत, हा विचार जवळपास प्रत्येक परिषदेत बिंबवण्यात येत होता. सत्यसमाजाच्या पहिल्याच परिषदेत स्वामी रामय्या यांनी सत्यसमाजीयांची राजनिष्ठा अढळ असली पाहिजे हा संदेश देताना म्हटले होते की, "जहालांचे निर्भेळ स्वराज्य आपल्या नुकसानीस कारण होणार यात शंका नाही. त्यापेक्षाही मवाळांचे वसाहतीचे स्वराज्य आम्हास फार घातक आहे. या स्वराज्याचा ओनामा म्हणजे म्युनिसिपालिट्या. त्यांची स्थिती पहा. त्याच्या व्यवस्थेत विद्येत मागासलेल्या लोकांविषयी आस्था यांचा किती अभाव असतो, हे आपणा सर्वांच्या अनुभवास आहेच. याकरिता आपली राजनिष्ठा उत्तम कसाची ठेवणे आपल्या किती फायद्याचे आहे, हे आपणास सांगण्याची आवश्यकता नाही." (माळी, २०००, पृ. ८५) हाच मुद्दा आधोरेखीत करताना डॉ. संतुजी लाड म्हणाले होते : "आमच्या सत्यशोधक समाजाची उत्पत्ती, अस्तित्व व भरभराट ही सर्व इंग्रजी राजसत्तेवर अवलंबून आहे. ही राजसत्ता स्थापित झाली नसती तर ब्राह्मणेतरात विद्येचा प्रवेश झालाच नसता व ज्ञानाचा अभाव असल्याने ईश्वर व भक्त यांच्यामध्ये दलाली करण्याचा हक्क सांगणाऱ्या लोकांचे कपट समजले नसते. .. परंतु ईश्वरी प्रेरणेनेच इंग्रजांचे हाती हिंदुस्थानचे व विशेषत: महाराष्ट्राचे स्वामित्व गेल्या कारणाने आमच्या सत्यसमाजाच्या कामास अवकाश मिळाला आहे." (कित्ता, पृ. ११३) या भूमिकेमुळेच हिंदुस्थानचे बादशहा पंचम जॉर्ज यांच्या दिल्ली दरबाराच्या प्रसंगी सत्यसमाज परिषदेने बादशहाचे अभिष्टचिंतन करण्याचा ठराव पारित केला. या ठरावात म्हटले होते की, "विद्येचा प्रसार करणे हे इंग्रजी

राज्यसत्तेचे ब्रीद आहे, व या राज्यातच विद्येचे दरवाजे सर्वांस खुले झाले व आम्हांस आमचे हक्क समजू लागले, याबद्दल आम्ही इंग्रज सरकारचे उपकार मानतो व हे राज्य आमच्यावर अखंड राहो, अशी ईश्वराजवळ प्रार्थना करतो." (कित्ता, पृ. १३८)

तत्कालीन ब्राह्मणेतर पक्षाच्या राजकीय चळवळीपेक्षा सत्यशोधक चळवळीचे उद्दिष्ट व कार्यक्षेत्र वेगळे होते. 'सत्यशोधकांचा वेद अथवा जेधे-जवळकरांस उत्तर' या पुस्तिकेत खंडेराव गणपत कालेलकर यांनी ही भूमिका स्पष्ट करताना म्हटले होते की, "सत्यशोधक चळवळ जशी धार्मिक आहे, तशी ब्राह्मणेतर चळवळ नाही. जे लोक सत्यशोधक नाहीत त्यांना ब्राह्मणेतर चळवळीत भाग घेता येतो. सत्यशोधक चळवळीत ब्राह्मण चालतो, पण ब्राह्मणेतर चळवळीत त्या मार्गात बंधने आहेत. .. या दोन्ही चळवळी निसर्गत: एकमेकींच्या विरुद्ध आहेत. .. ब्राह्मणेतर चळवळ ही राजकीय चळवळ आहे... हिंदूंची वर्णव्यवस्था बदलण्याचा, सुधारण्याचा किंवा नष्ट करण्याचा तिचा उद्देश नाही." (फडके य. दि. २०१३, पृ. ६२) मुकुंदराव पाटील यांनी सत्यशोधक चळवळीची तत्त्वे भागवत धर्माहून वेगळी नसून विठ्ठलाचे नाते कष्टकरी समाजाशी जोडले गेले असल्याचा विचार 'हिंदू आणि ब्राह्मण' (१९१०) या ग्रंथातून मांडला. चोखामेळा, सावता माळी, गोरा कुंभार इत्यादी संत हे उद्योजक विठोबाच्या उपासनेशी कसे जोडले गेले होते, याची चर्चा करताना त्यांनी लिहिले होते की, "धर्माच्या नावाखाली आडरानी बहकलेल्या जनास सन्मार्गावर आणणे हेच भागवत धर्माचे ध्येय आहे. भेदाभेद अमंगळ टाकून देऊन महारासही बरोबर घेणे, हे भागवत धर्माच्या देवाचे म्हणजे चोख्यामहाराची अंबील पिणाऱ्या विठोबाचे ध्येय होय. वेताळेफेताळाची तोंडे काळे करून तशा अनेक देवतांस पालथे घालणे हे भागवत धर्माचे ध्येय आहे. .. भागवत धर्माचा अनुयायी म्हणविणारा कर्ता सुधारक असला पाहिजे. त्याच्या अंगात *यारे यारे लहान थोर, याति भलत्या नारी नर'* अशी आरोळी देण्याची धमक पाहिजे. .. ही तत्त्वे सत्यशोधकांच्या चळवळीहून वेगळी आहेत असा कोणता शहाणा भागवतधर्मी छातीला हात लावून म्हणेल?" (दीनमित्र, २१ सप्टेंबर १९२५ / शिंदे अरुण, २०१९, पृ. ३८) सत्यशोधक समाज कुठल्याही एका जातीचे केंद्र बनला नाही. या चळवळीत सोनोपंत कुलकर्णी (ब्राह्मण), भीमराव महामुनी (सोनार), ज्ञानगिरी बुवा (गोसावी), पंडित धोंडिराम नामदेव (कुंभार), शास्त्री नारो बाबाजी महाघट (मराठा), असे विविध जातीतले कार्यकर्ते एकत्रित काम करीत होते.

सत्यशोधक समाजाने प्रमाण मानलेला कोणताही एक धर्मग्रंथ नसल्याची टीका केली जात असे, त्याला उत्तर देताना मुकुंदराव पाटील यांनी लिहिले होते की, "आम्हाला धर्मग्रंथांची आवश्यकता नाही, परंतु लोकांची बुद्धीची भूक भागवायची आहे. माणसांची मने नव्या ज्ञानाकरिता उघडी झाली पाहिजेत. म्हणून आम्ही कोणत्याही धार्मिक पुस्तकांची शिफारस करीत नाही." (दीनमित्र, ३१ जानेवारी १९१२ / शिंदे अरुण,

२०१९, पृ. ४०) याच भूमिकेतून मोतिराम वानखडे यांनी 'गायत्री मंत्राचे व्याख्यान' नामक पुस्तिकेतून सत्यशोधकांनी गायत्रीमंत्राऐवजी शिक्षणाचा मंत्र जपण्याचे आवाहन केले होते. भास्करराव जाधव यांनी 'घरचा पुरोहित' किंवा हरिभाऊ चव्हाण यांनी 'लग्नविधी', 'श्राद्ध', दशक्रिया' हे सत्यशोधक पुरोहितांसाठी केलेले लेखन हे पर्यायी धार्मिक मंत्रविधींच्या स्वरूपाचे असले तरी त्यामागे ब्राह्मण पुरोहितांच्या मक्तेदारीला शह देण्याच्या कृतिकार्यक्रमाची प्रेरणा होती. अंधश्रद्धा व कर्मकांडांच्या कथांना नवे विज्ञाननिष्ठ रूप द्यावे, स्पृश्यास्पृश्यभाव, सोवळे-ओवळे यातून येणारी भेदमूलक जीवनमूल्ये हद्दपार करावी या हेतूने के. बी. देशमुख यांनी पारंपरिक सत्यनारायणाच्या कथेची नवरचना करून आधुनिक 'सत्यशोधक समाजाची सुबोध सत्यनारायणकथा' लिहून प्रसिद्ध केली. साधूवाण्याच्या कथेतील अवतार म्हणजे परमेश्वराचे रूप असे; सत्यशोधक पोथीत ज्याच्यात ईश्वरी गुण दिसतील अशा व्यक्तीला अवतार मानावे असा नवार्थबोध दिला जात असे. सत्यनारायणाच्या कथेनंतर जमा झालेल्या दक्षिणेची रक्कम विद्यादानाकरिता द्यावी असे सत्यशोधक पोथीत छापलेले असे. धार्मिक विधींना सामाजिक सुधारणांचे अवगुंठन चढवून त्यांचे असे नवे आविष्कार हळू हळू समाजमान्य होऊ लागले. १९०६ साली विदर्भात अकोला जिल्ह्यातील वडिगाव येथे सत्यशोधक पद्धतीचे ३०५ विवाह लागले होते; यावरून विधिकर्माच्या या समांतर चळवळीला मिळत गेलेल्या सार्वत्रिक स्वीकृतीची कल्पना येते. साररूपाने सांगायचे तर सत्यशोधक चळवळ एकाच वेळी धार्मिक आणि त्याचवेळी धर्मसुधारणावादी व ब्राह्मणी शोषणाचा प्रतिवाद करणारी चळवळ होती. स्वत:चे विधी स्वत: करता यावेत व ब्राह्मणी पुरोहितांना दूर सारावे या विचारांचा गावोगावी प्रसार व्हावा यासाठी पूर्ण वेळ फिरते पगारी उपदेशक नेमण्याची कल्पना त्यातून पुढे आली. १९०७ साली बारामतीच्या सभेत तसा ठराव मांडला गेला व 'सत्यधर्मप्रसारक फंड' स्थापन करण्याची योजना पुढे आली. अर्थात अकारण ब्राह्मणांचे शत्रूत्व पत्करणारी जातिवादी तेढ निर्माण करणे हे या चळवळीचे ध्येय नव्हते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे लोकमान्य टिळकांचे चिरंजीव श्रीधरपंत टिळक हे १९२७ साली मुंबईत झालेल्या महात्मा जोतिबा फुले यांच्या जन्मशताब्दी कार्यक्रमास हजर होते व त्यांनी आल्या भाषणात 'आपण सत्यसमाजिस्ट नसलो तरी सत्यशोधक असल्याचे सांगून या विचारधारेशी असलेली बांधिलकी जाहीरपणे बोलून दाखविली होती. केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर, श्रीपतराव शिंदे हे ब्राह्मणेतर पक्षाचे पुढारी श्रीधरपंत टिळकांचे पाठीराखे होते. ८ एप्रिल १९२८ रोजी श्रीधरपंत टिळकांनी गायकवाड वाड्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीत 'समता संघा'ची स्थापना केली, त्या संघाचे अध्यक्ष श्रीपतराव शिंदे होते. दुर्दैवाने श्रीधरपंत टिळक यांच्या या भूमिकेमुळे केसरी-मराठा संस्थेच्या विश्वस्तांशी अंतर्गत कलह माजला व वयाच्या

तिसाव्या वर्षी श्रीधरपंत टिळकांनी आत्महत्या केली. सत्यशोधक समाजाच्या कार्यविस्ताराची एक दिशा प्रशस्त होण्याच्या प्रक्रियेला यामुळे खिळ बसली.

**सत्यशोधक जलसे :**

खेडूतांच्या प्रबोधनाचे साधन नाटक नसून 'जलसे' असल्याचे सत्यशोधक कार्यकर्त्यांनी जाणले होते. महाराष्ट्रात १९२० ते १९३० च्या काळात ग्रामीण भागात लोकजागृती करण्यासाठी जलसाकारांची एक नवी पिढी तयार झाली होती. पश्चिम महाराष्ट्रातून भाऊराव पाटील, बाबूराव घाटगे, रामचंद्र घाटगे, गोविंदराव घाटगे, भाऊराव पाटोळे, जोतीराव फाळके, तात्याबा यादव, लक्ष्मण भोसले, आबासाहेब साबळे; विदर्भातून गुलाबराव शिसोदे, सोनोपंत कुलकर्णी, रामभाऊ लोखंडे, मोतिराम वानखेडे, खंडेराव जाधव, श्यामराव कुलट; नाशिकचे गणपराव दादा मोरे गावोगावी फिरून जलशाचे कार्यक्रम करीत. जलशांचे उद्दिष्ट, आशय व रचना कशा असाव्यात यासंबंधी भाऊराव रामचंद्र पाटोळे यांनी जलशांच्या काही नमुन्यांसह 'जलसाशिक्षक' नामक कार्यपुस्तक तयार केले होते. त्यात जलशांचा उद्देश स्पष्ट करताना त्यांनी म्हटले होते की, ".. ह्याजपासून शेतकरी व मजूर वगैरे मागासलेल्या लोकांत विद्येचा प्रसार व्हावा; बालविवाह व जरठ विवाह करू नयेत; लग्नात बुडीत खर्च करू नये; दारूपासून होणारे नुकसान व वाईट परिणाम; हिंदू व मुसलमानांचे ऐक्य असावे; ईश्वरभक्ती करावी; परमेश्वर एकच मानावा; ईश्वरभक्ती करण्यास मध्यस्थ दलाल नसावा वगैरे वगैरे." (गुंदेकर, २०१०, पृ. ३६८)

जलशाचा प्रारंभ शिवाजीच्या पोवाड्याने होई , तसेच इंग्रजांचे शिक्षण, दळणवळण इत्यादी क्षेत्रात केलेल्या सुधारणांबद्दल आभारप्रदर्शन केले जात असे. सत्यनारायण किंवा वास्तुशांती, कन्याविक्रय, दोन बायकांचा दादला, गृहकलह, हुंड्याची चाल, केशवपन, बालविवाह यासारख्या प्रथांवर टीका करणारा उपहासगर्भ फार्स किंवा वग सादर करण्यात येई. तसेच ब्राह्मण-सावकारांपासून होणारे शोषण, दारूचे दुष्परिणाम, अस्पृश्यतानिवारण, हिंदू-मुस्लिम ऐक्य, आंतरजातीय विवाह, विद्येचे महत्त्व इत्यादी विषयांवर कवने सादर केली जात. पाळणा, छक्कड, लावणी, कलगीतुरा, पोवाडा, गवळण, मंत्र इत्यादी लोकसंस्कृतीत रुळलेल्या पद्यबंधांतून रचना सादर केल्या जात. (नमुना उदाहरणांसाठी पहा टिप २] सत्यशोधक समाजाने जलशांच्या माध्यमांतून धार्मिक अंधश्रद्धा, पोथी-पुराणातील भाकडकथा, कालबाह्य रूढी-परंपरा यांचा उपहास करणारे संवाद व पदे सादर करून सुधारणावादाचा पुरस्कार केला. '*धूर्त भटांना धर्म करोनी / नसे फायदा घ्या ऐकोनी*' यासारख्या पदरचनांतून पुरोहितशाहीच्या मतलबी काव्यावर कोरडे ओढणारे जलसे गायिले गेले. मोतिराम तुकाराम वानखडे यांनी 'संगीत शेतकऱ्यांची गोफण' (१९०३), सत्यशोधक चाबूक (१९०८), सत्याचा शोध (१९०९)

'संगीत भटांचे थोतांड खंडन' या पद्यग्रंथांतून शेटजी-भटजींवर टीका करणारी कवने लिहिली. सत्यशोधकांचे पारंपरिक शास्त्र्याबरोबर होणारे खटकेबाज संवाद लिहून जलसाकार ब्राह्मणी शोषण व ब्राह्मणेतरांचे पराक्रम गुंफणारी कथा लिहिली. नमुन्यादाखल रामचंद्र बाबा घाटगे यांच्या 'भट व महार संवाद' (१९१५) यातल्या एक खटकेबाज संवाद येथे उद्धृत करीत आहे :

महार : अहो माणसाला कुठे विटाळ होतो ?

भट : तर मग जनावराला होतो की रेड्याला होतो की गाढवाला होतो? होतो कोणाला? जंगलाच्या झाडाला?

महार : .. विटाळ बायकांत येतो. त्या चार दिवस दूर बसतात. त्याला 'रजस्वला' म्हणतात!

भट : विटाळ हे नाव प्राकृत आहे संस्कृत नव्हे.

महार : विटाळात रजस्वला मिळवली की अस्पृश्यता होते. आणि अस्पृश्यातून विटाळ वजा केला की रजस्वला शिल्लक राहते. रजस्वला बहिष्कृत राहाते आणि बहिष्कृताला विटाळाने भागितले की, भट शिल्लक राहतो व भटीण भागाकार होतो असेच तुमचे मत नाही का? असे सांगा भटजी, माझ्या सावलीने तुम्हास प्राकृत विटाळ झाला की संस्कृत? (साठे, २०११,पृ. २९८-२९९)

रामभाऊ भिलवडीकर यांनी ब्राह्मणवादावर टीका आणि बहुजनांच्या मनात शिक्षणाविषयी आस्था निर्माण करणारे वग व अस्पृश्यतानिर्मूलनाचा विचार पोचविणारी पदे रचली. *'शेतकीच्या शाळा घाला / बोर्डिंगची करा व्यवस्था / दर तालुक्याला'* अशा प्रबोधनपर रचनाही सादर केल्या. विद्येचे महत्त्व, दारूचे दुष्परिणाम, विधवांचे केशवपन इत्यादी विषय या रचनांमधून मांडले जात होते. सत्यशोधक जलसे सादर करणाऱ्यांत मराठे, कुणबी, न्हावी, सोनार वगैरे अन्य मागासवर्गीय लोककलावंतांचा सहभाग असे; इतकेच नाही तर सोलापूर जिल्ह्यातील सोनोपंत रामचंद्र कुलकर्णी ह्या ब्राह्मणाचाही सत्यशोधक जलशाचा फड होता. यामुळे जातीय तेढ कमी व्हायलाही अप्रत्यक्षपणे मदत होत होती. सत्यशोधक जलसाकारांनी बहुजन समाजात मान्यता असलेल्या वारकरी संप्रदायाशी व खंडोबाच्या उपासना पंथाशी जोडून घेऊन सुधारणावादी विचारधारा रूजविण्याचा प्रयत्न केला. यामुळे नव्या विचारांना सामाजिक स्वीकृती मिळवण्यातला अडसर दूर व्हायला मदत झाली. याचे उत्तम उदाहरण म्हणजे नारायण मल्हार जोशी यांनी १९११ साली स्थापन केलेल्या *'सोशल सर्व्हिस लीग'* या संस्थेचा होलिकोत्सव. या उत्सवात होळीला ग्राम्य व बीभत्स भाषेत केल्या जाणाऱ्या वर्तनव्यवहाराला प्रबोधनात्मक स्वरूपाच्या सुरूप रंजनाचे स्वरूप देण्यात आले.

सत्यशोधक समाजाच्या प्रबोधनवादी चळवळीला पुढे ब्राह्मण-ब्राह्मणेतर तणावांचे रंग चढू लागले व महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात जातीय तेढीचे प्रसंग उद्भवू लागले. या जातीय तेढीतून १९२० साली पुण्यातल्या ब्राह्मणांनी शाहू महाराजांची सभा उधळली. या घटनेचे तत्काळ पडसाद सातारा जिल्ह्यात उमटले. तिथे ब्राह्मणेतरांनी ब्राह्मणांची शेते जाळून-लुटून उद्ध्वस्त केली. बलुतेदारांनी ब्राह्मणांवर बहिष्कार टाकावा यासाठी सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांनी दबाव आणायला सुरुवात केली. कुंभारांनी ब्राह्मणांना मडके देऊ नयेत, नाभिकांनी त्यांच्या हजामती करू नयेत असा प्रचार सुरू केला. सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते ब्राह्मणांना धमकावतात, शिवीगाळ करतात, पिकांची नासधूस करतात, त्यांचे पाणवठे व देवळे विटाळतात अशी तक्रार पंढरपूरच्या ब्राह्मण्यसंरक्षक सभेने सरकारात दाखल केली. कायदेमंडळात रावजी रामचंद्र काळे यांनीही हा प्रश्न उपस्थित केला. गांधीजींनी ५ नोव्हेंबर १९२० च्या पुण्याच्या सभेत या प्रकारांचा जाहीरपणे निषेध करून जातीय विद्वेष थांबविण्याचे आवाहन केले होते.

**सत्यशोधक नियतकालिके :**

जलशांच्या माध्यमाखेरीज नियतकालिकांच्या मुद्रित माध्यमातून सत्यशोधक चळवळीचा प्रसार करण्याचे प्रयत्न या काळात झाले. [पहा- टिप ३] कोल्हापूर, पुणे, जळगाव, अमरावती अशा विविध ठिकाणांहून ही पत्रे प्रसिद्ध केली जात होती. या अंकांच्या मुखपृष्ठांवर किंवा अग्रलेखाच्या शिरोभागी सत्यशोधक चळवळीच्या ध्येयाशी सुसंगत अशी ब्रिदवाक्ये अथवा काव्यपंक्ती छापल्या जात. उदाहरणार्थ, भास्करराव जाधव यांच्या 'मराठा दिनबंधु' पत्राच्या मुखपृष्ठावर 'विद्येत मागासलेल्या लोकांकरिता' अशा शब्दांत लक्ष्यगटाचा निर्देश केला जात असे. के. सी. ठाकरे आपल्या 'प्रबोधन' पत्राच्या मुखपृष्ठावर 'उत्तिष्ठित जाग्रत प्राप्य वरान्निबोधत' असे वचन छापत. शिवाय इंग्रजीतून "A Fortnightly Journal devoted to the Social, Religious and Moral Regenaration of the Hindu Society' हे आपले ध्येय्य असल्याचे नमूद करीत. दिनकरराव जवळकर यांच्या 'कैवारी' पत्राच्या मुखपृष्ठावर "The orgn of the Bombay Provincial Non-Brahmin Party' किंवा बेळगावच्या 'राष्ट्रवीर' पत्रावर "The Organ of the Non-Brahman-Party" अशी आपली ब्राहणेतर पक्षाशी असलेली राजकीय बांधिलकी घोषित केलेली असे. कोल्हापूरच्या 'कर्मवीर' पत्राच्या मुखपृष्ठावर 'श्रीमत् क्षात्रजगद्गुरू करवीर यांचे आश्रयाखालील पाक्षिक पत्र' असे स्पष्ट शब्दात छालेले असे. 'हरहर महादेव' अशा शिरोभागीच्या गर्जनेने अग्रलेख छापणाऱ्या वर्ध्याच्या 'ब्राह्मणेतर' पत्राने कवी धनुर्धर यांच्या पुढील काव्यपंक्तीतून आपले ध्येयधोरण घोषित केले होते :

"मज म्हणती ब्राह्मणेतर / ध्येय माझे देशोद्धार
घेई दीनांचा कैवार / हेच ठरले ब्रीदसार

जुलुमी सत्तेचा धिक्कार / दुष्ट रूढींचा संहार
नूतन सत्याचा प्रचार / करित चैतन्य संचार"

मध्यप्रांत वऱ्हाडातून प्रसिद्ध होणारे 'सत्योदय' नियतकालिकही 'मुकं करोति वाचालं / पंगु लंघयते गिरिम्' या ब्रिदवाक्यातून वंचितांना सक्षम बनविण्याच्या आपल्या ध्येयाचा निर्देश करीत असे. मुकुंदराव पाटील 'दीनमित्र'च्या अग्रलेखाच्या शिरोभागी

"ज्याशी दु:खाने गांजिले / तेचि सोयरे आपुले
ठेवी मुक्तीला गहाण / काढी तयाकरिता ऋण
तोचि दिनांचा कैवारी / दीनां मानी देवापरी"

हा श्लोक छापून दीन दु:खितांची सेवा करण्याची पत्राची बांधिलकी असल्याचे नमूद करीत असत. तासगावचे नारायण रामचंद्र विभुते त्यांच्या 'सत्यप्रकाश' साप्ताहिकाच्या अग्रलेखाच्या शिरोभागी पुढील श्लोक छापत :

"भोंदू धूर्त फसविती असत्य धर्मे अशिक्षिती लोकां /
सत्यप्रकाश इच्छा व्हावी त्यांची तयातुनी सुटका
सत्यापरता नाही धर्म, सत्य तेचि परब्रह्म /
सत्याशी पुरुषोत्तम, सर्व काळ तिष्ठतसे "

केशव सीताराम बोले 'नवयुग'च्या अग्रलेखाच्या शिरोभागी –

नवयुग नवकाली कामगारासी मित्र / म्हणूनि उदय पावे ज्ञान हे आज
जगति बहुत लाभो योग्यता कामगारा / सतत सुरस गा जो उद्यमाचा नगारा"

अशा काव्यपंक्तीतून कामगारवर्गीयांची उद्यमशीलता वाढविण्याच्या आपल्या ध्येयाचा निर्देश करीत असत. निरनिराळ्या ध्येयवाक्यातून किंवा काव्यपंक्तीतून सत्यशोधक नियतकालिकांचे संपादक समोर असलेल्या उद्देशपत्रिकेची सूत्ररूपात मांडणी करीत असत. या नियतकालिकांनी मंत्र-तंत्र, नवस-सायास, अंगारे-धुपारे या अंधश्रद्धांतली व दैववादी प्रवृत्तीतली निरर्थकता पटवून देण्यासाठी लोकप्रबोधनाचे काम केले. सामान्यजनांचे आर्थिक व मानसिक शोषण करणाऱ्या ब्राह्मण व शेठ सावकारांचे वाभाडे काढले. टिळक पक्षीय मंडळीकडून शाहू महाराजांवर केल्या जाणाऱ्या टीकेचा खरपूस समाचार घेण्याचे काम केले. सक्तीचे व मोफत शिक्षण, विवाहपद्धती, श्राद्धविधी अशा कर्मकांडातल्या सुधारणा, जातीपेक्षा कर्मावरून व्यक्तीची गुणवत्ता ठरविण्याचे निकष, द्वेष-मत्सर टाळून सामाजिक ऐक्यभाव जपण्याची शिकवण, राजकारणात ब्राह्मणेतर पक्षाचा प्रचार हे या नियतकालिकांचे मध्यवर्ती विषय असत. शेतकरी परिषद, मराठा शिक्षण परिषद, अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशाची चळवळ अशा घटनांचे सविस्तर वृत्तांत प्रसिद्ध होत असत. या वृत्तपत्रांची भाषा परखड, उपहासगर्भ व तिखट शब्दप्रहार करणारी असे. 'काठीचे सपाटे' (मुकुंदराव पाटील : दीनमित्र), किंवा 'तलवारीचे वार' (दिनकरराव

जवळकर : विजयी मराठा) ही सदरांची नावे या प्रखर भूमिकेचीच निदर्शक होती. मात्र असे असले तरी,

"फणसा अंगी काटे / आत अमृताचे साठे
नारळ वसता कठीण / परि अंतरी जीवन साठे"

(हंटर : हरिभाऊ जाधव)

या न्यायाने 'नाठाळाचे माथी काठीचे घाव' घातले जात असले तरी आतून 'मऊ मेणाहूनी मऊ' अशी वैष्णवाची वाणीही या लेखनातून पाझरत असे. समाजबांधणीसाठी अशा लेखनाचा परिणामकारक उपयोग होत असल्याचे दिसून येत होते. 'मराठा समाजाचे शिक्षण' ह्या वासुदेव बिर्जे यांच्या 'दीनबंधु'तील लेखमालेमुळे 'मराठा शिक्षण परिषदे'च्या स्थापनेला गती मिळाली. मुंबई प्रांताच्या तसेच मध्यप्रांत-वऱ्हाडच्या कायदेमंडळाच्या निवडणुकीत ब्राह्मणेतर पक्षाच्या जागा वाढायला या पत्रांच्या प्रचारमोहिमेचा फायदा झाला. सायमन कमिशनच्या वेळी ब्राह्मणेतर पक्षाची बाजू 'कैवारी' या दिनकरराव जवळकर यांच्या पत्रातून नेटकेपणाने मांडण्यात आली. मुंबईतल्या कामगार चळवळीला 'कैवारी', 'नवयुग' पत्रातील लेखनामुळे आत्मबळ प्राप्त झाले. ब्राह्मणेतर पक्षात आणि सत्यशोधक चळवळीत संघटना, शिस्त, वैचारिक सुस्पष्टता निर्माण होण्यात या वृत्तपत्रांचा मोठा वाटा राहिला आहे. मुंबईच्या 'नवयुग'ने मुंबईच्या गिरणी कामगारांचे प्रश्न, खोतशाही, जोशी वेतन विधेयक, भेसळीसंबंधीचे विधेयक अशा ऐरणीवर आलेल्या प्रश्नांची मांडणी करण्यात पुढाकार घेतला. अमरावतीच्या 'महाराष्ट्र केसरी'ने शेतकरी संघाच्या मुखपत्राची भूमिका निभावली. ठाण्याच्या 'प्रतिनिधी'ने ब्राह्मणेतर काँग्रेस पक्षाचे मुखपत्र म्हणून भूमिका पार पाडली. बाळासाहेब पाटील यांच्या 'सत्यवादी'ने १९३४ साली स्वतंत्र स्त्रीविभाग सुरू करून स्त्रियांना संपादनात थेट सहभागी करून घेतले. मनोरमाबाई साबडे, सरोजिनी तोफखाने, शांता कुलकर्णी, कुसुम कुलकर्णी, विद्यागौरी या स्त्रियांनी 'सत्यवादी'त स्वतंत्र स्त्रीविभागाची जबाबदारी घेतली. सत्यवादीने स्त्रीशक्ती विशेषांक, विधवा विवाह पुरस्कार विशेषांक, महाराणी ताराबाई विशेषांक, राजर्षी शाहू विशेषांक, तसेच सिनेमा, बुवाबाजी या विषयावर विशेषांक काढून सत्यशोधकीय नियतकालिकांच्या आशयविश्वाची व्याप्ती वाढविली. १९४० साली दक्षिण संस्थान विशेषांक, १९४४ साली औद्योगिक विकास विशेषांक आणि १९४९ साली नेहरू विशेषांक काढून त्यांनी समकालीन व भविष्यकालीन विकासाच्या दिशा स्पष्ट करण्याची जबाबदारी निभावली.

ग्रामीण लोकजीवनाची पुनर्घटना साधता यावी यादृष्टीने लोकांच्या आचारविचारात कोणते बदल व्हावेत, ग्रामसंस्था आणि रूढी-परंपरांचे आधुनिक मूल्यदृष्टीतून पुनरुज्जीवन करण्यासाठी कोणते रचनात्मक कार्यक्रम करावेत यासंबंधी दिग्दर्शन करणारे साहित्य सत्यशोधकीय नियतकालिकांनी प्रसिद्ध केले. ग्रामजीवनात जत्रा ह्या सामाजिक

संमेलनाचे काम साधतात. कष्टकरी समाजाला जत्रा-उत्सवातून चैतन्याचे क्षण अनुभवायला मिळतात. मात्र त्याचबरोबर जत्रेतून अंधश्रद्धांचे पोषणही कसे होते याची चर्चा श्रीपतराव शिंदे यांनी 'विजयी मराठा' या पत्रातून केली आहे. जत्रेच्या वेळी होणाऱ्या धार्मिक कर्मकांडातील फोलपणा व शेतकरी-कष्टकरी समाजाचे शोषण यावर प्रकाश टाकताना ते लिहितात, "देवाच्या अंगावर गुलाल बुक्क्याच्या मुठीच्या मुठी फेकल्या म्हणून धर्माच्या नावावर भटांकडून अज्ञ लोकांच्या डोळ्यांत फेकली जाणारी धूळ थांबणे शक्य नाही किंवा देवाच्या पुढे कापराच्या वड्यावर वड्या जाळल्याने अज्ञानाचा काळोख दाटलेल्या अंत:करणात प्रकाशही पडणे शक्य नाही." जत्रेच्या माध्यमातून जमा होणारा पैसा शैक्षणिक-आर्थिक सुधारणांकडे वळवावा, कुस्तीचे फड जिंकणाऱ्या पैलवानांना बक्षिसे वाटताना सत्यशोधक समाजाची पुस्तकेही द्यावीत, देवाच्या नावावर होणाऱ्या मेंढरा-बकऱ्यांची हत्या थांबवावी, ब्राह्मणभोजने बंद करून अनाथ-अपंगांना अन्नदान करावे, जत्रेच्या उत्सवात मर्दानी खेळ, प्रदर्शन, वक्तृत्व स्पर्धा, मुलांना शालेय साहित्याचे वाटप इत्यादी विधायक उपक्रमांची जोड द्यावी असे पर्याय 'विजयी मराठा'कारांनी सुचविले होते. (विजयी मराठा, २७ एप्रिल १९२५ /शिंदे २०१९, पृ. १८९-१९०)

'जागृति'कार पाळेकर यांनी 'महाराष्ट्राच्या आर्थिक परवशते'ची परखड मीमांसा केली. महाराष्ट्राला राजकारण करण्यात फार गोडी आहे, मात्र स्वत:च्या आर्थिक स्थितीबाबत त्याने कायमच अनास्था दाखविली आहे. परिस्थितीवर खापर फोडून नामानिराळे होण्याची ही प्रवृत्ती महाराष्ट्राला घातक ठरेल, असा इशाराही त्यांनी आपल्या लेखनातून दिला होता (जागृती, २४ एप्रिल १९२१). मराठी माणसाच्या या आर्थिक उदासीनतेची चर्चा करताना त्यांनी सह्याद्री पर्वतातील पाण्याच्या स्त्रोतातून विद्युतनिर्मिती करण्याच्या टाटाच्या प्रकल्पाचा दाखला दिला होता. टाटांच्या कंपनीत युरोपियन आणि अमेरिकन भागीदार आहेत; त्यांच्या फायद्यातला किती भाग महाराष्ट्राच्या वाट्याला येणार आहे, याचा कोणी विचार करीत नाही. महाराष्ट्रात कारखानदारी, व्यापार-उद्योगात गुजराती, पारसी, खोजे, बोहरी, मेमण लोक आहेत; मराठी माणूस कुठे दिसत नाही. मराठी माणूस खर्डेघाशी करण्यात आणि हमाली उद्योगात समाधान मानतो. त्यामुळे मराठी माणसाची परवशता दिवसेंदिवस वाढतच असल्याचे पाळेकरांनी निदर्शनास आणून दिले होते. (पाळेकर, १९६६, पृ. ३८)

**सयाजीराव गायकवाड यांचे कार्य :**

१९ व्या शतकातील महाराजांच्या अस्पृशोद्धाराच्या व बहुजनांच्या शिक्षणासाठी केलेल्या कामाचा वृत्तांत यापूर्वीच्या पहिल्या खंडात आला असल्याने त्याची पुनरावृत्ती न करता येथे विसाव्या शतकातील कार्यापुरता आढावा घ्यावयाचा आहे. १९०२ साली महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी 'धार्मिक स्वातंत्र्याचा कायदा' केला व धर्मांतरित

व्यक्तीचे कायदेशीर हक्क व सांपत्तिक अधिकारांना संरक्षण दिले. धर्मांतरित व्यक्तीस जातिबहिष्कृत करता येणार नाही अशी कायदेशीर तरतूद करण्यात आली. १९०४ साली १८ व्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेचे उद्घाटन करताना महाराजांनी जातिसंस्थेतील घातक प्रथांची विस्ताराने चर्चा केली होती. कुटुंबसंस्था, वैवाहिक जीवन, शिक्षण अशा सर्वच क्षेत्रांवर हे जातिसंस्थेचे सावट आहे. जातीनुसार व्यवसाय निश्चित होत असल्याने मानवी कर्तृत्वाचा परिघ संकुचित झाला आहे. जातिसंस्थेत व्यवसाय बदल करता येत नाही, परदेशगमन करून पाश्चात्यविद्या शिकता येत नाही, जातीजातीत सुसंवाद नाही. जात स्थानिक द्वेष वाढविते, देशात दुही माजविते, बुद्धीची वाढ खुंटविते, राष्ट्रीय शक्तीचा ऱ्हास घडवून आणते. या दुःस्थितीवर मात करण्यासाठी सर्व जातीत रोटीबेटी व्यवहार सुरू करावेत व कट्टू भेदाभेद नष्ट करावेत, असे महाराजांनी आवाहन केले. (वरखेडे, २०१७, पृ. ९९)

विठ्ठल रामजी शिंदे यांनी म्हटल्याप्रमाणे अस्पृशोद्धाराच्या कामात भारतात सयाजीराव गायकवाड यांचा तिसरा क्रमांक लागतो. १९ व्या शतकात महात्मा फुले यांनी सर्वप्रथम या कार्याला हात घातला, त्यांच्या पाठोपाठ बंगाल प्रांतात ब्रह्म समाजाचे बाबू शशिपाद बॅनर्जी यांनी आणि त्यानंतर बडोद्याचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी अस्पृश्योद्धाराचे काम अंगिकारले. १८७५-७६ सालात स्वामी दयानंद सरस्वती बडोद्यास आले असता त्यांनी महाराजांना केलेल्या उपदेशात चेतावणी दिली होती की, "अस्पृश्योद्धार जर झाला नाही तर हिंदू समाजाला फार मोठी किंमत चुकवावी लागेल. विधर्मी लोक, विधर्मी प्रचारक आणि विदेशीयांचा पैसा घेऊन देशामध्ये फूट पाडणारे आमचेच स्वार्थी देशद्रोही याचा फायदा घेतल्याशिवाय राहणार नाहीत." (दादूमिया, २०१०, पृ. ९) स्वतः महाराजांनी १८७७ साली जातिभेदाची कडक बंधने झुगारून दिली. अस्पृश्यांना मंदिर प्रवेश द्यावा यासाठी मुंबई प्रांतात सुरू झालेल्या चळवळीआधीच बडोदे संस्थानात महाराजांनी आपले खंडेराव मंदिर व इतर सरकारी देवळात अस्पृश्यांना खुला प्रवेश देण्याचे राज्याचे धोरण जाहीर केले. १९२१ साली आर्य समाजाने महाराजांना 'पतितपावन' ही उपाधी देऊन त्यांचा गौरव केला होता. (वरखेडे, २०१४, पृ. १८) मागासवर्गीय लोकसमूहाला 'डिप्रेस्ड' अथवा 'दलित' म्हटलेले सयाजीराव गायकवाडांना आवडत नसे. १९०९ साली पुण्याच्या डिप्रेस्ड क्लास मिशनच्या सभेत त्यांनी जातिभेद निर्मूलनासाठी 'निराश्रित' हा शब्द न वापरण्याची सूचना केली होती. जगातील सर्व वंशांना आणि सर्व लोकांना समान पातळीवर आणण्यासाठी माणसांनी आपले विचारविश्व आणि भावनाविश्व यात समतोल साधण्याची गरज त्यांनी १९११ साली लंडनच्या जागतिक वंशविषयक परिषदेत मांडली होती. भारतातील अस्पृश्यतेचा प्रश्न हा राष्ट्रीय प्रश्न असून त्यासाठी जनभावना तयार करण्यावर त्यांचा भर

होता. "आपल्यातले पूर्वग्रह, लोकभ्रम इ. सडक्या गोष्टींचा बुजबुजाट नष्ट करून टाकण्याचे भीमशक्तीचे काम आपण आधी केले पाहिजे", यावर त्यांचा कटाक्ष असे. आपल्या संस्थानातील पारंपरिक विषमतेच्या रूढी मोडून काढण्यासाठी व अंधश्रद्धेच्या विळख्यातून लोकांना बाहेर काढून त्यांच्यात ऐहिक जाणिवा रुजविण्यासाठी त्यांनी निरनिराळे कायदे केले, प्रबोधन सभा घेतल्या. 'The Baroda Special Civil Marriage Act' हा विवाहविषयक कायदा करून अनुलोम-प्रतिलोम विवाहातून वा अन्य कोणत्याही माध्यमातून कुठल्याही धर्मातील व्यक्तीला आंतरजातीय विवाह करण्यास मोकळीक राहील, असे घोषित करण्यात आले. १९०१ साली विधवापुनर्विवाह कायदा, १९०४ साली बालविवाह प्रतिबंधक कायदा आणि १९३१ साली घटस्फोटाचा कायदा करून विवाहबंधनातून मुक्त होण्याचीही संधी दिली.

सामाजिक रूढीपरंपरांचे उच्चाटन करण्यासाठी कायदे केले पाहिजेत, हे खरे असले तरी राजकीय दंडनीतीला पूरक अशी लोकनीती घडविण्यावर त्यांचा भर होता. त्यामुळे जातिधर्मातील पंक्तिभेद दूर करण्यासाठी त्यांनी स्वत:पासूनच प्रारंभ केला. जुन्यांना बिचकू न देता व नव्यांना बिथरू न देता त्यांनी ज्या क्रमाने जातिभेद दूर करण्याचे प्रयत्न केले त्यासंबंधी इब्राहिमखान यांच्या 'मुस्लिम महार' या आत्मचरित्रात लिहून ठेवलेली एक आठवण अशी आहे :" राजवाड्यात ताटापाटाच्या पंक्ती असत. त्याऐवजी खुर्चीमेजांचे खाने सुरू केले. उपाहार असेल तर तोही त्याच पद्धतीचा. अशा प्रसंगी एकाच दिवाणखान्यात किंवा शामियान्यात जातीवार बिछायती किंवा गट ठेवीत. पुढे बिछायत एकच पण मेजे वेगवेगळी ठेवीत. मेजातले अंतर कापीत कापीत पुढे शाकाहारी व मांसाहारी हिंदू एकत्र केले. नंतर पार्शी, मुसलमान वगैरे परधर्मीयही हळूहळू सामील केले. अशा प्रकारे क्रमाने भोजनातला जातिभेद महाराजांनी लोपवून टाकला. या क्रमाने एकेक पाऊल टाकताना महाराजांनी घाई केली नाही, किंवा रेंगाळून मागे राहाणाऱ्या शंकेखोरांना काडीचे शासनही केले नाही." (फकिरुद्दिन बेन्नूर, २०१३, पृ. १९) राज्यकारभारात अत्यंजांचा सहभाग हवा म्हणून सयाजीरावांनी १९२७ साली डॉ. आंबेडकरांना धारा सभेत दलितवर्गाचा प्रतिनिधी म्हणून सामावून घेतले. आपल्या आयुष्याच्या अखेरच्या पर्वात १९३७ साली बागलाणात साल्हेर येथे आदिवासी परिषद घेऊन त्यांनी आपले वंचितोद्धाराचे व्रत चालू ठेवले होते. आपल्या देशबांधवांनी आंतर्वर्णीय विवाह व सहभोजनाच्या मार्गाने नवकल्पना व सुधारणा प्रचलित केल्या तर अस्पृश्यांना धर्मांतर करण्याची गरज पडणार नाही, असे त्यांचे मत होते. (वरखेडे, कित्ता, पृ. १०१-१०२)

**शाहू महाराजांचे कार्य :**

विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात राजर्षी शाहू छत्रपतींच्या 'वेदोक्त प्रकरणा'मुळे महाराष्ट्रात ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाला तोंड फुटले होते. १८९९ साली कोल्हापूरचे

राजपुरोहित नारायण भटजी यांनी शाहू महाराज हे बहिणीच्या घाटगे कुळातून दत्तक आल्याने शूद्र ठरतात व त्यामुळे त्यांना वेदोक्त मंत्रांचा अधिकार नसल्याची जाहीर भूमिका घेतली होती; त्यातून या वादाला तोंड फुटले होते. वास्तविक भोसले घराणे हे क्षत्रिय आहे हे गागाभट्टापासून मान्य झाले होते; मात्र नारायण भटजींनी हा दत्तक कुळाचा संदर्भ जोडून अकारण नवा वाद निर्माण केला होता. या राजपुरोहिताने पंचगंगेच्या घाटावर राजशिष्टाचारांचे उल्लंघन करणारे वर्तन केले होते. शूद्रांसाठी असणाऱ्या पुराणोक्त मंत्रविधींनीच शाहू महाराजांचे स्नानविधिकर्म करण्याची रीत अंगीकारण्याचा दुराग्रह कायम ठेवला होता. हे लक्षात आल्यावर ६ मे १९०२ रोजी राजर्षी शाहू महाराजांनी नारायण भटास राजपुरोहिताच्या नोकरीतून काढून टाकले व त्यांच्या जागी तात्याराव जोशी यांची राजपुरोहित म्हणून नेमणूक केली. शिवाय नारायण भटजींचे राजपुरोहिताचे इनामही रद्द करून येथून पुढे राजवाड्यातील सर्व धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीनेच होतील असे फर्मान काढले. या पार्श्वभूमीवर क्षत्रियांना वेदोक्ताचे अधिकार नाहीत, याला शास्त्राधार काय याविषयी बरेच चर्वित-चर्वण झाले. महाराष्ट्रात बराच मोठा वैचारिक-सामाजिक कलह झाला. कोल्हापूरचे 'ब्रह्मोदय', पुण्याचा 'केसरी', वाईचे 'मोदवृत्त', सोलापूरचे 'कल्पतरू', ठाण्याचे 'अरुणोदय', मुंबईचे 'गुराखी', विजापूरकरांची 'ग्रंथमाला' या पत्रांनी शाहू महाराजांच्या निर्णयावर टीका केली. या वादात लोकमान्य टिळकांनी 'केसरी'तून सनातनी ब्राह्मणांची बाजू लावून धरली. 'केसरी'कारांनी लिहिले होते की, "कोणास वेदोक्त संस्कार करायचा असेल तो त्याने खुशाल करावा, पण त्याकरिता हातात सत्ता आहे म्हणून अमक्याचे इनाम जप्त कर, अगर अमक्या देवस्थानाच्या वहिवाटीला हात घाल येथपर्यंत जी कित्येक संस्थानिकांची मजल येऊन ठेपली आहे, ती अगदी चुकीची आहे... राजा पूर्ण अधिकारी असला तरीही त्याचे अधिकार मर्यादित असतात. मग इंग्रजी सार्वभौम छत्राखाली वागणाऱ्या मांडलिक राजाची तर गोष्ट बोलायलाच नको." (केसरी, ५ नोव्हेंबर १९०१) इंग्रज सरकारने नारायण राजपुरोहिताचा अर्ज फेटाळला होता.

याच काळात म. शि. गोळे यांनी 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' या पुस्तकातून क्षत्रिय वर्ण अस्तित्वात नसल्याचा सिद्धांत मांडला. वि. गो. विजापूरकर यांनी 'ग्रंथमाले'तून 'जातिभेद व मराठ्यांचे नष्ट वैभव' ह्या लेखमालेतून मराठ्यांवर टीका केली. महाराष्ट्रातील क्षत्रियांचा ब्राह्मणांकडून होणारा हा पाणउतारा सहन न होऊन वासुदेवराव लिंगोजी बिर्जे (१८६४-१९०८) यांनी 'क्षत्रिय आणि त्यांचे अस्तित्व' (१९०३) हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथातून त्यांनी वेदकालापासून १७ व्या शतकापर्यंत वर्णजातिव्यवस्था अस्तित्वात नव्हती हे सप्रमाण सिद्ध करणारे विवेचन केले. प्रथम सर्व लोक एकाच जातीचे होते व त्यांना 'हंस' म्हणत; पुढे कर्मभेदाने चार वर्ण झाले. बौद्धकाळापर्यंत जाती नव्हत्या. श्वेतकेतू, गौतम

इत्यादी ब्राह्मणांनी याज्ञवल्क्य, अश्वपती, प्रवाहन जैवली, काशिराजा या क्षत्रिय राजांकडून ब्रह्मविद्येचे ज्ञान संपादन केले होते. तसेच विश्वामित्रासारखा ऋषी क्षत्रियच होता. देवयानीसारख्या ब्राह्मण कन्यांचे क्षत्रियांशी विवाह होत; तर ब्राह्मणेतर मच्छिमार कोळ्याची कन्या सत्यवतीचा पाराशर ऋषीशी विवाह झाला होता. अशा भेदरहित समाजव्यवस्थेत ब्राह्मणांनी धर्मक्षेत्रात मक्तेदारी प्रस्थापित करायला सुरुवात करून पुरोहितांची वतनदारी निर्माण केली व या पुरोहितशाहीतून जातिभेदाचे गढूळलेले समाजजीवन उदयाला आले. कर्मविपाकाचा सिद्धांत जातिभेद पक्के करण्यासाठी कारणीभूत झाला. गौतम बुद्धाने किंवा महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील संतांनी या पुरोहितशाहीचा आणि कर्मविपाकवादाच्या सिद्धांताचा प्रतिवाद केला होता. पण जातिभेदाच्या हरळीचे हे मूळ उपटून फेकण्याची प्रक्रिया अजूनही पूर्ण झाली नसल्याचे बिर्जे यांनी आपल्या ग्रंथातून विस्ताराने विशद केले होते. त्यांच्या मते कर्मविपाक, नशीब, प्रारब्ध या कल्पनांचा बागुलबुवा दूर करून उद्योग, परिश्रम, व ज्ञानाची कास धरली तर जातीच्या मोडक्या ढालीचा कोणालाही उपयोग होणार नाही. कोल्हापूरच्या वेदोक्त प्रकरणातून उठलेल्या वादळात क्षत्रियांच्या बाजूचे सप्रमाण समर्थन करणारा ग्रंथ म्हणून बिर्जे यांच्या ग्रंथाने महत्त्वाची भूमिका निभावली होती.

याच काळात तंजावूरच्या कोर्टात 'मराठे क्षत्रिय की शूद्र' याविषयावर वाद सुरू होता. राजर्षी शाहू महाराज त्या खटल्यात भाग घेत होते. चित्पावनी ब्राह्मणाच्या अहंकारातून वि. का. राजवाडे यांनी खोटे पुरावे सादर करून संभाजी महाराजांचा खून, साताऱ्च्या छत्रपतींना पदभ्रष्ट करण्याचे कारस्थान, नारायणराव पेशव्यांचा खून यामागे चांद्रवंशीय कायस्थांचे कारस्थान असल्याचे प्रतिपादन केले होते. प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांनी अस्सल कागदपत्रे मिळवून 'कोदंडाचा टणत्कार' (१९१८) या पुस्तकातून राजवाड्यांचा खोटारडेपणा उघड केला होता. इंग्रज सरकारनेही राजवाड्यांच्या या खोटारडेपणाची दखल घेऊन भारत इतिहास संशोधन मंडळाचे दोन हजार रुपयांचे अनुदान रद्द केले होते. ह्या सर्व घटनेकडे राजर्षी शाहू महाराजांचे लक्ष होते. पुण्यातल्या 'टिळकपक्षीय ब्राह्मण लेखकांनी चालविलेल्या क्षत्रियविरोधी प्रचारमोहिमेला शह देण्यासाठी प्रबोधनकार ठाकरे यांनी केलेल्या युक्तिवादामुळे प्रभावित होऊन महाराजांनी त्यांना कोल्हापूरात बोलावून घेऊन अभिनंदन केले. ठाकरे यांच्या 'भिक्षुशाहीचे बंड' या पुस्तकाच्या दोन हजार प्रती पाच हजार रुपये देऊन आगाऊ खरेदी केल्या. 'भट सांगे आणि मठ्ठ ऐके' या स्थितीचा फायदा पुण्यातील पगडीवाला 'केसरी' कंपू घेत असल्याची रोखठोक टीका या ग्रंथातून करण्यात आली होती. 'केसरी'कंपूला शह देण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी 'संदेश'कार अ. ब. कोल्हटकर यांनाही ५०० रुपये देऊन त्यांचे तोंड बंद केले होते. यावर 'राजाने दक्षिणा दिली, ती भटाने घेतली. चुकलं कुठे?' असे

कोल्हटकरांनी आपल्या कृतीचे समर्थन केले होते; उलट पैशाच्या जोरावर आपण अनेक माणसांना गाढव बनवले असल्याचे राजर्षी शाहू महाराजही खुल्या दिलाने सांगत असत. (गुंदेकर, २०१०, पृ. ६७२)

सत्यशोधक समाजाच्या चळवळीतून निर्माण झालेल्या मौखिक व लिखित साहित्यातूनही ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाची व जातिसंस्थेच्या पुनर्घटनेची चर्चा सुरू होती. १९०५ साली शंकराचार्यांनी शाहू छत्रपतींना क्षत्रिय म्हणून वेदोक्त पद्धतीने धर्मकृत्ये करण्याचा अधिकार असल्याचे जाहीर करून या वादावर पडदा पाडला होता; तरीही महाराष्ट्राच्या ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाची धग अजून पूर्ण शमली नव्हती. शंकराचार्यांनी शाहू महाराजांविषयी दिलेला निवाडा समस्त मराठा समाजाला लागू नसल्याची भूमिका ब्राह्मणवर्गाने घेतली व शाहू महाराजांनीही मराठ्यांखेरीज कायस्थ प्रभू, वैश्य, सोनार या जातींना वेदोक्ताचे अधिकार असावेत यासाठी आग्रह धरला नाही, याविषयी मतमतांतरे होत होती १९३० साली साताराच्या प्रतापसिंह महाराजांनी देशभरातल्या पंडितांची वादसभा आयोजित करून समस्त मराठे हे क्षत्रिय असून ते वेदोक्ताचे हक्कदार असल्याचा निवाडा करवून घेतला. मात्र राज्याच्या राजकारणात ब्राह्मणेतर पक्षाच्या माध्यमातून ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचे वारे वहातच राहिलेले दिसतात. मात्र एवढे राजकीय शह-काटशह होत असतानाही राजर्षी शाहू महाराजांच्या मनात टिळकांच्या राष्ट्रीय कार्याविषयीचा आदर जराही ढळला नव्हता. चिरोल खटल्याच्या प्रकरणात महाराजांनी दोन गुप्त पत्रे टिळकांना देऊन मदत केली होती. टिळकांच्या निधनाची बातमी आल्यावर महाराजांनी आपले त्या आठवड्यातले सर्व कार्यक्रम रद्द केले, संस्थानातील सर्व कार्यालयांना सुट्टी दिली व दिवाणसाहेबांकडे आपल्या मनातली भावना व्यक्त करताना म्हणाले, "मास्तर, मर्दानी माणूस गेला. आता आपण कोणाशी लढा देणार? त्याच्या मागे सारा पोरकटांचा बाजार" (गुंदेकर, २०१०, पृ. ६७३-६७४). याउलट १९२२ साली महाराजांच्या निधनाची बातमी कळल्यावर पुण्या-मुंबईच्या ब्राह्मणवर्गाकडून कुठल्याही प्रकारे शोकभावना व्यक्त झाली नसल्याचे निरीक्षण 'जागृति'कार पाळेकरांनी 'ब्राह्मणी खुनशीपणाचे मासले' या लेखातून नोंदवले आहे : " बाळ गंगाधर टिळक वारल्यानंतर राजर्षी शाहू महाराज यांनी टिळक कुटुंबियांना दुखवट्याची पहिली तार पाठविली परंतु त्याच छत्रपतींच्या मृत्यूनंतर ब्राह्मणांच्या पुण्या-मुंबईच्या दैनिकांनी शोकाचा एकही उद्गार काढला नाही. व वाईला अस्पृश्य वर्गाची दु:खप्रदर्शक सभा भरली असता तेथे काही ब्राह्मणांनी दु:खप्रदर्शनाला विरोध करण्याचा प्रयत्न केला. आणि सातारा वगैरे कित्येक ठिकाणच्या खुनशी, दीर्घद्वेषी व दूराभिमानी ब्राह्मणांनी महाराजांच्या मृत्यूची बातमी समजल्यावर आपसात पेढे वाटले असेही म्हणतात! (पाळेकर, १९६६, पृ. २१०-२११)

कोल्हापूरच्या शाहू छत्रपतींनी स्त्री-शूद्रांच्या उत्थानासाठी पुढाकार घेऊन सामाजिक

समतेच्या लढ्यात अग्रेसर असणाऱ्या संस्था व कार्यकर्त्यांना राजकीय पाठिंबा दिला. ते स्वत:ला आर्य समाजाचे अनुयायी असल्याचे म्हणवून घेत. आर्य समाजाच्या विचारधारेला अनुसरून त्यांनी स्त्रीशिक्षण, बालविवाहप्रतिबंध, विधवा पुनर्विवाह, अस्पृश्यता निवारण इत्यादी पुरोगामी उपक्रमांची सातत्याने पाठराखण केली. जातिभेदनिर्मूलनासाठी १९१९ साली कोल्हापूर संस्थानात आंतरजातीय विवाहांना कायदेशीर मान्यता दिली. इतकेच नाही तर आपल्या चुलत बहिणीचे लग्न इंदूरच्या होळकरांच्या धनगर घराण्यात लावून देऊन स्वत:च एक नमुनादर्श घालून दिला. यामुळे मिश्र विवाहांना प्रोत्साहन मिळू लागले. असे २५ मिश्र विवाह त्याकाळात झाल्याची नोंद राजर्षी शाहू महाराजांचे चरित्रकार धनंजय कीर यांनी केली आहे. (कीर,१९९२, पृ. ३११,३३६)

अस्पृश्यतानिवारणाच्या बाबतीत शाहू महाराज फार आग्रही होते. १९०८ साली आपली कन्या अक्कासाहेब हिच्या विवाहप्रसंगी महार-मांगांना इतर मानकऱ्यांप्रमाणे मान देऊन त्यांनी सामाजिक समतेचा मार्ग राजवाड्यातून सुरू होतो, याचा नमुनादर्श घालून दिला. १९१२ साली त्यांनी कोल्हापूरात सत्यशोधक समाजाची स्थापना करून सामाजिक समतेच्या चळवळीचा विस्तार होण्याच्या दिशेने काम सुरू केले. १९१८ साली महारांची वतने रद्द करून त्यांना इतर शेतकऱ्यांच्या पातळीवर आणले. महारांकडून सक्तीने काम करून घेण्यावर बंदी आणून सरकारी गावकीच्या व रयतेच्या गुलामगिरीतून मुक्त केले. ३ मार्च १९१९ च्या हुकूमान्वये बलुतेदारी पद्धतीलाही आळा घातला. अस्पृश्यांची वेठबिगारी बंद केली. जन्मानेच गुन्हेगार ठरविण्यात आलेल्या जातींना रोज चावडीवर हजेरी लावण्याची प्रथा बंद केली. जातीच्या नावावर व्यवसायधंदा करण्यास मनाई करणारी बंधने काढून टाकली. ८ ऑक्टोबर १९१९ रोजी जाहीरनामा प्रसिद्ध करून सार्वजनिक पाणवठे, सरकारी इमारती, शाळा, धर्मशाळा, दवाखाने, शासकीय वसतिगृहांमध्ये अस्पृश्यांना इतरांच्या बरोबरीने उपभोग घेण्याचे हक्क प्रदान केलेत. अस्पृश्यांना तलाठी, कोर्टकचेऱ्यांतील कारकून, पोलीस अशा संस्थानातल्या नोकऱ्यांत स्थान दिले. शिकलेल्या अस्पृश्य तरुणांना वकिलीच्या सनदा दिल्या. म्युनिसिपालिटीत अस्पृश्यांना स्वतंत्र प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार दिला. शालेय विद्यार्थ्यांत स्पृश्य-अस्पृश्य भाव राहू नये यासाठी अस्पृश्यांसाठी चालविल्या जाणाऱ्या स्वतंत्र शाळा बंद करून सार्वजनिक शाळांत स्पृश्य-अस्पृश्य विद्यार्थी एकत्र शिकतील असा हुकूम जारी केला. १९२० साली माणगाव येथे झालेल्या कोल्हापूर संस्थानातील अस्पृश्यांच्या पहिल्या परिषदेत डॉ. आंबेडकर यांचा गौरव करून त्यांना परिषदेच्या अध्यक्षपदाचा मान दिला. परिषद संपल्यावर डॉ. आंबेडकरांसह मराठे व महार यांचे एकाच पंक्तीत सहभोजन आयोजित करून अस्पृश्यांच्या प्रश्नात बहुजन समाजाची सामिलकी वाढविण्याचा दंडक घालून दिला. १९२० साली नागपूर येथे झालेल्या भारतीय बहिष्कृत परिषदेचे

अध्यक्षस्थानही शाहू महाराजांनी भूषविले होते. (खरात, २०१७, पृ. १३-१५)

म. फुले यांच्या सत्यशोधक समाजाच्या चळवळीविषयी शाहू छत्रपतींना आस्था होती. कोल्हापूरात सत्यशोधक समाजाची मुहूर्तमेढ करणारे भास्करराव जाधव, अण्णासाहेब लठ्ठे हे राजदरबारात अधिकारी होते. त्यांनी पुढाकार घेऊन ११ जानेवारी १९११ रोजी कोल्हापूरात 'श्रीशाहू सत्यशोधक समाज' स्थापन केला होता. ब्राह्मणेतरातून सत्यशोधक पुरोहित तयार करण्यासाठी भास्करराव जाधव यांच्या पुढाकाराने १९१३ साली 'सत्यशोधक शाळा' सुरू करण्यात आली होती. या शाळेच्या इमारतीसाठी शाहू महाराजांनी गंगावेशीत मोफत जागा उपलब्ध करून दिली होती, शिवाय १९१३ साली मासिक ४० रुपयांची मदतही सुरू केली होती. मुकुंदराव पाटील यांचा सत्यशोधक विचारधारेचा पुरस्कार करणारा 'कुलकर्णी लीलामृत' ग्रंथ महाराजांच्या प्रोत्साहनानेच प्रकाशित झाला होता. सत्यशोधक जलशांनाही महाराजांनी मदत केली होती. ब्राहणेतर वृत्तपत्रांना पाठबळ पुरवले होते. ब्राह्मणी वृत्तपत्रातील अपप्रचाराला प्रत्युत्तर देण्याकरिता जहाल शैलीत लेखन करणाऱ्या दिनकरराव जवळकर यांना त्यांनी कोल्हापूरात आणले होते. शाहू महाराजांच्या प्रेरणेतूनच 'भगवा झेंडा', 'राष्ट्रवीर', 'कर्मवीर', 'डेक्कन रयत' इत्यादी सत्यशोधकीय पत्रे प्रसिद्ध होत असत. कोल्हापूर संस्थानातल्या दरबारी सेवकांना सत्यशोधक समाजाच्या प्रसारासाठी पगारी रजा दिली जात असे. १९१८ साली गोविंदराव घाटगे यांच्या सत्यशोधक जलशावर कराडच्या मामलेदाराने मनाईहुकूम बजावल्यावर दंगल झाली. जमावबंदी लागू करण्यात आली. अनेकांवर फौजदारी खटले दाखल करण्यात आले. शाहू महाराजांनी ब्राह्मणेतर वकिलांच्या मदतीने हे खटले चालविण्याची जबाबदारी भास्करराव जाधवांवर सोपवून सत्यशोधक कार्यकर्त्यांना आश्वासित केले होते. अर्थात असे असले तरी शाहू महाराज स्वत:ला सत्यसमाजी म्हणवून घेत नसत. १९२१ साली बडोद्याच्या 'जागृती' पत्रातून शाहू महाराजांनी स्वत:च यासंबंधीचा खुलासा करताना म्हटले होते की, " मी सत्यसमाजीस्ट केव्हाही नव्हतो व नाही. .. मला सत्यसमाजीस्ट का म्हणतात ते कळत नाही. कोल्हापूरात आर्य समाज, थिऑसॉफी वगैरे पुष्कळ पंथ आहेत. त्यापैकीच सत्यसमाज हा एक आहे. मला वेद मान्य असून मी वेदास चिकटून राहणारा आहे." सामाजिक सुधारणावादी सर्वच चळवळींशी समन्यायाने वागण्याची त्यांची भूमिका यातून लक्षात येते.

करवीर पीठाचे शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी कोल्हापूर सोडून निघून गेल्यावर राजर्षी शाहू महाराजांनी ब्राह्मण जगद्गुरू शंकराचार्यांचे धार्मिक प्रभुत्व कमी करण्यासाठी १२ ऑक्टोबर १९२० रोजी जाहीरनामा प्रसिद्ध करून समांतर क्षात्रजगद्गुरू पीठाची निर्मिती केली. मराठा जातीचा क्षात्र जगद्गुरू नेमण्याचा हा निर्णय आगळावेगळा होता; जगद्गुरूने

ब्रह्मचारी राहू नये, लग्न करावे ही अट होती. या क्षात्रजगद्गुरूचा कार्यकाळ त्याच्या हयातीपुरता असणार होता, वंशपरंपरागत असणार नव्हता. शिवाय वतनावरही पुढच्या पिढीचा अधिकार राहाणार नव्हता. ब्राह्मणांच्या धार्मिक वर्चस्वाला शह देणारा हा मोठा निर्णय होता. मात्र या निर्णयाविषयी सत्यशोधक नेत्यांमध्ये दुहेरी प्रतिक्रिया उमटली. भास्करराव जाधव, मुकुंदराव पाटील, प्रबोधनकार ठाकरे, यांनी या कल्पनेविषयी नापसंती व्यक्त केली होती. सामाजिकदृष्ट्या निरुपयोगी ठरलेल्या अनेक मठांत आणखी एका नव्या मठाची भर कशाला असे या मंडळींचे मत होते. तर 'विजयी मराठा'कार श्रीपतराव शिंदे, अणासाहेब लठ्ठे, श्यामराव देसाई यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या निर्णयाचे स्वागत केले होते. वि. द. घाटे यांनी मराठा क्षत्रिय जगद्गुरू नेमण्याच्या राजर्षी शाहू महाराजांच्या निर्णयावर भाष्य करताना म्हटले होते की, "वेदोक्ताचा हट्ट धरून बसणारे शाहू महाराज आणि तत्कालीन मराठा समाज ब्राह्मणांना व ब्राह्मण्याला दूर ठेवीत नव्हता. आमचे विधी वेदोक्त करा असे ते ब्राह्मणांनाच आवाहन करीत होते. आम्हाला क्षत्रिय म्हणा, असे ते ब्राह्मणांनाच मागत होते. म्हणजे मराठा समाज त्यावेळी ब्राह्मणांचे ब्राह्मण्य व हिंदूंचे चातुर्वर्ण्य मान्य करून चालला होता. वेदोक्त प्रकरण हे ब्राह्मणी पुरोहितशाहीविरुद्ध बंड नव्हते. (तसे पुढे ते झाले.) तो चातुर्वर्ण्याच्या कुंपणाच्या आतील आपापसातला झगडा होता. ही गोष्ट बहुतेक लोक विसरतात." क्षत्रिय जगत्गुरू नेमण्याची महाराजांची भूमिका वि. द. घाटे यांना इंग्लंडमधल्या आठव्या हेन्रीसारखी वाटते. " हेन्रीने पोपच्या विरुद्ध बंड केले; परंतु कॅथॉलिक सिद्धांतांना आणि कर्मकांडांना धक्का लावला नाही. नाव मात्र बदलले आणि कँटबरी व यॉर्क येथील आर्चबिशप आणि इतर बिशप यांच्या नेमणुका स्वत: करायला सुरुवात केली." (घाटे, १९६१, पृ. २९४- २९५)

वेदोक्त प्रकरणानंतर क्षात्र जगत्गुरू नेमण्याच्या निर्णयावर अनेक क्रिया-प्रतिक्रिया उमटल्या. या वादाच्या संदर्भात 'जागृति'कार पाळेकर यांनी 'कोल्हापूरी क्विझो' या लेखातून त्यांनी ब्राह्मणेतर पक्षातील अंतर्गत फाटाफुटीवर टीका केली होती. कोल्हापूरातील ब्राह्मणेतर पक्षाची मंडळी समग्रपणे सत्यशोधक नव्हती, असे पाळेकरांचे आकलन होते. 'विजयी मराठा'कार श्रीपतराव शिंदे आणि 'जागरूक'कार वा. रा. कोठारी ह्यांच्यातल्या परस्परांतील आरोप-प्रत्यारोपांचा दाखला देऊन पाळेकरांनी हे पत्रकार डॉन क्विझो कादंबरीतील नायकाप्रमाणे फिरस्त्या फाकड्याची भूमिका वठवित असल्याचे म्हटले होते. कधी लिंगायत, भंडारी, जैन यांच्याबरोबर युती करायची, कधी त्यांच्याशी काडीमोड करायची, या दुटप्पीपणावरही पाळेकरांनी टीका केली होती. अशा दुटप्पीपणामुळे ब्राह्मणेतर चळवळीचे नुकसान होते, याची जाणीव त्यांनी करून दिली होती. एकूण भांडखोरपणाचा स्वभाव बाजूला ठेवून वैचारिक-सामाजिक सामीलकी निर्माण करण्यात मराठी माणूस काहीसा मागेच राहात होता, असे दिसते.

आचार्य स. ज. भागवत यांनी महाराष्ट्राच्या समाजजीवनात जातीय तेढ कशी होती याविषयीचे एक निरीक्षण नोंदवले आहे : "महाराष्ट्रात विशेषत: महाड वगैरे बाजूला ब्राह्मण आणि कायस्थ यांच्यामध्ये बरीच तेढ त्यावेळी आढळे. महाराष्ट्रातील कायस्थ प्रभु हे बुद्धीने ब्राह्मणांच्या बरोबरीचे, क्वचित श्रेष्ठही असल्याचे दिसते. ऐतिहासिक कालांतील त्यांची कामगिरी अशीच तेजस्वी आणि त्यागपरायण आहे. तथापि जातिभेदांतील श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या भावनेने ब्राह्मण-प्रभूत पुष्कळ मत्सर प्रकट होई. आगरकर-टिळकांच्या सामाजिक सुधारणाविषयक मतभेदामुळे महाराष्ट्रातील सुशिक्षित वर्गात तट पडले, तेव्हा कायस्थ-प्रभु जातीतील बहुतेक सुशिक्षितांनी आगरकरांचा सुधारणावादी विचार स्वीकारला. राजकारणातील मवाळ-जहाल भेदांतही पुष्कळ प्रभु मंडळी टिळकविरोधी झाली." (नवभारत, फेब्रु. १९५६, पृ. ४७) थोडक्यात क्षेत्र कुठेलेही असो, जातीय गटबाजी हा महाराष्ट्राचा स्वभावच बनला होता.

**विठ्ठल रामजी शिंदे यांचे कार्य :**

अस्पृश्यांवरील सामाजिक निर्बंध हटविण्यासाठी संस्थात्मक काम उभे करणाऱ्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे (१८७३-१९४४) यांचे या काळात महत्त्वाचे योगदान राहिले आहे. कर्नाटकातील जमखिंडी येथे मराठा कुटुंबात जन्म घेतलेल्या वि. रा. शिंदे यांना १८९८ साली पुण्यात फर्ग्युसन महाविद्यालयात उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळाली. तिथे मिल्ल, स्पेन्सर आणि आगरकर यांच्या विचारांनी प्रभावित होऊन त्यांनी आपले आयुष्य सामाजिक सुधारणांसाठी व्यतीत करण्याचा निर्धार केला. १९०१ साली 'युनेटिरियन आसोशिएशन ऑफ अमेरिका' या संस्थेची शिष्यवृत्ती घेऊन लंडनला ऑक्सफर्ड विद्यापीठात जगातल्या विविध धर्मांचा तौलनिक अभ्यास केला. तसेच युरोपातील सार्वजनिक लोककल्याणासाठी काम करणाऱ्या धर्मसंस्थांच्या कार्यशैलीचीही माहिती घेतली. १९०३ साली भारतात परत आल्यावर त्यांनी १९१० पर्यंत प्रार्थना समाजाचे आचार्य (मिशनरी) म्हणून काम केले. तरुणांना ब्रह्मविद्येची गोडी लागावी म्हणून 'यंग ब्रह्म युनियन' स्थापन केली. मुंबईत प्रार्थना समाजाचे 'पोस्ट मिशन' सुरू करून उदात्त धर्मविचारांचे वर्ग सुरू केले. १९०४ ते १९१३ या काळात 'अखिल भारतीय थिईस्ट कॉन्फरन्स' भरविण्यात पुढाकार घेतला. दरम्यान प्रार्थना समाजातील धुरिण नारायणराव चंदावरकर व प्रा. भांडारकर यांच्याशी मतभेद झाल्याने त्यांनी प्रार्थना समाजातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. ब्रह्मविद्येच्या प्रसारासाठी त्यांनी वाईला 'ब्राह्मो समाजा'ची स्थापना केली. काही काळ मंगलोरला ब्राह्मो समाजाचे आचार्य म्हणूनही काम पाहिले. १९२८ साली कलकत्त्यास ब्राह्म समाजाच्या शतसांवत्सरिक महोत्सवातही सहभागी झाले.

हिंदू समाजाची तात्त्विक व व्यावहारिक घटना, हिंदूंचा स्वभावधर्म, भारतातील कुटुंबपद्धतीचा पाया, जातिभेदांची विषमतामूलक उतरंड, पुरुषप्रधान मूल्यव्यवस्था इत्यादींचे गुणदोषांसकट मूल्यांकन करण्यावर त्यांनी प्रथमपासून भर दिला होता. १९०३ साली लंडनला असताना 'एन्क्वायर' या नियतकालिकात 'द रोमान्स ऑफ सोशल रिफॉर्म इन इंडिया' नावाचा लेख लिहिला. या लेखातून त्यांचे भारतीय समाजरचनेविषयीचे चिंतन व भविष्यकाळात सुधारणाविषयक कार्यक्रम राबविण्यासाठी त्यांच्या मनात असलेल्या आराखड्याची कल्पना येते. भारतात हिंदू, जैन, बौद्ध, शिख, लिंगायत, मुसलमान असे विविधधर्मी लोक रहात असले तरी हिंदू ८० टक्के असल्याने बहुसंख्य आहेत; या प्रत्येक धर्माचे रिवाज वेगवेगळे असले तरी दैनंदिन जीवनात धर्माचरणाच्या पद्धतींचा फारसा वेगळा परिणाम दिसत नाही. हे भिन्न धर्मीय लोक सामाजिकदृष्ट्या हिंदूच आहेत. अगदी २० टक्के मुसलमानांच्या सामाजिक जीवनातही हिंदूंच्या चालीरीतींचा पगडा आहे. भारतात खऱ्या अर्थाने वेगळे लोक हे अँग्लो इंडियन हे आहेत. त्यांनी अत्यंत कडवेपणाने आपले वेगळेपण जपले आहे. त्यामुळे अँग्लो इंडियन ही एकच अत्यंत वेगळी जात-जमात भारतात आहे असे शिंदे यांचे मत होते. या आकलनामुळे हिंदूंमध्ये जातीय ऐक्यभावना वाढीला लावण्यासाठी टोकाची संघर्षमूलक भूमिका घेण्याचे त्यांना कारण पडले नसावे.

**'डिप्रेस्ड क्लासेस मिशन'ची स्थापना :**

धर्मविद्येचे शिक्षण घेऊन परतल्यावर प्रार्थना समाजाचे काम करीत असताना अस्पृश्यांची सामाजिक-आर्थिक दुर्दशा पाहून त्यांच्यासाठी काही ठोस काम करण्याचे विचार महर्षी शिंदे यांच्या मनात घोळत होते. १८ ऑक्टोबर १९०६ रोजी प्रार्थना समाजाचे उपाध्यक्ष शेठ दामोदरदास गोवर्धनदास सुखडवाला यांच्या एक हजार देणगीतून त्यांनी मुंबईत 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया' (भारतीय निराश्रित साहाय्यकारी मंडळी) ही संस्था स्थापन करून आपल्या विचारांना मूर्त रूप दिले. न्या. नारायणराव चंदावरकर यांचेकडे अध्यक्षपदाची धुरा सोपविली. स्वत: अस्पृश्य वस्तीत आपल्या कुटुंबियांसह रहायला जाऊन अस्पृश्यांची सेवा-सुश्रुषा केली. त्यांना धर्म-कीर्तनाची गोडी लावणे, त्यांच्यासाठी रात्रशाळा चालविणे असे उपक्रम सुरू केले. अस्पृश्यांच्या उद्धारासाठी प्रथम त्यांना शिक्षणाकडे वळविणे आवश्यक असल्याचे लक्षात घेऊन १९०६ साली डिप्रेस्ड क्लास मिशनची अस्पृश्यांसाठी पहिली शाळा सुरू केली. अस्पृश्यांना स्वयंरोजगार मिळवता यावा यासाठी मुंबईत परळला, महाबळेश्वर व मंगरूळला व्यवसाय शिक्षणाचे वर्ग सुरू केले. शिवणकाम, हातमागावर कापड विणणे, पुस्तक-बांधणी अशा प्रकारची व्यावसायिक कौशल्ये शिकविली जाऊ लागली. तीन वर्षात मुंबईत ३ शाळा सुरू केल्या. याखेरीज मद्रास, मंगलोर, इंदूर इत्यादी ठिकाणी

मिशनची १४ केंद्रे सुरू केली. २३ शाळा, ५ वसतिगृहे, ५५ शिक्षक, ११०० विद्यार्थी आणि ५ मिशनरी आचार्य असा संस्थात्मक विस्तार झाला. अस्पृश्योद्धाराच्या कामासाठी लोकांनी पुढे यावे यासाठी १९०७ ते १९१४ या काळात त्यांनी निराश्रितांच्या ७ परिषदा घेतल्या. १९१२ साली पुण्यात झालेल्या पहिल्या महाराष्ट्र निराश्रित परिषदेत महाराष्ट्रातल्या १७ जिल्ह्यातले प्रतिनिधी सहभागी झाले होते. १९१३ साली शिंद्यांनी 'निराश्रित साहाय्यकारी मंडळी' चे केंद्र मुंबईहून पुण्यास हलवले व तिथे वंचितांसाठी 'अहिल्याश्रम' स्थापन केला. मुंबई सरकारने दिलेल्या ८७,००० रुपयांच्या अनुदानातून ह्या आश्रमात निराश्रित मुला-मुलींसाठी प्राथमिक शाळा आणि दोन वसतिगृहे सुरू केली. निराश्रितांच्या उद्धाराचे काम पुढे नेण्यासाठी पैसा फंड, मुष्टिधान्य फंड इत्यादी मार्गांनी निधी संकलित केला. बडोदे व इंदूर संस्थानच्या महाराजांनीही महर्षी शिंदे यांच्या अस्पृश्योद्धार चळवळीला अर्थसाहाय्य केले.

अस्पृशोद्धारासाठी सरकारची जबाबदारी काय आहे, याची जाणीव करून देणारा एक खलिता २७ ऑक्टोबर १९१६ रोजी त्यांनी भारत सरकारला धाडला होता. या खलित्यात त्यांनी केलेल्या ठळक सूचना अशा :

१.अस्पृश्यांच्या मुलांसाठी सरकारने खेड्यात व शहरांत ताबोडतोब जास्तीच्या शाळा काढाव्यात. या शाळांना जोडून निदान जिल्ह्यात एका ठिकाणी औद्योगिक शिक्षणाचे वर्ग सुरू करावेत.

२.अस्पृश्य विद्यार्थ्यांना ट्रेनिंग कॉलेजात व तांत्रिक शिक्षणाच्या शाळांत शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती योजना करावी.

३.अस्पृश्योद्धाराचे काम करणाऱ्या 'डिप्रेस्ड क्लास मिशन' सारख्या संस्थांना आर्थिक अनुदान द्यावे.

४.अस्पृश्य वर्गात सहकारी सोसायट्यांची वाढ होण्यासाठी खास सवलती द्याव्यात.

५.अस्पृश्यांच्या प्रश्नावर लोकमत तयार करण्यासाठी म्युनिसिपालिटी, लोकल बोर्डस, सहकारी शिक्षण खाते, वैद्यकीय खाते, डिप्रेस्ड क्लासेस मिशन या संस्थांच्या प्रतिनिधींची कमिटी संघटित करून तिच्यामार्फत प्रांतिक परिषदा, व्याख्याने यांची लोकजागरणाची मोहीम चालवावी. (खरात, २०१७, पृ. १२-१३)

अस्पृश्योद्धाराचे काम राष्ट्रीय पातळीवर न्यावे व समाजाच्या सर्व स्तरांतून या कामाला पाठिंबा मिळावा यासाठी त्यांनी राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनांना उपस्थित राहून प्रयत्न केले. सामाजिक समतेच्या मूल्यधारणा रुजविणारा कृतिकार्यक्रम हा राजकीय हक्कांच्या लढ्याचे एक अभिन्न अंग आहे, ही भूमिका घेऊन त्यांनी काँग्रेसच्या अधिवेशनात तसा ठराव संमत करून घेऊन समतेच्या लढ्याची व्याप्ती वाढविली. १९१७ साली कलकत्त्याच्या अधिवेशनात अस्पृश्यांवरील सर्व प्रकारचे सामाजिक-

आर्थिक निर्बंध उठवावेत यासाठी राष्ट्रीय सामाजिक परिषदेत ठराव मांडला. गोपाळ कृष्ण गोखले यांनी या ठरावाला पाठिंबा दिला. हा ठराव ठराव पारित झाल्यापासून अस्पृश्यतानिवारणाला काँग्रेसच्या कार्यक्रमपत्रिकेवरील एक स्थायी विषय म्हणून स्थान दिले जाऊ लागले. [४] गोपाळ कृष्ण गोखले यांच्या 'सर्व्हंटस् ऑफ इंडिया' संस्थेने संस्थेचे सभासदत्व देताना अस्पृश्यता न पाळण्याचे वचन घेण्याची प्रथा सुरू केली. १९२० साली माँटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणांनुसार पहिली निवडणूक झाली, त्यावेळी कर्मवीर शिंदे यांनी आपल्या बहुजन पक्षाच्या निवडणूक जाहीरनाम्यात अस्पृश्य वर्गाविषयीची आपली भूमिका स्पष्ट केली होती. अस्पृश्यता नष्ट करून त्यांना समान दर्जाने बहुजन समाजात एकजीव करणे हे या पक्षाचे केवळ पवित्र कार्य असल्याचे जाहीरनाम्यात नमूद करण्यात आले होते. "(अस्पृश्यता निवारणाची) पुष्कळशी संधी वायफळ वादात, ढोंगी ठरावात व मतलबी सहानुभूतीत अगोदरच दवडली गेली असल्यामुळे या वर्गातील व्यक्तींना सहाजिकच भलतेच वळण लागले, म्हणून आमच्या पक्षाने सावध राहिले पाहिजे." याची जाणीवही करून देण्यात आली होती. महाराष्ट्राच्या राजकारणात त्या काळी ब्राह्मण- ब्राह्मणेतर वाद सुरू होता; या वादामुळे जातीय समीकरणे वरचढ होऊन सामाजिक ऐक्य घडवून आणण्यावर विपरित परिणाम होईल, अशी भीती यापाठीमागे असावी.

कर्मवीरांनी ब्राह्मणेतर पक्षाच्या वतीने राखीव जागेवर निवडणूक न लढविण्यामागे त्यांची जातिभेदरहित सामाजिक ऐक्य निर्माणाची प्रबळ भूमिका होती. त्यांच्या मते हिंदुस्थानात दोनच वर्ग आहेत. एक वर्ग विद्या, द्रव्य आणि अधिकारबल असलेला आहे, तर दुसरा वर्ग या तिन्हींपैकी कोणतेच बल नसल्याने मागासलेला राहिलेला आहे. या दुसऱ्या वर्गास ते 'बहुजन समाज' या नावाने संबोधतात. या बहुजन समाजात ते शेतकरी, शिपाई, शिक्षक, उद्यमी, दुकानदार, मजूर व अस्पृश्य यांचा समावेश करतात. शेतकऱ्यांमधले जमीनदार वा पिढीजात जहागीरदार; शिपायांमध्ये सरदार, शिक्षकांमध्ये सोवळे शास्त्री, हक्कदार पुरोहित, दुकानदारांमध्ये पेढीवाले किंवा कंपनीवाले यांना ते बहुजन वर्गात समाविष्ट करीत नाहीत. त्यांच्या दृष्टीने 'जो आपल्या मालकीचे वा कौलाचे शेत आपणच वाहतो आणि त्या कामासाठी मजुरांना योग्य वेतन देऊन सांभाळतो तोच शेतकरी जाणावा; हातावर शिर घेऊन लढणारा एकांडा शिलेदार हाच खरा क्षत्रिय; आपल्या वृत्तीचा पिढीजात हक्क न सांगता शिक्षण द्यायला लायक असणारा व बाजारभावाप्रमाणे वेतन घेण्यास तयार असेल तोच शिक्षक, बिनव्याजी भांडवलवाले दुकानदार , मेहनती मजूर व अस्पृश्य हे सर्व मागासलेल्या वर्गात येतात. अशा सर्वांचा मिळून 'बहुजन समाज' बनतो अशी त्यांची धारणा होती. त्यामुळेच ब्राह्मणेतर पक्षाची जातीच्या तत्त्वावर भेद मानणारी भूमिका त्यांनी नाकारली होती. सामाजिक ऐक्य

प्रस्थापित करण्यासाठी राजकारणातील जातीय समीकरणे दूर करायला हवीत हा एक पायाभूत दृष्टिकोन विठ्ठल रामजी शिंदे प्रस्थापित करू पहात होते. सर्व माणसे समान आहेत आणि सर्व प्रकारच्या राजकीय-सामाजिक हक्कांसाठी व संधींसाठी ते पात्र आहेत ही लोकशाही मूल्यधारणा हा शिंदे यांच्या चिंतनाचा पाया होता. सामाजिक विषमतेची मुळे केवळ धर्म, जात, लिंग वा वर्ग अशा एककात नसून या सर्वांच्या परस्परपूरकतेतून विषमतेची दरी अधिकाधिक रुंदावत जाते; त्यामुळेच विषमतानिर्मूलनाचा एकसाची कार्यक्रम टाळून वंचित गटसमूहांचा शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक दर्जा सुधारण्यासाठी पायाभूत प्रयत्न सुरू केले पाहिजेत, अशी त्यांची भूमिका होती. अशा शोषित वंचित गटसमूहांची वर्गवारी 'डिप्रेस्ड क्लास' या एका छत्राखाली करून सामाजिक सुधारणा चळवळींना पथदर्शक राहील असा एक नवा मानदंड त्यांनी घालून दिला. नवा बुद्धिवाद रुजवताना समाजाच्या धर्मश्रद्धांना न दुखवता, प्रार्थनेतल्या करुणेचे व सहानुभावाचे मूल्य वाढवून समतेच्या मूल्यांचा नवा आचारधर्म रुजविण्याचे काम महर्षी शिंदे यांनी केले. महाराष्ट्रातील राजकीय-सामाजिक दुरावा संपविण्यासाठी ब्राह्मण-ब्राह्मणेतर अशी द्वंद्वात्मक भूमिका न घेता जातिभेदातीत सामाजिक ऐक्याची द्वंद्वमूल एकतेची भूमिका घेतली पाहिजे, हा त्यांच्या विचारांचा गोषवारा आहे. समाजाचे ज्ञानसंधारण करण्याचे आव्हान पेलण्यासाठी अशी वैचारिक बैठक तयार होण्याची गरज होती. ही गरज विठ्ठल रामजी शिंदे यांनी ओळखली होती. पुढच्या काळात महात्मा गांधींच्या अस्पृश्योद्धाराच्या व अंत्योदयाच्या कृतिकार्यक्रमातून या विचारधारेचाच विस्तार झालेला दिसून येतो. सर्वधर्म समभावाचे व निखळ मानुषतेच्या प्रेमभावाचे स्वाभाविक अंत:स्त्रोत जागविण्यासाठी ईश्वराच्या प्रार्थनेचे मूल्य गांधीजींनी हेरले होते. प्रार्थना समाजात न्या. रानडे, भांडारकर, दादोबा पांडुरंग तर्खडकर, वि. रा. शिंदे यांनी घालून दिलेला मानसिक उन्नयनाचा कित्ता पुढच्या काळातल्या सुधारणा आंदोलनात गिरवला जात होता.

**जातिप्रथेवरील डॉ. आंबेडकरांचे भाष्य :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वेळोवेळी केलेल्या लेखनातून जातिभेदाची लक्षणे, कारणे, जाती-जातीतील सामाजिक आंतरव्यवहारांचे रचनाबंध आणि जातिभेदनिर्मूलनाच्या दिशा व सुधारकांचे कार्य याविषयी भाष्य केले होते. हिंदू धर्मातल्या प्राचीन काळातील ब्रह्मवादामध्ये सर्व माणसे ब्रह्माची रूपे आहेत, असे म्हटले आहे. ब्रह्म आणि माणसे ही एकच आहेत. त्यांच्यात कसलाही भेद नाही. ब्रह्मवादाचे हे तत्त्वज्ञान ख्रिश्चन, मुस्लिम व ज्यू धर्मातील ईश्वरविषयक कल्पनेपेक्षा अधिक व्यापक होते. अद्वैताची ही कल्पना समतेच्या दृष्टीने अधिक श्रेष्ठ असून या ब्रह्मवादातून लोकशाहीचा वृक्ष चांगला फोफावला असता; परंतु जातिवादाने समतेचा विचार मारून टाकल्याने खरा प्रश्न निर्माण झाला असल्याचे त्यांनी म्हटले होते. (आंबेडकर २००५ क, पृ. ४०३) डॉ.

आंबेडकरांच्या मते हिंदू समाजात गुणभेदाच्या तत्त्वावर पडणाऱ्या जातिभेदाच्या उभ्या तटबंद्या आणि जन्मजातीच्या तत्त्वावर पडणाऱ्या आडव्या तटबंद्या अशा दुहेरी स्वरूपात जातिव्यवस्था अस्तित्वात आहे. युरोपातही राजा-राजेतर, पोप-पोपेतर, श्रीमंत-श्रीमंतेतर अशा उभ्या तटबंद्या आहेतच; पण जन्मजातीच्या तत्त्वानुरूप पडणाऱ्या आडव्या तटबंद्या इतर कोणत्याच समाजात दिसत नाहीत. या आडव्या तटबंद्यांमुळे हिंदू समाजात गुणभेदाचे तत्त्व बाजूला पडून श्रीमंत ब्राह्मण व श्रीमंत महार, ब्राह्मण मजूर व महार मजूर असा आणखी एक भेदभाव केला जातो. "ऋग्वेद काळानंतर ब्रह्मदेव बाळंत झाला तेव्हाच ब्राह्मण जातिवाचक कारटी जन्मास आली; व त्यांनी आपल्याभोवती प्रथमत: ही तटबंदी केली... जन्मजात उच्चनीच भाव हीच ब्राह्मण्याची खरी व्याख्या असून आपण इतरांपेक्षा श्रेष्ठ आहोत हे दाखविण्याच्या हेतूने त्यांनी ही तटबंदी निर्माण केली. या तटबंदीच्या पद्धतीचे अनुकरण केल्यामुळे त्यात अंतर्भूत झालेल्या श्रेष्ठ कनिष्ठ भावनेचेही त्यांच्याकडून सहजगत्या अनुकरण झाले. या तटबंदीमुळे हिंदू समाजात सर्वत्र अशी भावना पसरली की, दरेक जातीस आपण दुसऱ्या जातीपासून अगदी भिन्न आहोत, इतकेच नव्हे तर कोणत्या ना कोणत्या इतर जातीपेक्षा आपली जात श्रेष्ठ आहे, या भावनेने साऱ्या जाती अगदी पिडून गेलेल्या दिसतात... या ब्राह्मण्यामुळे ब्राह्मणेतर जनतेस विद्येची द्वारे बंद करण्यात येऊन त्यांना अडाणी ठेवण्यात आले. .. श्रेष्ठ व कनिष्ठ हा भेदभाव जन्मावरून ठरवून वैयक्तिक उन्नतीला व सुधारणेला अवश्य असणारा अवसर नाहीसा करण्यात आला. विधीमुळे यत्न विफल आहे या शिकवणीने सर्वांची गती खुंटवून टाकली. धर्मभोळेपणा वाढवून खऱ्या धर्माचे ज्ञान होऊ दिले नाही. सोवळ्याओवळ्याच्या व शिवाशिवीच्या कल्पना पसरवून लोकांना माणुसकीसारख्या अमोल वस्तूचा धिक्कार करण्यास शिकविले." (आंबेडकर, २००५ क, पृ. १८८-१८९) जातिभेदामुळे व अस्पृश्यतेमुळे हिंदुसमाजाची संघशक्ती क्षय पावली असून परस्परांतला आपलेपणा नष्ट झाला आहे. एका जातीचे हितसंबंध दुसऱ्या जातीशी विरोधी झाले आहेत; तो जातिभेद व ती अस्पृश्यता नष्ट झाल्याखेरीज एकनिश्चयात्मक बलसंवर्धनाचे कार्य घडून येणार नाही, असे डॉ. आंबेडकर यांनी म्हटले होते. (कित्ता, पृ. ८८) हिंदू समाजाचे पुढारीपण फार प्राचीन काळापासून ब्राह्मण वर्गाकडे असल्याने तेच या फाटाफुटीला जबाबदार आहेत. तेव्हा जातिभेदाच्या या उभ्या-आडव्या तटबंद्या भेदण्यासाठी 'ब्राह्मण्यविध्वंसन' हाच एक मार्ग असल्याचेही डॉ. आंबेडकरांनी या चर्चेचा समारोप करताना सुचविले होते. (आंबेडकर २००५ क, पृ. १९१) सामाजिक स्पर्शास्पर्शाच्या भावनेशिवाय राजकीय जातिवर्चस्वाचाही ब्राह्मण्यात अंतर्भाव होतो, असे त्यांचे मत होते. कोणत्याही सार्वजनिक संस्थेत अगर चळवळीत ब्राह्मण्यग्रस्तांचेच संख्याधिक्य असते, त्यामुळे सर्वत्र ब्राह्मण्याचा वरचष्मा राहातो. महाराष्ट्रातील टिळकपरंपरेतील स्वराज्यपंथीय लोक या गटात

मोडतात. त्यांच्या स्वहक्क-संपादन-रक्षणाच्या चळवळी जातिनिष्ठ ठरतात. आपल्या स्वार्थासाठी देशातील एका मोठ्या समाजाला दलितावस्थेत डांबून ठेवणारे लोक ही ब्राह्मणांची राजकीय ओळख असल्याचेही त्यांनी म्हटले होते. ब्राह्मणेतर किंवा अस्पृश्य यांच्या चळवळीत जर जातीयता असेल तर ती संरक्षक स्वरूपाची (Defensive) आहे; दुसऱ्या कोणाचे हक्क लुबाडून त्यांना आपले दास करण्याचा त्यांचा हेतू नाही. ब्राह्मणेतरांना आपले मानवी हक्क तेवढे मिळवायचे आहेत. (आंबेडकर, २००५ क, पृ. ३६६)

१९३६ साली लाहोरला जात-पात-तोडक मंडळाच्या वार्षिक परिषदेच्या अध्यक्षपदावरून भाषण देण्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना निमंत्रित करण्यात आले होते. या निमित्ताने त्यांनी 'जातिप्रथेचे विध्वंसन' (Annibilation of Castes) ह्या आपल्या भाषणाच्या लिखित संहितेतून हिंदू धर्मातील जातिप्रथा व सामाजिक सुधारणांत उपस्थित होणारे अडथळे यांची विस्ताराने चर्चा केली आहे. . हिंदू म्हणून असलेले हे आपले शेवटचे भाषण असल्याचे त्यांनी म्हटले होते. भाषणाच्या प्रारंभीच *'मी त्यांच्या नजरेतला साप आहे'* अशा शब्दांत त्यांनी हिंदू लोक त्यांच्याकडे किती द्वेषभावनेने पाहतात याविषयीचे निरीक्षण नोंदवले होते. (आंबेडकर, २०१४, पृ. १७) मात्र तरीही हे भाषण छापण्यामागे "हिंदूंना विचार करण्यासाठी आणि त्यांना त्यांच्या स्थितीची जाणीव करून देण्यासाठी प्रेरित करणे' हा आपला उद्देश असल्याचे त्यांनी म. गांधी यांना दिलेल्या उत्तरात स्पष्ट केले होते. जातिप्रथेमुळे हिंदू लोक एखादा समाज किंवा एखादे राष्ट्र का तयार करू शकत नाहीत, याची समाजशास्त्रीय मीमांसा त्यांनी या भाषणातून केली आहे. त्यातले ठळक मुद्दे असे :

१. जातिपद्धती हे श्रमविभागणीचे तत्त्व असल्याच्या युक्तिवादाचे त्यांनी खंडन केले आहे. जातिप्रथेत व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य नाही. जातिभेदाच्या श्रेणीप्रधान उतरंडीमुळे श्रमिकांचे विभाजन झाले आहे. इतकेच नाही तर, हिंदूंनी अनेक व्यवसायांना तुच्छ लेखल्यामुळे निम्न जातीच्या शोषणाची तीव्रता वाढतच गेली आहे. (आंबेडकर,२०१४, पृ. ३१) डॉ. आंबेडकरांच्या मते सामूहिक एकात्मीकृत जीवन जगण्यासाठी लागणारे सेंद्रिय एकात्मतेचे धागे हिंदू जीवनपद्धतीत नाहीत. सामूहिक कार्यात सर्वांना हिस्सेदार बनविण्यात जातिप्रथा प्रतिबंध निर्माण करते, त्यामुळे हिंदूंमध्ये सहभावाच्या जाणिवांचा विकास झाला नाही. आपल्या जातीबाहेरच्या माणसाचे गुण मान्य करण्याची ताकद हिंदूंमध्ये नाही. शिख वा मुसलमान यांच्यात जशी 'सह-भावना' असते तशी हिंदू लोकांत स्वकीयांविषयीची कोणत्याही प्रकारची 'हिंदू जाणीव' नाही; किंबहुना आदर्श हिंदू हा इतरांशी कोणतेही संबंध येऊ न देता आपल्या स्वत:च्या बिळात राहाणाऱ्या उंदरासारखा आहे. वेगवेगळ्या गटांत संपर्क ठेवणाऱ्या गोष्टींची विद्यमानता व

आंतरसंबंधांच्या शक्यतांचा अभाव असल्यामुळे हिंदूंना एखादा समाज किंवा एखादे राष्ट्र तयार करणे शक्य नसल्याचे मत डॉ. आंबेडकरांनी नोंदविले आहे. (आंबेडकर, कित्ता,पृ. ३५-४३)

२. हिंदू धर्मांतर्गत चालणाऱ्या ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादावरही डॉ. आंबेडकरांनी भाष्य केले आहे. त्यांच्या मते "ब्राह्मणाचा मुख्य संबंध ब्राह्मणेतरांच्या हितसंबंधांविरुद्ध स्वत:च्या हितसंबंधांचे रक्षण करण्यात आहे, आणि ब्राह्मणेतरांचा मुख्य संबंध ब्राह्मणांच्या हितसंबंधांविरुद्ध स्वत:च्या हितसंबंधांचे रक्षण करण्यात आहे. त्यामुळे हिंदू हे केवळ जातीचे समूह नाहीत, तर ते स्वत:पुरते व स्वत:च्या स्वार्थी ध्येयापुरते जगणारे अनेक युद्धखोर गट आहेत.

३. केवळ कर्मकांडांवर भर देणाऱ्या कोणत्याही धर्माला उज्जवल भविष्य नसल्याची जाणीव करून देऊन डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्माच्या गतिशून्यतेवर भाष्य केले आहे. त्यांच्या मते हिंदूंद्वारे संबोधण्यात येणारा धर्म हा आदेश व निषेधाज्ञा यांचे भरताड आहे. ज्या क्षणी धर्म नियमांमध्ये बुडून जातो त्या क्षणी तो धर्म असण्याचे थांबतो. यात सुधारणा करायची झाल्यास बुद्ध-नानकांप्रमाणे प्रथम हिंदूंमधली शास्त्रप्रामाण्याची श्रद्धा नष्ट केली पाहिजे. तसेच वारसाहक्काची पुरोहितशाही नष्ट केली पाहिजे. राज्याने विहित केलेली परीक्षा उत्तीर्ण झाल्यावरच पुरोहितशाहीचा धंदा करण्याची सनद दिली जावी व राज्याच्या गरजांनुसार पुरोहितांची संख्या मर्यादित करायला हवी. (आंबेडकर, कित्ता, पृ. ५८-६९) हिंदू धर्म वाचवायचा असेल तर ब्राह्मणवादाला ठार केले पाहिजे, असे असा इशाराही डॉ. आंबेडकरांनी दिला आहे. पोटजाती नष्ट करणे, आंतरजातीय सहभोजने सुरू करणे व आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देणे असे सामाजिक सुधारणेचे काही मार्ग सुचविण्यात येत होते, त्यापैकी पहिल्या दोन मार्गांनी फार काही साधणार नाही; मात्र आंतरजातीय विवाहांमुळे जातिप्रथेने आलेली कुंठितता दूर होईल असा विश्वास डॉ. आंबेडकरांनी व्यक्त केला आहे.

महात्मा गांधींनी 'हरिजन' पत्रातून या भाषणावर प्रतिक्रिया व्यक्त केली होती. वर्णाश्रमधर्म व जातिव्यवस्था या दोन भिन्न गोष्टी असल्याचे गांधीजींचे मत होते. वर्णाश्रमधर्मात अस्पृश्यतेवर श्रद्धा दर्शविणारी कोणतीही गोष्ट नाही, वर्ण आपले हक्क सांगत नाही, तर आपली कर्तव्ये सांगतो. प्रत्येकाने आपल्या पूर्वजांचा व्यवसाय करून आपली भाकरी मिळवली पाहिजे, हे कर्तव्य वर्ण सांगतो. डॉ. आंबेडकरांना गांधीजींचा हा युक्तिवाद अर्थातच मान्य नव्हता. ज्ञानसंपादनाची संधी नाकारून लोकांना अवनत करणे आणि त्यांना शस्त्र धारण करण्याचा अधिकार नाकारून त्यांची मुस्कटदाबी करणे हा वर्णव्यवस्थेचा उद्देश असल्याचे डॉ. आंबेडकरांनी आपल्या उत्तरात म्हटले होते. चातुर्वर्ण्याच्या आधारे हिंदू समाजाचे पुनर्संघटन करणे अशक्य असून हिंदू समाजाचे

पुनर्संघटन करायचे झाल्यास ते स्वातंत्र्य, समता व सहभाव या तत्त्वांना मान्यता देऊनच करता येईल असा स्पष्ट अभिप्राय त्यांनी गांधीजींना दिलेल्या उत्तरात नोंदवला होता. (आंबेडकर, कित्ता, पृ. ८३) धर्म केवळ विद्वत्तेवर जगत नसतो तो संतांच्या व द्रष्ट्यांच्या अनुभवावर , त्यांच्या जीवनावर व उपदेशांवर जगत असतो, ह्या गांधीजींच्या विचारांचेही डॉ. आंबेडकरांनी खंडन केले होते. संतांपैकी कोणीही जातिव्यवस्थेवर कधीच हल्ला केला नाही, उलटपक्षी, ते जातिव्यवस्थेचे कट्टर अनुयायी होते, असा गांधीजींच्या युक्तिवादाचा प्रतिवाद डॉ. आंबेडकरांनी केला होता. (आंबेडकर, कित्ता, पृ. ८४-८५) 'ज्या महात्म्याकडे मार्गदर्शनाची अपेक्षा करतात तो महात्मा विचार करण्यावर विश्वास ठेवत नाही व त्यामुळे जे अनुभवाच्या कसोटीवर उतरू शकेल असे म्हणता येईल असे कोणतेही मार्गदर्शन तो देऊ शकत नाही' ( आंबेडकर, कित्ता, पृ. ९६) अशा शब्दांत डॉ. आंबेडकरांनी गांधीजींच्या 'हरिजन'मधील पत्रांना दिलेल्या उत्तराचा शेवट केला आहे.

रोटीबंदी, बेटीबंदी ही जातिभेदाची मुख्य लक्षणे ब्राह्मण व मुसलमान यांच्यातही आहेत ; त्यामुळे ब्राह्मण व मराठा हा जातिभेद आहे, तसा हिंदू व मुसलमान हा देखील जातिभेदच म्हटला पाहिजे. या दृष्टीने विचार केल्यास जातिभेद मोडण्यास जसा मिश्रविवाह हा उपाय आहे, तसा हिंदु-मुसलमानांतील जातिभेद मोडण्यासाठीही त्यांच्यात मिश्रविवाह व्हायला हवेत, असा मुद्दा त्यांनी उपस्थित केला होता. २४ जून १९२७ रोजी डॉ. रा. गो. भांडारकर यांची पदवीधर नात कु. मालिनीबाई पाणंदीकर हिचा गुलाबखान बशिरुद्दिखान या पदवीधर मुसलमानाबरोबर विवाह झाला होता. डॉ. श्री. व्यं. केतकर यांच्या पत्नी शीलवती केतकर यांनी विवाहनोंदणी करताना साक्षीदार म्हणून सही केली होती. या विवाहावर पुण्यात त्या काळात चांगलाच गदारोळ उठला होता. या मिश्रविवाहावर भाष्य करताना डॉ. आंबेडकर यांनी 'बहिष्कृत भारत'च्या १ जुलै १९२७ च्या लेखात लिहिले होते की, "हिंदू समाजाने या दांपत्यास जर सहनशीलतेने वागवून हिंदू समाजांत मोडण्यास अवसर दिला तर या मिश्रविवाहाचा परिणाम खानसाहेबांच्या हिंदुकरणांत होईल. उलट जर त्यांचा छळ करण्यात आला तर त्याचा परिणाम मालिनीबाईंच्या मुसलमानीकरणांत होईल. .. काहीही झाले तरी मालिनीबाईने हिंदू समाजाची ध्वजा परधर्माच्या मोहल्ल्यांत रोवून पर्यायाने हिंदू महासभेच्या शुद्धीच्या कार्यास मदत केली, याबद्दल हिंदू धर्माची वाढ व्हावी असे इच्छिणारा दरेक हिंदू त्यांचे अभिनंदनच करील." (आंबेडकर, २००५ क, पृ. १६६-१६७)

जतिबंधनाच्या प्रथांवर आंबेडकरांनी सातत्याने टीका केली आहे. जातिबंधनांचा कर्मठपणा हा मानवी हक्कांवर गदा आणणारा आहे. हलक्या जातीच्या वापरात असलेल्या विहिरीचे पाणी प्याल्यामुळे जात बाटली असे म्हणून अशा लोकांवर ग्रामण्य घातले जाते. ग्रामण्याच्या शिक्षेला सामोरे जावे लागते, म्हणून कित्येकांनी धर्मांतर

करण्याचा मार्ग निवडला. ज्या स्त्रियांवर पुरुषांनी अन्याय करून बलात्कार केला अशा स्त्रियांना संरक्षण देण्याऐवजी त्यांना जातीबाहेर काढले जाते. नाईलाजाने अशा हतभागी स्त्रियांना धर्मांतराचा किंवा वेश्या व्यवसाय पत्करण्याचा मार्ग स्वीकारावा लागतो. हिंदू सभेने अशा हतभागिनी स्त्रियांचे शुद्धीकरण करावे, जातींच्या संकराचा (fusion) मार्ग खुला करावा इत्यादी उपायही त्यांनी सुचविले होते. (आंबेडकर, २००५ क, पृ. ४७५-४७६) अशा प्रकारच्या विधायक उपक्रमांचे काही पूर्वदाखलेही त्यांनी आपल्या मुद्द्याच्या समर्थनार्थ दिले होते. विशिष्टाद्वैत पंथाचे आद्य प्रवर्तक रामानुजाचार्य यांनी स्वत: कांचीपूर्ण नामक ब्राह्मणेतराला गुरू करून समतेचा नमुनादर्श घालून दिला होता. इतकेच नाही तर गुरु कांचीपूर्ण यांना आपल्या घरी जेऊ घातल्यानंतर रामानुजाचार्यांच्या पत्नीने जेवणाची जागा शुद्ध करून घेतली ही गोष्ट समतेच्या मूल्यांना बाधा आणणारी असल्यामुळे त्यांनी आपल्या कर्मठ बायकोला घराबाहेर काढले व स्वत: संन्यास घेण्याचा निर्णय घेतला होता. आपल्या संन्याशी जीवनात त्यांनी धनुर्दास या अस्पृश्यास आणि तिरुवल्लीच्या चांडाळ स्त्रीस पंथाची दीक्षा दिली; यादवगिरी नारायणाच्या देवळात अस्पृश्यांना प्रवेशाची व देवळाजवळच्या तळ्यात स्नान करण्याची मोकळीक देणारी आज्ञावली जारी केली होती. स्पर्शास्पर्शभेद नष्ट करणाऱ्या या रामानुज संप्रदायाचा मार्ग हिंदू धर्मातील शुद्धिकरणवाद्यांनी अनुसरावा, अशी सूचना डॉ. आंबेडकरांनी केली होती. (आंबेडकर, कित्ता, पृ. १५२-१५३)

**नामधारी सुधारकांवर टीका :**

जातिभेदनिर्मूलन वा अस्पृश्यतानिवारणाच्या नावाखाली चालणाऱ्या समाजसुधारकांच्या वरपांगी उपक्रमांतली निरर्थकता ह्यावर डॉ. आंबेडकर सातत्याने टीका करीत असत. सुधारकांचे त्यांनी 'खरा सुधारक' आणि 'नामधारी सुधारक' अशा दोन गटांत वर्गीकरण केले होते. *'टनभर बोलणारे पण इंचभर न हालणारे'* अशा शब्दांत त्यांनी या नामधारी सुधारकांचे वर्णन केले होते. (आंबेडकर २००५ क, पृ. ३८९) प्रश्नांच्या मुळापर्यंत न जाता वरपांगी सुधारणा सुचविणाऱ्यांची ते कशी वास्तवदर्शी समीक्षा करीत याचा एक नमुना येथे देत आहोत. मुसलमानाबरोबर विवाह करणाऱ्या मालिनीबाईंचे वडिल रा. पाणंदीकर यांनी २२ मे १९२७ या 'विविधवृत्ता'त अस्पृश्यतानिवारणाचे काही उपाय सुचविले होते. स्पृश्य वर्गातील आपापसातील अस्पृश्यता अगदी पहिल्याने दूर केली पाहिजे, तसेच शास्त्रत:च आम्ही अंत्यज आहोत, ही जी अस्पृश्य समाजाची दृढमूल समजूत, तीही दूर केली पाहिजे असे पाणंदीकरांचे मत होते. अस्पृश्य वर्गाने विरोधभाव जागृत न करिता जे जे हक्क प्राप्त होतील त्यांचा उपकारबुद्धीने गाजावाजा न करिता फायदा करून घेतला पाहिजे. इतर वर्गांच्या शाळांतूनच आम्हांस शिक्षण मिळाले पाहिजे हा आग्रह सोडून दिला पाहिजे. या कामी या

वर्गाकरिता स्वतंत्र शाळा स्थापन केल्या पाहिजेत. याप्रमाणे क्रमश: सुधारणा घडवून आणल्या म्हणजे अस्पृश्यता सहज निघून जाईल. (आंबेडकर. २००५ क, पृ. १६७) या अभिप्रायावर भाष्य करताना डॉ. आंबेडकरांनी 'धार्मिक मनोवृत्ती न दुखविण्याचा सुधारणावादी रा. पाणंदीकरांचा उपदेश आणि साध्या भोळ्या सनातन धर्मवाद्यांत काहीच फरक नसल्याचे दाखवून दिले होते. 'जो एका तोंडाने आपण अंत्यज आहोत अशी भावना अस्पृश्य वर्गाने काढून टाकावी असे सांगतो व त्याच तोंडी अस्पृश्यांनी स्पृश्य वर्गाच्या शाळांतून आम्हांस शिक्षण मिळाले पाहिजे असा आग्रह धरता कामा नये असे बजावतो त्याच्या ठायी अस्पृश्यता निवारणाची कळकळ किती असेल याविषयी जबरदस्त शंका येते." 'पण परंतुच्या पक्षांतर बोधक उभयान्वयी अव्ययाच्या जाळ्यांत गुरफटून गेलेला सुधारक हा खरा सुधारक नसून नामधारी सुधारक म्हटला पाहिजे, असाही निष्कर्ष त्यांनी नोंदवला आहे. (आंबेडकर २००५ क, पृ. १६८)

### स्वातंत्र्यवीर सावरकरांचे कार्य :

स्वातंत्र्यवीर सावरकर (१८८३-१९६६) यांनी जात ही जन्माधिष्ठित असते या पारंपरिक मताचे खंडन केले होते. तसेच जात कर्माधिष्ठित असते ही संकल्पनाच कालबाह्य झाल्याचे म्हटले होते. जातिप्रथाक समाजव्यवस्थेतील रोटीबंदी, बेटीबंदी, स्पर्शबंदी, व्यवसायबंदी या सामाजिक बेड्या तोडून नवा हिंदुस्थान घडवावा अशी त्यांची भूमिका होती. अस्पृश्यतानिर्मूलनासाठी त्यांनी सहभोजनादी उपक्रमांचा मार्ग स्वीकारून समाजात जाणीवजागृती निर्माण केली. आंतरजातीय विवाहांचे समर्थन केले. स्वा. सावरकरांनी रत्नागिरीत १९२४ ते १९३७ या काळात स्थानबद्ध असताना सामाजिक सुधारणांसाठी नियोजनबद्धपणे लोकसहभाग मिळवून विविध उपक्रमांची आखणी केली. रत्नागिरीत दाखल झाल्यावर त्या परिसरात घडलेल्या सामाजिक जीवनाचे एक वास्तवदर्शी निरीक्षण त्यांनी नोंदविले आहे : "रत्नागिरीत महारांच्या सावलीचा विटाळ खरोखरीच मानीत. महार शिवला तर सचैल म्हणजे कपड्यासुद्धा स्नान करणारे हजारो लोक असत. कर्मठ ब्राह्मणांच्या घरी 'महार' हा शब्दसुद्धा उचारणे अशुभ समजून 'बाहेरचा' म्हणत.. जिल्ह्यात तर अस्पृश्यता याहून कडक.. चांभार, महार, भंगी यांची आपापसातही तशीच कडक अस्पृश्यता. कोणी कोणाला शिवणार नाही.. महार, चांभार, भंगी ही नावे स्पृश्य लोकांमध्ये शिवी म्हणून वापरली जात." (सावरकर, १९६४, खंड ३, पृ. ५९४) ही सामाजिक विषमतेची विषवल्ली मुळापासून उपटून टाकण्यासाठी दीर्घकालीन प्रकल्प हाती घेण्याची गरज हेरून त्यांनी लोकसंघटनांची बांधणी करण्याला प्राधान्यक्रम दिला. स्पर्शबंदी, व्यवसायबंदी, रोटीबंदी, बेटीबंदी अशी टप्प्याटप्प्याने जातिभेदनिर्मूलनाची चळवळ विकसित करण्याची योजना आखली. रत्नागिरी हिंदू सभा, अखिल हिंदू गणेशोत्सव मंडळ, तरुण हिंदुमंडळ, अखिल हिंदू महिला मंडळ अशा संघटनांच्या

माध्यमांतून त्यांनी प्रथम अस्पृश्यतानिवारणाचे फार महत्त्वाचे कार्य हाती घेतले. लोकांमध्ये नव्या जाणिवा रूजविण्यासाठी सामाजिक सर्वमान्य सांस्कृतिक प्रारूपांचा उपयोग करून घेण्याचा मार्ग त्यांनी अनुसरला. भजन, कीर्तन, हळदीकुंकू, यात्रा-उत्सव, मकरसंक्रांतीचे तीळगूळवाटप, दसऱ्याचे सोने लुटणे, राखी पौर्णिमेचे रक्षाबंधन, सत्यनारायणाचा प्रसाद अशा लोकाभिरुचीला मानवणाऱ्या पारंपरिक माध्यमांचा उपयोग करून त्यांनी सर्वजातीय समाजघटकांना एकत्र आणण्याची किमया साध्य केली. लोकांच्या घट्ट पारंपरिक मानसिकतेत न बसणाऱ्या सामाजिक आंतरक्रिया घडवून आणण्याचे काम सोपे नव्हते. भजनासाठी महारवाड्यात वा चांभारवाड्यात गेलेल्या पांढरपेशा लोकांसोबत यायला अस्पृश्यांची तयारी नसे. सतरंजीवर सोबत बसायला तयार होत नसत. बळे बळे जमवून आणलेल्या स्पृश्यांनाही भजनानंतर घरात घेताना कपडे बदलावे लागत किंवा स्नान करावे लागे. हळदीकुंकवाच्या कार्यक्रमातही अस्पृश्य स्त्रियांना स्वहस्ते कुंकू लावावयास व ओट्या भरण्यास स्पृश्य स्त्रिया तयार होईनात; आणि अस्पृश्य स्त्रियाही स्पृश्य स्त्रियांबरोबर मिसळण्यास तयार होत नसत. मात्र हा बंध तोडण्यासाठी उसाच्या गाड्या लुटण्याचे किंवा पेढे वाटण्याचे आमिष दाखवून अस्पृश्य स्त्रियांना जमावण्याची युक्ती वापरण्याचा उपक्रम सावरकरांना करावा लागला. हळूहळू विठ्ठल मंदिरात, गणेशोत्सवात स्पृश्यास्पृश्यभाव विसरून परस्परांत बसण्या-फिरण्याची सवय होऊ लागली. (सावरकर,१९६४, खंड २, पृ. ५९५ / मोरे शेषराव, २०१५, पृ. १२१-१२४)

लोकमानसातून अस्पृश्यता घालविण्यासाठी सार्वजनिक स्थळी ठळकपणे दिसणारी विषमतेची प्रारूपे मिट्विण्याचे उपक्रम त्यांनी हाती घेतले. शाळांमध्ये अस्पृश्य मुलांना ओट्यावर किंवा कुंपणाच्या भिंतीशी वेगळे बसवले जात असे, ही प्रथा मोडण्यासाठी त्यांनी १९२५ पासून अग्रक्रमाने प्रयत्न सुरू केले. स्पृश्यास्पृश्य मुलांच्या सरमिसळ शाळा भरविल्या जाव्यात यासाठी त्यांनी सतत सात वर्षे चळवळ चालवली. १९२३ च्या सरकारी कायद्याला अनुसरून शाळांतून अस्पृश्यता न पाळण्याचा निर्णय स्कूल बोर्ड पाळत नव्हते. त्यामुळे रत्नागिरी जिल्ह्यातील साठ-सत्तर गावांत ही चळवळ चालवताना सावरकरांना बराच विरोध झाला. माऱ्यामाऱ्या, जाळपोळीपर्यंत प्रकरणे झाली.कधी कायद्याचा धाक, कधी हृदयपरिवर्तनाचे आवाहन करून लोकमतात परिवर्तन घडवून आणण्याचे अथक प्रयत्न केल्याने २०० पैकी १२० शाळांतून मुलांना सरमिसळ बसविण्याच्या प्रयत्नांना यश मिळाले. स्कूल बोर्डाचे अध्यक्ष जनूभाऊ लिमये यांनी सावरकरांच्या आंदोलनाची दखल घेऊन २ ऑगस्ट १९२८ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील शाळांतून अस्पृश्यता न पाळण्याचा आदेशही जारी केला. (अस्पृश्यांना हिंदूंच्या देवळात खुला प्रवेश असावा अशी सावरकरांची भूमिका होती, त्याविषयीचा वृत्तांत पुढील

विवेचनात आलेला आहे.)

१९२६ साली सावरकरांनी रत्नागिरीतील सर्वजातीय तरुणांचे 'तरुण हिंदुमंडळ' स्थापन करून अस्पृश्यतानिवारण, तसेच रोटीबंदी अर्थात जात्युच्छेदन इत्यादी सामाजिक सुधारणांसाठी आंदोलन करण्याकरिता एक संघ निर्माण केला. १९२९ साली डिसेंबर महिन्यात या तरुण हिंदुमंडळाच्या तिसऱ्या वर्धापनदिनी सावरकरांनी रोटीबंदीविरुद्ध सामाजिक लढा उभारण्याचे या मंडळास आवाहन केले. सावरकरांच्या भाषणानंतर ब्राह्मण, वैश्य, भंगी, महार इत्यादी विविध जातीतील शंभर तरुणांनी सहभोजन करून रोटीबंदीच्या आंदोलनाचा शुभारंभ केला. १९३० साली 'अखिल हिंदू गणेशोत्सव' सुरू करण्यात या मंडळाच्या कार्यकर्त्यांचा संघच आघाडीवर होता. गणेशोत्सवाच्या मिरवणुकीसमोर व्याख्यान देताना सावरकरांनी जन्मजात जातिभेदाच्या उच्छेदाचे आंदोलन सुरू करण्याचा संकल्प जाहीर केला. त्यानुसार १६ नोव्हेंबर १९३० रोजी रत्नागिरीच्या खातू बंधूंच्या नाटकगृहात सर्वजातीय सहभोजनाचा प्रकट कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास स्वयंपाकी मिळेनात, सहजासहजी जागा उपलब्ध होईना. पण या सर्व अडचणींवर मात करून हा सहभोजनाचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. तरुणांनी जातींची उच्चनीचता न मानण्याची शपथ घेतली. त्यानंतर मकरसंक्रांतीच्या निमित्ताने ११ जानेवारी १९३१ रोजी सर्वजातीय सहभोजनाचा दुसरा प्रकट कार्यक्रम झाला. यावेळी सावरकरांनी जात्युच्छेदाची भूमिका स्पष्ट करणारी नऊ लेखांची लेखमाला 'केसरी'तून प्रसिद्ध केली. २९ सप्टेंबर १९३१ रोजी ७५ स्त्रियांचे पतितपावन सहभोजन झाले. त्यात सहभागी झालेल्या स्त्रियांची नावे 'सत्यशोधका'त छापण्यात आली. त्यानंतर गणेशोत्सवात स्त्रियांचे पतितपावन भोजन करण्याची परंपरा सुरू झाली. यानंतर सावरकरांच्या कार्यकर्त्यांनी सत्कार समारंभ, नाटकमंडळ्यांचे करमणुकीचे कार्यक्रम इत्यादी सार्वजनिक समारंभाच्या निमित्ताने किंवा लग्न, मुंज इत्यादी कौटुंबिक कार्यक्रमात पतितपावन सहभोजनाचे कार्यक्रम घडवून आणण्याची चळवळ सुरू केली. पतितपावन सहभोजनात भाग घेणाऱ्यांची नावे छापली जाऊ लागली. सनातन्यांकडून होणाऱ्या विरोधाला उत्तर देण्याकरिता सावरकरांची 'सहभोजनाची इष्टानिष्टता' या विषयावर भाषणे होत. त्यातून सहभोजनात सहभागी होणे हे राष्ट्रकार्य असल्याची भूमिका ते मांडत. सावरकरांनी सहभोजन कार्यक्रमास सहमती वाढविण्यासाठी रत्नागिरीबाहेरील सामाजिक पुढारी मंडळींना आग्रहाने आमंत्रित केले. १९३२ च्या गणेशोत्सवात कोल्हापूरचे भाई माधवराव बागल , १९३३ साली महर्षी विठ्ठल रामजी शिंदे , १९३६ साली प्रबोधनकार ठाकरे, आचार्य अत्रे, राजभोज, सकट इत्यादी मंडळी सहभोजन कार्यक्रमासाठी उपस्थित राहिली. या सर्वांनी सावरकरांच्या या उपक्रमाचे भरभरून स्वागत केले. १ मे १९३३ रोजी सावरकरांनी सर्वजातीय लोकांसाठी

खुले असणारे अखिल हिंदू उपाहारगृह सुरू करून रोटीबंदीच्या कार्यक्रमाला एक नवे परिमाण देणारा उपक्रम केला. रोटीबंदीच्या अशा कार्यक्रमांची डॉ. आंबेडकरांना प्रत्यक्ष अनुभवातून कल्पना द्यावी म्हणून सावरकरांनी १३ नोव्हेंबर १९३५ रोजी रत्नागिरीस येण्याचे आमंत्रणही पाठविले होते; पण प्रत्यक्षात हा योग जुळून आला नाही. (मोरे शेषराव, पृ. २०६-२१४)

जातिनिष्ठ व्यवसायपद्धती नष्ट करून गुणनिष्ठ व्यवसायपद्धतीचा पुरस्कार केल्यास देशाची प्रगती होईल अशी भूमिका घेऊन जातिकेंद्री व्यवसायाची बेडी तोडण्याची चळवळ चालविली. पतितपावन सहभोजनात सहभागी झालेल्यांवर बहिष्काराचे अस्त्र वापरून अशा लोकांच्या घरी धार्मिक विधी करण्यासाठी न जाण्याचा ब्राह्मणवर्गांनी पवित्रा घेतला. त्यावर सावरकरांनी भटजींच्या जातिकेंद्री व्यवसाची बेडी तोडून ब्राह्मणेतरांनीच भटजीचे काम स्वत: करण्याचा पर्याय सुचविला. भटजीसाठी अडून न बसता आपणच 'हे देवा, मी तुला हे पाणी अर्पण करीत आहे, हे फल अर्पण करीत आहे' असे म्हणून पूजा करावी. पूजेसाठी ब्राह्मणांची गरजच नाही, हे त्यांनी आपल्या भाषणांतून लोकांच्या मनावर बिंबवायला सुरुवात केली. व्यवसायबंदीत खरी अडचण अस्पृश्यांच्या बाबतीत येते, त्यामुळे व्यवसायबंदी तोडण्यासाठी प्रथम स्पर्शबंदी तोडली पाहिजे, अशी भूमिका घेऊन त्यांनी स्पृश्यास्पृश्यभाव हटवण्याला प्राधान्य दिले. भंगीकामाकडे इतर जातीतील तरुणांनी व्यवसाय म्हणून पाहिले तर शिक्षक किंवा कारकुनाच्या पगारापेक्षा जास्त पैसे मिळतील, असा युक्तिवाद ते आपल्या भाषणांतून करीत. कथाकीर्तनाचे काम ब्राह्मणांनीच करण्याचे कारण नाही, यासाठी भंग्यांना कथा-कीर्तन करण्यास प्रवृत्त केले. स्वत: सावरकरांनी ढोर ओढण्याचे व सोलण्याचे काम करून पारंपरिक अंधसमजुतींना छेद देण्याचा प्रयत्न केला. (सावरकर, ४, १९६४, पृ. ६७८ / मोरे शेषराव, २०१५, पृ. २२३)

बेटीबंदी तुटल्याशिवाय जातिभेद पूर्णपणे नष्ट होणार नाही, अशी सावरकरांची धारणा असल्याने त्यांनी आपल्या भाषणांतून आंतरजातीय विवाहांना उत्तेजन देणारी मांडणी केली. "गुण, शील, प्रीती ह्यांनी अनुरूप असेल तर नि सुजननदृष्ट्या उन्नततर संततीस बाधा येत नसेल तर त्या हिंदुजातीच्या वधुवरांनी विवाहबद्ध होण्यास जन्मजात जातीची कोणतीही आडकाठी नसावी" अशा प्रकारचे प्रबोधन ते करीत. भाई परमानंद यांनी आपल्या मुलीस क्षत्रिय तरुणाबरोबर विवाह करण्यास संमती दिली यासाठी सावरकरांनी त्यांचे जाहीर अभिनंदन केले . अशा प्रकारचे आंतरजातीय विवाह घडवून आणण्यासाठी ते खटपट करीत असत. सावरकरांनी अशा प्रकारे हिंदू धर्मातील जातिभेदात्मक विषमता घालविण्यासाठी प्रत्यक्ष कृतिकार्यक्रमांवर भर देऊन रत्नागिरीतील आपल्या स्थानबद्धतेच्या काळात एक सामाजिक चळवळ संघटित केली.

इतकेच नाही तर हिंदू धर्म व संस्कृती इतरांवर लादू नये या भूमिकेतून धर्मनिरपेक्ष राज्यसंस्थेचाही त्यांनी आपल्या वैचारिक मांडणीतून पुरस्कार केला होता. (देशपांडे स. ह. २००४, पृ. २५)

**कर्मवीर भाऊराव पाटलांचे कार्य :**

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या व्यक्तिमत्वाचा पिंड सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीतून घडला होता. शाहू महाराजांच्या तालमीत ते तयार झाले होते. त्यांच्यावर म. गांधींच्या विभूतिमत्वाचाही तेवढाच प्रभाव होता. १९२० साली ठक्करबाप्पांनी त्यांचा गांधीजींशी परिचय करून दिला होता; गांधीजींचे भाषण त्यांनी ऐकले होते; गांधीजींनी परदेशी कपड्यांची होळी केल्याचा प्रसंग अनुभवलेला होता. अशा अनुभवसंस्कारांनी भारावलेल्या भाऊरावांनी तेव्हापासूनच गांधी विचारांना अनुसरण्याचा निर्धार केला होता. बॅ. पी. जी. पाटील यांच्या पत्रात त्यांनी याबाबत लिहिले होते की, "महात्माजींच्या त्या भाषणाचा माझ्या मनावर इतका परिणाम झाला की, अत:पर खादीचे वस्त्र धारण करावयाचे व त्याप्रमाणे डोकीचा फेटा किंवा पायात पादत्राण मुळीच घालावयाचे नाही. महात्माजींच्या सत्य अहिंसेचे पालन करावयाचे असा मी मनाशी निश्चय केला." (मगदूम, १९९७, पृ. ८३-८४) म. गांधींप्रमाणे अस्पृश्यतेच्या रूढीविषयी त्यांना लहानपणापासूनच तिटकारा होता. विटा (जि. सातारा) येथे एकदा त्यांच्या अस्पृश्य बालमित्राला विहिरीवरचे पाणी पिण्यास ग्रामस्थांनी नकार दिला, तेव्हा रागाने भाऊरावांनी त्या विहिरीचे रहाट पाण्यात फेकून देऊन आपला निषेध व्यक्त केला होता. (जाधव रमेश, २०१०, पृ. १६८) शाहू छत्रपतींच्या सहवासातूनही त्यांना अस्पृश्यतानिवारणाची प्रेरणा मिळाली होती. कोल्हापूरात जैन बोर्डिंगात शिकत असतानाच शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या अस्पृश्य वसतिगृहाच्या उद्‌घाटनसमारंभाला ते गेले होते. कार्यक्रम संपल्यावर बोर्डिंगात परत आल्यावर सेक्रेटरी अण्णासाहेब लट्ठे यांनी 'आधी स्नान करून मग जेवणाच्या पाटावर बसा', असा हुकूम केला. भाऊरावांना ते मान्य झाले नाही. त्यांनी थेट सांगितले की, "मी अस्पृश्यांचा विटाळ मानीत नाही. मी सकाळी स्नान केले आहे. आता मी पुन्हा स्नान करणार नाही." अण्णासाहेबांनी त्यांना 'तर मग उपाशी रहा' असे सुनावले; भाऊराव उपाशी राहिले, पण अस्पृश्यांचा विटाळ मानणार नाही या आपल्या निश्चयावर ठाम राहिले. (घाटे, १९६१, पृ. २४८)

कर्मवीर भाऊराव पाटलांनी सुरुवातीला साताऱ्यात अस्पृश्य वस्तीत जाऊन तेथील मुलांना शिकविण्याचे काम केले. १९२४ साली त्यांनी सातारा येथे एका महार मुलाला घेऊन स्वत:च्या घरातच बोर्डिंग स्थापन केले. भाऊरावांच्या पत्नी लक्ष्मीबाई स्वयंपाक करून मुलांना जेवण वाढत; मात्र त्यानंतर त्या आंघोळ करून स्वत:साठी वेगळे जेवण करीत. हे लक्षात आल्यावर भाऊरावांनी आपल्या विचारांप्रमाणे सहकार्य मिळणार नसेल

तर आपण स्वत:च्या हातून मंगळसूत्र तोडून टाकू अशी पत्नीस कडक शब्दात तंबी दिल्याचीही एक आठवणही त्यांच्या चरित्रकारांनी नोंदवली आहे. (जाधव. कित्ता. पृ. १७०) भाऊराव पाटील यांनी घरात सुरू केलेले हेच बोर्डिंग पुढे 'शाहू छत्रपती बोर्डिंग' म्हणून प्रसिद्ध झाले. १९४१ साली या बोर्डिंगमध्ये १४५ अस्पृश्य विद्यार्थी रहात होते, त्यात ७६ महार, २९ मांग, १२ रामोशी विद्यार्थ्यांचा समावेश होता. १९४४-४५ साली ही १६२ पर्यंत वाढलेली होती. त्यात ९० महार, ३४ मांग, २८ चांभार आणि १० रामोशी विद्यार्थी होते. (जाधव, कित्ता, पृ. १७१) या आकडेवारीवरून बोर्डिंगात राहून शिक्षण घेणाऱ्यांत महार समाजातील विद्यार्थ्यांच्या खालोखाल मांग व रामोशी विद्यार्थीही पुढे येऊ लागले होते हे स्पष्ट होते. पुढे रयत शिक्षण संस्था स्थापन करून कर्मवीरांनी महाराष्ट्रातल्या बहुजनसमाजाच्या व अस्पृश्य वर्गातल्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या. कर्मवीरांनी आपल्या संस्थेमार्फत मेघाजीराव कांबळे, डी. एम. शिंदे या अस्पृश्य विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परदेशात पाठविले होते. आष्टा येथे १९४४ साली रयत शिक्षण संस्थेचे हायस्कूल सुरु केल्यावर कर्मवीरांनी ग्रामस्थांचा विरोध डावलून रामकृष्ण वेताळराव खैरमोडे या अस्पृश्य वर्गातील शिक्षकाची मुख्याध्यापकपदी नेमणूक केली होती. इतकेच नाही तर आपल्या हयातीतच स्वत: स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदाची सूत्रे रामचंद्र मनोहर नलवडे या अस्पृश्य वर्गातल्या व्यक्तीकडे सोपवून एक नमुनादर्श घालून दिला होता.

वसतिगृहात राहून भिन्न जाती-धर्माच्या विद्यार्थ्यांना सहजीवनाचा अनुभव देणाऱ्या भाऊराव पाटलांच्या प्रयोगाचे महात्मा गांधींनीही मनापासून स्वागत केले व हरिजन फंडातून या उपक्रमासाठी ५०० रुपयांचे अनुदान सुरू केले. त्यानंतर त्यांनी जैन, मराठा, ब्राह्मण, महार, मांग, धनगर, मुसलमान, ख्रिस्ती अशा सर्व जाती-धर्माच्या मुलांसाठी मिश्र वसतिगृहे स्थापन करून जातिभेदनिर्मूलनाच्या कृतिकार्यक्रमाचा एक नवा मानदंड प्रस्थापित केला. याखेरीज कर्मवीर भाऊरावांनी जलशाच्या माध्यमातून बहुजन समाजात शिक्षण, सामाजिक सुधारणा व अस्पृश्यतानिवारण याविषयी प्रबोधन करण्याची चळवळ चालवली होती. बहुजन समाजातील जातिविषयक कुंठित भावना दूर करण्यासाठी या प्रबोधनपर्वाचा भाऊराव पाटलांनी कल्पकतेने प्रसार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही २९ जुलै १९२८ रोजी कर्मवीरांनी स्थापन केलेल्या साताऱ्याच्या वसतिगृहाला भेट दिली होती व २५ रुपयांची देणगीही दिली होती. मात्र २४ डिसेंबर १९३९ रोजी सातारा जिल्ह्यातील अंकलखोप येथे झालेल्या अस्पृश्य युवक परिषदेत आणि मेढे येथे ३ जानेवारी १९४० रोजी झालेल्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या अधिवेशनात बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांनी भाऊराव पाटील यांच्या वसतिगृहात प्रवेश न घेण्याचा सल्ला दिला होता. या संस्थेला म. गांधी

आणि काँग्रेसची सहानुभूती आहे म्हणून कदाचित डॉ. आंबेडकरांनी असा सल्ला दिला असावा, असे या काहीशा विसंगत वाटणाऱ्या घटनेचा अन्वयार्थ डॉ. सदानंद मोरे यांनी लावला आहे, त्यात बराच तथ्यांश वाटतो. (मोरे सदानंद, २००७, पृ. ९०७)

सत्यशोधक चळवळीत भाऊराव सक्रिय होते, त्यामुळे ब्राह्मणेतरांच्या अस्मितेला धरून काम करण्याचा त्यांचा पिंड बनला होता. वि. द. घाटे यांनी त्यांच्या या सत्यशोधकीय बाण्याचा एक अनुभव नोंदवला आहे. कृष्णाकाठी औदुंबरला दत्ताचे तीर्थक्षेत्र आहे. दत्तजयंतीला शेतकऱ्यांकडून धान्य जमवून भंडाऱ्याचा प्रसाद दिला जात असे. संध्याकाळपर्यंत ब्राह्मणांच्या पंक्ती उठत आणि ब्राह्मणांची जेवणे आटोपल्यावरच इतरांना जेवण वाढले जात असे. तोपर्यंत शेतकऱ्यांना भुका लागलेल्या असल्या तरी त्यांनी ताटकळत बसायचे असे. तरुण सत्यशोधकांना हे मानवले नाही, त्यांनी भाऊराव अण्णांकडे तक्रार नेली व हातात कुऱ्हाडी घेऊन ब्राह्मणांच्या समाचाराला जायची परवानगी मागितली. भाऊरावांनी 'एकाही ब्राह्मणाच्या अंगावर हात पडता कामा नये, तुमचे सोटे-कुऱ्हाडी कृष्णेत सोडून या' असे बजावले व या तरुणांना ब्राह्मणांच्या पंक्ती बसतात तिथे टेबल मांडायला लावले. टेबलावर पाण्याची घागर ठेवायला सांगितली. त्यांनी घागरीतले पाणी पित बुलंद आवाजात चारपाच तास भाषण देणे चालू ठेवले. त्यावर आता भाषण पुरे करा, ब्रह्मवृंद भुकेला झाला आहे, अशा सूचना यायला लागल्या. त्यावर भाऊरावांनी व्यवस्थापकांना सांगितले , "तुमचे ब्राह्मण भुकेले असतील; परंतु तुमचे अन्नदाते हे समोर बसलेले शेतकरीसुद्धा भुकेले आहेत, त्यांच्या भुकेकडे आजवर कधी लक्ष दिले होते का? आता असे करा ब्राह्मणांची व ब्राह्मणेतरांची एकच पंगत होऊ द्या. देवाचा हा प्रसाद आहे. आगेमागे नको, साऱ्यांनाच प्रसाद घेऊ द्या." (घाटे , १९६१, पृ. २५०) यावरून तत्कालीन ब्राह्मण-ब्राह्मणेतरांतल्या सामाजिक दुराव्यातली कटुता कशी होती हेही समजते आणि ब्राह्मणेतर पुढारी ब्राह्मणांना ब्राह्मणेतरांच्या नवजागृतीचा धडा कसे शिकवित होते, याचाही प्रत्यय येतो. ब्राह्मण नेतृत्वाकडून ब्राह्मणेतरांना मिळणाऱ्या वागणुकीचा प्रत्यय त्यांना स्वातंत्र्योत्तर काळातही आला होता. १९४८ साली म. गांधीजींच्या हत्येनंतर मुंबई प्रांताचे तत्कालीन प्रधानमंत्री बाळासाहेब खेर यांनी रयत शिक्षणसंस्थेची सर्व अनुदाने बंद केली होती. अर्थात भाऊरावांनी महाराष्ट्रभर फिरून लोकाश्रयातून संस्था जगवली, सरकारकडे जाऊन पुन्हा याचना करीत बसले नाहीत.

चिपळूणकर, टिळक, आगरकर यांच्याप्रमाणे ब्राह्मणेतरांनाही मोठमोठ्या संस्था काढता येतात हे त्यांना दाखवून द्यायचे होते. कर्मवीर भाऊराव पाटलांनी त्यांच्या शिक्षणसंस्थांत आणि वसतिगृहात फक्त ब्राह्मणेतरांनाच प्रवेश देण्याचे धोरण अवलंबिले होते. कदाचित ब्राह्मणांचा शिरकाव झाल्यास परंपरेनुसार रयतसभेचे रूपांतर केव्हा ब्राह्मणसभेत होईल हे समजणारही नाही, असा विचार करून त्यांनी ब्राह्मणांना दूर ठेवले

असावे. मात्र ही कटुता त्यांनी कायम ठेवली नाही. पुढे सातारचे कॉलेज त्यांनी ब्राह्मणांना खुले केले. खेड्यातल्या मराठमोळ्या मुलांबरोबर ब्राह्मणांची मुले-मुली तत्परतेने कमवा आणि शिका योजनेत खडी फोडताना भाऊरावांनी पाहिले-अनुभवले. "या श्रमसत्रात ब्राह्मण आणि ब्राह्मणेतरांचा घाम एकत्र आला होता. शतकानुशतकांचे भेद त्या सातारच्या गांधी टेकडीवर फुटले जात होते आणि भाऊरावांना ते मंजूर होते." (घाटे, १९६१, पृ. २५२) ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाची सामाजिक ऐक्यात होणारी ही पूर्णाहूती एका अर्थाने महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनाला समरसतेचा धडा घालून देणारी होती.

**ब्राह्मण – ब्राह्मणेतर वाद :**

ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद हा महाराष्ट्राच्या सामाजिक- राजकीय विग्रहाचा एक महत्त्वाचा पैलू आहे. ब्रिटिश अमदानीपूर्वी महाराष्ट्रात ब्राह्मण –ब्राह्मणेतरवादाला तोंड फुटले नव्हते. महाराष्ट्रात वारकरी संप्रदायामुळे ज्ञानेश्वर ब्राह्मण, सेना न्हावी, चोखा मेळा, नरहरी सोनार, गोरा कुंभार, सावता माळी अशा सगळ्या जातीतल्या संतांना सर्व जातींनी स्वीकारले होते. मात्र तरीही वि. द. घाटे यांनी म्हटल्याप्रमाणे या भक्ती चळवळीमुळे महाराष्ट्रात आंतरजातीय विवाह झाले नाहीत; अस्पृश्यता संपली नाही. चोखोबाला ब्राह्मणांच्या, मराठ्यांच्या, शिंप्यांच्या देवघरात स्थान मिळाले नाही. या अर्थाने पंढरीचा नशा मराठी जीवनात मुरला नाही, समाजात जिरला नाही. मात्र वारकरी संप्रदायाने जाती-जातीतला दुरावा कमी केला होता. मराठेशाहीत शिवाजी महाराज हे ब्राह्मण-ब्राह्मणेतरांचे एकमेव दैवत राहिले. गावगाड्यातही ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद नव्हता. आलुत्या-बलुत्यांच्या सहजीवनावर महाराष्ट्रधर्म पोसला होता. गावनिवाड्यात महार दोन पायरीवर बसत असतील, पण निवाड्यात त्यांचेही अंगठे लागत. मात्र इंग्रज आल्यानंतर सारेच बदलले. ग्रामीण जीवनावर सरकारी नोकरशाहीचे सावट पडले. गावगाडे जागोजाग मोडले. पेशवाईच्या अस्तानंतर नवी ब्राह्मणशाही सुरू झाली. कुलकर्णी सरकारचा नोकर झाला. मुंबई विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर इंग्रजीचे प्रस्थ माजले. इंग्रजी शिकलेल्यांना सरकारी नोकऱ्या मिळाल्या. ग्रामीण बहुजन ज्ञानापासून, सरकारी नोकरीपासून वंचित राहिले. शिक्षणाशिवाय पुढे जाण्याचा मार्ग नाही हे समजल्यापासून ब्राह्मणेतरांना जाग आली. तोपर्यंत गुरुमुखाने विद्यासंपादन हे ब्राह्मणांचे क्षेत्र, लिखापढी हे कायस्थांचे काम, लढाया हे मराठ्यांचे / क्षत्रियांचे काम अशी समजूत होती. जीवन सुखी होते तोपर्यंत ब्राह्मणांच्या ज्ञानसाधनेवर अतिक्रमण करण्याचे ब्राह्मणेतरांना सुचले नाही. इंग्रज आल्यानंतर त्याची खरी जाणीव झाली. लोकहितवादींनी 'भटांच्या निरुपयोगी विद्येचा समाचार' घेतला. म. फुल्यांनी ब्राह्मणेतरांसाठी शाळा काढल्या, सत्यशोधक समाज स्थापन करून अस्पृश्यता घालविण्याचा कृतिकार्यक्रम सुरू केला. बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड यांनी ब्राह्मणेतरांना वेदोक्ताचा अधिकार दिला; अस्पृश्यांना आपल्या पंक्तीत घेतले, त्यांच्या

शिक्षणाची व नोकऱ्यांची व्यवस्था केली. कोल्हापूरात शाहू महाराजांनी हाच मार्ग अनुसरला. ब्राह्मणेतर चळवळीचा हा पूर्वरंग होता. (घाटे, १९६१, पृ.२६५-२७०)

१९०१ नंतर कोल्हापूरच्या वेदोक्त प्रकरणावरून ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद शिगेला पोहचला होता. पश्चिम महाराष्ट्रापासून विदर्भापर्यंत 'बहुजनांच्या हक्कांचे अपहरण' म्हणून या वादाचे सर्वत्र पडसाद उमटत होते. 'क्षत्रियांचे धार्मिक स्वातंत्र्य' पणाला लागले होते. धार्मिक स्वातंत्र्यासाठी ब्राह्मण पुरोहितांच्या मक्तेदारीला शह देण्याचे कार्यक्रम सुरू झाले. नृसिंहवाडीत दत्तदर्शनासाठी ब्राह्मणेतर स्त्रियांना बंदी होती; 'हंटर'कार खंडेराव गोपाळ बागल यांनी मनुस्मृतीतील पक्षपाती श्लोकांची चर्चा करून ते श्लोक अन्याय्य असल्याचे सिद्ध केले व ब्राह्मणेतर स्त्रियांच्या धार्मिक हक्कांचे समर्थन केले. बापूराव संताराम भोईटे यांनी 'पुराणातील घोटाळे' (१९२३) या निबंधसंग्रहातून ब्राह्मणांच्या पक्षपाती परंपरांची समीक्षा केली. सी. र. तारकुंडे यांनी 'ब्राह्मणेतर व मराठे ह्यांच्या चळवळींचा पूर्वेतिहास आणि मराठ्यांची पूर्वपीठिका' या नावाने स्वतंत्र ग्रंथ लिहून या प्रश्नाची ऐतिहासिक पूर्वपीठिका विशद केली.

१९१७ साली अमरावतीच्या कायस्थ प्रभूंनी वेदोक्त पद्धतीने श्रावणी करण्याचा निर्णय घेतला होता; त्याविरुद्ध ब्राह्मणांनी कोर्टात दावा दाखल केला. १९२१ साली क्षत्रिय मराठ्यांनी विठ्ठलगिरी बाबा गोसावी यांच्या नारायण मंदिरात वेदोक्त श्रावणी करण्याचे ठरविले, तेव्हा तेथील भिक्षुकांनी मंदिराचे दरवाजे आतून बंद करून क्षत्रिय मराठ्यांना मंदिर प्रवेश नाकारला. मराठ्यांनी त्यावर महेश्वरी वैश्यांच्या बालाजी मंदिरात श्रावणीचा कार्यक्रम करून प्रतिशह दिला. (गुंदेकर, २०१३, पृ. ६६) वेदोक्त श्रावणीच्या विधिकर्मकांडात ब्राह्मण पुरोहित नको म्हणून विदर्भातील काशिनाथ बापूजी देशमुख यांनी स्वतंत्रपणे 'क्षत्रियांची वेदोक्त श्रावणी' ही संहिता प्रसिद्ध केली. ब्राह्मणेतर पुरोहितांनी दक्षिणा घेऊ नये व घेतल्यास तिचा विनियोग लोकोपयोगी कामासाठी करावा अशी सूचना छापून ब्राह्मणेतर चळवळीच्या ध्येयवादाची आठवणही द्यायला देशमुख विसरले नाहीत. १९१९ साली अमरावतीला 'क्षत्रिय माळी परिषद' भरविण्यात आली व माळी हे क्षत्रिय आहेत हे स्थायी स्वरूपात सिद्ध करण्यासाठी बळीराम श्रावणजी मालपे यांनी एक स्वतंत्र पुस्तकही लिहिले. (विक्रमादित्य,१९२८)

ब्राह्मण पक्षाकडूनही सातत्याने 'पृथ्वीतलावर सांप्रत क्षत्रिय राहिले नाहीत' असा उद्घोष सुरू होता. नागपूरच्या तेलंगशास्त्री यांनी १९ ऑक्टोबर १९२१ च्या 'महाराष्ट्र' पत्रातल्या लेखातून 'क्षत्रिय व वैश्य वर्गच राहिला नाही' असे विधान केले होते. त्याचा निषेध करण्यासाठी ६ नोव्हेंबर १९२१ रोजी नागपूरात क्षत्रिय-वैश्यांची मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या प्रांगणात सभा झाली. पाठोपाठ २७ नोव्हेंबर १९२१ ला नागपूरच्या तुळशीबागेत 'क्षत्रिय-वैश्य धार्मिक हक्क परिषद' झाली. या परिषदेने क्षत्रिय-वैश्यांच्या

संदर्भात निर्माण झालेल्या वादावर अभ्यासकांकडून निबंध लिहवून घेतले. त्यात काशीराम बापूजी देशमुख यांच्या 'क्षत्रिय वैश्यांचा ब्राह्मणांशी सामना' या निबंधाचा ५० रुपये बक्षिस देऊन गौरव करण्यात आला. का. बा. देशमुख यांनी त्यानंतर 'मराठा क्षत्रियांचा इतिहास' (१९२९) लिहिला व 'मराठा, रजपूत, माळी, कोळी, साळी, सोनार, गवळी, तांबोळी, लोहार, सुतार, कुंभार, ठाकूर, भाट, जाट इ. ब्राह्मणेतर जातींनी धंद्यावरून पडलेली नावे सोडून स्वत:ला क्षत्रिय म्हणवून घेण्याचा सल्ला दिला. दरम्यान १९२३ साली हायकोर्टाने क्षत्रिय व कुळंबी एकच आहेत असा निकाल दिला. नाशिकच्या डॉ. कुर्तकोटी शंकराचार्यांनी मराठे हे अस्सल क्षत्रिय आर्यांचे वंशज असल्याचा निर्वाळा दिला. (गुंदेकर, २०१३, पृ. ६९-८९)

अलीकडे चेहरेपट्टीचे मोजमाप आणि रक्ताची तपासणी केल्यावर असे दिसून आले आहे की मराठे आणि कुणबी एकाच रक्ताचे आहेत. पण स्वत:ला 'कुणबी' म्हणवून घेण्यापेक्षा 'मराठा' म्हणवून घेण्यात अधिक पुढारलेपणाची भावना गर्भित असते. सामाजिक व्यवहारात त्याचे प्रतिबिंब पडलेले असे. कुणबी शिकला सवरला, चार पैसे गाठीला बांधू लागला की, तो स्वत:ला 'मराठा' म्हणवत असे; आपल्यासारख्याच 'नव्या' मराठ्यांशी सोयरिक संबंध जोडण्याला तो प्राधान्य देत असे. अशा पद्धतीने समाजातील कुणब्यांची संख्या घटत जाऊन मराठ्यांची संख्या वाढत गेली. १९४१ सालच्या खानेसुमारीत कुणबी जवळपास राहिलेच नाहीत, इतके कमी झालेले दिसतात. वि. द. घाटे यांनी मराठा समाज ही खऱ्या अर्थाने जात नसून जातींचा समूह आहे, अशी उपपत्ती मांडली होती. 'जात म्हणजे एक्स्टेंडेड किनशिप' ही इरावती कर्वे यांची समाजशास्त्रीय व्याख्या प्रमाण मानून त्यांनी ही उपपत्ती मांडली होती. रक्ताचे नाते आणि लागेबांधे जेथपर्यंत पोहचतात तेथपर्यंत 'नातलगांचा गट म्हणजे जात' असे मानले तर मराठा समाजाच्या इतिहासाचा वेगळा पैलू समोर येतो. मराठा समाज हा मुळात अलग अलग छोट्या मोठ्या गटांच्या एकीकरणाच्या प्रक्रियेतून विस्तारत गेलेला आहे. मराठे हे बहुधा बाहेरून आलेले, चढाऊ आणि लढाऊ लोक; पण खानदेशातला दुधदुभत्याचा व्यवसाय करणारा लेवा समाज किंवा खानदेश आणि वऱ्हाडात तीळाची शेती करणारे तिळोरे हे कुणबीच होते; थोड्या चालीरीती सोडल्या तर त्यांच्यात आणि मराठ्यांत लक्षणीय भेद दिसत नसे. वऱ्हाड-खानदेशातले देशमुख हे स्वत:ला 'मराठा' म्हणवून घेण्यापेक्षा 'देशमुख', 'पाटील' म्हणवून घेणेच पसंत करतात; मात्र तरीही ते मराठेच असतात. रत्नागिरी जिल्ह्यातील मालवण-वेंगुर्ल्याचे गावडे आणि गावीत या समाजांचे अशाच प्रकारे मराठेकरण होत गेले आहे. 'कोकणी मराठे' हे इतर मराठ्यांपेक्षा वेगळे पडतात. ते उच्चकुलीन, त्यांची राहाणी निर्मळ, घरदार स्वच्छ; ब्राह्मणांइतकीच बुद्धी आणि शिक्षणाची आवड, असे हे कोकणी मराठे देशावरच्या मराठ्यांशी फटकून वागत. कोकणचे शिर्के

देशावरच्या भोसल्यांशी सोयरिक संबंध जोडण्यात पुढाकार घेत नसत. पण 'मराठा' जातीच्या बृहत वर्तुळात ही लघू वर्तुळे हळू हळू विसर्जित होत गेली. पुढे शाहू महाराजांनी स्वत:च्या घाटगे घराण्यातील मुलगी इंदूरच्या यशवंतराव महाराज होळकर या धनगर जातीत देऊन धनगर जातीला मराठ्यांमध्ये सामावून घेण्याचा धाडसी प्रयोग केला. अशा प्रकारे आपल्या समकक्ष असणाऱ्या इतर जातींना पोटात घेत मराठा समाजाची व्याप्ती वाढत गेली. (घाटे, १९६१, पृ. २०२-२१४)

मराठा समाज इतर पोटजातींच्या एकत्रीकरणातून एकीकडे बृहत होण्याचा प्रयत्न करीत असला, तरी ब्राह्मण जातीला मात्र ती शत्रूस्थानीच मानत होती. राजर्षी शाहू महाराजांच्या मृत्यूनंतरही ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाची धार कमी झाली नव्हती. खंडेराव गोपाळ बागल यांनी 'हंटर' पत्रातून स्पष्टच शब्दात लिहिले की, "टिळक म्हणतात, स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, तो मी मिळविणारच! आम्ही म्हणतो, समता हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे, तो मिळेपर्यंत आम्ही उच्च म्हणविणाऱ्या वर्गाला स्वस्थता मिळू देणार नाही." (हंटर २३ ऑक्टो. १९२५) गणपती उत्सवात टिळकसंप्रदायी ब्राह्मणांनी ब्राह्मणेतरांची टवाळी करावी आणि छत्रपती मेळ्यातून जेधे-जवळकरांनी टिळकपंथीयांवर प्रतिहल्ले चढवावेत असे पुण्यातल्या सांस्कृतिक उत्सवांना जातिवादी लढाईच्या रणभूमीचे स्वरूप प्राप्त झाले होते. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाला तोंड फुटण्यापूर्वीही गणेशोत्सवातील मेळ्यांत टिळकपक्षीय लोक टिळकांच्या राजनीतीचे समर्थन आणि सुधारकांची टिंगल करणारी पदे म्हणत :

"बिस्कुटे उष्टी त्वा खावी / साहेबी लक्तरे ल्यावी
सर्वदा लाळ घोटावी / रात्रंदिन जी जी करावी"

अशा शब्दांत सुधारकांच्या इंग्रजधार्जिण्या व ख्रिस्ती मिशनऱ्यांना अनुसरणाऱ्या वृत्तीचा उपहास केला जात असे. या उपहासाबरोबर सुधारकांची टिंगल-टवाळी करण्याचीही स्पर्धा लागायची :

"तुज मिळेल म्हारीण कोणी / वाकडी जी सात ठिकाणी
काळुंद्री घुबडावाणी / तू राजा मग ती राणी"

असल्या निंदाव्यंजक भाषेत व अभिरुचीहीन पातळीवर सार्वजनिक ठिकाणी पदे म्हटली जात. पुढे ब्राह्मणेतरांनी ब्राह्मण व टिळकधार्जिण्या पुढाऱ्यांचा उपमर्द करण्यासाठी गणेशोत्सवातील ह्या सार्वजनिक धुळवडीचा उपयोग करून घेतला. जेधे –जवळकर यांनी गणेशोत्सवात समांतर 'छत्रपति मेळा' आणला, त्याचे ध्रुपदच ब्राह्मणांची भंबेरी उडविणारे होते ."अरे आला छत्रपती मेळा, पळा भटांनो, पळा, पळा !" या ठेक्यावर मेळ्यातली पदे झडू लागली. *'शिवाजी आमुचा राणा, मराठी आमुचा बाणा'* अशी मराठी अस्मितेची पोलादी ओळख मिरवित हे मेळे सादर होत. ब्राह्मणी काव्याचा पर्दाफाश करण्याबरोबरच

शिवाजी महाराज, शाहू छत्रपती, महात्मा फुले, म. गांधी या जननायकांचे चरित्रगानही या मेळ्यातून केले जात असे. ब्राह्मणेतर सत्यशोधक चळवळीतील रामचंद्र नरहर माळी, शंकरराव बळवंतराव भोसले या जलसाकारांनी शिवाजी महाराजांच्या जीवनगाथेवर पोवाडे रचले (१९२२). चित्पावन ब्राह्मणांवर जळजळीत टीका हा छत्रपती मेळ्यातील पदांचा मध्यवर्ती गाभा असायचा. उदाहरणार्थ, हरिभाऊ तोरणे यांनी 'चावडीतील बैठक' (१९२३) या फार्समधून 'लोकमान्यतेचा टेंभा मिरविणारे कैक हरीचे लाल आंधळे आणि बहिऱ्याचे सोंग घेऊन बसले आहेत' अशा सूचक औपरोधिक शब्दात टिळकांच्या अनुयायांविषयीची रागाची भावना व्यक्त केली होती. अशा टीकेमुळे ब्राह्मण –ब्राह्मणेतर हातघाईवर येण्याचे प्रसंगही घडत. १९२४ साली *'नकट्यांचा बाजार सारा'* या पदावरून ब्राह्मण-ब्राह्मणेतरांत मारामारीही झाली होती. टिळकांचा उल्लेख 'नकट्या' शब्दांत गर्भित असल्याची भावना होत होती.

होळीच्या सणाला ग्रामोत्सवात सार्वजनिक रित्या बोंब मारून कृष्णकृत्यांना उजेडात आणण्याचा व मनातली मळमळ दूर करण्याचा मुक्त आविष्कार करण्याची परंपरा महाराष्ट्रात आहे. गणेशोत्सवातील धर्ममार्तंडाचे मेळे व ब्राह्मणेतरांचे छत्रपती मेळे या सांस्कृतिक परंपरेला जवळ जाणारे होते. कोंडलेल्या रागाला सार्वजनिक ठिकाणी तोंड फोडून सामूहिक विरेचनाची शुद्धीकरणाची प्रक्रिया म्हणून या कलगीतुऱ्याकडे पाहिले गेले असते तर फारसा मोठा पेच निर्माण झाला नसता. मात्र या मेळ्यांना राजकीय सत्ताकारणाचा रंग चढल्याने उत्सवांना रणभूमीचे स्वरूप प्राप्त होत गेले. मेळ्यांतल्या पदांतून ब्राह्मणेतरांच्या सामूहिक अबोधमनात साठलेल्या रागाचा ज्वालामुखी बाहेर पडू लागला. पदरचनाकारांना लोकशिक्षणाबरोबरच विद्रोहाच्या ठिणग्या पेरण्याची आकांक्षा होती, त्यामुळे *'ब्राह्मण स्वार्थी तर मराठा देशप्रेमी'* अशी थेट शेरेबाजी होऊ लागली. संवादी भाषेतून अभिव्यक्ती होत असल्याने ह्या पदांची आवाहनक्षमताही मोठी होती. 'देशोन्नतीस ब्राह्मणांचा जातिस्वार्थच आड आला. हा जातिभेद आड आला नसता तर रजपूत, मराठे एकत्र होऊन जगाला त्यांनी शह दिला असता' अशी मांडणी ब्राह्मणेतरांकडून पुढे येऊ लागली होती. (श्यामराव देसाई, राष्ट्रवीर, ९ मे १९२१) अशा प्रकारे सार्वजनिक उत्सव आणि मेळे यातून सामाजिक ऐक्यभाव वर्धिष्णू होण्याच्या संधी महाराष्ट्र गमावू लागला होता.

**पुतळ्यांवरून झालेले वादविवाद :**

१९१७ साली ग्वाल्हेरचे खासेराव पवार आणि बडोद्याचे खासेराव जाधव यांनी पुण्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याची योजना आणली. प्रारंभी हे शिवस्मारक निव्वळ मराठ्यांचे करावे असा एक मतप्रवाह होता. कोल्हापूरचे शाहू छत्रपती, 'जागृतिकार' पाळेकर वगैरे मंडळींचा त्यात समावेश होता. या स्मारकाची

कोनशिला ब्रिटनचे युवराज प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या हस्ते करण्याचे प्रस्तावित असल्याने हे शिवस्मारक अखिल भारतीय स्वरूपाचे असावे या विषयावर एकमत झाले. १९ नोव्हेंबर १९२१ रोजी प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या हस्ते शिवस्मारकाची कोनशिला बसविण्यात आली. नंतर नजीकच्या काळात राजर्षी शाहू महाराजांचे निधन झाल्यावर शिवस्मारक समितीत ग्वाल्हेरच्या शिंदे सरकारांनी सांगलीचे संस्थानिक पटवर्धन आणि पुण्याचे गोपाळराव देवधर या ब्राह्मण सदस्यांचा समावेश केला व देवधरांकडे समितीच्या चिटणीसपदाची जबाबदारी सोपविली. त्यावरून केशवराव जेधे, दिनकराव जवळकर, पालकर या ब्राह्मणेतर सत्यशोधक तरुणांनी वाद घातला. या तरुणांनी हे स्मारक निखळपणे शिवाजी सोसायटीचेच असावे, ब्राह्मणांना त्यात स्थान नको अशी टोकाची भूमिका घेतली होती. दिनकरराव जवळकर यांनी 'आग्यावेताळ' या टोपणनावाने *'श्रीशिवस्मारक पुराण'* नामक १७ अध्यायांची पोथी लिहून प्रकाशित केली. केशवराव जेधे यांनी १९२३ साली *'श्रीशिवस्मारक'* नावाचे साप्ताहिक सुरू करून शिंदे सरकारांनी घेतलेल्या निर्णयाविरुद्ध जनमत जागविण्यास सुरुवात केली. पुढे १६ जून १९२८ रोजी कोल्हापूरच्या छत्रपती राजाराम महाराजांच्या पुढाकाराने मुंबईचे गव्हर्नर लेस्ली विल्सन यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण होऊन या वादाची इतिश्री झाली. वीरपुरुषांच्या स्मारकांच्या निमित्ताने सामाजिक समरसता वाढायला प्रेरणा मिळण्याऐवजी अशा वादातून महाराष्ट्राच्या समाजजीवनात जातीय अस्मितेच्या फाटाफुटीला खतपाणी घातले जात होते, असे सर्वसाधारण चित्र या रणधुमाळीतून पुढे येते होते.

दरम्यान तात्यासाहेब न. चिं. केळकर पुणे नगरपालिकेचे अध्यक्ष असताना १९२४ साली पुण्यात नगरपालिकेने १६ हजार रुपये खर्चून टिळकांचा पुतळा उभारला व २२ जुलै १९२४ रोजी पं. मोतीलाल नेहरू यांच्या हस्ते त्याचे अनावरण झाले. एका रस्त्याला टिळकांचे नावही दिले. पाठोपाठ सप्टेंबर महिन्यात विष्णूशास्त्री चिपळूणकर यांच्या पुतळ्याचे म. गांधी यांच्या हस्ते अनावरण झाले. शिवाय ब्राह्मणी वस्तीत विजेचे दिवेही लावण्यात आले. ब्राह्मणेतरांच्या वस्तीत मात्र अद्याप विजेचे दिवे लावण्यात आले नव्हते. त्यावरून टिळकपंथीय ब्राह्मण वर्ग आणि राजर्षी शाहू महाराज संप्रदायी ब्राह्मणेतर असे सरळ सरळ दोन गट पुण्यात निर्माण झाले. केशवराव जेधे यांनी छत्रपती मेळ्यातून 'नक्ट्यांचा बाजार'नामक जलशाच्या माध्यमातून जनतेच्या पैशातून टिळकांचा पुतळा उभा केला याचा निषेध करणारी काही पदे रचली :

"नक्ट्यांचा बाजार / लाज काय असणार
कमिटीमध्ये बसूनि नक्टे / विचार करिती पुतळ्याचा
लोकहिताला फाटा देऊनि / स्मारकास धजणार

जनसेवेचे नाव करूनि / कमिटीमध्ये बसतात
टिळकांच्या स्मारकास खर्ची / रुपये सोळा हजार //

दिनकरराव जवळकर यांनी 'छत्रपती पद्यसंग्रहा'त लो. टिळकांचा उल्लेख *'हा असा म्हसोबा सोट्या'* अशा शब्दात केला होता. या पदसंग्रहातील एका पदात तात्यासाहेब केळकर, अण्णासाहेब भोपटकर, भालाकार भाऊसाहेब भोपटकर आणि श्रीधर बळवंत उर्फ बापू टिळक यांची नावे गुंफून *"तात्या, अण्णा, भाऊ, बापू खिसेकापू जमलेतेले'* असे पद रचले होते. यावर श्रीधरपंत टिळक यांनी बदनामीचा खटला दाखल केला. २३ एप्रिल १९२५ रोजी न्या. फ्लेमिंग यांनी पदरचनाकार दिनकरराव जवळकर व प्रकाशक रामचंद्र लाड यांना प्रत्येकी पाच महिने कैद व पाचशे रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. पुढे अपिलात गेल्यावर ही शिक्षा कमी करण्यात आली व प्रत्येकी पन्नास रुपयांचा दंड करण्यात आला. सारांश, टिळकांवर 'ब्राह्मणी गटाचे पुढारी' असा शिक्का मारून टिळक पुतळ्याविरुद्ध ब्राह्मणेतरांनी आपला राग व्यक्त केला. अशा प्रकारे राष्ट्रीय पुढाऱ्यांची स्मारके जातीच्या चौकटीत मर्यादित करण्याच्या राजकारणाची बीजे पुण्यातल्या पुतळ्यांच्या वादातून पेरली जात होती.

यानंतर लगेचच १९२५ साली नव्याने निवडून आलेले नगरसेवक केशवराव जेधे यांनी पुणे नगरपालिकेला २० हजार रुपये खर्च करून सार्वजनिक ठिकाणी महात्मा फुले यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याच्या प्रस्ताव दिला. नगरपालिकेचे अध्यक्षपद त्यावेळी लक्ष्मणराव आपटे यांच्याकडे होते. पुणे नगरपालिकेतील ब्राह्मण व काही ब्राह्मणेतर नगरसेवकांनी केशवराव जेधे यांनी मांडलेल्या ठरावाला विरोध केला. यावरून पुण्यात वादप्रतिवादांचे रण माजले. भालाकार भोपटकरांनी फुले हे माळी समाजाचे नेते होते असे म्हणून फुल्यांच्या कार्याला जातीय सीमेत बंदिस्त करण्याचा प्रयत्न केला. "कै. जोतीराव हे 'पब्लिक' म्हणजे सार्वजनिक गृहस्थ नसून 'सेक्शनल' म्हणजे विशिष्ट पंथीय होते' असा त्यांचा युक्तिवाद होता. फुल्यांच्या पुतळ्यासाठी पुण्यापेक्षा कोल्हापूर हे शहर अधिक योग्य राहील, अशी मल्लिनाथीही त्यांनी केली होती. गणपराव म. नलावडे यांनी 'सत्यशोधक की ख्रिस्तसेवक' नामक चोपडे लिहून महात्मा फुले ख्रिस्ती झाले होते, अशी अफवा पसरवली. ख्रिस्तांनी हिंदू धर्माविरुद्ध सोडलेले पगारी प्रचारक म्हणून फुल्यांचा निर्देश केला व 'अशा स्वधर्मशत्रूचे स्मारक म्युनिसिपालिटीने उभे करणे म्हणजे हिंदू धर्माच्या मुडद्यावर ख्रिस्ताचा सांगाडा उभे करणे होय' अशी विध्वंसक मांडणी केली. या चोपड्याला म. फुल्यांचे चुलत नातू विश्वनाथ महादेव फुले यांची प्रस्तावना घेऊन त्यांच्याकरवी म. फुल्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला होता यावर शिक्कामोर्तब करण्याचा बनाव रचण्यात आला. या वादाच्या पार्श्वभूमीवर म. फुले यांच्या पुतळ्याचा प्रस्ताव नामंजूर झाला. विशेष म्हणजे लो. टिळकांच्या पुतळ्याचा प्रस्ताव ब्राह्मणेतरांच्या बहुमताने

मंजूर झाला होता; तर म. फुलेंच्या पुतळ्याचा प्रस्तावही ब्राह्मणेतरांच्याच बहुमताने नामंजूर झाला होता. पुतळ्याचा ठराव नामंजूर होताच दिनकरराव जवळकर यांनी *'देशाचे दुश्मन'* नावाचे पुस्तक लिहून ब्राह्मण वर्गाच्या जातीय राजकारणावर प्रखर टीका केली. केशवराव जेधे हे पुस्तकाचे प्रकाशक होते. या पुस्तकावर बदनामीकारक मजकूर छापल्याचा ठपका ठेवून खटला भरण्यात आला. सेशन कोर्टात १५ सप्टेंबर १९२६ रोजी लेखक जवळकर यांना १ वर्ष कैद व २५० रु. चा दंड ठोठावण्यात आला. पुढे डॉ. आंबेडकरांनी वकिलपत्र घेऊन हायकोर्टात अपील केले, त्यात जवळकरांना निर्दोष ठरविण्यात आले.

खंडेराव गोपाळ बागल यांनी यानिमित्ताने लिहिलेल्या लेखात पुणेकर ब्राह्मणांची पायाखाली पहाण्याची प्रवृत्ती कशी संकुचित होती यावर तिखट शब्दात प्रतिक्रिया नोंदवली होती. म. फुल्यांच्या पुतळ्याला विरोध करून पुण्यातल्या ब्राह्मणांनी ब्राह्मण-ब्राह्मणेतर ऐक्याची फार मोठी संधी घालवली अशी खंत त्यांनी व्यक्त केली. आपल्या लेखात बागल यांनी लिहिले होते की, "फुले हे माळी होते. ते धोतरबडवे, पाणके, पळीपंचपात्रेबहादूर किंवा ओगराळाचार्यही नव्हते; किंवा सोवळे-ओवळेपणाचे ढोंग माजवून त्यांनी धर्मबुडवी हॉटेलेही काढली नव्हती.. युनिव्हर्सिटीच्या पदव्या घेऊन खरी जनता कोण हे तुम्हाला कळत नाही, परंतु त्या अल्पज्ञ कुणब्याने साठ वर्षांपूर्वी खरी लोकशाही म्हणजे ब्राह्मणेतरशाही हे बरोबर ओळखून जनतेला नवी दिशा दाखविली.. पुणेरी मंडळीने अक्कल गमावली आहे. टिळकांचे स्मारक करताना लोकमत घेतले नाही. मी, तू व माझा गोतावळा हे टिळकांचे धोरण होते. तीच त्यांची जनता होती." (हंटर, २४ जुलै १९२५) ब्राह्मण-ब्राह्मणेतरवादातून 'लोकशाही म्हणजे ब्राह्मणेतरशाही' अशी नवी राजकीय समीकरणे महाराष्ट्रात तयार होऊ लागली होती. जातीय सलोख्याच्या ऐवजी जातीय अपसरणाच्या दिशेने प्रवास सुरू झाला होता. १९०१ च्या वेदोक्त प्रकरणातून सुरू झालेल्या वादविवादांचे जातीय अहंकारवादाच्या वावटळीत रूपांतर होऊ लागले होते.

सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीचा जोर जसजसा वाढू लागला तसतसा ब्राह्मणी धर्मपंडितांनी ब्राह्मणेतरांची अवहेलना करण्याचा सपाटा चालविला होता. या पंडितांनी ब्राह्मणेतरांच्या आचारधर्माची बंधने सांगायला सुरुवात केली. ब्राह्मणांखेरीज इतरांनी वेदाध्ययन करू नये, जानवी घालू नये, शेंडी राखू नये, निऱ्या करून धोतराचा कासोटा घालू नये, कासोट्याचा फरारा सोडून धोतर नेसावे, आपली मंदिरे हमरस्त्यावर बांधू नये व मंदिरावर कळसबंद शिखरे चढवू नये, ब्राह्मणांसाठी बांधलेल्या हौदातून इतर जातींनी पाणी भरू नये, अतिशूद्रांनी फक्त दुपारच्या वेळेत गावात यावे व येताना गळ्यात मडके बांधून यावे अशा बंधनांचा नारा सुरू केला होता. ब्राह्मणांच्या या निर्बंध लादण्याच्या प्रवृत्तीचा निषेध करण्यासाठी १९३० साली कोल्हापूरात रामचंद्र बाबाजी जाधव यांनी

महालक्ष्मी मंदिरात सत्याग्रह केला व स्वत:ला अटक करवून घेतली. बाळासाहेब पाटील यांच्या 'जीवनचक्र' (१९३३) या आत्मचरित्रात या सत्याग्रहाची हकिगत प्रसिद्ध झाली आहे. (गुंदेकर, २०१३, पृ. १८६)

सांगलीच्या सौ. लक्ष्मीबाई अभ्यंकर यांनी 'विविधवृत्त' पत्रातून 'ब्राह्मण विधवांना केशवपनासाठी हलकट माणसापुढे बसावे लागते' असे विधान केले होते. संपूर्ण न्हावी समाजालाच हलकट ठरविणाऱ्या या विधानाचा गणपतराव जाधव यांनी 'हलकट' (१९२८) या निबंधातून खरपूस समाचार घेतला. त्यांनी ब्राह्मण समाजावर सामाजिक बहिष्कार घालण्याचे आवाहन केले. लक्ष्मीबाईंनी माफी मागितली नाही तर न्हाव्यांनी ब्राह्मण समाजाच्या हजामती करू नयेत, परटांनी ब्राह्मणांचे धुणे बंद करावे, शेतकऱ्यांनी ब्राह्मणांची शेती कसू नये; इतकेच नाही तर न्हावी समाजाने ब्राह्मणांना प्रयश्चित्त देऊन शुद्ध करावे, असेही ठणकावून सांगितले. ब्राह्मणी पंडितांच्या अहंकाराचा वर्ख उतरवणारे पुरावे शोधून ब्राह्मणेतरांनी लेखन प्रसिद्ध करण्याचा सपाटा सुरू केला होता. रामचंद्र नारायण लाड यांनी चित्पावन ब्राह्मणांच्या उत्पत्तीच्या बीजकथा शोधून प्रसिद्ध केल्या. चित्पावनांची उत्पत्ती परशरामाने कोळ्यांच्या प्रेतांच्या चितेपासून केली ('सह्याद्रीखडा'तील कथा), पश्चिमेच्या समुद्रातून वाहून आलेल्या १४ प्रेतांपासून चित्पावन उत्पन्न झाले (स्कंदपुराणातील कथा), चित्पावन हे हिंदू नसून आफ्रिका खंडातून आले (के. सी. ठाकरे यांचा 'ग्रामण्यांचा इतिहास'), चित्पावनांना शंकेश्वराच्या शंकराचार्यांनी मान्यता दिल्यापासून ते ब्राह्मण झाले ('मराठ्यांचे उद्‌गार', आचार्य भागवत) इत्यादी दाखले देत चित्पावन हे कसे कर्तृत्वहीन होते, हलक्या दर्जाची कामे करणारे, मुलींचा विक्रय करणारे, स्वत:च्या बायका गहाण ठेवणारे होते अशा प्रकारची टीका-टिपण्णी करणारे लेखन प्रसिद्ध होऊ लागले. ( लाड, १९२७ / गुंदेकर, २०१३, पृ. १९०) लाडांच्या या पुस्तकावर सनातन्यांनी खटला भरला व त्यांना ९ महिन्यांची शिक्षा भोगावी लागली. दिनकरराव जवळकर यांनी 'लढाईचा पहिला दिवस' या लेखातून ब्राह्मणांना 'षंढ' म्हटले व 'भट ही व्यभिचारोत्पन्न जात आहे' असे विधान केले होते. ब्राह्मण स्त्रियांचा निर्देश त्यांनी *'टंच माद्या'* अशा शब्दात केला होता. रामचंद्र लाड यांच्या 'मजूर' पत्रातून हा लेख प्रसिद्ध झाला होता. या लेखनाविरुद्ध पुण्याचे नगरसेवक रामचंद्र गोविंद दंडवते यांनी बदनामीचा गुन्हा दाखल केला. लाडांनी माफीनामा लिहून दिल्याने हे प्रकरण शमले.

ब्राह्मणेतरांनी 'भट-भिक्षुकां'ची लक्तरे उघड करायला सुरुवात केल्यावर ब्राह्मणांकडून बचावात्मक पवित्रा घेणारे लेखन होऊ लागले. १९२७ साली 'संदेश'कार अ. ब. कोल्हटकर यांनी ब्राह्मणास 'भट' म्हणू नका हे सांगण्यासाठी ब्राह्मणांच्या जमेच्या बाजू सांगण्याचा प्रयत्न केला. 'ब्राह्मण लोक मोच्याचे दुकान, सावकारी, कुलकर्णीपणा,

मामलेदारी यापैकी काहीही करतील; पण ते परोपजीवी नाहीत. ते परान्नावर जगत नाहीत. ते उद्योगी, मितव्ययी व निर्व्यसनी आहेत. ब्राह्मणही तरवारबहाद्दर होते. ब्राह्मणांनी पेशवाई न्यायाने मिळवली व अन्यायाने घालवली.' याउलट 'भटशाहीवर विजय म्हणजे हिंदू धर्माच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा होय' अशा शब्दात खंडेराव कालेलकर यांनी कोल्हटकरांच्या युक्तिवादाचा प्रतिवाद केला. (गुंदेकर, २०१३, पृ. २४५-२५३)

कालांतराने महाराष्ट्रातील ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद संपवावा व 'वयं पंचाधिकं शतं' या भावनेने हिंदुसमाजाने एकत्र यावे व हिंदुसमाजाची पुनर्घटना करण्याच्या कार्याला प्राधान्य द्यावे, असा विचार पुढे येऊ लागला. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद हा मुंबई इलाख्यातच जास्ती करून आहे, इतरत्र नाही. अलीकडे लोकसत्ताक राज्यपद्धती, नवीन मतदारसंघ, जातवार प्रतिनिधित्व या योगाने हा वाद महाराष्ट्रात पुन्हा रंगू लागला आहे, त्यामागची 'फोडा आणि झोडा' ही कुटील नीती ओळखून वादाची धग वाढवू नये अशा प्रकारचा सल्ला देणारे लेखन प्रसिद्ध होऊ लागले. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद ज्या चातुर्वर्ण्याच्या भूमिकेवरून सुरू झाला होता तो चातुर्वर्ण्यच आता राहिला नाही, त्यामुळे हा वाद संपायला हवा, अशी मांडणी केली जाऊ लागली. बृहन्महाराष्ट्रात फार तर दहा लक्ष ब्राह्मण आहेत व संबंध हिंदुस्थानात सुमारे दीड कोटी ब्राह्मण भरतील. ब्राह्मणेतरांना जर फार अडचणी होत असतील तर त्यांनी या ब्राह्मणांना वसाहतीकरिता एक चांगला सुपीक भाग देऊन मोकळे व्हावे आणि स्वत: स्वराज्य मिळवून जगावर साम्राज्य करावे, अशा प्रकारचा त्रागाही अप्रत्यक्षपणे व्यक्त होत होता. वाई, अकोला येथील काही ब्राह्मण संघटनांनी काळाची पावले ओळखून आत्मपरीक्षण केले व ब्राह्मणेतरांच्या बाबतीत होणाऱ्या अन्यायाचे परिमार्जन करणारे ठरावही पारित केले. अकोल्याच्या ब्राह्मण परिषदेतले ठराव असे होते :

- समानता : ब्राह्मणांनी अब्राह्मणांस हीन समजू नये व त्यांचा विटाळ मानू नये अशी ब्राह्मणेतर समाजाची रास्त अपेक्षा होती. त्या अनुषंगाने करण्यात आलेला ठराव असा होता – " हिंदूतील कोणतीही जाती सामाजिक अगर धार्मिक दृष्ट्या जन्माने श्रेष्ठ – कनिष्ठ नाही, असे या परिषदेचे मत आहे."
- वेदाधिकार : वेदांचा अधिकार सर्व हिंदूंना असावा अशी मागणी कोल्हापूरच्या वेदोक्त प्रकरणापासून केली जात होती; त्या अनुषंगाने झालेला ठराव असा – "आर्यांचे वेद हे अत्यंत पवित्र आहेत, त्यांच्या अभ्यासाने अपवित्रही पवित्र व धन्य होतील अशी त्यांची योग्यता आहे. वेदास अपवित्रता येणे कधीही शक्य नाही म्हणून वेदांच्या अभ्यासाचा मनुष्यमात्रांस अधिकार आहे असे या परिषदेचे मत आहे."
- पौरोहित्य : स्वत:चे धर्मविधी व संस्कार ब्राह्मणांकडूनच नव्हे तर कोणत्याही सच्छिल व विद्वान हिंदूकडून करून घेण्याची मुभा असावी अशी ब्राह्मणेतर चळवळीची भूमिका

होती, त्या अनुषंगाने झालेला ठराव असा – "ब्राह्मणेतरांची धर्मकृत्ये करण्यासाठी त्यांनी ब्राह्मणास बोलावल्यास त्यांचे घरी जाऊन त्यांची धर्मकृत्ये यथासांग पार पाडावी."

- अस्पृश्यतानिवारण : जन्मश्रेष्ठतेचा जुलूम हा कुणीही दुसऱ्यावर करू नये, ह्या ब्राह्मणेतर चळवळीच्या मुद्द्याला अनुषंगून झालेला ठराव असा- " आजपर्यंत अस्पृश्य मानण्यात येणाऱ्या जमातींना यापुढे कोणत्याही बाबतीत अस्पृश्य मानण्यात येऊ नये." (दिवेकर, १९३०, पृ. ७५-८९)

'भटजी ब्राह्मण्य' आणि 'रावबाजी ब्राह्मण्य' या घातक ब्राह्मण्यावर ब्राह्मणेतर चळवळीचा राग होता, त्यातली प्रस्तुतता ओळखून हे ठराव करण्यात आले होते.

ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाची धग पुढे १९३० नंतर कमी होत गेली. ब्राह्मणेतर पुढारी केशवराव जेधे, शंकरराव मोरे हे काँग्रेस पक्षात गेले व तत्कालीन राजकारणात ब्राह्मणेतर पक्ष विलयाला गेला. तसेच टिळकपंथीय ब्राह्मणही काँग्रेसमधून बाहेर पडले. १९३० नंतर ब्राह्मणही बदलले. या बदलाची निरीक्षणे वि. द. घाटे यांनी नेमकेपणाने नोंदवली आहेत : "गेल्या तीस वर्षांत (म्हणजे १९३० ते १९६०) ब्राह्मणही फार बदलले. पुष्कळच समंजस झाले. आता कोणी ब्राह्मण वेदोक्तासाठी अडून बसेल तर ब्राह्मणच त्याला विरोध करतील, त्याला हसतील.. राजकीय क्षेत्रात ब्राह्मणेतरांना मिळालेले विशिष्ट स्थान आजच्या ब्राह्मणांना मंजूर आहे. ते रूसून कोपऱ्यात बसले नाहीत. ब्राह्मणांनी गेल्या काही वर्षांत नव्या नव्या वाटा शोधून काढल्या आहेत. पूर्वी ब्राह्मणेतरांचे असे समजले जाणारे धंदे आजचे ब्राह्मण बिनबोभाट करीत आहेत. व्यापारात शिरले आहेत, नाना प्रकारचे उद्योगधंदे चालवीत आहेत. भारतीय सैन्य आणि नौदल यांत शिरले आहेत. साधने उपलब्ध होताच इंजिनिअर आणि तंत्रज्ञ झाले आहेत. .. मोठ्या संख्येने ब्राह्मण मांसाहार करू लागले आहेत... मिश्रविवाहांना फारसा विरोध राहिला नाही." (घाटे, १९६१, पृ. २९८-२९९) थोडक्यात, विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात सामाजिक वादांची वादळे उठली, बौद्धिक-भावनिक संघर्षांच्या ठिणग्या जरूर पडल्या, पण वादळ शमू लागले व सामाजिक पुनर्घटनेचे शाहणपण मराठी माणसात हळू हळू जागे होत गेले, असा सर्वसाधरण निष्कर्ष काढता येतो.

## ६.५. अस्पृश्य समाजाची पुनर्घटना

### अस्पृश्यतेची व्याख्या

महाराष्ट्रातल्या बौद्धिक वर्तुळात अस्पृश्य कुणाला म्हणावे, याविषयी विविध मतप्रवाह होते. माँटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांच्या वेळेपासूनच 'अस्पृश्य समाजा'ची नेमकी व्याख्या करण्याचे प्रयत्न सुरू झाले होते. इंग्रज सरकारने नेमलेल्या कमिट्यांपैकी फ्रँचाईज कमिटीने 'ज्यांना देवळात घेत नाहीत; ज्यांच्या स्पर्शाने किंवा अंतरावरूनही

विटाळ होतो ते अस्पृश्य" अशी व्याख्या केली होती. स्टार्ट कमिटीने एक प्रश्नावली करून अस्पृश्यतेसंबंधींच्या लोकसमजुतींचा मागोवा घेतला होता. जनगणना करणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यांनी 'डिप्रेस्ड' शब्द स्वीकारला होता व डिप्रेस्ड म्हणजे 'दलित', 'दडपलेला', 'खालचा', 'मागासलेला', 'दूरचा', 'अनाडी','रानटी असे अर्थ करून त्यात बसणाऱ्या लोकांचे डिप्रेस्ड गटात वर्गीकरण करण्याची प्रथा सुरू केली होती. शिक्षणाने मागासलेले, ऐपतीने (आथिकदृष्ट्या) मागासलेले व सामाजिक दर्जाने मागासलेले या सर्वांचा 'डिप्रेस्ड क्लास' मध्ये अंतर्भाव केला जात होता. सायमन कमिशनने Untouchable, Exterior, आणि Depressed अशा तीन इंग्रजी पर्यायांपैकी 'डिप्रेस्ड क्लास' हा शब्द स्वीकारला होता. स्पर्शाने किंवा अंतरावरूनही ज्याचा विटाळ मानला जातो तो 'डिप्रेस्ड क्लास'चा माणूस' अशी व्याख्या कायम करावी असे 'सायमन कमिशनने म्हटले होते. कमिशनने अस्पृश्य, डोंगरकरी व इतर मागास असे डिप्रेस्ड क्लासचे तीन भागात वर्गीकरण केले होते. त्यात गुन्हेगार जातींना वगळले होते. डिप्रेस्ड क्लासमधील अस्पृश्य गटात ३६ जातींची, डोंगरकरी गटात २४ जातींची व इतर मागास जातीत ९८ जातींची यादी त्यांनी घोषित केली होती. सायमन कमिशनपुढे डिप्रेस्ड क्लासची व्याख्या करताना डॉ. आंबेडकर यांनी 'विटाळ झाला' असे मानले जाते तो समाज अशी अस्पृश्य समाजाची व्याख्या केली होती.(खराल, २०१३, पृ. ८५-८६)

चवदार तळ्याच्या सत्याग्रहावरून 'भाला'कार भोपटकरांनी ११ एप्रिल १९२७ च्या अंकात अस्पृश्यतेच्या प्रश्नावर भाष्य करताना 'ओल्या अन्नाची भिक्षा मागणारा तो अस्पृश्य' अशी 'अस्पृश्या'ची व्याख्या केली होती. यावर प्रतिक्रिया देताना डॉ. आंबेडकरांनी लिहिले होते की, खेडेगावात महार-मांग लोक भाकर मागतात हे खरे आहे; पण ती भिक्षा म्हणून मागत नसून ते बलुत्याचा हक्क म्हणून मागत असतात. मराठे लोकही ब्राह्मणाच्या घरचे शिजलेले ओले अन्न खातात, ब्राह्मण स्त्रिया पुरुषांचे उष्टे अन्न खातात म्हणून त्यांना अस्पृश्य म्हणतात का? खुद्द ब्राह्मणात माधुकरी मागून शिकणारे विद्यार्थी ओल्या अन्नाची भिक्षा मागतात, म्हणून ते अस्पृश्य ठरतात का? चांभार व भंगी लोक ओल्या अन्नाची भिक्षा मागत नाहीत मग त्यांची स्पृश्यात गणना कराल का?' अशी प्रश्नमालिका उपस्थित करून डॉ. आंबेडकरांनी भालाकारांच्या युक्तिवादातला फोलपणा उघड केला होता. (बहिष्कृत भारत ६ मे १९२७)

२० नोव्हेंबर १९३० रोजी गोलमेज परिषदेत झालेल्या चर्चेत अस्पृश्यतेची व्याख्या करण्याचा प्रसंग आला तेव्हा डॉ. आंबेडकरांनी हा मुद्दा अधिक विस्ताराने स्पष्ट केला होता: "दलित वर्ग हा एक वेगळाच गट आहे. तो मुसलमानांहून वेगळा आहे. आणि त्यांचा समावेश जरी हिंदूत करण्यात येत असला तरी तो काही त्या जमातीचा एकात्म भाग नाही. त्याचे अस्तित्व वेगळे आहे. कनिष्ठ दर्जा असलेल्या जमाती हिंदुस्थानात आहेत, पण

दलित वर्गाला जो दर्जा देण्यात आलेला आहे तो अजिबात निराळा आहे. भूदास आणि गुलाम यांच्या दरम्यान हा दर्जा मोडतो. भूदास आणि गुलाम यांच्या बाबतीत शिवाशिवीचा प्रश्न नव्हता, आणि दलितांच्या बाबतीत तो आहे. ही सक्तीची Servility आणि अस्पृश्यतेमुळे आलेली मनाई यामुळे त्यांना सार्वजनिक जीवनात भेदभावाने वागवले जाते. त्यांना समान संधी नाही आणि अगदी प्राथमिक स्वरूपाचे नागरिक हक्कही नाहीत." (खरात, २०१७, पृ. १०५-१०७) अस्पृश्यता ही हिंदू धर्माच्या तत्त्वज्ञानातच समाविष्ट असून बाह्य आचारात जरी नाइलाज म्हणून लोकांनी अस्पृश्यता पाळली नाही तरी ती त्यांच्या मनांतून निखळून पडली आहे असे समजू नये, म्हणून अस्पृश्यतेची भावना जोपर्यंत आहे तोपर्यंत अस्पृश्यता आहेच, असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. त्यांनी लिटरल सेन्स म्हणजे 'शब्दार्थ' व नोशनल सेन्स म्हणजे "भावना' असा भेद सांगून म्हटले होते की, " जरी शब्दाने अस्पृश्यता गेली म्हणजे सध्याच्या अस्पृश्यांचा जरी कोणी विटाळ मानीनासे झाले तरी तेवढ्याने तिचे उच्चाटन झाले असे समजता कामा नये. अस्पृश्यतेची भावना ही शिल्लक राहाते. ती नष्ट होणे कठीण आहे." (माटे, १९३३, पृ. १५)

अस्पृश्य शब्दाने शिवण्यास अयोग्य असा बोध होतो म्हणून श्री. म. माटे यांनी 'अस्पृष्ट' हा पर्याय पुढे आणला होता, तर म. गांधींनी त्यासाठी 'हरिजन' असा प्रतिशब्द रूढ केला होता. श्री. म. माटे यांनी या शब्दचर्चेचा आढावा घेऊन म्हटले होते की, "ब्राह्मण ज्यांच्या हातचे अन्नपाणी घेत नाही त्या जाती अस्पृश्य असे म्हणावयाचे असेल तर हिंदू समाज जवळ जवळ सगळाच अस्पृश्य बनला आहे असे म्हणावे लागेल! कोण कुणाला आपल्या पंक्तीला घेतो किंवा ज्याच्या हातचे पाणी घेतो हेच जर पहावयाचे म्हटले तर ब्राह्मणांतही पुन्हा अस्पृष्य निर्माण होतील. तेव्हा हातचे खाणेपिणे ही व्याख्या ठरविणे व तीवरून डिप्रेस्ड क्लासची संख्या ठरविणे हास्यास्पद आहे. ज्यांच्या शरीराला विटाळ मानतात व म्हणून ज्यांना जीविताच्या व्यवहारांत प्रत्येक ठिकाणी अडचण उत्पन्न होते तेच अस्पृश्य समजले जावे हेच रास्त आहे." (माटे १९३३, पृ. ९-१०)

**अस्पृश्य वर्गातील पोटजाती :**

'अस्पृष्टाचा प्रश्न' या ग्रंथात माट्यांनी अस्पृश्य वर्गाच्या सर्व जाती-पोटजातींची उत्पत्ती, त्यातील उपजाती, कुळपरंपरा, आहार, व्यवसाय, दैवते, विवाहपद्धती, मर्तिकाचे विधी, व इतर अस्पृश्य जातींबरोबरच्या आंतरक्रियांबाबतचे सामाजिक संकेत यांची सविस्तर माहिती करून दिली आहे. 'अस्पृश्य' लोकांत पुष्कळ भेदभाव होते. अस्पृश्य वर्गात मोडणारे सगळेच लोक एकाच पातळीचे आणि परस्परांशी समत्वाच्या नात्याने वागत होते, असे नाही. उदाहरणार्थ, डुकराचे मांस खातात म्हणून मांगांना महार लोक कमी लेखत, तर महार लोक गायीचे मांस खातात म्हणून मांग लोक त्यांना कमी लेखत. महार लोक बुरुड, जिनगर, कैकाडी, वडारी, परीट, मोची, भंगी, मांग आणि घाडशी यांच्या

हातचे अन्न खात नसत; परंतु होलार आणि मांग यांना मात्र त्यांच्या हातचे अन्न खात. ठाकूर महाराच्या हातचे खातो, पण महार मात्र ठाकूरच्या हातचे खात नाही. परवारी महार संबळ, सनई, बक, चाप, अलगुज ही वाद्ये वाजवत, पण तंबोरा किंवा कर्णा कधीही वाजवीत नसत, कारण ती मांगांची वाद्ये समजली जात.

**महार-मातंग वाद :**

अस्पृश्य वर्गातील पोटजातींपैकी महार व मातंग जातींमध्ये पारंपरिक दुरावा होता. परभणी जिल्ह्यातील पाथ्रीच्या देविदास बुधा कांबळे या मातंग समाजातल्या एका शिकलेल्या तरुणाने डॉ. आंबेडकर यांना ३० मे १९४१ रोजी एक पत्र लिहून अखिल भारतीय अस्पृश्य समाजाचे पुढारी म्हणून महार व मातंग समाजाची एकी घडवून आणण्याचे आवाहन केले होते. आपल्या पत्रात देविदास कांबळे यांनी मातंग समाज व महार समाजातील हाडवैरासंबंधी लिहिले होते की, " मातंग समाज व महार समाज यामध्ये देव-दानवासारखे हाडवैर आहे व आपापसात वैर, तिरस्कार, द्वेष , मत्सर आणि वाईट भावना आहेत. त्याची कारणे –

(१) महार समाज मातंग समाजास तुच्छ व हलका समजतो.

(२) मातंग समाज डुकरास पवित्र मानतो व ते जनावर शूर व मर्द असल्यामुळे त्याची (रानडुक्कर) शिकार करतो, पण महार समाज मुसलमानापेक्षाही डुकरास अपवित्र समजतो. ह्या व इतर क्षुल्लक कारणावरून आपापसात विनाकारण झगडे होतात.

(३) मातंग समाजात मराठ्यांप्रमाणे सर्व सण व लग्नसमारंभ व मिरवणुकी काढण्याचा हिंदुधर्मशास्त्रदृष्ट्या अधिकार आहे, म्हणून ज्यावेळी मातंग लोकांचा नवरदेव घोड्यावरून मारुतीला परण्यास जातो त्यावेळी महार लोक वेशीमध्ये अडवतात व पंचारतीमध्ये थुंकतात. यामुळे भयंकर मारामारी होऊन डोकी फुटतात व वैरभाव वाढतो.

(४) लोकसंख्येच्या प्रमाणात महार लोकांची संख्या जास्त असल्यामुळे प्रत्येक गावी महारांची आबादी आहे व मांगांची कमी आहे. मनाप्रमाणे न वागले तर महार लोक विनाकारण त्रास देतात व त्यांना वाटते की, ज्याप्रमाणे हिंदू लोकांची गुलामगिरी अस्पृश्य समाज करतो, त्याप्रमाणे मातंग समाजाने महार समाजाची गुलामगिरी करावी.

(५) अस्पृश्य समाजात शिकलेले व पुढे गेलेले महार लोक आहेत, हे स्वार्थी व आपमतलबी असून इतर समाजातील लोकांस पुढे जाण्यास व सुधारण्यास वाव देत नाहीत. जितक्या बोर्डिंगात आहेत त्यात महार विद्यार्थ्यांचाच भरणा जास्त आहे. जितके एम. एल. ए. आहेत ह्यात महार मेंबरांचाच भरणा जास्त आहे. फक्त नावाकरिता काही ठिकाणी कळसूत्री बाहुल्यांसारखे मांग मेंबर निवडले असून ते

बिनबुडाच्या भांड्याप्रमाणे आहेत.

डॉ. आंबेडकर केवळ महार समाजातील लोकांची बाजू उचलून धरतात म्हणून पक्षपाती असल्याची समजूत मातंग समाजात पसरली असल्याचेही पत्रलेखकाने लिहिले आहे. अस्पृश्य जातींमधली ही दुफळी सांधण्यासाठी डॉ. अंबेडकरांनी निकराचे प्रयत्न करावेत अशा भावनेतून त्याने हे पत्र लिहिले आहे,असावे. आपल्या पत्रात त्याने डॉ. आंबेडकरांना अस्पृश्य जातिसमूहाच्या एकीकरणाचा पर्याय सुचविताना लिहिले होते की, "ज्याप्रमाणे नॉर्मन आणि सॅक्सन यांच्या मिश्रणाने रिचर्ड लायन हार्ट यांच्या कारकीर्दीत या परस्परविरुद्ध जातीच्या संमेलनाने अर्वाचीन धैर्यशाली, वीर्यशाली व सुधारलेली इंग्रज जात निर्माण झाली त्याप्रमाणे करावी, की जिचे नाव ऐकताच सर्व जातीवर व समाजावर दरारा बसावा, जिचा धर्म व कर्म इतरांहून भिन्न असावा." (आंबेडकर, २००५ ख, पृ. ३४७-३४८)

डॉ. आंबेडकर यांनी देविदास कांबळे यांना उत्तर देताना लिहिले होते की,

(१) मी पुढारी आहे, समाजसेवक नाही. पुढारी या नात्याने चालना देणे, लोकमत तयार करणे, येवडेच माझे काम आहे, त्यात मी जातिभेदाला जागा दिली, असे कोणीही – माझा शत्रूदेखील म्हणणार नाही.

(२) अस्पृश्यांत सहभोजन व्हावे, सहविवाह व्हावा याचा पुरस्कार मी केला आहे. आणि सहविवाह जरी झाला नसला तरी महार-मांगात, महार-भंग्यात सरसहा सहभोजन सुरू आहे. (चांभार लोक सहभोजनाला तयार नाहीत.) हा माझ्या शिकवणुकीचा परिणाम आहे, असे मी निर्भयपणे म्हणू शकतो.

(३) माझ्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभांतून महारांपुरते ठराव कधीच पास झालेले नाहीत.

(४) मी जी बोर्डिंगे काढली त्यांत जातभेद कधीच ठेवला नाही, इतर महारांनी जी काढली त्यांत त्यांनीही जातिभेद ठेवलेला माझ्या कानावर आला नाही.

(५) स्वतंत्र मजूर पक्ष महारांचा आहे असे म्हणण्यात येते, परंतु ते खोटे आहे. स्वतंत्र मजूर पक्षात महार-महारेतर असा भेद नाही. (आंबेडकर, २००५ ख, पृ. ३४५)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अस्पृश्य वर्गाच्या सामाजिक-राजकीय हक्कांसाठी केलेल्या संघटनात्मक चळवळींना मिळणारा प्रतिसाद उत्तम होता, हे आतापर्यंतच्या मागोव्यावरून सुस्पष्ट झाले आहे. समाजाने अव्हेरलेल्या बहिष्कृतांना राजकीय सत्ताकारणात स्थान देण्यास सरकार तयार झाले, ही आंबेडकरी चळवळीची सर्वात मोठी फलश्रुती होती. मात्र अद्याप ही लढाई अजून शेवटच्या टप्प्यात आलेली नव्हती. मध्य प्रांतालील मांग लोकांच्या संघटनेच्या एका ठरावातून डॉ. 'केवळ महारांचा पुढारी' असा सूर उमटला होता. त्यावर डॉ. आंबेडकरांनी ४ जानेवारी १९४१ च्या 'जनता' पत्रातून

खुलासा केला की, "मी महारांचा पुढारी आहे, ही काँग्रेसची ओरड आहे, त्याचीच री मांगांनी ओढली. .. 'पुणे करार' झाला त्यावेळी काँग्रेस मला 'सर्व हिंदुस्थानातील अस्पृश्यांचा पुढारी' म्हणून मान्य करीत असे. त्यानंतर मी नुसता मुंबई इलाख्यातील अस्पृश्य लोकांचा पुढारी आहे, असे म्हणू लागली. त्यानंतर नुसता महारांचा पुढारी आहे, असे म्हणू लागली. माझी खात्री आहे की, काही दिवसांनी मी कोकणस्थ महारांचा पुढारी आहे व त्यानंतर मी दापोली तालुक्यातील महारांचा पुढारी, असा प्रचार काँग्रेस करील व त्याला महारातूनच माणसे सापडतील असे म्हणावयास हरकत नाही." (आंबेडकर, २००५ ख, पृ. ३४४)

**भंगी जातीचे प्रश्न :**

'अस्पृश्यांचे प्रश्न' या पुस्तकात श्री. म. माटे यांनी अस्पृश्यांच्या ५२ हक्कांची माहिती दिली आहे, त्यात सफाईकाम करणाऱ्या भंग्यांच्याविषयी कुठलाच उल्लेख केलेला नाही. विठ्ठल रामजी शिंदे यांच्याही मते महाराष्ट्रात पूर्वापार अंत्यज वर्गात भंगी जात आढळत नाही; पायखाने स्वच्छ करण्याची चाल मुसलमानांकडून आली असावी असा एक तर्क विठ्ठल रामजी शिंदे यांच्या निबंधातून मांडण्यात आला आहे. ब्रिटिश अमदानीत लष्करी छावण्यांतल्या सफाईसाठी आणि म्युनिसिपालिट्यांची स्थापना झाल्यानंतर शहर सफाईसाठी गुजरात व पंजाबातून भंगी लोक महाराष्ट्रात आले, असेही त्यांनी म्हटले आहे. नगरपालिकांची स्थापना झाल्यानंतर 'खराट्याचे स्वातंत्र्य' असा वाक्प्रचार महाराष्ट्रात रूढ झाला होता, त्याची पूर्वपीठिका या नव्या स्वच्छताव्यवस्थेच्या घटनेत असावी. भंगी जातीला कुठलाही धर्म नसल्याची समजूत आपल्याकडे रूढ होती. १९१७ साली मुंबईला खोजा समितीने मेघवाल भंग्यांचे धर्मांतर घडवून आणण्याचा प्रयत्न केला होता, पण तो विफल झाल्याची एक नोंद आढळते.

अस्पृश्यता निर्मूलनाच्या चळवळीत भंगी जातीच्या प्रश्नांकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. १९३० साली बी. एच. मेहता यांनी युसूफ मेहरअली यांच्या यूथ लीगच्या वतीने मेघवाल भंगी समाजाची शिक्षण परिषद भरविली होती, मात्र या प्रयत्नातून एकही शिक्षण संस्था निर्माण झाली नाही. भंगी समाजात सामाजिक सुधारणा करण्याच्या उद्देशाने बाबालाल लाड यांनी ४ नोव्हेंबर १९३४ रोजी मिरज येथे सामाजिक सभा भरविली होती. समाजात मामानापमानावरून दुही माजू नये, पाट-पुनर्विवाहास मान्यता द्यावी यादृष्टीने या सभेत ठराव झाले होते. कोल्हापूर संस्थानात धोंडिराम बापू लाड यांनी देशी भंगी, परदेशी भंगी असे समाजांतर्गत कृत्रिम भेद मिटविण्याचे प्रयत्न केले होते. मेहेतर समाजाच्या लोकांची स्वत:ची घरे व्हावीत म्हणून गृहनिर्माण सहकारी सोसायटी स्थापन केली होती; कोल्हापूरच्या शाहू छत्रपतींनी घरांसाठी जागा दिल्याने व शिक्षणासाठी साहाय्य केल्याने या समाजातील लोकांना शिक्षण घेणे, व्यवसाय बदलणे शक्य झाले होते. १९४९ साली

बर्वे समितीने मुंबईच्या कामगारवर्गात चांगले व स्वच्छ घर मिळण्याचा पहिला अधिकार भंग्यांचा असून भंगी व सफाई कामगारांना युद्धोत्तर पुनर्वसन योजनेखाली स्वत:च्या मालकीची घरे बांधण्यास प्रोत्साहन द्यावे, त्यांच्यासाठी गृहनिर्माण संस्था स्थापन कराव्यात, अशी शिफारस केली होती. (ठाकूर, १९८९ पृ. ८७, १०६-१२२)

भंगी समाजाच्या पुनर्घटनेसाठी म. गांधी, सेनापती बापट, अप्पासाहेब पटवर्धन, गाडगेबाबा यांनी पुढाकार घेऊन काही सकारात्मक नमुनादर्श घालून दिले होते. १९१३ साली तुरुंगातून सुटून आल्यावर सेनापती बापट यांनी त्यांच्या स्वग्रामी अहमदनगर जिल्ह्यातल्या पारनेर येथे सफाई यज्ञाची मोहीम सुरू केली होती. १९१९ साली मुंबईत पगारवाढीसाठी भंगी कामगारांनी संप केला तेव्हा मुंबईत जाऊन त्यांचे नेतृत्व केले होते. ते स्वत:ला *'हरिघरचा झाडू'* म्हणवून घेत. गाडगेबाबांनी आपल्या समाजसुधारणा चळवळीत ग्रामसफाईला अग्रस्थान दिले. अप्पासाहेब पटवर्धन यांनी रत्नागिरीच्या तुरुंगात संडास सफाईचे काम केले; त्यानंतर 'भारत सफाई मंडळ' स्थापन करून संडास सफाईच्या कामासाठी लोकचळवळ संघटीत केली. सफाईचे महत्त्व पटवून देण्यासाठी पदयात्रा काढली आणि गोपुरी आश्रमात संशोधन करून सुलभ संडासही तयार केला. गांधीजींच्या हरिजन सेवक संघानेही पायखाने सफाईचा उपक्रम केला. स्वत: गांधीजी भंग्यांच्या वस्तीत जाऊन राहिले व भंग्यांकडे बघण्याचा सामाजिक दृष्टिकोन बदलण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. मात्र हे अल्प प्रयत्न सोडले तर भंग्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी व्यापक अभियान चालवले गेले नाही. नाशिकचा कुंभमेळा, पंढरपूरची यात्रा अशा सार्वजनिक यात्रा-उत्सवांच्या काळात भंगी समाजावर कामाचा खूप ताण येत असे, संडासातल्या गॅसमुळे दम्याचे व श्वसनाचे विकार, क्षयरोगाचा प्रादुर्भाव होत असे; पण या सर्व प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी शाश्वत विकासाचे प्रयत्न या काळात झालेले आढळून येत नाहीत.

**अस्पृश्यांचे सामाजिक स्थान :**

हिंदू समाजातील अस्पृश्यांचे स्थान काय हे विशद करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'मूकनायक'मधील एका लेखात म्हटले होते की, "हिंदू समाज हा एक मनोरा आहे व एक एक जात म्हणजे त्याचा एक एक मजलाच होय. पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे की, या मनोऱ्यास शिडी नाही, आणि म्हणून एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्ग नाही. ज्या मजल्यात त्यांनी जन्मावे त्याच मजल्यात त्यांनी मरावे. खालच्या मजल्यातला इसम, मग तो कितीही लायक असो, त्याला वरच्या मजल्यावर प्रवेश नाही; व वरच्या मजल्यातला माणूस, मग तो कितीही नालायक असो, त्याला खालच्या मजल्यात लोटून देण्याची कोणाची प्राज्ञा नाही. उघड भाषेत बोलावयाचे म्हणजे जातीजातीत असलेल्या या उच्चनिच भावना गुणावगुणाच्या

पायावर झाल्या आहेत असे नाही. उच्च जातीत जन्मलेला, मग तो कितीही अवगुणी असो, तो उच्च म्हणावयाचा; तसेच नीच जातीत जन्मलेला, मग तो कितीही गुणी असो, तो नीच राहावयाचा." (खरात, कित्ता, पृ. ३५-३६) जन्मसिद्ध अपवित्रता व जन्मसिद्ध अयोग्यता या दोहोंच्या मान्यात सापडल्यामुळे अस्पृश्य वर्गाची स्थिती फार शोचनीय झाली असून व्यापार, नोकरी व शेती हे धनसंचयाचे तिन्ही मार्गही त्यांच्यासाठी खुले नाहीत. सार्वजनिक जीवनात सहभागाच्या संधी तर त्याला नाहीतच, उलट अनेक दिवसांपासून स्वत:स अयोग्य व अपवित्र मानून घेतल्यामुळे नैतिकदृष्ट्या त्यांच्यातील अत्मबळ व स्वाभिमान ही जी उन्नतीची आद्य कारणे ती अगदी लयास गेली आहेत.

३०-३१ मे १९३६ ला मुंबईत झालेल्या मुंबई इलाखा महार परिषदेच्या अध्यक्षपदावरून अस्पृश्यतेचा प्रश्नाची चर्चा करताना डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यता ही नैमित्तिक नसून नित्याची आहे हे लक्षात आणून दिले होते. त्यांच्या मते अस्पृश्यांचा प्रश्न हा वर्गकलहाचा प्रश्न आहे. स्पृश्य आणि अस्पृश्य या दोन समाजांतील कलहांचा, एका वर्गाने दुसऱ्या वर्गावर केलेल्या आगळीकीचा, अन्यायांचा प्रश्न आहे. हा वर्गकलह सामाजिक दर्जासंबंधीचा कलह आहे. मनुष्यबळाच्या दृष्टीने अल्पसंख्य, जातिभेदामुळे आणि खेडीपाडी विखुरले गेल्यामुळे संघशक्तीचा अभाव, व्यापार- उदीम- नोकरी- शेती नसल्याने द्रव्यबल नाही, शेकडो वर्षे वरिष्ठ वर्गाच्या सेवेत घातल्याने व त्यांची छी थू निमूटपणे सोसल्याने मानसिक बल नाही. अशा स्थितीत जोपर्यंत हिंदू धर्म आहे तोवर अस्पृश्यता राहाणार आहे हेही त्यांनी स्पष्ट शब्दात सांगून टाकले होते. (खरात, २०१३, पृ. २०९)

**अस्पृश्यांवरील सामाजिक बहिष्काराचे स्वरूप :**

१९२८ साली मुंबई इलाख्यातील अस्पृश्यांच्या स्थितिगतीची पाहणी करण्यासाठी नेमलेल्या स्टार्ट कमिटीच्या रिपोर्टमध्ये अस्पृश्यांना समाजातल्या इतर समूहाकडून मिळणाऱ्या वागणुकीविषयी काही निरीक्षणे नोंदविली आहेत. त्यात त्यांनी नमूद केले आहे की, "अस्पृश्यांनी जरा स्वाभिमान दाखविला की हे सनातनी स्पृश्य गावकरी त्यांच्याकडून जमिनी काढून घेतात. त्यांना आपल्या कामावरून दूर करून त्यांची रोजची मीठ-भाकरी बंद करतात. या सामाजिक बहिष्काराचे स्वरूप इतके भयंकर व व्यापक असे की, गावातील रस्त्यावरून जाण्यायेण्याचीही त्यांना बंदी होते. पैसे देऊनही गावातील बनियाकडून सामान मिळत नाही. ... विहिरीवर वगैरे पाणी भरण्याचा आपला हक्क शाबित करण्याचा अस्पृश्यांनी प्रयत्न केला तर मग काही विचारायलाच नको." सामाजिक बहिष्काराची ही तीव्रता लक्षात घेऊन स्टार्ट कमिटीने अशी शिफारस केली होती की, "अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी त्यांना देण्यात येणाऱ्या नागरिकत्वाच्या समान हक्कांचा व स्वातंत्र्याचा त्यांना निर्वेधपणे उपभोग घेता यावा म्हणून सामाजिक बहिष्काराच्या

साधनाने बहुसंख्यांक स्पृश्य लोकांचा अस्पृश्यांवर होणारा जुलूम व अन्याय अगदी कडक व न्यायनिष्ठुरपणे नष्ट करण्यात यावा अशी आमची शिफारस आहे." (खरात, २०१७, पृ. ३२-३३)

डॉ. आंबेडकरांनीही अस्पृश्यांवरील सामाजिक बहिष्कार हा फौजदारी गुन्हा ठरविण्यात यावा, अशी भूमिका घेतली होती. १९३० च्या गोलमेज परिषदेत त्यांनी अस्पृश्यांच्या हक्क संरक्षणासाठी राज्यघटनेत व कायद्यात कोणत्या तरतूदी करायला हव्यात याची समग्र मांडणी केली होती. समान नागरिकत्व, सर्व प्रकारच्या सार्वजनिक स्थळी समान उपभोगाचे हक्क, राजकीय व सामाजिक जीवनात भेदभावांपासून संरक्षण, कायदे कौन्सिलात व सरकारी नोकऱ्यांमध्ये पुरेसे प्रतिनिधित्व, अस्पृश्यांच्या बाबतीत पक्षपातीपणा होऊ नये म्हणून देखरेखीसाठी स्वतंत्र खाते निर्माण करण्याची आवश्यकता व ह्या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे तपशील यांची समग्र मांडणी गोलमेज परिषदेत त्यांनी केली होती. पुढे भारतीय राज्यघटनेच्या मसुद्यात त्याचे प्रतिबिंब पहायला मिळते.

**अस्पृश्यता निवारणाच्या चळवळी**

महाराष्ट्राच्या समाजमनातून अस्पृश्यता घालवणे हा फार मोठा प्रश्न होता. समाजाच्या सामूहिक नेणिवेतून जातीच्या हरळीची मुळे उपटून फेकणे हा दीर्घकालीन सातत्य ठेवून करावयाचा बृहत्प्रकल्प होता. आधीच्या विवेचनात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महाराजा सयाजीराव गायकवाड व राजर्षी शाहू महाराज यांनी अस्पृश्यतानिवारणासाठी केलेल्या कामांचा वृत्तांत आलेला आहेच; याखेरीज अस्पृश्यतेच्या प्रश्नाला केंद्रस्थानी ठेवून झालेल्या अन्य प्रयत्नांचा येथे मागोवा घ्यावयाचा आहे.

१९१२ साली न्या. ना. गो. चंदावरकर यांच्या सामाजिक सुधारणा परिषदेने हिंदू आणि अस्पृश्यांच्या सहभोजनाचा कार्यक्रम आयोजित करून अस्पृश्योद्धारासाठी सामाजिक सहमती मिळविण्याचा एक यशस्वी उपक्रम केला होता. ११ नोव्हेंबर १९१७ रोजी न्या. चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्य कार्यकर्त्यांची मुंबईत सभा झाली. या सभेत सरकारकडे आपल्या मागण्यांचे निवेदन देण्यासाठी काही ठराव करण्यात आले. त्यात अस्पृश्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात कायदे कौन्सिलवर प्रतिनिधित्व देण्याची राजकीय मागणी करणारा ठराव होता, तसेच अस्पृश्योद्धारासाठी सक्तीच्या व मोफत शिक्षणाचा कायदा करण्याचीही मागणी करण्यात आली होती. राष्ट्रीय कॉंग्रेसनेही अस्पृश्योद्धाराच्या कामात पुढाकार घ्यावा अशी विनंती एका ठरावाद्वारे करण्यात आली. नंतरच्या आठवड्यात बापूजी नामदेव बागडे या ब्राह्मणेतर पुढाऱ्याच्या अध्यक्षतेखाली झालेल्या परिषदेतही अस्पृश्यांना राजकीय प्रतिनिधित्व देण्याविषयी व सक्तीच्या मोफत

शिक्षणाबाबत ठराव पारित करण्यात आले. (खरात, २०१७, पृ. १७-१८)

२३ मार्च १९१८ रोजी मुंबईत महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय अस्पृश्यतानिवारक परिषदेत अस्पृश्यता निर्मूलनासंबंधीचा ठराव पारित करण्यात आला. या ठरावात म्हटले होते की, "निकृष्ट वर्गावर लादलेली अस्पृश्यता यापुढे ताबडतोब काढून टाकण्यात यावी आणि या कार्यासाठी प्रत्येक प्रांतातील वजनदार व विचारी कार्यकर्त्या पुढाऱ्यांनी एक अस्पृश्यतानिवारक जाहीरनामा काढून निकृष्ट वर्गास शाळा, दवाखाने, न्यायकचेऱ्या, सार्वजनिक खर्चाने चालविलेल्या सर्व सार्वजनिक संस्थांत; तसेच विहिरी, तळे, म्युनिसिपालिटीचे नळ अशा सार्वजनिक पाणवठ्यांस; व्यवहाराची व करमणुकीची ठिकाणे व देवालयासारख्या सार्वजनिक ठिकाणी कोणत्याही प्रकारे प्रतिबंध न राहता पूर्ण मोकळीक करून द्यावी असे ह्या परिषदेचे मत आहे." यानंतर परिषदेतील जाहीरनाम्याचा मसुदा तयार करून सह्यांसाठी मान्यवर पुढाऱ्यांकडे पाठविण्यात आला. परिषदेला उपस्थित असलेल्या लो. टिळकांनी अस्पृश्यतानिर्मूलनाच्या भूमिकेला पाठिंबा दिला होता, मात्र जाहीरनाम्यावर सही करण्यास नकार दिला. यावर महाराष्ट्रातून बऱ्याच उलटसुलट प्रतिक्रिया उमटल्या होत्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते की, "Mr. Tilak is credited with a short speech unreported. But this was only lip sympathy shown to hoodwink the untouchables, for when the draft of the proclamation removing untouchability was presented to Mr. Tilak, it is known on creditable evidence that he refused to honour it with his signature." (Franchise Reform, 1919, Written statement of Dr. Ambedkar, Para 45 ) इतकेच नाही तर १९१९ साली साऊथबरो कमिशनपुढील निवेदनात डॉ. आंबेडकरांनी मुंबईत सयाजीराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या या परिषदेला 'फार्स' म्हणून संबोधले होते. यावरून टिळकांना अस्पृश्यांसबंधी सहानुभूती नव्हती अशी समजूत पुढे रूढ झालेली पहायला मिळते. टिळकांनी अस्पृश्यतानिवारक जाहीरनाम्यावर सही केली नाही म्हणून रँग्लर परांजपे यांनीही डॉ.आंबेडकरांप्रमाणेच बॉम्बे क्रॉनिकलमध्ये विरोधी पत्र लिहिले होते; त्याला उत्तर देताना टिळकांनी लिहिले होते की, "Mr. Paranjape knows full well that I am all Caste distinctions regarding interdining and unatouchability. I have said so many a times but I am not prepared to take up the work of actual propaganda in this matter as my own, and refused to sign a manifesto which would have clearly throw that the responsibility on me." वि. रा. शिंदे यांना लिहिलेल्या पत्रातही टिळकांनी लिहिले होते की, "कार्यक्रम शिरावर घेऊन तो

प्रत्यक्ष अंमलात आणण्याची व्यक्तिश: जबाबदारी त्याल टाकलेली असल्यामुळे सध्याच्या माझ्या कार्यव्यापृततेमध्ये हे नवीन कार्य मला अंगावर घेता येईलसे वाटत नाही." (चव्हाण रा. ना. १९८१, पृ. ३६३) टिळकांनी या परिषदेत केलेले भाषण अस्पृश्यतानिर्मूलनाच्या ठरावाला पोषक असेच होते. या भाषणात ते म्हणाले होते की, "हिंदुधर्म वेदप्रणीत आहे, आणि वेदात अस्पृश्यतेला कोठेही थारा नाही. तेव्हा आपल्यापैकी काहीजणास अस्पृश्य लेखणे हा मी देवाच्या घरी गुन्हा समजतो. वर्णव्यवस्था ही समाजचे सोयीसाठी आहे. समाज वर्णव्यवस्थेसाठी नाही." टिळकांचे विचार अस्पृश्यतानिवारणाच्या बाजूने कसे होते याची अनेक उदाहरणे आहेत. "जी अस्पृश्यता मेल्यावर राहात नाही, जी अस्पृश्यता परमेश्वराच्या घरी जाताना आड येत नाही, ती अस्पृश्यता आपण आपल्यात वावरू देणे, म्हणजे परमेश्वराच्या घरी पाप करण्यासारखे आहे." (बापट, १९४६, पृ. २४९) आपल्या लौकिक जीवनात टिळक स्पृश्यास्पृश्यभाव पाळत नव्हते. पुण्यास एकदा गणपती उत्सवाच्या मिरवणुकीत महारांनी बसविलेला गणपती कोणीच सामावून घेण्यास तयार नव्हले, त्यावेळी स्वत: टिळकांनी एक बगी आणून तो गणपती विसर्जनाच्या मिरवणुकीत सामील करून घेतला होता. गणपतीला अत्यंजांचा विटाळ होतो म्हणून सार्वजनिक गणपत्युत्सव नको ह्या आक्षेपाचे १९०७ सालीच खंडन करून 'महारमांगापासून ब्रह्मवाद्यांपर्यंत सारे हिंदू या सदरात येतात असे सांगितले होते. मरणापूर्वी टिळक सांगलीला गेले होते तेव्हा महार-चांभारांच्या वतीने केलेली पानसुपारी त्यांनी स्वीकारली होती. अस्पृश्यांचे प्रतिनिधी राष्ट्रीय सभेत व कौन्सिलात असावेत याबाबत लो. टिळक आणि विठ्ठल रामजी शिंदे यांच्यात एकमत होते. १९१७ साली पुण्यात वि. रा. शिंदे यांनी स्थापन केलेल्या 'राष्ट्रीय मराठा संघा'च्या सभेत टिळकांनी जातिभेदाच्या प्रथेविरोधी आपली मते मांडताना म्हटले होते की, "जातिभेदाच्या अनिष्ट तत्त्वाचा नवीन राज्यातही शिरकाव करू नका. आता आपल्याला पूर्वीचे स्वराज्य नको असून पाश्चिमात्य धर्तीवरील स्वराज्य पाहिजे. आपल्या जातिभेदामुळेच येथे ब्रिटिश राज्य स्थापन झाले व तो जातिभेद असाच पुढे चालू राहणार असेल तर स्वराज्यातही आमची अशीच अधोगती होईल." साररूपाने सांगायचे तर टिळकांनी अस्पृश्यतानिर्मूलनाच्या जाहीरनाम्यावर कार्यबाहुल्यामुळे सही केली नसली तरी अस्पृश्यतानिवारणाच्या चळवळीला त्यांचा प्रथमपासून पाठिंबा होता. पुढे श्री. म. माटे, न. चिं. केळकर, बॅ. सावरकर यांनी टिळकांच्या अस्पृश्यतानिर्मूलनाच्या विचारांचा आपापल्या परीने पाठपुरावा केला. (चव्हाण रा. ना. १९८१, पृ. ३५८-३६४)

**श्री. म. माटे यांचे कार्य :**

१९१७ सालापासून श्री. म. माटे (१८८६- १९५७) यांनी पुण्यात अस्पृश्योद्धाराच्या कामाला प्रारंभ केला. श्री. म. माटे हे चित्पावन ब्राह्मण कुटुंबात

सनातन विचाराच्या पर्यावरणात वाढलेले असूनही अस्पृश्योद्धाराच्या चळवळीचे पुढारपण करायला निघालेले शिक्षक होते. ज्या काळात टिळकांच्या राष्ट्रीय विचारांनी भारावलेला तरुण वर्ग राजकारणात रस घेत होता, त्या काळात श्री. म. माटे यांनी सामाजिक सुधारणांसाठी पुढाकार घेण्याचा पर्याय निवडला होता. लोकमान्य टिळक अस्पृश्यांचा प्रश्न सुटला पाहिजे असे म्हणत असत, किंबहुना 'परमेश्वराला जर अस्पृश्यांचा विटाळ होत असेल तर तो परमेश्वरच नव्हे असे मी म्हणेन' अशी भाषाही ते करीत असत, मात्र राजकारणाच्या संघर्षात अस्पृश्योद्धारासाठी सामाजिक चळवळ उभी करण्यास त्यांना उसंत नव्हती. यापूर्वी धर्मांतराच्या प्रेरणेना का होईना पण ख्रिस्ती मिशनऱ्यांनी अस्पृश्योद्धाराचे काम निकराने सुरू ठेवले होते. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या 'निराश्रित साहाय्यकारी मंडळा'ने शुद्ध मानवधर्माच्या कल्पनेने अस्पृश्यांच्या प्रश्नाला हात घातला होता. मात्र असे अपवाद सोडल्यास अस्पृश्योद्धारासाठी हिंदू सुधारकांतून फारसा पुढाकार नव्हता. माट्यांनी म. गांधी यांना लिहिलेल्या अनावृत पत्रात म्हटले होते की, "हिंदू लोकांचे मन राजकारणग्रस्त आहे; समाजसुधारणा व धर्मसुधारणा ही हिंदू लोकांची पोरकी अपत्ये आहेत." (माटे, २०१०, पृ. २२८-२२९) या पार्श्वभूमीवर श्री. म. माटे यांनी जाणीवपूर्वक उपेक्षितांच्या उद्धाराचा प्रश्न हाती घेतला होता. आपली भूमिका स्पष्ट करताना त्यांनी म्हटले होते की, " आम्ही चातुर्वर्ण्य लोक हे या देशाचे मालक आहोत हा हट्ट आपल्या धार्मिक तत्त्वज्ञान राशीतून गाळला पाहिजे व हिंदुस्थान देशात जे कोणी राहतात त्या सर्वांचा हा देश आहे व योग्यतेप्रमाणे कोणालाही सत्ता, सौख्य व वैभवे मिळवता येतात हा न्याय सामाजिक तत्त्वज्ञान म्हणून पत्करला तरच अस्पृश्यता निवारण शक्य आहे." (माटे, १९३३, पृ. २४६) मध्यममार्गी सनातनी सुधारक अशी श्री. म. माटे यांची ओळख होती. परंपरा आणि आधुनिकता यापैकी कोणत्याही एका विचारधारेला घट्ट चिकटून राहाण्यापेक्षा दोहोंचा समन्वय साधून परिवर्तनावादी विचारांची रुजवात करण्यावर त्यांचा भर होता.

आपल्या समकालीनांच्या धार्मिक समजुती किती मुर्खपणाच्या होत्या यावर माट्यांनी स्वत:च भाष्य केले होते. सनातनी विचारांचा पगडा असलेल्या ब्राह्मण समाजातल्या विटाळाच्या कल्पना किती कर्मठ होत्या हे त्यांच्या आत्मचरित्रातल्या पुढील नोंदींवरून लक्षात येते :

- सोवळे नेसून जेवायला बसलेल्या माणसास ओवळ्या माणसाचा स्पर्श झाला तर पानावरून उठावे लागे. सोवळ्याने चालताना कापसाच्या सुतावरूनही पाय पडला तर विटाळ होत असे. तागाचा, रेशमाचा मुकटा नेसणे म्हणजे सोवळे परिधान करणे. कापसाचे धूतवस्त्रही सोवळे म्हणून चालत असे, पण ते एकदा कंबरेचे सुटले म्हणजे ओवळे होत असे. लोणचे पापड यांच्या बरण्यांना किंवा भांड्याना धाबळी परिधान

करूनच बायकांना स्पर्श करता येत असे. पात्रशुचिता अशीही एक समजुत रूढ होती. चांदीचे व तांब्याचे भांडे पूर्ण शुद्ध, मात्र कल्हई केलेली पात्रे कमी शुद्ध मानीत असत.

- पाण्याला विटाळ होतो असा एक समज होता. पिठात पाणी घालून भाकरी केली तर ती खायला सोवळे नेसावे लागे; पण 'दूधातली दशमी' ओवळ्याने खाता येत असे. भाजण्यामुळे त्यातील जलांश मोडतो, म्हणून भाजणीचे थालिपीठ ओवळ्याने खाता येत असे.
- सुतकातल्या माणसाचा विटाळ दहा –दहा दिवस चाले. अशा माणसांना घरातल्या घरात पण क्वारंटाईनमध्ये बसावे लागे. दहाव्या दिवशी आंघोळी झाल्या, म्हणजे सारी वस्त्रे धुवून घ्यावी लागत. ज्या ठिकाणी धुण्याचे काम अवघड असे तिथे गोमूत्र शिंपडून शुद्धीकरण होत असे.
- विटाळशी स्त्रीला तीन दिवस कडक बहिष्कारात राहावे लागे. विटाळशीची निराळी खोली असे. या तीन दिवसात तिला स्नान नसे. चौथ्या दिवशी स्नान झाल्यावर स्वयंपाक व देवपूजेखेरीज घरातली इतर कामे करता येत असत व पाचव्या दिवसाच्या स्नानानंतर ती पूर्ण शुद्ध होत असे. बाळंतिणीचा विटाळ दहा दिवसपर्यंत धरत.
- न्हाव्याकडून हजामत केल्यावर आंघोळ करून शुचिर्भूत होईपर्यंत इकडे तिकडे शिवता येत नसे.

अस्पृश्यता ही कित्येक शतकांची दृढमूल परंपरा काही दिवसांत किंवा काही महिन्यात नष्ट होणार नाही, ती नाहीशी करण्याचा मार्ग क्रांतीचा नसून उत्क्रांतीचा आहे अशी माट्यांची समजूत होती. त्यामुळे अस्पृश्यांच्या अंगच्या सुप्त गुणांचा विकास घडविण्यासाठी त्यांना सुशिक्षित बनविणे, आर्थिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रात त्यांच्या कर्तृत्वाला समान संधींचे क्षितिज खुले होईल या दृष्टीने प्रयत्न करीत राहिले तर अस्पृश्यता नाहीशी होईल, असा माट्यांना विश्वास वाटत होता. यासाठी हिंदुत्वातून निराळे न होता हिंदूतूनच या प्रश्नाकडे सहानुभूतीने पाहाणारे सुहृद मिळवून हे काम पुढे न्यावे अशी माट्यांची भूमिका होती. संत साहित्याच्या व्यासंग असल्याने तर्ककर्कश बुद्धिवादी खंडनमंडनापेक्षा उद्बोधक भावपरिवर्तनाचा मार्ग त्यांना अधिक पसंत होता. 'अस्पृश्य' हा शब्द अवमानास्पद असल्यामुळे 'अस्पृष्ट' असा पर्यायी शब्द रूढ करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. 'डिप्रेस्ड क्लास' म्हणजेच अस्पृश्य वर्ग समजण्याची गल्लत आपण करू नये यासाठी भारतातील सर्वच वंचित गटसमूहांच्या लोकसंख्येचे तक्ते देऊन त्यांनी या शोषित गटाची व्याप्ती किती मोठी आहे याकडे लक्ष वेधून घेतले होते.

प्रश्न जर सोपा बनवायचा तर त्याची इतर सामाजिक प्रश्नांशी गुंतागुंत करू नये व विनाकारण आपल्या कामात अडथळे उत्पन्न करवून घेऊ नयेत अशा निष्कर्षाप्रत माटे येऊन पोहचले. हिंदू धर्माबद्दल उपेक्षाबुद्धी न ठेवता सामाजिक सुधारणांचे काम करावे

अशी माट्यांची व हरिभाऊ फाटक यांची धारणा होती. हिंदू लोकांतल्या सोवळ्या-ओवळ्याच्या आणि विटाळाच्या कल्पनांचा माट्यांनी सातत्याने निषेध केला होता. रोटी-बेटी व्यवहार हा अस्पृष्यता निवारणाचा एक आवश्यक भाग असल्याचे त्यांना मान्य होते; अस्पृश्यता निवारणाची माट्यांची स्वत:ची वेगळी व्याख्या होती. अस्पृष्टांच्या खरा प्रश्न त्यांच्या सामर्थ्याचा समाजात आणि देशात वापर होऊ दिला जात नाही, हा आहे. त्यामुळे अस्पृष्ट लोकांना त्यांच्यातल्या नैसर्गिक शक्ती वाढीस लागण्याच्या दृष्टीने समाजाने व धर्माने संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत, अशी माटे यांची विचारसरणी होती. या भूमिकेतून १९१७ साली पुण्याच्या नव्या पेठेतील मांगवाड्यात पिंपळाच्या पाराखाली रात्रशाळा सुरू करुन अत्यंजांच्या उद्धारकार्याची सुरुवात केली. लेखन-वाचन, धार्मिक प्रवचन, दारू सोडण्यासंबंधी उपदेश, रस्ते झाडून स्वच्छता करणे असे शाळेचे स्वरूप होते. अनंतराव सहस्त्रबुद्धे, हरिभाऊ फाटक, विनायकराव लिमये हे स्वयंसेवकाचे काम करीत. पांढरपेशी ब्राह्मण माणसे मांगवाड्यात येऊन शिवाशिव न मानता शिकवतात याचे स्थानिक लोकांना अप्रूप वाटे. पावसाळ्यात मांग वस्तीतल्या लोकांनीच स्वयंसेवेतून पत्र्याची शाळा बांधली. यानंतर मंगळवार पेठेतील महारवाड्यात शंकराच्या देवळात दुसरी शाळा सुरू केली. तेथे सदाशिव नाडकर्णी, बापू केळकर, विनायक पटवर्धन हे सातवीत शिकणारे विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून सोबतीला आले. त्यानंतर नारायण पेठेतील चांभारवाड्यात लक्ष्मणराव कदम यांच्या ओसरीवर शाळा सुरू केली. हळू हळू शहरातील इतर चांभारवाड्यात म्हणजे कसबा पेठ, हत्तिमहाल, भिकारदास गेट, घोरपडे पेठ, मीठगंज, नागझरीच्या चांभारवाड्यात शाळा सुरू केल्या. तसेच साऱ्याचा व गुलटेकडीचा व भांबुर्ड्याचा मांगवाडा , रविवार पेठेतील ढोरवाडा, कामाठीपुऱ्यातील कातडखाना, मीठगंजेतील, आणि साऱ्याच्या महारवाड्यात अशा एकूण २२ शाळा काढून आपल्या कामाचा विस्तार केला. या शाळांतून तयार होणारे विद्यार्थी पुढल्या औपचारिक शिक्षणासाठी म्युनिसिपल शाळेत पाठविले जात. माट्यांनी ल. ब. भोपटकर यांच्या अध्यतेखाली 'अस्पृश्यतानिवारक मंडळा'ची स्थापना करून आपल्या कामाचा विस्तार केला. मंडळाच्या चिटणीसपदाची जबाबदारी माट्यांनी स्वत:कडे घेतली होती.

पुण्यात त्या काळी चांभार लोकांच्या वस्त्या जास्त असल्याने त्यांच्यासाठीच्या शाळा जास्त निघाल्या, त्यामुळे माटे मास्तरांची चांभार लोकांशीच घसट आहे असा समज होता; मात्र पुण्यात महार लोकांच्या दोन-चारच वस्त्या होत्या, त्यातल्याही तीन ठिकाणी त्यांनी शाळा काढल्या होत्या. तत्कालीन महार समाजाविषयी माटे त्यांच्या आत्मचरित्रात लिहितात : "... महार लोक हे त्यातल्या त्यात जास्त पुढारलेले; ख्रिस्ती मिशनरी, युरोपियन लोक, इत्यादिकांशी यांचा इतरांच्या मानाने फार आधी संबंध आलेला. अर्थात् त्यांना स्वत्वाची जाणीव इतरांच्या मानाने जास्त झालेली होती. इंग्रजी

शिकलेल्यांची त्यांची संख्याही त्यातल्या त्यात जास्त होती.... आमचे आम्ही पाहू; असे वागा आणि तसे वागा असे आम्हांला सांगणारे तुम्ही कोण? असे टाफरून बोलण्याची त्यांच्यातील अर्धवट सुशिक्षितांतसुद्धा प्रवृत्ती होती; व तीच हळू हळू त्यांच्या द्वारा त्यांच्या समाजात फैलावत होती. पण मनुष्य एकदा स्वाभिमान घेऊन उठला, म्हणजे हे सर्व होणारच... स्वत्वाची जाणीव व स्वाभिमान हेच सामाजिक उन्नतीचे पाये आहेत, हे ओळखून महार लोकांनी आमच्या प्रयत्नांसंबंधाने थोडी उपेक्षा किंवा अप्रियतासुद्धा बाळगली, तर त्यात काहीच आश्चर्य नाही." (माटे, २०१०, पृ. १९५-१९६) अर्थात जेथे आपल्या प्रयत्नांची जास्त जरूरी होती तेथे काम करण्याची भूमिका घेऊन माट्यांनी आपल्या कामाचा विस्तार केला. अस्पृश्यांसाठी शाळा चालवताना तिथल्या वस्तीतल्या अस्पृश्यांच्या बारीकसारीक कामांना मदत करण्याचे व्रत त्यांनी निभावले. आळीत कंदील नाही म्हणून तक्रार आल्यावर कंदील मिळवणे, जातपंचांची भांडणे मिटवणे, कुणाला जोड्यांच्या दुकानाची जाहिरात लिहून देणे, कुणाला नादारीचा अर्ज लिहून देणे, दिवाळीच्या दिवशी अस्पृश्य मुलांच्या साबण लावून आंघोळी घालणे, दुष्काळात नगर जिल्ह्यातून पुण्यास आलेल्या वंचित लोकांसाठी आपल्या विद्यार्थ्यांच्या मदतीने शिदोरी जमवणे, अस्पृश्य वस्तीतल्या आळ्यांमध्ये जाऊन रस्ते झाडणे, लोकांना दारूपासून परावृत्त करणे अशी रोज पाच-सहा तास नानाविध कामे करून अस्पृश्यांच्या उपयोगी येण्यात माटे नेहमी अग्रेसर असत. ते अस्पृश्यांच्या बसाहतीत इतका वेळ काम करीत असल्याने *'महार माटे'* असे संबोधून स्पृश्य वर्गाकडून त्यांची हेटाळणीही होत असे. "हरिभाऊ फाटक आणि माटे हे मांगिणीशी व्यभिचारासाठी मांगवड्यात रात्रीचे जातात" अशीही संभावना केली जाई. मात्र या कामात त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई माटे यांचा भक्कम पाठिंबा होता. माटे आपल्या कमाईतला बराच भाग अस्पृष्टांच्या कामात खर्च करतात म्हणून त्यांनी कधी तक्रारीचा सूर आळवला नाही, उलट पतीची पाठराखणच केली. माट्यांच्या अस्पृश्यतानिवारक मंडळाच्या कामात त्यांना सर्वोदयी कार्यकर्ते अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे, बॅ. छोटेलालजी अग्रवाल, ज्ञानप्रकाशचे बातमीदार दामुअण्णा कोकजे, मल्ल सदाशिवराव गोडबोले, गांधीजींच्या चळवळीतील सदाशिव नाडकर्णी, रघुनाथ दिवेकर, अस्पृश्य समाजातील चांभार परिषदेचे चिटणीस पांडुरंगराव राजभोज, के. के. सकट, मातंग समाजाचे पुढारी बाबूराव वायदंडे यांची साथ लाभली होती.

अस्पृश्य वर्गातल्या ह्या सामाजिक अंतर्भेदांमुळे सर्व अस्पृश्य वर्गाला एकाच सामाईक मंचावर एकत्र आणून अस्पृश्योद्धाराच्या कामाला चालना देणे शक्य होणार नाही, याचा त्यांना अंदाज आला होता. त्यामुळे जातीनिहाय अस्पृश्यांच्या परिषदा भरवून समाजजागृतीचे काम करावे असा त्यांनी निर्णय घेतला. त्यानुसार पांडुरंग हरळे उर्फ पांडुरंगराव राजभोज यांना सोबत घेऊन एक 'चांभार-ढोर परिषद' घेतली. बाबूराव

वायदंडे, के. के. सकट यांना सोबत घेऊन मातंग परिषद भरविली. या परिषदांमध्ये अस्पृश्यता निवारण, मुलांचे शिक्षण, आपापल्या धंद्यातल्या अडचणी हेच सर्वसाधारण विषय असत. डॉ. आंबेडकर यांना मात्र माटे यांची जातवार स्वतंत्र परिषदा घेण्याची कल्पना योग्य वाटत नव्हती. सर्व अस्पृश्यांसाठी एक सामाईक मंच असावा असे त्यांचे मत होते.

श्री. म. माटे यांच्या अस्पृश्यता निवारक मंडळाची व्याप्ती अध्यक्ष आणि सचिवापलीकडे न जाणारी असल्याने माट्यांच्या या मंडळाकडून कुठलीच अपेक्षापूर्ती करण्याचे कारण नसल्याची डॉ. आंबेडकरांची खात्री पटली होती. "माट्यांनी कोणा अस्पृश्याबरोबर रोटीव्यवहार करून दाखविला आहे का बेटीव्यवहार करून दाखविला आहे? माट्यांनी केले आहे तरी काय हे एकदा स्पष्ट झाले असते म्हणजे त्यांच्याबद्दल शंकाकुशंका घेण्यास तरी कोणास कारण उरले नसते." मातंगांची वेगळी परिषद भरविण्याच्या माटे यांच्या उपक्रमामुळे अस्पृश्यांत बुद्धिभेद निर्माण केला गेल्याचीही प्रतिक्रिया डॉ. आंबेडकरांनी व्यक्त केली होती. (आंबेडकर, २००५ क, पृ. १७३)

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य :**

अस्पृश्योद्धाराच्या चळवळीत अस्पृश्य वर्गातूनच पुढे आलेले क्रांतिकारी नेतृत्व म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१८९१-१९५६) यांच्या कार्याचे विशेष महत्त्व आहे. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्याकडून उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती प्राप्त झाल्यानंतर अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठातून त्यांनी डॉक्टरेटची पदवी संपादन केली. भारतात परत आल्यावर ११ नोव्हेंबर १९१७ साली न्या. नारायणराव चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईच्या मदनपुऱ्यात अस्पृश्य समाजाने सभा आयोजित करून त्यांच्या अभिनंदनाचा ठराव पारित केला होता. (जाधव २००२, पृ. २५) अस्पृश्य वर्गाने आपल्यातूनच पुढे आलेल्या या सुशिक्षित नेतृत्वाचे अशा प्रकारे स्वागत करणे ही डॉ. आंबेडकर यांच्या पुढच्या सामाजिक-राजकीय वाटचालीची नांदी होती. २० एप्रिल १९२४ रोजी मुंबईत समविचारी पुढाऱ्यांची सभा घेऊन डॉ. आंबेडकरांनी बहिष्कृतांच्या उद्धारासाठी संस्थात्मक चळवळ चालविण्याचा संकल्प सोडला व लगेचच २० जुलै १९२४ रोजी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' या संस्थेची अधिकृत स्थापना करण्यात आली. मुंबईत त्यावेळी सोशल सर्व्हीस लीग, सेवासदन, महिला विद्यालय इत्यादी समाजसेवा करणाऱ्या संस्था होत्या; परंतु त्यांची कार्यकक्षा मध्यमवर्गापुरतीच मर्यादित होती. बहिष्कृत वंचित वर्गापर्यंत या सामाजिक संस्था अद्याप पोहचलेल्या नव्हत्या. गांधीजी हिंदू-मुसलमानांचे ऐक्य व अस्पृश्यतानिवारण या दोहोंशिवाय स्वराज्य मिळणार नाही, असे सांगत असले तरी खादीप्रसार आणि हिंदू-मुस्लमान ऐक्य यावर ते जितका भर देत तितका अस्पृश्यतानिवारणावर देत नाहीत, असे डॉ. आंबेडकरांचे निरीक्षण होते.

त्यामुळे बहिष्कृतांसाठी स्वतंत्र सामाजिक संस्था असावी, असे ठरवून डॉ. आंबेडकरांनी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' स्थापन केली. 'शिकवा, चेतवा आणि संघटित करा' हे ब्रिदवाक्य संस्थेच्या पुढील कार्याची दिशा स्पष्ट करणारे होते. अस्पृश्य वर्गाची परंपरेने चाललेल्या दास्यातून मुक्ती करणे व त्यांना माणुसकीचे मानवाधिकार प्राप्त करून देणे ही या चळवळीची भूमिका होती. या चळवळीसाठी अस्पृश्य आणि समविचारी सवर्ण यांना एकत्रित आणण्याचा प्रयत्न त्यांनी संस्थेच्या स्थापनेपासूनच केला होता. संस्थेचे अधिपती म्हणून डॉ. सर चिमणलाल सेटलवाड यांची व उपाधिपती म्हणून मेजर निस्सीम, रुस्तुमजी जीनवाला, जी. के. नरीमन, डॉ. र. पु. परांजपे, डॉ. वि. पां. चव्हाण व सॉलिसिटर बी. जी. खरे यांची नियुक्ती ही या सम्यक धोरणाचीच निदर्शक म्हणायला हवी. संस्थेच्या नियामक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष म्हणून स्वत: डॉ. आंबेडकर व सचिवपदी सीताराम नामदेव शिवतरकर यांनी काम पहायला सुरुवात केली.

बहिष्कृत हितकारिणी सभेच्या परिषदा आयोजित करून वंचितोद्धाराच्या चळवळीची वैचारिक व संघटनात्मक बांधणी करण्याचे काम त्यांनी सुरू केले. १०-११ एप्रिल १९२५ रोजी बेळगाव जिल्ह्यातील निपाणी येथे झालेल्या बहिष्कृत परिषदेच्या अधिवेशनात त्यांनी महाराष्ट्रातील समकालीन राजकीय-सामाजिक चळवळींची समीक्षा केली. त्यावेळी महाराष्ट्राच्या समाजधुरिणांमध्ये 'आधी राजकीय मग सामाजिक' ह्या प्रश्नावरून दोन तट पडले होते. डॉ. आंबेडकरांच्या मते ही मीमांसा नादानपणाची असून सामाजिक प्रश्न बाजूस टाकणारी आहे. त्यांच्या ह्या एकांगी भूमिकेमुळे राजकीय ध्येयाची साध्यता त्यांची त्यांनीच बिकट करून टाकल्याची टीका डॉ. आंबेडकरांनी केली. या अधिवेशनात त्यांनी अज्ञान आणि रूढीप्रथांमुळे होणारी सामाजिक हानी टाळण्यासाठी बहिष्कृत वर्गाला मार्गदर्शन केले. कामधंदा करून स्वत:च्या पायावर उभे राहाण्यापूर्वीच मुलांची कर्ज काढून लग्न करण्याची घाई केल्याने तरुण पिढी पुन्हा प्रपंचासाठी कर्जाच्या ओझ्यात चेंगरून जाते, त्यांना आपल्या मुलांना चांगले शिक्षण देता येत नाही, त्यामुळे ही अनिष्ट सवय सोडून दिली पाहिजे; लहान मुलींना मुरळी सोडण्याच्या प्रघात बंद केला पाहिजे; देवदासी म्हणून सोडलेल्या मुली आपला देह विकून नातेवाईकांची पोटे भरतात, हा प्रकार थांबवला पाहिजे, याविषयी त्यांनी समाजबांधवांना आवाहन केले. कुटुंब म्हणजे आपल्या प्रजेचे रक्षण व संगोपन करण्यास समाजाने स्थापन केलेली एक संस्था आहे; ही संस्था चालविणारी दांपत्ये जितकी शुद्ध, सात्त्विक व अभिमानी असतील तितकीच त्यापासून निपजणारी संतती शुद्ध , सात्त्विक व अभिमानी असू शकेल. म्हणून एका बाईने पुष्कळ नवरे करावेत किंवा एका पुरुषाने पुष्कळ बायका कराव्यात ही कौटुंबिक पद्धत अप्रशस्त असून एक पत्नी व एक पती हीच कौटुंबिक पद्धत रास्त आहे, असा सल्लाही त्यांनी समाजबांधवांना दिला.

१९-२० मार्च १९२७ रोजी कुलाबा जिल्ह्यातील महाड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली बहिष्कृत परिषद घेण्यात आली. परिषदेला स्वागताध्यक्ष संभाजी तुकाराम गायकवाड, गं. नि. सहस्त्रबुद्धे, बापूराव जोशी, अनंतराव चित्रे, सुरेंद्र गोविंदा टिपणीस, तुळजाभाई मिठा शेठ, शंकरभाई विठ्ठल धारिया या सवर्ण व अस्पृश्य पुढाऱ्यांना एकत्र आणण्याची किमया डॉ. आंबेडकरांनी साधली होती. आपल्या अध्यक्षीय भाषणातून त्यांनी अस्पृश्यांच्या दु:स्थितीच्या कारणांची चर्चा केली व अस्पृश्यवर्गाच्या उर्जितावस्थेचे मार्ग सुचविणारा एक पथदर्शक आराखडा सुचविला. अस्पृश्य वर्ग शौर्य व कर्तबगारीत मुळीच कमी नाही. अस्पृश्य वर्गाकडे शूरता, वीरता व स्वाभिमानाचे तेज होते याचे ऐतिहासिक दाखले देऊन डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या अस्मितास्थळांची एक यादीच दिली. राजारामाच्या सांगण्यावरून कोणाचीही कुमक न घेता मोगलांच्या ताब्यात असलेला वैराटगड जिंकून मराठ्यांच्या राज्यास जोडून देणारा नागेवाडीचा महजूर सेटी बिन नागनाक महार; ब्राह्मण्याच्या पंक्तिभेदाच्या नीतीला स्वत:च्या रणाच्या मर्दुमकीचे आव्हान देऊन 'ज्याची तरवार खंबीर तो हंबीर' असे हिरोजी पाटणकरासारख्या सरदाराकडून न्यायवचन मिळवणारा व खर्ड्याच्या लढाईत पठाणांच्या हातून परशुरामभाऊचा प्राण वाचविणार रणवीर शिदनाक महार [५] आणि पेशवाईला अखेरची मूठमाती देताना धारातीर्थी पडलेले व कोरेगावच्या जयस्तंभावर ज्यांची नावे कोरली गेली ते वीर पुरुष ही अस्पृश्यांच्या अस्मितेची चिरंतन उदाहरणे असल्याचे नमूद करून डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्य वर्गास सकल मानव धर्मोद्धाराचा धडा घालून देण्यासाठी सिद्ध होण्याचे आवाहन केले होते. (आंबेडकर, २००५ क, १३९-१४०) मराठ्यांच्या दुही व तेढीमुळे ब्रिटिशांनी राज्य संपादित केले हा समज त्यांनी खोडून टाकला व अस्पृश्यांच्या सैनिकी बळावर त्यांनी हिंदुस्थानात राज्य प्रस्थापित केले याची आठवण करून दिली. जोपर्यंत अस्पृश्य लोक सैन्यात होते तोपर्यंत त्यांची स्थिती चांगली होती; ते साक्षर होते, त्यांच्याकडे श्रीधर, मुकुंदराज, ज्ञानेश्वर, मुक्तेश्वरांच्या साहित्याचा ग्रंथसंग्रह होता, स्त्रियासुद्धा पुराण कथन करीत असत. मात्र १८५७ च्या बंडानंतर ब्रिटिशांनी लष्करभरती बंद केल्यानंतर अस्पृश्य वर्गाची स्थिती खालावत गेली. १९१७ साली पहिल्या महायुद्धाच्या वेळी अस्पृश्यांना सैन्यात घेतले गेले तेव्हा या परिस्थितीत बदल होण्याची चिन्हे दिसू लागली होती; मात्र युद्ध संपल्यावर अस्पृश्यांची लष्करातून हाकालपट्टी करण्यात आली. या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा सरकारने अस्पृश्यांना लष्करी सेवेत आणि पोलिस दलात संधी उपलब्ध द्यावी, याकरिता प्रयत्न करणे हा सुधारणेचा एक मार्ग त्यांनी आपल्या भाषणातून सुचविला.

अस्पृश्यांमध्ये चांभार लोक सोडले तर बिन धंदेवाईक लोकच जास्त आहेत, हे अस्पृश्यांच्या मागासलेपणाचे एक मुख्य कारण असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र जीवन जगण्यासाठी लागणारे उद्योग-व्यवसाय न केल्याने अस्पृश्यांचे जीवनमान कसे खालावले आहे याची कठोर समीक्षा करताना डॉ. आंबेडकरांनी महार जातीच्या परावलंबित्वाचा दाखला दिला. ते म्हणाले की, "महार म्हणजे भिकार लोकांचा तांडा आहे असे म्हणावयास काही हरकत नाही. दररोज हक्काने दारोदार शिळे तुकडे टोपल्याच्या टोपल्या गोळा करून चरितार्थ चालविण्याची या जातीला सवय पडून गेली आहे. या प्रघातामुळे या जातीला मुळी गावात इज्जत नाही, मानमतराब नाही. या रिवाजामुळे या जातीचा स्वाभिमान नष्ट झाला आहे." ही स्थिती बदलायची झाल्यास अस्पृश्यांच्या आचार, विचार व उच्चार यांची शुद्धी झाली पाहिजे, देव-देवस्कीसारख्या अंधश्रद्धांपासून दूर जायला हवे असे सांगून डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या उर्जितावस्तेचे दोन मार्ग याप्रसंगी सुचविले:

१.पांढरपेशे बनणे. म्हणजे उच्च शिक्षण घेऊन सरकारी नोकरीत शिरणे. सरकार ही सरकारी नोकरांवर अवलंबून असणारी एक जबरदस्त संस्था आहे. सरकारचे मन म्हणजे सरकारी नोकरांचे मन असे समीकरणच प्रस्थापित झाले आहे. सरकारी नोकरीचा अधिकार या प्रांतातील ब्राह्मणांच्या हाती जर नसता तर इतर प्रांतातील ब्राह्मणांप्रमाणे ते पाणके किंवा स्वयंपाकी झाले असते. म्हणून अस्पृश्यांनी आपल्या उर्जितावस्थेसाठी उच्च शिक्षणाची कास धरून पांढरपेशे बनावे. त्याकरिता सरकारने शिक्षण सक्तीचे करावे, ३० मुले असलेल्या गावी शाळा काढाव्यात, अस्पृश्य मुलांसाठी जिल्हानिहाय बोर्डिंगा काढाव्या, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या द्याव्या, समाजाने वार लावून बहिष्कृत विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी घ्यावी असे ठराव या परिषदेत करण्यात आले.

२.कोणत्याही जातीच्या माणसासाठी खुला असणारा शेतीचा व्यवसाय करण्यासाठी अस्पृश्य वर्गाने पुढे यावे असा एक दुसरा मार्ग डॉ. आंबेडकरांनी सुचविला. यासाठी सरकारने पडीक जमिनी व फॉरेस्टच्या जमिनी कसण्यासाठी अस्पृश्यांना उपलब्ध करून द्याव्यात, शिवाय शेती करणाऱ्या अस्पृश्यांच्या मदतीसाठी सहकारी पतपेढ्या व सहकारी गल्ले यांची पूरक व्यवस्था निर्माण करावी असा ठराव करण्यात आला.

अस्पृश्यांना स्वाभिमानाने जगता यावे यादृष्टीने या परिषदेत आणखी काही महत्त्वाचे ठराव पारित झाले. त्यात सार्वजनिक स्थळे व पाणवठे खुले करावेत, बलुत्याऐवजी मासिक पगाराची पद्धत सुरू करावी, मेलेली जनावरे ओढून नेण्याची जबाबदारी अस्पृश्य वर्गावर न सोडता ज्याने त्याने आपापली निभवावी, मिश्र विवाहाचे प्रघात सुरू करावेत, शिक्षण व दारुबंदीची सक्ती करण्यात यावी इत्यादी ठरावांचा समावेश होता. (जाधव, २००२, पृ. ३६-५५) ब्राह्मण्यविध्वंसनाचा अजेंडा केंद्रस्थानी ठेवूनच अस्पृश्यांना आपली अस्मितेची लढाई लढावी लागेल, हेही त्यांनी नमूद केले होते.

२५-२६ डिसेंबर १९२७ रोजी महाडच्या बहिष्कृत परिषदेच्या सभेत डॉ. आंबेडकरांनी 'हिंदुमात्राचा जन्मसिद्ध हक्कांचा जाहीरनामा घोषित केला. या जाहीरनाम्याच्या माध्यमातून "जन्मसिद्ध मानवी हक्क कायम राहातील हाच राज्यव्यवस्थेचा व समाजव्यवस्थेचा अंतिम हेतू असला पाहिजे, हे तत्त्व स्पष्ट करण्यात आले व समानतेच्या तत्त्वाला बाधा येईल अशा कोणत्याही धोरणाला व विचारांना थारा मिळू नये असे सभेचे मत असल्याचे जाहीर करण्यात आले. हिंदू समाजाच्या विषमतामूलक रचनेचा पुरस्कार करणाऱ्या प्राचीन, अर्वाचीन ग्रंथवचनांचा तीव्र निषेध करण्यात आला. लोकविग्रही व माणुसकीचा उच्छेद करणाऱ्या मनुस्मृती दहनाचा विधी करण्यात आला. या सभेत डॉ. आंबेडकर यांनी अस्पृश्योन्नतीच्या प्रश्नावरच अधिक भर दिला होता. अस्पृश्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी स्त्रियांनी जुन्या व गलिच्छ चालीरीती सोडून दिल्या पाहिजेत हे सांगताना डॉ. आंबेडकर यांनी अस्पृश्य वर्गातील स्त्रियांना काही कानगोष्टी सांगितल्या. "ज्या गोष्टीमुळे लोक आपण अस्पृश्य आहोत, असे ओळखतात त्या साऱ्या गोष्टी तुम्ही आता बंद केल्या पाहिजेत. तुमची लुगडी नेसण्याची पद्धती ही तुमच्या अस्पृश्यतेची साक्ष आहे, ती साक्ष तुम्ही बुजविली पाहिजे. वरिष्ठ वर्गाच्या बाया ज्या पद्धतीने लुगडे नेसतात, त्या पद्धतीने तुम्ही लुगडी नेसण्याचा प्रघात पाडला पाहिजे. त्याचप्रमाणे गळ्यात भाराभार गळसऱ्या व हातांत कोपरभर कथलाच्या किंवा चांदीच्या गोठ-पाटल्या ही देखील तुम्हास ओळखण्याची खूण आहे. एका गळसरीपेक्षा अधिकांची जरूरी नाही. त्याने नवऱ्याचे आयुष्य वाढते किंवा आपल्या शरीराला शोभा येते, अशातला भाग नाही. दागिन्यांपेक्षा कपड्यालाच अधिक शोभा आहे तेव्हा कथलाच्या किंवा चांदीच्या दागिन्यात पैसे खर्च करण्याऐवजी चांगल्या कपड्यात पैसे खर्च करा. दागिना घालायचाच असला तर सोन्याचा करून घालावा; नाहीतर घालू नये. त्याचप्रमाणे स्वच्छतेने वागण्याची खबरदारी घ्यावी... तुम्ही घरच्या गृहलक्ष्मी आहात. घरात कोणतीही अमंगळ गोष्ट होऊ न देणे याबद्दल तुम्ही काळजी वाहिली पाहिजे... जो नवरा मेलेल्या जनावराचे मांस घरात आणील, त्यास तुम्ही स्पष्ट सांगा की, असला प्रकार माझ्या घरी चालणार नाही. .. तसेच आपल्या मुलांनाही शिक्षण दिले पाहिजे." (खरात, २०१३, पृ. ७०-७१) अस्पृश्यांचे जीवनमान सुधारण्यावर आंबेडकरांचा कटाक्ष होता, हे या उपदेशावरून लक्षात येते.

**पाणवठे खुले करण्याचा प्रश्न :**

सार्वजनिक व्यवस्था सर्वांना खुल्या करणे हाच अस्पृश्यतानिवारणाचा खरा मार्ग असल्याचे डॉ. आंबेडकरांचे मत होते. महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह ह्याच भूमिकेतून करण्यात आला होता. २० मार्च १९२७ रोजी बहिष्कृत हितकारिणीच्या महाड अधिवेशनाच्या समारोपप्रसंगी अनंत विनायक चित्रे यांनी सार्वजनिक पाणवठ्यांवर

अस्पृश्यांचा पाणी भरण्याचा हक्क प्रस्थापित करण्यासाठी चवदार तळ्यावर जाण्याचा प्रस्ताव ठेवला. 'म्युनिसिपालिटीने तळी सर्व लोकांसाठी खुली केली असल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चवदार तळ्यातील ओंजळभर पाणी पिऊन सत्याग्रह केला. ही वार्ता पोहचल्यावर सवर्णांपैकी एका गुरवाने अस्पृश्य मंडळी वीरेश्वराच्या मंदिरात घुसणार असल्याची अफवा पसरवली. सवर्णांनी आपला विवेक बाजूला ठेवून दंगा सुरू केला. अस्पृश्यांना मारहाण केली, त्यांच्या जेवणात माती कालवली. संपूर्ण परिसरात जातिभेदाच्या विग्रहाचे विषारी वातावरण पसरले. विष्णुमंदिरात ब्रह्मवृंदाने सभा बोलावली व बहिष्कृतांनी बाटविलेल्या तळ्याचे शुद्धीकरण करण्याचा निर्णय केला. एक हजार कलश पाणी उपसून वेदोक्त विधिपूर्वक शुद्धी समारंभ केला. समकालीन वृत्तपत्रांतून महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाची उलटसुलट बातमीपत्रे प्रसिद्ध झाली. 'केसरी'ने ३ मे १९२७ च्या अंकात शेटजीभटजींनी महाडच्या मारामारीत भाग घेतला नसून ब्राह्मणेतरांनीच भाग घेतला होता, त्यामुळे अस्पृश्यांनी दिशाभूल करून घेऊ नये असा सल्ला दिला. यावर डॉ. आंबेडकर यांनी २० मे १९२७ च्या 'बहिष्कृत भारत' मधून उत्तर देताना लिहिले की, "एवढ्या मोठ्या प्रश्नावर लिहिताना केसरीसारख्या पत्राने लोकांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालावयास पाहिजे होते; बदललेल्या मनूत आपण कसे वागले पाहिजे याचा खुलासा करून अज्ञ जनतेची समजूत करून द्यावयास पाहिजे होती, पण त्यांच्या लिखाणात उदार कल्पनेची कोठे छटाही दिसत नाही. उलट ज्याने ते लिहिले आहे ते अगदी कोत्या बुद्धीचे निदर्शक आहे. त्यात शेटजी भटजींची वकिली करण्याचा क्षुद्र हेतू आहे, इतकेच नव्हे तर शुद्ध आगलावेपणा आहे. असे का याचा तपास केला असता असे दिसून येईल की, अस्पृश्यतानिवारण्याचे बाबतीत साऊथ आफ्रिकेतील गोऱ्या लोकांना अस्पृश्यतानिवारणाची जितकी कळकळ आहे त्याहून जास्त कळकळ केसरीला नाही. दोघांनाही अस्पृश्यता घालवावयास नको. .. हिंदी लोकांनी समान हक्क मागितले की, साऊथ आफ्रिकेतील गोऱ्या लोकांनी अस्पृश्यतेच्या अन्यायाचे घोडे दामटलेचा तसेच ब्राह्मणेतरांनी ब्राह्मणांशी समान हक्क मागितले की, केसरीने तुम्ही अस्पृश्यांना विरोध करता मग तुम्हाला आमच्या बरोबरीने हक्क मागण्याचा काय अधिकार असा प्रश्न केलाच!" केसरी पत्राची आता काही मातब्बरी राहिली नसून 'हिंग गेला पण वास राहिला' या म्हणीप्रमाणे त्याचे नाव तेवढे अजून शिल्लक आहे, असा औपरोधिक टोलाही त्यांनी लगावला. (आंबेडकर, २००५ क, पृ. १२१-१२२) 'कुलाबा समाचार ने मारामारीचा ठपका बहिष्कृत वर्गावर ठेवून मामलेदारांनी स्पृश्यांना मदतच केली असा वृत्तांत प्रसिद्ध केला. 'श्री. म. माटे यांनी महाडला भेट दिल्यानंतर ४ मे १९२७ रोजी पुण्यात शिवाजी मंदिरात व्याख्यान देऊन शेटजी भटजींनी महाडला झालेल्या मारामारीत भाग घेतला नसल्याचे निवेदन केले. विरेश्वर मंदिरात अस्पृष्य

घुसणार अशी कंडी पिकल्याने दंगा झाला, तसेच महाडात ब्राह्मणांनी अस्पृश्य बाईला मारहाण केल्याच्या वृत्ताचा इन्कार करून या अत्याचारात ब्राह्मणांचा संबंध नसल्याचे सांगितले. १६ एप्रिल १९२७ च्या 'चाबूकस्वार'नेही अशाच प्रकारचा वृत्तांत प्रसिद्ध केला. ८ मे १९२७ च्या 'ज्ञानप्रकाश'पत्रातून राजभोज व शांताराम रघुनाथ यांनी माट्यांचा वृत्तांत दिशाभूल करणारा असल्याचा खुलासा केला. 'भाला'कार ल. ब. भोपटकर यांनी २८ मार्च १९२७ च्या अंकात "तुम्ही देवळे किंवा पाणवठे बाटविण्याचा प्रयत्न एकदम बंद करा, तसे न केल्यास आम्ही तुमच्या पाठी सडकू" असा दम भरणारा अग्रलेख लिहिला. त्यावर डॉ. आंबेडकरांनी "आमच्या जो पाठी सडकेल त्याची आम्ही टाळकी सडकू" असे प्रत्युत्तर दिले. (आंबेडकर, कित्ता, पृ. १०२)

वि. दा. सावरकर यांनी मात्र महाडच्या सत्याग्रहाचे समर्थन केले. अस्पृश्यांना प्राप्त झालेल्या कायदेशीर अधिकारांना स्पृश्यांकडून विरोध झाला तर प्राप्त झालेले अधिकार बजावण्यासाठी अस्पृश्यांनी सत्याग्रह केल्यास त्यांना दोष देता येणार नाही, अशी सावरकारांची भूमिका होती. महाड सत्याग्रहासंदर्भात त्यांनी म्हटले होते की, " सत्याग्रह हे नित्यधोरण नाही, पण विशिष्ट आणि अपवाद्‌भूतप्रसंगी अवलंबिण्याचा तो एक कडू पण अपरिहार्य असा नैमित्तिक उपाय आहे. सार्वजनिक शाळा, पाणवठे, नळ, नगरसंस्था, जिल्हा मंडळे, विधी मंडळे, सभा, इत्यादी सर्व सार्वजनिक स्थळी विशेषत: जिथे मुसलमानादिक अहिंदू स्पृश्य समजले जातात, तिथे तिथे आणि त्यांच्यापुढे एक पाऊल तरी आमच्या तथाकथित अस्पृश्य बंधूंना स्पृश्य बंधूंनी येऊ दिलेच पाहिजे. तो त्यांचा न्याय्य अधिकार आहे. तो त्यांचा नैर्बंधिक अधिकार आहे. यास्तव डॉ. आंबेडकर यांची महाडच्या सत्याग्रहाची चळवळ ही आम्हास दोषार्ह वाटत नाही, हे आम्ही स्पष्टपणे घोषित करू इच्छितो... ज्या तळ्यावर मुसलमान लोकही पाणी पितात आणि आपली भांडीही धुतात, त्या तळ्यावर पाण्याच्या दुर्भिक्षतेच्या दिवसातही आपल्या अस्पृश्य हिंदूबंधूंना पाणी पिण्याचा मज्जाव करण्यात आला. इतकेच नव्हे तर त्यांनी शांतपणे तळ्यावर पाणी पिण्यास नगरसंस्थेच्या आज्ञेप्रमाणे आरंभ केला असता, महाडच्या शेकडो स्पृश्य हिंदूंनी त्यास मारहाण केली. अस्पृश्य देवळात शिरणार, अशा भूमिकेने ही गोष्ट झाली, हे म्हणणे सर्वस्वी विश्वसनीय होऊ शकत नाही." (समग्र सावरकर वाड्मय, खंड ३, पृ. ४८५)

डॉ. आंबेडकरांना अस्पृश्यांच्या हक्कांच्या चळवळीत स्पृश्यांना दूर ठेवायचे नव्हते; उलट स्पृश्यांचा सहभाग वाढवूनच ही चळवळ पुढे नेण्याचा त्यांचा मनोदय होता. ब्राह्मणेतर चळवळीतल्या आपल्या पाठीराख्यांचा आग्रहही त्यांनी याबाबतीत मान्य केला नव्हता. महाड सत्याग्रहाच्या चळवळीतून ब्राह्मणांना वगळण्यात यावे अशी सूचना नागपूरचे वा. न. घोरपडे व जवळकर यांनी केली होती. महाड सत्याग्रहात भाग घेऊ इच्छिणाऱ्या स्वयंसेवकाकडून पुढील अटी मान्य असल्याचे लेखी प्रतिज्ञापत्र घ्यावे असे

मत मांडणारे पत्रक त्यांनी प्रसिद्ध केले होते :
१.जन्मसिद्ध चातुर्वर्ण्यावर माझा विश्वास नाही.
२.जातिभेद मला मान्य नाही.
३.अस्पृश्यता मी हिंदू धर्मावरील कलंक समजतो व तो अजिबात नाहिसा करून टाकण्याचा मी प्रामाणिकपणे प्रयत्न करीन.
४.उच्च-नीचतेची भावना मनांत बाळगून हिंदुसमाजापुरते तरी खाण्यापिण्याचे बाबतीत मी जातिनिर्बंध पाळणार नाही.
५.अस्पृश्यांना देवळे, पाणवठे, शाळा, इतर सर्व ठिकाणी स्पृश्यांच्या बरोबरीचे हक्क असावेत असे माझे मत आहे.

सत्याग्रह पायाशुद्ध व्हावा व सामाजिक गुलामगिरीच्या मुळाकडे त्याचे दुर्लक्ष होऊ नये, या उद्देशाने या अटींचे प्रतिज्ञापत्र भरवून घ्यावे असे श्री. घोरपडे यांचे मत होते. (आंबेडकर, २००५ क, पृ. ४५४-४५५) डॉ. आंबेडकर यांनी जवळकर व घोरपडे यांच्या विचारावर प्रतिक्रिया देताना म्हटले होते की, "काही सोवळे ब्राह्मण किंवा ब्राह्मणेतर आमच्या स्पर्शाचा विटाळ मानोत, परंतु सद्धेतूंनी प्रेरित ब्राह्मणांच्या किंवा ब्राह्मणेतरांच्या साहाय्याचा आम्ही तरी विटाळ मानीत नाही...अस्पृश्यता काढून टाकणे ही सुधारणा न्याय, भूतदया व राष्ट्रैक्य यांच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे असे ज्यांचे मत आहे अशा सर्व लोकांना बहिष्कृतांतर्फे व त्यांच्याबरोबर सत्याग्रहात सामील होण्यास काही हरकत नसावी... सत्याग्रहासारखी चळवळ विशिष्ट बाबींवरच भर ठेवून चालवावयाची असते. तिच्यामध्ये अनेक प्रश्नांची गुंतागुंत होऊ देणे इष्ट नसते आणि व्यवहारामध्ये तत्त्वाचा भंग न होऊ देता वेगवेगळ्या मतांच्या व प्रवृत्तींच्या माणसांशी सहकार्य करणे सर्वांना फायदेशीर असते." (आंबेडकर, २००५ क, पृ. २२१-२२२) पुण्याहून एका ब्राह्मण भगिनीने आपल्या पतीच्या संमतीने महाडच्या सत्याग्रहात स्वयंसेविका म्हणून भाग घेण्याची इच्छा व तयारी असल्याचे पत्राद्वारे कळविल्याचा उल्लेखही डॉ. आंबेडकरांनी केला होता.

यानंतर ४ सप्टेंबर १९२७ रोजी डॉ. आंबेडकरांनी 'समता समाज संघ' स्थापन केला. संघाची भूमिका स्पष्ट करणाऱ्या पत्रकात त्यांनी म्हटल होते की, " समता समाज संघाचे तत्त्व सूर्याप्रमाणे स्पष्ट व वज्राप्रमाणे अभेद्य आहे. ते मुसलमानाला भीत नाही, ब्राह्मणाला घाबरत नाही, अगर सत्यशोधकाला पाहून बिचकत नाही. समता (समाज, जाती, पंथ, धर्म समता) हा या संघाचा पाया आहे व निर्भयता हे कवच आहे. हे कवच धारण करण्याची ज्यांच्यात कुवत असेल तो या संघात सामील होईल. संघ हा वर्ण, पंथ, जात व स्त्री-पुरुष भेदातीत आहे. सामाजिक समता अस्तित्वात आल्याशिवाय समाजाचा सामुदायिक जीवनक्रम सुरळीत चालणे अशक्य आहे. शक्य त्या सर्व उपायांनी वरील

तत्त्वांची अंमलबजावणी करण्याचा ह्या संघाचा संकल्प आहे." (खरात, २०१३, पृ. ६३)

अस्पृश्यांना पाणवठे सुरू करण्याची चळवळ पुढे महाराष्ट्रात इतरही ठिकाणी सुरू होती. विदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी १९४६-१९४८ या काळात मोझरी आणि अमरावती भागात सुमारे वीस विहिरी खुल्या करण्यासाठी जनतेला प्रवृत्त केले होते.

**अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशाचा प्रश्न :**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात अमरावती, पुणे, नाशिक, पंढरपूर येथे अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशासाठी झालेल्या सत्याग्रहांना मानवाधिकारांचे लढे म्हणून ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. ह्या सत्याग्रहांतून स्पृश्य-अस्पृश्यांतल्या पूर्वापार समजुतींची जटिलता लक्षात येते. सामाजिक परिवर्तनाच्या लढाईत चळवळीसाठी व्यूहनीती आखताना नेतृत्वाचा वैचारिक कस, लोकसंवादशैली आणि संघटनाकौशल्य पणाला लागत असते. समाजमान्य असणाऱ्या नेतृत्वातच अंतर्गत मतभिन्नता असेल तर चळवळीवर त्याचा उलट-सुलट परिणाम होत असतो. वाद-प्रतिवादात वैचारिक भुसभुशीतपणा असेल, सामाजिक हितापेक्षा व्यक्तिगत अहंकार व कर्मठ समजुतींचा पगडा असेल तर परिवर्तनाच्या चळवळी फसतात; शासनकर्त्यांचा बोटचेपेपणा व अधिकाऱ्यांची उदासीनता यामुळे परिवर्तनाच्या चळवळीत गतिरोध निर्माण होतात, याचे अनेकविध नमुने मंदिरप्रवेशाच्या सत्याग्रहांमध्ये पहायला मिळतात. मराठी संवेदनस्वभावाच्या भावनिक, बौद्धिक व सामाजिक संबंधांच्या मुशी संस्कारित होण्यात या सत्याग्रहांचे नेमके योगदान काय, याचा अंदाज बांधण्यासाठी या सत्याग्रहांचा तपशीलवार आढावा येथे घ्यावयाचा आहे.

अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशाच्या प्रस्तुततेविषयी काही प्रश्न या काळात उपस्थित केले जात होते; तसेच अस्पृश्यांसाठी वेगळी मंदिरे बांधावीत असे पर्यायही सुचविले जात होते. या चर्चेमागची सामाजिक मानसिकता जाणून घेण्यासाठी या काळातील काही चर्चांचा प्रथम मागोवा घेऊ. अस्पृश्योद्धारासाठी काम करणारे श्री. म. माटे यांना हिंदू असूनही अस्पृश्यांना हिंदू मंदिरात प्रवेश दिला जात नाही, हा प्रश्न सतावत होता. म्हणून त्यांनी १९१७ साली हरिभाऊ फाटक यांच्या सहकार्याने पुण्यात अस्पृश्यांसह सर्व हिंदूंना मुक्त प्रवेश राहील असे *'पतितपान मंदिर'* नावाचे एक विठ्ठलाचे मंदिर बांधण्याचा संकल्प केला. या प्रकल्पाबाबत समाजातील विविध घटकांची मते अजमावण्यासाठी त्यांनी काही समाजधुरिणांशी मंदिरप्रकल्पाबाबत चर्चा केली. प्रथम विठ्ठल रामजी शिंदे यांना भेटून त्यांचे मत अजमावले. त्यांनी पतितपावन मंदिराच्या कल्पनेला पाठिंबा दिला, टिळकांनीही भरभरून पाठिंबा दिला व मंदिर भव्य असावे, असा सल्ला दिला. हरिभाऊ आपटे, नामदार बाबासाहेब कामत, बॅ. जयकर, श्रीधरशास्त्री पाठक, विष्णुबुवा जोग, डॉ.

कुर्तकोटी, अमळनेरचे सखाराम महाराज, वारकरी संप्रदायातले फडकरी यांच्या भेटी घेऊन त्यांची मतमतांतरे जाणून घेतली. बऱ्याच मान्यवरांनी पतितपावन मंदिराच्या कल्पनेचे स्वागत केले; परंतु अशा उपक्रमातल्या सामाजिक विरोधाच्या बाजूही पुढे आल्या. श्रीधरशास्त्री पाठक यांनी अस्पृश्यांच्या दर्शनाने देव बाटतो, तेव्हा वैदिक मंत्रांनी तुमच्या विठ्ठलाची प्रतिष्ठपना कशी होणार असा प्रश्न उपस्थित केला. वारकरी पंथाचे विष्णुबुवा जोग यांना असे मंदिर व्हावे हे मनाने पटत होते; परंतु आपल्या पंथात हे नवे बंड उभारावयास ते तयार नव्हते. वारकरी पंथातल्या निरनिराळ्या फडकऱ्यांना भेटून त्यांचा पाठिंबा मिळवण्याचा माट्यांनी प्रयत्न केला. ज्ञानोबांची पालखी प्रस्तावित पतितपावन मंदिरासमोर थांबवावी व दोन अभंग म्हणून पालखी पुढे न्यावी ही माट्यांची विनंती फडकऱ्यांनी धुडकावून लावली. अखेर पतितपावन मंदिराच्या कल्पनेस सामान्य जनता, वैदिक शास्त्री-पंडित, वारकरी संप्रदायाचे फडकरी अशा कुठूनच अनुकूल प्रतिसाद न मिळाल्याने आपण असे देऊळ बांधले तर लोकांच्या लेखी तो *'महाराचा विठोबा'* म्हणूनच ओळखला जाणार हे स्पष्ट दिसू लागल्यावर माटे व हरिभाऊ फाटक यांनी ही कल्पना सोडून द्यायचे ठरवले. ( माटे २०१०, पृ. १७८-१८५)

१९२७ साली मुंबईत हिंदू महासभेने माटुंग्याला अस्पृश्यांना देवदर्शनासाठी खुले राहील असे नवे देऊळ बांधण्याचा संकल्प घोषित केला व जनतेकडून निधी संकलनाचे काम सुरू केले होते. *'अस्पृश्यतानिवारणाचा पोरखेळ'* अशा शब्दांत या उपक्रमांची निरर्थकता स्पष्ट करताना डॉ. आंबेडकरांनी म्हटले होते की, " निराळी व्यवस्था करण्याने जर अस्पृश्य लोक स्पृश्य होते तर महारवाडे, चांभारवाडे व ढोरवाडे हे आज अनादिकालापासून वेगळेच आहेत; त्याचा परिणाम काय झाला आहे याचे जागती ज्योत उदाहरण डोळ्यांपुढे असता निराळे देऊळ बांधल्याने अस्पृश्यला निवारण होईल असे म्हणणे शुद्ध पोरकटपणा नव्हे काय?" मुंबईत अस्पृश्य लोकांपैकी चांभार लोकांचे एक विठोबारुक्माईचे देऊळ होते. असे "निराळे देऊळ बांधल्याने चांभार लोक स्पृश्य तर झाले नाहीतच, पण बिचारा पांडुरंग आपल्या रुक्मिणीसह अस्पृश्य मात्र झाला." (बहिष्कृत भारत, ३ जून १९२७) 'देवळावाचून आमचे अडलेले नाही. मात्र सामाजिक उपासना व सामाजिक संमेलन अथवा ऐक्य यासाठी देवळे पाहिजे असतात. आम्हाला समाजात समान हक्क हवेत आणि ते आम्ही शक्य तोवर हिंदू समाजात राहून आणि जरूर तर कवडीमोल ठरलेल्या हिंदुत्वावर लाथ मारून मिळवणार आहो आणि हिंदुत्वावर पाणी सोडण्याची पाळी आली तर अर्थातच आम्ही देवळांच्या वाटेला जाणार नाही.' (आंबेडकर २००५ क, पृ. ६७) अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशाचे सामाजिक दुखणे किती अवघड होते, याची यावरून कल्पना येते. असे असले तरी सामाजिक समरसता निर्माण करायची असेल तर अस्पृश्यांना सन्मानाने व बरोबरीच्या नात्याने मंदिरप्रवेशाचा हक्क

दिला पाहिजे, याविषयी सामाजिक नेते विचार करू लागले होते. या भूमिकेतूनच महाराष्ट्रात मंदिरप्रवेशाच्या सत्याग्रहाची चळवळ सुरू झाली होती.

**सावरकरांची भूमिका :**

देवस्थानी अस्पृश्यांना खुला प्रवेश असावा आणि स्पृश्यांप्रमाणे अस्पृश्यांनाही देवपूजेचा अधिकार असावा यासाठी स्वा. सावरकरांनी चळवळ सुरू केली होती. गणेशोत्सवात प्रत्येक जातीचा गणपती बसवला जात असे. मात्र विसर्जनाच्या मिरवणुकीत अस्पृश्यांचे गणपती व स्पृश्यांचे गणपती यांच्यात शिवाशिव होऊ देत नसत. सावरकरांनी १९२४ साली नाशिकला गणपती विसर्जनाच्या मिरवणुकीत महारबंधूंच्या गणपतीला अग्रस्थान, दुसरा मान काठेवाडी मेहतरांना व तिसरा मान धनगर बंधूंच्या गणपतीला देण्याची योजना करून सार्वजनिक जीवनात ब्राह्मण-ब्राह्मणेतर, स्पृश्य-अस्पृश्य भाव मिटविण्याचा प्रयत्न केला होता. ४ सप्टेंबर १९२४ रोजी भंगीवाड्यात पानसुपारीच्या कार्यक्रमाला शहरातील सर्वजातीय लोकसमाज एकत्र आला होता. त्यावेळी झालेल्या सभेत स्वा. सावरकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले होते की, "अस्पृश्यतेचा नाश झालेला मी माझ्या डोळ्यांनी पाहीन असा मला विश्वास वाटतो व माझी अशी इच्छा आहे की, मी मेल्यावर माझे प्रेत वाहण्यास ब्राह्मण, वाणी यांबरोबर धेड, डोंब हेही यावेत व मला दहन करावे, म्हणजे माझ्या आत्म्याला समाधान लाभेल." (लोकसत्ता, ६ सप्टें. १९२४) १९२५ साली रत्नागिरीतही संत नामदेवाच्या पायरीशी सर्व पूर्वास्पृश्यांचा गणपतीमेळा बसवून गावातील स्पृश्यांना अस्पृश्यांनी आयोजित केलेल्या पानसुपारीच्या कार्यक्रमात एकत्र आणण्याचा यशस्वी उपक्रम त्यांनी केला होता. १९२५ साली रत्नागिरीत कार्तिकी एकादशीच्या रथाच्या मिरवणुकीत सर्व हिंदूंच्या दिंड्यांबरोबर खांद्याला खांदा लावून अस्पृश्यांच्या दिंड्यांना सहभागी करवून घेण्याचा उपक्रम केला होता. स्पृश्य-अस्पृश्यांच्या दिंड्यांच्या अशा सरमिसळीमुळे देव बाटत नसतो असा समज लोकमानसात दृढ करण्याची भूमिका या उपक्रमामागे होती. शिरगावला गुरव समाजातील महादेव लक्ष्मण यांनी बांधलेल्या हनुमान मंदिराच्या प्राणप्रतिष्ठापनेसाठी सावरकरांना निमंत्रित करण्यात आले होते. या संधीचा उपयोग करवून घेऊन सावरकरांनी पालखी प्रदक्षिणेत अस्पृश्यांना सामावून घेण्याचे वचन घेतले, शिवाय भजनात पूर्वास्पृश्यांच्याही भजनीमेळ्याचे भजन होईल अशी व्यवस्था केली. यानिमित्ताने केलेल्या भाषणात सावरकर म्हणाले की, "त्र्यंबकेश्वर अथवा काशिविश्वेश्वर यांची देवळे नि संस्थाने फार भव्य नि श्रीमंत आहेत. तेथील प्रदक्षिणेच्या वाटेवर कुत्री, मांजरे, गाढवे फिरत असतात.. पण माणसासारखे माणूस , आणि आपले धर्मबंधू नि आपल्याच देवाचे पूजक महार, मांग, भंगी आदी आहेत, त्यांना मात्र त्या वाटेवर जाण्यास मज्जाव आहे! त्यामुळे त्या मोठ्या नि श्रीमंत मंदिरापेक्षा सर्व हिंदूंना जेथे प्रदक्षिणा घालता

येते ते हे छोटेसे मंदिर मला अधिक महान वाटते." (सावरकर बाळाराव, १९७२, पृ. ८३-८४) देवरुखच्या चांभरांनी बांधलेल्या विठ्ठल मंदिरात महार-मांग-भंग्यांना प्रवेश नसे. तिथेही सावरकरांनी चांभार समाजाच्या लोकांची समजूत घालून इतर अस्पृश्यांना चांभारांच्या विठ्ठलमंदिरात प्रवेशाची मुभा मिळवून दिली.

**रत्नागिरीचे पतितपावन मंदिर :**

अस्पृश्यांना देवालय नाही तेव्हा त्यांच्यावरचा अन्याय दूर करण्यासाठी एक स्वतंत्र मंदिर बांधण्याची सूचना भागोजी कीर या भंडारी जातीतील धनवान गृहस्थास सावरकरांनी केली. भागोजी कीरांनी त्यास संमती देऊन मंदिर बांधले. डॉ. कुर्तकोटी शंकराचार्य यांच्या हस्ते १० मार्च १९२९ रोजी पायाभरणीची कोनशिला बसविण्यात आली. 'पतितपावन मंदिर' या नावाने हे मंदिर ओळखले जाते. अर्थात केवळ अस्पृश्यांसाठी हे मंदिर असता कामा नये, ते अस्पृश्यांसह सर्व हिंदूंचे मंदिर असावे, ही सावरकरांची भूमिका होती. या मंदिरासंबंधीच्या नियमावलीत त्यांनी तसा खुलासा केला होता. पतितपावनाच्या देवळात नेमला जाणारा पुजारी हिंदूंतील पूर्वास्पृश्यांसुद्धा कोणत्याही जातीचा असला तरी केवळ जातिभेदाच्या कारणासाठी त्यास हरकत घेतली जाणार नाही. एक सार्वजनिक धर्मकेंद्र असेच या मंदिराचे स्वरूप असेल. पतितपावन मंदिराचा कोनशिला समारंभ झाल्यानंतर डॉ. आंबेडकर यांनी बहिष्कृत वर्गासाठी खास देवळांची गरज नसून अशी देवळे बांधल्याने अस्पृश्यतेचा प्रश्न सुटणे अधिकच लांबणीवर पडेल अशा आशयाची टीका केली. ('बहिष्कृत भारत', १२ एप्रिल १९२९) सावरकरांनी या टीकेची दखल घेऊन पतितपावन मंदिरामागील आपल्या भूमिकेचे विस्ताराने स्पष्टीकरण देणारा लेख १८ मे १९२९ च्या 'बलवंत' पत्रातून प्रसिद्ध केला. "अस्पृश्यांसाठी स्वतंत्र आणि त्यांच्यापुरतीच नवी देवळे हा अस्पृश्यतानिवारणाचा खरा मार्ग नव्हे" ह्या विचाराशी असलेली सहमती व्यक्त करून त्यांनी या लेखात लिहिले होते की, ".. कितीही नवी मंदिरे बांधली तरी पंचवटीचा राम, काशीचा विश्वेश्वर, रामेश्वर इत्यादी देवालयांत पूर्वास्पृश्यादिक अखिल हिंदूंचा प्रवेश-पूजाधिकार समानतेने मिळाल्यावाचून अस्पृश्यता नष्ट झाली असे म्हणताच यावयाचे नाही, हे रत्नागिरी हिंदुसभेने वारंवार कंठरवाने लेखांतून, भाषणांतून आणि कृतीतून व्यक्त केलेले आहे. या वस्तुस्थितीशी मतभेद असेल त्यांनी तो अवश्य सांगावा, परंतु अप्रामाणिकपणे किंवा अक्षम्य आळशीपणाने वस्तुस्थितीचा विपर्यास मात्र करू नये." (सावरकर , १९६४, खंड ४, पृ. ४९१-४९३) त्यानंतर २२ फेब्रुवारी १९३१ रोजी शूद्राला वेदोक्ताचा अधिकार नसतानाही वेदोक्ताची बंदी मोडून सावरकरांनी भागोजी कीरांच्या हस्ते विष्णूमूर्तीची वेदोक्त पद्धतीने प्राणप्रतिष्ठापना करवून घेतली. चांभारांचे नेते पां. ना. राजभोज यांनी मूर्तीची व शंकराचार्यांची पूजा केली. यावेळी काशीच्या ब्राह्मणांनी केलेला विरोध

सावरकरांनी मानला नाही. जन्माने ब्राह्मण तोच पुरोहित ही व्याख्या टाकून देऊन आपली 'नवी अखिल हिंदुस्मृती' कोणती ती जाहीरपणे सांगितली. "हा जो इथे मराठे, महार, चांभार, भंडारी, ब्राह्मण, भंगी अखिल हिंदुसमाज दाटलेला आहे, त्या शतावधी धर्मबंधूंसह आम्ही ही देवमूर्ती अनंत हस्ती उचलून 'जय देवा!' असे गर्जून स्थापणार! हाच आमचा विधी! 'हिंदुधर्म की जय'चे हजारो कंठांतून निघणारे जयघोष हाच आमचा वेदघोष नि 'भावे हि विद्यते देव:' हा आमचा शास्त्राधार!" (मोरे शेषराव, २०१५, पृ. १७४-१७५) याच दिवशी पतितपावन मंदिराच्या प्रांगणात सावरकरांच्या अध्यक्षतेखाली 'मुंबई इलाखा अस्पृश्यतानिवारक परिषदे'चे सहावे अधिवेशनही पार पडले. शिवाय 'अन्नसंतर्पण' कार्यक्रमात सजातीय व सहभोजनी अशा दोन पंक्तीतून भोजनाचा कार्यक्रम झाला. त्यात सहाशेहून अधिक लोकांनी पंक्तीत सर्वजातीय सहभोजन जेवण घेतले; पूर्वास्पृश्यांनी वाढपाचे काम केले. सावरकरांनी आपल्याला बाटवले अशी ओरडही काही लोकांनी केली; पण जातीय तेढ कमी करण्यासाठी हा कृतिकार्यक्रम महत्त्वाचा ठरला.

देऊळ बांधून झाल्यावर डॉ. आंबेडकरांनी पतितपावन मंदिर बांधण्याच्या सावरकरांच्या भूमिकेची समीक्षा करताना लिहिले होते की, "लाखाचे देऊळ बांधण्याऐवजी या लाख रुपयांच्या मदतीने एखादे दुसरे जुने देऊळच सर्वांना खुले केले असते तर ते कार्य बॅ. सावरकरांच्या हेतूला नि:संशयपणे अधिक पोषक झाले असते.... एरवी नवीन मंदिराबाबत जे नियम केलेले आहेत ते अत्यंत व्यापक व हिंदुजनतेची ब्राह्मणीधर्माच्या मगरमिठीतून सुटका करावयास पाहिजे तसे आहेत.. बॅ. सावरकरांनी तयार केलेल्या या नियमावलीत आजच्या जातिभेदप्रणीत उच्चनीचत्वाच्या कल्पनेचा समूळ उच्छेद करण्यात आला आहे व त्याबद्दल त्यांचे आम्ही सविनयपूर्वक अभिनंदन करतो. पण जातिभेदविध्वंसक व अस्पृश्यतानिवारक हे अमृत त्यांनी जुन्या देवळांद्वारे जनतेच्या पचनी पाडावे.. नवीन देवळे हे अमृत पोहचविण्यास पुरणार नाहीत आणि उपयोगीही पडणार नाहीत."('जनता', ९ मार्च १९३१) सावरकरांच्या पतितपावन मंदिराच्या प्रकल्पावर नंतरच्या काळातही बरीच उलटसुलट मतमतांतरे व्यक्त झालीत; मात्र असे असले तरी या पतितपावन मंदिराला अस्पृश्यतानिवारणाच्या चळवळीत एक महत्त्वाचे स्थान आहे. ३० सप्टेंबर १९३१ च्या 'टाइम्स ऑफ इंडिया'तील पुढील वृत्तांत यादृष्टीने पुरेसा बोलका आहे : "रत्नागिरी येथे अखिल हिंदूंना देवदर्शनासाठी खुले असलेल्या वीर सावरकरनिर्मित पतितपावन मंदिरात भंगी जातीच्या बुवांनी कीर्तन करावयाचे व उच्चवर्णी हिंदूंनी त्यांचे गळ्यात हार घालून त्यांचे पायावर डोके ठेवायचे ही आजवर कधीही न पडलेली प्रथा पाडून सावरकरांनी महान क्रांती केली आहे." (मोरे शेषराव, २०१५, पृ. १७६) अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशाने सामाजिक ऐक्यभाव कसा वाढीस लागतो, याचा प्रत्यय देणाऱ्या या घटना होत्या.

**अमरावतीचा अंबाबाई मंदिर प्रवेश सत्याग्रह (१९२७) :**

अमरावती येथे प्राचीन अंबादेवी मंदिरात अस्पृश्य हिंदूंना प्रवेश द्यावा असा अर्ज तेथील सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांनी मंदिराच्या विश्वस्तमंडळाकडे केला होता. दोन वेळा अर्ज फेटाळण्यात आल्यावर या विषयीचा निर्णय करण्याकरिताडॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पुढाकाराने २६ जून १९२७ रोजी अमरावतीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेला गणेश गवई, देवराव नाईक, रा. ना. शिवतकर, बॅ. तिडके, पंढरीनाथ पाटील, नानासाहेब अमृतकर इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते. मंदिर प्रवेशाचा सत्याग्रहामागे हिंदूंच्या सांस्कृतिक मानसिकतेत मूलगामी बदल घडवून आणण्याची व अस्पृश्यांमध्ये मानवी हक्कांसाठी जागृती घडवून आणण्याची प्रेरणा पायाभूत होती. 'अस्पृश्यांच्या प्रवेशाने देवालय भ्रष्ट होत नाही, किंवा त्यांच्या स्पर्शाने मूर्तीचे पावित्र्य कमी होत नाही'; पण मंदिरप्रवेशाचा प्रश्न सांस्कृतिकदृष्ट्या कसा महत्त्वाचा आहे, याविषयी डॉ. आंबेडकरांचे भाषण झाले. त्यांच्या मते "हिंदुत्व ही जितकी स्पृश्यांची मालमत्ता आहे, तितकीच अस्पृश्यांची आहे. ह्या हिंदुत्वाची प्राणप्रतिष्ठा जितकी वसिष्ठासारख्या ब्राह्मणांनी, कृष्णासारख्या क्षत्रियांनी, हर्षासारख्या वैश्यांनी, तुकाराम सारख्यांनी केली, तितकीच वाल्मिकी, चोखामेळा व रोहिदास इत्यादी अस्पृश्यांनी केलेली आहे. या हिंदुत्वाचे रक्षण करण्यासाठी हजारो अस्पृश्यांनी आपली माणुसकी खर्ची घातली आहे... हिंदुत्वाच्या नावाखाली उभारलेली मंदिरे जितकी स्पृश्यांची तितकीच अस्पृश्यांचीही आहेत. त्यावर जितका स्पृश्यांचा तितका अस्पृश्यांचा वारसा आहे. एकदा वारसा मान्य केला की, जुन्या वहिवाटीचा प्रश्न शिल्लक राहात नाही. कायद्याच्या दृष्टीने पाहता सार्वजनिक बाबतीतील व्यक्तिमात्राचा हक्क कोणास काही सनद देऊन निर्माण करावयाचा नसतो. तो दरेकाच्या ठायी कायम असतो. त्याची वहिवाट नसली किंवा त्याच्या वहिवाटीत जरी खंड पडला तरी तेवढ्यावरून तो हक्क हिरावला जात नाही." (खरात, २०१३, पृ. ९०-९१) अंबादेवी मंदिराचे विश्वस्त दादासाहेब खापर्डे यांनी ही भूमिका लक्षात घेऊन अस्पृश्यांना मंदिर प्रवेश देण्याचे आश्वासन दिल्याने हा पेच सुटला.

**पुण्याचा पर्वती मंदिर प्रवेश सत्याग्रह (१९२९) :**

पुण्याला पर्वती मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून १३ ऑक्टोबर १९२९ रोजी सत्याग्रह करण्यात आला. हा सत्याग्रह घडवून आणण्यात सुरुवातीला पुण्याच्या अस्पृश्यता निवारक मंडळाने पुढाकार घेतला होता. सत्याग्रहापूर्वी ल. ब. भोपटकर यांनी पर्वती देवस्थानाच्या पंचांना आवाहन करणारे पत्र पाठविले होते व २७ ऑगस्ट १९२९ च्या 'केसरी'तही ते पत्र प्रसिद्ध केले होते. त्या पत्रात म्हटले होते की, "पर्वती देवस्थान सार्वजनिक स्वरूपाचे असून त्याची व्यवस्था पंचामार्फत होत असते. .. हिंदू समाजापैकी

अस्पृश्य गणले गेलेले पोटसमाज हिंदुधर्मीय असल्याबद्दल पंचांना पूर्ण जाणीव आहे, असे समजण्यास हरकत नाही. पर्वतीच्या पायऱ्या चढताना एक लहानसा पीर ज्या देवस्थानाच्या हद्दीत दृष्टीस पडतो व जो पंचांना सहन करवतो, ते देवस्थान व पंच स्वधर्मीयांबद्दल असहिष्णू असण्याचा संभव नाही. अस्पृश्य समाजाची अस्पृश्यता घालवून टाकण्याविषयी सर्व राष्ट्रीय पुढाऱ्यांची जी एकसुराने विनवणी चाललेली आहे, तिचा ध्वनी-प्रतिध्वनी पंचांच्या कानावर गेला असून त्याचा पडसाद त्यांच्या अंत:करणात उमटत असलाच पाहिजे. म्हणून या पत्राद्वारे मी त्यांना अशी जाहीर विनंती करण्याचे धाडस करतो की, .. देवस्थानच्या आवारात अस्पृश्यास्पृश्य भेदभाव यंदापासून नष्ट करावा, व सर्व देवस्थान व देवता सर्व हिंदुधर्मियांना खुल्या कराव्यात व त्यांच्या धन्यवादाचे धनी व्हावे!" (आंबेडकर २००५ ख, पृ. ४९२-४९३) पंचांकडून ८ ऑक्टोबर १९२९ च्या 'केसरी'तून खुलासा करण्यात आला की हे देवस्थान श्री. बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांनी आपल्या खाजगी खर्चाने बांधले असून अस्पृश्य वर्गास तेथे जाण्याचा हक्क नाही व वहिवाटही नाही. या खुलाशामुळे पर्वती ट्रस्टशी वाटाघाटी करण्यात व्यत्यय निर्माण झाला. सत्याग्रह करावा किंवा करू नये याविषयी उलटसुलट प्रतिक्रिया उमटल्या, तशी पत्रेही केसरीतून प्रसिद्ध झाली. अशा वातावरणात अमर्याद सत्याग्रहाचा पुरस्कार करणाऱ्यांनी उचल खाल्ली व ठरल्याप्रमाणे १३ तारखेस सत्याग्रह झाला. केशवराव जेधे, काकासाहेब गाडगीळ, एस. एम. जोशी यांनी सत्याग्रहात भाग घेतला होता.

सत्याग्रहासाठी स्पृश्य व अस्पृश्य वर्गातील तीन चार हजार लोकांची गर्दी लोटली होती. अस्पृश्य वर्गातील सत्याग्रहींमध्ये स्त्रियांचाही उत्स्फूर्त सहभाग होता. ही मंडळी भजने म्हणत दिंडीने सत्याग्रहस्थळी पोहचली. मात्र देवस्थानच्या पंचांनी मंदिराचे सर्व दरवाजे कुलुपे लावून बंद केले होते. खबरदारीचा उपाय म्हणून कलेक्टर मि. गुल्ड हे पोलिसबंदोबस्त घेऊन हजर होते. शिवराम जानबा कांबळे, पांडुरंग नथुजी राजभोज, श्री. रा. थोरात, न. वि. गाडगीळ यांची भाषणे झाली. सत्याग्रहींच्या पाच तुकड्या करून पाठोपाठ सत्याग्रही मंदिराच्या दिशेने वर चढू लागल्यावर रेटारेटी सुरू करून सत्याग्रहींना धमकावण्याचा प्रकार सुरू झाला. दगडफेक झाली व दंगल माजली. पांडुरंग राजभोज त्यात मुर्छित पडले, देशदास रानडे जबर जखमी झाले. न. वि. गाडगीळ, विनायकराव भुस्कुटे जखमी झाले. आर्यसमाजी स्वामी योगानंदांना ढकलून दिल्याने ते पायऱ्यांवरून गडगडत खाली फेकले गेले. कलेक्टरांकडून देवस्थानचा रस्ता सार्वजनिक असल्याने अडवता येणार नाही अशी जमावाला समज देण्यात आली. सत्याग्रही मंडळी मंदिराच्या दरवाजापर्यंत पोहचली, पण दरवाजा बंद असल्याने पायरीवर डोके टेकवून परतली. (आंबेडकर,२००५, ख - पृ. ४९४-५०४)

अस्पृश्यतानिवारक मंडळीने ऐनवेळी या सत्याग्रहाशी आपला संबंध नसल्याचे जाहीर केले. अस्पृश्य वर्गात फाटाफूट पाडण्याचाही प्रकार झाला. पुण्यातील मातंग व हरळे चांभार समाजाच्या पुढाऱ्यांनीही या सत्याग्रहात आपण भाग घेणार नसल्याचे जाहीर केले. ६०-६५ महार लोकांच्या सहीचे पत्र प्रसिद्ध करून त्यांचा सत्याग्रहास विरोध असल्याचे जाहीर करण्यात आले. या दुटप्पीपणाची दखल घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'पुणे म्हणजे बदमाशांचा अड्डा व लबाडांची पेठ आहे' अशा कठोर शब्दात टीका केली. त्यांनी 'बहिष्कृत भारत' मधून लिहिले की, " अस्पृश्यता निवारणाचा प्रसार करून देवळे उघडावी असे ज्यांनी प्रतिपादन केले .. त्याच लोकांनी ऐन वेळी सत्याग्रहाशी आमचा काही संबंध नाही असे म्हणून अवसानघात केला. इतकेच नव्हे तर त्यांनी अस्पृश्यांत फूट पाडून त्यांच्या कार्यातील अडचणी शतगुणीत केल्या. अशा प्रकारचे नामधारी अस्पृश्यतानिवारक लोक आमच्या मते उघडपणे दंडेली करणाऱ्या सनातन्यांपेक्षाही हीन दर्जाचे ठरतात." (आंबेडकर, २००५ ख, पृ. १७५) स्पृश्यांनी पर्वती टेकडीवर जे अत्याचार केले त्याचा निषेध करण्यासाठी कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पुण्याच्या रे मार्केटसमोर जाहीर सभा झाली. १९२९ साली सी. बी. लांडगे यांनी 'पर्वती-सत्याग्रह' नामक पुस्तिका प्रसिद्ध केली, या पुस्तिकेच्या प्रस्तावनेत वि. रा. शिंदे यानी राष्ट्रीय सभेने या प्रश्नी धारण केलेल्या मौनावर टीका केली होती. 'अस्पृश्यता कायम ठेवून हिंदुस्थानने स्वराज्य भोगावयास पुढे सरसावणे म्हणजे सर्व जगाला धोका आहे' असा इशाराही त्यांनी या प्रस्तावनेच्या माध्यमातून दिला. ज्यांना स्वराज्य पाहिजे असेल त्यांनी दुसऱ्यांना स्वराज्य दिले पाहिजे, ज्यांना मानवी हक्क पाहिजेत, त्यांनी दुसऱ्यांना मानवी हक्क दिले पाहिजेत. ही देवाण-घेवाण प्रत्येक जीवाला, प्रत्येक समाजाला, प्रत्येक धर्माला, प्रत्येक राष्ट्राला, प्रत्येक साम्राज्याला लागू आहे" ह्या व्यापक मानवधर्माचा विचार या पुस्तिकेतून त्यांनी मांडला. (खरात, २०१७, पृ. १३, २४)

१४ ऑक्टोबर १९२९ च्या 'केसरी' पत्रातून न. चिं. केळकर यांनी अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशाच्या हक्काचे समर्थन करणारा लेख प्रसिद्ध केला. या लेखातून हा प्रश्न सामोपचाराने कसा सोडवता येईल याविषयी नांदेडच्या गुरुद्वाराचे व कोकणातल्या मंदिरांतील देवदर्शनाच्या प्रथांचा हवाला देऊन त्यांनी एक मध्यममार्गी तोडगा सुचविला. नांदेडच्या गुरु गोविंदसिंग यांच्या समाधीच्या गाभाऱ्यात पुजारी सोडून इतर कुणीही आत पाऊल टाकत नसल्याची वहिवाट आहे. कोकणातल्या देवळांत खुद्द सभामंडपातच स्पृश्यांखेरीज अस्पृश्यांकरिता म्हणून एक ठरीव भाग आखून दिलेला असतो. मर्यादा म्हणून मध्ये एखादे आडवे लाकूड बांधलेले असते. या पद्धतीला अनुसरून देवळाच्या गाभाऱ्यात स्वच्छता व पावित्र्य राखण्यासाठी मूर्तीला प्रत्यक्ष स्पर्श न करता किंवा त्यावर पाणी वगैरे न घालता ठरावीक अंतरावरून देवदर्शन घेण्याची स्पृश्य व अस्पृश्यांसाठी

समान प्रथा सुरू करावी, असा पर्याय केळकरांनी सुचविला. या गोष्टीला ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांनी संमती दिल्याने एक फार मोठे कार्य होणार आहे. .. पूर्वी जपानात 'सॅमुराय' लोकांना विशेष हक्क होते. ते त्यांनी आपखुषीने सोडून दिल्याबरोबर त्या राष्ट्रात ऐक्याचे चैतन्य एकदम संचारले. आणि देवदर्शनाच्या बाबतीत ब्राह्मण किंवा ब्राह्मणेतर यांनी आपापले विशेष हक्क सोडून देऊन, अस्पृश्यांसुद्धा ते सर्व जर देवालयात एकाच ठरीव स्थानापासून देवदर्शन करू लागतील तर हिंदू समाज एकजीव होण्याला, त्याचे संघटन होण्याला फार सोपे जाईल." (केळकर, भाग २, उतारे धार्मिक-सामाजिक,१९३२,पृ. १७०-१७१)

अस्पृश्यतानिवारणाचा प्रश्न सत्याग्रहापेक्षा मतपरिवर्तनाने सोडवावा असा युक्तिवाद करणाऱ्यांचा डॉ. आंबेडकरांनी खरपूस समाचार घेतला. त्यांच्या मते हिंदू जनता ही रामदासाने सांगितल्याप्रमाणे सिद्ध, साधक किंवा मुमुक्षु या कोणत्याच वर्गात येऊ शकत नाही. ती फक्त बद्ध वर्गात येऊ शकते. अशा बद्ध लोकांत कोणत्याही प्रश्नाची ज्ञानयुक्त धारणा करावयास लावण्यास त्यांच्या आचारांत व विचारांत मोठी क्रांती घडवून आणली पाहिजे. त्याशिवाय ते आत्मनिरीक्षण करण्यास उद्युक्त होणार नाहीत व तसे जोपर्यंत नाही तोपर्यंत त्यांच्यात मतांतर होणार नाही. स्वराज्य मिळविण्याचे प्रयत्न चालू असताना अस्पृश्यांनी आपल्या हक्काचे भांडण पुढे करून देशात दुही माजवणे बरे नाही, असे म्हणणाऱ्या तथाकथित स्वराज्यवाद्यांना उत्तर देताना डॉ. आंबेडकरांनी लिहिले होते की, "जे लोक आज आम्हाला साधे माणुसकीचे हक्क देण्यास तयार नाहीत ते उद्या स्वराज्य मिळाल्यावर आमची माणुसकी ओळखतील व स्वत:च्या माणुसकीला जागतील असे मानणारा एकही अस्पृश्य नाही. म्हणूनच ज्या स्वराज्याला स्पृश्य लोक भाग्य असे म्हणतात त्यालाच अस्पृश्य लोक एक मोठी आपत्ती आहे असे समजतात... अस्पृश्यांची गुलामगिरी कायम ठेवण्याकरिताच जर स्वराज्य मिळविण्याची खटपट असेल तर अशा खटपटीला जितकी विघ्ने आणता येतील तितकी विघ्ने आणणे हे अस्पृश्य वर्गातील दरेक व्यक्तीने आपले कर्तव्यकर्म म्हणून समजले पाहिजे." (आंबेडकर, कित्ता, पृ. १७९)

**नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह (१९३०-१९३२) :**

१९३० च्या नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रहमालिकेतील पहिल्या प्रस्तावित सत्याग्रहाची पूर्वतयारी वर्षभर आधीच सुरू झाली होती. १७ नोव्हेंबर १९२९ रोजी देवळाली येथे संभाजी येसू रोकडे यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक जिल्ह्यातील महार समाजाचा संघ स्थापन करण्यात आला होता. दादासाहेब गायकवाड यांनी संघाच्या चिटणीसपदाची जबाबदारी स्वीकारली. त्यानंतर २५ जानेवारी १९३० रोजी त्र्यंबकेश्वरला निवृत्तिनाथांच्या जत्रेच्या प्रसंगी अमृतराव रणखांबे यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन सत्याग्रहींची नोंदणी सुरू झाली. काळाराम मंदिरांच्या पुजाऱ्यांनी

अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशाबाबतची आपली भूमिका जाहीर केली होती. 'हे मंदिर सार्वजनिक नसून देवस्थान पुजाऱ्यांच्या ताब्यात आहे. मंदिरात सोडण्याचा अथवा मज्जाव करण्याचा पंचांना अधिकार नाही. स्वार्थबुद्धीने पंच मंदिरप्रवेशाची परवानगी देतील तर त्याचा प्रतिकार केला जाईल'. पुजाऱ्यांनी गव्हर्नरास तार करून 'महारांच्या बेकायदेशीर कृत्यांना मनाई करण्याचे हुकूम द्यावेत' अशी विनंती केली होती. याउलट अस्पृश्यांच्या मते या मंदिराला वार्षिक हजार रुपयांचे सरकारी अनुदान मिळत असल्याने मंदिर सार्वजनिक मालकीचे आहे. अशा परस्परविरुद्ध दाव्यांच्या पार्श्वभूमीवर १३ फेब्रुवारी १९३० रोजी सवर्ण हिंदूंची जाहीर सभा झाली. श्रीधर अण्णाशास्त्री, गोपाळशास्त्री पुराणिक यांनी अस्पृश्यांना मंदिरप्रवेशाचा हक्क नसल्याचे सांगितले, तर नीळकंठराव पाटणकर वकील व काँग्रेस नेते रघुनाथ हरि गद्रे यांनी अस्पृश्यांची बाजू लावून धरली. जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष व्ही. बी. आकूत तटस्थ राहिले.

२ मार्च १९३० रोजी सत्याग्रह करण्याचे नक्की झाले. सत्याग्रह सुरु करण्यापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दादासाहेब गायकवाड यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले होते की, "मंदिरप्रवेशाने तुमचा सर्वच प्रश्न सुटेल असे मुळीच म्हणता येणार नाही. आपल्या प्रश्नाचे स्वरूप व्यापक आहे. ते राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक अशा स्वरूपाचे आहे. पण आजचा हा आपला काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह हे उच्चवर्णीय हिंदू मनास एक प्रकारचे आवाहन आहे. हिंदू आपल्यासारख्या माणसांना माणूस म्हणून किंमत देणार आहेत की नाही? आम्ही उच्चवर्णीय हिंदू मनाची ही एक परीक्षा घेत आहोत. आम्हाला माहीत आहे, मंदिरात दगडाचा देव आहे. त्याचे दर्शन झाल्याने व त्याची पूजा केल्याने आमचा सर्वस्वी प्रश्न सुटणार नाही, हे आम्ही जाणतो. आजचा सत्याग्रह हा हिंदूंच्या मनात बदल घडवून आणण्याचा प्रयत्न आहे". (खरात, २०१३, पृ. ९० / फडके य. दि. २०१४, पृ. ६५-६६)

२ मार्च १९३० च्या सत्याग्रहासाठी नागपूर, धुळे, जळगाव, मुंबई, रत्नागिरी इत्यादी ठिकाणांहून आठ हजार अस्पृश्य नाशिकच्या महारवाड्यात जमा झाले. महमद झकेरिया मणियार यांनी अस्पृश्यांसाठी आपला बंगला वापरण्यास दिला. सत्याग्रहासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासोबत देवराव नाईक, डी. व्ही. प्रधान, बाळासाहेब खेर, स्वामी आनंद, पत्रकार बाळकृष्ण जनार्दन मराठे इत्यादी मान्यवर नाशकात दाखल झाले. सत्याग्रह्यांमध्ये सदतीस स्त्रियांचाही सहभाग होता. सत्याग्रहींनी खादीचा वेष परिधान करून गांधी टोप्या घातल्या होत्या. काही लोक गीते गाऊन वातावरणनिर्मिती करीत होते. महारवाड्यात डॉ. आंबेडकरांची सभा झाल्यानंतर चार चार सत्याग्रहींच्या ओळी करून सत्याग्रही मिरवणुकीने मंदिराकडे निघाले. मिरवणुकीत समता सैनिक दलाचे तरुण, लष्करी पद्धतीचा बँड, सनया, तुताऱ्या आणि रणशिंगे फुंकीत, जयघोष करीत व

भजने म्हणत शिस्तबद्धपणे पुढे सरकत होते. नाशिकचे जिल्हाधिकारी गार्डन यांनी देवळाचे दरवाजे बंद करण्याचा हुकूम दिला. सत्याग्रहींच्या पथकांनी मंदिराच्या चारही दरवाजांवर ठाण मांडले. पूर्व दरवाजावर कचरू मथूजी साळवे, पश्चिम दरवाजावर शंकरदास नारायणदास, उत्तर दरवाजावर पतितपावनदास आणि दक्षिण दरवाजावर पांडुरंग नथूजी उर्फ बापूसाहेब राजभोज यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रहींनी धरणे धरले. ३ मार्चला सवर्ण हिंदूंची शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन नीळकंठराव पाटणकर यांनी तडजोडीसाठी पुढाकार घ्यावा असा प्रस्ताव मांडण्यात आला. मात्र सुधारणेस अनुकूल असणाऱ्या ब्राह्मणांवर सनातन्यांनी दगडफेक व चपलांचा मारा करून हुल्लड माजवली आणि तडजोडीचा प्रस्ताव निकालात काढला. हिंदू महासभेचे डॉ. नारायणराव सावरकर, डॉ. मा. भै. उद्गावकर, भालचंद्र धडफळे यांनी तडजोडीचा एक नवा पर्याय पुढे आणला. मंदिराच्या गाभाऱ्यात जाऊन दर्शन घेण्याऐवजी स्पृश्यांना जेवढ्या अंतरावरून देवदर्शन घेता येते तेवढ्याच अंतरावरून अस्पृश्यांनाही देवदर्शन घेण्याची परवानगी द्यावी. मात्र ही सूचनाही सनातन्यांनी फेटाळून लावली. ८ मार्चला आयुक्त घोषाळसाहेब नाशिकला आले, त्यांनी डॉ. आंबेडकरांशी बोलणी करून तडजोडीचा मार्ग निघतो का यादृष्टीने प्रयत्न केले; पण त्याला यश आले नाही. कुठलाही गैरप्रकार न होता सत्याग्रह सुरू राहिला.

रामनवमी जवळ आली म्हणून १ एप्रिल १९३० रोजी पुजाऱ्यांनी मंदिराचे दरवाजे उघडले; मात्र ३ एप्रिल १९३० रोजी पुन्हा सत्याग्रहाला सुरुवात झाली.१४४ कलम लागू करून जमावबंदी घोषित करण्यात आली. बापूसाहेब राजभोज यांच्यासह बारा सत्याग्रहींना अटक करण्यात आली. ४ व ५ एप्रिलला दादासाहेब गायकवाडांसह ६८ सत्याग्रहींना अटकेत ठेवले. ७ एप्रिलला डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली पुजाऱ्याच्या घरासमोरून मिरवणूक काढण्यात आली. रामनवमीच्या दिवशी शांतताभंग झाला नाही. ९ एप्रिलला रथयात्रा होती. राम मंदिराच्या पूर्व दरवाजापर्यंत स्पृश्य हिंदूंनी रथ आणावा व तेथून पुढे स्पृश्य व अस्पृश्य यांनी मिळून रथ न्यावा अशी तडजोड ठरली. रथ ओढण्यास दादासाहेब गायकवाड यांच्याखेरीज अस्पृश्यांतून नाशिकचे पहिलवान सखाराम काळे, पाथर्डीचे विठ्ठल दोंदे, गोगाजी दोंदे, सावळाराम रणखांबे, भाऊजी ननावरे अशी ताकदवान मंडळी पुढे झाली. पण ही तडजोड मंदिर प्रवेश प्रतिबंधक समितीला मान्य झाली नाही. रथ ओढण्यास सुरुवात झाल्यावर मारामारी सुरू झाली. गणेशवाडीच्या रस्त्याच्या बाजूने स्पृश्यांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या दिशेने दगडफेक केली. दगड बाबासाहेबांजवळ उभ्या असलेल्या रंगनाथ भालेराव मिस्त्री यांना लागून ते रक्तबंबाळ झाले. पहिलवान मंडळींनी रथ आडवा पाडला. ( फडके, २०१४, पृ. ९३) त्यातून दंगल झाली. छोटी दुकाने जाळली गेली. अस्पृश्य स्त्रियांनाही बेदम मारहाण झाली. २६ जण

जखमी झाले. टाइम्सच्या वृत्तानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भास्करराव कद्रेकर यांच्यासह जखमींची संख्या शंभराहून अधिक होती. डॉ. आंबेडकर यांनी मुंबईस जाऊन गृहमंत्री अर्नेस्ट हॉटसन यांची भेट घेतली. सत्याग्रह थांबवावा असे गृहमंत्र्यांचे मत होते. मात्र २८ एप्रिलला पुन्हा सत्याग्रह सुरू झाला. सत्याग्रहींच्या डोक्यावर सनातन्यांनी घाण पाणी टाकले, शिबीरातून आलेले जेवण जेवणाऱ्या अस्पृश्यांच्या पत्रावळींवर धूळ फेकण्यात आली. मारहाणही झाली. २५ मे १९३० रोजी सत्याग्रह चळवळ थांबविण्यात आली. (फडके य. दि. २०१४, पृ. ६-३०)

१५ मार्च १९३१ ला पुन्हा एकदा पाच हजार लोकांच्या मिरवणुकीने सत्याग्रहाचा प्रारंभ झाला. देवळाचे चारही दरवाजे बंद झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुंबईत कोर्टाच्या कामात अडकल्याने सहभागी होऊ शकले नाहीत; मात्र दादासाहेब गायकवाड, बापूसाहेब राजभोज, देवराव नाईक, दिनकरराव जवळकर इत्यादी पुढाऱ्यांचा सहभाग होता. मिरवणुकीतल्या दगडफेक व मारामारीत दिनकरराव जवळकर जखमी झाले. १४४ कलम लागू करण्यात आले. पुजाऱ्याच्या घरच्या खाजगी दरवाजातून स्पृश्यांबरोबर अस्पृश्यांनाही मंदिरात जाऊ दिले पाहिजे असा युक्तिवाद पुढे आला. वकिलांनी पुजाऱ्याच्या घरचा खाजगी दरवाजा हे सार्वजनिक प्रवेशद्वार ठरू शकत नसल्याचा अभिप्राय दिला. २८ मार्चला रामनवमीच्या दिवशी अस्पृश्य आणि सनातनी वर्गाने आपापल्या सभा घेतल्या. अस्पृश्यांच्या सभेत दादासाहेब गायकवाड, बापूसाहेब राजभोज, देवराव नाईक यांची भाषणे झाली. पंचवटीतल्या दीक्षित वाड्यात सनातन्यांची सभा झाली. ३० मार्चला पूजाधिकाऱ्याने गव्हर्नरला तार करून परंपरेला धरून रथयात्रा काढली जाईल असे कळविले. जमावबंदीचा आदेश असल्याने मोठा रथ न काढता देवाची छोटी मूर्ती गोदावरीवर स्नानासाठी नेण्याची परवानगी देण्यात आली. कुठलाही गैरप्रकार घडला नाही. (फडके य. दि. २०१४, कित्ता, पृ. ३१-३५)

१९३१ साली नोव्हेंबरात नाशिकला सिंहस्थाचा मेळा होता. त्यावेळी सत्याग्रह करण्याचा प्रस्ताव नाशिककरांकडून पुढे आला. सत्याग्रहामुळे यात्रेकरूंची संख्या घटली तर यात्राकराचे उत्पन्न घटेल या भीतीमुळे नगरपालिकेने ठराव करून सिंहस्थात सत्याग्रहाला मनाई करण्यात यावी अशी सरकारला विनंती केली. नाशिक जिल्हा कॉंग्रेसमध्ये मंदिर सत्याग्रहाबाबत दोन मतप्रवाह होते. रघुनाथराव गद्रे, गोविंदराव देशपांडे, बाळकृष्णपंत मराठे हे सत्याग्रहाला पाठिंबा देणाऱ्यात होते, तर आर. जे. पांडे आणि आकूत हे विरोधात होते. मुंबई प्रदेश कॉंग्रेस समितीने सत्याग्रह न करता सनातन्यांचे हृदयपरिवर्तन करण्यावर भर द्यावा असा पर्याय सुचविला. प्रदेश कॉंग्रेस समितीचे सदस्य पु. रा. लेले यांनी या पर्यायाला विरोध केला व तसे न झाल्यास आपण समिती सदस्यत्वाचा राजीनामा देऊ अशी भूमिका घेतली. १४ ऑगस्ट १९३१ ला डॉ.

आंबेडकर यांनी महात्मा गांधी यांची भेट घेतली व कॉंग्रेसकडून सत्याग्रहाला होणाऱ्या विरोधाची माहिती दिली. मंदिरप्रवेशासारख्या प्रश्नावर सत्याग्रहाची वेळ अद्याप आली नाही, असे गांधीजींचे मत होते. दरम्यान गोलमेज परिषदेसाठी १५ ऑगस्ट १९३१ ला डॉ. आंबेडकर विलायतेस रवाना झाले. इकडे २० सप्टेंबर १९३१ ला विंचूरच्या सभेत पतितपावनदास यांच्या अध्यक्षतेखाली सत्याग्रह समिती गठित करण्यात आली. दादासाहेब गायकवाड यांनी गणेशोत्सवात जिल्ह्यात ठिकठिकाणी मंदिर सत्याग्रहाची भूमिका स्पष्ट करणारी भाषणे द्यायला सुरुवात केली. सत्याग्रहाची अशी तयारी सुरू असताना स्पृश्य-अस्पृश्य यांच्यात संघर्षाचे काही प्रसंग निर्माण झाले. २३ सप्टेंबरला येवल्याजवळ मुखेड गावी 'पांडवप्रताप' पारायणाच्या समाप्तीच्या दिवशी अस्पृश्यांनी काढलेली ग्रंथाची पालखीची मिरवणूक स्थानिक मराठा समाजातील लोकांनी अडवल्याने दंगा झाला. दादासाहेब गायकवाडांसह दहा-बारा अस्पृश्य जखमी झाले. दुसऱ्या दिवशी मामलेदारांनी मराठ्यांविरुद्ध खटले भरले. ही मोडलेली मिरवणुक ११ ऑक्टोबरला पुन्हा काढण्यात आली. मात्र मिरवणुकीनंतर परतलेल्या परगावच्या अस्पृश्यांना काही गावात मारहाणीच्या घटना घडल्या. डॉ. आंबेडकरांना तारेने मुखेड मिरवणुकीची वार्ता कळविण्यात आली. ५ नोव्हेंबरचा प्रस्तावित सत्याग्रहाचा निर्धार कायम ठेवावा असे त्यांनी दादासाहेब गायकवाड यांना पत्राने कळविले.

५ नोव्हेंबर १९३१ रोजी ठरल्याप्रमाणे शहरात पाच हजार अस्पृश्यांची मिरवणूक शांततेत पार पडली. पुजाऱ्याच्या घरातून स्पृश्यांनी मंदिर प्रवेश करू नये म्हणून पहारा देणाऱ्या अस्पृश्यांना सनातन्यांनी रोखण्याचा प्रयत्न केला. ७ नोव्हेंबरला २२ व ८ नोव्हेंबरला ४१ अस्पृश्यांना अटक करण्यात आली. ८ नोव्हेंबरला अस्पृश्य सत्याग्रहींनी रामकुंडात स्नान करण्याचा प्रयत्न केला. त्यातून तणाव निर्माण झाला. १२ नोव्हेंबरला लहवित येथे चिमा मुथाडे या मराठ्याने तुळाजी महार कुटुंबीयांना मारहाण केल्याच्या प्रकरणात सवर्ण हिंदूंना तीन महिन्यांची व ११ महारांना एक महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. ३ डिसेंबरला रात्री सत्याग्रह प्रतिबंधक समितीच्या सभेत सत्याग्रहाविषयी अनुकूल भूमिका घेणाऱ्या गोविंदराव देशपांडे यांना सनातन्यांनी मारहाण केली. सनातन्यांची सभा संपल्यावर अस्पृश्यांनी वाकडी बारवजवळ बस अडवून पुरुषोत्तम विश्वनाथ दीक्षित यास भोसकण्याची घटना घडली. सभेनंतर झालेल्या दंगलीत एका अस्पृश्याच्या तडाख्यातून वृद्धास सोडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या कवी कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर) या महाविद्यालयीन विद्यार्थ्यावर चाकूने वार करून जखमी करण्यात आले. अशा तंग वातावरणाच्या पार्श्वभूमीवर दादासाहेब गायकवाड यांनी १३ डिसेंबर १९३१ रोजी सत्याग्रही मिरवणुकीने रामकुंडावर जाऊन स्नान करतील, असे जाहीर केले. रामकुंडाभोवती १४४ कलम लावण्यात आले. सनातन्यांनी सत्याग्रहींना

रोखण्यासाठी कुंडाभोवती कडे केले; तरीही एका सत्याग्रहीने कडे तोडून रामकुंडात उडी घेतली. सनातन्यांकडून त्यास मारहाण सुरू झाली. जिल्हाधिकारी गॉर्डन यांनी यापुढे बंदोबस्तासाठी पोलिस येणार नाहीत अशी भूमिका घेऊन अंग काढून घेतले. जिल्हाधिकाऱ्यांची भूमिका गृहमंत्री व गव्हर्नरनेही मान्य केली. (फडके,२०१४, पृ. ४८-४९) ४ जानेवारी १९३२ ला पुन्हा काळाराम मंदिराजवळ दीडशे अस्पृश्य जमले. उभय बाजूंनी दगडफेक झाली. रामकुंडाच्या परिसरात लावलेल्या १४४ कलमाची मुदत १४ फेब्रुवारी १९३२ रोजी संपल्यावर लगेच सत्याग्रह करण्याची डॉ. आंबेडकरांची योजना होती. त्यावर सरकारने १४४ कलमाची मुदत आणखी एका महिन्याने वाढवली. ही वाढीव मुदत संपल्यावर १५ एप्रिलला रामनवमीला सकाळी सात वाजता देवळाचा उत्तर दरवाजा उघडण्यात आला. स्पृश्यांना या दरवाजाने प्रवेश देऊन दक्षिण दरवाजाने बाहेर काढण्याची व्यूहरचना करण्यात आली होती. यावर देवराव नाईक यांनी अस्पृश्य स्त्रियांना उत्तर दरवाजातून प्रवेश करण्यासाठी पुढे केले. पोलिसांनी या १४ स्त्रियांना अटक केली. त्यानंतर पुन्हा तीस स्त्रियांची तुकडी तयार करण्यात आल्याचे समजल्यावर विश्वस्तांनी दरवाजे बंद केले. भाऊराव गायकवाड, अमृतराव रणखांबे, सावळाराम दाणी, हरिभाऊ जाधव यांच्यासह १४ अस्पृश्यांना अटक करण्यात आली. त्यांना दोन महिन्यांची व स्त्रियांना एक महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. १७ एप्रिल १९३२ रोजी रथयात्रेच्या वेळीही १४४ कलम लागू करण्यात आल्याने रथयात्रा निघू शकली नाही. (फडके य. दि. कित्ता, पृ. ५३)

सत्याग्रहाचे नेते दादासाहेब गायकवाड, रणखांबे, दाणी हे धुळ्याच्या तुरुंगात शिक्षा भोगीत असतानाच नाशिकचे जिल्हाधिकारी ब्राऊन यांनी १९ एप्रिल १९३२ रोजी १४७ कलमानुसार अधिसूचना काढून रामकुंडाबाबत सत्याग्रही व सनातनी या दोन्ही पक्षांना आपापली बाजू मांडण्यास पाचारण केले. सत्याग्रही पक्षाने ११ मे पर्यंत मुदत वाढवून मागितल्यानंतर १२ मे १९३२ रोजी स्पृश्य व अस्पृश्य अशा उभय पक्षांनी आपापली निवेदने सादर केली व १४ मे पासून दोन्ही पक्षाच्या वकिलांनी जिल्हाधिकाऱ्यांसमोर आपापले युक्तिवाद मांडण्यास सुरुवात केली. सत्याग्रही पक्षाची बाजू सबनीस वकिलांनी मांडली. यापूर्वीच्या निवाड्यांचा हवाला देऊन त्यांनी रामकुंडात अस्पृश्यांना स्नान करण्याचा अधिकार असल्याचा युक्तिवाद केला. सनातन्यांच्या वतीने आकूत वकिलांनी बाजू मांडली. दक्षिणा घेऊन रामकुंडात स्नान करणे व धर्मविधी करणे याबाबतचे अधिकार भटभिक्षुकांकडे असल्याचा १८४० चा न्यायालयाचा निवाडा व १९०७ साली तत्कालीन जिल्हा न्यायाधीश बी. सी. केनेडी यांनी ब्राह्मणांच्या बाजूने दिलेला निकाल यांचा पुरावा सादर करून त्यांनी सनातन्यांच्या पक्षाचे समर्थन केले. जिल्हाधिकारी ब्राऊन यांनी अस्पृश्यांना रामकुंडात स्नान करण्याचा अधिकार नसल्याचा निर्णय दिला.

अशा प्रकारे काळाराममंदिर सत्याग्रह पर्वाचा शेवट झाला. यानंतर १ ऑगस्ट १९३२ ची त्रिखंडी सिंहस्थ पर्वणी शांततेत पार पडली. २४ मार्च १९३४ ला रामनवमीला पुन्हा एकदा सत्याग्रह करण्याचा प्रस्ताव काही मंडळींनी पुढे आणला होता; त्यावर दादासाहेब गायकवाड यांनी डॉ. आंबेडकर यांना पत्र लिहून त्यांचे मत मागवले. डॉ. आंबेडकरांनी दादासाहेब गायकवाडांना कळविले की, "या प्रश्नावर सत्याग्रहाची भूमिका मला पसंत नाही. त्याची आता आवश्यकताही नाही. ते (आंदोलन) तहकूब करावे एवढेच नाही तर सत्याग्रहाचा विचारच सर्वस्वी रद्द करावा.. यापुढे दलित वर्गाने राजकीय व शैक्षणिक कार्यावर आपली शक्ती पणाला लावावी." (फडके २०१४, पृ. ६८) मंदिरप्रवेशाच्या प्रश्नापेक्षा अस्पृश्यांनी विहिरीतून पाणी घेण्याचा, शाळेत प्रवेश मिळविण्याचा, सार्वजनिक वाहने किंवा रस्ते यांचा वापर करण्याचा प्रश्न, अशा नागरी हक्काच्या चळवळी कराव्यात असे डॉ. आंबेडकरांचे मत तयार झाले होते. अर्थातच त्यामुळे सत्याग्रह मालिका संपविण्यात आली.

दीर्घ काळ चाललेल्या काळाराम मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहानंतरही अस्पृश्यांना हे मंदिर खुले झाले नाही. रोहम यांनी अस्पृश्यांच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर रामकुंडात स्नान करण्याचा अधिकार अस्पृश्यांना नसल्याचा निकाल न्यायालयाने दिला. अस्पृश्यांना रामाचा रथ ओढण्याचा परंपरेने चालत आलेला अधिकारही स्पृश्यांनी मिळू दिला नाही. रथ ओढण्याच्या परंपरेला छेद देऊन घोड्यांनी रथ ओढण्याच्या आधुनिक पर्यायाचाही विचार रूजू शकला नाही. मधल्या काळात रंगा अय्यर यांनी मध्यवर्ती कायदेमंडळात मंदिरप्रवेशासंबंधी मांडलेले विधेयकही मागे घेण्यात आले. सांस्कृतिकदृष्ट्या हवे तसे स्थित्यंतर घडवून आणण्याच्या दृष्टीने मंदिर प्रवेश सत्याग्रहाची फलश्रुती फारशी उल्लेखनीय नसली तरी अस्पृश्यामध्ये आपल्या मानवी हक्कांसाठी संघटित होऊन लढण्याची प्रेरणा मात्र निश्चित जागवली गेली, ही या सत्याग्रहाची महत्त्वाची फलश्रुती म्हटली पाहिजे. मंदिरप्रवेश ही अस्पृश्यतेच्या उच्चाटणाची शेवटची पायरी आहे, ह्या धारणेतून वर्ध्याचे पुढारी जमनालाल बजाज यांनी मध्यप्रांतात आणि श्री. नागेराव एकबोटे यांनी वऱ्हाड प्रांतात अस्पृश्यांना देवदर्शनार्थ प्रवेश खुला करण्यासाठी पुढाकार घेतला. त्यापाठोपाठ सातारा, वाई, मुंबई, पुणे, जबलपूर, अकोला इत्यादी ठिकाणी देवालये दर्शनासाठी खुली करण्यात आली. (दिवेकर, १९३०, पृ. ५०) हळूहळू या विषयात लोकपरिवर्तन व्हायला सुरुवात झाली होती.

काळाराम मंदिर सत्याग्रहाचे सांस्कृतिक पैलूही तितकेच महत्त्वाचे आहेत. मंदिरप्रवेशाच्या सत्याग्रहाला सनातन्यांकडून जसा विरोध झाला, तसा हिंदूंमधील सुधारक विचाराच्या पुढाऱ्यांकडून पाठिंबाही मिळत होता. डॉ. आंबेडकरांचे निष्ठावंत सहकारी देवराव नाईक हे ब्राह्मण गृहस्थ रामनवमीच्या सत्याग्रहात अग्रभागी होते. पत्रकार

बाळकृष्ण जनार्दन मराठे, डॉ. नारायणराव सावरकर, रघुनाथ हरी गद्रे, नीळकंठराव पाटणकर, गोविंदराव देशपांडे, प्रा. रा. वि. ओतुरकर, पु. रा. लेले इत्यादींनी सकारात्मक भूमिका घेऊन अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेश सत्याग्रहाचे समर्थन केले. रत्नागिरीस स्थानबद्ध असलेल्या विनायक दामोदर सावरकरांनी नाशिककरांना अनावृत पत्र लिहून काळाराम मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश देण्याचे आवाहन केले होते. काळाराम मंदिराच्या दरवाजापाशी धरणे धरून बसलेल्या अस्पृश्य सत्याग्रहींना पाहून हेलावलेल्या ब्राह्मण वृद्धाने सत्याग्रहांच्या साहाय्यासाठी आपल्याकडची पैशांची थैली रिकामी केली. हिंदूंमध्ये सुधारणेच्या नव्या मूल्यबदलाच्या दिशेने होत असलेल्या पाऊलखुणा म्हणून अशा सकारात्मक प्रतिसादांची नोंद करायला हवी. ह्या सकारात्मक बदलांबरोबरच सनातन्यांच्या कर्मठपणाला व सामाजिक समरसतेविषयीच्या बधिरतेला कंटाळून अस्पृश्यता निवारणाच्या कार्यासाठी आपले आयुष्य व्यतीत करणारे गणेश आबाजी कुलकर्णी यांनी मुसलमान धर्मात प्रवेश केला व खानमहंमद नाव धारण केले. सवर्ण हिंदूंमध्ये असुरक्षित वाटल्याने मुसलमान धर्मात प्रवेश करण्याचा विचार त्या काळात काही लोकांच्या मनात रूजू लागला होता, हे अशा उदाहरणावरून लक्षात येते. मंदिरप्रवेशाच्या चळवळीत दिनकरराव जवळकरांचा अपवाद वगळता ब्राह्मणेतर चळवळीचे कार्यकर्ते अलिप्तच राहिले असल्याचेही एक निरीक्षण य. दि. फडके यांनी नोंदवले आहे. कॉंग्रेस संस्कृतीनेही राजकीय सत्तेवर डोळा ठेवून मंदिरप्रवेशाचा आग्रह धरण्याबाबत सोयीस्कर मौन पाळले होते. (फडके, २०१४, पृ. ७०- ७५)

ब्रिटिश सनदी अधिकाऱ्यांचा सामाजिक सुधारणेच्या चळवळींबाबतचा दृष्टिकोणही या सत्याग्रहातून पुढे आला. मंदिरपरवेशाच्या सत्याग्रहामागची सामाजिक न्यायाची बाजू लक्षात न घेता केवळ कायदा आणि सुव्यवस्थेच्या एकाच भिंगातून पाहाण्याच्या भूमिकेमुळे गृहमंत्री हॉटसन डॉ. आंबेडकरांना सत्याग्रह थांबविण्याचे सुचवित होते. स्पृश्य आणि अस्पृश्य अशा दोन्ही पक्षाच्या पुढाऱ्यांना मंदिरप्रवेशाचा प्रश्न न्यायालयात नेण्यासाठी वारंवार सुचवून सरकारी अधिकारी स्वत:ची या पेचप्रसंगातून सुटका करून घेऊ पहात होते. चळवळीत हस्तक्षेप करायला वाव राहील म्हणून मारामारी टाळण्यापेक्षा मारामारी व्हावी अशी या अधिकाऱ्यांची इच्छा असे. काळाराम मंदिराच्या सत्याग्रहाच्या अनुभवातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना "कायदा, न्यायसंस्था, पोलिसयंत्रणा प्रस्थापितांच्या बाजूने असतात हे प्रत्ययास आले. त्यामुळे देश स्वतंत्र झाल्यावर त्यांनी नेहरूंच्या मंत्रिमंडळात जाऊन दलितमुक्ती आंदोलनात अडथळा ठरलेल्या कायद्यातील तरतूदी काढून टाकण्याचा प्रयत्न केला आणि भारतीय घटनेतच दलितांचे प्रश्न आणि हित लक्षात घेऊन तरतूदी केल्या" (फडके य. दि. २००१४, पृ. ७६) य. दि. फडके यांनी काळाराम मंदिर सत्याग्रहाच्या फलश्रुतीचा लावलेला हा अन्वयार्थ किती यथार्थ आहे, हे

लक्षात येते.

वंचित समाजातल्या व्यक्तींकडे अंगभूत असलेल्या नाट्यगुणांचे दर्शन या सत्याग्रहात झाले. उदाहरणार्थ, शंकर श्रावण गायकवाड या तरुणाने पुजारी ब्राह्मणाचे सोंग वठवून पोलिसांना चकवा देत रामकुंडात उडी घेतली. त्याने अंगात स्वच्छ बंडी, कमरेला धोतर, डोक्यावर ब्राह्मणी पगडी, पायात पुणेरी जोडा, खांद्यावर पंचा,कपाळावर गंधाचे तीन पट्टे व मधोमध लाल रंगाचा गोल कुंकवासारखा टिळा असा पूजा अर्चा, होम हवन करणाऱ्या ब्राह्मणाचा पोषाख केला. आधी ब्राह्मणी मंडळीत मिसळून व नंतर छडीचे ठोके मारीत रामकुंड परिसरातल्या पोलिसांच्या कड्यात बिनधास्त प्रवेश केला. 'महारडी जात फार विचित्र, त्यांना तुम्ही रामकुंडाकडे बिलकूल सरकू देऊ नका' अशी बडबड करीत त्याने आपण ब्राह्मण असण्याचा बहाणा करून पोलिसांची दिशाभूल केली. अचानक संधी शोधून रामकुंडात उडी मारली व काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाचा विजय असो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर की जय अशा घोषणा द्यायला सुरुवात केली. अर्थात आडदांड सनातन्यांकडून त्याला बेदम मार मात्र जरूर बसला! केरू तेजाळे नावाचा किशोरवयीन मुलगा नीटनेटके कपडे घालून सवर्णांना संशयही येणार नाही इतक्या बेमालूमपणे त्यांच्यात मिसळला व एका लहानशा दरवाजातून त्याने मंदिरात प्रवेश केला. राममूर्तीला शिवला आणि 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर की जय'च्या घोषणा दिल्या.

काळाराम मंदिर सत्याग्रहाच्या निमित्ताने जाणीव-जागृतीसाठी जलसा-मंडळे स्थापन झाली, ही या चळवळीची महत्त्वाची सांस्कृतिक फलश्रुती होती. १४ जानेवारी १९३१ रोजी भीमराव कर्डक यांनी 'नाशिक जिल्हा युवक संघाचे संगीत जलसा मंडळ' स्थापन केले. ४ फेब्रुवारी १९३१ रोजी नाशिकजवळील चांदोरी येथे 'सत्याग्रहाचा फार्स' नामक पहिला जलसा सादर केला. भीमराव कर्डक यांनी दारूबंदी, धर्मांतर, अस्पृश्यतेचा प्रश्न अशा विविध विषयांवर जलसे सादर केले. चांदवडचे कवी दामोदर जयराम अहिरे यांनी सत्याग्रहाचा जलसा रचला. सुदामा अहिरे यांनी डॉ. आंबेडकरांवर पोवाडा रचला. गाणी, संवाद आणि फार्स यांच्या माध्यमातून लोकजाणिवा संस्कारित करणारा जनवाङ्मयाचा एक नवा आकृतिबंध या चळवळीतून उत्क्रांत झाला. यामुळे मराठी साहित्यात मोलाची भर पडली. नमुन्यादाखल तळटिपांमध्ये काही रचना उद्धृत केल्या आहेत, त्यावरून त्यावेळच्या अस्पृश्यजनांच्या भावभावनांची कल्पना येईल. [६]

**साने गुरुजींचा पंढरपूर मंदिर प्रवेश सत्याग्रह (१९४७) :**

१ मे ते १० मे १९४७ असे दहा दिवस साने गुरुजी यांनी पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा यासाठी आमरण उपोषण केले होते.

अस्पृश्यतानिर्मूलनाच्या प्रश्नावर १९२८ साली या विषयावर त्यांनी एक नाटिकाही लिहिली होती. १९४३ साली त्रिचनापल्लीच्या तुरुंगात आणि अमळनेरला मुलांना सोबत घेऊन संडास साफ करण्याचे काम केले होते. 'कॉंग्रेस' साप्ताहिकातून अस्पृश्यतानिवारणाच्या प्रश्नावर वेळोवेळी लेख लिहिले होते. पण या प्रयत्नांना अजूनही फारसे यश येत नव्हते. खानदेशातील सीतारामभाऊ चौधरी हे हिमालयाची यात्रा करून आल्यानंतर पंढरपूरला आले होते व अंत्यजांसाठी पंढरपूरचे मंदिर उघडावे म्हणून खटपट करीत होते. त्यांनी साने गुरुजींना पत्र लिहून आपण सोबत आल्यास माझी हिंमत वाढेल अशी विनंती केली होती. ह्या हाकेला प्रतिसाद देण्याचा निर्णय गुरुजींनी घेतला आणि त्यांनी पंढरपूर मंदिरप्रवेशासाठी लढा उभा करण्याची तयारी सुरू केली. उपोषणाला बसण्यापूर्वी साने गुरुजींनी चार महिने महाराष्ट्रभर दौरा काढून जनजागृती केली होती. सोबत सेनापती बापट, एस. एम. जोशी होते. महाराष्ट्र शाहीर पथक वसंत बापट यांनी लिहिलेल्या 'रामनवमी' हा राष्ट्रीय तमाशा सादर करीत असे. या दौऱ्यात ४०० सभा झाल्या. आपल्या उपोषणाचे समर्थन करताना साने गुरुजी म्हणत, "पंढरपूरला आषाढी-कार्तिकीला खानदेश वऱ्हाडकडून शेकडो मैल पायी चालत, विठ्ठल विठ्ठल म्हणत पंधरापंधरा हजार अस्पृश्य वारकरी येतात. ज्यांना दोन दोन हजार अभंग पाठ येतात. ज्यांनी ज्ञानेश्वरी, एकनाथी भगवत यांची अनेक पारायणे केली आहेत, असे हरिजन वारकरी मला भेटले आहेत. गळ्यांत तुळशीची माळ घालणारे, मद्यमांसास न शिवणाऱ्या ह्या निष्ठावंत भक्तांना मंदिरप्रवेश नाही, हा अन्याय आहे, तो तत्काळ नष्ट केला पाहिजे."भाषणाच्या अखेरीस गुरुजी जनसमुदायास पंढरपूरचे मंदिर हरिजनांना खुले व्हावे असे तुम्हास वाटत असल्यास हात वर करा असे म्हणत तेव्हा सर्व सभेतून हात उंचावत असत. (बोडा, १९९७, पृ. ९५-९६) पंढरपूरचे मंदिर हरिजनांसाठी मोकळे करून काय साध्य होणार? डॉ. आंबेडकर आणि त्यांच्या अनुयायांना मंदिरे नको आहेत, राजकीय हक्क हवे आहेत, मग तुमचा मंदिरप्रवेशासाठी लढा देण्याचा हट्ट कशासाठी? असे प्रश्न साने गुरुजींना विचारले जात असत. त्यावर गुरुजींचे उत्तर असे : हरिजनांना राजकीय हक्क मिळू नये असे म्हणणारा मी नाही. पण केवळ राजकीय हक्क, आर्थिक सुस्थिती, शिक्षण एवढ्याने हा प्रश्न सुटणार नाही. आपल्या डोक्यातल्या खोट्या धर्मकल्पना नष्ट झाल्याशिवाय अस्पृश्यता जाणार नाही. पंढरपूरचे मंदिर एक प्रतीक म्हणून मी घेतले आहे. पंढरपूरचे मंदिर उघडणे म्हणजे आपली हृदये प्रेमाने हरिजनांसाठी उघडी करणे. हे मंदिर उघडले तर महाराष्ट्रातील हजारो खेड्यांत प्रकाश येईल. एकदा देवाजवळ सारे जाऊ लागले म्हणजे उद्या माझ्या ओटीवर, विहीरीवर आले तरी चालेल असे माणसे म्हणू लागतील." (बोडा, १९९७, पृ ४४-४५)

हरिजनांना मंदिर प्रवेशाचा हक्क देणारा कायदा होणारच आहे, तेव्हा उपोषण करू

नये असे कॉंग्रेसश्रेष्ठींकडून सांगण्यात आले. मात्र गुरुजी आपल्या निर्धारापासून हटले नाहीत. १ मे १९४७ ला तनपुरे महाराजांच्या मठात गुरुजींनी आपले प्राणांतिक उपोषण सुरू केले. महात्मा गांधींनी त्यांना उपवास सोडावयास सांगितले तेव्हा गांधीजींच्या तारेला ३ मे १९४७ रोजी गुरुजींनी उत्तर पाठविले :"आपली तार मिळाली. मला माफ करा. माझ्या निश्चयाचे पावित्र्य व स्त्यावरील निष्ठा यांची सत्त्वपरीक्षा आता उपोषणाच्या माध्यमांतून होऊ दे. मी स्वत:ला आता पूर्णपणे देवाच्या हवाली केले आहे." सर्व महाराष्ट्रातून गुरुजींचे प्राण वाचवा म्हणून पंढरपूरला तारा आणि पत्रांचा खच पडला. दहाव्या दिवशी ठक्करबापा व दादासाहेब मावळंकर पंढरपूरात आले. बडव्यांची सभा घेतली व संध्याकाळी साडेसहा वाजता बडवे पंचसमितीने अस्पृश्यांसाठी मंदिर उघडण्याचा निर्णय जाहीर केला, संध्याकाळी साडेसात वाजता बडव्यांचे निवेदन साने गुरुजींना वाचून दाखविण्यात आल्यानंतर गुरुजींनी मोसंबीचा रस घेऊन उपोषण सोडले. साने गुरुजींच्या या उपोषणानंतर 'मुंबई मंदिर प्रवेश कायदा १९४७'( Bombay Harijan Temple Entry Act 1947) मंजूर करण्यात आला. याच दरम्यान साने गुरुजींच्या पंढरपूरच्या मंदिर प्रवेशाच्या उपोषणात सोबत करणाऱ्या तुकडोजी महाराजांनी १९४६ साली विदर्भात वरखेड येथे मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह चळवळ केली होती; १० नोव्हेंबर १९४७ ला रामटेक येथे मंदिर प्रवेश आंदोलन केले होते; त्यामुळे ही मंदिरे अस्पृश्यांसाठी खुली झाली. थोडक्यात मंदिर प्रवेशाचे सत्याग्रह हे अस्पृश्यांच्या मानवी हक्कांच्या संरक्षणाचे लढे होते, तसे समाजात वंचित जनजातींविषयीची उपेक्षेची भावना दूर करण्यासाठीचे जनभावना-शुद्धीकरणाचीही चळवळ बनली होती.

**म. गांधीप्रणीत हरिजन सेवक संघ :**

पुणे करारानंतर त्याच आठवड्यात ३० सप्टेंबर १९३९ रोजी मुंबईस पंडित मदनमोहन मालवीय यांच्या अध्यक्षतेखाली हिंदूंची सभा होऊन 'अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण संघा'ची (All India Anti-Untouchability League) स्थापन झाली. जी. डी. बिर्ला यांची अध्यक्षपदी व अमृतलाल ठक्कर यांची सरचिटणीस म्हणून निवड झाली. पुढे या संघाचे 'अस्पृश्य सेवा संघ' आणि नंतर 'हरिजन सेवक संघ' असे त्याचे नामकरण झाले. हरिजन सेवक संघाच्या मध्यवर्ती नियामक मंडळात डॉ. आंबेडकर, रावबहादूर श्रीनिवासन व रावबहाद्दूर एम, सी. राजा हे अस्पृश्य वर्गातले सभासद होते. म. गांधी आता अस्पृश्यांना 'हरिजन' संबोधू लागले. अस्पृश्यताविरोधी जनमत तयार करण्यासाठी म. गांधींनी भारत दौरा केला व प्रांतोप्रांती हरिजन सेवक संघाच्या शाखा स्थापन झाल्या. अस्पृश्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक सुधारणांनीच अस्पृश्यतेचे निवारण होईल या विचारांवर या संघाची कार्यपद्धती ठरविण्यात आली.सहभोजन आणि आंतरजातीय विवाह यांची अस्पृश्यता निवारणासाठी

जरूरी नाही असे गांधीजींचे मत होते. (यंग इंडिया २२ जाने. १९२५). कायद्याच्या दंडुक्यानेही अस्पृश्यता जाणार नाही, असे ते म्हणत. (हरिजन २३ सप्टें. १९३९) अस्पृश्येतेचे उच्चाटन करणे हे सवर्ण हिंदूंनी हिंदुधर्मासाठी व स्वत:साठी पश्चाताप म्हणून केले पाहिजे. अस्पृश्यांच्या शुद्धीची आवश्यकता नाही. शुद्धी ही वरिष्ठ जातीची झाली पाहिजे' (यंग इंडिया, १६ जाने. १९२४) अशी गांधीजींची मते होती. हरिजन सेवक संघाचे काम या विचारांवर अधिष्ठित होते.

महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर या दोघांनी अस्पृश्यता निवारणाच्या कार्यात महत्त्वाची भूमिका निभावली होती; मात्र दोघांच्या मार्गात भिन्नता होती. शंकरराव खरात यांनी या दोघांच्या भूमिका व कार्यपद्धतीची अचूक तुलना केली आहे : "म. गांधीजी यांनी १९२० सालापासून अस्पृश्यांच्या प्रश्नावर वेळोवेळी मांडलेले विचार व अस्पृश्यता निवारण करण्यासंबंधी टाकलेले कृतीचे पाऊल हे जपून व काळजीपूर्वक होते. ब्रिटिश सरकारविरोधी स्वातंत्र्यासाठी जी क्रांतिकारक उठावाची, सत्याग्रहाची ते भूमिका घेत, तशी अस्पृश्यता निवारण्यासाठी भूमिका ते घेऊ शकले नाहीत.. 'आम्हाला तुमचे उपकार नको, आम्हाला आमचे जन्मजात हक्क आहेत, ते पाहिजेत' ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जशी खणखणीत व रोखठोक मागणीची भूमिका होती, त्याप्रमाणे म. गांधी भूमिका घेऊ शकले नाहीत. 'केलेल्या पापाचे प्रायश्चित्त म्हणूनच पश्चातापदग्ध होऊन ते फेडण्यासाठी आपण अस्पृश्यतानिवारण केले पाहिजे' अशीच म. गांधींची भूमिका होती. म्हणूनच अस्पृश्यांचे जन्मजात अधिकार व हक्क म्हणून त्यांच्या मागण्या मान्य केल्या पाहिजेत, या मताशी म. गांधीजी सहमत दिसत नव्हते. उपकारकर्ता, सहानुभूतिदार याच्याच भूमिकेने प्रायश्चित्त म्हणून पतितांचा उद्धार करावयाचा, त्यांना पुनीत करावयाचे अशी म. गांधीजींचा व त्यांच्याच विचारांची छाप पडलेल्या 'हरिजनोद्धारक' कार्यकर्त्यांचा व समाजसेवकांचा समज होता." (खरात, २०१७, पृ. ७५-७६)

**जातिभेदात्मक विषमतानिर्मूलनाचे यशापयश :**

महाराष्ट्रात जातिभेदात्मक विषमता घालविण्याचा प्रयत्न यापूर्वी वारकरी संप्रदायाच्या चळवळीतून व संत साहित्याच्या माध्यमातून केला गेला होता. पण या चळवळीच्या स्वभावत:च काही मर्यादा होत्या. पंढरीच्या विठोबाने महाराष्ट्रासाठी नेमके काय केले? या प्रश्नाचे उत्तर शोधताना वि. द. घाटे यांनी यासंदर्भात केलेले भाष्य महाराष्ट्र संस्कृतीच्या पुनर्घटनेच्या वाटचालीचे वाचन करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे वाटल्याने ते इथे उद्धृत करीत आहे : "विठोबाने एक गोष्ट नक्की केली. त्याने नामदेव शिंप्याला , सजन कसायाला, सेना न्हाव्याला, सावता माळ्याला, चोखामेळा महाराला, ज्ञानोबा ब्राह्मणाला चंद्रभागेच्या वाळवंटात एकत्र आणले. . पण या पंढरीच्या भेटीगाठींनी महाराष्ट्रात सामाजिक ऐक्य आणले नाही. पंढरीस भेटणाऱ्या आणि खाणेपिणे सारखे

असलेल्या मराठा, माळी, साळी,कोष्ट्यांमध्येसुद्धा बेटीव्यवहार सुरू झाला नाही. वारकरी भावाभावात सोयरिकी झाल्या नाहीत. सामाजिक जाणिवा आणि गरजा उत्पन्न झाल्या नाहीत. पंढरीचा नशा जीवनात मुरला नाही. समाजात जिरला नाही. विठोबाने अस्पृश्यता नाहिशी केली नाही. चोखोबाला वाळवंटात शिवत असतील कदाचित, पण चोखोबाचा ब्राह्मणांच्या, मराठ्यांच्या, शिंप्यांच्या घरात शिरकाव झाला का? देवघरात त्याला प्रवेश मिळाला का? तरी पंढरीने जातीजातीतला दुरावा पुष्कळ कमी केला. (घाटे, १९६१, पृ. २६५-२६६) विसाव्या शतकात ब्राह्मणेतर चळवळीने पुरोहितशाहीविरुद्ध लोकजागरणाचा प्रकल्प मोठ्या हिरिरीने राबविला. शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड यांनी वेदोक्ताच्या हक्कांचे सामाजिकीकरण करून व आपापल्या संस्थानात जातिभेदनिर्मूलनाचे कायदे करून समतेची मूल्ये सामाजमानसात रुजविण्याचा यथाशक्ती प्रयत्न केला. गांधीजींच्या अस्पृश्यता निर्मूलनाच्या प्रयत्नांनी तसेच डॉ. आंबेडकरांच्या मंदिरप्रवेशाच्या व सार्वजनिक पाणवठ्यावरील अस्पृश्यांच्या हक्कांच्या लढाईतून महाराष्ट्रातील जातीय तेढीची मुळे खिळखिळी व्हायला निश्चितच मदत झाली. मात्र तरीही जातीच्या हरळीची मुळे पूर्णपणे उपटून फेकण्यात महाराष्ट्राला अद्यापही संपूर्ण यश आले नाही. वि. द. घाटे यांच्या भाषेत सांगायचे तर जातिभेदात्मक विषमतेच्या लढ्याची बीजे महाराष्ट्राच्या भूमीत पुरती रुजली नाहीत. श्री. म. माटे यांनी म्हटल्याप्रमाणे 'जोपर्यंत संधिसमानत्वाचा सार्वत्रिक प्रसार होऊन निरनिराळ्या जातींची नेमकी कुवत काय आहे याचा प्रत्यक्ष प्रयोगाने निकाल लागलेला नसेल तोपर्यंत जातिसंस्था टिकून राहील. मनुष्याच्या अंगच्या सर्व गुणांचा प्रकर्ष व्हावा अशी संधी सर्वांना मिळत राहिली आणि माणसामांणसांची खरी किंमत काय आहे याचा निकाल एकदा जातिश: लागला म्हणजे हा प्रश्न जलदीने चालीस लागेल." (माटे, १९५०, पृ. ९३-९४) त्यामुळे या विषयातल्या सामाजिक मशागतीचे काम स्वातंत्र्यानंतरही पुढे चालू ठेवणे गरजेचे आहे, असा सर्वसाधारण निष्कर्ष काढता येतो.

**डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर :**

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील जातिधर्मभेदात्मक विषमतेविरुद्ध सुरू असलेल्या विविध चळवळींचा वृत्तांत आतापर्यंत आपण पाहिला. अस्पृशोद्धारासाठी आयुष्य व्यतीत करणाऱ्या डॉ. आंबेडकरांना हिंदू धर्मात राहून अस्पृश्यांना न्याय मिळेल याची खात्री वाटत नसल्याने धर्मांतराचा पर्याय निवडणे इष्ट वाटू लागले. त्यानुसार १३-१४ ऑक्टोबर १९३५ रोजी नाशिक जिल्ह्यातील येवला येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतराची घोषणा केली. हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मुळीच राहणार नाही, अशी प्रतिज्ञा त्यांनी येवल्याच्या सभेत केली. दहा वर्षे चळवळ करूनही हिंदू लोक कसल्याच सवलती किंवा हक्क द्यावयास तयार नाहीत यामुळे आलेली उद्विग्नता हे

त्यांच्या धर्मांतराच्या प्रतिज्ञेमागचे एक महत्त्वाचे कारण होते. येवल्याच्या भाषणात धर्मांतराची घोषणा करताना ते म्हणाले होते की, "आठ कोटी अस्पृश्यांना गुलामगिरीत डांबणारा, कोट्यवधी बहुजनसमाजाला अज्ञान, दारिद्र्य व रूढी यांच्या अंधारात दडपणारा आणि असंख्य स्त्रियांना माणुसकीतून उठवणारा हा धर्म नव्हे. या गुलामगिरीच्या शृंखला आहेत. त्या आज आम्ही तोडावयाच्या ठरविल्या आहेत. हिंदू म्हणून घ्यावयाचे पण देवळात शिरावयाचे नाही. नळाचे पाणी प्यायचे नाही. इतकेच काय पण इतरांस स्पर्शही करावयाचा नाही. मग करावयाचा काय तो धर्म? असून नसून सारखाच." (खरात, २०१३, पृ. २००) हिंदू धर्म जर आम्हाला हिंदू म्हणवून घेणास तयार नाही, तर आम्ही देखील स्वत:ला हिंदू म्हणून का घ्यावे? ज्या धर्मात समता, प्रेम व आपुलकीची भावना नाही, त्या धर्माला मी हिंदू धर्म म्हणावयास तयार नाही. हिंदू धर्माच्या अनुदार चौकटीत राहता येत नाही, म्हणून ही धर्मांतराची घोषणा करणे भाग पडले. पं. पंडित सातवळेकर यांनी 'पुरुषार्थ' मासिकात डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराच्या घोषणेवर लेख लिहून नफा तोटा पाहून धर्मांतर करायचे ते करा असा सल्ला दिला होता; त्याचे उत्तर देताना डॉ. आंबेडकरांनी लिहिले होते की, "अस्पृश्यातील जातिभेद मोडण्यास मी माझी पराकाष्ठा करण्यास तयार आहे. परंतु जोपर्यंत अस्पृश्य समाज हिंदू समाजातील जातिभेदाच्या तांगडातांगडीत जखडून गेला आहे, तोपर्यंत या कार्याला कधीही यश येणे शक्य नाही. अस्पृश्यातील जातिभेद मोडण्याला हिंदू धर्मातून निघणे हाच एक मार्ग आहे... शिवाय हिंदू धर्म माझ्या मते धर्म नसून लोकांना वेडे करण्याची एक जडी आहे. हिंदू समाज हा एक वेडसर लोकांचा समाज आहे, अशा वेडसर लोकांत राहाण्याचा माझा इरादा नाही. अर्थात त्याची मला मनधरणी करण्याची जरुरी नाही." ( खरात, २०१३, पृ. २०५)

१९३६ साली मुंबईच्या अखिल महार परिषदेत दिलेल्या 'मुक्ती कोन पथे' या आपल्या प्रसिद्ध भाषणातूनही त्यांनी आपल्या धर्मांतराच्या भूमिकेचे समर्थन करणारे मुद्दे उपस्थित केले होते. हिंदू धर्म व्यक्तिविकासाला पोषक नाही असे त्यांचे प्रमेय होते. व्यक्तीचा विकास हेच धर्माचे खरे ध्येय आहे, पण हिंदू धर्मात व्यक्तीला काही स्थान नाही. एकाने दुसऱ्याशी कसे वागावे याची बंधने हिंदू धर्मात आहेत. हिंदू धर्माची रचना वर्गाच्या कल्पनेवर केली आहे. ज्या धर्मात एका वर्गाने विद्या शिकावी, दुसऱ्याने वर्गाने शस्त्र धरावे , तिसऱ्याने व्यापार करावा व चौथ्याने नुसती सेवा करावी असे आहे , तो धर्म आपल्याला मान्य नसल्याचे त्यांनी सांगितले. जो धर्म एकाला सज्ञान ठेवण्यासाठी बाकीच्यांना अज्ञानात ठेवतो, एकाच्या हाती शस्त्र देतो व दुसऱ्याला नि:शस्त्र करतो तो धर्म नसून एकाला दुसऱ्याने पारतंत्र्यात ठेवण्याची शक्कल आहे... व्यक्तीच्या आत्मोन्नतीला पोषक असे वातावरण उत्पन्न करणे ही धर्माची मूलभूत कल्पना आहे, हे जर मान्य केले तर हिंदू धर्माने तुमची आत्मोन्नती कधीही होणार नाही. हिंदू धर्मात

बुद्धीला, विचाराला प्राधान्य नाहीच नाही, पण वाव देखील नाही. वेदांची गुलामगिरी, स्मृतींची कास, महाजनांचे अनुकरण यामुळे हिंदू धर्मात विचारस्वातंत्र्याला वाव नाही. हिंदू धर्मातील अशा बौद्धिक व व्यावहारिक गुलामगिरीतून सुटका करून घेण्यासाठी धर्मांतराशिवाय दुसरा पर्याय नाही, अशी डॉ. आंबेडकरांची भूमिका होती. (खरात, २०१३, पृ. २११-२१४)

धर्म आणि राजकारण यांची सांगड घालणारी वैचारिक बैठक हे आंबेडकरांच्या सामाजिक- राजकीय चळवळीचे वैशिष्ट्य होते. १९३५ साली हिंदू धर्माचा त्याग करण्याची प्रतिज्ञा केल्यानंतर बौद्ध धर्मात प्रवेश करण्याच्या दिशेने त्यांचे चिंतन सुरू होते. 'बुद्धजयंतीचे राजकीय महत्त्व' या विषयावर १७ मे १९४१ च्या 'जनता' पत्रात लिहिलेल्या लेखातून त्यांच्या ह्या वैचारिक प्रवासाचे मध्यवर्ती आशयसूत्र स्पष्ट होते. परमेश्वरप्राप्ती हे धर्माचे क्षेत्र नसून मनुष्याने मनुष्याशी कसे वागावे ह्याचे योग्य प्रकारे बंधन घालून देणे हे धर्माचे क्षेत्र आहे अशी बुद्धाची भूमिका होती आणि ही भूमिकाच लोकशाही राज्याचा आधारस्तंभ होऊ शकते, अशी डॉ. आंबेडकरांची धारणा होती. सामाजिक समतेचा बुद्धाइतका मोठा पुरस्कर्ता जगात दुसरा झाला नाही, असे त्यांनी म्हटले होते ते या अर्थाने. बुद्धाने वेदप्रामाण्य, यज्ञ बलिदान आणि वर्णाश्रम या ब्राह्मणी धर्माच्या तीन आधारस्तंभांवर हल्ला चढवला होता. वेदप्रामाण्यापेक्षा विवेक आणि विज्ञाननिष्ठा हा सत्याचा पाया आंबेडकरांना महत्त्वाचा वाटत होता. जातिभेदांचे मूळ असलेला वर्णाश्रमधर्म हे सामाजिक विषमतेचे मूळ गाडून टाकून समताधिष्ठित समाजाची पुन:संघटना बांधण्यासाठी बुद्धाचा समताविचार आंबेडकरांना खुणावत होता. ब्राह्मणी धर्मात स्त्रिया व शूद्रांना मानाचे स्थान नाही, उपजीविकेचे मार्ग मोकळे नाहीत, कशावर स्वामित्व नाही. पण बुद्धाने स्त्रियांना भिक्षुकीणी आणि शूद्रांना भिक्षूच्या उच्च स्थानी बसवले. अंत्योदयाच्या चळवळीसाठी डॉ. आंबेडकरांसमोर हा बुद्ध धर्माचा आदर्श होता. ब्राह्मणी धर्म वर्णाश्रमाच्या विषमतावादी मूल्यांतून अंत्यजांचे शोषण करीत वाढला, मुसलमानी धर्म तलवारीच्या जोरावर वाढला, ख्रिस्ती धर्म कायद्याच्या जोरावर वाढला. फक्त एकट्या बुद्धाच्या धर्माचा प्रसार गुणांमुळे झाला. त्याला तलवारीच्या धारेची अगर कायद्याच्या दंडनाची जरूरी लागली नाही. बुद्धाची चातुर्वर्ण्य विध्वंसनाची मोहीम ही डॉ. आंबेडकरांच्या दृष्टीने त्या काळची ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळ होती. आजही राजकारणाची रक्तशुद्धी करण्याकरिता सर्व हिंदूंनी बुद्धजयंती साजरी करणे हितावह होईल असे त्यांनी प्रस्तुत लेखात म्हटले होते. लोकशाही हवी असेल तर चातुर्वर्ण्य नाहीसे झाले पाहिजेत. हे चातुर्वर्ण्याचे जंतू काढून टाकण्याकरिता बुद्धाच्या तत्त्वज्ञानासारखे मारक रसायन नाही, असे त्यांना वाटत होते. (आंबेडकर,२००५ ख, पृ. ३३१-३३५) थोडक्यात सांगायचे तर आधी राजकीय की आधी सामाजिक या तत्कालीन नेतृत्वाच्या वादातली अप्रस्तुतता डॉ.

आंबेडकरांनी ओळखली होती व धर्म आणि राजकारण, राजकारण आणि समाजकारण यांचा एकात्मिक विचार करूनच त्यांनी आपल्या राजकारणाचा व समाजकारणाचा प्रवास चालू ठेवला होता.

१९५० साली महाबोधी सोसायटीच्या एका जर्नलमध्ये प्रकाशित केलेल्या लेखातून बौद्ध धर्माचा पुरस्कार करण्यासंबंधीचे आपले चिंतन मांडले होते, तेही इथे लक्षात घ्यायला हवे. हिंदू आणि बौद्ध धर्माची तुलना करताना त्यांनी लिहिले होते की, "बौद्ध धर्माचा पाया नैतिक आचरण हा असून, हिंदू धर्माचा पाया कर्मकांडाचे आचरण हाच आहे. स्नानसंध्या, जपजाप्य, सोवळे-ओवळे व यज्ञयाग यांनी हिंदू धर्म सामावलेला आहे. तर केवळ नैतिक आचरण म्हणजेच बौद्ध धर्म होय. बौद्ध धर्मात देव नाही, ही खरी गोष्ट आहे. देवाची जागा बौद्ध धर्मात नैतिक आचरणाने भरून काढली आहे... हिंदू धर्माची उभारणी अमंगल अशा भेदा-भेदांवर केलेली असून बुद्ध धर्माची उभारणी समतेवर केलेली आहे. .. हिंदू धर्मात शूद्र व स्त्रिया यांना धर्मशिक्षक होण्याची बंदी असून त्यांना परमेश्वरप्राप्तीसाठी संन्यास घेण्याचीही मनाई आहे. बुद्धाने आपल्या भिक्षू संघाचे दरवाजे स्त्रिया व शूद्र यांना मुक्त मनाने उघडे करून दिले आहेत. हिंदू धर्मातील विषमता हाणून पाडण्यासाठीच वरील मार्ग बुद्धाने स्वीकारला हे उघडच आहे.. धर्मामध्ये 'स्वातंत्र्य, समता व बंधुता' या त्रयींचाही अवश्यमेव अंतर्भाव करणे जरूर आहे. .. या सर्व कसोट्यांस उतरणारा असा धर्म म्हणजे बौद्ध धर्मच होय. म्हणून बौद्ध धर्म हाच जागतिक ऐक्याचा अस एकमेव अद्वितीय असा धर्म होय, असे मानणे भाग पडते. (खरात, २०१३, पृ. ३०७-३०९) १९३५ साली धर्मांतराची प्रतिज्ञा केल्यानंतर १९५६ साली डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्मात प्रवेश केला, त्यामागे असलेले त्यांचे धर्मचिंतन वरील लेखाच्या गोषवाऱ्यातून सुस्पष्टपणे ध्वनित झालेले आहे. अस्पृश्यांच्या मुक्तीसाठी सामाजिक संघर्षाच्या निरनिराळ्या पातळ्यांवर केलेल्या लढायांचा प्रवास अशा प्रकारे धर्मांतराच्या तिठ्यावर येऊन पोहचला होता.

डॉ. आंबेडकर हे प्रबोधनाचे वारसदार होते आणि प्रबोधनाची मूल्ये स्वीकारून त्यांनी आपल्या राजकीय-सामाजिक कार्याची बांधणी केली होती, अशा प्रकारचा अन्वयार्थ प्रा. मे. पुं. रेगे यांनी लावला होता, तो किती यथार्थ आहे, हे डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराच्या भूमिकेमागचे वरील तत्त्वचिंतन वाचल्यावर पटते. समतेचे तत्त्व आणि दु:खमुक्तीचे ध्येय यांची सांगड घालणारा बौद्ध विचार हा आंबेडकरांचा आदर्श होता. माणसाच्या सुखसमाधानाच्या तृष्णांना स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव ह्या मूल्यांची नैतिक चौकट असणे हे न्यायाचे तत्त्व या तत्त्वज्ञाचे अधिष्ठान आहे. डॉ. आंबेडकर यांनी बौद्ध तत्त्वज्ञानातील दु:ख आणि तृष्णा यांचा वेगळा अर्थ लावला असल्याचे मे. पुं. रेगे यांनी आपल्या निबंधात म्हटले आहे. दु:खाचा उगम माणसाच्या प्रकृतीत नसून शोषणात

आहे, हा तो अन्वयार्थ! माणसे परस्परांच्या सहकार्याने व श्रमाने जी सुखसाधने निर्माण करतात त्यात प्रत्येकाला त्याचा योग्य तो हिस्सा मिळायला हवा. असा योग्य वाटा मिळण्यात न्याय असतो. परंतु दुसऱ्याचा न्याय वाटा हिसकावून घेणे, त्याला जेवढे मिळायला हवे होते, त्यापेक्षा कमी वाटा देऊन स्वत:कडे उरलेला भाग ओढून घेण्याची प्रवृत्ती माणसांच्या शोषणाचे कारण ठरते. शोषणावर आधारलेल्या अशा मानवनिर्मित समाजरचनांमुळे सामाजिक न्यायाचा तोल बिघडतो आणि त्याचे बळी होणारी शोषित माणसे दु:खी बनतात. (रेगे, १९९२, पृ. ८१-९१) ह्या दु:खनिरासाचा मार्ग डॉ. आंबेडकरांना बौद्ध तत्त्वज्ञानात सापडला होता. राजकीय-सामाजिक संघर्षाच्या लढाईमागे हे एवढे व्यापक धर्मचिंतन उभे होते, हे आंबेडकरांच्या सामाजिक चळवळींच्या यशाचे वेगळेपण होते आणि सामर्थ्यही!

१९ व्या शतकात सुरू झालेल्या जातीय विषमतानिर्मूलनाच्या चळवळीचा हा दीर्घकाळ चाललेला संघर्ष अजूनही पूर्ण संपलेला नसला तरी याबाबत आपण खूप मोठी मजल गाठली आहे, हे निश्चित! १९५० साली भारतीय राज्यघटनेत या विषमतानिर्मूलनाच्या चळवळीने बाळगलेल्या स्वप्नाचे प्रतिबिंब पडलेले दिसते : " The State shall promote with special care the educational and economic interests of the weaker sections of the people, and, in particular, of the Sheduled Castes and Sheduled Tribes, and shall protect them from social injustice and all forms of exploitation." २१ व्या शतकात प्रवेश करण्यापूर्वी राज्यघटनेत नमूद केलेल्या या उद्देशपत्रिकेची कितपत पूर्तता झाली याची स्वतंत्र समीक्षा करावी लागेल.

## ६.६. धार्मिक पुनर्घटनेचा विचार :

भारतीय समाजाच्या समग्र पुनर्घटनेचा विचार महाराष्ट्रातल्या विचारवंतात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातच सुरू झाला होता, विसाव्या शतकात ह्या पुनर्घटनेच्या संदर्भात लो. टिळक, म. गांधीजी, विनोबा भावे, वि. रा. शिंदे , डॉ. आंबेडकर, स्वा. सावरकर या सर्वांनी धर्मचिंतनाला महत्त्व दिले आहे. सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तनाच्या चळवळींतील व्यक्तिवादी जाणिवा आणि सामाजिक बांधिलकीच्या कर्तव्यसन्मुखतेचा विचारही धार्मिक अंगाने केला जात होता. आधुनिक महाराष्ट्राच्या धार्मिक चिंतनात गीता, उपनिषदे व स्मृतिग्रंथांतील भारतीय तत्त्वज्ञानाचा, बौद्ध, चार्वाकांच्या इहवादी जणिवांचा आणि पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावातून आलेल्या ख्रिस्ती तत्त्वज्ञानाचा व विवेकवादी विचारधारांचा संकर झालेला आढळून येतो. माणसामध्ये जेव्हा बौद्धिक जागृती मंदावते, प्रयोगापेक्षा प्रामाण्यावरच भिस्त ठेवण्याची वृत्ती वाढते, तेव्हा समाजात एक प्रकारचे धर्मजाड्य उत्पन्न होते. धर्माधर्मात व

जातीजातीत भांडणे आणि कलह निर्माण होतात. परस्परांवरचा विश्वास उडतो. अशा वेळी सामाजिक स्वास्थ्य आणि सलोखा निर्माण करण्यासाठी केवळ कायदे आणि नियम पुरसे नसतात. समाजात उत्साह व उत्थान येण्यासाठी धर्मसंस्करण आवश्यक असते. ह्या गरजेतून महाराष्ट्रातल्या सामाजिक पुढाऱ्यांना धार्मिक पुनर्घटनेची गरज भासत होती.

लोकमान्य टिळकांच्या राजकीय स्वातंत्र्याच्या विचारव्यूहाला गीतेच्या कर्मयोगाचे अधिष्ठान होते. भारतीय आध्यात्मविचारांतील संन्यासमार्गाऐवजी ऐहिक अभ्युदयाला प्राधान्य देण्याची वैचारिक भूमिका गीतारहस्याचा माध्यमांतून टिळकांनी महाराष्ट्रात रूजविण्याचा प्रयत्न केला होता. नागरिक म्हणून व्यक्तीने आपली श्रेयसाधना व कर्तव्ये निष्काम कर्तव्यबुद्धीने करावी हे त्यांच्या विचारांचे मध्यवर्ती सूत्र होते. त्याचबरोबर सामाजिक व्यवहारांचे नियमन करताना निर्णयप्रक्रियेत व्यक्तीला समान अधिकार असला पाहिजे, हे आधुनिक जाणिवांचे तत्त्वही त्यांच्या धार्मिक-राजकीय विचारात सामावलेले होते. आध्यात्मिक साधना-उपासना आणि लौकिक जीवनातील नागरिकांची कर्तव्यसन्मुखता यांची सांगड घालून त्यांनी गणेशोत्सवाच्या धार्मिक कर्मकांडाला राजकीय कर्तव्यभावनेचा रंग चढवला होता.

म. गांधींनीही धर्माचरण आणि राजकीय कृतिकार्यक्रम यांचे पृथकत्व मानले नाही. त्यांच्या राजकीय लढ्याचे आशयसूत्र हे धर्मचिंतनाच्या गाभ्यातूनच उदित होत असे. आपल्या धार्मिक चिंतनात त्यांनी वैष्णव संप्रदायातील अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह या तत्त्वांना महत्त्व दिले. त्याचबरोबर ख्रिस्ती धर्मातील ईश्वर प्रेममय असल्याची संकल्पना आणि दीनदुर्बलांच्या सेवेत ईश्वरोपासनेचा अर्थ दडला आहे ही शिकवण यांनाही त्यांनी आपल्या विचारव्यूहात स्थान दिले. गांधीजींना सत्य म्हणजे केवळ केवळ बुद्धीला उमजलेला अर्थ इतकाच मर्यादित अर्थ अभिप्रेत नसून सत्य ही आचरणात आणावयाची घटना आहे, असे ते मानीत. त्यामुळे सत्याचे पालन करणारा आचारधर्म हा त्यांच्या लेखी धार्मिक व्रतबंध होता. अहिंसेच्या संकल्पनेतही त्यांना स्वार्थासाठी दुसऱ्याच्या जीवनात विक्षेप न आणणारा आचारधर्म अभिप्रेत होता. त्यामुळे कायम दुसऱ्याच्या भूमिकेत जाऊन विचार करणारा परमतसहिष्णुतेचा मनोधर्म ही अहिंसेची पूर्वअटच असल्याचे ते मानीत. . त्यामुळेच त्यांच्या राजकीय लढ्यातील उपासाला केवळ दबावतंत्राचे साधनमूल्य नव्हते तर आत्मशुद्धीच्या साधनेचेही परिमाण होते. गांधीजींची 'रामराज्या'ची संकल्पना ही त्यांच्या धर्मचिंतनाशी निगडीत होती हे स्पष्ट करताना मे. पुं. रेगे यांनी म्हटले होते की, " सर्व माणसांच्या स्वायत्ततेची, समान कदर करणारी अर्थव्यवस्था, समाजव्यवस्था आणि राजकीय व्यवस्था प्रस्थापित करण्याचे प्रयत्न करीत रहाणे ही अहिंसेवर आधारलेली जीवनसरणी आहे. अशा समाजव्यवस्थेला गांधीजींनी 'रामराज्य' म्हटले; पण हा हिंदू आध्यात्मिक परंपरा आणि आधुनिकता ह्यांच्या संवादातून

निर्माण झालेला आदर्श आहे." (रेगे, १९९४, पृ. १३)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना लोकशाही मूल्यांवर आधुनिक भारताची पुनर्घटना करण्यासाठी आवश्यक असणारी वैचारिक बैठक हिंदू धर्मात सापडली नाही. अस्पृश्यतेचा प्रश्न हा वर्णप्रधान व जातीच्या उतरंडीवर आधारलेल्या विषमताप्रधान हिंदू समाजरचनेतून आला असल्याने त्यांनी हिंदू धर्माची कठोर समीक्षा केली. लोकशाहीप्रधान समाजरचना निर्माण करण्यासाठी एक व्यक्ती- एक मूल्य हे सूत्र आणि स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वांवर अधिष्ठित असणारी लोककेंद्री राज्यप्रणाली घडविण्याचे आव्हान भारतवासीयांसमोर होते. डॉ. आंबेडकर यांनी ही सामाजिक न्यायाची पुनर्घटना साधण्यासाठी बौद्ध तत्त्वज्ञानातील प्रज्ञा, शील, करुणा, मैत्री, मुदिता, उपेक्षा, पारमिता या मूल्यांचा आणि पाश्चिमात्य तत्त्वज्ञानातील विवेकवादाचा मेळ घातला. गांधीजी हिंदुधर्माच्या गाभ्याला धक्का न पोचवता सुधारणा अपेक्षित होते; तर डॉ. आंबेडकर जातिकेंद्री हिंदुधर्माला सक्षम पर्याय म्हणून बौद्ध धर्माच्या प्रसाराला महत्त्व देत होते. बौद्ध धर्मातील 'संघ' संकल्पनेतून नवसमाजनिर्मितीचे स्वप्न ते पहात होते.

हिंदुसमाजाचे सामाजिक व राष्ट्रीयदृष्ट्या बल वाढावे, तसेच देशात सामाजिक स्वास्थ्य नांदावे यासाठी हिंदुसमाजाची पुनर्घटना करण्याची चर्चा या काळात विशेषत्वाने सुरू होती. स्वा. सावरकरांनी हिंदुधर्माची पुनर्घटना विज्ञाननिष्ठ दृष्टी ठेवून करावी अशी वेगळी मांडणी सुचविली होती. सृष्टीनियम आणि वैज्ञानिक सत्ये हाच सनातम धर्म समजावा, असे त्यांचे प्रतिपादन होते. प्रकाश, उष्णता, गती, गणित, ध्वनी, विद्युत, चुंबक, रेडियम, शरीरवैद्यक, यंत्र, शिल्प यांचे जे नियम ज्ञात आहेत, तो खरा सनातन धर्म. हे नियम आर्यांसाठी, अनार्यांसाठी, मुस्लिमांसाठी व काफरांसाठी व इस्त्रायलींसाठी समान लागू आहेत. या अर्थाने सृष्टिधर्मास ते सनातन धर्म मानत होते. कोणतेही धर्मग्रंथ ईश्वरप्रणीत नसून मनुष्यकृत आहेत, म्हणून ते शाश्वत सत्य सांगणारे आहेत, असे मानता येणार नाही, असे सांगून धर्मग्रंथप्रामाण्यही त्यांनी नाकारले. विज्ञानयुगात समाजसंस्थेची जी संघटना करावयाची ती प्रत्यक्ष ऐहिक व विज्ञाननिष्ठ तत्त्वांवरच केली पाहिजे, असा सावरकरांचा आग्रह होता. हिंदुधर्माची पुनर्घटना करण्यासाठी हिंदुधर्मातील वेदोक्तबंदी, व्यवसायबंदी, स्पर्शबंदी, सिंधुबंदी, शुद्धिबंदी, रोटीबंदी आणि बेटीबंदी या सात बेड्या तोडल्या पाहिजेत, तरच विज्ञानाच्या कसोटीत उतरणारी धार्मिक पुनर्घटना होऊ शकेल असे त्यांचे ठाम मत होते. (किर्लोस्कर जून १९३७ / कानिटकर, २०००, पृ. ९-१५)

१८५७ च्या जाहीरनाम्यानुसार ब्रिटिशांनी भारतातील धार्मिक परंपरांमध्ये ढवळाढवळ न करण्याचे धोरण ठरविले होते; पण तरीही सतीबंदी सारख्या अनिष्ट रूढींवर कायद्याने बंदी घालून भारताच्या धार्मिक पुनर्घटनेला कायद्याचे परिमाण देण्याचा काही अंशी प्रयत्न केला होता. मात्र केवळ कायदे करून धर्माची पुनर्घटना होत नसते. कारण

कायदे करताना कायद्याचा जो उद्देश असतो तो प्रत्यक्ष व्यवहारात विसरला जातो. समाजाला कलमबंदीची सवय होते; त्यामुळे जीवनातले चैतन्य ओसरते, जीवन यांत्रिक बनू लागते. त्यासाठी लोकधारणा समृद्ध करणाऱ्या शिक्षणाची गरज असते अशी भूमिका काका कालेलकरांनी मांडली होती. त्यांच्या मते आपल्याकडच्या सर्व भांडणांच्या मुळाशी अज्ञान आणि अनुदारता आहे. आपल्या समाजात प्रचलित असलेल्या 'ब्राह्मण आणि साप सारखा', 'मारवाडी चामडी देईल पण दमडी देणार नाही', 'मुसलमान बडे बेईमान', अशा प्रकारच्या म्हणी या कुज्ञानाच्या द्योतक आहेत. यातला एक दोष बौद्धिक आहे आणि दुसरा नैतिक; दोन्ही दूर केले पाहिजेत. भांडणे मिटविण्यासाठी प्रतिपक्षाला समजावून सांगण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा समजण्याचा अधिक प्रयत्न झाला पाहिजे. आणि यासाठी कालेलकरांनी कायदे आणि नियमांपेक्षा समाजाची धारणा करणाऱ्या धार्मिक पुनर्घटनेची गरज असल्याचे प्रतिपादन केले होते. (कालेलकर, १९४६, पृ. २-७, ६९, ७१)

कायद्याच्या राज्याच्या फायद्यातोट्यांची चर्चा या काळात निरनिराळ्या पद्धतीने होत होती; परंतु समग्र सामाजिक जीवनाला संस्कारित करणारा जीवनधर्म रूजविण्यासाठी ब्रिटिशांची कायदे आणि नियमांची चौकट असलेले पोलिसी राज्य हा अडसरच असल्याची भूमिका अण्णासाहेब विनायक रामचंद्र पटवर्धन यांनीही मांडली होती. त्यांच्या मते ब्रिटिश सभ्यता भौतिकतेच्या मूल्यांचे पोषण करणारी असल्याने 'बळी तो कान पिळी' हा न्यायच बलवत्तर ठरतो. ब्रिटिशांचे कायदे व्यक्तीच्या हितरक्षणावर भर देणारे असल्याने समूहजीवनाचे उन्नत भान निर्माण करणारी जीवनशैली घडविण्यासाठी ते फारसे उपयुक्त नाहीत, असे त्यांचे मत होते. हिंदुस्थानातल्या अज्ञ समाजाच्या उद्धाराची जबाबदारी आपण स्वीकारली असल्याचा (White mans' burdun) गोऱ्या लोकांचा सामाजिक कर्तव्यबुद्धीचा दावा त्यांना ढोंगीपणाचा वाटे. राष्ट्रीय अस्मितेचा बळी देऊन कुठलीही पाश्चिमात्य सुधारणा आपल्याला नको असे, त्यांनी ठामपणे प्रतिपादिले होते. व्यक्तीचे हित समष्टीच्या हितात आहे, म्हणून व्यक्ती आणि समष्टीतली अभिन्नता रूजविणाऱ्या वैदिक संस्कृतीच्या परंपरेतून उत्क्रांत झालेल्या 'महाराष्ट्र धर्मा'ची पुनर्घटना साधण्याचा मार्ग आपण स्वीकारला पाहिजे, अशा प्रकारच्या संस्कृतिक राष्ट्रवादाची मांडणी वि. रा. पटवर्धन यांनी सुचविली होती. या 'महाराष्ट्रधर्मा'त परस्पराश्रयी वर्णाश्रमधर्माची व सामाजिक कर्तव्यनिष्ठेतून समाजाच्या एकात्म विकासाचा मार्ग प्रशस्त करणाऱ्या कल्याणकारी आश्रमधर्माची संकल्पना त्यांनी गृहीत धरली होती. (अप्रबुद्ध, १९२६, पृ. ४०-४१)

वि. का राजवाडे यांचीही भूमिका पटवर्धनांच्या वरील भूमिकेशी मिळतीजुळती अशीच होती. पाश्चिमात्य संस्कृती ही दुसऱ्यांवर गुलामगिरी लादणारी संस्कृती (Enslaving culture) आहे हा राजवाड्यांच्या मीमांसेचा सारांश होता. हिंदुस्थानसह

पेरू, मेक्सिको,दक्षिण आफ्रिका, अमेरिकेतील रेड इंडियन यांच्यासोबत पाश्चिमात्यांचा जो व्यवहार होता, तो याचा साक्षी असल्याचे त्यांनी म्हटले होते. पाश्चात्यांच्या ह्या प्रवृत्तीचे वर्णन त्यांनी 'खादाड' (great eater) राक्षसी प्रवृत्तीचे म्हणून केले होते. हिंदुस्थानी जनतेने युरोपीयनांचा हा स्वभावधर्म ओळखून त्यांना 'जशास तसे' या न्यायाने उत्तर दिले पाहिजे, असे राजवाडे म्हणत.

## दिवेकरांची समष्टिधर्माची मांडणी :

भारतीय समाजाची धार्मिक पुनर्घटना कशी करता येईल याविषयीचे एक चिंतन महादेवशास्त्री दिवेकर यांनी 'हिंदुसमाज समर्थ कसा होईल' (१९३०) या ग्रंथातून मांडले होते. विधर्मी समाजाकडून हिंदूंच्या हक्कांची होणारी पायमल्ली थांबविण्यासाठी हिंदूंना प्रतिकारक्षम बनविण्याच्या दृष्टिकोनातून दिवेकरांनी या पुनर्घटनेचे प्रारूप सुचविले होते. ख्रिस्ती-मुस्लिमांच्या विरोधाला तोंड देण्यासाठी आक्रमक हिंदुत्ववादाचा पवित्रा घेणे, हिंदू समाजाची सामाजिक समरसता वाढविण्यासाठी जातिभेदातली विषमता मिटविणे, ब्राह्मण-ब्राह्मणेतरवादाला मिळत जाणारे विखारी वळण थोपविणे, विटाळाच्या व स्पृश्यास्पृश्यभावाच्या अंधश्रद्ध समजुतींना दूर सारण्यासाठी विवेकवाद रूजविणे आणि सामाजिक समतेचा वर्तनव्यवहार वाढविण्यासाठी चळवळ संघटित करणे ही सामाजिक पुनर्घटनेची प्रक्रिया दिवेकरांना अभिप्रेत होती. स्वराज्याचा लढा लढण्याकरिता व मिळवलेले स्वराज्य टिकविण्याकरिता हिंदू जाती संघटित करण्याचे आव्हान पेलणारी हिंदू राष्ट्रवादाची संकल्पनात्मक मांडणी करण्याचा प्रयत्न या लेखनातून त्यांनी केला होता; किंबहुना मुसलमाननिरपेक्ष स्वराज्य मिळविण्याची महत्त्वाकांक्षा हाच या लेखनाचा मध्यवर्ती प्रेरणास्त्रोत होता. म. गांधींच्या म्हणण्याप्रमाणे हिंदुमुसलमानांच्या एकीशिवाय स्वराज्य मिळविता येणार नाही, तसेच ते रक्षणही करता येणार नाही. यावर दिवेकरांचा युक्तिवाद असा आहे की, तुल्यबल झाल्याशिवाय कोणत्याही दोन समाजात एकी संभवत नाही. एकमेकांच्या सामर्थ्याची जाणीव असणे व समबलत्व स्थापन करणे ही जर उभय समाजांच्या ऐक्याची साधने आहेत, तर त्याकरिता हिंदू समाजाने संघटित व्हावयास नको का, असा दिवेकरांचा प्रश्न आहे. किंबहुना हिंदू-मुसलमानांचे ऐक्य सबंध हिंदुस्थानात कदाचित महाराष्ट्रात लवकर संभवेल, कारण उभय समाजांनी एकमेकांस आपले पाणी दाखविले आहे. लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी यांना अभिप्रेत असलेल्या राष्ट्रवादापेक्षा आक्रमक हिंदुत्ववादी राष्ट्रवादाची दिवेकरांची मांडणी वेगळी आहे. स्वराज्यप्रस्थापनेच्या लढाईत लो. टिळकांनी 'शठं प्रति शाठ्यं' हे सूत्र सांगितले होते, तर म. गांधींनी 'शठं प्रति सत्यं' हे सूत्र सांगितले होते. ही दोन्ही तत्त्वे आक्रमक हिंदुत्ववादी राष्ट्रवादाच्या प्रस्थापनेसाठी कुचकामी असल्याचे दिवेकरांनी म्हटले आहे. त्यांच्या मते या दोन्ही तत्त्वांत आधी 'शठा'ची अपेक्षा आहेच, म्हणजे शठाने तोंडात मारल्यावर

'शठ्या'ने प्रतिटोला द्यावा किंवा 'शठा'ने काही डावपेच केल्यावर 'शठ्या'ने सत्याने बचाव करावा या दोन्ही भूमिका हिंदू राष्ट्रवादाला मान्य नाहीत. त्यांच्या मते हिंदू समाजाने बचावापेक्षा आगळीकीचे आक्रमक तत्त्वज्ञान निर्माण केले पाहिजे. दुसऱ्याची आधी आगळीक करणारा समाज जगात फार दिवस जगू शकणार नाही. त्यामुळे दुसरा आपली आगळीक न करील, आपल्या वाटेला न जाईल, आपल्या कोणत्याही वर्मावर घाव घालू शकणार नाही अशी तयारी हिंदू समाजाने करायला हवी. हिंदू समाजाने सहिष्णु स्वभाव बदलून जयुष्णु केला पाहिजे अशी हिंदुत्ववाच्या सामाजिक पुनर्घटनेची दिशा दिवेकरांना अभिप्रेत होती. हिंदू समाज समर्थ होण्यासाठी त्याचे मनोबल, शरीरबल, समाजबल आणि संपत्तिबल वाढविण्यासाठी उपक्रमशील होण्याची दिशा दर्शविणारी हिंदू राष्ट्रवादाची मांडणी दिवेकर करू पहात होते. (दिवेकर, १९३०, पृ. १२७)

हिंदू राष्ट्रवादाची संकल्पनात्मक मांडणी करताना त्यांच्यापुढे बॅ. सावरकर यांचा नमुनादर्श होता. हिंदुराष्ट्र = पितृभू (राष्ट्र + जाती) + पुण्यभू (संस्कृती) ही सावरकरांची व्याख्या या विवेचनात दिवेकरांनी प्रमाण मानली आहे. भौगोलिक स्थलावकाशात नांदणाऱ्या समाजाची राष्ट्रीय अस्मिता आणि सांस्कृतिक एकजिनसीपणा ही हिंदूत्वाची राष्ट्रीय ओळख सावरकरांना अभिप्रेत होती. समान राष्ट्र, समान जाती आणि समान संस्कृती ही त्यांच्या दृष्टीने हिंदुत्वाची लक्षणे होत. सावरकरांच्या या व्याख्येचा विस्तार करताना दिवेकरांनी लिहिले आहे की, "एक इतिहास, एक वाङ्मय, एक कला, एक शिल्पशास्त्र, एक कायदा, एक धर्मशास्त्र, एक आचार, आणि एक संस्कार, क्रियाकर्मे आणि विधिनियम; समान दैवते, समान उत्सव ,समान यात्रा आणि समान व्यवहारशास्त्र यांच्या समुच्चयाने जी बनली गेली आहे, अशी या 'हिंदुजाती'ची संस्कृती जो स्वत:ची मानतो, आणि जो या सर्वांवर या भूमीला- या सिंधूस्थानाला- आपली 'पुण्यभू' समजतो तो हिंदू होतो. या भूमिकेतून हिंदुसमाजाची पुनर्घटना करताना त्यात जसे सनातनी पाहिजेत, तसे आर्यसमाजी पाहिजेत, जसे शीख पाहिजेत तसे जैनही पाहिजेत. लिंगायत, गुरखे, ब्राह्मो, प्रार्थनासमाजी, स्पृश्य, अस्पृश्य इत्यादी सर्व घटक हिंदू सभेच्या कार्यात असले पाहिजेत, अशी एकात्म हिंदू समाजाच्या पुनर्घटनेची दिशा कल्पून ही मांडणी झाली आहे. अर्थात महाराष्ट्रात सनातनी हिंदूच अधिक आहेत, हे वास्तवही दिवेकरांनी आधोरेखित केले असून महाराष्ट्रातील सनातन हिंदूंनी सर्वांशी भ्रातृभावाने वागून हिंदू समाजाचे बल वाढविण्यासाठी आपल्या पारंपरिक मानसिकतेत बदल करण्याची गरज आहे, असेही दिवेकरांनी सूचित केले आहे. (दिवेकर, १९३०, पृ. १५-१६)

आक्रमक हिंदुत्वादी भूमिकेतून जातिप्रथाक समाजव्यवस्थेत परिवर्तन घडवून आणणारी 'समष्टिधर्मा'ची संकल्पना दिवेकरांनी मांडली होती. त्यांच्या मते हिंदुसमाजात व्यष्टिधर्माचे श्रेष्ठत्व आहे ते समष्टिधर्मात परिवर्तीत व्हायला पाहिजे. हिंदुसमाजात

व्यक्तीचा मोक्ष, व्यक्तीचे सुख, व्यक्तीची उन्नती, व्यक्तीची नीतिमत्ता यावरच भर असतो. समाजाचे सामुदायिक बल वाढविण्यासाठी लागणारी सामुदायिक ध्येये आणि द्वेषही आवश्यक असतो. त्यामुळे समाजात प्रतिकारशक्ती, सावधानता आणि दूरदर्शीपणा हे गुण वाढतात; प्रेम, ऐक्य, सहकार्य हे गुण वृद्धिंगत होतात. परंतु मुळातच सांप्रत हिंदुसमाज वर्णबद्ध नसून जातिबद्ध आहे; हिंदुसमाजाचे घटक जातिरूपाने आहेत, समाजरूपाने नाहीत. हे जातींचे जंगल एवढे मोठे आहे की, एकट्या मुंबई इलाख्यातच १४४८ जाती आहेत. हिंदुंमधील प्रत्येक मुख्य जातीत अनेक पोटजाती आहेत. मराठ्यांमध्ये ९६ कुळी व ७ कुळी या प्रमुख जाती असल्या तरी त्यात अवांतरही पुष्कळ पोटजाती आहेत. मासे धरण्याकरिता जाळी टाकणे, कडेवरून, खांद्यावरून व डोक्यावरून पाणी आणणे, पानमळे करणे, व्याजबट्टा करणे असल्या क्षुद्र कामांनी ज्या असंख्य जाती झाल्या आहेत, त्यांचे एकीकरण केले पाहिजे. कुटुंबबंधुत्व आणि जातिबंधुत्वापेक्षा समाजबंधुत्वाच्या व्यापक परिघातले हिंदुसंघटन साधण्यासाठी जातींच्या एकीकरणाला प्राधान्य देण्याचा विचार दिवेकरांनी मांडला आहे. हिंदुसमाजातील काही जाती पुढारलेल्या व काही फार मागासलेल्या आहेत, त्यामधील महद्‌अंतर हे शिक्षण, सभ्यता व संस्कृतिप्रसार यांनी तुटल्याने हिंदुसमाज समर्थ होईल. हिंदुसमाजाने जीवनातले हे प्रश्न सोडविण्यासाठी सहिष्णु स्वभाव बदलून जयिष्णु केला पाहिजे, तरच तो मुस्लिम वा ख्रिश्चन धर्मीयांच्या धर्मविस्ताराला तोंड देऊ शकेल अशा आशयाची मांडणी दिवेकरांनी केली होती. (दिवेकर, १९३०, पृ. ९४-१००)

**वेदान्तशास्त्र हा विश्वधर्माचा पाया :**

पुण्याचे म. फुले यांचे समकालीन डॉ. विश्राम रामजी घोले यांची कन्या गंगूबाई आणि जावई वेदांतभूषण डॉ. रघुनाथराव खेडकर (१८७३-१९३०) यांनी कोल्हापूरला वैदिक असोशिएशन ही वैदिक धर्माच्या शिकवणुकीचा प्रसार करणारी चळवळ चालवली होती. करवीर पीठाच्या धर्मकेंद्रात ते गीता आणि वेदान्त शिक्षणाचे वर्ग चालवीत, करवीर शंकराचार्यांच्या अधिपत्याखाली 'वेदान्तिन' ह्या इंग्रजी नियतकालिकाचे संपादन करीत. १९०५ साली इंग्लंड व १९११ साली कॅनडात त्यांनी धर्मप्रवचने केली. १९११ साली त्यांनी इंग्रजीतून वेदांतांची प्राथमिक ओळख करून देणारे ' A Handbook of the Vedant Philosophy and Religion' हे दोन भागातले पुस्तक प्रसिद्ध केले. १९१२ साली त्यांनी 'Commentary on The Bhagawad Geeta : First Discourse' हे गीताभाष्य प्रसिद्ध केले. गीता ही सर्व दर्शनांचे सार आहे, असे ते म्हणत. प्राचीन हिंदू धर्मातला ज्ञानयोग हा रघुनाथरावांच्या आस्थेचा विषय होता. वेदान्त आणि भगवद्गीतेवर व्याख्याने देण्यासाठी हे पतीपत्नी इंग्लंडलाही जात असत. देशाबाहेर इंग्लंड अमेरिकेत जाऊन धर्मप्रवचने करणारी पहिली हिंदू महिला म्हणून गंगूबाईंचा नामनिर्देश केला जातो.

गंगूबाई घोले खेडकर (१८७८-१९४०) यांनी १९११ साली इंग्लंडला 'वेदान्तशास्त्र हा विश्वधर्माचा पाया' असल्याची भूमिका मांडली होती. धर्म हा मनुष्याच्या कल्याणासाठी असून धर्मतत्त्वांच्या ग्रहणामुळे माणसाचा मनोविकास घडतो, मनोविकारांवर नियंत्रण ठेवता येण्याची किमया साध्य होते, सद्हेतूंच्या प्रेरणेतून समाजोन्नतीचे कार्य करण्याची भावना निर्माण होते, म्हणून समाजाला धर्मशिक्षणाची गरज असल्याचे विवेचन त्या आपल्या भाषणांतून करीत असत. केवळ स्तोत्रपठणाने वा उपवास केल्याने हे साध्य होत नसते; शुद्ध आचरण आणि मिशनरी वृत्तीने मानवजातीची सेवा करण्यातच धर्माची इतिकर्तव्यता आहे. सामूहिक धर्माचरणही कर्मकांडविरहित व प्रार्थनेच्या स्वरूपाचे असावे, सुशिक्षितांनी देवळात धार्मिक तत्त्वज्ञानाचा नवा विचार देणारी प्रवचने-कीर्तने करावीत अशा प्रकारचे धर्मसंस्करण त्या आपल्या धर्मनिरुपणपर व्याख्यानांतून करीत असत. धर्माची ही शिकवण जनसामान्यांमध्ये रूजविण्यासाठी लेखकांनी बालबोध भाषेत मुलांसाठी व प्रौढांसाठी गोष्टीरूप वाड्‌मय निर्माण केले पाहिजे, असेही आवाहनही त्या सुशिक्षित वर्गाला करीत. त्यांनी स्वत:ही १९१२ साली 'धर्मजिज्ञासू कुमुदिनी' नामक दीर्घकथा लिहून अद्वैतधर्मविचाराला ललितरम्य कथनरूप दिले होते. १९१५ साली मुंबईत भरलेल्या आठव्या मराठी साहित्यसंमेलनात त्यांनी धर्मसंबद्ध वाड्‌मयाविषयी भाषणही केले होते. (ढेरे, २००२, पृ. ११९-१२१, १७०)

**सयाजीराव गायकवाड यांचा व्यवहारवादी धर्मविचार :**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी १९३३ साली शिकॅगोच्या दुसऱ्या जागतिक धर्मपरिषदेच्या अध्यक्षीय भाषणातून व्यवहारवादी दृष्टिकोनातून धर्माची पुनर्घटना करण्याचा मार्ग सुचविला होता. धर्मविचारातील गूढवाद, मायावाद, जगन्मिथ्यावाद या सर्वांना संपूर्ण नकार दिल्याशिवाय धर्माची पुनर्घटना करता येणार नाही, अशी त्यांची धारणा होती. जगाला माया अथवा भ्रम मानणे हे परमेश्वराची नालस्ती करण्यासारखे आहे असे त्यांचे मत होते. त्यामुळे ईश्वरविषयक मायावादी तत्त्वज्ञान मोडीत काढून ऐहिकता आणि व्यावहारिकता यांची सांगड घालणारा नवा इहवादी धर्मविचार प्रस्थापित करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी या भाषणातून केले. कबीर, तुलसीदास, संत तुकाराम महाराज या साधुसंतांनी आणि चार्वाक, भगवान गौतम बुद्ध, श्रीकृष्ण , म. गांधी या महात्म्यांनी धर्माच्या बाबतीत जी व्यवहारबुद्धी दाखविली तिचा 'अश्वबुद्धी' (Horse Sense) असा गौरवपूर्ण उल्लेख करून या पूर्वसूरींनी दाखविलेल्या इहवादी जाणिवांच्या मार्गाने धर्माची पुनर्घटना करणे श्रेयस्कर असल्याचे त्यांनी सुचविले. धर्ममूल्ये आणि नागरी मूल्ये यांची सांगड घालणारी धर्माची पुनर्घटना त्यांना अभिप्रेत होती. ईश्वर ही मुळात मनुष्यनिर्मित संकल्पना असून तो लोकसत्ताक राज्यातल्या राजासारखा गरिबांचा कैवारी असतो. त्याच्या लेखी जनसेवा हेच धर्ममूल्य असते. धर्माचे अकारण दडपण न

घेता ऐहिक जीवन हा एक उत्सव आहे असे समजून त्या उत्सवात प्रत्येकाने आनंदाने व मुक्तपणे सहभागी व्हावे हा धर्माचरणाचा खरा मथितार्थ आहे, ही गोष्ट लोकमानसात रूजविण्याला धर्मगुरूंनी प्राधान्य दिले पाहिजे, असे त्यांचे मत होते. धर्मविषयक अंधश्रद्धा, लोकभ्रम, पूर्वग्रह यांना मूठमाती देऊन धर्माची पुनर्घटना व्हावी; त्यासाठी लोकभाषेतून धर्मचर्चा व्हाव्यात; जातिभेद, पंक्तिभेद, अस्पृश्यता हे समाजदोष घालविण्यासाठी कायदे करावेत, लोकांचे हृदयपरिवर्तन करण्यासाठी प्रबोधन करावे, व व्यावहारिक जीवनातील धर्माचरणात भेदाभेदरहित आचरणशुद्धता आणावी हा धर्मप्रसाराचा कृतिकार्यक्रमही गायकवाड महाराजांनी वेळोवेळी आपल्या भाषणांतून सुचविला होता. (वरखेडे, २०१४, पृ. ८-१०)

**अंधश्रद्धानिर्मूलानाचा विचार :**

मराठी माणसाच्या मनावर असलेला परंपरा व रूढींचा पगडा, धार्मिक अपसमजुती, शकुन-अपशकून-फलज्योतिषावरचा फाजील विश्वास यामुळे सामाजातली उद्यमशीलता, स्वावलंबित्व या गुणांचा विकास होऊ शकला नाही. 'मालकाचे नाव गण्या आणि चाकराचे नाव रुद्रिजीपंत अशी स्थिती झाली होती. कोणत्याही नव्या गोष्टींकडे किंवा सुधारणांकडे पाहताना सकारात्मक दृष्टिकोणाऐवजी हा कलीचा प्रताप म्हणून बघण्याचा रोग मराठी माणसांना जडला होता. उदाहरणार्थ, तरुण मुलींच्या पोषाखात, केशरचनेत किंवा जोडा परिधान करून चालण्याच्या नव्या फॅशनकडे हा कलकीचा प्रताप म्हणून पाहिले जात असे कुणा शास्त्र्याने मनगटी घड्याळ परिधान केले तरी तो कलीचा प्रताप ठरत असे. सगळ्या जगात नाविकशास्त्रातल्या प्रगतीमुळे समुद्रसत्ता प्रबळ होत असताना आपल्याकडे मात्र परदेशगमन केले म्हणून प्रायश्चित्त घ्यावे लागत होते. *'कलीची करणी झाली धोतराची उपरणी'* असली लोकगीते समाजात रूढ झाली होती, यावरून या समजुतीच्या गडद प्रभावाची कल्पना येते. अशा अंधविश्वासातून येणारी कर्तव्यविन्मुखता कशी घालवावी हे विसाव्या शतकातल्या समाजधुरिणांपुढचे मोठे आव्हान होते. दैववाद, वेदांत आणि कली ह्या त्रिदोषांचा हिंदू समाजाच्या मानसिकतेवर आणि पर्यायाने सामाजिक आंतरक्रियांवर फार मोठा पगडा होता. शकुन, फलज्योतिष व भुतेखेते यांच्या समजुतींमुळे एक प्रकारची मनोदुर्बलता मराठी समाजात नांदत होती. वावटळ सुटली, चंद्राआड खळे दिसले, प्रेत पुढे आले की अपशकून होतो; पण या गोष्टी निसर्गनियमांप्रमाणे स्वाभाविक होतात, हे लक्षात घेतले जात नव्हते. शिंक येणे, डोळा लवणे, बाहु फुरफुरणे, पायाच्या तळव्याला कंड सुटणे या गोष्टी शरीरधर्माच्या आहेत; त्याचा व कोणत्याही कार्याचा मुळीच कार्यकारणसंबंध नसतो याची जाणीव नव्हती. 'बोडका ब्राह्मण पुढे आला, विधवा पुढे आली की कार्यहानी होते' अशा लोकसमजुती महाराष्ट्रातच जास्ती करून रूढ होत्या. दक्षिणेत मद्रासेकडे असल्या अपसमजुतींचा

इतका प्रभाव दिसत नव्हता. तिकडे सर्वच ब्राह्मण बोडके फिरत, वपन केलेल्या स्त्रियाही तिरुपती व गोविंदराजपट्टण या भागात डोके उघडे टाकून पुरुषांप्रमाणे रस्त्यांत हिंडत; शुभाशुभाच्या कल्पनांनी त्यांचा वर्तमान व्यवहार गढूळलेला नव्हता. पण मराठी माणूस या शकून अपशकूनाच्या कल्पनांच्या इतक्या आहारी गेला होता की, व्यतिपात किंवा वैधृती या कुयोगांवर अपयश येते म्हणून तो खटल्याच्या तारखा चुकवित असे आणि स्वत:ची आर्थिक हानी करून घेई. इंग्रजांचे कोर्ट काही असले योग पाहून खटल्याच्या तारखा ठरवित नसते हे काही तो ध्यानात घेत नसे. ज्युलियस सिझर किंवा शिवाजी महाराजांसारखे योद्धे काही शकूनपशकूनांचा, ग्रहज्योतिषांचा सल्ला घेऊन युद्धावर निघत नव्हते. अर्थात नवीन शोध, नवीन सुधारणा , नव्या कल्पना यामुळे भुताखेतांच्या समजुतीत हळूहळू बदल होऊ लागला असल्याचे चित्र दिसू लागले होते. औदुंबर, श्रीनृसिंहवाडी, बिराडसिद्धाचे कवठे इत्यादी भूतप्रसिद्ध क्षेत्रांत भूतांची संख्या घटल्याचे एक निरीक्षण दिवेकरांनी नोंदवले आहे. (दिवेकर, १९३०, पृ. २०-२५)

साधूसंत हे मनुष्य आणि ईश्वर यांच्यातले मध्यस्थ आहेत अशा समजुतींमुळे महाराष्ट्रात साधुसंतांचा व बुवाबाजीचाही फार सुळसुळाट झाला होता. साधूंच्या आशीर्वादाने मुले होतात, किंवा बढतीचा योग येतो असल्या समजुती होत्या. दिवेकरांनी या साधूंना लष्कारात पाठवावे म्हणजे त्यांना मरण्याचा व मारण्याचा वेदांत कळेल अशी टीका केली होती, त्यावरून विनायक महाराज साखरे आणि दिवेकर यांच्यात या काळात वादही रंगला होता. अवतार संकल्पनेचाही महाराष्ट्राच्या राजकीय लोकमतधारणेवरही प्रभाव पडलेला दिसून येतो. ईश्वर भक्तांच्या कल्याणासाठी सगुणविग्रह करून मायामय शरीर धारण करतो अशी अवतार संकल्पनेविषयीची समजूत प्रचलित होती. घोड्यावर बसलेला व तलवार धारण करणारा शिवाजी हा म्लेंच्छसंहारासाठी कल्कीचा अवतार धारण करून अवतरला असल्याची लोकसमजूत मराठी समाजात रूढ होती. विसाव्या शतकातही प्रभावशाली माणसांत देव संबोधण्याची व त्यांच्या दर्शनात देवदर्शनाचे पुण्य लाभते अशा समजुतींतून महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्वाची सामाजिक स्वीकृतिशीलता वाढलेली दिसून येते. लोकमान्य टिळक किंवा महात्मा गांधींना मराठी माणूस सर्वज्ञ ईश्वर समजत असे; तर ॲनी बेझंट बाईंना देवीचा अवतार समजले जात असे. संस्थानांतील लोक आपल्या राजाला विष्णूचा अवतार समजून नमस्कार करीत असत. मुसलमान पुढारी आगाखान हे कल्की अवतार आहेत असे भासवून हिंदूंना फसवत व बाटवित. (दिवेकर, १९३०, पृ. ५७- ६१)

**गोरक्षणासंबंधीच्या धार्मिक धारणा :**

हिंदूंच्या धार्मिक श्रद्धाविश्वात गाईला पवित्र स्थान असल्याने मुसलामानांकडून होणाऱ्या गोहत्येच्या विरोधात हिंदू समाजात तीव्र असंतोष नांदत होता. त्यातूनच

बाळकृष्ण चौंडे महाराज यांनी 'गोरक्षण ज्ञानप्रसारक संघ' किंवा 'गोपाल विद्यालय' यासारख्या संस्था स्थापन केल्या होत्या. किंवा विनायकराव भावे यांनी ठाण्यात 'टिळक दुग्धगृह' स्थापन केले होते. कोल्हापूरच्या शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात गायी चारण्यासाठी दोनशे एकरांचे कुरण चौंडे महाराजांना उपलब्ध करून दिले होते. राजकीय व्यासपीठांवरही गोरक्षणाचा मुद्दा उपस्थित केला जात होता. खिलापत चळवळीच्या निमित्ताने हिंदू-मुस्लिम ऐक्यभावना वाढण्यासाठी मुसलमानांनी गोहत्या थांबविण्याचे ठरावही झालेत. १९१९ साली अमृतसरला मुस्लिम लीगच्या अधिवेशनात 'मुस्लीमांनी गोहत्या करू नयेत' अशा आशयाचा ठरावही पारित झाला होता. कॉंग्रेसनेही नागपूर अधिवेशनात असा ठराव पारित केला होता. १९२४ साली बेळगावला गांधीजींनी गोरक्षणाचा प्रश्न स्वराज्याइतकाच महत्त्वाचा असल्याचे आपले मत जाहीरपणे मांडले होते. १९२५ साली मुंबईत माधवबागेत 'अखिल भारतीय गोरक्षण मंडळा'च्या स्थापनेच्या सभेत गांधीजींबरोबर शौकत अलींनीही गोरक्षणाचे समर्थन केले. स्वा. सावरकरांनी मात्र या गोरक्षा चळवळीच्या पार्श्वभूमीवर वेगळी भूमिका घेतली होती. गायीला पवित्र देवता मानण्याची हिंदूंची परंपरा ही अंधश्रद्धा असून गायीकडे एक उपयुक्त पशू म्हणून पाहिले पाहिजे अशी सावरकरांची बुद्धिवादी मांडणी होती. गायीला उपयुक्त पशू म्हणून मूल्य असल्याचे गांधीजींनाही मान्य होते. त्यांनी मृत गाईचे कातडे कमावून चामड्याच्या उपयुक्त वस्तू तयार करण्याचा स्वदेशी उद्योग चालू ठवण्यातले हित समजावून सांगण्याचे काम केले होते; पण त्यांची एकूण मांडणी गायीला धार्मिक प्रतिष्ठा देणारी होती. (मोरे सदानंद, २००७, पृ. ६२०-६३५) गोमांस खाऊ नये ही हिंदू समाजापुरती एक रूढी-परंपरा असून हिंदू धर्मातही गोमासभक्षणाला प्रतिबंध करण्याचे आधार नसल्याने मुस्लिम, ख्रिश्चन व बौद्ध धर्मीयांना गोमांस खाऊ नये यासाठी कायदा करता येणार नाही, असा एकूण सूर याही काळातल्या चर्चेत कायम होता. गोपालनाचा प्रश्न धार्मिक गडबडगुंडा चालू न देता निव्वळ आर्थिक आणि वैज्ञानिक दृष्टीने सोडवावा, असे सावरकरांनी सुचविले होते. (कानिटकर, २०००, पृ. १९)

**शुद्धीकरणाची मोहीम :**

हिंदू लोकांना ख्रिस्ती वा मुस्लिम धर्मात प्रवेश देण्याच्या घटना विसाव्या शतकातही सुरू होत्या. छल, बल, छद्म, अपकृत्य इत्यादी मार्गांनी धर्मांतरे घडवून आणली जात होती. धर्मांतराच्या या घटनांमुळे हिंदूंची संख्या घटून ख्रिश्चन व मुस्लीमांची संख्या वाढू लागली होती. १९११ आणि १९२१ च्या शिरगणतीच्या आकडेवारीनुसार दहा वर्षात हिंदूंची संख्या १ कोटी १२ लक्षांनी कमी झाली होती.

अशा धर्मांतरित हिंदूंना परत हिंदू धर्मात आणण्यासाठी शुद्धीकरणाची चळवळ स्वामी श्रद्धानंद, आर्य समाज आणि डॉ. कुर्तकोटींची हिंदुधर्मपरिषद यांनी सुरू केली

महाराष्ट्रात या १० वर्षात हिंदूंच्या संख्येत झालेली जातनिहाय घट अशी होती :

| | जात | १९११ | १९२१ | १० वर्षातील घट |
|---|---|---|---|---|
| १. | ब्राह्मण | १,४५,९५,७०८ | १,४२,५४,९९१ | ३,४०,७१७ |
| २. | अहीर | ९५,७८,४८६ | ९१,६२,८६१ | ४,१५,६२५ |
| ३. | सोनार | १२,६२,९७८ | ११,३७,६११ | १,२५,३६७ |
| ४. | माळी | २०,३५,८५३ | १८,७५,६१० | १,६०,२४३ |
| ५. | हजाम | ३०,१३,३९९ | २९,०५,७२४ | १,०७,६७५ |
| ६. | लिंगायत | २९,७६,६३० | २७,३८,२१४ | २,३८,७१६ |
| ७. | लोहार | २०,७०,३७२ | १५,४६,३०८ | ५,२४,०६४ |
| ८. | कुणबी | ४५,१२,७२७ | ३२,२९,०१८ | १२,८३,७०९ |
| ९. | कोळी | ३१,७१,७९८ | २४,९९,०१४ | ६,७२,७८४ |
| १०. | कसई | ९,६२,१२३ | २,८५,७५८ | ६,७६,३६५ |
| ११. | महार | ३३,४२,६८० | ३०,०२,५१६ | ३,४०,१६४ |
| १२. | चांभार | १,१४,९३,७३३ | १,१२,६३,६४८ | २,३०,०८५ |
| १३. | डोंब | ९,२५,८२० | ४,२४,६५० | ५,००,८७० |

*(दिवेकर,१९३०, पृ. ६१)*

होती. महाराष्ट्रात गजानन भास्कर वैद्य यांनी हिंदू मिशनरी या नात्याने या कार्याला प्रथम सुरुवात केली होती. खिलाफत चळवळ थंडावल्यानंतर देशात ठिकठिकाणी हिंदू-मुसलमानांत दंगली झाल्या. मोपल्यांच्या बंडानंतर जुलमाने अनेक हिंदूंना मुसलमान करण्यात आले. या पार्श्वभूमीवर मुसलमान झालेल्या कित्येक हिंदूंना शुद्धीकरणाच्या प्रक्रियेतून पुन्हा हिंदू करण्याची मोहीम सुरू झाली होती. अन्य धर्मीयांना हिंदू धर्मात प्रवेश देण्याची कुठलीही विधिपरंपरा नव्हती; यामुळे धर्मांतराची प्रक्रिया कशी करावी याविषयीची विविध मतमतांतरे या काळात चर्चेत होती. 'जर शेंडी छाटून मुसलमान होता येते तर दाढ्या बोडून हिंदूही करता येते, हिंदू मुलींना इजारी नेसविल्या की त्या जर मुसलमान होतात तर मुसलमान बायांना साड्या नेसविल्या तर त्या का हिंदू होऊ नयेत? जर कुराण मानल्याने मुसलमान व बायबल मानल्याने ख्रिश्चन होता येते, तर गीता मानून हिंदू का होता येऊ नये? जर इतर धर्मीयांनी नुसत्या पाण्यावर, अन्नावर व हजामतीवर धर्मांतर करण्याची प्रथा सुरू केली आहे, तर त्याच उपायांनी त्यांना गप्प बसविले पाहिजे, अशी आक्रमक भूमिका पुढे येऊ करून घेण्याचा धडाका लावावा, असा विचार मांडला जात होता. लोकशाहीत जर संख्याबळच महत्त्वाचे असते, तर हिंदूंचीही संख्या वाढविली पाहिजे, या मताने जोर धरला होता. (दिवेकर, १९३०, पृ. ५६-६५) संख्येत खरे बळ

नसून समाजातील व्यक्तींच्या तेजादिक गुणांतच सर्व बळ आहे, अशा प्रकारचा युक्तिवाद काही घटकांकडून होत होता, त्याला उत्तर देताना स्वा. सावरकरांनी लिहिले होते की, "आम्हाला गुणबळ हवेच, पण संख्याबळही हवेच. संख्याबळ हेही एक बळच आहे. प्रांतात व देशांत आमची इतकी संख्या म्हणून विधिमंडळात, नोकऱ्यांत आम्हाला इतके प्रतिनिधित्व द्या. आमच्या प्रांतात आमची इतकी संख्या म्हणून हिंदुस्थानचे अमुक प्रांतच अलग करून द्या, या मागण्या काय सांगतात? (कानिटकर,२०००, पृ. ३१)

५ जुलै १९१७ रोजी मुंबईत गजाननराव वैद्य यांच्या पुढाकारातून 'हिंदू मिशनरी सोसायटी' स्थापन झाली होती. गरजू लोकांना आमिष दाखवून धर्मांतर करण्यास प्रवृत्त करणाऱ्या ख्रिस्ती मिशनऱ्यांचा प्रतिवाद करण्याच्या प्रेरणेतून ह्या सोसायटीची स्थापना झाली होती. ब्रिटिश सत्तेचे आक्रमण हे केवळ राजकीय नसून धार्मिक-संस्कृतिक असे सर्वंकष आक्रमण असल्याचे त्यांचे मत होते. 'बाटला तो आम्हाला मेला' या न्यायाने हिंदुधर्मीय धर्मांतरित व्यक्तींकडे पहात असत; गजाननराव वैद्य यांनी अशा बाटलेल्या किंवा बाटविल्या गेलेल्या धर्मांतरितांना पुन्हा हिंदू धर्मात आणण्याची मोहीम चालवली. पुण्यात डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या पत्नी शीलवती केतकर यांचा लग्नापूर्वी वेद्संमत व्रात्यस्तोमविधीने हिंदू धर्मात प्रवेश याच हिंदू मिशनरी सोसायटीच्या वतीने करण्यात आला होता. (रघुनाथराव खेडकर हे पुण्याच्या हिंदू मिशनरी शाखेचे पहिले अध्यक्ष होते.) धर्मांतराच्या विधीला हिंदू मिशनरी सोसायटीत 'शुद्धीकरण' असे न म्हणता जाणीवपूर्वक 'उपनयनविधी' म्हणून संबोधले जाई. उपनयन म्हणजे जवळ करणे असा अर्थ त्यांना अभिप्रेत होता, उपनयनविधीच्या माध्यमातून अंतर्गत एकीकरणाचा मार्ग प्रशस्त करण्याची भूमिका होती. धर्म हा जातिसंबद्ध नसून माणसाचा आत्मसंतोष हा धर्माचा गाभाभूत आशय आहे असे मानणाऱ्या हिंदू मिशनरी सोसायटीने नवहिंदूंना जात नाही असे जाहीरपणे सांगितले होते.

राष्ट्रीय पातळीवर शुद्धीकरणाची चळवळ संघटित करणाऱ्या स्वामी श्रद्धानंदांची २३ डिसेंबर १९२६ रोजी अब्दुल रशीद या मुस्लीमाने हत्या केली. दिल्लीत आजारी असलेल्या स्वामींना आदरांजली वाहण्याचा बहाणा करून रशीदने स्वामींच्या निवासस्थानी जाऊन त्यांची हत्या केली होती. या हत्येमुळे हिंदू-मुस्लिमांतली तेढ वाढत गेली. हिंदुत्ववादी अधिकाधिक आक्रमक होऊ लागले. या आक्रमक हिंदुत्ववादाने बऱ्याचदा संयमाची व सहिष्णुतेची भाषा बाजूला ठेवून भडकावू भाषेत आपल्या विचारांची मांडणी केलेली दिसते. मुस्लमानांचा मशिदीवरून वाद्ये वाजविण्यास विरोध असे, व त्यावरून दंगलीही होत. यावर आक्रमक हिंदुत्ववाद्यांचे उत्तर असे की, मुसलमानांना ताबुतांमध्ये पंजापुढे वाद्ये चालतात, तेव्हा नमाजात काही व्यत्यय येत नाही; हिंदूंच्या मिरवणुकीतील वाद्यांचाच तेवढा व्यत्यय कसा होतो? तुर्कस्थान, इराण, इराक,

अफगणिस्तानात मशिदीपुढे वाद्ये वाजवायला बंदी नाही, मग भारतातच बंदी का? मुसलमान गोवधबंदीला तयार नाहीत म्हणून त्यांना चीड आणण्याकरिता वराहवधाने उट्टे काढावे असली 'शठं प्रतिशाठ्यं'ची भाषा या हिंदुत्ववाद्यांच्या युक्तिवादात ठासून भरलेली असे. (दिवेकर, १९३०, पृ. ११०) वृत्तपत्रांतून यासंदर्भात प्रसिद्ध होणाऱ्या वार्तापत्रांच्या भडकावू भाषेवरही गांधीजींनी टीका केली होती. 'यंग इंडिया' त त्यांनी लिहिले होते की, "वृत्तपत्रकार हे जिवंत रोगजंतू झालेले आहेत. खोट्या व निंदापर गोष्टींचा संसर्ग ते पसरवीत असतात. आपल्या भाषेतील अपशब्दांचा उद्धार ते करतात आणि हे विष निरपराध, साध्यासुध्या, समुत्सुक वाचकांच्या मनांत पसरवितात. आपल्या भाषेतील अलंकारिक फुलोऱ्याने धुंदी येऊन, पुढाऱ्यांना आपल्या वाणीवर व लेखणीवर ताबा ठेवला पाहिजे हे कळत नाही. गुप्त व घातक प्रचाराने आपले कार्य पार पडले आहे याबद्दल कोणी अटकाव करत नाही आणि कोणाला त्याची लाज वाटत नाही. म्हणून आपण सुशिक्षित व अशिक्षित लोकच अब्दुल रशीद याला संतापवायू झाला याबद्दल जबाबदार आहोत. (कानिटकर, २०००, पृ. ५७) म. गांधी यांनी मात्र या घटनेकडे एका मुसलमानाने एका हिंदूविरुद्ध केलेले दुष्कृत्य असे या न पाहता एका प्रमादशील बंधूने एका शूर पुरुषाविरुद्ध केलेले दुष्कृत्य म्हणून पहावे असा हिंदूंना सल्ला दिला. (गोखले द. न. पृ. १९७) स्वा. सावरकरांनी गांधीजींच्या या भूमिकेवर आक्षेप घेतला. गांधीजींच्या विधानांवर भाष्य करताना सावरकरांनी लिहिले होते की, " हिंदू-मुसलमानांतील वैमनस्याच्या भयंकर रोगापासून जर आपणास सर्वांस मुक्त होणे असेल, तर स्पष्टपणे आपण त्या रोगाची चिकित्सा केली पाहिजे. ती चिकित्सा हेच सांगते की, मुसलमानी समाजातील धर्मोन्मादाची प्रवृत्ती हेच या रोगाचे मूळ कारण आहे आणि त्या प्रवृत्तीचे आविष्करण करण्यास भयाने किंवा भाबडेपणाने किंवा मुर्खपणाने, स्वत:चे महत्त्व मुसलमानांत अधिक वाढावे अशा अक्षम्य इच्छेने, हिंदू समाज आणि मुसलमानी समाज सारखाच दोषी आहे म्हणून म्हणणारा हा नि:पक्षपाती पक्षपात हाच खरा राष्ट्रविघातक 'चालता प्लेग' आहे." (श्रद्धानंद, १० जाने. १९२७ / कानिटकर, २०००, पृ. ६४)

हिंदू समाजाने मुसलमानांवर बहिष्काराचे अस्त्र वापरावे व कुठल्याही बाबतीत त्यांच्यावर अवलंबून राहाता कामा नये यासाठी समाजबंधुत्वाचे मूल्य घट्ट करावे, असा एक पर्याय दिवेकरांनी सुचविला होता. त्यासाठी त्यांनी दिल्लीला ३१ डिसेंबर १९२६ च्या 'तबलिक परिषदे'च्या अध्यक्षांनी मुस्लिम समाजाला दिलेल्या पुढील सल्ल्याचे उदाहरण दिले होते: "That Muslims should take a vow to buy all the requirements from the Muslims alone" या सल्ल्यानुसार कित्येक गावात मुसलमानांनी असे प्रयत्न सुरू केलेले आहेत की त्यांच्या समाजातील पैसा हिंदू धंदेवाईकांना बिलकूल मिळू द्यावयाचा नाही. पुण्यात मंडप घालण्याच्या धंद्यातून

मुसलमानांनी बुरुडांना बाहेर काढून त्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. भुसावळला बत्तासे करण्याचा मक्ता मुसलमानांकडेच आहे, हिंदू हलवाई त्यांच्याकडून बत्तासे घेऊन विकतात. मिरज, सुरत, कल्याण शहरात गवळ्यांचा दूधाचा व्यवसाय मुसलमानांनी आपल्या अखत्यारित आणला आहे. मालेगावात हिंदू कोष्टी नाहिसे झाले असून फक्त मोमीनच या व्यवसायात अग्रेसर आहेत. बँड वाजविण्याचा धंदा मुसलमानांनीच ताब्यात घेतला आहे. अकोला, मूर्तिजापूर, बऱ्हाणपूर, कल्याण, कऱ्हाड येथे टांगेवाले मुसलमानच असतात, हिंदू टांगेवाला विरळाच सापडेल. हिंदू चांभारांनी जोडे शिवावेत, पण त्यांची विक्री मात्र मुसलमानांनी करावी, गवंडी कामातही मुसलमान कारागीरच पुढे असतात, कल्हईवाले, फेरीवाले, छत्र्याकुलुपे विकणारे, खिळेमोळे विकणारे , शोभेची दारू विकणारे मुसलमानच असतात. असे सर्वसाधारण चित्र दिसू लागले होते. हिंदूंनीही याच पद्धतीने सर्व आर्थिक क्षेत्रे व्यवस्थितपणे आपलीशी केली पाहिजेत, अशी प्रतिक्रियावादी विचारसरणी मूळ धरू लागली होती. हरहुन्नर करणारे अठरा पगड जातीचे लोक हिंदू समाजात असताना आपल्याला मुसलमानांची आवश्यकताच उरत नाही, अशी ही भूमिका होती. (दिवेकर, १९३०, पृ. १२२-१२३) धार्मिक तेढीतून का होईना हिंदू समाजाची आर्थिक पुनर्घटना करण्याचा विचार पुढे येते होता, ही त्यातल्यात्यात जमेची बाजू म्हणता येईल.

युरोपियन लोक आपल्या देशाचा उल्लेख 'कास्ट रिडन कंट्री' अर्थात जातींनी दबलेला देश असा करतात, हे कटू सत्य आहे. त्यामुळे जातिकेंद्री हिंदू समाजाची पुनर्घटना साधण्यासाठी काकासाहेब कालेलकरांनी नव्या जातिवर्गाच्या संरचनेचा पर्याय सुचविला होता. शं. द. जावडेकर आणि स. ज. भागवत यांनी राष्ट्रीय ग्रंथमालेच्या माध्यमांतून कालेलकरांची ही सामाजिक पुनर्घटनेची मांडणी मराठी समाजाच्या विचारमंथनासाठी प्रसृत केली होती. वर्ण आणि जात यातील मूलभूत भेद लक्षात घेऊन कालेलकरांनी ही पुनर्घटना सुचविली होती. तांच्या मते वर्णामध्ये योग्य परस्परावलंबन, परस्परसहकार्य आणि समस्त सामाजिक जबाबदारीची तत्त्वे असतात. जातीच्या बाबतीत मात्र असे दिसून येत नाही. जात ही स्वयंपूर्ण समाजाची रचना करण्याचा प्रयत्न करीत असते. इतर लोकांपासून वेगळे होऊन आपली टोळी मजबूत करणे एवढाच विचार करते. राष्ट्रीय संकटे ओळखून धर्मभावनेने लढण्याची जातींची तयारी नसते, किंवा सामाजिक जबाबदारी ओळखून सगळ्या समाजाची सेवा करण्याचा संघटित प्रयत्न जाती करताना दिसत नाहीत. फार तर आपल्या जातीतल्या मुलांमुलींना शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या देणे, छात्रालये काढणे, त्यासाठी फंड गोळा करणे, आपल्या जातीची मुले सरकारी नोकरीत घुसविण्यासाठी प्रयत्न करणे, आपल्या जातीचा इतिहास व तिच्यासंबंधीच्या पौराणिक कथा संग्रहित करणे, आपली जात श्रीमंत व वशीलेबाज कशी होईल यापेक्षा वेगळे व्यापक

समाजहिताचे काम ह्या जातिसंस्था करताना दिसत नाहीत. समाजिक, आर्थिक, कलाविषयक वा अन्य क्षेत्रातील आवश्यकता तपासून स्वतंत्र शिक्षणपद्धती शोधून तिचा प्रयोग करून पाहाण्याचे सर्जनशील उद्योग जातिसंस्था करत नाहीत. किंवा उत्तम चारित्र्यवान, शुद्ध देशभक्त, राष्ट्रधुरीण किंवा असाधारण विद्वान माणसाला ह्या ज्ञातिसंस्था आपले पुढारपण बहाल करताना दिसत नाहीत. हा सार्वत्रिक अनुभव लक्षात घेता जातिसंस्थेच्या बद्धतेत अडकण्याऐवजी सामाजिक प्रवृत्तीनुसार नवे वर्ग कल्पून समाजाच्या पुनर्घटनेचा विचार व्हावा म्हणून एक नवे प्रमेय कालेलकारांनी पुढे आणले होते. ते असे : निसर्गनियम आणि प्रकृतिधर्मानुसार समाजाचे प्रामुख्याने ३ वर्ग पडतात –

१. सागरी वर्ग : समुद्रावर उपजीविका करणारी समुद्र किनारपट्टीवर राहाणारी माणसे. होडी हा त्यांचा जीवनसाथी. नौकानयन व मच्छिमारी करणे हा त्यांचा मुख्य व्यवसाय. हे लोक साहसी, दीर्घोद्योगी आणि सुसरीसारखे किंवा मुंगळ्यासारखे चिकट व बेदरकार असतात. जितक्यांदा जाळे तुटेल तितक्यांदा ते जोडण्यात हे लोक कुशल असतात.
२. कृषिवर्ग : शेतीवर उदरनिर्वाह करणारा वर्ग. धान्य, कापूस, ऊस, तंबाखू आणि फळझाडे हे त्यांच्या उपजीविकेचे साधन असते. गुरे-गाई, म्हशी, बैल, रेडे, शेळ्यामेंढ्या, हे त्यांचे जीवनसाथी असतात. जमिनीसाठी प्राण पणाला लावतील. वेळ आल्यास आपली जात किंवा धर्महि सोडतील; पण जमिनीला चिकटून राहातील. निसर्गावर आणि पशूंवर अवलंबून असल्याने परस्पर सहकार्याने संघ स्थापन करणे, व्यवस्था उभ्या करणे या गोष्टी त्यांना सहज जमतात.
३. वन्यवर्ग : या वर्गात भिल्ल, रामोशी, कातकरी इत्यादी लोक येतात. शिकार हे उपजीविकेचे मुख्य साध, त्यामुळे कुत्रा हा त्यांचा जीवनसाथी. शेतीची हे लोक मदत घेताल, पण शेती हा त्यांचा मुख्य जीवनाधार नसतो. वन्यवर्गात स्वावलंबन, अखंड जागृती किंवा सावधानता, अनोळखी व्यक्तीविषयी काहीसा अविश्वास व स्वातंत्र्यप्रीती हे गुण आढळून येतात. इमान, विश्वास, आतिथ्य आणि बहादुरी हे त्यांचे खास गुणविशेष असतात.

निसर्गापासून प्राप्त झालेले हे मूळ स्वभाव पुन: विकसित करण्यावर भर देऊन सामाजिक पुनर्घटना व्हावी असे कालेलकरांना वाटले. एकमेकांच्या विकासात एकमेकांचे हित सामावले आहे, या निसर्गधर्मानुसार परस्परसहकार्याच्या बंधांतून राष्ट्रीय विकास साधणारी सामाजिक पुनर्घटना करावी, असा आदर्शवादी पर्याय कालेलकरांनी सुचविला होता. युरोपात जाती नसून वर्ग आहेत, तशी आपल्याकडे पुनर्घटना झाली तर युरोपात जसा चांभारही लॉर्ड किंवा इंग्लंडचा मुख्य प्रधान होऊ शकतो, तशी किमया भारतातही घडवता येईल, असा विश्वास कालेलकरांनी या मांडणीतून व्यक्त केला होता. (कालेलकर, १९४६)

**मुस्लिम धर्माची पुनर्घटना :**

महाराष्ट्रात हिंदू धर्मानंतर मुसलमान धर्मीयांची लोकसंख्या आहे. मराठवाड्यात १५ टक्क्यांहून अधिक मुसलमान समाज असून मालेगाव, मुंबई, भिवंडी, बुलढाणा, धुळे, जळगाव, अहमदनगर, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, मिरज, सातारा आणि कोकणात सर्वत्र कमीअधिक प्रमाणात मुस्लिम समाजाचे पूर्वापार वास्तव्य आहे. महाराष्ट्रातल्या मुसलमानांत अश्रफ आणि अजलफ हे दोन प्रमुख वर्ग आणि शिया व सुन्नी असे सांप्रदायिक भेद आहेत. मुसलमानांमध्येही ७० हून अधिक जाती आहेत. पैकी शेख, सय्यद, पठाण, खोजा, बोहरा, मेमन, खलीफ, फकीर आणि मुगल या जाती वरिष्ठ वर्गात मोडतात. बोहरा आणि खोजा मुस्लिम व्यापार करणारे असून विदर्भातील काही मुसलमान जमीनदार आहेत; अन्य जातीत कारागीर आणि शेतमजूरांचा भरणा अधिक आहे. शिकलगार, दर्जी, पिंजारी, रफूगार, हजाम, तांबोळी, पखाली, गवंडी, भडभुंजे, मदारी, हलाल इत्यादी जमाती पारंपरिक कारागिरीचे व्यवसाय करतात.

महाराष्ट्रात मुस्लिम समाजाच्या पुनर्घटनेसाठी जाणीव-जागृती घडविणाऱ्या चळवळी मात्र फारशा झाल्या नाहीत. धर्म अपरिवर्तनीय व शाश्वत असल्याची श्रद्धा असल्याने मुस्लिम धर्मात सुधारणावादाला स्थान नाही, अशी सर्वसाधारण समजूत रूढ होती. प्रेषिताचे चरित्र, पवित्र कुराण आणि हदीस यांना प्रमाण मानून धर्माचरण करावे, याखेरीज इतर कोणतीही वेगळी सुधारणा स्वीकारण्याची मानसिकता या समाजात नव्हती. आचार्य अ. के. भागवत यांनी मुस्लिम धर्मसुधारकांच्या अशा उदासीनतेविषयी खंत व्यक्त करताना इस्लामच्या धार्मिक तत्त्वज्ञानातील विधायक बाबींकडे लक्ष वेधले होते; त्यांनी नोंदविलेली इस्लामची विधायक तत्त्वे अशी होती :

- अल्लाहचा नियम एकच आणि तो म्हणजे सत्य.
- खरा मोमीन तो की जो स्वत:ला जाणतो आणि आचरणात व्यक्त करतो.
- कुराणाविषयी आदर बाळगणारा जर वेदांविषयी आदर बाळगीत नसेल, तर तो सच्चा मुस्लिम नव्हेच.
- काफीर या शब्दाचा खरा अर्थ नास्तिक, परमेश्वर न मानणारा असा आहे.
- कुराणात तलवारींचा उल्लेख केवळ स्व संरक्षणाच्या संदर्भात करण्यात आला आहे.

मात्र या तत्त्वांनुसार मुसलमानांचे आचरण होत नाही, त्यासाठी मुस्लिम सुशिक्षितांनी धर्मचिकित्सेचा दृष्टिकोण ठेवून धर्मसुधारणेसाठी पुढे यायला हवे, अशी अपेक्षा भागवतांनी व्यक्त केली होती. (कांता, १९९५, पृ. १४५)

मुस्लिम धर्माची सामाजिक पुनर्घटना न होण्यामागे त्यांच्यात रूढ असलेल्या काही ठाम समजुती कारणीभूत होत्या. स्वा. सावरकरांनी मुसलमानांच्या धार्मिक समजुतींविषयीचे निरीक्षण नोंदवताना म्हटले होते की, " सर्वसाधारण मुसलमान अद्याप

धार्मिक पगड्यापासून मुक्त नाही. त्यांच्या धार्मिक विचारानुसार ही भूमी दोन भागात विभागली आहे. एक मुस्लिम भूमी नि दुसरी शत्रुभूमी. शत्रुभूमीत राहणाऱ्या मुसलमानांनी ती भूमी तेथील लोकांना मुसलमान करून किंवा जिंकून आपल्या सत्तेखाली आणली पहिजे ही त्यांची धर्मश्रद्धा आहे. त्या श्रद्धेप्रमाणे त्यांना येथील हिंदूपेक्षा बाहेरचे मुसलमान जवळचे वाटतात. त्यांच्याशी संगनमत करताना त्यांना देशद्रोह वाटत नाही कारण त्यांना ही हिंदू भूमी शत्रुभूमी (दार उल हरब) वाटते. दार ऊल इस्लाम वाटत नाही. (कानिटकर, २०००, पृ. ८१) (यासंदर्भात प्रस्तुत खंडातील 'मुस्लिम लीग आणि लखनौ करार' , 'खिलाफत चळवळ' आणि 'हैद्राबाद संस्थानातील धार्मिक-राजकीय गुंता' ह्यासंबंधीचा मजकूरही पहावा.)

**हिंदी-ख्रिस्ती सांस्कृतिक पुनर्घटना :**

ख्रिस्ती धर्माचे हिंदी संस्कृतीकरण ही संकल्पना प्रथम रे. नारायण वामन टिळक यानी पुढे आणली होती. धर्म बदलून आपण ख्रिस्ती झालो म्हणजे वेगळे झालो ही कल्पनाच त्यांना मंजूर नव्हती. ते म्हणत, "आम्ही मराठी ख्रिस्तांनी ख्रिस्ताचा नवा करार स्वीकारला आहे; मोझेसचा जुना करार नाही. आमचा जुना करार ज्ञानदेव-तुकाराम आहेत, ते आम्हाला पूज्य आहेत. त्यांनीच आम्हाला ख्रिस्ताची वाट दाखविली." टिळकांनी ख्रिस्ती समाजात वारकऱ्यांप्रमाणे टाळ, वीणा, मृदंग यांच्या साह्याने भजन करण्याची प्रथा सुरू केली. . उपासना तीच, उपास्यदैवत तेवढे वेगळे. हिंदू धर्माला हे अनेकत्व मंजूर आहे." अहमदनगरला ख्रिस्ती मिशनरी आले, ते मराठी शिकले, मिशनरी स्त्रिया घरोघरी जाऊन ओट्यावर बसून भजने म्हणत, मुलींना भरतकाम, शिवणकाम शिकवत. त्यांनी मराठी संस्कृतीचा अनुबंध पुसून टाकण्याचा प्रयत्न केला नाही. रे. टिळकांच्या सहवासात आलेल्या ख्रिस्ती स्त्रिया कुंकू लावू लागल्या. ख्रिस्ती झाले म्हणजे पाटलोण घातलीच पाहिजे असे नाही, हा संस्कार रूजवला. स्वत: टिळक ख्रिस्ती झाले तरी शाकाहारीच राहिले. ख्रिस्ताबरोबर मिशनऱ्यांनी आणलेली आनुषंगिक अडगळ फेकून देऊन ख्रिस्ती धर्माचे मराठी वळण रूजविण्यासाठी त्यांनी नमुनादर्श घालून दिला. ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या वसाहतवादी राजवटीलाही त्यांचा विरोधच होता; आपली स्वातंत्र्याकांक्षेची देशी बांधिलकी कवितेतून व्यक्त करताना टिळकांनी लिहिले होते,

"बांधा रे गाठोडी व्हा रे चालते, जया नावडते हिंदभूमी
हात जोडितो मी प्रेमाविण कोणी, नका ख्रिस्तवाणी खोटी करू
तारील आम्हाला सत्ता किंवा वित्त, हीच समजूत आधी खोटी
नकोत आम्हां पितरें दैवते, बंधुत्वाचे नाते जोडा पाहू
दास म्हणे झाले काल ते विसरा, नवी वृत्ती धरा आज आधी //"

अर्थात सर्वच मिशनऱ्यांना टिळकांचा हा मराठी बाणा रूचला नाही, त्यांनी टिळकांना

विरोधही केला. शेवटी त्यांनी चर्चा त्याग करून भगवी कफनी चढवून नगर सोडले. 'देवाचा दरबार' नावाची नवी संस्था काढली, आणि ख्रिस्ताच्या पायाशी शपथ घेतली, 'मी तुझ्यासारखा दरिद्री राहीन, तुझ्यासारखी सेवा करीन, तुझ्यासारखा निर्वैर असेन; तुझ्यासारखा खांबाला खिळात जाण्यास सिद्ध राहीन'. (घाटे, १९६१,पृ. १८-२०)

ख्रिस्ती मिशनऱ्यांनी पुढे 'हिंदी-ख्रिस्ती संस्कृतिनिर्माणाचा संकल्प घेऊन आपल्या कार्याची नवी दिशा ठरविली होती. १९२९ साली २५ जूनला नाशिकला बिशप लॉईडची स्थापना झाली. नाशिकचे पहिले बिशप म्हणून लॉईड यांची संत आन्द्रयाच्या देवळात धर्मपीठावर नेमणूक झाली. या स्थापना विधीप्रसंगी भाषण करताना मुंबईचे बिशप म्हणाले होते की, " हा धर्म मुख्यत्वेकरून देशी आहे. धर्मप्रांताच्या वृद्धीचा इतिहास म्हणजे हिंदी-ख्रिस्ती एक्क्लेसियाच्या वृद्धीचा इतिहास. अशानेच तुमची हिंदी-ख्रिस्ती संस्कृती तयार होईल. हे कार्य तुम्ही हाती घ्यावे म्हणून मुंबईच्या मोठ्या धर्मप्रांतापासून तुम्हांस स्वतंत्र केले आहे. हे पहिले ध्येय तुम्ही ठेवा- प्रत्येक खेड्यात शुभवर्तमानाचा प्रसार करा. परदेशी मिशनरी हिंदी चर्चचे मदतनीस होतील." (आठवले, १९३२, पृ. ५४-५५)

विसाव्या शतकातले ख्रिस्ती धर्मीय नेतृत्व वसाहतवादी राजकीय प्रभुत्वाच्या मूल्यचौकटीबाहेर जाऊन धार्मिक पुनर्घटनेचा विचार करू लागले होते. सामाजिक मनोधारणा घडविणाऱ्या एतद्देशीय धार्मिक-सांस्कृतिक आचारधर्माच्या मुशींचे आदिबंध न मोडता धार्मिक पुनर्घटना साधण्याची नवी दिशा हे नेतृत्व शोधू पहात होते, हे वरील उदाहरणांवरून लक्षात येते. थिऑसॉफिकल सोसायटीनेही इंग्रजी वळणाचे दडपण कमी करणारा आचारधर्म स्वीकारून स्थानिक सांस्कृतिक परंपरा आणि नमुनादर्शांच्या चौकटीत आपला आचारधर्म बसविण्याचा मार्ग स्वीकारला होता. थिऑसाफिस्टांनी दिवाणखान्यात खुर्च्यांऐवजी भारतीय पद्धतीची बैठकव्यवस्था करण्याचा रिवाज ठेवला होता. धुप-उदबत्ती लावण्याची दैनंदिन धार्मिक जीवनाचारातली सवय थिऑसॉफिस्टांनीही गिरवली होती. लांबसडक केस, निळसर मखमली टोपी, मुंडीछाट सदरा ह्या पोशाखात दिमाख असला तरी तो भारतीय वळणाचा होता. लोकपरंपरातल्या चांगल्या सवयींचा वारसा कायम ठेवून नव्या धर्मविचारांचे कलम करण्याची पद्धती या संप्रदायाने स्वीकारली होती. (घाटे, १९६१, पृ. ११२)

धर्म कुठलाही असो, त्याच्या स्वभावधर्माची घडण आणि त्याचा दैनंदिन आचारधर्म हा खास मराठी वळणाचाच असायचा. अगदी मुसलमानांनाही हे लागू पडत असे. वि. द. घाटे यांनी कोकणातल्या मुसलमानांविषयीचे एक वस्तुनिष्ठ निरीक्षण त्यांच्या आत्मकथनात नोंदवले आहे : "१९२२ साली मी रत्नागिरीला गेलो तेव्हा तेथील हिंदू-मुसलमानांत धर्माखेरीज मला कसलाही भेद दिसला नाही. त्या वेळी मुसलमान कोण हे ओळखणे कठीण जाई. सारे मुसलमान धोतर नेसत, रूमाल बांधीत, अंगावर उपरणे घेत.

सारे शुद्ध मराठी बोलत आणि लिहीत. कोणी तांबे, महाडिक अशी आपली मूळची आडनावे वापरीत. .. मी मुसलमानांशी उर्दूत बोलू लागलो म्हणजे सांगायचे 'मराठीत बोला, तुमचे उर्दू आम्हाला समजत नाही.. आम्हाला उर्दू शाळा द्या म्हणून मागणी करणारे मुसलमान बाळबोध लिपीत अर्ज लिहीत आणि सुवाच्च मोडीत सही करीत." (घाटे, १९६१, पृ. २३३) अशा प्रकारे धर्म वेगळे असले, तरी मराठी माणसाची मूस एकच होती. तीत धर्म बदलल्याने काही आमुलाग्र बदल झाला नव्हता. हिंदू मुसलमानांइतकेच मागासलेले होते आणि ख्रिस्ती होऊनही मराठी माणसाची मूळ प्रकृती बदलली नव्हती. मात्र धार्मिक अस्मितेचे राजकारण करणारी मंडळी जाणीवपूर्वक धार्मिक विभक्तीकरणाची भावना जागवून महाराष्ट्र संस्कृतीच्या एकजिनसीपणाला भेदणारी कारस्थाने करताना दिसत होती. मोर्ले-मिंटो सुधारणांनंतर राजकीय हितसंबंधांचे गड भक्कम करण्यासाठी धार्मिक-भाषिक भेदनीतीचा उपयोग केला जाऊ लागला. याचे एक उदाहरण वि. द. घाटे यांनी नोंदवले आहे. कोकणात पाचदहा मुसलमान मुले असली तरी त्यांच्यासाठी उर्दू माध्यमाच्या शाळेची वेगळी व्यवस्था हट्टाने निर्माण करण्याचा खटाटोप चालत असे. इब्राहिम रहिमतुल्ला हे एक्झिक्युटिव्ह कौन्सिलर अशा उर्दू शाळा काढण्यासाठी पुढाकार घेत असत. कोकणातल्या मुसलमानांना उर्दू येते नव्हते म्हणून धारवाड-हुबळीहून उर्दू शिक्षक मागवून उर्दू शाळा चालविण्याचा खटटोप त्यांनी चालविला होता. मुसलमानांना मराठी समाजापासून वेगळे काढण्याचा डाव अशा प्रकारे हे मुसलमान धुरीण करीत होते. (घाटे, १९६१, पृ. २३४) धार्मिक राजकारण करणाऱ्यांनी मराठी समाजाच्या एकजिनसीपणाला सुरुंग लावल्याने सामाजिक एकता कशी भंग पावत होती, याचे हे एक नमुना उदाहरण आहे.

## ६.७. आदिवासींची पुनर्घटना :

महाराष्ट्रात एकूण लोकसंख्येपैकी ९. २७% लोकसंख्या आदिवासींची आहे. सह्याद्री, सातपुडा डोंगरकुशीत आदिवासींची वस्ती आहे. ठाणे जिल्ह्यात वारली, कातकरी, कोकणा, मल्हार कोळी, ठाकर; नाशिक जिल्ह्यात महादेव कोळी, कोकणा, ठाकर, भिल्ल; धुळे-नंदुरबार जिल्ह्यात भिल्ल, गावीत, तडवी, पावरा, कोकणा, धानका; अहमदनगर व पुणे जिल्ह्यात महादेव कोळी व ठाकर; रायगड व सिंधूदुर्ग जिल्ह्यात ठाकर, कातकरी; औरंगाबाद, अमरावती जिल्ह्यात कोरकू; यवतमाळ जिल्ह्यात कोलाम, गोंड व आंध; चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात गोंड, मडिया गोंड, परधान, हलबा या आदिवासी जमाती रहातात. (गारे, २००२, पृ. १२) महाराष्ट्रातल्या आदिवासी जमातींच्या राहाणीमानात, सामाजिक जीवनात, धर्म वा नीतिकल्पनांत थोडेफार बारकावे सोडल्यास एकसारखेपणा आढळतो. पहाडात राहाणारे 'तडवी', वसाहत करून राहाणारे 'वसावा',

मूळ गावापासून तुटलेले 'तडवी', भिलाटीत राहाणारे 'बरडे' भिल्ल, 'वरल' (राब भाजण्यासाठीचा झाडोरा) पसरून शेती करणारे 'वारली', बांबूपासून टोपल्या बनवणारे 'बुरूड', खैराच्या झाडापासून कात बनविणारे 'कातकरी', दगडापासून पाटेवरवंटे करणारे 'पाथरवट', या अशी क्षेत्रव्यवसायसंदर्भान्वये नामभिन्नता मात्र आढळून येते. या आदिवासी जमातींमध्ये छोटेमोठे राजे, जहागीरदारही होऊन गेले आहेत. जवाहर संस्थानचे राजे महादेव कोळी होते. चंद्रपूर भागात गोंड राजे होते; परधान आदिवासी हे गोंडांच्या राज्यात दिवाणाची जबाबदारी सांभाळणारे होते, खानदेशी भिल्लातले पाडवी, वसावे, वळवी यांनी राजघराण्यात, अथवा जहागिरदारांकडे कारभारी म्हणून काम केले होते. हलबा जमातीत काही लढाऊ सैनिकही होते. असे काही अपवाद सोडल्यास इतर बहुतांश आदिवासी हे डोंगराळ भागात शेती, शेतमजुरी किंवा पशुपालन करीत असत. उपजीविकेसाठी पशुपक्ष्यांची शिकार, मध व जंगलातील डिंक, फळे गोळा करणे, दारू पाडण्याचे व्यवसाय करीत. शिंदीच्या झावळ्यांपासून चटया विणण्याचे काम कैकाडी करीत, ठाकर लोक शिंदीच्या झाडापासून ताडी काढत.

स्थलपर्यावरणानुसार आदिवासींच्या घरांच्या रचनांत थोडेफार फरक असतात. डोंगरकुशीत राहाणाऱ्या बहुतेक आदिवासींची घरे झोपडीवजा, कुडाची किंवा बांबुच्या तट्ट्याची, गवताने किंवा भाताच्या पेंढ्यांनी शाकारलेली असतात. अपवादाने काही आदिवासींची घरे मजबूत असतात. गोंडांच्या घरात चिरेबंदी वाडेही असतात, पारध्यांची घरे धाब्याची, आंधांची घरे कौलारू असतात. हलबा, मल्हार कोळी, कोरकू, कोलाम यांची घरे चौकोनी किंवा आयताकृती असतात, तर माडिया गोंडांची घरे मात्र त्रिकोणी असतात. कोकणा, कोरकू, माडिया गोंड दगडाचे जोते बांधून त्यावर घर बांधतात. मल्हार कोळी, कोरकू आदिवासींची घरे एकच अखंड खोलीची असतात; तर इतर आदिवासींमध्ये दोन किंवा तीन खोल्या असतात. गुरांसाठी वेगळा गोठा नसतो, घरातच एक भाग त्यांच्यासाठी ठेवलेला असतो. बऱ्याच घरांना दारे नसतात, खिडक्याही नसतात; काही घरांना दारे असली तरी झापासारखी असतात. थोडक्यात सांगायचे तर औद्योगिक क्रांतीमुळे झालेले बदल अजुनही आदिवासी भागात पोहचलेले नव्हते; त्यामुळे घरांच्या बांधकामात लोखंड, सिमेंट, चुना यांचा वापर नसे; सुतारकामाची करवत, पटाशी, रंधा इत्यादी उपकरणे परिचित नसल्याने लाकूडकामातली कारागिरीही नव्हती. अजूनही सायकल, शाळा यांच्यापासून हा समाज दूर होता. मध आणि डिंकाच्या समप्रमाणात मीठ खरेदी करणारा हा समाज आधुनिक बाजारपेठेपासून लांबच होता. आधुनिक भारतीय स्वातंत्र्यलढ्यात गुंतलेल्या कार्यकर्त्यांना आदिवासींच्या सामाजिक पुनर्घटनेच्या कार्याकडे लक्ष देण्यास कदाचित पुरेशी सवड मिळाली नसल्याकारणाने हे क्षेत्र अजूनही उपेक्षितच राहिले होते.

१९२७ साली सायमन कमिशनने आदिवासी विकास ही शासनाची जबाबदारी असून त्यासाठी पुरेशा निधीची तरतूद करायला हवी, अशी शिफारस केली होती. १९३५ च्या भारत कायद्यात आदिवासींच्या प्रश्नांची दखल घेण्यात आली होती. आदिवासी समूहाचे वर्जित व अंशत: वर्जित असे वर्गीकरण करण्यात आले होते. वर्जित गटातील आदिवासी लोकसमूह गव्हर्नरांच्या प्रांतिक सत्तेखाली मोडत व अंशत: वर्जित गट मंत्रालयीन अधिकाऱ्यांच्या कक्षेत येत. मात्र राजकीय सत्तेने आदिवासी विकासासाठी काही लक्षणीय काम केले असे दिसत नाही. विसाव्या शतकातल्या पहिल्या पन्नास वर्षात देशी संस्था व राजकीय पक्षांकडून अपवादनेच काही ठिकाणी आदिवासींच्या हक्कांसाठी चळवळी व समाजोन्नतीसाठी रचनात्मक कार्यक्रम झालेत. इतरत्र आदिवासींचे समाजजीवन पूर्वापार परंपरेने चालत आले तसे पुढे चालू होते. १९५० च्या भारतीय राज्यघटनेत मात्र आदिवासींसाठी 'अनुसुचित जमाती' ह्या विशिष्ट संज्ञेची योजना करण्यात आली व आदिवासींसाठी शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक सुधारणेसाठी घटनात्मक तरतूदी करण्यात आल्या. (प्रजासत्ताक स्वतंत्र भारतात आदिवासींसाठी झालेल्या रचनात्मक सुधारणा कार्यक्रमांचा तपशील पुढच्या खंडात आपण लक्षात घेणार आहोत.) मात्र १९५० पूर्वी महाराष्ट्राच्या आदिवासी भागात ज्या थोड्या ठिकाणी सामाजिक लढे वा रचनात्मक कार्यक्रम राबवले गेले, त्यांचा मागोवा येथे घ्यावयाचा आहे.

मुंबई इलाख्यात ठाणे जिल्ह्याच्या उत्तर भागात जव्हार, पालघर, तलासरी, उंबरगाव परिसरात आदिवासी वारली जमातीची वस्ती आहे. १९४१ च्या शिरगणतीनुसार त्यांची संख्या २,५१,८५१ होती. आदिवासी लोकसंख्येच्या ५० टक्के वारली लोकसंख्या होती. इंग्रजी अंमलापूर्वी हे आदिवासी भरपूर धान्य पिकवून पोटभर खाऊन आपल्या निसर्गरम्य प्रदेशात सुखाने नांदत होते; मात्र इंग्रज आल्यानंतर ब्रिटिश सत्ताधाऱ्यांच्या मदतीने व्यापार उदीम करणाऱ्या सुशिक्षित हिंदु, मुसलमान आणि पारशी लोकांचा या भागात शिरकाव झाला आणि त्यांनी निरक्षर आदिवासींच्या जमिनी ताब्यात घ्यायला सुरुवात केली. एकेकाळचा जमीनमालक आता वेठबिगारी करू लागला. वारल्यांच्या स्थितीविषयीचे वास्तव काय होते हे जाणून घेण्यासाठी गोदावरी परुळेकर यांनी 'जेव्हा माणूस जागा होतो' या पुस्तकात मुंबई प्रांताचे तत्कालीन गृहमंत्री व महसूलमंत्री मोरारजी देसाई यांच्या भाषणातील उद्धृत केलेला पुढील उतारा पुरेसा आहे :

"या भागात खानदेशमधील भिल्ल लोकांप्रमाणे काही वर्षापूर्वी सर्व जमीन या लोकांच्या मालकीची होती. वाईट दिवसात, दुष्काळाच्या व टंचाईच्या दिवसात, या लोकांच्या जमिनी त्यांच्या ताब्यातून सावकारांच्या ताब्यात अत्यंत तुटपुंज्या रकमेसाठी गेल्या. पाच पौंडाच्या धान्यासाठी काही एकर जमीन गेल्याची, काही वेळा एक एकरास पाच रुपये किंवा एक रुपया किंवा कधी तर आठ आणे एवढ्या मोबदल्यात जमिनी

गेल्याची अनेक उदाहरणे आहेत."

आदिवासींच्या जमिनी सावकार आणि लाकूड उद्योगातले कंत्राटदारांनीनी एखादे ताडीचे मडके देऊन लाटल्याची उदाहरणे होती. किरकोळ रक्कम देऊन आदिवासींच्या जमिनी कोऱ्या कागदावर अंगठे उठवून बळकावण्यात आल्या होत्या. बळकावलेल्या जमिनींपैकी एखाददुसरा हलक्या प्रतीचा जमिनीचा तुकडा आदिवासींना करार करून घेऊन कसण्यासाठी देत, आणि त्या बदल्यात हे जमीनमालक आपल्या शेतीची सारी कामे सक्तीने आणि मोफत करून घेत; शिवाय आदिवासींनी पिकवलेल्या धान्यातला अर्धा वाटाही जमीनमालकाला द्यावा लागत असे. या मोफत काम करून घेण्याच्या पद्धतीला 'वेठ' म्हणत. फॉरेस्ट खात्यातर्फे जंगलाचे कूप घेणारे मक्तेदार या वेठबिगारांकडून मोफत गवतकापणी किंवा जंगलतोड करून घेत, किंवा अगदी फार तर चार आणे रोजाची मजूरी देत. गोदावरी परुळेकर यांनी उद्‌धृत केलेल्या सिमिंग्टन अहवालाप्रमाणे "मजुरी रोज चार आणे आहे आणि अंगावर काम घेतले तरी एकत्र काम करणाऱ्या सहा अगर अधिक मंडळींना जो मोबदला मिळतो तो त्यांनी वाटून घेतल्यानंतर दररोज तीन आण्यांपेक्षा किंवा नेहमी त्यापेक्षा कमी रोज पडतो." आदिवासींचे शोषण करणाऱ्यात जमीनदार, सावकार यांच्याप्रमाणे फॉरेस्ट ऑफिसर, पोलिस पाटील, तलाठी, मुलकी अधिकारी, मुकादम हेही असत. फॉरेस्टचे सरकारी अधिकारीही जंगल साफ करणे, बी पेरणे, वणवा पेटला तर तो विझवणे ही कामे सक्तीने व मोफत करायला भाग पाडत. याला 'सरकारी वेठ' म्हणत. वेठीच्या आसाचा फेरा असायचा. जमीनमालक रोज एक लोखंडी गज म्हणजेच वेठीचा आस एकाच्या घरी पाठवी, त्या दिवशी त्या घरातल्या सर्व माणसांनी सकाळपासून संध्याकाळपर्यंत जमीनदार सांगेल ती कामे मोफत करून द्यायची. हा वेठीचा आस बारा महिने एकीकडून दुसरीकडे फिरत राही. मागणीप्रमाणे काम झाले नाही तर आदिवासींना मारझोड करणे, कधी कोळशाच्या भट्टीत टाकून मजुरांना जाळणे, मिरच्यांची धुरी देणे असल्या शिक्षा दिल्या जात असत.

या भागात लग्नगड्यांची क्रूर पद्धत होती. लग्नासाठी शंभर रुपयांचे कर्ज घेऊन आयुष्यभर सावकाराच्या दारी बायकोसह मोफत घरगडी म्हणून गुलामीचे जीवन कंठणारे वारली आदिवासी या भागात रहात होते. धुणी-भांडी, गोठा साफ करणे, धारा काढणे इथपासून घरे शाकारणे, घोड्याला खरारा करणे, मालकाचे अंग दाबणे, मालकाच्या टांग्यामागे मैलोनमैल पळणे, शौचकूप साफ करणे अशी कितीतरी कष्टाची कामे करावी लागत. जमीनदार सावकराने बायकोची अब्रू लुटली तरी लग्नगडी मुकाट्याने सहन करीत असे. वारल्यांच्या या जीवनासंबंधी गोदावरी परुळेकरांनी लिहिले आहे, "त्या खेडेगावांतून त्यावेळी जमीनदारांची खटली होती. खटले म्हणजे काय, तर वेठीत काम करणारे स्त्री-पुरुष. त्यांनी सकाळी घंटेबरोबर जाऊन दुपारपर्यंत काम करायचे. दुपारी त्यांना एका

माणसाला पुरेल एवढा भात देत. ते कांडायचे आणि तांदूळ करायचे. ते शिजवून, भात करून मिठाच्या खड्याबरोबर व पाण्याच्या घोटाबरोबर गिळून, ठरलेल्या वेळी सुट्टी संपली की कामावर हजर व्हायचे. दिवस मावळताना संध्याकाळी सुट्टी होई. घासभर भाताशिवाय दुसरी मजुरी नाही. दुखणे बहाणे नाही, मुक्या जनावराप्रमाणे रोज सकाळ झाली की कामाल जुंपून घ्यायचे; गोळाभर भात पोटात भरून कंबर मोडेपर्यंत काम करायचे. रात्र झाले की, मरगळून पडायचे... एखाद्या बकऱ्याची मान कापली तरी तो प्रतिकार करीत नाही, त्याप्रमाणे जणू साऱ्या भावना मारून आदिवासी जीवन जगत होते. जीव घेतला, उपाशी ठेवले, बायको पळविली तरी मुकाट्याने सहन करून त्या प्रसंगाला मान तुकवीत होते." ( परुळेकर,२०१२, पृ. १० )

अशा प्रकारे कवडीमोल जिणे जगणाऱ्या आदिवासींचे जीवनमान अत्यंत खालावलेले होते. चारसहा लाकडाचे वासे, पेंढ्यांचे छप्पर, बांबूच्या काड्या किंवा कारवीच्या भिंती असलेली झोपडीवजा घरे. भिंती शेणामातीने सारवलेल्या असत. उंचवट्यावर झाडांच्या सावलीच्या आश्रयाने अशा दहाबारा झोपड्यांचा पाडा आणि लांब लांब विखुरलेल्या दहाबारा पाड्यांचे गाव असे या वस्तीचे स्वरूप होते. दळणवळणाचा अभाव असल्याने शहराशी किंवा बाजारपेठेशी संपर्क नव्हता. शिक्षण नव्हते. चिंचेचा पाला, आंबाड्याची भाजी, करवंदे, मोहाची फुले, आळुचे कांदे, कोंड्याची भाकर, आंबील खाऊन अर्धपोटी जगत होते. अर्धनग्न रहावे लागत होते. दवाखाने नव्हते, रोगराईचा मुकाबला करताना प्राण गमवावे लागत. १९४५ साली गोदावरी परुळेकर यांनी या भागात जमीनदार व कंत्राटदारांच्या अन्यायातून आदिवासींची सुटका करण्यासाठी वारल्यांमध्ये संघटनात्मक चळवळ उभी केली. कुळकायदा, कर्जनिवारण कायदे झाले होते, पण अज्ञानामुळे ते आदिवासींपर्यंत पोहचले नव्हते; या कायद्यांचे सामाजिकीकरण करण्याचे काम गोदावरी परुळेकरांनी हाती घेतले. कम्युनिस्ट पक्षाच्या लाल बावट्याची चळवळ सुरू झाली. वारल्यांनी वेठबिगारीविरुद्ध बंड पुकारले. त्यांच्यातला आत्मविश्वास जागवला; त्यांना आपल्या भाषेत भाषण करून आपल्या समस्या मांडता येतील असे शिक्षण दिले. आर्थिक साक्षरतेचे धडे दिले व गुलामगिरीच्या बेड्या तोडून आत्मनिर्भर होण्याची शैली आत्मसात करण्याची शिकवण दिली. आदिवासींमधून कॉ. गोविंद देवदेकर, कॉ. रूपजी कडूसारखे कार्यकर्ते तयार झाले. टिटवाळ्याला दहा हजार आदिवासींची परिषद झाली. २३ मे १९४५ रोजी उंबरगावजवळ झरी येथे पाचशे स्त्रियांसह आदिवासींची परिषद झाली व 'वेठबिगार रद्द करा' या मागणीसाठी विद्रोह पुकारला गेला. वारल्यांनी जमीनदारांवर सामाजिक बहिष्कार घातला. लग्नगड्यांनी 'सुडका-मडका घे, सुटून पड' अशा घोषणा देत (सुडका म्हणजे कपडा) मालकांच्या गुलामीतून बाहेर पडायला सुरुवात केली. गवतकापणीचा संप करून अल्प मजुरीत काम करण्यास नकार दिला. कम्युनिस्टांनी

आदिवासी भागात समांतर सरकार चालवल्याचा आरोप करून सरकारने आणीबाणीची परिस्थिती जाहीर केली, लष्कराला पाचारण केले; किसान सभेच्या पुढाऱ्यांना हद्दपार केले; पण आदिवासींनी गोळीबाराची पर्वा न करता माघार घेतली नाही. त्यांच्यातल्या वर्गजाणिवा जाग्या झाल्या होत्या. त्यानंतर या भागाकडे काँग्रेसचे व सरकारचेही लक्ष गेले. त्यामुळे जंगल कामगार सोसायट्या स्थापन झाल्या व या सोसायट्यांना अग्रक्रमाने कूप देऊन आदिवासींना अर्थसाहाय्य करण्याची योजना कार्यान्वित झाली. आदिवासी वारल्यांच्या पुनर्घटनेचा हा १९४५-४६ चा हा प्रयोग लक्षणीय होता. ह्या पुनर्घटनेनंतर वारल्यांच्या जीवनसरणीतील बदलांची १९७८ मधली स्थिती काय हे जाणून घेण्यासाठी स. ह. देशपांडे आणि शरद कुलकर्णी यांनी केलेल्या पहाणीत पुढे आलेले वास्तव असे होते :

"आदिवासींनी मजुरीवाढीसाठी व त्यांचा आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी इतके लढे दिल्यानंतर आज आदिवासींची आर्थिक परिस्थिती सुधारली आहे, उपासमार टळली आहे, अशी जर समज झाली तर ती चूक होईल.. वारल्यांमध्ये झालेला मुख्य फरक म्हणजे त्यांची अस्मिता जागी झाली आहे.. त्यांच्यातील भेदरटपणा, न्यूनगंड नष्ट झाला आहे.. गोदाराणींच्या बंडानं मजुरी सुधारली आणि अमानुष अत्याचारांना बराचसा पायबंद बसला. पुढं कुळकायद्यानं आदिवासींना जमिनी मिळाल्या; पण नुसती जमीन दिल्यानं काय होतं, किंवा खरं म्हणजे काहीच कसं होत नाही, ह्याचा पुरावा म्हणजे वारल्यांची शेती. ती गेली हजारो वर्षे जशी असावी तशीच आजही आहे. बऱ्याचशा जमिनी नाममात्र वारल्यांकडं आहेत; पीक सावकारच घेऊन जातो. गवताच्या व्यापारातली लुबाडणुक जोरात चालू आहे. . 'कंट्रोली'तील म्हणजे रेशन दुकानातून फसवणूक चालूच आहे. अजुनही बांधून मारण्याचा एखाद दुसरा प्रकार अधूम मधून होतोच.. अजुनही मुलगी अत्याचाराला बळी पडते आणि ह्याचा बोभाटा होत नाही. अजुनही खोट्या फिर्यादीत वारली अडकवले जातात. अजूनही एखाददुसरी जमीन मुजोर सावकार लुटतो. वारली मुलुखात अजुनही 'शासन' अस्तित्वात असल्याच्या खुणा क्वचितच दिसतात." (देशपांडे स. ह. १९७८, पृ. ४२) वारली अजुनही डवरून येत नाही, ह्याचे कारण वारल्यांमधला सांस्कृतिक आत्मगौरव जेवढा वाढायला हवा, तेवढा वाढलेला नाही आणि परंपरेने अंगवळणी पडलेल्या न्यूनगंडाने व भयगंडाने तो अजुनही पछाडलेला आहे, असा निष्कर्ष देशपांडे-कुलकर्णी या लेखकद्वयांनी काढलेला आहे. महाराष्ट्रातील आदिवासी समाजाच्या सामाजिक पुनर्घटनेच्या प्रयत्नांचा इतिहास आणि वास्तव यांचे हे प्रातिनिधिक उदाहरण म्हणायला हवे.

खानदेशातल्या सातपुडा पर्वतराईच्या कुशीत वसलेल्या भिल्ल, मावची, बंजारा इत्यादी आदिवासींच्या कल्याणासाठी गांधी-विनोबांच्या विचारधारेतल्या आणि

सावरकरप्रणीत हिंदुत्ववादी गटाने संस्थात्मक कार्य केले. खानदेशातील तळोद्याजवळच्या मोरवड (रंजनपूर) येथील भिल्ल समाजातील संत गुला महाराज (१८९८-१९३८) यांनी भिल्ल समाजात जागृती करण्यासाठी १९२० ते १९३५ या काळात 'आप' संप्रदाय स्थापन केला. 'सर्व खल्विदं ब्रह्म' या न्यायाने सर्व भूमी परमेश्वराची आहे व आपण भगवंताचे गुलाम आहोत हे 'आप' संप्रदायाचे तत्त्वज्ञान होते. त्यामुळे 'गुलाम भगवान' या अर्थाने 'गुला महाराज' हे नाव या संताने धारण केले होते. 'बीज भाजुनी केली लाही, आम्हा जन्म मरण नाही' असे निखळ वर्तमानावर विश्वास ठेवणारे इहवादी तत्त्वज्ञान हा या संप्रदायाचा विशेष होता. 'आपकी जय' ह्या उद्‌घोषातून भूमीचा जयजयकार आणि मातीचा बुक्का लावून भूमीशी असलेले नाते चिरंजीव ठेवण्याची धारणा रुजविणारा मंत्र त्यांनी भिल्लांना दिला. खरे बोलावे, लबाडी करू नये, स्वच्छ राहावे, मद्य-मांस-भांग निषिद्ध मानावे ही या संप्रदायाची शिकवण होती. भिल्लांमध्ये सूर्यपूजनाची सामुदायिक आरतीची परंपरा या संप्रदायाने रूढ केली. गुला महाराजांनंतर अंबरसिंग महाराजांनी खानदेशात आप संप्रदायाची चळवळ पुढे चालवली व गुजरांच्या जमिनी खंडाने कसणाऱ्या भिल्लांचे प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतला होता. (ठकार, १९३६)

भारत सेवक समाजाच्या वतीने ठक्करबापांनी १९२२ साली 'पंचमहाल भिल्ल सेवा मंडळ ' स्थापन केले होते. तळोदे येथील शबरी कन्या छात्रालय (१९४१) व ठक्करबाप्पा छात्रालय ही ठक्करबाप्पांच्या प्रेरणेतूनच पुढे स्थापन झालीत. स्वा. सावरकरांचे खानदेशातील हिंदुवादी अनुयायी धुळ्याचे विश्वनाथ गणेश जावडेकर, पिंपळनेरचे राजाराम अनंत देशपांडे आणि नंदुरबारचे गोविंद सखाराम मराठे यांनी एकत्र येऊन १९३५ साली धुळे येथे 'भिल्ल सुधार समिती' स्थापन केली. या समितीने ठिकठिकाणी आरोग्यसेवाकेंद्रे स्थापन करून आदिवासींमध्ये कॉलरा, खरूज या साथीच्या रोगांवर इलाज करणारी सेवाचळवळ सुरू केली. ग्रामोफोन तबकड्यांवर आरोग्यविषयक गाणी ऐकवून जनजागृती करण्याचा अभिनव उपक्रम भिल्ल सुधार समितीने अमलात आणला होता. अमळनेरचे प्रताप शेठ, मुंबईचे एन. एम. वाडिया यांनी समितीला अर्थसाहाय्य केले होते. २० मार्च १९३८ रोजी नंदुरबार येथे बाळकृष्ण लक्ष्मीदास उर्फ बाळूभाई मेहता (१८८९-१९८१) यांच्या अध्यक्षतेखाली 'पश्चिम खानदेश भिल्ल सेवा मंडळा'ची स्थापना झाली. नानासाहेब शंकरराव ठकार, शंकरराव बर्वे, नटावदकर वगैरे गांधीवादी अनुयायी एकत्र येऊन त्यांनी या भागात आदिवासी मुलांसाठी शाळा-वसतिगृहे काढली, शाळांमधून सुतकताई व स्वावलंबनाचे कौशल्यशिक्षण वर्ग सुरू केले. आदिवासींना दारूपासून मुक्त करण्यासाठी प्रचारकार्य केले. नटावदला महादेव मंदिरात बसून बाळूभाई आदिवासींना बुकर टी वॉशिंग्टनची चरित्रगाथा ऐकवत व नीग्रोंनी प्रगती केली, तशी आपणही करू

शकतो असा आत्मविश्वास जागवण्याचे कार्य केले. भिल्लांमध्ये दुसऱ्याची बायको पळवणे वगैरे प्रकार होत, म्हणून विवाहाच्या पावित्र्याविषयी प्रबोधन करण्याचे काम केले. काँग्रेसच्या ग्रामोद्धाराच्या चळवळीचा भाग म्हणून बाळूभाई मेहता यांनी धुळे जिल्ह्यातल्या मुकटी येथे 'समर्थ उद्योगमंदिर, खांडबारा येथे 'सर्वोदय केंद्र' व जंगल कामगार सोसायट्या ' स्थापन केल्या. कापडणे, कासारे, मालपूर, दोंडाईचे, खोंडामळी इत्यादी ठिकाणी ग्रामोद्योग केंद्रे स्थापन केली. तळोद्याला मातीची भांडी करण्याचा, दोंडाईच्याला कापड रंगविण्याचा, सोनगीरला बांगडी उद्योग आणि घोंगड्या विणण्याचा, होळनाथे येथे तेलघाण्यांचा ग्रामोद्योग सुरू करण्यात आला. १९४९ साली अर्थमंत्री वैकुंठभाई मेहता यांनी आदिवासींच्या उद्धारासाठी सर्वोदय योजना जाहीर केली होती, त्याअंतर्गत बाळुभाई मेहता यांनी आदिवासींसाठी खांडबारा केंद्र सुरू केले, जंगल कामगार सोसायटी स्थापन केली. धनाजी नाना चौधरी यांनी सातपुड्याच्या कुशीत पाल व परिसरातील २५ खेड्यांमध्ये तडवी, वंजारा, पावरा भिल्लांसाठी मुंबई सरकारच्या सर्वोदयी योजनेतून शेतीसाठी सुधारित बियाणे, सेंद्रिय खते, जनावरांची निगा, आरोग्यसेवा, साक्षरता कार्यक्रम सुरू केलेत. लोहारा येथे आश्रमाळा काढली.

वऱ्हाड-मध्यप्रांतातील यवतमाळ, अमरावती, वर्धा, चांदा या जिल्ह्यातील डोंगराळ भागात वस्ती करून राहाणाऱ्या 'कोलाम' या आदिवासी जमातीत सामाजिक पुनर्घटनेच्या दृष्टीने १९५० पर्यंत काहीच प्रयत्न झाल्याचे दिसत नाही. कोलाम जमातीत कुस्ती आणि शेतीची कामे शिकणे यापलीकडे शिक्षणाचा पूर्ण अभाव, त्यांच्या बोलीला लिपी नाही, त्यांच्या जमातीचे कुठले वाङ्मय नाही, बैल-अवजारांची शेतीही नाही. डोंगरउतारावर बी फेकून पेरणी करण्याची पारंपरिक 'पोडू शेती' करायची किंवा क्वचित कुणी मक्त्याने कसायला दिल्यास तिथे वाटणी तत्त्वावर शेती करायची. एरव्ही उपजीविकेसाठी रानडुकरांची शिकार, मासेमारी, हरणे, ससे पकडणे हे उद्योग करीत. मांस विकत घेणे निषिद्ध असल्याने स्वत: शिकार करून अन्न मिळवण्यावर भिस्त असे. या भागात ख्रिस्ती मिशनरी पोहचले नसल्याने धर्मांतरित आदिवासी समाज नव्हता. मुसलमानांचे रखेलीपण हा अपवाद सोडल्यास इतर धर्मीयांशी संबंध नव्हता. गावाबाहेर डोंगराकाठी कुडाच्या भिंती आणि गवती छपरांच्या घरांची छोटेखानी वस्ती असल्याने गावगाड्याशीही या जमातीचा संबंध येत नव्हता. अर्थात अशा स्वायत्त समजांतर्गत एक स्वयंशासीत अनुशासनव्यवस्था होती. चौकोनी रांगेत वसलेल्या झोपड्यांच्या वस्तीत मध्यभागी चावडी आणि शेकोटी असे. चावडीतून वस्तीच्या समाजजीवनाला नियमांच्या चौकटीतला आचारधर्म पाळायला लावणारी जात पंचायत असायची. नाईक हा या जातपंचायतीचा प्रमुख, त्याच्या सोबत दुसऱ्या स्थानी अधिकारात असणारा 'महाजन', वर्गणी-वसुलीची कामे करणारा, लग्नप्रसंगी घट मांडणारा हरकाम्या 'घट्या' अशी

पंचायतीची संरचना असयची. कापसाची वगैरे चोरी करणाऱ्याला शिक्षा देणे, -गावबांधणी उत्सवाचे नियोजन इत्यादी कामे पंचायत करीत असे. नीतीकल्पनांत आचारशुद्धीवर भर असे. विटाळशी स्त्री विटाळाच्या काळात गावाबाहेर रहात असे. संध्याकाळनंतर मित्राच्या घरी पुरुष जात नसत, त्यामुळे स्त्रियांशी नीतिबाह्य वर्तनाच्या घटना घडत नसत. (मांडवकर,१९६६) आपापल्या परीने स्वायत्त जीवन जगणारा हा आदिवासी समाज स्वातंत्र्यपूर्व काळात मध्यवर्ती जीवनप्रवाहापासून दूरच होता. सर्वच आदिवासी क्षेत्रांत ह्यापेक्षा वेगळी स्थिती नव्हती.

कोकणात रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांत, देशावर नाशिक, नगर आणि विदर्भात अकोला परिसरात 'ठाकर' ही आदिवासी जमात सामाजिक पुनर्घटनेबाबत बहुतांशी स्थितिवादीच असल्याचे दिसून येते. भौगोलिक दळणवळणाच्या सोयी नसल्याने एका जिल्ह्यातील ठाकरांचे दुसऱ्या जिल्ह्यातील ठाकरांसोबत सोयरिक संबंधही होत नसत. उपजीविकेसाठी सावंतवाडी सिंधुदुर्ग भागातील ठाकर गावोगावी जाऊन चित्रकथी, कळसूत्री बाहुल्यांचे खेळ, पांगुळ इत्यादी लोककलांचे प्रदर्शन करीत असत. ठाकर जमातीतला 'पिंगळा' देशावरच्या 'वासुदेवा'सारखा पहाटे डमरूनाद करीत दारासमोर लोकगीत गाऊन भिक्षा गोळा करीत असे. पांगुळ बैलाला तीन पायावर उभे राहाणे, दोन पायात गुढघे दुमडून वाकण्याचे कसरतीचे प्रयोग करून व पदे गाऊन पोट भरीत असे. १९२०-३० च्या सुमारास सावंतवाडी संस्थानातल्या लष्करात काही ठाकर नोकरीला होते. भिसाजी जिवबा गंगावणे नावाच्या ठाकराचे राजदरबारात येणेजाणे होते. सावंतवाडीच्या राजपुरुषांवर बावलेकर, पांगुळ यांनी रचलेले पोवाडे गाण्यासाठी ते राजदरबारात जात असत. १९४०-४५ च्या दरम्यान देवू गंगावणे याने मुंबईहून पठ्ठे बापूराव यांच्या लावण्यांचे पुस्तक आणून लावण्याही रचल्या-गायिल्या होत्या. (रणसिंग, १९९४, पृ.३८- ४२)अपवादाने काही लोक उपजीविकेसाठी कोकणातून मुंबईत गेल्याने या समाजाला अंशत: सामाजिक सुधारणांचा परिचय झाला होता. १९३२ च्या सुमारास गोविंद धोंडू बावलेकर हे मुंबईस कापडगिरणीत मुकादम (जॉबर) म्हणून काम करू लागले, त्यांनी 'बावलेकर हितवर्धक संघ' व ठाकर समाज विद्यार्थी संघ' स्थापन करून समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पारितोषिके इत्यादी देऊन प्रोत्साहन दिले. 'पिंगुळी ठाकर ग्रामस्थ मंडळ' नामक आणखीही एक संस्था मुंबईत स्थापन झाली व याही संस्थेच्या पुढाकारातून कोकणातल्या ठाकरांपर्यंत आधुनिक शिक्षण व सुधारणाविचार पोहचलेत. ठाकरांची मुलं शिकू लागली. पुरुष नारळ, काजू, तांदूळ , सुपाऱ्या विकून रोख पैसे कमावू लागले. स्त्रियांच्या राहणीमानात बदल झाले. गुढघ्यापर्यंत आखूड लुगडे नेणाऱ्या स्त्रिया नऊवारी लुगडी नेसू लागल्या, खांद्यावर पदर घेऊ लागल्या, बाजारहाटाला जाताना अंगात चोळी घालू लागल्या. दंडातल्या ॲल्युनियमच्या बाक्या

जाऊन काचेच्या बांगड्या आल्या, काही स्त्रिया गोलसाडीही नेसू लागल्या. हे लोक कायम कर्जबाजारी असायचे. बारशीच्या हंगामात बैलाला नवीन शिणगार करायचा तरी सावकराकडून कर्ज घेत. मात्र सर्वसाधारणपणे आर्थिक व सामाजिक सुधारणांपासून हे लोक लांबच होते. इतकेच नाही तर मुंबईतले चाकरमाने ठाकर महिन्याच्या सुटीत गावाला आले तर परत जाताना भाड्यासाठी सावकाराकडून कर्ज घेत. (रणसिंग,कित्ता, पृ. ७५-७७,१७१)

## नैसर्गिक आपत्तीतून झालेले बदल :

विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन-तीन दशकात प्लेग, कॉलरा, टॉयफॉइड, मलेरिया, इनफ्लूएन्झा, क्षय, न्यूमोनिया हे आजार सतत होत असत. हे साथीचे आजार का होतात व त्यावर उपाय काय असतात याविषयी कमालीचे अज्ञान होते. घरगुती प्रथमोपचार म्हणून पाणी उकळून पिणं, पथ्यपाणी सांभाळणं, रोग्याची शुश्रुषा करण, गावाबाहेर मोकळ्या हवेत जाऊन राहाणं अशा प्रकारांनी काही माणसं जगायची, बरीचशी साथीच्या फेऱ्यात बळी जायची. अशा साथीच्या रोगात आणि दुष्काळ, महापूर, भूकंप यासारख्या नैसर्गिक आपत्तीत माणसांचा वर्तनव्यवहार कसा असतो, परस्परांशी त्यांच्या आंतर्क्रिया कुठल्या स्वरूपाच्या असतात, अशा आपत्तीला तोंड देताना त्यांची सर्जनशीलता कशी काम करते, भविष्यात आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवल्यास दक्षता किंवा खबरदारीच्या स्थायी स्वरूपाच्या कोणत्या पर्यायी व्यवस्था उभ्या केल्या जातात यावरुन माणसाच्या तत्कालीन समाजाच्या सामाजिक धारणा व सांस्कृतिक संबोधांचा माग काढता येतो. विसाव्या शतकात महाराष्ट्रात घडलेल्या अशा आपत्कालीन परिस्थितीतल्या अनुभवांच्या नोंदी चरित्र, आत्मचरित्रे, वृत्तपत्रातील वार्तापत्रे यांतून विखुरलेल्या आहेत; त्यातल्या काही नोंदींचा धांडोळा घेऊन हा तपास करावयाचा आहे.

### प्लेगचा फेरा :

१८९५ पासून १९१६-१७ पर्यंत महाराष्ट्रात प्लेगच्या साथीने लोक जर्जर झाले होते. गळ्यांत, खाकेत किंवा जांघेत आंब्याच्या कोयीएवढा गोळा उठत असे; आणि ताप आल्यापासून दोन अडीच दिवसांत शेवटी वात होऊन माणूस दगावत असे. वर्षानुवर्षे चालणाऱ्या या साथीचा लोकजीवनावर काय परिणाम होत असे याच्या काही नोंदी श्री. म. माटे यांच्या आत्मचरित्रात मिळतात. त्यांनी लिहिले आहे की, "सप्टेंबर महिन्यापासून माणसे गावाच्या बाहेर झोपड्या बांधून रहात असत. गावात जिकडे तिकडे मेलेल्या उंदीर-घुशींची घाण सुटत असे. लस टोचून घेणे हा इलाज लोकांनी हळू हळू पत्करला; पण रोगाच्या प्रसाराच्या मानाने या इलाजाचा प्रसार मात्र झाला नाही. स्थलांतर हा एकच इलाज हिताचा ठरला. टोचून घेऊनसुद्धा गावात एकट्या-दुकट्याने राहणे धोक्याचे वाटे;

आणि मेलेल्या उंदरांची घाण आळोआळीला येत असे. ज्यांना बाहेर जाता येणे शक्य नव्हते, ते गावातच रहात; आणि बहुधा मरून जात. टोचून घेतलेले मात्र दगावत नसत. मोठाली शहरे सोडली तर बाहेरच्या टापूत रिकाम्या गावांत चोरट्यांचा उपद्रव सुरू होई. मिळून वर्षाकाठी चार-पाच महिने माणसांना विलक्षण हालअपेष्टा सोसाव्या लागत." या नैसर्गिक आपत्तीमुळे मानवी आंतरक्रियांमध्ये झालेले बदल, सामाजिक मानसिकता व चालीरीती, आचारधर्म व मूल्यसंकल्पनात झालेल्या बदलांचीही माटे यांनी नोंद घेतली आहे. या बदलांचे तपशील नोंदवताना ते लिहितात की, "परगावच्या नातेवाईकांकडे रहावयास जावे, एखाद्याने मोठे छप्पर घातलेले असले, तर मैत्रीचा हक्क सांगून त्याच्या त्या छपरांत तुरमुंडी द्यावी, रात्रीच्या वेळी उघड्यावर पडावे, असा प्रकार गावोगावी चाललेला असे. मोठाल्या शहरांतून रोज अडीच अडीचशे, तीन तीनशे प्रेते स्मशानात जात असत! मुंबईला तर ही संख्या याच्या तिप्पटीवर जात असे. .. तरुण पुरुष मेल्याने समाजात वैधव्य जिकडे तिकडे दिसू लागे; आणि एक तऱ्हेची हताशपणाची दाट छाया जीवनावर पडलेली दिसे. पुनर्विवाह समाजात रूढ झाला, तो यामुळेच होय. पण एक गोष्ट मात्र खरी की, अशा दारुण परिस्थितीकडे लक्ष देऊन माणसे एकमेकांना साहाय्य करीत. परगावहून आलेल्या पाहुण्यांना आपल्या कुटुंबात सामावून घेत, आपल्या सोयीचा फायदा गरीब नातेवाईकांना देत... दरवर्षी झोपडी घालावी आणि मोडावी; त्यापेक्षा ती एकदाच पुरेशी बळकट घालून ठेवावी, हा विचार अनेक लोकांच्या डोक्यांत येऊ लागला; आणि अनेक मोठाल्या शहरांच्या बाहेर पक्क्या झोपड्या दिसू लागल्या. याच झोपड्यांच्या पुढे बंगल्या झाल्या. आज अनेक शहरांच्या बाहेर जी निरनिराळ्या तऱ्हेची व आधुनिक पद्धतीची वस्ती झालेली आपल्याला दिसते, तिचे उगमस्थान प्लेगच्या दिवसात उभारलेल्या झोपड्या हे होय!" (माटे ,२०१० पृ. ६९-७०)

**इन्फ्लुएंझाची साथ :**

१९१८-१९ च्या दरम्यान इन्फ्लुएंझाची भली मोठी साथ आली होती. या साथीचे साक्षीदार असलेले कृ. पां. कुलकर्णी यांनी धुळे येथे या साथीने जो कहर माजवला होता त्याविषयी आपल्या आत्मचरित्रात लिहिले आहे की, " सबंध धुळ्यात असे एक घर राहिले नाही की जेथे चार पाच तरी अंथरुणे पडली नाहीत. आदल्या दिवशी घसा खवखवायचा, दुसऱ्या दिवशी सकाळी पडसे व ताप एकदम, संध्याकाळी ताप वाढायचा, कफ व्हायचा, तो आत गुदमरायचा, फुफ्फुसे बिघडायची, तापाचे प्रमाण वाढले की वात, वात झाला की पुढची पायरी. घसा खवखवल्यापासून दोन तीन दिवसांतच ग्रंथ आटपायचा. आजारी कोणी पडला की त्याला आराम पडण्याचे अगदी नावच नको. तडकाफडकी त्याचा निकाल. एकाला स्मशानात पोचवून यावे तो त्याच घरात दुसरे शव पुन: तयारच. एका धुळे गावात किती माणसे मृत्यूमुखी पडावीत? त्याला गणतीच नाही. पांझरा नदीच्या

काठी अहोरात्र सारखी होमकुंडे पेटलेली." अशा आपत्कालीन स्थितीत स्वत:चा बचाव करून रुग्णांपासून स्वत:ला सुरक्षित ठेवण्याची काळजी घेणे हे स्वाभाविक असले तरी धोका पत्करून माणसे एकमेकांच्या मदतीला धावून जात. रुग्णाइतांच्या घरी सेवा पोचविण्यात धुळ्यातल्या शाळेतल्या शिक्षकांनी पुढाकार घेतला. "ह्यांत नित्सुरे मास्तर हे अग्रगण्य होते... हे रोज सकाळी पहाटे उठावयाचे, एक भले मोठे पातेलेभर कांजी आणि लापशी शिजवायचे. ती भांड्यांत भरून घरोघरी ते वाटत जायचे. तसेच पाचपंचवीस बाटल्या घेऊन ते दवाखान्यात जात व औषधे भरून घरोघरी वाटत फिरत. हे असे काम त्यांनी सारखे एक महिना दीड महिन केले व सर्वांचे दुवे त्यांनी घेतले." (कुलकर्णी, १९६१, पृ. ११०)

देवीच्या रोगावर लस उपलब्ध झाली होती; पण लसीच्या सार्वत्रिक उपलब्धीचा अभाव किंवा लस टोचून घेण्याविषयीच्या जनजागृतीचा अभाव यामुळे लोकांना या साथीच्या उपद्रवाला तोंड देण्याची वेळ वारंवार येत असे. १९१८ च्या सुमारास धुळे येथे देवीच्या साथीचा प्रादुर्भाव झाला होता. त्याविषयी कृ. पां. कुलकर्णी यांनी आपल्या आत्मचरित्रात स्वत:च्या घरातला अनुभव नोंदवताना म्हटले आहे की, "गावात तुरळक देवीची साथ होती. देवी पूर्वीच काढल्या आहेत ह्या सबबीवर टोचून घ्यायचे झाले नाही. .. देवीचे दुखणे म्हणजे भोगायचेच असले. त्याला औषधे द्यायची हे खरे, पण मुख्य गोष्ट म्हणजे रोगाचा काळ जो ठरला आहे तो कसातरी कंठायचा असतो व रोगांत अधिक गुंतागुंत किंवा त्याला फाटे फुटू न द्यायचे इतकीच काळजी घ्यायची असते. .. देवी आल्या, दिसू लागल्या, उमलल्या, फुगल्या. असे तीन दिवस गेले. सुदैव आमचे की रोगाचा फार जोर नव्हता. एकंदर सौम्यच प्रकार होता. देवाने खैर केली. देवी सुकल्या, खपल्याही पडल्या. " (कुलकर्णी कृ. पां. १९६१, पृ. १०९)

त्या काळात सुशिक्षित मंडळीही अडाण्यांसारखी वागत. लस टोचून घेत नसत. पाणी उकळून पीत नसत. स्वच्छता सगळीकडे बेताचीच असे. कोणतीही साथ आली की देवीचा कोप झाला एवढं म्हणत. गावात वाजंत्री वाजवत नसत. साथीच्या रोगांवर औधोपचार उपलब्ध नसे. क्षयरोगावर औषध नव्हते, पेनिसिलीन नव्हते. टॉयफॉईडवरही १९४५ पर्यंत औषध नव्हते. त्यामुळे विश्रांती, पथ्य आणि ताप उतरण्याची वाट पाहणे भाग असे. पुढे 'क्लोरोमायसेटीन' औषध निघाले होते, पण तेही सहजासहजी उपलब्ध होत नसे, शिवाय किंमतही खूप असे, एका पाकिटाला ६८ रुपये लागत. घरगुती औषधोपचार अर्थात लोकवैद्यकाच्या पारंपरिक ज्ञानाचा वारसा बऱ्याचदा उपचारांसाठी कामी येत असे. महाराष्ट्रात पिढीजात वैद्यकी करणारे धन्वंतरी गावोगावी असत. नाडीवरून रोगाचे निदान करीत. गोळ्या, भस्मे, पूड, अर्क, आसवे, अरिष्टे अशा प्रकारची त्यांची औषधयोजना साधी,सहज व विनासायास प्राप्त होणारी अशी असे. कुणाला पाने

घालून स्नान, तर कुणाला पानाच्या लाद्याचा लेप तर कोणाला विड्यांत खायचे औषध; कुणाला दुधात तर कुणाला मधात तर कुणाला दह्यात तर कुणाला बेलफळाच्या मुरावळ्यात पुडी म्हणा, गोळी म्हणा, काढा म्हणा ते देत असत. तुळशीतील साधी माती किंवा तुळशीचे तीर्थ दिले तरी रोग्याला गुण हा हमखास ठरलेला. (कुलकर्णी, १९६१, पृ. ११-१२) चामखीळ घालवण्यासाठी विड्याच्या पानाचा देठ आणि चुन्याचा वापर करीत. चुन्यात बुडवलेला देठ चामखिळीवर सात आठ दिवस नेमाने चोळल्यावर चामखिळ गळून पडत असे. या जालीम उपायामुळे आग होत असली तर गुण शंभर टक्के येत असे. (करंदीकर सुमा, पृ. २००२,५३) या लोकवैद्यक परंपरांचा अभ्यास करून बापू दांडेकर यांनी 'आयुर्वेदातील भस्मे' या विषयावर शोधनिबंध लिहून जर्मन विद्यापीठातील प्राध्यापकाला पाठविला होता; त्याचे महत्त्व लक्षात घेऊन वैद्यकशास्त्रातली पदव्युत्तर पदवी नसतानाही दांडेकरांना जर्मन विद्यापीठात विशेष बाब म्हणून डॉक्टरेटसाठी प्रवेश देण्यात आला. तिथे त्यांनी 'सर्जरी इन एंशंट इंडिया' या विषयावर प्रबंध लिहून डॉक्टरेट मिळवली व जर्मनीत आयुर्वेद वैद्यकाचा दवाखानाही चालविला. मराठी माणसाच्या पारंपरिक ज्ञानवारशावर अशा प्रकारे शास्त्रीय ज्ञानाचे शिक्कामोर्तब झाले. (कित्ता, पृ. १२२)

विसाव्या शतकाच्या पहिल्या तीन दशकात आळीपाळीनी येत गेलेल्या प्लेग, कॉलरा, इन्फ्लुएन्झा, विषमज्वर या आजारांच्या साथीत फार तरुण माणसं मेल्याने १९२०-२५ च्या आसपास घरोघर विधूर पुरुष आणि विधवा स्त्रिया असायच्या. त्यात पुरुषांना दुसरं-तिसरं लग्न तरी करता यायचं; पण विधवाविवाह फार थोडे व्हायचे. काही थोड्या स्त्रिया शिकून प्राथमिक शाळेत शिक्षिका म्हणून काम करायच्या. रस्त्यानं खाली मान घालून आणि अंगभर पदर घेऊन अशा विधवा शिक्षिका मोठ्या कानकोंडेपणाने शाळेला जाता-येताना दिसत. (अकलूजकर, २०००, पृ. ९८) साथीच्या रोगांची आवर्तने सुरू असल्यामुळे माणसं भविष्याचा फार पुढचा विचार करीत नसत. आज पोटापुरतं मिळालं, बस्स झालं अशी वृत्ती बनणे स्वाभाविक होऊन बसले होते. त्यामुळे उद्यमशीलतेने नवे उद्योग उभारणे वगैरे बाबतीत मराठी माणूस मागे राहिला. शेतीत नवे प्रयोग करणे, शेतीचे यांत्रिकीकरण करणे, डेअरी किंवा सहकारी कारखानदारीसाठी पुढाकार घेण्यात मराठी माणसाचा उत्साह टिकत नसे. मात्र पशुपक्ष्यांना सगेसोयरे मानण्याचा सांस्कृतिक वारसा अशा आपत्कालीन परिस्थितीतही मराठी माणसाने टिकवून ठेवला. दुष्काळात जनावरं दावणीला सांभाळणंही अवघड व्हायचं; पण गोठ्यातली जनावरं कसायाकडे जाऊ दिली जात नसत, दुभती जनावरे आणि भाकड जनावरे यांच्यात भेद केला जात नसे, भाकड म्हशींनाही दुभत्या जनावरांच्या बरोबरीने सरकी-पेंढ घातली जात असे. (अकलूजकर, २०००, पृ. २३१)

**ख्रिस्ती मिशनचे कार्य :**

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकापासून विसाव्या शतकाच्या प्रारंभकाळापर्यंत महाराष्ट्रात दुष्काळ, साथीचे रोग यासारख्या नैसर्गिक आपत्तींचे संकट नित्यनेमाने हजर होत असे. अशा वेळी आपत्तीग्रस्तांच्या मदतीला आणि त्यांच्या सामाजिक पुनर्वसनाच्या कामात ख्रिस्ती मिशनरींचा पुढाकार रहात असे. इ. स. १९०० सालच्या दुष्काळात नाशिकच्या शरणपूर मिशनने रे. जोन्सच्या देखरेखीखाली गावात घरांची बांधकामे, शाळागृहांचे बांधकाम आणि रस्त्यांची कामे काढून दुष्काळग्रस्तांना रोजगार निर्माण करून दिला. नाशिकला अनेक वर्षे रक्तपितीच्या आजाराने त्रस्त झालेली माणसे गोदावरी नदीकाठच्या मंदिरात पडून असत. नदीवर पाणी भरण्यास आणि धुणी धुण्यास बायका येत, तिथेच हे रुग्ण आपलीही धुणी धूत व आंघोळ करीत. मिठाईच्या दुकानासमोर उभे राहून किंवा बाजारात भीक मागत हिंडत. दुष्काळात अन्न पुरवणे आणि प्लेगच्या दिवसात यांना गावाबाहेर आसरा देण्याचे काम मिशनरी करीत. मिस हार्वी हिने या प्रश्नात लक्ष घालून १९०३ साली लेपर आसैलमच्या इमारती बांधून घेतल्या. मध्यभागी सेंट मेरीचे देऊळ बांधले. दवाखान्याचीही सोय केली. मैलभर अंतरावर लेडी पॉलवर्थ होम बांधून रोग्यांच्या लेकरांना आईबापांच्या संसर्गापासून अलग ठेवण्याची सोय केली. सर दिनशा पेटीट यांनी या कामासाठी प्रथम देणगी देऊन मदतीचा हात पुढे केला होता, शिवाय दुष्काळ फंडातूनही मिस हार्वीने निधी उभा केला होता. रक्तपितीने / महारोगाने पीडीत असलेल्या या लोकांना सामाजिक – मानसिक दुराव्याने येणारा एकाकीपणा व आत्मिक अशांती दूर करण्याचेही काम या आश्रमातून केले जात असे. मिस हार्वीने जनावरांच्या देखभालीसाठीही दवाखाना सुरू केला होता. ब्रिटिश सरकारने कैसर-हिंद पदक देऊन तिच्या ह्या सेवाकार्याचा गौरव केला होता. (आठवले, १९३२, पृ. ४०-४३) ख्रिस्ती मिशनऱ्यांचे असे सेवा कार्य इतर ठिकाणीही चालू होते.

## ६.८. सांस्कृतिक जीवन :

विसाव्या शतकाच्या पूर्वार्ध म्हणजे जुने सुटत चालले आहे आणि नवीन अद्याप रूललेले नाही, असा संधिकाळ आहे. या संधिकाळात महाराष्ट्रातील नागर आणि ग्रामीण जीवनधाटणीत कोणते बदल झाले याचा तपास प्रामुख्याने येथे करावयाचा आहे. आधुनिक महाराष्ट्राची एकूण समाजरचना ही खेडी आणि शहरे अशा दोन गटात विभागलेली आहे. शहरी समाजघटकांच्या जीवनव्यवहारावर, सामाजिक आंतरक्रियांवर, अर्थकारणावर, मूल्यधारणांवर आणि अभिरुची-संस्कारांवर औद्योगिक भांडवलशाहीचा प्रभाव वाढत होता. शहरात विविध धर्मांच्या व जातीजमातींच्या लोकांची वस्ती असली तरी स्थूलमानाने मालक आणि कामगार वर्गाची *'वर्गीय समाजरचना'* हा शहरी

समाजव्यवस्थेचा आकृतिबंध बनत चालला होता. शहरात कामधंदा मिळत असल्याने ग्रामीण भागातून शेतमजूर वा कारागिरांचे लोंढे शहरांच्या दिशेने सुरू झाले. भांडवली उद्योगाची नवी कौशल्ये आत्मसात करून शहरात स्थिरावण्यासाठी संघर्ष करणारी पिढी हा या काळाचा युगविशेष राहिला आहे. शहरात स्थलांतरितांचे लोंढे आल्याने चाळी, झोपडपट्ट्या वाढल्या. शैक्षणिक, औद्योगिक व प्रशासकीय आस्थापनांसाठी नव्या इमारती बांधल्या जाऊ लागल्या. यंत्राधिष्ठित कौशल्ये संपादित केलेले कारागीर, दूरदेशांशी व्यापारी उलाढाल करणारे पेढीवाले, प्रशासनातले सनदी नोकर, रंजनक्षेत्रात व प्रसिद्धी माध्यमांत काम करणारे कलावंत, मैदानावर व बंदिस्त जागेत खेळणारे खेळाडू यांच्यामुळे शहरी संस्कृतीचा चेहरामोहरा बदलत गेला. शहरी समाजरचनेत व्यक्तीला आपल्या सर्जनशीलतेच्या आविष्कारांसाठी आणि ऐहिक आकांक्षांच्या पूर्ततेसाठी खुला अवकाश उपलब्ध असे. त्यामुळे अभिरुचिवैचित्र्यानुसार नाट्यगृहे, चित्रपटगृहे, क्रीडांगणे, रेसकोर्स, व्यायामशाळा, वाचनालये, क्लब, खानावळी व उपहारगृहे, अशा सेवासंस्थांची भरभराट झाली. शहरांतर्गत वाहतूक व्यवस्था, सुरक्षा यंत्रणा इत्यादींची वाढ झाली. रोजगाराच्या संधींचे क्षेत्र जसजसे विस्तारत गेले, तसतशी नगरांची महानगरे होऊ लागली. महानगरांमध्ये श्रीमंतांच्या वसाहती, मध्यमवर्गीयांच्या चाळी आणि गरिबांच्या झोपडपट्ट्या वाढत गेल्या.

**नागर संस्कृतीतील बदल :**

महाराष्ट्राच्या नागर संस्कृतीत मुंबई आणि पुणे या दोन महानगरांच्या सांस्कृतिक स्वभाववैशिष्ट्यांची जडणघडण पूर्णत: वेगळी झालेली दिसून येते. मुंबई हे मुळातच औद्योगिक शहर, १९ व्या शतकापासूनच ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या प्रशासनाचे व व्यापाराचे ठाणे असल्याने या शहरात इंग्रजी संस्कृतीला अनुसरणाऱ्या लोकांची संख्या अधिक होती. पाश्चिमात्य शिक्षणाचे केंद्र म्हणून आधुनिक महाराष्ट्रातील बुद्धिवादाचे व इंग्रजीनिष्ठ विचारांचे शहर म्हणून या महानगराने आपला चेहरा घडवला होता. राज्यकर्त्यांना कडवा विरोध करण्यापेक्षा ब्रिटिश राजनीतीशी सुसंगत अशी राजनीती करणारा वर्ग या शहरात तयार झाला होता. या औद्योगिक महानगरीय संस्कृतीची १९ व्या शतकात जडघडण कशी झाली याचा सविस्तर वृत्तांत यापूर्वीच्या पहिल्या खंडात आलेलाच आहे. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात मुंबईचा चेहरा मोहरा बदलू लागला होता. या बदलाची काही निरीक्षणे साहित्यिकांनी आपल्या अनुभवकथनातून नोंदवली आहेत. श्री. ना. पेंडसे यांनी लिहिले आहे :

" त्या काळात मालाड हे लहान गावासारखे होते. . गिरगावात मलेरियाचा फार त्रास होई.. तेव्हाचे दादर आणि आजचे दादर ह्यांत कसलेही नाते राहिलेले नाही. पन्नास वर्षांपूर्वी (म्हणजे सुमारे १९२५ चे) दादर स्टेशनवर बैलांचे रेकले येत. भवानीशंकर आणि

लेडी जमशेटजी हे दोनच नाव घेण्यासारखे रस्ते होते. टिळक पूल नुकताच बांधून झाला होता; पण तो जवळजवळ निर्मनुष्य असे. छबिलदास शाळेच्या जागी आणि समोर मोकळे मैदान होते. पावसाळ्यात तेथे डबकी तयार होत. मुकुंद मॅन्शनचे बांधकाम नुकतेच सुरू झाले होते.. कोहिनूर सिनेमाच्या जागी रंगाचा कारखाना होता. मामा काण्यांचे हॉटेल सध्याच्याच जागी, पण एका बैठ्या इमारतीत - विजयनगरकडे तोंड करून होते. विजयनगर त्यावेळी नव्हते." नायगाव भाग हा बकाल वस्तीचा होता. तिथे भुरट्या चोऱ्या फार होत. (पेंडसे, १९७४,पृ. ३४)

केशवराव भोळे यांनी १९१५ च्या मुंबईचे वर्णन लिहून ठेवले आहे, त्यावरून तेव्हाच्या मुंबईची नगररचना आणि नागरी वातावरणाचा दृश्यपट समोर येतो. त्यांनी लिहिले आहे, "तेव्हाची मुंबई किती सुंदर होती. रस्ते डांबरी झाले नव्हते. रस्त्यात गर्दी बेताची. सकाळी-संध्याकाळी रस्त्यावर पाणी मारून धूळ दाबून टाकीत. पाण्याच्या होजचा फवारा मारणारे म्यु. कामगार कामात इतके वाकबगार होते की, पाण्याचा फवारा मारताना चालणाऱ्यांच्या अंगावर थेंबही उडत नसे. तेव्हा फुटपाथ नव्हते. रस्ते म्हणजे रस्ते. त्यांना फुटपाथची झालर नव्हती. मोटारींपेक्षा व्हिक्टोरियांची गर्दी जास्त होती. लोकांना रहदारीचे ज्ञान चांगले होते. (पुणेकरांपेक्षा) त्यामुळे व्हिक्टोरियावाल्यांना कधी ओरडावे लागत नव्हते. काही ठरावीक ठिकाणी (ठाकुरद्वारा नाका) गिरगाव, सदाशिव लेनमध्ये भाजीवाले बसत. ठाकुरद्वारी भाजी जास्त तऱ्हेवार, स्वस्त मिळे. मासेवाल्या कोळणी टोपल्या डोक्यावर घेऊन ठुमकत जात. त्यांची ती ठुसकेदार चाल प्रेक्षणीय होती. त्या ठरावीक वस्तीत घरात शिरत. (प्रभू-सारस्वतमंडळी) तरीपण चिराबाजारात मात्र जास्त चांगली व स्वस्त मिळे असे तज्ज्ञ सांगत. .. चिराबाजाराशेजारीच पाठारे प्रभुलोकांच्या वस्तीचे आगर म्हणजे नवी वाडी. येथील गिऱ्हाईक अमाप.... लॅमिंग्टन रोड हा सर्वांत सुंदर. स्वच्छ रस्ता. दुतर्फा सुंदर इमारती. नव्या जुन्या शिल्पाकृती. त्यात एन्. पॉवेल कंपनीची इमारत त्यावेळी फार भव्य दिसे. या रस्त्यावर पामची, शिंदीची झाडे लावलेली होती. फुलाफळांना आली की त्यांचा एक मादक सुगंध दरवळे. दोन हर्त्तीना लागून 'पर्शियन इंडियन' हे इराण्याचे हॉटेल. पावणा कप चहा घेतल्याशिवाय चहाचा शौकिन मनुष्य पुढे जात नसे. .. चौपाटीची शोभा तर विचारूच नका. संध्याकाळी तेथे फेऱ्या माराव्या. येणाऱ्या लाटांचे जिवंत नृत्य बघावे. कधी तीत पाय बुडवावे. चार सुंदर चेहेरे त्यांच्या गजगामिनींसह बघावेत. ब्राह्मणी स्त्रिया (भटणी म्हणतात त्यांना) प्रभू सारस्वतांपेक्षा फुटून वेगळ्या दिसत. त्यांचे ते खुंटी ठोकल्यासारखे दिसणारे अंबाडे, दोन हातांवर सोडलेले शालीचे पदर आणि तऱ्हेतऱ्हेची पातळे, लुगडी (आता साड्या म्हणतात) रेशमी जरी काठाची लुगडी. ते नॉयलॉनचे युग नव्हते, तेव्हा जॉर्जेट नुकतेच बाजारात येऊ पाहत होते. शिफॉनचा तर पत्ताच नव्हता. पोलकी मात्र चिकनची,

अरगंडीची, स्टार्च केलेली पातळे हे त्या महिलांचे पोशाख. भटणी इंदुरी इरकली लुगडी नेसत, चोळ्या धारवाडी खणाच्या घालीत, झंपर सुती घालीत. चौपाटीप्रमाणे मलबार हिल हे एक अत्यंत मनोहर स्थळ. मोठाली हिरवीगार लॉन्स. ऋतुप्रमाणे रंगीबेरंगी फुलांचे ताटवे. गोल फिरण्यास लालमातीचे रस्ते, पण रोलर फिरवून घट्ट केलेले. पश्चिमेला अरबी समुद्र. अथांग पसरलेला- क्षितिजापर्यंत पसरलेला निळा दर्या, त्यावरून जाणाऱ्या मोठाल्या बोटी. या समुद्रात सायंकाळी सूर्य जेव्हा बुडी मारतो तेव्हाचे रंगीबेरंगी दृश्य फारच मनोहारी! मलबार हिलवरही वर जाण्याकरता केलेल्या पायऱ्यांच्या वाटा – आजुबाजूंनी फर्न, फुलझाडे, बसायला बाके. बाकावर बसून चौपाटीचे सुंदर दृश्य पाहावे. मुंबईमध्ये गलिच्छ वस्ती नाही असे कसे होईल? झावबाची वाडी धसवाडी, मुगभाट ही गलिच्छपणाची आगरे. .. मेडिकल कॉलेजच्या भोवतालची वस्ती म्हणजे घाणीची परिसीमा. .. ही घाण माणसेच करतात. रोजच्या रोज स्नान करून सोवळे ओवळे पाळणारे ब्राह्मण, जुम्मे के जुम्मा न्हाणारे मुसलमान या बाबतीत सारखेच! कोणाला निंदायला नको आणि वंदायला नको. फोर्टमधील सुंदर इमारतींचे जिने व भिंती पानाची पिंक टाकून रंगविणारे व्यापारी, विड्यांची थोटके, सिगरेटसचे लहानशी अवशेष झोकणारे असे सर्वच!" ( भोळे, १९७४, पृ. ४०-४१)

मुंबई शहरात मलबार हिल परिसर हा श्रीमंतांच्या वस्तीचा. मालदार व्यापारी, उद्योजक, शहरातले प्रतिष्ठित नागरिक, मंत्रिगण, सनदी नोकर यांची घरे या भागात आहेत. फोर्ट परिसरात सरकारी व खाजगी आस्थापनांच्या कचेऱ्या आणि तेथे काम करणाऱ्या उच्चभ्रू वर्गातल्या माणसांची घरे; गिरगाव, ठाकूरद्वार, काळबादेवी, नळबाजार भागातल्या चाळीत गिरणी कामगार व कारकूनादि कामे करणाऱ्या मध्यमवर्गीयांची वस्ती; नागपाडा, कुंभारवाडा, नायगाव वरळीची बीडीडी चाळ इथे दलित, नवबौद्ध व गरीब मुसलमानांची वस्ती, तर धारावीत निम्नवर्गीयांची झोपडपट्टी अशी ढोबळ मानाने वर्गवारी आढळते. मुंबई शहर हे चाकरमान्यांचे शहर म्हणून ओळखले जाते. ग्रामीण भागातून पोटपाण्यासाठी आलेली कुटुंबे चाळीत रहातात. या चाळींची एकूण रचना आणि तिथले लोकजीवन हे गावसमाजाला जवळ जाणारे असल्याने या चाळींचे वर्णन शहरातल्या 'वाड्या' किंवा 'उभे खेडे' (Verticle village) असे केले जाते. (karandikar, 2010, p. 69) खेड्यातली वाडीवस्ती ही एकमेकांना खेटून असलेल्या छोट्या घरांची, सर्वांना मिळून सामाईक अंतरांगण असलेली एकजिनसी वसाहत असते, तशीच काहिशी मुंबईतल्या चाळींचीही रचना असते. दुमजली किंवा चारमजली चाळीत प्रत्येक मजल्यावर दहा ते वीस कुटुंबे राहातील अशी ही एकात्मिक वस्ती असे. खुल्या सामाईक वापराच्या व्हरांड्यात उघडणाऱ्या ९ किंवा १०चौरस फूटांची एक किंवा दोन खोल्यांचे एकक, त्यात एक मोरी, स्वैपाकाची जागा आणि बैठक खोली अशी सर्वसाधारण रचना असे. सगळ्यांना

मिळून ४-५ संडास, खुला धोबीघाट, सामाईक नळ याप्रमाणे पूरक सोयी असतात. या चाळीतल्या मध्यमवर्गीयांचे जीवन शेजारधर्म पळणारे, एकमेकांच्या सुखदु:खात वाटेकरी होणारे, परस्पराश्रयी असे. चार पाहुणे आले तर व-हांड्यात अंथरुणे घालणार, घरात राहाणाऱ्या बायका, म्हातारी माणसे व्हरांड्यात बसून गप्पा मारणार आणि खाली अंतरांगणात खेळणाऱ्या चाळीतल्या मुलांवर नजर ठेवणार, कपडे वाळत घालण्यासाठी व्हरांड्याच्या कठड्याचा वापर करणार, घरात जागा नसेल तेव्हा सामानसुमानाची अडगळ ठेवण्यासाठीही व्हरांडा वापरणार. मुलं अभ्यासासाठी, वाचन करण्यासाठी व्हरांड्यात बसणार. सणासुदीला, लग्नकार्याला, गणपती बसवायला व्हरांडा आणि खालचे मोकळे अंतरांगण सर्वांना उपलब्ध असे. लहान मुलांना अंगाखांद्यावर खेळवण्यात, नोकरी करणाऱ्या स्त्रियांची मुले पाळणाघरासारखी सांभाळण्यात शेजारी कामाला येत. सुटीच्या दिवशी चाळीतली मुलं एकत्र खेळ मांडून बसत. सहजीवनाचा एक उत्तम नमुना म्हणून मुंबईच्या चाळ संस्कृतीचा निर्देश केला जातो. मराठी साहित्यात पु. ल. देशपांडे यांनी 'बटाट्याची चाळ' , गंगाधर गाडगीळ यांच्या 'किडलेली माणसे', अरविंद गोखले यांच्या 'मंजुळा' सारख्या कथेतून चाळ संस्कृतीची यथार्थ वर्णने आली आहेत.

शिरवाडकारंनी मुंबईचे बदल नोंदवताना लिहिले होते, "आजच्या मुंबईची माझ्या मनात व्याख्या येते ती ही – सामान्य माणसाचा जास्तीत जास्त अपमान करणारे भारतातील किंबहुना जगातील सर्वात अग्रेसर शहर. जागा, हवा, पाणी, वाहतुक इ. सर्व प्राथमिक गरजांच्या बाबतीत हे शहर सामान्य स्थितीतील माणसाला किड्याप्रमाणे चिरडीत आहे. पण वीस वर्षांपूर्वी परिस्थिती पुष्कळच वेगळी-चांगली होती. दगडापेक्षा आणि कॉंक्रिटपेक्षा माणसाला अधिक प्रतिष्ठा होती. राहण्याच्या जागा हव्या तेवढ्या मिळत होत्या, रेटारेटी केल्याशिवाय कोणत्याही वाहनात बसता येत होते, खिशात पैसे नसले तर रस्त्याने निवांतपणे चालता येत होते, हॉटेलात आपल्या टेबलाभोवती प्रतीक्षकांची गर्दी जमत नव्हती. ही नेहमीची परिस्थिती. पण युद्धाच्या अखेरच्या काळात तर मुंबई आणखीनच मोकळी झाली, जपानी बॉम्बहल्ल्याच्या धास्तीने. याची परमावधी झाली ती मशीदबंदर भागातील प्रचंड स्फोटानंतर. .. या स्फोटानंतर हजारो लोक मुंबईच्या बाहेर निघून गेले. पोती ओतावी त्याप्रमाणे शहरातील अनेक मोहल्ले रिकामे झाले. .. पण वर्षा-दीड वर्षाने हे चित्र बदलू लागले. चहूकडे बंधारे फुटल्याप्रमाणे मुंबई भरू लागली. गर्दीपर्व सुरू झाले." (शिरवाडकर, २०१२, पृ. ५९-६०)

मुंबई बंदर हे जागतिक व्यापाराचे व औद्योगिक उत्पादनाचे केंद्र असल्याने दुसऱ्या महायुद्धाच्या काळात शत्रूराष्ट्राच्या रडारावर हे शहर कायम असे; त्यामुळे इथल्या रहिवाशांना अशा युद्धजन्य आपत्तींपासून बचाव करण्यासाठी सतत खबरदार रहावे लागत असे. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी मुंबईकरांना 'एअर रेड' (air-raid) तालीमीचा

सराव करावा लागत असे. जपानी विमानं आली तर त्यांना मुंबई दिसू द्यायची नाही. त्यासाठी मुंबईला लपवण्याची तालीम म्हणजे 'एअर-रेड तालीम'. रोज रात्री नऊ वाजता आपली विमानं आभाळात लुटीपुटीच्या फेऱ्या मारीत. पोलिस चौकातून सायरन वाजवत. तेव्हा जपानी विमानं येताहेत असं समजून सगळीकडे चिडीचिप व्हायचं. सगळी दारं-खिडक्या बंद केली जायची. काचेच्या दाराला कागद लावले जात.विमानांची घरघर थांबेपर्यंत सर्वत्र गडद अंधार आणि निरव शांतता पसरत असे. विमानं निघून गेली की दारं-खिडक्या उघडली जायची. दिवे लागायचे. सुटकेच्या भावनेतून हास्यकल्लोळ सुरू व्हायचा. महायुद्धाच्या काळात अन्नधान्याच्या टंचाईचा मुंबईकरांना सामना करावा लागे. तांदूळ, गहू, साखर , घासलेट सगळं रेशनवर मिळायचं. सगळीकडे रेशनच्या रांगा लागत. 'अचानक बातमी येऊन धडकायची. 'घासलेट आलय', साखर येतेय बरं का!' की पिशव्या, डबे घेऊन बायाबापड्या आणि मुलं दुकानासमोर रांगा लावत." (मेहता, २०१४. पृ. २७) ट्रॅमच्या फेऱ्या हा मुंबईच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला होता. पहाटे चार वाजता पहिली ट्रॅम निघायची, शेवटची दहाला. बोरीबंदरला ट्रॅम थांबली की परतीच्या प्रवासासाठी तिचं तोंड गिरगावच्या दिशेने फिरवावे लागे. (मेहता, कित्ता, पृ. १८) औद्योगिक शहर म्हणून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात मुंबईची जीवनशैली कमालीची वेगळी होती.

मुंबईच्या तुलनेने पुणे शहराने मात्र जुन्या संस्कृतीचे आणि परंपरांचे शहर म्हणून आपली ओळख कायम ठेवली होती. सर्व रस्ते रोमला जातात या म्हणीप्रमाणे महाराष्ट्र संस्कृतीचे सर्व रस्ते पुण्याला जाऊन मिळतात, असे म्हणण्याइतपत पुण्याचे सांस्कृतिक महत्त्व असल्याची समजूत आहे. इंग्रजी विद्येपेक्षा देशी ज्ञानपरंपरांचा वारसा पुणे शहरानेच पुढे चालवला. भारतीय अस्मितेच्या संरक्षण व संवर्धनाच्या प्रेरणेतून राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ पुण्यातच सुरू झाली. पुण्यात सनातनी आणि सुधारक असे दोन्ही वर्गांचे प्रतिनिधित्व करणारे लोक होते; पण तुलनेने सनातनी विचारधारेचा पगडा असलेल्या मध्यमवर्गीयांचा गट वरचढ होता. ब्राह्मणी संस्कृतीचे गाव अशी पुण्याची ओळख असली तरी महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक चळवळीचे केंद्र म्हणून या शहरात ब्राह्मणेतरांचाही गट प्रबळ होता. त्यामुळे महाराष्ट्र संस्कृतीचा पोत जाणून घ्यायचा असेल तर पुण्याच्या नगरवासीयांच्या सांस्कृतिक जीवनसरणीचा प्रथम मागोवा घ्यायला हवा.

पुणे शहरातील मध्यमवर्गीयांचे जीवन, त्यांचे राहाणीमान, त्यांची घरे दारे, त्यांची अभिरुची, त्यांच्यातले हेवेदावे यांचा तपास करताना महाराष्ट्र संस्कृतीच्या पुणेरी स्वभावाच्या जडणघडणीच्या खुणा हाती लागतात. पेशवाईच्या बुडाल्यानंतरच्या पुण्यातल्या अव्वल इंग्रजी कालखंडातल्या अशा काही गुणविशेषांचा मागोवा यापूर्वीच्या पहिल्या खंडात आपण घेतलेला आहे. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात वाडे जाऊन हवेल्या

वा बहुमजली इमारतींचे लक्षणीय बदल तुरळकपणे दिएसू लागले होते; पुण्याच्या वस्तीत, घरादारांच्या ठेवणीत फार मोठा बदल झालेला नव्हता. सदाशिवपेठी वाडा संस्कृतीतल्या जीवनधाटणीच्या स्मरणखुणा सोबत घेऊन पुणेकर नव्या बदलांना सामोरे जात होते. पुणेकरांच्या आत्मवृत्तात्मक लेखनात या बदलांच्या काही नोंदी आढळतात. बहुतांश लेखकांनी मोडकळीला आलेल्या वाड्यांचे जुने वैभव आता राहिले नाही, अशी खंत व्यक्त केलेली आहे. या वाड्यांभोवती असलेल्या आख्यायिकांचे गूढ अजूनही तितक्याच ताजेपणाने चघळण्याची पुणेकरांची सवयही अशा लेखनातून प्रतिबिंबित झालेली पहायला मिळते. श्री. ज. जोशी यांच्या 'जोशीपुराणा'त अशा काही नोंदी आढळतात : सदाशिवपेठेतल्या एका मोडक्या वाड्यात पिंपळाच्या झाडावरील मुंजाच्या अनेक आख्यायिका सोबत घेऊन इथले मध्यमवर्गीय रहिवासी अजूनही आनंदाने राहताना दिसतात. वाड्यातल्या या मुंजाला केशरी साखरभात फार प्रिय ! देवकार्यात साखरभाताचा नैवेद्य दाखविण्याचे विसरल्याने मुंजाचा कोप झाला आणि हिरवा शालू नेसलेली नवरी जिना चढून नवऱ्याच्या खोलीकडे जाताना अदृश्य शक्तीने खाली ओढली गेली व त्यात तिचा मृत्यू झाला, अशी आख्यायिका या परिसरात ऐकायला मिळते. मालकाच्या घराण्यातली माघारी आलेली विधवा म्हणजे मुंजाची बायकोच अशी समजूत असून दर पिढीत या घराण्यातली एक मुलगी तरुणपणी विधवा होते आणि मुंजाची सेवा करते, अशा लोकसमजुती या वाड्याभोवती नांदत असतात. काळानुसार वाड्यातल्या जीवनधाटणीत काही सुधारणाही होत गेलेल्या आहेत. उदाहरणार्थ, म्युनिसिपालिटीचे पाण्याचे नळ आल्याने जुन्या विहिरीच्या रहाटावरून पाणी ओढण्याचा त्रास कमी झाला. मात्र तरीही परंपराभिमानी पुणेकरांनी नळाच्या सुधारणांचं स्वागत करण्यापेक्षा 'विहिरीचं पाणी शुद्ध झऱ्याचं, जास्त पाचक; नळाच्या पाण्यात विलायती औषधं घातलेली म्हणून आम्ही नाही ते वापरणार असल्या प्रतिक्रिया द्यायला सुरुवात केली. अर्थात पुढे सवयीने नळावरचं पाणी भरणं आणि पाण्यासाठी नंबर लावण्यावरून भांडणं सुरू व्हायलाही वेळ लागला नाही.(जोशी, २०१७, पृ.१८-२१)

संशयी स्वभाव ही पुणेकर मध्यमवर्गीयांची प्राथमिक ओळख! विशेषत: तरुण स्त्री-पुरुषांच्या सहवासाकडे कायम संशयाने पाहणारी ! आपल्या घरातली एखादी मुलगी कोणाशी तरी बोलेल, कुठेतरी प्रेम जमवील, कुलशीलाला बट्टा लागेल या भयाने कायम पछाडलेले! 'जोशीपुराणा'त अशा एका सहा मुलींच्या कुटुंबवत्सल पती-पत्नींचं चित्रण आलेलं आहे. ते कोणाही तरुणाला घरात येऊ देत नसत. मुलगी कुणाशी बोलते आहे किंवा काय याबद्दल नेहमी चिंतातूर असत. ' या मुली शिकल्या. युद्धकाळात कुणी शिक्षिका झाल्या, कुणी कारकुन्या केल्या. पण ऐट ही की कुणी कधी परपुरुषाशी बोलल्या नाहीत.. प्रेमविवाह वगैरे केले नाहीत.. घरातली भांडी मोरीत खालच्या मानेने घासावीत

त्याप्रमाणे ऑफिसात मान खाली घालून इकडे तिकडे न बघता कारकुनी करीत.' (जोशी, कित्ता, पृ. २१-२२)

सभांचे गाव ही पुण्याची एक महत्त्वाची ओळख. अस्सल पुणेकरांना जेवणाइतकेच व्याख्यानांचेही वेड असे. ऐन प्लेगच्या साथीत दिवसाकाठी शंभर-सव्वाशे माणसे मृत्यूमुखी पडत; तेव्हाही गावात सभा झाल्याशिवाय रहात नसे. शिवाजीच्या काळात किंवा पेशवाईत 'सभ्य स्त्री-पुरुषांना' उद्देशून व्याख्याने दिली जात नव्हती; इंग्रजी अमदानीत मात्र ही व्याख्यानबाजी वाढली. नेमस्तांच्या सभा हिराबागेत आणि जहालांच्या सभा मंडईसमोर होत. कायदेभंगाच्या चळवळीपासून नव्या पुलाखालचे पटांगण किंवा एस. पी. कॉलेजचे मैदान अशी अनेक सभास्थाने निर्माण झाली. हिंदुमहासभेच्या बैठकी टिळक स्मारक मंदिर किंवा शिवाजी मंदिर यासारख्या बंदिस्त ठिकाणी होत. पण जाहीर वादळी सभा मात्र शनिवारवाड्यापुढेच व्हायची! आठवड्यातून दोनतीन वेळा कम्युनिस्टांचे मोर्चे, मिरवणुका, शनिवारवाड्यापुढे येत. सभा सुरू होण्यापूर्वी *"उठाव झेंडा बंडाचा/ शेतकरी स्वातंत्र्याचा / कामकरी स्वातंत्र्याचा"* अशी अमरशेखांची गाणी होत. ब्राह्मणेतर चळवळीतले पुढारी शंकरराव मोरे यांची उपहासगर्भ, कोटीबाजपणा खच्चून भरलेली जहाल भाषणे शनिवारवाड्यासमोरच होत. बाळूकाका कानिटकरांसारखे हौशी वक्ते शनिवारवाड्यापुढे भाषण देण्याऐवजी चौकाचौकातून भाषणे देत फिरत. कुणी निंदा, कुणी वंदा, आमचा बोलण्याचा धंदा असे त्यांचे ब्रीद असे. खोचक बोलण्यात प्रवीण असणारे भालाकार भोपटकर यांचा पट्टा एकदा सुरू झाला की त्यात कोण भरडून निघेल हे सांगता येय नसे. काँग्रेसच्या अनुयायांना ते गांधाळ, सुताळ आणि कायदेभंगी असे संबोधत. (जोशी, कित्ता, पृ. २८-३२) १९२८-२९ सालात पुण्यात सत्यशोधक चळवळीला आणि ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाला बहर आला होता. त्यावेळी ब्राह्मणेतरांची मुले ब्राह्मणांच्या मुलांना 'भट्ट जेवूनी तट्ट फुगले' हे गाणं म्हणून खिजवत. शिमग्यातही ब्राह्मण स्त्रियांबद्दल घाणेरडे उखाणे घेत. महात्मा गांधींची हत्या झाल्यावर भर दिवसा ब्राह्मणांची घरे पेटविण्यात पुरुषार्थ किंवा देशभक्ती आहे असेही समजले जाऊ लागले होते. (जोशी, कित्ता, ३९)

सनातनी आणि सुधारक यांच्यातल्या चढाओढीचे प्रसंग हा पुण्याच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग बनला होता. याचे अनेक प्रसंग वृत्तपत्रांतून आणि आत्मकथनांमधून चित्रित झालेले आहेत. १९०३ साली पुण्यात नाटककार श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या चुलतबहिणीचे (आवडी उर्फ बनीचे) हरिपंत घारपुरे यांच्याबरोबर सुधारकी थाटाने विवाह करण्याचे ठरले होते. धर्माभिमान्यांनी या विवाहात विघ्न आणण्याचा पद्धतशीर बेत आखला. लग्नाची मिरवणूक कसबा गणपतीजवळ येताच सनातन्यांनी देवळाचा बाहेरचा दरवाजा बंद करून घेतला. पण सनातन्यांकडून असे

काही विघ्न येणार याची आधीच कुणकुण लागल्यामुळे सुधारक पक्षाचे लोक सावध होते. त्यांनी दरवाजा बंद होण्यापूर्वीच एक छोटी अक्षत देवाला पाठवून दिली होती. त्यामुळे हे विघ्न फसले. या प्रसंगावर कोल्हटकरांनी विविध ज्ञानविस्तारात 'गणेशचतुर्थी' नामक लेख लिहिला. त्यावर धर्माभिमान्यांचे पित्त खवळले. त्यांनी विविधज्ञानविस्तारकर्त्यांना मासिक बंद करण्याच्या धमक्या द्यायला सुरुवात केली. (कोल्हटकर, पृ. ३८)

पाश्चिमात्यांच्या संपर्कामुळे अनुकरण करण्याच्या स्वाभाविक प्रवृत्तीतून पोषाख वा चालीरितींमध्ये काही नवे बदल झालेले दिसत होते. एके काळी आगरकर 'सुधारक' पत्रातून 'बायकांनी जोडे का घालू नयेत?' जाकिटे का घालू नयेत?' असे प्रश्न उपस्थित करीत होते, आता विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन-तीन दशकात इतके बदल झाले होते की, पुरुषांमध्ये आणि बायकांमध्येही नव्या फॅशन्स रूजू लागल्या होत्या. श्री. म. माटे यांनी या बदलत्या अभिवृत्तीची टिपणे लिहिली आहेत : 'कॉलेजात जाणारे विद्यार्थी इटालियन कॅप किंवा रंगीबेरंगी रेशमी वेल काढलेल्या मखमलीच्या टोप्या घालीत. क्रिकेटच्या टीममधले खेळाडूसुद्धा धोतरे नेसून खेळत, पण आता फर्ग्युसन कॉलेजातल्या विद्यार्थ्यांत विजारीची फॅशन आली होती. पुढाऱ्यांचे पोषाखसुद्धा पाहण्यासारखे असत. शिवरामपंत परांजपे यांचीसुद्धा प्रवृत्ती नटण्याकडे असे. "ते कडकडीत अंगरख्याच्या आत मखमलीचे जाकिट घालीत; आणि डोक्याला गुलाबी पागोटे घालीत; कानांत बाळी, पायांत आगरकरी म्हणजे टाचेचा जोडा, मधून मधून डोकावत असलेले हिरवे जाकिट, आणि करवतीकाठी उपरणे अशा ऐटीने सभेला येत." बायकांच्यात लोकप्रिय होत असलेल्या नव्या पोषाखपद्धतीविषयी त्यांनी लिहिले आहे की, "पदर लहान काढणे व पुन्हा पुन्हा खांद्यावरून तो खाली ओढणे ही फॅशन काही दिवसपर्यंत चालू होती. पुढे इरकली लुगडे निघाल्यानंतर त्याच्या टोपपदराची शोभा दिसावी म्हणून लांब पदर काढण्याची पद्धत सुरू झाली; आणि तो सुद्धा इतका लांब की, मागल्या बाजूने पिंढऱ्यांपर्यंत लोंबत राहावा. स्त्रीशिक्षणाचा प्रसार होऊन मुली जोडे घालू लागल्या होत्या." (माटे,२०१०, पृ. ६७-६८) चहा-कॉफी घेणे, स्त्रियांबरोबर सहल करणे, मंदिरांतून इंग्रजांप्रमाणे शानदार पोषाख घालून नवरा-बायकोने ऐटीत प्रार्थनेसाठी जाणे असे काही दृश्य बदल समोर येऊ लागले होते. पुण्यातल्या 'केसरी' पत्रानेही या बदलांची दखल घेऊन आपला अभिप्राय व्यक्त करताना म्हटले होते की, 'इंग्रजांच्या अनुकरणाच्या सर्वच गोष्टी मुर्खपणाच्या नसल्या तरी बायकी ढंग करू नयेत'. ..'मुंबईत प्रार्थना समाजात उपासनेच्या वेळी स्त्रियांनी मांडीवर बसावे असा प्रचार सुरू असून गोड गळा असणाऱ्या स्त्रियांनी प्रार्थना म्हणण्यात भाग घेतला, परंतु याचा फायदा आंबट शौकिनांनी कर्णेंद्रिये व चक्षुद्रिये तृप्तीसाठी उठवला तेव्हा बरीच खळबळ होऊन प्रथा मोडावी लागली'. (केसरी, ९ ऑगस्ट १८८१) केसरीकारांनी व्यक्त केलेला हा अभिप्राय एका अर्थाने तत्कालीन

संस्कृतीरक्षकांच्या मानसिकतेचा प्रातिनिधिक उद्गार होता. दुसरीकडे स्वदेशीची चळवळ सुरू झाल्यावर डोक्यावरची इटालियन कॅप जाऊन छबिलदासच्या दुकानातली देशी टोपी आली. माट्यांनी लिहिल्याप्रमाणे 'स्वदेशीची संक्रांत एवढ्या वेगाने आली की, सारा डामडौल आणि फॅशन कोणीकडच्या कोणीकडे वाहून गेली.' (माटे, कित्ता, पृ. ६७) सांस्कृतिक देवघेवीच्या या प्रवृत्तींकडे पहाण्याचा सनातन्यांचा दृष्टिकोन आणि सुधारकांचा दृष्टिकोन दर्शविणाऱ्या या दोन प्रतिक्रिया आहेत. समकालीन सामाजिक जीवनातील बदलांचे एकाच वेळी स्वागतही होत होते आणि त्याचवेळी तिरस्कार वा उपहासाच्या प्रतिक्रियाही उमटत होत्या. ह्या प्रतिक्रियांतून एका अर्थाने पारंपरिक व आधुनिक अशा दोन जीवनदृष्टीतल्या मूल्यसंघर्षाचे पडसाद ऐकायला येत होते.

कोल्हापूर शहर मात्र अजुनही जुन्या संस्थानी परंपरेतच जगत होते. सार्वजनिक जीवनात स्त्री-पुरुषांना पुण्या-मुंबईसारखे मोकळे वावरता येत नसे. राजाराम कॉलेजात शिकवणाऱ्या प्राध्यापकांना रंकाळा तलावावर बायकोसह फिरायला जाऊन चिवडा-भेळ खाताना संकोच वाटत असे. माधवराव पटवर्धनांचा सिनेमागृहातला एक अनुभव त्यांचे चरित्रकार द. न. गोखले यांनी लिहिला आहे : ""त्या काळात कोल्हापूरात स्त्रिया जशा नवऱ्याबरोबर फिरायला जात नसत, तशाच सिनेमालाही जात नसत. यदाकदाचित गेल्याच तर इतर नातेवाइकांबरोबर त्या सिनेमाला जात आणि चिकाच्या पडद्याआड वेगळ्या बसत. .. मूक चित्रपटांच्या त्या जमान्यात एखाद्या चांगल्या चित्रपटाला, विशेषत: इंग्रजी चित्रपटाला केव्हा केव्हा जात, .. अशा वेळी, दोघे स्टॉलमध्ये बसलेली असली तरी साऱ्या चित्रपटगृहात काही नवलाई असल्यासारखे वातावरण असे. लोक चार खुर्च्या सोडून त्यांच्यापासून दूर बसत, आणि पुढला पडद्यावरचा सिनेमा सुरू होण्यापूर्वी नि मधल्या सुट्टीत, माना वळवून या जोडप्याकडे चोरून चोरून बघत." (गोखले, १९७८, पृ.३०६) मुंबई सारख्या शहरातही स्त्रियांसाठी हिंदी सिनेमाचा वेगळा 'जनाना शो' असायचा. स्त्रियांसाठी सिनेमाचं तिकीट अर्ध्या किंमतीचं असायचं. (मेहता,२०१४, पृ. ३९) शहरांमधील सांस्कृतिक जीवनातले बदल किती मंदगतीने होत होते, याची ही काही उदाहरणे होत.

विदर्भातील अमरावतीचे चित्र थोडे वेगळे होते. वऱ्हाड सुपीक प्रांत होता. तिथल्या सुबत्तेमुळे पुण्याहून बरेच लोक नोकरीच्या निमित्ताने व वकिली करण्यासाठी अमरावतीला स्थायिक झाले होते. त्याचा परिणाम तिथल्या सांस्कृतिक जीवनात दिसत होता. अमरावतीत नाटकमंडळ्या नाटकांच्या प्रयोगासाठी येत, राजकीय-सामाजिक पुढाऱ्यांची भाषणे होत. अमरावतीचा जिमखाना प्रसिद्ध होता. ब्रिटिश अधिकारी आणि भारतीय शिकलेला वर्ग यांच्यात त्यामुळे क्रिकेट, हॉकीची अभिरुची निर्माण झाली होती. स्त्रीजीवनातही बदलाचे प्रवाह दिसून येत होते. अमरावतीला १९१० -१९१५ च्या

सुमारास वनिता समाज नावाचे महिला मंडळ होते. केशवराव भोळे यांनी त्यांच्या आत्मकथनात या वनिता समाजाविषयीची माहिती नोंदवली आहे, ती अशी : "हा वनिता समाज गावातील वकील, सरकारी अधिकारी, डॉक्टर लोक यांच्या बायका यांनी काढला होता... सभासद कोणालाही होता येत असल्यामुळे सामान्य बायकाही सभासद झाल्या होत्या..श्रीमंतांच्या बायका अगदी साध्या पोषाखात येत असत. त्यामुळे त्यांच्यात आणि सामान्य स्त्रियांमध्ये जवळीक व्हायला वेळ लागला नाही. सामान्य स्त्रियांचा संकोच, भीती दूर झाली . त्या आपल्यातल्याच आहेत असे त्यांना वाटून समाजामध्ये वर्णभेद जाऊन एकोपा निर्माण झाला त्याचे प्रत्यंतर सामान्य स्त्रीच्या घरी लग्न-मुंजीसारखे कार्य निघाले तर समाजातील श्रीमंत बायका त्यांच्या घरी जाऊन सर्व कार्यात प्रेमाने भाग घेत असत. पाचपाचशे पान असले तरी या स्त्रियांच्या अंगमेहनतीमुळे कार्य व्यवस्थित पार पडे. या प्रसंगी स्वत:च्या दागदागिन्यांचे, शालू-शेल्यांचे प्रदर्शन या श्रीमंत बायका करीत नसत. .. त्या काळात स्त्रियांत शिक्षणामुळे जागृती होत होती. आपली परवशता, सासुरवास, छळ, केशवपन, संमतिवयाचा कायदा, हे स्त्रीविषयक प्रश्न या वनिता समाजात चर्चिले जात. या चर्चेच्या मागे पुरुषांचा हात होता हे सांगायला नको. काही प्रतिष्ठित स्थानिक किंवा पुण्यामुंबईकडील सामाजिक पुढाऱ्यांची भाषणे या समाजात होत. स्त्रियांना शिक्षण दिले की आपोआप त्यांना दु:स्थितीची जाणीव होईल, त्या वर्तमानपत्रे वाचतील, आगरकरांचे निबंध वाचतील, हरिभाऊंच्या कादंबऱ्या (मधली स्थिती, पण लक्षात कोण घेतो वगैरे) त्यांचे साप्ताहिक करमणूक, मासिक मनोरंजन (का. र. मित्र) वाचतील, त्यांना स्वोन्नतीची जाणीव होईल, निदान मुलींच्या करिता स्वतंत्र शाळा तरी निघायला पाहिजेत, प्राथमिक शिक्षणही त्यांना मिळत नाही, स्थानिक म्युनिसिपालिटी, लोकल बोर्ड यांनी मुलींकरिता शाळा स्थापून दिल्या पाहिजेत, अशा तऱ्हेचे वाद होत. ठराव पास होऊन सरकार व संस्थांकडे पाठविले जाऊ लागले. मुलींकरिता प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू झाल्या. या समाजामुळे स्त्रियांच्या उन्नतीची चळवळ सुरू झाली. तिला जहाल, मवाळ या दोन्ही राजकीय पक्षांनी सारखाच पाठिंबा दिला, हे अमरावतीच्या राजकीय पक्षाचे खास वैशिष्ट्य होते. यामुळे वनिता समाजाचे पाऊल पुढे पडू लागले. त्या समाजाने स्त्रियांच्या कलाकौशल्यांचे प्रदर्शन भरविले. मुलींना गाणे शिकवायला गवई ठेवला होता. (भोळे, १९७४, पृ. १८-१९)

महाराष्ट्रातल्या शहरी भागातल्या सांस्कृतिक जीवनात त्या काळात कोणते बदल होत होते याची ही काही प्रातिनिधिक उदाहरणे आहेत. आधुनिक सुधारणांबरोबर व्यावसायिक बदलही होत होते. मुंबई महानगरात रेल्वे, ट्रामच्या सार्वजनिक वाहातुकव्यवस्था उभ्या राहिल्या. शहरी चाकरमाण्यांना या यंत्रणेची सवय जडली. पुण्यासारख्या शहरांतर्गत वाहतुकीसाठी भाडोत्री टांग्यांचा पर्याय पुढे आला. टांगेवाला

नामक एक व्यावसायिक गट तयार झाला. सायकली आल्याने शहरांतर्गत व्यक्तिगत प्रवासाचे स्वावलंबन आले. लोकांच्या खाण्यापिण्याच्या सवयी बदलल्या, पोषाख आणि शृंगाराच्या कल्पना बदलल्या. कामगारसंघटनांचा उदय झाल्या, नाटकमंडळ्या स्थापन झाल्या. विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन-तीन दशकांत वकिली व्यवसाय करणाऱ्यांची संख्या वाढली. त्यामुळे अशील मिळवण्यासाठी त्यांच्यात स्पर्धा सुरू झाली. या स्पर्धेतून वकिली व्यवसायात काही अपप्रवृत्ती शिरल्या. व्यावसायिक नीतिमत्तेला बाधा येईल अशा काही व्यावहारिक क्लृप्त्या रूढ होऊ लागल्या. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी त्यांच्या आत्मवृत्तात विदर्भातल्या खामगावच्या वकिली व्यवसायातील बदलांच्या प्रत्यक्षदर्शी नोंदी केल्या आहेत, त्यावरून या बदलांची कल्पना येते. कोल्हटकरांनी लिहिले आहे की, "१९०६ किंवा १९०७ साली पाच रुपये शेकडापेक्षा कमी वकिली घ्यायची नाही असा सर्व वकिलांनी नियम केला होता; तो नियम धाब्यावर बसवून कमी पैशात वकिली घेऊन गिऱ्हाईके आपल्याकडे वळवण्याचे प्रकार वकिलवर्गात सुरू झाले. इतरांचे पक्षकार आपल्याकडे आकर्षून घेण्याकरिता नवे वकील आपल्या कारकूनांना रेल्वे स्टेशनवर पक्षकारांची टेहळणी करण्यासाठी पाठवित, रस्त्यातून पक्षकारांना आपल्याकडे ओढून आणीत; तसेच मध्यस्थांना दलाली देऊन पक्षकार मिळविण्याची नवी प्रथा सुरू झाली. काही वकील पक्षकारांच्या घरी खेपा मारून फिर्यादी दाखल करून घेत. तशात युरोपातल्या युद्धामुळे व पिके बुडाल्यामुळे पक्षकारांना वकिलांची फी परवडेनाशी झाली. अशा स्पर्धेत टिकून राहाण्यासाठी इतर वकिलांप्रमाणे कुठलीही नीतिबाह्य कृती न करणाऱ्या कोल्हटकरांनाही नाइलाजाने आपल्या वकिलीचा दर पाच टक्क्यांवरून तीन टक्के इतका खाली आणावा लागला. (कोल्हटकर, पृ. १२६-१२७)

महाराष्ट्रात खेडोपाडी लोकवैद्यक प्रचलित होते, तर नागर वस्तीत विलायती औषधविद्येच्या दवाखान्यांचा अपवाद सोडल्यास आयुर्वेदाचे उपचार करणारी वैद्यांची परंपरा चालत आलेली होती. त्यांच्याकडे कुठली डिग्री नसायची किंवा कुठले रजिस्ट्रेशन सर्टिफिकेटही नसायचे. या आयुर्वेदाचार्यांच्या कार्यशैलीचे वर्णन कृ. पां. कुलकर्णी यांनी त्यांच्या 'कृष्णाकाठची माती' या आत्मचरित्रात केले आहे : "खोलीच्या खिडकीशी मांडलेले एक साधे टेबल, त्यावर सात आठ लहान मोठे डबे, तेथेच लहान मोठ्या तीस चाळीस बाटल्या, काहीत गोळ्या तर काहीत भस्मे व पूड तर इतर काहीत अर्क, आसवे व अरिष्टे, परंतु ह्यावरून त्यांच्या वैद्यकीची नीट कल्पना यायची नाही. टेबलावर नसणारी अशी कितीतरी इतर औषधे व वनस्पती ते निदान केल्यानंतर तोंडाने घडाघडा सांगत. औषधयोजना साधी व सहज व विनाआयास प्राप्त होणारी अशी असे. कुणाला पाने घालून स्नान, तर कुणाला पानाच्या लाद्यांचा लेप तर कोणाला विड्यांत खायचे औषध; कुणाला दुधांत तर कुणाला मधांत, तर कुणाला दह्यांत तर कुणाला बेलफळाच्या मुरावळ्यांत पुडी

म्हणा, गोळी म्हणा, काढा म्हणा ते देत असत. .. रोगाचे निदान करणेही साधे असे. त्यात अगदीसुद्धा अवडंबर नसे. रोग्याचा हात घेऊन ते नाडीवरून रोगाचे निदान करीत. नाडी बघायला हात हातात घेतला की रोग्याला एक प्रकारचा विश्वासच वाटावा... तुळशीतील साधी माती किंवा तुळशीचं तीर्थ दिले तरी रोग्याला गुण हा हमखास ठरलेला. (कुलकर्णी, १९६१, पृ. ११-१२)

दुसऱ्या महायुद्धापूर्वी मध्यमवर्ग हा आर्थिक व सामाजिक या दोन्ही बाबतीत मध्यम होता. महायुद्ध आणि नंतरच्या काळात किंमती भराभर चढत गेल्या आणि ठराबीक उत्पन्नावर गुजराण करणारा मध्यमवर्ग आर्थिकदृष्ट्या कनिष्ठ पातळीवर गेला. याउलट काळाबाजार, साठेबाजी करणारा वर्ग उच्च आर्थिक पातळीवर गेला आणि पूर्वीचा श्रमजीवी कनिष्ठ वर्ग महागाई भत्ता, बोनसादी रूपांनी आपली आर्थिक पातळी वाढवून मध्यमवर्गीय बनला. याउलट पांढरपेशांची दयनीय अवस्था झाली. आर्थिकदृष्ट्या ह्या वर्गाची कनिष्ठापर्यंत अवनती झाली. तरीही सामाजिकदृष्ट्या मध्यम राहाण्याचा त्याने केविलवाणा प्रयत्न केला. आपली परीटघडीची व्हाइट-कॉलर संस्कृती टिकविण्याकरिता त्याची धडपड निष्फळ ठरली. .. आर्थिक अवनतीच्या पाठोपाठ सामाजिक अवनती होणे क्रमप्राप्त होते. आतापर्यंत कामगार संघटना या फक्त कनिष्ठ वर्गीय कर्मचाऱ्यांच्या असतात अशी धारणा होती. रस्त्यावरून घोषणा देत मिरवणुका काढणे, किंवा संप, हरताळ, मोर्चा या मार्गांचा अवलंब करणे पांढरपेशा मध्यमवर्गाला पसंत नसे. मात्र युद्धकाळातल्या बदललेल्या परिस्थितीत आर्थिक कोंडी झाल्यावर मध्यमवर्गीयांच्याही कर्मचारी संघटना उभ्या राहिल्या व कालांतराने त्या बलवान झाल्या.

**ग्रामीण जीवनातील बदल :**

ग्रामीण जीवनात मात्र शहरी जीवनाप्रमाणे वैचित्र्य किंवा गतिमानता आढळत नाही. महाराष्ट्रातील खेडे विसाव्या शतकातही फारसे बदललेले नव्हते. अलुतेदारी-बलुतेदारी, कारू-नारूची कार्यविभागणी कायम होती. शेतीवाडी, घरादाराच्या, पीक-पाण्याच्या नोंदी ठेवणारे जोशी-कुलकर्णी, गावचा राखणदार महार, गावपाटील हा गावगाडा पूर्वीप्रमाणेच पुढे चालत आला होता. अजूनही खेडे स्वयंपूर्ण होते. शेतकरी आणि कारागीर परस्परांवर अवलंबून असल्याने त्यांच्यात सलोखा नांदत होता. खेड्यातली माणसे भोवतालच्या परिस्थितीप्रमाणेच घडतात. पश्चिम महाराष्ट्रातील खेड्यातल्या माणसांच्या स्वभावधर्माची काही वैशिष्ट्ये कृ. पां. कुलकर्णी यांनी नोंदवली आहेत. येथील माणसे रंगेल, बैलही रंगेल व धनधान्यही रंगेल. शेतकरी सालस आणि गरीब असले तरी थोडा ताठरपणाही असे. अर्थात ही माणसे रंगेल असली तरी रंगेल नसत. अभिमानी असत, पण मत्सरी नसत, त्यांच्यात हेवेदावे असत पण ते शेतीवाडीच्या अथवा वतनवाडीच्या मर्यादेपुरतेच. (कुलकर्णी, १९६१, पृ. ८) गावसमाजाच्या बंदिस्त चौकटीमुळे व्यक्तीच्या

कर्तृत्वाला आणि ऐहिक उत्कर्षाला मर्यादा पडत असत. सामाजिक संबंध व्यक्तिकेंद्री असण्यापेक्षा जातिकेंद्री असत. गावगाड्यात वहिवाटीने प्राप्त होणारे हक्क हे जातिसमूहांतर्गत कुटुंबाला प्राप्त होत असत. शेतातल्या उत्पन्नातून गावसमाजातल्या प्रत्येक घटकाला जाती व वंशावळीच्या वहिवाटीनुसार किमान उपजीविकेपुरता का होईना वाटा मिळत असे. जातीच्या श्रेणींची उतरंड व स्पृश्यास्पृश्यभावाची वागणूक यामुळे सामाजिक विषमता नांदत असे. मात्र असे असले तरी ग्रामव्यवस्थेत परस्परावलंबी श्रमविभागणी व अलुतेबलुतेदारीमुळे सामाजिक एकसंधता टिकून असायची. चातुर्मासातील भागवताचा सप्ताह, कृष्णाष्टमीचा गोपाळकाला, कीर्तने, भारुडे, पोळा,रामनवमीचा जन्मोत्सव, दिवाळीचे सण, जावळ, लग्नविधीचे समारंभ यामुळे गावाची सांस्कृतिक एकात्मता टिकून असायची.

कोकणातले ग्रामीण भागातील सांस्कृतिक जीवन आधुनिक बदलांपासून अजुनही लांबच होते. नमुन्यादाखल श्री. ना. पेंडसे यांच्या आत्मचरित्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील मुर्डे-हर्णेचे काही अनुभव येथे प्रातिनिधिक स्वरूपात उद्‌धृत करीत आहोत कोकणात गणपती उत्सव हा महत्त्वाचा सण. पेंडशांकडचा गणपती उत्सव कसा साजरा व्हायचा याचे हे वर्णन: "गावातील लोक आरास करायला एकादशीपासून येत. माजघरात छत लावणे, हंड्या लावणे अशी आरास असे. भिंतीशी गणपती ठेवायला मोठा पलंग मांडीत. त्याच्या मागे पुरुषभर उंचीचे आरसे. माजघरातल्या भिंतीवर ड्रॉइंग काढीत. घरात बायकांना दिवसभर काम असे. प्रसादाकरिता पाऊणशे नारळ लागत. वेलची दळावी लागे. गणपतीचे दहा दिवस घरात लग्नकार्य असावे तसे वाटे. गणपतीची मूर्ती तृतीयेला आणीत. . गावातली कितीतरी माणसे आणि कोंडावरचे गडी गणपती आणायला हर्णेस जात. सजवलेल्या रथातून आणीत. गणपती खाडीवर आला की भाऊशेठ केवढ्याने ढोलकी वाजवी. नंतर खालू वाजवू लागत. वाजंत्री मुर्डीला ऐकू येत. रथ दाराशी येई तेव्हा माणसांनी अंगण भरून जाई. मोठ्या माणसाएवढी गणपतीची मूर्ती असे. दाही दिवस पक्वान्न, कथा, मंत्रजागर, आरत्या, देवे. रोज गडी नाचायला येत. ललिताच्या दिवशी (त्रयोदशी) हर्णेपासून माणसे येत. रात्रभर चहा चालू असे. एक दागोटा साखर लागे. अनंतचतुर्दशीला अडीचशे पान होई. संध्याकाळी सजविलेला रथ अंगणात येई. त्यात गजाननाची मूर्ती ठेवताच वाद्यांचा गजर होई तो आंजर्ल्याच्या पुळणीवर जाईपर्यंत. वाद्ये सुरू झाली की सगळे गहिवरून येत. असा हा गणपति-उत्सव." (पेंडसे, पृ. १२)

सार्वजनिक दवाखाने वा प्रसुतिगृहांच्या सोयी अद्याप झालेल्या नसल्याने स्त्रियांची बाळंतपणे घरीच होत. पण या बळंतपणात बाळ-बाळंतिणीची काळजी किती निगुतीने घेतली जात असे, त्यातून कौटुंबिक जिव्हाळा आणि सांस्कृतिक जीवनशैलीचे पैलू लक्षात येतात. बाळंतिणीचे डोहाळे, पाचव्या महिन्यात ओटी भरणे, सुटका झाल्यावर दहा दिवस

शांतिपाठ म्हणायला ब्राह्मण सांगणे, सटी, पाचवी साजरी करणे, हे सगळे कार्यक्रम दणक्यात होत. गावाला घुगऱ्या खायला बोलवत. गावात खरवसाच्या वड्या वाटत. कान टोचणे, बारसे होई. रात्री मुलाला तेल चोपडावे. आज उगाळले ते उद्या नाही. मुलाचे बाळकडू घरीच तयार करीत. जायफळ, मायफळ, सुंठ, काकडशिंग, डाळिंबाची साल, कासवाची पाठ अशा लोकवैद्यकातल्या औषधी वस्तूंचा बाळकडूत यथायोग्य वापर होत असे. सकाळी उठल्यावर बाळंतिणीला मोठा चमचाभर तुपात भिजवलेला डिंक आणि शिरे देत. शिरे हळदीचे असत. चमचाभर हळद, चमचाभर सुंठ, सुपारीएवढा गूळ, दोन चमचे तूप हे मिश्रण कढवायचे आणि अंगाला लावण्याआधी ते बाळंतिणीला द्यायचे. नंतर अंगाला लावणे. शेकशेगडी. रात्रीची औषधे वेगळी. सागरगोटा आधी भाजायचा. मग बी तुपात खलून बाळंतिणीला द्यायची. पहिले तीन दिवस झोपायच्या अधी बिब्याची फुले तुपात टाकून देत. शिवाय रोज मध, तूप आणि केशर. अशी पहिल्या दहा दिवस औषधे देण्याची चाल होती. पहिल्या दहा दिवसात बाळंतिणीच्या पोटात कच्चे तीन शेर तरी तूप जायला हवे, जेवण नाही गेले तरी चालेल... त्या दिवसात मोलकरणीचे दरसुद्धा सध्यापेक्षा वेगळे होते. दहा दिवस अंगाला लावण्याचे लक्ष्मी मोलकरणीला दहा निठवी तांदूळ, दहा आणे आणि एक नारळ. तो दोन पैशांना मिळे. अकराव्या दिवशी निगडीच्या पाण्याने बाळंतिणीला स्नान घालीत. त्या दिवशी परटीण सोहेर काढायला येई. सोहेर काढायचा म्हणजे सगळे धुवून घ्यायचे. भिंतीसुद्धा सारवायच्या. मुलगी असली तर दहा पायली भात आणि आठ आणे, मुलगा असला तर बारा पायली भात आणि सव्वा रुपया एव्ढे सोहेर काढण्याकरिता परटिणीला देत. (१६-१८)

ब्रिटिश अमदानीत सरकारी हस्तक्षेपामुळे ग्रामीण जीवनधाटणीत काही बदल व्हायला सुरुवात झाली होती. जमीन महसूल गोळा करण्याच्या हेतूने ब्रिटिशांनी व्यापक सर्वेक्षण करून, जमिनीचे मोजमाप करून व्यक्तींच्या नावावर जमिनीच्या मालकीच्या नोंदी करवून घेतल्या होत्या. जमीन-मालकीचे हस्तांतरण, कर्जासाठी जमिनी गहाण ठेवण्याचे नियम, महसूलासाठी उत्पादित पिकांची आणेवारी ठरविणारी नियमव्यवस्था यामुळे ग्रामीण समाजरचनेत काही अंतर्गत ताण निर्माण झाले होते. औद्योगिक भांडवली अर्थव्यस्थेच्या प्रभावामुळे खेड्यातील पारंपरिक उद्योग बुडाले होते. ग्रामीण रोजगारीचे नवे प्रश्न निर्माण झाले होते. परिवर्तनवादी चळवळींमुळे हक्कांची नवी जाणीव पहाटली होती. सामाजिक विषमतेच्या पारंपरिक आकृतिबंधांना छेद देणाऱ्या घडामोडींमुळे स्त्रिया, दलित व वंचित गटांमध्ये सामाजिक अस्मितेचे भान जागे झाले होते.

या कालखंडात भौतिक बदलांबरोबरच सामाजिक व सांस्कृतिक जीवनात बरेच मोठे परिवर्तन झालेले दिसून येते. इंग्रजी संस्कृतीच्या अनुकरणातून आपले नमुनादर्श बदलले, जीवनसरणी आणि आचारधर्म बदलला, पोषाख आणि चालीरिती तर बदलल्याच पण

भाषा आणि मूल्यादर्शही बदलले. ह्या बदलाच्या खुणा नवी घरे बांधली जाताना आपल्याला पहायला मिळतात. अंगण-परसदार असलेली बहुखणी घरे किंवा अंतरांगण असलेले वाडे जाऊन आता बंद खोल्यांच्या चाळी किंवा सदनिका बांधल्या जाऊ लागल्या. पूर्वी समया होत्या, त्यांची जागा कंदिलाने घेतली आणि कंदिलाची जागा बटनाची उघडझाप केल्यावर उजळणाऱ्या आणि मालवणाऱ्या विजेच्या ऐटबाज दिव्यांनी घेतली. तोंड धुण्यासाठी शेणाची राखुंडी वापरत, त्याची जागा कारखान्यात तयार होणाऱ्या दंतमंजनाने घेतली. सगळ्या नैसर्गिक गोष्टींना आपण पारखे झालो. या कालखंडातील स्थित्यंतराच्या काही खुणा ज्योत्स्ना भोळे यांनी *'अंतरीच्या खुणा'* या पुस्तकात नोंदविल्या आहेत. या प्रकरणातील तपासाचा एकूण गोषवारा या प्रातिनिधिक दर्शनातून सांगता येईल :

'खेड्यात कच्चे पेरू, कैऱ्या, चिंचा खाल्ल्याने भरपूर व्हिटॅमिन पोटात जात असे, आता व्हिटॅमिनच्या गोळ्या खाव्या लागतात; एवढे करून तब्येती नाजूकच! लहानपणी आईचा लसणीचा ठेचा आणि भाकरी-चटणीची गोडी यांनी मिळणारं समाधान आता पंचपक्वान्नं उपलब्ध असूनही मिळत नाही. आंब्याच्या दिवसात मुलांची बाठा चोखून पांढरा करण्याची शर्यत आता राहिली नाही. लहानपणी जत्रा असली म्हणजे महागात महाग म्हणजे चार आणे किंमतीच्या रेशमी बांगड्या भरल्या जात, आता हिऱ्याच्या बांगड्या आल्या तरी तो आनंद मिळणार नाही. नऊवारी लुगडं, मोठं कुंकू, मोत्याची कुडी, चोळी आणि केसाचा अंबाडा आताच्या फॅशनच्या युगात दिसायचा नाही. चांदीचा लामणदिवा, तुपाची लोटी, कुंकवाची कुयरी ह्या वस्तू आता घरातून नाहीशा झाल्यात. पिंपळ-वडाचे उपवास, फुले-पत्री गोळा करणं, वऱ्याच्या तांदुळाचा भात जेवणं, बाळंतिणीचे डिंकाचे लाडू हे सारं आता भूतकाळात जमा झालं. पहाटे देवळात वाजणारा चौघडा आता राहिला नाही. शाळेतला छडीचा मार, घरी राहिलेल्या मुलाला उचलबांगडी करून, पालखीत धिंड काढल्यासारखे शाळेत आणण्याचे दिवस आता संपलेत. दिवसाला श्लोक पाठ केल्याशिवाय जेवायला मिळत नसे, ते दिवस आता राहिले नाहीत. आता मूल तीन वर्षांचं झालं की मॉंटेसरी आईच्या ताब्यात जातं आणि खरी आई खुशाल समाजकार्यात किंवा क्लबाल जायला मोकळी होते. भाषिक वर्तनव्यवहारही खूप बदलला. 'आई' या नावाशिवाय 'ममी ममी'चा जयघोष दिवसभर सुरू असतो आणि ममीच्या नावाप्रमाणं पाश्चिमात्य संस्कृतीची ऐट मिरवण्यासाठी जाता येता चुंबनांची खैरात चालते. कामकाजाच्या ठिकाणीही पोवाड्यात जसं 'जी जी रे जी जी' पालुपद असतं तसं 'जी' म्हणजे 'येस' किंवा 'या' म्हणत रहायचं, असे सगळे भाषाव्यवहार बदलू लागले आहेत. (भोळे, १९६६) सध्या आपलं जीवन ना धड देशी ना धड विदेशी असं अर्धवटासारखं झालं आहे, असा या बदलांचा थोडक्यात निष्कर्ष आहे.

### भाषिक प्रश्नांतही जातीय तेढ :

१९३२ साली कोल्हापूरला महाराष्ट्र साहित्य संमेलनात नानासाहेब चापेकर यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीने तयार केलेल्या शुद्धलेखनाच्या नियमावलीवरून वाद झाला. अनुच्चारित अनुस्वार ठेवावेत की काढून टाकावेत या मुद्द्यावरून झालेल्या वादात अनुच्चारित अनुस्वार काढून टाकण्याचा पक्ष घेणाऱ्या गोविंदराव पावशे गटाने 'मराठीतील अनुच्चारित अनुस्वार कोकणस्थ चित्पावन ब्राह्मणांनी आणले, ते मूळचे मराठीत नव्हते, तेव्हा ते काढून टाकावेत' अशी उपसूचना मांडली व त्यास अनुमोदन देणारे भाषण मूळचे कृष्णाकाठचे व सध्या अकोल्यात शिक्षक असणाऱ्या श्री. आचार्य यांनी केले. आपल्या भाषणात त्यांनी "अनुस्वार हे कोकणस्थ चित्पावन ब्राह्मणांनी आणले, ते लाथ मारून उखडून टाकले पाहिजेत" असे आविर्भावयुक्त भाषण केले व 'ठोकरसे उडा देंगा' म्हणून चप्पल घातलेल्या पायाची ठोकर हवेत उडवली. त्यावर संमेलनात उपस्थित कोल्हापूरच्या बहुसंख्य मराठा समाजातील उपस्थितांनी पटके, शेमले उंचावून टाळ्यांच्या कडकडात पाठिंबा दिला. या चेतलेल्या प्रसंगाच्या पार्श्वभूमीवर शुद्धलेखन समितीचे चिटणीस प्रा. कृ. पां. कुलकर्णी यांनी शिलालेखांपासून ज्ञानेश्वर-तुकाराम आणि सगनभाऊ-होनाजीबाळापर्यंतच्या लेखनाची प्रमाणे देऊन उत्तर देताना म्हटले की, "ह्यापैकी कोणीही साधुसंत चित्पावन नव्हता. सर्व मराठी भाषा आपण देशस्थ यजुर्वेदी, ऋग्वेदी, शिंपी, सोनार, माळी, कुंभार, महार, वेश्या, गोंधळी, शिकलगार ह्यांनी बनवली. .. आम्ही पण कृष्णाकाठचे आहोत. आमचेही पिंड तिथल्या मातीचे आहेत. आम्हीही तेथले पाणी प्यायलो आहोत. आम्हीही कृष्णाकाठचे पाटखळ-बोरखळचे जोंधळे खाल्ले आहेत. आम्हीही गोट्याची वांगी खाल्ली आहेत. कृष्णाकाठच्या मातीचा अभिमान फक्त तुम्हालाच?.. आम्हाला तर तुमच्यापेक्षाही अधिक आहे. आणि ठोकर कुणाला दाखविता? आम्हाला? ती कुणावर उगारता? बिचाऱ्या अनुस्वारांवर? काय ही तुमची मर्दुमकी! वाहरे वाहवा!" ह्या भाषणालाही तेवढाच प्रतिसाद मिळाला. ठराव मताला टाकल्यावर भास्करराव जाधवांसारख्या पुढाऱ्यांसह शुद्धलेखन समितीच्या बाजूने उभे राहिले व प्रचंड मताधिक्याने गोविंदराव पावशेंची उपसूचना फेटाळण्यात आली. (कुलकर्णी, १९६१, पृ. ६) महाराष्ट्राच्या समाजजीवनात व भाषिक राजकारणात जातीयतेचे व प्रादेशिकतेचे रंग कसे मिसळले होते याचा हा एक नमुना आहे.

### युरोपियनांचा वर्तनव्यवहार :

महाराष्ट्रात राहाणारे अँग्लो इंडियन लोकांचा एतद्देशीय हिंदूंशी लोकांबरोबर होणाऱ्या वर्तनव्यवहारात अजुनही वर्णद्वेषाच्या खुणा मिटलेल्या नव्हत्या. रेल्वेच्या प्रवासातही त्यांच्याकडून हिंदूंना विषमतामूलक वागणूक मिळत असे. नाटककार श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी त्यांच्या आत्मचरित्रात रेल्वे प्रवासातल्या अशा अनुभवाची नोंद केली

आहे. त्यांनी लिहिले आहे की, "आगगाडीच्या डब्यात बसण्यासंबंधाने माझे सोजर किंवा किरिस्ताव लोकांशी व इतरांशीही अनेकदा तंटे झाले आहेत. एकदा मी दुसऱ्या वर्गाच्या डब्यात चढत असता आत दोन सोजर बसले होते, त्यापैकी एकजण दात-ओठ खात व मुठी वळत माझ्या अंगावर धावून आला." (कोल्हटकर, पृ. १३५) व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळाचे सभासद असलेले लोकनायक अणे यांच्यावरही असाच प्रसंग ओढवला होता. नागपूरला रिझर्व डब्यात बसलेल्या अणेंना सैनिकांनी अतिशय अपमानास्पद वागणूक देऊन डब्यातून उतरण्यास भाग पाडले होते. प्रवासी उतारूंच्या हक्कांची अशी सरसकट पायमल्ली करणारा वर्तनव्यवहार युरोपीयनांकडून होत असे. (अष्टपुत्रे, १९४३, पृ. ७५)

सरकारी नोकरवर्गाला ब्रिटिश प्रशासनाकडून मिळणारी वागणूकही अशीच भेदभावाची होती. सर्व सरकारी सुखसोयींचा लाभ घेणारे, संध्याकाळी टेनिस खेळणारे, सुटीच्या दिवशी शिकार आणि करमणुकीसाठी वेळ देणारे ब्रिटिश अधिकारी एतद्देशीय नोकरवर्गास मात्र त्याच न्यायाने वागवित नसत. ब्रिटिश प्रशासनात सरकारी नोकरवर्गाची स्थिती भारवाहू प्राण्यापेक्षा वेगळी नव्हती. यासंदर्भात गांधीजींच्या मौनातल्या विश्रांतिसुखाची कल्पना असलेल्या डॉ. अष्टपुत्रे यांनी तुरुंगातल्या डायरीत एक वास्तवदर्शी निरीक्षण नोंदवले आहे . कारकून लोकांना वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मर्जीनुसार रात्री नऊ नऊ वाजेपर्यंत कचेरीत बसून राहावे लागते. पुन्हा घरी काम करण्यासाठी फाईली घेऊन जाव्या लागतात. रविवारी सुटीच्या दिवशी किंवा सणाच्या दिवशीही साहेबाकडून कामासाठी बोलावण्यात येते. 'वर्षानुवर्षे या बिचाऱ्यांना विश्रांती कशी ती ठाऊक नसते आणि त्याचा व्हायचा तोच परिणाम त्याच्या शरीरावर आणि मनावर होतो आणि मग त्या सर्वांचा परिणाम कुटुंबातील साऱ्या माणसांवर आणि व्यवहारांवरही होतो.' युरोपात नोकरवर्गाला सुटीचा दिवस आनंदात घालता यावा म्हणून शहरापासून दूर निसर्गरम्य जागी वेळ घालविण्याच्या सोयी निर्माण केलेल्या असतात. तिथे पोहणे, सायकलीवर वा घोड्यावर रपेट मारणे, खेळ, करमणुकीची साधणे उपलब्ध असतात; हिंदुस्थानात मात्र अशा एतद्देशीय नोकरवर्गासाठी अशा सुविधा उपलब्ध करून देण्याऐवजी सुटीच्या दिवशीसुद्धा कामावर बोलावण्याचा प्रघात असल्याने नोकरदारवर्ग मनोविश्रांतीच्या गरजा भागविण्यापासून वंचित राहिलेला दिसतो. (अष्टपुत्रे, १९४३, पृ. ६२, ७२)

सारांश, शहरी वा ग्रामीण भागात सांस्कृतिक बदलाच्या खुणा दिसत असल्या तरी सामाजिक आंतरक्रियांतली पारंपरिक संकेतव्यवस्था फारशी बदलली नव्हती; पोशाख व राहाणीमानात बदल झालेले असले तरी मूल्यभानात मौलिक बदल झालेले दिसत नाहीत. औद्योगिक क्रांतीनंतर व्यावसायिक बदल झाले, कामकाजाच्या ठिकाणचा वर्तनव्यवहार

बदलला तरी जातिकेंद्री समाजाचे वर्गीय समाजात रूपांतर झाले नाही.

## ६.९.इतिकथन :

महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात झालेल्या बदलांमागे सत्यशोधक समाज, डिप्रेस्ड क्लास मिशन, मराठा शिक्षण परिषद, बहिष्कृत हितकारिणी सभा, ब्राह्मणेतर पक्षाचा मंच इत्यादी सामाजिक चळवळींचा प्रभाव कसा होता याचा मागोवा आपण घेतला. मराठी माणसाचा बौद्धिक पिंड घडविण्यात आणि सामाजिक कर्तव्यनिष्ठेची मूल्ये संवर्धित करण्यात राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ, कर्व्यांचे महिला विद्यापीठ, प्राज्ञ पाठशाळेसारख्या पाठशाळा इत्यादी औपचारिक व अनौपचारिक शिक्षणसंस्थांनी दिलेल्या योगदानाचे तपशील आपण पाहिले. सोवळ्यात अडकलेला कर्मठ समाज परंपरेच्या बेड्या तोडून इहवादी जीवनशैलीकडे कसा वळला ह्या बदलांच्या खुणांचा माग काढीत आपण महाराष्ट्राच्या सामाजिक पुनर्घटनेतील विविध अंत:प्रवाहांचा तपास केला. विसाव्या शतकाच्या उंबरठ्यावरचे सामाजिक वास्तव आणि १९५० साली प्रजासत्ताक भारताचे नवे वळण सुरू होण्यापर्यंत बदलत गेलेल्या मूल्यधारणा आणि जीवनशैलीतील परिवर्तनांच्या विविध पैलूंचा तपास आपण केला. या तपासातून हाती लागलेल्या निष्कर्षांचा साररूप गोषवारा असा:

महाराष्ट्राच्या समाजजीवनातली जातीय तेढ कमी करण्याचे प्रामाणिक प्रयत्न या काळात झालेले दिसतात. चातुर्वर्ण्याच्या चौकटीत उच्च स्थानी समजल्या जाणाऱ्या सुशिक्षित अभिजनांनी स्वत:च्या जातिधर्माच्या सनातन संदर्भचौकटीतून बाहेर येऊन अस्पृश्यता निर्मूलनासाठी स्वयंस्फूर्तीने प्रयत्न केले. स्वा. सावरकरांनी रत्नागिरीत अस्पृश्यांसह सहभोजन, सहप्रार्थना व सहशिक्षणाचे प्रसंग घडवून आणले; श्री. म. माटे यांनी दिवाळसणाला अस्पृश्य वस्तीत जाऊन अस्पृश्यांच्या मुलांना आंघोळी घातल्या; पंजाबराव देशमुखांनी अमरावतीला वा साने गुरुजींनी पंढरपूरला अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशासाठी पुढाकार घेतला. जातिकेंद्री समाजाधारणेतल्या सांस्कृतिक भेगा बुजविण्यासाठी प्रतिकात्मक स्वरूपात का होईना सार्वजनिक जीवनात परस्पर संवाद वाढविणारे सामाईक समरसतेचे प्रसंग घडवून आणण्याची गरज होती. अस्पृश्यांकडे तुच्छताभावाने पाहाण्याच्या प्रवृत्तीत बदल घडवून आणण्यासाठी महार, मांग असे जातिवाचक निर्देश करण्याचे टाळून माट्यांनी 'अस्पृष्ट' ह्या पर्यायी शब्दाचे उपयोजन करण्याचा पर्याय सुचविला किंवा गांधीजींनी अस्पृश्यांकडे तुच्छताभावाने पाहाण्याच्या सामाजिक दृष्टिकोणाला हद्दपार करण्यासाठी 'हरिजन' अशी सन्मानदर्शक संज्ञा रूढ केली. भाषेमुळे होणारा संवादभंग टाळण्यासाठी समाजभाषेच्या पुनर्घटनेची गरज आहे, हे ह्या समाजधुरिणांनी ओळखले होते. कर्मठ परंपरावादी लोकांमध्ये ही नवी भाषिक प्रमाणके रुजायला वेळ लागत होता, हेही तितकेच खरे. किंबहुना सनातनी मंडळी

माट्यांचा *'महार माटे'* म्हणून तुसडेपणाने उल्लेख करीत. किंवा ते 'मांगिणीशी व्यभिचारासाठी मांगवड्यात रात्रीचे जातात' अशीही संभावना केली जाई. वास्तविक चातुर्वर्ण्य अस्मितेच्या टोप्या उतरवून माटे हरिजन वस्तीत शाळा चालवीत होते, अस्पृशोद्धारासाठी काम करीत होते. परंतु चळवळीतल्या कार्यकर्त्यांनीसुद्धा 'माट्यांनी कोणा अस्पृश्याबरोबर रोटीबेटीव्यवहार करून दाखविला आहे का' असा प्रश्न उपस्थित करून अप्रत्यक्षपणे माट्यांच्या अस्पृश्योद्धाराच्या कामाविषयीच्या निष्ठाच प्रश्नांकित केल्या होत्या. महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाच्या चळवळींनी आपल्या अंतर्वर्तुळात इतर तत्सम प्रवाहांना सामावून घेण्याचा मोठेपणा दाखविला नाही, किंवा आपले अंतर्वर्तूळ भेदून अन्य प्रवाहात मिसळून जाण्यासाठी लागणारी लवचीकता मर्यादित कार्यकक्षेत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी दाखविल्याचे दिसत नाही.

आधुनिक महाराष्ट्रात जातिभेदनिर्मूलनासाठी सुरू झालेल्या सामाजिक चळवळींच्या केंद्रस्थानी 'ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद' होता. जातीय विषमतेची बीजे चातुर्वर्ण्यव्यवस्थेत रूजलेली होती; या व्यवस्थेला धार्मिक अवगुंठन चढवून श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या जातीय उतरंडीत बदवण्याला ब्राह्मण वर्ग व त्यांनी निर्माण केलेले धर्मग्रंथ जबाबदार होते, अशी परिवर्तनवाद्यांची खात्री होती. त्यातून मराठी समाजात ब्राह्मण-ब्राह्मणेतर अशी उभी फूट पडणे स्वाभाविक होते. मात्र बऱ्याचदा सनातनी परंपरावाद्यांवर प्रहार करताना विद्रोही विचारधारेतल्या पुढाऱ्यांची राग-द्वेषाची मात्र चढत गेल्याने ब्राह्मण वर्गाची तुच्छतादर्शक भाषेत संभावना करण्याचे प्रसंग झडत असत. असे भडकावू शब्दप्रयोग सामाजिक समरेसतेऐवजी सामाजिक अपसरणालाच कारणीभूत होतात, याचे भान चळवळीतले कार्यकर्त्यांना रहात नसे. सार्वजनिक मेळे ही मीलनाची क्षेत्रे होण्याऐवजी भांडणाचे आखाडे बनू लागले, दिंड्या-मिरवणुकांचे झुंडीत रूपांतर होऊ लागले तर सलोखा कसा वाढेल हे लक्षात घेतले जात नव्हते. ब्राह्मणेतर चळवळीतली जवळकरांच्या युक्तिवादाची भाषा, किंवा छत्रपती मेळ्यातली पदे यातून भडकावू भाषेचे सर्रास उपयोजन होत असे. त्यामुळे सामाजिक अवमानाचे खटलेही चालवले गेलेत; काही वेळा विद्रोही मंडळींना अशा अपशब्दांच्या वापरासाठी माफी मागण्याचेही प्रसंग आले. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाला भडकावू भाषेचा रोग टिळकयुगापासूनच जडला होता, हे या आढाव्यातून लक्षात येते. परिवर्तनवादी चळवळींत वैचारिक संवादापेक्षा भाषिक खडखडाट अधिक ऐकायला मिळतो.

महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील बदलाच्या प्रवाहांची ऊर्जास्थाने म्हणून पुणे, कोल्हापूर आणि नागपूर ह्या शहरांचे योगदान राहिले आहे. पुणे शहरातील हुजूरपागा शाळा, फर्ग्युसन व डेक्कन कॉलेजात शिकणाऱ्या तरुणांच्या मनोधारणांवर राष्ट्रीय ध्येयवादाचा, युरोपीय ज्ञानाचा आणि पाश्चिमात्य संस्कृतीचा संस्कार अधिक गडदपणे

जाणवतो. तसेच कर्व्यांच्या हिंगणे आश्रमातून देशी मूल्ये व सांस्कृतिक कर्तव्यभावनेला मानदंड अनुसरणारी पिढी तयार होत होती. कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजातही राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार करणारा अध्यापकवर्ग असल्याने युवा पिढीत वसाहतवादविरोधी जाणिवांची पेरणी होत होती. इंग्रजी सत्तेच्या विरोधात जनभावना चेतवणारा राष्ट्रवाद आणि देशी संस्कृतीच्या जीर्णोद्धाराच्या वाटा शोधणारा धार्मिक अस्मितावाद ह्या दोन तत्त्वांनी भारलेला टिळकसंप्रदायी वर्ग पुण्यात वरचढ होता. या टिळकसंप्रदायाला शह देणाऱ्या ब्राह्मणेतर चळवळीतल्या तरुणांचाही एक गट पुण्यात प्रभावी होता; त्यांना म. फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचे वैचारिक अधिष्ठान होते आणि कोल्हापुरातून राजर्षी शाहू छत्रपतींचे राजकीय पाठबळ होते. विष्णुशास्त्री चिपळूणकर- टिळकांच्या पिढीने सुरू केलेल्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीला समांतर मराठा शिक्षण परिषदेची संस्थाबांधणी या काळात सुरू होती. कोल्हापूरला छत्रपती शाहू महाराजांनी बहुजनांच्या मुलांसाठी सुरू केलेल्या बोर्डिंगांची परंपरा हळू हळू संपूर्ण महाराष्ट्रात विस्तार पावत होती. संस्थानी राजवटीत बडोदे हे सामाजिक परिवर्तनाच्या पर्वात सर्वात पुढे होते; किंबहुना महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणांची प्रयोगशाळा म्हणूनच बडोदे संस्थानाचा नमुनादर्श ग्राह्य मानला जात होता. टिळकांना विदर्भात नागपूर-अमरावतीतून मोठा अनुयायी वर्ग लाभला होता. दादासाहेब खापर्डे, मुंजे, हेडगेवार यांनी हिंदुत्ववादी राष्ट्रवादाचे पुष्टीकरण करणारी संघटनात्मक बांधणी केली. त्याला समांतर सत्यशोधक चळवळीचे अनुयायी अमरावती, बुलढाण्यात अंधविश्वासाच्या विरोधात सामाजिक सुधारणेचे बीजारोपण करण्यात आघाडीवर होते. सामजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत लो. टिळक, वि. रा. शिंदे, सयाजीराव गायकवाड, राजर्षी शाहू छत्रपती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्री. म. माटे, स्वा. सावरकर, साने गुरुजी, महर्षी कर्वे, म. गांधी इत्यादी विभूतिमत्त्वांचा आणि त्यांनी स्थापन केलेल्या संस्था-संघटनांचा वाटा मोठा होता.

राजकीय संविधान निर्मात्यांनी सामाजिक शक्तींना विचारात घेतलेच पाहिजे अशी डॉ. आंबेडकरांची धारणा होती. या मुद्द्याच्या समर्थनार्थ त्यांनी कार्ल मार्क्सचा सहकारी फर्निनंड लासेलच्या भाषणातील एक अवतरण उद्धृत करून 'संविधानिक प्रश्न हे हक्काचे प्रश्न नसून बळाचे प्रश्न असतात' हेही स्पष्ट केले होते. 'राजकीय संविधाने समाजांतर्गत व्यवहारात अस्तित्वात असलेल्या ह्या शक्तींच्या स्थितींना जेव्हा अचूकपणे व्यक्त करतात तेव्हाच त्या राजकीय संविधानांना महत्त्व व स्थिरता प्राप्त होते. म्हणून राजकीय संविधानाने सामाजिक संघटनांची दखल घेतलीच पाहिजे' या लासेलच्या विचारांशी आपण सहमत असल्याचे डॉ. आंबेडकरांनी नमूद केले होते. (आंबेडकर, २०१४, पृ. २४-२८) भारतीय संविधानाच्या रचनेत सामाजिक समतेला केंद्रस्थानी ठेवण्यात आले होते; ही सामाजिक परिवर्तनासाठी विविध संस्था-संघटनांनी केलेल्या संघर्षाची महत्त्वाची

फलश्रुती होती. संविधानाच्या चौकटीत सामाजिक हक्कांना संरक्षण मिळाले असले तरी सामजिक समरसतेची जीवनधाटणी हा समाजाचा स्वभावधर्म बनण्याची लढाई अजुनही संपलेली नाही, हे वास्तव असल्याने दृष्टीने कोणते प्रयत्न झालेत, याचा मागोवा पुढच्या खंडातून घ्यावयाचा आहे.

## टिपा :

[१] सामाजिक चळवळींना राजकीय अधिष्ठान प्राप्त होऊ शकले नाही हा मुद्दा विशद करताना डॉ. आंबेडकर यांनी लिहिले होते की, "सामाजिक परिषदवाल्या सुधारकांना (कुलाचाराचे प्रश्न आणि देशाचाराचे प्रश्न) हा भेद कळला नाही; आणि म्हणून जातिभेद व स्पर्शास्पर्शभेद इत्यादी सर्वजनव्यापी प्रश्नांना विसरून जाऊन विधवांचे वपन, गतभर्तुकांचे पाट व पोरपणांतील लग्ने अशा कुलवाचक प्रश्नांवरच त्यांची रणे पडली.. स्वजातीच्या लोकांची शुद्धता करण्यात त्यांनी सारा वेळ घालविला आणि सामाजिक सुधारणेचा जप करूनही जातिभेद व स्पर्शास्पर्शभेद होता तसा ठेवून गेले." (बहिष्कृत भारत, ३ जून १९२७)

[२] जलशात सादर केल्या जाणाऱ्या लोकसांस्कृतिक पद्यबंधाचे नमुने :

(अ) छक्कड :

दोघी बायकांची हौस पुरली माझी / आता शिल्लक बाकी नाही उरली // धृ.//
होतो सुखात खाऊन दोन घास / चार लोकांत झोकात ठाम
घेतले बळे गळ्याला गळफास / आला चालून कसा वनवास //
एका जिवाला झाले दोन सूळ / शिरले घरात वादाचे मूळ
गेला संसार उडाली धूळ / काही सुचेना लागले खूळ //
खूळ लागले घमेंड जिराली / दोन बायकांची.. //

(जलसाकार दादा पाटील, गुंदेकर, २०१०, पृ. ३७४)

(आ) पाळणा :

मराठा शिक्षण परिषदे बाई / किती व्हावे तुझे उतराई // धृ.//
१९०७ डिसेंबर तीस तारखेला / धारवाडात जन्म तुझा झाला //

(भीमराव महामुनी, गुंदेकर, कित्ता, पृ. ४२०)

(इ) गवळण :

कर्माची कहाणी राया येऊ द्या तुम्हावरी माया /
नसताना जोडा पाया / वळितात बैल, म्हशी, गाया //
उघडी ती सारी काया / एक लंगोटी नेसाया //

(भीमराव महामुनी, कित्ता, पृ. ४२१)

(ई) मंत्र :

धेनुपालकाय नम: धान्य उत्पन्नकर्ताय नम:
कष्ट भोगणाराय नम: नीसत्व धान्य स्वाहाकर्त्याय नम:
वस्त्राविणा थंडी घालविणाराय नम: अनवाणी चालणाराय नम:
भटभिक्षुकाला भिणाराय नम: दानधर्म करणाराय नम:

(भीमराव महामुनी, कित्ता, पृ. ४२२)

(ए) गांधी-आंबेडकर यांच्यातील पुणे कराराकडे सनातनी वर्ग डॉ. आंबेडकरांची फजिती म्हणून पहात होता; मात्र त्याचवेळी भीमराव कर्डक सारखे डॉ. आंबेडकरांचे अनुयायी या घटनेकडे व्यापक राष्ट्रहिताच्या भूमिकेतून पहात होते हे कर्डकांच्या पुढील जलशावरून लक्षात येते :

या थोर कार्यासाठी / स्थापन केली कमिटी //
रुपये जमले पाव कोटी / अस्पृश्यतेच्या नाशासाठी //
शेठ बिर्ला आणि ठक्कर / सनातन्याशी देती टक्कर //
अस्पृश्यता करण्या हो ठार / चळवळ करिती राष्ट्रभर //
करडक म्हणे अहो भट / पुरे करा तुमचा हट्ट //
करुनि हिंदू धर्माची जूट / मिळवा स्वराज्याचे ताट //"

[३] विसाव्या शतकातील सत्यशोधकीय नियतकालिके :

| अ.क्र. | प्रकाशन वर्ष | नियतकालिकाचे नाव | संपादक | प्रकाशन स्थळ |
|---|---|---|---|---|
| १. | १९०२ | मराठा दीनबंधु | भास्करराव जाधव | कोल्हापूर |
| २. | १९०५ (मूळ १८७७) | दीनबंधू | वासुदेवराव बिर्जे | मुंबई |
| ३. | १९०७ | विजयी मराठा | भुजंगराव गायकवाड | कोल्हापूर |
| ४. | १९०९ | मराठा मित्र | गोपाळराव दाजीबा दळवी | नागपूर |
| ५. | १९१० | दीनमित्र | मुकुंदराव पाटील | पुणे |
| ६. | १९११ | विश्वबंधू | बळवंत कृष्णाजी पिसाळ | कोल्हापूर |
| ७. | १९१२ | सुमती | दत्तात्रय भिमाजी रणदिवे | वर्धा |
| ८. | १९१५ | सत्योदय | कृष्णाजी चौधरी | करजगाव, विदर्भ |
| ९. | १९१५ | क्षत्रिय माळी पुढारी | मोतीराम तुकाराम वानखडे | अमरावती |
| १०. | १९१७ | जागरूक | वालचंद कोठारी | पुणे |
| ११. | १९१७ | जागृती | भगवंतराव पाळेकर | बडोदे |
| १२. | १९१८ | डेक्कन रयत (इंग्रजी) | अण्णासाहेब लठ्ठे | कोल्हापूर |
| १३. | १९१९ | सत्यप्रकाश | नारायण रामचंद्र विभुते | तासगाव |

| अ.क्र. | प्रकाशन वर्ष | नियतकालिकाचे नाव | संपादक | प्रकाशन स्थळ |
|---|---|---|---|---|
| १४. | १९१९ | विजयी मराठा | श्रीपतराव शिंदे | पुणे |
| १५. | १९२० | गरिबांचा कैवारी | बाबूराव यादव | कोल्हापूर |
| १६. | १९२० | भगवा झेंडा | दत्ताजी यशवंत कुरणे | कोल्हापूर |
| १७. | १९२० | तरुण मराठा | सखाराम पांडुरंग सावंत | कोल्हापूर |
| १८. | १९२० | छत्रपति | सखाराम पांडुरंग सावंत | कोल्हापूर |
| १९. | १९२१ | शिवछत्रपति | कीर्ती वा. निंबाळकर<br>व केशवराव घोरपडे | कोल्हापूर |
| २०. | १९२१ | मुलुखमैदान | शंकरराव खाकुर्डीकर | पुणे |
| २१. | १९२१ | शेतकरी हिंदुस्थान | द. स. झोडगे | पुणे |
| २२. | १९२१ | राष्ट्रवीर | शामराव भोसले | बेळगाव |
| २३. | १९२१ | प्रबोधन | केशव सी. ठाकरे | मुंबई |
| २४. | १९२१ | संजीवन | दत्तात्रय भीमाजी रणदिवे | पुणे |
| २५. | १९२३ | आत्मोद्धार | सीताराम नाना चौधरी | जळगाव |
| २६. | १९२४ | कैवारी | भाऊसाहेब कळंबे | कराड |
| २७. | १९२४ | शाहूप्रभा | दाजीराव विचारे | मालवण |
| २८. | १९२४ | राजहंस | दामोदर देवमनसा गुलालकर | अकोला |
| २९. | १९२४ | सिंध मराठा | रामचंद्र सावंत | कराची |
| ३०. | १९२५ | सुबोधमाला | के. बी. देशमुख | अमरावती |
| ३१. | १९२५ | नवप्रभा | बाबासाहेब रामचंद्र घोरपडे | सावंतवाडी |
| ३२. | १९२५ | मजूर | रामचंद्र नारायण लाड | पुणे |
| ३३. | १९२५ | कर्मवीर | शि. आ. भोसले | कोल्हापूर |
| ३४. | १९२६ | धर्मवीर | ह. ल. चव्हाण | कोल्हापूर |
| ३५. | १९२६ | रयत | दिनकरराव जवळकर | पुणे |
| ३६. | १९२६ | सत्यवादी | बाळासाहेब पाटील | सातारा |
| ३७. | १९२६ | सत्यवादी | हरी पिराजी धायगुडे | विदर्भ |
| ३८. | १९२६ | प्रतिनिधी | सखाराम हरी गोलतकर | वसई |
| ३९. | १९२६ | मराठा समाचार | भालचंद्र पंढरीनाथ खेडकर | अकोला |
| ४०. | १९२७ | लोकहितवादी | केशव सीताराम ठाकरे | पुणे |
| ४१. | १९२६ | ब्राह्मणेतर | व्यंकटराव गोडे | वर्धा |
| ४२. | १९२८ | कैवारी | दिनकरराव जवळकर | पुणे |
| ४६. | --- | दीनबंधु | हरिश्चंद्र नारायण नवलकर | विदर्भ |

| अ.क्र. | प्रकाशन वर्ष | नियतकालिकाचे नाव | संपादक | प्रकाशन स्थळ |
|---|---|---|---|---|
| ४७. | ---- | समाजसेवक | ----- | बारामती |

*(ही यादी तयार करण्यासाठी अरुण शिंदे यांच्या 'सत्यशोधकीय नियतकालिके' या ग्रंथाचा आधार घेण्यात आला आहे)*

[४] राष्ट्रीय काँग्रेसचा अस्पृश्यतेविरुद्धचा ठराव: १९१७ साली ॲनी बेझंट आंच्या अध्यक्षतेखाली कलकत्ता येथे झालेल्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात मद्रासचे श्री. जी. ए. नटेशन यांनी अस्पृश्यतेसंबंधी मांडलेला ठराव :

"This congress urges upon the people of India the necessity, justice and righteousness of removing all disabilities imposed by custom upon the Depressed Classes the disabilities being of a most vexatious and oppressive character, subjecting those classes to considerable hardship and inconvenience." या ठरावाचे अनुमोदक : भुलाभाई देसाई, मुंबई; रामा अय्यर व असफ अली, दिल्ली.

[५] शिदनाक महार: शिदनाक महार हा पेशव्यांच्या सैन्यात शिलेदार होता. तो महार असला तरी सैन्य लढाईस निघाले की त्याचा तंबू महारवाड्याप्रमाणे लांब व वेगळा राहात नसे. कारण शत्रूशी झगडताना जेथे जगण्याचीच भ्रांत तेथे सोवळ्या ओवळ्याचा कोण विचार करीत बसतो? त्यामुळे लढवय्यांच्या पंक्तीत जातपात पुसायची नसते. ज्याची तलवार बळकट तोच खरा लढवय्या एवढेच तत्त्व तिथे पाळले जाई. हेच तत्त्व आपल्या रोजच्या व्यवहारात का असू नये, असा प्रश्न सयाजीराव गायकवाड यांनी मुंबईच्या २३ मार्च १९१८ च्या सभेतही उपस्थित केला होता. (वरखेडे, २०१७, पृ. १०१)

[६] काळाराम मंदिर सत्याग्रहातले जलसे: नाशिकचे कलेक्टर गार्डन हे बूट घालून थेट राम मंदिरात देवाजवळ गेले; पण पुजाऱ्याने कुठलीच हरकत घेतली नाही. ह्या प्रसंगाला धरून भीमराव कर्डक यांनी गायलेल्या जलशातील काही ओळी :

चला चला करू सत्याग्रह, माणुसकीचे मिळवू हक्क,
म्हणून करू चला सत्याग्रह
परधर्मीय लोक घालूनी बूट, जाती देवळाचे जवळ थेट,
त्याचा तुम्हाला नाही बाट, हिंदू धर्म असा हलकट
म्हणून करू चला सत्याग्रह /१/

कवी दामोदर जयराम अहिरे यांनी लिहिलेला जलसा :

"आंबेडकरांनी केली गर्जना, चला जाऊ सत्याग्रहाला
हजारो वर्षापासूनी, गाजविला स्वाभिमान

जाऊ नाशिकाला, रामकुंडाला, तेथे लढा देण्याला
चला जाऊ सत्याग्रहाला. /१/
जाऊ आपण शौर्यानं, काळ्या रामाचे कुलूप तोडून
आपले हक्क मिळविण्याला, चला जाऊ सत्याग्रहाला. /२/
आपण माणसे असताना, आला विटाळ हिंदू मानतात
ही गुलामगिरी तोडण्याला, चला जाऊ सत्याग्रहाला /३/
आपण होऊन रणशूर, पाठीशी आहे आंबेडकर
विषमता नष्ट करण्याला, चला जाऊ सत्याग्रहाला /४/"

सुदामा अहिरे यांनी रचलेल्या पोवाड्यातील काही अंश :

"चळवळीचे सूत्रधार, आंबेडकर भीमराव वीर, धरूनी अवतार
मृत्यू लोकांत घेतला जन्म सोमवंशात, किर्तीचा डंका गाजे गगनात / जी रे जी/
ऐकूनी भीमगर्जना, शेठ भटजींना, ऐकवेना वीर प्रतापाका, सुरुवात केली कुचेष्टेला
खेळ घुबडाचा सुरू झाला / जी रे जी /
चोराशी न आवडे चंद्रदर्शन, घुबडाशी आवडत नाही भानुकिरण
जारिणी न आवडे पतिव्रतेचे गुण, जी कागास वाटे मत्सर हंस पाहून
जी असे भीमरावाचे गुण, कानी ऐकून भट ब्राह्मण, करिती मत्सर अंतरी
परि भीमराव खरे शिलेदार, सर्वांचा घेतला त्यांनी समाचार,
कपटी करणी, जागचे जागी ठार, ज्ञान गदा घेऊनी सदा तैयार /जी रे जी /

बा. शि. मुंजे प्रभृतींनी अस्पृश्य पुढाऱ्यांत फाटाफूट घडविली, त्याविषयीचा राग औपरोधिक सुरात व्यक्त करताना हा शाहीर म्हणतो :

जसा सापास हो जादूगार, टाकितो भार, तसा प्रकार डॉ. मुंजांनी सुरू केला
एक महामंत्र त्यांनी जपला, मोहित एम. सी. राजा केला, गवई ज्ञानबद्ध झाला
देवरुखकराला महामंत्र त्यांच्यावरही गेला, मुंजे साहेबाचा खेळ झाला
आंबेडकर पुढारी कोठला आला, त्यात तुमचा मान कमी झाला
म्हणून एक युक्ती सांगतो तुम्हाला, मते द्यावी तुमची आज मला
संयुक्त मतदान पद्धतीला, तुम्हा पाठवितो कौन्सिलला
असे मोहिले की पुढाऱ्याला, मारुनी आपल्या बगलेला
अस्पृश्यांत माजविले दुहीला, पुढे प्रकार कसा झाला सांगतो पुढच्या चौकात"

❑❑❑

## ७

# साहित्य आणि समाज

### ७.१. पूर्वकथन :

साहित्याचे स्वरूप हे इतिहासलेखन किंवा वृत्तांतकथनापेक्षा वेगळे असते. ते कालसंबद्ध असण्यापेक्षा अधिक शाश्वत, चिरंतन व नित्यनूतन असते. अनेकार्थकता, सूचकता, ध्वन्यर्थ ही साहित्याची गुणवैशिष्ट्ये असतात. वक्रोक्ती, रूपके-दृष्टांतांच्या माध्यमांतून एक अलौकिक अनुभवविश्व साहित्यातून प्रकट होत असते; त्यामुळे साहित्यातून इतिहासाचे वाचन करण्याला काही मर्यादा पडतात, हे प्रारंभीच लक्षात घ्यायला हवे. वरकरणी ललित साहित्याचा घाट हा अद्भुतरम्य,मनोरंजक असला तरी या अलौकिकसृष्टीची मुळे लौकिक जीवनातच रूतलेली असतात. समाजजीवनाच्या सांस्कृतिक कोशातच साहित्याचा व्यवहार घडत असतो. त्या त्या काळातील युगप्रवृत्तीचा आविष्कार वाङ्मयातून होत असतो. किंबहुना समकालीन समाजजीवनाचे वास्तव हेच ललित लेखनाचे आशयद्रव्य असते. त्यामुळे साहित्याचा असा वेगळा इतिहास असत नाही. मानवाचा इतिहास हाच साहित्याचा इतिहास असतो. कादंबरीकार डॉ. श्री. व्यं. केतकर यांनी म्हटल्याप्रमाणे "कथेचा कथापणा कारस्थानामुळे निर्माण होत नसून अनेक माणसे एकत्र मिळून जो व्यवहार होतो, त्यामुळे उत्पन्न होतो. त्यामुळे साहित्य हे राजकीय-सामाजिक बखरीसारखे असते." लिहिणारी मंडळी सामान्यत: सुशिक्षित मध्यमवर्गातून आलेली असतात. आपल्या काळातल्या साक्षर संस्कृतीचे ते प्रतिनिधित्व करीत असतात. स्वाभाविकच समकालीन सामाजिक घडामोडींचे व समाजाच्या सामूहिक जाणीव-नेणिवेतील स्पंदनांचे, श्रेयस-प्रेयसाचे समकालीन बुद्धिवादी वर्गाकडून झालेले वाचन त्यांच्या वाङ्मयीन आविष्कारांतून परिवर्तीत झालेले असते. त्यामुळेच अशा वाङ्मयीन दस्तांतून सामाजिक जीवनातील भौतिक व मानसिक स्थित्यंतरांच्या उत्क्रांतीचा मागोवा घेता येतो; काळाच्या प्रवाहात उत्क्रांत होत जाणाऱ्या सामाजिक

अनुभवांचे तर्कशास्त्र तपासता येते; वाङ्मयातून व्यक्त होणारे समाजमन वाचण्याचा प्रयत्न या माध्यमातून करता येतो. विसाव्या शतकातल्या पहिल्या पन्नास वर्षांत महाराष्ट्रातल्या मध्यमवर्गीयांच्या जीवनधारणांत आमुलाग्र बदल होताना दिसतात. इंग्रजी शिक्षणातून, पाश्चिमात्य साहित्याच्या व इतिहासाच्या वाचनातून नव सुशिक्षित पिढीत व्यक्तिवाद, स्वातंत्र्य, समता इत्यादी मूल्यांचे; मार्क्सवादी, गांधीवादी, नवमानवतावादी तत्वज्ञानाचे संस्कार झाले होते. राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्याच्या राष्ट्रवादी प्रेरणांनी भारलेला हा कालखंड होता. राष्ट्रीय अस्मिता-जागरणाबरोबरच विदेशी राजवटीबरोबर पाश्चिमात्य संस्कृतीतील जीवनमूल्यांमुळे बदललेल्या सांस्कृतिक धारणांचा व वातावरणाचा प्रभाव ललित लेखकांवर पडणे स्वाभाविक होते. या पन्नास वर्षांच्या काळात महाराष्ट्राच्या सामाजिक धारणांत झालेल्या बदलांचा आणि वाङ्मयीन आविष्कारशैलींचा मोजक्या निवडक साहित्यकृतींच्या आधारे येथे तपास करावयाचा आहे.

## ७.२. टिळकयुगाचा प्रभाव :

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात मराठी लेखकांमध्ये राजकीय जाणिवांतून इतिहासाचे पुनर्वाचन करण्याची प्रेरणा जागृत झाली होती. साहित्याच्या माध्यमातून बलोपासनेला आणि वीरवृत्तीला चालना देणारे इतिहासाचे पुनर्वाचन व पुन:कथन करण्यात येत होते. विशेषत: १८५७ च्या बंडानंतर मराठी माणसाच्या स्वदेशाभिमानाच्या प्रेरणा अधिकाधिक जाज्ज्वल्य होऊ लागल्या होत्या. विसाव्या शतकात भारतीय स्वातंत्र्यलढ्याची व्याप्ती जसजशी विस्तारत गेली तसतशी साहित्यातून राष्ट्रीय अस्मितेचे स्फुल्लिंग चेतवणारी अभिव्यक्ती होऊ लागली. १९०८ साली ग्रंथकार संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात चिं. वि. वैद्य म्हणाले होते की, "जुन्या महाराष्ट्र वाङ्मयरूपी मंदिराची अधिष्ठात्री देवता जर भगवद्भक्ती होती, तर महाराष्ट्रातील नवीन वाङ्मयाची अधिष्ठात्री देवता स्वदेशप्रीती ही आहे." कवित्वस्फूर्तीस आणि साहित्यनिर्मितीस कोणत्या तरी अत्यंत श्रेष्ठ व पवित्र अशा मनोविकाराचा पाठिंबा लागतो, तो या कालखंडात स्वदेशभक्तीतून मिळत आहे, असे चिं. वि. वैद्य यांनी या वाङ्मयीन स्थित्यंतराचे वर्णन केले होते.

ब्रिटिश राजसत्तेने क्रांतिकारी भावनांना दाबून टाकण्यासाठी लेखन व मुद्रणस्वातंत्र्यावर बंधने घालण्याचे धोरण राबविले होते. त्याचा परिणाम मराठी साहित्यनिर्मितीवर होणे स्वाभाविक होते. राजकीय असंतोषाच्या कारणाने अनेक ऐतिहासिक विषयांवर इंग्रज सरकारने बंदी आणली होती. सरकारी वक्र दृष्टीमुळे शिवाजी-संभाजीच्या जीवनावरील अनेक कृती बंदीत होत्या. अशा दडपशाहीच्या काळात राजद्रोहाचे संकट येऊ नये म्हणून १८९७ ते १९१८ या काळात मराठी साहित्यात शिवकालावर फारच थोडी नाटके लिहिली गेली. जाधव, नातू या आडनावाच्या मंडळींनी ऐतिहासिक नाटकांतून आपल्या वंशाची बदनामी होते, म्हणून सरकार दरबारी तक्रारी

केल्या होत्या; त्यामुळे १९१२ साली सरकारने ऐतिहासिक साहित्यकृतींवर बंदीहुकूम जारी केला. या पार्श्वभूमीवर मुसलमानांच्या भावना दुखावू नयेत याची काळजी घेणे मराठी नाटककारांना भाग पडू लागले. परिस्थितिशरण होऊन हे नाटककार ऐतिहासिकतेकडून रंजक पलायनवादाकडे वळले. तरीही या काळात न. चिं. केळकर यांनी पेशवाईवर कोसळणाऱ्या घोर अनर्थाचे ओझे आणि नानांची मुत्सद्देगिरी यावर प्रकाश टाकणारे तोतयाचे बंड (१९१२) हे नाटक लिहिले. वासुदेवशास्त्री खरे यांनी 'शिवसंभव' (१९१९) नाटकातून शिवजन्माची कथा सांगितली आणि त्यातून जिजाबाईच्या धिरोदात्त व तेजस्वी स्त्रीमनाचे प्रत्यकारी चित्रण करून स्वातंत्र्यभावनेचा रंग भरला. राम गणेश गडकरी यांनी 'राजसंन्यास' (१९२२) ह्या अपूर्ण राहिलेल्या नाटकातून संभाजी राजांनी प्राणांतीही स्वधर्म व स्वाभिमान यांचा त्याग न करता स्वीकारलेले हौतात्म्य ह्या विषयाचे भावपूर्ण चित्रण केले. राष्ट्रीय बाण्यातून वीरवृत्ती जागविणाऱ्या वि. वा. हडप, नाथ माधव यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या, 'माझी जन्मठेप'सारखे सावरकरांचे आत्मचरित्र, बलोपासनेच्या स्पर्धांच्या पार्श्वभूमीवर लिहिलेले अत्र्यांचे 'साष्टांग नमस्कार' नाटक, 'रामदास आणि रामदासी' सारखे नियतकालिक, ह्या सर्व वाङ्मयीन घटनांमागे राष्ट्रीय स्वातंत्र्याकांक्षेच्या प्रेरणा होत्या. ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या विरोधात लोकक्षोभ जागवला जाईल अशा औपरोधिक शैलीतल्या कथा 'काळ'कर्ते शि. म. परांजपे यांनी लिहिल्या; तर 'केसरी'चे संपादक न. चिं. केळकर यांनी 'म्हणा स्वराज्य मतदार की जय' सारख्या राजकीय कथा लिहिल्या. 'काळ' पत्रातील राजकीय लेखांसाठी शि. म. परांजपे यांना १९ महिन्याची राजद्रोहाच्या आरोपाखाली शिक्षाही झाली होती.

विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकात टिळक-गोखले यांच्या राजकारणाचा मराठी साहित्यावर गडद प्रभाव होता. या काळात रंगभूमी हे राजकारणाचे हत्यार समजले जात होते. नाट्यपरिषदेचे व पहिल्या कीर्तन संमेलनाचे अध्यक्षस्थानही टिळकांनी भूषविले होते. 'बळवंत संगीत मंडळी', 'लोकमान्य नाटक मंडळी', 'बालमोहन' या नाटकमंडळ्यांच्या नावातही टिळकांचे नाव गुंफलेले असे. टिळकचरित्र हे मराठी नाटककारांना विषय पुरवित होते. टिळकचरित्रातील पंचहौद चहाग्रामण्याच्या प्रकरणावर धुंडिराज जोशी यांनी 'खरोखर स्वप्नदर्शन' हे नाटक लिहिले. टिळकांच्या संमतिवयाच्या कायद्याविषयीच्या भूमिकेवर नारायण बापूजी कानिटकर यांनी 'तरुणी शिक्षण नाटिका' हे नाटक लिहिले. बडोद्याच्या क्रॉफर्ड प्रकरणात टिळकांनी लढा देऊन न्याय मिळवला या घटनेवरही ना. बा. कानिटकर यांनी 'न्यायविजय' हे नाटक लिहिले. दुष्काळात टिळकांनी 'केसरी'मधून प्रजेच्या हक्कांचे समर्थन करणारे व सरकारवर टीका करणारे अग्रलेख लिहिले होते, त्यावरून त्यांच्यावर झालेला राजद्रोहाचा खटला व सक्तमजुरीची शिक्षा या घटनेवर आधारित 'संगीत बंधविमोचन' (१९०७) हे नाटक गोपाळ गोविंद सोमण यांनी

लिहिले. या नाटकात सत्यव्रत आणि अनुत्कर्ष या व्यक्तिरेखा अनुक्रमे लो. टिळक आणि गोपाळकृष्ण गोखले यांच्या राजकीय व्यक्तिमत्वावर आधारलेल्या होत्या. लो. टिळक हे लोकोपकारी, प्रजेची दु:खे राजाच्या कानी घालणारे लोकसेवक आणि आपण जे करतो ते सनदशीरच आहे व ते सारे काही सरकारच्या हितासाठीच आहे, असा पवित्रा घेण्याची त्यांची शैली 'सत्यव्रत'च्या माध्यमातून नाटकातून साकार झाली आहे. तसेच टिळकांचा दुस्वास करणारे, स्वत:ला राजनिष्ठ म्हणविणारे, ब्रिटिशांच्या मर्जीने चालणारे, खटल्याचा प्रसंग आला तर माफी मागणारे, आणि इतके असूनही स्वभावत: सरकारचे शत्रूच असलेले गोपाळकृष्ण गोखले हे 'अनुत्कर्ष' च्या व्यक्तिरेखेतून नाटककाराने उभे केले होते. तत्कालीन राजकारणातील जहाल व मवाळ या दोन प्रवृत्ती-प्रवाहांचे द्वंद्वात्मक दर्शन या नाटकातून सोमण यांनी घडविले होते. राजकीय नेतृत्वातली ही भाऊबंदकी मिटली असती तर महाराष्ट्राच्या राजकारणाची दिशा बदलली असती. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी 'भाऊबंदकी' (१९०९) नाटकातून हाच विषय हाताळला आहे. १९०८ च्या सुरत काँग्रेसमधील जहाल-मवाळ तंट्याच्या पार्श्वभूमीवर हे नाटक रंगभूमीवर आले. या नाटकातील रामशास्त्री म्हणजे टिळक, आनंदीबाई म्हणजे ब्रिटिश सरकार, राघोबादादा मवाळपंथीयांचा प्रतिनिधी, अशी रूपकात्मक मांडणी होती. डोक्यावर पगडी घालणाऱ्या टिळकांचे बाह्यरूप आणि स्वभावातला करारीपणाचा यांचा प्रत्यय देणारी व्यक्तिरेखा 'रामशास्त्री'च्या माध्यमातून त्यांनी साकार केली होती. पत्नीने पतीला राजसत्तेसाठी खून करण्यासाठी प्रवृत्त करणे हे सूत्र खाडिलकरांना शेक्सपीयरच्या 'मॅकबेथ' नाटकातून मिळाले होते; परंतु पेशवाईत नारायणराव पेशव्यांच्या खूनामागील कटकारस्थानाशी ते सूत्र मिळतेजुळते होते. रामशास्त्र्यांच्या व्यक्तिरेखेतून जनतेत जाणीव जागृती करणे आणि राजसत्तेला इशारा देणे ही दोन्ही कार्ये खाडिलकरांनी साध्य केली होती. राज्यकर्ते करतात ते योग्य की अयोग्य हा विचार प्रजा करते, हा विचार पुढे आणण्याचे काम 'भाऊबंदकी' नाटकाने केले. १९१७ च्या नाट्यसंमेलनातील भाषणात खाडिलकरांनी टिळक हे रामशास्त्र्यांचेच उत्तरावतार कसे आहेत याविषयी भाष्य करताना म्हटले होते की, "हरिकिर्तन संस्थेपासूनच नाट्यकलेचा महाराष्ट्रात अभ्युदय झाला. पूर्वी जे पंडित, शास्त्री, कथेकरी होते तेच स्वराज्यकाळी राजकारणात पडले. त्यावेळी शास्त्रीलोक महाभारताचेच शिक्षण घेत. पुढे स्वराज्य गेले. पूर्वीचीच संस्था, तेच शास्त्री, पुन्हा इंग्रजीत निराळ्या रूपाने पुढे आले. रामशास्त्री इतके नि:स्पृह व विरक्त की घरामध्ये फक्त एक दिवसाची सामग्री ठेवावयाचे; त्यांचा नि:स्पृहपणा एवढा की त्यांनी स्वत:च्या संसारावर पाणी सोडले, पण राघोबाला देहांत शिक्षा फर्मावली! त्या रामशास्त्र्यांच्याच स्वार्थत्यागाने व नि:स्पृहपणाने 'केसरी' काढला व चालवला गेला. त्यांनी सरकारवर स्पष्ट व निर्भीड टीका करून आपला नि:स्पृहपणा सिद्ध केला. तेच हे

शास्त्री पुढे नाटककार बनले". (कुळकर्णी, १९७८, पृ. १८४)

लोकांमध्ये मिसळून लोकजागृती करण्याची गंधर्व मंडळीची महाराष्ट्राची पुरातन परंपरा खाडिलकरांनी नाट्यलेखनातून पुढे चालवली. 'कीचकवध' (१९०७) या नाटकांतून त्यांनी बंगालच्या फाळणीच्या पार्श्वभूमीवर व्हाइसरॉय कर्झनवायलीच्या विरोधात महाराष्ट्राच्या लोकमानसात जे तापलेले वातावरण होते, त्या लोकक्षोभाला रूपकात्मक स्वरूपात नाट्यरूप दिले. टिळकांनी 'केसरी'तून 'आमचे बोलघेवडे व्हाइसरॉय', 'लॉर्ड कर्झन यांची बारा महाकृत्ये' यासारख्या अग्रलेखातून लॉर्ड कर्झनची औरंगजेबाशी तुलना केली होती. या पार्श्वभूमीवर महाभारतातील कथानकावर आधारलेले खाडिलकरांचे 'कीचकवध' रंगभूमीवर आले. त्यात द्रौपदी म्हणजे असहाय भारतीय जनता आणि "राज्यकर्ते ते राज्यकर्ते आणि दास ते दास' असे म्हणणारा कीचक म्हणजे लॉर्ड कर्झन आणि कीचकाला यमसदनास पाठविणारा, जहाल प्रवृत्तीचा भीम म्हणजे लो. टिळक असे थेट रूपक असल्याचा प्रत्यय तत्कालीन प्रेक्षकांना येत असे. मवाळ, संयमी, सर्व काही सबुरीने घेणारा, भीमाला सनदशीरपणाचा सल्ला देणारा युधिष्ठिर हा थेट गोखल्यांच्या व्यक्तिरेखेवर बेतलेला असल्याचे प्रतीत होई. 'नवीन राज्ये भरभराटीस आणणे आणि जुनी नावाजलेली लयास नेणे, ही ज्यांची रोजची सहज लीला, असल्या मजसारख्या वीर पुरुषांच्यापुढे विश्वांतील सर्व सुखोपभोगाचे पदार्थ हात जोडून सेवेला तत्पर उभे राहिले पाहिजेत." हे साम्राज्यशाही राजकारणाचे सूत्र कीचकाच्या तोंडातून सांगितले गेले; तर प्रजेला छळणाऱ्या राज्यकर्त्यांचे भविष्य काय असू शकते याचा इशारा कंकभटाच्या तोंडून दिला गेला आहे : "अनाथांकडून बलात्कार मुकाट्याने सोसला जातो किंवा हताश होऊन दुबळी प्रजा दु:खातच दिवस काढीत गप्प बसते, असे पाहून जर राजे लोक आपल्या कर्तव्यास जागेनासे झाले तर त्यांच्या सिंहासनाच्या खालचा धर्माचा पाया त्यांना न कळत खचत जाऊन बोलता बोलता सिंहासन तिरपागडे झाल्यावाचून राहात नाही." असा गर्भित इशारा या नाटकातून दिला आहे. देशस्थ, कोकणस्थ, जहाल-मवाळ असली भांडणे करण्यापेक्षा आपल्या अभ्युदयाकरिता भांडले पाहिजे, असा संदेशही 'कीचकवध' नाटकातून संज्ञापित केला गेला. नाटकाच्या या रूपकात्मक मांडणीतून ब्रिटिश सत्तेविरुद्ध लोकक्षोभाची भावना चेतवली जाते असा गोपनीय अहवाल सरकारला सादर करण्यात आला. त्यानंतर २७ जानेवारी १९१० रोजी या नाट्काच्या प्रयोगांवर बंदी घालण्याचा आदेश काढण्यात आला. (यासंबंधीचा पूरक तपशीलासाठी पहा टिप [१]) कृ. प्र. खाडिलकर यांनी १९१७ सालच्या पुण्याच्या नाट्यसंमलेनात अध्यक्षीय भाषणातून केलेला एक उल्लेख यासंदर्भात लक्षात घेण्याजोगा आहे. त्यात त्यांनी म्हटले होते की, "कवी हे मुख्यत: संसाराभोवतीच गुरफटलेले असतात. संसाराचे केंद्र म्हणजे राज्यव्यवस्था होय. राजाला कवी प्रिय असेल तर तो कवीला आश्रय देतो; पण तोच

अप्रिय असेल तर तो कवीला घालवून देतो, त्याची पुस्तके जप्त करतो." (कुळकर्णी, १९७८, पृ. १८१) लॉर्ड कर्झनच्या जुलमी राजवटीवर माधवराव पाटणकर यांनीही 'सं. भस्मासूर' (१९०७) हे नाटक लिहून तत्कालीन लोकमानसातील असंतोषाला वाट करून दिली होती. पारंपरिक 'शिवलीलामृत' आख्यानातील कथानकाच्या आडून पाटणकरांनी कर्झनशाहीच्या जुलमी व हुकूमशाही प्रवृत्तीचे दर्शन घडविले आहे.

दामोदर विश्वनाथ नेवाळकर यांच्या 'धर्मरहस्य', दंडधारी', 'तारकमारक', 'कट्टा कर्मयोगी' या नाटकांनाही टिळक-गोखले यांच्या जहाल-मवाळ नाटकांची पार्श्वभूमी आहे. आधी सामाजिक सुधारणा झाल्या पाहिजेत या विचारांचा पुरस्कार करणारे गोपाळ कृष्ण गोखले हे 'काकशीर्ष' या व्यक्तिरेखेच्या रूपात साकार होतात; तर राजकीय सुधारणा आधी झाल्या पाहिजेत याचा आग्रह धरणारे लो. टिळक 'दंडधारी' या व्यक्तिरेखेतून साकार होतात. 'दंडधारी' नाटकातली अडकित्त्याने सुपारी फोडण्याची शैली प्रेक्षकांना टिळकांची आठवण करून देत असे. तसेच 'काकशीर्ष' ह्या पात्राचा पोशाख थेट गोखल्यांप्रमाणेच असायचा. विधवा पुनर्विवाहासारख्या सामाजिक सुधारणांत इंग्रजांना हस्तक्षेप करू न देता आपण देशवासीयांनीच परस्पर सामंजस्याने सुधारणांचा मार्ग अनुसरावा हे टिळकांचे मत 'दंडधारी' पात्राकरवी या नाटकातून कथन केले जात असे. शास्त्रसंमत मार्गाने अस्पृश्योद्धार करावा या टिळकमताचा पुरस्कार नेवाळकरांच्या 'धर्मरहस्य' (१९०९) नाटकातून करण्यात आला होता. या नाटकात शाहू छत्रपती महाराज, राजारामशास्त्री भागवत यांच्यावर बेतलेली पात्रे एकमेकांच्या साहाय्याने अस्पृश्यतेचा प्रश्न सोडवतात, असे दाखविले आहे. 'कट्टा कर्मयोगी' (१९१३) या नाटकातून गीतारहस्याचे तत्त्वज्ञान मांडणारे टिळक प्रेक्षकांना दिसायचे. 'धर्मरहस्य' नाटकातून सनातन्यांचा बुरखा फाडणारे जहाल पण त्याचवेळी अस्पृश्यतेचा प्रश्न सोडविणारे, वंचितांची कणव असलेले टिळक प्रेक्षकांना भावायचे. पौराणिक कथानक आणि राजकीय आशयद्रव्य असलेले 'विद्याहरण' (१९१३) हे खाडिलकरांचे नाटक इंग्रजी विद्येकडे पहाण्याचा एक नवा दृष्टिकोन देई. नाटकातील शुक्राचार्य हा संजीवनी विद्येचा भांडवलदार असला तरी वृत्तीने अहंकारी आणि दारुड्या राक्षस होता. असे असले तरी कचाने जशी शुक्राचार्यांच्या पोटात शिरून संजीवनी विद्या मिळवली; तशी राष्ट्राच्या भल्यासाठी आपण इंग्रजांकडून आधुनिक विद्या ग्रहण करायला हवी असे या नाटकातून अप्रत्यक्षपणे सुचविण्यात आले होते. ब्रिटिश जरी आपल्या लेखी शत्रूस्थानी असणाऱ्या राक्षसगणातले असले तरी विद्येचे अधिकारी होते; ब्रिटिशांपासून आधुनिक विद्येचा स्त्रोत आपण मिळवला हे वास्तव स्वीकारण्याचा कल या नाटकातून सूचित होत असे.

प्रजेच्या इच्छाशक्तीच्या जोरावर राष्ट्र स्वतंत्र होऊ शकते हे आशयसूत्र घेऊन 'अरुणोदय' (१९२३) हे काल्पनिक कथानकाचे नाटक वा. वा. भोळे यांनी रंगभूमीवर

आणले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी जपानच्या मदतीने हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी हिंद सेना उभी करून जी सशस्त्र लढ्याची व्यूहरचना आखली, त्यावर मामा वरेरकर यांनी 'सिंगापुरातून' (१९४४) हे राजकीय नाटक लिहिले. या नाटकाचे स्वरूप प्रचारकी थाटाचे असले तरी समकालीन राजकीय विषय थेट रंगभूमीवर आणण्याचे धाडस या नाट्यलेखनातून वरेरकरांनी दाखविले होते. कवी मनमोहन यांनी 'बावटा अर्धा अधिक खाली' आणि 'फील्ड मार्शलची सलामी' ह्या दीर्घ काव्यांतून नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेच्या लढ्याचे चित्र रेखाटले होते. या समकालीन राजकीय घटनांखेरीज मा. ना. जोशी यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कारभारातला गोंधळ 'स्थानिक स्वराज्य अथवा सचित्र म्युनिसिपालिटी' (१९२५) या विनोदी नाटकातून रंगभूमीवर आणला. वि. दा. सावरकर यांनी आपल्या राजकीय विचारांना अनुसरून 'उःशाप' (१९२७), संन्यस्त खड्ग' (१९३१) व 'उत्तरक्रिया' (१९३३) ही नाटके लिहिली. 'उःशाप' नाटकाचे धर्मांतराचा प्रश्न हे आशयसूत्र असून पश्चातापानंतर पुन्हा मूळ धर्मात परत येण्याचे समर्थन करण्यात आले आहे. 'सन्यस्त खड्ग' (१९३१) मध्ये खरी अहिंसा कोणती हा विषय हाताळला आहे. अहिंसा आणि रक्तरंजित क्रांती यातील संघर्षाचे विविध पैलू या नाटकातून मांडण्यात आले आहेत. तसेच पानपतावरच्या लढाईत मराठ्यांचे अपूर्ण राहिलेले काम पूर्ण करणे आणि हिंदुस्थानात हिंदूंच्या सत्तेची पुनःस्थापना करणे हा विषय आलेला आहे. थोडक्यात या कालखंडातील नाट्यवाङ्मयाने राजकारण आणि मराठी रंगभूमी यांचे घट्ट नाते जोपासले होते.

या काळात रंगभूमीवर आलेल्या नाटकांतून विषयानुसार समकालीन राजकारणातील प्रतीके नेपथ्यातून मंचावर सादर केली जात असत. गांधीवादी नाटकांतून चरख्यावर सूत कातणारी पात्रे (गांधी टोपी : श्री. ना. ताडपत्रीकर, १९२२; सत्तेचे गुलाम : भा. वि. वरेरकर); साम्यवादी विचारांच्या नाटकांत गिरण्यांची धुराडी (सं. गिरणीवाला अथवा मालक - मजूर : मा. ना. जोशी, १९१९); कामगारांच्या जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या नाटकांत मुंबईच्या बहुमजली इमारती, आगगाडीच्या सडका (सुविचार विजय नाटक : सीताराम देवधर, १९०५; संन्याशाचा संसार : भा. वि.. वरेरकर, १९२०; आंदोलन : मा. कृ. शिंदे, १९४३) अशा प्रकारचे नेपथ्य योजून राजकीय वातावरणाची निर्मिती केली जात असे. आशय, भाषा आणि मंचीय सादरीकरण या सर्व अंगांनी समकालीन राजकीय प्रवाहांचे दर्शन घडविण्यात येत होते.

## ७.३. साम्यवादाचा प्रभाव :

१९२० ते १९४७ या काळातील राष्ट्रीय स्वातंत्र्यलढा, अस्पृश्यतानिवारण, हिंदू-मुस्लीम ऐक्य, भांडवलदार / जमीनदार यांच्या विरोधात उभ्या राहाणाऱ्या श्रमिकांच्या कामगारसंघटना , स्त्री-पुरुष समता, वर्गीय विषमतानिर्मूलनाचे समाजवादी राजकारण या

सर्वांशी महाराष्ट्रातल्या सुशिक्षितांच्या आस्था जडल्या होत्या. स्वातंत्र्यलढ्यात भाग घ्यावा, भूमिगत चळवळीत पडावे, तुरुंगवास भोगावा अशा ईर्षेने तरुण राजकारणात स्वत:ला झोकून देत होते. इतकेच नाही तर शिकलेल्या मध्यमवर्गीय तरुणींना देशभक्तीने भारावलेल्या तरुणाबरोबर विवाहबंधनात पडायला आवडत होते. या सर्व घडामोडींपासून मराठी साहित्यिकही अलिप्त राहू शकत नव्हते. १९२० नंतरच्या काळात साम्यवादी राजकीय तत्त्वज्ञानाचा आणि राजकीय चळवळीचा प्रभाव मराठी साहित्यावर पडू लागला होता. रशियात जुलमी राजेशाहीच्या विरोधात झालेल्या ऑक्टोबर क्रांतीचे लो. टिळकांनी स्वागत केले होते. १९१९ साली मुंबईत मजुरांचा हरताळ झाला. १९२० साली मुंबईत अखिल भारतीय ट्रेड युनियन काँग्रेस स्थापन झाली.१९२२ साली श्री. भिडे यांचे 'लेनिन चरित्र' मराठीत प्रसिद्ध झाले. १९२९ साली भाई डांगे यांच्यावर सरकार उलथून पाडण्याचा कट केल्याचा आरोप ठेवून मीरत खटला चालविण्यात आला. . १९३४ साली सरकारने कम्युनिस्ट पक्ष बेकायदा ठरवून त्यावर बंदी आणली . १९३६ साली प्रेमचंद यांच्या अध्यक्षतेखाली लखनौला भारतीय पुरोगामी लेखकसंघटनेचे अधिवेशन झाले. १९४३ साली मुंबईतही पुरोगामी लेखक संघाची स्थापना झाली. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर मराठी साहित्यात साम्यवादी विचारांचे पडसाद उमटू लागले होते. लालजी पेंडसे यांनी 'साहित्य आणि समाजजीवन' (१९३५) या ग्रंथातून मार्क्सवादी दृष्टिकोनातून साहित्य आणि समाज यांच्यातील अनुबंध उलगडण्यावर भर दिला. याच काळात पां. वा. गाडगीळ रशियातील क्रांती, समाजवाद याविषयीचे वैचारिक लेखन प्रसिद्ध करीत होते. वि. वा. हडप यांनी गॉर्कीच्या 'मदर'चे 'माझे बालपण' हे भाषांतर प्रसिद्ध केले. मराठी ललित साहित्यातही साम्यवादी जाणिवांचा आशय असलेली कथानके व पात्रसृष्टी अवतरू लागली. गिरणी मालक आणि कामगार यांच्या लढ्याला केंद्रस्थानी ठेवून या साहित्यकृतींची कथानके रचली गेली होती. मामा वरेरकर यांच्या 'धावता धोटा', सोन्याचा कळस' (१९३१) या कलाकृतींना मुंबईच्या १९१९ च्या मजुरांच्या हरताळाची पार्श्वभूमी होती. मा. ना. जोशी यांच्या 'गिरणीवाला' (१९२९) मध्ये गिरणी मालकांची स्वार्थपरायणता आणि मजुरांचा हटवादीपणा यातून उद्भवणारा संघर्ष हाच विषय असून मालक-मजूर लढ्यात समन्वय साधण्याची भूमिका घेतलेली आहे. गणेशशास्त्री फाटक यांच्या 'माझी जमीन' (१९३०) या नाटकावर साम्यवादी समाजवाद आणि म. गांधींच्या ग्रामवादाचा एकत्रित प्रभाव आढळतो. त्यांचे 'डेक्कन क्वीन' (१९३२) नाटकही मजुरांच्या प्रश्नांवर आधारलेले आहे. नाना जोग यांच्या 'चित्रशाळा' (१९४०), 'सोन्याचा देव' (१९४९) या नाटकांतूनही साम्यवादी तत्त्वज्ञानाची चर्चा करण्यात आली आहे. भा. वि. वरेरकर यांच्या 'धावता धोटा' कादंबरीत भांडवलशाही व्यवस्थेतले मालकवर्गाचे विलासी जीवन आणि कामगारांचे चाळीतले भकास दरिद्री जीवन यांच्यातला अंतर्विरोध

चित्रित करण्यात आला आहे. या कादंबरीतली बिजली ही कामगारांची तळपती तलवार म्हणून साकार करण्यात आली. केतकरांच्या 'ब्राह्मणकन्या' कादंबरीतही समाजवादी तत्त्वज्ञानाचा संदर्भ येतो. या कादंबरीतील रामराव भांडवलशाहीतील विषमतेचा टीकाकार आहे. त्याच्या मते गिरणी कामगारांची संघटना स्थापन करून भांडवलदारांविरूद्ध संघटितपणे उभे राहिले पाहिजे; मजुरांनी सहकारी तत्त्वावर कारखाने उभारून भांडवलदारांच्या मक्तेदारीला शह दिला पाहिजे. घटनात्मक मार्गांनी समाजवादाचा मार्ग प्रशस्त करावा या उद्देशाने कामगारांचे प्रबोधन करण्याकरिता रामराव 'खरी क्रांती' या नावाचे वृत्तपत्रही चालवतो. मराठी कादंबरीकार साम्यवादी चळवळीच्या प्रभावापासून अलिप्त राहू शकत नव्हते, ह्याचे हे उदाहरण आहे. ना. सी. फडके यांच्या 'उन्माद' (१९३२) कादंबरीचा नायक निरंजन हा डाव्या विचारसरणीने भारावलेला आहे. पु. य. देशपांडे यांच्या 'विशाल जीवन' (१९३९) कादंबरीचा कलावंत नायक दिलीप शेवटी शेतकऱ्यांचा नायक बनतो. वि. वा. हडप हेही समाजवादी विचारांनी प्रभावित झालेले लेखक होते. 'अन्नदाता उपाशी' (१९४७) ही त्यांची कादंबरी शेतकरी जीवनावर प्रकाश टाकणारी आहे. शेतकरी आणि कुळवाड्यांचे शोषण करणारे सावकार, खोत, सरकारी अधिकारी यांच्यातल्या वर्गीय संबंधांवर आधारलेले कथानक या कादंबरीतून साकार झाले आहे. 'प्रलय' कादंबरीत शहरातील भांडवलदार विरुद्ध कामगारांचा संघर्ष हे आशयसूत्र असून या संघर्षाची परिणती मजुरांच्या विजयात झालेली दाखविली आहे. हडपांच्या 'वादळ' कादंबरीतूनही शेतकऱ्यांची उपेक्षा थांबवण्यासाठी काँग्रेसचा उपयोग होणार नाही, त्यासाठी साम्यवादाचाच मार्ग अनुसरला पाहिजे, अशी मांडणी करण्यात आली आहे. काँग्रेसमध्ये राहून भिल्ल कोळ्यांचा उद्धार होणार नाही, म्हणून आदिवासींनी लाल बावट्याखाली एकत्र आले पाहिजे असे सूचित करणारी 'सावल्यांच्या उन्हात' (१९४६) ही कादंबरी श्रीराम अत्तरदे यांनी लिहिली होती.

वि. स. खांडेकर कादंबरीलेखनाकडे एक राजकीय-सामाजिक कृती म्हणूनच पहात. आपल्या कादंबरी लेखनाची भूमिका स्पष्ट करताना त्यांनी म्हटले होते की, "मी चित्रपट लिहितो ते पैशासाठी, लघुनिबंध व रूपककथा लिहितो ते स्वत:च्या आनंदासाठी आणि कादंबऱ्या लिहितो त्या कलेच्याद्वारे जीवनाची सेवा करण्याच्या तत्त्वावर माझी श्रद्धा आहे म्हणून." त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये तत्कालीन राजकीय-सामाजिक विचारप्रवाहांची पार्श्वभूमी अपरिहार्यपणे येते. त्यांच्या क्रौंचवध' (१९४२) या कादंबरीतली प्रो. दातार ही व्यक्तिरेखा महाराष्ट्रातल्या बुद्धिवादी, सुखवादी, वर्गाचा प्रातिनिधिक अवतार आहे. ही तथाकथित बुद्धिवादी मंडळी निष्क्रिय व आत्मपूजक असून राष्ट्रकार्यात अशा व्यक्तींच्या जीवनाला कुठलेच कारक मूल्य प्राप्त होत नाही, हेही या पात्राच्या माध्यमातून सूचित करण्यात आले आहे. 'दोन ध्रुव' (१९३४) या कादंबरीत उभे आयुष्य कष्टात काढणारा

श्रमजीवी वर्ग आणि त्यांच्या श्रमावर आपल्या कलाभिरुचीचे कोड पुरविणारा पांढरपेशा वर्ग या दोन ध्रुवातली विषमता हे आशयसूत्र केंद्रस्थानी आहे. श्रीमंतीच्या हाकेला ओ देऊन जन्माचा जोडीदार न निवडता स्त्रियांनी हृदयाच्या हाकेला ओ द्यावी, अशा आशयाचे कथानक 'हृदयाची हाक' (१९३०) कादंबरीत येते. 'कांचनमृग' (१९३१) या कादंबरीत समाजसुधारणेसाठी त्याग करणारा, शिक्षणासाठी प्रोफेसरकीवर लाथ मारणारा सुधारक आणि काव्याच्या खोट्या स्वप्नमय जगात राहणारा मधुकर किंवा संसारत्याग करून गरिबांना औषधे पुरवणारा स्वामी सदानंद आणि इंग्रजी साहेबांना देव मानून कायम हस्तिदंती मनोऱ्यात राहणारा रावसाहेब अशा दोन भिन्न प्रवृत्तींच्या जीवनाचे नमुने समोरासमोर ठेवून खांडेकर वाचकांना सत्प्रवृत्तीच्या व सामाजिक बांधिलकीच्या प्रेरणा घेण्यास प्रोत्साहक ठरेल अशी वातावरणनिर्मिती करतात. दोन ध्रुव (१९३४) या कादंबरीत विलासलीलांचे व भोगवादाचे माहेरघर असलेले मुंबई शहर आणि पोटाची भूक भागविण्यासाठी शील, शरीर, इमान विकण्यासाठी लाचार झालेले, गरीब, असहाय वर्गाचे कामापूर खेडे या दोन ध्रुवातला अंतर्विरोध चित्रित केला आहे. या कादंबरीतील रमाकांत कलावादी, तर विद्याधर श्रमजीवी अशी द्वंद्वात्मक मांडणी करण्यात आली आहे. 'उल्का' (१९३४) या कादंबरीतही ध्येयवादी चंद्रकांत आणि भोगवादी श्रीमंत पत्नी अशी द्वंद्वात्मक मांडणी आढळते. उल्का निसर्गनियमानुसार शरीराचे धर्म व लैंगिक इच्छा मान्य करणारी आहे. चंद्रकांतविषयी प्रेम वाटत नसतानाही ती वसंताबरोबर विवाह करण्याचे स्वप्न पाहते, त्यात अपयश आल्यावर माणिकरावांकडे आकर्षित होते आणि तिथे फसवणूक झाल्यावर चाळीशीतल्या बिजवराशी विवाह करते. उल्काला स्त्री-पुरुष संबंधातून प्राप्त होणाऱ्या प्रेमिका, पत्नी, माता या तिन्ही भूमिकांविषयी ममत्व आहे. या तिन्ही नात्यात जगण्याचा अनुभव ती घेते. पण स्त्री-पुरुष सहजीवनाच्या या विविध आविष्कारांतूनही खांडेकर समाजातल्या विविध प्रवृत्ती-प्रवाहांचे प्रातिनिधिक दर्शन घडवितात. 'दोन मने' (१९३८) या कादंबरीतून भोग आणि त्याग ह्या दोन प्रवृत्तींचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तिरेखांचे द्वंद्वात्मक दर्शन त्यांनी घडविले आहे. या कादंबरीतील बाळासाहेब श्रीमंत व सुखवादी जीवन जगणारा, पण 'श्री' हा बाळासाहेबाचा तरुण विधवेपासून झालेला आणि महाराने वाढविलेला मुलगा दरिद्री लोकांची व जर्जर रोग्यांची सेवा करतो; अस्पृश्यांच्या वतीने पिण्याच्या पाण्यासाठी सत्याग्रह करतो आणि गांधीजींच्या प्रेरणेतून त्यागाचे मूल्य जपतो. समाजाने स्वत:पुरता समाधानी राहाण्यापेक्षा वंचितांच्या उद्धारासाठी पुढे सरसावले पाहिजे, असा संदेश ह्या कादंबरीच्या माध्यमातून लेखकाने दिला आहे. खांडेकरांच्या इतरही कादंबऱ्यांतून हे आशयसूत्र आवृत्त झाले आहे. "हिरवा चाफा' (१९३८) या कादंबरीत करियरिष्ट वकील विजय आणि क्रांतिकारी कार्यकर्ता मुकुंद कांबळी अशा दोन प्रवृतींच्या प्रातिनिधिक व्यक्तिरेखा येतात. उद्याचे जग सुखी व्हायचे

असेल तर जीवनात भोग आणि त्याग, काव्य आणि कृती, बुद्धी आणि भावना यांचा सुंदर मेळ साधला पाहिजे असा विचार 'क्रौंचवध' (१९४२) कादंबरीतून मांडण्यात आला आहे. खांडेकरांच्या कादंबऱ्यांचा बहुतांश वाचकवर्ग हा पौगंडावस्थेतील विद्यार्थीवर्ग आणि मध्यमवर्गीय तरुणांचा होता. त्यामुळे मध्यमवर्गीयांचे स्वाभाविक आकर्षण असणाऱ्या त्याग, सेवा, ध्येयवाद या मूल्यभावना प्रज्वलित करण्याचे काम या कादंबऱ्या करीत होत्या.

ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या कादंबऱ्या समाजवादी विचारसरणीकडे झुकणाऱ्या आहेत. त्यांच्या 'मुक्तात्मा' (१९३३) या कादंबरीतून महाराष्ट्रातल्या राजकारणाचा लंबक नेमस्त विचारांकडून जहाल विचारांकडे कसा झुकू लागला होता याचे दर्शन घडते. या कादंबरीचा नायक चंद्रशेखर समाजवादी तरुणांची संघटना स्थापन करण्याच्या उद्देशाने 'लिटररी सोसायटी'ची स्थापना करतो. जहाल आणि मवाळ गटांपेक्षा नव्या समाजसत्तावादी विचारांचा प्रसार करण्याचे समर्थन हा नायक करतो. मजूर मित्रांच्या घरात भूमिगत राहून कार्य करतो. भारतातल्या कम्युनिस्ट चळवळीच्या प्रारंभकाळातील जडणघडणीचे राजकीय संदर्भ 'मुक्तात्मा' कादंबरीच्या केंद्रस्थानी आहेत. या कादंबरीतील चंद्रशेखर हे पात्र भाई डांगे यांच्या कार्याशी मिळते-जुळते आहे. मार्क्सवाद आणि राष्ट्रवाद यांच्यात समन्वय साधण्याचा दृष्टिकोण त्यात गर्भित आहे. मात्र कुसुमावती देशपांडे यांनी म्हटल्याप्रमाणे "समाजवादाचा नामोच्चार व काही समाजवादी तत्त्वांचा पाठपुरावा आपल्या लेखनात अनेकवार करूनही माडखोलकरांना खऱ्या समाजवादी बैठकीची एकही व्यक्तिरेखा निर्माण करता आली नाही." (बांदिवडेकर, १९७८, पृ. ८२) याचे कारण माडखोलकरांचे व्यक्तिमत्व ज्या भारतीय संस्कृतीच्या कोषात घडले ते मार्क्स-लेनीनचा साम्यवाद जसाच्या तसा स्वीकारण्यास राजी नसावे. मार्क्सवादी साहित्याचे समीक्षक डॉ. वि. स. जोग यांनी 'भंगलेले देऊळ' (१९३४) या कादंबरीची मीमांसा करताना याची कारणे शोधली आहेत. त्यांनी म्हटले आहे की, " एक पुरुष आणि दोन स्त्रिया यांच्या वर्तनस्खलनावर आधारलेल्या या कादंबरीत राजकारण नाही; पण समाजजीवनाच्या भाष्यात कुठेही मार्क्सवादाशी प्रतारणा नाही. रशियात मार्क्सवादी क्रांतीनंतर लैंगिक नवमतवाद हा 'ग्लास वॉटर थिअरी' या नावाने बोकाळला. पण त्याने कुटुंबसंस्थेला हादरा बसतो हे लेनिनच्या लक्षात आल्यावर त्याने या स्वैराचाराचा धिक्कार केला. मार्क्सच्या समंजस भाष्यात स्वैराचाराला स्थान नाही. म्हणून 'भंगलेले देऊळ' ही अनाचाराची शोकपर्यवसायी कथा शेवटी 'विवाहसंस्था हे भंगलेले देऊळ असेल, भ्रष्ट झालेले असेल, तर तुमच्या कल्पनेप्रमाणे त्याचा जीर्णोद्धार करा पण ते अजिबात पाडून टाकून मानव जातीच्या हाती स्वैराचाराची सनद देऊ नका' असा संदेश देते." (जोग, २०००, पृ. १५९) ग. त्र्यं. माडखोलकर यांनी गांधीजींच्या

अहिंसावादी विचारांऐवजी हिंदुत्ववादी समाजवाद आणि सशस्त्र क्रांतीविषयी ममत्व दाखविणारे लेखन केले. साम्यवादानेच सर्व प्रश्न सुटतील अशी टोकाची आग्रही भूमिका माडखोलकर घेत नाहीत. माडखोलकरांच्या 'शाप' (१९३६) कादंबरीचा नायक निशिकांत, 'दुहेरी जीवन'(१९४०) कादंबरीचा नायक मुकुंद, 'चंदनवाडी' (१९४३) चा नायक अवधूत यांची मने मार्क्स-एंगल्सची पुस्तके वाचून संस्कारित झाली आहेत. हे नायक समाजवादी तत्त्वज्ञानाने भारावलेले आहेत. त्यांच्या 'शाप' (१९३६) कादंबरीचा मार्क्सवादी नायक म्हणतो, "मला साम्यवाद हवा तो हिंदुस्थानच्या परिस्थितीला लागू होणारा हवा. रशियन जमिनीत रुजलेलं विदेशी रोपटं नको." (कित्ता, पृ. १५९)

माडखोलकरांवर गांधीवादाचा प्रभाव पडला नाही. विशेषत: 'मुखवटे' (१९४०) कादंबरीत गांधीजींच्या राजकीय तत्त्वज्ञानाचे खंडण आणि समाजवादी तत्त्वज्ञानाचे मंडण करण्याची भूमिका सुस्पष्टपणे प्रतिबिंबित झाली आहे. सत्तेसाठी मुखवटे धारण करणाऱ्या राजकारण्यांचे दर्शन या कादंबरीतून घडते. पोशाखी कम्युनिस्ट आणि कष्टाळू कम्युनिस्ट यांच्यातला फरक दाखविण्यासाठी अनुक्रमे अण्णासाहेब आणि विठोबा या व्यक्तिरेखा निर्माण करण्यात आल्या आहेत. कादंबरीच्या या राजकीय पार्श्वभूमीमुळे साम्यवादी विचारांची बौद्धिक चर्चा करणारे माडखोलकरांचे नायक गांधीवादी विचारांची थट्टा करताना दिसतात; किंबहुना, म. गांधी आणि सरदार पटेल हे कुटिल कारस्थानी नेते असल्याचे सूचित करण्यावर त्यांनी या कादंबरीत भर दिलेला आहे. या कादंबरीतील प्रियदर्शनला गांधीजींची मर्जी नसल्यामुळे मध्यप्रांताच्या मुख्यमंत्रीपदावरून पायउतार व्हावे लागते. त्यांच्या ''मुखवटे' आणि 'कांता' (१९३९) या दोन्ही कादंबऱ्यातला नायक 'प्रियदर्शन' याची व्यक्तिरेखा तत्कालीन मध्यप्रांत वऱ्हाडचे मुख्यमंत्री डॉ. खरे यांच्यावर बेतलेली आहे. १९३८-३९ च्या काळात डॉ. खरे यांच्या नेतृत्वाखाली वऱ्हाडात कॉंग्रेसचे राजकारण चालत असे. मात्र गांधीजींच्या अनुमतीने चालणाऱ्या कॉंग्रेसच्या अंतर्गत राजकारणातून डॉ. खरे यांना मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. 'गांधीवादाचं हिंदी राजकारणातलं कार्य संपलं असून कम्युनिस्ट क्रांतीसाठी प्रतिज्ञाबद्ध झालं पाहिजे, असं मनोगत 'नवे संसार' (१९४१) कादंबरीतला विद्याधर व्यक्त करतो. 'चंदनवाडी कादंबरीतही मार्क्सवाद आणि राष्ट्रवादाची सांगड घातली पाहिजे ह्या भूमिकेचे समर्थन केलेले आहे. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यावर आधारलेल्या 'प्रमद्वरा' (१९४३) कादंबरीत मार्क्सवाद, राष्ट्रवाद आणि हिंदुत्ववाद यांचा त्रिवेणी संगम साधणारा विचार माडखोलकर मांडू पहातात. या कादंबरीतला स्वामी अभयानंद म्हणतो, "मार्क्सवादाची मौलिक उपयुक्तता आम्हाला अंशत: पटते. म्हणूनच आम्ही राष्ट्रीयत्वाच्या जुन्या कल्पनांना त्यातील सर्वांगीण समतेची जोड देऊन, आपल्या लोकजीवनातील सर्व प्रकारचे पारतंत्र्य आणि सर्व प्रकारची विषमता यावर सारख्याच त्वेषाने शस्त्र धरणाऱ्या राष्ट्रीय

क्रांतीवादाचं, हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितीला सर्वथैव योग्य असं तत्त्वज्ञान निर्माण केलं आहे. पण मार्क्सवादातल्या निरात्मक, भौतिक समतेपेक्षा आपला उपनिषदातला आध्यात्मिक समतावाद हा सगळ्याच दृष्टींनी अत्यंत उच्च आणि पूर्ण आहे." (जोग, कित्ता, पृ. १६२-१६३) मार्क्सवादाचे भारतीयीकरण करण्याचा प्रयत्न माडखोलकर करू पहात होते.

१९३३ ते १९४५ या दशकातील मराठी कवितेवर साम्यवादी विचारांचा प्रभाव होता. अशावादी आणि निराशावादी, मानवतावादी आणि तुच्छतावादी अशा परस्परविरोधी जाणिवांच्या कवितांमागे साम्यवादी तत्त्वज्ञानाचा प्रभाव आढळतो. अनंत काणेकर यांनी धनिकांशी झुंजणाऱ्या कामगारांसाठी आपण गाणी रचू अशी स्पष्ट भूमिका घेऊन आपल्या कविता लिहिल्या. त्यांच्या 'चांदरात आणि इतर कविता' (१९३३) या काव्यसंग्रहातील कवितांवर साम्यवादी जाणिवांचा प्रभाव आहे. *"क्रांतियुद्धाची चढाई आज जर ना गाईन / मानवी इतिहास का देईल फिरुनी हा क्षण?"* ह्या प्रश्नातून कवीची साम्यवादाची बांधिलकी व्यक्त झाली आहे. *"आकाशातील पोलिसा ! छळिसि का दीनांस आम्हा बरे / देतो टाकूनि मूर्ति ही, गिरणिच्या काळ्या धुराड्यांत रे!"* अशा खणखणीत शैलीत काणेकरांची कविता अवतरली. वा. ना. देशपांडे यांच्या 'आराधना'(९१९३८) या संग्रहातील काही कवितांमधूनही साम्यवादाचा पुरस्कार आढळतो. साम्यवादी युगधर्माची देवता म्हणून 'श्रमलक्ष्मी'ची प्रतिमा त्यांच्या कवितेत येते. या श्रमलक्ष्मी स्तोत्रात 'विळा आणि फावडे' ही श्रमलक्ष्मीची आयुधे म्हणून अवतरतात. विंदा करंदीकर यांच्या 'स्वेदगंगा' (१९४९) या काव्यसंग्रहातून साम्यवादी जाणिवांना काव्यरूप लाभले आहे.

"विरोध ना विजयाला बाधे; / विरोध होता विकास साधे
विरोध करुनी अपुला चाकर, / त्या पायावर लढा उभारा;"

(करंदीकर, १९५८, पृ. ६)

असे विरोधविकासाचे तत्त्वज्ञान करंदीकरांनी कवितेतून मांडले आहे. 'महागाईचे पिवळे डोळे', स्वस्ताई ही मवाळ, दांभिक', बुभुक्षितांचा भयाण तांडा' अशा शब्दकळेतून त्यांनी समकालीन वास्तवाच्या हलाखीचे दर्शन घडविले. ('टाकसाळ ती मनात हसते', करंदीकर, 'स्वेदगंगा', पृ. ४२) *"जिकडे सत्ता तिकडे पोळी.. ज्याचा पैसा त्याची सत्ता; पुन्हा पुन्हा हाच कित्ता"* अशी पैशाची आणि सत्ताकारणाची बाराखडी त्यांनी कवितून लिहिली (सब् घोडे बारा टक्के, कित्ता, पृ. ४३). *'श्रीमंतांचा स्वर्ग रचाया नरक बने मजुरांचा'* हे भांडवलशाहीतले वास्तव त्यांनी आपल्या कवितेतून रेखाटले. गिरणीतल्या मजुरांच्या श्रमावर कारखानदारांचे इमले उठतात या विषमेच्या वास्तवाचे दर्शन घडविताना त्यांनी कामगारांच्या जीवनाचे शब्दचित्र असे रेखाटले आहे,

"धुरकटलेल्या गिरणविभागी जे जे मानव जाती

दृश्य त्यांना एकच भीषण दिसते :
मजुरांच्या शरिरांचा घालुन नित्य नवा तंबाखू
चिलमी ओढित गिरण्या साऱ्या बसल्या!
....
मजुरांच्या हाडांचा येथे जळतो अंगार सदा
मजुरांच्या घामाच्या वाफेवर फिरती ही यंत्रे
मजुरांचे पिंजुनिया स्नायू सूत इथे हे निघते
मजुरांच्या रक्ताच्या रंगाने ते सुंदर होते" ('मजूर', किरा, पृ. ४७)

भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या शोषणाचे बळी झालेल्या वंचितवर्गाच्या दु:खांना कुसुमाग्रजांच्या 'बळी', 'लिलाव', गुलाम' इत्यादी कवितांतून शब्दरूप दिले गेले आहे. 'अहिनकूल', 'आगगाडी आणि जमीन' यासारख्या रूपकात्मक कवितांतूनही सर्वसामान्यांना चिरडणाऱ्या उन्मत्त भांडवलदारांचे व चिरडल्या जाणाऱ्या शोषित वंचित वर्गाचे चित्र रेखाटले गेले आहे. सत्तेचा उन्माद असलेला सम्राट किंवा भांडवलदार आणि शोषित वर्गातला जननायक यांच्यात संग्राम पेटतो तेव्हा अंतिम विजय शोषितांचा होणार असा आशावाद या कवितांतून व्यक्त झाला आहे.

मर्ढेकरांची कविता वर्गविग्रहातून सामान्यांच्या वाट्याला आलेल्या निराशेचे, भग्नतेचे चित्र रेखाटते. या कालखंडात साम्राज्यवादी मनोवृत्ती आणि युद्धपिपासा यातून दोन महायुद्धे झाली आणि त्यातून समाजात भीती, असुरक्षितता, जीवनाची क्षणभंगुरता आणि अपार वैफल्य वाट्याला आले. या युद्धखोरीचे वास्तव रेखाटताना मर्ढेकर म्हणतात:

- "शुभ्र खादीबंद शेट
  जया हिंसाधर्म-वीट
  युद्ध-साहित्य-कंत्राट
  घेण्या उभा"

- "मुडद्यांची रास
  यंत्रातून आग
  गोळ्यांचे पराग
  विमानांचे हल्ले
  बेचिराख जिल्हे
  रक्ताची थारोळी"

मर्ढेकरांच्या 'कांही कविता'तील सामाजिक जाणीव ही साम्यवादाकडे झुकणारी आहे. भांडवलशाहीतील नफेखोरी व कामगारवर्गाची पिळवणूक याविषयीची प्रतिक्रिया मर्ढेकरांच्या कवितेतून उमटलेली दिसते. भांडवलशाही समाजरचनेत उत्पादनाची साधने

व व्यापाराची मक्तेदारी असलेल्या वर्गाची एकीकडे भरभराट होत असताना कष्टकरी लोकांच्या जीवनात मात्र हालापेष्टाच आल्या.

"जाणे भांडवली वृत्ती
नष्टचर्य पिकवी चित्ती
आणि कामगारा हाती
करवंटीच"

राजकारणातल्या प्रस्थापित नेतृत्वाविषयीची चीडही या कवितेतून व्यक्त होते :

"मोले धाडी जो मराया
नाही आसू नाही माया
त्यासी नेता बनवावे
आम्हा मेंढरास ठावे.

भांडवलशाही समाजरचनेत सामान्य माणसाच्या वाट्याला 'जीव पैशाला पासरी' करणारी महागाई, बेकारी, टंचाई आणि मालकवर्गाकडून होणाऱ्या पिळवणूकीचे दुःखच आले. शोषितांच्या वाट्याला आलेल्या या जीवनानुभावाचे वास्तव रेखाटताना कवी प्रश्न करतो :

"देवा, ऐशी भूक
कासया दिलीस?
झालो कासावीस
मीही नंगा
नंग्यांचाच आता
येथे कारभार
कोंडी आरपार
फोडाया ही
टिऱ्या अर्धपोट
जोवरी आहेत
ओंगळ समस्त
आम्ही नंगे "

भांडवलशाही शोषणाची सर्वात मोठी हानी बायकांच्या जीवनात झालेली दिसते. हे वास्तव मर्ढेकरांच्या कवितेतून असे येते:

"संसाराच्या, निबरट किरटी
हाडबंडले अशा बायका
उष्टीभांडी उरकून बसल्या

विणीत चिमणे जीवन"

मध्यमवर्गीयांच्या वाट्याला आलेली संबंध-विच्छेदाची जाणीव मर्ढेकरांच्या काव्यातून व्यक्त होते . बटनांच्या तालावर चालणाऱ्या शहरात मानवी संवादाला वाव नाही. अशा संवादभग्नतेचे चित्र रेखाटताना कवी म्हणतो :

"त्रुटित जीवनीं सुटी कल्पना,
ट्रिंग् ट्रिंग् जैसा खोटा नंबर
सलग जमेना एक भावना,
'हलो हलो'ला हलकट उत्तर "

आधुनिक जीवनातल्या पोकळ आध्यात्म व पोशाखी संस्कृतीविषयीचा तिरस्कार मर्ढेकरांच्या कवितेतून व्यक्त होतो :

"आम्ही ज्ञानवंत भागलो
ना पश्चातापे पोळलो
ना कधी हळहळलो
परदुःखे.
वेचिले ज्ञान कणकण
जैसे की वालुकाकण
झालो कोरडे पाषाण
बुद्धिरूपी."

शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी मराठीत मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणारी कविता लिहिली. वर्गविग्रहाने दुभंगलेले वास्तव साम्यवादी समाजरचनेनंतर बदलेल असे स्वप्नचित्र रेखाटण्यावर ही कविता भर देते. आपल्या या बांधिलकीविषयी स्वतः मुक्तिबोधांनीच म्हटले होते की, "मला कोणी मार्क्सवादी म्हटले तर ते खरेच आहे असे मी म्हणेन. मार्क्सने जीवनाचे जे गतिशील द्वंद्वात्मक दर्शन घडविले ते मला आजही पटते व तोच माझ्या मनाचा प्रत्यय आहे." (नवी मळवाट, १९८७, पृ. सत्तेचाळीस) समाजाच्या प्रगती तत्त्वाशी समरस होण्याच्या प्रेरणेतून त्यांचे काव्यलेखन झाले आहे. भांडवलशाही समाजातून वर्गविग्रह झाला व भांडवलदारांनी गरिबांच्या शोषणातून आपले इमले बांधले; हा अंतर्विरोध शरच्चंद्र मुक्तिबोधांच्या कवितेतून मांडला गेला :

"यांची तनू पिळूनिया
त्यांचे ओठ लाल
यांच्या डोळ्यांतील तारे भरडून
त्यांच्या शहरी लखलखाट"

सरंजामी समाजरचनेतल्या पारंपरिक शोषणाच्या उतरंडीतून बाहेर पडण्यासाठी

समाजवादी मूल्यधारणा आणि व्यक्तिस्वातंत्र्यवादी तत्त्वज्ञानाचे आकर्षण मराठी कवींना वाटू लागले होते. यातून पुरोगामी साहित्याची लाट मराठी वाङ्मयात आली. शरच्चंद्र मुक्तिबोधांच्या कवितेने ही 'नवी मळवाट' प्रशस्त केली. समाजवादी समाजरचना निर्माण झाल्यावर जो उज्ज्वल भविष्यकाळ अस्तित्वात येणार आहे, त्याचे स्वप्नचित्र या कवींनी रेखाटले.

"नवे निर्झर सूर्ययुगाची जाणती प्रजा
जेथे केवळ प्रकाशाचीच निर्वेध सत्ता"

असे प्रकाशपर्व अवतरेल अशी आशावादी कविता मुक्तिबोधांनी लिहिली. जनतेच्या मनात क्रांतीची प्रेरणा जागवणारी स्तवने त्यांनी लिहिली. 'मराठीचिये नगरी' या कवितेत हे क्रांतिसूक्त गाताना कवी म्हणतो,

"गाणे हवे बंडाचे, साखळदंडाचे
भयंकर छळाचे, छळातही बळाचे
गाणे गुप्त त्यागाचे, अज्ञात शौर्याचे
अतिकोमल मनांच्या कणखर वृत्तीचे
ज्वालेवर हात ठेवून घेतलेल्या शपथेचे
पराजयातून नव्या संकल्पांच्या गतीचे
....
गाणे जड दणकट लोखंडाच्या हातांचे
वाळलेल्या जर्जरशा थकलेल्या हातांचे
घण मारणाऱ्या, धान्य कापणाऱ्या हातांचे
पृथ्वी उचलून धरणाऱ्या दोन हातांचे"

१९४० नंतरच्या दशकात मुंबईत कम्युनिस्टांनी 'इप्टा' ही कलामाध्यमाची संस्था स्थापन केली होती. या संस्थेच्या चळवळीतून महाराष्ट्रातही साम्यवादी जाणिवांचा लोकरंगमंच उदयाला आला. लोकशाहीर नानिवडेकर व अण्णाभाऊ साठे यांनी साम्यवादी जाणिवातून पारंपरिक 'तमाशा'च्या घाटाला नवे रूप देऊन 'लोकनाट्या'चा नवा घाट प्राप्त करून दिला. शाहीर नानिवडेकर यांनी 'फॅशनचा वग', 'किसरूळचा शेतकरी', 'वसाडगावचा जमीनदार' ह्या वगातून शोषितांच्या प्रश्नांना नव्या राजकीय तत्त्वज्ञानाच्या मुशीतून लोकमंचावर आणले. शेतकऱ्यांची पिळवणूक करून श्रीमंत झालेले सरदारांच्या पिढीतले वारसदार हे पैशाची उधळपट्टी करून कशी चंगळ करतात आणि गरीब शेतकरी मात्र कर्जाच्या खाईत खितपत पडतो हा विरोधाभास नानिवडेकरांनी 'वसाडगावचा जमीनदार' या वगातून मांडला. गावाकडचा शेतकरी कर्ज फेडण्याच्या इराद्याने पैसे मिळविण्याचे स्वप्न घेऊन मुंबईत येतो; पण मुंबईत आल्यावर प्रत्यक्षात

त्याचा भ्रमनिरास होतो, त्याची स्वप्ने धुळीला मिळतात याची कहाणी 'किसरूळचा शेतकरी' या वगातून त्यांनी सादर केली. शाहीर अण्णाभाऊ साठे यांनी साम्यवादी चळवळीला लोकाभिमुख करणारे पोवाडे आणि वर्गजाणिवांचा आशय असलेली लोकनाट्ये सादर केली. १९४४ साली त्यांनी स्टॅलिनग्राडचा पोवाडा, बर्लिनचा पोवाडा, बंगालची हाक हे पोवाडे सादर केले. १९४७ साली 'पंजाब-दिल्लीचा दंगा', 'तेलंगणचा संग्राम', 'महाराष्ट्राची परंपरा' आणि १९४९ साली 'अमळनेरचे अमर हुतात्मे', 'मुंबईचा कामगार', आणि 'काळ्या बाजाराचा पोवाडा' हे पोवाडे सादर केले. पोवाड्याचे जुने स्फूर्तिदायी तंत्र अण्णाभाऊंनी नव्या वर्गलढ्यासाठी कौशल्याने उपयोजिले. उदाहरणार्थ, साम्राज्यशाहीच्या विरोधात खलाशांनी पुकारलेल्या बंडाला कामगारवर्गाने सार्वत्रिक संपाच्या माध्यमातून दिलेल्या साथीच्या पार्श्वभूमीवर सादर केलेल्या पोवाड्यात अण्णाभाऊंनी हा वर्गलढ्याचा संदर्भ असा जोडला होता :

"ती हाक ऐकता कामगार मग उठला
खलाश्याला साह्य करण्याला
संपाचा घण मग त्याने हाती घेतला
हादरले वायुमंडळ असा गर्जला
कारखाने आणि गिरण्याला थांबवून पार यंत्राला
कारभार ओस पाडिला सामसूम केले नगराला
कामगार आला रस्त्याला
उभारून भुईकोटाला
दमगीर केला मशिनगनवाला
तो शिवाजीपार्कला हातघाईवर आला
परळात प्रलय मांडिला
विसरून देहभानाला
त्यानं लालबागला लाल रंग आणिला." (साठे, १९९८)

या पोवाड्यात त्यांनी

"डांगे, मिरजकर आणि ब्रॅडले
नेते लाभले हिंमतवाले
उठविला ज्यांनी सारा कामगार
वर्गयुद्धाचा करूनी निर्धार
भांडवलदारी केला बाजार"

असे कम्युनिस्ट पुढाऱ्यांच्या गौरवपूर्ण सहभागाचेही गुणगाण केले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे सार पोवाड्यात गुंफताना अण्णाभाऊ या चळवळीचे लोकबळ वाढविण्यासाठी

आवाहन करतात :

"महाराष्ट्र हा नव्या युगाचा बजावून जागता
समाजास आता मागतो स्वायत्त स्वाधिनता
तो पाचारि बुद्धिवाद्यांना
आणि जहालांना
शेतकरी यांना
उभवू या ऐक्याची भिंत
महाराष्ट्र करूनि संयुक्त
दु:ख दैन्य दिसेना जेथ
लोकशाहीचे नंदनवनचि करण्या या भूला
महाराष्ट्राची परंपरा ती पुढती नेण्याला
जिथे ना कोटि जनाला जगण्याची भ्रांता"

पारंपरिक 'तमाशा'चे 'लोकनाट्य' असे नामांतरही त्यांनी केले. पारंपरिक तमाशातील 'गणा'मध्ये गणेशस्तवन असते, अण्णाभाऊंच्या लोकनाट्यात हे नमन मातृभूमीला, हुतात्म्यांना आणि राष्ट्रवीरांना असते. पारंपरिक तमाशात गणानंतर मथुरेच्या बाजाराला निघालेल्या गवळणी आणि कृष्ण-पेंद्यांच्या संवादांची गवळण हा आकृतिबंध असे. अण्णाभाऊंनी हा आकृतिबंध लोकनाट्यात वगळला व थेट वगाला सुरुवात करण्याची नवी परंपरा सुरू केली. पारंपरिक तमाशातील राजा-राणीचा वग शेतकरी-सावकार, कामगार-पुढारी यांचा वग बनला. पौराणिक कथानकांची जागा सावकारांचे शोषण, गिरणी कामगारांची पिळवणूक, भांडवलशाहीतला काळाबाजार, निवडणुकीतले राजकारण आणि पुढाऱ्यांच्या भूलथापा या कथानकांनी घेतली. लोकप्रिय सोंगाड्याच्या पात्राला अण्णाभाऊंनी वर्गजागृत सोंगाड्यामध्ये परिवर्तीत केले. आपल्या विनोदी ढंगातून वर्गशत्रूंवर टीकेची राळ उडविण्याचे आणि आपल्या कामगारबंधूंना स्वाभिमानाचे धडे देण्याचे काम या सोंगाड्याच्या माध्यमातून साधण्यात येई. तमाशातील 'सवाल-जबाब' अर्थात 'झगडा' हा रचनाबंधही शोषक आणि शोषित यांच्यातल्या वर्गीय संघर्षाला तोंड फोडण्यासाठी उपयोगात आणला जाई. कामगारांचा प्रतिनिधी काँग्रेस मंत्रिमंडळातील मंत्र्याला सवाल करतो,

"तुम्ही अहिंसावादी
सत्याचे दर्दी
गरिबांची टाळकी का फोडता?"

मंत्री त्याला जबाब देतो,

"तुम्ही कायद्याला मोडून

शांतता तोडून
संपाचा हैदोस का घालता?"

किंवा मुंबई शहराला महाराष्ट्रापासून स्वतंत्र ठेवण्याची मागणी करणाऱ्या व्यापाऱ्यांचा प्रतिनिधी – शेटजी आणि मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणारा समितीचा प्रतिनिधी विष्णू यांच्यात होणारे सवाल-जबाब :

शेटजी : नाना भाषेची
नाना जातींची
तूच मागशी कशी हिला?

विष्णू : जशी गरुडाला पखं
आणि वाघाला नखं
तशी ही मराठी मुलखाला.

शेटजी : आम्ही सोडून घरदार
हिच्या वाढवाया व्यापार
पैसा पेरिला का बोला?

विष्णू : नदीला बगळा
जमून सगळा
टपून बसतो कशाला?

अण्णाभाऊंनी १९४५ साली 'अकलेची गोष्ट', 'खापऱ्या चोर'; १९४६ साली 'कलंत्री', 'शेटजीचं इलेक्शन','देशभक्त घोटाळे', 'निवडणुकीतील घोटाळे', १९४७ साली 'बेकायदेशीर', १९४८ साली 'माझी मुंबई' आणि १९४९ साली 'मूक मिरवणूक' ही लोकनाट्ये लिहिली. व्यापारी वर्गाची नफेखोरी आणि सरकाची बेफिकिरी यावर प्रकाश टाकणारे संवाद हे या लोकनाट्याचे वैशिष्ट्य होते. 'अकलेची गोष्ट' या लोकनाट्यात कृत्रिम टंचाई निर्माण करून महागड्या दराने कापड विकणाऱ्या व्यापाऱ्यांच्या प्रवृत्तीवर भाष्य करताना या लोकनाट्यातला जानबा आपल्या बायकोला म्हणतो, "अगं, सरकार म्हनतंया १५ आने पायली इका जुंधळं, पर हे येपारी तीन रुपये पायली इकत्यातच का नाही! तसंच कापडाचं." मग सरकार काय करतंय", या पुळाबाईच्या प्रश्नाला जानबाचं उत्तर असतं, "सरकार माश्या मारतंया! या राज्यात आंदळं दळतं नि कुत्रं पीठ खातं तसं झालंया बघ! समदा ऐतखाऊंचा नि लाचखाऊंचा बाजार भरलाय!" (साठे, १९९८, पृ. ११५) 'माझी मुंबई अर्थात मुंबई कुणाची?' या लोकनाट्यातही माल दाबून ठेवून काळा बाजार करणाऱ्या व्यापारी प्रवृत्तीवर अण्णाभाऊंनी भाष्य केले आहे. या काळ्या बाजारामुळे गरिबांना गहू-जोंधळ्याऐवजी रबरी आटा खायची वेळ आली आहे. पण या समस्येविरुद्ध सामान्य कामगार संघर्ष करील व काळाबाजारवाल्यांना धडा शिकवेल असा संदेशही दिला आहे.

या लोकनाट्यातील पोवाड्यात शाहीर म्हणतात,

"या उंदरांना खेचून
काढू या बिळातून.
आम्ही महाराष्ट्राचे धनी नाव मऱ्हाटा
आम्ही दरीकपारीत चालवियला पट्टा
हातावरला अजोनि नाही जिरला घट्टा
.....
प्याला दुध जित्या आईचं
काळ्या खडकाचं
पाणी हाय तुमचं
नफेबाजांना दावा समयास
काळा बाजार न्यावा विलयास
वाटेगावकर विनवी सकलास" (साठे, १९९८, पृ. १५५)

अशी काळ्याबाजारवाल्यांविरुद्ध लोकचळवळ सुरू करण्याचे आवाहन ते या लोकनाट्यातून करतात. महाराष्ट्रातल्या साम्यवादी चळवळीचा लोकजागरणाचा मंच म्हणून अण्णाभाऊ साठ्यांच्या लोकनाट्यांनी आणि कलापथकांनी फार महत्त्वाची भूमिका निभावली होती.

## ७.४. गांधीवादाचा प्रभाव :

साम्यवादी चळवळीइतकाच किंबहुना त्याहून अधिक म. गांधींच्या सत्याग्रह चळवळीचा, अहिंसावादी तत्त्वज्ञानाचा, ग्रामसुधारणावादाचा आणि अस्पृश्यतानिवारण कार्यक्रमाचा प्रभाव या कालखंडातील सुशिक्षितांवर मोठ्या प्रमाणात पडला होता. 'दोन साम्यवाद' अशा शब्दात या दोन भिन्न प्रेरणांच्या संश्लेषणाचा उल्लेख आचार्य जावडेकरांनी केला होता. साम्यवादी चळवळीत भांडवलदार हे कामगारांचे वर्गशत्रू मानले जात होते; गांधीजींच्या तत्त्वज्ञानात मात्र भांडवलदार हे देशाचे विश्वस्त ठरवले जात होते. गांधीजींना समतेचे तत्त्व आणि मूल्य मान्य होते; मात्र वर्गकलहापेक्षा हृदयपरिवर्तनावर त्यांचा भर होता. जावडेकरांच्या भाषेत सांगायचे तर गांधीजींनी समाजवादाला आध्यात्मिक रूप दिले होते. मराठी साहित्यातील 'पुरोगामी साहित्या'चा प्रवाह समाजवाद आणि गांधीवाद यांच्यात सामंजस्य प्रस्थापित करणारा होता. १९२० ते १९५० या काळातील राजकारणात व समाजकारणात सहभागी झालेल्या तरुणांनी साहित्यनिर्मितीचे क्षेत्र हे आपल्या राजकीय सामाजिक कर्तृत्वाचे प्रांगण म्हणून स्वीकारले होते. गांधीजींच्या जीवनदृष्टीनुसार साहित्यनिर्मिती हेही एक नैतिक व राजकीय कर्मवादाचेच एक अंग होते. साहित्याच्या माध्यमातून प्रेम आणि करुणा, अहिंसा आणि सत्याग्रह, समता आणि

स्वातंत्र्य या मूल्यांची पेरणी करण्याचे, साहित्यातून हृदयपरिवर्तनाचा मार्ग प्रशस्त करण्याचे व्रत हाही स्वातंत्र्यलढ्याचाच एक भाग समजला जात असे. नवी समाजरचना व पर्यायी जीवनशैलीची प्रारूपे पुढे आणणे हे क्रांतदर्शी प्रतिभेचे कामच असते. किंबहुना 'सर्वोदय' हे साहित्याचे सर्वश्रेष्ठ प्रयोजन आहे, या गांधीवादी जीवनदृष्टीला अनुसरून मराठीत बरीच साहित्यनिर्मिती झाली. या साहित्यातील आशयसूत्रे आणि मूल्यदृष्टी यांचा तपास करीत गांधीवादी जीवनदृष्टीचा प्रभाव असलेल्या वाङ्मयाचा साररूप आढावा येथे घ्यावयाचा आहे.

साने गुरुजी यांनी साहित्याच्या माध्यमातून गांधीवादी जीवनदर्शनाचे सामाजिकीकरण करण्याची मोहीम चालवली होती. साहित्यनिर्मिती ही क्रांतिकारी चळवळीला पूरक ठरणारी पर्यायी नैतिक कृती आहे, अशा धारणेतून त्यांनी आपले लेखन केले. महाराष्ट्रातील कलावंतांनी राष्ट्रातील दु:खाला वाचा फोडणारे व पांढरपेशा सुखासीन लोकांना बेचैन वाटेल असे लेखन करावे, असे आवाहनही ते करतात. इतकेच नाही तर गांधीवादी सौंदर्यशास्त्र निर्माण करण्यासाठी त्यांनी स्वत:हून काही वाङ्मयीन प्रयोग केले. १९२४ साली अमळनेरच्या छात्रालयात रुजू झाल्यानंतर त्यांच्या लेखनाला प्रारंभ झाला. या काळात स्वातंत्र्यलढ्याने भारलेल्या धडपडणाऱ्या मुलांसाठी साने गुरुजींनी साहित्य लिहिले. हिंदूमुसलमानांचे ऐक्य, हरिजनोद्धार, खेड्यातील लोकांची दुर्दशा, खादीचा प्रसार, बंधुभाव, प्रेम, असहकार, निर्भयता यांना कलेची वस्त्रे चढविण्याचे ध्येय ठेवून त्यांनी आपली साहित्यनिर्मिती केली. खानदेशातील राष्ट्रीय चळचळीच्या बांधणीत साने गुरुजींचा मोठा सहभाग होता; त्यातल्या अनुभवांचे द्रव्य हेच त्यांचे कलाद्रव्य बनले. माणुसकीवर डोळस श्रद्धा ठेवणारा श्याम (श्यामची आई),किंवा 'धडपडणारी मुले' (१९३७) या कादंबरीतील 'स्वामी' हे पात्र म्हणजे स्वत: साने गुरुजीच आहेत. गांधीविचारांनी भारलेले 'स्वामी' अमळनेरात विश्वधर्ममंडळाची स्थापना करतात, हिंदु-मुसलमानांमधील झगडे नाहीसे करण्यासाठी पुढाकार घेतात, अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी, मिश्रविवाहाला आणि वृक्षसंवर्धनाला चालना देण्यासाठी विविध कृतिकार्यक्रम चालवतात. आपल्या विद्यार्थ्यांना प्रेरणा देऊन देवपूरला आश्रमशाळा काढतात. मुलांची कलापथके तयार करून प्रबोधनाचे मेळे आयोजित करतात. या कादंबरीतील स्वामी म्हणतात, "हे राष्ट्र जगायला हवे असेल तर राष्ट्राच्या मुळाला पाणी घालण्यास सर्वांनी उठले पाहिजे. कमळाला फुलवायचे असेल तर खालचा देठ शाबूत हवा. ... हा खेड्यातील जनतारूपी देठ चिखलात, शेवाळात धडपडत आहे. तेथला ओलावा कमी होत आहे. हा देठ सुकेल, गळून पडेल; आणि ही वरची हसणारी पांढरपेशी कमळे, तीही धुळीत पडतील! महापुरुष या देठांची काळजी घ्यायला बोलावीत आहे. .. युगपुरुषाच्या हाकेला ओ द्या" महाराष्ट्रातील सुशिक्षितांमध्ये, कलावंतांमध्ये,

वर्तमानपत्रकर्त्यांमध्ये राष्ट्रनिर्माणाविषयी अपेक्षित असलेली उत्कटता व बांधिलकी आढळत नसल्याची तक्रारही साने गुरुजींनी 'धडपडणारी मुले' या कादंबरीत ठळकपणे नोंदवली आहे. तत्कालीन वर्तमानपत्रे समाजात ऐक्याचे व प्रेमाचे वारे पसरविण्याऐवजी द्वेषमत्सराचे विषारी वारेच सोडत असतात, असे गुरुजींचे निरीक्षण होते. 'हिंदुमुसलमानांच्या दंग्यांची तिखटमीठ लावून विषारी केलेली वार्ता वर्तमानपत्रे जगभर नेतात, आणि कोट्यवधि हिंदु-मुसलमानांची मने अशांत केली जातात. आग नसेल तेथे आग उत्पन्न होते. प्लेग नसेल तेथे प्लेगाचे जंतू जातात. . भडक काहीतरी प्रसिद्ध करावे, पैसे मिळवावे. अंक खपवावे हे वर्तमानपत्रांचे ध्येय! मग भारत मरो का तरो', अशा शब्दात साने गुरुजींनी तत्कालीन वृत्तपत्रीय अभिव्यक्तीविषयीची नाराजी व्यक्त केली आहे. कलावंतांनी आपल्या अहंकाराचे विषारी बुडबुडे उडविणे बंद करून या दिव्य जीवनकलेचे उपासक झाले पाहिजे, अशा स्पष्ट शब्दात गुरुजींनी आपली गांधीविचारदर्शनाशी असलेली बांधिलकी जाहीर केली होती.

'चित्रकार रंगा' या कादंबरीचा नायक महात्मा गांधींच्या स्वप्नातल्या भारताचे चित्ररूप रेखाटण्याचा प्रकल्प हाती घेतो. मुंबईच्या खादी प्रदर्शनासाठी तो 'ग्राम-गोकूळ' ही संकल्पना घेऊन काही चित्रफलक तयार करतो. ग्रामीण जीवनातली अस्पृश्यता गेली आहे, भाऊबंदकी कमी झाली आहे, निरक्षरता जात आहे, नवे सुधारलेले ग्रामोद्योग येत आहेत, राष्ट्रीय भावना वाढत आहे, अशी गांधीजींच्या स्वप्नातल्या भारताची मूर्तचित्रे रंगविण्याचे काम चित्रकार रंगा करतो आहे. सर्वांचा सामाजिक दर्जा सारखाच असावा; शेतकरी, विणकर आणि शिक्षक यांच्यात कदापि भेदभाव होणार नाही अशी समताधिष्ठित समाजरचना असावी, हा साम्यवादी आदर्श गांधीजींनाही भावलेला होता. धनिकांनी विश्वस्ताप्रमाणे वागण्याची कल्पना गांधीजींच्या अर्थविचाराच्या मुळाशी होती. समाजाने गरजा कमी करून अपरिग्रहाचे तत्त्व जीवनमूल्य म्हणून स्वीकारावे, अशी त्यांची भूमिका होती. श्रीमंत गरिबांचे विश्वस्त म्हणून काम करू लागले तर संघर्षाशिवाय एक मूक सामाजिक क्रांती घडून येईल असा त्यांचा विश्वास होता. त्यांच्या या विचारसरणीत चरखा हे व्यापारी युद्धाचे प्रतीक नसून व्यापार क्षेत्रात शांती निर्माण करण्याचे प्रतीक होते. सुताच्या प्रत्येक तारेत त्यांना शांती, सद्भाव आणि प्रेम भरलेले दिसत असे. गांधीजींच्या या कल्याणकारी अर्थशास्त्राचे वाङ्मयीन नमुने साने गुरुजींच्या साहित्यातून चित्रित झालेले आहेत. 'क्रांती', 'नवा प्रयोग', 'आपण सारे भाऊ' या कादंबऱ्यांच्या माध्यमातून साने गुरुजी यांनी सामाजिक पुनर्घटनेची विविध पर्यायी रूपे सुचविली आहेत. कम्युन्सच्या धर्तीवर शेतकरी-कामगारांच्या सामुदायिक वसाहती अर्थात 'स्वराज्यवाड्या' उभारण्याची कल्पना त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून मांडली आहे.

गांधींच्या स्वप्नातील नवभारताचे चित्र रंगवणारा चित्रकार रंगा, खादीचा प्रचार

करणारा व विलायती वस्त्रांची होळी करणारा दिगंबरराय, आर्य आणि नाग यांच्यात सांस्कृतिक ऐक्य घडवून आणण्यासाठी पुढे सरसावणारा 'आस्तिक' कादंबरीतील नागानंद, श्रमणाऱ्याला सुखी करणे म्हणजे क्रांती असा संदेश देणारा रामदास; श्रमप्रतिष्ठा, सफाई व गरिबांशी एकरूपता साधून सुंदरपूर येथे संस्कृतिमंदिर उभारण्यास चालना देणारा 'नवा प्रयोग'मधील सखाराम; स्त्रियांची व अस्पृश्यांची गुलामगिरी संपविण्यासाठी प्रयत्नशील असणारी 'रामाचा शेला' मधील सरला, ही गांधीजींना अभिप्रेत असलेल्या समाजवादी भारताच्या नवनिर्माणासाठी कृतिशील असणारी पात्रे आहेत. साने गुरुजींच्या वाङ्मयाचे हे प्रयोजनमूल्य लक्षात न घेतलेल्या काही टीकाकारांनी त्यांच्या साहित्यात रडकेपणा आहे, अशी एक सर्वसाधारण समजुत रूढ केली होती. या टीकेच्या संदर्भात नरहर कुरुंदकर म्हणतात की, "गुरुजींच्या वाङ्मयातील जो रडकेपणा आहे, तो कर्तव्यनिष्ठांचा रडकेपणा आहे. या रडकेपणाला सामान्य जीवनातल्या रडलेपणापेक्षा काही वेगळे स्थान आहे, हे आमच्या टीकाकारांना नक्की वाचता आले नाही.. एक पिढी हे वाङ्मय रचताना रडली; आणि रडता रडता जेलमध्ये जायला तयार झाली. एक पिढी हे वाङ्मय वाचून कष्ट भोगायला तयार झाली. मार खायला तयार झाली. तेव्हा या वाङ्मयाने माणसाला दुबळे बनवले, हा चार्ज आम्ही मान्य करणार नाही. .. या वाङ्मयाने माणसाला त्यागाच्या प्रेरणा दिल्या आहेत; आत्महत्येच्या दिलेल्या नाहीत.. गुरुजींच्या वाङ्मयाचा परिणाम मृत्यूची आसक्ती नाही. गुरुजींच्या वाङ्मयाचा परिणाम आहे- जीवनाची आसक्ती; त्या जीवनासक्तीमध्ये विशिष्ट प्रकारचे परिवर्तन घडवून आणण्याची आसक्ती; आणि ते परिवर्तन घडविण्याच्या प्रयत्नात मरण आले तर ते स्वीकारण्याची तयारी... सामर्थ्य देणे आणि शिकवणे ही गोष्ट तितक्याच समर्थ मनाच्याशिवाय येत नाही. तर गुरुजींचे रडणे हे समर्थांचे रडणे आहे; त्याची वाङ्मयीन चिकित्सा करण्यात अर्थ नाही." ( प्रधान, २००७, पृ. ८९-९०-)

मराठी कादंबरीचे आशयविश्व समकालीन राजकीय सामाजिक वास्तवाचे प्रक्षेपण करीतच साकार झालेले दिसते. कादंबरीतल्या रंजनवादासाठी ज्यांची ख्याती होती अशा ना. सी. फडके यांच्या कादंबऱ्यांतल्या कथानकांना आणि पात्रसृष्टीलाही समकालीन राजकीय-सामाजिक वास्तवाची पार्श्वभूमी असायची. स्वत: ना. सी. फडक्यांनी 'शाकुंतल' (१९४३) कादंबरीच्या प्रस्तावनेत कादंबऱ्यांना राजकीय-सामाजिक पार्श्वभूमीचा अवकाश निवडण्यामागची त्यांची भूमिका स्पष्ट करताना म्हटले होते की, "१९४२ सालातल्या एका प्रातिनिधिक महाराष्ट्रीय तरुण मुलीच्या जीवनाचा विकास, तिचं पितृप्रेम, तिचा पहिला प्रीतिभाव, तिचा संसाराचा अनुभव, निराशा, दु:ख, पुन्हा भेटलेलं सुख इत्यादींचं चित्रण मला करायचं होतं.. आणि देशाच्या त्यावेळेस चालू असलेल्या सरकारविरोधी चळवळीचा गौरव करावा.. तशी कृत्यं करण्याची इच्छा लोकांच्या मनांत पर्यायानं निर्माण करावी, चालू

महायुद्धाबद्दल निषेध व्यक्त करावा.. या महायुद्धात लोकांनी ब्रिटिश सरकारच्या बाजूनं लढावं असं म्हणणाऱ्यांचा दृष्टिकोण किती चुकीचा आहे ते स्पष्ट सांगावं, इत्यादी हेतू मनाशी ठेवून मी 'शाकुंतल' कादंबरी लिहिली होती." (फडके, १९६४, पृ.१८) या कादंबरीत राजकीय प्रक्षोभ व राजकीय चळवळ करणाऱ्यांनी देशभरात चालवलेल्या घातपाताच्या कृत्यांची वर्णने येतात, ती केवळ पार्श्वभूमी म्हणून येत असली, तरी त्यापाठीमागे लोकांच्या मनात अप्रत्यक्षपणे राष्ट्रभावना चेतवण्याचाच लेखकाचा हेतू होता, हे त्यांच्या उपरोक्त भूमिकेवरून लक्षात येते. त्यामुळेच सरकारने या कादंबरीवर जप्ती आणली होती. फडक्यांच्या यापूर्वीच्या 'निरंजन' (१९३२) व 'प्रवासी' (१९३७) ह्या कादंबऱ्या रोमँटिक धाटणीच्या असल्या तरी त्यांनाही राजकीय पार्श्वभूमी होती. 'निरंजन' कादंबरीला गांधीजींच्या १९३० च्या सत्याग्रहाची पार्श्वभूमी आहे. 'प्रवासी' कादंबरीत तर लोकमान्य टिळकांपासून म. गांधींपर्यंतच्या महाराष्ट्रातील राजकारणाचा समग्र पट पार्श्वभूमी म्हणून येतो. या कादंबरीचा नायक राजाभाऊ स्वच्छंदी जीवन जगणारा असतो; पण तो सत्याग्रहात सहभागी होतो. असहकारितेच्या आंदोलनात सहभाग घेतो एवढ्या कारणावरून नायकाच्या प्रेमात पडणाऱ्या नायिका फडक्यांच्या कादंबरीत भेटतात. त्यांच्या 'झंझावात' (१९४८) कादंबरीचे सर्व कथानक १९४२ च्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर गुंफलेले आहे. 'आशा' (१९३७) कादंबरीला मुळशी धरणाच्या सत्याग्रहाची पार्श्वभूमी आहे. अर्थात निखळ राजकीय आशयद्रव्य केंद्रस्थानी ठेवून फडक्यांनी कादंबऱ्या लिहिल्या नाहीत. 'राजकीय कादंबरी' विषयी ना. सी. फडके यांची स्वत:ची भूमिका स्पष्ट केली होती. देशाच्या राजकारणातील पेचप्रसंग आणि व्यक्तीच्या आयुष्यातील पेचप्रसंग यांची कौशल्यपूर्ण सांगड घालून एकजिनसी कथानकाची निर्मिती करणे, एवढ्यापुरतेच राजकीय वास्तवाला ते कादंबरीत आणू इच्छित होते. राजकारण हा मराठी साहित्यिकांच्या कितपत आस्थेचा विषय होता, हे यावरून लक्षात येते.

वि. स. खांडेकर यांच्या कादंबरी लेखनावर साम्यवाद आणि गांधी तत्त्वज्ञानाचा थेट प्रभाव पडलेला दिसून येतो. खांडेकरांच्या कादंबऱ्यांत नेहरू सदरा आणि गांधी टोपी घालणारे, 'वंदेमातरम'चा मंत्र आळवणारे, साधी रहाणी आणि उच्च विचारसरणी असणारे नायक आणि सत्याग्रहात अंगावर लाठी झेलणाऱ्या नायकाच्या प्रेमात पडणाऱ्या नायिका भेटतात. गांधीजींचा मानवतावाद, खेड्यांच्या सुधारणांविषयीची त्यांची तळमळ, अस्पृश्यांवरील अन्याय दूर व्हावा याविषयीची धडपड या साऱ्या गोष्टींना खांडेकरांच्या कथानकांत स्थान मिळते. खेडी सुधारतील तरच देश सुधारेल; शहरांची सुधारणा करून देशाची उन्नती करणे हा 'कांचनमृग' आहे, अशी गांधीवादी दृष्टी 'कांचनमृग' (१९३१) या कादंबरीतून मांडण्यात आली आहे. श्रीमंती आणि गरिबी हे 'दोन ध्रुव' (१९३४) घेऊन कादंबरीचे कथानक गुंफताना खांडेकर गांधीवादी जीवनदृष्टीचा संस्कार रुजविण्याची

संधी घेतात. कामापूरच्या कामगारांमध्ये राहणारी वत्सला यंत्रामुळे शेकडो कामगार बेकार होऊ नयेत म्हणून विद्याधरकडून भाऊबिजेची ओवाळणी म्हणून यंत्रनिर्मितीचे कागद मागून घेऊन हस्तोद्योगाचे संरक्षण करते. प्रेमा कंटक यांच्या 'अग्नियान' (१९४२) कादंबरीतून गांधीजींच्या सत्याग्रहात, दारूबंदी अभियानात, जेल भरो आंदोलनात मराठी स्त्रिया कशा हिरीरीने पुढे येत होत्या याचे वास्तव चित्रण आले आहे. गांधीजींच्या ब्रह्मचर्याच्या कल्पनेवरही प्रेमा कंटक यांनी 'काम आणि कामिनी' (१९४२) नामक कादंबरी लिहिली.

वि. वा. शिरवाडकर यांनी आपल्या साहित्यनिर्मितीच्या प्रेरणांविषयी म्हटले होते की, "मी स्वातंत्र्यप्रेमी होतो, सत्यशोधक होतो, समाजवादी होतो आणि मराठी इतिहासाचा भाविक वाचकही होतो. माणसाने आपल्या वैचारिक साधनेसाठी मार्क्सच्या जाहीरनाम्याशिवाय दुसरे काही वाचण्याची गरज नाही असे एकीकडे वाटत होते. आणि त्याचबरोबर म. गांधींच्या अहिंसात्मक प्रतिकाराची आणि प्रेमात्मक संतत्वाची जाणीवही मन भारून टाकीत होती. नास्तिकतेचा पाठपुरावा करीत होतो, पण आत कोठेतरी झंकारणारी अस्तिकतेची एकतारी बंद होत नव्हती. सामान्यावर श्रद्धा होती, आणि असामान्यांच्या पूजनाकडेही ओढ होती." (रेगे पु. शि. संपा. १९७५, पृ. २८८) या भूमिकेमुळे शिरवाडकरांच्या कादंबरीत गांधीवाद आणि समाजवाद या दोन्ही तत्त्वदृष्टींचा समन्वय पहायला मिळतो. त्यांची 'वैष्णव' कादंबरी १९४६ साली प्रसिद्ध झाली. या कादंबरीतील कथानकाला १९४२ च्या स्वातंत्र्यसंग्रामाची पार्श्वभूमी आहे. स्वत: शिरवाडकर मुंबईच्या गवालिया टँकवर झालेल्या ४२ च्या काँग्रेसच्या ऐतिहासिक अधिवेशनात हजर होते. गांधीजींचे मंत्रभारले भाषण त्यांनी अनुभवले होते. ४२ चे हे आंदोलन खेड्यापाड्यात पोहचले होते, त्याविषयी एका गुप्त बुलेटिनमध्ये वाचनात आलेल्या एका बातमीतून त्यांना या कादंबरीच्या कथानकाचे आशयसूत्र सापडले होते. स्वत: शिरवाडकरांनीच त्याविषयी लिहून ठेवले आहे की, "कोणत्यातरी खेडेगावातील एक शाळामास्तर मुंबईत आला होता. तेथे पेटलेल्या यज्ञकुंडातून स्फूर्ती घेऊन तो माघारी आपल्या गावी गेला आणि तेथे त्याने बंडाचे निशाण उभारले. अशा आशयाची ती आठदहा ओळींची बातमी होती." (शिरवाडकर, १९७९, पृ. २४) या कादंबरीत गांधीजींच्या देशभक्तीच्या भावनेचा अंतरात्म्याला स्पर्श होताच राजकारणापासून अलिप्त रहाणाऱ्या या शाळा मास्तरचे वैष्णवीकरण कसे होते ह्याविषयीचे कथानक गुंफले आहे. ह्या कादंबरीचा तोंडवळा राजकीय असला तरी महाराष्ट्र संस्कृतीच्या घडणीतल्या अंत:प्रवाहांचा सुरेख संगम साधला आहे. मुरारवाडी ह्या खेड्याची पार्श्वभूमी असलेल्या या कादंबरीत संतांचा वैष्णवमार्ग अनुसरणारा महाराष्ट्र, शूद्रांच्या अस्मिताजागरणाची चळवळ बांधणारा सत्यशोधकांचा महाराष्ट्र, जातिधर्मभेदाच्या खुंट्या बाजूला सारून

गांधीजींच्या सत्याग्रहाच्या व ग्रामोद्धाराच्या चळवळीत सामील होणारा महाराष्ट्र, मुंबईच्या गिरणगावातल्या कामगार चळवळीतला वंचितांच्या हक्कांसाठी संघर्ष करणारा पुरोगामी मूल्यधारणांना अनुसरणारा महाराष्ट्र अशा सर्व अंत:प्रवाहांचा एकमेळ साधला गेला आहे. या कादंबरीतला रंभाजी पाटील हा सत्यशोधक चळवळीत तयार झालेला कार्यकर्ता आहे. मुरारवाडीत राहूनही कोल्हापूरच्या शाहू छत्रपतींशी थेट संवाद साधण्याइतका तो प्रगल्भ आहे. शिरवाडकरांनी याविषयी लिहिले आहे की, "सत्यशोधक चळवळ ही आवश्यक, ऐतिहासिकदृष्ट्या अपरिहार्य अशी चळवळ होती. तिच्यात जागृत झालेला बहुजनसमाजाचा स्वाभिमान पुढे राष्ट्रीय आंदोलनाच्या, अधिक व्यापक अशा प्रवाहाला मिळाला." ह्या विचारातून ब्राह्मण विनायकराव व मराठा रंभाजी यांचे मैत्र या कादंबरीत रेखाटले आहे. "मास्तर तुम्ही ब्राह्मण आहात, मी मराठा आहे. आणि तरीसुद्धा आपली एक जात आहे" अशा शब्दात रंभाजी विनायकरावांना आपल्या मैत्रभावाचे बीज उलगडून सांगतो. विनायकराव मास्तर हा ब्राह्मणी संस्कारांचा, दत्तोपासक, पण गांधीजींचा भक्त आहे. राजकारण हे आपले काम नाही अशी धारणा असतानाही गांधीजींच्या देशभक्तीची लागण होताच तो अंतर्बाह्य बदलतो आणि समग्र गावाचे नेतृत्व करतो. तसाच रंभाजीही ह्या लढ्यात स्वत:ला झोकून देतो. शिरवाडकरांनी त्यासंदर्भात म्हटले आहे की, "विनायकराव रंभाजीसारखीसारखी कितीतरी माणसे बेचाळीसच्या लढ्यात होती. भावनेच्या एका झंझावाती आवेगात ती व्यक्तिगत कोशातून बाहेर पडली आणि असामान्यत्वाला पोहोचली. .. वैष्णव कादंबरी म्हणजे माझे या वीरांना केलेले एक अभिवादन होय." (शिरवाडकर, कित्ता, पृ. २६) या कादंबरीतील मालोजी महाराज ही व्यक्तिरेखा संत गाडगेबाबा आणि संत तुकडोजी महाराज या समकालीन संतांच्या गुणविशेषांवर बेतलेली आहे. सामजिक सुधारणांचे धर्मसंकीर्तन करताना गांधीजींना अभिप्रेत असलेली ग्रामसुधारणा, स्वच्छता, साक्षरता, अस्पृश्यतानिर्मूलन आणि वैष्णववृत्तीचे मूल्य पेरण्याचे काम मालोजी महाराज आपल्या कीर्तनातून करीत असतात. समाजाचे वैष्णवीकरण ह्या मध्यवर्ती कल्पनेवर आधारलेली ही कादंबरी गांधीजींच्या जीवनदृष्टीने भारावून राष्ट्रकर्तव्य म्हणून आपली वाङ्मयीन बांधिलकी निभावण्याचेच काम करीत होती.

गांधीजींची व्यक्तिरेखा आणि त्यांचे तत्त्वज्ञान ह्या विषयावर या काळात बरीच नाटके लिहिली गेली. गांधीजींच्या असहकार आंदोलनामुळे व विदेशी वस्तूंवरील बहिष्काराच्या कार्यक्रमामुळे तरुण पिढीत स्वराज्याच्या लढाईत उतरण्याची उर्मी वाढू लागली होती. या बदललेल्या राजकीय संदर्भाचे पडसाद मराठी साहित्यातही उमटू लागले होते. मामा वरेरकर यांच्या 'सत्तेचे गुलाम' (१९२२) या नाटकातला नायक वैकुंठ गांधीजींच्या ग्रामोद्धाराच्या तत्त्वज्ञानाने प्रेरित होऊन शहरात वकिली करायचे सोडून खेड्यात जाऊन

राहतो आणि स्वत: शेती करून तेथील जनतेशी समरस होण्याचे व्रत निभावतो. प्र. के. अत्रे यांच्या 'वंदे भारतम्' व 'मी उभा आहे' या नाटकातील नायकही जनतेशी समरस होऊन राजकारण करण्याचे व्रत निभावतात. वीर वामनराव जोशी यांनी 'रणदुंदुभी' (१९२७) नाटकातून बंदिहुकूम तोडून राष्ट्रध्वजाचा सन्मान करणाऱ्या झेंडा सत्याग्रह चळवळीचे दर्शन घडविले. वि. वा. हडप यांनी गांधीजींच्या अहिंसावादी विचारांचा पुरस्कार करणारे 'सं. देवकी' (१९३२) व स. अ. शुक्ल यांनी गांधीजींच्या 'सत्य' संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवून 'सं. सत्याग्रही' (१९३३) हे नाटक लिहिले. कृ. प्र. खाडिलकर यांच्या 'त्रिदंडी संन्यास' (१९३६) या नाटकातील कृष्ण गांधीजींच्या मार्गाने जातो असे चित्रण करण्यात आले आहे. सामाजिक उद्बोधनासाठी लिहिल्या गेलेल्या नाटकात त्र्यं. सी. कारखानीस यांच्या 'राजाचे बंड' नाटकातून गांधीजींना अभिप्रेत असलेल्या लोकराज्याचा पुरस्कार करण्यात आला होता.

गांधीजींना अभिप्रेत असलेला अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न वरेरकरांच्या 'तुरुंगाच्या दारात' (१९२२) नाटकाची विषयवस्तू बनून येतो. अस्पृश्यता हा एक प्रकारचा तुरुंग असल्याची कल्पना या नाटकाच्या केंद्रस्थानी आहे. तुरुंगाच्या दारात उभे राहून अस्पृश्यांनी स्पृश्यांना अस्पृश्यता घालविण्यासाठी केलेले आवाहन, स्पृश्यांचे हृदयपरिवर्तन होऊन अस्पृश्यतेच्या बंदिवासातून हरिजनांची सुटका अशा आशयाचे हे कथानक होते. स्पृश्यास्पृश्यतेविषयीचा उच्च वर्णियांचा दृष्टिकोन बदलावा या भूमिकेतून 'पतितपावन' (१९३१)च्या कथावस्तूची मांडणी वरेरकर करतात. न. रा. ढोले यांनी काळाराम मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहाच्या वेळी सनातनी व अस्पृश्योद्धारक यांच्यात जो संघर्ष झाला, त्या पार्श्वभूमीवर आधारित 'पतितोद्धार' (१९३२) हे नाटक लिहिले. वि. दा. सावरकर हेही या काळात अस्पृश्यतानिवारणाच्या कामात पुढाकार घेणारे कर्ते सुधारक होते. त्यांनी स्वत: चोखामेळ्याच्या जीवनाची पार्श्वभूमी असलेल्या 'उ:शाप' नाटकातून स्पृश्य वर्गाला अस्पृश्यांबद्दलच्या जबाबदारीची जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला होता. अस्पृश्यांनी धर्मांतर करू नये असेही या नाटकातून सुचविण्यात आले होते. राजकीय चर्चाविश्वात गांधीजींचा प्रभाव असल्याने या काळातील ऐतिहासिक नाटकातही हिंदू-मुस्लीम ऐक्य, अस्पृश्यता निवारण, ब्रह्मचर्य इत्यादी विषय येऊ लागले होते. अच्युतराव कोल्हटकरांनी 'नारिंगी निशाण' या नाटकातून अखिल हिंदू ऐक्याचा विषय आणला, गुप्त्यांनी 'हिरा हरपला' या नाटकातून ब्रह्मचर्याचा व गिरिजाबाई केळकर यांनी 'आयेशा' नाटकातून हिंदूवर प्रेम करणाऱ्या मुसलमान स्त्रीचा आगळावेगळा आविष्कार घडविला. वि. गो. शेट्ये यांनी हिंदू-मुस्लीम ऐक्याच्या समस्येवर 'रामरहीम' (१९३४) हे नाटक लिहिले. वीर वामनराव जोशी यांचे 'रणदुंदुभी' नाट्क पारतंत्र्याची चीड निर्माण करते. गांधीजींचे तत्त्वज्ञान आणि राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा यांचा असा नाटककारांवर गडद

प्रभाव होता.

मराठी कवींवरही गांधीजींच्या जीवनाचा प्रभाव होता. गांधीजींच्या लोकनेतृत्वाचा गौरव करणाऱ्या कविता अज्ञातवासी ('सत्ययुगाचा यात्रिक'), यशवंत ('अढळ सिंहासन'), साने गुरुजी ('महात्माजीस'), बा. भ. बोरकर यांनी लिहिल्या. बा. भ. बोरकर यांना गांधीजींच्या व्यक्तिमत्वात मांगल्याचे, त्यागाचे, पावित्र्याचे दर्शन घडले. 'भंग्याघरी हरि अवतरावा' तसे गांधीजींच्या अस्पृश्यांविषयीच्या कळवळ्याचे दर्शन त्यांनी अनुभवले होते. गांधीजींच्या पूजामूर्तीला त्यांच्या कवितेत श्रद्धेचे स्थान लाभले होते. 'महात्मायन' हे महाकाव्य लिहिण्याचाही त्यांनी संकल्प सोडला होता, पण तो अपूर्ण राहिला. माधव जूलियन यांनी 'महात्मा काय करील एकला' (१९२१) या कवितेतून गांधीजींच्या सत्य, अहिंसा आणि प्रेमाच्या तत्त्वज्ञानाने निर्माण झालेल्या चैतन्याचे दर्शन घडविले. भा. रा. तांबे यांनी गांधीजींच्या असहकार आंदोलनावर 'मोहिनी' ही कविता लिहिली. गांधीजींच्या हत्येनंतर मनमोहन यांनी 'बापूजींची प्राणज्योती' कवितेतून गांधीजींच्या महात्मतेचे शब्दचित्र रेखाटले :

"ती पहा ती पहा बापूजींची प्राणज्योती
तारकांची सुमनमाला देव त्यांना वाहती
झुंजला राजासवे हा, रंगला रंकासवे हा
पेटता देहेही आता, दिव्यता दावून जाती
चंदनाचे खोड लाजे हा झिजे त्याहुनिही
आज कोटी लोचनींच्या अश्रुमाला सांडती
पृथ्वीच्या अक्षांशी लाली, पृथ्वीच्या रेखांशी लाली
चार गोळ्या ज्या उडाल्या, दशदिशांना कापती
नाव ज्याचे ऐकुनीया थरकली सिंहासने
ना करी तल्वार होती, हा अहिंसेचा पुजारी
सत्य मानी देव आणि झुंजला खोट्यासवे
मृत्युच्या अंतीम वेळी नाव रामाचे मुखी
सिंधु गंगा आणि यमुना धन्य झाली अस्थिंनी
राख तुझी भारताच्या तिलक घाली ललाटी"

(मनमोहन, १९७१, पृ. ९२)

कवी बा. सी. मर्ढेकर यांनी गांधीजींच्या हत्येनंतर तरी आपल्याला शहाणपण यावे असे पसायदान मागणारी कविता लिहिली :

"फुटेल (होती वेडी आशा)
आभाळाचा कर्मठ सांधा;

पडेल किंवा भयंकर
वसुंधरेच्या अर्ध्या अंगा
असे न काही घडले : फक्त
अनंत उठले सुतकी शब्द;
दो मिनिटांची सडी शांतता
शहारली अन् मिटली लब्धप्रतिष्ठितांवर"
-वदला पौष
जाता जाता या माघाला
अन् इसवी सन कवायतीचा
कदम उचलुनी पुढे सरकला
-अशीच जावी कांही वर्षे
आणि महात्मा यावा पुढचा;
अम्हांस आम्ही पुन्हा पहावे
काढुनि चष्मा डोळ्यांवरचा! " (मर्ढेकर १९५९, पृ. ७८)

स्वतंत्र्यलढा ऐरणीवर येत असतानाच हिंदू-मुस्लिमांतला अविश्वास वाढत होता; धार्मिक दुफळीने राजकीय वातावरण गढुळले होते. राजकारणातली दांभिकता आणि मूल्यऱ्हासाविषयीचे भाष्य मर्ढेकरांनी पुढील कवितेतून अभिव्यक्त केले आहे :

"कां हो माजवितां दुही / माखतां स्वातंत्र्याची वही
स्वजनरक्ताने प्रत्यहीं / लळथळां //
गातां धर्मांचे पवाडे / उघडीं झालेलीं कवाडें
दाविती अब्रूचीं की हाडें / टांगलेलीं //
अरे हिंदू-मुसलमान / प्राण देशावरी कुर्बान;
परी यादवी ही लांछन / अल्ला-रामां //
जो जो उठे तो तो नेता / मारी लंब्याचवड्या बाता;
परि हुल्लडीचा नियंता / कोणी नाहीं //
शब्दशूर वाचीवीर / ऐसे पुढारी थोर थोर,
जयीं प्रेतांचा बाजार / बोलवीला //
केला धर्माचा लिलाव / बुरखेवाली सत्ता-हाव,
येथे तुम्हां आम्हां राव / मात्र मौत //
जे जे म्हणविती पुढारी / वेळ येतां देती तुरीं;
सुरा पाठींत, छर्रा उरीं / तुम्हां आम्हां //
बोला अल्ला है राम / करा पैगंबरा प्रणाम;

आहे तुम्हां आम्हां हराम / बंधुद्वेष //
कुठे गया, कुठे मक्का / हत्याकांड येथे फुका;
भुकेकंगालिस्तान का / झिंदाबाद? //

सत्तेच्या अभिलाषेने धार्मिक दुहीचे चालणारे राजकारण, त्यातून निर्माण होणाऱ्या दंगली आणि बंधुभावाच्या बाता बोलणाऱ्या पुढाऱ्यांचा दांभिकपणा या तत्कालीन राजकीय वातावरणाचा आलेख या कवितेतून साकार झालेला आहे. शांती, सलोखा आणि द्वेषबुद्धीचा निरास करण्याची शिकवण देणाऱ्या गया आणि मक्का ह्या धार्मिक पिठांचा उद्घोष एकीकडे आणि राजकीय सत्ताकारणात धर्माच्या नावाखाली चालणारी हत्याकांडे दुसरीकडे हा अंतर्विरोध या कवितेतून उत्कटत्वाने व्यक्त झाला आहे.

कवी मनमोहन यांनी 'युगायुगांचे सहप्रवासी'(१९४६) या खंडकाव्यातून हिंदू-मुसलमानांतील सनातन संघर्षाची कहाणी कथन केली. या काव्यातील हिंदू नायकाची मुंबईतल्या नळबाजारात मुसलमान जमावाकडून हत्या झालेली असते, आणि त्याला मारणाऱ्या उस्मानचीही हिंदूकडून हत्या झालेली असते. ह्या दोघांना पुनर्जन्म लाभतो तेव्हा त्यांच्या धर्मांची उलटापालट झालेली असते. पण नंतरच्या आयुष्यातही धर्मवेडापोटी होणाऱ्या दंगली आणि हत्याकांडाचे पर्व संपत नाही; अशा आशयाचे कथानक असलेली ही कविता धार्मिक रुग्णतेने होणाऱ्या मानवतेच्या हानीविषयी चिंता व्यक्त करते. श्री. ना. पेंडसे यांच्या 'एल्गार' (१९४७) कादंबरीतून हिंदू-मुस्लिम संबंधात राजकारणामुळे येणाऱ्या विकृतींचे वास्तव चित्रित करण्यात आले आहे. हिंदू-मुसलामानांत स्वाभाविकपणे नांदणारा सामाजिक सलोखा या राजकारणामुळे गढूळला व परस्परांविषयी संशय वाढत गेला; धार्मिक मूल्यांना डावलून, विवेक गुंडाळून ठेवून हिंसा आणि क्रौर्याच्या घटना समाजात सर्रास घडू लागल्या हे वास्तव 'एल्गार' कादंबरीतून मांडले गेले. स्वातंत्र्योत्तर काळात १९५० पर्यंतच्या कालमर्यादेत फारसे राजकीय साहित्य लिहिले गेले नाही. फाळणीच्या वेळच्या पूर्वबंगालमधील परिस्थितीचे वास्तवदर्शन श्री. रा. बिवलकर यांनी 'सुनीता' कादंबरीतून चित्रित केले. गांधीहत्येनंतर महाराष्ट्रात ब्राह्मणांविरुद्ध उठलेल्या लोकक्षोभाचे वास्तव व्यंकटेश माडगूळकर यांनी 'वावटळ' कादंबरीतून चित्रित केले. असे काही अपवादात्मक लेखन या काळात झाले आहे.

आतापर्यंतच्या तपासातून टिळकसंप्रदायी, साम्यवादी, गांधीवादी विचारांच्या प्रभावळीतल्या साहित्यकृतींचा आपण मागोवा घेतला. राजकारण हाच मध्यवर्ती विषय ठेवून निखळ राजकीय साहित्यकृती लिहिण्याकडे मराठी लेखकांचा कल फारसा नव्हता; मात्र फुटकळ स्वरूपात का होईना राजकारणाला आपल्या लेखनात स्थान देण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती आढळते. मराठी साहित्यकृतीतून समकालीन राजकीय वास्तवाचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष दर्शन घडतच असले, तरी राजकारणाचे चित्रण बऱ्याचदा नायकाच्या

व्यक्तिमत्वाला उठाव देण्यासाठी पार्श्वभूमीसारखा केला गेला जात असे. वा. म. जोशी आपल्या कादंबऱ्यांतून सत्तास्पर्धेचे कथानक रंगवण्यापेक्षा राजकीय तत्त्वचर्चांना प्राधान्य देतात. दत्तो आप्पाजी तुळजापूरकर 'माझे रामायण' (१९२७ ) ही कादंबरी जालियनवाला बागच्या राजकीय पार्श्वभूमीला केंद्रस्थानी ठेवून लिहितात; पण त्यात कुठेही सूत्रबद्ध राजकीय आशयसूत्र वा तत्त्वज्ञान आढळत नाही. देशभक्तीने भारवलेल्या नायकाला फाशीच्या तक्तावर चढवणाऱ्या , ह्या गोऱ्या लोकांविषयी चीड असणारी नायिका फाशीच्या तक्तावर चढण्यापूर्वी देशभक्त वीरनायकाबरोबर लग्न करण्याची रोमँटिक महत्त्वाकांक्षा बाळगते; पण अशा साहस व उत्कंठावर्धक कथानकाचा आशय कुठेही राजकीय मूल्यमीमांसेकडे वळत नाही. (ल. ब. भोपटकर : मृत्यूच्या मांडीवर,१९३१) 'मुक्तात्मा' (१९३३) या कादंबरीतून माडखोलकरांनी तरुण पिढी समाजवादाकडे कशी आकर्षित होत आहे, याचे चित्रण केले आहे; किंवा पु. य. देशपांडेंचा कथानायक समाजवादाने भारावून राजकारणात उतरतो (काळी राणी : पु. य. देशपांडे, १९४१) पण समाजवादी समाजरचनेचे प्रारूप काय आणि ते कसे समाजात रूजवावे यावर या दोन्ही कादंबऱ्यांत भर दिला जात नाही. भा. वि. वरेरकर यांच्या 'मी रामजोशी' (१९४१) या कादंबरीतून वकील-बॅरिस्टर अशा शहरी मध्यमवर्गीयांच्या हाती केंद्रित झालेल्या तत्कालीन काँग्रेसच्या राजकारणाविषयीचे आकलन नोंदवण्यात आले आहे. ग्रामीण सामान्य जनतेला काँग्रेसविषयी आस्था असली, तरी नेतृत्व अद्याप गावपातळीवर आलेले नव्हते. काँग्रेसच्या संघटनात्मक बांधणीच्या अशा अभावात्मक पैलूंची सम्यक चिकित्सा मात्र या कादंबरीत आढळत नाही. वरेरकरांनी गांधीजींच्या तत्त्वज्ञानाला अनुसरणारे नायक आपल्या कादंबऱ्यांतून निर्माण केले; मात्र त्यांना आपल्या पांढरपेशा मध्यमवर्गीय भावविश्वातून बाहेर पडून गांधीमय होता येण्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रवासाचे उत्क्रमण साधलेले दिसत नाही. त्यांच्या 'फाटकी वाकळ' (१९४१) कादंबरीचा नायक म्हणतो त्याप्रमाणे, "मी खेड्यात आलो खरा, पण अजुनही वास्तवाचा खरा बोध मला झालेला नाही. अजून पुष्कळ गोष्टी करायच्या होत्या. कितीतरी बेत आखून ठेवण्यात आले होते. आजुबाजूच्या शेतकऱ्यांच्या जीवनाकडे एकदा नजर फिरवून त्यांना कोणत्या कामाला लावता येईल हे ठरवायचे होते." सूतकताई, हातमागावर कापड विणण्यातला अनुभव, श्रमदान, अस्पृश्योद्धाराच्या उपक्रमातली सामिलकी यातून आत्मदर्शनाची वाट प्रशस्त होत गेल्याचे चित्रण क्वचितच दिसते. त्यामुळे गांधीवादी राजकारणाचे जीवनमूल्य पचवणारे नायक मराठी कादंबरीत आढळत नाहीत. 'महाराष्ट्राला राजकारणाची आवड पिठले-भाताइतकीच मोठी आहे, असे म्हणतात, पण ही आवड मोठ्या आवाक्याच्या यशस्वी कादंबरीच्या रूपाने व्यक्त झाली नाही... बिनीच्या लेखकांनी राजकीय समरप्रसंग असणाऱ्या, राजकीय वातावरणाने भारून टाकणाऱ्या व स्वातंत्र्यपूर्व काळातील

जनमनाचा प्रत्यक्षदर्शी अनुभव देणाऱ्या कादंबऱ्या लिहिल्या नाहीत." (बांदिवडेकर,१९८९, पृ. ६८-६९) हा आक्षेप सर्वार्थाने खरा असला, तरी समीक्षेतील वाङ्मयीन मूल्यादर्शानुसार 'राजकीय साहित्या'चे मूल्यांकन करणे इथे अभिप्रेत नसल्याने त्याविषयीची चर्चा करण्याचे टाळले आहे. लोकमानसाच्या सामूहिक नेणीवेतील राजकीय जाणिवांचा थेट आविष्कार पुण्यातल्या गणेशोत्सवातल्या टिळकभक्तांच्या 'सन्मित्रमेळा'तून, ब्राह्मणेतर सत्यशोधक जेधे –जवळकरांच्या 'छत्रपती मेळा'तून, नाशिकच्या सावरकरभक्त क्रांतिकारकांच्या 'मित्रमेळा'तून आणि आंबेडकरांच्या नेतृत्वाला अनुसरणाऱ्या वंचित जनसमूहाच्या 'आंबेडकरी जलसा मंडळा'तून ' होत होता. या मेळ्यांमधून गायल्या जाणाऱ्या पदांतून महाराष्ट्राच्या राजकीय अंत:प्रवाहांचे स्वरूप यापूर्वीच्या 'राजकीय स्थित्यंतरा'च्या प्रकरणातून स्पष्ट करण्यात आले आहे; त्यामुळे त्याची इथे पुनरावृत्ती करण्याचे कारण नाही.

मराठी कवितेतही राजकीय आशयाच्या कविता लेखनाची परंपरा आढळते. केशवसुत, रे. ना. वा. टिळक, विनायक, कुसुमाग्रज या कवींच्या काव्यामागे स्वदेशप्रीतीचे आणि राष्ट्रीय अस्मितेचे भान होते. 'पूर्व दिव्य ज्यांचे त्यांचा रम्य भावी काळ' या सूत्रातून विनायकांची राष्ट्रीय कविता फुलली होती. या पन्नास वर्षांच्या काळात केशवसुतांच्या 'तुतारी'पासून कुसुमाग्रजांच्या 'क्रांतीचा जयजयकार'पर्यंत राष्ट्रीय भावना उद्दिपित करणाऱ्या कविता लिहिल्या गेल्या. राष्ट्राचे पूर्ववैभव गाणे, पारंतत्र्याबद्दल खेद प्रदर्शित करणे आणि स्वातंत्र्यप्राप्तीच्या लढ्याला प्रोत्साहन देणे या प्रेरणेतून मराठीत 'अग्निसंप्रदायी' कवितेचा प्रवाह निर्माण झाला. *'झेंडा बंडास्तव उभविला गेल्या पिढीने'* अशा काव्यरचनांतून व 'डंका', 'भगवा झेंडा' इत्यादी कवितांतून कवी बी यांनी हा वीररस आळविला. आनंदराव टेकाडे यांनी *"आनंदकंद ऐसा हा हिंद देश माझा"* अशा राष्ट्रीय भावोत्कर्षाच्या गझलरचना केल्या. राजकीय पारतंत्र्यातून मुक्तीचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणाईचे भावविश्व स्वा. सावरकर यांच्या कवितेतून अभिव्यक्त झाले आहे. *'मोक्ष मुक्ती ही तुझीच रूपे, तुला वेदांती स्वतंत्रते भगवती!'* अशा स्वरूपात स्वातंत्र्यदेवतेचे दर्शन सावरकरांनी घडविले. सावरकरांच्या 'मित्रमेळा' संस्थेशी संबंधित असलेले कवी गोविंद यांनी राष्ट्रीय कविता लिहिल्या. स्वातंत्र्यासाठी तुरुंगवास पत्करण्यासाठी ही देशभक्त पिढी सदैव अग्रभागी असे. कवी यशवंत या देशभक्तीचे वर्णन करताना म्हणतात, *"वाढू दे कारागृहाच्या भिंतींची उंची / मन्मना नाही क्षिती"*. कुसुमाग्रजांच्या कवितेतील स्वातंत्र्यवीरही *'मृत्यूंजय आम्ही, आम्हाला कसले कारागार?'* अशा शब्दात तुरुंगवासाचे भय न बाळगता स्वातंत्र्यलढ्यात उतरणाऱ्या देशभक्तांच्या भावनांचा प्रत्यय देतात. कुसुमाग्रजांच्या १९३२ ते १९४१ या कालखंडातल्या कविता 'विशाखा' (१९४२) काव्यसंग्रहात समाविष्ट झाल्या आहेत. त्यातील बहुतांश कवितांतून इंग्रजी

राज्यसत्तेविरुद्ध तरुणांच्या मनात उत्पन्न झालेल्या देशभक्तीच्या उर्मींचा प्रेरणास्त्रोत आहे. 'उष:काल', 'सूर्योदय' अशी स्वातंत्र्याचे आगमन सूचित करणारी शब्दकळा त्यांच्या कवितेत वारंवार आवृत्त झालेली आहे; किंबहुना यज्ञ, स्थंडिल, समिधा, निखारे अशा अग्निसंप्रदायी काव्यप्रतिमा त्यांच्या कवितेचे संघटनतत्त्व बनल्या होत्या. 'जालियनवाला बाग', 'वेडात मराठे वीर दौडले सात' अशा कवितांतून स्वातंत्र्यासाठी आहुती देणाऱ्या वीरनायकांचे गौरवगान कुसुमाग्रजांनी केलेले आहे. 'डमडमच्या तुरुंगात' अर्थात 'क्रांतीचा जयजयकार' ही कविता १९४२ च्या आंदोलनातील राजबंद्यांचेही प्रेरणास्तोत्र बनली होती. ही कविता लिहिली तेव्हा कुसुमाग्रज पुण्याच्या 'दै. प्रभात'मध्ये संपादकीय कचेरीत काम करीत होते. २५ जुलै १९३९ रोजी बंगालातील डमडमच्या तुरुंगातील कम्युनिस्ट राजबंद्यांनी साम्राज्यवादी सत्तेच्या जुलुमाचा निषेध करीत अन्नत्याग सुरू केला होता. याच काळात लाहोरच्या तुरुंगात 'इन्किलाब झिंदाबाद' अर्थात 'क्रांती चिरायू होवो' अशी घोषणा लोकमानसात बिंबवणारे भगतसिंग व बटुकेश्वर दत्त हे राजबंदी शिक्षा भोगत होते. कुसुमाग्रजांचे कविमन या राजबंद्यांच्या त्यागाने आणि स्वातंत्र्याकांक्षेने भारावलेले होते. त्यातूनच त्यांनी 'क्रांतीचा जयजयकार' ही कविता लिहिली. "अन्नत्याग करून मृत्यूच्या दारात पाऊल टाकताना राजबंद्यांच्या ओठावर स्फुरलेले गाणे" असे स्वत: कुसुमाग्रजांनीच या कवितेचे वर्णन केले आहे. या कवितेचा मध्यवर्ती आशय पुढील कडव्यातून लक्षात येईल :

"कशास आई, भिजविसी डोळे, उजळ तुझे भाल
रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उष:काल
सरणावरती आज आमुची पेटताच प्रेते
उठतील त्या ज्वालांतून भावी क्रांतीचे नेते
लोहदण्ड तव पायांमधले खळखळा तुटणार
आई, खळखळा तुटणार
गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार."

हे क्रांतिसूक्त पारतंत्र्यातून मुक्त होऊ इच्छिणाऱ्या भारतीयांच्या भावनेचे प्रातिनिधिक दर्शन घडविणारे आहे. श्रीकृष्ण पोवळे यांनी अशीच अग्निसंप्रदायी कविता लिहिली. त्यांच्या कवितासंग्रहाचे नावच मुळी 'अग्निपराग' असे होते. 'रुद्रवीणा' हा कवी वा. रा. कांत यांचा संग्रहही या अग्निसंप्रदायात मोडतो. वसंत बापट यांनी 'शिंग फुंकले रणी', 'सदैव सैनिका पुढेच जायचे' यासारखी स्फूर्तिगीते रचली. *'ठिणगी फुटेल जोसात, येईल विजेच्या वेषात'* अशा शब्दांच्या ठिणग्या उडवीत ही अग्निसंप्रदायी कविता आविष्कृत होते. कवी मनमोहन यांनी 'राजकवी'ना थोबाडाया'नामक कवितेतून इंग्रजी सत्तेची लाचारी पत्करणारे संस्थानिक आणि संस्थानिकांची लाचारी पत्करणारे राजकवी

या दोघांचे उपहासगर्भ चित्र रेखाटले आहे :

"इंग्रजी राज्यामधले भारत / शालन! त्यातले 'पिबळे तुकडे'
जस्ती तल्वारी मॅनातुन / घालून फिरती नागडे
त्याचे 'भाट' पाहून मनी मी – जेव्हा शरमुनिया गेलो
'राजकवीं'ना थोबाडाया / लोककवी मी पहिला झालो."

स्वातंत्र्याकांक्षा हे मराठी कवितेचे प्रेरणास्थान होते, हे यावरून लक्षात येते.

## ७.५. हैद्राबाद संस्थानातील वाङ्मयीन प्रवाह :

भगवान रघुनाथ कुलकर्णी उर्फ बी रघुनाथ (१९१३-१९५) यांच्या कथा-कादंबऱ्यांना हैद्राबाद संस्थानातले निजाम राजवटीतले राजकीय वास्तव आणि तेथील हिंदू मुस्लीम संस्कृतीच्या जीवनशैलीची पार्श्वभूमी आहे. बी रघुनाथ हे स्वत: २० वर्षे हैद्राबाद संस्थानात बांधकाम खात्यात कनिष्ठ कारकूनाची नोकरी करीत होते. संस्थानातल्या गुलामगिरीचा आणि स्वातंत्र्यचळवळीचा संदर्भ असलेल्या कथा त्यांनी लिहिल्या आहेत. 'प्रधानांचा दौरा', पैसा कुठे जातो', जनता लिंबे टाकळी' इत्यादी कथांतून आणि 'हिरवे गुलाब' कादंबरीतून निजाम राजवटीतल्या नोकरशाहीचे दर्शन घडते. 'नागझरीचे पाटील', 'रक्त आणि अश्रू', 'हत्याकांडातील तीन सर्ग' या कथांतून रझाकारांच्या अत्याचाराचे वास्तव समोर येते. हैद्राबाद संस्थानातल्या राजकीय वास्तवाचे चित्रण त्यांच्या कथा-कादंबऱ्यांतून येते. 'बाबू दडके' (१९४४) ह्या कादंबरीतला बाबू वार लावून शिकतो आणि स्वामी रामानंद तीर्थ यांच्या विचारांनी भारावून जाऊन हैद्राबादच्या मुक्तिलढ्यात सामील होतो.

'बेगम सकीना'या कथेला संस्थानी राजवटीतल्या नगरपालिकेच्या कारभाराची पार्श्वभूमी आहे. या कथेचा नायक मुबारक हा नगरपालिकेतला १२ रुपये पगारावर नोकरी करणारा शिपाई आहे. हाताखालच्या पाचसहा महारणींना दमदाटी करून, शिव्या हासडून काम करून घेणे हे त्याचे दैनंदिन कर्तव्यकर्म असते. पण मुबारक वृत्तीने रंगेल असतो. 'बडे ऐटसे चलनेवाले ! बडे शौकिन ! और खियालत घोडे हरवख्त हवापर उडानेवाले!' असे त्याच्या रंगेलपणाचे वर्णन कथालेखकाने केले आहे. हा मुबारक त्याच्या हाताखाली काम करणाऱ्या 'खुबसुरत' आणि वागण्यात नखरा असलेल्या सखु महारणीच्या प्रेमात पडतो. पुढे मुबारकचा वरचा अधिकारी सुपरिटेन तिच्या मोहबतीत पडतो आणि सखू महारीणची 'बेगम सकीना' होते. तिच्या ओळखीने आपल्याला बढती मिळू शकेल या आशेने मुबारक सकिनाला आवडणारा 'फाख्ता होला' घेऊन बंगल्यावर जातो. पण दारावरूनच मुबारकची हाकालपट्टी होते. अपेक्षाभंगाच्या दु:खाची ही गोष्ट असली तरी या कथेतून बी रघुनाथ यांनी तत्कालीन संस्थानी राजवटीतली लाचलुचपतीची व भ्रष्टाचाराची संस्कृती; मुस्लिम अधिकाऱ्यांची खाबुगिरी व ऐषआरामी भोगवादी वृत्ती आणि

खालच्या स्तरावर काम करणाऱ्या कष्टकऱ्यांच्या आयुष्यातले दारिद्र्य यांचे यथातथ्य चित्र उभे केले आहे.

'हिरवे गुलाब' (१९४३) या कादंबरीतून निजामी राजवटीतली नैतिकदृष्ट्या भ्रष्ट असणाऱ्या पोलिसांची दंडुकेशाही आणि धर्मांतराच्या राजकारणातून सामान्य माणसांच्या वाट्याला येणारी परिस्थितिशरणता यांचे वास्तव चित्रित करण्यात आले आहे. या कादंबरीतले अमीर आणि जानकीराम हे दोन्ही पोलिस स्त्रीदेहावर पाशवी अत्याचार करतात. जितांनी जेत्यांच्या स्त्रिया पळवायच्या या परंपरेचा वारसा अमीरच्या वागण्यातून दिसतो. "जलद सुरीच्या साहाय्याने बकऱ्यांच्या आणि कोंबड्यांच्या माना निर्विकारपणे कापण्याचा सराव असलेले अमीरचे हात कसल्याही अघोर कृत्याला सहज सिद्ध होऊ शकत होते" अशा शब्दात लेखकाने या पुरुषी कसाई वृत्तीचे वर्णन केले आहे. वासनांधता आणि निर्दयता याच त्याच्या जगण्याच्या प्रेरणा आहेत. त्याचा जन्मच मुळी क्रूरकर्मा दुलेखा आणि नवऱ्याचा खून करणाऱ्या कजाग नीलम यांच्या पोटी झालेला आहे. स्त्रीत्व कुस्करून टाकणाऱ्या पुरुषांच्या या स्वैराचारी दुर्वर्तनावर भाष्य करताना कादंबरीकार म्हणतो, "वासनेच्या पूर्तीसाठी विवाहसंस्थेसारखी आकर्षक, जन्मभर टिकणारी, थोडासा बिघाड झाल्यास पुन्हा दुरुस्त करता येणारी हक्काची अन् स्वतंत्र सोय असताना लोकांनी आडवळणाच्या या घराच्या पायऱ्या झिजवाव्या हे आश्चर्य होतं !" वासनेच्या उद्रेकात अमीरच्या हातून जनी नामक वेश्येची हत्या होते; जानकीराम त्याला खुनाच्या खटल्यातून वाचवतो आणि आश्रय देतो. गाव सोडून गेल्यावर अमीर धर्ममार्तंड बनतो. 'हिरवे गुलाब' कादंबरीतला दुसरा पोलिस जानकीराम हा मद्यपी उमाजी राऊत आणि वारकरी दिंडीत भक्तिभावाने सहभागी होणारी जानकी यांचा मुलगा आहे. उमाजीची वासनांधता आणि जानकीची सात्त्विकता असे दोघांच्या गुणविशेषांचे संमिश्रण त्याच्या व्यक्तिरेखेत आहे. जानकीरामचा पुढे फातिमा नावाच्या मुस्लीम स्त्रीशी संबंध येतो आणि फसत जातो. त्यातून सुटण्यासाठी तो अमीरची मदत मागतो; मात्र अमीर त्याला धर्मांतर करून मुस्लीम होण्याचा पर्याय पुढे करतो. नोकरीतल्या बढतीसाठी जानकीराम धर्मांतर करण्यास तयार होतो. यानिमित्ताने हैद्राबाद संस्थानातल्या हिंदूंचे धर्मांतर करण्याच्या मोहिमेचे वास्तव कादंबरीत येते. धर्मांतराच्या या प्रक्रियेचा आघात मानवी संवेदनशीलतेला कसे बधीर करून टाकतो याचे वर्णन कादंबरीत येते. संमतीने होणाऱ्या धर्मांतराच्या प्रक्रियेत आणि सक्तीच्या धर्मांतराच्या प्रक्रियेतला फरक कादंबरीकार अधोरेखित करतो : "धर्मांतराची प्रक्रिया यांत्रिकपणे सुरू होती आणि त्यात जानकीराम नव्हता. इस्लाम किंवा हिंदू धर्माची तत्त्वं जानकीरामला ठाऊक नव्हती, परंतु पिढ्यानुपिढ्या संस्कार झालेल्या त्याच्या मनाला आतून विकलता आली होती. .. त्याचं आत्मकुसुम शुष्क झालं होतं" आपल्या माणसांपासून आपण दुरावतो आहोत याचे शल्य

जानकीरामला डाचत राहाते. त्याच्या मनाच्या विचारशक्तीला गोठवून टाकणारी ही धर्मांतर प्रक्रिया लेखकाने या कादंबरीतून साक्षात केली आहे. कादंबरीत शेवटच्या भागात धरणगावच्या दिंडीवर मुसलमानांच्या हल्ल्याचा प्रसंग वर्णिला आहे. हिंदू-मुस्लीम वादात जानकीराम हिंदूंच्या बाजूने संघर्ष करतो आणि या लढ्यात अमीर आणि जानकीराम दोघांना मरण येते. हिंदू-मुसलमानांच्या धार्मिक तणावांची पार्श्वभूमी असलेल्या 'जगाला कळलं पाहिजे' (१९४९) या कादंबरीत लेखक म्हणतो, "इस्लामीयत्व किंवा हिंदुत्व ह्याच सर्वोत्कृष्ट गोष्टी नाहीत. ज्याच्याबद्दल अभिमान बाळगायला पाहिजे तो माणूसधर्म प्रसृत करण्यासाठी लक्षावधी सुधर्माश्रम स्थापन करणंच योग्य होईल.. स्नेहलतेनं, सांस्कृतिक मिश्रणानं उद्याची जी संस्कृती निर्माण होईल ती बाह्यत: धर्महीन असली तरी मानवधर्मावरच जगेल आणि वाढेल!" धार्मिक कलहाकडून धर्मातीत मानवधर्माकडे आपली वाटचाल झाली पाहिजे, अशी सांस्कृतिक आकांक्षा बी रघुनाथ यांच्या कादंबरीतून व्यक्त होते. 'बाबू दडके' कादंबरीतला धर्माभिमानी अजीज मानवतावादी बनल्याचे लेखक दाखवतो, किंवा 'जगाला कळलं पाहिजे' (१९४९) या कादंबरीतला बॅ. नाईक मुसलमान स्त्रीशी लग्न करतो, तेव्हा त्याला धर्माचा अडसर वाटत नाही. मानवता हाच खरा माणसाचा धर्म आहे, असला पाहिजे अशी मूल्यदृष्टी पेरणारे लेखन बी रघुनाथ यांनी केले आहे.

## ७.६. सामाजिक वास्तव : स्त्री-पुरुष संबंधांविषयीचे बदललेले दृष्टिकोण :

हिंदू समाजातील जातिवादाची मुळे मराठी माणसाच्या मूल्यधारणेत खोलवर रूजलेली होती; मात्र सत्यशोधकी व आंबेडकरी जलसे सोडल्यास जातीय वास्तवाची दखल मराठी साहित्यिकांनी फारशी घेतलेली दिसत नाही. अपवादाने काही नाटक-कादंबऱ्यांतून जातीय वास्तवाचे चित्र रेखाटण्यात आले आहे. भारतीय समाजमनातील वर्णजातिद्वेषाची भावना संपुष्टात यावी व निखळ मानुषतेच्या मूल्यांना अनुसरणारी समाजिक समरसता नांदावी ह्या उदात्त भावनेतून साने गुरुजींनी 'आस्तिक' (१९४०) ही कादंबरी लिहिली. आर्य-अनार्य यांच्यातील वर्णद्वेषाची पौराणिक कथा ही या कादंबरीची प्राथमिक विषयवस्तू आहे. मात्र या विषयवस्तूची हाताळणी गांधीवादी विचारधारेतून होत असल्याने ती केवळ भूतकाळाचे उत्खनन करणारी ऐतिहासिक गोष्ट अथवा पुराणकथा रहात नाही. तर ती भूतकालीन वर्णविद्वेषाच्या पारंपरिक चौकटीतून मुक्त होण्याची कथा म्हणून नव्या रूपात संरचित केली जाते. वर्णद्वेषाच्या या राजकारणाला सामान्य माणसांच्या जीवनात अग्रक्रम नसतो, हे सत्य या कादंबरीच्या माध्यमातून लेखकाने आपल्या वाचकांच्या नजरेला आणून दिले आहे. या कादंबरीतले आस्तिक ऋषीचे पात्र महत्त्वाचे आहे. आस्तिक ऋषी हे आर्यपुत्र होते आणि त्यांची आई मात्र नागकन्या होती. आर्यांची संस्कृती वाढावी यासाठी अनार्यांना नष्ट करावे, ही भूमिका स्वत: आस्तिक

ऋषींना मान्य नव्हती. उंबराच्या फळात असंख्य बिया आनंदाने रहातात, तसे नाग आणि आर्य यांनी न भांडता परस्पर सहकार्याने, आनंदाने रहावे, अशी त्यांची शिकवण होती. प्रेमाची पताका खांद्यावर घेऊन नाग व आर्य यांच्यात ऐक्य व्हावे यासाठी ते प्रयत्न करीत होते. आपल्या आश्रमातील तरुणांनी मानव्याची उपासना करावी, यावर त्यांचा कटाक्ष असे. मानव्याची साधना करणारे अगस्ती ऋषी; प्रेमभावाचे मूल्य प्रमाण मानणारे व जीवन सौंदर्यसन्मुख करण्याचा सल्ला देणारे शुक्राचार्य; भिन्न जातिवंशाचे घटक असूनही प्रेमबंधाचे मूल्य जपणारे व आपल्या वर्तनव्यवहारातून *'प्रेमाला जात नसते'* हा संदेश संज्ञापित करणारे नागानंद व वत्सला ही पात्रे गांधीवादी मूल्यादर्श जपणारी प्रातिनिधिक पात्रे आहेत. 'सर्व माणसे समान आहेत आणि समान हक्क आणि समान संधींसाठी ते पात्र आहेत' हे गांधीविचारधारेतील समतेचे मूल्य या कादंबरीतून आधोरेखित होते.

जन्मेजयाच्या सर्पसत्रात नागांची होळी होत असताना इंद्राने केलेली मध्यस्थी, युद्ध टाळण्यासाठी आस्तिकाने केलेली आत्मसमर्पणाची तयारी, शांतिसूक्ते गात राजाचे सैन्य परतवून लावणारी स्त्रियांची शांतिसेना, अशा विविध घटनानाट्यातून आर्य-नाग संघर्षाच्या कथेचा विकास साधीत गुरुजी कादंबरीच्या अखेरीस आर्य-नाग मीलनाचे सुंदर चित्र उभे करतात. द्वेषासाठी द्वेष नको, बहुजनसमाजातले प्रेमाचे धागे घट्ट राहोत हा विचार पुढे आणतात. आर्यांचा विष्णू व नागांचा सहस्त्र फणांचा नागदेव या दोन दैवतांच्या एकात्मतेतून शेषशायी भगवानाच्या निर्माणाचे, नव्या संमिश्र संस्कृतीचे एक आदर्श प्रारूप पुढे आणतात. अशा रीतीने या कादंबरीत मानव्याच्या आदर्श समाजरचनेचे एक स्वप्नचित्र पूर्ण झालेले असले, तरी भविष्यात ते खरोखर किती टिकेल याविषयीची साशंकताही साने गुरुजींनी कादंबरीच्या अखेरीस नोंदवून वाचकाला एक वास्तववादी धक्का दिला आहे. ही अखेरची घंटा अशी आहे :

"ज्या नागांची व आर्यांची आज एकी झाली त्यातूनही पुढे निराळे प्रश्न उत्पन्न होतील. आर्य लोक नागांची संस्कृती आत्मसात करतील, परंतु नागांना खाली लटकवतील. त्यांना एक प्रकारे ठिकठिकाणी अस्पृश्य करतील. त्यांच्या शेतीभाती जप्त करतील. त्यांना परावलंबी करतील. त्यामुळे आर्य व नाग यांच्या झगड्याऐवजी स्पृश्य व अस्पृश्य या नावाने झगडा सुरू होईल. परंतु त्याने घाबरून जाण्याचे कारण नाही. काही उदार स्पृश्य ह्या अस्पृश्यांना पुन्हा प्रेमाने जवळ घेऊ पाहतील. परंतु मग अस्पृश्यच रागावून दूर राहू लागतील. ते म्हणतील, 'आम्ही अलगच राहू'. परंतु त्यांचा हा राग हळूहळू दूर होईल. .. हे प्रवाह पुन्हा जवळ येतील. तसेच हिंदु व मुसलमान असे झगडे होतील. परंतु मागून ते एकमेकांची संस्कृती अभ्यासू लागतील. एकमेकांच्या सुंदर चालीरीती घेतील. एकमेकांच्या निरुपद्रवी धार्मिक आचारविचारांना मान्यता देतील. .. ह्या देशाचे तुकडे करा असे म्हटले जाताच झोपलेलेही जागे होतील, न बोलणारेही बोलू लागतील.

सर्व सत्प्रवृत्तीचे लोक पांगलेले होते, ते एक होतील; म्हणतील, नाही होऊ देणार तुकडे. आम्ही एकत्र राहू. परस्परांचे मांगल्य पाहू. तडजोड करू. हिंदु, मुसलमान, शीख, ख्रिश्चन सारे उठतील व ऐक्याचे प्रयत्न करू लागतील." भारतातील सामाजिक दुहीची संपूर्ण जाण आणि तरीही एकात्म भारताची तितिक्षा असणारे कलावंताचे मन यातून आलेले हे स्वगत आहे. गांधीवादी मूल्यादर्शाचा नमुनापाठ आणि एतद्देशीय वास्तवाची राखाडी बाजू या दोन्हींचे एक सम्यक दर्शन घडविणारी ही कादंबरी आपल्या वर्णजातीय विषमतेने गढूळलेल्या समाजजीवनाच्या शुद्धिकरणाची भविष्यकालीन वाटही किती कठीण आहे याकडे इशारा करते. द्रष्टा कादंबरीकार भविष्याच्या सूचना पेरून ठेवतो, त्याचा प्रत्यय येथे येतो.

अस्पृश्यतेच्या रूढीमुळे तुटलेल्या हिंदू समाजाची संलग्नता साधण्यासाठी गांधीजींच्या अनुयायांची चालवलेली धडपड 'अस्पृश्योद्धार' या नाटकाचा विषय आहे. या नाटकाचा नायक नारायण हा गावातल्या लक्ष्मीकांत सावकाराचा पुत्र आहे. हा नव्या पिढीतला सुशिक्षित तरुण घरातल्या परंपरेने चालत आलेल्या शोषणाच्या आकृतिबंधांचा निषेध करणारा आहे. त्याला सावकारी पेशातून खऱ्याचं खोटं करून, लोकांच्या जमिनींवर जप्त्या आणून मिळवलेल्या संपत्तीचा तिटकारा असतो. गांधीविचारांनी प्रेरित झालेला हा नवा शिपाई रूढींच्या बेड्या तोडून महारवाड्यात जाऊन अस्पृश्यांच्या सेवेचे कंकण बांधून काम करीत असतो. तापलेल्या राघूला वैद्यकीय उपचार मिळवून देण्यासाठी तो गावात नव्याने शिकून आलेल्या डॉक्टरला महारवाड्यात घेऊन येतो. परंपरेचे संस्कार डोक्यातून गेले नसल्याने हा डॉक्टर सुरुवातीला महारवस्तीत यायला नकार देतो. वैद्यकीय शिक्षण घेताना उंदीर, बेडूक, प्रेतं फाडताना न कचरणारा हा डॉक्टर माणसाला शिवताना मात्र मागे हटतो. तेव्हा नारायण त्याला सद्सद्विवेकाचे खडे बोल सुनावतो . "लोकमताच्या तलवारीच्या धारेखाली राहून तुम्हीही आपल्या शिक्षणानं सुधारलेल्या बुद्धीचा उपयोग देशदैन्याकडे डोळेझांक करण्याकडे करणार काय?" या खणखणीत वैचारिक प्रश्नाने डॉक्टरची सद्सद्विवेकबुद्धी जागी होते आणि तो उपचाराला तयार होतो. राघू दुरुस्त होतो. नारायण त्याला सूतकताईचे काम शिकवतो, चरखा आणून देतो, तो गांधीजींच्या चळवळीचा सदस्य बनतो. लक्ष्मीपंत मात्र महाराच्या मुलाच्या मदतीला धावून गेलेल्या नारायणला घरातून हाकलून लावतो. तेथेही नारायण आपल्या बापाला खडे बोल सुनावतो. "तुम्हाला मांजर, पोपट, कुत्रे चालतात; ८४ लक्ष योनीनंतर जन्म घेतलेला माणूस मात्र चालत नाही." अस्पृश्यतेच्या प्रश्नाची धग नाटकातून मांडताना सौम्य प्रकृतीच्या साने गुरुजींच्या लेखणीला धार चढते. सांस्कृतिक अस्मितेच्या प्रतिकांमागच्या अंधविश्वासांना धक्का देऊन सामाजिक दंभस्फोट करण्याचे नाट्यतंत्र गुरुजींनी 'अस्पृश्योद्धार' नाटकात उपयोगात आणले आहे. अस्पृश्यांनी पांडवप्रतापाची मिरवणूक

काढली म्हणून स्पृश्यांनी पांडवप्रतापाची प्रत जाळली; या घटनेचा संदर्भ घेऊन नाटककाराने समाजबांधवांना प्रश्न केला आहे की, पांडवप्रतापाच्या प्रतिकात्मक स्वरूपात असलेल्या श्रीकृष्णाच्या वाङ्मयीन मूर्तीला जाळून तुम्हाला कसा काय स्वर्ग लाभणार आहे?' नाटकातल्या दैवी-आसुरी संपत्तीतल्या द्वंद्वाचा शेवट "लोक नांदो एकमताने / आनंदाने संसार करो' या सर्वमांगल्याच्या पसायदानाने होतो.सर्वोदय हे साहित्याचे सर्वश्रेष्ठ प्रयोजन होय. संघर्षाचे विसर्जन, संवादाचा उदय आणि त्यातून उदयाला येणारे सत्याचे नवे भान हे टप्पे साधित या नाटकाचे संविधान भरतवाक्याप्रत येऊन पोचते. (वरखेडे, २०१९, पृ. २९-३०)

प्रबोधनकार ठाकरे यांनी 'टाकलेलं पोर' (१९३३) ह्या नाटकातून महाराष्ट्रातील ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाची बीजे ब्राह्मणी वृत्तीत कशी दडली आहेत, यावर प्रकाश टाकला आहे. महाभारतातील कर्णचरित्राचे ब्राह्मणेतरांच्या भूमिकेत जाऊन त्यांनी पुनर्वाचन केले आहे. या नाटकातला कृष्ण हा ब्राह्मणी काव्याप्रमाणे क्षत्रियांमध्ये भांडणे लावणारा आहे. 'दाणे टाकून कोंबडे झुंजवायची याला फार खोड' अशा शब्दांत त्यांनी कृष्णाच्या शिष्टाईचे वर्णन केले आहे . पांडवांनी 'स्वराज्य आमचा जन्मसिद्ध हक्क; त्यासाठी हे महायुद्ध" अशी जी हाकाटी पिटली होती त्यामागे लोकमतासमोर भुलभुलैय्या उभा करण्याचा राजकीय डाव असल्याचे दुर्योधन म्हणतो. महाराष्ट्रातील जातीय राजकारणाच्या वास्तवावर बोट ठेवणारे हे पुराणकथेचे नववाचन आहे. 'खरा ब्राह्मण' (१९३२) या नाटकातूनही ठाकऱ्यांनी तत्कालीन जातीय वास्तवाची मांडणी केली आहे. अस्पृश्यतेचा प्रश्न राजकीय नसून सामाजिक आहे; हे या नाटकाचे आशयसूत्र आहे. 'ब्राह्मण' आणि 'भट' (भिक्षुक) अशी सामाजिक वास्तवाची वर्गवारी करून परान्नपुष्ट भिक्षुशाहीविरुद्ध बंड करण्याची भूमिका नाटककाराने घेतली आहे. ब्राह्मणी कावा म्हणजे काय हे या नाटकातील म्हादबा सांगतो : "गावातल्या समद्या भानगडी ही बामणं करतात, आन म्हराट्यावर म्हराटा नाइतर म्हार घालून दानं टाकून कोंबड्याच्या झुजा खेळतात, आन सवता मातूर झटक उपारणं झटकून फटाक निसटतात." मंदिरप्रवेशाच्या संदर्भात 'महाराचा हार देवाच्या गळ्यात पडला म्हणजे अस्पृश्यता गेली असे होणार नाही' याची स्पष्ट जाणीव करून देणारे हे नाटक आहे. सनातनी परंपरेतून आलेले सामाजिक मानदंड बदलून समतेच्या नवमूल्यांची समाजधारणा होण्याची गरज आहे, हा प्रबोधनवादी विचार या नाटकातून ठाकरे यांनी पुढे आणला आहे. वरेरकरांच्या 'सात लाखातील एक' (१९४०) कादंबरीत ग्रामीण भागातील जातीय वास्तवाचे चित्र रेखाटण्यात आले आहे. गांधीजींच्या व राष्ट्रीय काँग्रेसच्या चळवळीच्या वैचारिक प्रभावामुळे जातिवादाच्या विरोधात काही एक भूमिका समाजमनात तयार होत होती. या सुधारित मतप्रणालीला अनुसरणाऱ्या व्यक्तिरेखा मराठी कादंबरीकारांनी रेखाटल्या आहेत.

हैद्राबाद संस्थानातल्या जीवनावर ललित साहित्य लिहिणाऱ्या बी रघुनाथ यांनी आपल्या कथा-कादंबऱ्यांतून वेश्या, गुंड, फकीर, पानवाले, टांगेवाले, टॅक्सी-ड्रायव्हर, हॉटेलातील पोरे, कचेऱ्यांतले कारकून अशा वंचित जनसमुहाच्या जीवनाचे वास्तव चित्रित केले आहे. 'काळी राधा', 'मुरळी' या कथांतून वेश्या व्यवसायातल्या स्त्रिया आणि वेश्यावस्तीची चित्रणे आली आहेत. 'काळी राधा' या कथेतल्या राधेला चारचौघींसारखा संसार करायची मनीषा असते; पण ती परिस्थितीपुढे अगतिक आहे. तिची आई समिंदर ही भडक शृंगार करून पुरुषांना जाळ्यात ओढण्यात पटाईत असलेली स्त्री होती. एका गावठी खानबहादुराच्या जनानखान्यात राहून त्याला तिने नावापुरता कुंकवाचा धनी बनवला आणि राजरोसपणे राणीसारखा वेश्येचा धंदा केला. गांधर्वविवाहाची वचने देऊन अनेकांना तिने लुबाडले होते. तिला तीन मुली होत्या. पैकी पैसे घेऊन सुंद्रीचे तिने कोवळ्या वयातच लग्न लावून दिले आणि नंतर लग्नातून सोडवून आणून धंद्याला लावले. गोदीच्या वाट्यालाही तेच जीवन आले. सावळ्या राधेला मात्र असले जीवन नको होते. पण एका गबर गिऱ्हाईकाने भरभक्कम रक्कम समिंदरच्या हातावर टिकवून राधेचे स्त्री नासवले होते. स्त्रियांच्या वाट्याला येणाऱ्या पुरुषी वासनांधतेचा बळी होणाऱ्या वेश्याव्यवसायातल्या स्त्रियांची परिस्थितिशरणता बी रघुनाथ आपल्या कथेतून पुढे आणतात.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात नवसुशिक्षितांच्या उदयोन्मुख पिढीने बुद्धिवादी दृष्टिकोन व इहवादी मूल्ये रुजविण्याचे काम सुरू केले होते. त्यातून 'सनातनी' आणि 'सुधारक' असा वैचारिक संघर्षही मराठी मध्यमवर्गीयांमध्ये सुरू झाला होता. म. फुले, आगरकर, ताराबाई शिंदे यांनी स्त्रियांची माणूस म्हणून अवहेलना करणाऱ्या सनातन्यांवर सडकून टीका केली होती. शिक्षणाच्या हक्कापासून वंचित असणाऱ्या स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे यासाठी प्रत्यक्ष कामाला प्रारंभ झाला होता. नागरी समाजजीवनात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना संस्थात्मक कामात सहभागी होता यावे, त्यांना भाषणाचे, लेखनाचे आविष्कार स्वातंत्र्य असावे, असा नवा विचार नवशिक्षित पुरुषवर्ग करू लागला होता. त्यातून रमाबाई रानडे, सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई यासारख्या सुधारणावादी स्त्रिया पुढे आल्या. ललित वाङ्मयातूनही या सुधारणावादी विचारांचे सर्जनशील आविष्कार होऊ लागले होते. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातही सुधारक आणि सनातनी यांच्यातल्या मूल्यसंघर्षाची चकमक त्यावेळच्या सभा-बैठकांतून, नियतकालिकातल्या निबंधलेखनातून, वाचकांच्या पत्रव्यवहारातून आणि ललित वाङ्मयातूनही दिसू लागली होती. हरिभाऊ आपटे, ना. ह. आपटे, गो. ब. देवल, वा. म. जोशी, श्री. व्यं. केतकर, भा. वि. वरेरकर यांनी सनातन्यांच्या पारंपरिक शोषणाच्या परंपरेचा प्रतिवाद करण्यासाठी वाङ्मयीन स्त्री- प्रतिमा' निर्माण केल्यात. या

लेखकांनी लिहिलेल्या वाङ्मयातून स्त्रियांच्या दमनाचे व स्त्रीची अस्मिताच जन्माला येऊ न देणाऱ्या पुरुषकेंद्री समाजव्यवस्थेचे दर्शन घडते. ह्या व्यवस्थेचा प्रतिवाद करणारी स्त्री-पुरुष पात्रे ही तत्कालीन वास्तवाचे प्रतिनिधी असण्यापेक्षा सुशिक्षितांच्या मनातल्या आदर्शांची प्रतिमाचित्रे म्हणून रेखाटली गेली आहेत. या अर्थाने त्या सुधारणावादी विचारांच्या लेखकांनी निर्माण केलेल्या पुरुषकेंद्री स्त्री-प्रतिमा आहेत. मध्यमवर्गीय सुशिक्षित पिढीच्या बौद्धिक गरजेतून त्या निर्माण झाल्या होत्या. बायकांच्या स्वतंत्र अस्तित्वाची, त्यांच्या समस्यांची समाजाला जाणीव करून द्यायचे काम या पुरुष लेखकांनी केले. स्त्रीच्या आत्मसन्मानासाठी तिने आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावे, त्यासाठी तिने शिक्षणाचा मार्ग अनुसरावा असे पर्याय शोधण्याचा प्रयत्न या पुरुष लेखकांनी केला. परस्परांचा आत्मसन्मान जपणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या नमुनादर्शांचे मानदंड निर्माण करण्याचा प्रयत्न या लेखकांनी केला. स्त्रियांच्या आत्मसन्मानासाठी सनातन्यांच्या टीकेची पर्व न करणारा हरिभाऊ आपटे यांच्या 'पण लक्षात कोण घेतो' कादंबरीतला रघुनाथ, जरठविवाहाची खिल्ली उडविणाऱ्या देवलांच्या नाटकातल्या शारदेच्या सख्या, लग्न न करता पुरुषापासून मातृत्वाचा निखळ स्त्रित्वाचा हक्क मिळविण्यासाठी पुढे आलेली कालिंदी (ब्राह्मणकन्या : श्री. व्यं. केतकर, १९३०), मानुषतेच्या मूल्यसंवर्धनासाठी विवेकाच्या मार्गाने जाऊ पाहणारी सुशीला (सुशीलेचा देव : वा. म. जोशी, १९३०) ह्या सगळ्या स्त्री-प्रतिमा तत्कालीन तरुणांच्या नवसमाजनिर्मितीच्या ध्यासातून पुढे आल्या आहेत. वा. म. जोशी यांनी 'इंदू काळे सरला भोळे' (१९३५) या कादंबरीतून स्त्री-पुरुषांच्या बदलत्या संबंधांतील नैतिकतेची परिमाणे तपासण्याचा प्रयत्न केला. स्त्री-पुरुषांच्या हक्क आणि कर्तव्यांच्या मोजपट्ट्या समान असल्या पाहिजेत, हा विचार वामन मल्हार जोशींच्या नायिका मांडतात. 'स्त्रियांची पापे मोजण्यासाठी सोन्याचा काटा आणि पुरुषांची पापे मोजण्यासाठी लोखंडाचा काटा ही विषम विभागणी 'नलिनी'ला अन्यायकारक वाटते. स्त्री ही पुरुषांच्या मालकीची व त्याच्या उपभोगासाठी निर्माण केलेली वस्तू नसून स्त्रीला माणूस म्हणून स्वतंत्र अस्तित्व आहे, याची जाणीव 'आश्रमहरिणी' कादंबरीतून करून देण्यात येते. 'स्त्री-पुरुष स्वातंत्र्याच्या मर्यादांची व्याप्ती कुठपर्यंत असावी याचीही चर्चा वा. म. जोशींच्या कादंबऱ्यांतून करण्यात आली आहे . स्त्रीला संसाराव्यतिरिक्त इतर ध्येये असू शकतात, हा विचार या नायिका सुस्पष्टपणे बोलून दाखवितात. विभावरी शिरूरकर यांच्या 'हिंदोळ्यावर' कादंबरीतील अचला स्त्री-स्वातंत्र्याच्या परिघाचा पैस नेमकेपणाने रेखाटते. आधुनिक स्त्री बुद्धिवान व स्वावलंबी झाल्याने तिने पुरुषदास्याच्या बेड्या झुगारून दिल्या पाहिजेत; मात्र त्याचबरोबर मातृत्वाचा तिचा निसर्गदत्त हक्कही समाजाने मान्य केला पाहिजे. अचला म्हणते, "मी जगले पाहिजे. माझं असं जगात ठेवलं पाहिजे. नुसती अचला जगून गेली असं

नाही. अचलेची जात जगून गेली पाहिजे. माझ्या हाडामासांची, माझ्या प्रवृत्तीची प्रतिष्ठापना जगात झाली पाहिजे." स्त्रियांच्या भावजीवनाचे अंतरंग उलगडून दाखविणाऱ्या व स्त्रीस्वातंत्र्याचे नवे व्याकरण रचणाऱ्या कथा-कादंबऱ्यांचे एक नवे दालन या कालखंडात मराठी साहित्यात उघडले गेले , ही या काळाची महत्त्वाची वाङ्मयीन फलश्रुती म्हटली पाहिजे.

स्त्रीच्या असतेपणाला तत्कालीन लग्नसंस्थेचे रिंगण पडले होते. ह्या लग्नसंस्थेला लवचिक बनवावे की तिला थेट नकारच द्यावा इथपर्यंत अनेक शक्यतांचा अदमास घेण्याचा प्रयत्न या कालखंडातील स्त्री-पुरुष लेखकांनी केला. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी 'संगीत मतिविकार' (१९०६) या नाटकातून विधवा पुनर्विवाह, विधवा पुनर्विवाहाला पर्याय म्हणून अल्पवयीन कुमारिकेशी केले जाणारे विषम विवाह, विधवांचे केशवपन, भ्रूणहत्या इत्यादी प्रश्नांची दखल घेतली होती. ल. गो. देशमुख यांनी 'प्रौढविधवाविवाह नाटक' (१९१०) या नाटकातून विधवापुनर्विवाहाचाच प्रश्न मांडला होता. 'संगीत वधूपरीक्षा' (१९१४) या नाटकातून प्रीतिविवाहाचा व अनुलोम विवाहाचाही विषय हाताळला होता. 'संगीत सहचारिणी' (१९१७) नाटकातून दोन बायकांचा नवरा हा विषय हाताळला होता; पण ह्या प्रश्नाची सखोल मांडणी किंवा पर्यायी दिशांचा तपास या नाटकांतून झाला नाही. लग्न संस्थेतून रूढ झालेल्या सामाजिक धारणांतून पोसला गेलेला पुरुषांचा मालकी हक्क हा स्त्रियांच्या स्वातंत्र्याच्या व व्यक्तित्वविकासाच्या मार्गातला मुख्य अडसर होता. लग्नसंस्था ही गुरांच्या बाजारासारखी आहे, मुली पाहाण्याचा कार्यक्रम गुरे खरेदी करणाऱ्या बाजारापेक्षा वेगळा नाही हे हरिभाऊ आपटे यांच्या यमूचे दु:ख हे त्या काळातल्या सर्व स्त्रियांचे दु:ख होते. ('पण लक्षात कोण घेतो', १८९३) ह्या पुरुषसत्ताक मूल्यसरणीविरुद्ध बंड करणाऱ्या नायिका विसाव्या शतकातील मराठी लेखकांनी आपल्या वाङ्मयातून साकार केल्या. भा. वि. वरेरकर यांची बालविवाह झालेली 'मथू' ('विधवाकुमारी, १९२७) हरिभाऊंच्या 'यमू'च्या तुलनेत अधिक कणखर आहे. विधवा झाली म्हणजे काय झालं हे कळण्याआधीच तिला वैधव्य आले. पंडिता रमाबाई यांच्या सुधारणेच्या वळणाने जाणारी ही नायिका आहे. वैधव्य प्राप्त झाल्यावर नवऱ्याने घातलेले मंगळसूत्र तिने काढले, तरी बालपणापासून लावलेले कुंकू पुसायला ती तयार नाही. आपल्या स्त्रीत्वाचा प्रतिकात्मक हक्क म्हणून त्याची जपणूक ती करू पाहते. 'विधवांनी कुंकू लावू नये, हे वेदांनी सांगितलं आहे का? निरनिराळ्या धर्माचे ईश्वर निरनिराळे आहेत का?' असे अनेक प्रश्न ती उपस्थित करते. निपुत्रिकाला स्वर्ग लाभत नाही म्हणून जरठ पुरुषाबरोबर कोवळ्या वयातल्या मुलींची लग्नं लावली जात, या प्रथेतला निलाजरेपणा वरेरकरांनी या कादंबरीतून उघड केला. स्त्रीच्या वयाचा विचार न करता पुरुषांची भोगलालसा उसळी मारून येते; संत पुरुष म्हणवून घेणारा बुवांच्या

आशीर्वादाच्या हातातील लंपट लालसा लपून रहात नाही. मथूला हा वेगळा स्पर्श ओळखता येतो. ती त्याच्या हाताला चावा घेते. जन्माला आल्यानंतर नऊ दिवसांनी कुत्र्यामांजरांना नजर येते तशी तिला स्त्रित्वाची दृष्टी येते, समज येते. पुरुषी वर्चस्वाची जाणीव ठसठशीतपणे करून देणे हे 'विधवाकुमारी'चे खरे योगदान आहे. मुलींनी संस्कृत शिकून काय करायचं, किंवा मुलींनी पुराणं सांगू नयेत या पारंपरिक समजुतीला धक्का लावण्याचे काम वरेरकरांनी केले आहे. स्त्रीजीवनाविषयीच्या पारंपरिक समजुतीतला दांभिकपणा उघड करणाऱ्या भाष्यकाराची भूमिका या लेखनामागे आहे. तर्कशुद्ध मांडणीतून सनातन्यांचा प्रतिवाद करणारा विवेकवाद हा वरेरकरांच्या कादंबरीलेखनाचा गाभा आहे.

हुंड्याच्या प्रथेवर भाष्य करणारे 'हुंडा' (१९०४) याच नावाचे नाटक सोकरजी त्रिलोकेकर यांनी लिहिले होते. या नाटकात हुंड्याचा लालची असलेला 'खंडेराव' याला दोन मुले झाल्याचा आनंद होतो. श्यामराव व धाकला भाई ह्या दोन मुलांपैकी 'धाकला भाई' हा पुरोगामी विचारांचा पुरस्कर्ता असून त्याला हुंड्याची प्रथा मान्य नाही. हुंडाविरोधी विचारांचे समर्थन करताना तो म्हणतो, "मुलास चाकरी लागून त्यास स्वत:च्या बायकोचे व मुलाबाळांची पोटे भरण्यास शक्ती येईल तोपर्यंत अविवाहित का ठेवीत नाहीत? लग्न करण्याची घाई का करता? तसं झालं तर मग त्याच्या बापावर उदरपोषणाचा बोजा पडणार नाही व मग हुंडा घेण्याचे कारणही पडणार नाही." लग्नाची वयोमर्यादा, स्वावलंबी झाल्यानंतर लग्न करण्याची प्रस्तुतता आणि हुंड्याच्या अनिष्ट चालीचे विषय या नाटकातून चर्चिले गेले आहेत. हुंडापद्धतीचा प्रश्न भा. वि. वरेरकर यांनी 'हाच मुलाचा बाप' (१९१६) या नाटकातून मांडला आहे. हुंड्याच्या प्रश्नातून एका कुमारिकेने स्वत:ला जाळून घेतले होते, या सत्य घटनेवर आधारित हे नाटक होते. जरठकुमारी विवाहाचा प्रश्न अनेक कथा-कादंबऱ्यांतून या काळात चर्चिला गेला आहे. ना. ह. आपटे यांची 'न पटणारी गोष्ट' (१९२२) याच विषयाला केंद्रस्थानी ठेवून लिहिली गेली आहे. विश्वनाथ विद्याशंकर या प्रस्तावित वराऐवजी फसवणुकीतून नीरेचा विवाह आपल्या वडिलांच्या वयाच्या केशव या जरठ पुरुषाबरोबर होतो. परंतु लग्नानंतर केशवशी तिचे सूर जुळत नाहीत. केशव आपले पांढरे केस काळे करून तरुण दिसण्याचा व नीरेला विश्वासात घेण्याचा प्रयत्न करतो; पण नीरा त्याला शरण जात नाही. केशवही थोडा संयमी आहे. तो जबरीने तिच्यावर काही लादू इच्छित नाही. नीरेचा एकूण नकारात्मक प्रतिसाद लक्षात घेऊन तो अखेर तिच्या कपाळावरचे जरठ सौभाग्य स्वत:च्या हाताने पुसून टाकतो. विश्वनाथ विद्याशंकरबरोबर तिचा पुनर्विवाह करण्याचा मार्ग खुला करतो. पण नीरेपुढे निराळाच पेच निर्माण होतो. विश्वनाथबद्दल तिला आदर आहे; पण प्रेम नाही. ह्या पुनर्विवाहामुळे त्याचे उपकार होतील, पण उपकाराच्या बदली प्रेम निर्माण होईल का

ह्या प्रश्नाचे उत्तर तिला मिळत नाही; म्हणून ती पुनर्विवाह करीत नाही. आयुष्य सार्थकी लावण्याचे इतरही काही मार्ग आहेत, याची ती जाणीव करून देते. स्त्रियांना यशस्वी होण्यासाठी आत्मविश्वास हवा, विवेकबुद्धीला पटणाऱ्या गोष्टी करण्याची निर्णयक्षमता हवी हा दृष्टिकोन देणारी ही कादंबरी आहे. विवाहसंस्थेत जात-गोत्र इत्यादी रूढींचे जे प्राबल्य होते त्यातले वैयर्थ पुढे आणणाऱ्या कथा या काळात लिहिल्या गेल्या. वि. वि. बोकील यांची देशस्थ-कोकणस्थ यांच्यातल्या विवाहातल्या पेचप्रसंगावर 'बेबी' ही कथा याचे उत्तम उदाहरण होय.

१९२२ साली राम गणेश गडकरी यांनी विधवा पुनर्विवाहाच्या सामाजिक प्रश्नाला केंद्रस्थानी ठेवून 'प्रेमसंन्यास' नाटक लिहिले. या नाटकाचा नायक जयंत प्रश्न उपस्थित करतो की, "विधवांच्या माना मुरगळण्यात पुरुषार्थ मानणारा, शिक्षणापासून स्त्रियांना दूर ठेवून केवळ पशुवृत्तीने त्यांची पायमल्ली करणारा समाज वंदनीय कसा होणार? ..गुडघ्याएवढ्या पोरीशी लग्न लावण्यासाठी उतावळेपणाने गुडघ्याला बाशिंग बांधणाऱ्या विधुराला अगदी वृद्धपणी सुद्धा नवरा मुलगा बनून आपल्या पोरकटपणाची वरात चंद्रज्योतीच्या प्रकाशामध्ये मिरवण्याचा परवाना मिळतो; आणि गुडघ्यात मान घालून बसलेल्या बिचाऱ्या बालविधवेला अंधारकोठडीत जुलमाने बाळपणी संन्यासदीक्षेची शिक्षा भोगावी लागते. आणि ती वधू मेली तर त्या थेरड्याला मात्र पुन्हा दुसऱ्या बालिकेला फसविण्यासाठी पांढऱ्या केसांना काळा कलप लावण्याची मुभा!" (गडकरी, १९९४, पृ. ५७) गडकऱ्यांच्या 'एकच प्याला' (१९२१) नाटकातील सिंधू म्हणते, "मुलीच्या लग्नाचा समारंभ आई बापांना सुखदायक वाटतो; पण मुलीचं लग्न म्हणजे तिची उत्तरक्रिया हे त्या बापड्यांच्या ध्यानीमनीसुद्धा येत नाही." (गडकरी, १९९४, पृ. ३९८) पातिव्रत्याच्या अतिरेकामुळे सिंधूच्या वाट्याला दु:ख येते. या नाटकातील तळीराम आपली पत्नी गीताला म्हणतो, "बायकांच्या मंगळसूत्राचा मणी म्हणजे काही जानव्याची ब्रह्मगाठ नव्हे की ती गळ्यात असलीच पाहिजे अगदी!" (गडकरी, कित्ता, पृ. ३६३) मराठी समाजात स्त्रियांना उपभोग्य वस्तूपेक्षा कुठलेही वेगळे मानवी मूल्य नाही, याची खंत या नाटकातून व्यक्त झाली आहे.

स्त्रियांचे स्वातंत्र्य आणि त्यांचे रास्त हक्क यांची समाजाला समंजसपणाने जाणीव करून देणारे नाटक श्री. कृ. कोल्हटकर यांनी लिहिले होते. त्यांच्या 'परिवर्तन' (१९१७) या नाटकातली शांता म्हणते, "पुरुष बायकांना मुद्दाम पारतंत्र्यात ठेवितात, असे आमचे मुळीच म्हणणे नाही. पण त्यांना जन्मल्यापासून मरेपर्यंत एक क्षणही स्वातंत्र्याचा मिळत नाही, ही गोष्ट खोटी नाही." स्त्रियांच्या स्वातंत्र्याविषयीची ही नेमस्त मांडणी होती. १९३० नंतर मात्र आधुनिक व्यक्तिस्वातंत्र्यवादी दृष्टिकोनातून स्त्रीप्रश्नांची मांडणी होऊ लागलेली दिसते. संगीत बायकांचे बंड (१९३५) या नाटकातून कृ. प्र. खाडिलकर यांनी

पुरुषांना गुलाम करून 'स्त्री-राज्य' उभे करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारी नायिका चित्रित केली आहे. या नाटकाची नायिका प्रमिला म्हणते, "ज्या स्त्री जातीला पुरुष पायातले खेटर समजत आले आहेत, त्या स्त्रीजातीच्या अंगी स्वतंत्रपणे राज्यव्यवस्था चालवून स्त्री राज्याचे सैन्य तयार करून, तुमच्या हस्तिनापुरसारख्या बलाढ्य साम्राज्याचा दिग्विजयाचा घोडा अटकेत ठेवण्याचे सामर्थ्य उत्पन्न होणे शक्य आहे." मात्र बायकांचे हे बंड फसते आणि स्त्रियांची फजिती होते. स्त्रीसत्ताक राज्याचे स्वप्न पुरुष लेखक पाहू शकत होते, मात्र अशा पर्यायी राज्याचा नमुनादर्श त्यांना निर्माण करता आला नाही. आचार्य प्र. के. अत्रे यांनी इब्सेनच्या 'डॉल्स हाऊस' नाटकाच्या धर्तीवर स्त्रीस्वातंत्र्यवादिनी नायिका रेखाटण्याचा प्रयत्न या काळात केला होता. त्यांच्या घराबाहेर (१९३४) नाटकाची नायिका निर्मला इब्सेनच्या 'नोरा'च्या पावलावर पाऊल ठेवून पुरुषांच्या गुलामगिरीचे प्रतीक असलेल्या मंगळसूत्राचा गळफास तोडून घराबाहेर पडते. मात्र ती स्वत:च्या पायावर उभे राहून स्वावलंबी बनण्याचा कुठलाही प्रयत्न करीत नाही. नाटकाच्या शेवटी नवऱ्याला पश्चाताप होतो आणि मुलाच्या ओढीने निर्मला परत नवऱ्याच्या घरी माघारी येते. 'स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंत काळाची माता आहे' हे मराठीतले सर्वश्रुत सुभाषित तेव्हढे आधोरेखित होते. जग काय म्हणेल (१९४६) या नाटकातही नायिका उल्का हिच्या वाट्याला बायकोला मारणारा, लफडे करणारा, संसारात लक्ष नसणारा दारुडा नवरा येतो. मात्र उल्का स्वातंत्र्यसैनिक व कामगार पुढाऱ्याची मुलगी असल्याने डाव्या विचारांच्या परंपरेत वाढलेली होती. त्यामुळे तिला ही नवरेशाही भांडवलशाहीतल्या जुलमासारखी वाटते. आतापर्यंत पुरुष बायकांना टाकून देत असत; मात्र 'बायकांनी टाकलेले नवरे समाजाला दाखवायचे आहेत' असा जाहीर पवित्रा घेऊन स्वाभिमानी उल्का घराबाहेर पडते. आर्थिकदृष्ट्या स्त्री स्वत:च्या पायावर उभी राहिल्याशिवाय खऱ्या अर्थाने ती स्वतंत्र होऊच शकत नाही, हा विचार या नाटकातून मांडण्यात आला.

१९३५ च्या आसपास मार्क्सवादाच्या प्रभावातून साहित्यिकांची जीवनदृष्टी स्वच्छंदतावादाकडून वास्तववादाकडे झुकू लागली होती. चहापानाच्या प्रसंगी होणाऱ्या काव्यशास्त्रविनोदातूनही ही सुशिक्षित मंडळी राजकीय-सामाजिक प्रश्नांचा उहापोह करीत असत, तत्त्वचिंतनात्मक चर्चा करीत असत. वामन मल्हार जोशी यांनी त्यांच्या कादंबऱ्यांतून अशा चर्चामंडळांचे चित्रण केले आहे. महाराष्ट्रातल्या सुशिक्षित मध्यमवर्गीयांवर वैज्ञानिक दृष्टिकोण व कार्यकारणभावावर अधिष्ठित विवेकवादाचा प्रभाव जसजसा वाढू लागला तसतशी त्यांच्या चर्चेत 'देव' संकल्पनेची चिकित्सा होऊ लागली . वा. म. जोशी यांच्या 'सुशीलेचा देव' (१९३०) या कादंबरीचे आशयसूत्र सुशिक्षितांच्या मनातील देवत्वाच्या बदलत्या संकल्पनांवर प्रकाश टाकणारे आहे. या कादंबरीवर

स्पेन्सरचा अज्ञेयवाद, तसेच विश्वकुटुंबवादाच्या वैचारिक संस्कारांचा प्रभाव आहे. भांडवलशाहीत माणसाला किंमत नसते, पैशाला किंमत असते; स्त्रियांनाही माणूस म्हणून किंमत असत नाही. बायका म्हणजे खाजगी मालमत्ता असा रोकडा व्यवहार असतो. पुरुषांनी अनेक विवाह केले तरी त्याला व्यभिचार म्हणत नाहीत; पण मग हेच उलट स्त्रियांनी केले तर त्यांना वेगळा न्याय का? पुरुषाने लग्नाच्या बायकोखेरीज इतर स्त्रियांचा उपभोग घेतला म्हणजे बायकोचं सुख तर कमी होत नाही ना, हा इथल्या पुरुषाने विचारलेला प्रश्न पुरुषसत्ताक स्वामित्ववृत्तीचाच निदर्शक आहे. पण या कादंबरीची नायिका सुशीला पूर्वीच्या सनातन आर्य स्त्रीसारखी नाही. कालमानाप्रमाणे धर्मव्यवस्था बदलायला हवी, विवाहसंस्थेत बदल झाले पाहिजेत या विचारांचा पुरस्कार करणारी ही नायिका आहे. परस्परांविषयी आदर नसताना केवळ अपत्यप्राप्तीसाठी विवाह हे पाप आहे, हा विचार मांडणारी ही कादंबरी आहे. दारूबाज नवऱ्याला केवळ लग्नसंस्थेमुळे स्त्रीने आपली नीतिमत्ता विकायची का हा प्रश्न या कदंबरीतून विचारण्यात आला आहे. सीतासावित्रीची सनातन परंपरा नाकारणारी सुशीला ही क्रांतदर्शिनी (रिव्होलेशनरी) स्त्री प्रतिमा आहे. देवपूजा म्हणजे देवाला दिलेली लाच आहे अशी विवेकवादी भाषा बोलणारी पात्रे लग्नसंस्थेलाही ह्याच विवेकवादातून प्रश्नांकित करतात. प्रेम हा सद्य:कालीन लग्नसंस्थेचा मूलाधार नसून वारसाहक्काचा व्यवहार हा लग्नसंस्थेचा पाया आहे, ह्या वास्तवाकडे ही कादंबरी निर्देश करते.

मराठी समाजातील स्त्रियांचे सामाजिक स्थान हा कादंबरीकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांचा मुख्य आस्थाविषय होता. प्रेमविवाह, विधवाविवाह, मिश्रविवाह, प्रतिलोमविवाह, सहवासोत्तर विवाह, वेश्यांचे विवाह अशा अनेक अंगांनी विवाहसंस्थेची चर्चा त्यांच्या कादंबऱ्यांतून करण्यात आली आहे. विवाहसंस्थेची समाजशास्त्रीय समीक्षा त्यांनी 'ब्राह्मणकन्या' (१९३०) या कादंबरीतून केली आहे. या कादंबरीची नायिका कालिंदी ही ब्राह्मण बापाची मुलगी आहे; पण तिच्या बंडखोर बापाने रूढी-परंपरांना न जुमानता वेश्येबरोबर लग्न केले होते; त्यामुळे समाज कालिंदीकडे वेश्येची मुलगी म्हणूनच पाहतो. केवळ लग्नसंस्कारामुळे कालिंदीचे अक्करमाशेपण संपत नाही, हे या कादंबरीचे मध्यवर्ती आशयसूत्र आहे. आपल्या अपत्यांनी ब्राह्मणातच राहावे ही तिच्या बापाची तडफड कायम आहे. कालिंदीकडे मात्र समाज वेश्येची मुलगी म्हणूनच पहात असल्याने तिला कुठल्याच बाजूने स्वत:चे घर नाही, स्वत:चे असतेपण नाही. त्यामुळे शिवशरणबरोबर लग्नाशिवाय राहाण्याचा धाडसी निर्णय ती घेते. (आजच्या परिभाषेत 'लिव्ह इन रिलेशनशिप) अविवाहित मातृत्वाचा धोका पत्करते. पण शिवशरण पितृत्वाची जबाबदारी झटकतो. तो तिला नाटकात काम करून चार पैसे मिळविण्याचा सल्ला देतो. तिची फसवणूक होते. ती रस्त्यावर येते. तिची वर्गमैत्रीण एस्सेल तिला आधार देते.

आर्थिक पारतंत्र्य हे स्त्रीच्या पारतंत्र्याचे एक मूलकारण आहे म्हणून स्त्रियांनी द्रव्यार्जनाची शक्ती वाढवून प्रतिष्ठा संपादन करण्याच्या पर्यायाचा शोध घेतला जातो. मात्र आपण आपला पैसा मिळवावा व कमी शिकलेल्या नवऱ्याबरोबर संसार करावा, तर अशिक्षित पुरुषांना सुशिक्षित बायकोची भीती वाटते हे वास्तव नाकारता येत नाही. मग कायद्याने तरी स्त्रियांना पाठबळ द्यावे; पण कायदे मध्यमवर्गीय श्रीमंतांनी, पुरुषांनी केलेले असल्याने तेही स्त्रियांना न्याय देणारे नाहीत. तेव्हा शिक्षण, आर्थिक स्वावलंबन किंवा कायदा ह्या सर्वच बाबतीत स्त्रियांना पुरुषी मतलबीपणाची शिकार व्हावे लागले आहे. प्रचलित विवाहसंस्था ही आर्थिक तत्त्वावर उभी असल्याने वंशाच्या दिव्यालाच महत्त्व आहे. म्हणून 'वैजनाथ स्मृती' ही नवी स्मृती रचण्याची गरज ह्या कादंबरीतून सुचविण्यात आली आहे.

मातृत्व हा स्त्रीचा स्वभावसिद्ध अधिकार आहे, आणि समाजाने तिच्या ह्या निसर्गदत्त हक्काचे संरक्षण केले पाहिजे, अशी भूमिका डॉ. केतकर यांनी पुरस्कृत केली आहे. कुमारीमातांकडे या निकोप मूल्यदृष्टीतून पहायला हवे, अशा आशयाची मांडणी त्यांच्या कादंबऱ्यांतून झालेली दिसते. त्यांच्या कादंबरीतील वैजनाथशास्त्री 'लग्नाशिवाय कालिंदीला मूल झाले तर बिघडले कुठे?' असा प्रश्न करतात. मातृत्वप्राप्तीत स्त्रीच्या लेखी पुरुष हा केवळ साधनमात्रच असतो. त्यामुळे विवाहाशिवाय तिने आपल्या निसर्गदत्त हक्कासाठी हव्या त्या पुरुषाचा साधनमूलक वापर करण्यास कोणताच प्रत्यवाय असता कामा नये, अशी बंडखोर स्त्रीवादी भूमिका केतकरांनी आपल्या कादंबरीतून पुढे आणली. पुरुषसत्ताक कुटुंबसंस्थेमुळे स्त्रियांच्या वाट्याला येणारे दास्य संपविण्यासाठी मातृसत्ताक समाजाची घडण व्हावी असा पर्याय ते सुचवू पहात होते. स्त्रियांच्या आत्मसन्मानाची नवी स्मृती स्त्रियांनीच रचावी, अशी एक नवी दिशा इथे सुचविण्यात आली आहे.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात शिकून पुढे आलेल्या स्त्रियाही वाङ्मयीन क्षेत्रात हिरिरीने उतरल्या. त्यांना आपला स्वत:चा शब्द गवसला होता. आतापर्यंत कोंडलेल्या स्त्रीकेंद्री अनुभवविश्वाला ललित साहित्यातून त्यांनी शब्दरूप दिले. आपले आत्मदर्शन आणि समाजाचा वास्तव रंग यातले ताण-तणाव शब्दबद्ध केलेत. ही मांडणी पुरुष लेखकांपेक्षा वेगळी आणि निखळ स्त्रीकेंद्री होती. प्रणयातली बेहोशी रंगविण्याकडे ना. सी. फडके आणि तत्कालीन मराठी लेखकांचा कल वाढू लागला होता. तरुण-तरुणींच्या विवाहपूर्व सहवासोत्तर प्रणयाची चित्रणे फडक्यांच्या कादंबऱ्यांत वैपुल्याने आढळतात. याउलट विभावरी शिरूरकर, गीता साने यांच्या लेखनातून स्त्रीजीवनाचे सामाजिक संबंधांतले प्रखर वास्तव मांडले जात होते. विभावरी शिरूरकर यांनी 'कळ्यांचे नि:श्वास' या कथासंग्रहातून प्रौढ कुमारिकांच्या मनातील घुसमट प्रथमच कथारूपाने मांडली. लग्नासाठी हुंडा देण्याची आर्थिक तयारी तरी पाहिजे, किंवा भुरळ पाडणारे रूप तरी

पाहिजे; हे दोन्ही नसेल तर लग्नाचा प्रश्न कसा सुटेल, या चिंतेने व्याकूळ होणाऱ्या स्त्रियांची घुसमट 'अंत:करणाचे रत्नदीप' या कथेतून विभावरी शिरूरकर यांनी मांडली.'ताई हेच बरे सुखाचे दिवस' या कथेतून मुलींना दाखवायच्या कार्यक्रमात तिला कळसूत्री बाहुलीप्रमाणे नटून थटून कसे निर्जीवपणे सामोरे जावे लागते, या प्रथेवर टीकात्मक भाष्य त्यांनी केले. कमावत्या मुली घरसंसाराला हातभार लावू लागल्या की, आईबापांना त्यांचा पैसा हवासा वाटू लागतो, आणि त्यामुळे 'बाबांचा संसार माझा कसा होणार?' या चिंतेने या तरुण कुमारिकांची आंतरिक कुत्तरओढ सुरू होते. सामाजिक प्रश्नांचे मनोविश्लेषणात्मक चित्रण करणारी ही नवकथा विभावरी शिरूरकर यांनी मराठीत प्रथमच लिहिली. विभावरी शिरूरकर यांच्या 'हिंदोळ्यावर' (१९३४) या कादंबरीतली अचला मध्यमवर्गीय कुटुंबव्यवस्थेत आणि स्त्री-पुरुष नात्यासंबंधीच्या पारंपरिक वातावरणातल्या घुसमटीतून बाहेर पडण्यासाठी स्वावलंबनाचा मार्ग पत्करून स्वतंत्र बनण्याचा विचार करते. तर 'विरलेले स्वप्न' (१९३५) या कादंबरीत जोपर्यंत श्रमविभागणीच्या तत्त्वाने जगण्याची जाणीव स्त्रिया आणि पुरुषांच्यात बरोबरीने निर्माण होत नाही, तोपर्यंत स्त्रियांमध्ये स्वतंत्र विचार करण्याची शक्ती विकसित होणार नाही, हा विचार त्यांनी मांडला होता. कमलाबाई टिळक यांनी स्त्रियांना स्वाभिमानाने जगण्यासाठी कणखर होऊन दारूड्या नवऱ्याला घराबाहेर काढणारी स्त्री व्यक्तिरेखा 'पतिव्रता' या कथेतून निर्माण केली. तर कृष्णाबाई मोटे यांनी स्त्रियांच्या जीवनात लग्नाने येणारे पारतंत्र्य झुगारून दिले पाहिजे अशा विचाराप्रत येणाऱ्या स्त्री व्यक्तिरेखा चित्रित केल्या. आर्थिक स्वालंबनामुळे स्त्रियांच्या जीवनात नवचेतना येईल या कल्पनेतले अर्धसत्य गीता साने यांनी त्यांच्या 'वठलेला वृक्ष' (१९३६) या कादंबरीतूनही मांडले आहे. अर्थार्जनाच्या ठिकाणच्या जबाबदारीबरोबर कुटुंबातल्या सांसारिक जबाबदाऱ्याही तितक्याच नेकीने स्त्रीला पार पाडाव्या लागतात. ह्या दुहेरी जबाबदारीच्या ओझ्याखाली स्त्रीजीवनाचा वृक्ष कसा वठत चालला आहे, याचे दर्शन या कादंबरीतून घडते. नोकरी करणाऱ्या स्त्रीला प्रणयाच्या स्वच्छंद अनुभवापासूनही वंचित राहावे लागते; संतती होऊ नये या दडपणाखाली पुरुष जोडीदाराला दूर ठेवावे लागते; संततिनियमनांच्या साधनांच्या बेभरवशामुळे त्यांचा वापर करण्यातला धोका मनातून जात नाही. अशा दडपणाखाली सहजीवन विस्कटते, बुद्धिवादी नायिकेचा नवरा विकृतीच्या वळणावर जातो, अशा प्रकारच्या दुरवस्थेचे चित्रण या कादंबरीतून करण्यात आले आहे.

केवळ आर्थिक स्वातंत्र्याने स्त्रियांचे प्रश्न सुटणार नाहीत, त्यासाठी समाजाच्या नैतिक धारणात मूलगामी बदल व्हायला पाहिजेत, असा विचार ना. सी. फडके यांनीही त्यांच्या 'उद्धार' (१९३५) कादंबरीतून मांडला . घटस्फोटाचा कायदा अस्तित्वात नसल्याने त्या काळात पुरुषी जाचापासून सुटका करून घेण्यासाठी नवऱ्यापासून

काडीमोड घेण्याचा मार्ग खुला नव्हता. यामुळे होणारा स्त्रियांचा कोंडमारा अनेक साहित्यकृतीतून चित्रित झाला आहे. मा. दा. आळतेकर यांच्या मुक्तबंध (१९१६), ललिता (१९४१), अंतरंग (१९४३) या कादंबऱ्यांतून; य. कृ. खाडिलकर यांच्या 'संसारशकट' (१९३१)या कादंबरीतून हा विषय हाताळण्यात आला आहे. काशीताई कानिटकर यांनी 'पालखीचा गोंडा' (१९२८) या कादंबरीतून वैवाहिक जीवनात सोसाव्या लागणाऱ्या कोंडमाऱ्यातून मार्ग काढण्यासाठी स्त्रियांनी समाजसेवेकडे वळण्याचा पर्याय सुचविला आहे. तर शांताबाई नाशिककर यांनी स्त्रियांना कोंडून मारणाऱ्या विवाहसंस्थेलाच प्रश्नांकित केले आहे. वा. म. जोशींनी 'आश्रमहारिणी' कादंबरीत एक स्त्री दोन पतींबरोबर प्रेमाने संसार करू शकेल का असाही एक मुद्दा उपस्थित केला आहे. मो. ग. रांगणेकर यांनी एखाद्या स्त्रीला दोन पुरुषांबरोबर संसार थाटायचा असेल, तर त्याकडे समाजाने सहिष्णू नजरेने पाहिले पाहिजे, अशी भूमिका 'सीमोल्लंघन' (१९३४) कादंबरीतून मांडली. गीता साने यांनी 'हिरवळीखाली' (१९३६) या कादंबरीतून हिंदू विवाहपद्धतीमुळे स्त्रियांची होणारी कुचंबणा, स्त्रिया शिकल्या तरी पुरुषसत्ताक मूल्यदृष्टीतून तयार झालेल्या कायद्यांची बंदिस्त चौकट आणि पुरुषी भोगवादातून स्त्रीमनाची कोवळीक करपून टाकणारे समाजजीवन यांची कठोर समीक्षा केली. 'हिंदू विवाहाइतकी अश्लील गोष्ट जगात कुठेही नसेल' अशा स्वरूपाची तीव्र विद्रोही प्रतिक्रिया या कादंबरीतून पुढे आली. यापूर्वी भा. वि. वरेरकर यांच्या 'धावता धोटा' (१९३३) कादंबरीतल्या बिजलीनेही लग्नसंबंधाबद्दल शिसारी आल्याची, वैवाहिक जीवन हिडीस वाटत असल्याची प्रतिक्रिया नोंदवली होती. मात्र वरेरकरांना विवाहसंस्थेत परिवर्तन आवश्यक वाटत असले तरी ती संस्था महत्त्वाची असल्याने टिकली पाहिजे असे वाटत होते. म्हणून वरेरकरांच्या कादंबऱ्यातल्या स्त्रिया वावदूक असल्या, पुरुषी आक्रमणाबद्दल जागरूक असल्या तरी लैंगिक स्वातंत्र्याचा आग्रह धरीत नाहीत. (बांदिवडेकर, १९८९, पृ. १७५) पुरुषनिरपेक्ष मूल्यदृष्टीतून स्त्रियांचे सामाजिक स्थान, तिची स्वायत्तता आणि अस्मिता याविषयीचे चिंतन वरेरकरांच्या कादंबऱ्यांतून आले आहे. आर्थिक स्वावलंबनातून स्त्रियांना त्यांचे स्वातंत्र्य प्राप्त होऊ शकेल, अशा पर्यायांच्या शक्यता पडताळण्याचाही प्रयत्न त्यांच्या कादंबरीतून झालेला आहे.

आधुनिक व्यक्तिवादी जाणिवांनी संस्कारित झालेल्या नव्या पिढीला समाजातील स्थितिशील रूढी- बंधनांच्या चाकोरीबाहेर पडून आपल्या आत्मिक समाधानाच्या व सुखाच्या प्रेरणांच्या समाराधानासाठी पर्याय शोधण्याची आच निर्माण झाली होती. स्त्री-पुरुष संबंधांकडे पाहण्याच्या सांकेतिक बंधनांमुळे होणारा मनाचा कोंडमारा सोसण्याऐवजी त्यातून मुक्त होण्याच्या निरनिराळ्या पर्यायांच्या शक्यता धुंडाळण्याचा प्रयत्न मराठी माणूस करीत होता आणि त्याचे प्रतिबिंब साहित्यातून उमटत होते.

पुरोगामी दृष्टिकोनातून स्त्रीप्रश्नांचे विविध पैलू साहित्यातून चित्रित होऊ लागले होते. त्यात प्रेमविवाह, सहवासोत्तर प्रेम, परित्यक्ता स्त्रीचे प्रेमाचे प्रश्न, घटस्फोटाचा अधिकार, लैंगिक स्वातंत्र्य, मातृत्वाचे प्रश्न इत्यादी अनेक विषयांची चर्चा-चिकित्सा केली जात होती. नवमतवादाच्या प्रभावामुळे तरुणाईच्या मनात स्त्री-पुरुष सहवासाच्या मुक्त सहवासाच्या कल्पनांचा स्वप्नाळूपणा बहरू लागला होता. या बदललेल्या अभिवृत्तीकडे सनातनी आणि सुधारक यांची पहाण्याची भूमिका अर्थातच भिन्न होती. या सामाजिक क्रिया-प्रतिक्रियांचे पडसाद मराठी कादंबरीतही उमटलेले आढळतात. द. र. कवठेकर यांनी 'विखुरलेले प्रेम' (१९३५) या कादंबरीतून हा विषय हाताळला आहे. सामाजिक मूल्यचौकटीला अनुसरणाऱ्या वैवाहिक जीवनातली नैतिकता व सात्त्विकता आणि उद्दाम व वासनात्मक आकर्षणातून सहवासात येणाऱ्या तरुण-तरुणींच्या जीवनाचा अध:पात अशी विरोधमूलक मांडणी करून त्यांनी नवमतवादापेक्षा परंपरावादी नैतिकतेचा पक्षच उचलून धरला आहे. कुलीनतेच्या पारंपरिक सांकेतिकतेमुळे स्त्रियांनी नाटक-सिनेमात काम करू नये ही परंपरा मोडण्याचे धारिष्ट्य या काळातील काही बंडखोर स्त्रियांनी केले होते. त्याविषयीच्या परस्परविरुद्ध प्रतिक्रियांचे मोहोळ समाजात उठले होते. या वास्तवाची दखल घेऊन द. र. कवठेकर यांनी 'उमललेल्या भावना' (१९३७) या कादंबरीतून नाटकात काम करण्यास पुढे सरसावलेल्या 'वसुंधरा' या नायिकेच्या मनोव्यापाराचे चित्रण केले.

आर्थिक, सामाजिक आणि नैतिक समानतेच्या नवमतवादी तत्त्वज्ञानाच्या प्रभावामुळे स्त्री-पुरुष संबंधातले खडबडीत वास्तव पुढे आणण्यात आता साहित्यिकांना संकोच वाटत नव्हता. फ्रॉईडच्या मानसशास्त्रीय संकल्पनांच्या प्रभावामुळे निखळ मानवी संवेदनस्वभावाचे मूल्य अधिक महत्त्वाचे मानण्याकडे या वर्गाचा कल झुकू लागला होता. पुरुषांप्रमाणेच स्त्रीलाही आपल्या लैंगिक भावनांचे समाराधन करण्याचा हक्क आहे हा विचार आता साहित्यकृतीतूनही व्यक्त होऊ लागला. वा. म. जोशी यांनी 'रागिणी' या कादंबरीतून प्रेमविवाहाचा पुरस्कार केला. 'सुशीलेचा देव'मधली सुशीला पतिनिरपेक्ष जीवनसाफल्याचा शोध घेऊ पाहते व दुर्बलांची सेवा करून आपल्या जीवनाच्या सार्थकतेसाठी स्वत:चे स्वतंत्र कार्यक्षेत्र निवडते. पु. य. देशपांडे यांच्या 'काळी राणी'(१९४१) मध्ये देहातीत मैत्रीची संकल्पना चर्चिली गेली. सांकेतिक प्रेमाच्या चौकटीत न अडकता व्यक्तित्व विकासाचे माध्यम म्हणून प्रेमाचा विषय 'बंधनाच्या पलिकडे' (१९२७) कादंबरीतून त्यांनी मांडला. स्त्री-पुरुष संबंधांबाबत शारीर आकर्षण असले तरी प्रणयाराधनाकडे बघण्याचा निकोप व खुला दृष्टिकोन वरचढ होऊ लागला होता. 'निर्माल्याची बळी' (१९३५) या कादंबरीतून कुमुदिनी प्रभावळकर यांनी आणि 'फेरीवाला' (१९३९) या कादंबरीतून गीता साने यांनी धंदेवाईक वेश्यांच्या उद्धाराचा प्रश्न

हाताळला. तरुणांनी वेश्योद्धारासाठी पुढे आले पाहिजे, अशी भूमिका या कादंबऱ्यांतून मांडण्यात आली. स्त्री-पुरुष संबंधाकडे पारंपरिक रूढ नैतिक संकेतांच्या पलीकडे जाऊन निखळ मानवी मूल्यभावाने पाहिले पाहिजे हा विचार मराठी साहित्यातून अशा प्रकारे प्रशस्त होऊ लागला होता. आधुनिक जीवनदृष्टीतील बदलांच्या या सर्व खुणा तत्कालीन मराठी वाङ्मयातून वाचता येतात.

१९४०-५० च्या दशकात मराठी स्त्रिया पदवीधर होऊन आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होऊ लागल्या होत्या; मात्र तरीही पुरुषसत्ताक मूल्यव्यवस्थेत स्त्रियांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन फारसा बदलला नव्हता. आचार्य प्र. के. अत्रे यांनी १९४० च्या सुमारास 'लपंडाव' चित्रपटासाठी लिहिलेल्या कथानकातून तत्कालीन स्त्रीजीवनाच्या वास्तवाविषयीचे निरीक्षण नोंदवले आहे : "पुण्याच्या सुशिक्षित जगांत मी वावरत असल्यामुळे प्रौढ वयाच्या पदवीधर कुमारिकांच्या विवाहाचा प्रश्न दिवसेंदिवस किती बिकट होत चालला होता हे रोजच्या रोज मी पहातच होतो. त्यापैकी कित्येक कुमारिकांच्या करुण कहाण्या मला प्रत्यक्ष माहीत होत्या. स्वत:ला 'पुरोगामी' किंवा त्या वेळच्या भाषेत सांगावयाचे झाले म्हणजे 'सुधारक' म्हणवणारे कित्येक पिते आपल्या मुलींना विश्वविद्यालयीन शिक्षण देऊन बी. ए. किंवा एम. ए. करीत. पण त्यांच्या विवाहाचा विचारसुद्धा त्यांच्या डोक्यात कधी शिरत नसे. त्यांना वाटे की, आपल्या मुलींनी खूप शिकावे आणि आजन्म विवाहित राहून समाजाच्या सेवेसाठी स्वत:ला वाहून घ्यावे. पूर्वीच्या काळी अज्ञानी नि देवभोळे आईबाप ज्याप्रमाणे आपल्या मुली देवाला वाहून टाकीत आणि त्यांना 'देवदासी' किंवा 'मुरळ्या' बनवीत, त्याप्रमाणे सुधारलेल्या जगातले शिकलेले आईबाप आपल्या मुली समाजाला वाहून टाकून 'समाजसेविका' बनवू लागले. पण दोन्हीही नमुने एकच. 'देवदासी'चे किंवा 'मुरळ्यां'चे जे होई, तेच अर्थात् निराळ्या रूपाने आणि वेगळ्या रीतीने ह्या प्रौढ सुशिक्षित समाजसेविकांचे होत असे. शारीरिक वासनांचा कोंडमारा झाल्यानंतर मग जन्माचा जोडीदार निवडण्यासाठी लगणारा मनाचा समतोल आणि विवेक त्यांच्याजवळ रहात नसे. त्यामुळे त्यांच्या सान्निध्यात येणाऱ्या कोणाही धूर्त पुरुषाशी पात्रापात्रतेचा विचार न करता त्या एकदम विवाहबद्ध होत. आणि मागाहून जन्मभर पस्तावत." (अत्रे, १९९४, पृ. ६) १९४०-५० च्या दशकातील सुशिक्षित स्त्रियांचे हे प्रत्यक्षदर्शी वास्तव होते. नोकरी करणाऱ्या अशा स्त्रियांच्या कोंडमाऱ्याचे दर्शन इतरही अनेक साहित्यकृतीतून चित्रित झाले होते.

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात भांडवलशाही अर्थव्यवस्थेतली जीवघेणी स्पर्धा आणि भडकलेली महागाई यामुळे नोकरी करणाऱ्या स्त्रियांची सांसारिक जीवनात होणारी कुतरओढ आणि नवरेशाहीमुळे स्त्रियांचा होणारा कोंडमारा कायम होता. मराठीतील नवकथेतून स्त्रियांच्या या कुचंबणेचे मनोविश्लेषणात्मक आणि सामाजिक परिमाणातून

चित्रण झालेले आहे. या काळातल्या लेखनाचा प्रातिनिधिक नमुना म्हणून अरविंद गोखले यांच्या 'मंजुळा' (१९५०) ह्या कथेचे उदाहरण पाहता येईल. या कथेतली मंजुळा शिकलेली, नोकरी करणारी आहे. घरातल्या कर्त्या पुरुषाच्या बरोबरीने संसाराचा आर्थिक भार अंगावर घेणारी आहे. महानगरीय जीवनात लोकलमध्ये नको असलेल्या पुरुषांचा लागट स्पर्श झेलणारी मंजुळा घरी थकून भागून आल्यावर नवऱ्याकडून फक्त भुकेजल्या सावजाची बळी होते. तिचा नवरा हा सनातनी परंपरेत मुरलेला नवरा आहे. कामावरून थकून भागून आलेल्या बायकोची विचारपूस करण्याचे सौजन्य तर त्याच्याजवळ नाहीच, पण वेळेवर चहा मिळाला नाही म्हणून तिच्या मनाला दुखापत करण्यात त्याला कुठलाच कमीपणा वाटत नाही. त्याच्या लेखी बायको म्हणजे शिण घालवण्याचा रामबाण उपाय. मंजुळेला त्याचा हा भोग प्रेताशी केलेल्या शृंगारासारखा वाटतो. तिच्या वृत्ती मोहरून येत नाहीत. चित्तवृत्ती मोहरून येण्यासाठी लागणारी प्रसन्नता, स्वच्छता, प्रतिसादांचा खुलेपणा भोवताली नाही. सगळीकडे रोगट, पिसवांचे वातावरण. अशा वातावरणात प्रेमभावही रंगत नाही, शारीर क्रीडाही खुलत नाही. संसारात महागाईची कुतरओढ आणि सहवासात भोगवादी ओरबाडणे यातून खंगलेल्या स्त्रीजीवनाच्या वास्तवाचे प्रातिनिधिक दर्शन या कथेतून घडते. स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य मिळालं तर त्यांची पुरुषसत्ताक गुलामगिरीतून सुटका होईल हे प्रमेय किती भाबडे आहे, हे या कथेतून स्पष्ट होते. पुरुषी लिंगवर्चस्ववाद जोपर्यंत संपत नाही, तोपर्यंत स्त्रित्वाचा सन्मान होण्याची शक्यता नाही, असेच वास्तव अजूनही कायम असल्याचे या कथेतून आधोरेखित होते.

या काळात स्त्री-पुरुष प्रेमाचे चाकोरीबाहेरचे वळण चित्रित करणारी विश्राम बेडेकर यांची 'रणांगण' (१९३९) कादंबरी प्रसिद्ध झाली. महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर वांशिक द्वेषभावनेतून निर्माण झालेले संशयाचे वातावरण, ज्यूंच्या वाट्याला आलेले अमानवी क्रौर्य, आणि अस्तित्वाच्या संघर्षात पाय ठेवायला हक्काची भूमी नसल्याने परागंदा व्हावे लागलेल्या हॅर्टा नामक ज्यू तरुणीची शोकांतिका हे या कादंबरीचे कथानक आहे. जहाजावरच्या प्रवासकाळात निखळ दैहिक आकर्षण व शुद्ध प्रेमलालसेतून हॅर्टा चक्रधर नावाच्या मराठी तरुणाच्या प्रेमात पडते. अत्यंत अशाश्वत असलेल्या भविष्यकाळाचे ओझे डोक्यावर असतानाही बोटीवरच्या अकरा दिवसातले चिरंतन प्रेमाचे शाश्वत क्षण पकडण्याचा बोटीवरचा तिचा तरंगता अनुभव कथाविषय झाला आहे. बोटीवरचा प्रवास संपल्यावर मुंबई बंदरात हॅर्टा आणि चक्रधरची ताटातूट होते. नंतर हॅर्टाने केलेल्या आत्महत्येचे वृत्त वाचणे तेवढे चक्रधराच्या वाट्याला येते. तथाकथित सामाजिक प्रश्नांच्या पलिकडे जाऊन, वंश, देशाच्या परिघापलिकडची स्त्री-पुरुषांच्या प्रेमभावाची ही वेगळी कथा बेडेकरांनी लिहीली. शारीर आकर्षणातही असलेल्या विशुद्ध शाश्वत मूल्याचे नवे आकलन या कादंबरीने पुढे आणले.

## ७.७. ग्रामीण वास्तवाचे वाङ्मयीन आकलन :

विसाव्या शतकात पदार्पण करतानाच हरिभाऊ आपटे यांनी 'काळ तर मोठा कठीण आला' या कथेतून ग्रामीण भागातील शेतकऱ्याच्या जीवनाल दुष्काळामुळे होणाऱ्या हलाखीच्या जीवनाचे चित्र रेखाटले होते. खेड्यातील कुणब्यांचे जीवन लोकांना कळावे या प्रेरणेतून धनुर्धारी यांनी 'पिराजी पाटील' (१९०३) ही कादंबरी लिहिली होती. शेतकऱ्यांची उपासमार, पांढरपेशा वर्गाकडून होणारी हेटाळणी, शासकीय अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांना मिळणारी वागणूक यांचे चित्रण या कादंबरीतून आले होते. धनुर्धारी यांनी स्वत:च आपली कादंबरीलेखनाची भूमिका विशद करताना शेतकऱ्यांचे महत्त्व पटवून द्यावे यास्तव आपण हे लेखन केल्याचे म्हटले होते. "हे चित्र पाहून अगदी गाढनिद्रिस्त अशा महाराष्ट्राच्या अनेक मनोवृत्ती व कर्तव्यदक्षता आणि खरी माणुसकी जागी झाली आणि हा माझा शेतकरी, हे माझे देशबंधू, हा माझा बहुजनसमाज, एवढे नुसते वाटू लागले, तर ही कहाणी सांगण्यात इतके श्रम केले त्याचे चीज केल्यासारखे वाटणार आहे." असे त्यांनी म्हटले होते. (कोत्तापल्ले, १९९३, पृ. १२३) विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकात महाराष्ट्रात सत्यशोधक चळवळीचा जोर होता. सत्यशोधक जलशांतून ग्रामीण जीवनाचे वास्तव साहित्यात येऊ लागले. (यापूर्वी सामाजिक स्थित्यंतरांच्या तपासात सत्यशोधकीय जलशांविषयी व वैचारिक गद्यातून चर्चिल्या गेलेल्या सामाजिक प्रश्नांविषयी विस्ताराने आढावा घेतला आहे. तो पहावा.) ब्राह्मण भटजीवर्गाकडून ग्रामीण शेतकरी-कष्टकरी वर्गाचे होणारे शोषण हे सत्यशोधकीय वाङ्मयाचे एक मुख्य आशयसूत्र असे. मोतीराम तुकाराम वानखडे यांनी 'सत्यशोधक चाबूक' (१९०८) या पदसंग्रहातून महाराष्ट्रात एकवीस लाखापेक्षा जास्त ब्राह्मण कुटुंबे हे आयते बसून खातात व त्यामुळे ते या भूमीला भारभूत झाले असल्याची टीका केली होती. ब्राह्मणांना देवद्रोही, स्त्रियाद्रोही, विधवाविद्वेषी अशी विशेषणे लावून त्यांनी ब्राह्मणवर्गाच्या सनातनी, प्रतिगामी जीवनधारणा उघड केल्या होत्या. ' ब्राह्मणांकडून ग्रामीण शेतकरी वर्गाचे दैनंदिन शोषणाचे सत्र कसे अव्याहत सुरू असते यावर 'संगीत भटांचे थोतांड खंडन' (१९२५) या पदसंग्रहातून त्यांनी प्रकाश टाकला होता :

"कोठवर सोसावा भटांचा त्रास / ब्राह्मण जोशांचा त्रास
दिवस निघाला नाही तोच हे / दारी येती बघ बारही मास
तीर्थक्षेत्री, कोर्ट कचेरीत / कोठेही जा तिथे असती भट उभा
पंचांगांच्या साह्ये भट हे / तोडुनी खाती जैसे गिधाड खत"

नारायण मारुतराव नवले यांनी 'धर्मभोळेपणाची तुंबडी' (१९१०) या गोष्टीतून कुळकर्णी-भट-पुरोहित यांच्या जळवा ग्रामीण बहुजनांचे कसे शोषण करीत होत्या, हे वास्तव पुढे आणले आहे. खंडोगणती धान्य पिकवणारा बळीराजा तीर्थक्षेत्री ब्राह्मण भोजने

घालण्यात स्वत:ला धन्य मानतो, व्रत-उपोषणे करून स्वत:च शोषणाच्या बंधात फसतो. या धर्मभोळेपणाच्या तुंबडीपासून सुटका करून घेण्यासाठी सत्यशोधक समाजाची कास धरावी असे बोधामृतही ह्या फार्समधून दिले जाते. मुकुंदराव पाटील यांनीही 'कुलकर्णी लीलामृत' (१९१३) या खंडकाव्यातून धार्मिक आणि राजकीय सत्तास्थानांवर ताबा मिळविलेल्या कुलकर्णींचा कपटकावा उघड केला आहे. ह्या कुलकर्ण्याला दानदक्षिणा, शिधा देऊन खूष ठेवण्याचे काम करणारा अडाणी समाज जोपर्यंत बदलत नाही, तोपर्यंत कुलकर्ण्यांचे फावणार आहे, हेही सत्य कवी लक्षात आणून देतो. गावच्या पाटलाचा अडाणीपणा, मानपानाच्या खोट्या कल्पना ह्यामुळे आपण स्वत:ची हानी करून घेतो ह्या वास्तवाकडे डोळसपणे पहायला लावणारे हे खंडकाव्य सत्यशोधक चळवळीच्या उद्देशपत्रिकेला धरूनच लिहिले गेले होते.

शेटजी-भटजींच्या पारंपरिक शोषणाखेरीज सावकार व जमीनदार मालकांकडून होणाऱ्या शोषणापासून ग्रामीण बहुजन समाजाला मुक्त करण्यासाठी प्रबोधन-प्रचार करणारे साहित्य या काळात निर्माण झाले. मुकुंदराव पाटील यांचे 'शेटजी प्रताप' (१९१९) हे खंडकाव्य या प्रकारच्या साहित्याचा प्रातिनिधिक नमुना आहे. मालक व खंडकरी कुळे यांच्यातली शोषक-शोषणाची परंपरा हे या खंडकाव्याचे मध्यवर्ती आशयसूत्र आहे. शेटजी सावकार खोटी कागदपत्रे करून निरक्षर कुळांचे अंगठे उठवून कुळांना कसे लुटतात, कोर्टात भांडणे लावून कसे छळतात याची अनुभवघटिते या खंडकाव्यातून वर्णिलेली आहेत.

ग्रामीण भागातील पाटील मंडळींच्या प्रतिष्ठेच्या खोट्या कल्पनांमुळे शेतकऱ्यांचे कसे नुकसान होते; व या पोकळ बडेजावापासून दूर राहून ग्रामजनांनी आत्मपरीक्षण करावे या हेतूने सत्यशोधक लेखकांनी समकालीन ग्रामीण समजुतींची कठोर समीक्षा केली आहे. हरिश्चंद्र आनंदराव तालचेरकर यांनी 'रावबहादूर पर्वत्या' (१९०४) या पाच अंकी प्रहसनातून हा विषय हाताळला आहे. ग्रामीण भागात बिगारी काम करणाऱ्या पर्वत्याला 'रावबहादूर' किताब मिळवण्याची हाव असते. पण हांजी हांजी करून, साहेबाचे बूट पुसून रावबहादूर पदवीचा बिल्ला छातीवर चढवला म्हणजे आयुष्याची इतिकर्तव्यता झाली ही समजूत कशी फसवी असते, हे या प्रहसनातून दाखविले आहे. असा सरकारी मानमतराब मिळवला तरी जनमानसात पर्वत्याची किंमत रतीभरही वाढत नाही, हे दर्शवून नाटककाराने ग्रामीण लोकांनी खोट्या प्रतिष्ठेच्या मागे न लागता निखळ मानवी मूल्यांना अनुसरण्याचा संदेश दिला आहे. मुकुंदराव पाटील यांनीही 'होळीची पोळी' (१९१९) या कादंबरीतून हाच विषय हाताळला आहे. खोट्या प्रतिष्ठेच्या मागे लागल्याने ग्रामीण भागात चालणारी पाटीलकीच्या वतनाची भांडणे या कथेतून चित्रित करण्यात आली आहे. मुकुंदराव पाटील यांनी सत्यशोधक कार्यकर्त्यांच्या कामात विघ्ने आणून, त्यांच्याविषयी

लोकमत कलुषित करणाऱ्या भट-पुरोहित वर्गाचे सामाजिक दुहीचे राजकारण 'राक्षसगण' या नाटकातून उघड केले आहे. शिक्षणक्षेत्रातील पुढारी आणि अधिकारी यांच्या संगनमताने चालणारी भ्रष्टाचाराची, वशिलेबाजीची प्रकरणे यावर प्रकाश टाकणारे 'हेडमिस्ट्रेस' (१९३८) हे नटकही मुकुंदरावांनी लिहिले.

ब्रिटिश राजवटीचे सकारात्मक-नकारात्मक सामाजिक परिणाम हे आणखी एक मुख्य आशयसूत्र सत्यशोधक साहित्यात आढळते. मोतीराम तुकाराम वानखडे यांनी 'संगीत शेतकऱ्यांची गोफण' (१९०३) या पदसंग्रहातून ब्रिटिश अमदानीतील शेतकऱ्यांच्या दु:स्थितीचे दर्शन घडविले आहे. ब्रिटिशांनी जंगले तोडून जमिनी उपजावू केल्या, पण त्यावर शेतकऱ्यांना मालकी दिली नाही. ब्रिटिश अमदानीत धान्य पिकवणाऱ्या शेतकऱ्याला पोटभर अन्न मिळत नाही. सरकारने त्यासाठी काही केले नाही. शेतकऱ्यांच्या मुलांना सक्तीचे मोफत शिक्षण नाही, त्यांना यंत्रविद्येचे प्रशिक्षण नाही, शेतकऱ्यांमधून चांगले प्रभावी नेतृत्व नाही, अशा अभावांची उजळणी या संग्रहातून करण्यात आली आहे. मुकुंदराव पाटील यांनी पेशवाईतला मराठी समाज आणि इंग्रजी राजवटीतला बदललेला समाज यांचे तौलनिक वास्तवचित्रण 'ढ्ढ्ढाशास्त्री परान्ने' (१९१५) या कादंबरीतून केले आहे. पेशवाईच्या ब्राह्मणी संस्कृतीत ब्राह्मणेतरांची अवहेलना होत असे, इंग्रजी राजवटीत मात्र सर्व जातिवर्णातील स्त्री-पुरुषांच्या बाबतीत समतेचा विचार सुरू झाला. काळाबरोबर पुण्याचे ब्राह्मणही बदलत आहेत, असे बदलणाऱ्या वास्तवाचे सूक्ष्म अवलोकन या कादंबरीतून मांडलेले आहे. ब्राह्मणांचा सोवळ्याचा आग्रह मागे पडला आहे, ते आता हॉटेलात बसून चहा पिऊ लागले आहेत; युरोपीयन पद्धतीचे पोशाख घालू लागले आहेत, आंघोळीला उटण्याऐवजी साबण वापरू लागले आहेत. नगररचनेतही युरोपीयन पद्धतीची बांधकामे होऊ लागली आहेत; पाण्याचे नळ आले आहेत, अशा बदलांच्या सूक्ष्म खुणांचे चित्रण या कादंबरीतून करण्यात आले आहे. मुख्य म्हणजे शिकलेल्या मराठ्यांचा चांगुलपणा ठसठशीतपणे मांडला आहे. त्यांच्यात पुनर्विवाहाची चाल, बीजवराशी लग्न, मिश्रविवाह इत्यादी सुधारणांचे युग सुरू झाले आहे. पेशवाईत साकळलेले जीवन ब्रिटिश अमदानीत गतिमान झाले आहे. सत्यशोधनाच्या मार्गाने गेल्याने जीवनाचे कल्याणच होते, हा संदेश यातून संज्ञापित करण्यात आला असून अशा सुधारलेल्या मराठा प्रजातीला विरोध करणारे हास्यास्पदच ठरतील असेही सूचित केले आहे. मुकुंदराव पाटील यांच्या 'चंद्रलोकीची विलक्षण रूढी अथवा दादासाहेबांची फजिती' (१९११) या कादंबरीतून शंभर वर्षांपूर्वी चंद्रलोकीच्या सफरीवर गेलेल्या दादासाहेब देशमुखांना पृथ्वीवर परत आल्यावर झालेले नवे बदल पाहून जो आश्चर्याचा धक्का बसला त्याला केंद्रस्थानी ठेवून पृथ्वीवरील जुन्या रूढी परंपरा आता कशा कालबाह्य झाल्या आहेत याविषयीचे दर्शन घडविले आहे.

चंद्रलोकावरही मानवी जीवन असल्याचे ह्या कथेत कल्पिले असून चंद्रलोकीची जीवनमूल्ये आणि पृथ्वीवरची जीवनमूल्ये यांची तौलनिक समीक्षाही केली आहे. चंद्रलोकीच्या स्त्रियांना पृथ्वीवरच्या स्त्रियांपेक्षा अधिक मान व प्रतिष्ठा होती; याउलट पृथ्वीवर स्त्रियांना कायम पददलितांचे स्थान असते हा विरोधाभास लेखकाने विडंबनात्मक शैलीतून वर्णन केला आहे. पृथ्वीवरच्या रूढी-प्रथांपेक्षा चंद्रावरच्या रूढी-प्रथा अधिक मानवी व प्रगत होत्या असे दर्शवून लेखक अपेक्षित आदर्श समाजरचनेचे रेखाचित्र या कादंबरीतून पुढे आणू पहातो.

र. वा. दिघे यांच्या 'पाणकळा', 'सराई' या कादंबऱ्यांतून खेड्यातील रम्य निसर्गवर्णने चित्रित होत होती, तशी तिथली वारकरी जीवनशैलीची सांस्कृतिक परंपराही आशयगर्भ होऊन अवतरत होत होती. 'पाणकळा' (१९३९) कादंबरीतून वारकरी संस्काराची जीवनमूल्ये प्रमाण मानणाऱ्या भुजाबा शेतकऱ्याच्या कुटुंबाच्या जीवनशैलीचे दर्शन त्यांनी घडविले आहे. या कादंबरीतला भुजाबा शेतकरी दुष्काळाच्या आपत्कालीन परिस्थितीत घरातले सर्व धान्य गावकऱ्यांना वाटून टाकतो आणि तुकोबारायांपासून चालत आलेल्या वारकरी संवेदनशीलतेचा वारसा पुढे नेतो. ग्रामजीवनात कुणबी आणि खोत, सावकार आणि शेतकरी यांच्यातले जे शोषणाचे द्वंद्वात्मक संबंध होते, त्याचेही चित्रण दिघे करतात. ब्रिटिश राजवटीत कायद्याचे राज्य आले असले तरी या पारंपरिक शोषणाचे आकृतिबंध अजून समाजात जसे होते, तसेच कायम असल्याचे वास्तव 'सराई' (१९४३) या कादंबरीतून आधोरेखित होते.

ग्रामीण जीवनातून हद्दपार झालेल्या विस्थापितांचे चित्रण करणाऱ्या काही कादंबऱ्या या कालखंडात लिहिल्या गेल्या. कर्जबाजारीपणामुळे स्वतःची शेती गमावून बसल्यावर उपजीविकेसाठी गाव सोडून मुंबईला स्थलांतरित झालेल्या शेतकरी कुटुंबाची कथा ना.वि. कुलकर्णी यांनी 'कसे दिवस जातील' (१९२५) ह्या कादंबरीत कथन केली आहे. या कादंबरीतील आबा मुंबईच्या गोदीत काम मिळवतो. पण रोजगार मिळाला म्हणजे संपले असे होत नाही. मुंबईच्या महानगरीय जीवनात गावातले एकजीनसी संस्कारी जीवन संपुष्टात येते. त्याची मुले बकाल वस्तीतल्या संगती-सोबतीतून बहकतात, अपप्रवृत्तींच्या आहारी जातात. मुंबईत येऊन आबालाही व्यसने जडतात आणि तो पुन्हा कर्जबाजारी होतो. अखेर आबाला शहर सोडून गावात परतण्याचा पर्याय शिल्लक राहातो. शहरात आपले भागधेय शोधण्यापेक्षा गावातच जीवनाचे नवे पर्याय शोधणे इष्ट अशा प्रकारची दिशा सूचित करणारी ही कादंबरी आहे.

गांधीजींच्या राजकारणामुळे 'खेड्याकडे चला' हा घोष मराठी तरुण पिढीने आळवायला सुरुवात केली होती. त्यामुळे खेड्यांचे आदर्शरूप चित्र मराठी कवितेतून वर्णन केले जाऊ लागले. खेडी म्हणजे भरगच्च निसर्ग, मोकळा वारा, सकस अन्न,

दणकट शरीरे, रासवट भावना आणि शहर म्हणजे भकास , एकसूरी कंटाळवाणेपणा असे खेड्यांच्या विरोधातले काळेकुट्ट चित्र रेखाटले जाऊ लागले. शहरी वाचकांचा रूचिपालट होईल असे खेड्यांचे रंजक चित्र रेखाटले जाऊ लागले. रविकिरण मंडळाच्या यशवंत, ग. ल. ठोकळ, ग. ह. पाटील यांच्या जानपद गीतांतून खेड्यांची अशी लोभसवाणी प्रतिमा पुढे येऊ लागली होती. [२] 'मैतरणी बिगी बिगी चल" यासारखी ग्रामीण ढंगाची रंजनवादी भाषा कवितेत आली. अर्थात ग्रामीण ढंगाच्या भाषेतून ग्रामजीवनाचे वास्तवही चित्रित होत होते. उदाहरणार्थ,

"साफ नांगरून शेत त्यावरी औतही चालवील / जोंधळं मगशानी पेरलं
साबर फणिचं काटकुंपण सभोवार घातलं / कुठंतर केकताड वाढलं"

(ग. ल. ठोकळ, मीठभाकर, १९३८)

नागर संस्कृतीत वाढलेल्या मराठी लेखकांकडून खेड्याच्या संस्कृतीचे उथळ दर्शन जेव्हा साहित्यात चित्रित होऊ लागले, तेव्हा वि. स. खांडेकर यांनी त्याविषयीची आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना 'सुगी' (१९३३) या ग्रामीण / जानपद कवितांच्या प्रातिनिधिक काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत म्हटले होते की, "खेड्यातल्या लोकांचा आमच्या ललित वाङ्मयात प्रवेश झालाच तर तो त्यांचा भोळेपणा अगर अडाणीपणा दाखवून विनोदाला रंग भरण्याकरताच व्हायचा.. बहुजन समाजाशी समरस होणे, अगर खेड्यातल्या जनांचे, मनाचे आणि वनाचे विविध सौंदर्य आपल्या वाङ्मयातून कुशलतेने प्रकट करणे फारसे शक्य नाही. शहरातील दलित वर्गाची चित्रे रेखाटणाऱ्या लेखकांना आज ना उद्या खेड्याकडे वळावेसे वाटेलच. ही प्रवृत्ती म्हणजे काही वाङ्मयातली फॅशन अगर चवचाल लहर नव्हे. म. गांधी 'खेड्याकडे चला' म्हणून उपदेश करीत आहेत, इलाखाधिपती ग्रामोद्धारासाठी दौरे काढीत आहेत; तेव्हा आपणही खेड्याच्या नावाने गोंधळ घालू या अशा कल्पनेने या नव्या मनूचे स्वागत करणाऱ्या लेखकांची कीवच करावी लागेल. समुद्राप्रमाणे अफाट पसरलेल्या आपल्या खेडवळ जीवनाचे मंथन करून त्यातील रत्ने काढायला मात्र प्रतिभासंपन्न लेखकच हवेत."( यादव, १९९३, पृ. ३२-३३)

मराठी साहित्यात अशा प्रकारे खेड्यातले जीवन फॅशन म्हणून चित्रित होऊ लागले तर बऱ्याचशा साहित्यातून ग्रामीण जीवनाचे वास्तव, समस्या आणि परिवर्तनाच्या दिशा स्पष्ट करणारे चित्रण होऊ लागले. ग्रामसंस्कृतीतले रीतिरिवाज,सावकार, शेतमजूर, अस्पृश्यांची शब्दचित्रेही रेखाटली जाऊ लागली. वामन चोरघडे 'अतिथी देवो भव' या कथेतून खेड्यातली माणसे शेतात राबणाऱ्या बैलाला देव मानून पोळ्याच्या सणाला त्याची भक्तिभावाने पूजा करतात याविषयीचा ग्रामीण संस्कृतीचा नमुनादर्श मांडतात. बैलांची पूजा ही अशिक्षितांची अंधश्रद्धा मानणाऱ्या शहरी मानसिकतेत घडलेल्या डॉक्टरने पोळ्याच्या सणाला बैलजोडीची पूजा करण्यास नकार देऊन इनामाची नोट पुढे

केल्यावर पैकूची बायको त्याला सांगते की, 'बैल ही जनावरे नाहीत, आज ते आमच्या घरचे पाहुणे आहेत; त्यांचा अपमान करणाऱ्या डॉक्टराचे इनाम हे आमच्या लेखी जहर आहे', असे म्हणून ती नोट तेलवातीवर जाळून टाकते. ह्या भावपूर्ण कथेतून चोरघडे ग्रामीण भारतीय संस्कृतीच्या श्रद्धाविश्वाचे दर्शन घडवतात. 'संस्कार' कथेतून खेडेगावातल्या प्राथमिक शाळेतले साधे पण रम्य वातावरण, हरघडी खोड्या करणारी निरागस मुले यांचे चित्रण करतात. 'घार' या कथेतून गांधीजींच्या हिंदू-मुस्लमानांतील सामाजिक समरसतेचा दृष्टिकोन खेड्यात कसा रूजलेला आहे, हे सांगणारे कथानक येते. या कथेत खोडकर हिंदू मुलगा आणि साधी, सरळ मनाची मुसलमान मुलगी अशी सात्विक पात्रे आहेत. सलमाला ठाऊक आहे की, तिचं लग्न झाल्यावर नवरा मुसलमानच असेल, पण आपल्या नवऱ्याजवळ सांगण्यासारखी एक गोष्ट असेल ती आपल्या शाळेतल्या बालपणीच्या आठवणींची. म्हणून ती आपल्या हिंदू मित्राकडून अपेक्षा करते की, त्याने आपल्याशी अभद्र बोलू नये, आपले मन मळले आहे, असं वागू नये. तो तिच्याशी छान खेळतो, आनंदी राहतो हाच आठवणींचा ठेवा तिला मिरवावासा वाटतो. गांधीजींना अभिप्रेत असलेला ग्रामीण वास्तवातला हा सांस्कृतिक सौहार्दाचा वारसा साहित्यातून संक्रमित करण्याचा वसा या लेखकांनी घेतला होता.

श्री. म. माटे यांनी 'उपेक्षितांचे अंतरंग' (१९४१) या कथासंग्रहातून ग्रामीण जीवनातील उपेक्षितांच्या व्यथा मांडल्या. कृष्णाकाठचा रामवंशी, तराळखोऱ्यातला पिऱ्या, धर्मा माकडवाला, गणू हलवाई अशा व्यक्तिरेखांतून समाजातल्या तळागाळातल्या वंचित समाजगटातल्या वास्तव जीवनाची चित्रणे केली. खेड्यातील गावकुसाबाहेरच्या वंचित समाजाचे जीवन त्यांनी या कथांतून मांडले. 'अस्पृष्टाच्या डायरीतील पाने' या कथेतून त्यांनी हरिजनांना गावच्या सार्वजनिक पाणवठ्यावर पिण्याचे पाणी भरण्यास केल्या जाणाऱ्या बंदीचे वास्तव पुढे आणले. या कथेतील तानी कीर्तनात एकनाथांनी तहानलेल्या गाढवाला पाणी पाजल्याची गोष्ट ऐकते आणि आपल्या बापाला - पिऱ्याला- विचारते, "बाबा! त्या गाढवाच्या पोराला बामणानं कावडीचं पाणी पाजलं, अन आपल्याला गावच्या हेलावर का वं भरू देत नव्हती?" यावर पिऱ्या तानीची समजूत काढताना म्हणतो, "तुला काय सांगू, आपला शिवा मोठा झाला म्हणजे गावकऱ्यांना विचारील जाब." 'कृष्णाकाठचा रामवंशी' या कथेतला सत्या न्यायाधीशाला म्हणतो, "आम्ही मर्द रामवंशी हाओ. आमाला तुमच्यावाणी बोलाया येत न्हाइ. पन काळ कंदी ना कंदी फिरंल, रामाची किर्पा हुइल अन आमाला बरं दिस येत्याल". माटे यांच्या कथेत प्रखर विद्रोहाच्या जाणिवा नसल्या तरी काळ बदलेल, गावच्या पारंपरिक समजुती बदलतील आणि वंचितांना न्याय मिळेल असा आशावाद त्यांनी आपल्या कथांतून व्यक्त केलेला आहे. पुढे १९५० साली विभावरी शिरूरकर यांनी 'बळी' कादंबरीतून चोरट्या गुन्हेगार जमातीच्या जीवनाचे

वास्तवचित्र रेखाटले. या कादंबरीतला आबा गांधी सेवा मंडळाच्या शाळेतून शिकून मास्तर झाला तरी समाज 'किती पांढरे कपडे घातले तरी तू चोराचाच मुलगा आहेस' याची त्याला सतत जाणीव करून देतो. समाजाची ही पारंपरिक मानसिकताच मराठी माणसाच्या सामाजिक जीवनाला गढूळ करीत असते, हे वास्तव या कादंबरीतून लेखिकेने ढळढळीतपणे पुढे आणले आहे.

श्री. व्यंकटेश शंकर वकील यांनी 'भिमीची सवत' या लोकनाट्यातून खेड्यातील दारूच्या समस्येचा वेध घेतला आहे. गडकऱ्यांच्या 'एकच प्याला' नाटकातल्या मध्यमवर्गीय मांडणीपेक्षा या लोकनाट्यातील दारूच्या व्यसनाच्या आशयसूत्राची मांडणी वेगळी आहे. खेड्यातील पोळा, होळी किंवा दिवाळीसारख्या सणावाराला दारू पिणारा नारायण पाटील आणि घराण्याची पूर्वपरंपरा पुढे चालविण्याच्या अभिनिवेशाने दारूच्या आहारी गेलेला गणपत देशमुख या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून या प्रश्नाची मांडणी करण्यात आली आहे. दारूच्या आहारी गेलेल्या पुरुषांची नैतिकता भ्रष्ट होते, बहिणीच्या अंगावर हात टाकणे, स्वत:च्या आईच्या गळ्यातले मंगळसूत्र तोडणे, सात्त्विक गुरुजीचा खून करणे असल्या घटना करताना दारूडी माणसे आपली नैतिकता हरवून बसतात. खेड्यात दारूच्या व्यसनाचा प्रादुर्भाव वाढण्याचे कारण दारूच्या धंद्याला भरमसाट व्याजाने पैसा पुरविणाऱ्या द्रव्यलोभी मारवाडी सावकारांचे आर्थिक हितसंबंध हे महत्त्वाचे कारण असल्याचे या लोकनाट्यातून सूचित करण्यात आले आहे. परंतु घरातली बायको कणखर असली तर ती आपल्या दारुड्या नवऱ्याला दारूच्या व्यसनापासून मुक्त करू शकते, अशी एक आशावादी किनारही व्यसनमुक्त होणाऱ्या पंढरीच्या व्यक्तिरेखेतून नाटककाराने दाखविली आहे. गांधीजींच्या दारूबंदीच्या प्रचाराला पोषक असे हे लोकनाट्य त्या काळात लिहिले गेले. (कोलते, १९६५, पृ. १३७)

बा. सी. मर्ढेकर यांनी 'तांबडी माती' (१९४३) आणि 'पाणी' (१९४८) या दोन कादंबऱ्यांतून भांडवलशाही युगातल्या आधुनिकतेमुळे व उत्पादनव्यवस्थेतील बदलांमुळे ग्रामीण समाजात निर्माण झालेले नवे पेच, हे विषय हाताळले आहेत. औद्योगिक संस्कृतीबरोबर बदलत जाणाऱ्या ग्रामीण जीवनातल्या संक्रमाणावस्थेवर लेखकाने प्रकाश टाकला आहे. मुंबईतल्या उद्योगधंद्यांच्या विकासासाठी वीज पुरविण्याकरिता मुळशी धरण बांधले गेले, पण धरणाच्या पाण्याखाली जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाच्या प्रश्नामुळे स्थानिक शेतकऱ्यांची सामाजिक-मानसिक कोंडी कशी झाली, यावर या कादंबरीतून मर्ढेकरांनी प्रकाश टाकला आहे. या कादंबरीतील भगतपूरच्या शेतकऱ्यांना पारंपरिक शेती पिकवण्याच्या व्यवसायातून बाद केले जाते. धरणाच्या कामावर मजुरी करण्याचा पर्याय स्वीकारावा लागतो. पण धरणाचे काम पूर्ण झाल्यावर पुन्हा अस्थिरता येते. पाण्याखाली गेलेल्या जमिनीची भरपाई म्हणून हाती पैसा आला, तरी कुठे तरी

परक्या ठिकाणी जमीन घेऊन पुन्हा एकदा नवे जीवन सुरू करणे ही गोष्ट सोपी नसते. धरणामुळे पिकाऊ जमीन गमावून बसलेला विठा मुंबईला स्थलांतरित होतो; पण मुंबईत त्याची मुळे रूजत नाही. भूमीहीन मजूर शहरात स्थलांतरित झाल्याने त्याची परिस्थिती सुधारत नसते, याचा अनुभव या कादंबरीतून मांडला गेला आहे. कुठलाच पर्याय सापडत नाही म्हणून सैन्यात भरती होण्याचा निर्णय तो घेतो. ग्रामीण संकृतीतली मुळे उखडलेल्या प्रकल्पग्रस्त माणसांची ससेहोलपट कशी जीवघेणी असते, याविषयीचे विषण्ण करणारे चित्र या कादंबरीतून मर्ढेकरांनी रेखाटले आहे. उत्पादनव्यवस्थेतील आधुनिकतेमुळे, साम्राज्यवाद्यांच्या युद्धखोरीमुळे आणि वसाहतवादी शासननीतीमुळे कोडिंबा, शिवा, सारजा ह्या खेड्यातल्या साध्या –भोळ्या माणसांची होणारी कोंडी हा विषय 'तांबडी माती' या कादंबरीत हाताळला आहे. संज्ञाप्रवाही निवेदनतंत्रातून श्रद्धाळू, अडाणी, भाबड्या खेडूतांचा मानसिक कल्लोळ या कादंबरीतून व्यक्त झाला आहे. सैन्यात भरती झालेला शिवा ह्या शेतकरीपुत्राला युद्धक्षेत्रावर पूर्णपणे अपरिचित असलेल्या नव्याच गुंतागुंतीच्या अनुभवांना सामोरे जावे लागते आणि त्यामुळे त्याच्या मनाच्या ज्या चिरफळ्या उडतात, त्याचे संज्ञाप्रवाही चित्र मर्ढेकरांनी रेखाटले आहे. ही कादंबरी आधुनिक ग्रामीण जीवनातील स्थित्यंतरांचे एक वेगळे दर्शन घडविते.

स्वराज्य मिळाल्यानंतर खेडे बदलले का, याविषयीचा तपास करण्यासाठी बी रघुनाथ यांच्या 'जनता लिंबे टाकळी' या कथेतील गावकऱ्यांनी शिक्षणमंत्र्याला लिहिलेल्या पत्रातला मजकूर पुरेसा आहे : "आता जनतेचे राज्ये (राज्य) आले आहे. लोखंडाचे पेटीत आम्ही मत्त (मत) टाकावे म्हणून आपण खुद्द आमचे गावी येऊन 'आम्ही तुमच्यासाठी चांगल्या शाळा काढू, नव्या सडका बांधू, अमके करू आणि तमके करू, असे आपण मोप (पुष्कळ) सांगितले. आपण मंत्री झालात, आणि आम्हांला विसरलांत. लिंबेटाकळीच्या शाळा आणि सडक प्रकरणी आठदहा अर्ज आम्ही रजिस्ट्रीने आपल्या इतर अधिकाऱ्यांच्या नावाने रवाना केले. तरी एकाचाही निकाल लागला नाही. आम्ही का समजू नये की मंत्री काम करीत नाहीत? भाई खन्ना आणि मुन्ना तुमच्या सगळ्या मंत्र्यांबद्दल जे बोलतात ते मात्र आता खरे वाटू लागते. राजकारण एवढे घुसळले तरी बोला आता लोणी कुठे आहे? .. गोष्ट अशी आहे की आमच्या गावातल्या चावडीत पूर्वी शाळा भरत होती. ही इमारत पडायला झाली. निवडणुकीच्या वेळीच आम्ही अधिकाऱ्यांना ती दाखविली. पण कोण पाहणार? आता तरी बांधणीखात्याकडून ती एकदा पाहायला लावा. नकशा काढून घ्या. तिला दुरुस्त करा. नाहीतर नवी बांधा. ती बांधून होईपर्यंत आमच्या नेमीचंद मारवाड्याच्या माडीत शाळा चालू करा. सध्याचा मास्तर वर्तनाने उद्धट आणि कामचुकार आहे. महिना महिना तो लिंबेटाकळीत राहत नाही. एखादा अधिकारी दौऱ्यावर यायचा असला म्हणजे तो येतो. नाहीतर चपराशाच्या

भरोवशावर खुशाल शाळा टाकून निघून जातो. कुठे, विचारा! कसबे 'कावळी' रंगूबाई मास्तरणीच्या घरी! शाळा कशी चालावी? अशाने सरकार चालते काय? आमचे म्हणणे असे आहे की, या मास्तरला तुम्ही काढून टाका आणि बापू हटकर सध्या जो चपराश्याचे काम करतो त्यालाच नेमा. तो चांगला शिकलेला आहे. तो शाळा नीट चालवू शकतो. बाहेरचा माणूस इथे टिकणार नाही. आता राह्यली चपराश्याची जागा. त्या जागेवर येथल्या तांबोळ्या शेकू काम करील. अशीच एक गोष्ट म्हणजे तुम्ही आमचे लोकलफंड काय करता? गावात सडका नाहीत. बैलांना पाणी प्यायला गावाबाहेर एक चांगले तळे असूनही त्याची दुरुस्ती नाही. मौजे लिंबे टाकळी ते कसबी कावळीला होणाऱ्या सडकेची नुकतीच पाहणी संपली. पण हा कुठला न्याय? राम टेकाळेच्या नापीक जमिनीतून सडक घालण्याऐवजी गोविंदराव पाटील आकात यांच्या बागबगीच्यातून ती नेली जाणार आहे. गावात खायला दाणा उरला नाही. तरी आपण या सगळ्या गोष्टींची कसून तपासणी करा. तरच हे जनतेचे राज्य आहे असे आम्हांला पटेल.- आपली जनता, लिंबे टाकळी." (बी रघुनाथ, १९६५, पृ. १७६-१७७) निजामी राजवटीच्या जुलुमातून सुटका होऊन स्वतंत्र लोकशाही राजवटीत आल्यावरही खेड्यातल्या जनतेची नाडवणूक थांबली नाही, हे कठोर वास्तव या कथेतून पुढे आले आहे. महाराष्ट्रातल्या अन्य भागातही याहून वेगळी परिस्थिती नव्हती.

## ७.८. वैचारिक साहित्यातील अंत:प्रवाह :

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील वैचारिक वाङ्मयातून तत्कालीन विचारप्रवाहांचे अंत:प्रवाह उमटलेले दिसतात. बीजग्रंथांच्या आधारे नवविचारांची मांडणी करण्याची परंपरा मराठी साहित्यात यादवकाळापासूनच रूळलेली होती. गीताभाष्य किंवा गीताटीका यांची एक दीर्घ परंपरा मध्ययुगीन मराठी साहित्याने निर्माण केली होती. आधुनिक जीवनसंदर्भात 'गीते'चे पुनर्वाचन करून आपल्या राजकारणाला धार्मिक अधिष्ठान देणारे साहित्य या काळात लिहिले गेले. लोकमान्य टिळकांचे 'गीतारहस्य, विनोबा भावे यांची 'गीता प्रवचने' हे या कालखंडातील गीताभाष्याचे दोन महत्त्वाचे मानदंड ठरले. वा. म. जोशी यांच्या 'इंदू काळे सरला भोळे' सारख्या कादंबऱ्यांतूनही गीतेतल्या कर्मवादाचे महत्त्व आळविण्यात आलेले आहे. साने गुरुजींनी 'भारतीय संस्कृती' या ग्रंथातून भारतीय तत्त्वज्ञानातील कर्म, भक्ती. ज्ञान, अहिंसा इत्यादी तत्त्वांचा परिचय करून दिला. आचार्य स. ज. भागवत यांनी 'जीवन आणि साहित्य' (१९४३) या ग्रंथातून 'कर्मयोग आणि नेटका प्रपंच'; आजचा महाराष्ट्रधर्म' यांची तात्त्विक मांडणी केली.

आचार्य शं. द. जावडेकर यांनी 'आधुनिक भारत' (१९३८) या ग्रंथातून टिळक आणि गांधीजींच्या राजकारणाचा बौद्धिक अन्वयार्थ लावण्याचे काम केले. आधुनिक राजकारणामागे असलेल्या व्यक्तिवाद, राष्ट्रवाद, समाजवाद, लोकशाही या

विचारधारांची प्रस्तूतता त्यांनी विशद केली. मार्क्स आणि गांधी यांच्या तत्त्वज्ञानातले सारतत्त्व वेचून 'सत्याग्रही समाजवादा'चे संश्लेषक तत्त्वज्ञान त्यांनी पुढे आणले. १९३८ ते १९४१ या काळात य. गो. जोशी यांनी 'वादविवेचनमाला' या ग्रंथमालिकेतून आधुनिक ज्ञानदृष्टीतून राजकीय-सामाजिक तत्त्वज्ञानाचा परिचय महाराष्ट्राला करून दिला. त्यात अराज्यवाद, सोशॅलिझम अर्थात सुलभ समाजवाद, मार्क्सचा भौतिकवाद, फॅसिझम ( पां. वा. गाडगीळ) ; साम्राज्यशाही, विश्वकुटुंबवाद अर्थात कम्युनिझम (ना. ग. गोरे); लोकशाही, गांधीवाद (शं. दा. जावडेकर); राष्ट्रवाद (श्रीपाद यशवंत कोल्हटकर); हिंदुत्ववाद (ज. स. करंदीकर); ईश्वरवाद (सोनोपंत दांडेकर); जडवाद (लक्ष्मणशास्त्री जोशी)अशी १२ पुस्तके प्रसिद्ध झाली. याखेरीज स. रं. सुंठणकर यांचे 'मार्क्सवादाचा प्रयोग' (१९३८), न. चिं. केळकर यांचे 'तिरंगी नवमतवाद', मा. दा. आळतेकर यांचे 'नवे मानसशास्त्र व नवी नीती' (१९३६) ही पुस्तके नव्या ज्ञानशाखेविषयी मराठी मनाची मशागत करण्याचे काम करीत होती. विवेकवादी दृष्टिकोनातून धर्म, नीती, कर्म आणि ज्ञानाची मानवतावादी मीमांसा करणारे निबंध वा. म. जोशी यांनी लिहिले. 'विचारविलास' (१९२७), 'विचारसौंदर्य' (१९४०), विचारविहार, विचारलहरी' (१९४३) ह्या वैचारिक निबंधाच्या पुस्तकांतून आधुनिक सुशिक्षितांचा वेदांत ते मांडत होते. समाजसन्मुख व्यक्तिवादाची संतुलीत मांडणी करीत होते. याखेरीज या काळात दादा धर्माधिकारी यांनी 'क्रांतिनिष्ठा' या निबंधसंग्रहातून गांधीवादी विचारांचे विश्लेषण केले.

र. धों. कर्वे यांनी 'समाजस्वास्थ्य' मासिकातून इहवादी व व्यक्तिवादी मूल्यदृष्टीतून स्त्री-पुरुष संबंधांकडे पाहण्याचा दृष्टिकोण रुजविण्याचा प्रयत्न केला. बाळूताई खरे (मालतीबाई बेडेकर) यांनी नवा युगधर्म लक्षात घेऊन स्त्रियांकडे बघण्याचा पुरुषकेंद्री दृष्टिकोण टाकून देऊन नवमूल्यांची प्रस्थापना केली पाहिजे, असा विचार पुढे आणला. "स्त्रियांची देवता म्हणून स्थापना व्हावयास नको आहे. त्यांची मानुषी म्हणून स्थापना व्हावयास पाहिजे. स्त्रीच्या शृंखला तोडून स्त्रीपुरुषांपैकी प्रत्येकाला आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक साधनांचा पूर्ण उपयोग करण्यास अवसर मिळायला पाहिजे; प्रगमनशील मन, विधायक कार्य आणि कर्त्या स्त्रिया पाहिजे आहेत. म्हणजे प्रत्येक समाजघटकाला आत्मभान होऊन आपोआपच नवे जग निर्माण होईल." (कुलकर्णी, १९८८, पृ. ५८) भारतातील जातिवाद आणि अस्पृश्यतेचा प्रश्न ह्या जटील समस्यांची समाजशास्त्रीय चिकित्सा करणारे लेखन या काळात झाले. त्यापैकी विठ्ठल रामजी शिंदे यांचे 'बहिष्कृत भारत' (१९०८) व 'भारतातील अस्पृश्यतेचा प्रश्न' (१९३३) हे निबंध; महादेवशास्त्री दिवेकर यांचा 'अस्पृश्योद्धार' (१९२३) आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इंग्रजीतून लिहिलेले 'हू वेअर द शूद्राज्' व 'ॲनिहिलेशन ऑफ कास्टस्' हे महत्त्वाचे ग्रंथ.जन्माधिष्ठित जात किंवा धर्म माणसाच्या अभ्युदयाच्या आड येता कामा नये ह्या

विचारांची संगतवार मांडणी डॉ. आंबेडकर करीत होते. ही मांडणी करताना व्यक्तिविकास आणि समाजविकास या परस्परसंलग्न बाबी आहेत ह्यावर त्यांच्या विचारांचा कटाक्ष असे. सामाजिक समतेच्या मूल्यांचा हिंदू धर्मात अभाव असल्याची परखड टीका त्यांनी केली. श्री. म. माटे यांनी 'अस्पृष्टांचा प्रश्न' या पुस्तकाच्या माध्यमातून अस्पृश्यतेच्या प्रश्नाची समाजशास्त्रीय चिकित्सा करणारे संशोधन-सर्वेक्षणावर आधारलेले पुस्तक लिहिले. सामाजिक प्रश्नांचे बुद्धिवादी आकलन करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या बौद्धिक मशागतीचा एक नमुनादर्श त्यांनी निर्माण केला.'भारतीय समाजशास्त्रा 'ची (१९३६) मांडणी करणारे पुस्तक श्री. व्यं. केतकर यांनी लिहिले. केतकरांनी इंग्रजीतून 'भारतीय जातिव्यवस्थेचा इतिहास'ही लिहिला.

इहवादी विचारांची प्रस्थापना हे या काळातल्या वैचारिक साहित्याचे एक महत्त्वाचे प्रयोजन राहिले आहे. ज्ञानाची साधना हा जीवनधर्म बनला पाहिजे, ज्ञानशास्त्राचा खुराक घरोघरी पोचविला पाहिजे हा विचार रूजविणारे लेखन वा. म. जोशी यांनी केले. स्वातंत्र्याचा मार्ग ज्ञानातूनच प्रशस्त होतो या भूमिकेतून केतकरांनी ज्ञानकोशाची निर्मिती केली. ज्ञानाचे झरे आपल्या भूमीतूनच उगम पावले पाहिजेत या भूमिकेतून श्री. म. माटे यांनी अधिभौतिक शास्त्रांचे महत्त्व प्रतिपादन करणारा 'विज्ञानबोध' नावाचा ग्रंथ लिहिला. 'प्रयोगशाळेला शरण जा' या निबंधातून विज्ञान हाच आधुनिक जीवनाचा वेदांत असल्याची भूमिका मांडली. 'ईश्वर मूळचाच आहे हे मानण्याऐवजी हे जगच मूळचे आहे असे मानावे' किंवा 'साक्षात्काराने वा ब्रह्मज्ञानाने विश्वाचे प्रश्न सुटत नसतात; सामाजिक ज्ञानच त्यासाठी उपयोगी पडते' हा विचार त्यांनी आग्रहाने मांडला. द. के. केळकर यांनी 'संस्कृतिसंगम' (१९४१) या ग्रंथातून युरोपीयन संस्कृतीच्या संपर्कात आल्यामुळे भारतात धार्मिक-सामाजिक क्रांतीचे नवे प्रवाह कसे रूजू लागले याची चर्चा केली. आपल्या प्राचीन संस्कृतीचे गुणविशेष जरूर जतन करावेत, पण यंत्रसंस्कृतीशी संगम साधून प्रगतीचा मार्ग अनुसरावा, असा सल्ला देणारे हे लेखन आहे. 'यज्ञा'च्या जागी 'यंत्रा'ची उभारणी करा असा सल्ला देणारे लेखन सावरकरांनीही केले. स्वा. सावरकरांनी दैनंदिन व्यवहारात विज्ञाननिष्ठा पाळली पाहिजे या भूमिकेतून समाजातील अंधश्रद्धांवर , जुनाट झालेल्या धर्मकल्पनांवर प्रखर टीका केली व बुद्धिवादाचा पुरस्कार केला. 'दोन शब्दात दोन संस्कृती', 'मनुष्याचा देव आणि विश्वाचा देव', 'गाय-एक पशू' इत्यादी निबंधांतून त्यांनी विज्ञाननिष्ठ दृष्टिकोण मांडला. (यापूर्वी सामाजिक स्थित्यंतरां'च्या प्रकरणात याची अधिक चर्चा आली आहे, ती पहावी) या काळातील साहित्यप्रेरणा व साहित्याची नवी वळणे या अनुषंगाने साहित्यविचारांची मांडणी करणारे लेखनही झाले. आचार्य जावडेकर आणि ना. सी. फडके यांच्यातील वाङ्मयीन वादावर 'पुरोगामी साहित्य' (१९४१) हे पुस्तक प्रसिद्ध झाले. साने गुरुजींनी टॉलस्टॉयच्या 'What is Art'

या ग्रंथाचे 'कला म्हणजे काय' हे भाषांतर प्रसिद्ध केले. लालजी पेंडसे यांनी मार्क्सवादी साहित्यविचारांची चर्चा करणारे 'साहित्य आणि समाजजीवन' (१९३५) हे पुस्तक लिहिले. पु. य. देशपांडे यांनी याच विषयावर 'नवी मूल्ये' (१९४६) हे पुस्तक लिहिले. समकालीन सौंदर्यवाद, मार्क्सवाद, वास्तववाद इत्यादी वादांची चर्चा करणारे 'वाङ्मयीन वाद' (१९४६) हे पुस्तक पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेने प्रसिद्ध केले. एकूण महाराष्ट्रातील विचारविश्वात सुरू असलेल्या तत्त्वचर्चा आणि त्यांचे वाङ्मयीन अनुबंध तपासणारे वैचारिक गद्य या कालखंडात लिहिले गेले. त्यातून या पन्नास वर्षांतील वैचारिक, सामाजिक, राजकीय अंत:प्रवाहांतील स्थित्यंतरांचा पट वाचता येतो.

## ७.९. इतिकथन :

विसाव्या शतकातील सामाजिक-राजकीय घडामोडींचे ऐतिहासिक वास्तव व मराठी समाजाच्या लोकनेणिवेतील अंत:प्रवाहांचे सर्जनशील प्रज्ञावानांना झालेले आकलन मराठी वाङ्मयातून प्रक्षेपित झालेले आहे. कथा-कादंबरी वा नाटक-कवितेतून प्रक्षेपित होणाऱ्या सामाजिक वास्तवाला समकालीन जीवनाचा संदर्भ असला, तरी हे वास्तव ऐतिहासिक दस्तासारखे, वृत्तांतासारखे नसते; हे वास्तव ललित घटितांच्या माध्यमांतून, वाङ्मयीन वक्रिभवनाच्या प्रक्रियेतून आविष्कृत झालेले असते. त्यात समकालाचे कालभान आणि लेखकाचे मूल्यभान यांचे संश्लेषण साधलेले असते. लेखक-कवींची सामाजिक-राजकीय बांधिलकी, नैतिक मूल्यादर्श, परंपरा आणि नवता याविषयीची समज यातून हे वास्तवद्रव्य संस्कारित होऊन वाङ्मयरूप घेत असते. प्रस्तुत विवेचनात साहित्यकृती चांगली आणि श्रेष्ठ, गंभीर आणि लोकप्रिय असे मूल्यांकन करावयाचे नसल्याने केवळ साहित्यातून प्रक्षेपित झालेल्या सामाजिक वास्तवाच्या अंत:प्रवाहांचा माग काढावयाचा होता. या मर्यादेत निवडक साहित्यकृतींच्या आधारे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील महाराष्ट्रातील सामाजिक-राजकीय घडामोडींचे वाङ्मयीन आकलन व मराठी समाजमनातील अंत:प्रवाहांचा कानोसा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यातून हाती लागलेले निष्कर्ष साररूपाने असे सांगता येतील :

सामाजिक- राजकीय परिवर्तनाच्या समकालीन प्रवाहात जे गट क्रियाशील असतात, त्यांचा परिवर्तनाच्या प्रक्रियेवर व स्वरूपावर प्रभाव असतो. या गटांच्या वैचारिक व मूल्यात्मक मुशींतून तयार झालेल्या प्रतिभावंतांचा पिंड स्वाभाविकच आपापल्या भूमिकेतून समकालीन राजकीय-सामाजिक आशयाचे आकलन व विश्लेषण करतो आणि भविष्यकालीन आदर्शरूपांचे वाङ्मयीन कल्पनारूपही रेखाटतो. विसाव्या शतकाच्या पहिल्या पन्नास वर्षांत महाराष्ट्राच्या लोकमानसाला लो. टिळक व महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाचे आकर्षण होते; अनेक तरुण त्यामुळे राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्यात उतरले होते. मात्र बऱ्याच तरुणांना या राष्ट्रीय-सामाजिक तत्त्वज्ञानाचे व चळवळींचे आकर्षण

असले, तरी त्या तत्त्वविचारांनुसार व्यक्तिगत व सामाजिक जीवनात बदल घडवून आणण्यासाठी लागणारी साधना, चिकाटी व त्याग करण्याची तयारी नव्हती. तरुणाईला साजेशी रोमँटिक, स्वप्नरंजनवादी वृत्ती, फॅशन म्हणून राजकारण-समाजकारणाकडे वळण्याची प्रवृत्ती जास्त करून आढळते. फडकेप्रणीत रंजनवादी कादंबऱ्यातले नायक, किंवा खांडेकरांच्या कादंबऱ्यातील ध्येयवादी नायक याच्या जीवनकथा ह्या सामाजिक बांधिलकी पत्करलेल्या कर्मयोग्यांच्या वा राष्ट्रकार्यासाठी आयुष्य समर्पण करणाऱ्या वीरगळांच्या कथा होत नाहीत. ध्येयवादाच्या छताखाली प्रेमकथांची घरटी सजवणाऱ्या जोड्याच अधिक आढळतात. प्रस्थापित समाजाच्या नैतिक जाणिवा तपासणारी चिकित्सक मांडणी किंवा शाश्वत मूल्यांच्या शोधाची आच यांचा अभावच जाणवतो. एकूणच मराठी समाजात आणि लेखकवर्गातही जाज्ज्वल्य मनोवृत्तीचा अभाव असल्याचे सर्वसाधारण चित्र दिसते. पौराणिक कथा-मिथांचे आधुनिक मूल्यदृष्टीतून पुनर्वाचन करून नवा क्रांतदर्शी समाजविचार मांडण्याचा प्रयत्न या काळात काही प्रमाणात झालेला आढळतो. कदाचित ब्रिटिशांच्या आविष्कारस्वातंत्र्यावरील बंधनामुळे हे आडवळण लेखकांना अधिक सोयीचे वाटले असावे.

साहित्यकृतींनी सामाजिक वास्तवाची मूलगामी चिकित्सा करावी,समाजातील उणिवांची वाच्यता करावी, समाजदोषांची समीक्षा करावी आणि पर्यायी समाजरचनेचे नवे आकृतिबंध पुढे आणावेत अशी एक अपेक्षा असते. मराठीत केतकरांच्या कादंबऱ्यांनी जातिसंस्था व विवाहसंस्थेची अशी समीक्षा केली आहे. स्त्रिया आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाल्याशिवाय स्त्री-पुरुष समता स्थापित होणार नाही, असा विचार बऱ्याच साहित्यकृतीतून आधोरेखीत झाला आहे. आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहांनी सामाजिक विषमता कमी झाली का याचा शोध घेण्याचाही काही लेखकांनी प्रयत्न केला आहे. आंतरजातीय विवाह झाले तर त्यांच्या संततीला समाज सहजासहजी सामावून घेणार नाही, त्यासाठी अक्करमाशांची स्वतंत्र जात निर्माण करण्याच्या पर्यायाचाही विचार करावा लागेल अशी एक दिशा डॉ. केतकर यांनी सुचविलेली आहे. अस्पृश्यतेसारख्या जटिल प्रश्नावर मात करण्यासाठी गांधीजींच्या हृदयपरिवर्तनाचा मार्ग बहुतेक लेखकांना मान्य झालेला आहे. मानुषतेच्या मूल्यांची पेरणी करणे हे काही लेखकांनी व्रतच घेतले होते. राजकीय वाङ्मयात ब्रिटिश सत्तेला विरोध करणाऱ्या राष्ट्रवादाला अग्रस्थान मिळणे स्वाभाविकच होते. पण ब्रिटिश शुक्राचार्यांच्या पोटात शिरून आधुनिक ज्ञानाचे स्त्रोत आत्मसात करून समृद्धीचा मार्ग प्रशस्त करण्याचा पर्यायही 'विद्याहरण' सारख्या रूपकात्मक नाटकातून खाडिलकरांनी सुचविला होता. मात्र एकूणच पापभिरू वृत्ती, सामाजिक आणि राजकीय रोषाला सामोरे जाण्यापेक्षा सुरक्षित अंतर ठेवून सामाजिक-राजकीय प्रश्नांची समीक्षा करणारी मराठी मानसिकता साहित्यलेखनप्रक्रियेत अधिक

जाणवते. याचा अर्थ मराठी माणसाच्या सामाजिक-राजकीय जाणिवा कोत्या होत्या, असे नव्हे, तर आव्हाने अंगावर घेण्यासाठी लागणारे साहसी मानस नसल्याने शैली वा आशयातही वाङ्मयीन बंडखोरीचे प्रमाण कमीच आढळते. सर्वच लेखकांना लेखनपूर्व आत्मनिष्ठा आणि लेखनगर्भ आत्मनिष्ठा यांचा एकमेळ साहित्यकृतीतून साधता येतो असे नाही. काही लेखक हे जाज्ज्वल्य मनोवृत्तीतून आपल्या वाचकवर्गाला मूल्यभान देऊ पहातात; तर काही लेखक रंजन वा बोधाच्या शैलीगुटिका पेरून वाचकांचा अनुनय करणारे, सजवले-धजवलेले लेखन करून लोकप्रिय साहित्याची निर्मिती करण्यात स्वारस्य मानतात.अशा लेखकांना वि. रा. शिंदे यांनी 'घरकोंबडे कादंबरीकार' या गटात टाकले आहे.

मराठी रंगभूमीच्या बाबतीत १९२० पर्यंतचा उत्कर्षकाळ सोडला तर काही अपवादात्मक नाटके वगळता मराठी नाटक सांकेतिक अभिव्यक्तीच्या आवर्तात सापडलेले दिसते. चित्रपटांच्या आक्रमणामुळे मराठी नाटकांना रंगमंदिरे सहजासहजी उपलब्ध होत नव्हती. नाटक कंपन्या बंद पडू लागल्या होत्या. व्यावसायिक रंगभूमीवरील रंगकर्मींवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली होती. अशा परिस्थितीत नाट्यव्यवसाय टिकवून ठेवण्यासाठी घटनाप्रधान, भडक व रंजनवादी नाटकांची परंपरा सुरू झाली. १९३० नंतर मराठी नाट्यभिरुचीची घसरण सुरू झाली. ऐतिहासिक नाटकात राष्ट्रीय अस्मिताजागरणापेक्षा स्वप्नरंजनात्मक अद्भुतरम्यतेला स्थान मिळू लागले. मराठी प्रेक्षकांची अभिरूची घडविण्याचे सामर्थ्य या नाटकांत नसल्याने मराठी माणसाची उथळ रंजनवादाची सवय घट्ट होत गेली. शाब्दिक विनोद, कोट्या यांचे आकर्षण वाढले. मात्र १९४७ साली वि. वा. शिरवाडकर यांचे 'दुसरा पेशवा' नाटक रंगभूमीवर आले. या नाटकाने ऐतिहासिक सत्याला बाधा न येऊ देता मानवी मनाचा शोध घेण्याचे अवघड कार्य कसे साधायचे असते, याचा नमुनादर्श निर्माण केला. साऱ्या उत्तर भारतात मराठी दौलतीचा दरारा निर्माण करणाऱ्या पराक्रमी बाजीरावाच्या वाट्याला मस्तानीच्या प्रेमापायी जिवापाड प्रेम करणारी पत्नी काशीबाई, भाऊ चिमाजी यासारख्या जीवलगांपासून दुरावण्याचे दुःख येते. सामाजिक –राजकीय आशयाच्या साहित्याचा घटनाप्रधान नाट्याकडून मनोविश्लेषणात्मक शोधाकडे प्रवास सुरू झाल्याची ही खूण होती.

१९२० नंतर मराठीत कलावाद विरुद्ध जीवनावाद हा वाद रंगला. रंजनवाद आणि बोधवाद यांच्या परिघातच ह्या चर्चा चालत असत. प्रणयाची रंजक कथानकेही सामाजिक अनुभवांच्या अवगुंठनातून कथन केली जात असल्याने रंजनाबरोबर सामाजिक प्रश्नांची व बदलत्या मूल्यांची चर्चा ओघानेच केली जात असे. ह्या रंजनवादी साहित्यामुळे वाचकवर्ग वाढला आणि खांडेकर-साने गुरुजींच्या साहित्याने मध्यमवर्गीय मराठी माणसाची

स्वातंत्र्यभावना आणि देशी सांस्कृतिक मूल्यांविषयीची आस्था जागवली गेली, हेही तितकेच खरे आहे. आधुनिक साहित्यापूर्वीच्या मौखिक परंपरेत ज्ञानदेव-तुकारामांच्या अभंगपठणातून व कीर्तन भारूडातून जे सांस्कृतिक शिक्षण होत होते, तसे साक्षर पिढीची मानसिक नांगरणी करण्याचे काम खांडेकर-साने गुरुजींच्या वाङ्मयाने केले. द्वितीय महायुद्धोत्तर काळात मर्ढेकर-गाडगीळांच्या नवसाहित्याने मराठी अभिरुचीला धक्के देणारे नवे वळण लावले. १९४५ नंतर महायुद्धांच्या खाईत होरपळलेल्या मानव्याची दुर्दशा, जीवनाची क्षणभंगुरता आणि वैफल्य हे साहित्याचे विषय बनले. मराठीतील नवसाहित्याचे हे वळण १९५० पर्यंत पुरेसे आकाराला आले होते. राजकीय-सामाजिक क्षेत्रातील उलथापालथी, धार्मिक तेढीतून उसळलेल्या दंगली, महायुद्धांमुळे उडालेला महागाईचा भडका, भांडवलशाही मूल्यांमुळे पारंपरिक समाजरचनेला बसलेले धक्के, धरणांच्या प्रकल्पांमुळे ग्रामीण शेतकऱ्यांच्या वाट्याला आलेले विस्थापिताचे जगणे, महानगरांतून उदयाला आलेले आधोलोकीचे जीवन, हिंदुस्थानच्या फाळणीतून राष्ट्रवाद आणि धर्म या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याची समजूत; पाठोपाठ उठलेल्या धार्मिक दंगली आणि महात्मा गांधींची हत्या यामुळे निर्माण झालेले संशयाचे व अविश्वासाचे वातावरण, इत्यादी घटनांमुळे ढवळून निघालेल्या समाज जीवनाबरोबर मराठी साहित्यात आशय आणि अभिव्यक्ती या उभय अंगांनी खूप लक्षणीय बदल झाले. साहित्याच्या अभिव्यक्तीचे घाट आणि भाषाशैलीचेही रूप आमुलाग्र पालटले. पारंपरिक अभिरुचीला धक्के देणाऱ्या आविष्कारशैलीमुळे नवसाहित्यावर अश्लीलता, दुर्बोधता आणि विफलतेचे आरोपही झाले. वाङ्मयीन अभिरुची संघर्षाचे एक नवे पर्व मराठी साहित्यात सुरू झाले. आतापर्यंत साहित्याचा विषय न झालेल्या विविध पोटजातींचे, गावकुसाबाहेरील आणि वन्य जामातींचे जीवन साहित्यात येऊ लागले. महानगरांतील यांत्रिक जीवनाबरोबरच ग्रामीण भागातील भूमिहीन व बेदखल कुळांचा प्रश्न, स्थानिक लोकजीवन आणि लोकसंस्कृतीचे बदललेले संदर्भविश्व असे नवे विषय साहित्यात आले. त्यासाठी लागणारी नवी भाषारूपे व साहित्याचे नवे घाट शोधण्याचे प्रयोग १९५० पर्यंतच्या मराठी साहित्यातून झाले. त्यातूनच मराठीतील नवसाहित्याचे वळण पुढे आले.

विसाव्या शतकाच्या प्रारंभकाळात परक्या राजवटीचे व विदेशी संस्कृतीचे होणारे आक्रमण आणि एतद्देशीयांची त्याविरुद्धची प्रतिक्रिया या वर्तूळात फिरणारे आशयविश्व साहित्यात अवतरत होते. राजकीय लढ्याच्या देशी प्रतिकाराच्या शैलीचे मंडण करणारे साहित्य लिहिले जात होते. त्याचबरोबर स्वत:च्या संस्कृतीतील दोषस्थळे हेरून त्यांची कठोर समीक्षा करीत सुधारणेच्या नव्या दिशा शोधण्याचाही प्रयत्न होत होता. आपल्या संस्कृतीतले ओजस्वी अनुभव साहित्यात ग्रथित करून अस्मितेचा गौरव केला जात होता. साने गुरुजींनी 'भारतीय संस्कृती'विषयी स्वतंत्र ग्रंथच लिहिला; तर टिळकांच्या

'गीतारहस्या'नंतर विनोबा भावेंनी 'गीता प्रवचने (१९३२), 'मधुकर' (१९३६), 'जीवनदृष्टी' (१९३८) 'क्रांतदर्शन' (१९४१) "स्थितप्रज्ञदर्शन' (१९४६) इत्यादी ग्रंथांतून भारतीय दर्शनशास्त्र व संतांच्या साहित्यावरची भाष्ये लिहिली. साने गुरुजी, वामनराव चोरघडे, काका कालेलकर यांनी भारतीय लोकसंस्कृतीतील लोकसाहित्याच्या मौखिक वाङ्मयाला मुद्रित रूपात संकलित करण्याचे प्रकल्प हाती घेतले होते. मराठी भाषा आणि संस्कृतीचा विकासाचा पैस हा भारतीय भाषा आणि भारतीय संस्कृतीच्या बहिर्वर्तूळातूनच आकार घेत असल्याने अन्य भारतीय भाषाभगिनींशी वाङ्मयीन आदान-प्रदानाची प्रक्रिया गतिमान झाली पाहिजे, ह्या विचारातून साने गुरुजींनी 'आंतरभारती'ची संकल्पना मांडली. वेगवेगळ्या भारतीय भाषांतील रामायण-महाभारतासारखी आर्ष महाकाव्ये, भक्ती साहित्य, लोकसाहित्य, नाट्यशास्त्र, संगीत यांच्या अभ्यासाला व भाषांतराला या काळात चालना मिळाली. स्वत: साने गुरुजींनी अनेक भारतीय व जागतिक साहित्यकृती मराठीत भाषांतरित केल्या. बा. भ. बोरकर, कुसुमाग्रज, चिंतामणराव देशमुख यांनी कालिदासाच्या 'मेघदूत'ची मराठीत भाषांतरे केली. काका कालेलकरांनी खलील जिब्रानच्या पद्यांचे अनुवाद केले. भा. वि. वरेरकर यांनी शरच्चंद्रांच्या कादंबऱ्या बंगालीतून मराठीत आणल्या. वा. गो. आपटे यांनी बंकिमचंद्रांचे संपूर्ण साहित्य मराठीत आणले. टागोरांच्या साहित्याचेही अनेक अनुवाद मराठीत आले. गुजरातीतून रमणलाल देसाई, कन्हैलाल मुन्शी यांच्या कादंबऱ्यांची मराठीत भाषांतरे झाली. प्रादेशिक, भारतीय आणि वैश्विक संस्कृतीत समन्वय साधण्याचा एक नवा दृष्टिकोन या काळात पुढे आला.

परंपरा आणि आधुनिकता यांची सांगड घालणारी समन्वयवादी जीवनदृष्टी हे या कालखंडातील लेखनाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य राहिले आहे. मार्क्सवाद आणि गांधीवाद यांचा समन्वय साधणारे लेखन या काळात झाले. दि. के. बेडेकर यांनी या वैचारिक सांधेजोडीच्या प्रयत्नांचे यथायोग्य मूल्यमापन केले आहे : "समाजवादी व कम्युनिस्ट विचारांचा व कृतींचा उद्‌भव भारतात किंवा महाराष्ट्रात झाला तो ब्रिटिश सोशॅलिस्टांच्या आणि रशियन कम्युनिस्टांच्या अनुकरणाने झाला, यात नवल नाही आणि त्यात वावगेही काही नाही. परंतु परकीयांकडून घेतलेले विचार किंवा कार्यपद्धती आपण आत्मसात कशी करतो व तिला आपल्या परिस्थितीशी मिळवून घेण्यात किती यश मिळवतो यावर सारे अवलंबून असते. परकी गोष्ट उपरी राहिली तर ती रुजत नाही व निकोपपणे वाढू शकत नाही. महाराष्ट्रातील आधुनिक विचारांचा विकासक्रम पाहताना असे आढळते की, मिल, स्पेन्सर, तसेच इटलीचे मॅझिनी, जर्मनीचे मार्क्स व रशियाचे लेनिन या सर्वांचे विचार येथे आले; पण उपरेपणाने, अपुऱ्या सामर्थ्याने व एकेरीपणाने आले. ते विचार मराठी लोकमानसात रुजण्यासाठी त्यांच्यावर मराठी लोकजीवनाचे संस्कार व्हावयास हवेत, ते होऊ शकले नाहीत." (भणगे, पृ. १५२) महायुद्धोत्तर काळात मराठी साहित्याच्या

आशयविश्वात आणि जीवनदृष्टीत नवे मूल्यभान जागे होऊ लागले होते. जागतिक महायुद्धांच्या धक्क्यांनी आणि आधुनिक जाणिवांनी बदललेल्या बौद्धिक-भावनिक परिवर्तनाची अंतर्वर्तुळे भेदीत मानवी जीवनातल्या बदलत्या विश्वभानाचा वेध घेण्याकडे मराठी साहित्य वळू लागले होते. वाङ्मयीन अभिरुची, सौंदर्यमूल्ये आणि समीक्षापद्धतीला पारंपरिक पठडीतून बाहेर काढून नवे सौंदर्यशास्त्र व पूरक अर्थनिर्णयनशास्त्र रचण्याची गरज पुढे येत होती. जीवनाच्या विविध क्षेत्रात आणि साहित्यनिर्मितीच्याही क्षेत्रात बहुजन समाजातली नवशिक्षित व नवजागृत पिढी क्रियाशील होऊ लागली होती. १९५० नंतरच्या मराठी साहित्यावर या परिवर्तनाचा प्रभाव पडणे स्वाभाविक होते. या बदलांचा मागोवा आपल्याला पुढील तिसऱ्या खंडात घ्यावयाचा आहे.

## टिपा :

[१] २७ जानेवारी १९१० च्या सरकारी गोपनीय अहवालातील वृत्तांश : "It is an open secret in Poona, known to every school boy there, that Kitchak and his followers represent Lord Curzon and his subordinates in the administration of India; and the mere fact is no longer Viceroy does not rob the play of its seditious tendency.म In whatever spirit the play may be received by a Bombay audience, there is no doubt that Deccan audience takes it as a cleverly-veiled incitement to murder European officials : as the murder of Kitchak was a good act, so there would be virtue in murdering oppressive officials." या अहवालानुसार सरकारी बंदिहुकूम जारी झाला. ५ फेब्रुवारी १९१० च्या टाइम्स ऑफ इंडिया' मध्ये प्रसिद्ध झालेल्या लेखातही 'कीचकवध'मधील रूपक प्रेक्षकांकडून कसे स्वीकारले जात होते याचा अनुभव नोंदवला होता : "These things are an allegory. Although his name is nowhere uttered on the stage or mentioned in the printed play, every one in the theatre knows that kitchak is really intended to be Lord Curzon, that Draupadi is India, and that Yudhishthira is the Moderate and Bhima the Extremist party. Every now and again unmistakable clues are proved." (कुळकर्णी, १९७८, पृ.२१६-२२३)

[२] मराठी कवितेत ग्रामीण वा जानपद गीतांचा नवा प्रवाह येण्यापूर्वी चंद्रशेखर यांचे 'काय हो चमत्कार' व गिरीश यांचे 'आंबराई" ही खंडकाव्ये प्रसिद्ध झाली होती.

❑❑❑

# ८

# वाङ्मयीन संस्कृतीतील स्थित्यंतरे

## ८.१. पूर्वकथन :

सामान्यतः सर्व प्रकारच्या भाषिक आविष्कारांचा समावेश 'वाङ्मया'त होतो. आधुनिक काळात याचा अर्थ होतो, जे जे छापले जाते ते ते सर्व. वाङ्मयात कथा-कादंबऱ्या, नाटके, चरित्र-आत्मचरित्र, ललित लेखन इत्यादी सर्व प्रकार तर येतातच, पण त्याचबरोबर वैचारिक, माहितीपर, वैज्ञानिक-शास्त्रीय, ऐतिहासिक, संशोधनपर, प्रचारासाठी लिहिलेला मजकूर इत्यादी सर्व प्रकारचा छापील मजकूर वाङ्मयामध्ये समाविष्ट होतो. याउलट 'साहित्य' ही कोटी प्रामुख्याने 'ललित साहित्य' या अर्थाने वापरली जाते. कल्पितावर अधिष्ठित लालित्यपूर्ण भाषिक आविष्कार म्हणजे साहित्य. कल्पित हा घटक प्रमुख असल्याने कथा, कादंबरी, कविता, नाटक हे प्रमुख ललित साहित्यप्रकार ठरतात. तर चरित्र, आत्मचरित्र, ललितनिबंध, प्रवासवर्णन इत्यादी कल्पितापासून अंतर राखणारे, वस्तुनिष्ठतेकडे झुकणारे साहित्यप्रकार दुय्यम ठरतात. ललित साहित्य हे एकंदर वाङ्मयाचे एक अंग असते.

एकंदर छापील वाङ्मयाहून ललित साहित्य हे वेगळे असते, ही जाणीव एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपासून महाराष्ट्रीय वाङ्मयव्यवहारात उगम पावली. ललित साहित्याचे म्हणून वेगळे विश्व विसाव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रात आकाराला आले. प्रस्तुत इतिहासाच्या पहिल्या खंडात एकोणिसाव्या शतकातील मुद्रित साहित्याचा इतिहास सांगताना त्याला 'मुद्रणसंस्कृती' असे संबोधले होते. याचे प्रमुख कारण म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रात मुद्रणतंत्राचा उदय झाल्यानंतर पुढील सात-आठ दशके मुद्रणमाध्यमाचा समाजजीवनाच्या वेगवेगळ्या अंगांत प्रसार होत राहिला. या नव्या माध्यमामुळे समाजजीवन प्रभावित होत होते. या काळात 'निबंध' (म्हणजे वैचारिक निबंध) हा प्रमुख वाङ्मयप्रकार म्हणून विकसित झाला. एकोणिसाव्या

शतकात नियतकालिके हे निबंधाच्या प्रसाराचे प्रमुख माध्यम होते. वेगवेगळ्या प्रकारचे माहितीपूर्ण, शास्त्रीय ज्ञान प्रदर्शित करणारे वाङ्मय आणि सुधारणावादी विचाराने प्रेरित निबंधवाङ्मय हे या काळात मोठ्या प्रमाणावर लिहिले गेले. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दोनतीन दशकांत कादंबरी, कविता आणि नाटक असे नव्या स्वरूपातले लेखन अधिक लोकप्रिय होऊ लागले. या वाङ्मयाची चिकित्सा करणारे समीक्षात्मक लेखन होऊ लागले. हे नवे कल्पितप्रधान वाङ्मय म्हणजे भाषिक आविष्काराचा लालित्यपूर्ण आधुनिक अवतार आहे, याची जाणीवही वाङ्मयव्यवहारात प्रकटू लागली. अर्धशतकभर मराठी मुद्रणसंस्कृतीमध्ये वैचारिक, ज्ञानप्रधान वाङ्मय केंद्रस्थानी होते, त्याची जागा एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस ललित साहित्याने घेतली.

प्रस्तुत खंडात या स्थित्यंतराची दखल घेताना, मराठी वाङ्मयव्यवहारामध्ये विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून केंद्रस्थानी आलेल्या साहित्य संस्कृतीला प्राधान्य दिले आहे. या साहित्य संस्कृतीमध्ये मध्यवर्ती प्रवाह ललित साहित्यव्यवहाराचा होता; त्याचबरोबर समाजाच्या वेगवेगळ्या स्तरात या साहित्याशी नाते सांगणारा, परंतु स्वतंत्र जाणिवा जोपासणारा आविष्कार होऊ लागला होता. 'साहित्य संस्कृती'मध्ये या सर्व प्रकारच्या साहित्यव्यवहाराचा समावेश होतो.

साहित्य संस्कृतीमध्ये लेखक, त्याची साहित्याविषयीची धारणा, वाचक व त्यांची अभिरुची, साहित्यमूल्यांची चर्चा, वाङ्मयीन क्षेत्रांतले वाद, लोकप्रिय साहित्याचे स्वरूप अशा अनेक गोष्टींचा समावेश होतो. साहित्यव्यवहाराचे विश्व ज्या मूल्यकल्पनांच्या आधारे आकाराला येते व आपली स्वतंत्र ओळख निर्माण करते, ती साहित्य संस्कृती. मराठीतील साहित्य संस्कृतीची अशी स्वतंत्र ओळख विसाव्या शतकाच्या आरंभापासून निर्माण होत गेली. विसाव्या शतकाचा प्रथमार्ध हा मराठी साहित्य संस्कृतीच्या उभारणीचा काळ होता असे म्हणता येते. या काळाचा इतिहास मांडण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

## ८.२. मागील शतकाचा वारसा

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठी साहित्याची निर्मिती आणि आस्वाद यांत इहवादी दृष्टी रूजली. पुस्तके आणि नियतकालिके यांनी नवे वाङ्मय वाचकांपर्यंत पोहोचवले. साक्षरतेचा समाजाच्या सर्व स्तरांमध्ये होऊ लागलेला प्रसार, नवशिक्षणाला आलेले महत्त्व यांमुळे वाचकवर्ग तयार होण्याची प्रक्रिया महाराष्ट्रात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सुरू झाली. या काळात नियतकालिके आणि पुस्तके यांच्याद्वारे वाचकांना उपलब्ध झालेले वाङ्मय प्रामुख्याने प्रबोधनात्मक स्वरूपाचे होते. 'निबंध' हा एकोणिसाव्या शतकातील ज्ञानप्रसाराचा प्रमुख आकृतिबंध होता. मुद्रणमाध्यमाद्वारे वेगवेगळ्या प्रकारचे साहित्य निर्माण झाले. शालेय अभ्यासक्रमातील कथावाङ्मय, मध्ययुगीन मराठी हस्तलिखित परंपरेतील कवींचे साहित्य असे साहित्य देखील छापले

गेले. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात कादंबरीसारखा नवा वाङ्मयप्रकार निर्माण झाला; नाटके छापली जाऊ लागली; पंडिती अथवा शाहिरी वळणाची कविता कालबाह्य ठरून नवी, लोकभाषेतील, लौकिक जीवनानुभव व्यक्त करणारी आधुनिक कविता लिहिली जाऊ लागली.

कालप्रवाह सलगपणे वाहत असतो. आपण आपल्या विवेचनाच्या सोयीसाठी शतकाचे, अर्धशतकाचे टप्पे पाडले असले, तरी एका विशिष्ट टप्प्यामधील घडामोडींचे सलग प्रवाही नाते त्याच्या आधीच्या व नंतरच्या टप्प्यांमधील घटना-घडामोडींशी असतेच. त्याप्रमाणे विसाव्या शतकाच्या प्रारंभी मराठी वाङ्मयीन संस्कृतीचे जे चित्र दिसते, त्यातील रेषांची वळणे, रंगांच्या छटा एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासूनच उमटू लागल्या होत्या. या चित्राला ठळकपणा, उठावदारपणा मात्र विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन-तीन दशकांमध्ये प्राप्त झाला. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात मराठी साहित्य संस्कृती पृथकपणे आकाराला आली. नवनवे साहित्य प्रवाह आणि प्रवृत्ती, वाङ्मयीन संस्था, नियतकालिके, बहुस्तरीय वाङ्मयीन अभिरुचीही या वाङ्मयीन संस्कृतीची वैशिष्ट्ये होती.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्रात समाजपरिवर्तनाच्या विचाराचे वादळ उठले होते. व्यक्तीच्या सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार झाला आणि विशेषतः स्त्रियांच्या अवनत जीवनाविषयी निषेधाचा सूर निघू लागला. धर्म-परंपरांची चिकित्सा होऊन ईश्वराविषयीचे नास्तिक, अज्ञेयवादी इत्यादी दृष्टिकोन स्वीकारले जाऊ लागले होते. समाजातील नवशिक्षित तरुणांवर या सर्व नवविचारांचा प्रभाव पडू लागला होता. प्रबोधनवादी विचार आणि चळवळी हा या काळाचा स्थायीभाव ठरला; या विचारांचे आणि चळवळींचे वाहक म्हणून अनेक वैचारिक नियतकालिके या काळात उदयाला आली. या नियतकालिकांमधील निबंधांच्या माध्यमातून वैचारिक वादविवाद झडले. वैचारिक निबंध हा वाङ्मयप्रकार या साऱ्या प्रक्रियेतून मराठीत प्रस्थापित आणि विकसित झाला.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्रीय समाजात नियतकालिके आणि पुस्तके सहजपणे विकत घेऊ शकणारा, ती वाचण्यासाठी आवश्यक वाचनकौशल्ये आत्मसात केलेला, वाचनासाठी पुरेसा मोकळा वेळ आणि खाजगी अवकाश उपलब्ध असलेला वाचकवर्ग शहरी पांढरपेशा समाजाअंतर्गत निर्माण झाला होता. मनोरंजनपर कल्पित गोष्टी, वैचारिक साहित्य, काव्य यांच्याविषयीच्या विशिष्ट आवडीनिवडी, मते या वाचकवर्गात तयार होऊ लागली. हा वाचकवर्ग इहकेंद्री दृष्टीने साहित्याकडे पाहात होता.

एकोणिसाव्या शतकात समाजातील विविध स्तरांमध्ये शिक्षित स्त्री-पुरुषांचे प्रमाण वाढू लागले; नियतकालिकांसोबतच छापील पुस्तके सहजपणे उपलब्ध होऊ लागली. समाजात पुस्तकाचे वाचन अधिकाधिक फैलावू लागले. एकीकडे पारंपरिक धार्मिक-

पारमार्थिक ग्रंथांची हस्तलिखिते मुद्रित माध्यमातून वाचकांसमोर येऊ लागली. दुसरीकडे आधुनिक विचारांचा प्रसार करणारे वैचारिक निबंध, विविध विषयांवरील इंग्रजीतून अनुवादित व स्वतंत्र पुस्तके असे साहित्य मराठी वाचकाच्या वाचन-कक्षेत येऊ लागले. कोणत्याही समाजात वाचनामागे मनोरंजन ही प्राथमिक स्वरूपाची प्रेरणा असतेच. या मनोरंजनाच्या प्रेरणेतून कल्पित कथांचीही निर्मिती मराठीत सुरू झाली. प्रारंभी फारसी, संस्कृत, इंग्रजी या भाषांतून कल्पित साहित्य मराठीत अनुवादित झाले. इंग्रजी कविता, कादंबरी यांच्या वाचनातून साहित्याविषयीच्या पारंपरिक कल्पना नाहिशा होऊन इहकेंद्री साहित्याचे संस्कार होऊ लागले होते. मध्ययुगीन समाजात असलेली परमार्थ आणि मनोरंजन ही साहित्याची दोन प्रमुख साध्ये मागे पडली आणि प्रत्यक्ष समकालीन भौतिक जीवनाविषयी लेखन केले जाऊ लागले. सामाजिक, राजकीय विषयांवरच्या वैचारिक निबंधांसोबतच कविता, कल्पित गोष्टी हे साहित्य लिहिले जाऊ लागले. कादंबरीतल्या अद्भुतरम्य कल्पित कथानकांची जागा हळूहळू प्रत्यक्ष समाजजीवनातील वास्तव आणि आदर्श रेखाटणाऱ्या शब्दचित्रांनी घेतली. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात संगीत नाटकांतील पौराणिक कथानके मागे पडून त्यांची जागा सामाजिक समस्याप्रधान कथानकांनी घेतली. कृष्ण-रुक्मिणी यांच्या विवाहाच्या पौराणिक कथानकाच्या जागी कल्पित नायक-नायिकांच्या प्रेमकथा संगीत नाटकांतून गुंफल्या जाऊ लागल्या.

विसाव्या शतकातील मराठी साहित्य संस्कृती आकाराला आली ती या सगळ्या स्थित्यंतरांच्या परिणामातून. १९०१ ते १९५० या काळातील साहित्य संस्कृतीचा पाया एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस रचला गेला होता. १८८० नंतर ही स्थित्यंतरे ठळकपणे दिसू लागली होती. या स्थित्यंतरांबद्दलची काही निरीक्षणे प्रथम नोंदवू.

१८८०नंतरच्या काळात संगीत नाटके आणि कादंबरी हे दोन आविष्कारप्रकार शिक्षित समाजात अधिक प्रिय झाले. कविता नव्या धर्तीची याच काळात लिहिली जाऊ लागली. १८८५मध्ये हरिभाऊ आपट्यांची पहिली आधारित अथवा रूपांतरित कादंबरी 'मधली स्थिती' पुण्याच्या 'पुणे-वैभव' या नियतकालिकातून क्रमशः प्रसिद्ध होऊ लागली. परंतु त्यांना खरी लोकप्रियता आणि प्रतिष्ठा मिळवून दिली ती १८९०पासून 'करमणूक' पत्रातून क्रमशः प्रसिद्ध होऊ लागलेल्या 'पण लक्षांत कोण घेतो' या कादंबरीने. आपट्यांनी लिहिलेल्या सामाजिक आणि ऐतिहासिक कादंबऱ्यांनी मराठीत नवे मन्वंतर घडवून आणले. केशवसुतांची पहिली कविता 'जास्वंदीचीं फुलें आणि पारिजाताचीं फुलें' ही ऑक्टोबर १८८८च्या 'काव्यरत्नावली' मासिकात प्रसिद्ध झाली. परंतु ही कविता 'कोणी एक कवि' अशा टोपणनावाने प्रसिद्ध झाली होती. केशवसुतांना खरी प्रसिद्धी 'मनोरंजन आणि निबंधचंद्रिका' या जोडनावाने प्रसिद्ध होणाऱ्या मासिकात नोव्हेंबर १८८९मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'प्रीति' या कवितेमुळे मिळाली. रोमँटिक कवितेचा नवा

प्रवाह मराठी कवितेत विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात निर्माण झाला. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचा माधवराव पाटणकरांच्या त्या काळातील लोकप्रिय अशा 'विक्रमशशिकला' या नाटकावर टीका करणारा पहिला समीक्षालेख १८९२मध्ये 'विविधज्ञानविस्तार'मध्ये प्रकाशित झाला. १८९४च्या सुमारास त्यांनी 'वीरतनय' हे त्या काळातील रूढ पौराणिक नाटकांहून निराळे नाटक लिहून पूर्ण केले (कानिटकर रा. प्र. (संपा.) १९७१ : ११). १८९६मध्ये हे नाटक किर्लोस्कर नाटक मंडळीतर्फे रंगभूमीवर आले. कोल्हटकरांचा 'साक्षीदार' हा विनोदी शैलीत लिहिलेला पहिला लेख १९०२मध्ये 'विविधज्ञानविस्तार'मध्ये प्रसिद्ध झाला. समाजातील विसंगती, दोष दाखवण्यासाठी विडंबन, उपरोध या कथनशैलींचा उपयोग करण्याचा हा नवा मार्ग कोल्हटकरांच्या विनोदी लेखनापासून सुरू झाला.

वरील तीनही लेखक-कवींची जडणघडण एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या काळातील परिवर्तनवादी, उदारमतवादी विचारांनी झाली. आणि या लेखकांचा प्रभाव विसाव्या शतकातील पहिल्या दोन दशकांपर्यंत मराठी साहित्यावर राहिला. लेखनाचा वैचारिकतेशी, विचारपरंपरांशी असलेला संबंध मराठी वाङ्मयक्षेत्रात प्रारंभापासूनच महत्त्वाचा मानला गेला आहे. विसावे शतक उजाडले तेव्हा साधारणपणे विचारांचे तीन प्रमुख प्रवाह महाराष्ट्रीय समाजात होते : पहिला प्रभावी प्रवाह होता आक्रमक, पुनरुज्जीवनवादी राष्ट्रवादाचा. चिपळूणकर-टिळक परंपरेच्या लेखनातून या विचाराचा प्रभाव समाजावर अधिक खोलवर पडलेला होता. दुसरा प्रवाह होता उदारमतवादी मानवतावादाचा. गोखले-रानडे यांची ही परंपरा होती. तिसरा वैचारिक प्रवाह महात्मा फुले आणि त्यांचे सहकारी यांच्या लेखनातून निर्माण झालेला विद्रोही विचारांचा होता. यापैकी चिपळूणकर-टिळकप्रणित पुनरुज्जीवनवादी राष्ट्रवादाने राजकीय आशयाच्या वैचारिक वाङ्मयाला जन्म दिला. तर उदारमतवादी मानवतावादी विचारप्रवाहाने कादंबरी, कविता आणि नाटक या नव्या साहित्य प्रकारांतील लेखन प्रभावित झाले. तिसऱ्या, सत्यशोधकी विचारप्रवाहाचे प्रभावक्षेत्र एकोणिसाव्या शतकात मर्यादित राहिले. परंतु विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ब्राह्मणेतर चळवळीच्या रूपाने सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात हा विचारप्रवाह प्रभावशाली ठरला. याच काळात साहित्यक्षेत्रात सत्यशोधक परंपरेतील लेखकांचे साहित्य मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध झाले. या साहित्याला मराठी साहित्याच्या मुख्य प्रवाहात स्थान मिळाले नाही; मात्र परिघावरचे साहित्य म्हणून आपली स्वतंत्र ओळख या साहित्याने निर्माण केली आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे शिक्षित पांढरपेशा जनतेवर चिपळूणकर-टिळक प्रणित पुनरुज्जीवनवादी राष्ट्रवादाचा प्रभाव अधिक होता. विसाव्या शतकाच्या आरंभापासून मराठीत लिहिल्या जाणाऱ्या ललित साहित्यावर मात्र प्रामुख्याने उदारमतवादाचा प्रभाव

राहिला. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्या नाटकांतून प्रखर राष्ट्रवादी जाणिवांचा आविष्कार होत होता. परंतु हरि नारायण आपटे यांच्या कादंबऱ्या, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांची नाटके यांमधून उदारमतवादी जीवनदृष्टी व्यक्त होत होती. या काळात केशवसुतांच्या कवितेतून रोमँटिक जाणिवेच्या विविध छटा व्यक्त झाल्या. या कवितांमध्ये सामाजिकदृष्ट्या मानवतावाद होता, व्यक्तिस्वातंत्र्याची बंडखोर जाणीव होती, कवीच्या आत्मनिष्ठेचा, स्वतंत्र प्रज्ञेचा गौरव होता. एकोणिसाव्या शतकातल्या विचारमंथनातून मिळालेला हा विचारप्रवाहांचा आणि नव्या साहित्यप्रकारांचा वारसा घेऊन मराठी साहित्य आपल्या कक्षा विसाव्या शतकाच्या पूर्वार्धापासून विस्तारू लागले.

## ८.३. नव्या वाङ्मयीन संस्कृतीचा उदय

विसाव्या शतकातल्या नव्या वाङ्मयीन संस्कृतीची वैशिष्ट्ये काय होती आणि तिची जडणघडण कशी झाली हे आता समजावून घ्यायचे आहे. विसाव्या शतकातील तीन-चार दशकांत महाविद्यालयांमधील वाङ्मयमंडळे, खाजगी अनौपचारिक वाङ्मयीन चर्चांचे अड्डे, आणि लेखकांमध्ये तयार झालेल्या गुरूशिष्य परंपरा या मार्गांनी साहित्याची निर्मिती आणि आस्वाद यांचे संस्कार शिक्षित समाजात मोठ्या प्रमाणावर झाले.

तुतारी मंडळ, रविकिरण मंडळ यांसारख्या अनेक संस्था या काळात महाराष्ट्रात शहरोशहरी स्थापन झाल्या. महाराष्ट्र साहित्य परिषद, अखिल भारतीय साहित्य महामंडळ आणि त्यांच्यातर्फे भरणारे साहित्य संमेलन या उपक्रमांनी याच काळात आकार धारण केला. विविध वाङ्मयीन संस्था, उपक्रम, साहित्यसंमेलने, कविसंमेलने, वाङ्मयीन नियतकालिके यांचा उदय आणि विस्तार १९२० ते १९५० या काळात झपाट्याने झाला. या सर्व प्रक्रियांद्वारे बदलत्या साहित्यविषयक जाणिवा, दृष्टी आणि अभिरुची यांचे संस्कार महाराष्ट्रातल्या शिक्षित समाजावर झाले. या काळात जुन्या साहित्यप्रकारांचे रूप पालटले, नवे साहित्यप्रवाह निर्माण झाले, १९४०नंतर साहित्याच्या प्रस्थापित अभिरुचीला धक्का देणारे नवसाहित्य लिहिले जाऊ लागले. १९०१ ते १९५० या काळातील वाङ्मयीन संस्कृतीची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे दाखवता येतील -

### 'प्रबोधनवादी ज्ञानप्रसारा'कडून 'सौंदर्यनिर्मिती'कडे

एकोणिसाव्या शतकातल्या बहुसंख्य लेखकांच्या लेखनाच्या मुळाशी वाचकांवर प्रबोधनवादी विचारांचे संस्कार करण्याचे, आधुनिक पाश्चात्य विद्येचा परिचय करून देण्याचे ध्येय होते. कादंबरीसारख्या साहित्यप्रकाराद्वारे देखील नव्या सामाजिक विचाराचा बोध झाला पाहिजे असा लेखकांचा कटाक्ष असे. विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून मात्र साहित्यातील लालित्य, सौंदर्य हा घटक अधिक महत्त्वाचा आहे अशी जाणीव मराठी लेखक-कवींमध्ये निर्माण झाली. ह. ना. आपटे यांनी 'विदग्ध वाङ्मया'च्या

कल्पनेत प्रचलित बोध आणि लालित्यपूर्ण निर्मिती या दोन्ही प्रयोजनांची सांगड घातली. "उपयुक्तता आणि सौंदर्य हीं दोन्ही ज्यामुळे येतात असें चातुर्य तें वैदग्ध्य," अशी व्याख्या त्यांनी केली. सौंदर्य – रचनेतील सौंदर्य, भाषिक सौंदर्य, कल्पनासौंदर्य – हेच साहित्याचे प्रमुख लक्षण ठरले. त्याचा अनेक लेखक-कवींनी आपल्या सोयीने अर्थ लावला हेही खरे. परंतु याच कल्पनांनी विसाव्या शतकाच्या पहिल्या चार दशकांच्या काळात मराठी साहित्याभिरुचीवर अधिराज्य गाजवले यात शंका नाही.

साहित्यनिर्मितीच्या हेतूमध्ये झालेला हा पालट या कालखंडातल्या नियतकालिकांच्या नावांमध्येही प्रतिबिंबित झालेला दिसेल. एकोणिसाव्या शतकातल्या बहुतांश नियतकालिकांच्या नावात 'ज्ञान' हा शब्द असे. जसे, 'ज्ञानप्रसारक', 'विविधज्ञानविस्तार', 'ज्ञानचंद्रोदय', 'ज्ञानोदय', 'ज्ञानसिंधू', 'ज्ञानचक्षू', 'ज्ञानदर्शन', 'ज्ञानदर्पण', 'ज्ञानाकर', 'ज्ञानसंग्रह' इत्यादी. पण एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात ह. ना. आपट्यांनी सुरू केलेल्या, आणि ज्याने कथा-कादंबऱ्या वाचण्याची गोडी शिक्षित समाजाला सर्वप्रथम लावली, त्या नियतकालिकाचे नाव होते, 'करमणूक'; आणि विसाव्या शतकाच्या पहिल्या-दुसऱ्या दशकात लोकप्रिय असलेल्या मासिकाचे नाव होते, 'मनोरंजन'. करमणूक आणि मनोरंजन हे विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून मराठीच्या मुख्य प्रवाहातल्या साहित्यनिर्मितीमागचे प्रमुख हेतू राहिले. त्याचे प्रत्यंतर या काळातल्या लोकप्रिय नियतकालिकांच्या नावांवरून देखील येते.

विसाव्या शतकाच्या प्रथमार्धात साहित्यातले वैचारिक निबंधांचे केंद्रवर्ती स्थान जसे गेले, तसेच नियतकालिकांचेही वैचारिक स्वरूप बदलून ती अधिकाधिक 'ललित साहित्यप्रधान' बनू लागली. 'मासिक मनोरंजन' आणि 'विविधज्ञानविस्तार' ही १९०१ ते १९२५ या काळातील सर्वाधिक प्रभावी नियतकालिके. त्यापैकी 'विविधज्ञानविस्तार' हे गंभीर मासिक गेल्या शतकापासून प्रसिद्ध होत होते. पण विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात सर्वसामान्य वाचकांमध्ये अधिक लोकप्रिय असलेले मासिक होते, 'केरळकोकिळ'. 'मासिक मनोरंजन'ने कविता, कथा, कादंबरी असे ललित वाङ्मय अधिक प्रसिद्ध करण्याचे धोरण ठेवले. तर 'विविधज्ञानविस्तारा'ने संशोधनात्मक, शास्त्रीय स्वरूपाचे लेखन अधिक प्रकाशित केले. इतिहास, भाषाशास्त्र, संस्कृती अशा विषयांसोबतच वाङ्मयविद्येविषयीची चर्चाही या मासिकाने प्राधान्याने प्रसिद्ध केली. एकूणच ललित वाङ्मय, त्याचे सिद्धान्तन हे विषय या नियतकालिकांच्या आस्थेचे विषय राहिले. जवळजवळ सर्वच मासिकांनी पुस्तक परीक्षणे प्रसिद्ध केली. कथा नियमितपणे आणि कादंबऱ्या क्रमशः प्रसिद्ध करून त्या वाचण्याची सवयदेखील वाचकांना याच मासिकांनी लावली. वैचारिक वाङ्मयापासून ललित वाङ्मयाची फारकत या काळात स्पष्ट झाली : लेखकांना आणि वाचकांनाही.

याचा एक परिणाम म्हणजे, १९२०नंतर मराठीत निखळ साहित्य-कलाविषयक

नियतकालिकांचा उदय झाला. विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून नियतकालिके अधिकाधिक ललित वाङ्मयाकडे, वाङ्मयचर्चेकडे झुकू लागली होती. तसे तर १९१३सालीच महाराष्ट्र साहित्य परिषदेने 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' हे पूर्णपणे साहित्यिक स्वरूपाचे नियतकालिक 'विविधज्ञानविस्तार'च्या अंतर्गत सुरू केले होते. परंतु एक म्हणजे हे एका साहित्य संस्थेचे मुखपत्र होते. दुसरे म्हणजे त्याचे प्रकाशन स्वतंत्रपणे नव्हे, तर अन्य नियतकालिकाचा एक भाग म्हणून होत होते. परंतु १९२५नंतर सुरू झालेली 'रत्नाकर', 'यशवंत' आणि त्यापाठोपाठ सुरू झालेली 'ज्योत्स्ना', 'प्रतिभा' या नियतकालिकांचे स्वरूप मात्र ललित साहित्यकेंद्री होते. साहित्यासोबत संगीत, चित्रकला यांसारख्या इतर कलांकडेही यापैकी काही नियतकालिके आस्थेने पाहात होती. प्रामुख्याने ललित साहित्य, कला आणि त्याविषयीची चर्चा याला ही नियतकालिके वाहिलेली होती.

'वैचारिकते'च्या जागी 'साहित्यातील सौंदर्या'ची स्थापना झाल्याचा साहित्यप्रकारांवर झालेला परिणाम लघुनिबंध या नव्या साहित्यप्रकाराच्या उदयात दिसून येतो. एकोणिसाव्या शतकात वैचारिक निबंध ही मराठी साहित्याची प्रमुख ओळख होती. तो तत्कालीन मराठीतील केंद्रवर्ती साहित्यप्रकार होता. या गंभीर निबंधापेक्षा निराळा, लघुनिबंध विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात लिहिला जाऊ लागला. वि. स. खांडेकर, ना. सी. फडके यांनी मराठीत प्रथमच लघुनिबंध लिहिले. या निबंधात विचारापेक्षा, भाषासौंदर्य, बांधेसूद मांडणी यांना महत्त्व होते. 'हलक्याफुलक्या विषयावर खेळकर शैलीत केलेले भाष्य' असे या लघुनिबंधाचे स्वरूप होते. लघुनिबंधाप्रमाणेच विनोदी लेखन हा साहित्यप्रकार विसाव्या शतकाच्या प्रथमार्धातच रूढ झाला. पहिले विनोदी निबंधकार श्रीपाद कृष्ण कोल्हटकर होते. त्यांनी लिहिलेल्या 'सुदाम्याच्या पोह्यां'मध्ये सामाजिक सुधारणावादी विचारही होता. फरक असा की एकोणिसाव्या शतकातल्या चिकित्सक वैचारिक मांडणीचा त्याग करून या निबंधांनी उपहासपूर्ण, विनोदी शैली अंगिकारली होती. मनोरंजनाचे वेष्टन पांघरले होते. अशा रीतीने साहित्यनिर्मितीच्या नव्या हेतूंशी सुसंगत नवे साहित्यप्रकार या काळात निर्माण झालेले दिसतात.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात कादंबरी आणि त्याखालोखाल कविता हे साहित्यप्रकार केंद्रवर्ती होते. कादंबरीमध्ये श्री. व्यं. केतकर, साने गुरुजी, मामा वरेरकर यांसारख्या सामाजिक वास्तवाचे दर्शन घडवणाऱ्या लेखकांच्या कादंबऱ्यांपेक्षा फडके आणि खांडेकर यांच्या कादंबऱ्या थोर मानल्या गेल्या. कवितेत केवळ भाषासौंदर्य मिरवणारी रविकिरणी कविता लोकप्रिय झाली. विसाव्या शतकाच्या प्रथमार्धातले वाङ्मयीन मानदंड देखील साहित्यनिर्मितीच्या सौंदर्यवादी प्रेरणांनी प्रभावित झाले होते असे म्हणता येते.

## इतर कलांचे संस्कार

विसाव्या शतकातल्या महाराष्ट्रीय शिक्षितांच्या या सौंदर्यदृष्टीची घडण साहित्यासोबतच इतर कलांच्या आस्वादाद्वारेही झाली. साहित्यासारख्या शाब्द कलेसोबत दृश्यकला आणि संगीत या कलांचा प्रभाव हे या काळातल्या मराठी सौंदर्याभिरुचीचे वैशिष्ट्य होते.

एके काळी संगीत हे अनागर बहुजनसमाजाचे मनोरंजनाचे साधन होते. ते प्रामुख्याने लोकसंगीताच्या रूपात अस्तित्वात होते. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पौराणिक संगीत नाटकांमधील पदांची लोकप्रियता वाढत गेली आणि या नाटकाच्या नवमध्यमवर्गीय, शहरी प्रेक्षकांमध्ये संगीताची आवड उत्पन्न झाली. विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून संगीत रंगभूमीवरील पदांना शास्त्रीय संगीताची जोड मिळाली. याच काळात उत्तरेकडून अनेक गायक महाराष्ट्रात आले आणि शास्त्रीय संगीत महाराष्ट्राच्या भूमीत वाढू लागले. नाटकापाठोपाठ आलेल्या चित्रपटकलेमध्येही प्रारंभीच्या काळात हे शास्त्रीय संगीत आविष्कृत होत होते आणि रसिकांपर्यंत पोहोचत होते. यामुळे संगीताची अभिरुची मराठी समाजात आकाराला आली. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपासून राजा रवीवर्मा याच्या चित्रांची कॅलेंडरे मराठी माणसाच्या भिंती सजवू लागली. कॅलेंडर आर्टच्या माध्यमातून एम. व्ही. धुरंधर, बाबुराव पेंटर यांच्यासारख्या अनेक चित्रकारांची चित्रे घरोघर पोहोचली. पुढे मासिकांच्या रंगीत मुखपृष्ठांनी ही चित्रकला वाचकांपर्यंत नेली. मराठी समाजाची दृश्याभिरुची या मार्गाने विकसित झाली. राजा रवीवर्म्याच्या चित्रातल्या शकुंतलेची वेशभूषा बालगंधर्वांनी अनुसरली आणि रंगमंचावरील स्त्रीवेषातल्या बालगंधर्वांचे अनुकरण त्या काळातल्या मराठी स्त्रियांनी प्रत्यक्ष जीवनात केले. असा हा जीवन आणि कला यांच्यातला अभिरुचीचा सांधा होता.

तत्कालीन विविध कलांद्वारे घडणाऱ्या सौंदर्यदृष्टीचा लसावी गो. म. कुलकर्णी यांच्या शब्दांत काढता येईल : "बालगंधर्वांचे रूपदर्शन, बाबूराव पेंटर किंवा पुढे दलाल-मुळगावकर, प्रभृती चित्रकारांनी केलेली स्त्रीचित्रणे, गोविंदराव टेंबे यांच्या हार्मोनियम वादनातून प्रकटणारे तलम रेशमी सूर आणि फडके यांच्या शैलीतील लडिवाळ लयकारी, या साऱ्यांत कुठेतरी एक आंतरिक साम्य असल्याचे जाणवते. त्यांचा एक विशिष्ट इंद्रजालसदृश मुलायम पोत या काळात – (विशेषतः १९२० – १९३०) विणला गेलेला आहे."(गो. म. कुलकर्णी, व. दि. कुलकर्णी (संपा.) १९८८ : ६२).

समाजात रुजलेल्या या 'मुलायम सौंदर्यदृष्टी'च्या मुळाशी 'स्वातंत्र्य' या मूल्याचा आधार होता. स्वातंत्र्य म्हणजे केवळ राजकीय स्वातंत्र्य नव्हे. सामाजिक जीवनात स्वतःच्या प्रेरणांशी प्रामाणिक राहून जगण्याचे स्वातंत्र्य, असा या मूल्याचा अर्थ होता. ही जाणीव या काळातल्या नव्या विचाप्रवाहांच्या मंथनातून शिक्षित, शहरी मराठी समाजाला

झाली होती.

**नव्या विचारप्रवाहांचा प्रभाव**

मराठी समाजाने प्रबोधनवादी मूल्यांचा वारसा घेऊन विसाव्या शतकात प्रवेश केला. धर्म आणि समाजव्यवस्थेच्या चिकित्सेतून एक नवी दृष्टी प्राप्त झालेले समाजधुरिण महाराष्ट्रात होते. त्याचबरोबर पुनरुज्जीवनवादी राष्ट्रवादी विचारांच्या मांडणीतून राजकीय स्वातंत्र्याची जाणीवही येथे सुप्त स्वरूपात निर्माण झाली होती. १९२०पर्यंतच्या मराठी साहित्यावर रानडेप्रणित सामाजिक प्रबोधनवादी मूल्यांचा अधिक प्रभाव होता. त्यामुळे कादंबरीत बोधवाद प्रबळ होता. कृ. प्र. खाडिलकरांच्या नाटकांतील इंग्रजविरोधी जाणिवांचा अपवाद केल्यास मराठी नाटकांद्वारे देखील प्रामुख्याने सामाजिक प्रबोधनाने प्रेरित आशयसूत्रे अभिव्यक्त होत होती. केशवसुतांच्या कवितेत रोमँटिक जाणिवांसोबत सामाजिक विचार ठळकपणे होता. याकडे प्रबोधनवादी मूल्यचौकटीचा प्रभाव म्हणून पाहता येते.

१९२०पासूनच्या मराठी साहित्यातून मात्र सौंदर्यकेंद्री जाणिवा अधिक ठळकपणे व्यक्त होऊ लागल्या. कोल्हटकर-खाडिलकर यांच्या नाटकांची लोकप्रियता कमी झाली आणि गडकऱ्यांच्या नाटकातील भाषासौंदर्याला नाट्यरसिक अधिक भुलू लागले. अशाच तऱ्हेची शैलीदार आलंकारिक भाषा असलेल्या वि. स. खांडेकरांच्या कादंबऱ्या अधिक लोकप्रिय झाल्या. भाषेच्या नजाकतीसोबत, वर्णनकौशल्य व मांडणीतला चटपटीतपणा यांमुळे ना. सी. फडके हे या काळातले 'युगप्रवर्तक कादंबरीकार' ठरले. केशवसुतांच्या कवितेतला सामाजिक आशय टाळून लिहिलेली आलंकारिक रविकिरण मंडळाची कविता ही या काळाची कविता ठरली.

एकोणिसाव्या शतकापासून वारशाने मिळालेल्या प्रबोधनवादी मूल्यचौकटीला, त्यातून प्रकटणाऱ्या जीवनदृष्टीला या नव्या सौंदर्यदृष्टीत स्थान नव्हते. १९२०नंतरच्या महाराष्ट्रीय समाजातल्या नव्या विचारप्रवाहांशी तिचे नाते कसे होते ते पाहू.

१९२०नंतर महात्मा गांधींच्या चळवळींतून गांधीवाद आणि बाबासाहेब आंबेडकरांच्या विद्रोही चळवळीतून आंबेडकरवाद हे दोन विचारप्रवाह आकाराला येत होते. त्याच वेळी, पहिल्या महायुद्धानंतर संपर्कमाध्यमांमध्ये झालेल्या क्रांतीमुळे आकाशवाणी आणि वर्तमानपत्रे यांच्याद्वारे पाश्चात्य जगापासून असलेले भौगोलिक अंतर कमी झाल्याचा अनुभव भारतीय समाज घेऊ लागला होता. युरोपीय समाजात दोन महायुद्धांदरम्यान झालेल्या उलथापालथीचे पडसाद इथल्या भूमीतही उमटू लागले आणि तिथल्या विचारविश्वातली वादळेही इथवर पोहोचू लागली. त्यामुळे इथे डार्विन आणि मार्क्स यांचे विचार पोहोचले, फ्रॉइडने केलेली मानवी मनाची चिकित्सा इथल्या शिक्षितांना परिचित झाली. मार्क्सवादी राजकीय विचाराने प्रेरित झालेल्या तरुणांची एक

पिढी लगेचच तयार झाली. वैचारिकदृष्ट्या होणारी घुसळण राजकीय-सामाजिक क्षेत्रात वाढली. गांधीजींच्या राजकीय हक्कांसाठीच्या आंदोलनांचा बहुजनांवर पडलेला प्रभाव, आंबेडकरांच्या सामाजिक हक्कांसाठीच्या चळवळींमुळे प्रेरित झालेला दलित समाज आणि मार्क्सवादाच्या क्रांतीविषयक कल्पनांनी पेटून उठलेला कामगार व तरुण वर्ग – असा समाजातल्या सर्वच स्तरांमध्ये विद्रोही विचार मूळ धरू लागला असताना मराठी साहित्य या विचारापासून दूर कसे राहील?

महाराष्ट्रात एकीकडे मार्क्सवादाने प्रेरित होऊन साहित्याची चिकित्सा सुरू झाली. लालजी पेंडसे यांचा 'साहित्य आणि समाज' हा ग्रंथ त्याचे उदाहरण आहे. १९३०-४०च्या दशकात मराठी साहित्यात 'कलावाद विरुद्ध जीवनवाद' हा वाद सुरू झाला. यात कलावादी फडक्यांविरुद्ध वितंड करण्यासाठी आचार्य भागवत, साने गुरुजी यांच्यासारखे गांधीवादी लेखक मैदानात उतरले. त्यांनी केलेल्या युक्तिवादांतून गांधीवादी साहित्यदृष्टी आकाराला आली. नाटकाच्या क्षेत्रात 'नाट्यमन्वंतर' घडवून आणणारे के. नारायण काळे, अनंत काणेकर यांच्यावर साम्यवादाचा प्रभाव होता. विज्ञानवाद, समतावाद, मार्क्सवाद या विचारांच्या संस्कारातून जी नवी मूल्यदृष्टी या काळातल्या शिक्षित मराठी समाजाने स्वीकारली तिला 'नवमतवाद' असे म्हटले जाते. मराठीतले १९२० ते ५० या काळातले बहुतांश लेखक नवमतवादी होते असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. अगदी कलावादाचे खंदे समर्थक असलेले ना. सी. फडके हे देखील विचाराने नवमतवादी होते. उत्तरायुष्यात त्यांना मार्क्सवादाचे आकर्षण वाटत होते. आंबेडकरवादाचे वारे मात्र या मध्यवर्ती मराठी साहित्यप्रवाहापर्यंत पोहोचले नाही.

१९२०नंतरच्या मराठी साहित्यावर या वैचारिक वादळांचा प्रभाव कितपत पडला, याचाही विचार आवश्यक आहे. असे दिसते की कादंबरी, कथा, नाटके अशा साहित्यप्रकारांमध्ये काही व्यक्तिरेखा गांधीवादी, मार्क्सवादी अशा विचारांनी प्रेरित होऊन वर्तन करताना दिसतात. संवादांमधून गांधीवादी, मार्क्सवादी, समतावादी विचार मांडले जातात. यापलीकडे अधिक खोलवर या वैचारिक वादांचा प्रभाव मराठी साहित्यावर पडला नाही. कवितेने तर वैचारिकतेकडे पाठच फिरवली. मात्र १९२० ते १९४० या काळातल्या मराठी साहित्यात आढळणाऱ्या व्यक्तिवादी आणि स्वातंत्र्यवादी प्रेरणांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

आधी सांगितल्याप्रमाणे समाजसुधारणेची दृष्टी बाळगणाऱ्या प्रबोधनवादी मूल्यांचा आविष्कार मराठी साहित्यातून १९२०च्या सुमारास मंदावला, त्यानंतर भाषा, कल्पना, रचना या पातळीवरील सौंदर्याचा आविष्कार प्राधान्याने होऊ लागला. या सौंदर्यजाणिवेच्या मुळाशी व्यक्तिवाद आणि स्वातंत्र्य या मूल्यांची जाणीव आढळून येते. हा व्यक्तिवाद गडकऱ्यांच्या नाटकातल्या कलंदरपणे जगणाऱ्या व्यक्तिरेखांच्या ठिकाणी

दिसतो; तसाच तो खुद्द गडकऱ्यांच्या जीवनशैलीतही दिसतो. फडक्यांच्या कादंबऱ्यांमधले तरुण-तरुणीही या व्यक्तिवादी जाणिवेनेच जगत असतात. अर्थात, हा व्यक्तिवाद सामाजिक जाणिवेचा व्यत्यास म्हणून या साहित्यात आवतरलेला आहे. तो आधुनिक आहे, परंतु त्याला गांधीवादी किंवा मार्क्सवादी विचारात अभिप्रेत असलेल्या सामाजिकतेचा स्पर्शही झालेला नाही. त्यामुळे हा व्यक्तिवाद आत्मकेंद्री आणि आत्मलुब्ध स्वरूपात प्रकटतो.

तीच गत या साहित्यातल्या स्वातंत्र्य या मूल्याचीही झालेली आहे. राजकीय स्वातंत्र्याची कल्पना आपल्या समाजात विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून प्रबळ झाली होती. टिळकांच्या आणि पाठोपाठ गांधीजींच्या राजकीय चळवळीतून या मूल्याचे संस्कार मराठी समाजावर झाले होते. स्त्रीमुक्तीचा विचार, फ्रॉइडचे मानसशास्त्र, कामगारांचे हित जपणारा मार्क्सवाद, नवमतवाद या विचारांद्वारे स्वातंत्र्याच्या कल्पनेला नवे आयाम मिळाले. परंतु १९२०नंतरच्या मराठी साहित्याने मात्र स्वातंत्र्य कल्पनेचा अर्थ फारच संकुचित करून टाकला. स्वातंत्र्य म्हणजे स्त्री-पुरुषांना प्रेम करण्याचे आणि आवडीच्या जोडीदारासोबत विवाहबंधनात अडकण्याचे स्वातंत्र्य, एवढ्या एकाच अर्थाने या काळातल्या रविकिरणी कविता, प्रेमकथानक-मंडित कादंबऱ्यांतून या साहित्याने स्वातंत्र्य कल्पनेचा पुरस्कार केला आहे. आत्मकेंद्री व्यक्तिवाद आणि प्रेमकेंद्री स्वातंत्र्य या मूल्यांचा आविष्कार १९४०पर्यंतच्या मराठी साहित्यात प्रभावी ठरला.

या साहित्याचा लेखक आणि वाचक प्रामुख्याने शहरी मध्यमवर्गातून आलेला होता. या वर्गाच्या संकुचित जीवनदृष्टीत व्यक्तिवाद आणि स्वातंत्र्य या मूल्यांचा अर्थही संकोच पावला. उपरोल्लेखित 'मुलायम सौंदर्यदृष्टी' आणि 'संकुचित जीवनदृष्टी' परस्परांना पूरक ठरल्या. या दृष्टीनेच या वर्गाची कलासाहित्यविषयक अभिरुची घडवली. १९४०-४५पर्यंतचे मराठी साहित्य या अभिरुचीला अनुसरत गेल्याने हे साहित्य देखील संकुचित जाणिवांचे साहित्य ठरले. साने गुरुजी, श्री. व्यं. केतकर, विभावरी शिरूरकर यांच्या कादंबऱ्या, दिवाकरांच्या नाट्यछटा अशा फार थोड्या लेखकांनी या अभिरुचीची कुंपणे पार करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. पण त्यामुळे या लेखकांचे साहित्य मध्यवर्ती साहित्यप्रवाहाच्या परिघावर ढकलले गेले.

साहित्याच्या मध्यवर्ती प्रवाहाचे समाजातल्या साक्षात् वैचारिक जाणिवांशी असलेले नाते असे क्षीण राहिल्याने समाजातून या साहित्याविरुद्ध असमाधानाची प्रतिक्रिया उमटणे स्वाभाविक होते. १९२०नंतर ब्राह्मणेतर चळवळीचे साहित्य, आंबेडकरी जलसे असे साहित्याचे काही प्रवाह वाङ्मयीन संस्कृतीच्या परिघावर निर्माण झाले. राजकीय विचारांचा उघडपणे पुरस्कार करणारे मार्क्सवादी साहित्य १९४०नंतर लिहिले जाऊ लागले. स्वातंत्र्याचा संकुचित अर्थ कुरवाळणाऱ्या आणि उथळ सौंदर्यकल्पना

जोपासणाऱ्या मध्यवर्ती धारेतल्या साहित्याविरुद्धची प्रतिक्रिया म्हणून समाजाच्या वेगवेगळ्या स्तरांतून हे साहित्य प्रवाह निर्माण झाले. परंतु हे परिघावरचे साहित्य ठरले. १९४० नंतर निर्माण झालेल्या नवसाहित्याने मात्र या मध्यवर्ती साहित्यप्रवाहाला 'आतून' हादरा दिला. मध्यवर्ती साहित्याचे मानदंड, अभिरुची जोपासणाऱ्या सामाजिक वर्गातूनच हे नवसाहित्याचे बंड झाले. या बंडामुळे नव्या वाङ्मयीन जाणिवांना वाट मोकळी करून दिली, ज्यातून १९५०नंतरची वाङ्मयीन संस्कृती आकाराला आली.

**साहित्यप्रकार : स्थित्यंतरे आणि स्थानांतरे**

वाङ्मयीन संस्कृतीच्या इतिहासात साहित्यप्रकारांमध्ये झालेल्या स्थित्यंतरांनाही स्थान असते. जुने साहित्यप्रकार बाद होऊन नवे साहित्यप्रकार येणे, केंद्रवर्ती साहित्यप्रकार परिघावर जाणे आणि परिघावरील साहित्यप्रकारांना केंद्रवर्ती स्थान मिळणे इत्यादी घडामोडी घडतात. साहित्यप्रकारांची स्वरूपवैशिष्ट्ये बदलतात. या सर्व स्थित्यंतरांचा संबंध एकीकडे साहित्यविषयक अभिरुची, जाणिवा, धारणा, समीक्षेचे मानदंड यांच्याशी असतो तर दुसरीकडे समाजात, सांस्कृतिक पर्यावरणात होणाऱ्या बदलांशीही असतो. त्यामुळे त्यांचा परामर्श घेणे गरजेचे ठरते.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी कादंबरी, कथा, कविता, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णन हे सर्वच साहित्यप्रकार मराठीसाठी नवे होते. इंग्रजपूर्व काळातल्या पुराणे, आख्याने, बखरी यांसारख्या कथनात्म साहित्यप्रकारांमधून एकोणिसाव्या शतकातल्या कादंबरीने काही तंत्रे उसनी घेतली असली तरी, १८८०नंतर या तंत्रांचा वापर कमी होऊ लागला आणि बाबा पदमनजी, नारायणराव रहाळकर आणि विशेषत: ह. ना. आपटे यांच्या कादंबरीलेखनामुळे कादंबरी या साहित्यप्रकाराचा पाश्चात्य रचनाबंध इथे रुजू लागला होता. पारंपरिक कवितेचे खंडकाव्य इत्यादी प्रकार मागे पडून 'भावकविता' हा प्रकार मध्यवर्ती स्थानी आला. चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णन हे साहित्यप्रकार तर पूर्णपणे परके होते. इंग्रजी साहित्याच्या परिशीलनातून या साहित्यप्रकाराची लेखनरीत तत्कालीन लेखकांनी आत्मसात करून घेतली होती. त्यातल्या त्यात पारंपरिक नाट्यकलेशी अनुबंध टिकवून ठेवलेला प्रकार म्हणजे संगीत नाटक होय. दशावतार, तंजावरी नाटक आणि तमाशा यांसारख्या लोककलाप्रकारांतून उत्क्रांत होत चाललेल्या संगीत नाटक या प्रकारावर एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस तत्कालीन नाट्यकर्मींनी संस्कृत आणि इंग्रजी नाटकांच्या गुणवैशिष्ट्यांचे कलम केले आणि त्यातून निर्माण झालेले आधुनिक नाटक विसाव्या शतकातल्या पहिल्या दोन दशकांतल्या मराठी नाट्यरसिकांना अतिशय भावले.

कवितेतील स्थित्यंतरे – वाङ्मयीन संस्कृतीमध्ये कवितेचा वाचक संख्येने मर्यादित असतो, मात्र कविता हा साहित्यप्रकार सर्वाधिक प्रतिष्ठा मिळवत असतो. शाब्द कला

म्हणून साहित्याचा विचार करताना सर्वाधिक भाषिक गुणवैशिष्ट्यांनी आकाराला येणारा प्रकार म्हणून कवितेचाच विचार होतो. लौकिक जीवनाहून अतिशय वेगळा, अ-लौकिक असा भाषेचा सर्जनशील वापर कविता या साहित्यप्रकारातच होत असतो. कवी आणि त्याची कविता यांना साहित्यविचारात अग्रस्थान मिळत असते. पारंपरिक भारतीय भाषांमध्ये काव्य हाच मध्यवर्ती साहित्यप्रकार होता. आख्याने, खंडकाव्ये यांसारखे कथनपर साहित्यप्रकार देखील पद्यरूपात, म्हणजे काव्याला जवळचे होते. मराठी साहित्य याला अपवाद नव्हते. मौखिक परंपरेद्वारेच साहित्य समाजात पोहोचत असल्यामुळे ते पद्यरूपात, काव्यरूपात लिहिले जाणे स्वाभाविक होते. एकोणिसाव्या शतकात मुद्रणयुग अवतरल्यानंतर हळूहळू या मौखिक परंपरेचा लोप झाला. पुस्तके ही एकट्याने वाचण्याची, आस्वादण्याची गोष्ट होती. कविता गाऊन सादर केल्या जात; त्यांचा सामूहिकरित्या आस्वाद घेतला जात असे. काव्यगायनाचे कार्यक्रम विसाव्या शतकात देखील होत असले, तरी कविता कागदावर छापली जायला लागली आणि तिचा आस्वाद एकट्याने एकांतात, सावकाश वाचत घ्यावा, अशी नवी धारणा रूढ झाली.

एकोणिसाव्या शतकात खंडकाव्ये, दीर्घकाव्ये, शाहिरी काव्ये इत्यादी परंपरेशी नाते सांगणारी कविता तुरळक प्रमाणात लिहिली जात होती. परंतु एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस मासिकांच्या नव्या माध्यमातून छापलेली कविता रसिकांसमोर जाऊ लागली. ही नवी कविता, कवीच्या अंतर्मनातल्या भावनांचा, अनुभवांचा आविष्कार करणारी 'भावकविता' होती. युरोपीय भाषांमधल्या रोमँटिक कवितेच्या प्रभावातून मराठी कवींना ही कविता स्फुरली. अशा कवितेने आधुनिक मराठी कवितेचा प्रवाह निर्माण झाला. केशवसुतांपाठोपाठ कवींची एक फळीच तयार झाली. त्यात रेंदाळकरांपासून ना.वा. टिळकांपर्यंत विविध प्रवृत्तींचे कवी होते. परंतु प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे या कवींच्या कवितेचे नाते रोमँटिसिझमशी होते.

केशवसुतांच्या कवितेत एका बाजूला वास्तववादाला, बुद्धिवादाला नकार देणाऱ्या रोमँटिक जाणिवा दिसतात, तर दुसरीकडे बुद्धिवाद-विवेकवादाने ज्या प्रबोधनवादी मूल्यांचा पुरस्कार केला, त्या मूल्यांनी झपाटले जाणेही दिसते. आपल्या समाजात पाश्चात्य शिक्षणाच्या माध्यमातून झालेले बुद्धिवादाचे संस्कार आणि त्यातून आपला समाज, धर्मव्यवस्था, एकंदर येथले मानवी जीवन यांची सुरू झालेली चिकित्सा केशवसुतांनी आपल्या कवितेत आणली. १९०५मध्ये केशवसुतांचे निधन झाले; परंतु त्यांच्या कवितेने प्रभावित होऊन काव्यलेखन करणारी एक पिढीच पुढील वीस वर्षांमध्ये मराठीत उदयाला आली. गोविंदाग्रज, बालकवी यांच्यासारखे पुढील पिढीतले महत्त्वाचे ठरलेले कवी स्वतःला केशवसुतांचे अनुयायी म्हणवत. या दोन्ही कवींच्या कवितांमध्ये रोमँटिक काव्यजाणिवांचा मराठीतला परमोच्च आविष्कार आढळतो. मात्र केशवसुतांच्या

कवितेतील सामाजिक आशय, प्रबोधनवादी मूल्यांच्या प्रस्थापनेची त्यांनी पाहिलेली स्वप्ने – हे मात्र या पुढील रोमँटिक कवितेतून हरवले. १९२०नंतर रविकिरण मंडळाच्या कवितेचा काळ सुरू झाला. याही काळात आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचा आविष्कार करणाऱ्या कविता (बी), सौंदर्यवादाचा आविष्कार करणाऱ्या कविता (भा. रा. तांबे) अशा निराळ्या छटा काही कवींच्या कवितेतून आढळत असल्या, तरी १९२० ते ४०पर्यंतच्या मराठी कवितेच्या केंद्रस्थानी रविकिरण मंडळाची कविता राहिली. रविकिरण मंडळाच्या कवींनी मराठी वाङ्मयीन संस्कृतीला कोणते योगदान दिले याची चर्चा पुढील छेदकात स्वतंत्रपणे केली आहे. येथे केवळ कविता या साहित्यप्रकाराला या कवींनी कोणते वळण दिले याच मुद्द्याची चर्चा आहे.

रविकिरण मंडळाची कविता रोमँटिसिझमशी नाते सांगणारी असली, तरी रोमँटिक जाणिवांचा फारच उथळ आविष्कार या कवितेने केला असे म्हणावे लागते. 'प्रेम' हा या कवितेचा स्थायीभाव होता. हे प्रेम केवळ दोनच रूपांत रविकिरण मंडळातील कवींनी पाहिले – स्त्री-पुरुष नात्यातील प्रेम आणि निसर्गप्रेम. त्यात पुन्हा, रविकिरण मंडळातले कवी ज्या काळात कविता लिहीत होते, त्या काळात समाजमनात रूजू लागलेली स्वातंत्र्याची कल्पना, प्लेटॉनिक प्रेमाची आदर्शवादी कल्पना – अशा कल्पनांचा आविष्कार त्यांनी प्रेमविषयक कवितांतून केला. रोमँटिक जाणिवा वास्तवाच्या विरोधीच असाव्यात म्हणून की काय, या शहरी कवींना ग्रामीण भागातल्या निसर्गाचे मोहक, हळवे रूपच भावले. या निसर्गाचाच भाग असलेले ग्रामीण समाजाचे जीवन, त्यातली हलाखी, दुःख इत्यादी त्यांना दिसले नाही. प्रेमभावना व्यक्त करतानाही प्रत्यक्ष समाजातल्या स्वातंत्र्यकल्पनांचे वास्तव त्यांना दिसले नाही. वास्तवाचा पाया नसलेल्या केवळ आदर्शवादात हरवून गेल्यामुळे रविकिरणी कवींच्या कवितांतील प्रेम आणि स्वातंत्र्य या कल्पना भाबड्या ठरल्या. पंडिती कवितेप्रमाणे वर्णनांची सांकेतिकता हे या कवितेचे वैशिष्ट्य ठरले. या काळातल्या मध्यमवर्गीय शहरी वाचकांना ही कविता आवडत असावी. कारण त्यांच्या जाणिवा याच प्रकारच्या होत्या. कविता, कादंबरी, कथा, लघुनिबंध यापैकी कोणताही साहित्यप्रकार असो, त्यांतून या काळातल्या वाचकांना मोहक भुलवणारे, मनाला रमवणारे भाषिक आविष्कार हवे होते. वास्तव अनुभवाच्या दाहक स्पर्शापेक्षा कृतक् अनुभवाचे मोहक आविष्कार हा या काळातल्या सर्वच साहित्याचा स्थायीभाव झाला होता. १९३५नंतर या रोमँटिक कवितेत पालट झालेला दिसतो. बा. भ. बोरकर आणि कुसुमाग्रज यांची कविता या काळात पुढे आली. ही रोमँटिक कविता असली तरी तिच्यात राजकीय क्रांतीवादी, सामाजिक जाणिवा, गांधीवादी-मार्क्सवादी मूल्यांचा प्रभाव याचा आविष्कार होऊ लागला. रविकिरण मंडळाची कविता ज्या भाषिक सांकेतिकतेच्या आवर्तात अडकलेली होती तिला या कवींनी छेद देण्याचा प्रयत्न केला. तर ना. घ.

देशपांडे, ग. ल. ठोकळ या कवींनी ग्रामीण जाणिवा कवितेतून व्यक्त केल्या. रविकिरण मंडळाच्या कवितेतल्या निसर्गप्रेमाप्रमाणे या कविता बेगडी भाषिक फुलोऱ्यात अडकलेल्या नव्हत्या. पुढे पु. शि. रेगे यांच्यासारखा शुद्ध सौंदर्यवादी जाणिवा व्यक्त करणारा कवी निर्माण झाला.

परंतु समाजात १९३५च्या दरम्यान एक मोठा वाचकवर्ग असा तयार झाला की ज्याला प्रस्थापित काव्याचे बेगडीपण जाचत होते. त्याविरुद्धच्या प्रतिक्रिया हळूहळू विविध स्वरूपांत येऊ लागल्या. उदाहरणार्थ, रविकिरण मंडळातील कवींच्या साचेबद्ध सांकेतिक कवितेविरुद्ध विडंबनकाव्याच्या रूपाने प्रतिक्रिया उमटली. प्र. के. अत्रे यांनी 'झेंडूची फुले'मध्ये रचलेल्या विडंबन कविता प्रामुख्याने रविकिरण मंडळाच्या कवितेविरुद्धची प्रतिक्रिया होत्या. १९४५नंतर बा. सी. मर्ढेकरांच्या 'काही कवितां'नी तर रविकिरण मंडळाची कविता आणि तिच्यावर पोसलेली वाचकांची अभिरुची या दोहोंसमोर एक मोठे प्रश्नचिन्ह निर्माण केले. विशेष म्हणजे मर्ढेकरांच्या कवितांचा पहिला संग्रह 'शिशिरागम' हा रविकिरण मंडळानेच प्रसिद्ध केला होता. या संग्रहातल्या कविता रविकिरणी कवितांशी नाते सांगणाऱ्या होत्या. परंतु त्यानंतर मर्ढेकरांची काव्यजाणीव बदलत गेली. मानवता आणि मानवतावादी जीवनदृष्टी संकटात सापडल्याचा हादरवून टाकणारा अनुभव १९४०च्या सुमारास, दुसरे महायुद्ध सुरू असताना युरोपातील लेखक-कलावंत घेत होते. त्याची झळ मर्ढेकरांसारख्या भारतीय कवीलाही लागली आणि त्यांची काव्याभिव्यक्ती आमूलाग्र बदलली. अशा रीतीने मराठीला पहिला 'नवकवी' मिळाला.

या काळातील कवितेतील बंडाचे आणखी एक रूप म्हणजे छंदोबद्ध, वृत्तबद्ध कवितेऐवजी मुक्तछंदातील कवितेची निर्मिती. १९३०-३१च्या सुमारास काही कवींनी कवितेला असलेल्या वृत्त किंवा छंद यांच्या काटेकोर बंधनाविरुद्ध भूमिका घेतली. या काळात इंग्रजीसह भारतातील इतर भाषांमध्ये देखील काव्यरचनेच्या पातळीवर ही भूमिका घेतली जात होती. आधुनिक काळात कविता भावस्वरूपातील अधिकाधिक तरल आशय व्यक्त करू लागली आहे. त्यामुळे भाषिक पातळीवरील रचनेची बंधने तिला आता मानवत नाहीत. कवींनी शब्दांची संख्या, यमकरचना इत्यादी नियमांमध्ये अडकून पडण्याऐवजी आशय अधिकाधिक नेमकेपणाने व्यक्त करू शकणाऱ्या शब्दांच्या उपयोजनावर अधिक लक्ष दिले पाहिजे – अशी ही भूमिका होती. आत्माराम रावजी देशपांडे (कवी अनिल) हे मुक्तछंदाचे खंदे पुरस्कर्ते होते. १९३५ साली त्यांनी लिहिले – "आधुनिक काव्यध्येय, काव्यहेतु व काव्यविषय यांना जुने छंद जुळत नाहीत." (मासिक सह्याद्री, फेब्रुवारी १९३५, पृ. ४३).

अनिलांसोबतच वा. ना. देशपांडे, पु. शि. रेगे यांनीही आपली कविता मुक्तछंदात लिहिण्याचे प्रयत्न केले. या कवितेला पु. शि. रेगे यांनी 'सहजकाव्य' म्हटले; 'बेबंद काव्य',

'छंदोविहीन काव्य' अशीही नावे दिली गेली. परंतु हळूहळू अनिलांनी दिलेले 'मुक्तछंद' हेच नाव मराठीत रूढ झाले. या काळात नवकाव्याची नवी वाट चोखाळणाऱ्या मर्ढेकरांनी ओवी छंदात काव्यरचना केली असली, तरी शरच्चंद्र मुक्तिबोध, विंदा करंदीकर आणि त्यांच्यानंतरचे इतर कवी यांनी मुक्तछंदातच कविता लिहिल्या. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात कवितेची रचना अधिकाधिक मुक्त होत गेली.

नाटकाच्या जागी कादंबरीची प्रस्थापना - नाटक हा एकंदरीतच मध्यवर्ती म्हणावा असा साहित्यप्रकार होता. इतर लेखकांपेक्षा नाटककाराला लोक अधिक ओळखत आणि मोठे साहित्यिक म्हणून नाटककारांचीच नावे प्रस्थापित होत. १९२०पर्यंत मराठीतले मोठे लेखक हे नाटककार होते. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, राम गणेश गडकरी ही पहिल्या फळीतली नावे नाटककारांची होती. कोल्हटकरांनी समीक्षा आणि कादंबरी लिहिलेली असली आणि गोविंदाग्रजांच्या रूपात गडकरी कवीही असले तरी या दोघांचीही नाटककार अशीच प्रतिमा समाजात ठसलेली होती. १९२०नंतर मराठी वाङ्मयीन संस्कृतीतील नाटककारांचे हे केंद्रवर्ती स्थान ढळले आणि त्यांच्या जागी कादंबरीकारांची प्रस्थापना झाली. १९२०नंतरचे सर्वात मोठे मानले गेलेले लेखक ना. सी. फडके आणि वि. स. खांडेकर हे कादंबरीकार होते.

नेमक्या याच काळात, १९२०-२५नंतर नाटकाच्या लोकप्रियतेला देखील ओहोटी लागलेली दिसते. गडकरींनंतर तितक्या मोठ्या ताकदीचा एकही नाटककार पुढील वीसेक वर्षांत मराठीत झाला नाही. याला एक कारण बोलपटांचे होते. बोलपटांनी नाटकाचा प्रेक्षक आपल्याकडे खेचून घेतला असा सूर आढळतो. दुसरीकडे या काळात विविध प्रकाशकांनी आणि मासिकांनी कादंबरीमाला प्रकाशित केल्या आणि त्याद्वारे कादंबरीचा वाचकवर्ग प्रचंड वाढला. १९२० पासून पुढच्या दोनतीन दशकांचा साहित्यप्रकार म्हणून कादंबरीचेच नाव घेतले पाहिजे.

कादंबरीची लोकप्रियता विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून वाढत चालली होती. मराठीत ह. ना. आपटे यांच्या कादंबऱ्या आणि कथा यांनी कथात्म साहित्याचा मोठा वाचकवर्ग सर्वप्रथम तयार केला. आपट्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांनी सर्वसामान्य वाचकाला कादंबरी या साहित्यप्रकाराकडे आकृष्ट केले. विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत 'मासिक मनोरंजन'ने बंगालीतले गाजलेले कथा-कादंबरी साहित्य मराठीत भाषांतरित स्वरूपात वाचकांपर्यंत पोहोचवले. त्यामुळे हा वाचकवर्ग अधिकच वाढला. या काळातली बहुतेक मासिके कादंबरी क्रमशः छापत असत. या मासिकांमुळे कादंबरी वाचण्याची सवय वाढीस लागली.

त्याचबरोबर कादंबरीचा वाचकवर्ग वाढण्यास आणखी एक गोष्ट कारणीभूत ठरली ती म्हणजे ग्रंथमाला. मासिकांमध्ये क्रमशः स्वरूपात कादंबरी छापण्याची रीत तर

एकोणिसाव्या शतकापासूनच होती. वि. गो. विजापूरकरांच्या 'ग्रंथमाला' मासिकाने दरमहा मासिकाच्या स्वरूपात वैचारिक, अनुवादित, माहितीपर पुस्तके वाचकांना द्यायला सुरुवात केली. त्याहीपूर्वी मध्ययुगीन पंडित आणि संत कवींचे ग्रंथ मासिक पुस्तकांच्या रूपात प्रसिद्ध होत होती. म्हटले तर ही नियतकालिके होती, म्हटले तर दरमहा स्वतंत्रपणे प्रसिद्ध होणारी पुस्तके होती. विसाव्या शतकाच्या आरंभापासून विविध विषयांवरील पुस्तके 'मालिके'च्या स्वरूपात नियमितपणे प्रसिद्ध होऊ लागली. मासिकांप्रमाणेच या ग्रंथमालिकांसाठी वर्गणीदारांची नोंदणी करून त्यांना दरमहा किंवा ठरलेल्या ठरावीक काळाने पुस्तके छापून पाठवली जात.

या ग्रंथमालांमधून कादंबऱ्या देखील प्रसिद्ध होऊ लागल्या. किंबहुना १९१०नंतर असे दिसते की कादंबरी किंवा चरित्रात्मक वाङ्मय छापणाऱ्या मालाच अधिक लोकप्रिय झाल्या. १९२०च्या सुमारास 'मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीची पुस्तकमाला' आणि 'भारत गौरव ग्रंथमाला' या अतिशय प्रसिद्ध अशा ग्रंथमाला होत्या. या मालांमधून विविध प्रकारचे ग्रंथ प्रसिद्ध होत असले तरी त्यात कादंबऱ्यांचा भरणा अधिक होता. याशिवाय तात्या नेमिनाथ पांगळ यांची 'सरस वाङ्मय ग्रंथमाला', नाथ निफाडकर यांची 'महाराष्ट्र ग्रंथमाला' इत्यादी इतरही ग्रंथमालांमधून कादंबऱ्या प्रसिद्ध होत होत्या. या मालांनी कादंबरीची लोकप्रियता या काळात अधिक वाढवली. वर्षभरात मालेतून किती कादंबऱ्या प्रसिद्ध होतील ते जाहीर केले जात असे. त्यांचे स्वरूप कसे राहील हेही स्पष्ट केले जाई. मासिकांप्रमाणेच या ग्रंथमालांचेही वर्गणीदार असत. एकदा ठरलेली वर्गणी वाचकांनी भरली की त्यांना त्या ग्रंथमालेत नियमितपणे प्रकाशित होणाऱ्या कादंबऱ्या भरपूर सवलतीने घरपोच दिल्या जात. 'कादंबरीकल्पद्रुमपुष्पमाला' या मालेची उद्देशपत्रिका पुढीलप्रमाणे होती :

"वरील नावाचे डेमी अष्टपत्री सांचाचे अठ्ठेचाळीस पृष्ठांचे मासिक पुस्तक आम्ही वाई येथे शके १८२२ (इ. स. १९००)च्या वर्षप्रतिपदेपासून सुरू केले आहे. यात सुप्रसिद्ध बंगाली व हिंदी कादंबरीकार रायबहादुर बंकिमचंद्र चतरजी, लखनौ येथील काँग्रेसचे अध्यक्ष बाबू आर. सी. दत्त आणि काशीनिवासी देवकीनंदन खत्री इत्यादिकांनी लिहिलेल्या शुद्ध, सरळ आणि मनोहर अशा कादंबऱ्या महाराष्ट्रभाषेत अनुवादरूपाने देण्याचे योजिले आहे. या मासिकाच्या द्वारे प्रसिद्ध झालेल्या कादंबऱ्या सर्वमान्य होऊन वाचकांच्या अंतःकरणास चटका लावून सोडीत आहेत आणि हिंदी व बंगाली भाषेतील या अपूर्व वाङ्मयाचा परिचय झाल्याने त्याविषयी लोकांस अचंबा वाटत आहे." (रा. श्री. जोग (संपा.) १९९९ : ४६३).

१९२०पर्यंत प्रकाशित झालेल्या कादंबऱ्यांपैकी निम्म्याहून अधिक कादंबऱ्या 'माले'तून प्रसिद्ध झाल्या होत्या. त्यात अनुवादित कादंबऱ्यांची संख्या लक्षणीय होती.

पाश्चात्य (इंग्रजी आणि इतर), बंगाली, हिंदी, गुजराती, उर्दू आणि गुजराती या भाषांतून कादंबऱ्यांचे अनुवाद मराठीत झाल्याची नोंद आढळते (उपरोक्त : ४६४-६५).

त्या काळातली एक प्रसिद्ध ग्रंथमाला म्हणून 'भारत गौरव ग्रंथमाले'च्या प्रभावक्षमतेचे स्वरूप पाहता येईल. ही ग्रंथमाला दीर्घकाळ टिकली आणि तिच्या लोकप्रियतेमुळे संस्थापकाच्या मृत्यूनंतरही अनेक वर्षे ही ग्रंथमाला दोन प्रकाशकांनी सुरू ठेवली होती. भारत गौरव ग्रंथमाला प्रभाकर श्रीपत भिसे यांनी १९१०मध्ये सुरू केली. ते स्वतः लेखक होते. या ग्रंथमालेत सुरुवातीला त्यांनी स्वतःच्याच कादंबऱ्या प्रसिद्ध केल्या. त्या अतिशय लोकप्रिय झाल्या. १९२०पर्यंत या मालेतून एकूण २८ कादंबऱ्या प्रकाशित झाल्या होत्या. १९२५मध्ये भिसे यांचे निधन झाले तोवर पुस्तकांची संख्या ६०वर गेली होती. यात कादंबरीसोबतच चरित्रपर, वैचारिक अशा पुस्तकांचाही समावेश होता. स्वतः भिसे यांनी लिहिलेल्या १३ कादंबऱ्यांचा त्यात समावेश होता. भिसे यांच्या निधनानंतर कर्नाटक प्रिंटिंग प्रेसच्या मंगेशराव कुलकर्णी यांनी ही लोकप्रिय झालेली माला पुढे चालू ठेवली. १९३९मध्ये माला बंद पडेपर्यंत या मालेतून एकूण १३८ पुस्तके प्रसिद्ध झाली (सदानंद भटकळ २०१० : ४३). यात खांडेकर, माडखोलकर, वि. सी. गुर्जर ना. के. बेहेरे, मा. दा. आळतेकर, प्रभाकर पाध्ये, श्री. रा. टिकेकर, वि. ल. भावे, पां. वा. काणे, श्री. व्यं. केतकर, मामा वरेरकर, बा. भ. बोरकर इत्यादी त्या काळातल्या आघाडीच्या लेखकांचा समावेश होता. भाषांतराच्या क्षेत्रातील या मालेची लक्षणीय कामगिरी म्हणजे, संपूर्ण बंकिमचंद्र चटर्जी भारत गौरव ग्रंथमालेने मराठी वाचकांना भाषांतरित स्वरूपात उपलब्ध करून दिला (१९३३-३४). मालेतून प्रसिद्ध झालेल्या वि. स. खांडेकरांच्या 'हृदयाची हांक' (१९३०), 'कांचनमृग' (१९३१), 'उल्का' (१९३४) या कादंबऱ्या विलक्षण लोकप्रिय ठरल्या आणि मोठे लेखक म्हणून खांडेकरांचे नाव मराठी साहित्यात प्रस्थापित झाले. खांडेकरांशिवाय त्या काळात मान्यता पावलेल्या जवळजवळ सर्व कादंबरीकारांच्या पहिल्या किंवा गाजलेल्या कादंबऱ्या भारत गौरव मालेतून प्रसिद्ध झालेल्या आहेत. केतकरांची 'ब्राह्मणकन्या' (१९३०), माडखोलकरांच्या 'मुक्तात्मा' (१९३३) आणि 'भंगलेले देऊळ' (१९३४), मामा वरेरकरांची 'धावता धोटा' (१९३४) ही काही उदाहरणे सांगता येतील.

वा. म. जोशी, खांडेकर, केतकर, माडखोलकर, वरेरकर हे सगळे मराठी कादंबरीच्या पहिल्या-दुसऱ्या फळीतले लेखक होते. या लेखकांच्या कादंबरीवाङ्मयाला 'गंभीर साहित्य' म्हणून मराठी साहित्याच्या इतिहासात स्थान मिळाले आहे. परंतु कोणत्याही काळात गंभीर साहित्याहून मनोरंजनपर साहित्य अधिक वाचले जाते. कादंबरी हा साहित्यप्रकार मनोरंजनाचे प्रमुख साधन म्हणून १९१०पासूनच मराठी साहित्यात रूढ झाला होता. त्यामुळे या काळात मनोरंजनपर कादंबऱ्या लिहिणारे अनेक लेखक उदयाला

आले. वर उल्लेखिलेल्या गंभीर लेखकांच्या कादंबऱ्यांपेक्षा मनोरंजनपर प्रणयकथा आणि ऐतिहासिक कादंबऱ्या मराठी वाचक अधिक संख्येने वाचत होता. अशा तऱ्हेचे साहित्य समाजात वाचकांची 'निर्मिती' करत असते. शिक्षित समाजातील लोक या साहित्याकडे आकर्षित होतात, त्यांना वाचनाची सवय लागते, समाजात वाचकवर्ग वाढतो. या वाचकवर्गातील काही वाचक आपली अभिरुची उन्नत करून गंभीर साहित्य वाचू लागतात. त्यामुळे वाङ्मयीन संस्कृतीत अशा मनोरंजनपर 'खूपविक्या' (बेस्टसेलर्स) लेखकांचे एक स्थान असते. अशा लेखकांची एक मोठी फळीच विसाव्या शतकाच्या पहिल्या तीन-चार दशकांपर्यंत मराठीत निर्माण झाली. त्यांच्या आधारे ग्रंथमालांची एक व्यवस्था तयार झाली. या ग्रंथमालांनी या लेखकांना 'खूपविक्ये' बनवले असे म्हटले पाहिजे. अशा लेखकांच्या अग्रभागी प्रभाकर श्रीपत भिसे, जानकीबाई देसाई, सहकारी कृष्ण, नाथमाधव, गो. ना. दातार, ना. ह. आपटे, वि. वा. हडप, वा. वि. भिडे, इत्यादी लेखक होते. अद्भुताचे वेड मराठी वाचकाला अधिक होते. गो. ना. दातारांनी रेनॉल्डसच्या कादंबऱ्यांवर आधारित लिहिलेली कादंबरीमालिका, नाथमाधवांची 'रायक्लब अथवा सोनेरी टोळी'सारखी साहसकादंबरी, नाथमाधव, वि. वा. हडप, ना. ह. आपटे यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या – या कादंबऱ्यांनी वाचकांची अद्भुताची भूक भागवली. सामाजिक म्हणवल्या जाणाऱ्या कादंबऱ्यांमध्येही अकल्पित आणि अशक्य योगायोग, अवास्तव वाटावीत अशी रहस्योद्घाटने इत्यादी घटक असत. बहुतेक कादंबऱ्या या प्रणयकथा असत.

नाथमाधवांची पहिली कादंबरी 'प्रेमवेडा' १९०८मध्ये प्रसिद्ध झाली. १९२०पर्यंत त्यांनी सुमारे वीस कादंबऱ्या लिहिल्या! अल्पावधीत नाथमाधव एक लोकप्रिय कादंबरीकार ठरले. १९२०नंतर त्यांनी लिहिलेल्या ऐतिहासिक कादंबऱ्या देखील वाचकप्रिय ठरल्या. अशा या लेखकाने एका ठिकाणी प्रांजळपणे कबूल केले आहे की, "पहिल्या पाचसहा कादंबऱ्या लिहीपर्यंत माझी अशी समजूत होती की, कादंबरी लिहिणे म्हणजे एकदोन पात्रे सजवून नायकनायिकेचे प्रेम दाखवावे, त्यांच्यावर संकटे आलेली दाखवावी व शेवटी त्यांचे प्रेममीलन झालेले दाखवावे, म्हणजे कादंबरी लिहिणे झाले..." (चारुशिला गुप्ते १९७३ : ८५). नाथमाधवांचे हे उद्गार प्रातिनिधिक आहेत. त्या काळातल्या बहुसंख्य मराठी कादंबरीकारांची (आणि वाचकांचीही) कादंबरीविषयीची समजूत एवढीच होती. त्यामुळे असा प्रणयकथांचा, कृत्रिम संकटांचा आणि कृतक् संघर्षाचा आकृतिबंध वापरून बहुसंख्य लेखक कादंबऱ्या लिहीत होते आणि बहुसंख्य वाचकांना हेच हवे असल्याने या कादंबऱ्या लोकप्रिय देखील होत होत्या.

वर म्हटल्याप्रमाणे मनोरंजनप्रधान, लोकप्रिय, खूपविकी कादंबरी ही कोणत्याही वाङ्मयीन संस्कृतीचे अंग असते. लोकांना वाचनाकडे आकृष्ट करून घेण्याचे, वाचकवर्ग

तयार करण्याचे कार्य हेच साहित्य करत असते. असे मनोरंजनप्रधान साहित्य आणि गंभीर साहित्य यांत एक सीमारेषा निश्चितच असते. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात मराठी कादंबरीच्या संदर्भात ही सीमारेषा स्पष्ट दिसते. मात्र एक वेगळे निरीक्षण असे की 'गंभीर' म्हणवले जाणारे लेखकही लोकप्रिय कादंबरीच्या उपरोल्लेखित आकृतिबंधामुळे प्रभावित झालेले दिसतात. उदाहरणार्थ, वि. स. खांडेकर जीवनावर काही गंभीर भाष्य करणारे लेखक म्हणून ओळखले जात; ग. त्र्यं. माडखोलकर आपल्या कादंबऱ्यांतून सामाजिक-राजकीय परिस्थितीचे चित्रण करण्याचा दावा करत. परंतु या दोघाही लेखकांच्या कादंबऱ्यांचा रचनाबंध मनोरंजनप्रधान कादंबऱ्यांच्यासारखाच असे : योगायोगाने घडणारे प्रसंग, ओढून ताणून आणलेले संघर्षबिंदू यांनी बनलेली अंतिमतः ती एक प्रणयकथाच असे. ना. सी. फडके यांनी तर उघडपणे 'दोन घटका मनोरंजन करणे' हे कादंबरीचे मुख्य उद्दिष्ट मानले होते. फडक्यांनी असा उद्देश बाळगून लिहिलेल्या कादंबऱ्या लोकप्रिय होणे स्वाभाविक होते, परंतु त्या समीक्षकप्रिय देखील होणे, मराठी कादंबरीतला मानदंड ठरणे, हे आश्चर्यकारक आहे. तत्कालीन कादंबरीचे समीक्षक आणि करमणुकीसाठी कादंबऱ्या वाचणारे सर्वसामान्य वाचक यांचा अभिरुचीचा स्तर जवळजवळ एकसारखाच होता असा निष्कर्ष काढावा लागतो.

याचा एक परिणाम असा झाला की सफाईदार रचनाकौशल्य, आलंकारिक भाषाशैली ही वैशिष्ट्ये समीक्षकांनी महत्त्वाची मानल्यामुळे अनुक्रमे फडके आणि खांडेकर हे मराठीतले मध्यवर्ती लेखक ठरले. परंतु लोकप्रिय कादंबरीचा आकृतिबंध टाळून सामाजिक स्थितीचे वस्तुनिष्ठ दर्शन घडवणाऱ्या, सामाजिक प्रश्नांचे निदान करणाऱ्या कादंबऱ्या ज्यांनी लिहिल्या, त्या लेखकांना कादंबरीच्या मुख्य प्रवाहात स्थान मिळाले नाही. उदाहरणार्थ, श्री. व्यं. केतकर आणि साने गुरुजी यांच्या कादंबऱ्या. या कादंबऱ्यांना विस्कळीत, ओबडधोबड, अकलात्मक, ठरवून त्यांना गौण स्थान देण्यात आले.

आधी सांगितल्याप्रमाणे या काळात चित्र, नाटक, साहित्य या कलांमध्ये 'सौंदर्य' हे तत्त्व प्रभावी होते. साहित्यापुरता सौंदर्यतत्त्वाचा अर्थ मानला गेला – रचनेमधले सौंदर्य (आकर्षक सफाईदार रचना इत्यादी), भाषिक सौंदर्य आणि मनाला आल्हाद देणारी कथने. कादंबरीसारख्या समाजाभिमुख प्रकाराचे समाजवास्तवाशी, लेखकाच्या जीवनदृष्टीशी नाते असते या महत्त्वाच्या बाबीकडे दुर्लक्ष झाले.

१९४०नंतर या 'सौंदर्यदृष्टी'ला मराठीतल्या बंडखोर साहित्यप्रवाहांनी धक्का दिला. समाजातील विविध स्तरांतील वास्तव कादंबरीने वाचकासमोर मांडले पाहिजे, ही जाणीव निर्माण झाली. मानवी जीवनाकडे पाहण्याची दृष्टीही या काळात बदलली. साहित्याने आदर्शवादी मूल्यांचा पुरस्कार करण्यापेक्षा प्रत्यक्ष समाजात दिसणाऱ्या मूल्यांचे खरे स्वरूप उघड केले पाहिजे ही जाणीव निर्माण झाली. त्याचे परिणाम कादंबरीसारख्या

साहित्यप्रकारावर लगेचच दिसून आले. समाजातल्या विविध स्तरांतल्या लोकांचे जीवन कादंबरीतून मांडले जाऊ लागले. असा एक प्रयत्न सर्वप्रथम र. वा. दिघे यांनी ग्रामीण आणि आदिवासी (कातकरी) समाजाच्या संदर्भात केला. श्री. ना. पेंडसे यांची 'एल्गार' (१९४९) विभावरी शिरुरकर यांची 'बळी' (१९५०) या कादंबऱ्यांनी पुढील काळात मराठी कादंबरी कोणत्या दिशेने जाणार आहे याची चाहूल तत्कालीन वाचकांना लागली.

कथा आणि लघुनिबंध – कादंबरीबरोबर कथा या साहित्यप्रकाराचीही वाचकप्रियता या काळात वाढली. कादंबरीचा वाचकवर्ग 'ग्रंथमालां'मुळे वाढला, तर मासिके व त्यांचे दिवाळी अंक हे कथांच्या प्रसाराचे मुख्य माध्यम होते. ह. ना. आपटे यांच्या 'करमणूक' पत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या स्फुट गोष्टी वाचण्याची सवय एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपासून मराठी वाचकांना लागली होती. १९१०पासून दुसरा प्रभावी कथाकार मराठी साहित्यात उदयाला आला, तो म्हणजे वि. सी. गुर्जर. 'मासिक मनोरंजना'चे ते प्रमुख लेखक. गुर्जरांनी पन्नास वर्षे कथालेखन केले. या काळात त्यांनी सुमारे ७०० कथा लिहिल्या. पैकी २१० कथा 'विविधवृत्त' मासिकात प्रसिद्ध झाल्या, तर १२३ 'मनोरंजन'मध्ये (व.दि. कुलकर्णी/गो. म. कुलकर्णी १९९१ : १५०-५२). गुर्जरांच्या बहुतेक कथा रूपांतरित अथवा भाषांतरित होत्या. आपट्यांच्या कथेप्रमाणे पाल्हाळ हे तिचे वैशिष्ट्य होते. त्यांच्या कथेची लोकप्रियता कमी झाली ती दिवाकर कृष्ण, य. गो. जोशी यांच्या कथा प्रसिद्ध होऊ लागल्यानंतर. विशेषतः दिवाकर कृष्ण यांच्या कथेने १९३०च्या सुमारास मराठी कथेत क्रांती केली असे मानले जाते. त्यांच्या 'अंगणातील पोपट' या कथेने मराठी कथेच्या स्वरूपात आमूलाग्र बदल घडवून आणला. मराठी कथेतल्या या पालटासंदर्भात दिवाकर कृष्णांचे समकालीन कथाकार वि. स. खांडेकरांनी पुढील मत मांडले : "१९२०च्या आगेमागेच...मराठी कथेचा कायापालट झाला. गोष्टीचे जुने सैल स्वरूप मागे पडले. तिला नवे कलात्मक रूप येऊ लागले. रंजनपर व बोधपर असे पूर्वी तिचे जे द्विविध ढोबळ स्वरूप होते, ते पालटून ती काव्यात्म, कलापूर्ण व मनोविश्लेषणपर होऊ लागली." (खांडेकर १९६९ : ७-८ ).

इथे खांडेकरांनी मराठी कथेत नव्याने अवतरलेल्या गुणवैशिष्ट्यांचा निर्देश केला आहे. काव्यात्म, कलापूर्ण, मनोविश्लेषणपर. काव्यात्मता हे कथेच्या भाषाशैलीचे वैशिष्ट्य होते. कलापूर्ण म्हणजे पात्रचित्रण, स्वभावदर्शन, प्रसंगचित्रण वगैरे तंत्रात आलेला सफाईदारपणा. आपटे-गुर्जर यांच्या कथेतले पाल्हाळ जाऊन हा सफाईदारपणा आलेला. त्या कथांतील पाल्हाळासोबत आलेले समाजाचे अघळपघळ का होईना, वास्तव दर्शनही गेले. आणि कथा कौटुंबिक नातेसंबंध, त्यांच्यातील ताणेबाणे एवढ्या आशयसूत्रांभोवती फिरत राहिली. बाह्य वास्तवापासून दुरावलेल्या या नव्या कथेने पात्रांच्या मानसिक विश्वावर लक्ष केंद्रित केले. परंतु या पात्रांसमोर जीवनाविषयीचे फार आणीबाणीचे प्रसंग

होते असे नव्हे. कौटुंबिक जीवनातल्या बारीकसारीक प्रश्नांपलीकडे ही कथा गेली नाही. असमाधानाच्या, दुःखाच्या, फजितीच्या साधारणशा अनुभवाला केंद्रस्थानी ठेवून पात्रांच्या वरवरच्या मनोवस्थांचे चित्रण करण्यावर कथालेखकांनी भर दिला. १९४०पर्यंतच्या या कथेच्या लोकप्रियतेची मीमांसा करताना म. द. हातकणंगलेकर म्हणतात, "...मध्यमवर्गीयांचे जीवन स्वास्थ्याचे आणि मानसिक सुखासीनतेचे बनत गेले. साहित्याचे विषय खडतर जीवनमार्गाचे न राहता संरक्षित जीवनशैलीचे होऊ लागले. बालगंधर्वांची वैभवाने झगमगणारी रंगभूमी, गडकऱ्यांची लखलखीत शब्दकळा आणि महाविद्यालयीन जीवनातील नव्या उदारमतवादी वैचारिक वातावरणाने सोत्कंठ झालेली तरुणांची संगमोत्सुक मने यामुळे कसदारपणाची जबर मागणी न करणारा, मर्यादित अवकाश असणारा आणि हलक्या, नक्षीदार तंत्रकुशलतेला आवाहन करणारा लघुकथेसारखा वाङ्मयप्रकार या अनुकूल परिस्थितीत मूळ धरून विकास पावू लागला." (व. दि. कुलकर्णी/गो. म. कुलकर्णी १९९१ : १६५).

लघुकथेच्या बरोबरीने या काळात लोकप्रिय ठरलेला स्फुट गद्य साहित्यप्रकार म्हणजे लघुनिबंध. आधी म्हटल्याप्रमाणे विसाव्या शतकाच्या प्रथमार्धात वैचारिक निबंधाचे मध्यवर्ती स्थान नाहिसे झाले आणि वैचारिकतेचे, मूलगामी विश्लेषणाचे वावडे असलेला लघुनिबंध हा साहित्यप्रकार मात्र अतिशय लोकप्रिय झाला. लघुकथेप्रमाणे याही प्रकारात जीवनातला एखादा हलकाफुलका अनुभव लेखक भाषेच्या द्वारे फुलवत असे आणि त्यात माफक चिंतनाचाही समावेश असे. भाषा-लालित्य हा गुण मात्र लघुनिबंधात अनिवार्य असल्याने वैचारिकदृष्ट्या तो जराही बोजड होऊ नये याची काळजी घेतली जात असे.

१९२६च्या 'रत्नाकर' मासिकात ना. सी. फडके यांची 'सुहास्य' ही गुजगोष्ट प्रसिद्ध झाली. ही लघुनिबंधाची सुरुवात मानली जाते (खांडेकर १९६९ : १). फडक्यांनी नंतर आपल्या लघुनिबंधांना 'गुजगोष्टी' असेच म्हणण्यास सुरुवात केली. १९२७मध्ये वि. स. खांडेकरांनी सावंतवाडीहून प्रसिद्ध होणाऱ्या 'वैनतेय' या साप्ताहिकात 'रानफुले' या सदराखाली छोटे गमतीदार निबंध लिहिले. या काळात विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात गार्डिनर या लेखकाच्या हलक्याफुलक्या शैलीतील निबंधांचा समावेश झाला होता. हे निबंध फडके, खांडेकर, वि. ल. बर्वे यांच्या वाचनात आले होते. लघुनिबंधाचा उदय मराठीत १९२५-२६नंतर होण्यास हे देखील एक कारण असावे (उपरोक्त : ८). पुढे अनंत काणेकरांपर्यंत अनेक लेखकांचे लघुनिबंध मराठीत लोकप्रिय झाले.

अशा प्रकारे लघुकथा आणि लघुनिबंध या दोन साहित्यप्रकारांची या काळातील मराठी वाचकांमधील लोकप्रियता ही वाचकांच्या विशिष्ट अभिरुचीचे द्योतक आहे. हा वाचक प्रामुख्याने पांढरपेशा मध्यमवर्गीय, शहरी पर्यावरणातला होता. या वाचकाच्या

भोवताली गांधींचा राजकीय विचार ग्रामीण समाजापर्यंत झिरपत होता, मार्क्सवाद आणि डॉ. आंबेडकरांची चळवळ यांमुळे सामाजिक शोषण, विषमता यांविरुद्धच्या समतावादी विचारांचे वारे समाजात वाहू लागले होते. कार्ल मार्क्स, डार्वीन, फ्रॉइड यांचे मानवी इतिहास, समाजस्थिती आणि मानवी मन यांविषयीचे मूलगामी विश्लेषण शिक्षितांपर्यंत येऊन पोहोचले होते. परंतु हा वाचक ज्या प्रकारचे मराठी साहित्य वाचत होता, त्यावरून वरीलपैकी वैचारिक विश्वातील प्रवाहांचा, वादळांचा वारा या वाचकाला लागला होता, त्यामुळे तो अस्वस्थ झाला होता, असे म्हणता येत नाही. नवमतवादी विचारावर तेव्हा मराठी मासिकांमधून चर्चा चालत. व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्रीपुरुष समता इत्यादी मूल्यांवर खंडणमंडणात्मक वादही होत. परंतु ललित साहित्याचे जग हे वेगळे आहे – त्याचा या वैचारिक विश्वाशी काही संबंध नाही. साहित्यात रंजक कथानक असावे, कल्पनारम्य भावनांचा आविष्कार व्हावा, भाषा शैलीदार-आलंकारिक असावी – ही साहित्याची मूल्ये मानली जात होती. रविकिरण मंडळातील कवितेतील प्रेमभावना, बालगंधर्वांच्या नाटकातील प्रेमाविष्कार आणि ना. सी. फडक्यांच्या कादंबऱ्यांतील प्रणयरम्य प्रसंग हे सर्व आविष्कार एकाच प्रकारच्या अभिरुचीला साद घालत होते.

## ८.४. परिघावरील / बंडखोर साहित्यप्रवाह

मात्र कोणत्याही कालखंडातील समाजाची संस्कृतीमध्ये प्रतिबिंबित होणारी अभिरुची एकजिनसी आणि स्थिर नसते. तिच्यात अनेक स्तर असतात. आणि समाजाच्या सांस्कृतिक स्थित्यंतरांनुसार अभिरुचीमध्येही पालट होत असतो. प्रत्येक कालखंडात एक मध्यवर्ती साहित्यप्रवाह असतो. त्या साहित्याची प्रस्थापित झालेली एक अभिरुची वाङ्मयीन संस्कृतीत दिसून येते. परंतु या मध्यवर्ती साहित्यप्रवाहाच्या असमाधानातून काही वेगळ्या प्रकारचे साहित्याचे आविष्कार संस्कृतीच्या परिघावरून, अधोस्तरावरून होत असतात. काही वेळा प्रस्थापित वाङ्मयीन मूल्यांचे मानदंड, अभिरुचीची तत्त्वे यांविरुद्ध काही लेखक बंड करतात. या पर्यायी/बंडखोर साहित्याच्या आविष्कारांना अल्प स्वरूपात वाचकवर्ग लाभतो. हळूहळू यापैकी काही अभिरुची-तत्त्वांना, वाङ्मयीन मूल्यांना साहित्याच्या मध्यवर्ती धारेत जागा मिळते. एकेकाळी बंडखोर, पर्यायी मानले गेलेले साहित्य मध्यवर्ती, प्रस्थापित साहित्य-परंपरेचा भाग बनते. ही सातत्यपूर्ण प्रक्रिया असते.

मराठीपुरते असे म्हणता येईल की आकृतिबंध आणि भाषा यांच्या कृतक्-सौंदर्यकल्पनांमध्ये विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील प्रस्थापित साहित्याभिरुची अडकली होती. या अभिरुचीला साद घालणारे साहित्य म्हणजे तत्कालीन मराठी साहित्याची मध्यवर्ती धारा होय. या साहित्याचे स्वरूप कसे होते, ते वरील छेदकांमध्ये आपण पाहिले. या अभिरुचीला छेदणारी काही अभिरुची-तत्त्वे देखील या काळात हळूहळू

संस्कृतीच्या पृष्ठस्तरावर येऊ लागली.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या सत्यशोधक चळवळीतून मराठी समाजातील शेकडो वर्षांपासून अशिक्षित राहिलेल्या वर्गात शिक्षणाची, ज्ञानप्राप्तीची लालसा निर्माण झाली. सत्यशोधक चळवळीतील महात्मा फुले यांच्यासह नारायण मेघाजी लोखंडे, कृष्णराव भालेकर इत्यादी लेखकांनी केलेले ग्रंथलेखन, प्रसिद्ध केलेली नियतकालिके यांच्याद्वारे या सामाजिक वर्गात वाचनाची सवय हळूहळू रुजू लागली. विसाव्या शतकाच्या पहिल्या एक-दोन दशकांत एक लहानसा का होईना वाचकवर्ग बहुजन समाजात तयार झाला होता. पाठोपाठ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दुसऱ्या दशकापासून दलितांना समानतेचा हक्क प्राप्त व्हावा यासाठी आंदोलने सुरू केली; दलित समाजातील अशिक्षितांना शिक्षणाची प्रेरणा दिली. त्यामुळे दलित वर्गातही हळूहळू वाचक तयार होऊ लागले. या वाचकांची अभिरुची प्रस्थापित मराठी साहित्याच्या अभिरुचीहून वेगळी असणे स्वाभाविक होते. या दोन चळवळींनी मध्यवर्ती साहित्यप्रवाहाहून वेगळ्या प्रकारच्या साहित्यनिर्मितीला चालना दिल्याचे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात दिसून येते. अशा पर्यायी, परिघावरील साहित्यप्रवाहांचे स्वरूप येथे स्पष्ट केले आहे.

## सत्यशोधकी साहित्य

सत्यशोधक चळवळीतील नेत्यांनी एकोणिसाव्या शतकात सुरू केलेल्या मासिकांतून लेखन केले. ग्रंथलेखनही केले. कृष्णराव भालेकर यांची 'बळीबा पाटील' ही पहिली ग्रामीण कादंबरी म्हणता येईल. ही कादंबरी भालेकरांच्या 'दीनमित्र' या नियतकालिकात १८८८मध्ये प्रसिद्ध झाली. त्याआधी भालेकरांनी 'दीनबंधू' हे नियतकालिक काढले होते. हे पहिले सत्यशोधक नियतकालिक. त्यात त्यांनी लिहिलेली पदे प्रसिद्ध झाली होती. सत्यशोधक साहित्य, आंबेडकरी विचाराचे साहित्य यांना साहित्याच्या मध्यवर्ती प्रवाहातील नियतकालिके, प्रकाशनसंस्था ही माध्यमे उपलब्ध नव्हती. या चळवळीतील मंडळींना आपले साहित्य प्रसिद्ध करण्यासाठी स्वतः छापखान्यांची सोय करावी लागली; नियतकालिके सुरू करावी लागली. पण बहुजन समाजात अद्याप पुरेशी साक्षरता नव्हती आणि साक्षर झालेल्या लोकांनाही नियतकालिकांच्या वर्गण्या भरणे अगत्याचे वाटत नव्हते. त्यामुळे अशा वाचनाविषयी उदासिन असणाऱ्या वर्गापर्यंत आपले लेखन कसे पोहोचवावे हा या चळवळीतील लेखकांसमोरचा कठीण प्रश्न होता.

विसाव्या शतकातल्या सत्यशोधक चळवळीतील मंडळींनी हा प्रश्न मौखिक परंपरेद्वारे सोडवला. पुढे आंबेडकरी विचाराच्या लेखकांनीही त्याचे अनुकरण केले. खेड्यापाड्यातल्या बहुजन समाजापर्यंत पुस्तके आणि वाचनसवयी पोहोचण्यासाठी दीर्घ काळ लागेल, तो घालवणे शक्य नाही; या भावनेतून 'सत्यशोधक जलशां'ची निर्मिती

झाली. सादरीकरणाच्या माध्यमातून, मौखिक स्वरूपात लोकांपर्यंत अधिक वेगाने आणि प्रभावीपणे पोहोचता येते हे ध्यानात आल्यावर सत्यशोधकी जलसे महाराष्ट्रभर मोठ्या प्रमाणावर सादर होऊ लागले. त्यासाठी सत्यशोधक चळवळीतले लेखक-कवी पदे व वग लिहू लागले. पारंपरिक मनोरंजनाचा प्रकार म्हणून वगनाट्ये सादर होत. त्या परंपरेचा स्वीकार करत सत्यशोधक चळवळीतील लेखक आपले विचार बहुजन समाजापर्यंत पोहोचवू लागले. जलशामध्ये पदे गायिली जात, एखादा वग असे आणि सत्यशोधक विचारवंतांची भाषणे होत. १९०२मध्ये सांगली जिल्ह्यातल्या भिलवडी गावचे भाऊराव रामचंद्र पाटोळे यांनी 'जलसाशिक्षक' नावाचे पुस्तक प्रसिद्ध केले होते. त्यात वग आणि पदे यांचा समावेश आहे. स्वतः पाटोळे जलशांचे प्रयोग महाराष्ट्रभर करत. भीमराव महामुनी या सत्यशोधक कार्यकर्त्याने १९०७मध्ये विदर्भात जलसे सादर केल्याची नोंद आहे (गुदेकर २०१० : ४१५).

विसाव्या शतकाच्या आरंभापासून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात सादर होणाऱ्या या काव्य-नाट्य साहित्यरूपाकडे शहरी पांढरपेशा वर्गाचे लक्ष गेले ते पुण्यासारख्या शहरात छत्रपती मेळ्यांमध्ये सत्यशोधक जलसे सादर होऊ लागल्यानंतर. त्या काळात पुण्यामध्ये टिळकप्रणीत राष्ट्रवादी विचारांचा प्रभाव अधिक होता. सत्यशोधक चळवळीने प्रथमपासून या विचारातील ब्राह्मणकेंद्री जाणिवांना विरोध केला होता. १९१७नंतर शाहू महाराजांच्या प्रेरणेने सत्यशोधक चळवळीचे 'ब्राह्मणेतर चळवळ' या नावाने राजकीय चळवळीत रूपांतर झाले. ब्राह्मणेतर चळवळीची पुणे ही प्रारंभीच्या काळातली संघर्षभूमी होती. ब्राह्मणेतर चळवळीच्या कार्यकर्त्यांनी छत्रपती मेळ्यांतून पदे सादर करून टिळक पक्ष व त्याची धोरणे यांवर टीका केली. विशेषतः दिनकरराव जवळकरांनी लिहिलेली पदे विशेष खळबळजनक आणि वादग्रस्त ठरली. पुण्यात गणपती मेळ्यात सादर केल्या जाणाऱ्या गाण्यांना उत्तर म्हणून जवळकरांनी छत्रपती मेळ्यांसाठी गाणी लिहिली. हा एकप्रकारे दोन सांस्कृतिक विचारधारांमधील संघर्ष होता.

जवळकरांच्या पदांनंतर सत्यशोधकी विचारांचा जोरकस आविष्कार मुकुंदराव पाटील यांच्या वैविध्यपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण साहित्यातून झाला. मुकुंदराव पाटील यांनी लिहिलेल्या 'कुलकर्णीलीलामृत' (१९१२-१३) आणि 'शेटजीप्रताप' (१९१६-१९) या दोन खंडकाव्यांचा निर्देश मराठी वाङ्मयाच्या इतिहासात 'विडंबनकाव्ये' म्हणून झाला आहे. त्यात अनुक्रमे ब्राह्मण कुलकर्णी आणि सावकार-शेटजी हे लोक ग्रामीण समाजातील शेतकऱ्यांना कसे नागवतात त्याचे उपरोधिक शैलीत वर्णन केले आहे. शिवलीलामृत, पांडवप्रताप या मध्ययुगीन धार्मिक ग्रंथांचा आकृतिबंध वापरून ही काव्ये लिहिली आहेत. त्यामुळेच वाङ्मयाच्या आधुनिक इतिहासकारांना या काव्याकडे विडंबनकाव्य म्हणून पाहणे सोपे गेले. त्या काळातले मान्यवर साहित्यिक न. चिं. केळकर यांनी या काव्यांत

वाङ्मयीन मूल्ये अव्वल आहेत असा निर्वाळा देत त्यांतल्या आशयावर मात्र टीका केली. 'केसरी'त या काव्यावर लिहिलेल्या लेखात त्यांनी 'असा जातीय द्वेष पसरवणाऱ्या काव्यावर खटला दाखल व्हावा' असेही सूचित केले. मुख्य प्रवाहातील साहित्यिक-समीक्षकांनी मुकुंदराव पाटलांच्या या काव्याचे असे 'निदान' केले असले तरी त्या काळातील बहुजन समाजात ही दोन्ही काव्ये अत्यंत लोकप्रिय झाली होती.

या दोन काव्यांशिवाय मुकुंदराव पाटलांनी कादंबऱ्याही लिहिल्या. त्या 'दीनमित्र'मधून क्रमशः प्रसिद्ध झाल्या. त्यांच्या कादंबऱ्यांपैकी 'ढढ्ढाशास्त्री परान्ने' ही अत्यंत अव्वल दर्जाची कादंबरी आहे. परंतु एक तर ती त्यांच्या हयातीत पुस्तकरूपाने प्रसिद्ध होऊ शकली नाही. दुसरे म्हणजे तत्कालीन वाङ्मयीन पर्यावरणात कादंबरीचे म्हणून जे निकष होते, त्यांना ती मुळीच उतरत नव्हती. त्यामुळे ती वाचकांकडून आणि समीक्षकांकडून दुर्लक्षित राहिली. १९३५-४० पर्यंत महाराष्ट्राच्या विदर्भ, दक्षिण महाराष्ट्र इत्यादी भागांत अनेक सत्यशोधकी विचारांच्या लेखकांनी कादंबऱ्या, नाटके, प्रहसने लिहिली. पदे लिहिली. त्यांची नोंद काही इतिहासकार अलीकडे करत आहेत. परंतु या साहित्याचा वाङ्मयीन मूल्यात्मकतेच्या दृष्टीने अभ्यास अद्यापही झालेला नाही. यापैकी बहुसंख्य साहित्य सत्यशोधक नियतकालिकांमध्ये राहिले. त्यांना पुस्तकरूप मिळाले नाही. आणि सत्यशोधक विचारांच्या वाचकापलीकडे ते फारसे पोचले देखील नाही. परंतु म्हणून त्याचे वाङ्मयीन संस्कृतीतील ऐतिहासिक महत्त्व कमी होत नाही.

### आंबेडकरी जलसे

सत्यशोधक जलशांच्या मागोमाग आंबेडकरी जलसेही महाराष्ट्रात सुरू झाले. गावकुसाबाहेर राहणाऱ्या समाजापर्यंत विद्रोही विचार पोहोचवण्याचा हा प्रभावी मार्ग होता. सर्वप्रथम आंबेडकरी जलसे सादर करणाऱ्यांपैकी भीमराव कर्डक हे होते. ते नोकरीनिमित्त मुंबईत राहात. आपल्या मित्रांसोबत त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली १९२७ साली चवदार तळ्याच्या सत्याग्रहातही भाग घेतला होता. आंबेडकरांच्या विचारांनी कर्डक प्रभावित झाले होते आणि समाजाच्या तळागाळापर्यंत आपण हे विचार पोहोचवले पाहिजेत असा ध्यास त्यांना लागला होता. निरक्षर लोक भाषणाला येत नाहीत, त्यांना वैचारिक प्रबोधन कंटाळवाणे वाटते, परंतु तमाशाला मात्र ते गर्दी करतात हे त्यांना दिसत होते. लहानपणी भीमराव कर्डकांनी सत्यशोधकी जलशांना होणारी गर्दी पाहिली होती. " 'सत्यशोधक जलशा'ची ही गाडी शेतकरी मराठा समाजाचे रुळावरून, ती अस्पृश्य महार समाजाचे रुळावर आणून, तिला शेटजी-भटजी ऐवजी, अस्पृश्य समाजांतील पूर्व परंपरागत जुन्या चालीरीती आणि रूढी या विरुद्ध चळवळ करण्यास फारच सोयीचे होईल," असा विचार त्यांनी केला. समविचारी मित्रांच्या सहकार्याने २६ ऑक्टोबर १९३० रोजी नाशिक जिल्हा युवक संघाची स्थापना केली आणि या संघातर्फे

पहिला आंबेडकरी जलसा नाशिक जिल्ह्यातील चांदोरी येथे खंडोबाच्या जत्रेत ४ फेब्रुवारी १९३१ रोजी सादर केला (कर्डक १९८२ : ७-८).

बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला दिलेले संदेश, उपदेश, त्यांनी पुकारलेल्या लढ्यांमागचा विचार, लोकभाषेतून आणि लोकलयींतून जलसाकार समाजासमोर मांडू लागले. भीमराव कर्डकांनी सर्वप्रथम जलशांची रचना करताना सांस्कृतिक विद्रोहाचा विचार बारकाईने केला होता. त्यांनी लहानपणी पाहिलेल्या सत्यशोधक जलशांची सुरुवात पारंपरिक तमाशातल्या गणपतीच्या नमनाऐवजी इंग्लंडच्या राजाच्या नमनपर गीताने होत असे. कर्डकांनी गणपती आणि इंग्लंडचा राजा ही दोन्ही प्रतीकं बाजूला करून डॉ. आंबेडकरांविषयीच्या गीताने जलशाला प्रारंभ केला (उपरोक्त ८).

प्रारंभीच्या काळात गोपाळबाबा वलंगकर, किसन फागुजी बंदसोडे, शिवराम जानबा कांबळे हे लोकशाहीर आंबेडकरी चळवळीचा विचार आपल्या गीतांच्या माध्यमातून समाजात प्रसारित करत होते. येवला धर्म परिषद आणि काळाराम मंदिर सत्याग्रह यांत भाग घेतलेले केरुजी घेडगे यांनी लिहिलेला 'हिंदी राजकारणाचा जलसा' अतिशय गाजला होता. १९४६पर्यंत आंबेडकरी जलसे विचारप्रसाराचे कार्य प्रभावीपणे करत होते.

आंबेडकरी कवितेचे मुकुटमणी म्हणून पुढील काळात ओळखले जाणारे वामनदादा कर्डक यांनी आपल्या कवितालेखनाला १९४३पासून सुरुवात केली. १९५०च्या दशकात आंबेडकरी विचाराचे जलसे कमी झाले आणि त्यांची जागा भीमगीत गायन पार्ट्या, कलापथके, कव्वालपार्ट्या यांनी घेतली. या माध्यमातून वामनदादांची गीते दलित समाजात घराघरात पोहोचली. १९४०-५०या दशकात विषमतेचा अनुभव मांडणारे कथालेखन होऊ लागले. पुढील कालखंडात दलित साहित्याचा प्रवाह मराठीत निर्माण झाला.

वरील दोन्ही साहित्यप्रवाहांचे वैशिष्ट्य म्हणजे राजकीय संदेश लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी या साहित्याची निर्मिती होत होती. या निर्मितीमध्ये राजकीय भूमिका स्पष्टपणे अध्याहृत होती. तत्कालीन मध्यवर्ती प्रवाहातील कथा-कादंबऱ्या-कविता राजकीय-सामाजिक प्रश्नांबाबत मुग्धता बाळगत असल्याची ही प्रतिक्रिया होती. सत्यशोधकी आणि आंबेडकरी जलशांचा श्रोता किंवा कथा-कादंबऱ्यांचा वाचक हा साहित्याकडून सौंदर्यमूल्यांची अपेक्षा करत नव्हता. त्याला या साहित्याकडून जीवनाविषयी, समाजव्यवस्थेविषयी राजकीय जाणिवांचा बोध हवा होता. ते कार्य या साहित्याने उत्तमप्रकारे केले. मुख्य म्हणजे राजकीय जाणिवा आणि साहित्य यांचा अनुबंध या काळात जुळून आला. ज्याप्रमाणे आंबेडकरी आणि ब्राह्मणेतर जलशांनी आपापल्या भूमिकांतून राजकीय आशय लोकांपर्यंत पोहोचवला, त्याचप्रमाणे विसाव्या

शतकाच्या अखेरच्या दशकात मार्क्सवादी भूमिकेतून राजकीय आशय लोकांसमोर व्यक्त करणारे साहित्यही मराठी संस्कृतीत निर्माण झाले. डाव्या राजकीय पक्षांनी आपली सांस्कृतिक आघाडी उभारली. या आघाडीवर कवी, लेखक आपली निर्मिती करू लागले. शाहीर अमरशेख, अण्णा भाऊ साठे ही कवींची जोडी यातूनच पुढे आली. त्यांशिवाय शाहीर दत्ता गव्हाणकर, शाहीर साबळे, अमरशेखांचा शिष्य विश्वासराव फाटे यांचीही शाहिरी याच डाव्या विचाराच्या मंचावरून लोकांपर्यंत पोहोचली.

अण्णा भाऊ साठे, दत्ता गव्हाणकर आणि अमरशेख हे तिघेही १९४१-४२च्या सुमारास मुंबईस आले. त्यापूर्वी १९३०पासूनच अमरशेखांनी काव्यलेखन सुरू केले होते. तमाशा, गोंधळ, पारंपरिक शाहिरी कविता यांना नव्या रूपात पेश करत. मुंबईत आल्यानंतर साम्यवादी विचारांनी भारलेल्या या तिघा शाहिरांनी 'लाल बावटा कलापथका'ची स्थापना केली. दत्ता गव्हाणकर यांचे 'बड्या दिवाण' आणि 'मुंबईचा कामगार' हे वग गाजू लागलेले असतानाच अण्णा भाऊ साठे यांनी पहिला वग 'अकलेची गोष्ट' हा १९४४मध्ये लिहिला. तो अतिशय लोकप्रिय झाला. मामा वरेरकरांनी उद्गार काढले की, "मराठी नाटकांनीही या वगापासून शिकण्यासारखे बरेच काही आहे." १९४२ ते ४९ या काळात अण्णा भाऊ साठे यांनी १५ पोवाडे लिहिले. त्यात 'स्तालिनग्राडचा पोवाडा', 'बर्लिनचा पोवाडा', 'मुंबईचा कामगार' हे प्रसिद्ध पोवाडे होते. १९४५नंतर लाल बावटा कलापथकातर्फे अण्णा भाऊ साठे यांनी लिहिलेली 'बिलंदर बुडवे', 'शेठजींचे इलेक्शन', 'पुढारी मिळाला', 'मूक मिरवणूक', 'निवडणुकीतील घोटाळे' अशी अनेक लोकनाट्ये महाराष्ट्रात सादर झाली आणि त्यांना प्रचंड लोकाश्रय मिळाला.

परिघावरच्या सामाजिक स्तरांतून झालेली ही साहित्य निर्मिती मुख्य धारेतील साहित्याहून पूर्णपणे निराळी होती. या साहित्यप्रवाहांचे नाते लोकसाहित्याशी, सादरीकरणाच्या कलाप्रकारांशी होते. ते निखळ साहित्य नव्हते. समाजातील अल्पशिक्षित व अशिक्षित वर्ग या साहित्यापुढचा अपेक्षित श्रोता होता. आणि वर म्हटल्याप्रमाणे राजकीय जाणिवांना हे साहित्यप्रवाह अस्पृश्य मानत नव्हते.

१९४०-५० या काळात एकंदर कलाविश्वात कलेने राजकीय हस्तक्षेप केला पाहिजे ही जाणीव निर्माण झाली. या काळात मुंबईत चित्रकलेच्या क्षेत्रात निर्माण झालेल्या चळवळींमधल्या चित्रकारांची, मुख्य धारेतल्या अनंत काणेकरांसारख्या अनेक लेखकांची राजकीय विचारांशी बांधिलकी होती. अशा राजकीय विचाराने प्रेरित नसलेल्या, परंतु तरीही साहित्यात मन्वंतर घडवून आणणाऱ्या नवसाहित्याची चळवळ याच काळात सुरु झाली.

### नवसाहित्याचा उदय

मराठीत १९४५नंतर झालेले नवसाहित्याचे बंड नेमके कशाविरुद्ध होते? तर

पांढरपेशा मध्यवर्गीय वाचकवर्गाच्या वाङ्मयीन अभिरुचीविरुद्धचे ते बंड होते. नवकविता आणि नवकथा या दोन रूपांत हे बंड झाले. पण हे केवळ प्रस्थापित अभिरुचीविरुद्धचे बंड नव्हते. नवसाहित्याने उघडपणे एखाद्या निश्चित अशा राजकीय विचारधारेचा स्वीकार केला नाही, हे बरोबर आहे. परंतु या चळवळीतील लेखकांचा वैचारिक पिंड हा आधुनिक राजकीय विचारधारा, ज्ञानशाखा यांच्यावर पोसला गेला होता. मानवता आणि मानवतावाद यांच्यावरील श्रद्धेला मिळालेला धक्का आणि त्यातून आलेला निराशावाद मर्ढेकरांच्या कवितेतून प्रकट झाला. या निराशावादाला आधुनिक वैचारिक तत्त्वज्ञानाची पार्श्वभूमी होती. गंगाधर गाडगीळांच्या कथेतून मानवी मनाच्या किडलेल्या अवस्थेचे जे दर्शन घडते, त्याला फ्रॉइडच्या मानसशास्त्रीय संशोधनाचा आधार होता. आणि एकंदर हे नवसाहित्य वाङ्मयीन रचनेच्या आणि भाषेच्या ज्या सौंदर्यकल्पना तोवर मराठीत अधिराज्य गाजवत होत्या, त्या कल्पनांविरुद्ध भूमिका घेत होते. १९४०नंतरची 'अभिरुचि' आणि 'सत्यकथा' ही नियतकालिके या नवसाहित्याची वाहक होती.

१९४०नंतर बदलत्या जीवनातल्या ताण्याबाण्यांना तोंड देणाऱ्या समाजाच्या वाङ्मयीन जाणिवाही बदलू लागल्या. फडके-खांडेकर-य. गो. जोशी यांच्या साहित्यातील अनुभव भाबडा, खोटा, कालबाह्य वाटू लागला. त्यामुळे नवसाहित्याचा वाचक वाढू लागला. दोन प्रकारच्या अभिरुचींमधील संघर्ष या काळात नवसाहित्यावर झालेल्या वादविवादाच्या रूपाने दिसतो. गाडगीळांच्या 'किडलेली माणसे'मधील कथा आणि मर्ढेकरांची 'पिपांत मेले ओल्या उंदीर' ही कविता अश्लील ठरवण्यात आली. मर्ढेकरांच्या 'काही कविता' (१९४८) या संग्रहावर तर खटला दाखल करण्यात आला.

'काही कविता' प्रसिद्ध झाल्यानंतर या संग्रहावर अनेक ठिकाणी चर्चा आयोजित करण्यात आल्या. १४-१५ मे १९४९ रोजी पुण्याला झालेल्या मराठी साहित्य संमेलनात चर्चा झाली. त्यात काव्यशाखेच्या अध्यक्षस्थानी असलेले वि. द. घाटे आणि आचार्य अत्रे यांनी मर्ढेकरांवर अतिशय औचित्यहीन भाषेत, निर्गल टीका केली (विनय हर्डीकर १९९९ : २०७-०८). मर्ढेकरांनी आपल्या संग्रहावरचा खटला अखेरपर्यंत लढवला. प्रकाशक वा. वि. भट यांनी दंड भरून स्वतःची सुटका करून घेतली तरी मर्ढेकर खटला लढवत राहिले. कारण त्यांना त्यातून वाङ्मयीन हेतू साध्य करायचे होते. यानिमित्ताने कायद्यातील अश्लीलतेची व्याख्या स्पष्ट होईल आणि कलावंतांचे आणि लेखकाचे आविष्कारस्वातंत्र्य सिद्ध होईल, अशी आशा त्यांना वाटत होती. त्यासाठी त्यांनी स्वतःची काव्यविषयक भूमिका स्पष्ट करणारे टिपणही लिहिले होते. शिवाय तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, आचार्य स. ज. भागवत, कुसुमावती देशपांडे हे मर्ढेकरांच्या बाजूने कोर्टात साक्ष देण्यास उभे राहणार होते (उपरोक्त २२१-२२). प्रत्यक्षात फक्त भागवतांची साक्ष होऊ शकली आणि १९५२मध्ये, फिर्यादी पक्षाला मर्ढेकरांवरील आरोप त्यांच्या

एकाही कवितेबाबत सिद्ध करता आलेला नाही, म्हणून संशयाचा फायदा देऊन मर्ढेकरांची मुक्तता करण्यात आली. आरोपातून मुक्त होऊनही आपला हेतू साध्य न झाल्यामुळे मर्ढेकर या निकालावर समाधानी नव्हते.

नवसाहित्याची चळवळ फार टिकली नाही. आणखी दशकभरात लघुअनियतकालिकांची चळवळ मराठीत निर्माण झाली आणि त्यानंतर साहित्यामध्ये मोठे परिवर्तन झाले, जे 'साठोत्तरी साहित्य' म्हणून ओळखले जाते. परंतु नवसाहित्याने पारंपरिक कविता आणि कथा यांचा प्रभाव पूर्णपणे मोडीत काढला, हे मात्र खरे.

## ८.५. वाङ्मयीन संस्कृतीचे घटक

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील मराठी वाङ्मयीन संस्कृतीची वैशिष्ट्ये सूत्ररूपाने येथवर पाहिली. या वाङ्मयीन संस्कृतीचे घटक कोणते आणि त्यांचे स्वरूप काय होते ही येथून पुढच्या विवेचनाची दिशा असेल. वाङ्मयीन संस्कृतीची ढोबळपणे दोन अंगे सांगता येतील : वाङ्मयमूल्ये, धारणा, अभिरुची यांची अमूर्त व्यवस्था आणि यांच्या मुळाशी असणारी वाङ्मयव्यवहार करणारी संस्थात्मक व्यवस्था. त्यापैकी वाङ्मयमूल्ये, वाङ्मयाविषयीच्या धारणा आणि अभिरुची यांच्यात काय बदल झाले याचा मागोवा येथवर घेतला. आता ही वाङ्मयीन संस्कृती उभी करणारा वाङ्ममयव्यवहार कसा होता याविषयी विवेचन केले आहे. प्रकाशनसंस्था आणि विक्रीव्यवस्था, साहित्यिक व वाचक यांच्या संस्था व त्यांचे उपक्रम या सर्वांचा समावेश वाङ्मयीन संस्कृतीमध्ये होत असतो. पैकी विसाव्या शतकातील प्रकाशनसंस्था आणि प्रकाशनसंस्था आणि विक्रीव्यवहार यांच्याविषयी येथे विवेचन केलेले नाही. याचे प्रमुख कारण असे :

प्रत्येक कालखंडातील संस्कृतीप्रवाहाच्या गाभ्याशी काही खास प्रेरणा आढळतात. त्या काळातील संस्कृतीव्यवहार या प्रेरणांनी बऱ्याच अंशी नियत झालेला असतो. या प्रेरणांच्या संदर्भात आपण प्रत्यक्ष संस्कृतीव्यवहाराचा विचार केला तर तिचे अधिक नेमके आकलन होण्याची शक्यता असते. जसे, एकोणिसाव्या शतकातील एकंदरीत ग्रंथनिर्मिती, वितरण आणि वाचन या सर्व व्यवहारांच्या गाभ्याशी 'मुद्रणतंत्राचे नव्याने झालेले आगमन आणि त्याच्या आधारे उभारल्या जाणाऱ्या नव्या व्यवस्था' – ही प्रमुख प्रेरणा होती. त्यामुळे त्या कालखंडातील वाङ्मयीन संस्कृतीला आपण 'मुद्रणसंस्कृती' असेच संबोधले; आणि या मुद्रणसंस्कृतीची उभारणी कशी झाली या दिशेचा इतिहास शोधला. मुद्रणालये, प्रकाशनसंस्था, पुस्तकांच्या वितरणव्यवस्था आणि नियतकालिके या घटकांच्या माध्यमातून ही नवी संस्कृती उभी राहिली. प्रबोधनवादी मूल्यांच्या संस्कारातून चिकित्सक दृष्टीचे संस्कार झालेला वर्ग या मुद्रणसंस्कृतीत सक्रिय झाला आणि त्यामुळे वैचारिक प्रबोधनपरतेच्या प्रेरणेने या काळातील साहित्य प्रामुख्याने निर्माण झाले असा निष्कर्ष निघाला. याच तर्काने, विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील वाङ्मयीन

संस्कृतीच्या गाभ्याशी असणारी प्रेरणा कोणती होती? तर वैचारिक साहित्याहून ललित साहित्याचे विश्व वेगळे आहे आणि या ललित साहित्याचा आविष्कार सौंदर्यप्रधान मूल्यांनुसार व्हायला हवा अशी नवी जाणीव या काळात निर्माण झाली. या जाणिवेवर चित्रकला-नाटक-संगीत-चित्रपट या इतरही कलांचा प्रभाव पडला. या काळातील एकंदर वाङ्मयव्यवहार या जाणिवेने प्रभावित झाला होता. प्रकाशनसंस्था आणि वितरण यांच्यामध्ये आता फारसे नवे घडताना दिसत नाही (आवश्यक त्या स्थित्यंतरांचा परामर्श घेतला आहे. उदाहरणार्थ, ग्रंथमालांचा उगम, वाङ्मयीन नियतकालिकांचा उदय, इत्यादी). त्यामुळे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील वाङ्मयीन संस्कृतीविषयी लिहिताना या संस्कृतीत निर्माण झालेल्या कलात्मक सौंदर्याच्या कल्पना आणि त्यांनी लेखन-वाचनावर, साहित्यप्रवाह आणि साहित्यप्रकार यांच्यावर टाकलेला प्रभाव यांचे विवेचन करण्यावर भर दिला आहे.

या वाङ्मयीन संस्कृतीतील वाङ्मयीन निकष, सौंदर्यविषयक कल्पना, वैचारिकतेविषयीच्या धारणा – यांच्या पायाशी वाङ्मयविश्वातील संस्थात्मक व्यवहार आहेत. वाङ्मयीन निकषांचा उदय आणि त्यांचे संक्रमण ज्या व्यवहाराच्या माध्यमातून होतो ते व्यक्तिगत व संस्थात्मक पातळीवरील व्यवहार आहेत. या सांस्कृतिक व्यवहारांचा इतिहास म्हणजेच येथून पुढे केलेले वाङ्मयीन संस्कृतीतील घटकांविषयीचे विवेचन होय. एकप्रकारे वाङ्मयीन संस्कृतीचे जे गुणधर्म येथवर सूत्ररूपाने मांडले, त्यांच्या उदय आणि विस्ताराचा हा इतिहास आहे.

इंग्रज वसाहती सत्तेद्वारे मिळणारे पाश्चात्य शिक्षण नव्या वाङ्मयीन संस्कृतीच्या जडणघडणीच्या मुळाशी होते. महाविद्यालयीन शिक्षणात इंग्रजी साहित्य हा अभ्यासाचा एक प्रमुख विषय होता. इंग्रजी साहित्यातील वैचारिक व ललित निबंध, वास्तववादी कादंबरी, रोमँटिक कविता असे साहित्याचे समकालीन नवे आविष्कार यांचा परिचय या विद्यार्थ्यांना होत होता. उदारमतवादी विचारप्रणाली, स्वातंत्र्य, समता, व्यक्तिस्वातंत्र्य इत्यादी आधुनिक मूल्ये यांचे संस्कार जसे शिक्षणक्रमातील वैचारिक साहित्याद्वारे होत होते, तसेच ते इंग्रजीतील ललित साहित्याद्वारेही होत होते. या संस्कारातून या पिढीची वाङ्मयविषयक अभिरुची विकसित होत गेली. समविचारी शिक्षित लोकांचे एकत्र येणे, त्यांचे वाचन व चर्चा यांद्वारे नव्या सामाजिक मूल्यांसोबतच वाङ्मयीन मूल्यांचाही प्रसार होऊ लागला. विसाव्या शतकाच्या प्रथमार्धात वाङ्मयीन क्षेत्रात गुरु-शिष्य परंपरा निर्माण झाल्या. साहित्य व त्यातील जीवनदृष्टी यांविषयी गंभीर विचार करणाऱ्या प्रभावी व्यक्तींच्या चिंतनाचा प्रभाव त्यांच्या भोवती वावरणाऱ्या लिहित्या-वाचत्या तरुणांवर पडू लागला. अशा काही समीक्षक-लेखकांकडे, संपादकांकडे होणाऱ्या अनौपचारिक चर्चा, बैठका यांमधून साहित्याविषयीची नवी अभिरुची, एक नवी जाण समाजात प्रसृत होऊ

लागली. हे सर्व मध्यमवर्गात घडत होते. हा वर्ग ज्याप्रमाणे राजकीय व सामाजिक चळवळीत अग्रेसर होता, त्याचप्रमाणे वाङ्मयीन संस्कृतीदेखील याच वर्गात आकाराला येत होती. या संस्कृतीच्या जडणघडणीत प्रामुख्याने पुढील घटकांचा समावेश होता.

### लेखकांची अनौपचारिक चर्चा-मंडळे

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपासूनच मुंबई-पुण्यासारख्या शहरांत आधुनिक अर्थाने लिहित्या-वाचत्या-जाणत्या व्यक्तींभोवती जिज्ञासू तरुणांचे कोंडाळे तयार होऊ लागले होते. गोविंद वासुदेव कानिटकर (१८५४-१९१८) यांचे उदाहरण घेता येईल. कानिटकर व्यवसायाने वकील व मुनसफ. उत्तम वाचक, कवी, अनुवादक. विचाराने उदारमतवादी. न्यायमूर्ती रानडे यांचे शिष्य. रानडे, बैरामजी मलबारी आणि न्यायमूर्ती तेलंग यांच्या सहवासात त्यांना समाजसुधारणेच्या विचारांचे धडे मिळाले. स्त्रियांच्या समस्यांविषयी विशेष जागरूक. जॉन स्टुअर्ट मिल याच्या 'सब्जेक्शन ऑफ वुमेन' या प्रसिद्ध पुस्तकाचा 'स्त्रियांची परवशता' (१९०२) हा अनुवाद त्यांनी केला होता. नाटक आणि संगीत या कलांचेही उत्तम जाणकार. मुंबईला राहात असताना हरिभाऊ आपट्यांचे चुलते महादेव चिमणाजी आपटे यांच्या घरी भरणाऱ्या गायन समाजाचे ते प्रमुख सदस्य होते (वेणूबाई पानसे १९३१ : ७६). हरिभाऊ आपटे यांचा आणि गोविंद कानिटकरांचा स्नेह जुळला आणि अखेरपर्यंत राहिला. प्रारंभी हरिभाऊ आपटे यांच्यावर चिपळूणकरांच्या अस्मितावादी प्रखर राष्ट्रवादाचा अधिक प्रभाव होता. पण नंतर ते रानडे-संप्रदायी, उदारमतवादी, सुधारणावादी विचारांचे बनले. हे परिवर्तन त्यांच्यात प्रामुख्याने गोविंदराव कानिटकरांमुळे घडले. मिल व स्पेन्सर याच्या विचारांशी आपट्यांचा परिचय कानिटकरांनीच प्रथम करून दिला. पुढे रानडे-गोखले यांच्या मवाळ पक्षात कार्यरत राहून टिळक-संप्रदायाचा रोष आपटे यांनी कसा ओढवून घेतला ते त्यांच्या चरित्रामध्ये नमूद आहे. परंतु कानिटकरांनी आपट्यांना दिलेल्या सामाजिक विचारांच्या संथेची मराठी साहित्याच्या दृष्टीने सगळ्यात महत्त्वाची निष्पत्ती म्हणजे, आपट्यांच्या हातून लिहिल्या गेलेल्या सामाजिक कादंबऱ्या. या कादंबऱ्यांमधून आपट्यांनी व्यक्त केलेली स्त्रियांविषयीची सहानुभूतिपूर्ण जाणीव, सामाजिक सुधारणांविषयीची कळकळ, राजकीय स्वातंत्र्याविषयीचा प्रगल्भ दृष्टिकोन याचे मूळ कानिटकरांच्या सहवासातील वैचारिक चर्चांमध्ये आहे. हरिभाऊ आपटे १८८३पासून गोविंदराव कानिटकरांच्या सहवासात होते. १८८६मध्ये कानिटकर पुण्यात राहाण्यास आल्यानंतर त्यांच्यात अधिक जवळीक निर्माण झाली. याच दरम्यान, १८८४पासून १८८९पर्यंत केशवसुतांचा पुण्यात शिक्षणाच्या निमित्ताने मुक्काम होता. पुण्याच्या रहिवासकाळात केशवसुतांना हरिभाऊ आपटे आणि गोविंद कानिटकर यांचा सहवास लाभला असावा असा अभ्यासकांचा कयास आहे (भ. श्री. पंडित १९७८ : ३९).

केशवसुतांची गाजलेली पहिली कविता 'प्रीति' ही गोविंदराव कानिटकर यांच्याच 'मनोरंजन आणि निबंधचंद्रिका' या मासिकाच्या नोव्हेंबर १८९९च्या अंकात प्रसिद्ध झाली होती. पुढील दोन वर्षांत केशवसुतांच्या एकूण तेरा कविता या मासिकाने छापल्या. त्यानंतरच्या दशकात हरिभाऊ आपट्यांनी देखील 'करमणूक' या आपल्या नियतकालिकात केशवसुतांच्या एकंदर ४६ कविता नियमितपणे छापल्या. केशवसुतांनी हरिभाऊ आपट्यांना उद्देशून "'पण लक्षांत कोण घेतो'च्या कर्त्यास' ही कविता १८९२मध्ये लिहिली होती. या कवितेत आपट्यांनी आपल्या कादंबरीद्वारे समाजाच्या जुन्या दुराग्रहांतून स्त्रीला बाहेर काढून 'रूढिकाराक्षसा'स पराभूत केल्याबद्दल केशवसुतांनी त्यांचे कौतुक केले होते (उपरोक्त १९७८ : २०२). ८ नोव्हेंबर १९१३च्या 'करमणुकी'च्या अंकात आपट्यांनी केशवसुतांचा उल्लेख "माझे परममित्र" अशा शब्दांत केला होता (उपरोक्त १९७८ : ४१). केशवसुतांची कविता संग्रहरूपाने प्रसिद्ध करण्याचा पहिला उपक्रम आपट्यांनीच १९१७मध्ये केला. केशवसुतांच्या कवितेतील उदारमतवाद, स्वातंत्र्य आणि समता या तत्त्वांचा उद्घोष यांमुळे केशवसुत हे वैचारिकदृष्ट्या आपटे-कानिटकर यांचे समानधर्मा ठरतात. १८९०च्या दशकात पुणे शहरात गोविंदराव कानिटकर या सुधारकी, उदारमतवादी लेखकाच्या भोवती लेखक-कवींचे जग अशा रीतीने फुलले.

अशाच प्रकारचे दुसरे उदाहरण समीक्षक वासुदेव बळवंत पटवर्धन (१८७०-१९२१) यांचे आहे. वा. ब. पटवर्धन नागपूर येथे शिकले. १८९३मध्ये त्यांनी बी.ए.ची पदवी घेतली आणि १८९४मध्ये ते पुण्याला आले. पुण्यात ते डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे सदस्य आणि फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्राध्यापक झाले. आगरकरांच्या पश्चात त्यांनी काही काळ 'सुधारक' पत्राच्या संपादनाचे काम पाहिले. विचाराने ते नास्तिक आणि कट्टर सुधारणावादी होते. सनातनी विचारांवर 'सुधारका'तून ते परखडपणे टीका करत. या लेखनामुळे पटवर्धनांनी सनातनी मंडळींचा रोष ओढवून घेतला. एका रात्री पुण्यातल्या सदाशिवपेठेच्या हौदाजवळ त्यांना या मंडळीकडून मारहाणही झाली होती (वि. स. खांडेकर १९८१ : २११). १८९८मध्ये सुरू झालेल्या 'सुविचारसमागम' या मासिकाच्या संपादनाशी पटवर्धनांचा संबंध होता. केशवसुतांशी पटवर्धनांचा चांगला स्नेह होता. समीक्षक म्हणून पटवर्धनांनी केशवसुतांवर दीर्घ लेखन केलेले नसले, तरी केशवसुतांची कवी म्हणून महत्ता ते ओळखून होते. केशवसुतांच्या कवितांचे सर्वप्रथम कौतुक करणाऱ्यांपैकी वा. ब. पटवर्धन हे एक होते. जून १९२१मध्ये 'केशवसुतांच्या कविता' या संग्रहाची आवृत्ती केशवसुतांचे बंधू सीताराम केशव दामले यांनी प्रसिद्ध केली. हे पुस्तक डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटीकडे अनुदानासाठी पाठवले होते. या सोसायटीच्या परीक्षक मंडळावर वा. ब. पटवर्धन होते (भ. श्री. पंडित (संपा.) १९७८ : ३८). तिथे पटवर्धनांनी

या पुस्तकाविषयी नोंदवलेल्या अभिप्रायावरून मराठी साहित्यातील केशवसुतांचे ऐतिहासिक महत्त्व त्यांनी ओळखले होते हे दिसून येते :

"हे कवितेचे पुस्तक फार वरच्या दर्जाचे आहे. विशेषतः गेल्या तीस वर्षांत जी कवितेची पुस्तके प्रसिद्ध झाली त्यात या पुस्तकास पहिल्या पाच-चारांत बसवावे लागेल. आधुनिक कवींमध्ये ज्यांच्या काव्यात स्वतंत्र स्फूर्तीची लक्षणे स्पष्टपणे दिसतात, ज्यांची प्रतिभा अंतर्भेदी आहे, आणि ज्यांची वाणी काव्यस्फूर्तीला अनुरूप आणि रसपरिपोषास अनुकूल असते, अशा कवींपैकी केशवसुत हे प्रमुख होते, हे त्यांच्या कवितेच्या आवृत्तीवरून दिसून येते.

"केशवसुतांची काही काव्ये इतकी सरस उतरली आहेत की ती आंग्ल कवींतील चांगल्या कवींच्या काव्यांत मिसळली तरी विशोभित दिसणार नाहीत. 'हरपले श्रेय', 'म्हातारी', 'झपूर्झा', 'थकलेल्या भटकणाराचे गाणे', 'स्फूर्ती', 'नवा शिपाई', 'तुतारी','निशाणाची प्रशंसा', 'वातचक्र', 'सतारीचे बोल', 'आम्ही कोण?', 'पुष्पाप्रत', 'फिर्याद', 'दवाचे थेंब', 'गोफण केली छान', 'प्रीति' इत्यादी काव्ये इतकी बहारीची आहेत की, ती कोणत्याही कवीला रचिता आली तर त्याला धन्यताच वाटेल. येवढीच काव्ये जरी केशवसुतांनी लिहून ठेवली असती, तरी देखील मराठी वाङ्मयात, विशेषतः आधुनिक महाराष्ट्र कवितेच्या इतिहासात त्यांनी कायमचे स्थान पटकाविले असते..." (सरोजिनी वैद्य (संपा.) १९९६ : ६८६).

वा. ब. पटवर्धनांची साहित्याविषयीची समज, समीक्षणात्मक लेखन, पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेतील त्यांची गाजणारी व्याख्याने यांच्या प्रभावातून त्यांच्याभोवती साहित्यप्रेमी तरुण गोळा होऊ लागले. फर्ग्युसन कॉलेजमध्ये साहित्य शिकवताना तर लेखन-वाचन करू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचे चांगले प्रोत्साहन लाभे. पण त्याचबरोबर त्यांच्या घरी नियमितपणे भरणाऱ्या बैठकींतही साहित्यविषयक चर्चा कायम रंगत असत. वि. स. खांडेकर १९१६-१७मध्ये पुण्यात फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत असताना पटवर्धन त्यांचे शिक्षक होते. खांडेकर त्यांच्या फार जवळ जाऊ शकले नाहीत. मात्र पटवर्धनांच्या भोवती असणाऱ्या होतकरू लेखकांविषयी, वाचकांविषयी त्यांनी लिहिले आहे (वि. स. खांडेकर १९८१ : २१०-११). पवटर्धनांसोबतच्या तरुण लेखक-कवींच्या बैठकी कशा चालत याची काहीशी कल्पना नाट्यछटाकार दिवाकर (शंकर काशिनाथ गर्गे, १८८९-१९३१) यांच्या रोजनिशीतील काही नोंदींवरून येऊ शकते. १९०९पासून दिवाकर पुण्यात जिल्हा पोलीस अधिक्षकाच्या कचेरीत नोकरी करत असताना त्यांना वाचन-लेखनाचा नाद लागला होता. यातूनच त्यांचा वा. ब. पटवर्धनांशी संबंध आला आणि तो पटवर्धनांच्या निधनापर्यंत कायम राहिला. त्यांच्या भेटीच्या काही नोंदी नमुन्यादाखल पुढीलप्रमाणे –

- "११ डिसेंबर १९१० : बाळू (सहस्रबुद्धे) व मी फर्ग्युसन कॉलेजातील प्रो. पटवर्धन यांजकडे गेलो. अर्धा पाऊण तास होतो. वाचन : मोलिअरच्या नाटकांचा तिसरा भाग वाचून तिन्ही भागांचे वाचन पुरे केले. काही नाटके वाचताना यथास्थित हसावयास मिळाले।
- ३० जुलै १९११ : प्रो. पटवर्धन यांजकडे 'पंडित विद्याधर' नाटकाचा चौथा व पाचवा अंक त्यांनी ऐकला. नाटकाचा पहिला अंक पसंत असून पुढे नाटक खाली खाली गेले असल्याचे सांगितले।
- १० सप्टेंबर १९११ : प्रो. पटवर्धन यांजकडे : वाचन –'ब्राऊनिंग – द फ्लाईट ऑफ द डचिस'.
- १८ सप्टेंबर १९११ : बाळू याजकडे : ब्राउनिंगच्या काव्याच्या धर्तीवर एक नाट्यप्रसंग 'महासर्प' लिहिला. तो तेथेच बाळू व बापूस (बाळूचा भाऊ) दाखविला. नंतर तो प्रो. पटवर्धन यांस दाखविला. म्हणाले, 'लेखनपद्धती सुरु केली आहे ती चालू ठेवण्यासारखी आहे! अवश्य लिहीत चला!'.
- १४ जानेवारी १९१३ : ...सायंकाळी प्रो. पटवर्धन यांजकडे. त्यांस केशवसुतांसंबंधी विचारले. त्यांनी बरीच गमतीची माहिती सांगितली! त्यांचा व आपला ऋणानुबंध, त्यांचा स्वभाव, कविता म्हणण्याची पद्धती वगैरे गोष्टी निघाल्या होत्या. 'स्वतःची काव्ये केशवसुतांस चांगलीच पाठ असत, म्हणणे मात्र अंमळ जाडे भरडेच.'
- ६ जानेवारी १९१९ : सायंकाळी चार-सव्वाचाराचे सुमारास दादांकडे (प्रो. वासुदेवरावजी पटवर्धन). बोलता बोलता 'बी' कवीच्या 'चाफा' कवितेबद्दल बोलणे निघाले. 'चाफा' हा खंत करणारा पुरुष पती आहे व म्हणणारी स्त्री – पत्नी आहे, अशा तयारीने ती कविता वाचली म्हणजे ती समजते, असे ते म्हणाले.
- १४ फेब्रुवारी १९१९ : सायंकाळी साताच्या सुमारास दादांकडे रे. टिळकांच्या कवितेबद्दल बोलणे झाले. काही काही ठिकाणी काव्यात प्रमाण साधलेले नाही. पण मनोगत – विचार वगैरे व्यक्त करण्याची हातोटी फारच साधली आहे. कळकळ बेताचीच आहे!
- २० फेब्रुवारी १९१९ : दादांकडे गेलो. शेले व ब्राउनिंग यांजविषयी बोलणे निघाले. 'शेले लिरिक वृत्तीचा व ब्राउनिंग ड्रॅमॅटिक वृत्तीचा आहे.'
- ५ मार्च १९१९ : दादांकडे सायंकाळी हरिभाऊ आपटे यांजबद्दल. 'स्वभावविकासाच्या दृष्टीने हरिभाऊंनी आपले वरवरचे आणि ठराविकच जग घेतले आहे. खोल तळघरात फारसे शिरलेच नाहीत. तसेच स्वभावातून कथानक बनत जाणे हे तर त्यांच्या लेखनात जवळ जवळ नाहीच म्हटले तरी चालेल!'
- ११ सप्टेंबर १९१९ : रोजच्याप्रमाणे दादांकडे संध्याकाळी. आज कवी ठोमरे यांच्या

कवितेसंबंधी बोलणे झाले. 'ठोमरे यांची कविता म्हणजे एक उत्कृष्ट एकतारी! सारंगी किंवा वीणेसारख्या अनेक तारा तिला नाहीत किंवा निरनिराळे सूरही तिला नाहीत. त्यांची कविता पूर्णावस्थेला गेली होती. केशवसुतांची मात्र पोहोचावयाची होती.'

- ६ जानेवारी १९२० : दादांकडे. प्रथम ते व मी असे दोघेच बोलत होतो. साधारणपणे इंग्रजी वाङ्मयासंबंधी बोलणे निघाले होते. 'आर्थिक जगाचे यथार्थ स्वरूप दाखवून पारमार्थिकाकडे मन वळवले आहे व त्याला स्थिरता आणली आहे असे इंग्रजी वाङ्मयात फार थोडे आहे. जग – वासनामय जग – व तद्विषयक तडफडी यांनीच बहुतेक वाङ्मय व्यापले आहे. नाही म्हणायला वर्ड्स्वर्थचे बरेचसे लिहिणे जीवाचे सांत्वन करून त्याचे थोडेफार समाधान करणारे आहे.'
- १६ फेब्रुवारी १९२० : सायंकाळी दादांकडे. शेक्सपीअरच्या ज्युलियस सीझर नाटकाबद्दल गोष्टी निघाल्या. कवीच्या इतर नाटकांहून हा प्रयत्न सर्वस्वी निराळा आहे. बाकीची नाटके प्रमुख व्यक्तीच्या नायकाच्या गुणदोषांवर अवलंबून आहेत. तसे या नाटकाचे नाही. ही प्रजासत्ताक राज्याची नाट्यकृती आहे. केवळ एका व्यक्तीची नाही.
- १३ जानेवारी १९२० : जेवण झाल्यावर रात्री दादांकडे. तेथे बारा वाजेपर्यंत होतो. शेक्सपीअर, ब्राऊनिंगविषयी बोलणे निघाले होते : 'ब्राउनिंग ही शेक्सपीअरची परिणतावस्था आहे असे वाटते." (सरोजिनी वैद्य (संपा.) १९९६ : ३५३-३९९).

वा. ब. पटवर्धनांभोवती जमलेल्या लेखक-कवींच्या गोतावळ्याप्रमाणेच इतरही काही चर्चामंडळं या काळात पुण्यात होती. तरुण नाटककार राम गणेश गडकरी यांचा एक गोतावळा होता. दिवाकरांच्या रोजनिशीत गडकऱ्यांसोबतच्या कवितावाचनाचे, वाङ्मयीन चर्चांचे, उल्लेख आहेत. उदाहरणार्थ, ५ ऑक्टोबर १९१४ची नोंद : "बापूरावांकडे बालकवी ठोमरे व गडकरी हे आले होते. रा. गडकरी यांनी माझे 'निजलेले मूल' व 'प्रवासी' ही वाचली." आणि ७ ऑक्टोबर १९१४ची पुढील नोंद : "संध्याकाळी सहाच्या सुमारास शनिवारवाड्याजवळील नव्या बागेत गेलो. रा. गडकरी, ठोमरे, बापूराव, बाळू वगैरे आम्ही होतो. 'रिकामपणाची कामगिरी'ची लेखमाला आपण कशी लिहिणार आहोत हे सर्व मोठ्या गमतीने ते स्वतः सांगत होते व आम्ही यथास्थित हसत होतो!" (उपरोक्त : ३८०).

राम गणेश गडकरी यांच्या घरी चालणाऱ्या वाङ्मयीन चर्चांच्या आठवणी वि. स. खांडेकरांनी लिहिल्या आहेत. गडकरी तेव्हा नाटककार म्हणून प्रस्थापित झालेले होते. तरी देखील नव्याने लिहू पाहणाऱ्या लेखक-कवींना ते वेळ देत असत. खांडेकर १९१४ ते १९१७ या काळात कॉलेज शिक्षणाच्या निमित्ताने पुण्यास राहात असत. ते लिहितात,

"त्यांच्या (गडकऱ्यांच्या) घरी गप्पांची बैठक ही नित्याचीच असे. त्या बैठकीत कधी माझ्यासारखे जिज्ञासू शिष्यच असत, कधी त्या काळातली साहित्यक्षेत्रातली प्रसिद्ध

मंडळीही असत. बालकवी ठोमरे, गणपतराव बोडस, अच्युतराव कोल्हटकर, 'मासिक मनोरंजना'चे संपादक काशिनाथ मित्र इत्यादिकांना मी प्रथम पाहिलं, ते गडकऱ्यांच्याच घरी. अशी कुणी मंडळी बैठकीत असली, आणि गडकऱ्यांच्या आणि त्यांच्या संभाषणाचा प्रभाव सुरू असला म्हणजे ऐकण्याचा जो आनंद मिळे, त्याचं वर्णन करून सांगणं कठीण आहे. त्यात कोट्या-प्रतिकोट्या असत. बुद्धिबळातल्या खेळांप्रमाणे दुसऱ्यावर मात करण्यासाठी केलेली विधानं असत. कधी रंगभूमीविषयी, कधी कवितेविषयी उलटसुलट स्वरूपाची चर्चा होई. कधी कुठल्यातरी निमित्तानं एखाद्या प्रसिद्ध साहित्यिकाच्या खाजगी जीवनातलं एखादं रहस्यही कानांवर पडे. तापलेली जमीन वळवाच्या पाण्याचा थेंबन्-थेंब शोधून घेते, तसं मी ते सारं अमृत मनानं ऐकत असे....त्यांच्या प्रत्येक बैठकीत एखाद्या नव्या इंग्रजी ग्रंथकर्त्याचं नाव निघे. एखाद्या वेळी रंगात आले, तर ते एखादी कविता समजून सांगत. अगर तिच्यावर भाष्य करीत. एकदा त्यांनी मला विचारलं,–"तू गोल्डस्मिथ वाचलायस का?" मला गोल्डस्मिथचं नाव ऐकून ठाऊक होतं. हायस्कूलमधल्या इंग्रजी पाठ्यपुस्तकात त्यांच्या 'Deserted Village' मधला एक उतारा होता. त्या उताऱ्याच्या आधारे मी गोल्डस्मिथविषयीचं माझं ज्ञान प्रकट करू लागलो, तेव्हा ते हसून म्हणाले –"बारडीतल्या पाण्यात कुणी पोहायला शिकत नाही, त्यासाठी विहिरीत उतरलं पाहिजे. त्याचं 'She Stoops to Conquer' वाच. 'Vicar of Wakefield' वाच. 'Citizen of the World' वाच."(वि. स. खांडेकर : १३०, १३२-३३). विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात बालकवी ठोमरे, र. वा. दिघे, वि. स. खांडेकर, शंकर काशिनाथ गर्गे उर्फ दिवाकर इत्यादी तरुण कवी-लेखक पुण्यात राहात होते. हे सर्वजण गडकऱ्यांकडे नियमितपणे हजेरी लावत असत.

पुण्यातील आणखी एक अशाच प्रकारचा कलासाहित्याविषयीच्या चर्चेचा अड्डा नीळकंठराव सहस्रबुद्धे यांच्या घरी भरत असे. सहस्रबुद्धे कुटुंब कलाप्रेमी व सुधारकी विचारांचे होते. कृतिशील सुधारक असा नीळकंठराव सहस्रबुद्ध्यांचा पुण्यात लौकिक होता. हिंगणे येथील कर्व्यांचा महिलाश्रम, सोशल सर्विस लीग अशा अनेक सामाजिक संस्थांशी त्यांचा संबंध होता. नीळकंठराव सहस्रबुद्ध्यांचे घर हे पुण्यातील सुधारकी विचाराचे लोक, लेखक-कवी, वाङ्मयीन अभिरुची बाळगणारे वाचक, महाराष्ट्र नाटक मंडळीतील नटमंडळी या सर्वांचे एकत्र जमून चर्चा करण्याचे हक्काचे ठिकाण होते. वा. ब. पटवर्धन, श्री. कृ. कोल्हटकर, का. र. मित्र, ना. वा. टिळक, द. अ. आपटे (अनंततनय), राम गणेश गडकरी, त्र्यंबक बापूजी ठोमरे (बालकवी), शंकर काशिनाथ गर्गे (दिवाकर), त्र्यंबक सीताराम कारखानीस अशी पुण्याची आणि पुण्याबाहेरील मंडळी सहस्रबुद्ध्यांच्या घरी चालणाऱ्या चर्चांना हजेरी लावून जात असत. बालकवी, दिवाकर आणि गडकरी यांच्या गाठीभेटी सहस्रबुद्ध्यांच्या याच बैठकीत अधिक आणि सातत्याने झाल्या.

दिवाकरांच्या नाट्यसंवादात्मक स्फुटलेखनाला 'नाट्यछटा' हे नाव वा. ब. पटवर्धनांनी सुचवले. ही ऐतिहासिक घटना सहस्रबुद्ध्यांच्या घरच्या बैठकीतच घडली (वैद्य (संपा.) १९९६ : चौतीस-पस्तीस).

१९२०च्या आसपास मुंबईच्या आंग्रेवाडीतील कवी माधव केशव काटदरे यांच्याकडे तरुण कवींचा दरबार भरत असे. ग. त्र्यं. माडखोलकर, प्रल्हाद केशव अत्रे, अज्ञातवासी, आनंद यांच्यासारखे त्या काळातले नवोदित कवी या बैठकीला हजेरी लावत, तर पुण्यात नव्या कवींची बैठक अनंततनय यांच्याकडे भरत असे. ही बैठक कशा वातावरणात भरत असे याची एक आठवण ग. त्र्यं. माडखोलकर यांनी दिली आहे : "मला अजूनहि पक्के आठवते की, श्री. श्री. अ. डांगे आणि मी, दुतर्फा बांधलेल्या म्हशींच्या रांगातून मोठ्या कष्टाने वाट काढीत, ज्या वेळी त्या वाड्याच्या माडीवर प्रथम गेलो, त्या वेळी त्या गवळ्याच्या वाड्यात महाराष्ट्रशारदेचे पुण्यातील व्यासपीठ असेल, अशी कल्पनाहि माझ्या मनाला शिवली नाही. आम्ही वर गेलो, त्या वेळी एका जुन्या मळक्या सतरंजीवर, शंकासुराच्या फुलाला जसे लांब टोकदार केसर असतात, तशा मिशा असलेले एक प्रौढ, शांत गृहस्थ आसनमांडी घालून बसलेले होते आणि त्यांच्याभोवती प्रो. बापूसाहेब चापेकर यांच्यापासून तो अज्ञातवासी केळकर यांच्यापर्यंत निरनिराळ्या वयाच्या आणि दर्जाच्या कवींचे कडे पडलेले होते..." (माडखोलकर १९७२:११). या अड्ड्यांना जोडलेली काही नियतकालिके देखील असत. उदाहरणार्थ, मुंबईला काटदरे यांच्या बैठकीतल्या लेखक-कवींना 'नवयुग' मासिकाची दारे प्रसिद्धीसाठी खुली असत, तर पुण्याला अनंततनयांच्या शिफारशीने 'चित्रमयजगत्' मासिकात कविता छापणे शक्य होई (उपरोक्त).

लेखक-समीक्षकांप्रमाणेच वाङ्मयीन नियतकालिकांच्या संपादकांकडे जमणारे गप्पांचे अड्डे हे देखील वाङ्मयीन संस्कारांचे महत्त्वाचे केंद्र होते. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात 'नाट्यकथार्णव', 'करमणूक' ही निखळ ललित साहित्याला वाहिलेली नियतकालिके लोकप्रिय झाली होती. विसाव्या शतकाच्या प्रारंभी 'विविधज्ञानविस्तार' आणि 'मनोरंजन' ही दोन मध्यमवर्गीय शिक्षित वाचकांमध्ये लोकप्रिय असणारी नियतकालिके साहित्यविषयक लेखन प्राधान्याने छापत होते. त्यात ललित साहित्यासोबतच समीक्षा व साहित्य-चर्चा यांनाही मोठे स्थान होते. या नितकालिकांच्या कार्यालयांमध्ये संपादकांना भेटण्यासाठी ज्येष्ठ आणि नवखे लेखक जमू लागले. अशा रीतीने या नियतकालिकांची कार्यालये म्हणजे वाङ्मयीन चर्चांचे अड्डे बनले. 'मनोरंजन'चे का. र. मित्र आणि 'विविधज्ञानविस्तार'चे रामकृष्ण रघुनाथ मोरमकर या दोन्ही संपादकांचे अड्डे मराठी साहित्यात प्रसिद्ध होते. उन्हाळ्याच्या आणि नाताळाच्या सुट्टीत श्रीपाद कृष्ण कोल्हटकर मुंबईला येऊन राहात. त्यावेळी मित्र यांच्याकडे 'मासिक मनोरंजन'च्या कार्यालयात त्यांचा इतर लेखकांशी गप्पांचा फड जमत असे. या भेटी-

चर्चांना कोल्हटकरांनी 'साहित्य संमेलनाच्या घरगुती छोट्या आवृत्ती' असे नाव दिले होते (पंडित १९७५ : २११). अशा चर्चांमध्ये जुन्याजाणत्या लेखकांसोबत नवे लेखकही सहभागी होत. नव्या लेखकांना मार्गदर्शन मिळत असे. ग. त्र्यं. माडखोलकर यांची श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांशी पहिली भेट मुंबईतील गिरगाव भागातील 'विविधज्ञानविस्तार'च्या मोरमकर यांच्याकडे मे १९२०मध्ये झाली आणि दोघांमध्ये गुरू-शिष्याचे नाते प्रस्थापित झाले (माडखोलकर १९६५ : ०१). मोरमकरांकडच्या गप्पाष्टकांचे वर्णन माडखोलकरांनी पुढील शब्दांत केले आहे : "उपरणे पांघरलेले तात्यासाहेब मध्यभागी बसलेले आहेत; त्यांच्या समवयस्क मित्रांचा आणि तरुण शिष्यांचा गराडा भोवती पडलेला आहे; व केव्हा कानावर एक हात देऊन 'तुजविण गमे वृथा संसार' हें पद ते आपल्या किनऱ्या मधुर आवाजात गुणगुणत आहेत, तर केव्हा कोटीवर कोटि लढवून आम्हा सगळ्याना मनसोक्त हसावयाला लावित आहेत!...साहित्याच्या शास्त्रीय गंभीर चर्चेपासून तो नाटकाच्या साभिनय हृदयस्पर्शी वाचनापर्यंत काव्यशास्त्रविनोदाचे सगळे प्रकार मी या मजलसींत अनुभवले;..." (माडखोलकर १९७२ : १२).

लेखकांच्या बैठकांची, चर्चामंडळांची ही उदाहरणे पुण्या-मुंबईतील असली, तरी अनौपचारिकपणे अशा वाङ्मयीन चर्चा करणारी मंडळे विसाव्या शतकाच्या दुसऱ्या-तिसऱ्या दशकापर्यंत इतरही शहरांमध्ये हळूहळू तयार होत होती. महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या तरुण लेखक-कवी-वाचकांची मंडळे स्थापन होऊ लागली होती. वाङ्मयीन अभिरुची विकसित होण्यासाठी अशा मंडळांचे उपक्रमही उपयुक्त ठरत असत. नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजमध्ये नोव्हेंबर १९२४मध्ये 'महाराष्ट्र भाषासंवर्धक मंडळ' स्थापन झाले (ना. सी. फडके १९४३ : १०९). नागपुरातील दुसरे मोठे महाविद्यालय मॉरिस कॉलेज येथे भवानीशंकर पंडित, वि. भि. कोलते हे विद्यार्थी असताना 'शारदा मंडळ' ही वाङ्मयीन उपक्रम करणारी संस्था होती. या शारदा मंडळातर्फे 'साहित्यसंग्रह' या नावाने एक हस्तलिखित प्रकाशित होई. जी. एन. जोशी हे प्रसिद्ध गायक या कॉलेजमध्ये विद्यार्थी असताना काही काळ या हस्तलिखिताचे संपादक होते. ना. घ. देशपांडे यांनी त्यांची अतिप्रसिद्ध 'शीळ' ही कविता मॉरिस कॉलेजमध्ये शिकत असतानाच लिहिली. ते जी. एन. जोशी यांचे सहाध्यायी (भवानीशंकर पंडित १९७५ : १५९). मॉरिस कॉलेजमधल्या शारदा मंडळाचा वार्षिकोत्सव भरत असे. १९२७मध्ये झालेल्या वार्षिकोत्सवाचे पाहुणे म्हणून श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी हजेरी लावली. या उत्सवात कोल्हटकरांनी स्वतः आपले महाराष्ट्र गीत गाऊन सादर केले आणि जी. एन. जोशी यांनी त्यांना पायपेटीवर साथ दिली (उपरोक्त १७२, १९६).

नव्या कलाजाणिवेचे लेखक-समीक्षक, सुधारकी विचारांची मंडळी यांच्या विचारांचा प्रभाव अशा अनौपचारिक चर्चा-बैठकांतून पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचला. मराठी

साहित्यविमर्शाची तत्त्वे, संकल्पना यांना या उपक्रमांतून आकार आला. या बैठकांमध्ये केशवसुत, ह. ना. आपटे, बालकवी, भा. रा. तांबे अशा तत्कालीन मराठी लेखक-कवींच्या वाङ्मयीन कार्याचे मूल्यमापन होई; त्यांच्या गुणदोषांची चर्चा होई. त्याचबरोबर पदवीशिक्षणातील साहित्याचे अभ्यासक्रम आणि नियतकालिकांमधील लेख, भाषांतरे या मार्गांनी मराठी वाङ्मयीन संस्कृतीत प्रविष्ट झालेले शेक्सपीअर, ब्राऊनिंग, शेले यांसारखे युरोपीय भाषांमधील, आणि तोरू दत्त, रवीन्द्रनाथ टागोर यांच्यासारखे बंगाली भाषेतील कवी-लेखक यांच्या साहित्याचा परिचय होई. ज्येष्ठ लेखक नव्या लेखकांचे लेखन सहानुभूतीने वाचत व त्यावर संस्कार करण्यासाठी मार्गदर्शन करत. वाचनासाठी पुस्तके सुचवत. विसाव्या शतकाच्या दुसऱ्यातिसऱ्या दशकांत उदयास आलेल्या बालकवी, र. वा. दिघे, वि. स. खांडेकर, स. आ. जोगळेकर यांच्यासारख्या तरुण पिढीतील वाचक-लेखकांची अभिरुची घडण्यात या चर्चा-बैठकांचा मोठा हातभार लागला.

### वाङ्मयीन चर्चा-मंडळांमध्ये स्त्रियांचा सहभाग

महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात स्त्रीसुधारणांचे वारे वाहू लागले तरी प्रत्यक्ष समाजजीवनात स्त्रियांना दुय्यम स्थानच होते. उच्च शिक्षणात स्त्रियांना प्रवेश मिळाला, तरी शिकणाऱ्या मुलींचे प्रमाण अत्यल्प होते. अशा स्थितीत साहित्यक्षेत्रातील उपरोक्त अनौपचारिक चर्चा-मंडळांमध्ये थोडेफार का होईना, परंतु स्त्रियांचे अस्तित्व होते; इतकेच नव्हे, तर अशा काही चर्चा-मंडळांच्या केंद्रस्थानी स्त्रिया होत्या, ही बाब उल्लेखनीय आहे. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात गोविंदराव कानिटकर यांची पत्नी काशीताई कानिटकर या स्वतः कथा-कादंबरीकार होत्या. ह. ना. आपटे यांचा कानिटकर परिवाराशी कौटुंबिक स्नेह होता. कानिटकरांच्या घरी चालणाऱ्या वाङ्मयीन चर्चांमध्ये काशीताईदेखील सहभागी होत असत. काशीताईंना त्यांची 'रंगराव' ही कादंबरी पूर्ण करण्यासाठी हरिभाऊ आपटे यांनी प्रोत्साहित केले, ही एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकातील घटना आहे. परंपराबद्ध समाजात, जिथे स्त्रियांना शिक्षणापासून, स्वतंत्र जीवनापासून दूर ठेवले जाते, तिथे काशीताईसारखी एक स्त्री कादंबरीलेखन करते ही हरिभाऊंना सामाजिकदृष्ट्या महत्त्वाची घटना वाटत होती. काशीताईंनी ही कादंबरी लिहायला घेतली, परंतु त्या वेळी 'पुणे-वैभवा'त क्रमशः प्रसिद्ध होणाऱ्या हरिभाऊंच्या 'मधली स्थिती' या कादंबरीची प्रकरणे वाचून इतकी चांगली कादंबरी आपल्याला लिहिता येणार नाही, असे त्यांच्या मनाने घेतले व त्यांनी स्वतःचे कादंबरीलेखन थांबवले. तेव्हा गोविंदरावांच्या विनंतीवरून खुद्द हरिभाऊंनी काशीताईंना पत्रे लिहून त्यांच्यातील लेखनगुणांना प्रोत्साहन दिले.

पण काशीताईंचा वाङ्मयीन उपक्रमांमधील हा सहभाग त्यांच्या पतीच्या निगराणीखालीच राहिला. आपल्या पतीच्या प्रभावर्तुळाच्या परिघापलीकडे लेखिका

म्हणून, वाङ्मयातील जाणकार व्यक्ती म्हणून आपले स्वतंत्र स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी करणे शक्य नव्हते. आपटे आणि केशवसुत हे मराठी लेखक व्यक्तिस्वातंत्र्याची महती आपल्या साहित्यातून गात होते; पण स्त्रियांना हे स्वातंत्र्य अद्याप पारखे होते आणि दलितांच्या संदर्भात तर व्यक्तिस्वातंत्र्याचा विचारही सत्यशोधक चळवळीबाहेरच्या लोकांना शिवत नव्हता. अशा परिस्थितीत या काळातील काही अपवादात्मक स्त्रियांचा पांढरपेशी लेखकांच्या वाङ्मयीन चर्चा-बैठकांमध्ये असलेला सहभाग उल्लेखनीय ठरतो.

मुंबईच्या गिरगाव भागातील मुगभाट परिसरात शांतारामाच्या चाळीत १९२०च्या आसपास कवी ना. के. बेहरे यांच्या सासू, मालतीबाई पटवर्धन राहात असत. शिक्षण जेमतेम मराठी चौथीपर्यंत झालेले असले तरी नर्सिंगच्या व्यवसायामुळे इंग्रजी, गुजराती या भाषा त्यांना बऱ्यापैकी येत होत्या. शिवाय वाचन व जीवनात आलेले विविध बरेवाईट अनुभव यांमुळे व्यक्तिमत्त्वात प्रगल्भता व समज आली होती. त्यांच्या घरातील आधुनिक पद्धतीने सजवलेल्या बैठकीच्या प्रशस्त खोलीत दामोदर गणेश पाध्ये, दाजीसाहेब तुळजापूरकर, अच्युतराव कोल्हटकर, रावसाहेब मोरमकर, मामा वरेरकर, यशवंतराव टिपणीस इत्यादी मान्यवर विद्वान मंडळी जमत असत. दिवाळीच्या किंवा उन्हाळ्याच्या सुट्टीच्या दरम्यान नागपूरहून कवी ना. के. बेहरे हे मालतीबाईकडे राहायला येत; त्या काळात श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांसारखे नाटककार, माधव केशव काटदरे यांच्यासारखे कवी, का. र. मित्र (मासिक 'मनोरंजन') आणि गणेश विठ्ठल कुलकर्णी ('उद्यान' मासिक) यांच्यासारखे संपादक इत्यादींची हजेरी मालतीबाईंच्या बैठकीत लागत असे. कोल्हटकर आपल्या शिष्यांना घेऊन मालतीबाईकडे जात असत. दाजीसाहेब तुळजापूरकर हे मालतीबाईकडील या विद्वानांच्या बैठकीला 'मादाम द स्ताअलचे सालन' असे संबोधत असत (माडखोलकर १९६६ : ३१३-१५).

मुंबईला राहणाऱ्या मालतीबाई पटवर्धनांप्रमाणेच बडोद्याच्या काशीताई हेर्लेकर यांच्या घरी देखील वाङ्मयप्रेमींची बैठक जमत असे. बडोद्यातील रावपुऱ्यात देवांच्या चाळीत त्या राहात. बडोदा संस्थानच्या शिक्षणखात्यात शिक्षकीपेशात असणाऱ्या काशीताई स्वतः लेखिका व कवयित्री होत्या. सामाजिकदृष्ट्या त्या आधुनिक विचारांच्या होत्या. केशवसुत, चंद्रशेखर, धनुर्धारी, दत्त हे कवी त्यांचे स्नेही होते (ह. वि. मोटे (संपा.) १९७२ : ३५०). काशीताईंची वाङ्मयाची अभिरुची त्यांच्या घरात दुसऱ्या पिढीतही संक्रमित झाली. काशीताईंची मुलगी शांताबाई हेर्लेकर हिला महाविद्यालयीन वयात असल्यापासून वाङ्मयाची गोडी लागली होती. "कु. शान्ताबाई ही बुद्धिमती, रसिक, संगीताची भोक्ती, अभिरुची असलेली, सुधारणावादी व वाक्चतुर अशी होती. तिच्याकडे तिचे अनेक पुरुष मित्र येत असत. त्यांत श्री. रा. शिंदे, कशाळकर, रा.वि. मराठे,

माधवराव (पटवर्धन) वगैरे येत असत. त्यांना ती 'दरबार' असे म्हणे. सर्व मंडळी जमली म्हणजे तिथे 'धार्मिक विषयां'वर, 'आत्मोन्नती'वर किंवा 'प्रेमाने मोक्ष साधण्या'वर चर्चा होत असे." (शं. के. कानेटकर १९६५ : १६). शांताबाईंच्या याच दरबारात माधव जूलियन आणि वि. द. घाटे यांची १९१०-११च्या सुमारास पहिली वाङ्मयीन ओळख झाली. घाटे आणि जूलियन तेव्हा शांताबाईंसोबतच महाविद्यालयीन शिक्षण घेत होते. शांताबाईंच्या घरी दर शनिवारी तरुण पिढीतील हे वाङ्मयप्रेमी जमत आणि कवितावाचन, वाङ्मयीन चर्चा करत. घाट्यांनी 'शांताबाईंच्या दरबारा'तल्या या शनिवारच्या बैठकांच्या आठवणी पुढील शब्दांत सांगितल्या आहेत –

"शांताबाईंच्या दरबारात माधवराव असत. रघुनाथराव खरे येत. भडोचहून रामभाऊ आले असले तर ते येत. शंकर खराटे टंगळमंगळ करत हजेरी देई. क्वचित् एखाददुसरी शांताबाईंची आणि लक्ष्मीबाईंची मैत्रीणहि असे. त्या दरबाराचें वातावरण प्रसन्न आणि सोज्ज्वळ होतें.

"आम्ही तशीं शाळेंत आणि कॉलेजांत शिकणारीं मुलेंच होतों. परंतु आमच्या भाषणांत आणि संभाषणांत थिल्लरपणा नसे, लघळपणा नसे. भलतेसलते विचार मनांत येत नसत. आम्ही अद्भुतरम्य अशा इंग्रजी वाङ्मयावर पोसले जात होतों. मैत्री आम्हांला एक पवित्र वस्तु वाटायची. स्त्रीच्या मैत्रीला तर आम्ही वेगळीच किंमत देत होतों. आमच्या मैत्रिणींना आम्ही एका उच्च आसनावर बसविलें होतें आणि किंचित् दूर ठेवलें होतें." (वि. द. घाटे १९९८ : १३६-३७). शांताबाई हेर्लेकरांच्या दरबारातील लक्ष्मीबाई ही शांताबाईंची जीवलग मैत्रिण. वि. द. घाट्यांनी लक्ष्मीबाईला केशवसुतांच्या कवितेची माहिती दिली आणि त्याबदल्यात तिने घाट्यांना 'गोल्डन ट्रेझरी' या इंग्रजी कवितासंग्रहाची ओळख करून दिली. माधव पटवर्धन यांना जूलियन हे नाव याच दरबारात शांताबाईंकडूनच मिळाले होते.

काशीबाई व शांताबाई हेर्लेकर, मालतीबाई पटवर्धन या पांढरपेशा समाजातील आधुनिक विचाराच्या स्त्रिया होत्या. त्यांचे विचार उदारमतवादी होते आणि त्यांनी जगण्यासाठी निवडलेला मार्ग रूढिभंजक होता. या कारणामुळे या स्त्रिया सर्वसामान्य समाजाच्या मुख्य प्रवाहापासून काहीशा दुरावलेल्या होत्या. पण तरीही त्यांच्या भोवती सुरक्षित व प्रतिष्ठित जीवनाचे कवच होते. त्या समाजाच्या मुख्य प्रवाहापासून पूर्णपणे बाजूला फेकल्या गेल्या नव्हत्या. त्यात काशीबाई हेर्लेकर या बडोदा संस्थानात शिक्षणखात्यात नोकरीला, तर मालतीबाई पटवर्धन मुंबईला आरोग्य खात्यातील सेविका. या नोकऱ्यांमुळे दोघींनाही सामाजिक जीवन जगता येत होते. पण अशा प्रतिष्ठित सामाजिक जीवनापासून वंचित वर्गातली एखादी स्त्री देखील वाङ्मयीन चर्चा-वर्तुळात मध्यवर्ती स्थान प्राप्त करून घेते, तेव्हा ते एक अपवादात्मक उदाहरण ठरते. हिराबाई

पेडणेकरांच्या घरचे चर्चा-मंडळ हे असे उदाहरण होते.

सामाजिकदृष्ट्या परिघावरील व उपेक्षित जीवन जगणाऱ्या या लेखिकेचे नाटककार गोविंद बल्लाळ देवल यांच्याशी भाची किंवा पुतणी असे नाते होते. हिराबाईंना गायनकलेत गती होती. नायकिणीचे घराणे आणि पेशा गाण्या-बजावण्याचा; त्यामुळे त्यांचे जीवन मुळात सामाजिकदृष्ट्या प्रतिष्ठेचे नव्हते. परंतु नाटक-साहित्यामध्ये त्यांना रुची होती; त्या काळातील संगीत रंगभूमीवरील नट नानासाहेब जोगळेकर यांच्याशी हिराबाईंचे प्रेमसंबंध १९०१च्या सुमारास जुळले आणि त्या निमित्ताने त्यांचा नाटकातील, साहित्यातील अनेक मंडळींशी संबंध आला. नानासाहेब जोगळेकरांच्या अकाली निधनानंतर काही काळ हिराबाईंची श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांशी जवळीक निर्माण झाली होती. कोल्हटकरांशिवाय कथा-कादंबरीकार वि. सी. गुर्जर, राम गणेश गडकरी, न. चिं. केळकर, चिं. वि. वैद्य, बालकवी ठोमरे, रेंदाळकर असे त्या काळातील प्रतिष्ठित लेखक-कवी नियमितपणे हिराबाईंच्या मुंबईच्या गिरगावातल्या 'दरबारा'त हजेरी लावत. तिथे वाङ्मयीन व रंगभूमीविषयक चर्चा चालत. हिराबाईंचा संतसाहित्याचाही चांगला अभ्यास होता. हिराबाईंकडे जमणारी लेखकमंडळी त्यांना कौतुकाने 'जॉर्ज सँड' असे संबोधत (माडखोलकर १९६६ : ३३२). जॉर्ज सँड (१८०४-१८७६) ही एकोणिसाव्या शतकातील वादग्रस्त बंडखोर फ्रेंच कादंबरीकार. इंग्रजी साहित्याचा प्रभाव या काळातल्या कवीलेखकांवर कसा पडत होता, हे अशा उदाहरणांवरून दिसून येते.

हिराबाई गायिका तर होत्याच, पण त्या नाटककार, कवयित्री आणि संगीतकार देखील होत्या. परशुरामबुवा बर्वे आणि भास्करबुवा बखले यांच्याकडे त्या गाणे शिकल्या होत्या (उपरोक्त : परिशिष्ट, पृ. ४-५). त्यांची 'जयद्रथविडंबन' (१९०४) आणि 'दामिनी' (१९१२) ही दोन नाटके प्रसिद्ध झाली होती. त्या मराठीतील पहिल्या स्त्री-नाटककार ठरतात. हिराबाईंनी स्वतःच्या नाटकांसोबतच श्री. कृ. कोल्हटकरांच्या नाटकांतील पदांनाही चाली लावल्या होत्या. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी हिराबाईंच्या 'जयद्रथविडंबन' या नाटकावरून बाईंच्या वाङ्मयीन गुणांविषयी पुढील उद्गार काढले आहेत : "नुसत्या चाली देणाऱ्या इतर नायकिणींसारखी ही केवळ एक अक्षरशत्रु संगीतज्ञ स्त्री नसून, स्वतः नवीन चाली बांधणारी आणि सुश्लिष्ट पद्यरचना करणारी निर्माणक्षम बुद्धीची कल्पक व्यासंगी स्त्री आहे, अशी जाणीव बाईंनी वयाच्या अठराव्या वर्षी लिहिलेल्या आपल्या या नाटकाने करून दिली." (उपरोक्त: ३२८-२९).

मालतीबाई पटवर्धन, काशीताई हेर्लेकर किंवा हिराबाई पेडणेकर या स्त्रियांच्या भोवती प्रतिष्ठित वाङ्मयसेवकांची तयार झालेली मांदियाळी पाहून आज आश्चर्य वाटू शकते. तत्कालीन समाजात आपल्या 'स्वतंत्र' विचाराने जगण्याचे धाडस दाखवणाऱ्या स्त्रिया अपवादात्मकच होत्या. स्त्रियांच्या बाबतीत समाज अधिकच स्थितिशील होता. हरि

नारायण आपट्यांच्या कादंबऱ्या वाचून स्त्रियांच्या परवशतेची, पारतंत्र्याची चर्चा मध्यमवर्गीय शिक्षित वाचकाच्या विश्वात सुरू झालेली असली, तरी या चर्चेचा परिणाम होऊन स्त्रियांकडे पाहण्याची समाजाची दृष्टी लगेचच बदलली, असे होणे शक्य नव्हते. काही मूठभर नवशिक्षित तरुणांना मात्र स्त्रीला समानतेच्या नात्याने वागवण्याची निकड भासू लागली होती. रानड्यांच्या उदारमतवादी सामाजिक चळवळी अनेक वर्षे चालवून जो परिणाम साधला नसता, तो हरिभाऊंच्या पाचसहा सामाजिक कादंबऱ्यांनी साधला गेला, असे निरीक्षण त्या काळातील जाणत्या लोकांनी मांडले आहे. आपले घर, कुटुंब आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यांच्या पलीकडे जाऊन, बाहेरच्या जगात पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण घेणारी, लिहिणारी-वाचणारी, वाङ्मयीन कल्पनांसोबतच सामाजिक-राजकीय विचार, मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान याविषयी स्वतंत्र बुद्धीने मतप्रतिपादन करणारी, सार्वजनिक ठिकाणी जाहीरपणे वादसंवाद साधणारी – अशा आधुनिक स्त्रीच्या रूपाचे स्वप्न हा नवशिक्षित, नवविचाराने प्रभावित झालेला समाजातला लहानसा वर्ग पाहात होता. वर उल्लेख केलेली लेखक-कवी मंडळी याच वर्गाचे प्रतिनिधित्व करत होती. त्यांनी ज्या स्वतंत्र प्रज्ञेच्या स्त्रीचे स्वप्न पाहिले होते, ते त्यांना मालतीबाई पटवर्धन, शांताबाई हेर्लेकर, हिराबाई पेडणेकर यांच्या रूपाने पूर्ण होताना दिसले. प्राप्त परिस्थितीमुळे, जाणीवपूर्वक स्वीकारलेल्या वैचारिक भूमिकेमुळे या स्त्रिया प्रस्थापित समाजव्यवस्थेपासून तुटलेपणाचे आयुष्य जगत होत्या; पण त्याच वेळी त्यांना स्वतःच्या वाङ्मयीन, कलात्मक प्रेरणा जोपासण्याची आवश्यक असा अवकाश नव्या वाङ्मयीन वातावरणात उपलब्ध झाला होता. त्यांना स्वतंत्र वैचारिक भूमिका आणि आधुनिक जीवनदृष्टी होती. आणि त्यांच्या या स्वतंत्र जीवनाकडे आकृष्ट झालेल्या समविचारी पुरुष लेखकांचा सहवास त्यांना मिळत होता. शांताबाई हेर्लेकरांच्या घरी जमणारे वि. द. घाटे, माधव पटवर्धन हे तरुण कवी स्त्री-पुरुषांमधील 'प्लेटॉनिक मैत्री'चा अनुभव घेताना दिसतात; मालतीबाई पटवर्धन, काशीबाई हेर्लेकर, हिराबाई पेडणेकर या स्त्रियांसोबत त्यांच्या घरी एकत्र जमून पुरुष लेखक वाङ्मयीन चर्चा करतात; रविकिरण मंडळातील कवी स्त्री-पुरुष एकत्र फिरायला अथवा सहलीला जातात; वाङ्मयीन संस्कृतीतील हे वर्तन एकप्रकारे स्थितिशील समाजाच्या प्रस्थापित नीतिकल्पनांविरुद्ध माफकपणे केलेल्या विद्रोहाचे प्रतीक होते.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी, सामाजिकदृष्ट्या स्त्री-पुरुष समतेच्या या विचाराला मराठी वाङ्मयीन संस्कृतीत रोमँटिसिझमची जोड मिळाली. इंग्रजी आणि फ्रेंच कवितेतून रोमँटिसिझमचा संस्कार मराठी वाङ्मयीन संस्कृतीत झिरपला. ज्ञानाच्या क्षेत्रातील बुद्धिवाद आणि जीवनव्यवहारातील सामाजिक व्यवस्थेच्या-नीतिमत्तेच्या प्रस्थापित चाकोऱ्या या दोहोंविरुद्ध युरोपीय साहित्यातील रोमँटिसिझमने बंड पुकारले होते. कवीच्या

अनिर्बंध स्वातंत्र्याचा पुरस्कार रोमँटिसिझमने केला. रोमँटिसिझमच्या प्रभावातून मराठीतही कवी-लेखकांमध्ये काही प्रमाणात कलंदरपणा, मनस्वीपणा निर्माण झालेला दिसून येतो. बालकवी, राम गणेश गडकरी यांचे जीवन ही त्याची अशा प्रवृत्तीची ठळक उदाहरणे. आत्माराम रावजी आणि कुसुमावती देशपांडे या कवींनी सामाजिक नीतिनियमांची पर्वा न करता केलेला प्रेमविवाह; माधव जूलियन, बालकवी, राम गणेश गडकरी यांच्या प्रेमाच्या सांगितल्या जाणाऱ्या कथा, हा याच स्वातंत्र्यवादी प्रेरणांचा आविष्कार होता.

एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रीय समाजात स्वातंत्र्य हे मूल्य सामाजिक व राजकीयदृष्ट्या परिचित झाले होते. जीवनाच्या सामाजिक व राजकीय अंगातील विषमतेची जाणीव स्वातंत्र्याच्या आलेल्या भानामुळे झाली. या मूल्याचा विसाव्या शतकाच्या प्रारंभी मध्यमवर्गीय मराठी समाजात संकोच झाला. तो वाङ्मयीन संस्कृतीत प्रेमभावनेचा आविष्कार आणि स्त्री-पुरुषांचे मुक्त साहचर्य या रूपांत दिसून आला. त्यांच्यासमोरचे आदर्श अर्थातच पाश्चात्य नीतिकल्पना, वाङ्मयीन संस्कृती यांचे होते.

अठराव्या-एकोणिसाव्या शतकात फ्रान्समधील उदारमतवादी उच्चवर्गीय समाजात शिक्षित सुसंस्कृत तरुणींच्या घरी अनौपचारिक चर्चामंडळे भरत. या मंडळांना 'सलोन' (salon) असे संबोधले जाई. या सलोनमध्ये राजकीय क्रांती, व्यक्तिस्वातंत्र्य, वाङ्मय-कलेच्या प्रांतातील नवनवे आविष्कार यांवर चर्चा चालत असे. फ्रान्समधील हे सलोन्स आधुनिकतेच्या उदयानंतर निर्माण झालेल्या नवजीवनाचा एक भाग होता. महाराष्ट्रात एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी काही वाङ्मयप्रेमी आणि मोकळ्या विचारांच्या स्त्रियांच्या घरी चालणाऱ्या 'वैचारिक बैठकीं'मध्ये सहभागी होणाऱ्या स्त्री-पुरुषांसमोर फ्रान्समधील या सलोन्सचे आदर्श होते असे दिसते. म्हणूनच दाजीसाहेब तुळजापूरकर मालतीबाई पटवर्धनांच्या घरी जमणाऱ्या बैठकींना 'मादाम द स्ताअलचे सालन' असे म्हणतात. ही मादाम द स्ताअल म्हणजेच युरोपीय रोमँटिसिझमचा आविष्कार कादंबऱ्यांतून करणारी जर्मेन द स्ताएल ही फ्रेंच लेखिका. तिची आई सुझान नेकर ही वैचारिक चर्चांचे एक मंडळ, 'सलोन' चालवत असे. जर्मेन द स्ताएलने विवाहानंतर स्वतःचे 'सलोन' सुरू केले. समता, स्वातंत्र्य ही आधुनिक मूल्ये ती मानत असे आणि क्रांतिकारी राजकीय विचारांचा पुरस्कार करत असे.

हिराबाई पेडणेकर यांच्या घरी जमणारी गडकरी, रेंदाळकर वगैरे मंडळी हिराबाईंना 'कौतुकाने' ज्या लेखिकेची उपमा देत, ती फ्रेंच लेखिका जॉर्ज सँड (१८०४-१८७६) मुक्त बंडखोर विचारांसाठी प्रसिद्ध होती. तिचे अनेक कलावंतांशी रोमँटिक संबंध होते. मालतीबाई आणि हिराबाई या स्त्रिया जर्मेन द स्ताएल किंवा जॉर्ज सँड यांच्याइतक्या बंडखोर नक्कीच नव्हत्या. परंतु मालतीबाई, हिराबाई यांच्याभोवतीचे मराठी लेखक-कवी

या स्त्रियांमध्ये कोणाची प्रतिमा आणि कोणती मूल्ये शोधत होते हे त्यांनी या स्त्रियांना दिलेल्या उपमांवरून दिसून येते. एकीकडे पारंपरिक नीतिनियमांनी बद्ध असे जगणे या पुरुष लेखकांना काचत असताना, समाजबंधनांपासून काही प्रमाणात 'मुक्त स्त्रिया' मालतीबाई, शांताबाई, हिराबाई यांच्या रूपात त्यांना दिसत होत्या; तेव्हा त्यांच्यात ते पाश्चात्य साहित्याच्या, संस्कृतीच्या आस्वादातून परिचित झालेले आणि आदर्शभूत ठरलेले स्त्री-पुरुष समतेचे, मुक्त साहचर्याचे आदर्श शोधत होते.

पण या लेखक-कवींच्या अशा स्वातंत्र्यवादी, समतावादी जीवनदृष्टीला तत्कालीन भारतीय समाजस्थितीने घातलेल्या मर्यादा उल्लंघता आल्या नाहीत, हेही सत्य आहे. या प्रत्येक लेखक-कवीला स्वतःचा कौटुंबिक संसार असे, आणि त्या संसारात पारंपरिक रीतीने लग्न करून घरात आणलेली एक पत्नी असे. ही बहुदा वयाने त्यांच्यापेक्षा अतिशय लहान आणि म्हणून हे लेखक तरुणपणी समतेच्या विचाराने, स्त्री-पुरुष मैत्रीच्या आदर्श मधुर स्वरूपाने भारावलेले असत, तेव्हा तिची समज मात्र अतिशय कमी असे. घरातील ज्येष्ठांनी परस्पर ठरवून लावून दिलेल्या या विवाहात पत्नी ही बहुदा अशिक्षित किंवा अल्पशिक्षित असे. स्त्री-पुरुष समानतेची जी मूल्ये या तरुण लेखक-कवींनी शिरोधार्य मानलेली असत, ती अनुसरण्याची संधी त्यांना मिळालेली नसे. या काळातील बरेच कवी-लेखक आपल्या लग्नाच्या पत्नीमध्ये असलेला शिक्षणाचा, सुसंस्कृततेचा, वाङ्मयाभिरुचीचा अभाव बोचत असल्याने दुःखी असत. अशा लेखकांना विद्वान, कलासक्त स्त्रियांचा सहवास मिळणे घराबाहेरच्या या स्त्रियांभोवती निर्माण झालेल्या चर्चा-मंडळांमुळे शक्य झाले.

जिथे मुक्तपणे वाङ्मयीन चर्चा चालतात असे लेखकांचे अड्डे आणि त्यातील काही अड्ड्यांवर निरनिराळ्या वयाच्या स्त्री-पुरुष लेखकांचा सहभाग हे या काळातील मराठी वाङ्मयीन संस्कृतीचे वैशिष्ट्य होते. मराठी वाङ्मयीन संस्कृतीची पायाभरणी होत असतानाच्या काळातल्या या उपक्रमांद्वारे लेखकाचे व त्याच्या प्रज्ञेचे स्वातंत्र्य, त्याच्या जीवनाच्या अंतःप्रेरणांना मुक्तपणे वाव देणारी मूल्यदृष्टी, स्त्रियांच्या संदर्भातील समतावादी व स्वातंत्र्यवादी मूल्ये इत्यादी कल्पना रुजल्या व पुढील काळात मराठी साहित्यात व एकंदर वाङ्मय संस्कृतीत बहरल्या.

## लेखक-कवींच्या गुरुशिष्य परंपरा

मराठी वाङ्मयीन संस्कृतीच्या जडणघडणीत लेखकांच्या गटांचा मोठा वाटा होता हे वरील विवेचनावरून दिसून येते. असे गट नंतरच्याही पिढ्यांमध्ये तयार होत गेले. अशा गटांमध्येच पुढील काळात वाङ्मयीन चळवळींचा जन्म झाला. त्याचा प्रारंभ विसाव्या शतकाच्या आरंभापासून झालेला दिसतो.

या काळातील वाङ्मयीन संस्कृतीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या वाङ्मयीन

गटांमध्ये निर्माण झालेल्या गुरुशिष्य परंपरा. वरील उदाहरणांमध्ये गोविंदराव कानिटकर, वा. ब. पटवर्धन, राम गणेश गडकरी इत्यादी लेखक त्या त्या गटाच्या केंद्रस्थानी होते. त्या त्या गटातील लेखक-कवींना वाचन-लेखनासाठी या केंद्रस्थानी असलेल्या लेखकांचे मार्गदर्शन मिळत होते. या अर्थाने हे लेखक गटातील तरुणांच्या गुरूस्थानीच होते. पण याच्या व्यतिरिक्त जाहीरपणे गुरूशिष्य परंपरा स्वीकारलेले लेखक-कवी या कालखंडात दिसतात. लेखकांची वडीलधारी पिढी आणि नवी पिढी यांच्यातले संबंध हे बऱ्याचदा दुराव्याचे असतात. परंतु या कालखंडात मात्र दोन पिढ्यांमधल्या लेखकांमध्ये गुरूशिष्य संबंध जडलेले दिसतात. आदर आणि जिव्हाळा हे या नात्याचे आधारस्तंभ होते. लेखकाच्या आधीच्या पिढीकडून नव्या पिढीवर वाङ्मयीन संस्कार या मार्गानेदेखील झाले.

केशवसुत संप्रदाय आणि कोल्हटकरांचा शिष्यसंप्रदाय हे विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या दोन-तीन दशकांतील या गुरूशिष्य परंपरेचे उदाहरण म्हणून दाखवता येतील. केशवसुतांचे निधन १९०५मध्ये झाले. पण त्यांच्या हयातीत त्यांच्या कविता संग्रहरूपाने प्रसिद्ध झालेल्या नव्हत्या. मृत्यूनंतर बारा वर्षांनी त्यांच्या कवितांचा संग्रह सर्वप्रथम प्रसिद्ध झाला. कृष्णाजी केशव दामले या नावाने कविता १८८८पासून प्रसिद्ध होत होत्या. पण 'केशवसुत' या कवीनामासह प्रसिद्ध झालेली त्यांची पहिली कविता म्हणजे, 'प्रणयकथन'. ती 'काव्यरत्नावली'च्या ऑगस्ट १८९८च्या अंकात प्रकाशित झाली. 'मासिक मनोरंजना'ने फेब्रुवारी १९००च्या अंकात छापलेल्या 'सतारीचे बोल' या गाजलेल्या कवितेखाली सर्वप्रथम 'केशवसुत' हे कवीनाम छापले (वाबगावकर १९७२ : ६९-७०). पण १८९८मध्ये मोती बुलासा यांनी 'मराठी भाषेची सद्यःस्थिती' या शीर्षकाने लिहिलेल्या, आणि 'सुविचारसमागम' या मासिकात क्रमशः प्रसिद्ध झालेल्या, मराठी वाङ्मयाच्या आढावावजा इतिहासात केशवसुतांचा उल्लेख नाही. महादेव गोविंद रानडे यांनी १८९८मध्ये लिहिलेल्या मराठी वाङ्मयाच्या अभिवृद्धीविषयीच्या निबंधात केशवसुतांचा उल्लेख जाता जाता केला आहे. त्यांच्या मते दामले (केशवसुत), मोगरे, लोंढे, नित्सुरे, लेंभे, भंडारे या तरुण कवींमध्ये कवित्वशक्ती दिसत असली तरी त्यांच्यापैकी एकानेही अद्यापपर्यंत थोर कविता लिहिलेली नाही (Ranade 1992 : 25). याचा अर्थ १८९८पर्यंत केशवसुतांची कविता वाचकांना फारशी परिचित नसावी असे दिसते. त्यानंतर मात्र केशवसुतांचे कवी म्हणून मोठेपण मराठी वाचकांच्या ध्यानात येऊ लागले असावे. तरीही केशवसुतांची कविता पुस्तकरूपाने सर्वप्रथम प्रसिद्ध होण्यास १९१७ साल उजाडावे लागले. या आवृत्तीची घोषणा हरि नारायण आपटे यांनी १९१३ साली 'करमणुकी'तून केली होती. या घोषणेत त्यांनी केशवसुतांचा 'कविश्रेष्ठ' म्हणून गौरव केला होता. पण त्याआधीच नियतकालिकांमधून प्रसिद्ध झालेल्या केशवसुतांच्या कवितांची पारायणे करणारा एक वाचकवर्ग मराठीत तयार झाला होता. शंकर काशिनाथ

गर्गे (दिवाकर) यांच्या रोजनिशीत २४ डिसेंबर १९१२ची नोंद केशवसुतांविषयीची आहे : "सकाळी नवाच्या सुमारास रा. बापूसाहेब टिपणीस (कवी 'भालचंद्र') यांजकडे गेलो. तेथे बालकवी ठोमरे भेटले. तिघेही केशवसुतभक्त! तेव्हा आनंदाला काय कमी? रा. ठोमरे यांनी केशवसुतांची 'वातचक्र' वगैरे पाचसहा काव्ये म्हणून दाखविली." (सरोजिनी वैद्य (संपा.) १९९६ : ३६४). केशवसुतांची कविता पुस्तकरूपाने उपलब्ध नसतानाही असे 'केशवसुतभक्त' त्या काळी अनेक तयार झाले होते.

वि. स. खांडेकर १९१४मध्ये महाविद्यालयीन शिक्षणासाठी पुण्यात आल्यानंतर राम गणेश गडकऱ्यांच्या संपर्कात आले. गडकरी तेव्हा मराठीतील प्रथितयश नाटककार होते. खांडेकर म्हणतात, "त्या वेळी केशवसुतांची कविता प्रसिद्ध झाली नव्हती. पण मला त्यांच्या बऱ्याचशा कविता गडकऱ्यांच्या घरी वाचायला मिळाल्या. निरनिराळ्या मासिकांतून त्यांनी त्या एका वहीत उतरून काढल्या होत्या." (खांडेकर १९८१ : १४१). ही आंधळी भक्ती नव्हती. डोळसपणे केशवसुतांच्या काव्यातील नावीन्य ओळखून त्या कवितेला नव्या पिढीने दिलेला तो प्रतिसाद होता. केशवसुतांच्या निधनानंतर नावारूपाला आलेल्या कवींपैकी बालकवी, राम गणेश गडकरी, काशिनाथ हरी मोडक (माधवानुज), एकनाथ पांडुरंग रेंदाळकर, विनायक हे कवी स्वतःला केशवसुतांचे अनुयायी म्हणवून घेत. मराठी कवितेच्या इतिहासात या कवींना 'केशवसुत संप्रदायाचे कवी' म्हणून ओळखले जाते.

वरील कवींपैकी दोन-तीन कवींशी केशवसुतांचा प्रत्यक्ष संपर्क कमीअधिक काळासाठी आला होता. काशिनाथ हरी मोडक (१८७२-१९१६) उर्फ माधवानुज हे १८८७ साली पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी असताना केशवसुतही पुण्यात होते. त्या काळात कवितेवरील प्रेमाच्या समान धाग्यामुळे हे दोघे कवी जवळ आले असावेत, असा तर्क माधवानुजांच्या भावाने मांडला आहे. तर माधवानुजांच्या कवितांना आधुनिक कवितेचे वळण केशवसुतांनी मुंबई मुक्कामी लावले, असे नरहर शंकर रहाळकर यांनी म्हटले आहे. अमेरिकन कवी इमर्सन याची आवड हा दोघांमधलाही समान धागा होता (पंडित १९७८ : ४२). १८९७ ते १९०४ या दरम्यान केशवसुतांचे वास्तव्य खानदेशातील भडगाव आणि फैजपूर या गावी होते. या काळात त्यांच्या संपर्कात विनायक जनार्दन करंदीकर (कवी विनायक) आणि नरहर शंकर रहाळकर हे कवी आले. विनायकांच्या कविता केशवसुतांच्या बरोबरीनेच 'मनोरंजन' व 'करमणूक' या नियतकालिकांत प्रसिद्ध होत. विनायक हे केशवसुतांना समकालीन होते. खानदेशात राहाताना केशवसुत व विनायक परस्परांना अनेकदा भेटत. विनायकांच्या बऱ्याच कवितांवर केशवसुतांचा प्रभाव आहे हे भ. श्री. पंडित यांनी दाखवून दिले आहे (पंडित १९७८ : ५०-५१). नारायण शंकर रहाळकर यांचे आजोळ भडगाव होते. केशवसुतांची व

त्यांची भेट भडगावास झाली. केशवसुतांचा प्रभाव आपल्यावर कसा पडला ते रहाळकरांनी पुढील शब्दांत सांगितले आहे :

"केशवसुतांच्या सहवासाने प्रस्तुत लेखकाची दृष्टी बदलली. त्याला कवितेचे निराळेच स्वरूप दिसू लागले. त्याची आकुंचित दृष्टी विस्तृत झाली, व कवितावाचनांत त्याला अननुभूत असा निराळाच विलक्षण आनंद वाटू लागला. केशवसुतांचा शिष्य बनून तो त्यांच्या भजनी लागला. आपल्या गोड, रसाळ व उद्दीपक वाणीने केशवसुत त्याला उत्तेजन देत. त्यांची टीकाही नेहमी पोषक, उत्तेजक आणि दिव्य दृष्टी देणारी असे. साधारण मनुष्याच्या ठायी कवित्वाचा थोडासा अंकुर दिसल्यास तो विकास पावेल अशीच ते योजना करीत." (पंडित १९७८ : ५१).

केशवसुत आपल्या संपर्कात आलेल्या होतकरू कवींना उत्तेजन देत, त्यांच्या कवितेची परखड चिकित्सा करून त्यांना कवितेच्या मार्गावर योग्य मार्गदर्शन करत. केशवसुतांच्या निधनानंतर त्यांची कविता नंतरच्या पिढ्यांतील वाचकांना, कवींना प्रेरणादायी ठरली; आणि हळूहळू मराठीतील युगप्रवर्तक कविता म्हणून या कवितेला स्थान मिळाले. केशवसुतांनंतर आलेल्या राम गणेश गडकरी (गोविंदाग्रज), त्र्यंबक बापूजी ठोमरे (बालकवी) या कवींनी केशवसुतांचे स्वयंघोषित शिष्यत्व मोठ्या अभिमानाने मिरवले.

या कवींच्या गुरुवरील निष्ठेचे आणखी एक प्रमाण म्हणजे त्यांनी केशवसुतांवर लिहिलेल्या कविता. केशवसुत हयात असतानाच एप्रिल १९०५मध्ये माधवानुजांनी त्यांच्यावर एक कविता लिहायला घेतली होती. तिच्या पाचसहा आर्या लिहून झाल्या असताना, ७ नोव्हेंबर १९०५ रोजी केशवसुतांचे निधन झाले; आणि माधवानुजांना 'काळें क्रूर तुला तों नेलें केशवसुतां सख्या! हरुनी / हळहळतें मन्मानस काळाचें अधम कृत्य हें स्मरुनी' अशा दोन दुःखपूर्ण ओळी लिहून ही कविता पूर्ण करावी लागली (पंडित १९७८ : ४३). केशवसुतांच्या निधनाची बातमी समजल्यानंतर कवी वा. वा. गद्रे यांनी लिहिलेली 'परलोकवासी कवी 'केशवसुत'प्रीत्यर्थ' ही कविता मासिक मनोरंजनात जानेवारी १९०६मध्ये प्रसिद्ध झाली. राम गणेश गडकरी यांचे केशवसुतांवरील प्रेम प्रसिद्धच आहे. त्यांनी आपल्या समविचारी सहकाऱ्यांसह स्थापन केलेल्या काव्यमंडळाला केशवसुतांच्या कवितेवरून'तुतारीमंडळ' असे नाव दिले. आणि या मंडळाच्या पहिल्याच बैठकीत गडकऱ्यांनी केशवसुतांवरील कविता सादर केली (वैद्य (संपा.) १९९६ : ४०४). शंकर काशिनाथ गर्गे (दिवाकर) यांनी लिहिलेला 'हे कोण दोघे?' हा ललित लेख ('रत्नाकर', जानेवारी १९२७) केशवसुतांवर आहे. एका गूढ आणि उदास रात्री गर्ग्यांना केशवसुत आणि विल्यम वर्ड्स्वर्थ हे दोघे समानधर्मा कवी परस्परांना एक-दुसऱ्याच्या आवडलेल्या कवितेच्या ओळी ऐकवताना दिसतात, अशी कल्पना या लेखात केली आहे. केशवसुतांची

कविता गऱ्यांच्या आणि त्यांच्या पिढीतील इतर कवी-लेखकांच्या जाणिवेत किती खोलवर संस्कारित झाली होती याचे दर्शन या लेखावरून होते. केशवसुतांच्या कवितेने पुढील पिढीतील कवींची कविता घडवली. रोमँटिक कवितेचा प्रवाह केशवसुतांनी मराठीत एकहाती आणला. त्यांच्या कविता संख्येने कमी असल्या, तरी त्या कवितांमध्ये, पुढील काळातील मराठी कवितेत ज्या विविध वृत्ती-प्रवृत्तीच्या रोमँटिक कविता लिहिल्या गेल्या त्या सर्व वृत्ती-प्रवृत्ती एकवटलेल्या दिसतात. गोविंदाग्रजांच्या कवितेतली समर्पणाची प्रेमभावना, बालकवींच्या कवितेतील उदासिनता, तांब्यांच्या व बोरकरांच्या कवितेतील सौंदर्यपूजकता या सर्व प्रवृत्ती बीजरूपाने केशवसुतांच्या कवितेत आढळतात. म्हणून केशवसुत या कवींचे पूर्वसुरी व प्रेरणास्थान ठरतात. या पूर्वसुरीशी नंतरच्या पिढीतील कवींनी मानलेले नाते गुरूशिष्याचे होते.

कवितेच्या क्षेत्रात जे कार्य केशवसुतांनी केले, ते समीक्षा नाटक आणि कथात्म साहित्याच्या क्षेत्रात श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी केले. श्रीपाद कृष्णांचे समीक्षालेखन १८९२पासून प्रसिद्ध होऊ लागले. नाटककार म्हणून कोल्हटकरांचा उदय 'वीरतनय' नाटकाद्वारे १८९८मध्ये झाला. मराठी साहित्यात मैलाचा दगड ठरलेले त्यांचे विनोदी लेखन ('सुदाम्याचे पोहे') १९१०पासून प्रसिद्ध होऊ लागले. नाटककार व समीक्षक म्हणून श्रीपाद कृष्णांच्या नावाला विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकापासून अधिमान्यता मिळू लागली. दुसऱ्या-तिसऱ्या दशकात त्यांना वाङ्मयक्षेत्रातील अनेक मानसन्मान मिळाले. श्रीपाद कृष्णांचे वैशिष्ट्य हे की ते आपल्या नंतरच्या पिढ्यांतील नव्या लेखकांचे साहित्य स्वतः वाचत, त्याची चिकित्सा करत, आणि त्याला प्रोत्साहनही देत. कोल्हटकरांच्या नाटकांचा प्रभाव तर पुढील नाटककारांवर पडलाच; पण त्याचबरोबर ग. त्र्यं. माडखोलकर, वि. स. खांडेकर यांच्यासारख्या कादंबरीकारांनाही कोल्हटकरांपासून प्रेरणा मिळाल्या. हिराबाई पेडणेकर, बि. सी. गुर्जर, राम गणेश गडकरी, वि. स. खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर असा कोल्हटकरांचा एक मोठा शिष्यसंप्रदाय मराठीत पुढील दोनतीन दशकांत तयार झाला. हे गुरूशिष्य संबंध कसे होते ते काही चरित्रात्मक तपशिलांवरून पाहू.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांशी गडकऱ्यांची पहिली भेट १९०७मध्ये 'मतिविकार' नाटकाच्या प्रयोगावेळी बार्शी मुक्कामी झाली (बाळिंबे १९८७ : २३७). त्यापूर्वीपासूनच गडकऱ्यांसमोर नाटककार म्हणून कोल्हटकर आदर्श होते. कोल्हटकरांच्या पहिल्या चार नाटकांतील वेचे निवडून, त्याला विवेचनाची जोड देऊन 'सुंदर उतारे' हे पुस्तक गडकऱ्यांनी तयार केले होते. कोल्हटकरांची सर्व नाटके गडकऱ्यांना पाठ होती. "काही कारणानं कोल्हटकरांची सारी प्रकाशित पुस्तकं एकदम अदृश्य झाली, तर आपण आपल्या स्मरणशक्तीनं ती जशीच्या तशी पुन्हा उतरून काढू आणि जिवंत ठेवू," असं

गडकरी नेहमी म्हणत (वि. स. खांडेकर १९८१ : १२९). गडकऱ्यांनी आपले नाटकही कोल्हटकरांना अर्पण केले होते.

ग. त्र्यं. माडखोलकर आणि कोल्हटकर यांची पहिली भेट १९२०मध्ये झाली. त्यापूर्वी १९१९मध्ये माडखोलकरांचा 'नवयुग'मध्ये प्रकाशित झालेला 'केशवसुतांचा संप्रदाय' हा लेख कोल्हटकरांच्या पसंतीस उतरला होता. आणि या तरुण लेखकांना भेटण्याची इच्छा कोल्हटकरांच्या मनात निर्माण झाली होती. त्यानंतर १९२०च्या मे महिन्यात कोल्हटकर मुंबईला 'विविधज्ञानविस्तारा'चे संपादक रावसाहेब मोरसकरांकडे आलेले असताना त्यांनी स्वतःहून माडखोलकरांना भेटण्यासाठी बोलावून घेतले. त्यानंतर आपल्या आठवड्याभराच्या मुंबईतील मुक्कामात कोल्हटकरांनी माडखोलकरांना स्वतःसोबत ठेवले व त्यांच्यासोबत मनसोक्त चर्चा केली. २० जून १९२०रोजी माडखोलकरांसारख्या नवख्या लेखकाला लिहिलेल्या पत्रात कोल्हटकर म्हणतात, "आपली बुद्धिमत्ता विशेष असल्याबद्दल आपल्या एक दोन लेखांवरून माझा ग्रह झाला होता; व त्यामुळें आपणांस भेटण्याची उत्कंठाहि मला साहजिकच वाटत होती...मी या खेपेस मुंबईस येण्यास निघालों, तेव्हां आपणांस भेटण्याचा संकल्प केला होता. तो संकल्प तडीस गेला, याबद्दल मला अत्यंत समाधान वाटलें." (माडखोलकर १९४५:१३४). पुढे कोल्हटकर माडखोलकरांना लेखनाविषयी वेळोवेळी सल्ला देत राहिले.

वि. स. खांडेकरांशी कोल्हटकरांचा परिचय देखील खांडेकरांचे लेखन वाचूनच झाला. 'नवयुग' मासिकाने जानेवारी १९२०मध्ये गडकरी-स्मृती अंक प्रकाशित केला. या अंकातील वि. स. खांडेकरांचा गडकऱ्यांवरील लेख वाचून कोल्हटकरांनी खांडेकरांना प्रशंसापत्र पाठवले. खांडेकर त्यावेळी कोकणातील शिरोडा येथे शिक्षक म्हणून रुजू झाले होते. येथून पुढे या दोघांमधील पत्रव्यवहार सुरू झाला व गुरुशिष्य नाते जोडले गेले (जयवंत दळवी १९८५ : १०). माडखोलकरांप्रमाणेच खांडेकरांशीही स्नेहबंध जोडण्यास कोल्हटकर उत्सुक होते असे दिसते. खांडेकरांना लिहिलेल्या १८ नोव्हेंबर १९२०च्या पत्रात ते म्हणतात, "आपल्या पत्रात आपण मजविषयी जो सद्भाव प्रकट केला आहे, तो पाहून प्रेमासाठी हपापलेल्या माझ्या अंतःकरणास अत्यंत समाधान वाटले. आपला परिचय दिवसेंदिवस वृद्धिंगत होत जावा, अशी इच्छा आहे." (खांडेकर १९८१ : ३१५). माडखोलकर आणि खांडेकर या दोघांनाही लेखनाला सुरुवात करण्याच्याही आधीपासून कोल्हटकरांसारख्या प्रसिद्ध नाटककाराविषयी आदर आणि आकर्षण होते. माडखोलकर म्हणतात, "मी कोल्हटकरांचं साहित्य वाचलं होतं. आणि 'नवयुग'चा लेखक म्हणून साहित्यक्षेत्रात पदार्पण केल्यापासून...(त्यांचं) व्यक्तिमत्त्व मला खूपच आकर्षक वाटलं." (दळवी १९८५ : ५३). वि. स. खांडेकर लिहितात,"वयाच्या सातव्या-आठव्या वर्षापासून कोल्हटकरांच्या शब्दचमत्कृतीचं, अर्थ-चमत्कृतीचं, विनोदाचं मला खूपच आकर्षण

वाटलं. आणि तसंच लिहावं, असं वाटू लागलं."याचा अर्थ या नव्या लेखकांसमोर कोल्हटकर एक महत्त्वाचा आदर्श होते. परंतु त्याच बरोबर खुद्द कोल्हटकरांना देखील या नव्या अपरिचित लेखकांशी संवाद व्हावा, त्यांच्याशी स्नेह जुळावा अशी आस लागली होती. लेखकांच्या दोन पिढ्या परस्परांशी संवाद साधण्यास उत्सुक असल्याचे अनोखे दृश्य या काळातील मराठी साहित्यात दिसते.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी नव्या लेखकांना अनेक प्रकारे मार्गदर्शन केले. या लेखकांची लेखकीय ताकद कोणत्या साहित्यप्रकारात दिसते हेही त्यांनी नेमकेपणाने लक्षात आणून दिले. उदाहरणार्थ, माडखोलकरांना त्यांनी कवितेऐवजी विवेचनपर गद्यावर लक्ष केंद्रित करायला सांगितले (माडखोलकर १९४५ : १८८); तर खांडेकरांना त्यांनी विनोदी लेखन, कविता सोडून कथा-कादंबरीच्या लेखनावर लक्ष केंद्रित करायला सांगितले (दळवी १९८५ : १०). लक्ष्मीबाई टिळक यांनी 'स्मृतिचित्रे' लिहावीत यासाठी श्रीपाद कृष्णांनी आग्रह धरला आणि त्यांना वेळोवेळी उत्तेजनही दिले (भवानीशंकर पंडित १९७५ : १६४-६५).

कोल्हटकरांनी नव्या पिढीतील एखाद्या लेखकाला शिष्य मानले की त्याच्या लेखनाविषयी ते विलक्षण आत्मीयता दाखवत. त्याच्या लेखनातील बारीकसारीक तपशील, त्रुटी, वैशिष्ट्ये याविषयी पत्राद्वारे आणि प्रत्यक्ष भेटीत ते सातत्याने चर्चा करत. वि. स. खांडेकर सांगतात, "पत्रद्वारे विद्यापीठाच्या परीक्षांचा अभ्यासक्रम शिकविण्याची पद्धत पाश्चात्य देशांत रूढ आहे. त्याच पद्धतीनं लिहावं कसं, अमुक गोष्ट कटाक्षाने का टाळावी, स्वतःचं टीकाकार स्वतःच कसं व्हावं, हे मला ते शिकवू लागले." (खांडेकर १९८१ : ३१६). खांडेकरांशी परिचय झाला तेव्हा कोल्हटकर वयाच्या पन्नाशीत होते. खांडेकरांनी उमेदवारीच्या काळात 'नवयुग' मासिकात विनोदी लेखन केले. मराठीत विनोदी लेखनाची परंपरा श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या 'सुदाम्याचे पोहे' या लेखमालेपासून सुरू झाली होती. त्यामुळे खांडेकरांच्या विनोदी लेखनावर अधिकारवाणीने बोलण्याचा कोल्हटकरांना हक्क होता; त्यात त्यांनी खांडेकरांचे गुरूपद स्वीकारलेले होते. खांडेकरांच्या या विनोदी लेखनावरची प्रतिक्रिया व्यक्त करताना कोल्हटकर पत्रात लिहितात,"आपले विनोदी लेख मी वाचले आहेत...त्या लेखांत शाब्दिक कोट्या फार असून त्यांची भाषा गुंतागुंतीची असावी, असे मला आठवते. हे दोष आपण यापुढे जरूर टाळावेत. विनोद उत्पन्न होण्याकरिता भाषा अत्यंत सुलभ असावी लागते व शाब्दिक कोटी फारच विलक्षण नसल्यास तिजमुळे रसभंग होतो, असा माझा अनुभव आहे." (खांडेकर १९८१ : ३१५). खांडेकर नवोदित लेखक होते, काही समीक्षालेख त्यांच्या नावावर होते, त्या दरम्यान, १९१९मध्ये खांडेकरांनी एक कथा लिहिली. ही कथा १९२३मध्ये 'महाराष्ट्र-साहित्य' या मासिकात छापून आली. ही कथा वाचल्यानंतर

कोल्हटकरांनी खांडेकरांना आवर्जून पत्र लिहिले. त्यात ते म्हणतात, "आज 'महाराष्ट्र-साहित्या'चा अंक वाचावयास घेतला असता त्यात आपली गोष्ट ('घर कोणाचे?') असल्याचे दिसून आले, म्हणून ती वाचावयास लागलो व ती अत्यंत चित्तवेधक वाटल्यामुळे लवकरच वाचून संपविली. मला ती फार आवडली, हे कळविण्यास संतोष वाटतो. अव्वलपासून अखेरपर्यंत भरून राहिलेला शोकरस मधूनमधून दृग्गोचर होणाऱ्या हास्यतुषारांमुळे फारच खुलून दिसतो. मेघसमुद्रातील विजेस जलमाशाची उपमा अतिशय समर्पक वाटली. दुसऱ्याही चांगल्या उपमा व कल्पना आल्या आहेत. सरस्वती व लक्षुमबाई यांच्या आरंभीच्या संभाषणात काही शाब्दिक कोट्या आल्या आहेत, त्या नसत्या तर बरे झाले असते. सरस्वतीचा नवरा जिवंत होता की मरण पावला होता, याबद्दल वाचकाची जिज्ञासा अतृप्त राहून असमाधान उत्पन्न होतं. दोनशे रुपयांचं बिन नोंदलेलं खरेदीखत कायदेशीर कसं झालं? व ते नोंदून घेण्यापूर्वीच पंतांनी सरस्वतीला हाकून कसं दिलं? या शंका शिल्लक राहतात. ही वैगुण्यं असताही गोष्ट अत्यंत परिणामकारक झाली आहे, यात शंका नाही." (खांडेकर १९८१ : ३२०). एका नवख्या लेखकाची कथा वाचल्यानंतर स्वतःहून त्याला पत्र लिहून त्या कथेतील बलस्थाने व त्रुटी किंवा मर्यादा कळवण्याचा हा स्वभाव प्रस्थापित लेखकांमध्ये क्वचितच आढळतो. कोल्हटकरांनी असे मार्गदर्शन अनेक लेखकांना केले.आणि त्यामुळे १९१० ते १९३० या काळात त्यांच्या शिष्यांची एक मांदियाळी महाराष्ट्रात तयार झाली. श्रीपाद कृष्णांची लेखक म्हणून असलेली लोकप्रियता आणि महत्ता १९२०नंतर झपाट्याने ओसरली व लवकरच विस्मरणातही गेली. परंतु लेखकांच्या पुढील पिढ्या घडवण्याचे श्रीपाद कृष्णांचे कार्य मात्र पुढील काळातील समीक्षकांनाही जाणवलेले दिसते. भवानीशंकर पंडित म्हणतात, "सॉक्रेटिसाचा एकही ग्रंथ नाही, तरी प्लेटो, ॲरिस्टॉटल इत्यादी त्याच्या शिष्य प्रशिष्यांच्या परंपरेमुळे आजही त्याचे नाव विख्यात आहे. कोल्हटकरांचे साहित्य विस्मृत झाले, तरी त्यांच्या शिष्यपरंपरेमुळे त्यांचे नाव कायम राहील." (पंडित १९७५ : १६३).

विशेष म्हणजे ही गुरुशिष्य परंपरा कोल्हटकर-खांडेकर या दोन पिढ्यांपुरती मर्यादित राहिली नाही. खांडेकरांच्या नंतरच्या पिढीतही ही परंपरा चालू राहिली. स्वतः कोल्हटकरांनी खांडेकर, माडखोलकर या लेखकांना आशीर्वाद देऊन जसे मार्गदर्शन केले, त्यांच्या साहित्याच्या प्रसिद्धीसाठी स्वतः प्रयत्न केले, तसेच पुढील काळात बा. भ. बोरकर, कुसुमाग्रज या नव्या कवींचे कवितासंग्रह वाचकांपुढे यावेत यासाठी वि. स. खांडेकर यांनी प्रयत्न केले; पुढाकार घेतला. वि. स. खांडेकरांच्या उतारवयात तत्कालीन तरुण लेखक जयवंत दळवी यांनी खांडेकरांची मुलाखत घेतली. या मुलाखतीत खांडेकर म्हणतात, "माझे आता डोळे गेले, म्हणून. नाहीतर मी माझ्या समकालीनांचे आणि नवीनांचं साहित्य प्रसिद्ध झाल्याबरोबर झडप टाकून वाचत होतो. बोरकर, कुसुमाग्रज हे

पुढं यावेत, म्हणून मी तळमळत होतो. कुसुमाग्रजांच्या 'विशाखा'ची वही माझ्याकडे आली. ही कविता प्रकाशात यावी, म्हणून मी अधीर झालो होतो. कविता काढायला कुणी तयार नव्हता. मी कोल्हापूरच्या स्कूल अँड कॉलेज बुक स्टॉलच्या मोघ्यांना बोलावून घेतलं. आणि सांगितलं, 'हे कवितांचं पुस्तक काढा. तुम्हांला जर तोटा आला, तर तो मी भरतो.' मोघ्यांनी पुस्तक काढलं..." (दळवी १९८५ : १७). १९३३ साली बा. भ. बोरकर खांडेकरांना भेटले. बोरकर सांगतात, "मी खांडेकरांना पत्र लिहिलं. त्यांचं लोभसवाणं उत्तर आलं. त्यामुळं मोठ्या खुशीनं त्यांच्या घरी गेलो. त्यांनी विचारलं, 'इतके दिवस मला तुम्ही कसे भेटला नाही?'...खांडेकर माझ्या कविता आग्रहानं मागून घेत. 'ज्योत्स्ना'तून प्रसिद्ध करीत. माझ्या कवितांची निवड करून माझा 'जीवनसंगीत' हा दुसरा संग्रह त्यांनीच तयार केला. स्वतः प्रस्तावना लिहिली आणि भारत-गौरव ग्रंथमालेतून तो संग्रह प्रकाशित करायला लावला. माझ्या यशाचा मोठा वाटा खांडेकरांचा आहे. पुढं मी वेगवेगळ्या प्रकारच्या ग्रंथलेखनाकडे वळलो, तो खांडेकरांच्या आग्रहामुळं आणि उत्तेजनामुळं." (दळवी १९८५ : ९३).

स्वातंत्र्यपूर्व काळातील मराठी वाङ्मयीन संस्कृतीत लेखकांच्या ज्येष्ठ आणि नव्या पिढ्यांमध्ये दिसणारे हे नाते स्नेहाचे आणि आदराचे आहे. विशेषतः स्वातंत्र्योत्तर काळात साठोत्तरी चळवळीपासून नव्या पिढीतील लेखकांचे आधीच्या पिढीतील लेखकांशी जे संघर्षाचे नाते दिसते, त्याचा स्वातंत्र्यपूर्व काळातील लेखकांच्या पिढ्यांमध्ये अभाव जाणवतो. साठोत्तरी काळातील दोन पिढ्यांमधील लेखकांमधील संघर्ष हे त्यांच्या वाङ्मयीन भूमिकांमधील संघर्ष म्हणून पुढे येतात. स्वातंत्र्यपूर्व काळातही लेखकांमध्ये मतभेद होते, वाद होत होते; परंतु या वादांना 'दोन पिढ्यांमधील वाद', किंवा 'भूमिकांमधील संघर्ष' असे स्वरूप प्राप्त होत नसे. या काळातील ज्येष्ठ लेखक स्वतःहून नव्या लेखकांचे लेखन काळजीपूर्वक आणि प्रेमाने वाचत. त्यावर केवळ प्रतिक्रियाच देऊन थांबत नसत, तर त्या लेखनाची सहृदयतेने चिकित्सा करून त्यातील गुणदोषांची त्या लेखकांपाशी चर्चा करत. नव्या लेखकांना त्यांच्या लेखनाविषयी सल्ला देत; त्यांचे साहित्य प्रकाशित करण्यासाठी स्वतः पुढाकार घेऊन प्रयत्न करत.

साठोत्तरी काळातील कादंबरीकार जयवंत दळवी यांना स्वातंत्र्यपूर्व काळातील लेखकांच्या पिढ्यांमधील या नात्याचे फार आश्चर्य वाटले आहे. काहीशा कौतुकाच्या सुरात ते या नात्याविषयी म्हणतात, "जुन्या काळातल्या साहित्यिकांची मला एक गंमत वाटते. खांडेकर, माडखोलकर आणि दिघे (र.वा.) यांच्या मुलाखती घेताना माझ्या लक्षात आले, की हे तिघेही चौदा-पंधरा वर्षांची 'पोरे' असताना त्यांचा मोठ्या साहित्यिकांत सुळसुळाट होता. आणि गंमत म्हणजे मोठे साहित्यिकही या 'पोरां'च्या खांद्यावर हात ठेवून फिरत, आपल्या बैठकीत त्यांना बसवून त्यांच्याशी साहित्यचर्चा करीत! खांडेकर

गडकऱ्यांच्या संगतीत गेले (१९१४), तेव्हा ते सोळा वर्षांचे होते. १९२० साली खांडेकरांनी 'नवयुग' मासिकाच्या गडकरी स्मृतिअंकात गडकऱ्यांवर लेख लिहिला. तर श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांसारख्या ज्येष्ठांनी खांडेकरांना पत्र लिहिले, इतकेच नव्हे, तर शिष्य म्हणून पंखांखाली घेतले. माडखोलकर वीस-एकवीस वर्षांचे असताना त्यांनी 'नवयुग'च्या गडकरी अंकात लिहिलेला लेख वाचून श्रीपाद कृष्णांनी माडखोलकरांना भेटायला बोलावले. कोल्हटकरांनी माडखोलकरांच्या कविता वाचून त्यांना काव्यलेखन सोडायला लावले. पण त्याच कविता वाचून कवी माधवांची माडखोलकरांशी दोस्ती जमली. इतकेच नव्हे, तर माधवांनी माडखोलकरांवर 'कवी हृदयोद्गार यास-' ही कविता लिहिली. ('हृदयोद्गार' हे माडखोलकरांचे टोपणनाव!) आणि ती कविता 'खेळगडी'मध्ये प्रसिद्धही झाली. याच वयात दिघे यांनी केलेली एक कविता भालचंद्र (टिपणीस) घेऊन जातात आणि कवी टिळकांकडे देतात. मग रस्त्यात दिघे यांची टिळकांशी भेट होते आणि त्या कवितेबद्दल टिळक खिशात हात घालून खिशात त्यावेळी होते ते दोन रुपये काढून शिष्यांना देतात, हे ऐकून आज गंमत वाटते." (दळवी १९८५ : बारा).

अर्थात, गुरू कायम उपदेशकाच्या भूमिकेत आणि शिष्य कायम विनम्र भावात असेच या लेखकांमधील नाते होते असे म्हणता येणार नाही. उदाहरणार्थ, १९१४पासून पुढची तीन वर्षे पुण्यात राहताना खांडेकर हे गडकऱ्यांच्या अगदी निकट आले होते. या वेळी गडकरी एक प्रथितयश नाटककार होते, तर खांडेकर एक महाविद्यालयीन विद्यार्थी. परंतु गडकऱ्यांसोबत खांडेकरांचे मतभेद होत आणि ते स्पष्टपणे नोंदवण्या इतका मोकळेपणा त्या दोघांच्या नात्यात होता. अगदी श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या 'मतिविकार' या नाटकाचे अनुकरण करत गडकऱ्यांनी 'प्रेमसंन्यास' हे नाटक लिहिले आहे, असे मत खांडेकर उघडपणे गडकऱ्यांसमोर मांडू शकत होते (खांडेकर १९८१ : १२९).

१९५०पूर्वीच्या मराठी वाङ्मयीन संस्कृतीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणून या काळातील लेखकांची अनौपचारिक चर्चा-मंडळे आणि त्यांच्या गुरुशिष्य परंपरा यांकडे पाहता येते. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकापासून मराठीत वैचारिक निबंधसाहित्याहून निराळी अशी ललित साहित्याची एक नवी आणि स्वतंत्र परंपरा निर्माण होऊ लागली. कादंबरी, लघुकथा, आत्मनिष्ठ जाणिवेची रोमँटिक कविता या साहित्यप्रकारांचा आविष्कार यातून झाला. पुढे विसाव्या शतकात विनोदी गद्य, लघुनिबंध, नाट्यछटा असे आणखी काही ललित साहित्याचे नवे प्रकारही मराठीत निर्माण झाले. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपर्यंतचे मराठीतील बहुतांश लेखक हे सामाजिक अथवा राजकीय चळवळीतील अग्रणी, कार्यकर्ते होते. या काळातील प्रमुख साहित्यप्रकार वैचारिक निबंध हा होता. विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून हे चित्र बदलले. ज्यांचा सामाजिक-राजकीय चळवळींशी थेट संबंध नाही, असे लेखक लिहू लागले. यापैकी काही

लेखक प्राध्यापक, पत्रकार अशा पेशांमधील होते. तर काही पूर्णवेळ लेखन करणारेही होते. आपले वाङ्मयीन विश्व वेगळे, काहीसे स्वतंत्र आहे असे हे लेखक मानत होते. रोमॅंटिसिझमचा प्रभाव कवितेव्यतिरिक्त एकूणच वाङ्मयीन धारणांवर पडू लागला. लेखक हा स्वतंत्र असतो, त्याच्या जाणिवांना कोणतीही बंधने असू नयेत, सर्वसाधारण मनुष्याहून काहीतरी वेगळी प्रतिभाशक्ती कवीच्या अंगी असते आणि त्या प्रतिभेच्या तेजामुळे त्याचे जीवनच बदलून जाते, अशा धारणा लेखक-कवींमध्ये रुजू लागल्या. या धारणांनी नव्या वाङ्मयीन संस्कृतीला आकार दिला. यात मोठा वाटा अनौपचारिक चर्चा-मंडळे आणि गुरुशिष्य परंपरा यांचा होता, हे वर पाहिले. अनौपचारिक चर्चा-मंडळांसोबतच औपचारिकपणे वाङ्मयीन संस्था, मंडळे स्थापन करण्याचे उपक्रमही या काळात विशेषत्वाने सुरू झाले. 'महाराष्ट्राचे संस्थाकरण' किंवा 'मंडळीकरण' करण्याचे वारे एकोणिसाव्या शतकापासून वाहत होते. परंतु या संस्था किंवा मंडळी प्रामुख्याने सामाजिक सुधारणा, ज्ञानप्रबोधन, राजकीय सुधारणा या उद्देशाने स्थापन होत असत. अनुवाद व ग्रंथप्रकाशन या उद्देशांसाठी स्थापन झालेल्या डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटीसारख्या ग्रंथव्यवहाराच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या काही मोजक्या संस्था महाराष्ट्रात होत्या. परंतु या संस्थांमागे प्रेरणा सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींच्याच होत्या. परंतु निखळ वाङ्मयीन आविष्कारासाठी व्यासपीठ उपलब्ध असावे या उद्देशाने लेखक-कवींनीच स्थापन केलेल्या संस्था मात्र विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून आढळतात. सुरुवातीला या संस्थांचे स्वरूप छोटेखानी, खाजगी मंडळांचे होते. एका मर्यादित वर्तुळात ही मंडळे विविध उपक्रम राबवत. कालांतराने मोठ्या, कायमस्वरूपी संस्था स्थापन होऊ लागल्या. या संस्था निश्चित अशी घटना आणि कार्यकारी मंडळे यांनी नियत होत. त्यांचे कार्य पुढे विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातही सुरू राहिले.

### छोट्या मंडळांचे वाङ्मयीन उपक्रम

सुरुवातीला स्थापन झालेल्या छोट्या मंडळांचे स्वरूप वैविध्यपूर्ण होते. काही मंडळे अल्पजीवी होती तर काही बराच काळ टिकली. काही संस्थांचे कार्य एका मर्यादित वर्तुळापुरते कार्यक्रम, बैठका आयोजित करणे अशा प्रकारचे होते. कवी-लेखक एकत्र येऊन नियमितपणे बैठका घेत. या बैठकांमध्ये आपापले साहित्य सादर केले जाई; त्यावर चर्चा होई. काही संस्थांनी याला पुस्तकप्रकाशनाची जोड दिली. काही संस्था अगदी अल्प काळ टिकल्या; तर काही संस्था प्रदीर्घ काळपर्यंत अस्तित्वात राहिल्या. काही संस्थांनी संशोधनावर भर दिला. तर काहींनी वाङ्मयीन कार्यक्रम, साहित्यसंमेलने अशा उपक्रमांना अधिक प्राधान्य दिले. अशा संस्थांमुळे मराठी साहित्यव्यवहाराचे स्वरूप बदलून अधिक व्यापक बनले. मराठी वाङ्मयीन संस्कृतीच्या विकासाला या संस्थात्मक व्यवस्थांनी मोठा हातभार लावला. अशा काही संस्था पुढीलप्रमाणे.

## तुतारी मंडळ

महाराष्ट्र नाटक मंडळीचे प्रमुख अण्णासाहेब कारखानीस हे राम गणेश गडकरी यांचे स्नेही. कवी भालचंद्र या नावाने ओळखले जाणारे भालचंद्र नारायण टिपणीस हे त्या काळी पुण्यात न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक होते आणि महाराष्ट्र नाटक मंडळीच्याच बिऱ्हाडी राहात होते. या मंडळींनी एकत्र येऊन जानेवारी १९११ मध्ये 'तुतारी मंडळ' स्थापन केले. या मंडळाची स्थापना कशी झाली याविषयी अण्णासाहेब कारखानीस सांगतात, "...आम्ही तिघेही केशवसुतांचे चहाते होतो व त्यांचेमुळे ज्याला इंग्रजी साहित्यांत Romanticism म्हणतात तशा प्रकारच्या स्वातंत्र्याच्या कल्पनांनी आम्ही तिघेही भारले गेलेलो होतो. मनांतील स्वतंत्र व उच्च विचारांचा प्रसार करण्यासाठी एक मासिक काढण्याचें आम्ही ठरविलें. व ज्या केशवसुतांच्या 'तुतारी'मुळे आम्हांला जागृति मिळाली त्या काव्याचेंच 'तुतारी' हें नाव त्या मासिकाला देण्याचे ठरवून त्यासाठीच हें 'तुतारी मंडळ' आम्ही स्थापन केले. या मंडळाचे मुख्य कार्य म्हणजे 'तुतारी'साठी लेखनसामुग्री तयार करून ठेवणें हें होतें." (वाळिंबे १९८७ : २४७-४८).

राम गणेश गडकरी, अण्णासाहेब कारखानीस आणि भास्कर मोरेश्वर कीर्तने हे तिघे या मंडळाचे मूळ सदस्य होते. याशिवाय बालकवी, शंकर परशुराम जोशी, बाबुराव दिघे, शं. ग. गडकरी आणि र. वा. दिघे या पाचजणांनी तुतारी मंडळाचे सभासदत्व घेतले, अशी माहिती म. शं. वाबगावकरांनी दिली आहे (वाबगावकर १९७२ : १२९). तुतारी मंडळाचे मासिक तर सुरू झाले नाही. पण या मंडळाच्या बैठका १९ फेब्रवारी १९११ ते ९ एप्रिल १९११ या दरम्यान दर रविवारी एकूण आठ झाल्या. प्रत्येक बैठकीची विषयपत्रिका ठरलेली असे आणि त्यानुसार प्रत्येक कवी सादरीकरण करी. मंडळाच्या पहिल्या रविवारी गडकऱ्यांनी (गोविंदाग्रज) 'केशवसुत मेले?' ही कविता सादर केली. दुसऱ्या रविवारी कारखानीसांनी 'भूक' ही कविता सादर केली. तिसरा रविवार ५ मार्च १९११ हा भालचंद्र यांचा होता. त्यांनी 'दुःखाश्रुमार्जन' ही कविता सादर केली. तर चौथ्या रविवारी पुन्हा गोविंदाग्रजांनी 'ये ये ये कविते!' ही कविता सादर केली. या मंडळाच्या बैठकीत वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम कसे चालत याचे एक उदाहरण अण्णासाहेब कारखानिसांनी दिले आहे : "बालकवीचा 'अरुण' ऐकून अगदी निराळ्या दृष्टीने गोविंदाग्रजांनी 'अरुण (दुसरा)' ही कविता रचून मंडळात वाचली...त्यानंतर भालचंद्रांनीही आपला 'अरुण' लिहिला...त्याच क्रमाने मीही एक अरुण लिहिला..." (वाबगावकर १९७२ : १३२-३३). तुतारी मंडळाच्या कामगिरीविषयी वाबगावकर म्हणतात, "आधुनिक मराठी कवितेच्या इतिहासात रविकिरण मंडळ, गोविंदाग्रज मंडळ इत्यादि अनेक मंडळे पुढे (जवळपास गावोगाव) निघाली. त्यापैकी काहींनी आपले काव्यसंग्रह व स्वतंत्र 'काव्यचर्चा' ग्रंथही प्रसिद्ध केले. मराठी कवितेच्या मध्यवर्ती प्रवाहावर आपला काही ठसाही त्यातील काहींनी उमटविला. तुतारी

मंडळ हे अशा उपक्रमांचे अग्रगामी असे आद्य मंडळ." (उपरोक्त : १३३). तुतारी मंडळाचे ऐतिहासिक महत्त्व यावरून ध्यानात यावे.

तुकाराम चर्चा मंडळ – तुतारी मंडळ हे सर्जनशील कवींचे होते. संशोधनाच्या क्षेत्रातही अशी मंडळे निघत होती. असे एक 'तुकाराम चर्चा मंडळ' विसाव्या शतकाच्या प्रारंभी, १९०१ मध्येच पुण्यात सुरू झालेले आढळते. हे मंडळ स्थापन करण्यात वासुदेव बळवंत पटवर्धन यांचा पुढाकार होता. एकोणिसाव्या शतकात सर्वप्रथम ख्रिस्ती मिशनऱ्यांचे लक्ष वारकरी संतांच्या काव्याने वेधून घेतले. इतर संतांच्या तुलनेत तुकारामांचे काव्य त्यांना अधिक प्रिय झाले. मुद्रणतंत्राच्या आगमनानंतर हस्तलिखित परंपरेतील साहित्य मुद्रित माध्यमातून प्रकाशित होऊ लागले. वारकरी संतांसह तुकारामांचे अभंग संग्रहित होऊन लोकांसमोर येऊ लागले. दरम्यान प्रार्थना समाजानेही तुकारामाच्या अभंगांचा स्वीकार करून आपली भक्ती कल्पना मांडली. अलेक्झांडर ग्रँट या इंग्रज अधिकाऱ्याच्या पुढाकाराने सरकारी पातळीवर देखील तुकारामांची एक अद्ययावत गाथा प्रकाशित करण्याचे प्रयत्न सुरू झाले. कृष्णराव अर्जुन केळूसकर यांनी विवेकी दृष्टीने लिहिलेले तुकारामांचे चरित्र एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात प्रकाशित झाले. अशा रीतीने इंग्रज राजवटीत साहित्याची जी नवी इहवादी संस्कृती आकाराला येत होती, त्या संस्कृतीत तुकारामांच्या मध्ययुगीन कवितेला सन्मानाचे स्थान मिळाले. केवळ सांप्रदायिक नव्हे, तर आधुनिक विवेकवादी दृष्टीतून तुकारामांच्या कवितेचा अभ्यास सुरू झाला.

वा. ब. पटवर्धनांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या तुकाराम चर्चा मंडळाची स्थापना अशा अभ्यासासाठीच झाली होती. जून १९०१मध्ये पुण्यातील प्रार्थना समाजात हे मंडळ सुरू झाले. या मंडळाचे सदस्य दर शुक्रवारी जमून दीड-दोन तास तुकारामांच्या अभंगांविषयी चर्चा करत. १९१५-१६पर्यंत, म्हणजे सुमारे पंधरा वर्षे या मंडळाचे काम सुरू होते. उन्हाळ्याची सुट्टी किंवा वारंवार येणारी प्लेगची साथ यांमुळे पडणारे खंड वगळता नियमित बैठका होत (पटवर्धन, केळकर २००९ : ०६ (प्रस्तावना)). या बैठकांमध्ये कधी दोनतीन तर कधी पाचसहा अभंगांवर चर्चा होत असे. सदस्यांमध्ये रा. गो. भांडारकर, वा. ब. पटवर्धन, का. बा. मराठे, गणेश सखाराम खरे, शिवरामपंत गोखले हे सदस्य नियमित येत. तर गोविंदराव कानिटकर, चिं. गं. भानू, डॉ. सुखटणकर, केशव सदाशिव केळकर, विठ्ठल रामजी शिंदे, पां. दा. गुणे, कोटकर हे सदस्य अधूनमधून, शक्य होईल तेव्हा हजेरी लावत. या सदस्यांमध्ये प्रार्थना समाजाचीच मंडळी आधिक्याने दिसतात. कारण तुकाराम चर्चा मंडळाच्या कार्यात प्रार्थना समाजाचा सहभाग प्राधान्याने होता (वैद्य २००७ : ४५७; पटवर्धन, केळकर २००९ : उपरोक्त). तुकारामांच्या प्रत्येक अभंगाची चिकित्सा करून त्यांचे अर्थनिर्णयन करतानाच, त्या त्या अभंगाचा तुकारामांच्या

जीवनातील घटना-प्रसंगाशी, स्थितीशी काय संबंध असेल, याचा शोध घेणे, त्याद्वारे तत्कालीन सांस्कृतिक-सामाजिक पर्यावरणातील तुकारामांची जीवनदृष्टी समजावून घेणे हे या चर्चामंडळाचे उद्दिष्ट होते. तुकारामांच्या अभंगांचा अगदी पद्धतशीरपणे अभ्यास चालत असे. ही पद्धत पुढीलप्रमाणे असे :

तुकाराम चर्चा मंडळाने तुकारामांच्या गाथेचा अभ्यास करण्यासाठी सांप्रदायिकांकडून हस्तलिखितप्रती मिळवल्या. परंतु या हस्तलिखितांमध्ये बराच गोंधळ असल्याने त्यांनी त्या काळात उपलब्ध असलेल्या तुकाराम गाथेच्या विविध मुद्रित आवृत्त्या संदर्भासाठी घेतल्या. मुख्य पाठ म्हणून रामचंद्र विष्णू माडगावकर यांनी संपादित केलेली प्रत मंडळाने स्वीकारली होती. पाठभेदांची तुलना करण्यासाठी प्रमुख संदर्भ पंडित प्रतीचा घेत. त्याशिवाय तुकारामतात्या पडवळ प्रत, निर्णयसागर प्रत, इंदिरा प्रेस प्रत, गणपत कृष्णाजी प्रत इत्यादी विविध आवृत्त्या मंडळात होत्या; त्या गरज पडेल तशा संदर्भासाठी वापरल्या जात.

चर्चा झाल्यानंतर या चर्चांची टिपणे स्वतः वा. ब. पटवर्धन लिहून काढत. रा. गो. भांडारकरांना दाखवून त्यात आवश्यक त्या दुरुस्त्या, बदल केले जात. गरज पडल्यास पटवर्धन टिपणांचे पुनर्लेखनही करत. कित्येक वेळा पुढील बैठकीत आधीच्या बैठकीतील टिपणांवर पुन्हा चर्चा होई. अशी तयार झालेली टिपणे माडगावकरांकडे पाठवली जात.त्यांनी काही शंका काढल्या तर त्यांचाही विचार नंतरच्या बैठकीत होत असे (वैद्य २००७ : ४५७).

तुकाराम चर्चा मंडळात अशा रीतीने सुमारे पावणे सोळाशे अभंग वाचून झाल्यानंतर वा. ब. पटवर्धनांनी तेथील चर्चांची काही टिपणे 'सुबोधपत्रिका' आणि 'ज्ञानप्रकाश' या नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध केली. १९१५च्या सुमारास वयोमान, वार्धक्य यांमुळे भांडारकर, मराठे, खरे या मंडळींना बैठकांना उपस्थित राहणे अवघड झाले. आणि त्यामुळे मंडळाचे कामही थंडावले. तोवर मंडळात एकूण १८०० अभंगांची चर्चा झाली. या टिपणांवरून तुकारामांच्या अभंगांची नवी आवृत्ती प्रसिद्ध करण्याची वा. ब. पटवर्धनांची इच्छा होती. परंतु पटवर्धनांचे १९२१मध्ये निधन झाल्याने हे काम पूर्णत्वाला जाऊ शकले नाही. त्यानंतर गणेश हरी केळकर यांनी या टिपणांपैकी काही टिपणे १९२७मध्ये दोन खंडांमध्ये प्रसिद्ध केली (पटवर्धन, केळकर २००९ : ०६-०७ (प्रस्तावना)). साहित्य अकादेमीने हे दोन्ही खंड २००९मध्ये पुनर्मुद्रित केले आहेत. त्यामुळे एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या या मंडळाच्या कार्याचे स्वरूप आजही आपल्यासमोर उपलब्ध आहे.

महाराष्ट्र शारदा मंदिर – १९२०मध्ये चैत्र-पाडव्याच्या मुहुर्तावर पुण्यात 'महाराष्ट्र शारदा मंदिर' ही संस्था स्थापन झाली असे श. के. कानेटकर उर्फ कवी गिरीश यांनी

म्हटले आहे (शं. के. कानेटकर १९६५ : ४६). अनंततनय (दत्तात्रेय अनंत आपटे), अज्ञातवासी, गिरीश, श्री. नि. चाफेकर, अरविंद शिंदे, शामराव काळे ही मंडळी या मंडळाची सदस्य होती. सुरुवातीला कवी अज्ञातवासी यांच्या घरी या मंडळाची बैठकीची जागा होती. नंतर ही संस्था कवी यशवंत यांच्या निवासस्थानी गेली. यशवंतांनी चित्रशाळा प्रेसच्या रस्त्यावर मोठी जागा घेतली. त्या जागेत महाराष्ट्र शारदा मंदिराच्या बैठका नियमितपणे होऊ लागल्या. न. चिं. केळकर, वा. म. जोशी, वा. गो. मायदेव, आचार्य अत्रे असे लेखक-कवी या बैठकांना हजेरी लावू लागले. परगावाहून पुण्याला येणाऱ्या साहित्यिकांना महाराष्ट्र शारदा मंदिरात चर्चेसाठी निमंत्रण मिळू लागले. त्यानंतर महाराष्ट्र शारदा मंदिराची रीतसर घटना तयार करून या मंडळाला संस्थात्मक स्वरूप दिले गेले (जयवंत दळवी १९८५ : १५३).

महाराष्ट्र शारदा मंदिरात वाङ्मयावर चर्चा, व्याख्याने असे विविध प्रकारचे उपक्रम चालत. मंदिरातर्फे 'लहरी' हे हस्तलिखित मासिक काही काळ चालले. महाराष्ट्र शारदा मंदिरातील उपक्रमांमध्ये नाट्यछटाकार शंकर काशीनाथ गर्गे नियमितपणे सहभागी होत असत. त्यांच्या रोजनिशीत त्यांनी हजेरी लावलेल्या बैठकांच्या नोंदी आहेत. त्यावरून महाराष्ट्र शारदेचे काम कसे चालत असे यावर प्रकाश पडतो. उदाहरणार्थ, १७ फेब्रुवारी १९२२ रोजी प्रो. खाड्ये यांचे 'कविता आणि तिचा संसाराशी संबंध' या विषयावर व्याख्यान झाले. या व्याख्यानाला गर्गे हे कवी गिरीशांसोबत गेले होते. याच वर्षी रवींद्रनाथ टागोर पुण्यात आलेले असताना २४ सप्टेंबर रोजी महाराष्ट्र शारदा मंदिराला त्यांनी उभ्या उभ्या भेट देऊन पानसुपारी घेतली होती. या काळात गर्गे केशवसुतांचे चरित्र व त्यांच्या कविता यांविषयी संशोधन करत होते. केशवसुतांच्या मृत्यूदिनांकावरून वाद सुरू होता. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शारदा मंदिराच्या बैठकीत गर्गे यांचे 'केशवसुत यांची मृत्युतिथी' या विषयावर २३ डिसेंबर १९२२ रोजी निबंधवाचन झाले. या बैठकीला श्री. म. माटे, ओक, अनंततनय, गिरीश, माधवराव पटवर्धन, ही मंडळी उपस्थित होती (उपरोक्त : ४२४-२५).

महाराष्ट्र शारदा मंदिरात १९२३मध्ये झालेल्या अनेक उपक्रमांचीही नोंद गर्गे यांनी रोजनिशीत केलेली आहे : १४ जानेवारी रोजी अनंततनय यांच्या प्रकाशित झालेल्या एका काव्यपरीक्षणपर लेखाचे वाचन यशवंत, गिरीश, माधवराव पटवर्धन, श्री. म. माटे या श्रोत्यांच्या उपस्थितीत झाले. तर ११ फेब्रुवारी रोजी झालेल्या बैठकीत अनंततनय यांनी 'डिसेंबर १९२२तील काव्ये' या विषयावर लिहिलेले टिपण वाचले. १८ फेब्रुवारी १९२३ रोजी अनिल आणि मुकुंदराय या दोन कवींचे कवितावाचन महाराष्ट्र शारदा मंदिरात झाले. त्यानंतर ४ मार्च रोजी वा. म. जोशी यांचे 'काव्य व नाट्य (रस)' या विषयावर व्याख्यान झाले. नंतर लगेच ११ मार्चला ना. म. भिडे यांच्या निबंधाचे वाचन झाले; तर ८

एप्रिल १९२३ रोजी शरच्चंद्र रानडे यांचे 'संयोग ऱ्हस्वास गुरुत्व देतो' या विषयावर निबंधवाचन झाले (उपरोक्त: ४२८-३२).

कवितेसंबंधी विविध विषयांवरील निबंध, प्रकाशित लेख, आढावावजा टिपणे यांचे वाचन, त्यावरील चर्चा, उपस्थित कवींचे कवितावाचन, परगावरून पाहुण्या आलेल्या लेखकाचे व्याख्यान-भेट असे विविध स्वरूपाचे कार्यक्रम महाराष्ट्र शारदा मंदिरातर्फे चालत. मंदिरातर्फे केशवसुतांचा स्मृतिदिन साजरा होत असे. कवीसंमेलन, तसेच बारावे साहित्य संमेलन मंदिराने आयोजित केले होते. या उपक्रमांचा अहवाल १९२२मध्ये महाराष्ट्र शारदा मंदिरातर्फे 'काव्यचर्चा' या पुस्तकात प्रसिद्ध करण्यात आला (कानेटकर १९६५ : ४६-४७). मराठीत गाजलेल्या रविकिरण मंडळाचा उदय याच महाराष्ट्र शारदा मंदिरातून झाला.

रविकिरण मंडळ – कवी यशवंत म्हणतात, "महाराष्ट्र शारदेमध्येही जुने आणि नवे असे अहेतुक दोन गट झाले. म्हणजे हे उघड गट नव्हते. पण मी, रानडे दांपत्य (श्री. बा. आणि मनोरमा रानडे), गिरीश, माधवराव पटवर्धन, ग. त्र्यं. माडखोलकर, द. ल. गोखले आणि नाट्यछटाकार दिवाकर यांच्यात अधिक जवळीक निर्माण झाली. कारण आम्ही आधुनिकतेने भारावलेलो होतो. त्यामुळं आमचं एक वेगळंच वर्तुळ बनत होतं. आम्हीही रविवारी खाजगी रीतीनं एकत्र जमू लागलो." (जयवंत दळवी १९८५ : १५३-५४). या एकत्र जमण्यातूनच पुढे रविकिरण मंडळाची निर्मिती झाली.

यशवंतांच्या या निवेदनात त्यांच्या पिढीतील कवींच्या जीवनदृष्टीतील बंडखोर वृत्तीचा ऐतिहासिक संदर्भ आला आहे. वर आपण पाहिले की स्वातंत्र्यपूर्व काळातील लेखकांच्या पिढ्यांमध्ये संघर्षाचे नाते असण्यापेक्षा गुरुशिष्याचे नाते अधिक ठळकपणे दिसते; आधीच्या पिढीला विरोध करत, तिच्याशी संघर्ष करत आपले साहित्य आणि त्यामागील भूमिका मांडण्याची बंडखोर वृत्ती या काळात दिसत नाही. असे असले तरी याला अपवाद देखील होते. हे अपवाद कादंबरीवाङ्मयापेक्षा काव्यवाङ्मयात अधिक ठळक होते. खुद्द केशवसुतांनी आपल्या कवितेतून आपण नव्या युगाची कविता घडवत आहोत, असा आत्मविश्वास प्रकट केला आहे. पुढे रविकिरण मंडळाची काव्यविषयक भूमिका देखील त्यांच्या काळाच्या संदर्भात बंडखोरीचीच होती.

केशवसुतांपासून सुरू झालेल्या आधुनिक काव्याच्या प्रवाहाला अधिमान्यता न देणारी, जुन्या, पारंपरिक काव्यजाणिवेवर पोसली केलेली काव्याभिरुची मराठी वाङ्मयीन संस्कृतीत होती. महाराष्ट्र शारदा मंदिरात या दोन्ही काव्याभिरुचींचे कवी एकत्र आले होते. कवी अनंततनय महाराष्ट्र शारदा मंदिराच्या स्थापनेपासून या मंडळात अग्रस्थानी होते. १९२३पर्यंत ते मंडळाचे अध्यक्ष देखील होते. अनंततनय साधारणपणे जुन्या पठडीतील कवी होते. त्यांच्या कवितेत "विषय नवे पण त्यांची मांडणी जुन्या पद्धतीने

व्हायची व स्फुट कवितेला दीर्घ स्वरूप प्राप्त व्हायचे असा काहीसा प्रकार घडताना दिसतो." (जया दडकर आणि इतर २०१३ : ०४). ते नव्या (म्हणजे रोमँटिक) कवींवर टीकाही करत असत. 'काव्यचर्चा' या पुस्तकात समाविष्ट असलेल्या रेंदाळकरांवरील लेखात त्यांनी केलेली टीका अभिरुचीला सोडून आहे. त्यांनी लिहिलेल्या 'श्री शारदादूतिका' या काव्यात मेघदूताचे अनुकरण केल्याचे भासवत त्यांनी नव्या कवींची कुचेष्टा केली आहे (उपरोक्त). अशा दोन भिन्न प्रवृत्तींचे कवी एकत्र आले तरी त्यांच्या काव्यविषयक भूमिका भिन्न असल्याने ते एकाच वाटेचे सहप्रवासी म्हणून फार काळ एकत्र राहू शकले नाहीत.

रविकिरण मंडळाची कविता आजघडीला कालबाह्य वाटत असली तरी ही कविता आणि तिच्यामागे असणारी काव्यदृष्टी तसेच जीवनदृष्टी यांना त्या काळाच्या संदर्भात ऐतिहासिकदृष्ट्या मर्यादित अर्थाने का होईना, पण विद्रोहाचे मूल्य नक्कीच आहे. खरे तर रविकिरण मंडळातील कवींची कविता ही केशवसुतप्रणित रोमँटिक काव्यपरंपरेतीलच होती. केशवसुतांनी कवीच्या जाणिवांचा मुक्त आविष्कार करण्यासाठी स्वातंत्र्याची आकांक्षा पाहिली. सामाजिक-सांस्कृतिक चाकोऱ्या, मूल्यचौकटी यांना उद्ध्वस्त करत कवी आपल्या जाणिवांचा आविष्कार करतो ही रोमँटिक जाणीव केशवसुतांच्या कवितेतून सर्वप्रथम आविष्कृत झाली. रविकिरण मंडळाच्या कवींनी ही जाणीव आपल्या जीवनात प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न केला. हे कवी शहरी, मध्यमवर्गीय होते; तथाकथित उच्चवर्णीय सामाजिक स्तरातून आले होते. या कवींनी केलेले बंड त्यांच्या स्वतःच्या सामाजिक स्तरांतील प्रस्थापित सांस्कृतिक-नैतिक मूल्यांविरोधात होते. त्यामुळे त्यांचे बंड आज वरवरचे, भाबडे आणि कोते वाटते. परंतु त्या काळाच्या संदर्भात मात्र या बंडखोर जाणिवेची दखल घेणे भाग पडते. स्त्री-पुरुषांनी एकत्र निसर्गात सहलीला जाणे, निसर्गाचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन त्यावर कविता लिहिणे असे उपक्रम ही मंडळी करत. ज्या काळात "स्त्रिया नुकत्याच पायांत चपला घालूं लागल्या होत्या; क्वचितच फिरायला जात होत्या. गेल्याच तर पुरुषांबरोबर क्वचितच जात होत्या" त्या काळात "रविकिरण मंडळाच्या सर्व कार्यक्रमांत पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना स्थान असे आणि मान असे," असे या मंडळाचे सदस्य वि. द. घाटे यांनी म्हटले आहे (घाटे १९९८ : ३३५).

मंडळाचे एक सदस्य शंकर केशव कानेटकर उर्फ कवी गिरीश यांनी माधव जूलियनांच्या चरित्रात उद्धृत केल्याप्रमाणे,रविकिरण मंडळामध्ये एकत्र जमलेल्या "सर्वांचीच सामाजिक मते पुढारलेली आहेत, या जाणिवेने निकट आलेल्या या लोकांना शेवाळू लागणाऱ्या मराठी काव्याला नवे नवे पाट फोडण्याची तळमळ लागली. एकमेकांसंबंधी जिव्हाळा उत्पन्न झाला. नित्य गाठी-भेटी, काव्यचर्चा, परस्परांच्या कवितांवर सडेतोड टीका, यामुळे सर्वांची काव्यविषयक मते एका नव्या अनुरोधाने ठाम

बनत चालली..." (कानेटकर १९६५ : ४७).

रविकिरण मंडळातील कवींची कविता निसर्गात रमणारी सौंदर्यासक्त वृत्ती आणि स्त्री-पुरुषांमधील प्रेम या भावनांपुरतीच मर्यादित राहिली, असे आज म्हणता येईल. पण या दोन भावाविष्कारांचे नाते त्या काळातील सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरणाशी होते हे ध्यानात घेतले पाहिजे. त्या काळातील सुधारकांच्या परिभाषेत स्त्रीसुधारणा आणि स्त्रीस्वातंत्र्य हेच शब्द अधिक प्रस्थापित होते. प्रेमविवाह करणे, विधवेशी विवाह करणे या कृती त्या काळातील मध्यमवर्गीय समाजात बंडखोरीचा 'सर्वोच्च' आविष्कार मानल्या जात होत्या. रविकिरण मंडळाचे प्रमुख आधारस्तंभ श्री. बा. रानडे आणि मनोरमाबाई रानडे (पूर्वाश्रमीच्या द्वारकाबाई हिवरगावकर) यांचा प्रेमविवाह पुण्यात ९ जून १९१४ रोजी झाला (कानेटकर १९६५ : ५२). श्री. बा. रानडे फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत असताना झालेल्या या ब्राह्मणजातीअंतर्गत आंतर-पोटजातीय विवाहाने पुण्यात खळबळ माजवली होती. पुण्यातील पहिला प्रेमविवाह फर्ग्युसन कॉलेजमधीलच नटेश आप्पाजी द्रविड आणि मथुराबाई यांच्यात झाला होता (वि. द. घाटे १९९८ : ३४९). त्यानंतरचा दुसरा प्रेमविवाह रानडे यांचा. पुढे रविकिरण मंडळाच्या कवींनी आपला पहिला प्रातिनिधिक संग्रह ९ सप्टेंबर १९२३ ला प्रकाशित झाला, याच दिवशी पुण्यात डॉ. वासुदेव लक्ष्मण (बाबासाहेब) देशपांडे आणि शान्ताबाई काळे यांचा पुनर्विवाह होणार होता (कानेटकर १९६५ : ४८). वि. द. घाटे सांगतात की या कारणामुळेच 'किरण'च्या प्रकाशनासाठी हा दिवस मुद्दाम निवडण्यात आला होता. वासुदेव लक्ष्मण देशपांडे यांनी आपल्या कुटुंबियांच्या आणि नातेवाईकांच्या विरोधाला न जुमानता एका मुलीची आई असलेल्या विधवेशी लग्न करण्याचा निर्णय घेतल्याने संपूर्ण पुण्यात खळबळ माजली होती (घाटे १९९८: ३४४). रविकिरण मंडळाच्या बंडखोरीला मर्यादित अर्थाने का होईना परंतु असलेले हे सामाजिक अंग समजून घेतले पाहिजे.

कवितेतून प्रेमभावनांची थेट अशी धीट अभिव्यक्ती करायला सुरुवात केली, त्यासाठी नवी भाषा घडवली याचे श्रेय रविकिरण मंडळाच्या कवींना द्यायलाच हवे. या कवींच्या बैठकांमध्ये त्यांच्या कविता वाचल्या जात; त्यावर चर्चा देखील होई. पूर्वसूरींचे साहित्य फारसे आत्मीयतेने वाचले जात नसे.

रविकिरण मंडळाच्या सदस्यांचा पहिला प्रातिनिधिक कवितासंग्रह 'किरण' हा ९ सप्टेंबर १९२३ रोजी प्रसिद्ध झाला; यावरून रविकिरण मंडळाची स्थापना या दिवशी झाली असे मानले जाते. परंतु यापूर्वी सुमारे दोन वर्षे रविकिरण मंडळाचे सदस्य नियमितपणे एकत्र जमून चर्चा, काव्यवाचन करत असल्याची नोंद आहे. या कवींनी अनौपचारिकपणे स्थापन केलेल्या या मंडळाला 'सन टी क्लब' असे नाव दिले होते. नंतर कवितासंग्रहाच्या प्रकाशनावेळी मंडळाचे औपचारिकपणे नामकरण करण्याचा प्रसंग आला

तेव्हा त्याला 'सन टी क्लब' या इंग्रजी नावाचे भाषांतर करून 'रविकिरण मंडळ' हे मराठी नाव देण्यात आले (वि. द. घाटे १९९८ : ३४३-४४). ग. त्र्यं. माडखोलकर १९२१मध्ये मुंबईहून पुण्यास राहायला आले आणि याच वर्षापासून रविकिरण मंडळाच्या बैठका सुरू झाल्या अशी आठवण त्यांनी सांगितली आहे. ते म्हणतात, "जुलै महिन्यांत मी पुण्यास रहावयाला आल्यानंतर जो पहिला रविवार आला, त्या रविवारीं कै. अनंततनय हे मला महाराष्ट्र शारदामंदिरात घेऊन गेले. मंदिराची कचेरी ही त्या वेळीं सदाशिव पेठेच्या हमरस्त्यावर राममंदिराच्या माडीवरील दर्शनी दिवाणखान्यांत होती; व श्री. यशवंत हे त्या दिवाणखान्याला लागून असलेल्या छोट्या खोलींत राहून तिचें दप्तर सांभाळत असत... यशवंत, माधव जूलियन आणि गिरीश...तिघांचेंहि काव्यगायन मी त्या दिवशी प्रथमच ऐकलें; व मंदिरांत जरी पुण्यांतले बहुतेक प्रमुख तरुण कवि-लेखक त्या वेळीं जमले होते, तरी माझ्याशीं विशेष जिव्हाळ्यानें जर कोणी बोलले असतील, तर हे तीनच कवि. प्रो. श्री. बा. रानडे यांनींहि आपल्या मितभाषी स्वभावानुसार मोजकेच पण कळकळ दर्शविणारे प्रश्न विचारून माझी चौकशी केली; व आपल्या घरीं येण्याचें निमंत्रण दिलें. त्याप्रमाणें मी बहुधा दुसऱ्याच दिवशीं नारायण पेठेंतील त्यांच्या बिऱ्हाडीं गेलों. तेथें कै. सौ. मनोरमाबाईशीं माझा परिचय झाला. यशवंतराव, माधवराव आणि शंकरराव (गिरीश) हे तिघेहि पुन्हां मला तिथें भेटले. अशा रीतीनें 'रविकिरणमंडळा'ची पहिली संकल्पित बैठक त्या दिवशीं रानडे दंपत्याच्या घरीं झाली, असें म्हटल्यास चूक होणार नाहीं." (माडखोलकर १९४५ : १९२).

महाराष्ट्र शारदा मंदिरात जमणाऱ्या ज्येष्ठ मंडळींना आपल्या कविता आवडत नाहीत, याची जाणीव या तरुण कवींना झाली होती. वर माडखोलकरांनी महाराष्ट्र शारदा मंदिरातील ज्या बैठकीचा उल्लेख केला आहे, त्या बैठकीत माधवराव पटवर्धनांनी सादर केलेल्या कविता "जमलेल्या मंडळींपैकी श्री. बा. रानडे, सौ. मनोरमाबाई, ग. त्र्यं. माडखोलकर, द. ल. गोखले, गिरीश, यशवन्त, दिवाकर गर्गे यांना फार आवडल्या; पण बाकीच्या हजार लोकांची तोंडे कशी तरी झाली होती. जणू काही शेजारी एखादा प्रचंड आघात होऊन काही तरी विचित्र झाल्यासारखे त्यांना वाटले होते, असे दिसले." (कानेटकर १९६५ : ४७).

अभिरुचीतील ही दरी जाणवल्यामुळे नव्या पिढीतील हे कवी स्वतंत्रपणे जमू लागले; कवितेविषयी चर्चा करू लागले. पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजच्या मागील टेकडीवर पश्चिमेकडील बाजूला असलेली एक खडकाळ जागा या मंडळींनी भेटण्यासाठी निश्चित केली होती. या ठिकाणी ते नियमितपणे जमत. या जागेला त्यांनी 'कवि-कातळ' असे नाव दिले होते (कानेटकर १९६५ : ४८). केवळ कवि-कातळावर नव्हे, पुरंदर, माथेरान, ग्रवत, बनेश्वर अशा ठिकाणी रविकिरण मंडळाचे कवी सहलीला जात. मंडळाच्या

नियमितपणे होणाऱ्या बैठकी, त्यांतील कवितावाचन व काव्यचर्चा, आणि मंडळातर्फे प्रसिद्ध झालेले सदस्य कवींचे कवितासंग्रह अशा उपक्रमांमुळे रविकिरण मंडळाला संस्थात्मक आकार मिळाला. परंतु रविकिरण मंडळाला घटना किंवा नियमावली यांसारख्या बंधनांत अडकवलेले नव्हते. या मंडळातील कवी ज्या रोमँटिक जीवनदृष्टीचा पुरस्कार करत होते, त्या दृष्टीला अशी बंधने मानवली नसती. यासंदर्भात मंडळाच्या एक सदस्याने दिलेला अभिप्राय बोलका आहे : "आमच्या मंडळाला ध्येय किंवा घटना नाहीं याचा अर्थ असा कीं, स्वतःच्या मताप्रमाणें व अभिरुचीप्रमाणें लिहावयाला आम्ही मोकळें आहोत. निरंकुश कवींचें मंडळ घटनारहित असावें, हें किती स्वाभाविक आहे! कांहीतरी नवीन करण्याची आकांक्षा आणि परस्परांच्या गुणांविषयी योग्य आदर या दोन गोष्टींनीं आम्हांला एकत्र आणलें आहे; व एकमेकांविषयीं आदरबुद्धी जोपर्यंत कायम आहे तोपर्यंत आमच्या मंडळाला भीति नाहीं." ('ज्योत्स्ना' ऑगस्ट १९३६, पृ. ४६).

रविकिरण मंडळाने आपल्या पहिल्या 'किरण' या कवितासंग्रहातील कवितांतून थेट शब्दांत अभिव्यक्त केलेल्या प्रेमाच्या धीट भावनांमुळे तेव्हाच्या पुण्या-मुंबईच्या साहित्यविश्वात बऱ्यापैकी खळबळ माजली. 'किरण'च्या प्रती रविकिरण मंडळाने मराठीतील मान्यवर साहित्यिक, नियतकालिके तसेच संस्था यांच्यापर्यंत आवर्जून पोहोचवल्या. परंतु पारंपरिक अभिरुचीवर पोसलेल्या मराठी वाचक-समीक्षकांना ही कविता मुळीच पसंत पडली नाही. बा. अ. भिडे या आधीच्या पिढीतील नामवंत टीकाकाराने 'किरण' काव्यसंग्रहावर 'विविधज्ञानविस्तार' मासिकात टीकालेख लिहिला. त्यावरून पारंपरिक काव्याभिरुचीचे समीक्षक नव्या पिढीच्या कवितेकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहात होते, हे कळते. भिडे म्हणतात,

"ही सर्वच कवने अत्यंत मोहक उतरली आहेत. त्यांचे रचनाचातुर्य, श्रवण-माधुर्य, भावना-तरलत्व, कल्पना-कौशल्य व विकारोन्माद कोणाही तरुणाच्या अंतःकरणास भारून टाकिल्याशिवाय राहणार नाहीत. पण या शृंगारिक कवनांचे भयंकरत्व काव्यप्रतिभेच्या दीप्तीने दुणावले आहे. चावणाऱ्या विषारी दातांच्या अगर कापणाऱ्या तीव्र शस्त्राच्या सुभगाकाराचे, तेजस्वी पाण्याचे किंवा कुशाग्रतेचे कौतुक आम्ही कोणत्या तोंडाने करावे? कवंडळाची कान्ती, वेस्वेचे लावण्य, मदिरेचा सुवास, विषाचे माधुर्य, शठाचे साधुत्व, व प्रस्तुत कवनांचे प्रतिभासंपन्नत्व, ही परिणामी सारखीच घातक होणारी आहेत. एकोणिसाव्या शतकाच्या आरंभाच्या सुमारास रावबाजीच्या चैनबाजीत उद्भवलेल्या अनंतफंदी, परशराम, होनाजीबाळा, प्रभाकर, इत्यादी वागीश्वरांचे सुधारलेले अवतार विसाव्या शतकाच्या आरंभी पुन्हा होणार, अशी दुश्चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत. पुढील छकडा-लावण्याच्या उदयाचा हा अरुण-किरण आहे, असे म्हटले तरी चालेल... माधव जूलियन् हे पुण्यात पुलाजवळच्या वळणावर भेटलेल्या 'बेहेस्तातील

परी'चे लोकलाजेस्तव 'भाऊ' म्हणवितात, परंतु 'वनकिशोरी'शी गाठ पडल्याबरोबर लोकलज्जेचे भय नसल्यामुळे त्यांनी सर्व आडपडदा दूर सारून, कुंजविहाराचा आपला हक्क उघड-उघड पुढे मांडला आहे. चटोरपणात माधव जूलियन् धाडसी आहेत, हे निभ्रान्त कबूल केले पाहिजे." (कानेटकर १९६५ : ४८-४९).

रविकिरण मंडळाच्या कवींची प्रणयकविता वाचून भिड्यांनी या कवींना चक्क शृंगारिक काव्य लिहिणाऱ्या शाहिरांच्या पंगतीला बसवले आणि माधव जूलियनांना 'चटोर कवी' म्हटले. माधव जूलियनांच्या कवितेवर त्यावेळच्या वाङ्मयीन क्षेत्रातील ज्येष्ठ मंडळींचा फारच राग असल्याचे दिसते. त्यांच्या कवितेतील प्रेमभावनेची मोकळी अभिव्यक्ती त्यांना 'निर्लज्जपणाचा आविष्कार' वाटत होती. त्यावेळी रविकिरण मंडळाचे एक सदस्य ग. त्र्यं. माडखोलकर हे भारत सेवक समाजाच्या 'ज्ञानप्रकाश' या मासिकात वाङ्मयविभागाचे संपादक म्हणून नोकरीला होते. ते रविकिरण मंडळाच्या सदस्यांचे साहित्य 'ज्ञानप्रकाश'मधून प्रसिद्ध करत असत. तिथे छापून येणाऱ्या माधव जूलियनांच्या कविता 'ज्ञानप्रकाशा'च्या परंपरावादी वाचकांच्या गळी उतरणे कठीण होते. जुन्या पिढीतील समीक्षक रामचंद्र भिकाजी जोशी एकदा माडखोलकरांना म्हणाले, "अहो माडखोलकर, हा माधव जूलियन् कोण गाठलाय तुम्ही? काय चावट कविता लिहितो हा! आमचा ज्ञानप्रकाश पोरीबाळीसुद्धा वाचतात. त्यात असल्या फाजील न पांचट कविता तुम्ही कशा छापता?" (कानेटकर १९६५ : ५६).

माधव जूलियन आणि एकंदर रविकिरण मंडळ यांच्या कवितेवर अशी प्रतिकूल टीका प्रस्थापित वाङ्मयीन केंद्रांकडून झाली, तरी बा. अ. भिड्यांसारख्या तालेवार समीक्षकाने 'विविधज्ञानविस्तार'सारख्या प्रतिष्ठित-प्रस्थापित मासिकाद्वारे या कवितेची दखल घेतल्यामुळे रविकिरण मंडळाला खूप प्रसिद्धी मिळाली. १९२३मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'किरण'नंतर पुढल्याच वर्षी, १९२४मध्ये कवी वि. द. घाटे आणि माधव जूलियन या दोन कवींच्या कवितांचा एकत्रित संग्रह 'मधु-माधव' या शीर्षकाने प्रकाशित झाला. वि. द. घाटे हे रविकिरण मंडळामध्ये मागाहून प्रवेश केलेले सदस्य होते. किरण काव्यसंग्रहावर झालेल्या टीकेने अस्वस्थ होऊन शंकर काशीनाथ गर्गे यांनी रविकिरण मंडळाचे सदस्यत्व सोडले. त्यांच्या जागी वि. द. घाटे यांना प्रवेश देण्यात आला, अशी माहिती शंकर कानेटकर यांनी दिली आहे (कानेटकर १९६५ : ४९). पण मंडळातून बाहेर पडल्यावरही गर्गे रविकिरण मंडळाच्या कार्यक्रमांना अधूनमधून हजेरी लावत राहिले. १९२३ सालच्याच १४ ऑक्टोबर रोजी श्रीधर रानडे यांच्याकडे जाऊन रविकिरण मंडळाच्या सदस्यांनी फोटो काढला; त्यात गर्गे होते. त्यानंतर २८ ऑक्टोबरला येरवड्याच्या रेफर्मेटरी स्कूलमध्ये कवी यशवंतांकडे झालेल्या 'सन्-टी-क्लब'च्या बैठकीलाही गर्गे हजर होते (सरोजिनी वैद्य १९९६ : ४३८-३९). त्यानंतर चार वर्षांनी ९

सप्टेंबर १९२७ रोजी झालेल्या रविकिरण मंडळाच्या वाढदिवस समारंभालाही गर्ग्यांनी हजेरी लावली होती. या कार्यक्रमात मंडळाच्या 'प्रभा' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. या कार्यक्रमाला प्रिं. वैजनाथ राजवाडे, दत्तो वामन पोतदार ही मंडळीही हजर होती.

रविकिरण मंडळाच्या काळात रेडिओचे आगमन महाराष्ट्रात झाले. रेडिओच्या माध्यमातून ध्वनिमुद्रित झालेले गाणे ऐकण्याची संधी श्रोत्यांना मिळाली. श्री. बा. रानडे यांच्या घरी १२ डिसेंबर १९२७ रोजी जमलेल्या यशवंत, गिरीश, माधव पटवर्धन, गर्गे या सर्वांनी प्रथमच रेडिओवरील गाणे ऐकल्याची नोंद सापडते (उपरोक्त : ४६८-६९). माधव जूलियन यांचे फर्ग्युसन कॉलेजमधील तथाकथित प्रेमप्रकरण गाजल्यानंतर त्यांना फर्ग्युसन कॉलेज आणि पुणे सोडून जाण्याची शिक्षा झाली; या प्रकरणात कच खाऊन रविकिरण मंडळाने देखील माधव जूलियन यांना १९२५मध्ये मंडळाबाहेर घालवले, असे उल्लेख सापडतात (घाटे १९९८ : ३३७). परंतु गर्गे जसे मंडळातून बाहेर पडल्यावरही मंडळाच्या बैठकांमध्ये सहभागी होत तसे माधव जूलियन देखील अधूनमधून हजेरी लावत. रविकिरण मंडळाच्या सदस्यांमध्ये दुरावा निर्माण झाल्यानंतरही त्यांनी परस्परांना अंतर दिले नव्हते, असा निष्कर्ष यावरून काढता येतो.

रविकिरण मंडळाची सुमारे १३७हून अधिक पुस्तके प्रसिद्ध झाली (कानेटकर १९६५ : ४९). मंडळाचे आणखी एक योगदान म्हणजे आधुनिक मराठी कवितेत मंचीय कवितेची परंपरा मंडळाने पक्की केली. रविकिरण मंडळाच्या कवितावाचनाचे कार्यक्रम लोकप्रिय झाले. खरे तर सर्वप्रथम कविता गाऊन सादर करणारे मराठीतील कवी म्हणजे सुमंत होत. परंतु त्यांच्यानंतर महाराष्ट्रभर काव्यगायन लोकप्रिय करण्याचे कार्य आनंद टेकाडे यांनी केले. कोणत्याही सभेची सुरुवात आनंद टेकाडे यांच्या 'आनंदकंद ऐसा' या कवितेने होत असे. त्याच सुमारास वा. गो. मायदेव यांनी आधी भा. रा. तांबे यांच्या आणि नंतर स्वतःच्या कविता गाऊन सादर करण्यास सुरुवात केली (घाटे १९९८ : ३४०). रविकिरण मंडळाने काव्यगायनाची ही रीत स्वीकारली आणि महाराष्ट्रभर तिची अभिव्यक्ती केली. त्यामुळे काव्यगायनाची रीत रविकिरण मंडळाने सुरू केली असा समज पसरला. रविकिरण मंडळाचे कविता-सादरीकरण कसे चालत असे याविषयी मंडळाचे सदस्य वि. द. घाटे सांगतात, "रविकिरण मंडळ कधी कविता वाचीत असे, कधी गात असे. वाचायचें कधी आणि गायचे कधीं हें कवितेवर आणि कवीवर अवलंबून असे. माधवराव आपली व दुसऱ्यांची कविता वाचूनच दाखवायचे. कधी गात नसत. सरळ ठसकेबाजपणाने वाचीत. माधवरावांच्या कवितांना सुंदर चाली गिरीश लावीत आणि माधवरावांच्या व आपल्या कविता गाऊन दाखवीत....यशवंत कविता गात, पण सरळसरळ; आणि पुष्कळ कविता नुसत्या खड्या स्वरांत वाचून दाखवीत." (घाटे १९९८ : ३३९-४०).

विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकाच्या प्रारंभी स्थापन झालेल्या रविकिरण मंडळाचा मराठी कवितेवर प्रभाव पडला, पण तो पुढील एकदीड दशकांपुरताच. दशकभरातच रविकिरण मंडळाच्या कवितेत तोचतोपणा येऊ लागला. त्यानंतर नवकाव्याची लाट आली आणि मराठी कवितेने पुन्हा एकदा नवे वळण घेतले. रविकिरण मंडळाची कविता कालबाह्य झाली. या कवींच्या कवितांमधील कृतक् अनुभवाभिव्यक्तीची थट्टा होऊ लागली. या कवींच्या जीवनाचा, अनुभवाचा भाग नसतानाही निसर्गाचा अनुभव मुद्दामहून घेण्याचा त्यांचा अट्टहास, त्यापोटी त्यांच्या कवितेत आलेला कृत्रिमपणा यांची थट्टा सुरू झाली. आचार्य अत्र्यांचा 'झेंडूची फुले'हा कवितासंग्रह म्हणजे रविकिरण मंडळाच्या कवितेला उपसाहपूर्ण स्वरात दिलेली प्रतिक्रिया आहे. पुढे नवकाव्याच्या आगमनानंतर तर रविकिरण मंडळाची निसर्गकविता आणि प्रेमकविता अगदीच भाबडी वाटू लागली. मात्र नवकाव्याचे उद्गाते बा. सी. मर्ढेकर यांच्या 'शिशिरागम' या पहिल्या कवितासंग्रहातील कवितांवर असलेला रविकिरण मंडळाच्या कवितेच्या शब्दकळेचा प्रभाव लपून राहात नाही.

असे असले तरी मराठी रोमँटिक कवितेला काहीसे साचलेपण आले होते, अशा एका टप्प्यावर चाकोरीबाहेरच्या अनुभवांनी तिला पुन्हा संजिवनी देण्याचा प्रयत्न करण्याचे ऐतिहासिक कार्य रविकिरण मंडळाने केले हे विसरून चालणार नाही. याची जाणीव ठेवून २७ सप्टेंबर १९६५ रोजी पुणे विद्यापीठाने रविकिरण मंडळाचा सत्कार केला. विद्यापीठाने या वेळी 'रविकिरण गौरविका' हा रविकिरण मंडळाच्या कर्तृत्वाचा आढावा घेणारा छोटा गौरवग्रंथही प्रकाशित केला. तेव्हा हयात असलेले रविकिरण मंडळाचे वि. द. घाटे, गिरीश, यशवंत, ग. त्र्यं. माडखोलकर, द. ल. गोखले आणि श्री. बा. रानडे हे सदस्य उपस्थित होते. काकासाहेब गाडगीळ हे तेव्हा पुणे विद्यापीठाचे कुलगुरू होते. या कार्यक्रमाला दत्तो वामन पोतदार, शं. गो. तुळपुळे, श्री. के. क्षीरसागर, ग. दि. माडगूळकर, कुसुमाग्रज हे नवेजुने साहित्यिक उपस्थित होते (कानेटकर १९६५ : ३२७-३३०).

वि. द. घाटे यांनी पुढील शब्दांत रविकिरण मंडळाची फलश्रुती सांगितली आहे :"रविकिरण मंडळ हा एक विचार होता. जीवनाचा आणि काव्याचा; मुख्यतः आणि मूलतः जीवनाचाच आणि त्याच्या अनुषंगाने काव्याचा. ती एक प्रेरणा होती; एक प्रयोगहि होता – सामाजिक आणि सांस्कृतिक. तो विचार आज टिकला असेल तर रविकिरण मंडळसुद्धा एका अर्थाने टिकून आहे असें म्हणतां येईल. पण मला वाटतें, तो विचार आणि प्रयोग त्यानंतर जन्मास आलेल्या विचारांत आणि प्रयोगांत विलीन झाला आहे. नवविचारांना आणि प्रयोगांना प्रेरणा देण्यांत – कदाचित् जन्म देण्यांत – विंचविणीप्रमाणे मंडळ मरण पावलें आहे...अशा मरणांतच खरोखर विचार जगतात!" (घाटे १९९८ : ३३८-३९).

**साहित्य-संशोधन क्षेत्रातील 'मंडळीकरण'**

आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीतील एक महत्त्वाचा पैलू म्हणजे इंग्रज वसाहतकाळातील महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रात सुरू झालेले मंडळीकरण. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून सामाजिक व धार्मिक सुधारणांचे, शिक्षणप्रसाराचे, संशोधनवृत्तीच्या वाढीचे, ग्रंथसंस्कृतीच्या विकासाचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून संस्था स्थापन होऊ लागल्या. न्यायमूर्ती रानडे यांनी या कार्यासाठी अनेकांना प्रेरणा दिली. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात न्यायमूर्ती रानडे यांनी 'ग्रंथकारसभा' स्थापन करून मराठीतील विविध विषयांवर ग्रंथलेखन करणाऱ्या लेखकांना संघटित करून त्यांच्यात संवाद साधण्याचा प्रयत्न केला होता. विसाव्या शतकाच्या प्रथमार्धात या ग्रंथकारसभेतूनच विस्तार पावलेल्या महाराष्ट्र साहित्य परिषद या संस्थेच्या कार्याचा वटवृक्ष निर्माण झाला. या संस्थेशिवाय साहित्य-संस्कृतीचे संवर्धन, इतिहास-तत्त्वज्ञान क्षेत्रातील संशोधन ही कार्ये करण्याच्या उद्देशाने अनेक संस्था महाराष्ट्रभर स्थापन झाल्या. मराठी वाङ्मयीन संस्कृतीच्या विकासात साहित्य, नाट्य, संशोधन या क्षेत्रात कार्य करणाऱ्या या संस्थांचा वाटा मोठा आहे.

या संस्थांसाठी 'मंडळीकरण' हा शब्द वि. का. राजवाडे यांच्या लेखनीतून बाहेर पडला आहे. १९१६साली पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत व्याख्यान देताना राजवाडे यांनी, महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी सुशिक्षितांनी काय काय केले पाहिजे हे सांगताना 'मंडळीकरण' या उपक्रमाचा निर्देश केला होता (भा. वा. भट १९४६ : २०४). व्यक्तिगत पातळीवर चालणारे कार्य त्या व्यक्तीच्या लहरीवर अवलंबून असते आणि व्यक्तीसोबतच ते कार्यही थांबते. परंतु नियामक मंडळासह स्थापन केलेल्या संस्था, या तुलनेने अधिक काळपर्यंत कार्यरत राहू शकतात व समाजाच्या विकासासाठी अशा दीर्घकाळ कार्य करू शकणाऱ्या संस्थांची आवश्यकता असते, असे राजवाड्यांचे मत होते. राजवाड्यांनी स्वतः अशा संस्था स्थापन करण्यासाठी सतत प्रोत्साहन दिले. पुण्याचे 'भारत इतिहास संशोधन मंडळ' हे त्याचे उदाहरण आहे.

विचारप्रसार व प्रबोधन या हेतूने स्थापन केलेल्या संस्था एकोणिसाव्या शतकापासून महाराष्ट्रात कार्यरत होत्या. साहित्य आणि संशोधन या क्षेत्रांत कार्य करणाऱ्या अशा संस्था विसाव्या शतकाच्या प्रथमार्धात मोठ्या प्रमाणात स्थापन झाल्या. त्यांचा प्रारंभ देखील एकप्रकारे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस स्थापन झाला होता. ग्रंथकार सभा आणि ग्रंथालये यांसारख्या वाङ्मयीन संस्कृतीच्या विकासाला पूरक असणाऱ्या संस्था एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्रात स्थापन झाल्या होत्या. केवळ मराठी ग्रंथांचा संग्रह करण्याच्या उद्देशाने वि. ल. भावे आणि त्यांचे सहकारी यांनी ठाण्यामध्ये १८९३मध्ये ग्रंथसंग्रहालय स्थापन केले. तर याच उद्देशाने १८९८मध्ये मुंबई मराठी

ग्रंथसंग्रहालयाची स्थापना झाली. एकीकडे हे उपक्रम सुरू असताना, ग्रंथकार सभेसारख्या उपक्रमातून साहित्यविषयक कार्य करण्यासाठी राज्य पातळीवरची कायमस्वरूपी संस्था स्थापन करण्याच्या हालचाली विसाव्या शतकाच्या प्रारंभी सुरू झाल्या. यातून महाराष्ट्र साहित्य परिषदेची निर्मिती झाली. परिषदेचे कार्य विस्तारत असतानाच महाराष्ट्राच्या राजकीय-सामाजिक जीवनात उलथापालथी सुरू होत्या. या उलथापालथींचा एक भाग म्हणजे महाराष्ट्राच्या भौगोलिक सीमा बदलत होत्या. विदर्भ आणि मराठवाडा हे दोन प्रांत मराठी भाषक असूनही मुंबई राज्याशी जोडलेले नव्हते. ते अनुक्रमे इंग्रजांच्या मध्य प्रांत या राज्यात व निजाम राजवटीत होते. आपल्याही प्रदेशात साहित्यविषयक उपक्रम व्हावेत, एक वाङ्मयीनदृष्ट्या समृद्ध वातावरण निर्माण व्हावे असे या भागातील शिक्षित समाजाला वाटू लागले होते. नागपूर अमरावतीकडील बरेच विद्यार्थी महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी पुण्याला फर्ग्युसन कॉलेजमध्ये येत. पुण्यातल्या चारपाच वर्षांच्या रहिवासात तेथील वाङ्मयीन वातावरणाने प्रभावित होत. अशा तरुणांनी पुढाकार घेऊन आपापल्या प्रदेशांत साहित्यविषयक कार्य करणाऱ्या संस्था स्थापन करण्याचा उपक्रम केला. त्यातून विदर्भ साहित्य संघ आणि मराठवाडा साहित्य परिषद या संस्थांचा उदय झाला. साहित्यप्रेमींनी चालवलेल्या स्थानिक पातळीवरच्या छोट्या मंडळांपेक्षा या संस्थांचे स्वरूप निराळे होते. त्यांचे कार्यक्षेत्र एक विस्तारित प्रदेश एवढे होते. या संस्थांच्या उद्दिष्टे, घटना, नियामक मंडळ अशा व्यवस्थांतून संस्थांचे अस्तित्व कायमस्वरूपी झाले होते. विसाव्या शतकातल्या मराठी वाङ्मयीन संस्कृतीचा विचार करताना या संस्थांच्या कार्याची दखल घ्यावी लागते.

साहित्यविषयक संस्था व साहित्य संमेलने – विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात स्थापन झालेल्या महाराष्ट्र साहित्य परिषदेचे व अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळातर्फे भरणाऱ्या साहित्य संमेलनांचे मूळ महादेव गोविंद रानडे यांनी १८७८साली भरवलेल्या ग्रंथकार सभेमध्ये आहे. रानडे यांच्या पुढाकाराने मराठीतील विविध प्रवृत्तींच्या आणि प्रवाहातील ग्रंथकारांचे भरलेले हे पहिले संमेलन होते. त्यानंतर १८८५ आणि १९०५मध्ये अनुक्रमे पुणे आणि सातारा येथे अशी ग्रंथकार संमेलने भरली होती. ग्रंथनिर्मिती आणि ग्रंथप्रसार करण्याच्या उद्देशाने कार्य करणाऱ्या काही संस्था किंवा उपक्रम विसाव्या शतकाच्या प्रारंभी सुरू होते. डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटी एकोणिसाव्या शतकातच स्थापन झालेली होती. मुंबईला मराठी ग्रंथसंपादक मंडळी आणि मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी या संस्था होत्या. धुळ्याला सत्कार्योत्तेजक सभा ग्रंथप्रसाराचे कार्य करत होती. ठाणे ग्रंथ संग्रहालय आणि मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय या संस्था वाचनसंस्कृती रुजवण्याचे कार्य करत होत्या. वि. का. राजवाडे, पुरुषोत्तम मावजी, वासुदेवशास्त्री खरे आणि द. ब. पारसनीस यांनी ऐतिहासिक कागदांचे संग्रह प्रकाशित

करण्याचा उपक्रम सुरू ठेवला होता. पण हे सगळे उपक्रम आपापल्या मर्यादित क्षेत्रात सुरू होते. अखिल महाराष्ट्र पातळीवर ग्रंथसंस्कृती, वाचनसंस्कृती या क्षेत्रात सातत्यपूर्ण कार्य करणाऱ्या संस्थेची निकड भासू लागली होती. महाराष्ट्राबाहेर बंगाली साहित्य परिषद, काशीची नागरी प्रचारिणी सभा अशा संस्था अस्तित्वात आल्या होत्या. त्या धर्तीवर महाराष्ट्रातही साहित्यसंस्था असावी अशी चर्चा सुरू झाली होती.

महाराष्ट्र साहित्य परिषद - या पार्श्वभूमीवर मे १९०६मध्ये पुण्याला चौथे ग्रंथकार संमेलन भरले. गोविंद वासुदेव कानिटकर या संमेलनाचे अध्यक्ष होते. या संमेलनात अशा संस्थेच्या स्थापनेविषयी निर्णायक चर्चा होऊन 'महाराष्ट्र साहित्य परिषद' या संस्थेची स्थापना झाल्याची घोषणा न. चिं. केळकर यांनी केली. या संस्थेला एकंदर साठ सभासद मिळाल्याचेही केळकर यांनी सांगितले. वि. ल. भावे, कृ. प्र. खाडिलकर आणि वा. गो. आपटे या तिघांना महाराष्ट्र साहित्य परिषदेचे सचिव म्हणून नेमण्यात आले (पोतदार, नवरे १९७१ :२३१). त्यानंतर १० जुलै १९०६च्या 'केसरी'त साहित्य परिषदेच्या उद्दिष्टांविषयी माहिती देणारे पत्र भावे, खाडिलकर आणि आपटे या तिघा सचिवांच्या सह्यांनिशी प्रसिद्ध झाले. परिषदेने 'हाती घेण्यासारखी कामे' आणि 'तातडीने करायची कामे' अशी कामांची विभागणी केलेली त्यात आढळते.

त्यानंतर १९०८मध्ये पुढील ग्रंथकार संमेलन साहित्य परिषदेतर्फे भरवण्याल आले. साहित्य परिषदेला नियमांची चौकट हवी म्हणून नियमावली, घटना तयार करण्याची चर्चा या संमेलनापासून सुरू झाली. साहित्य परिषद आणि साहित्य संमेलन यांच्यातील नाते स्पष्ट होत गेले. १९०९च्या बडोदा येथे भरलेल्या साहित्य संमेलनात परिषदेचे सचिव वा. गो. आपटे म्हणाले, "साहित्य संमेलनाचे ठरलेले उद्देश व धोरण लक्षात ठेवून त्याप्रमाणे साहित्योपयोगी कामे करण्यासाठी जी कार्यकारी मंडळी नेमण्यात आली आहे, तिचे नाव साहित्य परिषद." याच संमेलनात बंगाली साहित्य परिषदेच्या नियमावलीप्रमाणे नियम तयार करण्याचा ठराव संमत करण्यात आला. त्यानंतर घटना तयार करण्याचे काम सुरू झाले. १९१२मध्ये अकोला येथे भरलेल्या साहित्य संमेलनात या घटनेला संमेलनाची मान्यता मिळाली (पोतदार, नवरे १९७१ : २३२-३३).

या काळात झालेला एक लक्षणीय बदल म्हणजे 'ग्रंथकार संमेलना'च्या नावात पालट होऊन ते 'महाराष्ट्र साहित्य संमेलन' म्हणून ओळखले जाऊ लागले. साहित्य परिषद आणि साहित्य संमेलन यांच्या कार्यक्षेत्रातील आणि अधिकारक्षेत्रातील भेदरेषा अकोला साहित्य संमेलनानंतर स्पष्ट झाल्यानंतर त्यानुसार संमेलने काहीशा अनियमितपणे का होईना, पण भरवली जाऊ लागली. महाराष्ट्राबाहेर ग्वाल्हेर, इंदोर, बडोदे, हैदराबाद अशा मराठी भाषकांची वसती असलेल्या शहरांत देखील 'महाराष्ट्र साहित्य संमेलने' यशस्वीपणे पार पडत होती. या उपक्रमांपासून प्रेरणा घेऊन जिल्हा-तालुका पातळीवर

साहित्य मंडळे स्थापन झाली.

संस्थात्मक स्वरूपाचे संघटन झाल्यानंतर साहित्य संमेलनाच्या पलीकडे जाऊन परिषदेने कार्य करावे अशी अपेक्षा वाङ्मयक्षेत्रातील जाणकारांकडून होऊ लागली आणि त्या दिशेने काही कार्य परिषदेने केले देखील. उदाहरणार्थ, मोडी लिपीच्या पुनर्स्थापनेसाठी परिषदेने प्रयत्न केले. त्यानंतर मराठी भाषकांचे एकभाषक राज्य असावे ही कल्पना प्रथम साहित्य संमेलनाच्याच मंचावर मांडली गेली. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी जाहीरपणे अशी मागणी सर्वप्रथम केली. पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या कल्पनेचा पाठपुरावा साहित्य संमेलनातून सातत्याने होत राहिला.

महाराष्ट्र साहित्य परिषदेने सुरू केलेला आणखी एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे 'ललित वाङ्मय' या विषयाला पूर्णपणे वाहिलेले 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' हे नियतकालिक परिषदेने १९१३पासून सुरू केले. हे नियतकालिक 'विविधज्ञानविस्तार' या प्रतिष्ठित मासिकाचा एक भाग म्हणून प्रसिद्ध होऊ लागले. १९१५पर्यंत 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' मासिक स्वरूपात प्रसिद्ध होत असे. १९१६पासून ते त्रैमासिक झाले. १९२५ साली पत्रिकेचे प्रकाशन बंद पडले. पुढे १९२८पासून 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' स्वतंत्रपणे प्रसिद्ध होऊ लागली. 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'चे १९१५पासूनचे स्वतंत्र अस्तित्व गृहित धरल्यास महाराष्ट्र साहित्य पत्रिका हे मराठीतील पहिले निखळ वाङ्मयीन नियतकालिक ठरते. केवळ साहित्याला वाहिलेली नियतकालिके हे वाङ्मयीन संस्कृतीचे एक महत्त्वाचे अंग असते. मराठीत असे नियतकालिक १९२०च्या दशकात सुरू झाले, ही मराठी वाङ्मयीन संस्कृतीच्या जडणघडणीच्या दृष्टीने उल्लेखनीय नोंद ठरावी.

प्रादेशिक साहित्य परिषदांची स्थापना – एकीकडे महाराष्ट्र साहित्य परिषद ही महाराष्ट्रातील साहित्यव्यवहारातील अग्रेसर संस्था म्हणून नावारूपाला येत असताना, दुसरीकडे महाराष्ट्राची भौगोलिक व्याप्ती आणि सांस्कृतिक परीघ झपाट्याने बदलत होता. साहित्याच्या वाचन-लेखनासोबतच साहित्यविषयक विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्याचा उत्साह महाराष्ट्रातील सर्वच प्रांतांतील साहित्यप्रेमी दाखवू लागले. महाराष्ट्र साहित्य परिषद आधी मुंबईत आणि १९३२पासून पुणे शहरात स्थिरावली. मुंबईतून साहित्य परिषदेचे कार्यालय गेल्यानंतर मुंबई महानगर आणि उपनगर परिसरात साहित्यविषयक चळवळीचे अस्तित्वच राहिले नाही, या भावनेतून काही उत्साही साहित्यप्रेमींनी नव्या साहित्य संस्थेच्या स्थापनेचा घाट घातला. तिकडे वऱ्हाड आणि मराठवाडा हे प्रदेश मराठी भाषक असले तरी ते अनुक्रमे मध्य प्रांत आणि निजाम राज्य यांचा भाग होते. 'पुण्या-मुंबईकडे होतात तसे साहित्यविषयक उपक्रम आपल्याही प्रांतात व्हावेत' अशी इच्छा या प्रदेशातील साहित्यप्रेमींना होऊ लागली. यातून मुंबई मराठी साहित्य संघ, विदर्भ साहित्य संघ, मराठवाडा साहित्य परिषद अशा प्रादेशिक

पातळीवरील साहित्य संस्था उदयाला आल्या. एकभाषक वाङ्मयीन संस्कृती राजकीय सीमारेषांना भेदून कशी विस्तारत जाते याचे हे उदाहरण आहे.

कालानुक्रमे मुंबई मराठी साहित्य संघ या प्रादेशिक संस्थेची स्थापना सर्वप्रथम झाली. महाराष्ट्र साहित्य परिषदेची स्थापना १९०६च्या पुण्यात भरलेल्या मराठी ग्रंथकार संमेलनात झाल्यानंतर १९१२च्या अकोला साहित्य संमेलनानंतर परिषदेचे बस्तान मुंबईला बसवण्यात आले. परंतु मुंबईत साहित्य परिषदेची क्रियाशीलता फारच मंदावत गेल्यामुळे काही कार्यकर्त्यांनी परिषदेचे कार्यालय पुण्याला हलवण्याचा प्रयत्न केला. त्यानुसार १९३२मध्ये महाराष्ट्र साहित्य परिषदेचे पुण्याला स्थलांतर झाले. त्यानंतर तीनच वर्षांनी औंधचे राजे बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी पुणे शहरात परिषदेला जागा दिली. त्यावर परिषदेची स्वतःची वास्तू उभी राहून ही संस्था कायमची पुणे निवासी झाली. इकडे मुंबईत साहित्यक्षेत्रातील चळवळ्या मंडळींना मुंबई महानगर आणि परिसरात साहित्य चळवळ चालवणाऱ्या संस्थेची उणीव भासू लागली. गो. गो. अधिकारी, र. लु. जोशी (भगूरकर), डॉ. अ. ना. भालेराव या मंडळींचा यामध्ये समावेश होता. त्यांनी २९ एप्रिल १९३४ रोजी दामोदर सावळाराम यंदे यांच्या अध्यक्षतेखाली एक सभा बोलावली. या बैठकीत मुंबई मराठी साहित्य संमेलन भरवण्याचा ठराव झाला. त्यासाठी एक कार्यकारी मंडळही नेमण्यात आले. त्यानुसार ६-७ ऑक्टोबर रोजी पहिले मुंबई मराठी साहित्य संमेलन कृष्णराव अर्जुन केळूसकर यांच्या अध्यक्षतेखाली भरले. या संमेलनात अशा तऱ्हेची साहित्य संमेलने नियमितपणे आयोजित करणे शक्य व्हावे यासाठी एक कायमस्वरूपी संस्था स्थापन करण्याचा निर्णय झाला आणि २१ जुलै १९३५ रोजी मुंबई मराठी साहित्य संघाची स्थापना झाली. अ. बा. गजेंद्रगडकर हे साहित्य संघाचे पहिले अध्यक्ष होते. डॉ. अ. ना. भालेराव यांचे साहित्य संघाशी चिटणीस म्हणून जे नाते जुळले ते पुढे त्यांच्या निधनापर्यंत (१९५५) कायम राहिले. भालेरावांनी आपल्या सहकाऱ्यांच्या सहाय्याने धडाडीने एकामागे एक उपक्रम राबवले, संघासाठी स्वतःची जागा मिळवली. नाट्य व साहित्य क्षेत्रात मुंबई मराठी साहित्य संघाने अल्पावधीत मध्यवर्ती स्थान प्राप्त केले.

मुंबई मराठी साहित्य संघातर्फे १९३७ मध्ये 'वीणा' या वाङ्मयीन मासिकाचे प्रकाशन सुरू झाले. त्याचे संपादक श्री. म. गर्दे होते. पुढे हे मासिक बंद पडल्यानंतर संघाने १९४६मध्ये वा. रा. ढवळे यांच्या संपादकत्वाखाली 'साहित्य' हे द्वैमासिक सुरू केले. ते अद्याप सुरू आहे. १९३७ सालीच साहित्य संघाने हेमंत व्याख्यानमालेला प्रारंभ केला. १९४१मध्ये नाट्यसंमेलन भरवले. त्यानंतर नाट्यशाखा स्थापन करून दर वर्षी राज्य स्तरावरील नाट्यमहोत्सव भरवले. अ. ना. भालेराव यांच्या कल्पक नेतृत्वाखाली साहित्य संघाच्या नाट्यविषयक उपक्रमांनी संपूर्ण महाराष्ट्रात नाट्यक्षेत्रात नवे मन्वंतर

घडवून आणले.

मुंबई राज्याप्रमाणे विदर्भातही साहित्य संस्था असावी या दिशेने सर्वप्रथम प्रयत्न सुरू केले ते १९२२मध्ये कवी बळवंत गणेश खापर्डे यांनी. अशा तऱ्हेच्या प्रांतिक पातळीवरच्या साहित्य संस्था असाव्यात ही कल्पना मात्र पूर्वीपासून चर्चेत होती. विदर्भ साहित्य संघ स्थापन होण्याच्या दहा वर्षे अगोदर, १९१२मध्ये अकोला येथे मराठी साहित्य संमेलन भरले होते. हे संमेलन पार पडल्यानंतर शिल्लक राहिलेली रक्कम वऱ्हाड (प्रांतिक) साहित्य परिषदेकडे देण्यात यावी असा ठराव झाला होता. ही तेव्हा अस्तित्वात नसलेली संस्था स्थापन व्हावी यासाठी विष्णू मोरेश्वर महाजनी, अ. सी. साठे, श्री. कृ. कोल्हटकर इत्यादींची एक समितीही तयार करण्यात आली होती. परंतु तेव्हा अशी संस्था काही स्थापन होऊ शकली नाही (पोतदार, नवरे १९७१ : ३४४).

त्यानंतर १९२२मध्ये कवी ब. ग. खापर्डे पुणे येथे झालेल्या दुसऱ्या महाराष्ट्र कविसंमेलनासाठी गेले. हे कविसंमेलन अनुभवून परतल्यानंतर त्यांना वाटू लागले की विदर्भातही अशा तऱ्हेची साहित्य संमेलने भरवणारी संस्था असली पाहिजे. त्यांनी विदर्भातील साहित्यिकांशी या संदर्भात पत्रव्यवहार करून १३ जानेवारी १९२३ रोजी अमरावती येथे या विषयावर चर्चा करण्यासाठी एक सभा घेतली. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी, १४ जानेवारी रोजी विदर्भ साहित्य संघ या संस्थेची स्थापना झाली.

महाराष्ट्रातील साहित्यिक घडामोडींचे केंद्र तेव्हा पुणे-मुंबई हे होते. विदर्भ हा मराठी भाषक प्रदेश मध्य प्रांतात होता. आणि या प्रांतातल्या मराठी लोकांनी साहित्य संस्था काढणे केंद्रस्थानी असलेल्या काही साहित्य-धुरिणांना रुचले नसावे. कारण विदर्भ साहित्य संघाच्या स्थापनेकडे पुण्याच्या 'केसरी'ने 'सवतासुभा' या नजरेने पाहिले. पुढे काही वर्षांनी पुण्याच्या 'रत्नाकर' मासिकाच्या एप्रिल १९२९च्या अंकात 'साहित्याच्या प्रांतात हा सवतासुभा कशाला?' अशा शीर्षकाचा लेख 'पारिजात' या टोपणनावाने प्रसिद्ध झाला. महाराष्ट्राबाहेर असलेल्या विदर्भ, मराठवाडा या प्रांतांसह संपूर्ण मराठी भाषक प्रांतांचे एकीकरण व्हावे असा विचारप्रवाह तेव्हा सुरू झाला होता. विदर्भ साहित्य संघाची स्थापना ही या एकीकरणाच्या कल्पनेला छेदणारी आहे अशी टीका या लेखात करण्यात आली होती. विदर्भ साहित्य संघाच्या प्रारंभीच्या संस्थापकांपैकी एक असलेल्या या. मा. काळे यांनी या भूमिकेला उत्तर देणारा, 'विदर्भ साहित्य संघ व त्याचे आक्षेपक' या नावाचा लेख 'रत्नाकर'च्या जून १९२९च्या अंकात लिहिला. विदर्भातील मा. ना. कागभट, बाळासाहेब ढवळे इत्यादींनीही पारिजाताच्या आक्षेपांना उत्तरे देणारे लेख विविध नियतकालिकांतून लिहिले. यानंतर 'चित्रमयजगत्'च्या सप्टेंबर व ऑक्टोबरच्या अंकांत लेख लिहून विदर्भ साहित्य संघाच्या स्थापनेमागची भूमिका विस्ताराने स्पष्ट केली. १९४६पासून विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक 'युगवाणी' सुरू झाले.

मध्य प्रांतातील वऱ्हाडात ज्याप्रमाणे विदर्भ साहित्य संघाची स्थापना झाली, तशी संस्था निजाम राज्यात राहणाऱ्या मराठी भाषकांनाही हवी होती. या उद्देशाने मराठवाडा साहित्य परिषदेची स्थापना १९३७ साली हैदराबाद येथे करण्यात आली. हैदराबादमध्ये मराठी भाषकांची संख्या भरपूर होती. १९३१ आणि १९४७ साली महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे मराठी साहित्य संमेलने अनुक्रमे श्रीधर व्यंकटेश केतकर आणि न. र. फाटक यांच्या अध्यक्षतेखाली हैदराबाद येथे भरली होती. पुढे राज्य पुनर्रचनेनंतर मराठवाड्याचा प्रदेश महाराष्ट्राला जोडला गेला आणि मराठवाडा साहित्य परिषदेचे कार्यालय हैदराबादहून औरंगाबाद येथे स्थलांतरित झाले. हैदराबाद आता आंध्र प्रदेशात गेले होते. तेथील मराठी भाषकांसाठी 'मराठी साहित्य परिषद, आंध्र प्रदेश' ही संस्था पुढे १९५८मध्ये स्थापन झाली.

संशोधनकार्य करणाऱ्या संस्था – वर म्हटल्याप्रमाणे वि. का. राजवाडे यांनी महाराष्ट्राचे मंडळीकरण होण्याची आवश्यकता ध्यानात आणून दिली होती. त्यानुसार साहित्य आणि संस्कृतीच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांची निर्मिती महाराष्ट्राच्या विविध भागांत कशी सुरू झाली हे आपण पाहिले. याला जोडून ज्ञानक्षेत्र येते. एकोणिसाव्या शतकाच्या सरत्या काळात महाराष्ट्रात इतिहास मीमांसेचे वारे वाहू लागले होते. पाश्चात्य इतिहासकारांनी लिहिलेल्या मराठ्यांच्या इतिहासाबद्दल नापसंती व्यक्त करून एतद्देशीय इतिहासकार स्वकियांचा इतिहास लिहू लागले होते. स्वतः राजवाडे, का. ना. साने यांच्या इतिहासलेखनामागे राष्ट्रवादी दृष्टिकोन होता. तर वि. रा. शिंदे, राजारामशास्त्री भागवत यांच्यासारखे लेखक वैचारिक-तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात सामाजिक-सांस्कृतिक इतिहासाचा शोध घेऊ लागले होते.

परंतु ज्ञानवंतांनी चालवलेल्या अशा व्यक्तिगत पातळीवरील प्रयत्नांच्या मर्यादा राजवाड्यांसारख्यांना जाणवू लागल्या होत्या. त्यामुळे इतिहास साहित्याचे, तत्त्वज्ञानाचे संशोधन व प्रसिद्धी यासाठी संस्थात्मक व्यवस्था उभारण्याच्या हालचाली सुरू झाल्या.

खुद्द वि. का. राजवाडे यांच्या प्रयत्नांतून पुण्यात भारत इतिहास संशोधन मंडळाची स्थापना झाली. १९१० साली स्थापन झालेली ही अशा तऱ्हेची पहिली संस्था होती. सरदार खंडेराव चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब मेहेंदळे यांनी भारत इतिहास संशोधन मंडळासाठी स्वतःच्या मालकीचा वाडा उपलब्ध करून दिला. तेच या संस्थेचे पहिले चिटणीस झाले. मेहेंदळे यांनी पहिल्या वार्षिक अहवालात भारत इतिहास संशोधन मंडळाच्या स्थापनेविषयी व उद्दिष्टांविषयी पुढील माहिती दिली आहे –

"स्वदेशाच्या व इतर देशांच्या लोकांच्या इतिहासाच्या साधनांचा अभ्यास व शोध करण्याकडे अलीकडे बऱ्याच लोकांचें लक्ष लागलेलें दिसतें. कमींत कमी सध्यां देशांत दहापंधरा शोधक यथाशक्ति काम करीत आहेत. निवळ शोधक सोडले तरी समानशील

अशा गृहस्थांची संख्या कांहीं थोडींथोडकी नाहीं. असे शोधक व समानशील गृहस्थ कोठेंतरी एकत्र जमण्याची कांहींतरी सोय असावी असें अनेकांना वाटत होतें. तो योग या मंडळाच्या द्वारा जुळून आलेला आहे...एकत्र जमण्यानें शंका, समाधान, प्रश्न, विचारपूस तेथल्या तेथें समक्ष करतां येऊन व्यक्तिमात्राच्या विस्कळित प्रयत्नांना संकलित रूप मिळतें. होतकरू शोधकांना कामाची दिशा कळते आणि अशा रीतीनें सर्वांना इष्ट जें संशोधन त्याची प्रगति होते. लेखांचा संग्रह करण्याचें, तो सुरक्षित ठेवण्याकरितां संग्रहालय उभारण्याचें, उभारलेलें संग्रहालय चालू ठेवण्याकरितां फंड जमविण्याचें, ऐतिहासिक ग्रंथसंग्रह जुळविण्याचें, संदर्भग्रंथ एकत्र आणण्याचें, ताम्रशिलादि लेखांच्या संशोधनाचें व संग्रहाचें, पुराणवस्तूंचे नकाशे काढण्याचें, मूर्तींचा एकत्र जमाव करण्याचें वगैरे अनेकविध कार्य आपल्यापुढें आहे; इतकेंच नव्हें, तर हा नानाविध उद्योग करतांना सामान्य लोकांना सहज प्रिय होतील असे इतिहासग्रंथ निर्माण करण्याकडेही आपण लक्ष पोहोंचविलें पाहिजे..." (भा. वा. भट १९४६ : २१९-२०).

हा दीर्घ उतारा इथे देण्याचा उद्देश असा की विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्राच्या ज्ञानक्षेत्रात ज्ञानाचे संवर्धन आणि निर्मिती यांविषयीचा नवा दृष्टिकोन कसा आकाराला येत होता याची कल्पना यावी. एकट्या सुट्या सुट्या व्यक्तींच्या कार्याला मर्यादा येतात हे ओळखून ज्ञानव्यवहारात संस्थात्मक व्यवस्थांची उभारणी सुरू झाली. एकोणिसाव्या शतकातल्या संस्था प्रामुख्याने प्रबोधनाच्या उद्देशाने स्थापन झाल्या होत्या, त्याहून या संस्थांचे स्वरूप वेगळे होते. साहित्य, इतिहास, तत्त्वज्ञान, सामाजिक शास्त्रे या क्षेत्रांत नवे लेखन व्हावे आणि त्याचा मराठी समाजात प्रसार व्हावा असे प्रयत्न या संस्थांनी केले.

भारत इतिहास संशोधन मंडळाच्या पाक्षिक सभा नियमितपणे भरत आणि त्यात संशोधनपर निबंध सादर होत. त्यांवर चर्चा होई. यातील मान्यताप्राप्त निबंध नंतर वार्षिक अहवाल किंवा इतिवृत्त या नावाने प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांत छापले जात. १९१० के १९१५ या पहिल्या पाच वर्षांच्या कालखंडात मंडळाच्या सभांमध्ये सादर झालेल्या निबंधांची एकूण संख्या ५५४ होती (उपरोक्त : २२१).

भारतीय प्राच्यविद्या संशोधनासाठी अखिल भारतीय पातळीवरील संशोधन संस्था म्हणून भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेची स्थापना देखील पुण्यात १९१७ मध्ये झाली. प्राच्यविद्या संशोधनात डॉ. रा. गो. भांडारकर यांनी केलेल्या कार्याची स्मृती म्हणून या संस्थेला भांडारकरांचे नाव देण्यात आले. ही आज आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन संस्था मानली जाते. संस्थेतील संशोधन आणि साहित्य प्रकाशन इंग्रजी, संस्कृत अशा भाषांमध्ये प्राधान्याने होत असले तरी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनावर या संस्थेच्या कार्याचा मोठा प्रभाव पडला आहे.

अशा तऱ्हेच्या इतर संस्था महाराष्ट्रात इतरत्रही निघाल्या. वि. का. राजवाडे यांचे १९२६मध्ये निधन झाल्यानंतर दुसऱ्याच वर्षी त्यांच्या स्मृतीनिमित्त राजवाडे संशोधन मंडळाची स्थापना धुळे येथे करण्यात आली. त्यापूर्वी धुळ्यात राहणाऱ्या राजवाड्यांच्या प्रेरणेने खानदेशातल्या अंमळनेर येथे देखील १९२३मध्ये इतिहास संशोधन मंडळाची स्थापना झाली होती. अंमळनेर येथील दानशूर धनिक श्रीमंत प्रतापशेट यांच्या आर्थिक मदतीतून हे मंडळ सुरू झाले खरे; परंतु राजवाड्यांनी मंडळात भारतीय विवाहसंस्थेविषयी सादर केलेल्या निबंधातील प्रतिपादन प्रतापशेट यांना पटले नाही. या दोघांमध्ये झालेल्या वादाचे पर्यवसान मंडळाचे कार्य थांबण्यात झाले. याच प्रतापशेट यांच्या पुढाकाराने अंमळनेरसारख्या छोट्या शहरात १९१६मध्येच 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ फिलॉसॉफी' या संस्थेची स्थापना झाली होती. ही संस्था पुढे 'प्रताप तत्त्वज्ञान मंदिर' म्हणून ओळखली जाऊ लागली. प्रामुख्याने भारतीय तत्त्वज्ञानामध्ये अधिकाधिक अध्ययन, संशोधन, तत्त्वचर्चा व्हावी आणि ते ज्ञान समाजासाठी मुद्रित स्वरूपात उपलब्ध व्हावे असा उद्देश या संस्थेच्या स्थापनेमागे होता. त्यासाठी संस्थेतर्फे 'फिलॉसॉफिकल क्वार्टर्ली' हे इंग्रजी त्रैमासिक आणि 'परामर्श' हे मराठी मासिक सुरू झाले. याशिवाय इंग्रजी, मराठी आणि हिंदी भाषांमध्ये तत्त्वज्ञानावरील ग्रंथ संस्थेने प्रसिद्ध केले. साने गुरुजी १९२३मध्ये तत्त्वज्ञान मंदिराचे फेलो झाले होते. सुलभा पाणंदीकर, ग. ना. जोशी, सुरेंद्र बारलिंगे असे तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातले अभ्यासक या संस्थेचे फेलो होते.

अंमळनेरला तत्त्वज्ञान मंदिराची स्थापना झाली त्याच वर्षी (१९१६) दक्षिण महाराष्ट्रात वाई येथे प्राज्ञ पाठशाळा ही संस्था सुरू झाली. १९२०साली या शाळेचे 'प्राज्ञ पाठशाळा मंडळ' बनले. 'भारतीय दर्शनांचे शिक्षण देणारी पाठशाळा' असे या संस्थेचे प्रारंभीचे स्वरूप असले तरी प्रबोधनवादी मूल्यांचा स्वीकार या संस्थेचे संस्थापक नारायणशास्त्री मराठे (जे पुढे 'केवलानंद सरस्वती' या नावाने ओळखले जाऊ लागले –) यांनी केला, आणि त्याच विचारांच्या पायावर त्यांचे शिष्य तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी संस्थेची पुढील वाटचाल घडवून आणली. १९३१साली प्राज्ञ पाठशाळेतर्फे 'धर्मकोश' या बहुखंडीय ग्रंथाचे प्रकाशन सुरू झाले. शिवाय भारतीय धर्मशास्त्रे व तत्त्वज्ञान याविषयीचे अनेक ग्रंथ या संस्थेतर्फे प्रसिद्ध झाले.

मुंबई राज्याबाहेरील अन्य प्रांतांतील मराठी भाषकांनाही अशा संशोधन संस्था आपापल्या परिसरात स्थापन करणे अगत्याचे वाटू लागले. जसे की, विदर्भातील प्राचीन साहित्याचे संशोधन करणारी संस्था असावी या प्रेरणेतून यवतमाळ येथे संशोधक य. खु. देशपांडे यांनी पुढाकार घेऊन 'शारदाश्रम' ही संस्था स्थापन केली. या संस्थेचे पहिले अध्यक्ष बापूजी अणे हे होते. य. खु. देशपांडे यांच्याकडे चिटणीस पदाची जबाबदारी होती. १९३२मध्ये संस्थेची नोंदणी झाली. य. खु. देशपांडे यांनी स्वतःजवळ असलेली

ऐतिहासिक कागदपत्रे संस्थेला दिली. त्या पायावर संस्थेचे कार्य सुरू झाले. एकूण ३० घराण्यांकडून जुनी कागदपत्रे जमवण्यात आली. नेरपरसोपंत येथील नारायणशास्त्री यांनी संस्थेला ३०० हस्तलिखिते दिली. पुढील चारपाच दशकांत संस्थेसाठी देशपांडे यांनी जमवलेले हस्तलिखिते, पत्रव्यवहार, नाणी इत्यादी साहित्य प्रचंड होते. सुमारे पाच हजाराहून अधिक मराठी व संस्कृत हस्तलिखिते व दोन हजारांवर ऐतिहासिक कागदपत्रे यांचा संग्रह शारदाश्रम संस्थेने केला. विद्वानांची व्याख्याने सुरू केली. संशोधनाला वाहिलेले 'शारदाश्रम' याच नावाचे वार्षिकही संस्थेने सुरू केले होते. परंतु १९३३ साली पहिला अंक काढल्यानंतर आर्थिक चणचणीमुळे पुढील अंक निघू शकले नाहीत (राजेंद्र डोळके २०२० : ६३).

साहित्याप्रमाणेच ऐतिहासिक संशोधनाला वाहिलेली संस्था आपल्या परिसरात असावी अशी विदर्भातील इतिहासप्रेमींची इच्छा होती. १९३३ साली नागपूर येथे महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे वार्षिक मराठी साहित्य संमेलन झाले. या संमेलनाच्या निमित्ताने महाराष्ट्रातून आलेल्या मंडळींना जमवून ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या पुढाकाराने एक सभा भरवण्यात आली. अध्यक्षस्थानी दत्तो वामन पोतदार होते. या सभेत ठरल्याप्रमाणे २ जानेवारी १९३४ रोजी 'वाङ्मयेतिहास संशोधन मंडळ' या संस्थेची स्थापना करण्यात आली. १९३७ साली या संस्थेचे नाव बदलून 'मध्यप्रांत संशोधन मंडळ' असे करण्यात आले. पुढे राज्य पुनर्रचनेनंतर या संस्थेचे नाव पुन्हा बदलून 'विदर्भ संशोधन मंडळ' असे करण्यात आले.

वरील प्रकारच्या संस्थांमुळे साहित्य, धर्मशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान या आधुनिक ज्ञानक्षेत्रांत नवे लेखन प्रकाशित होऊ लागले. जुने साहित्य शोधून त्याचे जतन करण्याची दृष्टी महाराष्ट्रीय समाजात काही प्रमाणात का होईना रुजली. अशा सर्व साहित्याचे प्रकाशन हे मराठी वाङ्मयीन संस्कृतीचे वैशिष्ट्य ठरले.

## नियतकालिकांचे कार्य

एकोणिसाव्या शतकातल्या बहुतांश नियतकालिकांचा प्रमुख उद्देश 'प्रबोधन करणे' हा होता हे वर सांगितलेच आहे. या नियतकालिकांमधून प्रसिद्ध होणारा मजकूर माहितीपर, उपदेशपर आणि वैचारिक स्वरूपाचा असे. धार्मिक आणि सामाजिक रीतिरिवाज, समाजाची अवनत अवस्था इत्यादींची चिकित्सा त्यात केलेली असे. कोणती नवी मूल्ये रुजवली पाहिजेत, समाजाने कोणत्या दिशेने गेले पाहिजे याविषयी या नियतकालिकांत निबंध छापले जात. त्याचबरोबर जगाचा व भारताचा भूगोल, इतिहास, स्थलवर्णने, पदार्थविज्ञान, खगोलविज्ञान यांतील अनेक सिद्धान्त, कल्पना यांचा परिचय करून देणारे साहित्य या नियतकालिकांत छापले जाई. त्यामुळे ही नियतकालिके सामाजिक-राजकीय-आर्थिक-वैज्ञानिक विचार मांडणारी प्रबोधनात्मक नियतकालिके

होती.

१८६५-७०नंतर मराठीत प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकांची संख्या वाढली. अनेक नवी मासिकपुस्तके सुरू झाली. या नव्या मासिकपुस्तकांची दोन ठळक वैशिष्ट्ये दिसतात : पहिले वैशिष्ट्य म्हणजे केवळ प्रबोधनात्मक साहित्य न छापता, त्याच्या जोडीला काव्य, क्रमशः कादंबरीची प्रकरणे, ग्रंथ परीक्षणे असा 'ललित साहित्यकेंद्री' मजकूर या मासिकांमधून प्रसिद्ध होऊ लागला. प्रबोधनाच्या उद्देशाला मनोरंजनाचीही जोड मिळाली. मराठी मासिकांच्या पहिल्या शतकाचे इतिहासकार बा. द. सातोस्कर म्हणतात की प्रारंभीच्या काळातील मासिके ध्येयवादी लोकांनी 'कर्तव्यबुद्धी'ने चालवली. वाचकांचे प्रबोधन करणे ही त्यांची मुख्य प्रेरणा होती. तर नंतरच्या काळातील मासिके 'हौशी' मंडळींनी मनोरंजन करण्याच्या उद्देशाने सुरू केली (बा. द. सातोस्कर १९८६ : ०१).

या नव्या मासिकांमध्ये विषयांच्या वैविध्याप्रमाणेच लेखकांचेही वैविध्य दिसू लागले हे त्यांचे दुसरे ठळक वैशिष्ट्य होय. 'दिग्दर्शना'पासून 'निबंधमालेपर्यंत'ची बहुतांश मराठी मासिके त्या मासिकांचे संपादक लेखनदृष्ट्या जवळजवळ एकहाती चालवत. क्वचित संपादकासह आणखी एकदोघे लेखक मिळून संपूर्ण अंकाचा मजकूर लिहून काढत. मराठी मासिकांमधील ही प्रवृत्ती विसाव्या शतकात देखील काही प्रमाणात टिकून राहिली. 'केरळकोकिळ'चा संपूर्ण अंक कृष्णाजी नारायण आठल्ये लिहून काढत, तर 'बालबोध' मासिकातील सर्व मजकूर विनायक कोंडदेव ओक यांनी लिहिलेला असे. परंतु असे काही अपवाद वगळले, तर एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपासून मराठी मासिकांच्या चालकांच्या दृष्टीत परिवर्तन झालेले दिसते. एका मासिकपुस्तकात एकाच लेखकाचे साहित्य प्रसिद्ध करण्याऐवजी वेगवेगळ्या लेखकांकडून विविध विषयांवर लेखन लिहवून घेऊन ते प्रसिद्ध केल्यास वैविध्यपूर्ण अभिरुचीच्या वाचकांच्या वाचनाची भूक शमते हे ध्यानात आले. त्या काळातील पाश्चात्य इंग्रजी मासिकांच्या अवलोकनामुळेही या गोष्टीचे भान मराठी मासिकांच्या चालकांना आले असावे. 'विविधज्ञानविस्तार'च्या प्रारंभीच्या अंकांतील बहुतांश मजकूर रा. भि. गुंजीकर यांनी लिहिलेला असे. परंतु पुढे १८७०नंतर संपादक झालेल्या पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी यांनी अनेक लेखकांकडून विविध विषयांवर लिहवून घेतलेले लेख 'विस्तारा'तून प्रकाशित करण्यास सुरुवात केली. तोच कित्ता १९००नंतर संपादक रामकृष्ण रघुनाथ मोरमकरांनी सुरू ठेवला. १८९५मध्ये सुरू झालेल्या 'मासिक मनोरंजना'पुढे प्रथमपासूनच इंग्रजी मासिकांचा आदर्श होता. संपादक का. र. मित्र यांनी वैविध्यपूर्ण विषयांवर लिहिणाऱ्या अनेक लेखकांचा गोतावळाच तयार केला. विष्णू गोविंद विजापूरकरांनी 'ग्रंथमाला' या मासिकातही (१८९४-१९०६) हेच धोरण ठेवले.

१८७०नंतर मराठीत मासिके मोठ्या संख्येने निघू लागली तरी त्यापैकी बहुसंख्य

मासिके अल्पजीवी ठरली. 'विविधज्ञानविस्तारा'च्या मार्च १९०२च्या अंकात विनायक कोंडदेव ओक यांनी तत्कालीन मराठी मासिकांच्या स्थितीगतीची चर्चा केली आहे. ते म्हणतात, "काव्याकुट्ट आकाशांत जसा एखादा तारा मधेंच एकदम प्रकाशमान व्हावा, आणि त्यानें आपल्या तेजानें लोकांचें चित्त वेधावे, पण लोक दृष्टि वर करून त्याकडे पाहून नवल करतात न करतात तोंच तो अदृश्य व्हावा, तसें या मासिक पुस्तकांचें झालें." (वि. कों. ओक १९०२ : ८१)

असे होण्याचे कारण म्हणजे मासिकांच्या चालकांच्या अंगच्या ध्येयवाद आणि हौस या दोन्ही प्रेरणांमध्ये व्यावसायिक दृष्टीचा अभाव होता. त्यातही ध्येयवादी संपादकांमध्ये असलेल्या निष्ठेमुळे नियतकालिक तोट्यात गेले तरी ते चालू ठेवण्याचा चिवटपणा असे संपादक दाखवत. केवळ हौसेने चालवली जाणारी नियतकालिके मात्र आर्थिकदृष्ट्या डबघाईस आली की जीव सोडत. सातोस्करांनी स्पष्टपणे म्हटले आहे की, "साहित्याचा नाद असलेला एखादा होतकरू वा होऊ घातलेला लेखक पदरमोड करून मासिक सुरू करी, आणि कागदवाल्यांची व छापखान्यांची बिले थकली की मासिक अनियमितपणे निघून शेवटी बंद होई." (बा. द. सातोस्कर १९८६ : ०१-०२). वि. कों. ओक म्हणतात, "कांही मासिक पुस्तकें संपादकांच्या निवळ आळसामुळें बुडालेलीं मला माहित आहेत; कांहीं लोकांच्या अभिरुचीचा विचार न करतां काढल्यामुळें आणि विशेषतः त्यांच्यापासून द्रव्यप्राप्तीची आशा धरल्यामुळें अल्पायु होऊन गेलीं; व कांही लेखक व व्यवस्थापक या दोघांच्या अव्यवस्थित वर्तनामुळें लयास गेलीं." (वि. कों. ओक १९०२ : ८१). यावरून व्यावसायिक दृष्टीचा अभाव हेच मुख्य कारण मासिकांचे अल्पजीवी ठरण्यामागे दिसते. मासिकात अनेक लेखकांना लिहिते करून वाचकांना रुचेल, भावेल असा मजकूर त्यांच्याकडून लिहवून घेणे हे संपादक म्हणून अतिशय कौशल्याचे काम होते. हे ज्या संपादकांना जमले, त्यांचीच मासिके विसाव्या शतकात यशस्वी झालेली दिसतात.

मासिक-प्रकाशनामागे मनोरंजन हा हेतू आला आणि त्यांत विषयांची आणि लेखकांची वैविध्यपूर्णता आली, आणि मराठी मासिकांमध्ये ललित साहित्य अधिक दिसू लागले. हा बदल एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपासून झाला. १८८६मध्ये गोविंदराव कानिटकर आणि मंडळीने सुरू केलेले 'मनोरंजन', १८९०मध्ये हरि नारायण आपटे यांनी सुरू केलेले 'करमणूक', १८९५मध्ये का. र. मित्र यांनी मुंबईहून सुरू केलेले 'मासिक मनोरंजन' ही निखळ वाङ्मयीन नियतकालिके नसली तरी त्यांच्यात राजकीय-सामाजिक मजकुरापेक्षा ललित वाङ्मयाला अधिक प्राधान्य दिले जाऊ लागले होते.

या काळात निर्माण झालेली अनेक मासिके अल्पजीवी ठरली, तरी विसाव्या शतकाच्या पहिल्या चतुर्थापर्यंत (१९२५) ज्या मासिकांना वाचकाश्रय मिळाला आणि जी मासिके दीर्घकाळ सुरू राहिली, अशी बहुतांश मासिके एकोणिसाव्या शतकाच्या

अखेरच्या दोन दशकांत सुरू झाली होती. विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून १९२५पर्यंतचा कालखंड 'केरळकोकिळ' (१८८६), 'काव्यरत्नावली' (१८८७), 'करमणूक' (१८९०), 'विविधज्ञानविस्तार' (१८६७), 'मासिक मनोरंजन' (१८९५), 'नवयुग' (१९१३) या मासिकांचा होता. यातील 'नवयुग' वगळता इतर सर्व मासिके एकोणिसाव्या शतकात उदयाला आली आहेत, हे उल्लेखनीय आहे. १९२५नंतर वाङ्मयीन नियतकालिकांचा नवा टप्पा दिसतो. या कालखंडात आधी, 'किर्लोस्कर' (१९२०), 'रत्नाकर' (१९२६), 'यशवंत' (१९२८) ही महत्त्वाची मासिके सुरू झाली; या मासिकांमध्ये ललित साहित्याला प्राधान्य असले तरी त्यांचे स्वरूप संमिश्र होते. त्यानंतरच्या टप्प्यात सुरू झालेली 'सत्यकथा' (१९३३), 'प्रतिभा' (१९३४), 'ज्योत्स्ना' (१९३६) ही नियतकालिके मात्र संपूर्णपणे वाङ्मयीन स्वरूपाची होती. त्यातही 'प्रतिभा' पाक्षिक आणि 'ज्योत्स्ना' मासिक या दोन नियतकालिकांनी मराठीतील निखळ वाङ्मयीन नियतकालिकांचे नवे पर्व सुरू केले, असे म्हणावे लागते. १९४०नंतर मराठी वाङ्मयीन नियतकालिकांचा तिसरा टप्पा सुरू होतो. या कालखंडातील १९४३मध्ये सुरू झालेले 'अभिरुची' आणि १९४५पासून श्री. पु. भागवतांच्या संपादकत्वाखाली नव्या स्वरूपात सुरू झालेले 'सत्यकथा' या नियतकालिकांनी पन्नास व साठच्या दशकातील वाङ्मयीन चळवळींचे नेतृत्व केले; मराठी नवसाहित्याचा पाया रचला. या तीनही कालखंडांतील बदलत्या वाङ्मयीन प्रवृत्ती, निर्माण झालेले नवे साहित्यप्रकार, उदयाला येणाऱ्या लेखक-कवींच्या नव्या पिढ्या हे सर्व प्रामुख्याने वरील मासिकांच्या आश्रयाने घडून आले. या दोन्ही कालखंडांतील वाङ्मयीन वाद देखील या नियतकालिकांच्या माध्यमातूनच झडले. या काळातील वाङ्मयीन संस्कृतीच्या इतिहासाचा बराच हिस्सा या नियतकालिकांच्या कार्याने व्यापलेला आहे.

नियतकालिकांचा पहिला टप्पा : १९२०पर्यंत – १९२०पर्यंतच्या काळात लोकप्रिय असलेली आणि दीर्घकाळ चाललेली 'केरळकोकिळ', 'करमणूक', 'मासिक मनोरंजन', 'विविधज्ञानविस्तार' ही संमिश्र स्वरूपाच्या नियतकालिकांपैकी काही ठळक नियतकालिके. एकोणिसाव्या शतकात सुरू झालेल्या या नियतकालिकांनी विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत मराठी वाचकांची अभिरुची घडवण्यात आणि नवे लेखक-कवी घडवण्यात मोठी भूमिका निभावली. 'करमणुकी'ने प्राधान्याने कविता आणि कथात्म साहित्याला स्थान दिले. 'मासिक मनोरंजन' आणि 'विविधज्ञानविस्तार' यांनी कथात्म साहित्यासोबतच साहित्याविषयीचे समीक्षात्मक लेखनही छापायला सुरुवात केली. कोल्हटकर-खाडिलकर यांच्यापासून बालकवी, माडखोलकर, गडकरी या लेखकांपर्यंत बहुतेक सगळ्या आघाडीच्या लेखक-कवींचा गोतावळा या दोन मासिकांभोवती जमलेला होता. नाटक, कादंबरी, कथावाङ्मय, रोमँटिक वळणाची

कविता यांविषयीची समीक्षा विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत 'मासिक मनोरंजन', 'विविधज्ञानविस्तार', 'केरळकोकीळ' या मासिकांतून प्रसिद्ध होऊ लागली. मराठी लघुकथेचा पूर्वावतार म्हणता येतील अशा 'संपूर्ण गोष्टी' मासिक मनोरंजनमधून प्रसिद्ध झाल्या. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांची 'सुदाम्याचे पोहे' ही उपरोधिक शैलीत सामाजिक दोष दाखवणारी लेखमाला, किंवा राजारामशास्त्री भागवतांसारख्यांचे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाचे पैलू दाखवणारे लेखन 'विविधज्ञानविस्तारा'तून प्रसिद्ध झाले. या सर्व नियतकालिकांचा कल ललित वाङ्मयाकडे अधिक होता. कथा-कादंबऱ्या, परभाषांतील कादंबऱ्यांची भाषांतरे, ललित वाङ्मयाच्या विविध अंगोपांगांविषयी चर्चा असे साहित्य या नियतकालिकांतून प्रकाशित होत होते.

विविध विषयांवर माहितीपर लेख, महत्त्वाच्या घडामोडींविषयीचे वृत्तान्त यांच्या जोडीला कथा-कादंबरी, कविता यांसारखे ललित वाङ्मय, ग्रंथपरीक्षणे, वाङ्मयाच्या नव्या कल्पना मांडणारे लेखन इत्यादी छापणाऱ्या संमिश्र मासिकांपैकी ज्या मासिकांनी या काळात लोकप्रियता मिळवली, त्यांच्या कार्याचा थोडक्यात परामर्श पुढे घेतला आहे. त्यात हरिभाऊ आपट्यांच्या 'करमणूक' या साप्ताहिकाबरोबरच, आठल्यांचे 'केरळकोकिळ', मोरमकरांचे 'विविधज्ञानविस्तार' आणि का. र. मित्र यांचे 'मासिक मनोरंजन' या मासिकांचा समावेश आहे. १९२५पर्यंतचा काळ हा या नियतकालिकांच्या प्रभावाचा काळ होता. या काळातील ललित वाङ्मयप्रकारांच्या संकल्पना आणि वाचकांची अभिरुची यांवर या नियतकालिकांतून प्रसिद्ध होणाऱ्या साहित्याचा ठसा उमटलेला दिसतो. 'करमणूक' हे साप्ताहिक आपट्यांनी १९१७मध्ये बंद केले. 'केरळकोकिळ' १९२७मध्ये बंद पडले. 'मासिक मनोरंजन' आणि 'विविधज्ञानविस्तार' ही मासिके अनुक्रमे १९३५ आणि १९३७पर्यंत सुरू राहिली, तरी त्यांच्या उत्कर्षाचा आणि प्रभावाचा खरा काळ अनुक्रमे का. र. मित्र (१९२०) आणि रावसाहेब मोरमकर (१९२३) या त्यांच्या कर्तबगार संपादकांच्या निधनासोबतच लयास गेला.

'करमणूक' हे कथात्म साहित्याला वाहिलेले साप्ताहिक हरि नारायण आपटे यांनी १८९०मध्ये सुरू केले. ते एकंदर सत्तावीस वर्षे चालले. आपट्यांची अत्यंत गाजलेली, आणि नव्या प्रकारच्या सामाजिक कादंबऱ्यांचे उगमस्थान ठरलेली 'पण लक्षांत कोण घेतो' ही कादंबरी आणि मराठी साहित्याच्या इतिहासात पुढे क्रांतिकारक ठरलेल्या केशवसुतांच्या रोमँटिक जाणिवेच्या कविता याच 'करमणूक' पत्रातून प्रकाशात आल्या.

इंग्रजी राज्याच्या स्थापनेनंतर अल्पावधीतच मराठीत वैचारिक नियतकालिकांची परंपरा तयार झाली होती. हरिभाऊ आपट्यांच्या काळातील 'केसरी' आणि 'सुधारक' ही या वैचारिक परंपरेचे प्रतिनिधित्व करणारी प्रभावी नियतकालिके होती. या वैचारिक नियतकालिकांहून निराळा असा मार्ग हरिभाऊंनी निवडला. आपले 'करमणूक' पत्र

वैचारिक नियतकालिकांच्या परंपरेहून निराळे आहे, ते एक वाङ्मयीन स्वरूपाचे नियतकालिक आहे याची स्पष्ट जाणीव हरिभाऊ आपट्यांना होती. वैचारिक निबंधांद्वारे जो उपदेश अथवा बोध करून दिला जातो, तोच बोध कल्पनाप्रधान कथावाङ्मयाच्या माध्यमातून या साप्ताहिकातून करून दिला जाईल असे त्यांनी आपल्या नियतकालिकाची उद्दिष्टे स्पष्ट करताना म्हटले होते. शिक्षित समाजातील सर्व वयोगटांतील स्त्रीपुरुष हा या साप्ताहिकाचा वाचकवर्ग म्हणून त्यांनी डोळ्यांसमोर ठेवला होता. 'करमणूक' पत्रात शास्त्रीय ज्ञानाचा परिचय करून देणाऱ्या गोष्टी, स्थलवर्णने, खेळ व इतर उपयुक्त विषयांवरील माहिती अशा माहितीपर मजकुरासोबत महत्त्वाचा मजकूर प्रसिद्ध होऊ लागला, तो म्हणजे दोन मोठाल्या गोष्टी (म्हणजे क्रमशः प्रसिद्ध होणाऱ्या कादंबऱ्या) आणि 'दोनचारच अंकांत संपणाऱ्या अशा लहान चटकदार गोष्टी' (म्हणजे दीर्घकथा) हा होय.

'करमणूक' पत्राने लवकरच पुण्या-मुंबईतील नवशिक्षित समाजातील वाचकांवर गारुड केले. अनेक वाचकांनी पत्र लिहून 'करमणूक'विषयीची आपली पसंती व्यक्त केली. वाचकांच्या पुढील दोन प्रातिनिधिक पत्रांवरून वाचकांमध्ये नव्याने निर्माण झालेल्या अभिरुचीची पूर्तता करण्यात 'करमणूक' कसे यशस्वी झाले हे ध्यानात येईल :

प्रो. वासुदेव बाळकृष्ण केळकर, बी. ए. (२० ऑगस्ट १८९२) : "'करमणूक' पत्रासारखें वर्तमानपत्र पाहिजे होतें व ती उणीव आपण भरून काढली याबद्दल आपलें अभिनंदन करणें रास्त आहे. नुसती कशी तरी भरून काढली असें नाही तर, सहृदय वाचकांच्या अंतःकरणाला आल्हाद होईल अशा तऱ्हेने भरून काढली हें तुम्हांला विशेषतः श्रेयस्कर आहे....नांवाप्रमाणें करमणुकीचा भाग तर आपलें पत्र चांगल्या प्रकारें बजावीत आहेच; तत्रापि बोध करून घेणाराला व ज्ञानेप्सूला आपापल्या इच्छा मधुर व मनोहारि, नेहमींच्या शाळेतील नीरस व कटु मार्गाहून अत्यंत भिन्न, अशा मार्गानें तृप्त करून घेण्यास आपलें पत्र नामी साधन आहे."

रावबहादूर आत्माराम कृष्ण नूलकर : "करमणूक, उपयुक्त माहिती व गोष्टी यांचें योग्य मिश्रण आपल्या पत्रांत असल्यानें लहानमोठ्या स्त्रीपुरुषांची रिकामपणाची वेळ आनंदांत व मानसिक उन्नति करण्याच्या उद्योगांत सहज घालवितां येते. प्रत्यक्ष अनुभवावरून मी खात्रीनें सांगूं शकतों कीं शनिवारीं करमणूक पत्र हातांत केव्हां पडेल असें होतें. आबालवृद्धांचीही हीच उत्कंठा अनेक वेळां माझ्या दृष्टीस आली आहे." (पानसे १९३१ : ९९-१००).

थोडक्यात, एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस शिक्षित महाराष्ट्रियांमध्ये ललित वाङ्मयाचा वाचकवर्ग आकार घेऊ लागला होता. या वर्गाला कथा-कादंबरी-काव्य या साहित्यप्रकारांमधले नव्या स्वरूपाचे साहित्य वाचायला हवे होते. या वाचकवर्गाची साहित्याची भूक 'करमणूक' आणि पुढे 'मासिक मनोरंजन', 'केरळकोकिळ' या मासिकांनी

भागवली असे दिसते.

१८९० ते १९०० या पहिल्या दशकाच्या काळात या साप्ताहिकातून हरिभाऊ आपट्यांच्या 'पण लक्षांत कोण घेतो?', 'यशवंतराव खरे', 'मी', 'जग हें असें आहे', 'म्हैसूरचा वाघ', 'तेवीसशें वर्षांपूर्वी', 'केवळ स्वराज्यासाठीं'या सामाजिक व ऐतिहासिक कादंबऱ्याप्रसिद्ध झाल्या. त्याशिवाय सुमारे साडेतीनशे ते चारशे लघुकथा म्हणाव्यात अशा गोष्टी, कविता, शास्त्रीय स्वरूपाचे वाङ्मय प्रसिद्ध झाले. केशवसुतांच्या अनेक कविता एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात 'करमणूक'मधून वाचकांसमोर आल्या. केशवसुतांशिवाय चंद्रशेखर, गोविंदाग्रज, रेंदाळकर, ना. वा. टिळक हे कवी 'करमणुकी'तून पुढे आले. नारायण मुरलीधर गुप्ते (बी) यांची पहिली कविता 'प्रणयपत्रिका' ही १८९१मध्ये 'करमणुकीतून'च प्रसिद्ध झाली. १९११पर्यंत त्यांच्या आठ-दहा कविता 'करमणुकी'त आल्या (मोटे (संपा.) १९७२ : ३९५; उषा देशमुख (संपा.) १९९४ : ८१).

अशा रीतीने वास्तवप्रधान व ऐतिहासक कादंबरी, दीर्घ लांबीच्या कथा, तसेच नव्या रोमँटिक भावकविता हे नवे वाङ्मयप्रकार एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात मराठी वाचकांमध्ये रुजवण्याचे ऐतिहासिक कार्य हरिभाऊ आपट्यांच्या 'करमणुकी'ने पार पाडले. याशिवाय 'करमणुकी'ने चरित्रात्मक वाङ्मय प्रसिद्ध केले आणि 'साहित्यचर्चा' या सदरातून टीकालेखही छापले. या टीकालेखांनी वाङ्मयाभिरुचीचे संस्कार नवशिक्षित वाचकांवर होऊ लागले. विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून १९१७ पर्यंत 'भयंकर दिव्य', 'आजच', 'मायेचा बाजार', 'कर्मयोग' या सामाजिक कादंबऱ्या आणि 'रूपनगरची राजकन्या', 'चंद्रगुप्त', 'गड आला पण सिंह गेला', 'सूर्योदय', 'मध्यान्ह', 'सूर्यग्रहण', 'कालकूट', 'वज्राघात' या ऐतिहासिक कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. यापैकी काही कादंबऱ्या अपूर्ण राहिल्या. विसाव्या शतकातील सतरा वर्षांच्या काळात आपट्यांनी सामाजिक कादंबरीपेक्षा ऐतिहासिक कादंबरी हा साहित्यप्रकार अधिक प्रमाणात हाताळलेला दिसतो. या कादंबऱ्या वाचकांमध्ये प्रचंड प्रमाणात लोकप्रिय झाल्या. मराठी वाचकांना कादंबरी वाचनाची खरी गोडी याच कादंबऱ्यांनी लावली असे म्हटले जाते. या कादंबऱ्यांसाठी 'करमणुकी'च्या पुढील अंकांची आतुरतेने वाट पाहणारे अनेक वाचक त्या काळी होते. अशा रीतीने मराठी वाङ्मयाच्या आणि वाङ्मयीन संस्कृतीच्या क्षेत्रात 'करमणूक'साप्ताहिकाच्या या उपक्रमाद्वारे कथासाहित्याचा एक नवा अध्याय हरिभाऊ आपट्यांनी सुरू केला. तो अल्पावधीतच लोकप्रिय झाला.

विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत उपरोल्लेखित मासिकांनी आपट्यांच्या 'करमणुकी'ने रूढ केलेला मार्ग पत्करला. त्यापैकी महत्त्वाचे नियतकालिक म्हणजे 'मासिक मनोरंजन'. जानेवारी १८९५ ते फेब्रुवारी १९३५ या चाळीस वर्षांच्या काळात मराठी वाङ्मयीन संस्कृती घडवण्यात या मासिकाचा वाटा मोलाचा आहे.

'मासिक मनोरंजन'चे संस्थापक-संपादक का. र. मित्र यांचे बंगाली भाषा व साहित्यावर विशेष प्रेम होते. सुमारे पंचवीस वर्षे, १९२०पर्यंत का. र. मित्र यांनी 'मासिक मनोरंजना'चे संपादन केले. त्यांच्या निधनानंतर जुलै १९२० ते जून १९२७ या काळात त्यांचे बंधू दा. र. मित्र यांनी मासिकाच्या संपादनाचे काम पाहिले. मासिकाच्या अखेरच्या काळात, जुलै १९२७ ते फेब्रुवारी १९३५ या काळात का. र. मित्र यांची कन्या मालतीबाई मित्र या 'मासिक मनोरंजन'च्या संपादक होत्या. या मासिकाचा पहिल्या वीस वर्षांचा काळ, म्हणजे का. र. मित्र यांच्या संपादकत्वाचा काळ मराठी साहित्यातील खऱ्या अर्थाने प्रभाव काळ होता. मराठीतील सर्व आघाडीचे कथा-कादंबरीकार, कवी, नाटककार, समीक्षक 'मासिक मनोरंजन'मध्ये लिहीत असत. 'उदार विचारांचा प्रसार, सत्पक्षाचा पुरस्कार, सामाजिक अन्याय-जुलूम यांचा निषेध, समता भूतदयादी उच्च मनोवृत्तीचे पोषण करणारे' साहित्य छापण्याचे का. र. मित्र यांचे धोरण होते. उदारमतवादी विचाराचा पुरस्कार करणारे हे मासिक त्या काळातील नव्याने आकाराला येत असलेल्या वाचकवर्गात चांगलेच लोकप्रिय झाले. कथात्म साहित्य, कविता, पुस्तकपरीक्षणे असे साहित्य या मासिकातून प्राधान्याने प्रसिद्ध झाले. क्वचित सैद्धान्तिक वाङ्मयचर्चा देखील प्रसिद्ध केली. ग. स. भाटे यांची 'वाचन' ही लेखमाला 'मासिक मनोरंजन'मधून ऑक्टोबर १९१२ ते जुलै १९१३ या काळात प्रसिद्ध झाली. ऐतिहासिक आणि तौलनिक पद्धतीने एकंदर वाङ्मयाचे समालोचन करण्याची नवी पद्धत या लेखमालेतून ग. स. भाटे यांनी मराठीत प्रथमच उपयोगात आणली.

त्या काळी ह. ना. आपटे यांच्या 'करमणूक' साप्ताहिकातील गोष्टींची व कादंबऱ्यांची चटक मराठी वाचकाला लागली होती. परंतु हळूहळू 'मासिक मनोरंजना'ने 'करमणुक' पत्राची जागा घेतली. का. र. मित्र यांच्या कारकीर्दीत वि. सी. गुर्जर 'मासिक मनोरंजना'चे सहसंपादक होते. मासिकाच्या लोकप्रियतेत गुर्जरांच्या लेखणीचाही वाटा मोठा होता. वि. सी. गुर्जर यांनी बंगालीतून मराठीत अनुवादित केलेल्या कादंबऱ्या व कथा हे 'मासिक मनोरंजना'चे महत्त्वाचे आकर्षण ठरले. १९१४-१५च्या सुमारास ते ह. ना. आपटे यांच्या बरोबरीने मराठीतील लोकप्रिय कथालेखक होते. या कथासाहित्यातून प्रसृत होणारी स्त्री-पुरुष समानता, व्यक्तिस्वातंत्र्य ही मूल्ये त्या काळातल्या नवशिक्षित मध्यमवर्गीय वाचकांना अतिशय भावली.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी 'विविधज्ञानविस्तार' हे विद्वन्मान्य, तर 'मासिक मनोरंजन' आणि 'नवयुग' ही लोकप्रिय मासिकं म्हणून ओळखली जात होती. 'विस्तारा'चा खप जेमतेम एक हजार असताना, 'मासिक मनोरंजना'चा खप तीन-चार हजार होता (जयवंत दळवी १९८५ : ५१). १९१४च्या सुमारास 'मासिक मनोरंजना'च्या वर्गणीदारांची संख्या दहा हजारांवर गेली होती. या काळात मुंबई-पुणे या शहरांपलीकडे

कोल्हापूर, बडोदा, इंदूर, अमरावती, नासिक, ठाणे, मुरूड, तेल्हारा, भडगाव, नांदगाव, राहुरी, राजापूर, फैजपूर, दापोली, पातूर, देवपूर, पडघवली इत्यादी लहानमोठ्या गावीही 'मासिक मनोरंजना'चे वर्गणीदार होते (उषा देशमुख (संपा.) १९९४ : ९९-१००).

वऱ्हाडात राहणारे मराठीतील प्रसिद्ध कवी ना. घ. देशपांडे यांच्या आजोळी, बुलढाणा जिल्ह्यातल्या सेंदुरजनसारख्या आडगावी देखील 'मासिक मनोरंजन' पोहोचले होते. ना. घ. देशपांडे यांनी आपल्या संस्कारक्षम वयात (१९२०पूर्वी) 'मासिक मनोरंजना'च्या अंकात रविकिरण मंडळाच्या कवयित्री मनोरमा रानडे यांची 'मधुरस्मिता मृदुशीतला विधुची प्रभा बघा फाकली' ही कविता वाचली होती. रविकिरण मंडळाच्या कवितेशी या ग्रामीण भागातल्या काव्यरसिकाचा (आणि भविष्यातील कवीचा) परिचय 'मासिक मनोरंजना'मुळे घडून आला (ना. घ. देशपांडे १९९० : २११). नव्या वाङ्मयीन जाणिवांचा प्रसार महाराष्ट्राच्या निमशहरी-ग्रामीण भागात वाङ्मयीन मासिके करत होती हे यावरून स्पष्ट होते.

'मासिक मनोरंजन'ने कथा आणि कादंबरीच्या प्रसाराचे केलेले कार्य विशेष उल्लेखनीय आहे. 'मासिक मनोरंजन'ने काही विशेष उपक्रम राबवले. त्यात खास अंकांचा उपक्रम विशेष उल्लेखनीय आणि ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे. का. र. मित्र यांनी मासिक मनोरंजनचा दिवाळी अंक १९०९मध्ये प्रसिद्ध केला. मराठीतील हा पहिला दिवाळी अंक. तेव्हाच्या महाराष्ट्रातील विविध वृत्ती-प्रवृत्तींच्या नामवंत लेखकांचे साहित्य या अंकात प्रसिद्ध झाले. न. चिं. केळकर, रा. गो. भांडारकर, चिं. वि. वैद्य, वि. रा. शिंदे, न्या. चंदावरकर, रँग्ल. परांजपे, गोपाळ कृष्ण गोखले, बाळासाहेब पंतप्रतिनिधी, वा. ब. पटवर्धन, गो. चिं. भाटे, श्री. कृ. कोल्हटकर यांचे लेख आणि लक्ष्मीबाई टिळक, गोविंद वासुदेव कानिटकर, बालकवी यांच्या कविता या अंकात होत्या. बालकवींची 'आनंदी आनंद गडे' ही प्रसिद्ध कविता या पहिल्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली.

विद्वान, अभ्यासू वाचकांचे मासिक अशी 'विविधज्ञानविस्तार' मासिकाची ओळख होती. हे एकोणिसाव्या शतकातच नावारूपाला आलेले मासिक. जुलै १८६७ ते डिसेंबर १९३७ हा 'विविधज्ञानविस्तार'चा कालखंड. जवळजवळ सत्तर वर्षांइतक्या दीर्घकाळपर्यंत चाललेल्या या मासिकाने मराठी लेखकांच्या व वाचकांच्या दोन-तीन पिढ्या घडवल्या.

प्रारंभापासून १८७४पर्यंत रा. भि. गुंजीकर 'विविधज्ञानविस्तार'चे संपादक होते. त्यांच्या काळात या मासिकाचा पाया रचला गेला. विविध ज्ञानविषयांना स्पर्श करणारे लेखन या मासिकात प्रसिद्ध होत होते. गुंजीकरांनी स्वतः मराठी भाषा व व्याकरण यांविषयी 'विविधज्ञानविस्तार'मधून केलेले विद्वत्तापूर्ण लेखन प्रसिद्ध आहे. त्यांच्या काळातच एक विद्वत्तापूर्ण वजनदार मासिक म्हणून या मासिकाची प्रतिमा मराठी

वाचकांमध्ये रूजली.

विसाव्या शतकात 'विविधज्ञानविस्तारा'चे नेतृत्व १८९८मध्ये रामकृष्ण रघुनाथ मोरमकरांकडे होते. १८९८ ते १९२३ या काळात ते संपादक होते. विसाव्या शतकाच्या या पहिल्या चतुर्थकात मराठी साहित्यातील नव्या विचारांना स्थान देण्याचे काम मोरमकरांनी केले. त्यानंतर १९३४पर्यंत अनंत आत्माराम मोरमकर यांनी, तर अखेरच्या तीन वर्षांत रामचंद्र काशीनाथ तटणीस यांनी संपादक म्हणून काम पाहिले.

एकोणिसाव्या शतकात 'विविधज्ञानविस्तार'चे स्वरूप सर्वसमावेशक होते. त्यात शास्त्रीय, सामाजिक, ऐतिहासिक, आरोग्यविषयक, वैचारिक वाङ्मय व भाषाविषयक अशा विविध स्वरूपाचे लेखन प्रसिद्ध होत असे. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस प्रबोधनात्मक, वैचारिक स्वरूपाचे लेखन छापणारी नियतकालिके म्हणून काही नियतकालिकांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. याच दरम्यान ऐतिहासिक साहित्य, कादंबरी, नाटक, काव्य अशा एकेका विषयाला वाहिलेली नियतकालिकेही निघू लागली. त्यादरम्यान संपादक झालेल्या रामकृष्ण रघुनाथ मोरमकरांनी 'विविधज्ञानविस्तार'साठी काही महत्त्वाचे विषय निश्चित केले. त्यानुसार कविता, कादंबऱ्या, कथा अशा प्रत्यक्ष ललित साहित्यप्रकारांमधील साहित्य 'विविधज्ञानविस्तारा'मध्ये १९००नंतर फारसे प्रकाशित झालेले दिसत नाही. त्याऐवजी धर्म आणि संस्कृती, भाषाशास्त्र व व्याकरण, समाजशास्त्र आणि प्राचीन-अर्वाचीन इतिहास, प्राच्यविद्या आणि वाङ्मयविद्या या विषयांवरील गंभीर मांडणी करणारे लेखन 'विविधज्ञानविस्तार'ने प्राधान्याने प्रसिद्ध केले. त्यातून विविध शास्त्र-विषयांची गंभीर चर्चा करणारे मासिक अशी 'विविधज्ञानविस्तार'ची प्रतिमा तयार झाली.

वाङ्मयीन संस्कृतीच्या जडणघडणीच्या संदर्भात 'विविधज्ञानविस्तारा'ने केलेले कार्य उल्लेखनीय आहे. विसाव्या शतकाच्या पहिल्या चतुर्थात ललित साहित्य ही पारंपरिक धार्मिक साहित्याहून अथवा नव्या वैचारिक-प्रबोधनात्मक साहित्याहून निराळी गोष्ट आहे; ललित साहित्यात भाषेची आकर्षकता आणि रचनेची कलात्मकता ही आवश्यक असतात; कविता, कथा, कादंबरी, नाटक, चरित्र-आत्मचरित्र अशा प्रकारांच्या रूपात या ललित साहित्याचा आविष्कार होत असतो, याची जाणीव मराठी वाङ्मयीन संस्कृतीत प्रथम 'विविधज्ञानविस्तार'मध्ये स्पष्टपणे उमटलेली दिसते. भारतीय आणि पाश्चात्य साहित्यविचाराची चर्चा करणारे साहित्य या मासिकाने प्रसिद्ध केले. श्री. कृ. कोल्हटकर, द. के. केळकर, राजारामशास्त्री भागवत, भा. चिं. लेले इत्यादी समीक्षकांचे लेखन अशा प्रकारचे होते.

वा. गो. आपटे यांनी 'विविधज्ञानविस्तारा'तून १८९९ ते १९०१ या दरम्यान 'लेखनव्यवसाय' ही लेखमाला लिहिली. 'टीका आणि टीकाकार', 'कल्पनात्मक लेखन :

कविता', 'कल्पनात्मक लेखन : नाटक', 'कथा व कादंबऱ्या', 'इतिहास व चरित्रे', 'शास्त्र आणि तत्त्वज्ञान', 'वर्तमानपत्रे', 'मासिक पुस्तके' ही या लेखमालेतून प्रसिद्ध झालेल्या लेखांची शीर्षके होत. वा. ल. कुलकर्णी म्हणतात, "१८९०-९५च्या आतबाहेर निबंध, कविता, कादंबरी, नाटक व काही अंशी कथा या वाङ्मयप्रकारांतील लेखनाला त्यांचे पृथगात्म रूप प्राप्त होऊ लागले होते. हे सगळेच वाङ्मयप्रकार लेखकप्रिय व वाचकप्रिय बनू लागले होते. त्यांच्या स्वरूपाबद्दल व लक्षणांबद्दल एक प्रकारचे कुतूहल वाचकांच्या व होतकरू लेखकांच्या मनात निर्माण होत होते...परंतु या सर्वच वाङ्मयप्रकारांच्या पृथगात्म प्रकृतीवर प्रकाश टाकणारे असे सुसूत्र विवेचनात्मक लेखन झालेले नव्हते. अशा प्रकारचे अभ्यासपूर्ण विवेचनात्मक लेखन करण्याचा आपटे यांनी अगदी योग्य वेळी प्रयत्न केला..." (वा. ल. कुलकर्णी १९७६ : २७-२८).

याशिवाय 'विविधज्ञानविस्तार'मधून प्रसिद्ध झालेल्या वा. गो. आपटे यांचाच 'साहित्याचे दोन आदर्श : पाश्चात्य व आर्य' (१९०८), गो. वि. तुळपुळे यांचा 'वर्डस्वर्थचे सृष्टिविषयक विचार' (१९१२), श्री. कृ. कोल्हटकर यांचे 'मराठी कथात्म वाङ्मय' (१९१२) आणि 'रागिणी व तिची भावंडे' (१९१८) यांसारख्या लेखांनी आधुनिक साहित्यविषयक कल्पनांचा परिचय कविता, कादंबरी या साहित्यप्रकारांकडे पाहण्याची नवी दृष्टी मराठी वाचकांना दिली. ना. म. भिडे यांचा 'कला व तिचे महत्त्व' (१९२५) आणि वा. म. जोशी यांचा 'कला व नीती' (१९३३) हे लेख नव्या इहवादी दृष्टीतून मानवी जीवन व त्यातील कलेचे स्वायत्त विश्व यांच्यातील नाते स्पष्ट करणारे आहेत.

'विविधज्ञानविस्तारा'चे आणखी एक कार्य लक्षात घेतले पाहिजे. नवी साहित्यदृष्टी घडवतानाच धर्म-परंपरांची, इतिहासाची तसेच वर्तमान समाजाची परखड चिकित्सा करणारे साहित्य प्रसिद्ध करण्याचे धाडसही या मासिकाने दाखवले. राजारामशास्त्री भागवत यांनी धर्म, भारतीय इतिहास, भाषा, अलंकारशास्त्र यांची चिकित्सा करणारे लेखन याच मासिकातून केले. त्यांची 'विचारमाधुकरी' ही लेखमाला खळबळजनक ठरली. राजारामशास्त्र्यांचे सर्व लेखन विचारप्रक्षोभक आणि समाजाच्या रूढ मानसिकतेला धक्का देणारे होते. दुसरे उदाहरण मराठीत विनोदी लेखनाचा प्रारंभ करणाऱ्या श्री. कृ. कोल्हटकर यांच्या 'सुदाम्याच्या पोह्यां'चे आहे. या 'सुदाम्याच्या पोह्यां'ना 'विविधज्ञानविस्तारा'ने जागा करून दिली. कोल्हटकरांचा पहिला विनोदी लेख'साक्षीदार' हा ऑगस्ट-सप्टेंबर १९०२च्या अंकात प्रसिद्ध झाला. जुलै १९०३च्या अंकात 'गणेशचतुर्थी' हा चौथा विनोदी लेख 'सुदाम्याचे पोहे' या शीर्षकासह प्रसिद्ध झाला आणि त्याच्यासोबत "यापूर्वी आलेले 'साक्षीदार', 'कुलूप' व 'शिमगा' हे या मालेपैकी अनुक्रमे पहिले तीन लेख समजावे," अशी टीप देण्यात आली. या लेखांनी मराठी साहित्यात उपहासपूर्ण विनोदी वाङ्मयप्रकाराचा पाया रचला गेला. पण हे करताना 'विविधज्ञानविस्तारा'ला वाचकांच्या प्रस्थापित

वाङ्मयीन अभिरुचीशी वैर पत्करावे लागले.

कोल्हटकरांनी 'सुदाम्याच्या पोह्यां'मधून कालबाह्य धार्मिक रीतिरिवाजांची उडवलेली खिल्ली त्या वेळच्या पुराणमताभिमानी लोकांना सहन न होऊन ते कोल्हटकर आणि 'विविधज्ञानविस्तार' या दोहोंवर चांगलेच संतापले. 'इंदुप्रकाश', 'सरस्वतीमंदिर' यांसारख्या नियतकालिकांनी 'विविधज्ञानविस्तारा'तल्या या लेखांवर टीकेची झोड उठवली. 'शिमगा' आणि 'गणेशचतुर्थी' या लेखांमुळे हिंदुधर्माभिमानी खवळले; तर 'कुलूप' हा लेख वाचकांना अश्लील वाटला. अनेक वर्गणीदारांनी 'विविधज्ञानविस्तार' बंद करण्याची धमकी दिली (वा. ल. कुलकर्णी १९७६ : १०-११). यावर संपादक मोरमकरांनी आपल्या वाचकांना चुचकारणारा खुलासा प्रसिद्ध केला. 'विविधज्ञानविस्तार' हे आधुनिक व पुराणमताभिमानी अशा दोन्ही प्रकारच्या लेखनासाठी खुले व्यासपीठ आहे, अशी आपली भूमिका स्पष्ट केली. परंतु धार्मिक परंपरांना चिमटे घेणारे कोल्हटकरांचे लेख छापणे ('श्रावणी' या एकमेव लेखाचा अपवाद वगळता) त्यांनी त्यानंतरही सुरूच ठेवले. वाचकांनी टोकाची प्रतिकूल भूमिका घेतल्यानंतर आणि दा. ग. पाध्ये, वि. कों. ओक यांसारख्या मान्यवर लेखकांनी टीका केल्यानंतरही 'विविधज्ञानविस्तारा'ने कोल्हटकरांच्या या उपहासपूर्ण रूढिभंजक अभिनव लेखनाला सातत्याने जागा दिली.

मराठी वाङ्मयीन संस्कृतीच्या दृष्टीने 'विविधज्ञानविस्तारा'च्या माध्यमातून झालेला एक महत्त्वाचा प्रयोग म्हणजे, महाराष्ट्र साहित्य परिषद या संस्थेचे 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' हे निखळ वाङ्मयीन नियतकालिक ऑगस्ट १९१३पासून 'विविधज्ञानविस्तारा'च्या अंतर्गत प्रकाशित होऊ लागले. रामकृष्ण मोरमकर हे वि. मो. महाजनी आणि दा. ग. पाध्ये यांच्यासह या पत्रिकेच्या संपादनाचे काम पाहात. महाराष्ट्र साहित्य पत्रिका हे 'ललित वाङ्मय आणि त्याविषयीची चर्चा' यांना पूर्णपणे वाहिलेले मराठीतील पहिलेच नियतकालिक होते. ते 'विविधज्ञानविस्तारा'अंतर्गत सुरू झाले, ही नोंद ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची आहे.

वरील तीन मासिकांप्रमाणेच 'केरळकोकिळ' हे देखील एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस सुरू झालेले आणि विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांतील मराठी वाचकांच्या अभिरुचीवर हुकूमत गाजवणारे मासिक होते. १८८६मध्ये हे मासिक कृष्णाजी नारायण आठल्ये यांनी केरळमधील कोचीन शहरातून सुरू केले. चार वर्षांनी मासिक मुंबईला स्थलांतरित झाले. 'केरळकोकिळ' १९१५पर्यंत सुरू होते.

'केरळकोकिळ'ला प्रथमपासूनच वाचकांचा प्रतिसाद उत्तम मिळाला. केरळसारख्या महाराष्ट्राच्या भूमीपासून दूर असलेल्या परमुलखात सुरू झालेल्या या मासिकाच्या वर्गणीदारांची संख्या पहिल्याच वर्षी एक हजारापर्यंत पोहोचली होती. विसाव्या शतकाच्या

पहिल्या दशकात मासिकाच्या वर्गणीदारांची संख्या ३४०० होती (बा. द. सातोस्कर १९८६ : १०५-०८). पुस्तकपरीक्षणे ही 'केरळकोकिळ'ची मुख्य ओळख. दर अंकात आठल्ये स्वतः पुस्तकपरीक्षणे लिहीत. शिवाय 'कलमबहादुरांस शेलापागोटे' हे त्यांचे सदरही अत्यंत वाचकप्रिय झालेले होते. कविता, नाटक, चरित्रे, प्रवासवर्णने, भाषांतरित पुस्तके आणि क्वचित कादंबऱ्या या प्रकारांतील पुस्तकांची शेकडो परीक्षणे 'केरळकोकिळ'मधून प्रसिद्ध झाली आहेत. ही परीक्षणे वाचक आवडीने वाचत आणि लेखकांमध्ये 'केरळकोकिळ'च्या परीक्षणांचा दबदबा असे. या परीक्षणांमागे फार गंभीर असा काही साहित्यविचार किंवा साहित्यदृष्टी होती असे नव्हे. आठल्यांनी जुन्या वळणाच्या कवितांची, विशेषतः दीर्घकाव्यांचीच परीक्षणे प्रामुख्याने लिहिली. आधुनिक कवितेचे परीक्षण करणे आठल्यांनी टाळले, तसेच कादंबरी या आधुनिक साहित्यप्रकाराच्याही वाटेला ते फारसे गेले नाहीत. 'केरळकोकिळ'मध्ये तीनचारच कादंबऱ्यांवर परीक्षणे आली आहेत; आणि त्यापैकी ह. ना. आपट्यांची 'मधली स्थिती' वगळता इतर कादंबऱ्या नाव घेण्याइतक्या महत्त्वाच्या नाहीत. नाटकाविषयीच्या परीक्षणांमध्ये नाट्यसंहिता आणि प्रयोग या दोन्ही प्रकारांची समीक्षा उत्तम केली आहे. 'केरळकोकिळ'ची वाचकप्रियता लक्षात घेता या परीक्षण-दृष्टीचे संस्कार त्या काळातल्या मराठी वाचकांवर मोठ्या प्रमाणावर झाले असणार. तत्कालीन लेखकांमध्ये या परीक्षणांविषयी त्यामुळेच दबदबा असावा. बाळकृष्ण लक्ष्मण अंतरकर यांनी 'मेघदूता'चे मराठी समश्लोकी भाषांतर प्रसिद्ध केल्यानंतर ते परीक्षणासाठी 'केरळकोकिळ'कडे पाठवताना लिहिले, "आपल्याकडे अभिप्रायार्थ सदरहू पुस्तक पाठविले आहे. आपल्या आगीतून निघून ते शंभर नंबरी सोने ठरण्याचा मुळीच संभव नाही. पण त्यात सोन्याचा अंश असल्यास आपल्याकडून लावून सुलाखून किती रस आहे ते ठरल्याशिवाय त्याला कोणी विचारीत नाही...माझ्या पुस्तकाचे नशीब आपल्या हाती आहे. निःपक्षपातीपणाला बट्टा न लागता होईल तितकी कृपादृष्टी ठेवावी." (उषा देशमुख (संपा०) १९९५ : ३९). आक्रमक, बोचक आणि उपहासपूर्ण शैलीत कृष्णाजी आठल्यांनी लिहिलेल्या परीक्षणांचा धसका तत्कालीन मराठी लेखकांनी किती घेतला होता हे या पत्रावरून ताडता येते.

'केरळकोकिळ'ने मराठी मासिकांना अधिक चित्रमय केले, ही या मासिकाची आणखी एक कामगिरी. प्रत्येक अंकात भरपूर चित्रे देणारे पहिले मासिक हेच. संपादक आठल्ये स्वतः चित्रकार होते आणि छायाचित्रणकलाही त्यांना अवगत होती. सुरुवातीच्या वर्षांत कोचीनसारख्या ठिकाणी चित्रांचे ब्लॉक्स करून देण्याची सोय उपलब्ध नव्हती, तर आठल्यांनी 'वुडकट्स'वरून चित्रे छापली. या लाकडी ठोकळ्यांवरून चित्रे छापताना त्यात चित्रांतले बारकावे दाखवणे, छायाप्रकाश आणणे यासाठी हस्तकौशल्य गरजेचे होते. आठल्यांनी ते स्वतः प्रयत्नपूर्वक साधले (सातोस्कर १९८६ : ११२).

जुने, मध्ययुगीन संत, पंडित, शाहीर बखरकार इत्यादींचे मराठी वाङ्मय मुद्रणरूपात वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य करणाऱ्या मासिकांचा एक प्रवाह एकोणिसाव्या शतकात निर्माण झाला होता. विसाव्या शतकात मात्र अशा मासिकांना ओहोटी लागली. अशा तऱ्हेचा शेवटचा एक प्रयत्न म्हणून 'काव्यसंग्रह' मासिकाकडे पाहता येईल. 'काव्यसंग्रह' मासिक तुकाराम जावजी यांच्या निर्णयसागर प्रेसतर्फे जानेवारी १८९०पासून सुरू झाले आणि ते १९०९पर्यंत चालले (पु. बा. कुलकर्णी १९६७ : १४२). 'काव्यसंग्रहा'चे पहिले संपादक जनार्दन बाळाजी मोडक यांचे लवकरच निधन झाल्यामुळे अंकाची संपादकीय जबाबदारी वामन दाजी ओक यांच्यावर सोपवण्यात आली. ओकांच्या काळात मासिकाच्या वर्गणीदारांची संख्या सहाशेहून अधिक झाली होती. १८९७मध्ये ओकांचे निधन झाल्यानंतर नारायण चिंतामण केळकर, बाळकृष्ण अनंत भिडे आणि वामन दाजी ओकांचा पुतण्या दामोदरपंत ओक यांनी वेळोवेळी या मासिकाच्या संपादनाचे काम पाहिले. परंतु या मासिकाचा वाचकाश्रय झपाट्याने कमी कमी होत गेल्याने अखेर ते बंद झाले.

मध्ययुगीन मराठी काव्याचे मुद्रित माध्यमात पुनरुज्जीवन करण्याच्या ध्येयाने सुरू झालेल्या या मासिकांचा वाचकवर्ग कमी होत गेला. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकाच्या अखेरीस 'काव्यसंग्रह' बंद पडल्यानंतर अशा तऱ्हेचे मासिक सुरू करण्याचा महत्त्वाचा प्रयत्न झालेला दिसत नाही. याचे ठळक कारण म्हणजे याच काळात ललित वाङ्मयाविषयीच्या वाचकांच्या नव्या धारणा आकाराला येत होत्या. बखरी व काही प्रमाणात शाहिरी वाङ्मय वगळल्यास इतर सर्व मध्ययुगीन वाङ्मय प्रामुख्याने धर्मकेंद्री होते. पंडित कवींनी संस्कृत काव्यशास्त्राला अनुसरत आपल्या रचनांकडे काव्य म्हणून पाहिले तरी पंडिती आख्यानांच्या वाचन-श्रवणामागचा बहुसंख्यांचा दृष्टिकोन मात्र श्रद्धाशीलच होता. आधुनिक शिक्षणाने ही श्रद्धाशीलता गळून पडली आणि वाचन हे चिकित्सक दृष्टीशी, मनोरंजनाच्या प्रेरणेशी जोडले गेले. धर्मकेंद्री, पौराणिक व्यक्तींच्या जीवनावर आधारित अद्भुतकथांच्या जागी सर्वसामान्य समाजाचे प्रत्यक्ष भौतिक जीवन आणि भावजीवन यांच्या आविष्कार करणाऱ्या कविता, कादंबऱ्या लिहिल्या-वाचल्या जाऊ लागल्या. साहित्याकडून वाचकांच्या अपेक्षा बदलल्या. या नव्या अपेक्षांना उतरेल अशा साहित्याचा प्रसार अधिक होऊ लागला.याचा परिणाम होऊन आधुनिक ललित वाङ्मयप्रकारांना प्राधान्य देणारी नियतकालिके अधिकाधिक निघू लागली असे दिसते.

त्यामुळेच एकीकडे मध्ययुगीन मराठी कविता शोधून सटीप प्रसिद्ध करणारे 'काव्यसंग्रहा'सारखे मासिक बंद पडत असताना दुसरीकडे आधुनिक कवितेला वाहिलेले 'काव्यरत्नावली'सारखे मासिक जळगावसारख्या एका आडबाजूच्या शहरातून प्रसिद्ध होऊन देखील दीर्घकाळपर्यंत चालू राहिले. अर्थात, प्रतिकूल आर्थिक परिस्थिती,

मोजक्या वर्गणीदारांचाच आश्रय या समस्या 'काव्यरत्नावली'समोरही होत्या. पण तरी१८८७मध्ये सुरू झालेले 'काव्यरत्नावली' १९३५पर्यंत चालू राहिले. बा. द. सातोस्कर यांनी म्हटले आहे, "'काव्यरत्नावली'ला ग्राहकाकडून कितपत आश्रय मिळासा हे समजण्यास मार्ग नसला तरी कवीमंडळाचा मात्र त्यास पाठिंबा होता..." (बा. द. सातोस्कर १९८६ : १२१). 'काव्यरत्नावली' मासिकाचे संपादक नारायण नरसिंह फडणीस हे स्वतः कवितेचे जाणकार वाचक आणि व्यासंगी टीकाकार होते. 'काव्यरत्नावली' सुरू राहण्यामागे फडणीस यांची, आधुनिक कवितेला व्यासपीठ मिळवून देण्याची ठाम भूमिका प्रामुख्याने सहाय्यभूत झाली. शिवाय, केशवसुतांपासून माधव ज्यूलियन यांच्यापर्यंत मराठी कवींच्या तीन पिढ्या मानल्यास (पहिली केशवसुतांची, दुसरी गोविंदाग्रजांची आणि तिसरी रविकिरण मंडळ व त्यांच्या समकालीन कवींची–), या तीनही पिढ्यांतील सर्व आघाडीच्या कवींचा 'काव्यरत्नावली'शी संबंध आला. केशवसुत, रे. टिळक, विनायक, दत्त, बी, चंद्रशेखर, माधवानुज, अनंततनय, गोविंदाग्रज, बालकवी, दु. आ. तिवारी, रहाळकर, ना. के. बेहेरे, यशवंत, गिरीश, माधव ज्यूलियन, आनंदराव टेकाडे, देवदत्त टिळक, साने गुरुजी या वैविध्यपूर्ण प्रवृत्तींच्या कवींच्या कविता 'काव्यरत्नावली'तून प्रसिद्ध झाल्या. "इतर अनेक मासिके आधुनिक मराठी कवींची कविता आवर्जून प्रसिद्ध करीत. पण 'काव्यरत्नावली' हे आपले घरचे मासिक आहे असे कविमंडळींना वाटत असे आणि ही भावना लक्षात घेऊनच 'अलीकडील कविमंडळींनी चालविलेले कवितेचे मासिक पुस्तक' असे बिरुद 'काव्यरत्नावलि'चे संपादक मुखपृष्ठावर छापू लागले." (बा. द. सातोस्कर १९८६ : ११९).

या मासिकाच्या १९३५पर्यंतच्या अंकांची नोंद मराठी नियतकालिक सूचीच्या प्रथम खंडात आहे. म्हणजे जवळजवळ अर्धशतकभर हे मासिक मराठी कविता निष्ठेने प्रकाशित करत होते असे दिसते. या मासिकाचा "मूळ हेतू सर्व कविताच द्याव्या, पुरवठा न झाल्यास गद्यात्मक भाग द्यावा," असा होता. परंतु कवितांचा पुरेसा "पुरवठा झाल्यामुळे केव्हाच गद्यात्मक भाग द्यावा लागला नाही व तो बंदच केला." (शं. ग. दाते आणि इतर १९६९ : ५५). स्वातंत्र्यपूर्व काळात मराठी काव्यप्रवाहात निर्माण झालेल्या आधुनिक रोमँटिक कवितेला अधिमान्यता मिळवून देण्याचे श्रेय या मासिकाकडे जाते.

कवितेप्रमाणेच कादंबरी हा नवा साहित्यप्रकार रुजवण्यातही बऱ्याच प्रमाणात मासिकांचा हातभार होता. हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्यांचा वाचकवर्ग 'करमणुकी'मुळे वाढला हे वर सांगितले आहे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात शंकर मोरो रानडे यांनी १८७९ साली नाटक आणि कादंबऱ्या प्रसिद्ध करणारे 'नाट्यकथार्णव' हे मासिक सुरू करून काही काळ चालवले. या मासिकातून 'शिलादित्य', 'मथुरा' अशा काही कादंबऱ्या क्रमशः प्रसिद्ध झाल्या. वा. बा. केळकर यांच्या भाषांतरित नाटकांमुळे हे मासिक अधिक

लोकप्रिय झाले. परंतु १८८५नंतर ते अनियमितपणे निघू लागले आणि नंतर लवकरच बंद पडले. यानंतर असाच प्रयोग विसाव्या शतकातील पहिल्या दशकात 'कादंबरीकल्पद्रुम' या मासिकाने केला. १९०० ते १९०६ या काळात हे मासिक प्रसिद्ध होत होते. वाईहून प्रसिद्ध होणाऱ्या या मासिकातून रामचंद्र नीळकंठ सहस्रबुद्धे यांच्या 'नरेंद्रमोहिनी', 'चंद्रकला', 'वसंतमालती', 'नव्य समाजचित्र'; वा. न. भावे यांच्या 'प्रतिज्ञापूर्ती', 'संसार', 'दीपनिर्वाण',आणि कृष्णतनय या लेखकाची 'मनूच फिरला' इत्यादी कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या.

या कादंबऱ्या वाङ्मयीनदृष्ट्या थोर नसल्या तरी अशा कादंबऱ्या छापणाऱ्या मासिकांनीच या काळात महाराष्ट्रात कादंबरी या साहित्यप्रकाराचा वाचकवर्ग तयार केला. विसाव्या शतकाच्या पहिल्या-दुसऱ्या दशकात 'करमणूक' साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या हरिभाऊ आपट्यांच्या ऐतिहासिक आणि सामाजिक कादंबऱ्यांनी मराठी समाजातील कथनसाहित्याच्या वाचकांवर संस्कार केले. पुढील काळात 'मासिक मनोरंजना'ने प्रसिद्ध केलेल्या लघुकथा आणि क्रमशः भाषांतरित कादंबऱ्यांनी या वाचकाची अभिरुची अधिक व्यापक केली. 'मासिक मनोरंजन'ने सुरू केलेल्या मनोरंजक ग्रंथमालेप्रमाणे इतर अनेक लहानमोठ्या मासिकांनी ग्रंथमाला सुरू केल्या. मासिकांचा वाचकवर्ग आणि कादंबरीचा वाचकवर्ग हे परस्परांच्या वाढीला पूरक ठरले. याचा स्वतंत्रपणे परामर्श पुढे घेतला आहे.

नियकालिकांचा दुसरा टप्पा : १९२० ते १९४० – केवळ नियतकालिकांच्या संदर्भातच नव्हे, तर एकंदर वाङ्मयीन संस्कृतीत १९२० ही भेदरेषा म्हणून कालपटावर ठळकपणे दाखवता येते. १९२०नंतरचे मराठी वाङ्मयविश्व अनेकपदरी झाले. रोमँटिसिझमसारख्या वाङ्मयीन चळवळी, गांधीवाद-मार्क्सवादासारख्या विचारप्रणाली, समाजशास्त्र-मानसशास्त्रासारख्या नव्या ज्ञानप्रणाली यांनी या काळातल्या वाङ्मयविषयक अभिरुचीला, वाङ्मयनिर्मितीला आकार दिला. या काळात मराठी कादंबरीला व लघुकथेला भाषेच्या व रचनेच्या दृष्टीने घडीव, सुघटित स्वरूप प्राप्त झाले. नाटककारांची सद्दी मागे पडली आणि कादंबरीकार मराठी वाङ्मयीन संस्कृतीच्या केंद्रस्थानी आले. या साऱ्या बदलामध्ये नियतकालिकांचे स्वरूपही बदलले. नियतकालिके ही या १९२०दरम्यान झालेल्या वाङ्मयीन संस्कृतीतील स्थित्यंतरांचे कारण आणि परिणाम अशी दोन्हीही होती.

१९२०नंतर नियतकालिकांमध्ये झालेला महत्त्वाचा बदल असा की राजकीय, प्रबोधनात्मक विचारांचा प्रसार करणाऱ्या नियतकालिकांची संख्या १९२०नंतर रोडावली. त्यामुळे अशा आशयाच्या निबंधवाङ्मयाची निर्मिती देखील कमी झाली. इतिहास, भाषा, वाङ्मय यांच्याविषयी तात्त्विक विचार मांडणाऱ्या

'विविधज्ञानविस्तार'सारख्या गंभीर मासिकाची मराठी वाचकांमधील लोकप्रियता १९२५नंतर झपाट्याने कमी झाली. मनोरंजक आणि वेगवेगळ्या अभिरुची बाळगणाऱ्या वाचकांसाठी वाचनीय मजकूर हा या काळातल्या बहुतांश मासिकांचा स्थायीभाव ठरला. पाश्चात्य मासिकांच्या अनुकरणातून मराठी वाङ्मयीन नियतकालिकांमध्ये, विविध विषयांवर फारसे गंभीर, तात्त्विक, बोजड नसलेले, हलकेफुलके लेख; आणि याला समांतर अशा लघुकथा, लघुनिबंध, क्रमशः कादंबऱ्या – असे साहित्य प्रकाशित होऊ लागले. गंभीर विचारमंथनाकडून मनोरंजनप्रधानतेकडे वळण्याची आस या काळातल्या वाङ्मयीन नियतकालिकांच्या संपादकीय धोरणांत आणि वाचकांच्या अपेक्षांत – दोन्हींकडे सारखीच निर्माण झालेली दिसते.

उदाहरणार्थ, डिसेंबर १९२८मध्ये सुरू झालेल्या 'यशवंत' या मासिकाने स्पष्टपणे पुढीलप्रमाणे भूमिका घेतली : "गंभीर विषयांचा उहापोह करण्यासाठी, अथवा विशिष्ट पंथाचा पक्षाचा किंवा तत्त्वाचा पुरस्कार करण्यासाठी आम्ही हे मासिक काढलेले नाहीं..."यशवन्त"मध्ये लघुकथांना विशेष प्रामुख्य दिले जाईल." ('यशवंत', डिसेंबर १९२८ : पृ. ०३). स. आ. जोगळेकर, वा. प्र. ओक हे या मासिकाचे संपादक होते. वि. स. खांडेकर, यशवंत, ग. त्र्यं. माडखोलकर, वि. ह. कुलकर्णी वगैरे मंडळींनी मे १९३६पासून सुरू केलेल्या 'ज्योत्स्ना' या मासिकात वैद्यकीय ज्ञानाविषयीचे एक सदर होते. मासिकाच्या एका वाचकाने पत्र लिहून या सदराविषयी नापसंती व्यक्त केली. 'ज्योत्स्ना'च्या जुलै १९३६च्या अंकात ते पत्र छापले आहे. वाचक म्हणतो, "दंतमंजन, मलावरोध, बद्धकोष्ठ, पित्तप्रकोप वगैरेंची चर्चा मासिकांत व अशा श्रेष्ठ मासिकांत नसावीं. असल्या अडचणी व सल्ला घ्यावयास समाजांत पुरेसे डॉक्टर चिक्कार आहेत रस्तो रस्ती! हें सदर ताबडतोब बंद करण्यांत यावें अशी अत्यन्त आग्रहाची विनंती आहे." ('ज्योत्स्ना', जुलै १९३६, पृ. ६३).

थोडक्यात, मानवी जीवनाशी संबंधित शास्त्रीय ज्ञान हे नव्या मनोरंजनाच्या युगात 'अडगळ' वाटू लागले होते. कथा-कादंबऱ्यांचे विश्व हे एक कलाविष्कार म्हणून आपल्या दैनंदिन जीवनाहून उच्च कोटीचे, श्रेष्ठ असते अशी धारणाही वाचकांमध्ये या काळात निर्माण झालेली दिसते.

'मॉडर्न रिव्ह्यू', 'स्ट्रँड', 'अरगॉसी' अशा पाश्चात्य देशांतील वाङ्मयीन नियतकालिकांचे अनुकरण या काळातील मराठी नियतकालिकांनी केले. या अनुकरणातून निर्माण झालेल्या मासिकांच्या दोन ठळक प्रवृत्ती 'यशवंत' मासिकाच्या संपादकांनी पहिल्या अंकाला लिहिलेल्या संपादकीय निवेदनात स्पष्ट केल्या आहेत :

"प्रथम पृष्ठाशेजारी रंगीत अगर साधे चित्र, एकादी गोष्ट, एक चालू कादंबरी, गंभीर विषयावर चर्चात्मक स्वरूपाचे अनेक लेख, जागा सापडेल तेथे एकादी कविता आणि

शेवटी संपादकीय सूचना, अशी मॉडर्न रिव्ह्यूची नेहमीची मांडणी असते. मराठीतील बहुतेक मासिके याच धर्तीवर चालविण्यात येत आहेत. कित्येकांनी तर हेच आपले ध्येय असल्याचे जाहीर केले आहे. इतकेच नव्हे तर हल्ली मॉडर्न रिव्ह्यूबरोबरच तुलना करून आमच्या मासिकांची योग्यता ठरविण्यात येऊ लागली आहे...

"मॉडर्न रिव्ह्यू हे "यशवंत"चे ध्येय नव्हे. नॅश, स्ट्रॅंड, पीअर्सन, लंडन, पाल-माल, अरगॉसी वगैरे इंग्रजी मासिकातील बहुतेक भाग संपूर्ण लघुकथांनीच व्यापलेला असतो. सर्वसाधारण लोकांच्या जीवनाशी ज्याचा विशेष संबंध आहे अशा विषयावर सर्वसाधारण वाचकाना सहज समजतील अशा रीतीने लिहिलेले एक दोन लेखही यापैकी काही मासिकांमध्ये देण्यात येतात. "यशवंत" मासिक याच धर्तीवर चालविण्यात येणार आहे." (संपादकीय निवेदन, 'यशवंत', डिसेंबर १९२८, पृ. २-३).

'करमणूक' आणि 'मनोरंजन' या मासिकांनी लघुकथा आणि कादंबऱ्यांची सुरू केलेली प्रथा 'यशवंत'सारख्या मासिकाने पुढे चालू ठेवली. या मासिकाने युरोपीय भाषांतील कथा-कादंबऱ्यांचे स्वैर अनुवाद आणि रुपांतरेही मोठ्या प्रमाणावर छापली. पहिल्याच अंकात 'एका उत्कृष्ट आंग्ल कथेच्या आधारें' लिहिलेली 'जडावाचा खंजीर' ही संपूर्ण कादंबरी आणि रशियन लेखक पुश्किन याच्या 'डुब्रोवस्की' या कादंबरीचा अनुवाद 'प्रतापराव' प्रसिद्ध केला. 'यशवंत'च्या कादंबऱ्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्या प्रत्येक अंकात क्रमशः न छापता, एकाच अंकात एक संपूर्ण कादंबरी असे. कथात्म वाङ्मयावर भर देण्याचा 'यशवंत'चा प्रयोग तत्कालीन वाचकांना अतिशयच भावला असावा. कारण पहिल्या अंकाच्या सर्व प्रती अवघ्या पंधरा दिवसांत संपल्या असे संपादकांनी पुढील अंकात म्हटले आहे.

केवळ कथा-कादंबऱ्या छापणारी अनेक मासिके पुढील काळात निर्माण झाली. मराठीतल्या दिवाळी अंकांचाही कथा-कादंबऱ्यांकडे कल वाढला. आणि एकाच अंकात अधिकाधिक कथा किंवा कादंबऱ्या देणे हा मासिकांसाठी वाचकांना आकर्षूण घेण्याचा एक हुकमी मार्ग मानला जाऊ लागला. ना. सी. फडके आणि तत्सम लेखकांच्या मनोरंजनपर कादंबऱ्यांची लोकप्रियता १९२०-२५नंतर अतिशय वाढली. याचे एक कारण अशा मासिकांनी जोपासलेल्या मराठी वाचकांच्या अभिरुचीमध्ये दडलेले आहे.

जानेवारी १९२६पासून सुरू झालेल्या 'रत्नाकर' या मासिकाची सर्व रूपरेषा, स्वरूप ना. सी. फडके यांनी आखले होते. 'वैविध्यपूर्ण विषयांवरील वाचनीय मजकुराची आकर्षक मांडणी' हे या मासिकाचे वैशिष्ट्य. "कल्पित वाङ्मयाची आवड बाळगणाऱ्या वाचकापासून तों गंभीर विषयांची चर्चा ऐकूं इच्छिणाऱ्या वाचकांपर्यंत आणि घटकाभर मनोरंजनासाठीं वाचणाऱ्या तरुण स्त्रीपासून तों वादग्रस्त विषयांचा सांगोपांग ऊहापोह करूं पाहणाऱ्या वृद्ध विद्वानापर्यंत" सर्व अभिरुचीच्या वाचकांना अंक आवडावा अशी या

मासिकाची रचना होती. फडके म्हणतात, " 'रत्नाकर' मासिकाची योजना करताना त्याचं जें स्वरूप आम्ही ठरविलं तें तोंपर्यंत होऊन गेलेल्या सर्व मराठी मासिकांहून वेगळ्या प्रकारचं होतं. उच्च प्रतीचं कथावाङ्मय पुरविणारं, वाचकाची बहुश्रुतता व विचारक्षमता वाढेल अशा प्रकारचं ज्ञानसंवर्धक साहित्य सादर करणारं, आणि संगीत, नाट्य, चित्र, शिल्प इत्यादि सर्व कलांविषयीं वाचकाच्या ठिकाणी उच्च अभिरुचि निर्माण करणारं मासिक काढण्याची आमची इच्छा होती...शेवटपर्यंत त्याचं हे पहिलं संकल्पित स्वरूप कायम होतं." (फडके १९४३ : १३०).

संगीत आणि क्रिकेट हे फडक्यांचे आवडते विषय होते. त्यामुळे या दोन विषयांवरील लेखन प्रसिद्ध करण्यावर 'रत्नाकर'ने भर दिला. पहिल्याच अंकात दि. ब. देवधर आणि पी. विठ्ठल यांचा क्रिकेटवरील लेख छापला. गोविंदराव टेंबे यांची संगीताविषयीची लेखमाला प्रसिद्ध केली. बॉम्बे आर्ट सोसायटीच्या चित्रप्रदर्शनाचे वृत्तान्त छापायला सुरुवात केली. आरोग्य, ज्योतिषविद्या, इतिहास, रंगभूमी या विषयांवरील लेख छापले. त्याचबरोबर 'एव्हरीमॅन्स', 'लंडन टाईम्स', 'लिटररी डायजेस्ट' इत्यादी इंग्लिश-अमेरिकी नियतकालिकांतील निवडक मजकूर अनुवादित स्वरूपात छापण्यास सुरुवात केली. 'रत्नाकर'मध्ये जानेवारी १९२७च्या अंकापासून ना. सी. फडके यांची 'जादूगार' ही कादंबरी क्रमशः प्रसिद्ध होऊ लागली. दिवाकरांच्या नाट्यछटा आणि 'गुजगोष्टी' या मथळ्याखाली फडक्यांनी लिहिलेले लघुनिबंध, अशा नव्या वाङ्मयप्रकारांना 'रत्नाकर'ने स्थान दिले. फडक्यांच्या 'दौलत' आणि 'जादूगार' या कादंबऱ्या रत्नाकर मासिकातून वाचकांसमोर क्रमशः आल्या. फडक्यांचे कादंबरीकार म्हणून स्थान मराठी वाचकांत या कादंबऱ्यांमुळे निर्माण झाले.

'रत्नाकर'ने मजकुराची मांडणी तर आकर्षक केलीच; परंतु त्याचबरोबर चित्रांचा समावेश अधिक जाणीवपूर्वक केला. तसे तर 'करमणूक', 'मासिक मनोरंजन', 'केरळकोकिळ' या नियतकालिकांपासून मजकुरासोबत चित्रे छापण्याची प्रथा मराठीत रूढ झाली होती. पण त्या नियतकालिकांमध्ये चित्रे मजकुराला पूरक म्हणून येत. मराठी मासिकांमध्ये 'रत्नाकर'ने प्रथमच चित्रांना एक कला म्हणून स्वतंत्र स्थान दिले. मुंबईतल्या जे. जे. स्कूल ऑफ आर्ट प्रमाणे इतर काही शहरांमध्ये कलाविद्यालये स्थापन झाल्यानंतर महाराष्ट्रात चित्रकलेचा विकास होऊ लागला होता. नवे चित्रकार नावाजले जात होते. चित्रकलेच्या, वास्तुकलेच्या सौंदर्यशास्त्राचा विचार होऊ लागला होता. 'रत्नाकरा'ने या नावाजलेल्या चित्रकारांची चित्रे अंकातून स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्याचे धोरण ठेवले. ज. जी. कला महाविद्यालय आणि बॉम्बे आर्ट सोसायटी यांच्या सहकार्याने मासिकाची दृश्य बाजू सजविली जाईल, अशी घोषणा 'रत्नाकर'च्या पहिल्याच अंकात केलेली दिसते. 'रत्नाकर'च्या प्रत्येक अंकात पूर्ण पानाच्या आकाराचे रंगीत चित्र छापले

जाऊ लागले. पहिल्या अंकात प्रसिद्ध चित्रकार एम. व्ही. धुरंधर यांचे 'समुद्रमंथन' हे चित्र छापले. फेब्रुवारी १९२७च्या अंकात तर बंगालमधील हेमेंद्रनाथ मुजुमदार या चित्रकाराने काढलेले पश्चातापदग्ध स्त्रीचे अर्धनग्न अवस्थेतील चित्र छापण्याचे धाडस दाखवले.

मासिकांना चित्रांनी सजवण्याची ही कल्पना तत्कालीन वाचकांच्या पसंतीस उतरली. १९३६मध्ये सुरू झालेल्या 'ज्योत्स्ना' मासिकाच्या वाचकांनीही "'ज्योत्स्ने'त रत्नाकराप्रमाणे तीनरंगी चित्र यावं, त्यासाठी वर्गणी जास्त देण्याची आमची तयारी आहे," अशी मागणी केली होती (ज्योत्स्ना, जुलै १९३६, पृ. ६३).

अनुवादित कथासाहित्याचा मोठा प्रवाह या काळातल्या मराठी नियतकालिकांतून वाचकांपर्यंत पोहोचला. १९२०पूर्वी बंगाली भाषेतील साहित्याचे मराठी अनुवाद छापण्याचा सातत्यपूर्ण उपक्रम 'मासिक मनोरंजना'ने केला होता. पाश्चात्य लेखकांचेही साहित्य छापले जाऊ लागले. यात १९२०नंतर अधिक वैविध्यपूर्णता आलेली दिसते. 'यशवंत' मासिकाने पाश्चात्य भाषांतील कथासाहित्याचे अनुवाद प्राधान्याने छापायला सुरुवात केली. 'ज्योत्स्ना' मासिकाने हिंदी व इतर भारतीय भाषांतील समकालीन लेखकांचे अनुवादित साहित्य मोठ्या प्रमाणावर छापण्यास सुरुवात केली. १९२०पूर्वी बंगालीतील केवळ कथात्म साहित्याला 'मासिक मनोरंजना'ने प्राधान्य दिले होते. 'ज्योत्स्ने'मध्ये आत्मकथन, समीक्षा अशा प्रकारचेही साहित्य प्रसिद्ध होऊ लागले. सप्टेंबर १९३६च्या अंकात हिंदी साहित्यिक मैथिलीशरण गुप्त यांच्याविषयीचा लेख दिसतो; तर प्रेमचंदांनी आपल्या पहिल्या साहित्यकृतीविषयी हिंदीतील 'हंस'मध्ये लिहिलेला लेख 'ज्योत्स्ना'च्या ऑक्टोबर १९३६च्या अंकात प्रसिद्ध झाला. अशा रीतीने भारतीय व विदेशी परभाषांतील लेखकांच्या साहित्याशी मराठी वाचकांचा परिचय या काळात होऊ लागला. १९३०च्या सुमारास बंगाली, हिंदी, रशियन, फ्रेंच अशा भाषांतल्या अनुवादित कथा साहित्याच्या वाचनाचा परिणाम स्वाभाविकपणे मराठी वाचकांच्या अभिरुचीवर झाला.

या कालखंडातील वाङ्मयीन दृष्ट्या आणखी एक उल्लेखनीय नियतकालिक म्हणजे 'प्रतिभा'. ग. दे. खानोलकर यांनी 'जॉन ओ लंडन्स वीकली' या पत्रावरून प्रेरणा घेऊन १ जानेवारी १९३३ रोजी 'प्रतिभा' हे पाक्षिक स्वरूपात सुरू केले (मोटे ह. वि. १९८० : १२१). "वाङ्मयाद्वारे जीवनातील सर्व शाखांची सेवा करणे, महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील वाङ्मयाच्या प्रगतीला साहाय्य करणे," हा हे पाक्षिक सुरू करण्यामागचा उद्देश होता. त्यांच्यासोबत या मासिकाच्या संपादनाच्या कार्यात के. ना. काळे, वि. ह. कुलकर्णी हे सहभागी झाले होते. परंतु एका वर्षातच आर्थिकदृष्ट्या परवडेनासे झाल्यावर हे पाक्षिक खानोलकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ह. वि. मोटे यांना विकले. मोटे यांनी जानेवारी १९३४पासून जुलै १९३७पर्यंत हे मासिक चालवले.

समकालीन वाङ्मयातील नवे प्रवाह, विचार, मूल्ये, वादसंवाद यांची दखल घेण्याचे धोरण मोटे यांनी ठेवल्यामुळे 'प्रतिभा' हे अल्पावधीतच त्या काळातील महत्त्वाचे वाङ्मयीन नियतकालिक ठरले. वा. म. जोशी यांची 'इंदु काळे आणि सरला भोळे' ही कादंबरी आणि श्रीपाद कृष्ण कोल्हटकर या मोठ्या लेखकाचे आत्मवृत्त 'प्रतिभे'तून क्रमशः प्रसिद्ध झाले. वाङ्मयीन नीतीविषयीच्या कल्पना, नवमतवाद, मार्क्सवाद, कलाविषयक वाद या विषयांवरील लेखन 'प्रतिभे'तून प्रसिद्ध झाले.

या काळातल्या नियतकालिकांच्या संदर्भात आणखी एक उल्लेखनीय बाब म्हणजे, १९२०नंतर उदयाला आलेल्या मराठीतल्या महत्त्वाच्या लेखकांचे या नियतकालिकांशी जवळून संबंध होते. नवी वाङ्मयीन नियतकालिके सुरू करण्यात, या नियतकालिकांना आकार देण्यात त्यांचा सक्रिय सहभाग देखील होता. 'रत्नाकर' मासिकाची निर्मितीच ना. सी. फडके यांच्या संकल्पनेनुसार झाली होती. काही काळ त्यांनी या मासिकाचे संपादनही केले होते. त्यांच्या कादंबऱ्या या मासिकातून क्रमशः प्रसिद्ध झाल्या. 'प्रतिभा'चे संपादन काही काळ इतिहासकार त्र्यंबक शंकर शेजवलकर करत असत. मे १९३६पासून सुरू झालेल्या 'ज्योत्स्ना' मासिकावर संपादक म्हणून वि. स. खांडेकर, यशवंत, प्रभाकर पाध्ये, ग. त्र्यं. माडखोलकर, वि. ह. कुलकर्णी यांची नावे होती. खांडेकरांचा या मासिकाच्या संपादनात सक्रिय सहभाग होता. मासिक सुरू झाल्यानंतर पहिल्याच वर्षी खांडेकरांची 'हिरवा चाफा' ही कादंबरी क्रमशः प्रकाशित झाली.

१९२० ते ४० या काळात वाङ्मयीन नियतकालिके अधिकाधिक 'ललित वाङ्मयप्रधान' कशी होत गेली, सामाजिक-राजकीय विचारांकडून साहित्य-कलाविचाराकडे कशी झुकत गेली ते वरील विवेचनावरून समजून येते. १९२०पर्यंतच्या मराठी साहित्यावर प्रामुख्याने प्रबोधनवाद आणि रोमँटिसिझम यांचे संस्कार होते. १९२०नंतर मार्क्सवाद, गांधीवाद या विचारप्रणाली, मानसशास्त्र, समाजशास्त्र या शास्त्रांमधील नव्या संकल्पना, चित्रकलेसारख्या कलेतील भारतीय आणि पाश्चात्य देशांत होत असलेली स्थित्यंतरे यांची ओळख मराठी वाङ्मयविश्वाला होऊ लागली. ही ओळख करून देण्याचे, त्यावर वाद-चर्चा करण्याचे काम वरील नियतकालिकांनी केले. गेल्या शतकाच्या अखेरपासून संगीत कलेने महाराष्ट्रीय मध्यमवर्गाच्या जीवनात प्रवेश केला होता. महाराष्ट्रात लोकप्रिय असलेल्या संगीत रंगभूमीवर सादर होणाऱ्या गायकीला एकेकाळी शाहिरी संगीताची साथ होती; विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून रंगभूमीवरच्या संगीतावर असलेला शाहिरी-लोकसंगीताचा प्रभाव नाहीसा झाला आणि त्या जागी रागदारी संगीताने प्रवेश केला. तेव्हापासून शास्त्रीय संगीत मराठी मध्यमवर्गात विशेष लोकप्रिय होऊ लागले. 'रत्नाकर'सारख्या मासिकाने याची सर्वप्रथम दखल घेतली आणि संगीतविषयक लेखन छापायला सुरुवात केली. अशा रीतीने एकंदर कलाविषयक मजकूर

प्राधान्याने प्रसिद्ध होऊ लागला.

एकीकडे ललित साहित्यासह इतर वाङ्मयप्रकार आणि चित्रसंगीतादी कला या विषयांना प्राधान्य देणाऱ्या या नियतकालिकांबरोबरच १९२०नंतरच्या काळात सामाजिक-राजकीय विषयांकडे अधिक झुकलेली 'किर्लोस्कर' आणि 'सह्याद्री' ही नियतकालिके देखील लोकप्रिय ठरली. या काळातली वाङ्मय-कलाविषयक मासिके फार काळ टिकू शकली नाहीत. त्यांना चांगला वाचकवर्गही मिळू शकला नाही. पण किर्लोस्कर, सह्याद्री ही नियतकालिके मात्र तुलनेने दीर्घकाळ टिकली व त्यांचा वाचकवर्गही उपरोक्त मासिकांपेक्षा मोठा होता.

विशेषतः १९२० नंतरचा काळ हा 'किर्लोस्कर' मासिकाचा काळ म्हणून ओळखला जातो. मासिके अल्पजीवी ठरण्याच्या या काळात हे मासिक १९२० ते १९८० अशी साठ वर्षे टिकले. त्यातही १९६०पर्यंतच्या महाराष्ट्रातील मध्यमवर्गीय वाचकांमध्ये 'किर्लोस्कर'ने पहिले स्थान पटकावले होते. संपादक शंकरराव किर्लोस्कर यांनी आधुनिक दृष्टीने मासिकाला आकार दिला. मासिक सुरू झाल्यानंतर अवघ्या चार वर्षांत (१९२४) या मासिकाचे सात हजार वर्गणीदार होते. वर्गणीदारांची ही संख्या १९३३मध्ये बारा हजारांवर पोहोचली (मंगेश कश्यप २०१४ : ७८). या मासिकासोबतच किर्लोस्कर समुहाने १९३०मध्ये 'स्त्री' हे स्त्रियांसाठीचे मासिक आणि १९३४मध्ये 'मनोहर' हे तरुणांसाठीचे पाक्षिक सुरू केले.

'किर्लोस्कर'चा कल प्रथमपासूनच सामाजिक-राजकीय विषयांकडे अधिक राहिला. १९२०-३०च्या दशकापासून मध्यमवर्गीय महाराष्ट्रीय समाजाला नवमतवाद, मार्क्सवाद, समाजवाद, स्त्रीमुक्तीवाद या नव्या विचारप्रवाहांची ओळख 'किर्लोस्कर'मधूनच झाली. र. धों. कर्वे यांचे कुटुंबनियोजनाविषयीचे बंडखोर विचार सर्वप्रथम १९२५मध्ये 'किर्लोस्कर'मधूनच प्रसिद्ध झाले. 'किर्लोस्कर'ने बुवाबाजी, अंधश्रद्धा यांविरुद्ध प्रथमच जाहीर लढा पुकारला. पुरोगामी विचारांचा प्रसार केला. अगदी प्रारंभी ललित साहित्य छापायचे नाही, असे 'किर्लोस्कर'चे धोरण होते. 'हे मासिक काल्पनिक गोष्टींसाठी नाही', असे वाक्य मासिकाच्या मुखपृष्ठावर छापले जात असे. परंतु लवकरच 'किर्लोस्कर'ने कथा-कादंबऱ्या-कविता-ललित निबंध असे साहित्य छापायला सुरुवात केली. काशीबाई कानिटकर, वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, वि. सी. गुर्जर, चिं. वि. जोशी इत्यादी त्या काळातले आघाडीचे लेखक 'किर्लोस्कर'मधून लिहीत. 'किर्लोस्कर'चे बाह्यरूप देखणे असे. मुखपृष्ठावर ग. ना. जाधव, बाबुराव पेंटर, माळी अशा त्या काळातल्या प्रसिद्ध मराठी चित्रकारांची रंगीत चित्रे छापली जात.

या काळात रत्नाकर, यशवंत, प्रतिभा, ज्योत्स्ना या नियतकालिकांचा प्रभाव मर्यादित वाचकांवर राहिला. तर बहुसंख्य मध्यमवर्गीय मराठी वाचकांच्या अभिरुचीला

'किर्लोस्कर'ने आकार दिला.

नियतकालिकांचा तिसरा टप्पा : १९४०नंतर – एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपासून जे वाङ्मयीन पर्यावरण महाराष्ट्रात आकार घेत होते, त्याला नवे वळण मिळाले ते १९४०-५०च्या दशकात. १९३०नंतरच बदलाची चाहूल लागली होती. हा बदल केवळ वाङ्मयापुरता मर्यादित नव्हता. या दशकात चित्र, नाटक आणि साहित्य या तीनही कलांमध्ये पारंपरिक अभिरुचीला धक्के बसू लागले. त्याचे मूळ दोन महायुद्धांदरम्यान बदललेल्या युरोपीय विचार आणि कलाविश्वाशी महाराष्ट्रीय/भारतीय कलावंतांच्या व लेखकांच्या आलेल्या संपर्कात होते. आणि दुसरीकडे एतद्देशीय बदलत्या समाजवास्तवात होते. जीवनाकडे पाहण्याची दृष्टी बदलत होती आणि त्याचा परिणाम साहित्य-कलांवर होऊ लागला होता.

हा बदल पुस्तकांपेक्षा नियतकालिकांमध्ये तात्काळ आणि जिवंतपणे जाणवतो. मराठी साहित्यात 'अभिरुचि' आणि 'सत्यकथा' या नियतकालिकांचे युग १९४०-५०च्या दशकात सुरू झाले. नव्याने उदयाला आलेल्या नवसाहित्याची पालखी या मासिकांनी उचलून धरली. कारण दोघांच्याही प्रेरणा सारख्याच होत्या. सत्यकथेने साहित्यात नवे मानदंड प्रस्थापित करण्याचा प्रयत्न आपल्या सौम्य प्रकृतीनुसार केला. परंतु बंडखोरी हा या काळाचा स्थायीभाव होता असे गृहीत धरले, तर ही बंडखोरी जशी गंगाधर गाडगीळ यांच्या नवकथेत आणि बा. सी. मर्ढेकर यांच्या कवितेत होती, तशीच ती 'अभिरुचि' या मासिकातही होती.

पुरुषोत्तम आत्माराम ऊर्फ बाबुराव चित्रे यांनी 'अभिरुचि' हे मासिक फेब्रुवारी १९४३मध्ये बडोदा येथून सुरू केले. त्या काळातील केसरी संस्थेचे प्रस्थापित मासिक 'सह्याद्रि' याचा शंभरावा अंक एप्रिल १९४३मध्ये बाहेर पडला. या अंकाची व एकूणच 'सह्याद्रि'च्या संपादकीय दृष्टीची चिकित्सा 'अभिरुचि'ने केली आहे. प्रस्थापित मासिकावर केलेल्या या टीकेतून 'अभिरुचि'ची बंडखोर वृत्ती स्पष्ट होते : "साहित्य-सम्राट नरसिंह चिंतामण केळकर हे 'सह्याद्री'चे संचालक आहेत व या आठ वर्षांत त्यांचें आठशें पृष्ठें लिखाण 'सह्याद्री'ने छापलें; व त्यांचे 'प्रभावी नेतृत्व' आणि 'रसिक लेखणी' यांचा गौरव संपादकांनी केला आहे...या साहित्य-सम्राटांचा हा दरबार आहे. त्यांचे सरदार-दरकदार आहेत; भालदार-चोपदारहि आहेत. येथें गुणीजनांना वाव आहे; कसबाचें चीज आहे – पण दरबारची शिस्त सांभाळून आणि परंपरा पाळून मग या गोष्टी! म्हणून आश्रित ते आश्रित व (गुणी असले तरी) उपरे ते उपरे हा भेदभाव विसरला जात नाहीं. या ऐदी सरंजामशाहीला स्वतंत्र विचारांचें वारें कसें मानवणार?" ('अभिरुचि', मे १९४३, पृ. ३४).

'साहित्यातील सरंजामशाही'विरोधात बंड पुकारून, प्रस्थापित लेखक व त्यांचे साहित्य यांना नाकारून स्वतंत्र विचाराच्या नव्या साहित्याचा पुरस्कार 'अभिरुचि'ने

केला. जुलै १९४३च्या अंकात संपादकांनी 'अर्धशतकातील लेखकांच्या बंडखोरी'चा परामर्श घेणारा मार्जोरी बोवेन यांच्या लेखाचे भाषांतर छापले. मानवी संस्कृतीच्या विकासात बंडखोर लेखकांचाच वाटा मोठा असतो असा निष्कर्ष या लेखात काढलेला होता. खरे तर तोवरचे मराठीतले आघाडीचे लेखक व त्यांचे लेखन 'पुरोगामी' या सदरात बसवता येणारे होते; १९३०नंतर महाराष्ट्राच्या साहित्य क्षेत्रात 'नवमतवाद' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुरोगामी विचारांचा अतिशय प्रभाव दिसत होता. परंतु या पुरोगामी नवमतवादाची उद्दिष्टे संकुचित होती, आणि दुसऱ्या महायुद्धादरम्यान जागतिक पातळीवर विज्ञानवाद, मानवता इत्यादी मूल्यांनाच शह बसल्याचे पाहून हादरलेल्या महाराष्ट्रीय संवेदनशील कलावंत-लेखकांना या विचारांची सावली पुरेशी वाटणे अवघड होते. संपूर्ण समाजाला आणि त्याच्या बदलत्या स्पंदनांना संवेदनशीलतेने टिपण्यात मराठी साहित्य कमी पडते आहे अशी जाणीव नव्या पिढीतल्या लेखकांना होऊ लागली होती. या जाणिवेला 'अभिरुचि'ने पृष्ठस्तरावर आणले.

अर्थात एका विशिष्ट विचाराशी बांधिलकी मानणारे हे मासिक नव्हते. नव्या जाणिवांच्या विविध आविष्कारांना या मासिकाने स्थान दिले. एकीकडे कुसुमाग्रज, ना. घ. देशपांडे यांच्या कविता छापत असताना दुसरीकडे पु. शि. रेगे, शरच्चंद्र मुक्तिबोध यांच्याही कविता 'अभिरुचि'ने प्राधान्याने प्रसिद्ध केल्या. बा. सी. मर्ढेकरांच्या ज्या कवितेने मराठी साहित्यात वादळ निर्माण केले, ती 'पिपांत मेले ओल्या उंदीर' ही कविता 'अभिरुचि'च्या ऑक्टोबर-नोव्हेंबर १९४६च्या अंकात प्रसिद्ध झाली. १९४७-४८ साली 'अभिरुचि'ने घेतलेल्या कथा स्पर्धेत गंगाधर गाडगीळ यांची 'कडू आणि गोड' आणि व्यंकटेश माडगूळकर यांची 'देवा सटवा महार' या कथांना प्रथम पुरस्कार मिळाला. गाडगीळांच्या कथा चाळीसच्या दशकाच्या प्रारंभापासून इतरही नियतकालिकांत छापल्या जात होत्या, हे खरे असले तरी 'अभिरुचि'ने नवसाहित्याचा प्रसारक म्हणून मोठी कामगिरी बजावली होती.

१९५० ते ८० या काळात मराठी वाङ्मयाभिरुचीवर ज्यांच्या संपादकीय दृष्टीचा गाढा प्रभाव होता, त्या श्री. पु. भागवतांची वाङ्मयीन जडणघडण 'अभिरुचि' मासिकाने मोकळ्या केलेल्या वाङ्मयीन वातावरणात झाली. 'अभिरुचि'च्या वाङ्मयीन योगदानाबद्दल त्यांची साक्ष पुरेशी आहे, "कामत (ग. रा.) काय किंवा मी काय, किंवा साहित्यावर वेड्यासारखे प्रेम करणारे इतर वाचक काय, साहित्यकलाविषयीची आमची अभिरुची, सांस्कृतिक प्रश्नांविषयीची आमची जाण आणि भाषेविषयीची आमची दृष्टी घडवण्यात 'अभिरुचि' मासिकाचा मोठाच वाटा होता. त्यात प्रसिद्ध होणारी प्रत्येक कविता, कथा, ललित किंवा समीक्षणात्मक लेख, परीक्षणे, 'वाद-संवादा'तील टिपणे, पत्रे, सारे आम्ही जीव लावून वाचत असू." (श्री. पु. भागवत : साहित्याची भूमी, पृ. ०२).

या संस्कारित दृष्टीनेच श्री. पु. भागवतांनी 'सत्यकथा' मासिक चालवायला घेतले. नोव्हेंबर १९३३ मध्ये मो. ग. रांगणेकर यांनी सुरू केलेले 'सत्यकथा' हे मासिक १९४५-४६पासून श्री. पु. भागवतांकडे आले. 'सत्यकथे'ने नवसाहित्याच्या प्रकाशनाला अग्रस्थान दिले. अशा रीतीने १९४०नंतरच्या दशकावर या दोन वाङ्मयीन मासिकांनी आपली ठळक मुद्रा उमटवली.

## ८.६. इतिकथन

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे कोणत्याही समाजातील सांस्कृतिक प्रवाह अखंडितपणे वाहात असतो. या प्रवाहातील विशिष्ट कालखंडाचा इतिहास मांडायचा असल्यास त्याचा आरंभ बिंदू आणि विराम बिंदू निश्चित करावा लागतो. हा आरंभ आणि विराम विवेचनाच्या सोयीसाठी असल्याने तो बराचसा कृत्रिमच असतो. आरंभ बिंदूच्या मागे भूतकाळात त्या सांस्कृतिक प्रवाहातील काही पदर अस्तित्वात असतात आणि विराम बिंदूच्याही पुढे ते प्रवाहित होताना दिसतात. त्यांची भूतकाळातील ही मूळे व भविष्यातील प्रवासाची दिशा यांच्या संदर्भात मधल्या विवेच्य काळाचा इतिहास मांडावा लागतो.

वाङ्मयीन संस्कृतीचा १९०१ ते १९५० या कालखंडाचा तुकडा आपल्यासमोर मांडताना ही कसरत येथेही करावी लागली आहे. त्यामुळे विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून दिसणाऱ्या मराठी वाङ्मयीन संस्कृतीतील काही घटकांचे मूळ आधीच्या, एकोणिसाव्या शतकाच्या वाङ्मयीन संस्कृतीमध्ये कसे सापडते, याचा विचार मांडला आहे. त्याचबरोबर १९४० ते ५० या विवेच्य काळाच्या अखेरच्या दशकात मराठी वाङ्मयाभिरुचीमध्ये जी उलथापालथ झाली, त्याचा परिणाम भविष्यातील, म्हणजे १९५०नंतरच्या वाङ्मयीन संस्कृतीवर कसा झाला याविषयी थोडक्यात निरीक्षणे मांडली आहेत.

वाङ्मयीन संस्कृती ही व्यापक संस्कृतीचा एक भाग असते, आणि ही व्यापक संस्कृती राजकीय, सामाजिक, आर्थिक अशा अनेक अंगांनी बनलेली असते याची जाणीव ठेवून मराठी वाङ्मयीन संस्कृतीतील घटकांचा, मूल्यांचा भोवतालच्या परिस्थितीशी कसकसा संबंध होता, त्याचे परस्परांवर कोणते परिणाम झाले याचाही विचार मांडला आहे. मराठी वाङ्मयीन अभिरुची, वाङ्मयाचे मानदंड, साहित्यप्रकार आणि साहित्यातील निरनिराळ्या प्रवृत्ती यांवर त्यांचे झालेले परिणाम यांचा वेध घेतला आहे. आजवर मराठी वाङ्मयाचे इतिहास अनेक लिहिले गेले आहेत. या इतिहासाच्या सांस्कृतिक अंगाचे हे विवेचन आहे.

❑❑❑



बालगंधर्व




किर्लोस्कर नाटक मंडळी : 'मानापमान' (१९११), मुंबई

# ९

# नाट्यकलेतील स्थित्यंतरे

## ९.१. पूर्वकथन :

नाटक हे विसाव्या शतकाच्या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचे एक प्रमुख अंग होते. 'मराठी माणूस नाटकवेडा आहे' हे विधान आता एक 'क्लिशे' बनलेले असले, तरी विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या दोनतीन दशकांत महाराष्ट्रीय समाजाच्या नसानसांत नाट्यकला ज्या प्रचंड प्रमाणात आणि ज्या तीव्रतेने भिनली होती, ती पाहूनच महाराष्ट्रीय समाजाला देशभरात अशी ओळख प्राप्त झाली होती. या समाजासाठी नाटक हा चारसहा तास मनोरंजन करणारा केवळ एक खेळ नव्हता, तर तो त्यांच्या जीवनाला व्यापणारा हिस्सा बनला होता. गावोगावी नाटकांचे खेळ करण्यासाठी आपला लवाजमा घेऊन हिंडणाऱ्या नाटक कंपन्यांचे स्वतःचे असे एक सांस्कृतिक विश्व तयार झाले होते. १८८०साली किर्लोस्कर संगीत मंडळीच्या माध्यमातून संगीत नाटकांच्या रूपाने मराठी रंगभूमीवर क्रांती करणारे अण्णासाहेब किर्लोस्कर हे या सांस्कृतिक विश्वाचे आद्यपुरुष मानले जात. या नाटक मंडळ्या, त्यांचे दौरे, त्यांचे रंगमंचावर रात्र-रात्र रंगणारे खेळ या सर्व वातावरणाने तत्कालीन महाराष्ट्रीय समाजाला दोनतीन दशके तरी संमोहित केले. या नाटक कंपन्यांचा समाजावर पडलेला प्रभाव फक्त नाटकांपुरता मर्यादित नव्हता. अभिनय, संगीत आणि पडदे-देखावे यांच्या माध्यमातून दृश्यकला – अशा बहुस्तरीय कलात्मक अभिरुचीचे संस्कार मराठी मनावर केले. नाटक कंपन्यांनी गायन-वादनाची आवड गावा-शहरांत पोहोचवली. नाटक कंपन्यांमधले काहीसे मुक्त-स्वतंत्र वातावरण हे त्या काळातल्या बंदिस्त, नेमस्त समाजातल्या घुसमटणाऱ्या तरुणाईसाठी स्वातंत्र्याचे नंदनवन भासले. त्यामुळे त्या काळातले तरुण वेगवेगळ्या नात्यांनी नाटक कंपन्यांच्या या बहुरंगी विश्वाकडे आकर्षिली गेली.

विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकापासून मराठी रंगभूमीवर बऱ्याच नव्या गोष्टी घडू

लागल्या. किर्लोस्कर संगीत मंडळी ही संगीत नाटकांना जन्म देणारी कंपनी तेव्हा श्री. कृ. कोल्हटकरांची कल्पनाप्रधान नाटके यशस्वीरित्या करत होती. कृ. प्र. खाडिलकरांची सूचक राजकीय-सामाजिक आशय व्यक्त करणारी पौराणिक नाटके लोकप्रिय होत होती. नाटकाविषयीची मासिके याच काळात निघू लागली. अनंत वामन बरवे या नाटककाराने १९०४मध्ये 'नाट्यकला' हे नाटक या विषयाला वाहिलेले पहिले मासिक सुरू केले. ते पुढे दोन-तीन वर्षे चालले (बाबूराव जोशी १९७४ : ४०). त्यानंतर १९०७मध्ये किर्लोस्कर संगीत मंडळीचे चालक शंकरराव मुजुमदार यांनी नाट्यकला आणि नाट्यव्यवसाय यासंबंधीच्या प्रश्नांची चर्चा करणारे 'रंगभूमी' हे मासिक सुरू केले. राम गणेश गडकरी नाटककार होण्यापूर्वी टोपण नावाने या मासिकातून लिहीत असत. या उपक्रमांमुळे नाट्यकलेचा अधिक गंभीरपणे विचार सुरू झाला.

नाट्यकलेच्या भरभराटीच्या काळात नाटककार हे एकंदर मराठी साहित्यविश्वात अग्रेसर साहित्यिक ठरले आणि रंगभूमीवरचे नट हे समाजासाठी 'सुपरस्टार' बनले. संगीतक्षेत्रातल्या दिग्गज गवयांनी, संगीतकारांनी या रंगभूमीवर हुकूमत गाजवली. विसाव्या शतकाच्या दुसऱ्यातिसऱ्या दशकांत सुमारे चाळीस नाटक कंपन्या महाराष्ट्रात – आणि महाराष्ट्राबाहेरही – एकाच वेळी नाटकांचे प्रदर्शन करत हिंडत होत्या (पु. रा. लेले १९६५ : ७). यात गायनाने भरगच्च अशी संगीत नाटके होती, तशीच गद्य नाटकेही होती. १९३०-३५च्या सुमारास नाटक मंडळ्यांच्या या जगाला ओहोटी लागली. नाटकांचा प्रेक्षकवर्ग कमी होऊ लागला. त्याचे एक कारण होते १९३३मध्ये झालेला बोलपटांचा उदय. १९४०चे दशक हा जागतिक पटावर राजकीयदृष्ट्या मोठ्या स्थित्यंतरांचा काळ होता. या काळात भारतीय समाजाची आणि येथील कलाजीवनाचीही घडी बदलू लागली होती. महाराष्ट्रीय समाजावर नव्या विचारांचा, नव्या कलादृष्टीचा प्रभाव पडू लागला होता. १९४०च्या सुमारास चित्रकला, साहित्य या क्षेत्रांतही नव्या आविष्काराचे जोमदार वारे वाहू लागले होते. त्याचा परिणाम नाटकांवरही झाला. १९४१नंतर मराठी नाटकांचे स्वरूप बरेच पालटले. पौराणिक, कल्पनाप्रधान कथानकांवर आधारित संगीत किंवा गद्य स्वरूपाची नाटके मागे पडली. मराठी नाटक वास्तव जीवनाची अनुकृति करू लागले. गावोगाव आपल्या नटकलावंतांचा लवाजमा घेऊन हिंडणाऱ्या नाटक मंडळ्यांचा अस्त झाला. नाट्यमन्वंतर, रेडिओ स्टार्स, नाट्यकलानिकेतन यांसारख्या नव्या नाट्यसंस्था सुरू झाल्या, परंतु त्यांचे स्वरूप पारंपरिक नाटक मंडळ्यांहून भिन्न होते. मुंबई मराठी साहित्य संघाने मराठी नाट्यकलेचे पुनरुज्जीवन करण्याचा उपक्रम राबवला. संघाच्या नाट्यचळवळीचे लोण मुंबई-पुण्याबाहेर छोट्या शहरांमध्येही पोहोचले. अशा रीतीने १९४०नंतर मराठी नाट्यसृष्टीचे नवे पर्व सुरू झाले.

नाटक हे तमाशा, लळीत, दशावतार या लोकनाट्य-प्रकारांच्या स्वरूपात

आधीपासून अस्तित्वात होते. परंतु या लोकाविष्कारांचा प्रेक्षकवर्ग प्रामुख्याने अशिक्षित, अनागर असा बहुजनसमाज होता. नागर, शिक्षित, पांढरपेशा समाजातील श्रोत्याला रंगभूमीपर्यंत खेचून आणून तिच्याशी मंतरल्याप्रमाणे जखडून टाकण्याचे काम सर्वप्रथम केले ते अण्णासाहेब किर्लोस्करांनी. विष्णुदास भावे यांनी लोकपरंपरेतील नाट्यरूपांचा समन्वय साधून आधुनिक नाटकाच्या दिशेने पहिले पाऊल टाकले होते. त्यांच्या नाटकांचे स्वरूप पौराणिक व पारंपरिक नाट्यप्रकारांना अधिक जवळचे होते. त्या टप्प्यावरून आणखी पुढे झेप घेऊन पाश्चात्य नाटके, संस्कृत नाटके यांच्याशी दुवा जोडत आकर्षक-मनोरंजक भाषेतील नाट्यसंहिता, पदांना अधिक सुश्राव्य व वैविध्यतापूर्ण चाली, उत्तम रंगवलेले पडदे असा नेटका सफाईदार प्रयोग किर्लोस्करांनी रंगभूमीवर उभा केला. सतत नवे काहीतरी देण्याच्या स्पर्धात्मक हव्यासातून का असेना, पण या आविष्काररूपात पुढे आणखी बदल होत गेले.

या काळात नव्यानेच शिक्षण घेऊन सरकारी नोकऱ्यांमध्ये शिरलेला व स्थिर चौकटबद्ध जीवन जगणारा पांढरपेशा वर्ग शहरांमध्ये निर्माण होऊ लागला होता. या वर्गात नाटक अतिशय भिनले. महाराष्ट्रातला अनागर-अशिक्षित समाज समाजव्यवहार आणि संस्कृतीव्यवहारात बऱ्याच प्रमाणात या नागर-पांढरपेशा समाजाचे अनुकरण करत असल्यामुळे, नाटकामध्ये याही वर्गाची रूची वाढू लागली. अशा रीतीने महाराष्ट्रभर नाट्यकलेचा प्रभाव पडला.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील नाट्यकलेच्या इतिहासाचा बराचसा भाग नाटक मंडळ्या, त्यांचे नट आणि नाटककार यांनी व्यापलेला आहे. 'मानापमान' नाटकापासून (१९११) संगीतकारांनी स्वतःचे स्थान निर्माण केले. नाटकाचा आशय, सादरीकरण, संगीत, पडदे आणि देखाव्यांची सजावट या सर्व अंगांनी झालेले नवे प्रयोग नाटक मंडळ्यांचे चालक, नट आणि नाटककार यांच्या विचाराने, प्रेरणेने झाले. नाट्यकलेतल्या या स्थित्यंतरांवर पारशी-उर्दू-गुजराती-इंग्रजी रंगभूमीचा प्रभाव आणि प्रेक्षकांच्या नाटकाविषयीच्या बदलत्या अपेक्षा यांचा दाब एका बाजूने होता. नाटक हा एक 'व्यवसाय' झाल्यामुळे प्रेक्षकांच्या आवडीनिवडीला नाट्यसादरीकरणात अतिशय महत्त्व निर्माण झाले. १९३०च्या दशकात 'संगीत नाटकांमधले नाटक हरवले आणि केवळ संगीताचा अतिरेक झाला' असे म्हटले जाते. हा दोष प्रेक्षकशरणतेमुळे झाला होता. १९३३मध्ये बोलपटांचे आगमन झाल्यावर नाटकाची लोकप्रियता झपाट्याने ओसरली. नाटक कंपन्यांच्या आधाराने उभ्या राहिलेल्या मराठी नाट्यसृष्टीचा डोलारा १९४०च्या दशकात कोसळला. पारंपरिक नाट्यसृष्टीत पसरलेल्या काहीशा निराशाजनक वातावरणात, १९४३मध्ये, मराठी रंगभूमीचा शतसांवत्सरिक महोत्सव साजरा झाला. आणि त्यातून नव्या दृष्टीने मराठी रंगभूमीची वाटचाल पुन्हा एकदा सुरू झाली.

१९५०पर्यंत मराठी रंगभूमीच्या भविष्यातील वाटचालीच्या दिशा स्पष्ट झाल्या होत्या.

## १९०१ पूर्वीच्या नाटक मंडळ्यांची रंगभूमी

१९०१नंतरच्या मराठी नाट्यसृष्टीची पार्श्वभूमी समजावून घेण्यासाठी संगीत रंगभूमीच्या उदयापासून, म्हणजे १८८०पासूनच्या नाट्यक्षेत्रातले ठळक टप्पे, बदल पाहायला हवेत. अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या किर्लोस्कर संगीत मंडळीने रंगभूमीवर आणलेल्या 'शाकुंतल', 'सौभद्र', 'रामराज्यवियोग' या नाटकांनी संगीत रंगभूमीची लोकप्रियता तर महाराष्ट्रभर वाढवलीच, पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे मूळ पौराणिक कथेला आकर्षक संगीताची जोड देऊन वेगळ्या स्वरूपात सादर करण्याचा नवा आदर्श आकृतिबंध मराठी नाट्यसृष्टीत निर्माण केला.

किर्लोस्करच्या संगीत नाटकांप्रमाणेच गद्य नाटकेही या काळात सादर होत होतीच. १८८०पासून मराठी रंगभूमीवर एकीकडे किर्लोस्कर मंडळीच्या नाटकांनी संगीत नाटकांचा नवा प्रवाह निर्माण केला, तर दुसरीकडे १८८१साली स्थापन झालेल्या 'शाहूनगरवासी नाटक मंडळी'ने गद्य नाटके नव्या स्वरूपात रंगभूमीवर आणली. संगीत रंगभूमीवर १९००पर्यंत जसे किर्लोस्कर मंडळीचे भाऊराव कोल्हटकर अतिप्रसिद्ध होते, तसे गद्य रंगभूमीवर 'शाहूनगरवासी'च्या गणपतराव जोशांचे नाव झाले होते. गो. ब. देवल यांचे 'फाल्गुनराव' हे नाटक सर्वप्रथम शाहूनगरवासी मंडळीनेच १८९३मध्ये रंगभूमीवर आणले होते. पुढे वीस वर्षांनी या नाटकाचे 'संशयकल्लोळ' हे संगीत नाटक-रूप गंधर्व संगीत मंडळीने लोकप्रिय केले. 'संशयकल्लोळ' लोकप्रिय झाल्यानंतरही शाहूनगरवासी मंडळी गद्य 'फाल्गुनराव'चे प्रयोग करत होती. गणपतराव जोशांनी शेक्सपिअरच्या नाटकांची 'हॅम्लेट', 'झुंजारराव' ('ऑथेल्लो'), 'मानाजीराव' ('मॅकबेथ'), 'त्राटिका' ('टेमिंग ऑफ द् श्रू') ही भाषांतरे मराठी रंगभूमीवर आणली. या नाटक मंडळीने शेक्सपिअरच्या नाटकांचे यशस्वी नाट्यरुपांतर रंगभूमीवर सादर करण्यामागे पुण्याच्या प्रा. वासुदेवराव केळकर यांनी दिलेले नाट्यशिक्षणही कारणीभूत ठरले होते.

किर्लोस्कर संगीत मंडळी मराठी रंगभूमीवर इतिहास रचत होती, तेव्हा इतरही नाटक कंपन्यांच्या कर्तृत्वाची त्याला जोड होती. किर्लोस्कर मंडळीच्याही दोन वर्षे आधीपासून सोकर बापू त्रिलोकेकर यांच्या 'त्रिलोकेकर संगीत मंडळी'ने नाटकातील सूत्रधाराऐवजी पात्रांच्या मुखाने पदांचे गायन करण्याची पद्धत आपल्या नाटकांत अवलंबली होती. वासुदेव नारायण डोंगरे यांची 'डोंगरे संगीत मंडळी' आणि दातारशास्त्रींची आख्याने रंगभूमीवर सादर करणारी 'इचलकरंजीकर नाटक मंडळी' या दोन संस्था १८९१-९२पर्यंत कार्यरत होत्या. १८९०मध्ये स्थापन झालेली वाईकर संगीत मंडळी पांडुरंग गोपाळ गुरव यवतेश्वर या गवयाने स्थापन केली होती. किर्लोस्करी वळणाचे लावणी ढंगाचे संगीत किंवा पारशी-उर्दू रंगभूमीच्या प्रभावाने आलेले उडत्या चालींचे संगीत यांनी मराठी

रंगभूमीला भ्रष्ट केले आहे; या भूमिकेतून शुद्ध शास्त्रीय वळणाचे संगीत आपल्या नाटकांतून मराठी रंगभूमीवर रुजवण्याचा प्रयत्न पांडुरंगबुवांनी वाईकर संगीत मंडळीच्या माध्यमातून केला. परंतु या मंडळीचे नाट्यसंगीत प्रेक्षकांच्या पसंतीस उतरले नाही. विसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत ही मंडळी बंद पडली होती.

नरहरीबुवा सरडे यांची 'चित्तचक्षु चमत्कारिक कोल्हापूरकर नाटक मंडळी' ही १८६५पासून नाटकांचे खेळ करणारी जुनी संस्था, १८९८मध्ये अस्तंगत झाली. निरनिराळे देखावे रंगवलेले पडदे नाटकात वापरण्यासाठी ही संस्था विशेष प्रसिद्ध होती. किर्लोस्कर मंडळीची नाटके मध्यमवर्गात लोकप्रिय होत होती, त्याच काळात शहरातले गिरणी कामगार, मजूर यांसह अनागर बहुजन समाजामध्ये किर्लोस्करहूनही अधिक प्रसिद्धी माधव नारायण पाटणकर यांच्या 'पाटणकर संगीत मंडळी'च्या नाटकांना मिळत होती. १८६२पासून रंगभूमीवर असलेली ही मंडळी १९१६पर्यंत अस्तित्वात होती. त्या काळातल्या पारशी-उर्दू रंगभूमीवरचे उडत्या चालींचे संगीत पाटणकर मंडळीने मराठी रंगभूमीवर आणले. स्त्री-पुरुष द्वंद्वगीतांचे 'झगडे' म्हणून ओळखले जाणारे रूप या काळात अत्यंत लोकप्रिय होते. त्याचे अनुकरण 'पाटणकर मंडळी'ने मराठी नाटकांत केले.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात दोन नव्या नाटक मंडळ्या स्थापन झाल्या : स्वदेश हितचिंतक मंडळी आणि नाट्यकलाप्रवर्तक मंडळी. 'स्वदेश हितचिंतक नाटक मंडळी' या संस्थेची स्थापना १८९४मध्ये जनुभाऊ निमकर, त्यांचे बंधू, गणपतराव लळीत इत्यादींनी मिळून सुरू केली. केशवराव भोसले या नावाजलेल्या गायक-नटाचा उदय स्वदेशच्याच रंगमंचावर १९०२मध्ये झाला. १९१२पर्यंत या मंडळीचे अस्तित्व दिसते. केशवराव भोसले आणि किर्लोस्कर मंडळीतून आलेले कृष्णराव गोरे हे या मंडळीतील दोन प्रमुख गायक-नट होते. पुढे १९०८मध्ये केशवराव भोसलेंनी स्वदेश हितचिंतक मंडळी सोडली. त्यानंतरही मामा वरेरकरांची 'कुंजविहारी', 'संजीवनी' ही नाटके संस्थेने रंगभूमीवर आणली. कृष्णराव गोरे, विष्णुपंत पागनीस यांच्या स्त्रीभूमिका असलेले 'कुंजविहारी' हे १९०८मध्ये रंगभूमीवर आलेले नाटक अतिशय लोकप्रिय झाले. त्याचे मुंबईत ओळीने पन्नास-साठ प्रयोग झाले होते (वसंत देसाई १९६२ : १०).

'नाट्यकलाप्रवर्तक मंडळी'ची स्थापना १८९५मध्ये झाली. या मंडळीचे अस्तित्व विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकापर्यंत होते. गोपाळराव मराठे, माधवराव केळकर, बाबूराव जोशी हे नट या नाट्यसंस्थेत प्रमुख होते. वासुदेवराव पटवर्धनही या मंडळीशी संबंधित होते. शेक्सपिअरच्या नाटकांचे मराठी रुपांतर करून त्याला संगीताची जोड देण्याचा उपक्रम या मंडळीने केला. परंतु प्रेक्षकांना हे प्रयोग भावले नाहीत. या मंडळीच्या नाटकांचा प्रभाव मराठी नाट्यरसिकांवर फारसा पडू शकला नाही. हरि नारायण आपटे

यांचे 'संत सखू' हे या मंडळीचे एकमेव लोकप्रिय नाटक होते. १९२१नंतर भाटेबुवा आणि यशवंतराव मिराशीबुवा यांनी 'नाट्यकलाप्रवर्तन' मंडळीचे काम पाहिले. हे दोघेही विष्णु दिगंबर पलुस्करांच्या संप्रदायातले. दोघांचाही भर संगीतावर अधिक, पण नाटकाच्या अभिनयाच्या अंगाकडे दुर्लक्ष. 'संत सखू'ला मिळणारा प्रतिसाद कमी होऊ लागला, तसे भाटेबुवांनी 'पंजाब मेल' या जुन्या नाटकाचे प्रयोग सुरू केले. परंतु या कंपनीला प्रेक्षकांचा प्रतिसाद यथातथाच राहिला.

या नाटक कंपन्यांच्या माध्यमातून एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दोन दशकांत मराठी नाट्यसृष्टीची घडण होत गेली. नाटक धंद्याला मिळणारी प्रतिष्ठा आणि पैसा पाहून अनेकांनी नाट्यव्यवसायात प्रवेश केला. अनेक नटांनी स्वतःच्या नाटक कंपन्या काढण्याचे धाडस केले. संस्थानिक, व्यापारी धनिक यांनी अर्थपुरवठा केला. या नाट्यसृष्टीतून उभे राहिलेले नवे नाटक आणि त्याभोवती निर्माण झालेली एकंदर मराठी नाट्यसंस्कृती यांची ठळक वैशिष्ट्ये सूत्ररूपाने पुढीलप्रमाणे सांगता येतील :

१) पारंपरिक नाटकात सूत्रधारच सर्व पदे म्हणत असे. त्याऐवजी नाटकातील प्रमुख अशी सर्वच पात्रे पदे गाऊ लागली. त्यामुळे गायनातील एकसुरीपणा जाऊन आवाजाचे, सादरीकरणाचे वैविध्य निर्माण झाले. पदांची संख्या प्रचंड वाढली. 'शाकुंतल'मध्ये तब्बल दोनशे पदे होती, तर 'सौभद्रा'त सुमारे शंभर. गोविंद बल्लाळ देवल यांच्या 'मृच्छकटिक' आणि 'शापसंभ्रम' या नाटकांत अनुक्रमे १६० व ११५ पदे होती.

२) नाटकातील पदांमधून कथानक पुढे सरकत असे. त्यामुळे कथानकाशी पदे व त्यांचे गायन एकरूप होऊन गेले. कथासूत्रात गोवलेली ही पदे नाटकातील कलात्मक रचनेचे आणि भावनाविष्काराचे कार्य अधिक प्रभावीपणे करतात, याची अण्णासाहेब किर्लोस्कर व त्यांच्या नटांना जाणीव होती. त्यामुळे भरपूर पदे असली तरी प्रेक्षकांना त्यांचा कंटाळा आला नाही; उलट या पदांसाठी, त्यांच्या संगीतांसाठी प्रेक्षकांचे पाय पुनःपुन्हा नाटकांकडे वळू लागले. पुढे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात नाट्यसंगीत हीच मराठी रंगभूमीची प्रमुख ओळख ठरली. किंबहुना अमराठी प्रेक्षकांमध्ये देखील मराठी रंगभूमीने अभूतपूर्व लोकप्रियता मिळवली, ती या संगीताच्या बळावर. मुंबईतील अमराठी प्रेक्षक केवळ बालगंधर्वांचे गायन ऐकण्यासाठी मराठी नाटकांना गर्दी करत.

३) महत्त्वाच्या भूमिका करणाऱ्या सर्वच नटांच्या वाट्याला पदांचे गायन आल्यामुळे गायनकला शिकलेल्या नटांना मराठी रंगभूमीवर महत्त्व प्राप्त झाले. मोरोबा वाघोलीकर, बाळकोबा नाटेकर, हे किर्लोस्करच्या रंगभूमीवरील प्रसिद्ध नट गायनपरंपरेतले होते. भाऊराव कोल्हटकर आधी गाणे शिकलेले नसले, तरी त्यांच्याही घराण्यात हरदासी कीर्तनकाराची परंपरा होती. नाटकात आल्यानंतर त्यांनी लावणी व ठुमरी ढंगाचे गायन इतके उत्तम आत्मसात केले की भाऊराव कोल्हटकर उर्फ 'भावड्या' याचे गाणे ही मराठी

संगीत रंगभूमीवरची एक कायमस्वरूपी 'दंतकथा' बनली. पुढे संगीत रंगभूमीवर नानासाहेब जोगळेकर, दत्तोपंत हल्याळकर, बालगंधर्व, केशवराव भोसले, मास्टर कृष्णराव, मास्टर दीनानाथ, सवाई गंधर्व, कृष्णराव गोरे, शंकरराव सरनाईक, गंगाधर लोंढे, इत्यादी गायक असलेल्या नटांनीच कारकीर्द गाजवली.

४) एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस किर्लोस्करी नाटकांचे संगीत लोकसंगीतातली भक्तिगीते, स्त्रीगीते आणि लावणी-टप्पा यांसारखे लोकप्रिय गायनप्रकार यांवर आधारित असे. किर्लोस्कर कर्नाटकातले असल्याने त्यांनी कर्नाटकी संगीताचाही थोडाफार स्पर्श आपल्या नाटकांतील संगीताला दिला. १८९०नंतर हिंदुस्थानी संगीतातील अनेक मातब्बर गवई महाराष्ट्रात वावरू लागले. त्यांचा आणि मराठी नाटक मंडळ्यांचा संपर्क आला. त्यातून हिंदुस्थानी संगीत मराठी रंगीत रंगभूमीवर अवतरले.

५) नाटककार आणि नट यांना किर्लोस्करी नाटकांमध्ये महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. स्वतः अण्णासाहेब किर्लोस्कर आणि गो. ब. देवल हे किर्लोस्कर मंडळीचे प्रमुख नाटककार नाट्यपरंपरेतले होते. १८९५नंतर श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर हे वाङ्मयीन क्षेत्रातले नामवंत लेखक नाटककार म्हणून किर्लोस्कर मंडळीला मिळाले. विसाव्या शतकात कोल्हटकर-खाडिलकर यांच्या जोडीला राम गणेश गडकरी, मामा वरेरकर या नाटककारांनी रंगभूमी गाजवली. हे सगळे त्या काळात मराठीतले श्रेष्ठ लेखक म्हणून मान्यता पावले होते. मराठी लेखकांत तेव्हा नाटककार होण्याचे आकर्षण होते. ह. ना. आपटे, वि. स. खांडेकर, ना. सी. फडके या मराठीतल्या पहिल्या फळीच्या कादंबरीकारांनाही नाटके लिहून पाहावीशी वाटली, यावरुन हे स्पष्ट होते.

६) नाटककार आणि नट यांच्या खालोखाल मराठी नाट्यसृष्टीत तालीम मास्तर हा आणखी एक महत्त्वाचा घटक होता. नव्याने प्रवेशणाऱ्याच नव्हे, तर प्रस्थापित नटांनाही प्रत्येक नव्या नाटकाच्या तालमी तालीम मास्तरांच्या मार्गदर्शनाखाली कराव्या लागत. किर्लोस्कर मंडळीचे तालीम मास्तर गो. ब. देवल हे होते. भाऊराव कोल्हटकरांपासून नानासाहेब जोगळेकर, गणेश गोविंद (गणपतराव) बोडस, बालगंधर्व इत्यादी नट देवलांच्या हाताखाली तयार झाले. देवलांनंतर चिंतोबा गुरव, गणपतराव बोडस हे नट तालीम मास्तर म्हणून नावाजलेले होते. बऱ्याचदा नाटककार हाच स्वतःचे नाटक नटांकडून स्वतःला हवे तसे बसवून घेई. त्यामुळे कृ. प्र. खाडिलकर, मामा वरेरकर हे नाटक मंडळ्यांमध्ये आपापल्या नाटकांसाठी तालीम मास्तर म्हणूनही काम करत.

७) एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पुणे, मुंबई, कोल्हापूर येथील महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या तरुणांमध्ये नाटकाविषयी रुची निर्माण झाली. याला पाश्चात्त्य भाषांमधील अभ्यासक्रमात नेमलेली नाटकेही कारणीभूत ठरली. यामुळेच

शेक्सपिअरच्या नाटकांची अनेक भाषांतरे, रुपांतरे १८७०नंतर मराठीत झाली. किर्लोस्कर मंडळीच्या नाटकांमुळे नागर मराठी पांढरपेशा समाजात नाटकाचा प्रेक्षक मराठी रंगभूमीच्या इतिहासात प्रथमच निर्माण झाला. समाजाच्या याच वर्गातून तत्कालीन सामाजिक व राजकीय चळवळींचे नेतृत्व निर्माण झाले होते. त्यांचेही नाट्यसृष्टीशी संबंध निर्माण झाले. लोकमान्य टिळक, न्यायमूर्ती रानडे अशा समाजधुरिणांपासून शाहू महाराज, सयाजीराव महाराज अशा संस्थानिकांपर्यंत अनेकांशी नाटक मंडळ्यांच्या चालकांचे सौहार्दपूर्ण संबंध प्रस्थापित झाले. नामांकित वकील, डॉक्टर्स, धनाढ्य व्यापारी हे नाटक मंडळ्यांचे आश्रयदाते बनले. वकिलीचे शिक्षण घेणारा नानासाहेब जोगळेकरांसारखा तरुण, लोकमान्य टिळकांच्या सल्ल्यावरून किर्लोस्कर संगीत मंडळीचा नट व मालक बनला; तर वसंत शांताराम देसाईसारखा न्यायाधीश पदावरील नाट्यरसिक नाटक मंडळ्यांच्या बिऱ्हाडी इतका रमला की तो स्वतः गंधर्व संगीत मंडळीचा नाटककार बनला. थोडक्यात, अभिनयकलेला एकेकाळी हीन लेखले जाई; त्या कलेने समाजातील प्रतिष्ठित-अभिजनांच्या विश्वात सन्मानाचे स्थान पटकावले.

**किर्लोस्कर संगीत मंडळीचे योगदान**

वर म्हटल्याप्रमाणे मराठी नाट्यसृष्टीत एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस नवे मानदंड उभे राहिले, त्यात किर्लोस्कर नाटक कंपनीचा वाटा मोठा होता. भाऊराव कोल्हटकरांसारखा संस्मरणीय गायक-नट किर्लोस्कर मंडळीने मराठी रंगभूमीला दिला. भाऊरावांची छाप प्रेक्षकांवर कशी पडत होती याविषयीच्या अनेक आठवणी तत्कालीन नाट्यरसिकांनी नोंदवलेल्या आहेत. त्यातली ही प्रातिनिधिक आठवण किर्लोस्करच्याच पठडीतले नंतरच्या पिढीतले प्रसिद्ध नट गणपतराव बोडस यांची आहे. तरुणपणी प्रथमच भाऊरावांचे नाटकातील गाणे ऐकण्याचा अनुभव त्यांनी पुढील शब्दांत नोंदवला आहे : "...प्रत्यक्ष रंगदेवताच असे भाऊराव कोल्हटकर हातांत स्फटिकाची माळ, कमंडलु, साटिनची गुलाबी कफनी, पचंग मारलेलें जरीकांठी धोतर, कानावर पुष्पमंजरी, डोक्यावर कुरळ केसांचा मोहक टोप अशा पुंडरिकाच्या भूमिकेंत प्रवेश करतांच तीनही मजल्यावरून टाळ्यांचा कडकडाट झाला. त्यांनीं पुढें येऊन किंचित् हंसतमुखानें वांकून प्रेक्षकांना प्रणाम केला. वाक्य बोलून "नंदनवन देवीनें माझा" या पदाला भाऊरावांनीं सुरवात करतांच प्रेक्षकवर्ग चित्रासारखा तटस्थ झाला. शांतता इतकी निर्माण झाली कीं खिशांतील घड्याळाचें बारीक टिकटिकणें स्पष्ट ऐकूं येऊं लागलें. भाऊरावांच्या आवाजानें आणि सुस्वर आलापांनीं त्यांचा नित्याचा प्रेक्षक वर्ग जर इतका तल्लीन झाला तर प्रथमच आस्वाद घेणारा माझ्यासारखा मंत्रमुग्ध झाला असेल यांत काय आश्चर्य?" (बोडस १९४० : २९)

भाऊरावांच्या गाण्याविषयीच्या दंतकथा त्यांची नाटके न पाहिलेल्या त्यांच्या

समकालीन समाजात जशा प्रचलित होत्या तशाच त्या भाऊरावांच्या उत्तरकालीन समाजातही अनेक वर्षेपर्यंत चर्चेत होत्या. त्यामुळे विसाव्या शतकाचा उदय होता होताच या नटाचा अकाली अस्त झाला असला (१९०१), तरी तेथून पुढच्या मराठी रंगभूमीवरच्या प्रत्येक गायक-नटाची तुलना प्रेक्षकांनी भाऊराव कोल्हटकरांशी केली. किर्लोस्कर मंडळीच्या रंगमंचावर भाऊराव कोल्हटकरांची जागा घेतलेल्या नानासाहेब जोगळेकरांना मराठी प्रेक्षकाची पकड अखेरपर्यंत घेता आली नाही, याचे एक कारण भाऊराव कोल्हटकरांचा प्रभाव प्रेक्षकांच्या स्मृतीमध्ये ताजा असतानाच जोगळेकरांचे रंगभूमीवर झालेले आगमन, हे सांगितले जाते. 'भाऊरावांच्या गायनावर जीव ओवाळून टाकणारे प्रेक्षक नंतरची अनेक वर्षे अन्य गायक-नटाला – अगदी बालगंधर्वांनाही –गायक-नट म्हणून स्वीकारायला तयार नव्हते. याचे प्रत्यंतर अहिताग्नि राजवाडे यांच्या पुढील निवेदनावरून येईल : "...आता भाऊ कोल्हटकर मरून गेला होता. त्या कारणाने माझे किर्लोस्करांची नाटके पाहणे आपोआप बंद झाले....जेथे पूर्वी बाळकोबा व भाऊराव यांनी कामे केली व महाराष्ट्राला गानमुग्ध करून सोडले तेथे आता अगदी दुय्यम दर्जाचे नट आले. ते कसे आहेत हे पाहण्यासच केवळ मी त्यांच्या एकदोन नाटकांस गेलो व त्यांतील एक नट जोगळेकर व दुसरे बालगंधर्व यांची गाणी ऐकली. पण त्यात माझे मन रमले नाही. जोगळेकरांचा आवाज उंच चढे पण त्यात जिव्हारी नसे, व तो त्यांच्या शरीराला न शोभण्यासारखा असे. दुसरे बालगंधर्व. त्यांचे मी सुभद्रेचे काम मुद्दाम पाहण्यास गेलो पण माझ्या कानात भाऊरावांचे सूर स्थिरबद्ध असल्याकारणाने अर्ध्या नाटकातूनच कंटाळून निघून आलो." (शं. रा. राजवाडे १९८० : १०६-०७)

गायक-नटाचा नवा आदर्श किर्लोस्कर मंडळीने जसा ठेवला, तसेच नाटकाचा आशय आणि सादरीकरण यांच्या संदर्भात मराठी नाटकांना नवे वळण देण्याचे कामही किर्लोस्कर मंडळीच्याच १८९० ते १९०० दरम्यानच्या नाटकांनी केले. पौराणिक कथानके आधुनिक प्रेक्षकासमोर कशा स्वरूपात सादर करावेत याचे मानदंड अण्णासाहेब किर्लोस्करांच्या 'शाकुंतल' (१८८०), 'सौभद्र' (१८८२) आणि 'रामराज्यवियोग' (१८८४) या नाटकांनी केले. ही तीनही नाटके विसाव्या शतकाच्या दुसऱ्या-तिसऱ्या दशकांतही हमखास यशस्वी प्रकारातली नाटके होती. या पौराणिक नाटकांहून निराळे पाऊल श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या 'वीरतनय' (१८९६), 'मूकनायक' (१९०१) आणि 'गुप्तमंजूष' (१९०१) या नाटकांनी टाकले. किर्लोस्कर मंडळीतर्फे रंगभूमीवर आलेल्या या तीनही नाटकांचे कथानक पौराणिक नव्हते, तर कल्पनाप्रधान होते. पात्रे 'राजा-राजपुत्र' प्रकारची पारंपरिक, परंतु त्यांच्या जीवनातील घटना-प्रसंगांचे सादरीकरण मात्र आधुनिक जीवनाशी नाते सांगणारे – अशा प्रकारची कथानके या नाटकांची होती. १८७०-८० या काळात मराठी कादंबरीमध्येही अशी परंपरा आणि आधुनिकता यांच्या

सीमारेषेवरील कादंबरी मोठ्या प्रमाणात लिहिली व वाचली जात होती. राजा-राजपुत्र-राणी अशा व्यक्तिरेखांचे समकालीन आधुनिक जीवनातील पेचप्रसंगांवर कलम करून कथानके रचली जात होती. त्यामुळे कोल्हटकरांची नाटके त्या काळात लक्षवेधी ठरली. त्यांचे रंगभूमीवर यशस्वी स्वागत आणखी दोन कारणांमुळे झाले : वाङ्‌मयीनदृष्ट्या समृद्ध अनुभव देणारी नाट्यसंवादांची भाषा आणि नाटकांतील पदांची पारशी-गुजराती रंगभूमीवरील लोकप्रिय उडत्या चालींच्या धर्तीवर केलेली संगीतरचना. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकापर्यंत तरी कोल्हटकरांच्या नाटकांतील या 'नव्या' घटकांनी प्रेक्षकांना वेड लावले होते.

कल्पनाप्रधान कथानकाच्या माध्यमातून थेट सामाजिक आशय मांडणारे मराठीतील पहिले यशस्वी नाटक संगीत 'शारदा' (१८९९) हे देखील किर्लोस्कर मंडळीनेच रंगभूमीवर आणले. गोविंद बल्लाळ देवल यांच्या या नाटकाचे कथानक जरठकुमारीविवाहाच्या सामाजिक समस्येवर बेतलेले होते. त्याआधी सुमारे दोनतीन दशकांपासून महाराष्ट्रात बालविवाह आणि विधवांचे प्रश्न यांविषयी ज्वलंत चर्चा आणि चळवळी सुरू होत्या. या पार्श्वभूमीवर बालविवाहाच्या समस्येवर आधारित कथानक असलेली दोन-तीन नाटके यापूर्वी मराठी रंगभूमीवर येऊनही गेली होती. परंतु देवलांच्या 'शारदा' नाटकाला मिळालेले यश अभूतपूर्व होते. या यशात अर्थातच देवलांची प्रासादिक भाषाशैली आणि पदांना त्यांनी दिलेल्या नव्या धर्तीच्या आशयानुरूप चाली यांचाही वाटा होता. "एखाद्या उतार वयाच्या मनुष्याचें लग्न झालेलें अगर ठरलेलें ऐकलें कीं शारदेंतल्या त्या त्या भूमिका त्या त्या व्यक्तीच्या माथीं मारून मुलें व मुली "म्हातारा इतुका न" हें पद म्हणून हेटाळणी करूं लागलीं. १९३७ सालापर्यंत शारदा नाटकाइतकी समाजांत विलक्षण खळबळ दुसऱ्या कोणत्याही नाटकानें केली नाहीं...जरठकुमारीविवाह हा समाजांतील मोठा अन्याय आहे असें आबालवृद्धांनाहि वाटायला लागलें. मुलांना आपल्या असहाय स्थितीची जाणीव व्हायला लागली. आया सावध झाल्या." (बोडस १९४० : ७१). हा 'शारदा' या नाटकाचा सामाजिक परिणाम होता.

'शारदा' नाटक मुंबई-पुण्यात अल्पावधीत लोकप्रिय झाले आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात नाटक नाटकाचे खेळ होण्यापूर्वीच त्याची कीर्ती पोहोचली होती. 'शारदा' रंगभूमीवर आल्यानंतर चारपाच वर्षांनंतरची (१९०३-४दरम्यानची) या नाटकासंबंधीची वऱ्हाडातल्या यवतमाळची एक आठवण केशवराव भोळे यांनी नोंदवलेली आहे. त्या काळात स्वदेशहितचिंतक मंडळी या नाटकाचा प्रयोग करत होती. पुढे केशवराव भोसले म्हणून प्रसिद्धीस आलेला नट वयाच्या दहाव्या वर्षी स्वदेशहितचिंतक मंडळीतर्फे शारदेच्या भूमिकेत १९०२मध्ये रंगमंचावर उतरला होता. "त्या काळी कंपनीचे शारदा नाटक फारच गाजले होते. ते नाटक त्या काळच्या सामाजिक विशिष्ट दुःखाचे अत्यंत

परिणामकारक व हृदय पिळवटून काढणारे चित्रण होते. सर्व महाराष्ट्रभर त्या बाला-जरठ-विवाहाच्या नाटकामुळे खळबळ उडाली होती. शारदेतली पदे लोकांच्या तोंडी बसली होती, तर त्यातील काही पद्यपंक्ती तर घरोघरी ज्याच्या-त्याच्या तोंडी होऊन त्यांचा उपयोग म्हणी, अनुभवाचे बोल, दाखले यांसारखा होत होता. म्हाताऱ्या विधुरांना रस्त्याने जाण्याची सोय नसे. 'म्हातारा इतुका' या गाण्याचा आहेर त्यांना मिळायचा. वऱ्हाडात भाउरावांची कोदंडाची भूमिका लोकांना पाहायला मिळाली नव्हती. पण ज्यांनी शारदेचे प्रयोग पुण्यामुंबईस पाहिले होते त्यांनी त्या नाटकातील सर्व गुणांची व भाउरावांची तारीफ स्वमुखाने इतकी केली की वऱ्हाडातील प्रेक्षकांना शारदा कधी एकदा पाहू असे झाले होते..." (केशवराव भोळे १९६७ : ४).

विसाव्या शतकाच्या उंबरठ्यावरचा हा काळ मराठी रंगभूमीवर 'शारदा' नाटकाने गाजवला. संगीत आणि आशयदृष्ट्या प्रेक्षकांना जिंकून घेण्याचे कार्य किर्लोस्कर मंडळीच्या नाटकांनी १९००पर्यंत केले. या काळात किर्लोस्कर मंडळी आणि त्यांच्या समकालीन इतर नाटक मंडळ्यांनी नाट्यकलेला महाराष्ट्रीय समाजात सांस्कृतिक दृष्ट्या मध्यवर्ती स्थानी आणून ठेवले. विशिष्ट प्रकारची नाट्यसंस्कृती निर्माण करून मराठी समाजाची नाट्याभिरुची घडवण्याचे काम याच नाटक मंडळ्यांनी विसाव्या शतकाच्या पहिल्या तीन दशकांमध्ये केले. म्हणूनच मराठी नाटकाच्या इतिहासाचा परामर्श नाटक मंडळ्यांच्या उदय आणि अस्तापासून घेणे उचित ठरेल.

## ९.२ नाटक मंडळ्यांचे युग १९०१ ते १९३५

मराठी नाट्यकलेचे जाणकार इतिहासकार पु. रा. लेले यांच्या एका पुस्तकाचे नाव 'नाटकमंडळीच्या बिऱ्हाडीं' असे आहे. किर्लोस्कर, ललितकलादर्श, महाराष्ट्र, नूतन संगीत अशा अनेक बिनीच्या नाटक मंडळ्यांच्या सान्निध्यात त्यांनी सुमारे दोन दशकांचा काळ घालवला. सुमारे चाळीस नाटक कंपन्या विसाव्या शतकाच्या दुसऱ्या-तिसऱ्या दशकात महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेरही नाटके सादर करत हिंडत होत्या. यापैकी बहुतांश कंपन्यांचा पसारा मोठा असे. लेल्यांनी किर्लोस्करच्या पसाऱ्याची तुलना एखाद्या 'संस्थाना'शी केली आहे (लेले १९४६ : ०६). नाट्यविनोद संगीत नाटक मंडळी या कंपनीचे १९१३च्या सुमारासचे हे वर्णन पाहा :

"कंपनीत त्या वेळी ६६ माणसे होती. त्यात मॅनेजर, असिस्टंट मॅनेजर, तिकिट-विक्री मास्तर, बाजार मास्तर, कोठी मास्तर, स्टेज मॅनेजर, असिस्टंट स्टेज मॅनेजर, कपडेपट मास्तर, रंगपट मास्तर, गवई व एक मुलांसाठी गुरुजी, शिवाय आचारी, वाढपी, पाणके ही मंडळी असे. घरचे (म्हणजे कंपनीच्या बिऱ्हाडातले) व थिएटरचे गडी निरनिराळे असत. त्याखेरीज बाकी नटवर्ग व नृत्यांतील मुले, असा मोठा संसार असे. व्यवस्था एखाद्या संस्थानच्या लवाजम्यासारखी. घरचे सामान, स्वयंपाकाची भांडी, ताटे, वाट्या,

पाणी पिण्याची भांडी इत्यादी कंपनीच्याच मालकीची असत. थिएटर व घरचे सामान मिळून रेल्वेच्या दोन वॅगन्स सामान त्यावेळी होते." (धारणकर १९८० : १५).

रंगभूमीवर प्रत्यक्ष अभिनय करणाऱ्या नटवर्गाशिवाय इतक्या तऱ्हांचे लोक नाटक मंडळीत असत. गवई हा संगीत शिकवण्यासाठी, तर तालीम मास्तर अभिनय शिकवण्यासाठी असे. पदांचे गायन सुरू असताना नाचण्यासाठी म्हणून मुले असत, त्यांना 'नाचे' म्हटले जाई. या लहान मुलांना फावल्या वेळात इतर शिक्षण देण्यासाठी गुरुजी किंवा मास्तर नेमण्याची प्रथा सर्वप्रथम किर्लोस्कर कंपनीत मुजुमदार यांनी राम गणेश गडकऱ्यांना 'मास्तर' म्हणून नेमून सुरू केली. नाटक मंडळीत लहान वयातल्या मुलांचा प्रवेश प्रथम नाचे म्हणूनच होत असे. यथावकाश त्यांच्यापैकी अभिनयात, गायनात प्रगती दाखवणारी मुले नट बनत. नाटक मंडळीतले सर्व नट आणि इतर कामगार, कारागीर हे पगारी असत.

इतक्या मोठ्या संख्येने एकत्र राहणाऱ्या लोकांचे "सकाळचा चहा, दोन वेळचें जेवण, आंघोळ, राहाणें, काम आणि झोप इतक्या सर्व गोष्टी एकत्र होत असल्यामुळें मोठ्याशा एकत्र कुटुंबासारखीच त्या वेळच्या नाटक कंपनीची स्थिति असे..." (लेले १९४६ : ०६). अर्थात, कोणत्याही कुटुंबात असतात त्याप्रमाणे प्रेमाचे आणि कलहाचे वातावरण नाटक मंडळ्यांमध्येही असे. परंतु सहजीवनामुळे परस्परांना सांभाळून घेत जगण्याची सवयही लागत असे. म्हणूनच पु. रा. लेले यांनी मराठी नाटक मंडळ्यांना 'माणुसकीच्या संस्था' असे संबोधले आहे (उपरोक्त ०५).

या नाटक कंपन्या आपला लवाजमा घेऊन मुंबई, पुणे, नागपूर, वर्धा, अमरावती, खामगाव, धुळे, नाशिक, अहमदनगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी, सावंतवाडी, मालवण अशा लहानमोठ्या शहरांमध्ये दौरे करत. तसेच दक्षिणेला गोवा, बेळगाव, हुबळी आणि उत्तरेला बडोदे, इंदोर, ग्वाल्हेर इथपर्यंत त्यांची मजल जात असे. एका ठिकाणचा मुक्काम नाटकाला मिळणाऱ्या प्रतिसादानुसार काही आठवड्यांपासून महिन्यांपर्यंत असे. मुंबई-पुण्याचा मुक्काम एक-दीड वर्ष देखील लांबे. मुंबई-पुण्यात लोकप्रिय झालेल्या नाटकाची किर्ती महाराष्ट्राच्या इतर प्रांतांत फैलावत असे. त्यानंतर सावकाशपणे नाटक मंडळ्या त्या प्रदेशात दौरा करत.

किर्लोस्कर कंपनीच्या उदयापासून आठवड्याला तीन खेळ करण्याची या नाटक मंडळ्यांची रीत होती. शनिवारी रात्री, रविवारी दिवसा आणि बुधवारी रात्री असे हे तीन खेळ असत. जत्रेत मुक्काम पडला तर लोकांच्या मागणीवरून नाटकांचे खेळ दररोजही करावे लागत. पुढे पुढे, म्हणजे १९२५नंतर नाटक मंडळ्यांमधली स्पर्धा वाढली आणि आठवड्याच्या इतरही वारी सोयीनुसार नाटकांचे खेळ काही मंडळ्या करू लागल्या.

नाटकाला तिकीट काढून येणाऱ्या प्रेक्षकांची नाटकाकडून 'भरपूर, भरगच्च'

मनोरंजनाची अपेक्षा असे. नाटकाच्या खेळाचा अवधी, गद्य नाटक चार तासांत संपे तर संगीत नाटकांचा खेळ सहा तासांहूनही अधिक चाले. शिवाय संगीत नाटकातील संगीताच्या मेजवानीमुळे प्रेक्षक खूश होत असे. लवकर संपणारी गद्य नाटके किंवा संगीत फारसे प्रभावी नसणारी संगीत नाटके सादर करणाऱ्या कंपन्या मुख्य नाटकासोबत हलकेफुलके फार्स (प्रहसने) सादर करत. ऐतिहासिक किंवा वर्तमान सामाजिक विषयांवर असे फार्स सादर करण्याची प्रथा एकोणिसाव्या शतकात अधिक होती. १८९०नंतर फार्सचे सादरीकरण कमी झाले. लोकरंगभूमीवरील तमाशाच्या प्रभावातून फार्स मराठी रंगभूमीवर आले असावेत. कारण छेलबटाऊ आणि मोहना राणी, तुरेवालीचा फार्स असे तमाशातील वगही फार्स म्हणून सादर होत होते. 'नारायणरावाच्या वधाचा फार्स' त्या काळात अतिशय लोकप्रिय होता. लोकांचे मनोरंजन करण्यासाठी सुरुवातीच्या काळातल्या नाटक कंपन्या इतरही मार्ग चोखाळत असत. अशीच एक पूर्णचंद्रोदय नाटक मंडळी नाटकाच्या आधी अर्ध्या तासाची सर्कसही दाखवत असे, अशी आठवण मामा वरेरकर यांनी सांगितली आहे (भा. वि. वरेरकर १९४१ : २६-२७).

विसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत किर्लोस्कर मंडळीच्या संगीत नाटकांमुळे नाटकातील संगीत हेच प्रमुख आकर्षण बनले. नाटक कंपन्यांच्या बिऱ्हाडी संगीत आणि अभिनय या दोन कलांना पोषक असे वातावरण तयार झाले. पु. रा. लेले, वसंत शांताराम देसाई यांच्यासारख्या अनेकांना तरुणपणी नाटकांचे वेड तर लागलेच, पण नाटक मंडळीत राहण्याचे आकर्षण होते. तेथील मुक्त वातावरण कुटुंबव्यवस्थेत जखडलेल्या पांढरपेशा मराठी तरुणांना खेचून घेत असावे. लेले, देसाई यांच्यासारख्या शेकडो मराठी तरुणांवर नाट्यकलेचे संस्कार नाटक मंडळीच्या बिऱ्हाडी झाले.

**'किर्लोस्कर युग' आणि 'गंधर्व युग'**

विसाव्या शतकात किर्लोस्कर आणि गंधर्व या नाटक मंडळ्यांना मध्यवर्ती स्थान आहे. पैकी गंधर्व नाटक मंडळी १९१३मध्ये किर्लोस्करमधूनच फुटून निघालेल्या बालगंधर्व, गणपतराव बोडस आणि गोविंदराव टेंबे यांनी स्थापन केली होती. पुढे टेंबे आणि बोडस हे दोघेही गंधर्व मंडळीतून बाहेर पडले, तरी बालगंधर्वांनी मात्र या कंपनीचे अस्तित्व मराठी रंगभूमीचा हा सुवर्णकाळ अस्ताला जाईपर्यंत टिकवून ठेवले. त्यामुळे या काळातल्या मराठी रंगभूमीच्या इतिहासाची किर्लोस्कर युग (१९१३पर्यंत) आणि गंधर्वयुग (१९१३पासून १९३५पर्यंत) अशी विभागणी केली जाते. किर्लोस्कर युग एकोणिसाव्या शतकात, १८८०पासून सुरू झाले, ते १९१३मध्ये किर्लोस्कर दुभंगून गंधर्व संगीत मंडळीची स्थापना होईपर्यंत टिकले. या काळात किर्लोस्कर संगीत मंडळीसोबतच, शाहूनगरवासी नाटक मंडळी, स्वदेशहितचिंतक नाटक मंडळी, नाट्यकलाप्रवर्तक मंडळी, महाराष्ट्र नाटक मंडळी, पाटणकर संगीत मंडळी, राजापूरकर संगीत नाटक मंडळी या

प्रमुख नाटक कंपन्या होत्या. या प्रत्येक नाटक कंपनीच्या नाटकांची प्रकृती वेगळी होती आणि त्यांचा स्वतःचा असा प्रेक्षकवर्गही तयार झाला होता.

१९१३ नंतर किर्लोस्करचे अग्रस्थान ओसरले आणि गंधर्व संगीत मंडळीचा बोलबाला अधिक होऊ लागला. बालगंधर्व यांच्या आत्यंतिक लोकप्रियतेमुळे गंधर्व संगीत मंडळी अग्रस्थानी आली. किर्लोस्कर संगीत मंडळीतून बाहेर पडून स्थापन झालेल्या गंधर्व मंडळीचा कित्ता गिरवत, या गंधर्व युगात किर्लोस्कर युगातल्या इतरही काही नाटक कंपन्या फुटल्या. किर्लोस्कर मंडळी दुसऱ्यांना फुटली. ज्या नाटक मंडळ्यांमध्ये फूट पडली त्यांना 'मातृसंस्था' म्हणून ओळखले जाते. मराठी नाट्यसृष्टीच्या विकासात या मातृसंस्थांचा वाटा मोठा होता. गंधर्व युग हा मराठी नाटक मंडळ्यांसाठी फाटाफुटीचा काळ ठरला. परंतु यामुळे अनेक नवे गायक-नट रंगभूमीवर येऊ लागले. त्यांच्या गायनामुळे, संगीतामुळे मराठी नाटकांची लोकप्रियता वाढली. नाटक कंपन्यांच्या इतिहासात हे पैलू महत्त्वाचे आहेत.

गंधर्वयुगात नाटक मंडळ्यांच्या जादुई वातावरणाची प्रसिद्धी आणि आकर्षण महाराष्ट्रीय समाजात पसरले. या कंपन्यांमधले लोकप्रिय नट स्टारपदाला पोहोचले; या रंगभूमीवर सादर होणाऱ्या संगीताच्या रेकॉर्ड्स पांढरपेशी समाजात घरोघर वाजू लागल्या. हा मराठी संगीत रंगभूमीचा वैभवशाली काळ मानला जातो. पण याच काळात संगीत रंगभूमीच्या स्खलनाचीही सुरुवात झाली. संगिताचा अतिरेक, आशय हरवून बसलेली नाटकाची कृत्रिम कथानके आणि केवळ गायनकौशल्यामुळे रंगभूमीवर उभ्या राहिलेल्या नटांमधला अभिनयकलेचा अभाव – या वैगुण्यांचा शिरकाव मराठी रंगभूमीवर गंधर्वयुगात झाला. तशात चित्रपट कलेत सुधारणा होऊन मराठी चित्रपट बोलू लागले. मनोरंजनाचा अधिक स्वस्त आणि आकर्षक पर्याय उपलब्ध झाल्यानंतर नाटकांच्या तोच तोपणाला उबगलेल्या मराठी प्रेक्षकांनी नाटक कंपन्यांच्या नाटकांकडे पाठ फिरवली.

१९३५नंतरच्या पाचसहा वर्षांत संगीत रंगभूमीच्या अस्तासोबतच स्वतःच्या मालकीच्या नटसंचापासून नेपथ्यापर्यंत सर्व वस्तू स्वतंत्रपणे बाळगून गावोगाव नाटकांचे प्रयोग करत हिंडणाऱ्या नाटक मंडळ्यांचाही अस्त झाला. १९४०नंतर नव्या, कंत्राटी पद्धतीने नाटकांचे प्रयोग करणाऱ्या नाट्यसंस्था उदयाला आल्या. अशा रीतीने नाटक कंपन्यांचे युग संपले. हीच गंधर्वयुगाची तोवरच्या काळाला गंधर्व युग असे संबोधले जाते.

किर्लोस्कर संगीत मंडळीसोबत 'नाट्यकलाप्रवर्तक मंडळी', 'स्वदेशहितचिंतक नाटक मंडळी' आणि 'महाराष्ट्र नाटक मंडळी' या प्रमुख मातृसंस्था, त्यांच्यामधून निर्माण झालेल्या इतर नाट्यसंस्था, स्वतंत्रपणे आपले स्थान निर्माण करणाऱ्या नाट्यसंस्था, त्यांनी नाटकाच्या कथानकापासून सादरीकरणापर्यंत केलेले नवे प्रयोग, या नाट्यसंस्थांमधून विशेष कर्तृत्व गाजवून मराठी रंगभूमीवर आपली छाप पाडणारे नट या

सर्वांचा मागोवा येथे थोडक्यात घेतला आहे.

**पहिली मातृसंस्था : किर्लोस्कर संगीत मंडळी -**

शंकरराव किर्लोस्करांनंतर किर्लोस्कर नाटक मंडळीचे प्रसिद्ध गायक-नट भाऊराव कोल्हटकर यांच्या काळात किर्लोस्कर कंपनीची भरभराट होत राहिली. त्यांच्याच काळात, १८९६मध्ये श्री. कृ. कोल्हटकर यांचे पहिले नाटक 'वीरतनय' किर्लोस्करने रंगभूमीवर आणले, तर १८९९मध्ये गो. ब. देवल यांचे सामाजिक नाटक 'संगीत शारदा' हे रंगभूमीवर सादर केले. या दोन नाटकांनी पौराणिक नाटकांच्या प्रवाहापेक्षा वेगळे, अनुक्रमे कल्पनाप्रधान आणि सामाजिक समस्याप्रधान नाटकांचे नवे प्रवाह मराठी रंगभूमीवर सुरू झाले.

पुढे १९०१मध्ये भाऊराव कोल्हटकर यांचे निधन झाल्यानंतर नारायणराव जोगळेकर या नटाकडे किर्लोस्करची मालकी होती. विसाव्या शतकाचे पहिले दशक किर्लोस्कर संगीत मंडळीचा पठारावस्थेचा काळ होता. या काळात नारायणराव जोगळेकर हे कंपनीचे प्रमुख नट होते. त्यांच्याच काळात १९०४मध्ये बालगंधर्वांनी किर्लोस्करच्या रंगभूमीवर प्रवेश केला. मात्र गायक-नट म्हणून बालगंधर्वांची छाप नारायणराव जोगळेकरांच्या निधनानंतर (१९११) पडली. १९०१ ते १९१० या काळात कोल्हटकरांची 'मूकनायक', 'गुप्तमंजूष', 'मतिविकार' आणि 'प्रेमशोधन' ही नाटके किर्लोस्करने रंगभूमीवर आणली.

१९११मध्ये किर्लोस्कर मंडळीने कृ. प्र. खाडिलकर या गद्य नाटककाराने लिहिलेले पहिले संगीत नाटक 'मानापमान' हे रंगभूमीवर आणले. ही मराठी नाट्येतिहासातली ठळक घटना मानली जाते. एक तर गोविंदराव टेंबे यांनी 'मानापमान'ला दिलेले संगीत अवघ्या महाराष्ट्रात अत्यंत लोकप्रिय झाले. या नाटकापासून संगीत नाटकात पदांना चाली लावण्यासाठी स्वतंत्र संगीतकाराची योजना करण्याची रीत सुरू झाली. तोवर नाटककार व नाटक मंडळीतील इतर जाणती मंडळीच पदांच्या चाली गोळा करत असत. दुसरे म्हणजे 'मानापमान'मध्ये धैर्यधराची भूमिका करणारे किर्लोस्कर कंपनीचे प्रमुख नट नारायणराव जोगळेकर यांचे याच वर्षी निधन झाले आणि भामिनीची भूमिका करणाऱ्या बालगंधर्वांना लोकांनी डोक्यावर घेतल्यामुळे येथून पुढे बालगंधर्वांचे युग सुरू झाले. लक्ष्मीधराची भूमिका करणाऱ्या गणपतराव बोडस यांच्या रूपाने विनोदी, खल भूमिका करणारा एक गुणी नट मराठी रंगभूमीला दिला.

किर्लोस्कर मंडळीचे नाट्यक्षेत्रातले योगदान केवळ रंगमंचावर सादर होणाऱ्या नाटकापुरते मर्यादित नाही. नाटक मंडळ्यांचा कारभार कसा चालावा याच्या किर्लोस्करने घालून दिलेल्या पद्धती पुढे वहिवाट म्हणून इतर कंपन्यांनी स्वीकारल्या. शंकरराव मुजुमदार यांनी गडकऱ्यांची गुरुजी म्हणून केलेल्या नेमणुकीचा उल्लेख आधी येऊन गेला

आहे. नाट्यकला आणि नाट्यव्यवसाय यांच्या विविध पैलूंवर चर्चा व्हावी यासाठी किर्लोस्कर मंडळीने 'रंगभूमी' हे मासिक १९०७मध्ये सुरू केले. असे मासिक असावे ही कल्पना किर्लोस्करचे एक चालक शंकरराव मुजुमदार यांची होती.

मुजुमदार यांची आणखी एक कल्पना होती – ज्यांनी मराठी संगीत रंगभूमीची स्थापना करून तिची उज्ज्वल परंपरा निर्माण केली त्या अण्णासाहेब किर्लोस्करांचे स्मारक पुण्यात असावे असे त्यांना वाटत होते. यासाठी त्यांनी इतर काही मंडळींच्या मदतीने पुण्यात किर्लोस्कर नाट्यगृह उभारले. मुंबई सरकारचे गृहमंत्री सर मॅकेन्झी मूर यांच्या हस्ते या नाट्यगृहाचे उद्घाटन २१ ऑगस्ट १९०९ रोजी झाले. याप्रसंगी किर्लोस्कर मंडळीने अण्णासाहेब किर्लोस्करांच्या शाकुंतल या नाटकाचे पहिले चार अंक सादर केले (मोटे (संपा०) १९७५ : ४२).

येथवरचा किर्लोस्कर मंडळीचा प्रवास यश, प्रतिष्ठा यांच्या बाबतीत सतत चढत्या भाजणीचा राहिला. मात्र नारायणराव जोगळेकरांच्या पश्चात शंकरराव मुजुमदार यांच्या हाती कंपनीची सर्व सूत्रे आल्यानंतर या महाराष्ट्रातल्या सर्वाधिक प्रतिष्ठित नाट्यसंस्थेत अंतर्गत कुरबुरी सुरू झाल्या. श्री. कृ. कोल्हटकर, कृ. प्र. खाडिलकर, राम गणेश गडकरी यांच्यासारखे मराठीतले दिग्गज नाटककार या संस्थेशी बांधलेले होते. लोकमान्य टिळक, महाराजा सयाजीराव गायकवाड, छत्रपती शाहू महाराज यांचे किर्लोस्कर मंडळीशी जिव्हाळ्याचे संबंध होते. मराठी नाट्यकलेला उत्तेजन देण्यासाठी या संस्थेला दरवर्षी नियमितपणे आर्थिक साहाय्य देण्याची इच्छा सयाजीराव गायकवाड यांनी स्वतःहून किर्लोस्कर मंडळीकडे प्रकट केली होती. 'किर्लोस्कर'ची मंडळी आपली हक्काची आहेत, या भावनेतून शाहू महाराज यांनी नारायण राजहंस यांना किर्लोस्कर नाटक कंपनीच्या पदरात घातले होते (बोडस १९४० : पृ. २२२ आणि १४५).

अशा महाराष्ट्राचा सांस्कृतिकदृष्ट्या मानबिंदू असलेल्या नाट्यसंस्थेत १९१२-१३मध्ये वाद सुरू झाले तेव्हा त्यात श्रीमंत मिरजकर, कृ. प्र. खाडिलकर, न. चिं. केळकर यांच्यासारख्या मातब्बरांनी हस्तक्षेप केला. शंकरराव मुजुमदार व बालगंधर्व-टेंबे-बोडस या दोन पक्षांत समेट घडवून आणण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना यश आले नाही. १९१३ मध्ये किर्लोस्कर संगीत मंडळी या मातृसंस्थेतून बालगंधर्व, गणपतराव बोडस आणि गोविंदराव टेंबे हे तिघेही बाहेर पडले आणि त्यांनी 'गंधर्व संगीत मंडळी' या नाट्यसंस्थेची स्थापना केली. पुढील दोन दशके हीच गंधर्व मंडळी मराठी नाट्यसंस्कृतीच्या अग्रभागी राहिली. १९१८मध्ये किर्लोस्कर संगीत मंडळी दुसऱ्यांदा फुटली. या वेळी मास्टर दीनानाथ, चिंतामणराव कोल्हटकर हे नट या कंपनीतून बाहेर पडले आणि त्यांनी 'बलवंत संगीत मंडळी' सुरू केली. या दोन्ही नाट्यसंस्थांच्या कार्याचा परामर्श खाली घेतला आहे. तत्पूर्वी बलवंतच्या स्थापनेनंतरच्या किर्लोस्करच्या

कारकिर्दीवर दृष्टिक्षेप टाकू.

बालगंधर्व, गणपतराव बोडस यांच्यासारखे नट १९१३मध्ये बाहेर पडल्यानंतरही किर्लोस्कर संगीत मंडळी या आद्य नाट्यसंस्थेचा प्रवास सुरूच राहिला. काही काळ टिकून राहण्यासाठी किर्लोस्कर मंडळीला 'ताजेवफा' या हिंदी नाटकाचा आधार घ्यावा लागला. पण लवकरच राम गणेश गडकरी यांचे 'पुण्यप्रभाव' (१९१६) हे नाटक बसवले. या नाटकातल्या मास्टर दीनानाथ आणि चिंतामणराव कोल्हटकर यांच्या भूमिकांनी लोकप्रियता मिळवली. या दोघांच्या रूपाने किर्लोस्कर मंडळीला नवे गुणवान नट मिळाले. पण हेही नट १९१८मध्येच कंपनीतून बाहेर पडले. त्यानंतर किर्लोस्कर मंडळीचा प्रवास रखडत सुरू राहिला. अण्णासाहेब किर्लोस्करांनी सुरू केलेली, देवलांनी चालवलेली मातृसंस्था म्हणून तिला प्रतिष्ठा होती, परंतु व्यावसायिकदृष्ट्या कंपनीची नाटके यशस्वी होत नव्हती. १९२४मध्ये पुणे मुक्कामी अत्यंत हलाखीच्या आर्थिक परिस्थितीत किर्लोस्कर संगीत मंडळी बंद पडली. तेव्हा 'ललित कलादर्श संगीत मंडळी'तून बाहेर पडलेले नानासाहेब चापेकर यांनी किर्लोस्कर मंडळी चालवायला घेतली. १९२९पर्यंत त्यांनी नाटकांचे प्रयोग केले (मामा पेंडसे १९८६ : २५, ५३). त्यानंतरही किर्लोस्कर मंडळीचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न बळवंतराव मुजुमदार यांनी केला. परंतु तो अयशस्वी ठरला.

**गंधर्व संगीत नाटक मंडळी आणि बालगंधर्वांची कारकीर्द :**

अर्थात या फाटाफुटीनंतरही गंधर्व मंडळीची वाटचाल मराठी संगीत रंगभूमीच्या अस्तापर्यंत सुरू राहिली. बालगंधर्वांकडे याचे श्रेय जाते. १९१९मध्येच गणपतराव बोडस बाहेर पडल्यानंतर गंधर्व कंपनीची सारी सूत्रे अखेरपर्यंत बालगंधर्वांकडेच राहिली. किर्लोस्कर मंडळीपासून फारकत घेतली तरी किर्लोस्कर मंडळीचे संस्थापक अण्णासाहेब किर्लोस्कर हेच आपल्या परंपरेचे मूळ पुरुष आहेत, हे गंधर्व मंडळीचे कर्ते विसरले नव्हते. गंधर्व मंडळीच्या बिऱ्हाडी दर्शनी भागात अण्णासाहेब किर्लोस्करांची तसबीर ठेवलेली असे (मा. कृष्णराव १९८५ : १७). संगीत रंगभूमीवर विसाव्या शतकाचे पहिले दशक किर्लोस्कर मंडळीचे होते, तर दुसरे व तिसरे दशक गंधर्व मंडळीचे होते. या काळात बालगंधर्वांनी गायक-नट म्हणून लोकप्रियतेची परमावधी गाठली. गो. ब. देवल यांचे संगीत संशयकल्लोळ (१९१६), कृ. प्र. खाडिलकरांचे 'स्वयंवर' (१९१६) आणि राम गणेश गडकऱ्यांचे 'एकच प्याला' (१९१९) या लागोपाठच्या लोकप्रिय ठरलेल्या नाटकांमधील गायक-स्त्रीनट बालगंधर्व हे मराठी समाजाच्या गळ्यातले ताईत बनले. मे १९२१ ते जुलै १९३१ या दहा वर्षांच्या काळात गंधर्व कंपनीला 'एकच प्याला' या नाटकाचे उत्पन्न एकूण ३,३४००० रुपये इतके मिळाले (रा. शं. वाळिंबे १९८७ : ०२). यावरून गंधर्व कंपनीच्या भरभराटीचा अंदाज यावा.

त्या काळातले नामवंत संगीत कलावंत भास्करबुवा बखले यांनी गंधर्वच्या नाटकांना संगीत द्यायला सुरुवात केली. नारायणराव जोगळेकर किर्लोस्कर कंपनीचे मालक असतानाच भास्करबुवा बखले किर्लोस्करच्या गोतावळ्यात आले होते. त्या दोघांनी मिळून भास्कर गायन समाजाची स्थापना केली होती. पुढे शंकरराव मुजुमदार मालक झाल्यानंतर किर्लोस्कर मंडळी आणि भास्कर गायन समाज यांनी संयुक्तपणे संगीतसभा भरवल्या. किर्लोस्करतर्फे रंगभूमीवर आलेल्या विद्याहरण (१९१३) या नाटकातील काही पदांना भास्करबुवांचे संगीत होते. त्यानंतर गंधर्व संगीत मंडळीतर्फे खाडिलकरांच्या 'स्वयंवर' (१९१६) आणि 'द्रौपदी' (१९२०) या नाटकांना भास्करबुवांनी संगीत दिले. हिंदुस्थानी संगीतातील रागदारीची साथ मराठी नाटकांतील पदांना मिळाली. बालगंधर्वांच्या गायनाने हे संगीत पांढरपेशा महाराष्ट्रीय समाजातील घराघरात पोहोचले. बखल्यांचाच शिष्य असलेला मास्टर कृष्णराव (फुलंब्रीकर) यांच्यासारखा गायक-नट आणि संगीतकार गंधर्व मंडळीला पुढे लाभला. १९२३ ते ३३ या काळात गंधर्वच्या रंगभूमीवर आलेल्या सात नाटकांना मास्टर कृष्णराव यांनी संगीत दिले होते. मास्टर कृष्णरावांनंतर 'ललितकलादर्श मंडळी'तील नट गंगाधरपंत लोंढे हे १९३१मध्ये गंधर्व कंपनीत दाखल झाले. 'तेजस्वी आवाजाचा समजदार गायक नट' अशी कीर्ती त्यांनी गंधर्वच्या रंगभूमीवर मिळवली. त्यांच्याशिवाय विनायकबुवा पटवर्धन, जगन्नाथबुवा पंढरपूरकर, दत्तोपंत पेठकर, माधवराव वालावलकर इत्यादी संगीत नटांनी गंधर्वची रंगभूमी गाजवली.

१९३१नंतर गंधर्व मंडळीचा आणि एकूणच मराठी संगीत रंगभूमीचा ऱ्हासकाळ सुरू झाला. खरे तर गंधर्व मंडळीच्या नाटकांच्या रूपाने मराठी संगीत रंगभूमी विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात वैभवाच्या शिखरावर होती. रंगभूमीवरील बालगंधर्वांच्या गायकीने लोकप्रियतेच्या बाबतीत उच्चांक गाठला होता. बालगंधर्व यांनी प्रारंभीच्या काळात बेताचे संगीतशिक्षण घेतले होते. पण आधी किर्लोस्कर आणि नंतर गंधर्व या नाटक मंडळ्यांमध्ये त्यांनी कष्टपूर्वक गाणे आत्मसात केले. १९११मध्ये 'मानापमान'च्या निमित्ताने बालगंधर्वांना गोविंदराव टेंबे यांच्याकडून गाण्याची तालीम मिळाली. त्यानंतर १९१३मध्ये 'विद्याहरण' या नाटकापासून भास्करबुवा बखले यांच्यासारख्या श्रेष्ठ संगीतकाराची तालीम त्यांना मिळाली. पुढील काळात सुंदराबाई जाधव आणि मास्टर कृष्णराव यांच्याकडून त्यांना गाण्याचे मार्गदर्शन मिळाले. बालगंधर्वांची गायनपद्धती साधी, सरळ, पण अत्यंत रसोत्पादक. १९१७-१८च्या सुमारास भास्करबुवा बखल्यांच्या आग्रहावरून अल्लादियाखां त्यांचे गाणे ऐकण्यास आले. 'स्वयंवर' नाटक होते. तेव्हा बालगंधर्वांचे गाणे ऐकून ते अत्यंत प्रभावित झाले, अशी एक आठवण आहे. त्यामुळेच "इतका रसोत्पादक गाणारा स्त्री नट महाराष्ट्र रंगभूमीवर भाऊराव कोल्हटकरांनंतर दुसरा

झाला नाहीं," असे म्हटले जाते (एकलव्य : २१). लवकरच बालगंधर्व हे रंगभूमीवरील सर्वाधिक लोकप्रिय गायक-नट ठरले, त्यात त्यांच्या या गायकीचाच वाटा अधिक होता. तत्कालीन नाट्यरसिकांमधील बालगंधर्वांच्या लोकप्रियतेची साक्ष तत्कालीन नाट्यक्षेत्रातील जाणकार व्यक्तिमत्त्व वसंत देसाई यांच्या पुढील प्रतिक्रियेवरून मिळते : "आमक्याचें नाटक पाहिलें नाहीं तर समाजांत आपण अनद्यावत ठरूं' असें एखाद्या नटाबद्दलचें वेड बहुजनसमाजांत निर्माण होणें ही त्याच्या यशाची पराकाष्ठा समजली पाहिजे. असें वेड रसिक समाजाला बालगंधर्वांनीं लावलें होतें, आणि २०-२-१९११ रोजीं निघालेल्या एकच प्याला नाटकानें तें परमावधीला पोहोचविलें होतें." (वसंत देसाई १९६२ : २४).

बालगंधर्वांच्या नाटकातील स्त्री-वेशभूषेपासून प्रत्यक्ष जीवनातील जरीच्या टोपीपर्यंत सगळ्या गोष्टींचे अनुकरण करण्यात पांढरपेशा मराठी समाज धन्यता मानत होता. बालगंधर्वांची लोकप्रियता मराठी समाजाच्या सीमारेषा ओलांडून मुंबईतील गुजराती, सिंधी समाजापर्यंत पोहोचली होती. मुंबईत गंधर्व संगीत मंडळीच्या नाटकांचे प्रयोग होत, तेव्हा या अमराठी समाजातील रसिक केवळ बालगंधर्वांचे गाणे ऐकण्यासाठी थिएटरमध्ये गर्दी करत.

या गुणवैशिष्ट्यांचे श्रेय जसे गंधर्व संगीत मंडळीकडे जाते, तसेच दोषांचेही जाते. मराठी रंगभूमीवरील संगीताचा अतिरेक होऊन त्यात नाटक गौण ठरण्याचे अपश्रेय बालगंधर्वांच्या नाटकांनाच द्यावे लागते : "१९११नंतर प्रत्येक पद विशेषतः एकादेच कडवे, तासन् तास घोळून म्हणण्याची कंटाळवाणी व नाट्यदृष्ट्या रसहानीकारक सवय नारायणरावांना लागली. याला जबाबदार एकामागोमाग एक वन्समोअर देणारे त्यांचे अंधभक्तही आहेत. 'मानापमान' नाटकातील 'नाही मी बोलत नाथा' या ओळीचे ते अक्षरशः दळण दळत असत. याचे विडंबन होऊ लागले – माधवराव जोशी यांनी 'विनोद' या नाटकात - 'नाहीं मी बोलत नाथा झाडीन संगीत लाथा". (एकलव्य : २१).

याशिवाय बालगंधर्वांच्या नाटकांमध्ये जे इतर दोष निर्माण झाले, त्यांचे सूचन त्यांचेच एकेकाळचे सहकारी नट गणपतराव बोडस यांनी पुढीलप्रमाणे केले आहे :

"स्वयंवर नाटक गंधर्व मंडळीला सांपत्तिक दृष्टीनें अत्यंत यशस्वी झालें ही गोष्ट खरी; पण हें स्वयंवर कलेच्या दृष्टीनें नाट्याच्या ऱ्हासाचें बीज पडल्याप्रमाणें झालें. स्वयंवरांतील गायकी चालीमुळें नाटकांतल्या अभिनयाची आवश्यकता वाटेनाशी झाली. रुक्मिणीचें संगीतपात्र नारायणरावांसाठीं नटविलें तेवढ्यावरच झालें नाटक. खुद्द खाडिलकरांनीं पुढें नारायणरावांना मुख्य धरून त्यांच्यासाठींच एकखांबी तंबूसारखीं एकपात्री द्रौपदी, मेनका, सावित्री हीं नाटकें लिहून अनिष्ट प्रथा वाढीला लावली. मग गंधर्व कंपनी आणि खाडिलकर यांचा कित्ता इतर कंपन्या व दुसरे नाटककार यांनींहि गिरवायला सुरवात केल्यास नवल

काय? गायकी चालीचें खूळ स्वयंवरापासून सर्व नाटक मंडळ्यांत पसरूं लागलें. एकेक कंपनी एकेक उत्तम गवई धरूं लागली. त्यामुळें सर्वत्र गाणेंच गाणें होऊन गेलें. पदें गाण्याच्या वेळाची मर्यादाहि वाढूं लागली. जो जास्त वेळ पदें म्हणेल तो उत्तम गायक – चुकलों – उत्तम नट म्हणून मान्य होऊं लागला." (बोडस १९४० : २५३).

बालगंधर्वांची रंगभूमीवरील एकंदर अदाकारी टीकेचाही विषय झाली होती. या लोकप्रिय नटाविषयी त्याच्या समकालीन विद्वानांनी नोंदवलेली दोन विरुद्ध टोकाची मते पुढे दिली आहेत. पहिले मत अहिताग्नि राजवाडे यांचे आहे. त्यांनी भाऊराव कोल्हटकरांपासून संगीत नाटके पाहिली होती. त्या तुलनेत बालगंधर्वांचा अभिनय आणि गाणे – दोन्हीही हिणकस आहेत असे त्यांचे म्हणणे होते : "तो (बालगंधर्व) प्रत्येक अंकात स्टेजवर येताना निरनिराळ्या रंगाची निरनिराळी झिरझिरीत वस्त्रे परिधान करी त्यावरच प्रेक्षकवर्ग बेहद्द खूष होऊन टाळ्या पिटी. हे कलेचे अत्यंत हीन आणि ओंगळ रूप आहे. नाट्याच्या संबंधाने पाहिले तर गाणे आणि त्यातील अर्थानुरोधाने भोवतालची परिस्थिती यांत काहीच मेळ नसे. पुढे गाई चालल्या आहेत त्यासंबंधी गाताना गाईंच्याकडे पाठ व मध्यंतरी सबंध स्टेजचे मोकळे अंतर. कारण गाण्यातील सुराकरिता स्टेजच्या काठावर येऊन उभे राहणे भाग. बरे गाणे म्हणावयाचे त्याला काही सुमार असावा तर तोही नाही. एकेक ओळ संपता संपत नसे इतके कंटाळा येईपर्यंत तिचे चर्वितचर्वण..." (शं. रा. राजवाडे १९८० : १०८-०९). दुसरे मत गद्य नाटकांतील श्रेष्ठ नट गणपतराव जोशी यांचे चरित्रकार लक्ष्मण नारायण जोशी यांचे आहे. त्यांनी बालगंधर्वांचे नाव न घेता लिहिले आहे, "गोपाळराव मराठे व विनायकराव कवठेकर यांच्यासारखें सभ्य, घरगुती व श्रीमंती नखऱ्याचें सोंग जसें आम्हांला कधींच बघायला सांपडलें नाहीं, व सध्यां जें आमच्या रंगभूमीला छचोरपणाचें वळण एका प्रसिद्ध स्त्रीवेषधारी नटामुळें लागत चाललें आहे, त्यावरून तें तसें पुढें कोणालाही बघायला सांपडेल असें वाटत नाहीं." (ल. ना. जोशी १९२३ : ३६).

बालगंधर्वांच्या प्रेक्षकांपैकी एक मोठा वर्ग हा त्यांच्या अभिनय किंवा गायनकलेच्या नव्हे, तर त्यांचे स्त्रीवेषातील दिसणे, वावरणे यांच्याच प्रेमात पडला होता, असे यावरून दिसते. बालगंधर्वांचे रूप न्याहाळण्यासाठी काही प्रेक्षक दुर्बीण घेऊन नाटकाला येत असत. हे खरोखरीच हीन अभिरुचीचे लक्षण होते.

संगीत रंगभूमीला ज्या नाटक मंडळीच्या नटांनी आणि नाटकांनी वैभवाच्या शिखरावर नेले, त्याच नाटकांनी या रंगभूमीच्या स्खलनाची सुरुवातही करून दिली असे म्हटले पाहिजे. पण हे सगळे तिसऱ्या-चौथ्या दशकात घडले. इतिहासक्रमात थोडे मागे जाऊन पुन्हा एकदा किर्लोस्कर मंडळीच्या पुढील प्रवासाचा मागोवा घेऊ.

**शिवराज नाटक मंडळी :**

१९१३मध्ये बालगंधर्व, बोडस, टेंबे यांनी किर्लोस्कर कंपनीतून बाहेर पडून 'गंधर्व संगीत नाटक मंडळी'ची स्थापना केली. दोनच वर्षांनी गंधर्व संगीत मंडळीतून गोविंदराव टेंबे बाहेर पडले आणि त्यांनी स्वतःची शिवराज संगीत मंडळी स्थापन केली (१९१५). या नाटक मंडळीत सवाई गंधर्व, शंकरराव सरनाईक या गायक-नटांची त्यांना साथ होती. हे दोघेही अब्दुल करीम खां यांचे शिष्य. सरनाईकांनी आपल्या गायनाचा रसिकवर्ग अल्पावधीत तयार केला होता. परंतु टेंब्यांना ही नाटक कंपनी टिकवून ठेवणे जमले नाही. लवकरच सवाई गंधर्व शिवराजमधून बाहेर पडले आणि शंकरराव सरनाईक यांनी इंदोरचे नाट्यवेडे संस्थानिक तुकोजीराव होळकर यांना आपल्या नाट्यसंस्थेत घेतले. त्यामुळे शिवराज नाटक मंडळी अल्पजीवी ठरली.

**यशवंत संगीत मंडळी :**

शिवराज संगीत मंडळीतून शंकरराव सरनाईक बाहेर पडले आणि त्यांनी महाराजा तुकोजीराव होळकर यांनी १९१९मध्ये त्यांच्यावर नव्याने स्थापन केलेल्या 'यशवंत संगीत मंडळी'ची जबाबदारी सोपवली. स्थापन केली. १९१९मध्येच गंधर्वमधून बाहेर पडलेले गणपतराव बोडस यांची या कंपनीत नाट्यप्रशिक्षक म्हणून नेमणूक झाली होती. नटांना अभिनय शिकवणारा तालीममास्तर ही मराठी रंगभूमीवरील महत्त्वाची व्यक्ती मानली जात असे. यशवंत संगीत मंडळी हा मराठी नाट्यक्षेत्रातील एक वेगळा प्रयोग होता. कंपनीच्या रूपाने चालणाऱ्या संगीत नाटक मंडळ्यांना व्यावसायिकदृष्ट्या टिकून राहण्यासाठी अनेक तडजोडी कराव्या लागत. कलावंतांना जर आर्थिक पाठबळ दिले, तर त्यांना त्यांच्या अंगी असलेल्या नाट्यकलेचा विकास करण्याचा अवसर मिळेल, या उदात्त हेतूने होळकरांनी ही नाट्यसंस्था स्थापन केली होती. नफा मिळवण्यासाठी कोणत्याही व्यावसायिक तडजोडी करण्याची गरज या संस्थेतील नट, नाटककार यांना नसल्याने केवळ उच्चतर असा कलाविष्कार करण्यासाठी त्यांनी आपली शक्ती खर्च करावी असे अपेक्षित होते. संस्थेचा कारभार सुरळीत चालावा यासाठी होळकरांनी एक डायरेक्टर बोर्ड स्थापन केले होते. इंदोरला भूगर्भशास्त्रज्ञाच्या हुद्द्यावर असलेल्या सत्यबोधराव हुदलीकर, कवी नरहर शंकर रहाळकर यांच्यासारख्या जाणकार नाट्यप्रेमींचा या डायरेक्टर बोर्डात समावेश होता (वसंत देसाई १९६२ : ३२). परंतु तुकोजीराव होळकरांचा नाट्यकलेच्या उत्तेजन देण्यासाठी राजाश्रयावर नाट्यसंस्था चालवण्याचा हा प्रयोग लवकरच फसला. या संस्थेची नाटके कलेच्या क्षेत्रात कोणतीही भरीव कामगिरी करू शकली तर नाहीच, परंतु व्यावसायिकदृष्ट्या देखील अपयशी ठरू लागली. नाटक चालो अथवा न चालो, आपल्याला राजाश्रय आहे, त्यामुळे संस्थेला मरण

नाही, अशा वृत्तीमुळे संस्थेतील कलावंतांमध्ये एकप्रकारची बेफिकिरीची भावना निर्माण झाली. नुसताच आर्थिक खर्चाचा डोलारा वाढत गेला. त्यामुळे तुकोजीराव होळकरांनी संस्थेचा राजाश्रय काढून घेतला. अर्थात त्यानंतरही शंकरराव सरनाईकांनी स्वतःच्या हिमतीवर यशवंत संगीत मंडळी जिवंत ठेवली.

**बलवंत संगीत मंडळी आणि मास्टर दीनानाथ :**

१९१८मध्ये किर्लोस्कर मंडळीत दुसऱ्यांदा फूट पडली. मास्टर दीनानाथ, चिंतामणराव कोल्हटकर आणि कृष्णराव कोल्हापुरे यांनी किर्लोस्करमधून बाहेर पडून 'बलवंत संगीत मंडळी'ची स्थापना केली.

'शाकुंतल'च्या प्रयोगाने या नव्या नाटक मंडळीने प्रारंभ केला. नुकतेच निधन झालेल्या राम गणेश गडकरी यांचे 'भावबंधन' हे नाटक बलवंत मंडळीने रंगभूमीवर आणले (१९१९). या नाटकातील दीनानाथांची लतिकेची भूमिका अतिशय गाजली. मास्टर दीनानाथ यांच्यासारखा मनस्वी नट मराठी रंगभूमीला मिळाला. बालगंधर्वांनंतरच्या पिढीतला हा प्रसिद्ध नट होता. दीनानाथांचे गायन वेगळ्या पठडीतले होते. त्यांनी मराठी नाटकातील संगीतावर गझल, कव्वाली आणि पंजाबी ढंगाच्या गाण्याचे संस्कार केले आणि त्यातून स्वतःची अशी गायनशैली निर्माण केली.

वीर वामनराव जोशी, वासुदेवशास्त्री खरे, वि. दा. सावरकर यांच्यासारख्या राष्ट्रवादी विचारांच्या नाटककारांची राष्ट्रवादी विचारांनी भारलेली ऐतिहासिक नाटके बलवंत मंडळीने रंगभूमीवर आणली. एकीकडे गडकरी-कोल्हटकर अशा पहिल्या फळीतील नाटककारांची नाटके बसवतानाच दुसरीकडे न. चिं. केळकर, विश्राम बेडेकर या नाटककारांची नाटकेही या कंपनीने केली. १९३३पर्यंत ही नाट्यसंस्था नाट्यक्षेत्रात होती. त्यानंतर बदललेल्या वाऱ्यांची दिशा पकडत मास्टर दिनानाथ यांनी चित्रपटक्षेत्रात प्रवेश केला.

**दुसरी मातृसंस्था : स्वदेशहितचिंतक नाटक मंडळी**

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात किर्लोस्कर संगीत मंडळीची नाटके मराठी नाट्यसंस्कृतीची जडणघडण करत असताना अन्यही नाटक कंपन्या त्याला आपल्या परीने हातभार लावत होत्या. त्यापैकी उल्लेखनीय कंपनी म्हणजे 'स्वदेशहितचिंतक नाटक मंडळी'. या कंपनीची स्थापना जनुभाऊ निमकर आणि त्यांचे बंधू यांनी १८९४ मध्ये केली. संगीत आणि गद्य अशा दोन्ही प्रकारची नाटके ही मंडळी करत असे. १९०६-७पर्यंत त्यांनी गद्य नाटके केली. अखेरचे गद्य नाटक 'राजाराम'. स्वदेशहितचिंतक मंडळीचे 'तरुणीशिक्षण नाटिका' हे सुधारणाविरोधी नाटक चांगलेच लोकप्रिय झाले होते. सुरुवातीच्या काळात 'सौभद्र' आणि 'रामराज्यवियोग' ही नाटकेही त्यांनी सादर केली.

१९०२मध्ये या कंपनीने देवलाचे 'संगीत शारदा' पुन्हा रंगभूमीवर आणले. याच नाटकातून तेव्हा अवघ्या दहा वर्षांचा असलेल्या गायक-नट केशवराव भोसले यांचे रंगभूमीवर पदार्पण झाले. त्यांची शारदेची भूमिका विलक्षण गाजली. १९०४मध्ये केशवराव गोरे हे किर्लोस्कर संगीत मंडळीतले एक प्रमुख नट स्वदेशहितचिंतक मंडळीत आले.

मामा वरेरकर हे नाटककार स्वदेशहितचिंतक मंडळीमार्फतच नाट्यक्षेत्रात प्रवेशले. त्यांचे पहिले नाटक 'कुंजविहारी' हे मंडळीने १९०८मध्ये रंगभूमीवर आणले. त्यानंतरचे त्यांचे नाटक 'संजीवनी' हेही स्वदेशहितचिंतकच्याच रंगभूमीवर आले. या दोन्ही नाटकांनी लोकप्रियता मिळवली.

स्वदेशहितचिंतक मंडळीचे मालक जनुभाऊ निमकर हे उत्तम आणि कठोर शिस्तीचे तालीम मास्तर होते. त्यांनी आपल्या कंपनीच्या नाटकांद्वारे विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात किर्लोस्कर मंडळीच्या बरोबरीने स्वतःचा प्रेक्षकवर्ग निर्माण केला होता. जनुभाऊ निमकर यांच्या कार्याचे मूल्यमापन केशवराव भोळे यांनी पुढील शब्दांत केले आहे : "लहानमोठ्या नटांपैकीं प्रत्येकाचें काम रेखीवपणें त्यांनीं बसवून दिल्याप्रमाणें झालेंच पाहिजे अशी त्यांची शिस्त असे. प्रेक्षकांच्या टाळ्या-हंशा वन्समोअरना तर ते बळी पडत नाहींत हें ते स्वतः वुईंगमध्यें उभें राहून पाहात असत. लोकप्रिय होत असलेल्या केशववरही (केशवराव भोसले) त्यांचा दबाव असे. त्यांच्या नाटकांचे प्रयोग देखील पद्धतशीर बसलेले असत. वाणी स्पष्ट करण्याकरतां जुन्या शास्त्रीपंडिताप्रमाणें ते नटांना संथा देत असत. प्रॉम्टिंग नसे. त्यामुळें प्रत्येक नटाची नक्कल चोख पाठ असे आणि त्यामुळें त्यांचें आपल्या कामांत पूर्ण लक्ष असे. भाऊराव, मोरोबा, नाटेकरांसारखे स्टार नट नसतांनाहि जनुभाऊंचे नाट्यप्रयोग तितकेच परिणामकारक होत असत.... संगीताच्या आहारी ते गेले नाहींत व आपल्या नटवर्गालाहि त्यांनीं जाऊं दिलें नाहीं, हे त्यांचें संगीत रंगभूमीवरील कार्य लक्षणीय (आहे)." (केशवराव भोळे/ प्रस्तावना : २५-२६).

परंतु १९०७मध्ये केशवराव भोसले हे स्वदेशहितचिंतक मंडळीतून बाहेर पडले आणि त्यांनी स्वतःची 'ललितकलादर्श नाटक मंडळी' स्थापन केली. केशवराव भोसले यांच्यासारखा हुकमी नट गेल्यानंतर जनुभाऊ निमकरांना स्वदेशहितचिंतक मंडळीसाठी नाव घेण्यासारखा चांगला नट मिळाला नाही. किर्लोस्कर संगीत मंडळीतले कृष्णराव गोरे १९१२मध्ये काही काळासाठी या कंपनीत आले होते. ते पुन्हा किर्लोस्करमध्ये परतले. १९१२मध्ये स्वदेशहितचिंतक मंडळी कायमची बंद पडली.

## ललितकलादर्श मंडळी आणि केशवराव भोसले

जानेवारी १९०८मध्ये केशवराव भोसले यांनी स्वतःची ललितकलादर्श मंडळी ही नाटक कंपनी स्थापन केली. फारशा गुणी किंवा नावाजलेल्या नटांची सोबत नसतानाही, केशवराव भोसले यांनी सुरुवातीपासून स्वतःच्या एकट्याच्या बळावर ललितकलादर्शची नाटके यशस्वी करून दाखवली. १९१०साली त्यांनी पुण्यात 'सौभद्र'चे प्रयोग करून स्वतःच्या गायनावर अवघे पुणे डोलायला लावले, अशी एक आठवण आहे. १९१३मध्ये गंधर्व संगीत मंडळीची स्थापना होईपर्यंत ललितकलादर्श मंडळी चांगलीच नावारूपाला आली होती. १९१३मध्ये केशवराव भोसले यांनी वीर वामनराव जोशी यांचे 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' हे नाटक रंगभूमीवर आणले. मूळ उर्दूमधल्या 'खूबसुरत बला' या नाटकाचे हे मराठी रूपांतर होते. त्यानंतर त्यांनी 'मानापमान' हे नाटक बसवले. या दोन नाटकांमुळे ललितकलादर्शने स्वतःचा प्रेक्षकवर्ग निर्माण केला. मामा वरेरकर, वीर वामनराव जोशी यांची नाटके केशवराव भोसले यांनी ललितकलादर्शतर्फे रंगभूमीवर आणली. १९२१मध्ये केशवराव भोसले यांचे निधन झाले. त्यानंतर ललितकलादर्शची मालकी कंपनीतील अन्य दोन नट व्यंकटेश बलवंत पेंढारकर आणि शंकर नीलकंठ चापेकर यांच्याकडे गेली. १९२४मध्ये चापेकर ललितकलादर्शमधून बाहेर पडले आणि त्यांनी नुकतीच बंद पडलेली किर्लोस्कर संगीत मंडळी चालवायला घेतली, हा इतिहास यापूर्वी आलेला आहे. त्यानंतर पेंढारकर हेच ललितकलादर्शचे मालक राहिले. १९३०मध्ये किर्लोस्करमधील आवाजासाठी प्रसिद्ध असलेले नट गंगाधरपंत लोंढे यांचा ललितकलादर्शमध्ये प्रवेश झाला. वर्षभर या कंपनीत राहून ते पुढे गंधर्वमध्ये गेले.

ललितकलादर्शच्या लोकप्रियतेत या कंपनीच्या नाटकांच्या आकर्षक नेपथ्यरचनेचा मोठा वाटा होता. तोवरच्या नाटकांच्या सजावटीसाठी पडदे वापरले जात, परंतु या पडद्यांवरील रंगसंगती, चित्रे यांचा फारसा गांभीर्याने विचार केला जात नसे. कंपनीकडे असलेले तेच ते पडदे तिच्या सर्वच नाटकांना सरसकट वापरले जात. त्यावरच्या देखाव्यांचा नाटकातील कथानकाशी मेळ नसे. केशवराव भोसले यांनी ललितकलादर्शच्या पहिल्या नाटकापासूनच ही नेपथ्यरचनेत स्वतःच्या कल्पना राबवायला सुरुवात केली. पडद्यावर कुठलीही अवास्तव, काल्पनिक चित्रे रंगवण्याऐवजी भारतीय चित्रपरंपरेतील श्रेष्ठ अशा अजिंठा, वेरूळ इत्यादी ठिकाणची शिल्पे, चित्रे रंगवण्याची कल्पना केशवराव भोसले यांची. त्यासाठी बराच पैसा खर्च करून कोल्हापूरचे प्रसिद्ध चित्रकार आनंदराव पेंटर यांच्याकडून खास पडदे, सीन, मखमलीचा पडदा (ड्रॉप) तयार करून घेतले. रंगमंचाच्या दर्शनी भागात दोन्ही बाजूंनी सुटून मध्ये जुळणारा असा गाजलेला 'मखमली पडदा' मराठी नाटकांत सर्वप्रथम ललितकलादर्शच्या रंगभूमीवर आला (के. वा. भोळे १९६७ : ११८). 'संन्याशाचा संसार' (१९१९) या नाटकातील

शंकराचार्यांच्या मठाचा आणि ख्रिस्त्यांच्या स्मशानाचा देखावा चित्रकार पांडुरंग हळदणकर यांनी तयार केला होता (वसंत देसाई १९६२ : ७०). प्रत्येक नाटकातील आशयाला अनुरुप असणारे देखावे रंगवलेले स्वतंत्र पडदे केशवराव भोसले यांनी तयार करवून घेतले. केशवरावांच्या मृत्यूनंतर कंपनीचे मालक झालेले व्यंकटेश पेंढारकर यांनीही नेपथ्यरचनेत आधुनिकता आणण्याची ही परंपरा पुढे चालू ठेवली. १९२१मध्ये चित्रकार पु. श्री. काळे हैद्राबाद संस्थानातली नोकरी सोडून महाराष्ट्रात ललितकलादर्श मंडळीत आले. य. ना. टिपणीस यांच्या 'शहाशिवाजी' (१९२१) व अन्य नाटकांची नेपथ्य सजावट काळे यांनी केली. मराठी रंगभूमीवर फ्लॅट सीन सर्वप्रथम आणण्याचे श्रेय ललितकलादर्शकडेच जाते. मामा वरेरकर यांच्या 'सत्तेचे गुलाम' (१९२२) या नाटकासाठी रचनाकार पु. श्री. काळे यांनी हे फ्लॅट सीन तयार केले होते. आधुनिक पद्धतीचे दिवाणखाने, बौद्ध लेणी आणि हिंदू देवालये, बगीचे अशा देखाव्यांची नाटकांच्या नेपथ्यात रचना करून पु. श्री. काळे यांनी मराठी रंगभूमीचे दृश्य स्वरूप वास्तववादी बनवले. सामजिक सुधारणेचा विचार मांडणारी वरेरकरांची नाटके वास्तववादी प्रकारची होती. त्याला अनुरूप वास्तव जीवनाचे अनुकरण करणारी नेपथ्यरचना काळे यांनी उभी केली.

पौराणिक आणि अवास्तव कल्पनाप्रधान कथानकांमध्ये अडकून पडलेल्या मराठी नाटकाला सामाजिक वास्तववादी दृष्टी देण्याचे कार्य एका मर्यादेपर्यंत ललितकलादर्शच्या नाटकांनी केले. मामा वरेरकर यांची नाटके या प्रकारची होती. मामा वरेरकर यांच्या 'तुरुंगाच्या दारात' (१९२३) या नाटकात अस्पृश्यतेचा प्रश्न मराठी रंगभूमीवर प्रथमच मांडला गेला. मराठीतल्या पहिल्या स्त्री-नाटककाराचे नाटक रंगभूमीवर आणण्याचे श्रेयही केशवराव भोसले यांच्याकडेच जाते. हिराबाई पेडणेकर यांचे 'दामिनी' हे नाटक ललितकलादर्श मंडळीने रंगभूमीवर आणले. खरे तर हिराबाई पेडणेकर या किर्लोस्कर मंडळीचे मालक नानासाहेब जोगळेकर यांच्या एकेकाळच्या सहचारिणी. श्री. कृ. कोल्हटकर यांच्या नाटकांमधल्या पदांना त्या चाली देत. त्या भास्करबुवा बखले यांच्याकडे गाणे शिकल्या होत्या. परंतु हिराबाईंनी लिहिलेले नाटक मात्र किर्लोस्कर किंवा गंधर्व या नाटक कंपन्यांनी अनेक वर्षांत रंगभूमीवर आणले नाही. केशवराव भोसले यांनी अखेर हिराबाईंना न्याय दिला.

गंधर्व संगीत मंडळीला भास्करबुवा बखले यांची संगीत-साथ मिळाली, त्याप्रमाणे ललितकलादर्श मंडळीच्या नाटकांना दुसरे प्रसिद्ध हिंदुस्थानी संगीत-कलावंत रामकृष्णबुवा वझे यांचे संगीत लाभले. मामा वरेरकरांच्या 'हाच मुलाचा बाप' (१९१८), 'संन्याशाचा संसार' (१९१९), 'सत्तेचे गुलाम' (१९२२), 'तुरुंगाच्या दारात' (१९२३) या नाटकांना वझेबुवांचे संगीत होते.

केशवराव भोसले यांचा गायक-नट म्हणून लौकिक जनुभाऊ निमकर यांच्या नेतृत्वाखाली, स्वदेशहितचिंतक मंडळीत असतानाच सर्वत्र पसरला होता. वयाच्या अवघ्या अठराव्या वर्षी केशवरावांनी ललितकलादर्श मंडळी स्थापन केल्यानंतर त्यांच्या कारकिर्दीचा दुसरा टप्पा सुरू झाला. अनेक बाबतींत ही नाटक कंपनी मराठी नाट्यक्षेत्रात वेगळी वाटचाल करणारी ठरली, याचे श्रेय केशवराव भोसले यांच्याकडे जाते. ललितकलादर्शच्या नाटकांची नेपथ्यरचना ही वास्तवावर आधारित असली पाहिजे, सजावटीसाठी भारतीय चित्र-शिल्पपरंपरेचे वैभव असलेल्या प्राचीन लेणी, देवालये यांची चित्रे, प्रतिकृती वापरल्या पाहिजेत, ही कल्पना केशवरावांची होती. मामा वरेरकरांसारखा नाटककार पौराणिक, कल्पनाप्रधान नाटकांऐवजी सामाजिक वास्तवाला स्पर्श करणारी नवी नाटके लिहीत होता. केशवराव भोसले यांनी वरेरकरांची ही नाटके मराठी रंगभूमीवर आणली. सामाजिक व राष्ट्रवादी विचारांच्या नाटकांची निवड त्यांनी जाणीवपूर्वक केली.

हे झाले त्यांचे नाटक कंपनी चालवण्यातले कर्तृत्व. व्यक्तिगत पातळीवर एक गायक-नट म्हणून केशवराव भोसले स्वतःला सतत घडवत राहिले. रामकृष्णबुवा वझे यांचा गंडा बांधून त्यांनी स्वतःच्या गायकीवर चांगली मेहनत घेतली. त्याचबरोबर अभिनयातही ते अव्वल बनले. 'मानापमान' व 'हाच मुलाचा बाप' या नाटकांमधल्या भूमिकांमध्ये त्यांचे श्रेष्ठ अभिनयकौशल्य दिसले. पदे गात असतानाही उचित अभिनय आणि पवित्रे घेऊन ते भूमिका उत्तम वठवत. गाणे आणि अभिनय या दोहोंतही सहजपणा हे त्यांचे वैशिष्ट्य.

अभिनय-कारकिर्दीच्या प्रारंभापासूनच केशवराव भोसले यांची बालगंधर्वांशी स्पर्धा होत राहिली. दोघांचाही रंगभूमीवर प्रवेश साधारणतः एकाच वेळी झाला. त्यांच्या शारदेच्या आणि सुभद्रेच्या भूमिका सारख्याच लोकप्रिय झाल्या. दोघांच्याही गाण्याची प्रकृती वेगळी होती. बालगंधर्वांचे गाणे मुलायम, भावव्याकूळ, तर केशवरावांचे गाणे जोरकस. १९१३ ते १९२० या काळात मराठी नाट्यरसिकांमध्येही दोन तट पडले होते. बालगंधर्वांचे रसिक प्रेक्षक केशवराव भोसले यांची नाटके चुकूनही पाहात नसत, तर केशवरावांच्या गाण्याचे निष्ठावान रसिक बालगंधर्वांच्या गायकीला नाके मुरडत असत. या दोन अव्वल गायक-नटांना एका संयुक्त नाट्यप्रयोगात एकत्र आणावे अशी कल्पना काही नाट्यरसिकांनी मांडली आणि ती दोघांनीही स्वीकारली. ८ जुलै १९२१ रोजी मुंबईच्या ग्रँड थिएटरमध्ये गंधर्व आणि ललितकलादर्श या दोन्ही नाटक मंडळ्यांचा संयुक्तपणे 'मानापमान' या नाटकाचा प्रयोग पार पडला. हा प्रयोग ठरल्यापासून नंतरही बराच काळ मराठी रंगभूमीच्य इतिहासात बहुचर्चित ठरला. मराठी रंगभूमीवरच्या या अनोख्या प्रयोगाबद्दल वसंत देसाई म्हणतात, "मराठी रंगभूमीच्या पहिल्या शंभर वर्षांच्या आयुष्यांत इतकी आतुरता आणि इतकी खळबळ कधींही दृष्टीला पडली नाहीं. प्रत्येक प्रेक्षक त्या नाट्यप्रयोगाकडे दोन महान् कलावंतांचें मीलन म्हणून नव्हे, तर जणू काय, ती दोन

मल्लांची कुस्ती होती अशा दृष्टीनें पहात होता. अण्णासाहेब किर्लोस्करांनीं केलेल्या पहिल्या शाकुंतल नाटकाला मराठी रंगभूमीची पद्धतशीर सुरुवात करण्याचें पुण्य होतें, तर संयुक्त मानापमान हें आमच्या रंगभूमीनें गांठलेलें अत्युच्च शिखर होतें." (वसंत देसाई १९६२ : ५१). या प्रयोगात प्रथमच या दोन गायकांना एकाच वेळी ऐकण्याची संधी प्रेक्षकांना मिळाली आणि त्यात केशवराव भोसले बालगंधर्वांवर बाजी मारून गेले.

संयुक्त मानापमानाचा हा प्रयोग ज्याप्रमाणे मराठी रंगभूमीच्या इतिहासातले एक अत्युच्च शिखर होता, त्याचप्रमाणे तो केशवराव भोसले यांच्या कारकिर्दीचेही अत्युच्च शिखर ठरला. कारण वर्षानुवर्षे केशवरावांच्या अभिनय-गायकीकडे तुच्छतेने पाहणाऱ्या बालगंधर्वांच्या निष्ठावान रसिक प्रेक्षकांना केशवरावांनी मंत्रमुग्ध केले; एकप्रकारे आपले मोठेपण स्वीकारण्यास भाग पाडले. परंतु या प्रयोगानंतर लगेचच, ऑक्टोबर १९२१मध्ये केशवराव भोसले यांचे निधन झाले.

## तिसरी मातृसंस्था : महाराष्ट्र नाटक मंडळी (१९०४)

मातृसंस्था म्हणून मानल्या जाणाऱ्या किर्लोस्कर मंडळी आणि स्वदेशहितचिंतक मंडळी या दोन्ही कंपन्या एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपासून मराठी रसिकांचे रंजन करत आल्या होत्या. महाराष्ट्र नाटक मंडळी ही तिसरी मातृसंस्था विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात, १९०४मध्ये स्थापन झाली होती. किर्लोस्कर केवळ संगीत नाटके करी, स्वदेशहितचिंतक मंडळींनी संगीत नाटकांसोबत काही गद्य नाटकेही केली; तर महाराष्ट्र नाटक मंडळी मात्र केवळ गद्य नाटके करणारी संस्था होती. एकोणिसाव्या शतकापासून गणपतराव जोशी यांच्या शाहूनगरवासी मंडळीने गद्य नाटकांची परंपरा मराठीत टिकवून ठेवली होती. ती पुढे नेण्याचे कार्य महाराष्ट्र नाटक मंडळीने केले. १९०४मध्ये प्रा. गोविंदराव टिपणीस, यशवंतराव टिपणीस, माधवराव टिपणीस आणि त्रिंबकराव कारखानीस यांनी या मंडळीची स्थापना केली. प्रा. चिं. ग. भानू हे या मंडळीचे मार्गदर्शक होते. नाट्यक्षेत्र हे अशिक्षित किंवा अल्पशिक्षित लोकांनीच भरलेले आहे अशी समजूत तेव्हा रूढ होती; त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नाटक मंडळी ही 'सुशिक्षितांची नाटक कंपनी' म्हणून ओळखली जाऊ लागली. एकतर या कंपनीतील अण्णासाहेब कारखानीस, गणपतराव भागवत वगैरे मंडळी अभ्यासू वाचक होती. नाट्यकलेविषयी गंभीरपणे चिंतन आणि चर्चा महाराष्ट्र नाटक मंडळीत चाले. सामाजिक-राजकीय विचार किंवा संदेश मांडणारी नाटके प्रामुख्याने प्रारंभीच्या दशकात तरी या कंपनीतर्फे रंगभूमीवर आली. शि. म. परांजपे, चिं. ग. भानू, कृ. प्र. खाडिलकर यांच्या विद्वत्तापूर्ण चर्चा कायम महाराष्ट्र नाटक मंडळीच्या बिऱ्हाडी चालत असत. त्यात राजकारण, समाजकारण, साहित्य, नाटक असे सगळेच विषय असत. त्यामुळे सुरुवातीच्या काळात तरी महाराष्ट्र नाटक मंडळीचे स्वरूप निराळे होते. केशवराव भोळे यांनी महाराष्ट्र नाटक मंडळीला

"नाट्यलेखनाची, नाट्याभ्यासाची, नाट्यचर्चेची, नाट्यशिक्षणाची प्रयोगशाळा" असे म्हटले आहे (के. वा. भोळे १९६७ : ७७).

किर्लोस्करच्या रंगभूमीवर श्री. कृ. कोल्हटकर यांची कल्पनाप्रधान संगीत नाटके गाजत होती, त्या काळात कृ. प्र. खाडिलकर यांची गद्य नाटके १९०४ ते १९१० या काळात महाराष्ट्र नाटक मंडळीने रंगभूमीवर आणली. खाडिलकरांच्या 'कांचनगडची मोहना' (१९०४), 'सवाई माधवरावांचा मृत्यु' (१९०६), 'कीचकवध' (१९०७), 'बायकांचे बंड' (१९०७) आणि 'भाऊबंदकी' (१९०९) या गद्य नाटकांमुळे महाराष्ट्र नाटक कंपनीला प्रचंड लोकप्रियता मिळाली. या नाटकांमुळेच खाडिलकर हे मराठीतले पहिल्या प्रतीचे नाटककार ठरून कोल्हटकरांच्या पंक्तीला जाऊन बसले. महाराष्ट्र नाटक मंडळीने सादर केलेल्या त्यांच्या 'कीचकवध' या पौराणिक नाटकातून इंग्रजांविरुद्ध प्रतिकात्मकरित्या भावना भडकवल्या जातात, असा आरोप ठेवून सरकारने या नाटकावर बंदी घातली.

सुरुवातीला गणपतराव भागवत हे कंपनीचे प्रमुख नट होते. यशवंतराव टिपणीस, माधवराव टिपणीस, त्रिंबकराव प्रधान हे त्यांना अभिनयात साथ देत. १९०७च्या सुमारास गणपतराव भागवत यांची 'कीचकवधा'तील कीचकाची भूमिका एवढी गाजली होती की त्यामुळे पुण्यात त्यांना घराबाहेर पडता येत नव्हते. "हा पाहा तो दुष्ट कीचक म्हणून लोक बोटे दाखवून तिरस्कार करायचे, त्वेषाचे उद्गार काढायचे, कित्येक त्यांना खडेही मारायचे..." अशी आठवण आहे (के. वा. भोळे १९६७ : ६९).

१९१२ साली राम गणेश गडकरी यांचे 'प्रेमसंन्यास' हे पहिले नाटक महाराष्ट्र नाटक मंडळीनेच रंगभूमीवर आणले. या नाटकातून केशवराव दाते आणि वामनराव पोतनीस हे दोन नट प्रकाशझोतात आले. त्यानंतर पुन्हा खाडिलकरांची 'सत्त्वपरीक्षा' (१९१४), 'द्रौपदी' (१९२०), 'सवतीमत्सर' (१९२७) ही नाटके महाराष्ट्र मंडळीच्याच रंगमंचावर सादर झाली.

१९१२ ते १९२९ ही वर्षे महाराष्ट्रच्या रंगभूमीवर केशवराव दाते यांनी गाजवली. शंकर परशुराम जोशी यांचे 'विचित्रलीला' (१९१६), वासुदेवशास्त्री खरे यांचे 'शिवसंभव' (१९१९) आणि विष्णुपंत औंधकर यांचे 'बेबंदशाही' (१९२४) या नाटकांमधील केशवराव दाते यांच्या वेगवेगळ्या प्रकृतीच्या भूमिका प्रेक्षकांच्या अतिशय पसंतीस उतरल्या. शंकर जोशी यांची 'मायेचा पूत' (१९२३) आणि 'खडाष्टक' (१९२७) ही विनोदी धाटणीची नाटके महाराष्ट्र मंडळीतर्फेच आली. १९१९पासून महाराष्ट्र मंडळीची धुरा केशवराव दाते सांभाळत होते. परंतु १९२९मध्ये ते महाराष्ट्र मंडळीतून बाहेर पडले आणि १९३०मध्ये त्यांनी समर्थ नाटक मंडळीत प्रवेश केला. तेथून ते नाट्यमन्वंतर या संस्थेत गेले. १९३०नंतर संगीत नाटक कंपन्यांचीच वाताहत होऊ लागली; अशा

काळात गद्य नाटक कंपन्यांनी तग धरून राहणे त्याहूनही कठीण होते. त्यामुळे महाराष्ट्र नाटक कंपनीही लयाला गेली.

### भारत नाटक मंडळी

१९१२मध्येच महाराष्ट्र नाटक मंडळीतून यशवंतराव टिपणीस आणि माधवराव टिपणीस हे बाहेर पडले आणि त्यांनी 'भारत नाटक मंडळी' स्थापन केली. या कंपनीतर्फे रंगभूमीवर आलेले पहिले नाटक म्हणजे माधवराव टिपणीस यांचे 'मत्स्यगंधा' (८ सप्टेंबर १९१२). त्यानंतर १९१२मध्येच भारत नाटक मंडळीने न. चिं. केळकर यांचे 'तोतयाचे बंड' रंगभूमीवर आणले. यशवंतराव टिपणीस यांची पुढील काळातील नाटके भारत नाटक मंडळीतर्फे रंगभूमीवर आली. भारत नाटक मंडळी अल्पजीवी ठरली.

### आर्यावर्त नाटक मंडळी

भारत नाटक मंडळी बंद पडल्यावर यशवंतराव टिपणीस आणि माधवराव टिपणीस यांनी १९१७मध्ये 'आर्यावर्त नाटक मंडळी'ची स्थापना केली. 'चंद्रग्रहण' या शिवाजी महाराजांच्या जीवनावरील नाटकाने कंपनीची सुरुवात झाली. हे शिवाजी महाराजांवरील पहिले प्रभावी नाटक मानले जाते (ह. वि. मोटे (संपा०) १९७५ : ७३). आर्यावर्त नाटक मंडळी बंद पडल्यानंतर यशवंतराव टिपणीसांनी रंगभूमीचा निरोप घेतला.

### गणेश नाटक मंडळी

१९२१मध्ये आर्यावर्त नाटक मंडळी बंद पडल्यावर माधवराव पोतनीस वगैरे नटांनी 'गणेश नाटक मंडळी'ची स्थापना केली. १९२१ नाना फाटक या तेजस्वी नटाचा उदय याच संस्थेत झाला.

महाराष्ट्र नाटक मंडळी आणि तिच्या गोतावळ्यातून उदयाला आलेल्या या इतर कंपन्या या गद्य नाटक कंपन्या होत्या. या काळात आणखीही काही नाटक कंपन्या गद्य नाटके सादर करत होत्या. त्यामध्ये प्रामुख्याने समर्थ नाटक मंडळी, लोकमान्य नाटक मंडळी, चित्ताकर्षक नाटक मंडळी यांचा समावेश होता.

या काळातील मराठी रंगभूमी गाजवणाऱ्या प्रमुख नटांमध्ये संगीत नाटकांमधील गायक-नटांचे प्रमाण अधिक होते. गंधर्व, किर्लोस्कर, ललितकलादर्श यांसारख्या पहिल्या फळीच्या नाटक कंपन्या संगीत नाटकेच सादर करीत. बहुतांश मराठी प्रेक्षकवर्ग नाटकांकडे खेचला गेला तो नाटकातील संगीताच्या आकर्षणामुळे. स्वाभाविकच संगीत नाटकांचा प्रवाह या काळात अधिक प्रभावी ठरला. गद्य नाटकांना तुलनेने प्रेक्षकांचा प्रतिसाद कमी असे. तरीदेखील वरील नाटक कंपन्या निष्ठेने गद्य नाटके सादर करत राहिल्या. प्रेक्षकांची गर्दी खेचून घेण्याजोगा संगीतासारखा हुकमी एक्का नसतानाही नाटकाचे कथानक, नटांचा अभिनय यांच्याद्वारे प्रेक्षकांना वेधून घेत राहिल्या. एकीकडे

संगीत नाटकांमधून 'नाटक' हरवत गेले आणि केवळ संगीत उरले; अशा काळात प्रेक्षकांच्या अल्प प्रतिसादामुळे खचून न जाता खरेखुरे 'नाटक' टिकवून ठेवण्याचे मौलिक काम गद्य नाटक मंडळ्यांनी केले. म्हणूनच गद्य नाटक मंडळ्यांच्या कार्याचे मूल्यमापन करताना केशवराव भोळे यांनी पुढील उद्गार काढले आहेत : "महाराष्ट्रीय नाट्यकलेचा व रंगभूमीचा विकास कसा झाला, कोणी केला, याचा प्रांजळपणाने अभ्यास करणाऱ्याला शाहूनगरवासी, महाराष्ट्र नाटक मंडळी यांनी त्या विकासाला प्रामुख्याने केवढा मजबूत हातभार लावला हे कळून येईल; इतकेच नव्हे, तर मराठी नाटक व रंगभूमी अखेरपर्यंत कोणी जगविली असेल तर बहुतांशाने या गद्य मंडळींनी हे कबूल करणेच प्राप्त होईल." (के. वा. भोळे १९६७: ८०).

ही गद्य नाटकांची परंपरा एकोणिसाव्या शतकापासून जारी होती. त्या काळात ती 'बुकीश नाटके' म्हणून ओळखली जात. पाश्चात्य नाटकांच्या परिशिलनातून येथील शिक्षित नाट्यरसिकांमध्ये नाटकाचे वेगळे रूप घडवण्याची इच्छा निर्माण झाली. अशा मंडळींनी एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात पुण्यात स्थापन केलेल्या 'शाहूनगरवासी मंडळी'ने मराठीत गद्य नाटकांचा एक आदर्श निर्माण केला. या नाटक मंडळीतून पुढे आलेल्या गणपतराव जोशी या नटाने जवळजवळ अडीच दशके मराठी रंगभूमीवर विविध भूमिका करून स्वतःच्या अभिनयाचा इतका गडद ठसा उमटवला की संगीत रंगभूमीवरचे भाऊराव कोल्हटकर, बालगंधर्व अशा पहिल्या फळीच्या नटांशी त्यांची बरोबरी होऊ लागली. म्हणूनच गद्य नाटकांच्या योगदानाचा विचार करताना शाहूनगरवासी मंडळी आणि गणपतराव जोशी यांच्या कार्याचा विचार प्रथम करावा लागतो.

### विसाव्या शतकातील गद्य नाटकांची गंगोत्री : शाहूनगरवासी मंडळी व गणपतराव जोशी

किर्लोस्कर संगीत मंडळीइतकीच शाहूनगरवासी नाटक मंडळी देखील जुनी आहे. पुण्यातील नाट्यरसिक वासुदेवराव केळकर, रावसाहेब फाटक यांनी शाहूनगरवासी नाटक मंडळीची स्थापना १८८०मध्ये केली. सुरुवातीला कंपनीने पौराणिक नाटके केली. गणपतराव जोशी, बाळाभाऊ जोग हे प्रमुख नट होते. १८८६पासून त्यांनी गद्य नाटके करण्यास सुरुवात केली. १८९०च्या सुमारास पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजमधील इंग्रजीचे प्राध्यापक वासुदेवराव केळकर यांच्या संपर्कात जोशी-जोग ही मंडळी आली. त्यांना रंगभूमीवर नवे काहीतरी करायचे होते. केळकरांनी त्यांना शेक्सपिअरच्या 'टेमिंग ऑफ दी श्रू' या नाटकाचे 'त्राटिका' या नावाने मराठी भाषांतर करून दिले. १८९१मध्ये शाहूनगरवासी मंडळीने पाच अंकी हॅम्लेट नाटकाचा प्रयोग पुण्यात लावला. वासुदेव केळकरांनी आपल्या फर्ग्युसनमधील विद्यार्थ्यांना या नाटकाचा प्रयोग पाहण्यास सांगितले व त्या प्रयोगाला गर्दी झाली. तेथून पुढे शाहूनगरवासीच्या 'हॅम्लेट'ला तरुण पिढीतून

प्रेक्षकवर्ग मिळू लागला (ल. ना. जोशी १९२३ : १०७). हळूहळू 'शेक्सपिअरची नाटके करणारी कंपनी' अशी शाहूनगरवासी मंडळीची ओळख प्रस्थापित झाली. १८९१-९२मध्ये अनुक्रमे 'त्राटिका' आणि वा. रं. शिरवळकर-वि. त्र्यं. मोडक या द्वयीने लिहिलेले 'राणा भीमदेव' ही शाहूनगरवासी मंडळीची नाटके अतिशय लोकप्रिय झाली. त्यातील गणपतराव जोशी यांच्या भूमिका गाजल्या.

ऐतिहासिक नाटकांचा जो आकृतिबंध शाहूनगरवासी मंडळीने रंगभूमीवर आणला तोच पुढे रूढ झाला. ऐतिहासिक नाटकांची मंचसजावट, पात्रांची वेशभूषा ऐतिहासिक काळाला शोभतील अशी असावीत ही कल्पना या नाटकांनी मराठीत रुजवली. त्याचबरोबर मराठी नाटक पौराणिक-काल्पनिक वातावरणातून वास्तवसदृश वातावरणात आणण्यास शाहूनगरवासी मंडळीच्या नाटकांनी हातभार लावला.

'राणा भीमदेव', 'पानपताचा मुकाबला', 'तुकाराम', 'रामदास', 'एकनाथ', 'बाजी देशपांडे' ही शाहूनगरवासी मंडळीची गाजलेली ऐतिहासिक नाटके. त्याचबरोबर शेक्सपिअरची पुढील रुपांतरित नाटके कंपनीने रंगभूमीवर आणली – 'विकारविलसित' (हॅम्लेट), 'त्राटिका' (टेमिंग ऑफ द श्रू), 'झुंजारराव' (ऑथेल्लो), 'मानाजीराव' (मॅक्बेथ), 'कान्तीपूरचे दोन गृहस्थ' (टू जंटलमेन ऑफ व्हेरोना), 'तारा' (सिंबेलाईन), 'कपिध्वज' (किंग जॉन), 'विश्वामित्र' (टायमन ऑफ अथेन्स).

प्रेक्षकांना नाटकांकडे आकर्षून घ्यावे यासाठी वासुदेवराव केळकर यांनी केलेल्या एका युक्तीमुळे मराठी नाट्यक्षेत्रात नवा पायंडा पडला. शाहूनगरवासी मंडळीच्या आगामी नाटकाची जाहिरात करताना त्या नाटकाच्या कथासूत्राचा प्रेक्षकांना परिचय होऊन त्यांच्या मनात नाटक पाहण्याविषयी उत्सुकता निर्माण व्हावी यासाठी त्यांनी नव्या आगामी नाटकाचे कथासूत्र थोडक्यात छापून ती हँडबिले आधी वाटण्यास सुरुवात केली. या मजकुरात रंगमंचावरील त्या नाटकातील आकर्षक देखाव्यांचेही वर्णन केलेले असे (ल. ना. जोशी १९२३ : १३२). या हँडबिलांमध्ये 'जळत असलेला तुरुंग', 'किल्ल्याच्या बुरुजावरून उडी' अशी प्रसंगांचा उत्कंठा वाढवणारी थोडक्यात वर्णने असत. त्यामुळे प्रेक्षकांमध्ये त्या नाटकाविषयी आकर्षण निर्माण होई अशी आठवण मामा वरेरकर यांनी सांगितली आहे (भा. वि. वरेरकर १९४१ : २२).

गणपतराव जोशी हे शाहूनगरवासी मंडळीचे आणि मराठी गद्य रंगभूमीवरचे देखील सर्वश्रेष्ठ नट होते. वयाच्या चौदाव्या वर्षी त्यांनी शाहूनगरवासी मंडळीत प्रवेश केला. गणपतराव जोशी यांनी स्वतःच्या अभिनय-कौशल्याच्या जोरावर बुकीश नाटके लोकप्रिय केली. झुंजारराव, राणा भीमदेव, हॅम्लेट, मानाजीराव, प्रतापराव (त्राटिका), तुकाराम या पात्रांच्या त्यांच्या भूमिका अतिशय गाजल्या. गणपतरावांच्या हॅम्लेटने आणि राणा भीमदेवाने लोकांना वेड लावले. गणपतरावांच्या या भूमिका अगणित वेळा पाहिलेले श्रोते

त्या काळात होते. १८९०नंतरच्या दशकात संगीत रंगभूमीवरील किर्लोस्कर मंडळीच्या भाऊराव कोल्हटकर यांच्याइतकेच गद्य रंगभूमीवरील गणपतराव जोशी हे देखील प्रभावी नट मानले जात होते. "भाऊरावांचे काही गाण्यांचे स्वर जसे कानात सारखे गुंजन करीत तशीच हॅम्लेट आणि राणा भीमदेवाची गणपतरावांची भाषणेही पंधरापंधरा दिवस आपल्या कानांत अजून उमटत आहेत, असे प्रेक्षकांना वाटे." (के. वा. भोळे १९६७ : ६६). 'राणा भीमदेव' नाटकाद्वारे गणपतराव जोशांनी वीररसप्रधान भूमिकेचा एक आकृतिबंधच मराठी नाटकांत रुजवला. पुढे ऐतिहासिक नाटकांतून इतर नटांनी त्याचे अनुकरण केले. राणा भीमदेवाच्या भूमिकेतील त्यांच्या विशिष्ट आवाजात संवादफेक करण्याच्या शैलीवरूनच 'राणा भीमदेवी थाटात' हा वाक्प्रचार मराठी भाषेत रूढ झाला.

संगीत नाटकांमुळे प्रेक्षकांच्या हृदयात अढळ स्थान मिळवलेल्या किर्लोस्कर मंडळीच्या नाटकांचा प्रेक्षक खेचून घेण्याची ताकद गणपतरावांच्या अभिनयात होती. एकदा किर्लोस्करचे 'सौभद्र' आणि शाहूनगरवासीचे 'राणा भीमदेव' या नाटकांचे खेळ एकाच गावात समोरासमोर लागले असताना, "भाऊरावांच्या कर्णमधुर आणि अद्वितीय तानेच्या ललकारीला, रणचंडीचें तांडव करायला तत्पर करणाऱ्या भीमदेवाच्या गगनभेदी आवाजानें सुरवात करतांच, किर्लोस्करांचें थिएटर दुसऱ्या अंकापासून मोकळें होऊं लागून, मेघांच्या गडगडाटांशी स्पर्धा करणाऱ्या भीमदेवाच्या रणोत्साही गर्जना ऐकायला शाहूंच्या थिएटरांत उसन्या घाईनें प्रेक्षकांची गर्दी उसळूं लागली..." अशी आठवण नोंदवली गेलेली आहे (ल. ना. जोशी १९२३ : ११९). गणपतरावांच्या हॅम्लेट, झुंजारराव, प्रतापराव या भूमिकांची वाखाणणी टाइम्स, ॲडव्होकेट यांसारख्या इंग्रजी वर्तमानपत्रांनी तर केलीच, पण शेक्सपिअरची मराठीत रुपांतरित असलेली त्यांची नाटके भारतातल्या इंग्रज सनदी अधिकाऱ्यांनी पाहिली, त्यांनीही गणपतरावांच्या अभिनयकौशल्याचे वेळोवेळी कौतुक केले.

गणपतराव जोशी यांनी पारंपरिक मराठी नाटकातल्या अनेक छोट्यामोठ्या रीतीरिवाजांना फाटा देऊन मराठी नाटकाला 'आधुनिक' रूप देण्याचा उपक्रम केला. शाहूनगरवासी नाटक मंडळीच्या नाटकांची नेपथ्यरचना अगदी साधी असे. काल्पनिक, अवास्तव देखाव्यांचा वापर रंगमंचावर नसे. त्याचबरोबर गणपतराव जोशी व इतर नटांची वेशभूषाही साधी असे. गणपतरावांनी खादीचा साधा कुर्ता आणि डोक्याला फेटा असा त्यांचा रंगभूमीवरील वेष असे. खादीच्या कुर्त्यातला हॅम्लेट गणपतरावांनी मराठी नाटकात लोकप्रिय केला. त्याचप्रमाणे मराठी नटांच्या डोक्यावरील शेंडीही गणपतरावांनी हटवली. तोवरच्या मराठी नाटकांमध्ये स्त्री भूमिका करणाऱ्या नटांच्या डोक्यावर विशाल केशसंभार असे, आणि इतर नटांनी टक्कल करून शेंडी राखलेली असे. मराठी रंगभूमीवरील हॅम्लेटदेखील शेंडी राखलेलाच असे. बिनशेंडीचा, व्यवस्थित केस राखून

भाग पाडलेला हॅम्लेट पहिल्यांदा गणपतराव जोशी यांनी सादर केला. ब्राह्मण, ऋषी आणि गोसावी या भूमिकांशिवाय अन्य कोणत्याही भूमिकेत नटाने रंगभूमीवर बोडक्या डोक्याने येऊ नये हा नियमही त्यांनी मोडला.

गणपतराव जोशी यांचे नाट्यकलेसंबंधी सखोल वाचन होते आणि वासुदेवराव केळकर, शंकरराव पाटकर, दादासाहेब खापर्डे यांच्यासारख्या ज्येष्ठ जाणत्यांकडून त्यांनी भारतीय व पाश्चात्य रंगभूमीचा अभ्यास केला होता. त्यामुळे अभिनय आणि एकूणच नाट्यकला याविषयी त्यांचे निश्चित विचार होते. संगीत नाटकांत पदांना 'वन्स मोअर' मागून जास्तीत जास्त मनोरंजन पदरात पाडून घेण्याची चटक लागलेल्या प्रेक्षकांनी गणपतरावांच्या गद्य नाटकातल्या प्रवेशालाही वन्स मोअर मागायला सुरुवात केली, परंतु गणपतराव त्यांना बळी पडले नाहीत. एकदा मुंबईत 'मॅक्बेथ'चा प्रयोग होता. बाळाभाऊ जोग हा सोबतचा नट झोपेत मरतो असा प्रवेश झाला आणि त्याला वन्स मोअर मिळाला. गणपतरावांनी नाटक थांबवले आणि रंगमंचावर येऊन त्यांनी अशा एखाद्याच प्रवेशाचं सादरीकरण पुन्हा करणार नाही, असे स्पष्टपणे प्रेक्षकांना बजावले. ते म्हणाले, "संगीतांतलें 'वन्स मोअर' हें संगीत मंडळ्यांना जरीं खपत असलें तरी तें निसर्गविरुद्ध असल्यानें अक्षम्यच आहे. आम्ही नट म्हणजे संसारात घडलेल्या गोष्टींचें हुबेहुब प्रदर्शन करणारे आहोंत. संसारांत एकदां मनुष्य मेला असतां, त्याला पुन्हां एकदां मरून दाखीव म्हणून त्याच्यापाशीं जरी कंठशोष केला तरी त्याच्या कलेवरावर त्याचा काय परिणाम होणार! ...मृत्युमुखीं पडत असलेला माणूस उत्तम तऱ्हेच्या सजीवावस्थेंतल्या माणसाप्रमाणें सुरेल तालबद्ध ताना मारीत गात गात मरण पावल्याचें अनैसर्गिक कृत्य संगीत नाटकांत जरी 'वन्स मोअर'च्या गजरांत पचनीं पडलें, तरी तें आमच्या निसर्गाच्या प्रतिसृष्टीच्या गद्यनाटकरूप सृष्टींत पचनीं पडण्या इतके अद्यापि बाष्कळ झालेलें नाही." (ल. ना. जोशी १९२३ : १५७).

थोडक्यात, संगीत नाटकांची कृत्रिम कथानके आणि संगीतामागे फरपटत जाणे गणपतराव जोशींना मुळीच मान्य नव्हते. नाटक हे मानवी जीवनाचे दर्शन घडवते, त्यामुळे ते वास्तवदर्शीच असले पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. त्यामुळेच वेशभूषेपासून अभिनयापर्यंत वास्तवदर्शी शैली त्यांनी गद्य नाटकांतून रूढ केली.

१९१०पर्यंत गणपतराव जोशी यांची नाटके प्रचंड यशस्वी होत होती. त्यानंतरही त्यांची लोकप्रियता टिकून राहिली तरी शाहूनगरवासी मंडळीची स्थिती खालावत गेली आणि पर्यायाने गणपतराव जोशी यांनाही प्रतिकूल परिस्थितीला तोंड द्यावे लागले. १९२२ मध्ये त्यांचे निधन झाले. मात्र मराठी गद्य रंगभूमीवरील गणपतरावांच्या पस्तीस वर्षांच्या प्रभावी कारकिर्दीमुळे १९१२नंतर मराठीत अनेक गद्य नाटक मंडळ्या निघाल्या आणि त्यांनी गद्य नाटकांची परंपरा टिकवून ठेवली. केशवराव भोळे गणपतरावांच्या

नाट्यकारकिर्दीचे मूल्यमापन करताना म्हणतात, "खरा नट सर्व बंधने तोडून मानवजातीला आवाहन करीत असतो. गणपतराव असेच अद्वितीय नट होऊन गेले. ते महाराष्ट्राच्याच नव्हे, तर जगातल्या उत्तम नटांच्या रांगेत जाऊन बसले. म्हणूनच त्यांना 'इंडियन गॅरिक' ही सार्थ संज्ञा रसिकांनी दिली..." (के. वा. भोळे १९६७ : ६६).

### इतर नाटक मंडळ्या

विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून १९३५-४०पर्यंत महाराष्ट्रात नाटके सादर करणाऱ्या मराठीतल्या आघाडीच्या नाटक मंडळ्या आणि त्यांच्यातून निर्माण झालेल्या इतर मंडळ्या यांच्या विविध प्रवाहांचा हा थोडक्यात परिचय होता. याशिवाय इतर काही उल्लेखनीय नाटक कंपन्यांविषयी सांगितले पाहिजे.

पाटणकर संगीत मंडळी (१८८४-१९१६) ही एकोणिसाव्या शतकापासून अस्तित्वात असलेली एक उल्लेखनीय नाटक कंपनी. मालक माधवराव पाटणकर यांनी लिहिलेली नाटके कंपनीतर्फे रंगमंचावर येत. या नाटकांची कथानके कपोलकल्पित, भडक स्वरूपाची असत. पाटणकरांनी आपल्या नाटकांमधल्या पदांना गुजराती-पारशी रंगभूमीवरील संगीताच्या धर्तीवर चाली दिल्या. त्याचप्रमाणे 'झगडे' या नावाने ओळखली जाणारी स्त्री-पुरुषांची द्वंद्वगीते त्यांनी नाटकांतून पेरली. या दोन गोष्टींमुळे पाटणकरांची नाटके अतोनात लोकप्रिय झाली. अर्थात, पांढरपेशा समाजात जेव्हा किर्लोस्करची नाटके लोकप्रिय होत होती, तेव्हा अशिक्षित, मजूर-कामगार या वर्गाने पाटणकर संगीत मंडळीच्या नाटकांना पसंती दिली. ही कंपनी बहुतांश काळ मुंबईतच वास्तव्याला असे. येथील गिरणी कामगार हा त्यांचा प्रमुख प्रेक्षकवर्ग होता. "माझी नाटके गिरणबाबूंकरिता आहेत," असे माधवराव पाटणकर म्हणत असत (बाबूराव जोशी १९७४ : ३४-३६).

याच काळात 'श्री महालक्ष्मी प्रासादिक मंडळी'च्या (१९००-१९१६) नाटकांनाही प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद होता. या कंपनीतील प्रमुख नट दत्तोपंत हल्याळकर यांची तुलना किर्लोस्कर मंडळीतील भाऊराव कोल्हटकर यांच्याशी होत असे. किंबहुना भाऊरावांइतकेच सरस आवाजात गाणारे दत्तोपंत हल्याळकर अभिनयाच्या बाबतीत भाऊरावांहून दोन पावले पुढे होते, असेही सांगतात. विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत दत्तोपंत हल्याळकरांच्या 'शाकुंतल', 'शापसंभ्रम' आणि 'मृच्छकटिक' या नाटकांतील अनुक्रमे दुष्यंत, पुंडरीक आणि चारुदत्त या भूमिका अतिशय लोकप्रिय होत्या.

नाट्यकलाप्रवर्तक मंडळी १८९६मध्ये स्थापन झाली. या मंडळीच्या संचालक मंडळात पुण्यातील गोपाळराव मराठे, वासुदेव सदाशिव पटवर्धन इत्यादी. माधवराव केळकर, बाबूराव जोशी हे नट प्रमुख होते. नाट्यकलाप्रवर्तक मंडळीने शेक्सपिअरच्या काही नाटकांची रुपांतरे संगीतासह सादर केली. उदाहरणार्थ, 'विंटर्स टेल' या नाटकाचे रुपांतर असलेले 'विकल्पविमोचन', 'तारा', 'प्रेमगुंफा' इत्यादी. परंतु हा 'संगीत

शेक्सपिअर' लोकांना भावला नाही. या नाटकांत संगीत शोभत नाही अशी टीकाही या नाटकांवर झाली. मात्र कंपनीचे ह. ना. आपटे लिखित 'संत सखू' (१९११) हे नाटक मात्र अतिशय लोकप्रिय झाले होते. या नाटकात सखूची भूमिका सवाई गंधर्व करत, तर विठ्ठलाची भूमिका तेव्हा लहान वयाचे असलेले कृष्णराव फुलंब्रीकर करत.

नाट्यकलाप्रवर्तक मंडळीने विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात केलेली एक कामगिरी म्हणजे हिंदुस्थानी संगीताचे रीतसर शिक्षण घेतलेल्या गवयांना त्यांनी नट म्हणून रंगभूमीवर उभे केले. १९०९मध्ये अब्दुल करीमखां यांचे पट्टशिष्य रामभाऊ कुंदगोळकर ऊर्फ सवाई गंधर्व, भास्करबुवा बखले यांचे शिष्य कृष्णराव फुलंब्रीकर, नंतरच्या काळात बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांचे शिष्य मिराशीबुवा आणि भाटेबुवा ही मंडळी गायक-नट म्हणून सर्वप्रथम नाट्यकलाप्रवर्तक मंडळीच्याच रंगभूमीवर अवतरली. मराठी रंगभूमीवर हिंदुस्थानी संगीताचा गडद प्रभाव पडण्यास ही गोष्ट कारणीभूत ठरली. १९१३नंतर भास्करबुवा बखले, रामकृष्णबुवा वझे या थोर गायकांची प्रत्यक्ष साथ मराठी नाटक मंडळ्यांना मिळू लागली आणि मराठी रंगभूमी हे हिंदुस्थानी संगीताच्या विविध आविष्कारप्रकारांचे प्रमुख केंद्र ठरले.

सवाई गंधर्व पुढे नाट्यकलेतून बाहेर पडले आणि त्यांनी १९१४मध्ये स्वतःची 'नूतन संगीत नाटक मंडळी' स्थापन केली. नूतन संगीत मंडळीने रंगभूमीवर आणलेले 'विनोद' (१९१३) हे नाटक आणि 'आनंदविलास नाटक मंडळी'च्या रंगभूमीवर आलेले माधवराव जोशी यांचे 'स्थानिक स्वराज्य' ऊर्फ 'म्युनिसिपालिटी' हे नाटक (१९२५) ही मराठी रंगभूमीवरील विनोदी वळणाची नाटके होती. पुढील काळात, १९३३नंतर आचार्य अत्रे यांच्या नाटकांनी विनोदी नाटकांचा हा प्रवाह अधिक प्रभावी केला. संगीत नाटकांच्या घसरणीच्या काळात बालमोहन संगीत मंडळीने हा नवा प्रवाह मराठी रंगभूमीवर रुजवला.

या काळातली सर्वसामान्य प्रेक्षकांची मने जिंकून घेणारी आणखी एक नाटक कंपनी म्हणजे भक्तिरसप्रधान नाटके सादर करणारी बाबाजी दौलत राणे यांची 'राजापूरकर संगीत मंडळी' (स्थापना १९०३). ही कंपनी मुळात १८९७मध्ये 'मुंबईकर नाटक मंडळी' या नावाने स्थापन झाली होती. १९०३पासून ती राजापूरकर संगीत मंडळी म्हणून ओळखली जाऊ लागली. 'संगीत दामाजी' (लेखक – ल. ना. जोशी, १९०४), 'श्री पुंडलिक' (१९०५), 'संत तुकाराम' (१९११) ही या कंपनीची नाटके श्रद्धाळू बहुजन समाजात दोनतीन दशके गर्दी खेचून घेत होती. विशेषतः स्त्रियांचा प्रेक्षकवर्ग मोठा होता. या कंपनीचे सर्वाधिक लोकप्रिय नाटक म्हणजे 'संत तुकाराम'. यात पुरुषोत्तम वामन शुक्ल हे तुकारामांची भूमिका करीत. तर तुकारामांच्या पत्नीची भूमिका बाबाजी राणे करीत. या नाटकात भक्तिबरोबर विनोदही होता.

बाबाजी राणे १९१८पूर्वी दिवंगत झाले होते. त्यानंतरही त्यांची नाटके मराठी रंगभूमीवर लोकप्रिय असण्याचे मुख्य कारण पुरुषोत्तम शुक्ल हे त्यांचे प्रमुख नट होत. "तुकारामाचीं भूमिका ते इतक्या तन्मयतेनें करीत, चेहऱ्यावर साधेपणा, भक्तिभाव आणि स्थितप्रज्ञता इतकी वाखाणण्यासारखी दाखवीत, आणि स्वतः मोठेसे गायक नसतांही तुकारामाचे अभंग इतक्या रसाळ पद्धतीनें म्हणत, कीं त्याचें वर्णन करता येणें शक्य नाहीं." (वसंत देसाई १९६२ : २०). राजापूरकर मंडळीने न. चिं. केळकरांचे 'भानुदास' हे नाटकही रंगभूमीवर आणले होते.

## ९.३ मराठी नाट्याभिरुची आणि प्रेक्षकांचा प्रतिसाद

नाटक कंपन्यांच्या काळात मराठी नाट्यरसिकाची अभिरुची एकाच छापाची नव्हती. बहुतांश नाटकवेडे संगीताचे शौकीन होते. त्यामुळे संगीत नाटके अधिक चालत. हिंदुस्थानी संगीत जसजसे मराठी रंगभूमीवर अधिकाधिक येऊ लागले, तसतसा पांढरपेशा मध्यमवर्गातील हिंदुस्थानी संगीताचा रसिक श्रोता मराठी नाटकांकडे वळू लागला. किर्लोस्कर, गंधर्व, ललितकलादर्श, नाट्यकला, बलवंत या कंपन्यांच्या नाटकांचा प्रेक्षकवर्ग प्रामुख्याने संगीतासाठी येत असे. पाटणकर, वाशिमकर, महालक्ष्मी या कंपन्यांची नाटके त्यांतल्या भडकपणासाठी, उडत्या आणि लोकप्रिय संगीतासाठी प्रसिद्ध होती. तर राजापूरकर मंडळीची नाटके त्यांतील धार्मिक कथानकांसाठी पाहिली जात होती. मोठ्या नटांचे 'फॅन' असलेले प्रेक्षकही असत. वर बालगंधर्व आणि केशवराव भोसले या दोन नटांमधल्या सुप्त स्पर्धेविषयी लिहिले आहे. या दोन नटांमधली ही स्पर्धा त्यांच्या प्रेक्षकांमध्येही झिरपली होती. केशवराव भोसल्यांचे चाहते प्रेक्षक बालगंधर्वांची नाटके पाहात नसत, तर बालगंधर्वांचे चाहते केशवरावांच्या नाटकांकडे पाठ फिरवत. १९२१मध्ये या गंधर्व आणि ललितकलादर्श यांचा 'मानापमान' नाटकाचा ऐतिहासिक ठरलेला सामायिक प्रयोग झाला, त्यात या दोघांच्याही चाहत्यांमधली ही दरी स्पष्ट दिसून आली. या प्रयोगात "केशवराव भोसल्यांचे चहाते गंधर्वांच्या गाण्याला टाळ्या देत नसत तर गंधर्वांचे चहाते केशवरावांच्या गाण्याला टाळ्या देत नसत. कांहीतर उठून त्या त्या पदाच्या वेळी बाहेर जात." अशी आठवण आहे (त्रिं. अ. धारणकर १९८० : ९६).

प्रदेशानुसार देखील प्रेक्षकांच्या अभिरुचीमध्ये पालट दिसत असे. मुंबई आणि पुणे ही मराठी नाट्यप्रयोगांची प्रमुख केंद्रे होती. प्रतिष्ठित नाटक कंपन्यांचा मुक्काम बहुतांश काळ याच शहरांत असे. नवे नाटक आले की पुण्यातील प्रेक्षकवर्ग त्याला प्रतिसाद कसा देतो यावर त्या नाटकाचे भवितव्य प्रामुख्याने अवलंबून असे. विशेषतः पुण्यातल्या शिक्षित मध्यमवर्गाने पसंत केलेल्या नाटकांना इतर शहरांमध्येही पांढरपेशा प्रेक्षक मिळू लागला. अशिक्षित, अनागर अशा बहुजन समाजातील लोक पूर्वीपासून तमाशाचे प्रेक्षक

होते. पांढरपेशा वर्गातले लोकही तमाशाला जात, परंतु त्या कलेला या वर्गात प्रतिष्ठा नव्हती. पाटणकर संगीत मंडळी किंवा त्या परंपरेतील इतर कंपन्यांच्या नाटकांचा प्रेक्षकवर्गही हाच होता. किर्लोस्कर मंडळीच्या नाटकांमुळे प्रथमच पुण्यातल्या शिक्षित-पांढरपेशा वर्गातला प्रेक्षक नाटकांकडे वळला. इंग्रजी नाटकांशी परिचय सर्वप्रथम याच वर्गातील तरुणांचा झाला. याच वर्गाने पुण्यात सादर झालेली बुकीश नाटके पसंत केली. गद्य नाटकांचा प्रेक्षकवर्ग त्यातून तयार झाला.

मराठी रंगभूमीला तिच्या उदयापासून पहिली पन्नास वर्षे वळण लावण्याचे काम पुण्याच्या प्रेक्षकांनी केले, असे पु. रा. लेले म्हणतात. "नटाला महाराष्ट्रभर कीर्ति हवी असेल, तर त्यानें पुणें गाजवलें पाहिजे; नाटक-कंपनीला महाराष्ट्रभर मान्यता व लोकप्रियता पाहिजे असेल, तर त्या कंपनीनें पुणेंकरांना जिंकलें पाहिजे; नाटक प्रथितयश व्हावयास हवें असेल, तर त्यानें पुणेंकरांचीं अंतःकरणें काबीज केलीं पाहिजेत किंवा हलवून सोडलीं पाहिजेत : असा शिरस्ता सुरू झाला. पुण्याचें हें पुढारीपण खाडिलकरांच्या 'मानापमान'चा पहिला प्रयोग मुंबईंत सन १९११ सालीं होईपर्यंत कायम होतें." (पु. रा. लेले १९६५ : १०-११). पुण्याच्या आणि मुंबईच्या प्रेक्षकांच्या प्रतिसादाची तुलनाही लेले यांनी केली आहे :

"पुण्याच्या मानानें मुंबईंत शिक्षणाचा प्रसार अगोदरपासून आणि अधिक झाला होता, तरी मराठी समाजच मुंबईंत अगदीं दुभंगलेला होता आणि त्याला महाराष्ट्रांतील लोक 'बकाली' हे विशेषण लावीत असत....एकंदरींत पुण्याच्या प्रेक्षकांत जें संघटित सामर्थ्य होतें, तें मुंबईच्या प्रेक्षकांत नव्हतें. मुंबईचा प्रेक्षक रसिक होता, पण आग्रही नव्हता.

पुण्यांत नटाची, नाटकाची किंवा नाटक मंडळीची हुर्रेवाडी होत असे, तशी मुंबईंत क्वचितच होई. नाटक आवडलें नाहीं किंवा नटाचें काम आवडलें नाहीं तर प्रेक्षक उठून जात....मुंबईंत एकाद्या नाटकाचा प्रयोग चालून गेला किंवा लोकप्रिय झाला, म्हणजे गांवोगांव तो चालेलच अशी खात्री देतां येत नसे. पुण्यांत एखादें नाटक यशस्वी झालें किंवा पुण्यांत एखाद्या नटानें प्रेक्षक जिंकले, म्हणजे तें नाटक आणि तो नट महाराष्ट्रभर यश मिळवूं शके." (उपरोक्त पृ. १५).

मुंबई व पुण्याच्या प्रेक्षकांच्या अभिरुचीविषयी वसंत देसाई यांची निरीक्षणे पुढीलप्रमाणे आहेत : "नवीनतेचें हौसेनें आणि सहानुभूतीनें स्वागत करायला प्रथम हजर राहायचा मुंबईकरांचा बाणा इतरत्र दिसणार नाहीं. फाजिल उत्साही प्रेक्षकांनीं नवें नाटक अगोदर पाहून त्यांचें अनुकूल मत दिसलें तरच आपण पैसे खर्च करावे अशी फाजिल सावधगिरी मुंबईबाहेर दाखविली जाते. मुंबईचा प्रेक्षक नवीनतेचा, शोभिवंतपणाचा आणि संगीताचा षोकी आणि अत्यंत मर्यादशील! ... नाटक आवडलें नाहीं तर मुकाट्यानें घरीं निघून जाईल!" याउलट "पुण्याचा प्रेक्षकसमाज संगीताच्या लज्जतदार खुमारीची आणि

वाङ्मयीन वैशिष्ट्यांची मौज लुटण्यांत सारखाच वाकबगार!...नटाच्या तोंडून एखादा चुकीचा शब्द निसटला, कीं त्याचा पुणेकर प्रेक्षक काय अर्थ लावील त्याचा नियम नसतो!...नकला चुकूं लागल्या, गाणें कंटाळवाणें झालें किंवा आचरट अभिनय दिसला तर पुण्याच्या रंगभूमीवर वेळप्रसंगीं भज्यांचा मारा होतो..." आणि वऱ्हाडातल्या प्रेक्षकाची पसंती-नापसंती दर्शवण्याची रीत तर याहूनही भयंकर होती. वऱ्हाडातल्या प्रेक्षकांची अनेक नटांना भीती वाटत असल्याचे उल्लेख त्या काळातल्या नटांच्या चरित्र-आत्मचरित्रांमध्ये आले आहेत. वऱ्हाडी प्रेक्षक, मग ते पहिल्या रांगांमधले प्रतिष्ठित असोत की पिटातले सामान्य आर्थिक स्तरांतले असतो, त्यांची नाटकाचा आस्वाद घेण्याची रीत सारखीच होती असे : "वरच्या पातळीच्या प्रेक्षकांची दृष्टी कांटेकोर नसली तरी त्यांना नाटकांत मौज पाहिजे, गाणें ठाकठीक पाहिजे! गातांना बेसूर झालात, भलतीच तानबाजी केलीत, तर तुमच्या नशिबीं 'पार्वतीपते हरहर महादेव'चा टोला बसलाच!...पार्वतीपतेचा मारा मारायच्या भजांपेक्षां भयंकर समजला जात असे! पीटमधून सुरू झालेल्या पार्वतीपतेच्या ललकारींत खुर्चींचे प्रेक्षक सामील व्हायचे नाहींत असा गैरविश्वास कोणींही धरूं नये. एकदां तर खुर्चींचे प्रेक्षक नाटकासंबंधींची आपली नापसंती दाखवायला खुर्च्या फिरवून रंगभूमीकडे पाठ करून बसल्याची हकीकत पेंढारकरांनी मला सांगितली होती! त्या असहकारवाद्यांत मोठमोठे डॉक्टर आणि वकीलही सामील होते." (वसंत देसाई १९६२ : १३५-३६).

पुण्या-मुंबईत नाटकाच्या प्रयोगाला मिळालेल्या प्रतिसादाचा अदमास घेऊन नाटक कंपनी महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील इतर प्रांतांमध्ये मुलुखगिरी करण्यास बाहेर पडे. बडोदे, इंदोर, ग्वाल्हेर या संस्थानिकांच्या दरबारी सेवा रुजू करण्याच्या निमित्ताने या शहरांमध्ये काही कंपन्यांचे तळ पडत. याशिवाय कोकण, गोवा, दक्षिण महाराष्ट्र (बेळगाव-धारवाडपर्यंत), खानदेश आणि विदर्भ या प्रदेशांमध्ये नाटक कंपन्यांचे दौरे निघत. मराठवाडा त्या काळात निजामाच्या राज्यात होता आणि मराठवाड्यातील औरंगाबाद वगैरे शहरांत नाटक कंपन्या जात असल्याचे उल्लेख आढळत नाहीत. हैदराबादला मात्र काही नाटक कंपन्या गेल्या आहेत.

या काळात सर्वसाधारपणे नाटकाच्या प्रेक्षकांमध्ये दोन वर्ग स्पष्ट दिसत होते. एकीकडे किर्लोस्कर, गंधर्व, ललितकलादर्श, शाहूनगरवासी या नाटक मंडळ्या होत्या; यांची नाटके समाजातील पांढरपेशा, शिक्षित वर्गाला अधिक भावत होती. तर दुसरीकडे पाटणकर, राजापूरकर, महालक्ष्मी प्रासादिक, वाशिमकर या मंडळ्या होत्या; या कंपन्यांची नाटके समाजातल्या अशिक्षित किंवा अर्धशिक्षित, अनागर वर्गाला आपल्याकडे खेचून घेत होती.

**स्त्रियांचा मराठी रंगभूमीवरील प्रवेश**

सुप्रसिद्ध गायिका हिराबाई बडोदेकर यांची नूतन संगीत मंडळी ही नाट्यसंस्था १९२९मध्ये स्थापन झाली. किर्लोस्कर मंडळीपासूनचे प्रख्यात तबलजी दादा लाडू हे या संस्थेचे तालीम मास्तर होते. तर बलवंत आणि यशवंत मंडळीचे व्यवस्थापक म्हणून काम पाहिलेले नानासाहेब हर्डीकर हे या नव्या नाट्यसंस्थेचे व्यवस्थापक म्हणून काम पाहू लागले. फेब्रुवारीमध्ये 'संशयकल्लोळ' या नाटकाचा प्रयोग संस्थेने केला.

तोवर मराठी नाटक कंपन्यांतून पुरुष-नट स्त्रीभूमिका करत. याचा अर्थ रंगभूमीवर स्त्रिया मुळीच नव्हत्या असे नव्हे. महाराष्ट्रात स्त्रियांनी चालवलेल्या, किंवा सर्वच भूमिका स्त्री-नटांद्वारे केल्या जाणाऱ्या अशा तुरळक कंपन्या होत्या. १८६७च्या सुमारासच्या अशा दोन कंपन्यांचा उल्लेख मिळतो : 'विबुधजन चित्र चालक स्वाती' आणि 'नाटकलंकार मनोरंजन मुंबईकर हिंदू स्त्री मिश्रित नाटकमंडळी'. त्यानंतर १९१० ते १९२५ या काळात सातारकर नाटक मंडळी, बेळगावकर मंडळी, मनोरमा नाटक मंडळी अशा काही स्त्रियांच्या नाटक कंपन्या होत्या. चंद्रकांत गोखले यांच्या मातोश्री या अगदी लहान वयापासून (१९०५-६पासून) आपल्या आईसोबत नाटकात कामे करत होत्या. पण हे सगळे अपवाद होते. एकतर नाटकात कामे करणाऱ्या स्त्रियांना समाजात प्रतिष्ठा नव्हती. दुसरे म्हणजे मराठीतल्या प्रतिष्ठित म्हणून मान्यता पावलेल्या कुठल्याही नाटक कंपनीत स्त्रीनटांचा समावेश नव्हता. पुरुष नटच स्त्रियांच्या भूमिका करत, त्या भूमिकेतील पदांचे गायन करत. किंबहुना १९३०पर्यंतच्या मराठी संगीत रंगभूमीवरील संगीताची भरभराट याच स्त्री-भूमिका करणाऱ्या पुरुष नटांच्या गायनाने झाली होती.

या पार्श्वभूमीवर, पुरुष-नटांच्या बरोबरीने स्त्रीने नाटकात अभिनय करण्याचा उपक्रम प्रथम नूतन संगीत मंडळीद्वारे झाला. हिराबाई बडोदेकर यांच्या नाटकात प्रथमच स्त्रियांनी स्त्रीभूमिका केल्या. फेब्रुवारी १९२९मध्ये नूतन संगीत मंडळीच्या झालेल्या पहिल्या प्रयोगात हिराबाईच्या बहिणी कमलाबाई आणि सरस्वती यांनी प्रमुख स्त्रीभूमिका केल्या होत्या. हिराबाई नाटकातील सत्यनारायणाच्या प्रवेशात फक्त गायिल्या. त्यानंतर या नाट्यसंस्थेने रंगभूमीवर 'संगीत सौभद्र' हे नाटक आणले. या नाटकात मात्र हिराबाई बडोदेकरांनी स्वतः सुभद्रेची प्रमुख स्त्रीभूमिका केली. हिराबाईंचा भाऊ सुरेश माने यांनी अर्जुनाची तर सवाई गंधर्वांनी कृष्णाची भूमिका केली. ५ सप्टेंबर १९२९ रोजी मुंबईला बॉम्बे थिएटरमध्ये नाटकाचा पहिला खेळ झाला (वसंत देसाई १९७१ : ११९). हिराबाईंनी केलेली सुभद्रेची ही भूमिका प्रेक्षकांच्या अतिशय पसंतीस उतरली आणि या नाटकाने चांगली गर्दी खेचली. पुरुषांच्या बरोबरीने नाटकात स्त्रियांनी अभिनय करण्याचा ऐतिहासिक प्रारंभ अशा रीतीने हिराबाई बडोदेकरांपासून झाला.

जुनी हुकमी यशस्वी नाटके रंगभूमीवर सादर करून या संस्थेने जम बसवला आणि

नंतर नवी नाटकेही रंगभूमीवर आणण्यास सुरुवात केली. १९३०मध्ये ना. सी. फडके यांचे 'युगांतर' हे नूतन नाटक मंडळीने रंगभूमीवर आणलेले पहिले नवे नाटक होते. या नाटकाचा पहिला प्रयोग पुणे येथे झाला (वसंत देसाई १९७१ : १३९).

हिराबाईंच्या नूतन संगीत मंडळीनंतर स्त्रीभूमिका करणाऱ्या स्त्रिया नाट्यमन्वंतर या संस्थेत दिसल्या (१९३३). ज्योत्स्ना भोळे, पद्मा वर्तक या अभिनेत्रींच्या भूमिका गाजल्या आणि ही वाट मराठी रंगभूमीवर येथून पुढे रूळली.

## ९.४ १९३०पर्यंतचे महत्त्वाचे नाटककार

किर्लोस्कर संगीत मंडळीने नाटक मंडळ्यांची नवी संस्कृती रुजवली. या संस्कृतीत नाटककाराला मानाचे स्थान होते. १९२०पर्यंत तर मराठी सारस्वतातले मोठे नाव नाटककाराचेच असे. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आणि कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर या दोन प्रतिष्ठित लेखकांची कारकीर्द मुळात नाटककार म्हणूनच गाजत होती. हरि नारायण आपट्यांसारख्या कादंबरीकार म्हणून नावाजलेल्या लेखकाला नाटक लिहावेसे वाटले. पुढल्या पिढीत ना. सी. फडके यांच्यासारख्या कादंबरीकारालाच नव्हे, तर न. चिं. केळकरांसारख्या वैचारिक लेखक-पत्रकारालाही नाटककार म्हणून लोकांनी आपल्याला ओळखावे असा मोह झाला. यावरून नाटककारांचा महिमा किती होता हे ध्यानात येईल.

किर्लोस्कर मंडळीचे चालक शंकरराव किर्लोस्कर आणि गो. ब. देवल, पाटणकर मंडळीचे माधवराव पाटणकर हे स्वतः नाटककार होते. नाटक कंपन्यांच्या चालकांनीच नाटके लिहायची आणि ती कंपनीतर्फे सादर करायची अशी सर्वसाधारण पद्धत सुरुवातीला होती. ती काही प्रमाणात पुढेही सुरू राहिली. पण विसाव्या शतकाच्या प्रारंभी नाटककारांचा स्वतंत्र वर्ग निर्माण झाला. नाटक लिहिणेच नव्हे, तर नाटकातील पदांना चाली देणे, नटांच्या तालमी घेणे ही जबाबदारी देखील हे नाटककार पेलू लागले. त्यामुळे नाटक कंपन्यांतील नाटककारांची प्रतिष्ठा वाढली. हा संप्रदाय सुरू करण्याचे श्रेय कोल्हटकर आणि खाडिलकर यांच्याकडे जाते. विसाव्या शतकाचे पहिले दशक कोल्हटकरांचे होते, तर दुसरे दशक खाडिलकरांचे होते, असे मानले जाते. गडकऱ्यांची नाटके १९२०नंतर गाजली; त्यामुळे तिसरे दशक गडकऱ्यांचे होते. याशिवाय मामा वरेरकर, न. चिं. केळकर, वासुदेवशास्त्री खरे यांच्यासह अनेक नाटककारांनी मराठी रंगभूमी गाजवली. १९३५नंतर आचार्य अत्रे यांची कारकीर्द सुरू झाली. या ठळक नाटककारांच्या कारकिर्दीचा हा आलेख –

### श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

विष्णुदास भावे यांच्यापासून किर्लोस्करांच्या नाटकांपर्यंत पौराणिक नाटकांची सुरू असलेली परंपरा मोडून, स्वतंत्र कल्पनाप्रधान कथानके असलेली नाटके रंगभूमीवर

सर्वप्रथम आणण्याचे श्रेय श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांकडे जाते. त्यांच्या कथानकात हास्योत्पादक प्रसंग असत आणि नाटकातून सामाजिक प्रबोधनपर तत्त्वाचा पुरस्कार करण्याकडे त्यांचा कल असे. किर्लोस्कर संगीत मंडळीने १८९३मध्ये उत्तम नाटकाकरिता लावलेले बक्षीस कोल्हटकरांच्या 'वीरतनय' या नाटकाला मिळाले. शिकार, बंदिवास, लढाई, पराक्रम अशा प्रसंगांचा समावेश असलेले हे नाटक प्रणयभावनेचा आविष्कार करणारे होते. पारशी रंगभूमीवरील संगीत स्वतः कोल्हटकरांचे असल्यामुळे त्यांनी त्या संगीताच्या धर्तीवर पदे रचली व त्यांना चाली दिल्या. या सुरुवातीच्या काळात संगीत दिग्दर्शक म्हणून नाटक कंपनीत स्वतंत्र व्यक्ती नसे. नाटककार किंवा नाटक कंपनीचे संचालक स्वतःच चाली तयार करत, शोधून आणत. प्रत्येक नाटकासाठी नवनव्या चाली शोधण्याची परंपराही कोल्हटकरांनीच सुरू केली. त्यामुळे येथून पुढच्या काळात नाट्यसंगीत हे प्रेक्षकांसाठी महत्त्वाचा आकर्षणबिंदू ठरले.

'वीरतनय'नंतर विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात किर्लोस्कर संगीत मंडळीने कोल्हटकरांची 'मूकनायक' (१९०१), 'गुप्तमंजूष' (१९०१), 'मतिविकार' (१९०७), 'प्रेमशोधन' (१९१०) ही नाटके रंगभूमीवर आणली. त्यापैकी 'मूकनायक' आणि 'प्रेमशोधन' ही नाटक अत्यंत यशस्वी झाली. 'प्रेमशोधन' हे कोल्हटकरांचे सर्वाधिक लोकप्रियता लाभलेले नाटक होते. "श्रीपाद कृष्णांच्या या नाटकातून मराठी भाषेतील बरीच नाटके जन्माला आली आहेत," असे मामा वरेरकरांनी म्हटल्याची नोंद आहे (गोमकाळे १९५० : पृ. १२७). या नाटकाच्या तालमी कृष्णाजी प्रभाकर खाडिलकरांनी घेतल्या होत्या.

कोल्हटकरांनी प्रथमच मराठी रंगभूमीवर कल्पनाप्रधान कथानकांवर आधारित नाटके सादर केली. त्याशिवाय आणखी दोन बाबतींत कोल्हटकरांची नाटके वैशिष्ट्यपूर्ण होती - एक विनोदी प्रसंग आणि दुसरे समाजप्रबोधनात्मक विचार. 'मूकनायक' या नाटकात मद्यपाननिषेधाचा विचार होता, तर 'गुप्तमंजूष' या नाटकात स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रश्न हाताळला होता. १९१३मधल्या 'वधूपरीक्षा' या नाटकात बालविवाह, जातिभेद यांवर टीका केली होती, तर 'परिवर्तन' (१९२२) या नाटकात स्त्रियांच्या समान हक्कांचा पुरस्कार केला होता. हे नाटक गंधर्व मंडळीने स्वीकारले होते, परंतु ते रंगभूमीवर आले नाही. 'जन्मरहस्य' (१९१८) या बलवंत संगीत मंडळीतर्फे सादर झालेल्या नाटकात कोल्हटकरांनी आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार केला होता. हास्यरसप्रधान अशा शैलीत ही नाटके त्यांनी सादर केली. कोटीबाज शैली हे त्यांच्या भाषेचे वैशिष्ट्य होते. 'सहचारिणी' (१९१७) या नाटकात विनोदाचा अतिरेकही झालेला दिसतो.

१९२०नंतर कोल्हटकरांची नाटके बसवण्यास प्रथितयश कंपन्या तयार नव्हत्या. 'सहचारिणी' नाटक चालले नाही, म्हणून 'परिवर्तन' रंगभूमीवर आले नाही. 'शिवपावित्र्य'

(१९२१), 'श्रमसाफल्य' (१९२८), 'मायाविवाह' (१९२८) ही नाटकेही रंगभूमीवर आली नाहीत. 'मायाविवाह' या नाटकाचा साहित्यसंघात एक प्रयोग झाला होता. १९२०नंतर मराठी नाटकांचे स्वरूप बदलले. कोल्हटकरांचे समकालीन कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी विसाव्या शतकाचे दुसरे दशक गाजवले, तर तिसऱ्या दशकात मराठी प्रेक्षकांच्या मनावर राम गणेश गडकऱ्यांच्या नाटकांनी राज्य केले. वाङ्मयीनदृष्ट्या श्री. कृ. कोल्हटकरांच्या नाटकांना मराठी नाट्यकलेच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान असले, तरी लोकप्रियतेच्या दृष्टीने विसाव्या शतकाचे पहिले दशक वगळता कोल्हटकरांची नाटके मागेच राहिली. यासंदर्भात वि. स. खांडेकर म्हणतात, "देवल, खाडिलकर आणि गडकरी यांना नाटककार या नात्यानें लाभलेली लोकप्रियता कोल्हटकरांना कधींच मिळाली नाहीं. दहा पंधरा वर्षें ते किर्लोस्कर नाटक मंडळीचे प्रमुख नाटककार होते. सुशिक्षित मंडळींना, विशेषतः विशी पंचविशींतल्या विद्यार्थ्यांना आणि वाङ्मयप्रेमी लोकांना – त्यांच्या नाटकांचें १९०० ते १९१० या दशकांत विलक्षण आकर्षण होतें. किर्लोस्कर मंडळीचा मुक्काम पुण्याला आला की, 'येत्या शनिवारी मतिविकार लावा' अशा अर्थाचे अर्ज डेक्कन कॉलेजमधल्या विद्यार्थ्यांकडून कंपनीच्या व्यवस्थापकाकडे जत असत, अशी आपली एक आठवण वाग्भट देशपांड्यांनी मला सांगितली होती. १९०० ते १९१०च्या दरम्यान 'मूकनायक' हे सौभद्राइतकेंच मराठी रंगभूमीवरलें लोकप्रिय नाटक होतें. या सर्व गोष्टी खऱ्या असल्या तरी 'शारदा' व 'संशयकल्लोळ' 'कीचकवध' आणि 'स्वयंवर', 'एकच प्याला' व 'भावबंधन' यांनीं मराठी रंगभूमी जशी दीर्घकाळ फुलविली आणि खुर्चीपासून जमिनीपर्यंतचा सारा मराठी प्रेक्षक वर्ग जसा झुलविला, तसें भाग्य कोल्हटकरांच्या कोणत्याही नाटकाला लाभले नाहीं." (गोमकाळे १९५० : १७).

यामागे दोन प्रमुख कारणे होती. एक म्हणजे, कोल्हटकरांची नाटके बुद्धीच्या, कल्पनेच्या विलासात अधिक रंगत. त्यांचे शिष्य राम गणेश गडकरी यांनी भावोत्कट नाटके लिहून अत्युच्च लोकप्रियता मिळवली. कोल्हटकरांच्या नाटकांत भावनाप्रधान प्रसंगांना स्थान नव्हते. अशी रुक्ष नाटके शिक्षित, बुद्धिजीवी प्रेक्षकांनाचा आवडत. दुसरे म्हणजे कोल्हटकरांनी नाटकातील संगीताकडे जितके लक्ष पुरवले, तितके नाटकाच्या सादरीकरणाच्या अंगाकडे लक्ष दिले नाही. देवल, खाडिलकर या त्यांच्या समकालीन नाटककारांनी नाट्यतंत्र ज्या सफाईदारपणे हाताळले, त्या पार्श्वभूमीवर कोल्हटकरांच्या नाटकांतील घडामोडीविरहीत सपाट प्रवेश, लांबच लांब संवादांनी भरलेले कंटाळवाणे प्रसंग या गोष्टी खटकतात.

मात्र असे असले, तरी गो. ब. देवलांपासून मो. ग. रांगणेकर यांच्यापर्यंत विसाव्या शतकाची पहिली चार दशके श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या नाटकांचा प्रभाव मराठी नाटककारांवर दिसून येतो, असे खांडेकरांनी म्हटले आहे. उदाहरणार्थ, कोल्हटकरांचे

'वीरतनय' गाजू लागल्यावर देवलांचे 'सौभद्र' नाटक आले. या नाटकातील देवलांचे संवाद हे त्या आधीच्या किर्लोस्करी नाटकांहून वेगळे, कोल्हटकरांच्या संवादशैलीप्रमाणे मार्मिक आणि चटकदार होते. 'सौभद्र'नंतर एका तपाने आलेल्या आणि लोकप्रियतेच्या बाबतीत मराठी नाटकांत मैलाचा दगड ठरलेल्या खाडिलकरांच्या 'मानापमान' नाटकाचे कथानक कोल्हटकरांच्या नाटकांप्रमाणे कल्पनारम्य होते. त्यापूर्वीची खाडिलकरांची नाटके ऐतिहासिक किंवा पौराणिक कथानकांवर आधारित होती. विनोदचातुर्य, मुग्धशृंगार, कल्पनारम्य वातावरण हे घटक यानंतरच्या नाटकांमध्ये दिसू लागले. नंतरच्या पिढीत राम गणेश गडकरी, मामा वरेरकर यांनी उघडपणे 'आपण कोल्हटकर संप्रदायाचे नाटककार आहोत, त्यांचे शिष्य आहोत' अशी भूमिका घेतली. माधवराव जोशी, आचार्य अत्रे यांनी कोल्हटकरांच्या नाटकांतील विनोदाचा अधिक विकास केला. मो. ग. रांगणेकरांच्या नाटकांतील खुमासदार संवाद कोल्हटकरी नाटकांशी नाते सांगतात. अशा रीतीने कोल्हटकरांच्या नाटकांचा प्रभाव नंतरच्याही मराठी नाटकांवर दिसून येतो. म्हणूनच मराठी नाट्येतिहासात कोल्हटकरांच्या नाटकांना ऐतिहासिक स्थान आहे.

### कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी 'सवाई माधवरावाचा मृत्यू' हे आपले पहिले नाटक १८९३मध्ये वयाच्या एकविसाव्या वर्षी लिहिले. १८९५मध्ये वकिलीच्या अभ्यासासाठी त्यांचे वास्तव्य मुंबईला असताना त्यांचा परिचय श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्याशी झाला आणि त्यांना खाडिलकरांनी आपले नाटक वाचून दाखवले (सहस्रबुद्धे १९३५ : १०). त्यानंतर हे नाटक 'विविधज्ञानविस्तार'च्या अंकात प्रसिद्ध झाले. अशा रीतीने नाटककार खाडिलकर यांचा उदय रंगभूमीच्या आधी आधी मुद्रणमाध्यमातून झाला. या ऐतिहासिक नाटकात खाडिलकरांनी पेशवाईतल्या कथानकावर 'हॅम्लेट'मधील हॅम्लेट आणि 'ऑथेल्लो'मधील आयागो यांची व्यक्तिमत्त्वे एकत्र करून त्यांचे कलम केले. संशयाचे भूत मानगुटीवर बसून अतिरेक होतो तेव्हा माणसे परस्परांचा जीव घेतात – असे या नाटकाचे शोकात्म स्वरूपाचे कथानक तोवरच्या मराठी नाट्यसृष्टीला अपरिचित होते.

पुढे १८९७मध्ये 'केसरी'त दाखल झाल्यावर एका प्रवासात विजापूरचा मोडकळीस आलेला किल्ला पाहून त्यांना स्वराज्यस्थापनेच्या घटनेवरील ऐतिहासिक नाटकाचे कथानक सुचले. यावर आधारित 'कांचनगडची मोहना' हे नाटक त्यांनी लगेचच लिहिले आणि ते छापून प्रसिद्धही केले. या नाटकाचा पहिला प्रयोग सोशल क्लब, पुणे यांच्यातर्फे २४ डिसेंबर १८९८ रोजी नगर येथे झाला. त्यानंतर १९०१ मध्ये शाहूनगरवासी मंडळीतर्फे हे नाटक रंगभूमीवर आले. १० सप्टेंबर १९०४ रोजी महाराष्ट्र नाटक मंडळी या गद्य नाटक मंडळीचा प्रारंभही 'कांचनगडची मोहना' या नाटकाद्वारेच झाला. हे नाटक गाजल्यानंतर, १९०६मध्ये महाराष्ट्र नाटक मंडळीनेच खाडिलकरांचे पहिले नाटक

'सवाई माधवरावाचा मृत्यू' हे रंगभूमीवर आणले.

१९०५नंतर एकीकडे किर्लोस्कर मंडळीतर्फे रंगमंचावर येणाऱ्या श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या नाटकांच्या लोकप्रियतेला उतरती कळा लागलेली असताना, गद्य रंगभूमीवर खाडिलकरांची ऐतिहासिक, पौराणिक कथानकांवर आधारित नाटके गर्दी खेचू लागली. १९१०पर्यंत त्यांची 'बायकांचे बंड' (१९०७), 'कीचकवध' (१९०७) आणि 'प्रेमध्वज' (१९१०) ही नाटके प्रेक्षकांसमोर आली. या नाटकांची कथानके पौराणिक/ऐतिहासिक होती, पण त्यांचा आशय समकालीन समस्यांशी निगडित होता. 'बायकांचे बंड' या नाटकात पौराणिक काळातील प्रमिलेचे स्वराज्य दाखवून त्याद्वारे स्त्रीसुधारणेचा पुरस्कार केला होता. तर 'कीचकवध'मधल्या जुलमी कीचकाचा वध इंग्रज सरकारवर निशाणा साधणारा होता. 'भाऊबंदकी' या नाटकातून पेशवाईतील सत्तेसाठी चाललेली भाऊबंदकी दाखवलेली असली तरी तिचा रोख वर्तमानकाळातील जहाल मवाळ यांच्यातील संघर्षामुळे भारतीयांचे कसे नुकसान होते, हे दाखवण्याकडे होता. 'कीचकवध'मधील राजकीय आशय इंग्रज सरकारच्या लक्षात आल्यावर या नाटकावर १९१० मध्ये बंदी घालण्यात आली, ती पुढे पंधरा वर्षे कायम होती. १९२६मध्ये महाराष्ट्र नाटक मंडळीचे केशवराव दाते, दत्तोपंत देशपांडे या मंडळींनी 'कीचकवधा'वरील बंदी उठवण्यासाठी प्रयत्न केले आणि हे नाटक पुन्हा रंगभूमीवर अवतरले.

ज्या काळात मराठी रंगभूमीची सर्वसाधारण प्रवृत्ती संगीत नाटकांची होती, त्या काळात गद्य असूनही खाडिलकरांच्या नाटकांनी स्वतःचे स्थान निर्माण केले. त्यानंतर विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात खाडिलकरांनी संगीत नाटकांच्या क्षेत्रात प्रवेश केला. १९११ मध्ये रंगभूमीवर आलेल्या खाडिलकरांच्या 'मानापमान' या संगीत नाटकाने मराठीत इतिहास निर्माण केला. नाटकाला गोविंदराव टेंबे यांनी दिलेले वैशिष्ट्यपूर्ण संगीत आणि बालगंधर्वांचे गायन – यांनी 'मानापमान'ची लोकप्रियता कळसाला पोहचवली. मराठी नाटकांत पौराणिक कथानकांच्या सहाय्याने हिंदुस्थानी संगीताचा प्रधान्याने आविष्कार करण्याचा नवा पायंडा या नाटकापासून पडला. यानंतर १९१६मध्ये बालगंधर्वांच्या गंधर्व संगीत मंडळीकडून रंगभूमीवर आलेले खाडिलकरांचे 'स्वयंवर' हे नाटक देखील प्रचंड यशस्वी झाले. या दोन नाटकांद्वारे बालगंधर्वांची लोकप्रियता कळसाला पोहचली. संगीत रंगभूमीचा सुवर्णकाळ म्हणून हे दशक मानले जाते आणि त्यात खाडिलकरांची संगीत नाटके आणि बालगंधर्वांच्या भूमिका यांचा वाटा मोठा होता. बालगंधर्वांना डोळ्यासमोर ठेवून, म्हणजे एखाद्या नटाला डोळ्यासमोर ठेवून भूमिका अथवा नाटक लिहिण्याचा पायंडा या नाटकांपासून खाडिलकरांनी मराठी रंगभूमीवर पाडला, असे म्हटले जाते. यामुळे मराठी रंगभूमीवरील नाट्यकलेची वाढ

खुंटली आणि ती एका आवर्तात सापडली, असेही म्हटले जाते. 'मानापमान' आणि 'स्वयंवर' या दोन नाटकांमुळे संगीत रंगभूमीवर विसाव्या शतकाचे दुसरे दशक खाडिलकरांचे ठरले. यानंतरच्या काळात आलेली खाडिलकरांची 'विद्याहरण' (१९१३), 'द्रौपदी' (१९२०), 'मेनका' (१९२६) आणि 'सावित्री' (१९३५) ही सर्व संगीत नाटके होती. १९३५मध्ये सुलोचना संगीत मंडळीकडून खाडिलकरांच्या मूळच्या गद्य असलेल्या 'बायकांचे बंड' या नाटकाचे संगीत नाटकात रुपांतर करून ते सादर करण्यात आले. महाराष्ट्र नाटक मंडळीकडून आलेले 'सवतीमत्सर' (१९२७) हे एकमेव गद्य नाटक खाडिलकरांनी लिहिले.

**राम गणेश गडकरी**

राम गणेश गडकरी हे नाट्यलेखक म्हणून स्वतःला श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे शिष्य म्हणवत. त्यांनी एकूण पाच नाटके लिहिली असली, तरी त्यापैकी फक्त दोन नाटके त्यांच्या हयातीत रंगभूमीवर आली. उर्वरित नाटके त्यांच्या अकाली निधनानंतर रंगभूमीवर आली. 'राजसंन्यास' हे नाटक त्यांच्या हातून संपूर्ण लिहून होण्यापूर्वीच त्यांचे निधन झाले. या नाटकांनी मराठी रंगभूमीवर गडकऱ्यांचे नाटककार म्हणून स्वतंत्र स्थान निर्माण झाले.

गडकऱ्यांना प्रारंभीच्या काळात किर्लोस्कर मंडळी, नाट्यकलाप्रवर्तक मंडळी या नाटक कंपन्यांच्या बिऱ्हाडी राहण्याची संधी मिळाली. किर्लोस्कर मंडळीत शंकरराव मुजुमदारांनी त्यांना लहान मुलांना शिकवण्यासाठी शिक्षक म्हणून काही काळ नेमले होते. त्यामुळेच 'गडकरी मास्तर' हे नाव त्यांना पडले. नाट्यकलाप्रवर्तक मंडळीतील अभिनयकुशल नट असलेले तालीम मास्तर शंकरराव पाटकर यांच्यामुळे गडकऱ्यांना नाट्यशिक्षण मिळाले. इथेच त्यांना शेक्सपिअरच्या नाटकांची गोडीही लागली (रा. शं. वाळिंबे १९८७ : २२३).

१९१२मध्ये राम गणेश गडकरी यांचे पहिले नाटक 'प्रेमसंन्यास' हे महाराष्ट्र मंडळीतर्फे रंगभूमीवर आले. पुनर्विवाह या विषयाभोवती या नाटकाचे कथानक गुंफले होते. कथानकाच्या दृष्टीने कोल्हटकरांच्या 'मतिविकार' या नाटकाशी त्याचे नाते होते. गडकऱ्यांच्या 'प्रेमसंन्यास'ची दखल त्या काळातल्या 'इंदुप्रकाश', 'मुंबई वृत्त', 'ज्ञानप्रकाश', 'Indian Social Reformer' या नियतकालिकांनी घेतली होती.

यानंतर चार वर्षांनी किर्लोस्कर मंडळीतर्फे गडकऱ्यांचे दुसरे नाटक 'पुण्यप्रभाव' (१९१६) रंगभूमीवर आले. या नाटकात मास्टर दीनानाथ, चिंतामणराव कोल्हटकर, कृष्णराव कोल्हापुरे या नटांनी भूमिका केल्या होत्या. बालगंधर्व, गणपतराव बोडस आणि गोविंदराव टेंबे ही मंडळी किर्लोस्कर कंपनीतून बाहेर पडल्यानंतर किर्लोस्करने उभी केलेली ही नटांची नवी फळी होती. 'पुण्यप्रभाव' या नाटकापासून गडकऱ्यांच्या शाब्दिक

कोटीबाज शैलीचे दर्शन प्रकर्षाने होऊ लागले. कोटीबाज, सुभाषितप्रचुर भाषा आणि तिला भावनात्मकतेमुळे मिळालेले वजन ही गडकऱ्यांच्या येथून पुढच्या नाटकांची वैशिष्ट्ये ठरली.

गडकऱ्यांनी १९१७मध्ये लिहिलेले 'एकच प्याला' हे नाटक त्यांच्या निधनानंतर, २९ मार्च १९१९ रोजी गंधर्व नाटक मंडळीतर्फे रंगभूमीवर आले. यात बालगंधर्व आणि गणपतराव बोडस यांनी प्रमुख भूमिका केल्या होत्या. या दशकात मराठी नाट्यप्रेक्षकांना खाडिलकरांच्या पौराणिक, संगीतप्रधान, सुखात्मिक नाटकांची चटक लागली होती. या पार्श्वभूमीवर गडकरीकृत 'एकच प्याला' ही दारूच्या व्यसनाने जीवन उद्ध्वस्त झालेल्या एका मध्यमवर्गीय कुटुंबाची शोकांतिका मराठी प्रेक्षकांसाठी नवा, अपरिचित अनुभव देणारी ठरली. त्यातल्या भावनाप्रधानतेमुळे ती अधिक परिणामकारक ठरली. या नाटकापाठोपाठ १९१९मध्येच, गडकऱ्यांचे आणखी एक नाटक आले, ते म्हणजे 'भावबंधन'. हे मास्टर दीनानाथ यांच्या बलवंत संगीत मंडळीने सादर केले. या नाटकातील काही पदे गडकऱ्यांच्या पश्चात श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी रचली होती. या नाटकालाही 'एकच प्याला'सारखी लोकप्रियता मिळाली. किंबहुना 'एकच प्याला'ने गडकऱ्यांच्या वाढलेल्या लोकप्रियतेचा फायदा 'भावबंधन'ला झाला. भावबंधनची छाप प्रेक्षकांवर कशी पडली हे पुढील प्रातिनिधिक प्रतिक्रियेवरून ध्यानात येईल : "नाटकांतील एकही वाक्य फुकट जाऊं नये अशा अधाशी उत्साहानें आम्ही भावबंधन नाटक पाहिलें. पहिल्या वाक्यापासून शेवटच्या वाक्यापर्यंत एक क्षणही कंटाळवाणा न जातां नाटकाची रंगत वाक्यागणिक वाढत जावी, एका प्रवेशांत पोट दुखेपर्यंत हंसावें तर दुसऱ्या प्रवेशांत डोळ्यांत अश्रू उभे राहावे, असें भावबंधनासारखें दुसरें नाटक मराठी रंगभूमीवर आलें नाहीं. एकच प्याला नाटक भावनाप्रधान होतें, तर भावबंधन नाटक बुद्धिप्रधान होतें. नाटकाचा प्रयोग चालू असतां गडकऱ्यांच्या अलौकिक बुद्धिवैभवाची प्रभा आपल्यासमोर पसरलेलीं प्रत्यक्ष पाहतों आहों असा भास होऊन, गडकरी जिवंत नाहींत हें खरेंच वाटत नसे." (वसंत देसाई १९६२ : ५४).

कोल्हटकरांना गुरुस्थानी मानणाऱ्या गडकऱ्यांची नाटके बऱ्याच प्रमाणात कोल्हटकरांच्या नाटकांना अनुसरणारी होती असे म्हटले जाते. वि. स. खांडेकर म्हणतात, "मुख्य कथानकाला दिलेली उपकथानकांची जोड, त्या सर्वांची विचित्र गुंतागुंत, त्या गुंतागुंतीमुळे होणारा रसभंग, नाट्यापेक्षा कथनावर ठिकठिकाणी दिलेला भर इत्यादि कोल्हटकरांची वैगुण्ये त्यांच्या (गडकऱ्यांच्या) नाटकांतही आढळतात." (उद्धृत – द. रा. गोमकाळे : २३) पण तरीही गडकऱ्यांची नाटके विलक्षण लोकप्रिय झाली, याचे महत्त्वाचे कारण, त्यातील उत्कट भावनाप्रधान आविष्कार. मराठी साहित्यात ज्या वेळी रोमँटिक कविता लोकप्रिय झाली होती, त्याच काळातला रंगभूमीवरचा रोमँटिसिझमचा आविष्कार

गडकऱ्यांच्या नाटकांतून प्रकट झाला. मिश्किल आणि उपहासप्रधान विनोदाचा आविष्कार त्यांनी केला. गडकऱ्यांची भाषा भरजरी होती. अनुप्रास, उपमा इत्यादी अलंकारांचा वापर त्यांच्या गद्यशैलीतही विपुल आढळतो. कोटीबाज भाषेचा अतिरेक गडकऱ्यांच्या नाटकात असला, तरी भाषेच्या वैभवामुळे प्रेक्षक दिपून गेले. गावोगावचे प्रेक्षक गडकऱ्यांच्या नाटकातले सुभाषितवजा संवाद वहीत टिपून ठेवत असत.

विसाव्या शतकाच्या दुसऱ्या-तिसऱ्या दशकात खाडिलकरांच्या बरोबरीने, तितकेच लोकप्रिय नाटककार म्हणून गडकऱ्यांचे नाव घेतले जाते. खाडिलकरांच्या 'मानापमान' आणि 'स्वयंवर' या नाटकांप्रमाणेच गडकऱ्यांची 'भावबंधन' आणि 'एकच प्याला' ही नाटके कायम गर्दी खेचणारी नाटके म्हणून मान्यता पावली.

**भा. वि. (मामा) वरेरकर**

मामा वरेरकर यांचा नाट्यलेखक म्हणून उदय विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात झाला. या अर्थाने ते श्री. कृ. कोल्हटकर, कृ. प्र. खाडिलकर यांच्या पिढीतले नाटककार ठरतात. १९०६मध्ये त्यांचे कुंजविहारी हे पहिले नाटक रंगभूमीवर आले. तेव्हापासून पुढची सुमारे पाच दशके वरेरकरांनी नाटके लिहिली. १९५५मध्ये त्यांनी अखेरचे नाटक लिहिले. त्याच्यानंतर नाटककारांच्या तीन पिढ्या येऊन गेल्या. तिसऱ्या-चौथ्या दशकात संगीत नाटकांचे युग संपुष्टात आले. पौराणिक आणि ऐतिहासिक कथानकांत रमलेल्या मराठी नाटकाला वास्तवावर आधारित सामाजिक आशयप्रधानतेचे नवे वळण मिळाले. या सर्व प्रवासात मामा वरेरकर हे नाटककार म्हणून मराठी रंगभूमीवर वावरत होते. इतकेच नव्हे, तर मराठी रंगभूमीला नवे वळण देण्यात वरेरकरांचा मोठा वाटा होता.

खरे तर 'कुंजविहारी' आणि 'संजीवनी' ही मामा वरेरकरांची जनुभाऊ निमकर यांच्या स्वदेश हितचिंतक मंडळीने अनुक्रमे १९०८ आणि १९१०मध्ये रंगभूमीवर आणलेली पहिली दोन नाटके पौराणिक स्वरूपाची होती. पहिल्या नाटकात त्यात राधाकृष्णाच्या प्रेमकथेवर आधारित होते, तर दुसरे कचदेवयानीच्या कथेवर. परंतु या प्रारंभीच्या काळापासूनच वरेरकर हे नाटकाविषयी गंभीरपणे विचार करत होते. यानंतर वरेरकरांनी एका बंगाली नाटकावर आधारित 'सारस्वत' हे शोकात्म नाटक लिहिले. ते नाट्यविनोद नाटक मंडळी या नव्याने स्थापन झालेल्या संस्थेतर्फे रंगभूमीवर आले. हे नाटक अर्थातच त्या काळात चालले नाही. पण वरेरकरांचा वेगळे काहीतरी करण्याचा प्रयत्न यातून दिसला. तोपावेतोच्या मराठी रंगभूमीवरच्या पौराणिक, ऐतिहासिक कथानकांपेक्षा निराळे, असे समकालीन जीवनातील समस्यांचे दर्शन घडवणारे नाटक लिहिण्याचा वरेरकरांचा प्रयत्न चालला होता. त्या काळातल्या प्रेक्षकवर्गाच्या अभिरुचीचाही विचार ते करत होते. समाजातील उच्चभ्रू वर्गासाठी नव्हे, तर बहुजन समाजासाठी आपल्याला नाटक लिहायचे आहे हा विचार त्यांनी दृढ केला. त्या काळात किर्लोस्कर, गंधर्व या नाटक मंडळ्यांचा

प्रेक्षक समाजातील शिक्षित, पांढरपेशा, शहरी वर्गातील असे. तर स्वदेश हितचिंतक मंडळी, पाटणकर संगीत मंडळी, नाट्यकलाप्रवर्तक मंडळी, शाहूनगरवासी मंडळी या कंपन्यांच्या नाटकांना अर्धनागर, ग्रामीण भागातला, महानगरातल्या सामान्य जनेतचा प्रतिसाद अधिक चांगला मिळत असे. वरेरकरांच्या लक्षात आले की या कंपन्यांची नाटके 'बहुजनदृष्टी'ला आवाहन करतात. "दोन्हीं संप्रदायांची मी तुलना करूं लागलों, त्यावेळीं जास्त माणसं कुठं खेंचलीं जातात व कां खेंचलीं जातात, हें हळूहळू माझ्या लक्षांत येऊं लागलं. त्या दृष्टीनंच मी या नाटकांकडे पाहूं लागलों. विद्वत्ता आणि अविद्वत्ता यांमधील मध्यबिंदू गांठून नाट्यवाङ्मय निर्माण केलं पाहिजे असं मला वाटूं लागलं." (वरेरकर १९४१ : ७३).

नाटकाकडे पाहण्याचा वरेरकरांचा दृष्टिकोन असा असल्यामुळे, सर्वसामान्य समाजाला समजेल अशी भरजरी-आलंकारिक-संवादविरहीत, सुभाषित-कोट्याविरहीत नाट्यभाषा वापरून त्यांनी सामान्य माणसांच्या जीवनातील समस्यांना वाचा फोडणारी कथानके रचली. इतर आघाडीचे नाट्यलेखक पौराणिक आणि कल्पनाप्रधान कथानकांमध्ये रमले असताना मामा वरेरकरांनी मात्र तत्कालीन समाजातील सामाजिक व राजकीय जाणिवांना, वास्तवाला नाटकात स्थान दिले. मोलिएर आणि इब्सेन या दोन नाटककारांच्या नाटकांचा प्रभाव मामांवर पडला होता. ही नाट्यशैली मराठी नाट्यसृष्टीला अपरिचित होती. मामा वरेरकरांनी या नव्या दृष्टीतून लिहिलेले पहिले नाटक म्हणजे, 'हाच मुलाचा बाप'. हे गद्य नाटक लोकमान्य नाटकमंडळीने १९१६मध्ये रंगभूमीवर आणले. नंतर केशवराव भोसले यांनी हे नाटक संगीतसाज चढवून ललितकलादर्श मंडळीतर्फे नव्या रूपात सादर केले.

'हाच मुलाचा बाप' या नाटकातून मामा वरेरकरांनी समाजातील हुंडाप्रथेवर टीका केली होती. परंतु नाटकाचे स्वरूप प्रहसनात्मक होते. त्या काळातल्या मराठी नाटकांत हे रूप अनोखे ठरले. या नाटकाची बरीच चर्चा झाली आणि नाटककार म्हणून मामा वरेरकरांची ओळख मराठी नाट्यसृष्टीत पक्की झाली.

त्या काळात मिशनऱ्यांच्या प्रचाराला बळी पडून ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करणारे लोक समाजात होते. या निर्णयामुळे काही लोक स्वकीयांपासून तुटत नव्या ख्रिस्ती समाजात मिसळून जाणे त्यांना अशक्य झाल्यास एकटेपणाचे दुःखद जीवन कंठत. अशा एका मित्राची शोकांतिका पाहून त्यावर आधारित 'संन्याशाचा संसार' (१९१९, ललितकलादर्श मंडळी) हे नाटक मामा वरेरकरांनी लिहिले. ख्रिस्ती धर्मात गेलेल्या मनुष्याला पश्चाताप झाल्यास पुन्हा स्वधर्मात येण्याचा मार्ग खुला आहे- अशा विचाराचा पुरस्कार करणारे हे नाटक त्या काळात बरेच गाजले.

यानंतर मामांचे ललितकलादर्श मंडळीने मंचित केलेले नाटक म्हणजे, 'सत्तेचे गुलाम'

हे होय (१९२२). ललितकलादर्शचे मालक केशवराव भोसले यांच्या निधनानंतर हे नाटक रंगभूमीवर आले. या नाटकात राजकीय आशय प्रथमच मराठी रंगभूमीवर थेटपणे मांडला गेला. खाडिलकरांच्या नाटकातल्या राजकीय जाणिवा पौराणिक कथानकांनी वेष्टित असत. परंतु वास्तववादी शैलीत राजकीय आशय मांडणारे पहिले नाटककार म्हणजे मामा वरेरकर होत. 'सत्तेचे गुलाम' हे नाटक व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी झाले. मराठी नाट्यरसिकांनी आणि समीक्षकांनी, तसेच समाजातील इतर मान्यवरांनीही या नाटकाची विशेष दखल घेतली. वर्तमानपत्रात या नाटकावर बरीच अनुकूल-प्रतिकूल चर्चा झाली. बापूराव पेंढारकर, नाना चापेकर आणि नाना फाटक हे तीन मोठे नट या नाटकामध्ये एकत्र आले. त्यांच्या या नाटकातल्या भूमिका पुढील नाट्येतिहासात मैलाचा दगड ठरल्या. आणखी एका कारणासाठी हे नाटक गाजले, ते म्हणजे त्याचे नेपथ्य. पु. श्री. काळे यांनी 'सत्तेचे गुलाम'साठी केलेली फ्लॅट सीनची रचना मराठी नाटकांत पहिल्यांदाच होत होती.

या लागोपाठच्या दोन नाटकांनी मामा वरेरकर ललितकलादर्श मंडळीशी जोडले गेले. ललितकलादर्शचे केशवराव भोसले आणि मामा वरेरकर या दोघांनाही मराठी नाट्यक्षेत्रात नाटकाच्या आशयापासून तर प्रयोगरूपापर्यंत काहीतरी नवे करून दाखवण्याची इच्छा होती. समानधर्मा मंडळी एकत्र आल्यास त्यांना नवे काही घडवणे शक्य होते. ते या दोघांच्याही बाबतीत घडले. केशवराव भोसले यांच्या अकल्पित निधनानंतरही (१९२१) ललितकलादर्शशी मामांचे नाते कायम राहिले आणि नवे संचालक बापूराव पेंढारकर यांनी त्यांची नाटके तितक्याच तयारीने रंगभूमीवर आणली. मामांच्या 'सत्तेचे गुलाम' आणि त्यानंतर आलेल्या 'तुरुंगाच्या दारात' (१९२३) या नाटकांच्या रूपाने 'इब्सेनियन रंगभूमी'चे गुणधर्म मराठी रंगभूमीवर अवतरले. 'तुरुंगाच्या दारात' हे नाटक व्यावसायिकदृष्ट्या अयशस्वी झाले. परंतु या नाटकाचे वास्तववादी पद्धतीने केलेले नेपथ्य अनोखे ठरले. हे मराठीतले आधुनिक पद्धतीचे पहिले तीन अंकी नाटक होते. मामा वरेरकरांनी या नाटकात अस्पृश्यता-निवारण हा विषय हाताळला होता. त्या काळाच्या पार्श्वभूमीवर आणि मराठी बहुसंख्य नाट्यरसिकांची पारंपरिक सामाजिक मानसिकता पाहता, अशा विषयावर रंगभूमीवर नाटक सादर करणे हेच धाडसाचे होते. हरी नारायण आपट्यांनी मराठी कादंबरीत आणि केशवसुतांनी कवितेत जी आधुनिक दृष्टी आणली, तिच्याशी नाते सांगणारी आधुनिक मूल्यदृष्टी सर्वप्रथम मामा वरेरकरांच्या ललितकलादर्श मंडळीतर्फे आलेल्या नाटकांद्वारे मराठी रंगभूमीवर व्यक्त झाली.

१९३१मध्ये मंचित झालेल्या 'सोन्याचा कळस' या मामा वरेरकरांच्या नाटकाचा आशयही राजकीय होता. मामा वरेरकर यांनी नाटककार म्हणून दीर्घ कारकिर्दीत एकूण ४० नाटके लिहिली. पैकी २८ नाटके सामाजिक-राजकीय विषयांवर आधारित होती.

ऐतिहासिक नाटक १ आणि पौराणिक कथानकावर आधारित नाटके ७ होती. यावरून वरेरकरांच्या नाट्यनिर्मितीमागच्या प्रेरणा स्पष्ट होतात. विसाव्या शतकाच्या तिसऱ्या, चौथ्या दशकात, म्हणजे मराठी संगीत रंगभूमीच्या पडत्या काळात मामांची अनेक नाटके रंगभूमीवर आली. परंतु ती यशस्वी ठरली नाहीत. या काळात त्यांनी कादंबरीकार आणि चित्रपटकथालेखक म्हणूनही लेखन केले. संगीत रंगभूमीच्या पडत्या काळात नवी वास्तववादी दृष्टी रुजवण्याचा मामा वरेरकरांचा प्रयत्न मात्र ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे. १९३०नंतरचा नव्या मराठी नाटकांचा प्रवास याच दिशेने झाला. नाट्यमन्वंतर, रेडिओ स्टार्स या नाट्यसंस्था आणि प्र. के. अत्रे, मो. ग. रांगणेकर यांची नाटके – ही त्याची उदाहरणे म्हणता येतील.

## १९३०पर्यंतचे इतर नाटककार

कोल्हटकर, खाडिलकर, गडकरी, वरेरकर ही विसाव्या शतकातल्या नाटककारांची पहिली पिढी. यांच्या काळात इतरही नाटककार मराठी रंगभूमीवर यश मिळवत होते. त्यांत यशवंत टिपणिसांसारखे नाट्यकर्मी होते आणि वासुदेवशास्त्री खऱ्यांसारखे इतिहासकारही होते. न. चिं. केळकरांसारख्या सामाजिक-राजकीय क्षेत्रात सक्रीय असलेल्या पत्रकाराला आणि ना. सी. फडक्यांसारख्या कादंबरीकारालाही या काळात नाटक लिहावेसे वाटले. याचे मुख्य कारण मराठी संगीत रंगभूमीने मराठी समाजाच्या अभिरुचीवर जे अधिराज्य गाजवले, त्यामुळे नाटककारांची प्रतिष्ठा वाढली, हे होते. नाटक कंपन्यांमध्ये नाटककाराची भूमिका केवळ नाटक लिहिण्यापुरती मर्यादित नव्हती. कोल्हटकर, खाडिलकर यांच्यासारखे नाटककार तालीममास्तरही होते. ते आपापल्या नाटकांच्या तालमी घेत. त्यामुळे नाटक कंपनीत त्यांचे प्रस्थ वाढत असे. किर्लोस्कर मंडळीतून फुटून स्थापन झालेल्या गंधर्व मंडळीवर खाडिलकरांचा वरदहस्त होता; नाट्यविनोद मंडळी स्थापन करण्यात वरेरकरांचा वाटा मोठा होता. अशा रीतीने नाटककार हे त्या काळात नाट्यक्षेत्रात फार कळीची भूमिका बजावत होते. १९२०-२५पर्यंत तरी नाटककाराचा सन्मान हा केवळ नाट्यक्षेत्रात नव्हे, तर वाङ्मयीन आणि एकंदर मराठी सांस्कृतिक विश्वात पहिल्या प्रतीचा होता. त्यामुळे इतर क्षेत्रांतील लेखकांनीही नाटके लिहून पाहिली. त्यातील काही यशस्वीही झाली.

इतिहास संशोधक वासुदेवशास्त्री खरे यांनी १९१३ ते २४ या काळात नाट्यलेखन केले. खरेशास्त्र्यांनी १८८५मध्येच 'गुणोत्कर्ष' हे नाटक लिहिले होते. परंतु नंतर त्यांनी मार्ग बदलला आणि ते इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात शिरले. १९१२-१३च्या सुमारास महाराष्ट्र नाटक मंडळी या गद्य नाट्यसंस्थेचे त्रिंबकराव कारखानीस यांनी पाठपुरावा करून वासुदेवशास्त्री खऱ्यांकडून एक नाटक लिहून घेतले. त्याचे नाव 'तारामंडळ'. या नाटकाला लोकप्रियता मिळाली. त्यानंतर खऱ्यांची 'चित्रवंचना', 'कृष्णकांचन',

'शिवसंभव', 'उग्रमंगल' ही नाटके रंगभूमीवर आली. 'शिवसंभव' हे नाटक शिवाजी महाराजांच्या जन्मकथेविषयी होते. शिवाजी महाराजांना भवानीदेवीचा साक्षात्कार झाला होता, असे या नाटकात दाखवले होते. तर 'उग्रमंगल' या नाटकात राणी पद्मावतीची कथा आलेली होती. या काळात शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित नाटकांची लाट आली होती. नट असलेल्या यशवंत टिपणिसांनी नाटकेही लिहिली. त्यांचे 'शहा शिवाजी' (१९२१), 'चंद्रग्रहण' ही नाटके शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित होती. टिपणिसांची आणखी दोन लोकप्रिय नाटके म्हणजे, 'आशानिराशा' (१९२३) 'शिक्का कट्यार' (१९२७). यशवंतराव टिपणीस आधी महाराष्ट्र नाटक मंडळीचे चालक होते. १९१२मध्ये या कंपनीतून बाहेर पडल्यावर त्यांनी भारत नाटक मंडळी काढली. त्यांना तत्कालीन प्रेक्षकाची नस ते चांगली ओळखून होते. इतिहास आणि पुराणांतील कथानकांचा उपयोग करून प्रेक्षकांच्या रुचीला मानवतील अशी नाटके त्यांनी लिहिली.

या काळात गाजलेले आणखी एक नाटककार म्हणजे वऱ्हाडातले वीर वामनराव जोशी. त्यांचे पहिले नाटक 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' हे ललितकलादर्श मंडळीतर्फे केशवराव भोसले यांनी १९१३मध्ये रंगभूमीवर आणले. या नाटकाच्या लोकप्रियतेची तुलना खाडिलकरलिखित गंधर्व मंडळीच्या 'स्वयंवर' या नाटकाशी केली जाते. त्यानंतर १२ वर्षांनी वामनराव जोशींचे 'रणदुदुंभी' हे नाटक आले. हे वीररसप्रधान नाटकही अतिशय लोकप्रिय झाले. भावमधुर आणि प्रासादिक पदे हे त्यांच्या नाटकाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते.

वामनराव जोश्यांप्रमाणे राजकीय क्षेत्रातून नाट्यक्षेत्रात आलेले दुसरे नाटककार म्हणजे न. चिं. केळकर. 'केसरी'चे संपादक आणि लोकमान्य टिळकांचे अनुयायी म्हणून त्यांचे नाव आधीच प्रस्थापित झाले होते. तरीही त्यांना संगीत नाटक लिहावेसे वाटले आणि त्यांनी १९१२मध्ये यशवंतराव टिपणिसांच्या नव्याने स्थापन झालेल्या भारत नाटक मंडळीसाठी ते लिहिले. पेशवाईतील तोतया प्रकरणावर आधारित या नाटकाचे नाव 'तोतयाचे बंड'. हे नाटक महाराष्ट्र नाटक मंडळीकडे फार काळ राहिले नाही. चित्ताकर्षक मंडळीकडून त्याचे प्रयोग होऊ लागले. १९१३मध्ये याच मंडळीसाठी केळकरांनी 'चंद्रगुप्त' हे नाटक लिहिले. ते चंद्रगुप्त आणि चाणक्य यांच्यातील संबंधावर आधारित ऐतिहासिक अंश असलेले, पण कल्पनारम्य नाटक होते. यानंतर 'कृष्णार्जुनयुद्ध' (१९१४) आणि 'वीरविडंबन' (१९१८) ही महाभारतातील कथानकावर आधारित पौराणिक नाटके त्यांनी लिहिली. 'कृष्णार्जुनयुद्ध' या गद्य नाटकाचे पुढे १९२५मध्ये संगीत नाटकात रूपांतर केले. केळकरांच्या एकूण नाटकांमध्ये हे सर्वाधिक यशस्वी नाटक होते. चित्ताकर्षक मंडळी होती तोपर्यंत, म्हणजे विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकातच केळकरांच्या नाटकांचे प्रयोग सातत्याने होत राहिले. नंतर मात्र त्यांची

नाटके रंगभूमीवरून हळूहळू अदृश्य होत गेली. 'कृष्णार्जुनयुद्ध' आणि काही प्रमाणात 'वीरविडंबन' वगळता त्यांची इतर नाटके रंगभूमीवर टिकली नाहीत.

बहुतेक नाटककार अशी मळलेली वाट पत्करत असताना, मामा वरेरकरांसारखे काही नवे करू पाहणारे आणखी काही नाटककार होते. त्यात माधवराव जोशी आणि प्रबोधनकार ठाकरे यांचे नाव घ्यावे लागेल. पैकी माधवराव जोशी यांनी प्रचलित राजकीय व्यवस्थेचे विडंबन करणारे 'संगीत म्युनिसिपालिटी' हे नाटक १९२६मध्ये लिहिले. त्यापूर्वी त्यांनी पौराणिक पठडीची नाटके लिहूनही त्यांना यश मिळाले नव्हते. तेव्हा इंग्रजीतील प्रहसनांच्या धर्तीवर मराठीत नाटक लिहिण्याची कल्पना त्यांना सुचली. "समाजात पदोपदी दिसणाऱ्या विचित्र व्यक्तींना, मान्यता पावलेल्या दांभिकांना आणि सुधारणेच्या नावाखाली बोकाळलेल्या स्वच्छंदीपणाला उपहासपूर्ण विनोदाच्या चौकटीत बसवून त्यांचे रंगभूमीवर विडंबन करण्याचे तंत्र त्यांनी अंमलात आणले." (वसंत देसाई १९६२ : १०५). माधवराव जोशींनी 'म्युनिसिपालिटी' नाटकात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील गोंधळ आणि भ्रष्टता यांचे उपहासपूर्ण दर्शन घडवले. त्याला चटकदार विडंबनपूर्ण गीतांची जोड दिली. या नाटकानंतर जोशींनी 'वऱ्हाडचा पाटील', 'पैसाच पैसा' ही नाटके रंगभूमीवर आणली. परंतु ती फारशी चालली नाहीत. त्यांचे नाव मराठी नाटकांच्या इतिहासात टिकून राहिले, ते 'म्युनिसिपालिटी' या नाटकामुळेच. वास्तवाचे उपहासप्रधान चित्रण करण्याची नवी वाट त्यांनी मराठी नाटकांना दाखवली. पुढे आचार्य अत्रेंनी या वाटेचा अधिक विस्तार केला. यापूर्वी कोल्हटकर आणि गडकरी यांच्या नाटकांतून विनोदाचे माफक दर्शन घडत असे. परंतु संपूर्ण नाटकच विनोदी शैलीत मराठीत सादर झाले नव्हते. माधवराव जोशींच्या 'म्युनिसिपालिटी'ने तो प्रवाह मराठीत आणला.

मामा वरेरकर यांच्या वाटेने जात, जातीय प्रश्नांवर थेट भाष्य करणारी नाटके लिहिणारे दुर्लक्षित नाटककार म्हणजे केशव सीताराम उर्फ प्रबोधनकार ठाकरे. त्यांची 'टाकलेलं पोर' आणि 'खरा ब्राह्मण' ही दोन नाटके रंगभूमीवर आली. 'काळ'कर्ते शिवराम महादेव परांजपे यांनी कर्णाच्या जीवनावरचे 'पहिला पांडव' हे नाटक लिहिले होते. या नाटकातील प्रतिपादनाच्या विरुद्ध दिलेली प्रतिक्रिया म्हणजे प्रबोधनकार ठाकरे यांचे 'टाकलेलं पोर' हे नाटक होय. परांजप्यांनी कर्ण हा कुंतीच्या पोटचा पांडवांमधला थोरला मुलगा या नात्याने त्याला पहिला पांडव असे संबोधले होते. आणि त्याला क्षत्रिय दर्जा मिळावा या दृष्टिकोनातून हे नाटक लिहिले होते. याउलट आपल्याला कुणीतरी क्षत्रिय म्हणावे म्हणून कर्णाने याचना करणे म्हणजे कर्णाचा अपमान आहे अशी ठाकरे यांची भूमिका होती. या नाटकातला कर्ण समाजाच्या जातजाणिवेविरुद्ध विद्रोही स्वरूपात दाखवला आहे. त्यामुळे पौराणिक आशय असला तरी नाटक क्रांतिकारक होते. यानंतर

१९३२मध्ये आलेले प्रबोधनकार ठाकरे यांचे 'खरा ब्राह्मण' हे नाटक अधिक स्पष्टपणे जातीव्यवस्थेवर भाष्य करणारे, वास्तववादी होते. या नाटकाचे कथानक सोळाव्या शतकात, एकनाथांच्या काळात घडते; या अर्थाने ते ऐतिहासिक नाटक आहे. पण पात्रे कोणी राजकीय इतिहासपुरुष नव्हे, तर सर्वसामान्य माणसे आहेत. नाटकाचा नायक 'विठोबा महार' आहे. पुरोहितशाहीवर जळजळीत भाष्य करून, आचरणामुळे विठोबा महार हाच खरा ब्राह्मण आहे, असे ठाकरे यांनी या नाटकात दाखवले आहे. या नाटकाचे ७५ प्रयोग झाले (दत्ता भगत २०१९ : ३१७). इतिहासकाळातली सामान्य माणसे घेऊन लिहिलेले हे मराठीतले पहिलेच नाटक असावे.

१९२०नंतर बदललेली सामाजिक परिस्थिती, विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेली जातिअंताची चळवळ यांचा प्रभाव मराठी नाट्यसृष्टीवर पडू लागला होता, हे मामा वरेरकर, प्रबोधनकार ठाकरे यांच्या नाटकांवरून दिसू लागले होते. मात्र ही नाटके व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी होत नव्हती. याचे कारण मराठी नाट्य-प्रेक्षकांची मानसिकता. किर्लोस्कर, बलवंत,

१९३०पर्यंत शंकरराव किर्लोस्कर, गो. ब. देवल, कृ. प्र. खाडिलकर, गडकरी हेच प्रामुख्याने यशस्वी नाटककार राहिले. नाटक कंपन्या जुन्या बंद पडत गेल्या किंवा फुटत गेल्या, नव्या स्थापन होत गेल्या. परंतु या नाटककारांची काही नाटके हमखास यश देणारी म्हणून पुन्हा पुन्हा या कंपन्यांकडून रंगमंचावर येत राहिली.

## ९.५ मराठी संगीत रंगभूमीची अखेर

१९३१च्या सुमारास मराठी नाटकांना मिळणारा प्रेक्षकांचा प्रतिसाद रोडावला. पण त्याआधीच्या दशकातच मराठी रंगभूमी एका आवर्तात अडकल्याची जाणीव काही नाट्यकर्मींना होऊ लागली होती. प्रेक्षकांच्या अभिरुचीचा एक ठरीव साचा बनला होता. पौराणिक-ऐतिहासिक किंवा अवास्तव कल्पनाप्रधान कथानकांवर आधारित नाटक आणि त्याला ठरावीक साच्यातल्या संगीताची जोड – असे या नाटकांचे चाकोरीबद्ध स्वरूप ठरून गेले होते. आलाप-तानांचा अतिरेकी वापर करणाऱ्या गायक-नटांमुळे संगीताचा अतिरेकी प्रमाणात आविष्कार नाटकातून होऊ लागला होता. त्यातले नाटक हरवून केवळ संगीत मैफिल असे स्वरूप त्याला आले होते. अशा नाटकांना संगीतप्रेमी प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळत होता, हे खरे असले तरी बदलत्या काळानुसार प्रेक्षकांची अभिरुचीही बदलू लागली होती. संस्कृतीच्या इतर अंगांमध्ये होणाऱ्या बदलांचा प्रभाव पडू लागला आणि नाटकांच्या प्रचलित स्वरूपाविषयी असमाधानाही व्यक्त होऊ लागले. उदाहरणार्थ, नाटकांतील पदे बालगंधर्व, मास्टर दीनानाथ यांच्या आवाजात ध्वनिमुद्रित तबकड्यांवर सहजपणे उपलब्ध होऊ लागल्यानंतर केवळ त्यांचे गाणे ऐकण्यासाठी

नाटक पाहायला जाणे तितकेसे अनिवार्य राहिले नाही. त्यामुळे संगीताच्या ओढीने येणारा प्रेक्षकवर्ग कमी झाला. अशात जो प्रेक्षक रंगभूमीकडे येई, त्याला नाटकातून मनोरंजन हवे असे. परंतु मधल्या काळात नाटक मंडळ्यांनी प्रेक्षकांच्या संगीताभिरुचीलाच महत्त्व देत संगीताचा आविष्कार वाढवत विकसित करत नेल्यामुळे नाटकाच्या कथानकाकडे, सादरीकरणाकडे त्यांचे दुर्लक्ष झाले होते. कथानक कमकुवत असले तरी केवळ संगीताच्या बळावर नाटक किती प्रचंड लोकप्रिय होऊ शकते, याचे 'मानापमान' हे नमुनेदार उदारहण होते. त्याचेच अनुकरण पुढच्या दोन दशकांत नाटक मंडळ्यांनी केले. याचा परिणाम म्हणजे, संगीताऐवजी केवळ नाटकाचे कथानक व सादरीकरण यांच्या बळावर प्रेक्षकांना आकृष्ट करण्याची वेळ आली, तेव्हा संगीत रंगभूमीचे अवसान गळाले. हे विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात विशेषत्वाने दिसून आले.

१९२०-३०च्या दरम्यान राजकीय क्षेत्रात महात्मा गांधी नवी असहकारितेची, अहिंसेची तत्त्वे प्रस्थापित करत होते; विचाराच्या क्षेत्रात समाजशास्त्र, मार्क्सवाद, फ्रॉइडचे मानसशास्त्र यांचा परिचय होत होता; साहित्याच्या क्षेत्रात रोमँटिसिझमचा आविष्कार चाकोरीबद्ध झाला होता आणि श्री. व्यं. केतकर, मामा वरेरकर, पु. य. देशपांडे यांच्या कादंबऱ्यांमधली वास्तववादाची नवी रूपे – अशा नव्या उर्मींच्या प्रभावामुळे पौराणिक-ऐतिहासिक कथानकांवर आधारलेली कृतक्, मेलोड्रॅमॅटिक नाटके व त्यांचे पठडीबद्ध संगीत मराठी प्रेक्षकांना कालबाह्य वाटू लागले असल्यास नवल नाही. अशा वातावरणात मामा वरेरकरांसारख्या नाट्यक्षेत्रातल्या काही मंडळींनी नाटकाचे हे रूढ प्रारूप बदलण्याचा प्रयत्न केला. मामांचे 'सत्तेचे गुलाम', माधवराव जोशी यांचे 'म्युनिसिपालिटी' या नाटकांना तरुण प्रेक्षकांचा प्रतिसाद चांगला मिळाला. प्रबोधनकार ठाकरे यांच्या 'खरा ब्राह्मण' या नाटकाला मोठ्या, प्रस्थापित नाटक कंपनीचे पाठबळ नसतानाही या नाटकाचे ७५ प्रयोग झाले – यावरून नवे प्रयोग, नवा आशय नाट्यरसिकांना हवा होता हे स्पष्ट होते.

विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात रेडिओ आणि बोलपट ही दोन नवी आव्हाने संगीत रंगभूमीसमोर उभी राहिली. १९२७मध्ये सरकारी आकाशवाणी केंद्र मुंबई येथे सुरू झाले. त्यावरून संगीत सादर होऊ लागले. पाठोपाठ नाटकाशी जवळीक साधणारा 'नभोनाट्य' हा प्रकारही सादर होऊ लागला. नभोनाट्य हे केवळ श्राव्य माध्यमातील असले, तरी संवाद, संगीत व प्रसंगांच्या सादरीकरणात उपयोगात आणले जाणारे विविध ध्वनी यांच्या बळावर दृश्य माध्यमाची कमी भरून काढली जात असे. नवे माध्यम म्हणून प्रेक्षकांमध्ये याविषयी आकर्षण निर्माण झाले.

बोलपटाचे आव्हान विशेष परिणामकारक ठरले. मराठी नाटकांना पहिला शह बोलपटांनी दिला असे म्हटले जाते. गणपतराव बोडस यांच्या आठवणीप्रमाणे १९३३च्या

सुमारास नाटक कंपन्या अचानक घरसणीस लागल्या. बालगंधर्व आणि गणपतराव बोडस १९३०च्या डिसेंबरमध्ये मुंबईला गेलेले असताना त्यांनी 'लव्ह परेड' हा इंग्रजी बोलपट पाहिला. बोडस लिहितात, "बोलपट पाहिल्यावर मी नारायणरावांना म्हटलें होतें कीं नाटक मंडळ्यांवर हे आगामी संकट आहे. आणि तेंच प्रत्ययाला येऊं लागलें होतें. १९३२ सालीं प्रभातचा पहिला बोलपट "अयोध्येचा राजा" हा निघाला व त्यानें थिएटरें रिकामीं पाडावयास सुरवात केली होती." (बोडस १९४० : ३५०). चित्रपटांचे तिकीटदर नाटकांपेक्षा कितीतरी कमी होते आणि नव्या तंत्रज्ञानाचे हे माध्यम असल्याने त्याची प्रभावक्षमता नाटकांहून अधिक होती.

जुलै १९३१मध्ये बालगंधर्वांची गंधर्व कंपनी हक्काचे प्रेक्षक असलेल्या पुण्यात आली, परंतु नाटकांना प्रेक्षकांचा प्रतिसाद फारच खालावल्याचे कंपनीच्या लक्षात आले. नव्या नाटकांकडे प्रेक्षक फिरकेनात म्हणून शारदा, रामराज्यवियोग, शापसंभ्रम या जुन्या गाजलेल्या नाटकांचे खेळ लावावेत असा विचार त्यांनी केला. वसंत देसाई यांना लिहिलेल्या पत्रात बालगंधर्वांनी लिहिले, "पुण्याचे पुढचे सीझनचें थिएटर आम्ही ठरविणार नाहीं असें म्हणतों. एक दोन वर्षं जरा आमच्या पुण्याच्या मंडळीना विसर पडला पाहिजे असें वाटतें." (विश्रब्ध शारदा खंड २ : ७४). मराठी रंगभूमीचा हा 'सुपरस्टार' सुद्धा प्रेक्षकांना पुन्हा आपल्या नाटकांकडे खेचून घेण्यासाठी काय करावे या विवंचनेत पडला होता.

पुण्याहून ऑक्टोबर १९३१मध्ये गंधर्व कंपनीने आपला मुक्काम मुंबईला हलवला, तेव्हा पेंढारकरांची ललितकलादर्श, मास्टर विनायकांची बलवंत या कंपन्याही मुंबईत प्रेक्षक मिळवण्यासाठी धडपडत असलेल्या बालगंधर्वांना दिसल्या. पुण्यापेक्षा मुंबईत आपली नाटके चालतील या अपेक्षेने बालगंधर्व आले होते, परंतु इथे त्यांना भयावह भवितव्याची चाहूल लागली. एका बुधवारी 'शाकुंतल'च्या प्रयोगाला अवघी १७५ रुपयांची तिकीट विक्री झाली; त्या दिवशी बलवंतने 'उग्रमंगल' नाटकाचा प्रयोग लावला होता. परंतु तिकीट विक्री मुळीच न झाल्यामुळे 'चिंतामणराव कोल्हटकर यांची प्रकृती बरी नाही' असे कारण दाखवून शेवटी खेळ रद्द करण्याची नामुष्की बलवंत कंपनीवर ओढवली. ललितकलादर्शच्या माणसांचा पगार चारसहा महिन्यांपासून थकल्याचे बालगंधर्वांना समजले (उपरोक्त : ७८).

संगीत नाटक मंडळीच्या चालकांनी चित्रपटांमुळे नाटकांपासून प्रेक्षक दुरावला असे म्हटले असले, तरी ते पूर्णपणे खरे नव्हते. बदलत्या काळानुसार बदलायला या कंपन्यांचे चालक तयार नव्हते, हे त्यामागचे मुख्य कारण होते. प्रेक्षकांची अभिरुची कशी आणि का बदलली, हे वर सांगितले आहेच. पन्नासच्या दशकात संगीत रंगभूमी अस्ताला गेल्यानंतर मराठी रंगभूमीवर ज्यांनी मोठे यश संपादन केले, त्या मो. ग. रांगणेकरांचे मतही विचारात

घेतले पाहिजे. बोलपटांच्या आक्रमणामुळे नाटक कंपन्या बंद पडल्या या म्हणण्यात फारसे तथ्य नव्हते असे सांगून ते पुढे म्हणतात, "नाटक कंपन्या बंद पडल्या त्या त्यांच्याच अव्यवहारी वागण्यामुळं आणि दूरदृष्टी नसल्यामुळं. दिवसेंदिवस सगळ्याच बाबतीतला खर्च वाढत चालला आहे, हे काय त्यांना दिसत नव्हतं? अगदी आवश्यक तेवढीच माणसं कंपनीत ठेवून हा संसार त्यांनी आटोपशीरपणानं चालवायला नको होता? तीच तीच नाटकं वर्षानुवर्षं ओरबाडत बसल्यामुळे प्रेक्षक कंटाळले असतील, तेव्हा नवीन नवीन कल्पनांची, विचारांची नाटकं लेखकांकडून लिहवून घेऊन रंगभूमीवर आणायला नको होती? बदलत्या काळाप्रमाणे रंगभूमीवरही आवश्यक त्या सुधारणा करायला नको होत्या? ते न करता काहीजण नाटक कंपन्या बंद करून सिनेमा कंपन्या काढण्याच्या मागे लागले आणि शेवटी हालअपेष्टा काढून नामशेष झाले. मग बोलपटांमुळे नाटककंपन्या बंद पडल्या, असा आक्रोश करण्यात काय अर्थ?" (रांगणेकर १९९२ : १२३).

प्रेक्षकांचा आश्रय वाढावा यासाठी या कंपन्यांनी केलेले प्रयत्न फारच तुटपुंजे आणि चाकोरीतले होते. उदाहरणार्थ, गंधर्व कंपनीत वाढता खर्च आणि घटते उत्पन्न यांच्यातले व्यस्त प्रमाण वाढतच चालले. नव्याने रंगभूमीवर आणलेले 'कान्होपात्रा' हे नाटकही चालेना, तेव्हा खर्च कमी करण्याचा मार्ग म्हणून कंपनीने माधवराव वालावलकर, कृष्णाप्पा भांडारकर या जुन्या व लोकप्रिय नटांना कंपनीतून रजा दिली. पण याचा उलट परिणाम असा झाला की या नटांअभावी नाटकांचे खेळ रंगेनात, व आधीच कमी झालेल्या प्रेक्षकांचा प्रतिसाद अधिकच रोडावला. अखेर त्यांना पुन्हा कंपनीत बोलवावे लागले.

आधीपासून मराठी नाटक कंपन्यांमध्ये एक प्रथा चालत आली होती. एखाद्या कंपनीची नाटके महाराष्ट्रात चालेनाशी झाली की ती कंपनी महाराष्ट्राबाहेर कर्नाटक, हैदराबाद, मध्यप्रांत या भागांत दौरा काढत असे. १९१३मध्ये किर्लोस्कर मंडळीतून फुटून गंधर्व मंडळी स्थापन झाल्यावर किर्लोस्करची नाटके चालेनाशी झाली होती. तेव्हा शंकरराव मुजुमदारांनी कंपनी उत्तर भारतात व कलकत्त्याला नेली. त्यांनी मंचित केलेली 'ताजेवफा' आणि 'काटों में फूल' ही नाटके तिथे अतिशय गाजली. १९१८मध्ये चिंतामणराव कोल्हटकर, मास्टर दीनानाथ यांनी बलवंत संगीत मंडळीची स्थापना केल्यावर प्रारंभीच्या काळात त्यांना महाराष्ट्राबाहेर सादर केलेल्या हिंदी नाटकांनीच हात दिला. 'ताजेवफा', 'काटों में फूल' आणि आनंदप्रसाद कपूर यांचे 'भक्त ध्रुव' या नाटकांचे खेळ बलवंत मंडळी करत असे. १९२१मध्ये यशवंत संगीत मंडळीमधले सगळे नट सोडून गेल्यावर एकटे शंकरराव सरनाईक यांच्यावर मंडळीची जबाबदारी येऊन पडली. त्यांनी मराठी नाटके चालेनात म्हणून हैदराबाद येथे कंपनीचा मुक्काम हलवून तिथे 'चलती दुनिया' या हिंदी नाटकाचे खेळ केले. त्या बळावर कंपनीची आर्थिक स्थिती पुन्हा सुधारली.

हा इतिहास लक्षात घेता १९३१मध्ये महाराष्ट्रात नाटके चालेनात, तेव्हा नाट्यकलाप्रवर्तक मंडळीने उत्तर भारतात दौरा काढून 'पंजाब मेल' या नाटकाचे प्रयोग लावले.

**नाटक मंडळ्यांचा कोसळता डोलारा – चित्रपटक्षेत्राचे आकर्षण**

पण मराठी नाटक कंपन्यांच्या अशा पारंपरिक प्रयत्नांना आता यश मिळणे शक्य नव्हते. प्रेक्षकांची अभिरुची बदलली होती. बोलपटाच्या रूपाने एक नवी पर्यायी आणि सशक्त मनोरंजनप्रधान कला आव्हान देऊ लागली होती. अशा स्थितीत १९३३ ते ३५ या काळात मराठी नाटक मंडळ्या एकामागोमाग एक बंद पडत गेल्या. शंकरराव सरनाईक यांनी प्रेक्षकांच्या प्रतिसादाअभावी यशवंत नाट्यसंस्था बंद केली. हिराबाई बडोदेकरांनी नूतन नाटक मंडळी बंद करून पुन्हा गायन मैफलींचा आणि जलशांचा व्यवसाय सुरू केला. नाट्यमन्वंतर ही नवी नाट्यसंस्था देखील बंद पडली आणि महाराष्ट्र नाटक मंडळी ही गद्य नाटके करणारी संस्थाही बंद झाली. एकामागोमाग सर्व नाट्यसंस्थांचा अस्त झाल्याने नाटक मंडळ्यांचे युग जवळजवळ संपुष्टात आले. एक पर्व संपले.

'अयोध्येचा राजा' आणि 'मायामच्छिंद्र' या दोन बोलपटांमुळे मराठी प्रेक्षकांप्रमाणे रंगभूमीवरील नटांना बोलपटांचे जबरदस्त आकर्षण वाटू लागले. बालगंधर्व वसंत शांताराम देसाई यांना २ ऑक्टोबर १९३१ रोजी लिहिलेल्या पत्रात लिहितात : "आता टॉकीजना पैसे मिळतात. थोड्या वेळात करमणूक, थोडे दर, अशी गोष्ट असल्यामुळे टॉकीजना पैसे मिळतात. पेंढारकर स्वतः टॉकीज काढण्याच्या विचारात आहेत." (वसंत देसाई १९७१ : १५६). नाटक मंडळ्यांचा डोलारा कोसळल्यानंतर हे कलावंत आपले अस्तित्व टिकवण्यासाठी चित्रपटक्षेत्रात प्रवेशण्याचा प्रयत्न करू लागले.

नाटकाकडून चित्रपटाकडे गेलेले पहिले नाट्यकर्मी म्हणजे ललितकलादर्शचे बापूसाहेब पेंढारकर. त्यांनी नाटक कंपनी सुरू असतानाच 'विजयाची लग्ने' हा चित्रपट काढला. नाटक मंडळी कुठेही असली तरी नाटकाच्या खेळांचे तीन वार सांभाळून आठवड्यातले उरलेले दिवस मुंबईत राहून त्यांनी चित्रिकरण पूर्ण केले. पण या धावपळीचा प्रकृतीवर विपरीत परिणाम होऊन, १९३७मध्ये बापूराव पेंढारकर यांचे इंदौर मुक्कामी निधन झाले. परिणामी ललितकलादर्श मंडळी बंद पडली.

पेंढारकरांच्या पावलावर पाऊल ठेवून, १९३४मध्ये बालगंधर्वांनी गंधर्व नाटक मंडळीचे विसर्जन केले आणि व्ही. शांताराम यांच्या प्रभात फिल्म कंपनीसोबत बोलपटनिर्मितीचा करार केला. रंगभूमीवरील आपली लोकप्रियता लक्षात घेता चित्रपटाच्या पडद्यावरील आपले आगमन प्रेक्षकांना खेचून घेईल अशी अपेक्षा बालगंधर्वांना होती. परंतु प्रत्यक्षात व्ही. शांतारामांसोबत त्यांनी निर्माण केलेला पहिला चित्रपट 'धर्मात्मा' १९३५मध्ये पडद्यावर आला आणि साफ कोसळला. पडद्यावरचे

पुरुषभूमिकेतले बालगंधर्व प्रेक्षकांनी स्वीकारले नाहीत. खुद्द बालगंधर्वांनाही चित्रपट हे आपले माध्यम नाही याची जाणीव झाली. इकडे बालगंधर्वांनी स्वतः गंधर्व कंपनीचे विसर्जन केल्यावरही कंपनीतील नट गंगाधरपंत लोंढे यांनी इतर मंडळींना हाताशी धरून १९३५मध्ये गंधर्व संगीत मंडळीचे पुनरुज्जीवन केले होते. चित्रपटाचा प्रयोग फसल्यावर १९३६ मध्ये बालगंधर्व पुन्हा माघारी जाऊन या पुनरुज्जीवित गंधर्व मंडळीत प्रवेश करते झाले.

चिंतामणराव कोल्हटकर, मास्टर दीनानाथ यांनी बलवंत नाटक मंडळी बंद करून तिचे 'बलवंत पिक्चर्स'मध्ये रुपांतर केले. पण जेमतेम दोन बोलपट काढल्यानंतर बलवंत पिक्चर्स बंद पडून फक्त कर्ज मागे उरले (विश्रब्ध शारदा : ८१). १९३३पासून केशवराव दाते प्रभात फिल्म कंपनीत राहिले. जवळजवळ तीस वर्षांपर्यंत त्यांनी भूमिका केल्या. नाना फाटक, गणपतराव बोडस, मास्टर दिनकर, गंगाधरपंत लोंढे, हिराबाई बडोदेकर, ज्योत्स्नाबाई भोळे या मराठी रंगभूमीवरच्या गाजलेल्या नटांनी बोलपटांमध्ये काम केले. परंतु जेवढे यश त्यांना रंगभूमीवर मिळाले, तेवढे चित्रपट कलेत मिळाले नाही. याचे कारण ही दोन्ही कलामाध्यमे पूर्णपणे निराळी होती. त्यांची अभिनयकलेची मागणी वेगवेगळ्या स्वरूपाची होती.

१८८०पासून – म्हणजे पन्नासहून अधिक वर्षांपासून संगीत नाटकांनी आणि गद्य नाटकांनीदेखील मराठी रसिक प्रेक्षकांचे मनोरंजन केले, त्यांची संगीत आणि नाट्य अभिरुची जोपासली. साहित्यक्षेत्रातल्या प्रतिष्ठित लेखकांनी नाटककार म्हणून आपली लेखनी झिजवली, मोठमोठ्या संगीतकार-गायकांनी रंगभूमीवर संगीत देण्यात धन्यता मानली. भाऊराव कोल्हटकरांपासून बालगंधर्वांपर्यंतचे अनेक नट या रंगभूमीवरचे आजच्या शब्दांत सुपरस्टार ठरले. 'नाटकवेडा समाज' ही महाराष्ट्रीय समाजाची ओळख देशभर याच नाटक मंडळ्यांनी प्रसारित केली, प्रस्थापित केली. महाराष्ट्रीय रसिकांच्या किमान तीन पिढ्यांवर इतका खोलवरचा प्रभाव टाकणारी ही नाट्यकला आपला प्रभाव हरवून बसू लागली, प्रेक्षकांअभावी दीनवाणी झाली, नाटक मंडळ्यांचे खटले ओस पडू लागले, तेव्हा या नाटकांवर आपली कलाभिरुची जोपासलेल्या नाट्यरसिकांना किती धक्का बसला असेल, त्याची कल्पना वसंत देसाई यांच्या पुढील प्रतिक्रियेवरून कळून येते. वसंत देसाई हे १९२०पासून मराठी नाट्यक्षेत्रात प्रेक्षक म्हणून आणि पुढे स्वतः नाटककार म्हणून संबंधित तर होतेच, पण नाटक मंडळ्या, त्यांतले कलाकार आणि व्यवस्थापक, नाटकांचे लेखक-समीक्षक या सर्वांच्या वर्तुळात ते जीवनभर रमले होते. १९३१नंतर नाटक मंडळ्यांना मिळणारा प्रेक्षकांचा प्रतिसाद अचानक रोडावला; नाटकांतले लोक चित्रपटाकडे वळू लागले, तेव्हाची त्यांची ही प्रतिक्रिया आहे. ते म्हणतात : "कलेचा आनंद इतका अमर्याद असतो की, त्या आनंदात मग्न असताना

कलेच्या मर्यादेची कल्पना मनाला स्पर्श करीत नाही. आपल्या डोळ्यांदेखत बालगंधर्व रंगभूमीवरून दिसेनासे होतील, असे मला कधीच वाटले नव्हते. बालगंधर्वच नव्हेत, तर केशवराव दाते, नाना फाटक, पेंढारकर, चिंतामणराव कोल्हटकर, मास्तर दीनानाथ आणि मास्तर दिनकर वगैरे नटांच्या भूमिका मी रंगभूमीवर जणू नेहमी पाहत राहणार आहे, अशा वृत्तीने मी वागत होतो. मराठी रंगभूमीने माझे नुसते रंजन केले नव्हते. माझ्या विचारांचा आणि भावनांचा पिंड जणू काय मराठी रंगभूमीच्या कुशीत वाढला होता. तिच्या मध्यस्थीनेच गायनाभिनयाच्या कलेचा, मराठीतील उत्तम साहित्याचा, मानवी जीवनातील मूल्यांचा आणि माझा दाट परिचय झाला होता. माझ्या परिचयाच्या नाटक-मंडळ्या बंद पडता-पडता अखेर गंधर्व-मंडळीचे विसर्जन झाले, त्या वेळी माझ्या जीवनात एक प्रकारची पोकळी निर्माण झाल्यासारखे मला वाटले!" (वसंत देसाई १९७१ : १५७-५८).

वसंत देसाईंचे वरील उद्गार हे तत्कालीन एकंदरच मराठी समाजाचे नाटकाविषयीचे प्रातिनिधिक उद्गार म्हटले पाहिजेत. नाटक हे तत्कालीन मराठी समाजासाठी केवळ मनोरंजनाचे साधन नव्हते, तर या समाजाला जीवनरस पुरवणारे ते महत्त्वाचे कलामाध्यम होते. 'नाटकवेडा' ही मराठी माणसाची प्रमुख ओळख याच काळात प्रस्थापित झाली होती. मग अशा 'नाटकवेड्या' मराठी माणसाला नाटक कायमचे सोडून कसे जाईल?

## नाटक मंडळ्यांच्या पुनरुज्जीवनाचे अपयशी प्रयत्न

चित्रपटकलेमध्ये आपले बस्तान बसणे कठीण आहे, हे ध्यानात आल्यावर १९३१नंतर नाटक मंडळ्यांतून चित्रपटमाध्यमाकडे वळलेले अनेक महत्त्वाचे नट हे दशक संपण्याच्या आतच पुन्हा रंगभूमीकडे परतले. बालगंधर्वांच्या रंगभूमीवरच्या पुनरागमनाची हकीगत वर सांगितलीच आहे. गंधर्व मंडळी गंगाधरपंत लोंढे यांनी १९३५मध्ये पुन्हा सुरू केली. १९३८मध्ये चिंतामणराव कोल्हटकर यांनी बलवंत संगीत मंडळी पुन्हा सुरू केली. पण त्यांची नाटके चालेनात. गंगाधरपंत लोंढेही नंतर बोलपटात गेले होते. तिथून परतून १९३९मध्ये राजाराम संगीत मंडळी सुरू केली. त्यांना चिंतामणराव कोल्हटकर, मास्टर दीनानाथ यांनी साथ दिली. जोवर चांगले नवे नाटक मिळत नाही, तोवर जुनी नाटके जुन्या मंडळींसोबत करार करून चालवण्याची लोंढे यांची योजना होती. त्यानुसार १९४०-४१पर्यंत राजाराम संगीत मंडळीच्या नाटकांत दामूअण्णा मालवणकर, नाना फाटक, शंकरराव सरनाईक, मास्टर दीनानाथ यांनी भूमिका केल्या. पण नाटके फारशी चालली नाहीत. या दरम्यान 'भावबंधन' नाटकाचे प्रयोग केले. त्यांना मात्र प्रतिसाद मिळाला. मास्टर नरेश हा कुशल नट तेव्हा राजाराम संगीत मंडळीला मिळाला. हा मराठी रंगभूमीवरचा अखेरचा यशस्वी स्त्रीभूमिकेतला पुरुषनट ठरला. १९४२मध्ये व्यंकटेश बलवंत पेंढारकर यांचा मुलगा भालचंद्र पेंढारकर यांनी 'ललितकलादर्श' या संस्थेचे

पुनरुज्जीवन केले. पुनरागमनात त्यांनी केलेले पहिले नाटक म्हणजे, मामा वरेरकरांचे 'सत्तेचे गुलाम'. मुंबईला ललितकलादर्श मंडळीने या नाटकाचे ओळीने पाच प्रयोग केले.

पारंपरिक मराठी नाटक कंपन्यांनी १९४०च्या सुमारास मराठी रंगभूमीत जीव ओतण्याचे असे प्रयत्न चालवले असले तरी त्यांना म्हणावे तसे यश येत नव्हते. अपुऱ्या आर्थिक प्राप्तीअभावी नाटक कंपन्यांचा एखाद्या मोठ्या कुटुंबासारखा असणारा पसारा पारंपरिक पद्धतीने सांभाळणे अशक्य झाले होते. थोडक्यात, मराठी रंगभूमीला एका नव्या 'व्यवस्थे'ची गरज होती. आणि चित्रपटांच्या नव्या जादुई रंजनविश्वात रमलेल्या प्रेक्षकांना पुन्हा नाटकांकडे खेचून घेण्यासाठी नव्या धर्तीच्या नाटकांचीही आवश्यकता होती. या दोन्ही दिशांनी काही नवे प्रयोग १९३०नंतरच्या, संगीत नाटक मंडळींच्या पडझडीच्याच काळात मराठी नाट्यसृष्टीत होत होते. पारंपरिक नाटक कंपन्यांच्या पुनरुज्जीवनाचा प्रयोग यशस्वी झाला नाही, तरी नव्या वाटांच्या दिशेने सुरू असलेले प्रयोग मात्र मराठी रंगभूमीच्या भावी वाटचालीच्या दिशेने आशादायी वातावरण निर्माण करत होते.

## ९.६ मराठी रंगभूमीचे नवे रूप : १९३३ ते १९५०

१९३५पर्यंत मराठी संगीत रंगभूमीचा काळ मानला, तर त्यानंतरचा पंधरा वर्षांचा काळ हा मराठी रंगभूमीच्या नव्या रूपाच्या जडणघडणीचा काळ मानायला हवा. या काळात नवे काही करू पाहणारे नाटककार, नव्या धर्तीवर स्थापन झालेल्या व्यावसायिक नाटक कंपन्या, मराठी रंगभूमीची वाढ होण्यासाठी धडपडणाऱ्या नाट्यसंस्था – या सर्वांच्या प्रयत्नांतून मराठी नाट्यकलेत नवे प्रवाह निर्माण झाले.

१९३३मध्ये, एकीकडे बोलपटांच्या आक्रमणापुढे पारंपरिक संगीत रंगभूमीने सपशेल पराभव पत्करलेला असताना मराठी नाटकांत नवे चैतन्य निर्माण करणाऱ्या दोन महत्त्वाच्या घटना घडल्या : एक – नाट्यमन्वंतर या नाट्यसंस्थेचे 'आंधळ्यांची शाळा' हे नव्या धर्तीचे नाटक रंगभूमीवर आले; आणि दोन – आचार्य अत्रे यांचे 'साष्टांग नमस्कार' हे अगदी वेगळे नाटक रंगभूमी गाजवू लागले. या दोन नाटकांनी मराठी रंगभूमीची भावी दिशा निश्चित झाली असे म्हणावे लागेल.

### 'नाट्यमन्वंतर' आणि 'रेडिओ स्टार्स' : नवे प्रयोग करणाऱ्या नाट्यसंस्था

१९३०च्या सुमारास मराठी नाटकांत काही नवे, वेगळे प्रयोग करण्याच्या हेतूने मुंबईतल्या अनंत काणेकर, के. नारायण काळे, श्री. वि. वर्तक, ग. य. चिटणीस, पार्श्वनाथ आळतेकर अशा समविचारी नाट्यकर्मींनी एकत्र येऊन 'नाट्यमन्वंतर' ही संस्था स्थापन केली. या मंडळींनी जागतिक रंगभूमीचा जाणीवपूर्वक अभ्यास करून मराठी रंगभूमीवर नवे प्रयोग करण्याचा निर्णय घेतला. पारंपरिक मराठी रंगभूमीचा पौराणिक-ऐतिहासिक नाटकांचा आकृतिबंध नाकारून सामाजिक आशयाचे मोजक्या नेपथ्यानिशी वास्तववादी

दर्शन घडवणारा नवा आकृतिबंध स्वीकारला. त्यांच्यासमोर आदर्श म्हणून इब्सेनियन रंगभूमी होती. इब्सेनचा नात्याने साडू असलेला नाटककार ब्यर्सन याच्या 'ग्वाँटलेट' या नाटकाचे मराठी रुपांतर श्री. वि. वर्तक यांनी केले. 'आंधळ्यांची शाळा' नावाच्या या नाटकाचा पहिला प्रयोग मुंबईच्या रिपन थिएटरमध्ये १ जुलै १९३३ रोजी झाला (वि. भा. देशपांडे २००८ : ५५). मूळ नाटकातील स्त्री-पुरुष नात्यावरील प्रमेय तत्कालीन मराठी समाजाच्या नैतिक कल्पनांना झेपेल इतपत सौम्य करून या नाटकात वर्तकांनी मांडले असले, तरी हे नाटक आशय आणि सादरीकरणाच्या दृष्टीने नव्या युगाची नांदी ठरले. विशेष म्हणजे पारंपरिक संगीत रंगभूमीवरील नाट्यकर्मी केशवराव दाते यांनी या नाटकाचे दिग्दर्शन केले होते. नाटकात स्त्रियांनी पुरुषांच्या बरोबरीने भूमिका कराव्यात, असा या मंडळींचा आग्रह होता. यापूर्वी हिराबाई बडोदेकरांनी तसा प्रयोग केला असला, तरी तो मराठी नाट्यसृष्टीत अपवादच राहिला होता. म्हणून खुद्द नाटककार वर्तक यांची पत्नी पद्मावती वर्तक आणि संगीत दिग्दर्शक केशवराव भोळे यांची पत्नी ज्योत्स्ना भोळे यांनी या नाटकात स्त्रीभूमिका केल्या.

'आंधळ्यांची शाळा' या नाटकाच्या आशयापासून त्यातील नटांचा अभिनय, नेपथ्य, दिग्दर्शनामागील दृष्टी हे सारेच नवे होते. स्वगते नाहीत, मेलोड्रामारूपी नाटकी अभिनय नाही, वन्समोअरने लांबत गेलेले पदांचे गायन नाही – असे हे नाटक होते. त्यात वास्तवदर्शन हे प्रमुख सूत्र होते. स्त्री-पुरुष नात्यावर आधुनिक दृष्टीतून केलेले भाष्य होते. भरमसाठ पदांच्या ऐवजी मोजक्या भावगीतांचा उपयोग केला होता. स्वाभाविकच हे नाटक शहरी प्रेक्षकांपुरते मर्यादित राहिले. 'आंधळ्यांची शाळा'चे अगदी मोजके प्रयोग झाले आणि तेही मुंबई-पुण्यात. यानंतर वर्तकांनी 'तक्षशिला' आणि 'लपंडाव' ही आणखी दोन नाटके लिहिली आणि ती रंगभूमीवर देखील आली. परंतु त्यांची फारशी चर्चा झाली नाही. ही नाटके चालली देखील नाहीत. आणि मराठी रंगभूमीवर मोठे परिवर्तन घडवून आणण्याच्या हेतूने स्थापन झालेली नाट्यमन्वंतर ही संस्था देखील अल्पजीवी ठरली. १९३६मध्ये ही संस्था बंद पडली.

'नाट्यमन्वंतर'चा बोलबाला मराठी नाट्येतिहासात अधिक आहे. परंतु नाट्यमन्वंतरच्याही आधी मराठी रंगभूमीवर नवे काही करण्याच्या इराद्याने मुंबईत स्थापन झालेली संस्था म्हणजे 'रेडिओ स्टार्स'. नाट्यमन्वंतरमध्ये असलेले पार्श्वनाथ आळतेकर याही संस्थेत होतेच. त्याशिवाय नंदू खोटे, श्रीपाद नरसिंह बेंडे यांचा या संस्थेत सहभाग होता. श्रीपाद बेंडे यांचे 'बेबी' हे नाटक रेडिओ स्टार्सने १९ नोव्हेंबर १९३२ रोजी रंगभूमीवर आणले (दत्ता भगत २०१९ : ३३४). या नाटकाला त्या काळात भरपूर यश मिळाले होते. 'बेबी' या नाटकाचे आशयसूत्र तत्कालीन मराठी नाटकांत वेगळे उठून दिसणारे आहे. महाविद्यालयात शिक्षण घेणारी तरुण मुले-मुली प्रेमाच्या रेशमी

कोषात समाधान शोधण्याचा प्रयत्न करतात परंतु अखेर निराशेच्या टोकावर येऊन पोहोचतात असे त्याचे कथानक होते. तरुण पिढीमध्ये होणारे मानसिक बदल आणि त्याचा परिणाम यांवर हे नाटक प्रकाश टाकते. असा विषय तोवरच्या कोणत्याच नाटकांनी हाताळला नव्हता. तरुण पिढीचे प्रतिबिंब असल्याने कदाचित तरुण प्रेक्षकवर्ग मिळाला असेल. परंतु रेडिओ स्टार्स बंद पडल्यानंतरही बरीच वर्षे या नाटकाचे प्रयोग होत होते.

रेडिओ स्टार्स या संस्थेने स्वतःची नाट्यकलेविषयीची भूमिका वगैरे जाहीर केली नव्हती. परंतु संस्थेने मंचित केलेल्या नाटकांवरून संस्थेकडे स्वतःची दृष्टी होती, हे स्पष्ट होते. रेडिओ स्टार्सला आधुनिक नाटक सादर करायचे होते. त्यामुळेच बेंडे यांच्या नाटकांशिवाय प्रबोधनकार ठाकरे यांचे सामाजिकदृष्ट्या विद्रोही आशय असलेले 'खरा ब्राह्मण' हे नाटक त्यांनी रंगभूमीवर आणले. याशिवाय मामा वरेरकरांचे 'नामानिराळे' आणि य. ना. टिपणीस यांचे 'स्वस्तिक बँक' ही आधुनिक धाटणीची नाटके रेडिओ स्टार्सने मराठी प्रेक्षकांसमोर सादर केली. ही संस्था देखील १९३६च्या सुमारास बंद पडली.

नाट्यमन्वंतर आणि रेडिओ स्टार्स या दोन्ही नाट्यसंस्था अल्पजीवी ठरल्या तरी मराठी नाटकांना नवा आशय, नवी जीवनदृष्टी आणि सादरीकरणाचे वास्तवदर्शी असे नवे तंत्र देण्याचा त्यांचा उद्देश मात्र सफल झाला. कारण १९४०च्या दशकापासून एकीकडे नाटक कंपन्यांची पौराणिक-ऐतिहासिक-अद्भुतरम्य कल्पनाप्रधान नाटके प्रतिसादाअभावी बंद पडत असताना, अशा नव्या वाटा चोखाळणारी नाटके लिहिणारे नाटककार आणि नाट्यनिर्माते मात्र तयार होत राहिले. त्यांनीच मराठी रंगभूमी या काळात जिवंत ठेवली आणि नाट्यरसिकांवर आधुनिक मूल्यदृष्टीचे संस्कार करून नवी नाट्याभिरुची घडवण्यास हातभार लावला.

**नाटककार अत्रे**

१९३३मध्ये एकीकडे नाट्यमन्वंतरसारखी नाट्यसंस्था जाणीवपूर्वक नवे काही देण्याचा प्रयत्न करत असताना दुसरीकडे प्र. के. अत्रे यांचे पहिले नाटक 'साष्टांग नमस्कार' हे दामुअण्णा जोशी यांच्या बालमोहन संगीत मंडळीतर्फे मे १९३३मध्ये पुण्याला रंगभूमीवर आले. गडकरी, माधवराव जोशी यांच्या परंपरेतला परंतु संपूर्ण नाटकभर पसरलेला विनोद आणि समकालीन वास्तवाचे उपहासपूर्ण दर्शन – यांमुळे या नाटकात ताजेपणा आला होता. प्रेक्षकांनी हे नाटक डोक्यावर घेतले. 'साष्टांग नमस्कार'मधली विडंबनगीतेही अतिशय लोकप्रिय झाली.

अत्र्यांनी नाटकांतल्या संवादांत बोलीभाषेचा सहजपणा आणला. वास्तवदर्शनाच्या दृष्टीने हे उपयुक्त ठरले. १९३४मध्ये आलेल्या त्यांच्या 'घराबाहेर' या नाटकाच्या रंगसूचनेत "काळ - हल्लीचा" आणि "स्थळ – महाराष्ट्रातले एखादे शहर" असे लिहिले

आहे. वास्तवदर्शनासाठी आवश्यक असणारी स्थलकालबद्धता या नाटकात स्पष्टपणे आली. 'घराबाहेर'ची नायिका निर्मला घर सोडून जाण्याचा निर्णय घेते, पण अखेरीस घर सांभाळण्यासाठी परत येते. हा सामाजिकदृष्ट्या माफक बंडखोर आशय प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला. अनंत गद्रे यांनी आपल्या 'निर्भिड' या पत्राचा विशेषांक या नाटकावर काढला. इंग्रजी, गुजराती, हिंदी, कन्नड या भाषांत 'घराबाहेर'ची भाषांतरे झाली. या नाटकाचा प्रयोग आकाशवाणीवरूनही प्रसारित झाला (वि. भा. देशपांडे २००८ : ७१). स्त्रीपात्राला केंद्रस्थानी ठेवून तत्कालीन समाजातील स्त्रियांच्या स्थितीविषयी आणखी दोन नाटके अत्र्यांनी पुढील काळात लिहिली : 'उद्याचा संसार' आणि 'जग काय म्हणेल'. या तीनही नाटकांतून त्यांनी भारतीय कुटुंबव्यवस्था आणि विवाहसंस्था यांच्याबद्दल काही प्रश्न उपस्थित केले. १९४६ सालच्या 'जग काय म्हणेल' या नाटकाच्या नायिकेने पतीविरुद्ध बंड केले. त्यांच्या नाटकांमधल्या व्यवस्थेविरुद्ध बंड करणाऱ्या या नायिका तत्कालीन प्रेक्षकांना भावल्या. मराठी समाजाची जीवनदृष्टी कशी बदलत होती, याचेच हे निदर्शक होते.

एकीकडे अत्रे सामाजिक आशय व्यक्त करणारी नाटके लिहीत असताना विनोदी नाटकांतूनही सामाजिक-सांस्कृतिक स्थितीवर भाष्य करत होते. 'लग्नाची बेडी' आणि 'मी उभा आहे' ही बालमोहन संस्थेने रंगभूमीवर आणलेली अत्र्यांची नाटकेही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली. त्यामुळे १९४५-४६पर्यंत मराठी रंगभूमीच्या पडत्या काळात एकटे प्र. के. अत्रे हेच एकमेव यशस्वी नाटककार ठरले.

### मो. ग. रांगणेकर आणि त्यांची 'नाट्यनिकेतन'

अत्र्यांची नाटके रंगभूमीवर गाजत असताना वि. वा. शिरवाडकरांसारख्या नाटककाराचेही आगमन झाले. त्यांचे १९४७मध्ये आलेले 'दुसरा पेशवा' हे नाटक ऐतिहासिक असले, तरी पहिला बाजीराव आणि मस्तानी यांच्या कथेद्वारे हिंदु-मुस्लिम प्रश्नासारख्या संवेदनशील विषयावर त्यात भाष्य केलेले होते.

पण या काळातले कर्तबगार नाट्यकर्मी म्हणजे मो. ग. रांगणेकर. त्यांनी पन्नासच्या दशकात नाटककार म्हणून आणि नाट्यनिकेतन संस्थेतर्फे नाट्यनिर्माता म्हणून मराठी रंगभूमी गाजवली. रांगणेकर पत्रकार, संपादक म्हणून परिचित होते. परंतु पडझडीच्या काळातला नाटक कंपन्यांचा व्यवसाय त्यांनी जवळून पाहिला होता. या कंपन्यांविषयीचे त्यांचे मत वर दिलेच आहे. नाटक कंपनीचे 'बिऱ्हाड' न उभारता त्या त्या नाटकासाठी कलाकारांशी करार करून त्यांना आपल्याशी बांधून घ्यावे आणि "बोलपटांशी त्यांच्याच तंत्रानं टक्कर देण्यासाठी अडीच-तीन तासांची उत्तम उत्तम नाटकं तयार करून सिनेमाप्रमाणे ती एखाद्या थिएटरात तीन, सहा व नऊ वाजता रोज लावावीत," असा विचार त्यांच्या मनात खेळत होता (रांगणेकर १९९२ : १२३). १९४१मध्ये त्यांनी

आपल्या मनातली कल्पना प्रत्यक्षात उतरवली. या वर्षी दसऱ्याच्या मुहुर्तावर त्यांनी नाट्यनिकेतन नावाची नवी व्यावसायिक नाटक मंडळी स्थापन केली. ३० नोव्हेंबर १९४१ रोजी मुंबईच्या रॉयल ऑपेरा हाऊस येथे नाट्यनिकेतनतर्फे पहिले नाटक 'आशीर्वाद' हे रंगभूमीवर आले. स्वतः मो. ग. रांगणेकर यांनीच हे नाटक लिहिले होते. कुटुंबव्यवस्था आणि मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न हे या तीन अंकी नाटकाचे आशयसूत्र होते. नेपथ्यरचना, अभिनय आणि संवादभाषा या तीनही बाबी वास्तववादी तंत्राने मांडलेल्या होत्या. नाटक आटोपशीर आणि परिणामकारक होते. या पहिल्याच नाटकाने नाटककार म्हणून आणि नाट्यनिर्माता म्हणून रांगणेकरांनी आपले स्थान निर्माण केले.

रांगणेकर आपल्या कलाकारांशी तीन महिन्यांचा करार करत. दर तीन महिन्यांनी नवे नाटक रंगभूमीवर आणायचे असे त्यांनी ठरवले होते. त्यानुसार तीन महिन्यांत पंचवीस प्रयोग झाल्यानंतर 'आशीर्वाद'चे प्रयोग थांबवण्यात आले. त्यानंतर रांगणेकरांनी लिहिलेले दुसरे नाटक 'कुलवधू' हे २२ ऑगस्ट १९४२ रोजी रंगभूमीवर आले. या नाटकाने मात्र पन्नासच्या दशकात मराठी रंगभूमीवर इतिहास निर्माण केला. रांगणेकरांची ही दोन्ही नाटके आशयदृष्ट्या किंवा सादरीकरणाच्या दृष्टीने श्रेष्ठ नव्हती. परंतु त्यांत एक प्रकारचा चटपटीतपणा, ताजेपणा होता. तो त्या काळातल्या पारंपरिक नाटकांना कंटाळलेल्या प्रेक्षकांना भावला असावा. 'कुलवधू'मधील ज्योत्स्ना भोळे यांचे भावगीत गायन आणि अभिनय हे देखील लोकप्रियतेचे एक प्रमुख कारण होते. किंबहुना नाट्यनिकेतनच्या पुढील सर्वच नाटकांत ज्योत्स्ना भोळे यांचे अभिनयनैपुण्य आणि गायकी प्रभावशाली ठरली.

या दोन नाटकांनंतर पुढे १९५०पर्यंत रांगणेकरांनी लिहिलेली 'नंदनवन' (१९४२), 'अलंकार' (१९४४), 'माझे घर' (१९४५), 'वहिनी' (१९४५), 'एक होता म्हातारा' (१९४८) आणि 'कोणे एके काळी' (१९५०) अशी एकापाठोपाठ एक कौटुंबिक कथानकांवर आधारित नाटके नाट्यनिकेतनने रंगभूमीवर आणली. पैकी 'माझे घर', 'वहिनी', 'एक होता म्हातारा' ही नाटके विशेष लोकप्रिय झाली. पु. ल. देशपांडे हे 'वहिनी' या नाटकातून सर्वप्रथम पुढे आले.

चाळीसच्या दशकात मराठी रंगभूमीपासून दुरावलेला प्रेक्षक पन्नासच्या दशकात पुन्हा रंगभूमीकडे वळला तो नाट्यनिकेतनच्या नाटकांमुळे असे म्हणावे लागेल.

### साहित्य संघाची नाट्यचळवळ

पन्नासच्या दशकात नाट्यनिकेतनने मराठी रंगभूमीला व्यावसायिक यश मिळवून दिले; तर महाराष्ट्रातल्या विविध भागांत लहान-मोठ्या शहरांत नाट्यरसिक आणि नाट्यकर्मी यांच्यात चैतन्य निर्माण करण्याचे कार्य मुंबई मराठी साहित्य संघाच्या नाट्यशाखेने केले. १९५०नंतर महाराष्ट्रभर हौशी नाट्यसंस्था, स्पर्धा सुरू होऊन

मराठी रंगभूमीचा मराठी समाजात खऱ्या अर्थाने विस्तार झाला, त्याचा प्रारंभ साहित्य संघाच्या नाट्यचळवळीद्वारे झाला.

मुंबई मराठी साहित्य संघ ही मुळात साहित्यक्षेत्रात कार्य करण्याच्या उद्देशाने १९३५मध्ये स्थापन झालेली संस्था होती. डॉ. अ. ना. भालेराव यांच्या नेतृत्वाखाली साहित्य संघाने विविध उपक्रम सुरू केले, त्यात संघाच्या नाट्यशाखेचाही समावेश होता.

विष्णुदास भावे यांच्यापासून प्रारंभ झालेल्या मराठी रंगभूमीला १९४३मध्ये शंभर वर्षे पूर्ण होत होती. त्यानिमित्त भावे यांच्या मूळ कर्मभूमीत, म्हणजे सांगली येथे मराठी रंगभूमीचा शतसांवत्सरिक महोत्सव भरवावा अशी कल्पना निघाली आणि अतिशय भव्य प्रमाणात अविस्मरणीय असा हा महोत्सव साजरा झाला. या महोत्सवात अ. ना. भालेराव यांच्या नेतृत्वाखाली साहित्य संघाचे योगदान मोठे होते. मराठी रंगभूमीचा गेल्या एक-दोन दशकांपासून पडता काळ सुरू असताना भरलेल्या या नाट्यमहोत्सवाने काही प्रमाणात जुन्या वैभवशाली स्मृतींना उजाळा मिळाला आणि पुन्हा एकदा मराठी रंगभूमीला उर्जितावस्था येईल असे आशादायक वातावरणही निर्माण झाले.

सांगलीच्या उत्सवापासून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रातल्या अनेक शहरांमध्ये शतसांवत्सरिक महोत्सव साजरे झाले. मात्र यात खऱ्या अर्थाने ऐतिहासिक ठरला तो एप्रिल १९४४मध्ये मुंबई मराठी साहित्य संघाने मुंबई येथे भरवलेला शतसांवत्सरिक नाट्यमहोत्सव. या महोत्सवात एकंदर ४१ संस्था सहभागी झाल्या होत्या. हौशी नाट्यसंस्थांसाठी महोत्सवात आयोजित केलेल्या स्पर्धेत १३ संस्थांनी नाटके सादर केली. महोत्सवासाठी 'संगीत शारदा', 'संगीत सौभद्र', 'संगीत स्वयंवर', 'सत्तेचे गुलाम', 'भाऊबंदकी' अशा जुन्या नाटकांसोबतच 'सारस्वत', 'जन्माचे सोबती' अशा नव्या नाटकांची निर्मितीही संघाने केली. 'शकुन्तला स्वप्न' हा ऑपेरा, प्रफुल्ल पिक्चर्स या कोल्हापूरच्या संस्थेने सादर केलेला चित्रपट व नाटक या कलांवरील संमिश्र कार्यक्रम – अशी काही वेगळी सादरीकरणेही झाली. याला जोडून 'रंगभूमीच्या पुनरुज्जीवनाची नवी दिशा' या विषयावर चर्चासत्र झाले. त्यात श्री. वि. वर्तक, वा. ल. कुलकर्णी, गो. के. भट, पार्श्वनाथ आळतेकर इत्यादींनी आपले विचार मांडले. हा महोत्सव पंधरा दिवस सुरू होता आणि त्याचे अध्यक्षपद बालगंधर्वांना देण्यात आले होते. स्वागताध्यक्ष प्र. के. अत्रे होते, तर उद्घाटक काकासाहेब खाडिलकर होते.

या महोत्सवासाठी गिरगाव चौपाटीजवळच्या मैदानात एक भव्य खुले नाट्यगृह साहित्य संघाने उभे केले होते. या नाट्यगृहात आठ हजार प्रेक्षक बसू शकत होते. इतक्या मोठ्या संख्येने आलेल्या प्रेक्षकांपर्यंत नाटकाचा ध्वनी व्यवस्थित पोचावा यासाठी झाकलेल्या ध्वनिक्षेपकांची योजना करण्यात आली होती. या महोत्सवाबद्दलची एक आठवण अशी की, पृथ्वीराज कपूर हा सोहळा पाहायला आले होते आणि भारावून गेले

होते. इतकेच नव्हे, तर महोत्सव संपल्यानंतर त्यांच्या पृथ्वी थिएटर्सचे 'दीवार' हे नाटक सादर करण्यासाठी हा रंगमंच उपलब्ध करून द्यावा अशी विनंती त्यांनी केली आणि भालेरावांनी ती मान्य केली (अंधृटकर १९८५ : १६).

या महोत्सवामुळे मराठी नाट्यक्षेत्रात चैतन्य निर्माण झाले. या क्षेत्रात साहित्य संघ नवे काहीतरी करावे अशी अपेक्षा व्यक्त होऊ लागली. त्यामुळे साहित्य संघाने दरवर्षी मराठी नाट्यमहोत्सव भरवण्यास सुरुवात केली. त्याचबरोबर नव्या-जुन्या नाटकांची निर्मितीही सुरू केली. डॉ. भालेराव यांनी साहित्य संघ आणि त्याचे नाट्यविषयक उपक्रम घडवून आणण्याच्या निमित्ताने शेकडो कार्यकर्त्यांची एक फळीच उभी केली होती. साहित्य आणि नाट्यक्षेत्रातल्या जुन्या-नव्या मान्यवर व्यक्तिमत्त्वांपासून तर नवोदित लेखक-कलाकारांपर्यंत अनेकांचा त्यामध्ये समावेश होता. १९४४ ते ५५ या अकरा वर्षांच्या काळात साहित्य संघाने एकूण ९० नाटके रंगमंचावर आणली. १९४९मध्ये संघाची स्वतंत्र नाट्यशाखा सुरू झाली. अशा रीतीने प्रस्तुत कालखंडाच्या अखेरीस संगीत नाटकांचे युग संपले.

## ९.७ इतिकथन

१९०१ ते १९५० या कालखंडात संगीत रंगभूमीची भरभराट झाली. किर्लोस्कर संगीत मंडळी, गंधर्व नाटक मंडळी, ललित कलादर्श इ. नाटक मंडळ्यांनी महाराष्ट्राची नाट्याभिरुची घडविली. नाटकाबरोबरच संगीताचा कान तयार करण्याचे कामही या नाट्यप्रयोगांनी साध्य झाले. नाट्यमन्वंतर सारख्या संस्थेने नाटकाच्या आशयाची पुनर्घटना साधण्याचे काम केले आहे. किर्लोस्कर, देवल, कोल्हटकर, खाडिलकर, गडकरी, वरेरकर, अत्रे, रांगणेकर यांनी मराठी नाट्यसृष्टी समृद्ध केली. मराठीत नव्या नाट्यप्रवाहांची पायाभरणी झाली. बोलपटांचे युग सुरू झाल्यानंतर हळूहळू संगीत नाटकांची लोकप्रियता ओसरत गेली. परंतु अखेरच्या पंधरा-वीस वर्षांत नाट्यमन्वंतर, रेडिओ स्टार्स, नाट्यनिकेतन यांसारख्या व्यावसायिक नाट्यसंस्थांनी रंगभूमीला दिलेल्या नव्या स्वरूपामुळे आणि साहित्य संघासारख्या संस्थांच्या उपक्रमांमधून सुरू झालेल्या नाट्यचळवळींमुळे मराठी नाटकांना पुन्हा एकदा उर्जितावस्था प्राप्त झाली. समकालीन समाज आणि संस्कृती यांचा परामर्श घेणाऱ्या वास्तववादी नाटकांचे नवे युग १९५०नंतर मराठी रंगभूमीवर अवतरले.

❑❑❑

# १०

# संगीतविश्वातील स्थित्यंतरे

## १०.१. पूर्वकथन :

संगीतज्ज्ञ अशोक रानडे यांनी भारतीय संगीताच्या पाच प्रमुख कोटी दिल्या आहेत : आदिम संगीत, लोकसंगीत, भक्तिसंगीत, कला-संगीत आणि जनसंगीत.

महाराष्ट्रापुरता या संगीत-कोटींचा आलेख पुढीलप्रमाणे काढता येईल. भारतातील प्राचीन काळापासून राहात आलेल्या आदिवासी समुहांचे ते आदिम संगीत; महाराष्ट्रात वारली, गोंड, भिल्ल यांच्या संगीतपरंपरांचा समावेश आदिम संगीतात होईल. त्याशिवाय धनगर, कोळी इत्यादी जातिसमुहांच्या संगीताचा समावेश लोकसंगीतात होईल. महाराष्ट्रात परंपरेने चालत आलेल्या लावणीसारख्या संगीत-परंपरेलाही लोकसंगीत म्हणता येईल. लावणी-संगीताचा आविष्कार तमाशाच्या फडांवर होत होता. पेशवाईनंतर एकोणिसाव्या शतकात अशा तमाशा फडांतून लावणी सादर केली गेली. विसाव्या शतकाच्या प्रथमार्धातही लावणीची ही परंपरा जिवंत होती. संतकाळापासून सुरू झालेल्या कीर्तनांनी भक्तिसंगीताची धारा महाराष्ट्रात जिवंत ठेवली. एकोणिसाव्या-विसाव्या शतकात नारदीय कीर्तनांच्या माध्यमातून या भक्तिसंगीताचा आस्वाद खेड्यापाड्यातील लोक घेत होते.

चौथी संगीत धारा कला-संगीत किंवा शास्त्रोक्त संगीताची. प्रामुख्याने दरबारी गायनाद्वारे ही परंपरा टिकून होती. पेशवाईच्या काळात राजे-सरदारांच्या दरबारी धृपद गायक किंवा क्वचित कर्नाटकी संगीताचे गायक असत. एकोणिसाव्या शतकात उत्तर भारतीय संगीताशी महाराष्ट्राचा संपर्क आला आणि टप्पा, ख्याल हे गायनप्रकार येथील समाजाला परिचित झाले. यापैकी टप्पा गायकी थोडी लोकसंगीताकडे झुकलेली होती; मात्र ख्याल गायकीच्या रूपाने कला-संगीत किंवा शास्त्रोक्त संगीताची धारा महाराष्ट्रात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात रुजली आणि विसाव्या शतकात तिचा विस्तार आणि खोली अधिक वाढली. मराठीत संगीत नाटके विष्णुदास भाव्यांपासून सादर होत

होती. या नाटकांतील संगीताच्या अंगाचा अधिक सशक्त असा आविष्कार १८८०पासून होऊ लागला. प्रारंभी मराठी नाट्यसंगीत लावणी, टप्पा, ठुमरी अशा लोकसंगीताच्या आविष्काराने प्रभावित होते; पण लवकरच, म्हणजे विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून ख्यालगायकीचे शिक्षण घेतलेले गवई संगीत नाटकांना संगीत देऊ लागले किंवा स्वतः गायक-नट बनले. त्यांच्या माध्यमातून कला-संगीताचा प्रभाव मराठी रंगभूमीवर पडला आणि या रंगभूमीचा प्रेक्षक जो महाराष्ट्रीय मध्यमवर्ग, त्यात कला-संगीताची लोकप्रियता प्रचंड वाढली. पुढे १९३०नंतर बोलपटांचा काळ सुरू झाला, तेव्हा प्रारंभीच्या काळात बोलपटांना संगीत देणारे कलावंतही याच शास्त्रीय संगीत परंपरेतले होते. त्यामुळे कला-संगीताने नाट्यसंगीतापाठोपाठ चित्रपट-संगीतालाही प्रभावित केले. कला संगीताची ही धारा लोकसंगीत किंवा आदिम संगीत यांच्यापासून पूर्णपणे स्वतंत्र होती असे म्हणता येणार नाही. अशोक रानडे म्हणतात की, एकाच भारतीय संगीत-परंपरेचे हे विविध प्रवाह असल्यामुळे काळाच्या ओघात या प्रवाहांचा परस्परांवर प्रभाव पडला आहे, त्यांच्या गुणवैशिष्ट्यांची सरमिसळही झाली आहे (रानडे २०१४ : १५).

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातल्या महाराष्ट्रीय संगीताच्या इतिहासातील स्थित्यंतरे ही अशा परस्परप्रभावप्रक्रियेतून झाली आहेत आणि त्यांच्या केंद्रस्थानी शास्त्रोक्त-संगीताची म्हणजे कलासंगीताची धारा आहे. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात उत्तर भारतातून आलेल्या गवयांनी आणि एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपासून संगीताचा गांभीर्याने विचार करणाऱ्या महाराष्ट्रीय गवयांनी पारंपरिक भारताच्या विविध प्रांतातील लोकसंगीत, भक्तिसंगीत यांच्यातून उसनवारी करून कलासंगीताची परंपरा समृद्ध केली. ख्यालगायकी हे कला-संगीताचे या काळातले प्रमुख आविष्काररूप असले तरी टप्पा, ठुमरी, लावणी, कव्वाली, गझल या आविष्कारप्रकारांनाही या प्रवाहातील मोठ्या कलावंतांनी स्थान दिले. तसेच या कालखंडात, महाराष्ट्रात पूर्वीपासून चालत आलेल्या संगीत नाटकांवर आणि नव्याने उदयाला आलेल्या चित्रपटांतील संगीतावर कला-संगीतातील कलावंतांनी प्रभाव टाकला. नाट्यसंगीत, चित्रपटसंगीत ते आजच्या काळातले जाहिरातींचे व इतर मनोरंजनमाध्यमातील संगीत - या आधुनिक मनोरंजनपर सांगितिक आविष्काररूपांना अशोक रानडे यांनी 'जनसंगीत' असे म्हटले आहे आणि भारतीय संगीतपरंपरेतील पाचवा प्रवाह म्हणून त्याला स्थान दिले आहे. पारंपरिक लोकसंगीताच्या आविष्काराहून या जनसंगीताचा प्रवाह वेगळा आहे, असे त्यामागे गृहितक आहे. हे विसाव्या शतकात घडले. हा इतिहास डोळसपणे पाहिल्यास या काळात महाराष्ट्राच्या व एकंदर भारताच्या संगीतक्षेत्रात कला-संगीताची धारा मध्यवर्ती बनली असे दिसून येते.

महाराष्ट्रीय समाजाचा उत्तर भारतीय संगीताशी (म्हणजेच हिंदुस्थानी संगीताशी)

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात घडून आलेला संपर्क हे ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे घटित होते. याच काळात मुंबई शहर इंग्रजांमुळे पाश्चात्य संस्कृतीच्या संपर्काचे केंद्र बनले होते. पाश्चात्य संस्कृतीतील अनेक पैलूंसोबत पाश्चात्य संगीताचाही परिचय एतद्देशीय समाजाला होऊ लागला. विशेषतः मुंबईतल्या पारशी समाजामध्ये पाश्चात्य संगीत अधिक लोकप्रिय होते. पाश्चात्य संगीताची ओळख झाल्यामुळे आपल्या संगीताचे शास्त्र रचण्याची प्रेरणा इथल्या संगीत-कलावंतांना झाली. त्यासाठी नवनवे प्रयोग होऊ लागले.

इंग्रज राजवटीत पाश्चात्य देशातील आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रवेश भारतीय समाजात अधिक वेगाने होऊ लागला. या तंत्रज्ञानामुळे संगीतक्षेत्रात मोठे बदल घडून आले. ध्वनिमुद्रिकांचा जन्म ही त्यातली ठळक घटना. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस संगीत ऐकण्याचे यंत्र फोनोग्राम भारतात आले आणि त्यावर वाजवल्या जाणाऱ्या दंडगोलाकृती ध्वनिमुद्रिका (सिलिंडर्स) तयार झाल्या. पुढे या सिलिंडर्सची जागा गोलाकार चकत्या किंवा तबकड्यांनी घेतली. फोनोग्राममध्ये सुधारणा होऊन ग्रामोफोन तयार झाले. यावर वाजवल्या जाणाऱ्या रेकॉर्ड्‌समुळे गायकाच्या अनुपस्थितीतही त्याचे गाणे ऐकण्याची सुविधा प्रथमच निर्माण झाली. यामुळे गायकांचा आवाज घराघरात पोहोचला. संगीताची लोकप्रियता त्यामुळे अधिक वाढली.

एकेकाळी लोकसंगीत सार्वजनिक ठिकाणी जमलेल्या बहुजनांमध्ये आणि कला-संगीत राजदरबारी ऐकू येई. उत्तर भारतात असलेल्या लहानमोठ्या संस्थानिकांच्या आश्रयाला हिंदुस्थानी संगीत गायक असत. महाराष्ट्रातही ही प्रथा होती. पेशव्यांच्या दरबारात धृपदगायक होते. एकोणिसाव्या शतकात उत्तरेकडील ख्यालगायक उपजीविकेच्या शोधात महाराष्ट्राच्या दिशेने आले. त्यांना आश्रय देणाऱ्यांमध्ये महाराष्ट्रातल्या संस्थानिकांचा जेवढा वाटा होता, तेवढाच मुंबईच्या धनिकांचाही होता. उद्योग-व्यापारात भरभराटीला आलेले हे आधुनिक शहर संगीताचे आश्रयदाते शहर बनले. उत्तरेतील अनेक गायकांनी मुंबईच्या धनिकांचा आश्रय घेतला. अशा रीतीने हिंदुस्थानी संगीत महाराष्ट्रात रुजले. पुढे संगीताचे आधुनिक पद्धतीने शिक्षण देण्यासाठी संस्थात्मक उभारणीही महाराष्ट्रीय गायक विष्णुबुवा पलूस्कर यांनी केली. नाट्यसंगीत आणि चित्रपट-संगीत यांच्या रूपाने हे संगीत महाराष्ट्राच्या जनजीवनात खोलवर झिरपले. ही सर्व स्थित्यंतरे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात घडून आली. म्हणूनच हा कालखंड महाराष्ट्राच्या संगीत-इतिहासातील महत्त्वाचा कालखंड आहे.

## १०.२ महाराष्ट्रावरचे संगीत संस्कार

### हिंदुस्थानी संगीत

एकोणिसाव्या शतकात एकाच कालखंडात आणि महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील

काही तरुणांना संगीत-शिक्षणाची आस लागली आणि उत्तर भारतातील गवयांना महाराष्ट्रात येऊन उपजीविका शोधण्याची प्रेरणा झाली. हिंदुस्थानी संगीताचा महाराष्ट्रावर संस्कार होण्याची प्रक्रिया यातून सुरू झाली.

मध्ययुगीन काळात तेराव्या शतकापासून महाराष्ट्रासह उत्तर भारतात धृपद गायन प्रचलित होते. पुढे या गायनाविरुद्ध बंड करत ख्याल गायकी रूढ झाली. लखनौचा नबाब असफउद्दौला (१७७६-१७९७) याच्या पदरी असलेले गुलाम रसूलखाँ हे ख्याल गायकीत पारंगत होते. त्यांचा मुलगा गुलाम नबी उर्फ शौरीमियां याने उंटावरून प्रवास करताना पंजाबी लोक जी गाणी म्हणत, त्यांनी प्रभावित होऊन त्यावरूनच शौरीमियांनी टप्पा हा नवा गायनाविष्कार घडवला (केशवराव भोळे १९६२ : २१).

पुढे एकोणिसाव्या शतकात ग्वाल्हेर हे संगीतकलेचे प्रमुख केंद्र बनले. हद्दूखाँ, हस्सूखाँ, नथ्थेखाँ हे तिथले या काळातले प्रसिद्ध गवयी. या काळात ख्यालासोबत लखनौहून टप्पा गायकीसुद्धा ग्वाल्हेरला पोहोचली होती. या काळात भारतभरातले संगीत शिकू इच्छिणारे कलावंत ग्वाल्हेरला येत. महाराष्ट्रातल्याही काही तरुणांनी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ग्वाल्हेरची वाट धरली. त्यात अलिबागजवळच्या नागावचे वासुदेवराव जोशी, पुण्याचे रामकृष्ण परांजपे ही इतिहासात नोंदली गेलेली ठळक नावे. हे दोन्ही कलावंत संगीतशिक्षणानंतर तिकडेच स्थायिक झाले. पुढच्या पिढीत बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, विष्णुपंत छत्रे, रावजीबुवा गोगटे हे तरुण मध्यप्रांतात संगीत शिक्षणाच्या इच्छेने महाराष्ट्रातून गेले. त्यापैकी बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर हे धार येथे देवजीबुवांकडे तीन वर्षे टप्पा गायन शिकले आणि त्यानंतर ग्वाल्हेरला जोशीबुवांकडे जाऊन ख्याल शिकले. त्यानंतर ते महाराष्ट्रात परतले. १८७५ ते १८९५ या काळात बाळकृष्णबुवांनी सांगली, मीरज, इचलकरंजी, कुरुंदवाड, कोल्हापूर, बेळगाव या परिसरात अनेकांना ग्वाल्हेर घराण्याची ख्याल गायकी शिकवली. बाळकृष्णबुवांच्या नंतरच्या पिढ्यांमध्ये भास्करबुवा बखले, रामचंद्रबुवा वझे हे गायक ग्वाल्हेरला जाऊन हिंदुस्थानी संगीत शिकून आले. या सर्व गायकांमुळे हिंदुस्थानी संगीतातील ख्याल गायन महाराष्ट्रात रुजले आणि पुढे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ते अधिक बहरले.

एकीकडे महाराष्ट्रातले गायक उत्तर भारतात जाऊन हिंदुस्थानी संगीताचे संस्कार करवून घेत असताना, उत्तर भारतातले गायक उपजीविकेच्या शोधात महाराष्ट्रात आले. जयपूर घराण्याचे अल्लादियां खाँ मुंबईत १८९३-९४च्या सुमारास आले आणि तेथून शाहू महाराजांच्या निमंत्रणावरून कोल्हापूर संस्थानात १८९६मध्ये दाखल झाले. रजबअली खाँ, हैदरबक्ष यांनीही कोल्हापूर संस्थानात आश्रय घेतला होता. याच काळात इंदोरचे प्रसिद्ध बीनकार बंदेअली खाँ मुंबई-पुणे परिसरात वास्तव्याला होते. १८९६-९७दरम्यान त्यांचे पुणे येथे निधन झाले. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांप्रमाणेच

ग्वाल्हेरास जाऊन वासुदेवराव जोशीबुवांकडे ख्याल गायकीचे शिक्षण घेतलेले सर्कसवाले विष्णुपंत छत्रे यांना महाराष्ट्रात संगीत क्षेत्रात नाव मिळवता आले नाही. परंतु ग्वाल्हेरचे महान गायक हद्दूखाँ यांचा मुलगा भूगंधर्व रहिमत खाँ यांना त्यांनी आयुष्यभरासाठी आश्रय दिला. १८९२पासून छत्र्यांच्या सर्कसबरोबर रहिमत खाँ महाराष्ट्रात गावोगाव फिरले आणि त्यांचे गायनही महाराष्ट्रात सर्वदूर पसरले. आग्रा घराण्याचे नत्थन खाँ हे म्हैसूर संस्थानात आश्रयाला होते. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत महाराष्ट्रातल्या काही गायकांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले होते. सन १८९३-९४दरम्यान अल्लादियां खाँ मुंबईत दाखल झाले तेव्हा या नत्थन खाँ यांची शिष्या बाबलीबाई मुंबईतली फार प्रसिद्ध गायिका होती. याच काळात महाराष्ट्रात दाखल झालेले आणखी एक महत्त्वाचे उत्तर भारतीय गायक म्हणजे किराणा घराण्याचे अब्दुल करीम खाँ. १८९८च्या सुमारास ते बडोद्याहून मुंबईला आले तेव्हा किर्लोस्कर नाटक मंडळीचा मुक्काम मुंबईत होता. भाऊराव कोल्हटकरांशी अब्दुल करीम खाँ यांची भेट झाल्यावर त्यांनी प्रथम किर्लोस्कर मंडळीतच गाणे सादर केले (बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी १९७२ : ३३०). नंतर अब्दुल करीम खाँ मीरजेला जाऊन राहू लागले. त्यांची सगळी कारकीर्द महाराष्ट्रात मीरज, पुणे आणि मुंबई इथे गेली. उत्तर भारतातून आलेल्या अल्लादियां खाँ, नत्थन खाँ आणि अब्दुल करीम खाँ या तीन मोठ्या गायकांची शिष्यपरंपरा महाराष्ट्रात तयार झाली. त्यांच्या माध्यमातून अनुक्रमे जयपूर घराणे, आग्रा घराणे आणि किराणा घराणे या हिंदुस्थानी संगीतातील तीन मातब्बर घराण्यांची गायकी महाराष्ट्रात समृद्ध झाली. तर बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, त्यांचे शिष्य विष्णु दिगंबर पलुस्कर आणि गोविंदबुवा वझे यांनी ग्वाल्हेर घराण्याची गायकी महाराष्ट्रातील पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवली. या परंपरा प्रामुख्याने ख्यालगायकीच्या होत्या. पुढील काळात मराठी नाट्यसंगीत आणि चित्रपट संगीतावर याच ख्यालगायकीचा प्रभाव पडला.

पण उत्तर भारतातील या ख्याल संगीताच्या आधी हिंदुस्थानी संगीतातील टप्पा गायनाचा प्रवेशही महाराष्ट्रात झाला होता तो देवजीबुवांचे दुसरे शिष्य रावजीबुवा गोगटे यांच्या माध्यमातून. बाळकृष्णबुवांप्रमाणेच धारला देवजीबुवांकडे टप्पा गायन शिकून रावजीबुवा महाराष्ट्रात परतले आणि त्यांनी केशव आणि नारायण या आपल्या दोन्ही मुलांना हे गायन शिकवले. स्वतः रावजीबुवा इचलकरंजी संस्थानात नोकरीला राहिले, तर थोरला मुलगा केशवबुवा बावडे संस्थानच्या आश्रयाला गेला. धाकटा मुलगा नारायण हा फलटणला चुलत्यांच्या घरात दत्तक गेला. ते कीर्तनकार घराणे होते. घराण्याच्या संप्रदायानुसार कीर्तने करताना नारायणाने आपल्या टप्पा गायनाचे कीर्तनाच्या आविष्कारावर संस्कार केले. अभंग, साकी, पदे, दिंड्या तो टप्पा पद्धतीने रंगवत असे. त्याचे हे वेगळे अभंग गायन ऐकण्यास फार गर्दी जमू लागली. 'फलटणकरबुवा' म्हणून

त्याचा लौकिक साऱ्या महाराष्ट्रभर पसरला. तेव्हापासून हे गोगटे घराणे महाराष्ट्रात टप्पा गायनासाठी प्रसिद्ध झाले. महाराष्ट्राच्या पूर्वापार चालत आलेल्या हरदासी (कीर्तन) गायन परंपरेवर टप्प्याच्या रूपाने हिंदुस्थानी संगीताचे संस्कार करण्याचे श्रेय गोगटे घराण्याकडे जाते (केशवराव भोळे १९६२ : २४-२५).

पुढे या हरदासी कीर्तन परंपरेतले एक कलावंत मोरोबा वाघोलीकर हे किर्लोस्कर कंपनीत गायक-नट झाले. त्यांनी कीर्तनातले टप्प्याचे वळण नाट्यसंगीतात नेले. १८८०पासून मराठी संगीत नाटकांनी नाट्यसंगीताचा केलेला आविष्कार त्या काळात महाराष्ट्रीय समाजात अतिशय लोकप्रिय झाला होता. या लोकप्रियतेमागे किर्लोस्कर नाटक कंपनीतल्या मोरोबा वाघोलीकर, बाळकोबा नाटेकर, भाऊराव कोल्हटकर या गायक-नटांचा मोठा वाटा होता. हे गायक-नट लावणी चांगली गात. "बाळकोबा आणि अण्णा (किर्लोस्कर) हे दोघे तमाशातील तमासगीरांच्या लावण्या ऐकून येत व त्यातील एक सूर व दुसरा शब्द लक्षात घेऊन त्यावरून पदे बसवीत." (अहिताग्नि राजवाडे १९८० : ११३). मोरोबा वाघोलीकरांसारख्या हरदासी परंपरेतल्या गायकाने या लावणीवर टप्प्याचे संस्कार केले. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस पांडोबा गुरव यांच्या वाईकर संगीत मंडळीच्या नाटकांमधील पदे पूर्वापार चालत आलेल्या धृपदधमाराच्या वळणाने सादर व्हायची, तर किर्लोस्कर कंपनीच्या नाटकांतून थोडा कर्नाटकी ढंग, लावणी व टप्प्याचा ढंग, ठुमरी ढंग - असा फरक दिसून येई. हे किर्लोस्कर नाटकांचे 'प्रयोगशील', 'नवे' संगीत लोकांमध्ये अधिक प्रिय झाले. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकापर्यंत कृष्णराव गोरे, जनुभाऊ निमकर, केशवराव भोसले, नारायणराव जोगळेकर, दत्तोपंत हल्याळकर, बालगंधर्व हे टप्पा परंपरेतील गायक मराठी रंगभूमीवर संगीताचा आविष्कार प्रभावीपणे करत होते (केशवराव भोळे १९६२ : २५-२६).

लोकांमध्ये संगीत कलेचा प्रसार होण्याचे संगीत नाटक हे या काळातले प्रमुख माध्यम होते. त्यामुळे रंगभूमीवर लोकप्रिय झालेले टप्पा वळणाचे गायन महाराष्ट्रीय समाजात अधिक प्रेमाने ऐकले व शिकले जाऊ लागले. 'मानापमान' (१९११) नाटकानंतर मराठी संगीत नाट्यसंगीतावर टप्पा गायनाचा प्रभाव राहिला नाही. दरम्यान विसाव्या शतकाच्या पहिल्या-दुसऱ्या दशकापासून भास्करबुवा बखले, गोविंदबुवा वझे अशा संगीतकारांशी मराठी संगीत रंगभूमीचा संपर्क आला, अब्दुल करीम खाँ, अल्लादियां खाँ यांचे शिष्य गायक-नट म्हणून रंगभूमीवर वावरू लागले आणि ख्याल गायकीचा आविष्कार मराठी नाट्यसंगीतातून अधिक प्रमाणात होऊ लागला.

सर्वसाधारणपणे हिंदुस्थानी (उत्तर भारतीय) गायकी ही भावनाविलासी, तर कर्नाटकी (दक्षिण भारतीय) गायकी ही तर्कशुद्ध शास्त्रकठोर मानली जाते. दक्षिण महाराष्ट्रात काही प्रमाणात कर्नाटकी गायकी रूढ होती. परंतु एकोणिसाव्या शतकाच्या

उत्तरार्धापासून पुढल्या काळात उपरोक्त हिंदुस्थानी गायनपरंपरा महाराष्ट्रात दाखल झाल्यानंतर कर्नाटकी संगीताचा प्रभाव महाराष्ट्रातून जवळजवळ नाहीसा झाला. आणि महाराष्ट्रीय संगीताने पारंपरिक भजन, लावणी या गायनाविष्कारांसोबत ख्याल, ठुमरी, गझल, कव्वाली या गायनपरंपरा धारण केल्या.

**पाश्चात्य संगीत**

विसाव्या शतकाच्या प्रथमार्धात हिंदुस्थानी संगीतासोबत पाश्चात्य संगीताचाही प्रभाव महाराष्ट्रीय समाजावर पडला. मुंबई शहरात राहणाऱ्या सधन पारशी समाजात एकोणिसाव्या शतकापासूनच पाश्चात्य संगीताविषयी विशेष रुची होती. विसाव्या शतकाच्या प्रारंभी मुंबईत धनिक पारशी लोकांनी स्थापन केलेली 'बॉम्बे सिम्फनी ऑर्केस्ट्रा' नावाची संस्था होती. मि. बेहेर म्हणून एक जर्मन गृहस्थ या ऑर्केस्ट्राचे संचालक होते. या संस्थेचे जलसे एक्सेलसिअर थिएटर, कावसजी जहांगीर हॉल येथे होत असत. युरोपीय संगीतकार बीथोवेन, ब्रॉम्स, शॉपे, बाख यांच्या संगीतरचना या जलशांतून सादर केले जात. पहिल्या महायुद्धानंतर तीनचार वर्षांनी युरोपातल्या नामांकित ऑपेरा कंपन्या आणि पाश्चात्य जगातील प्रसिद्ध पियानो वादक व व्हायोलिन वादक भारतात येऊ लागले. युरोपमधून बोटीने ऑस्ट्रेलियाकडे जाताना ते वाटेत मुंबईला थांबत आणि दोनचार जलसे करून पुढे जात. एक्सेलसिअर थिएटर, रॉयल ऑपेरा हाऊस इथे असे जलसे होत (बी. आर. देवधर १९७३ : ५१-५३).

पाश्चात्त्य संगीत एतद्देशीयांना परिचित होण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे विदेशी चित्रपट. मूकपटांच्या जमान्यापासूनच भारतात संगीत हे चित्रपट-प्रदर्शनाचे एक अंग बनले होते. १९२०च्या दशकापासून देशी मूकपटांचे युग सुरू झाले. भारतातील प्रेक्षकांना पडद्यावरील पात्रांच्या मूक हालचाली-अभिनय चित्रपट शांतपणे बसून पाहणे सहन होत नसे. खोकणे, शिंकणे, शिट्ट्या वाजवणे, जागा बदलणे अशा हरप्रकारच्या हालचाली-आवाजांनी ते चित्रपटगृह भरून टाकत. तेव्हा सिनेनिर्माते आणि थिएटरमालक यांनी यावर उपाय म्हणून मूकपटाचा खेळ होत असताना त्याला पूरक असे संगीत वाजवण्यास सुरुवात केली. मुंबई, पुणे, दिल्ली, कलकत्ता, कानपूर अशा भारतातील मोठ्या शहरांमधील चित्रपटगृहांमध्ये विदेशी चित्रपटांसाठी पियानो आणि व्हायोलिन यांच्या सहाय्याने पाश्चात्त्य संगीत वाजवले जायचे. मूकपटांतील केवळ नृत्याचे संगीतच या वाद्यावर वाजवले जात असे असे नव्हे, तर पियानोवर घड्याळाच्या टोलांपासून घोड्याच्या टापांपर्यंत सगळे आवाज काढले जात. मेलडीसाठी व्हायोलिन वाजवले जाई (भास्कर चंदावरकर २०१७ : ७-८).

भारतीय संगीतप्रेमींवर या पाश्चात्त्य संगीताचा प्रभाव कसा पडत असे, याचे प्रत्यंतर केशवराव भोळे यांच्या पुढील आठवणीवरून येते : "मी कॅपिटॉल, जुने वेस्टएंड, ऑपेरा

हाऊस या चित्रपटगृहांत उच्च दर्जाचे मूकपट १९११ ते १९३० पर्यंत पाहात होतो. कॅपिटॉल व ऑपेरा हाऊस यामध्ये मोठा इंग्लीश पद्धतीचा ऑर्केस्ट्रा पडद्यासमोर बसलेला असे आणि पडद्यावरील प्रसंगांशी एकरूप होऊन विविध वाद्यमेळांनी त्यांतील भाव उठावदार करीत असे....तसाच संच वेलिंग्टन सिनेमागृहांतहि होता. 'लेडी ऑफ दी कामील', 'फाउस्ट', 'स्कॅरामूश', 'गोल्ड रश', 'सिटी लाइट्स', 'ब्ल्यू एंजल' असे नामांकित मूकपट या आर्केस्ट्रामुळे फारच उठावदार होत होते. या उचित संगीताचे माझ्या मनावर नकळत केवढे संस्कार होत होते, याचा मात्र त्या वेळी मला पत्ताहि नव्हता....ऑर्केस्ट्रामधील निरनिराळ्या वाद्यांचे नाद (tone,) त्यांच्या विशिष्ट जाति (timber) माझ्या मनावर परिणाम करीत....या सर्व श्रवणाचा उपयोग मला पुढील काळांत झाला." पुढे १९२९नंतर मूकपटांच्या जागी विदेशी बोलपटदेखील येऊ लागले. ""शोबोट', 'माय सॉनी बॉय' हे संगीतप्रधान चित्रपट मी कॅपिटॉल,एक्सेलशिअर या थिएटरांमध्ये पाहिले. पॉल रोबसनचा भरदार सामर्थ्यवान् आवाज, ऑल जॉनसनचे भावमय गायन ऐकतांना चित्रपटसंगीताचे पहिलेवहिले प्रयोगच माझ्या नजरेखालून जात होते." (केशवराव भोळे १९९६ : ४-५).

१९२०च्या दशकात 'एत्युद' (Etudes) या नावाचे एक इंग्रजी नियतकालिक महिन्यातून दोनदा भारतात येत असे. यात पाश्चात्त्य गाणी व त्यांची नोटेशन्स छापलेली असत. त्यावरून भारतीय शहरांमधले पाश्चात्त्य संगीताकडे आकर्षित झालेले लोक ते संगीत वाजवण्याचे प्रयोग करत (भास्कर चंदावरकर २०१७ : ९-१०).

पाश्चात्त्य संगीत आणि भारतीय संगीत यांचा तौलनिक विचार या काळात सुरू झाला होता. पाश्चात्त्य संगीतातील हार्मनी (विविध स्वरांचा परस्परमेळ) हे तत्त्व भारतीय संगीतात आहे किंवा नाही, हा वादविषय बराच रंगला. १९२० साली पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर यांनी मुंबईत भरवलेल्या संगीत परिषदेत हार्मनी या विषयावर वादविवाद झाला. काही भारतीय संगीतज्ज्ञांचे मत, भारतीय संगीतात देखील हार्मनी आहे, असे होते. हा वाद सुरू झाल्यानंतर टाइम्स ऑफ इंडिया वृत्तपत्राचे संगीतसमीक्षक आणि प्रसिद्ध संगीतकार जिओव्हानी स्क्रिझी यांनी एक योजना जाहीर केली. त्यांच्या मते, "हा वादग्रस्त प्रश्न सोडविण्याचा एकच मार्ग आणि तो म्हणजे, हिंदी संगीताचा चांगला अभ्यास केलेल्या एखाद्या विद्यार्थ्याला पाश्चात्त्य संगीताचे शिक्षण देणे. अशा तहेने दोन्ही संगीताचा तुलनात्मक अभ्यास केलेला विद्यार्थी अधिकृत रीत्या सांगू शकेल की, हिंदी संगीतात हार्मनी आहे किंवा नाही." (बी. आर. देवधर १९७३ : ४६). त्यासाठी स्क्रिझी यांनी विष्णू दिगंबर पलुस्कर यांच्या गांधर्व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याला एक शिष्यवृत्ती देऊ केली. ही शिष्यवृत्ती गांधर्व महाविद्यालयात संगीताचे शिक्षण घेणाऱ्या बी. आर. देवधर यांना मिळाली. त्यांनी काही काळ स्क्रिझी यांच्या देखरेखीखाली पाश्चात्त्य संगीताचे अध्ययन

केले. पलुस्करांनी धुंडीराज पलुस्कर या आपल्या शिष्याला एका इटालियन वादकाकडे व्हायोलिन शिक्षण घेण्यासाठी देखील पाठवले होते. १९२९मध्ये भरलेल्या संगीत परिषदेत पलुस्करांनी स्क्रिझी यांच्या पियानोवादनाचा कार्यक्रम ठेवला होता (अशोक रानडे २०१० : ६३).

पाश्चात्त्य संगीताच्या अशा संपर्कातून त्याचा काहीएक परिणाम भारतीय संगीतावर होत होताच. विशेषतः पाश्चात्त्य संगीतातील हार्मनी हिंदुस्थानी संगीतात आणण्याचा प्रयोग काही मंडळी करू लागली. असे करणे योग्य की अयोग्य ही चर्चा या काळात कायम होत राहिली. संगीतकार केशवराव भोळे यांनी १९३८मध्ये 'माझा मुलगा' या मराठी बोलपटातल्या 'पाहू रे किती वाट' या गाण्यात हार्मनीचा भारतीय संगीताशी मिलाफ घडवून आणण्याचा प्रयत्न केला. पुढे असे प्रयोग चित्रपटसंगीतात मोठ्या प्रमाणावर होऊ लागले. केशवराव भोळे यांनी या प्रयोगाविषयी आपले मत पुढीलप्रमाणे नोंदवले : "भावगीतें, चित्रपटांतील गाणी, सांघिक गाणी या बाबतींत हार्मनीला खूप वाव आहे. परंतु रागगायनांत मुळींच वाव नाही....हार्मनीवर विशिष्ट प्रसंगी एक बंधन आहे. ते म्हणजे साहचर्याचें (associations). भजनीं गाणी, स्त्रीगीतें, पोवाडे (ज्यांना स्थलकालाचें, भावनेचे साहचर्य आहे) या गीतांत हार्मनी रुचणार नाही." (केशवराव भोळे १९६२ : ११५).

कोणत्याही आधुनिक शास्त्राप्रमाणे हिंदुस्थानी संगीताचे शास्त्रही वस्तुनिष्ठपणे शास्त्रीय कसोटीवर उभे राहिले पाहिजे याची जाणीव संगीतक्षेत्रातील काही जाणकारांना पाश्चात्त्य संगीताच्या परिचयामुळे झाली. हिंदुस्थानी संगीताची शास्त्रीय पायावर उभारणी करण्याचे प्रयत्न या काळात सुरू झालेले दिसतात. शेकडो वर्षांची सलग परंपरा असलेले हिंदुस्थानी संगीत शिकण्याचा एकमेव मार्ग चालत आलेला होता, तो म्हणजे गुरुमुखातून ही कला हस्तगत करणे. परंतु पाश्चात्त्य संगीताचा आस्वाद घेताना, त्याचे शास्त्र समजावून घेताना, भारतीय संगीताचे देखील शास्त्र आहेच, परंतु त्याची मांडणी आजवर झालेली नसल्याने ते अशा रीतीने अभ्यासता येत नाही, ही उणीव जाणवू लागली होती. संस्कृतमधील जुन्या संगीतविषयक ग्रंथांतील ग्राम, श्रुती, जाती, मूर्छना वगैरे संकल्पनांच्या अर्थाचा उलगडा करण्याचा प्रयत्न व्हायला हवा; आणि वर्तमानात प्रत्यक्ष गायिल्या जाणाऱ्या हिंदुस्थानी रागदारीशी त्याचा अनुबंध दाखवून देता यावा अशा प्रेरणेने काही मंडळींनी कार्य सुरू केले. त्यात साताऱ्याचे डिस्ट्रिक्ट जज असलेल्या एडवर्ड चार्ल्स क्लेमंटस् (१८७५-१९३५) या युरोपियनाप्रमाणे रावबहादूर कृष्णाजी बळवंत देवल (१८४७-१९३१) यांच्यासारखे भारतीय लोकही होते.

रावबहादुर देवल आणि अब्दुल करीम खाँ यांची १९०३-०४च्या सुमारास भेट झाली तेव्हा देवलांनी इतर अनेकांप्रमाणेच त्यांना देखील आपल्या मनातल्या हिंदुस्थानी

संगीताच्या शास्त्रउभारणीबद्दलची कल्पना सांगितली. अब्दुल करीम खाँ गुरु-शिष्य परंपरेतून संगीत शिकलेले, परंतु देवलांसोबत कार्य करण्यास तयार झाले. त्यांच्या आविष्काराची पारंपरिक ग्रंथबद्ध शास्त्रीय ज्ञानाशी सांगड घालण्याचा प्रयोग देवलांनी सुरू केला. १९०५मध्ये हुबळी येथे अब्दुल करीम खाँ व देवल यांनी संयुक्तपणे कार्यक्रम सादर केला. यात देवलांनी ग्राम, श्रुति, जाती, मूर्छना वगैरे संकल्पना स्पष्ट केल्या आणि त्याला सुसंगत राग अब्दुल करीम खाँ यांनी सादर केले. असे आणखीही कार्यक्रम या दोघांनी पुढे ठिकठिकाणी सादर केले (बाळकृष्ण कपिलेश्वरी १९७२ : ४४६).

रावबहादुर देवल यांनी या प्रयोगांवर आधारित 'हिंदू म्युझिकल स्केल अँड ट्वेंटी टू श्रुतीज' हे पुस्तक लिहून १९१०मध्ये प्रसिद्ध केले. एडवर्ड क्लेमंटस् यांनी या पुस्तकाला प्रस्तावना लिहिली होती. या निमित्ताने क्लेमंटस् आणि देवल यांनी हिंदुस्थानी संगीताची शास्त्रीय पायावर उभारणी करण्यासाठी एकत्र काम करण्याचे ठरवले. १९१२मध्ये महाबळेश्वर येथे मुंबई राज्याचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांच्या अध्यक्षतेखाली त्यांनी 'फिल हार्मोनिक सोसायटी ऑफ वेस्टर्न इंडिया' या नावाची संस्था स्थापन केली. एडवर्ड क्लेमंटस् यांनी अब्दुल करीम खाँ यांच्या सहकार्याने तयार केलेली 'रागाज ऑफ हिंदुस्तान', 'रागाज ऑफ तंजावर' आणि 'अॅन इंट्रोडक्शन टू द स्टडी ऑफ इंडियन म्युझिक' ही पुस्तके या संस्थेतर्फे प्रसिद्ध झाली.

पुढे काही काळाने एडवर्ड क्लेमंटस् यांनी तयार केलेल्या 'श्रुती ऑर्गन'वरून अब्दुल करीम खाँ यांच्याशी त्यांचे मतभेद झाले. हा ऑर्गन परिपूर्ण नाही; कारण ऑर्गनसारख्या वाद्यातून सूक्ष्म स्वर निघू शकत नाहीत, ते तंतुवाद्यातून, गळ्यातून निघू शकतात, असे अब्दुल करीम खाँ यांचे म्हणणे होते. यानंतर अब्दुल करीम खाँ फिल हार्मोनिक सोसायटीपासून दुरावले. मात्र अब्दुल करीम खाँ यांनी क्लेमंटस् यांच्या ऑर्गनविषयी नापसंती व्यक्त करून त्यांच्यासोबतची व्याख्याने बंद केल्यानंतर डॉ. रा. गो. भांडारकर, शि. म. परांजपे, रँग्लर परांजपे, ह. ना. आपटे, दादासाहेब खापर्डे इत्यादी वेगवेगळ्या क्षेत्रांतल्या मान्यवरांनी अब्दुल करीम खाँ यांचे मन वळवण्याचा प्रयत्न केला होता. यावरून क्लेमंटस्-देवल यांनी चालवलेल्या भारतीय संगीताच्या शास्त्र-उभारणीच्या उपक्रमाला समाजात अधिमान्यता मिळू लागली होती असे दिसते (बाळकृष्ण कपिलेश्वरी १९७२ : ४४७-४८).

एकीकडे उत्तर भारतीय गायक महाराष्ट्रात आल्याने व महाराष्ट्रातील संगीतप्रेमी कलावंत उत्तरेतून हिंदुस्थानी संगीत आत्मसात करून महाराष्ट्रात परतल्याने उत्तर भारतातील हिंदुस्थानी संगीताचा महाराष्ट्रीय समाजात जोमदार प्रसार होऊ लागला. दुसरीकडे पाश्चात्त्य संगीताच्या परिचयप्रभावातून या हिंदुस्थानी संगीताची शास्त्रीय चौकटीत मांडणी करण्याचे आधुनिक उपक्रम महाराष्ट्राच्या भूमीतच सुरू झाले. अशा

रीतीने विसाव्या शतकाच्या प्रथमार्धापासून हिंदुस्थानी संगीत हाच महाराष्ट्रीय संगीताचा मध्यवर्ती प्रवाह बनला.

## हिंदुस्थानी संगीताची शास्त्रीय पायावर उभारणी

हिंदुस्थानी संगीताचा शास्त्रीय पाया आधुनिक पद्धतीने रचणाऱ्या कलावंतांमध्ये पंडित विष्णू नारायण भातखंडे आणि पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर या दोन महाराष्ट्रीयांचे योगदान असाधारण आहे. अखिल भारतातील हिंदुस्थानी संगीताच्या क्षेत्रात यांचे कर्तृत्व मान्यता पावलेले आहे.

पंडित विष्णू नारायण भातखंडे (जन्म : १८६० - निधन : १९३७) यांच्यावर संगीतकलेचे प्राथमिक संस्कार मुंबईच्या मिश्र संस्कृतीत झाले. बालपणापासून वल्लभदास गोपालगिरी, बुवा दामुलजी, जीवनजी महाराज या भाटिया समाजातील संगीतज्ज्ञांकडून भातखंड्यांना सतारवादनाचे शिक्षण मिळाले आणि संगीतशास्त्राच्या प्राचीन काळापासून चालत आलेल्या साहित्याशीही त्यांचा परिचय झाला. पुढे कॉलेजात शिकत असताना भातखंडे पारशी गायनोत्तेजक मंडळीच्या शापूर स्पेन्सर यांच्याशी जोडले गेले. या संस्थेच्या उपक्रमांतून अनेक प्रसिद्ध गायकांच्या हिंदुस्थानी गायनपद्धतीशी भातखंड्यांचा परिचय झाला.

गुरूपरंपरेने मौखिक स्वरूपात शिष्यांना दिले जाणारे भारतीय संगीत-ज्ञान वेळीच शिस्तशीरपणे नोंदवून ठेवले नाही, तर त्याचे स्वरूप विकृत बनण्याचा आणि ते नाहीसेही होण्याचा धोका आहे हे पंडित भातखंडे यांच्या लवकरच ध्यानात आले. विसाव्या शतकाच्या प्रारंभी ध्वनिमुद्रणतंत्र भारतात प्रवेशल्यानंतर हिंदुस्थानी संगीतातील थोर कलाकारांची गायकी कायमस्वरूपी संगृहित करण्याची सुविधा उपलब्ध झाली. यानंतर अशा गायकांची गाणी ध्वनिमुद्रित व्हावीत यासाठी भातखंड्यांनी अथक प्रयत्न केले. त्याचबरोबर विविध गायन-परंपरांमधल्या गायकांकडून ख्याल, ध्रुपदे, पदे गोळा करून त्यांचे स्वरलेखन करण्याचा उपक्रम त्यांनी सुरू केला. भारतात प्राचीन काळापासून लिहिल्या गेलेल्या संगीतविषयक ग्रंथांतले ज्ञान वर्तमान काळातील प्रत्यक्ष सादर होणाऱ्या संगीताला जसेच्या तसे लागू करणे अशक्य आहे; सध्या प्रचलित असलेल्या भारतीय संगीताच्या विविध आविष्काररूपांचे शास्त्र प्राचीन संगीतविद्येशी सांगड घालत, परंतु नव्याने रचावे लागेल हे त्यांच्या लक्षात आले. त्या दृष्टीने त्यांनी पुढे आपला अभ्यास चालू ठेवला.

पंडित भातखंडे यांनी भारताच्या विविध भागांत प्रत्यक्ष भ्रमंती करून संगीत-साहित्य गोळा केले. १८९६मध्ये त्यांनी सुरत, बडोदा, भडोच, नवसारी, अहमदाबाद, राजकोट, भावनगर इत्यादी स्थळांना भेटी दिल्या; तर १९०४मध्ये दक्षिणेकडेच्या म्हैसूर, मद्रास, तंजोर, त्रावणकोर, मदुरा, इत्तय्यापुरम, त्रिवेंद्रम, बंगलोर, रामेश्वर इत्यादी ठिकाणी ते

फिरले. या दौऱ्यात व्यंकटमखीच्या ७२ थाटांच्या आधारे रागवर्गीकरण करण्याच्या पद्धतीशी त्यांचा परिचय झाला. १९०६-०७मध्ये ते पूर्व भारतात फिरले, तर १९०७-१९०८मध्ये उत्तर भारतात. मुंबईत असतानाच पं. भातखंड्यांनी पारशी गायनोत्तेजक मंडळीत येणाऱ्या पं. रावजीबुवा बेलबागकर यांच्याकडून ३०० धृपदे मिळवली, तर उस्ताद अली हुसेन व विलायत हुसेन यांच्याकडून १५० ख्याल घेतले. १९०६-०७मध्ये मनरंग घराण्यातील उस्ताद आशिक अलीखाँ व जयपूर घराण्याचे उस्ताद अहमद अलीखाँ यांच्याकडून पंडित भातखंड्यांनी ३०० बंदिशी ध्वनिमुद्रित केल्या आणि त्यांचे स्वरलेखनही केले. पं. गणपतीबुवा भिलवडीकर यांच्याकडूनही त्यांनी सुमारे ३०० रचना आत्मसात केल्या (अशोक रानडे २०१० : ०३-०४).

भारतीय संगीताच्या "प्रत्यक्ष प्रयोगपरंपरेत मुरलेली अमूर्त औपपत्तिक विधाने व कार्यकारी होणारे सिद्धांत हुडकण्यात त्यांच्या कुशाग्र बुद्धिमत्तेस बरेच यश आले. हिंदुस्थानी कलासंगीताशी संबंधित व्याकरणिक बांधण्या, त्यांची ऐतिहासिक वाटचाल, सादरीकरणाचे प्रघात आणि सौंदर्यशास्त्रीय निकष या विषयींच्या त्यांच्या मतांचे १९१०च्या सुमारास बऱ्यापैकी स्फटिकीभवन झाले होते..." (अशोक रानडे २०१० : ०५).

एकीकडे हे संगीत संशोधन आणि संकलनाचे कार्य सुरू असताना त्यांनी अखिल भारतीय पातळीवरील संगीत परिषदा नियमितपणे आयोजित करून, त्यांत रागस्वरूपासारख्या तांत्रिक बाबतींत निर्णायक बहुमत व्हावे यासाठी चर्चा, संवाद, वादविवाद घडवून आणले. संस्थानिक वा ब्रिटीश अधिकारी यांच्या आश्रयाने त्यांनी बडोदा (१९१६), दिल्ली (१९१८), बनारस (१९१९), लखनौ (१९२४ आणि २५) अशा ठिकाणी या परिषदा भरवल्या. पहिल्या बडोदा संगीत परिषदेसाठी भातखंड्यांनी तयार केलेल्या उद्देशपत्रिकेवरून संगीतशास्त्राकडे पाहण्याचा त्यांचा आधुनिक दृष्टिकोन आणि भूमिका स्पष्ट होतात :

१) संगीताची राष्ट्रीय पायावर उन्नती साधणे
२) रागसंगीताच्या पद्धतशीर अध्यापनास आरंभ करणे
३) शक्य असल्यास हिंदुस्थानी व कर्नाटक संगीताचे एकीकरण साधणे
४) सार्वत्रिक संमतीची एक स्वरलेखन पद्धती उत्क्रांत करणे
५) पद्धतशीरपणे व ग्रंथानुसार नवरागनिर्मिती करणे
६) संगीतवाद्यांत सुधारणा करणे
७) ह्यात सादरकर्त्यांच्या मदतीने पारंपरिक बंदिशी ध्वनिमुद्रिकेवर घेणे
८) महत्त्वाचे संगीतशास्त्रीय ग्रंथ संगृहित करणे
९) चर्चेच्या माध्यमातून सूक्ष्म स्वरांतरे (श्रुती) निश्चित करणे (अशोक रानडे २०१० : ०७).

पंडित भातखंडे यांनी संगीतशास्त्राची चर्चा करणारे प्राचीन काळापासूनचे सुमारे वीस निरनिराळे ग्रंथ संशोधित करून मुद्रित माध्यमात प्रसिद्ध केले. त्यामुळे संगीतविषयक हस्तलिखितांमधले ज्ञान प्रथमच सर्वसामान्य संगीत रसिकांना उपलब्ध झाले. दुसरीकडे, भातखंड्यांनी स्वतः भारतीय संगीताचा इतिहास आणि शास्त्र लिहिण्याचा मोठा उपक्रम केला तो वेगळाच. 'हिंदुस्थानी संगीत पद्धती' हा त्यांचा चार खंडांतील ग्रंथ या दृष्टीने महत्त्वाचा आहे. हिंदुस्थानी संगीताचा इतिहास, श्रुतिचर्चा, रागचर्चा, आजचे प्रचलित स्वरसप्तक - या संगीतातील मूलभूत प्रश्नांची सर्वांगीण चर्चा या ग्रंथात त्यांनी केली आहे. या ग्रंथाचे पहिले तीन खंड १९१० ते १४ या काळात प्रसिद्ध झाले, तर चौथा खंड पं. भातखंडे यांच्या निधनापूर्वी प्रसिद्ध झाला. एकंदर सुमारे २००० पृष्ठांचा हा मजकूर आहे. भारतीय संगीतशास्त्राच्या अभ्यासासाठी हा ग्रंथ आजही अपरिहार्य आहे. याशिवाय 'क्रमिक पुस्तक मालिका' या नावाने सहा भागांत बहुतेक महत्त्वाच्या संगीत घराण्यांत प्रचलित असलेल्या सुमारे १८०० बंदिशींचे स्वरलेखन त्यांनी प्रसिद्ध केले.

भारतीय संगीतकलेचे शास्त्र रचताना पंडित भातखंड्यांसमोरही पाश्चात्त्य संगीत-शास्त्राचा आदर्श होता. 'हिंदुस्थानी संगीत पद्धती'चे चार खंड लिहिताना आपल्यासमोर डॉ. बर्नी लिखित 'हिस्टरी ऑफ म्युझिक' या ग्रंथाचा आदर्श असल्याचा उल्लेख त्यांनी केला आहे. पाश्चात्त्य ध्वनिमुद्रणामुळे भारतीय संगीताचे रक्षण होईल, म्हणून भारतीय गायकांची अधिकाधिक ध्वनिमुद्रणे व्हावी असा त्यांचा प्रयत्न होता. पं. विष्णू नारायण भातखंडे हे संगीतविषयक आधुनिक चळवळीचे प्रवक्ते आणि प्रणेते ठरले.

भारतीय संगीताची आधुनिक शास्त्रीय पायावर उभारणी करण्याचा उपक्रम करणारे पं. भातखंड्यांचेच समकालीन दुसरे महाराष्ट्रीय कलावंत म्हणजे पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर (१८७२-१९३१) होत. पं. पलुस्कर हे ग्वाल्हेर घराण्याचे महाराष्ट्रातले आद्य गायक बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांचे शिष्य. बाळकृष्णबुवांकडे संगीतशिक्षण घेतल्यानंतर १८९६मध्ये त्यांनी मीरज सोडले आणि ते भारतभ्रमणासाठी बाहेर पडले. पारंपरिक पद्धतीने गुरुमुखातून संगीत शिक्षण घेण्याच्या प्रचलित पद्धतीबद्दल पलुस्करांना असमाधान वाटत होते. गुरू बऱ्याचदा रागांची नावेसुद्धा आपल्या शिष्यांना सांगत नसत; मग संगीताविषयीची इतर शास्त्रीय माहिती दूरच राहिली. ही गोष्ट पलुस्करांना खटकत होती. संगीताचे शास्त्रीय ज्ञान सर्वांसाठी खुले केले पाहिजे अशी महत्त्वाकांक्षा त्यांनी धरली. उत्तर भारतात पंजाबपर्यंत भ्रमंती करून त्यांनी गाण्यांच्या असंख्या चिजा गोळा केल्या. त्यांचे स्वरलेखन करण्याच्या पद्धती तयार केल्या. आरोहावरोह, मुख्य स्वर, वावर्त्य स्वर वगैरे सर्व बारकावे लिहून काढले.

पंडित पलुस्कर यांचे नाव प्रामुख्याने घेतले जाते ते त्यांनी संगीत शिक्षणाची संस्थात्मक उभारणी देशभरात सर्वप्रथम केली, यासाठी. या संगीत शिक्षणसंस्थांसाठी

अभ्यासक्रम आणि अभ्याससाहित्य त्यांनी रचले. स्वतः केलेल्या संशोधनाचा उपयोग त्यांना संगीत महाविद्यालयाचे अभ्याससाहित्य तयार करताना झाला. १९०१मध्ये पं. पलुस्कर यांनी लाहोर येथे संगीत महाविद्यालय सुरू केल्यावर या महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमासाठी त्यांनी संगीतविषयक पुस्तकांचे लेखनही सुरू केले. 'संगीत बालबोध' हे पुस्तक त्यांनी हिंदी-उर्दू भाषेत छापले. या पुस्तकात जोडराग, रूपक, सवारीसारखे ताल वापरणाऱ्या बंदिशी, अष्टपदीसारखे विरळ गायले जाणारे गायनप्रकार तसेच ख्याल, तराणे, सरगम असे प्रचलित गायनप्रकारही संगृहित केले होते. १९०५पासून पुढे वर्षसव्वा वर्ष त्यांनी 'संगीतामृत प्रवाह' या नावाचे नियतकालिक चालवले.

पं. पलुस्कर यांनी बालवयातील संगीत-विद्यार्थ्यांपासून तर प्रशिक्षित संगीतकारांपर्यंत सर्वांना उपयोगी पडतील अशी 'बालोदय संगीत', 'संगीत बालप्रकाश', 'स्वल्पालाप', 'राग प्रवेश मालिका', 'संगीत', 'संगीत बालबोध', 'कर्नाटक संगीत', 'बंगाली गायन', 'राष्ट्रीय संगीत', होरी व टप्पा या गायनप्रकारांविषयीची पुस्तके - इत्यादी सुमारे साठ पुस्तके लिहिली. या पुस्तकांच्या विषयांचे वर्गीकरण अशोक रानडे यांनी पुढीलप्रमाणे केले आहे –

१) आवाज तयार करणे व अलंकारांच्या अंगाने स्वरधुनीचा विस्तार यावरील
२) संगीताचा आरंभिक अभ्यास नोंदवणारी
३) गायकी ढंगांवर
४) होरी इत्यादी गायनप्रकारांवर
५) ग्वाल्हेर घराण्यानुसार ख्याल व त्यांचा विस्तार दाखवणारी
६) देशभक्तिपर गीते
७) बंगाली व कर्नाटकी संगीत
८) व्यायामाबरोबरचे संगीत
९) 'तुलसी रामायणा'तील दोहे, चौपाया यांचे गायन

(अशोक रानडे २०१० : ६४).

"संगीत शिक्षणशास्त्रीय साधने व अध्ययन-अध्यापनास साहाय्यक ठरणारी लिखित सामग्री म्हणजेही संगीतावरचे शास्त्रीय लिखाणच असते," (उपरोक्त). हे ध्यानात घेता पं. पलुस्करांच्या संशोधन-लेखनाचा हिंदुस्थानी संगीत आधुनिक शास्त्रीय पायावर उभारण्यात किती वाटा होता हे कळून येते.

## संगीतशिक्षणाची आधुनिक प्रणाली

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भारतीय संगीताच्या क्षेत्रात घडून आलेले महत्त्वपूर्ण परिवर्तन म्हणजे संगीत-शिक्षण देण्याची आधुनिक पद्धती रूढ झाली. यातही महाराष्ट्र अग्रेसर होता. संपूर्ण भारतात आधुनिक पद्धतीने संगीत शिक्षण देणारे पहिले महाविद्यालय

पं. विष्णू दिगंबर पलुस्कर यांनी १९०१मध्ये लाहोर येथे सुरू केले. महाराष्ट्रात, मुंबई शहरात पलुस्करांच्या गांधर्व संगीत महाविद्यालयाची स्थापना १९०८मध्ये झाली. नंतर या संस्थेची महाविद्यालये पुणे व नागपूर येथेही सुरू झाली.

परंपरेने संगीतशिक्षण हे गुरुगृही राहून घ्यावे लागे. गुरूच्या मर्जीवर हे शिक्षण अवलंबून राही. अनेक दिवस गुरुगृही राहून पडतील ती कामे करत, स्वरांची आराधना करत शिष्य चिकाटीने राहिला, तर गुरूकडून त्याला काही चिजा शिकायला मिळत. गुरू त्याविषयीचे संपूर्ण ज्ञान शिष्याला स्पष्टपणे देईलच याचा काही भरवसा नसे. बहुतेक गायक हे अल्पशिक्षित किंवा अशिक्षित असत. संगीत ही मुळात बहुजनसमाजात प्रसार झालेली कला होती. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रातील तथाकथित प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या ब्राह्मणवर्णीय तरुणांमध्ये या कलेविषयी आकर्षण निर्माण झालेले दिसत असले, तरी एकंदर या समाजाचा संगीत-कलावंतांकडे पाहण्याचा दृष्टिकोन तुच्छतावादी होता. हे चित्र बदलण्यासाठी संगीत शिक्षण देण्याची पद्धती बदलली पाहिजे असे गायक-कलावंतांना वाटू लागले होते. १९१०मध्ये अब्दुल करीम खाँ यांनी बेळगाव येथे 'आर्य संगीत विद्यालया'ची स्थापना केली, तेव्हा नव्या संगीत-शिक्षणाच्या पद्धतीची आवश्यकता त्यांनी पुढील शब्दांत प्रतिपादिली होती : "गवई लोक प्रायः व्यसनी, आळशी, अशिक्षित व तबियतखोर आणि शिकवण्यास तर नालायक असे ठरून गेल्याने सुशिक्षित वर्गाचे तिकडे दुर्लक्ष होवू लागले आहे. या सशास्त्र गायनकलेचा अभ्यास नसेल व गवई लोकांस व्यावहारिक शिक्षण नसेल आणि सुशिक्षित वर्गाची अभिरुचि नसेल तर या ऋषिप्रणीत गायनकलेचा अस्त होईल...गायनकला उर्जितावस्थेत आणणे असेल तर गवयांनी निर्व्यसनी राहिले पाहिजे. सुशिक्षित लोकांना गायनकलेचे सशास्त्र शिक्षण देण्यास पद्धतशीर गायनाच्या शाळा, त्यावर नोटेशनसह उत्तम प्रकारची पुस्तके तयार झाली पाहिजेत..." (बाळकृष्ण कपिलेश्वरी १९७२ : ४७६).

विष्णू दिगंबर पलुस्कर यांनी मुंबईत १९०८मध्ये सुरू केलेल्या गांधर्व संगीत महाविद्यालयाचा पुढील दशकभरात फार मोठा विस्तार झाला. या महाविद्यालयासाठी १९१५साली पलुस्करांनी सॅंडहर्स्ट रोड, दुभाष लेन आंग्रेवाडी येथे चार मजली नवी इमारत उभारली. वसतिगृहाची स्वतंत्र इमारत उभारून विद्यार्थ्यांची निवासाची व्यवस्था केली. १९१८मध्ये या महाविद्यालयात सुमारे ५०० विद्यार्थी संगीताचे शिक्षण घेत होते (बाळकृष्ण कपिलेश्वरी १९७२ : ७३७). या महाविद्यालयात संगीतशिक्षणासाठी नेमलेले शिक्षक अभ्यासक्रमासाठी तयार केलेल्या पुस्तकांवरून विद्यार्थ्यांना संगीत शिकवत असत. हिंदुस्थानी संगीत शिक्षणासाठी ही पद्धती अत्यंत नवी होती. या संगीत महाविद्यालयातर्फे पलुस्करांनी १९१८ ते १९२२ या काळात पाच संगीत परिषदा भरवल्या. या परिषदांमध्ये देशातील अनेक मोठ्या गायक, संगीत कलावंतांनी हजेरी

लावली.

पलुस्करांप्रमाणेच अब्दुल करीम खाँ यांनी सुरू केलेल्या संगीत विद्यालयांचेही स्थान महाराष्ट्रातील संगीत शिक्षणाच्या क्षेत्रात महत्त्वाचे आहे. अब्दुल करीम खाँ यांनी वर म्हटल्याप्रमाणे प्रथम बेळगाव येथे १९१०मध्ये आर्य संगीत विद्यालयाची स्थापना केली. त्यांच्या शिक्षणसंस्थेचे स्वरूप गांधर्व संगीत महाविद्यालयाहून निराळे होते. गुरुकुल-पद्धतीनेच संगीताचे शिक्षण द्यावे असा अब्दुल करीम खाँ यांचा आग्रह होता. शिष्याने आयुष्यात इतर गोष्टी, प्रलोभने यांचा त्याग करून संगीताच्या अध्ययनाशी एकरूप व्हावे, यासाठी त्याने गुरूच्या सान्निध्यात सर्वकाळ राहणे त्यांना गरजेचे वाटत होते. आर्य संगीत विद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यालयाशी आठ वर्षे बांधिल राहू असा करार करावा लागे व तेवढा काळ अब्दुल करीम खाँ यांच्यासोबत निवास करून राहावे लागे. या काळात विद्यार्थ्याने रंगभूमीवर देखील जाऊ नये अशी अब्दुल करीम खाँ यांची अट असे. त्या काळात संगीत नाटकात गायक-नट म्हणून काम करण्याची आकांक्षा बाळगून असणारे बरेच जण संगीत शिकण्यासाठी येत; त्यांच्यासाठी ही अट अडचणीची होती. १९१२मध्ये अब्दुल करीम खाँ यांनी आर्य संगीत विद्यालय बेळगावहून पुण्याला स्थलांतरित केले. दत्तोपंत फुलंब्रीकर आणि कृष्णराव फुलंब्रीकर या दोघांनाही अब्दुल करीम खाँ यांच्याकडे संगीत शिकायचे होते, परंतु आठ वर्षांचा करार करण्यास कृष्णराव फुलंब्रीकर तयार नसल्याने त्यांना प्रवेश मिळाला नाही, अशी आठवण अब्दुल करीम खाँ यांच्या चरित्रात नमूद आहे (बाळकृष्ण कपिलेश्वरी १९७२ : ४९२).

पुण्यात आर्य संगीत विद्यालय प्रारंभी शुक्रवार पेठेतील पंतसचिवांच्या घरासमोर डॉ. भागूबाई यांच्या तीन मजली वाड्यात होते. पुण्याच्या सनातनी संवेदनेला एका मुसलमान गवयाच्या घरी ब्राह्मण व इतर हिंदू जातींतील मुले एकत्र निवास-भोजन करतात ही गोष्ट खपण्यासारखी नव्हती. आजूबाजूच्या लोकांकडून या मुलांना व खुद्द अब्दुल करीम खाँ यांना खूप त्रास होऊ लागला. सार्वजनिक हौदावर हे संगीताचे विद्यार्थी पाणी भरणे, धुणी-भांडी करणे यासाठी जात तेव्हा लोक त्यांना छळू लागले. तेव्हा या लोकांना समजावून त्यांचे मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न पुण्यातल्या रावबहादुर देवल, ह.ना. आपटे, डॉ. भांडारकर या प्रतिष्ठित मंडळींनी केला. डॉ. भांडारकरांनी आपली मुलगी मालिनी हिला आर्य संगीत विद्यालयात संगीत शिक्षण घेण्यासाठी दाखल केले. तसेच ना.सी. फडके, प्र. के. अत्रे या तेव्हाच्या तरुण विद्यार्थ्यांनी आर्य संगीत विद्यालयात शिक्षण घेतल्याची माहिती मिळते (बाळकृष्ण कपिलेश्वरी १९७२ : ४८८-८९). या विद्यालयात संगीताचे शिक्षण कसे चाले हे ना. सी. फडके यांनी लिहून ठेवलेल्या पुढील आठवणीवरून कळते. १९१४साली बी. ए. पूर्ण केल्यावर फडक्यांनी हार्मोनियम शिकण्यासाठी आर्य संगीत विद्यालयात नाव दाखल केले होते. "अब्दुल करीमखाँसाहेबांच्या विद्यालयांत शिकणाऱ्या

विद्यार्थ्यांत बी. ए. च्या पदवीनं विभूषित झालेला मी पहिलाच आणि एकटाच विद्यार्थी होतो. यामुळेच कदाचित् असेल, खाँसाहेब माझ्या शिक्षणावर विशेष देखरेख ठेवल्याप्रमाणे वागत असत. ठकार नांवाचे मास्तर मला शिकवित असत. परंतु मधेच खाँसाहेबांनी फेरी मारावी, कांही वेळ माझं वाजविणं ऐकत उभं राहावं, आणि मग जवळ येऊन मला काही सूचना द्याव्या. त्यांच्या पेटीवादनाचा संपूर्ण कोर्स मी दोन महिन्यांतच पूर्ण केला, तेव्हा खाँसाहेब मला म्हणाले, "आता तबला शिका" आणि त्रितालाचा धडा ते स्वतः देऊ लागले." (ना. सी. फडके १९६१ (अ) : ०६). १९१८मध्ये अब्दुल करीम खाँ यांनी मुंबईला आपले विद्यालय गिरगाव कांदेवाडीमध्ये जयकर हाऊस येथे सुरू केले. उद्घाटन शेठ जमनादास द्वारकादास यांच्या हस्ते झाले (बाळकृष्ण कपिलेश्वरी १९७२ : ६७१).

विष्णू दिगंबर पलुस्करांनी मुंबईत संगीत महाविद्यालय काढले त्याच्या एक वर्ष आधी, १९०७मध्ये औंधहून आलेल्या पंडित अनंत मनोहर जोशी या त्यांच्या गुरुबंधूने देखील 'श्री गुरुसमर्थ गायन वादन विद्यालय' ही संस्था मुंबईत काढली होती (अशोक रानडे २०१० : ७५). अब्दुल करीम खाँ यांच्या पाठोपाठ त्यांचे शिष्य बाळकृष्ण कपिलेश्वरी यांनी देखील मुंबईमध्ये चिराबाजारात १९२०मध्ये 'श्री सरस्वती संगीत विद्यालय' ही संगीत शिक्षण देणारी संस्था सुरू केली. या संस्थेला अच्युतराव कोल्हटकर आणि दामोदर सावळाराम यंदे यांनी आपल्या नियतकालिकांतून भरपूर प्रसिद्धी दिली. पुढे दादर परिसरातल्या विद्यार्थ्यांसाठी एक शाखा करी रोड येथील हाजी कासम चाळीत सुरू झाली. ती १९२६पर्यंत चालली (बाळकृष्ण कपिलेश्वरी १९७२ : ६७२).

पलुस्कर-अब्दुल करीम खाँ यांनी मुंबई-पुण्यासारख्या मोठ्या शहरांत आधुनिक पद्धतीने संगीत शिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन केल्यानंतर महाराष्ट्रात लहानमोठ्या शहरांत अनेक ठिकाणी संगीत विद्यालये सुरू झाली. विदर्भातील हिंदुस्थानी संगीताचे आद्य प्रणेते म्हणून नामदेवबुवा अमरावतीकर (?-१९२६) यांचे नाव घेतले जाते. ते बडोदा संस्थानातल्या मौलाबक्ष यांचे शिष्य होते. त्यांनी 'मौलाबक्ष प्रासादिक गायन समाज' या नावाने संगीत विद्यालय चालवले. या नामदेवबुवांचे शिष्य नत्थुबुवा अमरावतीकर (?-१९४४) यांनी मुंबईत वास्तव्याला असताना गिरगावात 'आर्यन म्युझिक कॉलेज' या नावाने संगीत शिक्षण संस्था सुरू केली. अनेक दशके सुरू असलेल्या या संस्थेचे नाव बदलून नंतर 'आदर्श संगीत विद्यालय' असे करण्यात आले. १९४२नंतर नत्थुबुवा नागपूरला राहू लागले, तेव्हा त्यांनी तिथे 'नॅशनल म्युझिक कॉलेज' सुरू केले (ना. गो. मंगरूळकर १९७६ : ०३-०६). अकोला येथे गायक चिंतामणराव रानडे (१८९६-१९४९) यांनी शारंगदेव संगीत विद्यालयाची स्थापना केली. वर्ध्याला १९३०मध्ये रामदास उर्फ भाऊजी काळे यांनी श्रीराम संगीत विद्यालय सुरू केले. तर

१९४१मध्ये भास्करराव नारायण संगीत यांनी शिवानंद संगीत विद्यालयाची स्थापना केली (उपरोक्त : २४-३३). यवतमाळ येथे १९३०मध्ये दत्तुबुवा जाधव यांनी सरस्वती संगीत विद्यालय सुरू केले; तर दारव्हा येथे याच सुमारास बाबाराव सदाशिव कासलीकर (१८८७-१९३६) यांनी संगीत विद्यालय काढले होते (उपरोक्त : ३८-३९).

या काळात संगीत नाटकांमधील पदांच्या लोकप्रियतेमुळे महाराष्ट्रीय समाजात संगीताची लोकप्रियता अधिकाधिक वाढत होती. अशात या नव्या संगीत शिक्षण पद्धतीमुळे संगीताचे शिक्षण घेणे या समाजातील संगीतप्रेमींना सुलभ झाले. शाळांमध्येही संगीत हा विषय अभ्यासासाठी नेमला जाऊ लागला. संगीत विद्यालयांमधून दिले जाणारे हे संगीतशिक्षण हिंदुस्थानी संगीताच्या विविध परंपरांमधले होते. हार्मोनियम, तबला यांसारख्या नव्या वाद्यांच्या वादनाचे शिक्षण तरुण पिढी मोठ्या आवडीने घेत होती. संगीत नाटकांमधील गायक-नट हे या संगीतरसिकांचे आदर्श होते. हिंदुस्थानी संगीतातील ख्याल गायकीचा प्रभाव एव्हाना संगीत नाटकांवर वाढला होता. तिकीटे लावून गायकांचे जलसे आयोजित होत होते. महाराष्ट्रीय समाजात संगीत कलेच्या विस्ताराच्या या नव्या वाटांना बळ पुरवणारी हिंदुस्थानी संगीताची सशक्त परंपरा या काळात महाराष्ट्रात विकसित झाली. विविध घराण्यांच्या गायकांनी महाराष्ट्रीय संगीतप्रेमींवर आपापल्या गायनाचे संस्कार केले. त्यांचा थोडक्यात मागोवा घेऊ.

## १०.३ महाराष्ट्रातील हिंदुस्थानी संगीताच्या परंपरा

उत्तर भारतात मध्ययुगापासून संगीत कलेचा प्रवास प्रबंध गायकीकडून ध्रुपद गायकीकडे आणि धृपदाकडून ख्यालगायकीकडे झाला. एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात पेशवे व इतर सरदारांच्या दरबारात धृपद गायक नेमलेले असत, त्या काळात उत्तर भारतात इंदोर, ग्वाल्हेर येथे मात्र ख्याल गायकी प्रस्थापित झाली होती. आधी सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्रात स्थलांतरित झालेल्या उत्तर भारतीय गायकांनी आणि ग्वाल्हेर-इंदोरला जाऊन संगीत शिक्षण घेऊन महाराष्ट्रात परतलेल्या मूळ महाराष्ट्रीय गायकांनी ही ख्याल गायकी महाराष्ट्रात आणली. अशा रीतीने हिंदुस्थानी संगीतातील ग्वाल्हेर, आग्रा, जयपूर अशा विविध घराण्यांची गायकी इथे रुजली आणि त्यांची शिष्य-परंपराही निर्माण झाली.

### बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर आणि ग्वाल्हेर घराण्याची गायकी

ग्वाल्हेर घराण्याची ख्याल गायकी महाराष्ट्रात आणणारा पहिला गायक म्हणजे बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर (१८४९-१९२६). हे मुळात कीर्तनकाराच्या परंपरेतून आले होते. वयाच्या दहाव्या वर्षी एका हरदासाकडून कीर्तन शिकत असतानाच त्यांना गायकीची इतर अंगे शिकण्याची इच्छा निर्माण झाली. पुढे ग्वाल्हेरला देवजीबुवांकडे

ख्याल गायकी शिकून महाराष्ट्रात परतल्यानंतर १८८१-८२च्या सुमारास ते मुंबईला राहात असताना त्यांनी गायनशाळा सुरू केली होती. त्यांच्याकडे त्या काळात डॉ. रा. गो. भांडारकर, ह. ना. आपट्यांचे काका महादेव चिंतामणी आपटे, न्या. तेलंग, म. मो. कुंटे ही प्रतिष्ठित मंडळी गाणे शिकायला येत असत. मुंबईत राहात असताना बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांनी प्रसिद्ध सतारवादक विश्वनाथ रामचंद्र काळे यांच्या सहकार्याने 'संगीत दर्पण' हे संगीतकलेला वाहिलेले मासिकही चालवले (देवधर १९७३ : १३). पण पुढे दम्याच्या विकारामुळे त्यांना मुंबई सोडावी लागली आणि ते प्रथम पुण्याला आणि तेथून औंध संस्थानात गेले. आपल्या आयुष्याचा पुढील काळ त्यांनी औंध, मीरज, इचलकरंजी येथे व्यतीत केला. आधी सांगितल्याप्रमाणे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत ग्वाल्हेर घराण्याची ख्याल गायकी त्यांनी अनेक महाराष्ट्रीय गायकांना शिकवली.

औंधला असताना गुंडूबुवा इंगळे (औंधकर) आणि विष्णू दिगंबर पलुस्कर हे बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांचे सुरुवातीच्या काळातले महत्त्वाचे शिष्य. पैकी पलुस्करांनी हिंदुस्थानी संगीताच्या क्षेत्रात केलेल्या क्रांतिकारी कार्याचे विवेचन आधी केले आहे. पलुस्करांना औंध सरकारच्या वाड्यावर बाळकृष्णबुवा शिकवत असत. तेव्हापासून पलुस्कर बाळकृष्णबुवांसोबत राहिले. फिरतीवर असतानाही ते सोबत असत. १८९६मध्ये मीरजला असताना पलुस्करांनी गुरूची साथ सोडली आणि ते उत्तर भारतात गेले.

याशिवाय बाळकृष्णबुवांच्या सुरुवातीच्या काळातील शिष्यांपैकी अनंत मनोहर जोशी (औंध), नीळकंठबुवा जंगम (मीरजकर) आणि वामनबुवा चाफेकर ही शिष्य मंडळी विशेष नावारूपाला आली. अनंत मनोहरांचे शिष्य म्हणजे त्यांचा मुलगा गजाननबुवा जोशी (१९११-१९८७) आणि या गजाननबुवांचे शिष्य म्हणजे अलीकडच्या काळातले प्रख्यात संगीतज्ज्ञ अशोक रानडे. अर्थात, गजाननबुवा जोशी यांनी ग्वाल्हेर घराण्याची गायकी वडिलांकडून आत्मसात केल्यानंतर जयपूर व आग्रा घराण्याचीही गायकी शिकले होते. बाळकृष्णबुवांचे दुसरे शिष्य नीळकंठबुवा जंगम यांचे शिष्य मल्लिकार्जुन मन्सुर (१९१०-१९९२). असा हा शिष्यसंप्रदाय पुढे विस्तारत गेला. १८९६नंतर बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर मीरज सोडून इचलकरंजीकर सरकारच्या आश्रयाला गेले, ते अखेरपर्यंत तेथेच होते. इचलकरंजीला गेल्यावर बाळकृष्णबुवांचा मुलगा अण्णाबुवा, पंडित मिराशीबुवा, गणपतराव भाटे, दत्तोपंत काळे, बाळुबुवा कासार असा त्यांचा शिष्यसंप्रदाय वाढला.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या काळात बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांचीच गायकी महाराष्ट्रीय संगीतरसिकांसमोर प्रामुख्याने असल्याने आणि दक्षिण महाराष्ट्रात त्यांचा शिष्यसंप्रदायही बराच वाढल्याने हिंदुस्थानी संगीत म्हणजे ग्वाल्हेर घराण्याची गायकी, असाच समज सर्वसाधारणपणे महाराष्ट्रात रूढ होता. या काळात इतरही काही ग्वाल्हेर घराण्याचे गायक महाराष्ट्रात होते. त्यामुळे हा समज अधिकच दृढ झाला. अशा गायकांमध्ये ग्वाल्हेर येथे स्थायिक झालेल्या वासुदेवराव जोशी (जोशीबुवा) यांचा मुलगा भय्यासाहेब हे होते. ग्वाल्हेरमध्ये या जोशीबुवांकडूनही बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर गाणे शिकले होते. जोशीबुवांची महाराष्ट्रात प्रसिद्धी त्यांच्याजवळील अस्ताई अंतऱ्यांसाठी होती. त्यांच्याजवळ चिजांचा मोठा भरणा होता. भय्यासाहेब जोशी हे अखेरच्या काळात मीरज, सांगली या परिसरात राहिले. त्यांच्या गायनाचा येथील संगीत रसिकांवर प्रभाव पडला. भय्यासाहेब जोशी यांच्याशिवाय सर्कसवाले विष्णुपंत छत्रे हे हद्दूखाँ या ग्वाल्हेर येथील प्रसिद्ध गायकाचा मुलगा रहिमत खाँ यांना महाराष्ट्रात घेऊन आले. १८९२पासून पुढे रहिमत खाँ यांची गायकी विशेष प्रसिद्ध झाली आणि अनेकांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांचे औंध येथील शिष्य अनंत मनोहर जोशी यांनी १९०१ ते १९०७ या काळात रहिमत खाँ यांना तंबोऱ्याची साथ केली आणि त्यांच्याकडून ते गाणे शिकले. महाराष्ट्रीय संगीतात वेगळ्या गायकीने स्वतःची छाप उमटवणारे रामकृष्णबुवा वझे हे देखील प्रारंभीच्या काळात ग्वाल्हेर घराण्याचीच गायकी शिकले होते. ग्वाल्हेर घराण्याचे निसारहुसेर खाँ यांचे ते शिष्य. पुढे कोणत्याही घराण्याच्या बंधनात न अडकता त्यांनी हिंदुस्थानी संगीतातल्या विविध परंपरा आत्मसात करून त्यातून स्वतःची नवी वाट चोखाळली. मराठी रंगभूमीवरील नाट्यसंगीताला वळण लावणाऱ्या संगीतकारांमध्ये भास्करबुवा बखले यांच्या जोडीने रामकृष्णबुवा वझे यांची कामगिरी विशेष महत्त्वाची मानली जाते. अशा रीतीने ग्वाल्हेर घराण्याच्या गायकीने महाराष्ट्राच्या संगीत-परंपरेत महत्त्वाचे स्थान मिळवले.

### अल्लादियाखाँ आणि जयपूर घराण्याची गायकी

अल्लादियाखाँ (१८५५-१९४६) यांनी जयपूर घराण्याची ख्यालगायकी महाराष्ट्रात सर्वप्रथम रुजवली. उत्तर भारतातून भ्रमंती करत अल्लादिया खाँ एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात बडोदामार्गे मुंबई शहरात येऊन काही काळ राहिले. पुणे ते बेळगाव या दक्षिण महाराष्ट्राच्या पट्ट्यात या काळात हिंदुस्थानी संगीतातील ग्वाल्हेर घराण्याच्या गायकीची ओळख बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, रहिमत खाँ यांच्यामुळे पक्की झाली होती. मुंबई शहरात मात्र वेगवेगळ्या परंपरांमधले गायक येऊन आपली कला सादर करत. तेथील संगीतप्रेमी धनिकांनी दिलेल्या आश्रयामुळे भारतातल्या अनेक गायकांचे स्वर या शहरात उमटले. मुंबईत राहणाऱ्या काही गोवेकर कलावंतिणी देखील

गायनात अव्वल होत्या. मुरादाबाद घराण्याच्या नझीरखान यांची शिष्या अंजनीबाई मालपेकर, आग्रा घराण्याच्या नथ्थन खाँ यांची शिष्या बाबलीबाई उर्फ चंद्राबाई साळगावकर (१८६०१९२५) यांच्या गायकीचा मुंबईत या काळात दबदबा होता.

अशा वातावरणात १८९२-९३च्या सुमारास अल्लादियाखाँ मुंबईत दाखल झाले. मुंबईतील एक प्रसिद्ध संगीतप्रेमी स्त्री बापुतारा यांच्या घरी भरलेल्या मैफिलीत बाबलीबाई हिच्या गाण्यानंतर अल्लादियाखाँ यांनी गाणे सादर करून उपस्थित श्रोत्यांची वाहवा मिळवली व त्यांचा लौकिक महाराष्ट्रात पसरू लागला. १८९५च्या सुमारास छत्रपती शाहू महाराज यांच्या निमंत्रणावरून ते कोल्हापूर दरबारात गायक म्हणून रुजू झाले आणि पुढची सुमारे पंचवीस-तीस वर्षे त्यांच्या गायनाचे स्वर दक्षिण महाराष्ट्रात रुंजी घालत राहिले. तोवर या परिसरातील संगीतप्रेमींना प्रामुख्याने बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर व त्यांच्या शिष्यसंप्रदायाच्या आवाजातली ग्वाल्हेर घराण्याची साधी सरळ गायकी ऐकण्याची सवय होती. अल्लादियाखाँ यांच्या गाण्यातील पेचदार व सौंदर्ययुक्त जागांनी हे रसिक प्रभावित झाले. तोवर न ऐकलेल्या अनेक नव्या रागांचा परिचय अल्लादियाखाँ यांच्या गायकीतून महाराष्ट्रीय श्रोत्यांना होऊ लागला. १९२२मध्ये शाहू महाराजांचे निधन झाल्यानंतर अल्लादियाखाँ यांनी कोल्हापूरहून आपला मुक्काम मुंबईला हलवला. त्यांच्या शिष्यसंप्रदायाच्या रूपाने जयपूर घराण्याच्या गायनपद्धतीचा विस्तार महाराष्ट्रात होत राहिला.

अल्लादियाखाँ यांचे भाऊ हैदरखाँ यांची नेमणूक शाहू महाराजांनी आपल्या राजवाड्यात देवीसमोर गाण्यासाठी केली होती. शिवाय अल्लादियाखाँ यांच्या तीन मुलांपैकी मंजीखाँ आणि भुर्जीखाँ या दोघांना त्यांनी स्वतः गाणे शिकवले होते. शिवाय गोदुबुवा शाळिग्राम हे अल्लादिया खाँ यांचे कोल्हापुरातले शिष्य. उत्तरायुष्यात अल्लादियाखाँ मुंबईला आल्यानंतर त्यांनी ज्या शिष्यांना तालीम दिली त्यांत केसरबाई केरकर या प्रमुख होत. मोगुबाई कुर्डीकर यांनाही त्यांनी काही काळ गाणे शिकवले, परंतु नंतर ती जबाबदारी त्यांनी आपला भाऊ हैदरखाँ यांच्यावर सोपवली. १९२६ ते १९३१ या काळात मोगुबाईंना हैदरखाँ यांनी गाणे शिकवले. त्यानंतर १९३४मध्ये अल्लादियाखाँ यांनी त्यांना गंडा बांधला (कल्याणी इनामदार १९८६ : ६२). मोगुबाईंच्या मार्फत जयपूर घराण्याची ही गायनपरंपरा किशोरी आमोणकर, वसंतराव देशपांडे, सुशीला पटेल, सुहासिनी मुळगावकर, सुलभा पिशवीकर या पुढच्या पिढीपर्यंत पोहोचली. अल्लादियाखाँ यांनी आपल्या उत्तरायुष्यात गुलूभाई जसदनवाला, शंकरराव सरनाईक, लीलाबाई शिरगावकर, निवृत्तिबुवा सरनाईक, वामनराव सडोलीकर या गायकांनाही थोडेबहुत गाणे शिकवले (देवधर १९७३ : २८). प्रसिद्ध हार्मोनियम वादक गोविंदराव टेंबे अल्लादियाखाँ यांच्या गायकीने अतिशय प्रभावित झाले होते. अल्लादियाखाँ कोल्हापुरात राहात

असताना १९०१च्या सुमारास महाराष्ट्रातील प्रयोगशील गायक भास्करबुवा बखले यांनी काही काळ त्यांच्याकडून गाण्याची तालीम घेतली होती.

अल्लादियाखाँ यांनी अनेक नव्या रागांचा परिचय महाराष्ट्राला करून दिला. कधीही न ऐकलेले शेकडो राग त्यांच्या संग्रही होते. "खटतोडी, खट, खोकर, हुसेनी तोडी, मालीगौरा, बिहागडा, पूर्वा, सावनी, सावनीनट, हेमनट, भूपनट, कामोदनट, सावनीकल्याण, बसंती केदार, रायसा कानडा, हुसेनी कानडा, बागेश्री कानडा, गारा कानडा इत्यादी रागांची नावे ऐकून हे काय प्रकार आहेत, असा प्रश्न जसा श्रोत्यांना पडे, तसाच तो गायकांनाही पडे..." (कल्याणी इनामदार १९८६ : ७६७७). परंतु अल्लादियांखाँ यांनी हे राग महाराष्ट्रीय रसिकांमध्ये रूळवले.

ख्याल गायकीमध्ये तानबाजी अल्लादियां खाँ यांनीच सर्वप्रथम आणली असेही म्हटले जाते. अल्लादियाखाँ स्वतःला जयपूर घराण्याचे म्हणवून घेत असले तरी त्यांचे गायन मूळ जयपूर घराण्यातील गायकांपेक्षा पुष्कळच वेगळे होते; त्यांनी स्वतःच स्वतंत्र गायकीचे ढंग निर्माण केले, असे संगीतज्ज्ञ भातखंडे यांचे म्हणणे होते (देवधर १९७३ : २९-३०).

**किराणा घराण्याचे गाणे आणि अब्दुल करीमखाँ**

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्राच्या संगीतविश्वावर आपली छाप उमटवणारे दुसरे मोठे गायक म्हणजे अल्लादियाखाँ यांचे समकालीन, अब्दुल करीमखाँ (१८७२-१९३७) हे होत. अब्दुल करीमखाँ यांनी किराणा घराण्याची ख्याल गायकी महाराष्ट्रात रुजवली. अब्दुल करीमखाँ सर्वप्रथम १८९८मध्ये मुंबईस आले. काही काळ हुबळी-बेळगाव येथे राहिल्यावर ते महाराष्ट्रातच पुणे-मुंबई-मिरज येथे स्थिरावले. उत्तरायुष्यात ते मिरजेलाच स्थायिक झाले. अब्दुल करीमखाँ ख्याल आणि ठुमरी गायनासाठी विशेष प्रसिद्ध होते. त्यांना मराठी उत्तम येत असे आणि मराठी नाटकांतील पदेही ते जलशांतून सादर करत असत. अखेरपर्यंत त्यांचा मोठा शिष्यपरिवार महाराष्ट्रात तयार झाला.

अब्दुल करीमखाँ यांच्या आवाजातल्या विलक्षण माधुर्यामुळे त्यांचे गाणे महाराष्ट्रीय संगीतप्रेमींच्या विशेष पसंतीस उतरले. ना. सी. फडके यांची आठवण आहे, "खाँसाहेबांचं साधं संभाषणदेखील ऐकावंसं वाटत असे. "हां हां आज फार गर्मी होते आहे" असे साधे शब्द त्यांच्या तोंडून बाहेर पडत तेदेखील एखाद्या बासरीतून निघालेल्या स्वरासारखे मिठ्ठास वाटायचे." (फडके १९६२ [१] : ०७). स्वतःच्या सुरेल आवाजाप्रमाणे शिष्यांच्याही आवाजावर संस्कार करण्याची पद्धत त्यांनी तयार केली होती. त्यानुसार त्यांनी आपल्या अनेक शिष्यांचे आवाज घडवले. ते गोहरबाणीची गायकी गात असत. ही गायकी करुण व शोकरसाबद्दल विशेष प्रसिद्ध आहे. खुद्द अब्दुल करीमखाँच्या गाण्यात नेहमीच भावप्रधानता असे. त्यांचा भर संगीताच्या आवाहकतेवर अधिक असे. गाण्यातील

बोलांच्या अर्थापेक्षा त्यांनी भावपूर्ण आवाहक गायन मुख्यतः आवाजाच्या लगावातून सिद्ध करण्याचा उपक्रम केला. शब्दाच्या स्पष्ट उच्चारापेक्षा त्याच्या नादावर अधिक भर दिला. पढिक-पांडित्य, तंत्रांच्या बंदिस्त चौकटी मोडून रागरचना अधिक खुल्या केल्या. म्हणूनच अशोक रानडे यांनी अब्दुल करीमखाँ यांच्या गायकीचे मूल्यमापन करताना त्यांना "परंपरेच्या प्रवाहाच्या विरुद्ध हात मारणारा बंडखोर कलावंत" असे संबोधले आहे (अशोक रानडे २०१० : ४८).

अब्दुल करीमखाँ आयुष्यभर संगीतक्षेत्रात काही नवे करण्याच्या प्रयत्नात राहिले. त्यांनी रावबहादुर देवल व क्लेमेंटस् यांच्यासोबत संगीतात केलेल्या नव्या प्रयोगांची हकीगत यापूर्वी सांगितलेली आहे. संगीतकार केशवराव भोळे म्हणतात की अब्दुल करीमखाँ यांची संगीतातील श्रुतींविषयीची कामगिरी प्रशंसनीय आहे. श्रुती मनुष्याने आपल्या आवाजातच ऐकून प्रथम जाणल्या, वाद्यांतून नव्हे, असा त्यांचा सिद्धांत होता. निरनिराळ्या रागांमध्ये वापरल्या जाणाऱ्या २७ श्रुती ते स्वतः गळ्यातून काढून दाखवत असत (केशवराव भोळे : ०७). भारतीय संगीताचे मूळ स्वरसप्तक कोणते असा त्या काळात एक वाद होता. अब्दुल करीमखाँ यांनी प्राचीन ग्रंथांच्या आधारे शोध घेऊन भैरवी रागाचे स्वर सप्तक हे मूळ सप्तक असल्याचे नक्की केले. हे स्वर सप्तक त्यांनी १९३४मध्ये मद्रास येथे भरलेल्या संगीत परिषदेत वीणा, सतार इत्यादी वाद्यांच्या सहाय्याने वाजवून दाखवले (बाळकृष्ण कपिलेश्वरी १९७२ : ४५०).

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्रात आलेले बंदेअली, रहिमतखाँ, नथ्थनखाँ, अल्लादियाखाँ, अब्दुल करीमखाँ यांच्यासारख्या उत्तर भारतीय गायकांच्या प्रभावामुळे व महाराष्ट्रातून गायनकला शिकण्याच्या उद्देशाने बाहेर पडलेले संगीतप्रेमी बव्हंशी ग्वाल्हेर-इंदौरकडेच जाऊन गाणे शिकल्यामुळे महाराष्ट्रातील धृपदापासून लावणीपर्यंतचे पारंपरिक गायनप्रकार काहीसे बाजूला पडले; तसेच दक्षिण भारतीय-कर्नाटकी संगीताशी असलेला महाराष्ट्राचा थोडाबहुत अनुबंधही पुसट झाला. त्यामुळे विसाव्या शतकात महाराष्ट्रीय संगीत म्हणजे हिंदुस्थानी संगीत असे समीकरण बनले. हिंदुस्थानी संगीत भावनाविलासी होते तर कर्नाटकी संगीतात भावप्रधानतेला थारा नव्हता; ते तंत्रप्रधान, शास्त्रकठोर होते. मध्ययुगात हिंदुस्थानी संगीत प्रबंध संगीताकडून धृपदाकडे आणि धृपदाकडून ख्याल गायकीकडे असे अधिकाधिक मोकळे, प्रयोगशील होत गेले होते. त्या मानाने दक्षिण भारतीय संगीत स्थितीशील, संकेतबद्धच राहिले होते. महाराष्ट्रात विसाव्या शतकात हिंदुस्थानी संगीताच्या प्रभावामुळे कर्नाटकी संगीताशी जवळजवळ दुरावा निर्माण झालेला असताना अब्दुल करीमखाँ यांच्यासारख्या हिंदुस्थानी संगीतातील तोलामोलाच्या गायकाने मात्र कर्नाटकी संगीताचा आस्थेने विचार केला. त्यांनी या परस्परविरुद्ध संगीतप्रवाहांमध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. या समन्वय

यांत्रिक, वरवरचा नव्हता, तर अधिक मूलभूत स्वरूपाचा होता. "कर्नाटक पद्धतीने रचलेले काही सरगमचे आकृतिबंध घेऊन, ते कर्नाटक पद्धतीने न गाता, हिंदुस्तानी संगीतविस्तारात मुरवून टाकण्याचा त्यांनी घाट घातला....संदर्भ निराळा, आकृतिबंधही ताजा आणि प्रयोगसरणी मात्र रुजलेली व रुचलेली अशी कौशल्यपूर्ण कामगिरी त्यांनी साधली....प्रस्तुत खटाटोप म्हणजे सांगीत दत्तक घेणे ठरत नाही, तर झाडाचे यशस्वी पुनरारोपण म्हणून सिद्ध होते!" अशा शब्दांत अशोक रानडे यांनी अब्दुल करीमखाँ यांच्या या प्रयोगशीलतेचे वेगळेपण सांगितले आहे (अशोक रानडे २०१० : ४८).

अब्दुल करीमखाँ यांनी महाराष्ट्रीय संगीतविश्वात एक नवा पायंडा पाडला, तो म्हणजे जाहीर जलशांचा. संस्थानिकांच्या दरबारातील मैफिली आणि मुंबई-पुण्यासारख्या मोठ्या शहरांतील धनिकांच्या दिवाणखान्यातील खाजगी मैफिली असे दोनच मार्ग या काळातील गवयांना उपलब्ध होते. पण या दोन मर्यादित विश्वांपलीकडे संगीताचा भुकेला असा रसिकवर्ग समाजात तयार होऊ लागला होता. आणि या दोन मर्यादित विश्वांमध्ये प्रत्येक गायकाला संधी मिळेल याची खात्री नव्हती. यावर तोड म्हणून, समाजात विस्तारलेल्या रसिकवर्गाकडे आपले गाणे घेऊन जाणारा पहिला गायक म्हणजे अब्दुल करीमखाँ. त्यांनी तिकीटे लावून संगीताचे जाहीर कार्यक्रम करण्यास प्रारंभ केला. १९०७-०८च्या सुमारास अब्दुल करीमखाँ यांनी सोलापूर येथे असा कार्यक्रम ठेवला. हा कार्यक्रम कल्पनेपलीकडे यशस्वी झाला. त्यानंतर त्यांनी अशा जाहीर जलशांचा धडाकाच लावला. सुरुवातीला इतर गायकांना अब्दुल करीमखाँ यांचा हा मार्ग रुचला नाही. त्यांनी संगीतकला 'रस्त्यावर आणली' असाही आरोप भास्करबुवा बखले, विष्णू दिगंबर पलुस्कर यांनी केला. परंतु काही वर्षांतच या दोघांसह इतर गायकांनाही जाहीर जलशांचाच मार्ग पत्करावा लागला (बाळकृष्ण कपिलेश्वरी १९७२ : ४५४). सन १९२७मध्ये मदन थिएटर्सचे मालक बिलिमोरिया यांनी त्यांच्या मालकीची भारतातली सर्व थिएटर्स अब्दुल करीमखाँ यांच्या जलशांसाठी खुली करून दिली. त्यानंतर भारतभर अब्दुल करीमखाँ यांचे कार्यक्रम अशा मोठ्या थिएटर्समध्ये होऊ लागले (बाळकृष्ण कपिलेश्वरी १९७२ : ८१५).

अब्दुल करीमखाँ हुबळी येथे असताना १९०८साली रामभाऊ कुंदगोळकर, अनंतराव गाडगीळ यांनी त्यांचा गंडा बांधला. रामभाऊ कुंदगोळकर हे पुढे सवाई गंधर्व या नावाने विख्यात झाले. पुढे सवाई गंधर्व यांचे शिष्य मास्टर कृष्णराव, गंगूबाई हनगल, भीमसेन जोशी, फिरोझ दस्तूर यांच्या माध्यमातून अब्दुल करीमखाँ यांची गायकी पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचली. अब्दुल करीमखाँ यांचा मुलगा सुरेशबाबू माने आणि मुलगी हिराबाई बडोदेकर हे विसाव्या शतकाच्या चौथ्या-पाचव्या दशकांत नावाजलेले गायक. अर्थात, त्यांना खुद्द अब्दुल करीमखाँ यांची तालीम फारशी मिळाली नाही. पण किराणा

घराण्याची गायन-परंपरा त्यांनी पुढे चालवली. त्याशिवाय विश्वनाथबुवा जाधव (कोल्हापूर), दशरथबुवा मुळे, बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी हे अब्दुल करीमखाँ यांचे शिष्य पुढील काळात विशेष प्रसिद्धीस आले.

अब्दुल करीमखाँ यांचे आणखी एक कार्य म्हणजे त्यांनी तिकिटे लावून गवयांचे कार्यक्रम, जाहीर जलसे आयोजित करायला सुरुवात केली. थिएटरमध्ये गाणे म्हणणे त्या काळातले अनेक नामवंत गवयी कमीपणाचे समजत. तसे गाणे म्हणणाऱ्यांकडे ते तुच्छतेने बघत. ही मानसिकता बदलण्याचा यशस्वी प्रयत्न अब्दुल करीमखाँ यांनीच सर्वप्रथम केला.

**आग्रा घराण्याचे संगीत : नथ्थनखाँ यांची परंपरा**

हिंदुस्थानी संगीतातील आग्रा घराण्याचे प्रसिद्ध गायक नथ्थनखाँ (?-१९०१) यांची गायकी अल्लादियाखाँ आणि अब्दुल करीमखाँ यांच्याही आधीपासून महाराष्ट्राला परिचित होती. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात नथ्थनखाँ दक्षिणेत म्हैसूर संस्थानात नोकरीला होते. दरवर्षी म्हैसूर नरेशांच्या जूनमधील जन्मगाठीच्या उत्सवापासून दसऱ्यापर्यंत त्यांचे वास्तव्य म्हैसूरला असे. त्यानंतरचे आठ महिने ते इतरत्र संचार करत (ना. सी. फडके १९६२ (२) : १२). या काळात बऱ्याचदा महाराष्ट्रात अनेक ठिकाणी त्यांच्या गाण्याचे कार्यक्रम खाजगी मैफिलींमध्ये होत असत. १८९४मध्ये बडोद्याच्या दरबारात अल्लादियाखाँ, रहिमतखाँ आणि नथ्थनखाँ या तिघाही गायकांचे एकाच वेळी कार्यक्रम झाले होते. १८९७मध्ये कोल्हापूरच्या छत्रपती शाहूमहाराजांच्या मुलाच्या बारशाच्या निमित्ताने झालेल्या संगीतोत्सवात नथ्थनखाँ यांचे गाणे झाले होते. त्या वेळी महिनाभर त्यांचे कोल्हापुरात वास्तव्य होते (उपरोक्त).

नथ्थनखाँ यांच्या गायनाच्या प्रभावामुळे त्यांचा शिष्यपरिवार महाराष्ट्रात वाढू लागला. अल्लादियाखाँ यांनी १८९२-९३च्या सुमारास मुंबईत सर्वप्रथम आल्यावर पहिल्याच मैफिलीत जिच्या गाण्यानंतर आपले गाणे सादर केले होते, ती बाबलीबाई ही नथ्थनखाँ यांची शिष्या होती आणि तिच्या गायनाची एवढी प्रसिद्धी होती की तिच्यानंतर गाण्याचे धाडस कोणी करत नसे. नथ्थनखाँ यांचा मुलगा विलायतखाँ हे विसाव्या शतकाच्या दुसऱ्या-तिसऱ्या दशकापर्यंत मुंबईचे रहिवासी होते. त्यांनी इंदिराबाई वाडकर, नार्वेकर, सरस्वतीबाई फातरफेकर यांना आग्रा घराण्याचे संगीत शिकवले. विलायतखाँ यांचे तालावर विशेष प्रभुत्व होते. अब्दुल करीमखाँ यांनी मुंबईत आल्यावर मोगुबाई कुर्डीकर यांना तालीम देणे बंद केल्यानंतर काही काळासाठी त्या विलायतखाँ यांच्याकडे गाणे शिकत होत्या. ते पाहून नंतर अब्दुल करीमखाँ यांनी आग्रहाने आपला भाऊ हैदरखां याच्याकडे त्यांना गाणे शिकायला लावले. अशा रीतीने मोगुबाई कुर्डीकर यांना काही काळ आग्रा घराण्याची तालीम मिळाली. विलायतखाँ यांचा भाचा खादीम हुसेन हा देखील

विलायतखाँ यांच्याकडेच गाणे शिकला. पुढे ज्योत्स्ना भोळे या खादिम हुसेन यांच्या शिष्या बनल्या.

नथ्थनखाँ यांच्याकडून संगीत शिकलेला प्रमुख महाराष्ट्रीय गायक म्हणजे भास्करबुवा बखले. भास्करबुवांच्या तीन प्रमुख गुरूंपैकी नथ्थनखाँ एक होते. अशा रीतीने महाराष्ट्रीय संगीतविश्वाला प्रभावित करणारे उत्तर भारतीय कलावंत म्हणून अल्लादियाखाँ, अब्दुल करीमखाँ, रहिमतखाँ यांच्यासोबत नथ्थनखाँ यांचेही नाव घ्यावे लागते.

**महाराष्ट्रातील प्रयोगशील हिंदुस्थानी संगीत :**
**भास्करबुवा बखले व रामकृष्णबुवा वझे**

अशा रीतीने वरील गायकांच्या माध्यमातून हिंदुस्थानी संगीतातील महत्त्वाच्या घराण्यांचे गाणे महाराष्ट्रात प्रवाही झाले. येथील मुंबई-पुण्यापुरतेच मर्यादित न राहता, तर मिरज, सांगली, नाशिक, अमरावती अशा शहरांमध्ये देखील हे संगीत पोहोचले. वरील प्रत्येक घराण्यातील संगीताचे आपापले वैशिष्ट्य होते. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, रहिमतखाँ यांच्या ग्वाल्हेर घराण्याच्या गायकीचे स्वरूप बरेचसे साधेसरळ होते. नुसत्या अस्ताई-अंतऱ्याच्या उच्चाराने रागस्वरूप समोर उभे करण्याबद्दल हे घराणे नावाजलेले होते. नथ्थनखाँ यांचे आग्रा घराणे हे लयकारी व तान-बोलतान यासाठी अधिक प्रसिद्ध होते. अल्लादियाखाँ यांचे जयपूर घराणे कूटतानांबद्दल, तऱ्हेवाईक मुश्किल अशा तानक्रियेबद्दल प्रसिद्ध होते; तर अब्दुल करीमखाँ यांचे किराणा घराणे नितांतमधुर विलंबतीसाठी व स्वरविस्तारासाठी ओळखले जात होते.

हिंदुस्थानी संगीताची ही सर्व रूपे महाराष्ट्रात विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात अवतीर्ण झाली. बहुतेक गायकांचा प्रयत्न आपापल्या घराण्याच्या गायकीची प्रचलित रीत सांभाळून संगीतसाधना करण्याचा असे. बरेच गुरू तर आपल्या शिष्यांना इतर घराण्यांच्या शिकवणुकीचा वारा लागू नये यासाठी दक्ष असत. परंतु काही कलावंत मात्र घराण्यांची ही बंधने न मानता आपली संगीतकला जोपासण्याचा, तिच्यात वृद्धी करण्याचा प्रयत्न करत. महाराष्ट्रात असे प्रयत्न करणारे नामांकित गायक म्हणजे भास्करबुवा बखले व त्यांच्या खालोखाल रामकृष्णबुवा वझे हे दोघे होत. त्यातही भास्करबुवा बखले यांची संगीतातील प्रयोगशील वृत्ती, जाणीवपूर्वक त्यांनी विविध घराण्यांतील गायकांकडून आत्मसात केलेली संगीतकौशल्ये आणि आपल्या गायकीत त्या कौशल्यांचा घातलेला मिलाफ यांसाठी त्यांचे विशेष नाव घेतले जाते. भास्करबुवांप्रमाणे रामकृष्णबुवा वझे यांनीही विविध घराण्यांच्या गायकीचा अभ्यास करून स्वतःची वाट निर्माण केली. नेमके हेच दोघे प्रयोगशील संगीतकार विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातल्या मराठी संगीत रंगभूमीशी जोडले गेले आणि त्यामुळे त्यांच्या

प्रयोगशीलतेचा प्रभाव मराठी नाट्यसंगीतावर देखील मोठ्या प्रमाणावर पडला. या मराठी नाट्यसंगीतानेच या काळातील महाराष्ट्रीय समाजाची संगीताभिरुची अधिक प्रमाणात प्रभावित केलेली असल्यामुळे एकप्रकारे विसाव्या शतकातील महाराष्ट्रीय संगीताभिरुचीला वळण लावणारे कलावंत म्हणून या दोन संगीतकारांकडे पाहिले पाहिजे.

भास्करबुवा बखले (१८६९-१९२२) हे मुळात किर्लोस्कर नाटक मंडळीत १८८४मध्ये गायकनट म्हणून रुजू झाले. किर्लोस्कर मंडळीच्या 'रामराज्यवियोग' या नाटकातील कैकयीच्या भूमिकेत ते सर्वप्रथम उभे राहिले. पण त्यांना अभिनयापेक्षाही संगीतकलेचे आकर्षण अधिक होते. म्हणून कंपनीच्या दौऱ्यांच्या निमित्ताने ते ज्या शहरात जात तिथल्या जाणकार गवयांकडून गाणे शिकण्याचा उपक्रम करत. असे म्हणतात की एकदा भाऊराव कोल्हटकरांनी भास्កररावांच्या संगीतप्रेमाची हेटाळणी केली; तेव्हा ते सहन न होऊन त्यांनी कंपनी आणि नाटक सोडले, ते कायमचे. त्यानंतर त्यांनी कठोरपणे संगीतसाधना केली. वेगवेगळ्या गायकांच्या सान्निध्यात राहून मधुकरवृत्तीने त्यांनी गायनकलेचे ज्ञान मिळवले. बडोद्याला असलेले फैज महंमदखाँ या गायकाकडे ते सर्वप्रथम गेले. फैज महंमदखाँ यांच्याकडे पाच वर्षे गाणे शिकल्यानंतर त्यांच्याच सल्ल्यावरून भास्करबुवा म्हैसूर दरबारातील प्रसिद्ध गायक नथ्थनखाँ यांच्याकडे गेले. त्यांच्या हाताखाली ते साडेपाच वर्षे संगीतसाधना करत राहिले. संगीतासाधनेत जवळजवळ एक तप घालवल्यानंतर, गायक म्हणून संस्थानिकांचे आश्रित होण्याचा पारंपरिक मार्ग सोडून भास्करबुवांनी नवा मार्ग स्वीकारला : धारवाड येथील ट्रेनिंग कॉलेजमध्ये त्यांनी गायन-शिक्षक म्हणून नोकरी पत्करली. ही नोकरी करत असतानाही त्यांचे संगीताचे अध्ययन सुरूच होते. सहा महिनेपर्यंत त्यांनी बीनकार बंदेअलीखाँ यांचे शिष्यत्व पत्करले. त्यानंतर कोल्हापूरला असलेल्या अल्लादियाखाँ यांच्या सहवासात संधी मिळेल तेव्हा राहून त्यांनी संगीताचे आणखी ज्ञान मिळवले (फडके १९६२ [२] : २९-३२).

स्वतंत्र वृत्तीचे भास्करबुवा धारवाडच्या नोकरीत दोनच वर्षे राहिले. त्यानंतर नोकरी सोडून भास्करबुवा मुंबईला आले, आणि गाण्याच्या शिकवण्या घेऊन आणि गाण्याच्या मैफली भरवून जगण्याचा मार्ग त्यांनी स्वीकारला. विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून भास्करबुवा बखले हे महाराष्ट्रीय संगीतक्षेत्रातील एक ठळक नाव बनले.

भास्करबुवांचे पहिले गुरू फैज महंमदखाँ हे ग्वाल्हेर घराण्याचे गायक होते. त्यांच्याकडून भास्करबुवांनी आलाप आणि ख्याल बढत यांचे कौशल्य मिळवले. फैज महंमदखाँ यांनी त्यांना दोनशे ते तीनशे चिजा शिकवल्या. नथ्थनखाँ यांच्याकडून ते आग्रा शैलीतले संगीत शिकले, तर जयपूर घराण्यातील तान आणि इतर गायकी ते अल्लादियाखाँ यांच्याकडून शिकले (शर्मा २०१४ : २५२). या तीनही गुरूंच्या

गायनवैशिष्ट्यांच्या छटा भास्करबुवांच्या गायनात दिसून येत. "पहिल्या प्रतीच्या तीन गुरूंपासून प्रयत्नपूर्वक मिळविलेल्या तीन प्रकारांच्या गायकीचं भास्कररावांनी चिंतनपूर्वक संकलन केलं होतं, आणि यामुळे गायनसौंदर्याच्या तीन तऱ्हांचा मोठा मनोहर त्रिवेणी संगम त्यांच्या मैफलीत आढळत असे. या संगमातले तीन प्रवाह स्पष्ट ओळखता आल्यामुळे जाणत्या लोकांना तर भास्कररावांच्या गाण्यापासून विशेष आल्हाद होत असेच, परंतु श्रोत्यांमध्ये जी सामान्य माणसं असत त्याना देखील येवढं सहज कळत असे की इतर कुठे ऐकायला न मिळणारी अशी आल्हाददायक गायकी आपण ऐकत आहोत." (फडके १९६२ [२] : ३३).

भास्करबुवांचा आवाज मूळचा मधुर नव्हता, पण अमर्याद मेहनत करून कमावलेल्या आवाजाची गोडी त्यांच्या आवाजात होती. भास्करबुवा ध्रुपद, ख्याल, ठुमरी, टप्पा, अष्टपदी, भजने, नाट्यगीते आणि कधी कधी तर लावणी देखील गात असत. हे सर्व प्रकार त्यांच्या मैफलीत ऐकायला मिळत.

आयुष्याच्या अखेरच्या काही वर्षांत भास्करबुवांनी सातत्याने गाण्यांच्या मैफली केल्या. ना. सी. फडक्यांच्या आठवणीनुसार या काळात पुण्या-मुंबईत असा एकही आठवडा जात नसे की त्यात भास्करराव बखले यांची दोन गाणी झाली नाहीत. त्यांचा बिदागीबाबत काही हट्ट नव्हता; लोकांना मनमुराद गाणे ऐकवण्याचे त्यांना वेड होते. मुंबईत भास्करबुवा शास्त्रीहॉलमध्ये राहात असत. तिथे चातुर्मासात दर एकादशीला ते गात. हे गाणे सर्वांसाठी खुले होते. चातुर्मास संपला की आठ आण्याची बिदागी म्हणून त्यांना फक्त एक श्रीफळ अर्पण केले जाई. त्याचप्रमाणे दरवर्षी ते आपल्या घरी वसंतपंचमीचा उत्सव करत. या उत्सवात मियाँजान, कालेखाँ, कुदरतुल्ला, बरकतुल्ला, इस्माईल अशा मोठमोठ्या गायकांचे गाणे ठेवत आणि त्यांना देणग्याही देत (फडके १९६२ [२] : ३७).

भास्करबुवा बखले यांच्या गायनकलेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ती केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित राहिली नाही. त्यांच्या गायनाला उत्तर भारतातही उदंड प्रतिसाद मिळाला. शिकारपूर येथील 'हंडा उत्सव', जालंदर येथील हरवल्लभ मंदिरातील उत्सव, अशा उत्सवांत गाण्यासाठी त्यांना दरवर्षी निमंत्रण असे. लाहोर, अमृतसर येथेही त्यांच्या गायनाचे कार्यक्रम दरवर्षी होत. माईकलाऊडस्पीकर नसण्याचा तो काळ होता. अशा काळात उत्तर भारतात भरणाऱ्या या मैफिलींमध्ये भास्करबुवा बखले चार-पाच हजार श्रोत्यांसमोर आपले गाणे सादर करत असत. इतक्या मोठ्या संख्येने जमलेले श्रोते सलग पाच-सहा तास भास्करबुवांचे गाणे ऐकत. थंडीच्या दिवसांत हे जलसे होत. "जालंदर येथील गाण्याच्या वेळेस प्रत्येक दहा श्रोत्यागणिक एक शेगडी अशा चारपाचशे शेगड्या श्रोत्यांमध्ये ठेवलेल्या असत. आणि भास्करबुवांच्या दोन्ही बाजूसहि धगधगत्या

निखाऱ्याच्या शेगड्या फुललेल्या असत. तानांचे सट्टे मारायचे, उजव्या किंवा डाव्या बाजूच्या शेगडीवर हात शेकून घ्यायचे, आणि पुन्हा तानांचे सट्टे सुरू करायचे, असा भास्करबुवांचा गंमतीदार क्रम चालत असे." (फडके १९६२ [२] : ३८). लोकस्मृतीमधले हे दृश्य महाराष्ट्रीय संगीताच्या इतिहासात नोंदवून ठेवण्याइतपत उल्लेखनीय नक्कीच आहे.

भास्करबुवांच्या संगीतविद्येचा महाराष्ट्रीय नाट्य-संगीत क्षेत्रावर खोलवरचा परिणाम झाला. भास्करबुवांनी मधुकरवृत्तीने आत्मसात केलेले गाणे बहुआयामी होते. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस हिंदुस्थानी संगीताशी महाराष्ट्रीय संगीतरसिकांचा परिचय झाला होता. परंतु ते संगीत प्रामुख्याने ग्वाल्हेर घराण्याशी संबंधित होते. या घराण्यातील हद्दू-हस्सू खाँ यांच्या परंपरेतले अनेक गायक दक्षिण भारतात, महाराष्ट्रात आले. रहिमतखाँ, बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांचे गाणे महाराष्ट्र ऐकत होता. पण या सर्व गायकांच्या तोंडून ठरावीक रागिणीच ऐकायला मिळत. अशा रुळलेल्या पंचवीसतीस रागिणींपलीकडचे शास्त्रीय संगीत महाराष्ट्रीय संगीतरसिकांच्या कानापर्यंत पोहोचत नव्हते. ते भास्करबुवांनी ऐकवले. शामकल्याण, खंबावती, दुर्गा, बिहागड, काफी, कानडा, सुहा कानडा, गौरी, पट बिहाग, खोखर, सावनी, विलासखानी तोडी, खट अशा अनेक रागांचा महाराष्ट्राच्या संगीतविश्वात प्रवेश भास्करबुवांच्याच गायकीतून सर्वप्रथम झाला. "भास्करबुवांच्या गाण्यामुळे किती तरी राग 'मुश्किल' या सदरातून 'मामुली' या सदरात येऊन पडले." (फडके १९६२ [२] : ३५).

कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचे 'स्वयंवर' हे मराठी रंगभूमीवर लोकप्रियतेचा उच्चांक स्थापन करणारे नाटक. या नाटकाला भास्करबुवा बखले यांचे संगीत होते. जे कार्य त्यांनी मैफलींच्या माध्यमातून केले, तेच 'स्वयंवर'चे संगीतकार म्हणूनही केले. तोवरचे मराठी नाटकांतील पदांचे संगीत यमन, पिलु इत्यादी ठरावीक रागांवर बांधलेले असे. भास्करबुवांनी 'स्वयंवर' मधल्या पदांसाठी सूरदासी मल्हार, वृंदावनी सारंग अशा वेगळ्या अपरिचित रागिणी मुद्दाम निवडल्या. त्यांतल्या काही उत्तम चिजा निवडून त्याबरहुकूम पदे नाटककार खाडिलकर यांच्याकडून लिहवून घेतली आणि बालगंधर्वांना या पदांचे गायन शिकवताना त्यांना मूळ चिजांचीही तालीम दिली. त्यामुळे 'स्वयंवर' नाटकाला एखाद्या भरगच्च संगीत मैफलीचेच स्वरूप प्राप्त झाले आणि हे नाटक महाराष्ट्रीय संगीतरसिकांचे सर्वाधिक आवडते नाटक ठरले. या पदांमुळे अनेक अपरिचित राग महाराष्ट्रात सर्वदूर पोहोचले, आणि घराघरातल्या तरुण-तरुणींच्या तोंडी ऐकू येऊ लागले. महाराष्ट्रीय संगीतश्रोत्यांची अभिरुची एकप्रकारे उंचावण्याचे कार्य भास्करबुवांच्या या संगीतरचनेतून झाले, असे म्हटले पाहिजे.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रीय संगीतक्षेत्रात भास्करबुवांच्या अनेक

शिष्यांनी नाव मिळवले. या काळातल्या संगीत रंगभूमीवर देखील भास्करबुवांच्या शिष्यांचा प्राधान्याने वावर होता. मा. कृष्णराव फुलंब्रीकर, गोविंदराव टेंबे, बालगंधर्व, ताराबाई शिरोडकर, बापूराव केतकर, नरहरीबुवा पाटणकर, रामकृष्णबुवा वझे, सवाई गंधर्व, केसरबाई केरकर हे गायक भास्करबुवांच्या तालमीत गायकी शिकले होते. भास्करबुवांच्या निधनानंतर त्यांच्या तालमीत तयार झालेल्या या गायकांच्या आवाजाच्या रूपात भास्करबुवांचे संगीत मराठी रंगभूमीवर व संगीतरसिकांमध्ये बराच काळ टिकून राहिले.

भास्करबुवा बखले यांच्याप्रमाणे रामकृष्णबुवा वझे (१८७२-१९४३) यांचेही गाणे घराण्यांच्या चाकोऱ्या मोडणारे म्हणून प्रसिद्ध होते. रामकृष्णबुवा वझे हे मूळचे कोकणातले, सावंतवाडीजवळच्या ओझरे गावचे. लहानपणापासून संगीताचे वेड. अगदी लहान वयापासून कागल येथे बळवंतराव पोहरेबुवा यांच्याकडे गाणे शिकू लागले. ते पोहरेबुवा इनायत हुसेन यांचे शिष्य होते. नंतर १८८२च्या सुमारास मालवणला विठोबा अण्णा हडप यांच्याकडे वर्षभर शिक्षण घेतले. पण अधिक संगीत शिकण्याची भूक स्वस्थ बसू देईना. अशात ग्वाल्हेरला जाण्याची संधी मिळताच तिथे जाऊन त्यांनी ग्वाल्हेर घराण्याचे निसारहुसेनखाँ यांचे शिष्यत्व पत्करले. त्यानंतर जयपूर येथील महम्मदखाँ यांच्याकडेही त्यांनी थोडी तालीम घेतली. अतिशय कष्टपूर्वक त्यांनी ही कला मिळवली. त्यानंतरही रामकृष्णबुवा मधुकरवृत्तीने संगीत शिकत गेले. मिळतील तिथून बंदिशी गोळा केल्या. त्यामुळे १९०६मध्ये, वयाच्या पस्तिशीतच ते रहिमतखाँ यांच्यासारख्या नामवंत गायकासोबत स्पर्धात्मक सादरीकरणात उतरण्याइतपत तयार झाले होते.

वझेबुवांनी विविध सांगितिक प्रभाव पचवले आणि त्यातून आपली स्वतःची खास गायनशैली सिद्ध केली. त्यामुळे त्यांच्या गायकीला विशिष्ट घराण्याचे लेबल लावता येत नसे. बी. आर. देवधर म्हणतात, " 'वझे गायकी' हेच नाव या गायकीला योग्य होईल." (देवधर : ११४).

वझेबुवांचा शिष्यसंप्रदाय मोठा होता. त्यांचा मुलगा शिवरामबुवा वझे यांच्यासह गजाननबुवा जोशी, भास्करबुवा जोशी, हरिभाऊ घांग्रेकर, गुरूराव देशपांडे, विनायकबुवा पटवर्धन, कागलकरबुवा हे त्यांचे प्रसिद्ध शिष्य होते. केशवराव भोसले, बापूराव पेंढारकर, दीनानाथ मंगेशकर या त्यांच्या शिष्यांनी मराठी रंगभूमी गाजवली.

खुद्द रामकृष्णबुवा वझेंनी मराठी रंगभूमीवर संगीतकार म्हणून दैदिप्यमान कामगिरी बजावली. १९२२ ते १९३२ या दशकात केशवराव भोसले यांच्या ललितकलादर्श नाट्यसंस्थेच्या 'सत्तेचे गुलाम', 'तुरुंगाच्या दारात', 'कृष्णार्जुन युद्ध', 'संगीत श्री', 'शिक्का कट्यार', 'रणदुर्दुभि' आणि 'सोन्याचा कळस' या नाटकांना त्यांनी संगीत दिले. विशेष म्हणजे संगीत नाटकांच्या दृष्टीने हा उतरणीचा काळ होता. "पं. वझेबुवांनी संगीत दिलेल्या

नाटकांपैकी निदान चार नाटके मूलतः गद्य नाटके होती व त्यांचे संगीत नाटकांत नंतर रूपांतर करण्यात आले होते,...याचा अर्थ असा की, काही प्रमाणात पं. वझेबुवा संगीतरचनेत एक नवे नसले तरी विरळा पाऊल उचलत होते. मूळ नाटकात संगीतासाठी जागा नसता ते संगीताला जागा करून घेत संगीत देत होते." (अशोक रानडे २०१० : २५). मराठी नाट्यसंगीताला हिंदुस्थानी रागदारी संगीताचे वळण लावण्याचे कार्य भास्करबुवा बखले आणि रामकृष्णबुवा वझे यांनी प्रामुख्याने केले.

अशी प्रयोगशील वृत्ती पुढील पिढीतील गायकांमध्येही दिसून आली. गजाननबुवा जोशी (१९११-१९८७) हे आधी ग्वाल्हेर घराण्याची गायकी शिकले. वझेबुवांकडून गाणे शिकताना गजाननबुवांनी त्यांच्याकडून विविधप्रवाही संगीतात मेळ घालण्याची दृष्टीही आत्मसात केली असावी. ग्वाल्हेर घराण्याच्या गायकीनंतर गजाननबुवा जयपूर घराण्याची परंपरा भुर्जीखाँ यांच्याकडून शिकले. त्यानंतर विलायतखाँ यांचे शिष्यत्व पत्करून त्यांनी आग्रा घराण्याची गायनकौशल्ये प्राप्त करून घेतली. अशा रीतीने विविध अंगांनी आपले गाणे समृद्ध करण्याचा उपक्रम गजाननबुवा जोशी यांनी केला. कुमार गंधर्व (१९२४-१९९२) हे आणखी एक उदाहरण. त्यांची संगीतक्षेत्रातील कारकीर्द खऱ्या अर्थाने १९५४पासून सुरू होते; परंतु वयाच्या बाराव्या वर्षी, १९३६मध्येच, मुंबईत झालेल्या त्यांच्या गाण्याने सर्वजण दिपून गेले होते. त्यानंतर विष्णू दिगंबर पलुस्कर यांचे शिष्य बी. आर. देवधर यांच्याकडे कुमार गंधर्व दहाबारा वर्षे गाणे शिकले. परंतु या दरम्यान त्यांना क्षयाची बाधा झाल्याने मध्य प्रदेशात माळव्यातील देवास येथे ते राहू लागले. या वास्तव्यात माळव्यातील लोकपरंपरांमधील लोकसंगीताचा त्यांनी मोठा संग्रह केला; त्याचा अभ्यास केला आणि तोवर आत्मसात केलेल्या संगीत-ज्ञानाशी त्याचा मेळ घालत, नवे राग, नव्या रचना तयार केल्या. कुमार गंधर्वांना संगीताची स्वतंत्र वाट या प्रयोगातून गवसली.

महाराष्ट्रीय संगीत-कलावंतांच्या या कामगिरीचा विचार करताना हिंदुस्थानी संगीत आणि महाराष्ट्रीय संगीतविश्व यांच्यातील परस्परसंबंधाकडे इथे लक्ष वेधणे योग्य ठरेल. उत्तर भारतीय गायकांचे महाराष्ट्रातले वास्तव्य आणि महाराष्ट्रीय गायकांचे उत्तर भारतीय संगीताविषयीचे आकर्षण - यांमुळे विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून हिंदुस्थानी संगीतातील विविध परंपरा महाराष्ट्रात रुजल्या. हिंदुस्थानी संगीत हेच महाराष्ट्रीय संगीत बनले, हे याआधी सांगितले आहे. पण याला दुसरी बाजूही आहे. भास्करबुवा बखल्यांसारखा हिंदुस्थानी संगीतातील विविध घराण्यांचे प्रवाह आत्मसात करून, पचवून, स्वतःची गायकी सिद्ध करणारा गायक उत्तर हिंदुस्थानात पंजाबापर्यंत मैफिली गाजवू लागला. १९१०नंतर पंजाब व सिंध प्रांतात त्यांना गायनाची दरवर्षी निमंत्रणे येत. एका महाराष्ट्रीय गायकाने हिंदुस्थानी संगीतात राष्ट्रीय पातळीवर आपले स्थान निर्माण

करणे वैशिष्ट्यपूर्ण होते. त्याचबरोबर विष्णू दिगंबर पलुस्कर यांनी संगीताचे आधुनिक रीतीने, पद्धतशीर शिक्षण देण्याचे नवे पर्व भारतात सर्वप्रथम सुरू केले. त्यांचे हे कार्य लाहोरपासून सुरू झाले, तिथल्या काही वर्षांच्या वास्तव्यात त्यांनी उत्तर भारतातील संगीतविश्वावर बराच प्रभाव टाकला. पलुस्करांचे गाणे पंजाबी रसिकांना एवढे आवडले देशभर प्रसिद्ध असलेल्या जालंदरच्या हरवल्लभ मेळाव्यात त्यांचे गाणे १८९८ ते १९०७ या काळात दरवर्षी अव्वल ठरत होते. पलुस्करांचे समकालीन असलेले विष्णू नारायण भातखंडे हे भारतीय संगीताचे व्याकरण रचणारे पंडित म्हणून ओळखले जातात. त्यांनी लिहिलेल्या 'हिंदुस्थानी संगीत पद्धती' या चतुःखंडीय ग्रंथाला आजही संगीतशास्त्राचा पायाभूत शास्त्रीय ग्रंथ म्हणून देशभर मान्यता आहे. अशा प्रकारे भास्करबुवा बखले, पलुस्कर, भातखंडे या महाराष्ट्रीय संगीत-कलावंतांनी हिंदुस्थानी संगीताच्या वाटचालीत विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात राष्ट्रीय पातळीवर महत्त्वाची व ऐतिहासिक स्वरूपाची भर घातली आहे. महाराष्ट्राने हिंदुस्थानी संगीताचा केवळ स्वीकार केला नाही, तर हे संगीत पचवून, त्याचा विकास करण्यातही मोलाची कामगिरी बजावली आहे.

## १०.४ महाराष्ट्रीय मध्यमवर्गातील संगीतकलेचा प्रसार

विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून पांढरपेशा मध्यमवर्गात संगीताचा 'कान' असणारा एक वर्ग तयार होऊ लागला. गेल्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्रातल्या संगीत रसिकांची हिंदुस्थानी संगीतपरंपरेशी ओळख झाली. या काळात कोकण, दक्षिण महाराष्ट्र या प्रदेशातील अनेक ब्राह्मण तरुणांना संगीताची प्रेरणा झालेली दिसते. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांच्यापासून रामकृष्णबुवा वझे यांच्यापर्यंत अनेकांनी मध्य-उत्तर भारतात जाऊन संगीत-साधना केली.

याच दरम्यान उत्तर भारतातल्या संस्थानिक-जहागिरदारांच्या आश्रयाला असलेल्या गवयांपैकी काही दक्षिणेकडे सरकले. बडोदा, कोल्हापूर, कागल, सांगली, मिरज, सातारा, नागपूर येथील संस्थानिकांचे दरबार जसे या काळात संगीत कलावंतांचे आश्रयस्थान होते, तसेच आर्थिकदृष्ट्या भरभराटीला आलेले मुंबई शहर देखील गवई व वादक यांचा चरितार्थ चालवण्याची ऐपत बाळगून होते. धनिक लोकांच्या घरी गाण्याच्या खाजगी मैफिली भरत. त्यात त्यांच्या आप्तमित्रांना, निमंत्रितांना प्रवेश असे. मुंबईतल्या पारशी लोकांना संगीताची गोडी होती. या मंडळींनी मुंबई शहरात १८८४पासून 'पारशी गायनोत्तेजन मंडळी' नावाची संस्था चालवली होती. गायकांचे कार्यक्रम तर ही संस्था आयोजित करीच, पण संगीत शिक्षण देण्याचे उपक्रमही राबवले जात (अशोक रानडे २०१० : ०३). वीणावादक मंगेशराव तेलंग आणि पुरुषोत्तमराव तेलंग हे बंधूद्वय मुंबईतले संगीतक्षेत्रातले बडे प्रस्थ होते. त्यांचे घर गवई व कलाकारांनी नेहमी भरलेले असे.

विसाव्या शतकाच्या पहिल्या-दुसऱ्या दशकात मुंबईत येणारे नावाजलेले गवई त्यांच्या घरी उतरत. गवईबंधूंच्या शिफारशीनंतरच या गवयांना इतरत्र कार्यक्रमाची निमंत्रणे येत (बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी १९७२ : ३३४). बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी यांनी या काळातील मुंबई शहरातील संगीतकलेच्या आश्रयदात्यांची एक यादी दिली आहे. ती पुढीलप्रमाणे - डॉ. नागूताई जोशी, डॉ. काशीबाई नवरंगे, शांताराम नारायण तथा बाबासाहेब दाभोळकर, सेंट्रल बँकेचे संस्थापक सोराबजी पोचखानवाला, सोहराब बनाजी, शेठ खरशेटजी सोनावाला, 'इंदुप्रकाश' पत्राचे व मराठी पुस्तकांचे प्रकाशक दामोदर सावळाराम यंदे, 'मुंबई समाचार'चे संपादक सोराबजी कापडिया, 'क्रॉनिकल', 'मुंबई समाचार' इत्यादी पत्रांचे मालक शेठ नवरोजी बेळगाववाला, हीरजीभाई दलाल, शेठ माधवदास पास्ता, बडे मंदिरचे गोकुळदास महाराज इत्यादी (उपरोक्त : ६७०-७१).

मात्र महाराष्ट्रीय मध्यमवर्गात संगीतकलेविषयी फार प्रेम नव्हते. उदाहरणार्थ, कोल्हापुरात संगीताने भारलेले वातावरण असले, तरी आपल्या घरातील तरुण मुलगा संगीतकलेच्या वाटेला लागू नये अशीच मध्यमवर्गीय पालकांची इच्छा असे. याचे एक मुख्य कारण गाण्याचा नाद लागलेला तरुण नाटकात जातो, अशीही त्या काळी दृढ समजूत होती. आणि नाटक ही व्यसनी, छंदीफंदी लोकांची हलकी कला समजली जात असे. गोविंदराव टेंबे (१८८१-१९५५) यांना लहानपणीच गाण्याची आवड निर्माण होऊन ते ऐकलेले गाणे स्वतः वेळोवेळी गाऊन पाहू लागले, तेव्हा वडील रागाने त्यांना म्हणाले, "गोद्या लेका! सारखा ताना मारीत असतोस! नाटकात पळून जाणार आहेस वाटतं? शालू नेसायची हौस आहे?" टेंबे सांगतात, "अलीकडे वीस-पंचवीस वर्षांत मेळे, प्रार्थनागीते, ग्रामोफोन, रेडिओ, गायनवर्ग इत्यादी उपक्रमांमुळे जितके संगीत लहान मुलांच्या कानांवर अनायासे पडते, त्याच्या एकशतांशदेखील त्या वेळी आमच्या कानांवर पडत नसे. संगीताचा ओढा नाटकाच्या धबधब्यास हटकून मिळतो, ही त्या वेळची ठाम समजूत. तीत अगदीच काही तथ्य नव्हते, असे नाही. नाटकी मंडळी व्यसनी बनतात अशी समजूत होतीच; पण त्या वेळी नाटक हेच एक व्यसन मानले जात असे. अशा वेळी आम्हांला संगीताच्या थाऱ्याला कोण राहू देणार? दहा-अकरा वर्षांच्या वयाला माझ्या तानबाजीची अशी गळचेपी झाली." (टेंबे १९८४ : ०४).

पांढरपेशा समाजाच्या पलीकडे, बहुजन समाजात मात्र संगीताचा आविष्कार जोरकसपणे होत होता. त्यात महाराष्ट्रात ग्रामीण भागात सादर होणारे लावणी संगीत होते. तसेच भारताच्या कलकत्ता, आग्रा, अलाहाबाद, बनारस, बडोदा, लखनौ अशा सर्वच मोठ्या शहरांप्रमाणे मुंबई शहरात सामाजिक प्रतिष्ठा नसलेले 'माडीवरचे किंवा कोठीवरचे संगीत' आधीपासून होते. हे संगीत गझल, कव्वाली, लावणी, ठुमरी अशा लोकसंगीताच्या परंपरेतले होते. मुंबईत गोवेकरीण कलावंतिणींचा अशा गायकांमध्ये

भरणा होता. "रात्रीचे पहिले दोन प्रहर उलटले की या मोहल्ल्यांत गाणारी नायकीण वेशभूषा करून आणि चेहऱ्याचं प्रसाधन करून सज्ज होते. ही नुसतीच गाणारी असते किंवा कधी कधी गायन आणि नृत्य या दोन्ही कला तिला अवगत असतात... रात्रीची योग्य वेळ झाली की मोहल्यांतल्या माडीमाडींत किंवा घराघरांत बैठक सुरू होते. सारंगीवाला आणि तबलेवाला अशा दोन साजिंद्यांच्या मधोमध मुलगी बसते आणि गाऊ लागते. ऐकायला कुणी नसलं तरीदेखील. कारण या मोहल्यांतला शिरस्ता असा की गझल-कवालीचे स्वर ऐकून कुणीहि माडी चढून जावं. बिदागीची सक्ति नाही. मात्र शिष्टाईची रीत अशी की गाणं अगर नाच चालू असतांना अधूनमधून एखादा रुपया पुढे करावा." हा तमाशातल्या दौलतजादासारखाच काहीसा प्रकार होता आणि इथले संगीतही तमाशाशी नाते सांगणारे, म्हणजे लोक-परंपरेतले असे. "...जुन्या अस्सल तमाशांत जी लावणी ऐकायला मिळत असे तिची तऱ्हा अशी होती की नुसता खणखणीत उंच स्वर ऐकला आणि सफाईदार तान हवेत उठली की श्रोत्यांचे कान तृप्तीनं भरून जावे. फोरेंस रोडसारख्या मोहल्यांतली गझल-कवालीची तऱ्हा या प्रकारचीच. शास्त्रोक्त रागरागिणी या ठिकाणी सहसा ऐकायला मिळत नाहीत. क्वचित् एखादे वेळेस गाणाऱ्या मुलीनं राग म्हटला तरी तो केवळ रागाची धून पसरविण्यापुरताच. सारा भर असतो गझल-कवालीवरच. ही सारी शृंगार गीतं किंवा विरह गीतं असतात." (फडके १९६२ [१] : १७-१८). इथे येणाऱ्या श्रोत्यांमध्ये पांढरपेशे शिक्षित लोक गेलेच तर चोरून जात. 'बिघडलेले तरुण' या वाटेने जातात अशी रूढ धारणा होती.

विसाव्या शतकाच्या दुसऱ्या-तिसऱ्या दशकापर्यंत महाराष्ट्रीय मध्यमवर्गीयांमध्ये संगीताबद्दलचा हा दृष्टिकोन बराच बदलला, निवळला. या काळात संगीतकला संस्थानिकांच्या दरबाराबाहेर पडली, तसेच ती माडीवरूनही खाली उतरली. नव्याने उदयाला आलेल्या मध्यमवर्गीयांच्या वसाहतींमध्ये तिचे सूर उमटू लागले. १९१२मधले पुणे शहरातले हे चित्र पाहा : "रस्त्याने जाणाऱ्या माणसाला आजूबाजूच्या घरांतून किंवा क्लासच्या जागेतून 'मानापमान' नाटकांतल्या लोकप्रिय पदांचे हार्मोनियममधून निघालेले स्वर ऐकू यावे हा एक नित्याचा अनुभव होऊन बसला होता... मुलगी पाहावयास येणारी मंडळी मुलीला विचारीत असत, "पेटी वाजवतां येते का?" मुलगी लाजत मुरकत देशी बनावटीची छोटीशी पेटी पुढे ओढून घेत असे. 'मला मदन भासे' हे पद तिनं वाजविलं की तिला पाहावयास आलेला मुलगा आपल्याला अनुलक्षूनच हे पद वाजविलं जात आहे अशा कल्पनेनं खूष होत असे." (फडके १९६२ [१] : ०६). पुण्या-मुंबईप्रमाणे इतर शहरांमध्येही संगीताची लोकप्रियता वाढू लागली. नाट्यसंगीताची लोकप्रियता हे यामागचे प्रमुख कारण होते.

कोल्हापूर शहरात 'देवल क्लब' ही संगीतविषयक कार्यक्रम करणारी नावाजलेली

संस्था होती. या संस्थेचा वार्षिकोत्सव दरवर्षी होत असे. १९४६ साली झालेल्या वार्षिकोत्सवासाठी बडे गुलामअली, विलायत हुसेन आणि अल्लारखाँ हे तीन भारतीय कीर्तीचे कलावंत आले होते. पॅलेस थिएटरमध्ये तीन दिवस हा उत्सव सुरू होता.

कोल्हापुरात राहणाऱ्या गोविंदराव टेंबे यांना लहानपणी १८९१-९२मध्ये घरातून संगीत शिकण्यास झालेला विरोध आता इतिहासजमा झाला होता. राजाराम महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे जे उपक्रम चालत, त्याचा एक भाग म्हणून सन १९३३मध्ये 'म्युझिकल अँड थिएट्रिकल असोसिएशन' (नाट्य-संगीत मंडळ) ही संस्था स्थापन झाली. या संस्थेतर्फे वर्षातून किमान दोन नाट्यप्रयोग, सहा संगीत जलसे आणि सहा व्याख्याने असे कार्यक्रम सादर होत. मंडळाचे उद्घाटन हिराबाई बडोदेकर यांच्या गायनाने झाले होते. त्यानंतर अब्दुल करीमखाँ, वझेबुवा, सवाई गंधर्व, विनायकबुवा पटवर्धन, सुरेशबाबू, मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर, लक्ष्मीबाई बडोदेकर, पद्मावती शाळिग्राम अशा अनेक मोठ्या गायकांचे कार्यक्रम या संस्थेने राजाराम कॉलेजमध्ये केले. या उपक्रमामुळे "कोल्हापुरांतील बड्या बड्या लोकांना आणि सामान्य जनांनाहि संगीत श्रवणाची संधि मिळाली. आणि मुख्य म्हणजे गाणं ऐकावं कसं याचं विद्यार्थ्यांना शिक्षण मिळालं." (फडके १९६२ [१] : ६३). या संस्थेची कीर्ती इतरत्रही पोहोचली आणि मग पुण्या-मुंबईच्या महाविद्यालयांमध्येही अशी मंडळे निघू लागली अशी आठवण ना. सी. फडके यांनी नोंदवली आहे (उपरोक्त). १९०७च्या सुमारास पुण्यातील महाविद्यालयांमध्ये स्नेहसंमेलनांत अब्दुल करीमखाँ किंवा बालगंधर्व यांचे गायन होत असे, अशी आठवण त्या काळात पुण्याच्या इंजिनियरिंग कॉलेजात शिकणाऱ्या अ. बा. शिरगांवकर (रा. गो. भांडारकरांचे नातू) यांनी लिहिली आहे. डेक्कन कॉलेजच्या स्नेहसंमेलनातील अब्दुल करीमखाँ यांच्या कार्यक्रमाचे हे वर्णन पाहा : "डेक्कन कॉलेजमधल्या मोठ्या हॉलमध्ये पसरलेल्या बिछायतीवर प्रोफेसर्स व विद्यार्थी दाटीने बसलेले असत. संगीताचा आनंद लुटण्यास आलेली ही मंडळी, शिक्षक व विद्यार्थी हा भेदभाव तात्पुरता विसरून मोकळेपणाने एकमेकांत मिसळत. सुदैवाने त्या काळी ध्वनिक्षेपक लावण्याची प्रथा नव्हती. रोजच्या त्या कॉलेजच्या नीरस वातावरणांत खांसाहेब एक निराळीच स्वरांची दुनिया उभी करत, व गॅदरिंग होऊन गेले तरी कित्येक महिने पूरिया, 'बसंत, मालकंस' इत्यादी रागिणी सूर मनांत घुटमळत राहत." (शिरगांवकर १९६९ : २३).

मुंबई-पुण्यात प्रार्थना समाज, सुधारणावादी चळवळी यांच्याशी निगडित मंडळींनी संगीताची अभिरुची प्रथमपासूनच जोपासली होती. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर प्रथम मुंबईत आले तेव्हा - १८८२च्या सुमारास - रा. गो. भांडारकर, महादेव चिमणाजी आपटे, म. मो. कुंटे हे समाजधुरिण त्यांच्याकडे संगीत शिकायला जात, हे वर नमूद केलेच आहे.

भांडारकरांच्या घरात संगीताचे वेड प्रथमपासून होते. भांडारकरांचे नातू अ. बा. शिरगांवकर लिहितात, "मला संगीताची आवड मातुःश्रीच्या बाजूने आली. तिच्या वडिलांना (डॉ. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर) रागदारी संगीत ऐकावयास आवडत असे. म्हणून अबदुल करीम खांची 'सुध बिसर गई' (खमाज) ही खुल्या आवाजांतील जुनी रेकॉर्ड, गोहरजान, मलकाजान, कालीजान, जोहराबाई, मोजुद्दीनखां इत्यादि गायक गायिकांच्या व कांहीं सनईच्या सुद्धां रेकॉर्ड्स, मी व घरांतील इतर मंडळी आजोबांच्यासाठी मुद्दाम लावत असूं..." अनेक गायक-कलावंतांशी भांडारकर कुटुंबाचे दीर्घकाळ संबंध राहिले. "प्रसिद्ध पेटीवादनकार श्री. भाचूभाई भांडारे व श्री. गोविंदराव टेंबे आमच्या गिरगांवामधल्या घरी मधूनमधून येत व त्यावेळेस त्यांची पेटीदेखील ऐकावयास मिळे. श्री. बालगंधर्वदेखील कधीतरी येत. त्यांच्याकडून मी "कृष्णमुरारी" ही चीज शिकलो." (शिरगांवकर १९६९ : ०२-०३). १९१२नंतर अब्दुल करीमखाँ पुण्याला राहायला आल्यानंतर डॉ. भांडारकर, ह. ना. आपटे हे त्यांचे गाणे नियमित ऐकत असत.

कॉलेजशिक्षण घेणारे पांढरपेशा समाजातले तरुण-तरुणी, समाजसुधारक, लेखक अशा नवशिक्षित वर्गामध्ये हिंदुस्थानी संगीताला अशी प्रतिष्ठा मिळत गेली. अब्दुल करीम खाँ आणि त्यांना अनुसरत इतर गायकांनीही तिकीट लावून जलसे भरवण्यास सुरुवात केल्यानंतर या वर्गाला सहजपणे संगीताचा आस्वाद घेता येऊ लागला. विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकापासून भास्करबुवा बखले, रामकृष्णबुवा वझे या प्रयोगशील हिंदुस्थानी संगीतकारांचा मराठी रंगभूमीशी संबंध आला. गायकनटांना या संगीतकारांनी तालमी दिल्या. त्यातून बालगंधर्वांपासून दीनानाथ मंगेशकरांपर्यंत गायक-नटांची एक पिढीच घडवली गेली. त्यामुळे मराठी नाट्यसंगीताचे रूपडे पालटले. या संगीतकारांनी व गायकांनी नवे राग रंगभूमीवरील गायनासाठी आणले. लावणी-ठुमरी अशा पारंपरिक लोकगीतगायनप्रकारांवर आधारित असलेले नाट्यसंगीत ख्यालगायकीच्या रूपात प्रकट होऊ लागले. या कलावंतांनी संगीताला अधिक लोकप्रियता मिळवून दिली. संगीत नाटकांमुळे महाराष्ट्राच्या निमशहरी, ग्रामीण भागातील श्रोत्यांमध्येही संगीताची अभिरुची विकसित झाली, हे मान्य केले पाहिजे.

**वाद्यांमध्ये झालेला पालट : हार्मोनियम आणि तबला**

संगीताचे मुख्य अंग म्हणजे वाद्यसंगीत. वर ज्या 'मानापमान' नाटकाचा उल्लेख केला आहे, त्याला गोविंदराव टेंबे यांनी संगीत दिले होते. १९११साली रंगभूमीवर आलेल्या या नाटकातील पदांनी महाराष्ट्रीय संगीतात इतिहास घडवला. टेंबे यांनी संगीत दिलेली 'मानापमान'मधली पदे आणि टेंबे यांचे लाडके वाद्य हार्मोनियम या नाटकानंतर खूपच प्रसिद्ध झाले.

हार्मोनियम हे भारतीय संगीतविश्वात नवे वाद्य म्हणून एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या काळात दाखल झाले. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस काही प्रसिद्ध हार्मोनियमवादक होते. ग्वाल्हेरचे गणपतराव भैय्या यांनी गोहरजान आणि मोजुद्दीन यांना हार्मोनियम वादन शिकवले. १८७१मध्ये स्थापन झालेल्या आल्फ्रेड नाटक मंडळीत लक्ष्मणराव म्हणून एक प्रसिद्ध पेटीवादक होते (टेंबे १९८४ : ११). मुंबईत भंडारी समाजातील लक्ष्मीकांत सदानंद उर्फ भाचूभाई भांडारे (१८७८-१९०९) यांचे पेटीवादन महाराष्ट्रीय मध्यमवर्गात अतिशय प्रसिद्ध होते. त्या काळात पायपेटी असे. पण या काळात रंगभूमीवर व संगीत मैफिलींमध्ये तंतूवाद्यांचेच प्राबल्य असे. महाराष्ट्रात हार्मोनियम वादनाला खरी लोकप्रियता मिळाली ती विसाव्या शतकात गोविंदराव टेंबे यांच्या हार्मोनियम वादनानंतर. गोविंदराव टेंबे यांच्यावर पेटीवादनाचे पहिले संस्कार भाचूभाई भांडारे यांच्या पेटीवादनाचेच झाले होते.

एकोणिसाव्या शतकात मराठी रंगभूमीवरील प्रमुख आणि जवळजवळ एकमेव वाद्य तंबोरा हे होते. तंबोऱ्याच्या साथीनेच नाट्यगीतांचे गायन होत असे. भाऊराव कोल्हटकरांच्या पिढीने आपली गाणी तंबोऱ्यासह सादर केली. त्या गाण्यावर पोसल्या गेलेल्या रसिकांच्या पिढीला हार्मोनियम हे वाद्य पसंत नव्हते. अहिताग्नि राजवाडे यांची एक आठवण उद्‌बोधक आहे : किर्लोस्कर नाटक कंपनीच्या पहिल्या पिढीतील प्रसिद्ध नट बाळकोबा नाटेकर (मृत्यू १९१०) यांना राजवाड्यांनी आपल्या मुलांना गाणे शिकवण्यासाठी घरी बोलावले, तेव्हा पेटी विकत घेऊ काय म्हणून विचारले. पण त्याला नकार देऊन बाळकोबांनी दोन तंबोऱ्यांच्या सहाय्याने गाणे शिकवण्यास सुरुवात केली. ते राजवाड्यांना म्हणाले, "मीच एकदा ही चुकी नाटकमंडळीत केली, मीच तेथील तंबोरे काढून पेटी आणून बसविली. त्याचा मला आज पश्चाताप होतो आहे." (राजवाडे १९८० : १०८). पूर्वीचे सारंग्या व तंबोरे जाऊन त्याजागी पेटीचे वर्चस्व येणे, हे पसंत न पडलेल्या या पिढीच्या मते हार्मोनियमचा मोठा दोष म्हणजे, "गाणारा हा वाद्याच्या कक्षेत गेला, वाद्य त्याच्या कक्षेत राहिले नाही." (उपरोक्त). पेटीचे स्वर हे गायकाच्या स्वराला गिळून टाकतात, हा आक्षेप होता. वाईट गाणाराही त्यात खपून जातो. परंतु खऱ्या गायकाच्या सुरांचे सौंदर्य त्यामुळे आस्वादता येत नाही.

विसाव्या शतकाच्या दुसऱ्या-तिसऱ्या दशकापर्यंत नियतकालिकांतून लेख लिहून काही मंडळी हार्मोनियमच्या वाढत्या लोकप्रियतेवर टीका करत. तंबोरा, सतार या तंतूवाद्यांची महती गात. हार्मोनियममधील स्वर हे शास्त्रशुद्ध स्वरूपाचे नाहीत, त्यामुळे भारतीय संगीताच्या स्वररचनेशी हार्मोनियम वादन विसंगत आहे, असा आक्षेप बरेच दिवस घेतला जात होता. परंतु हार्मोनियमची लोकप्रियता वाढत गेली. याची तीन मुख्य कारणे म्हणजे, "नादमधुरता, नादनवीनता आणि वादनसुलभता" ही होत (टेंबे १९५६ :

१८९). हार्मोनियमच्या मर्यादा लक्षात घेऊन भारतीय संगीताशी जुळवून घेण्यासाठी त्यात या काळात बरेच बदल करण्यात आले. प्रथम भारतीय संगीताच्या दृष्टीने उपयुक्त हार्मोनियम बनवण्याचा प्रयत्न एडवर्ड क्लेमंटस् यांनी केला. पण त्यात वादनसुलभता नव्हती. नंतर पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजमधील संगीत-शिक्षक आचरेकर यांनी हार्मोनियममध्ये श्रुति वाजवण्याची व्यवस्था केली, तसेच स्वरांतून मींड निघण्यासाठीही कळ दिली होती. अशा प्रयत्नांतून हे वाद्य या काळात विकसित होत गेले (केशवराव भोळे १९६२ : १७).

समाजात संगीत-शिक्षणाचे वेड जसजसे वाढू लागले, तसतसे वाद्यांमध्ये बदल होत गेले. बीन, तंबोरा, सतार ही पारंपरिक भारतीय वाद्ये होती. सर्व काळ गुरूच्या सान्निध्यात राहून संगीताचे शिक्षण घेत, तेव्हा गायनाच्या बरोबरीने या वाद्यांचे वादन, त्यांचे जतन-संगोपन हे देखील शिकवले जात असे. पण संगीत-शिक्षणाची पद्धत बदलली; गायनशाळा व महाविद्यालयांमध्ये ठरावीक तास शिकवले जाऊ लागले, तेव्हा वाद्यांसाठी इतका वेळ देणे परवडणारे नव्हते. "केवळ तंबोऱ्यावर गायला शिकायचे असा निश्चय करून सुरुवात करायची म्हटले तरी गुरूजी आहे तोपर्यंत ठीक. विद्यार्थ्याने केव्हांहि धडा घटवायचा म्हणून तंबोरा छेडावा तो त्याची एकादी तार अगदीच उतरलेली व इतर तारा कमी अधिक बिघाड झालेल्या! मग त्या बिचाऱ्याने जवळपास कोणी तज्ज्ञ असेल त्याच्याकडे तंबोरा घेऊन जायचे! नसेल तर दुसरे दिवशी गुरुजी येईपर्यंत वाट पाहावयाची...म्हणजे गायन शिकायचे तर गुरुगृहीवास किंवा एखादा तंबोरा जुळविणारा कसबी इसम कायमचा ठेवून द्यायचा?...आजकाल मजेखातर गायन शिकणारे लोक हा व्याप करतील की काय त्याची शंका वाटते. इतर तंतूवाद्यांचे तसेंच. विद्यार्थ्यांचे कान तारा जुळविण्याइतके तयार होण्यास जो दीर्घ काळ जावा लागतो तेवढ्यात त्याची हुरूपहि मावळून जाते..." (टेंबे १९५६ : १९५-९६). अशा रीतीने संगीत शिक्षणाचे स्वरूप आणि प्रेरणा बदलल्यामुळे हार्मोनियम हे वाद्य अधिक सोयीचे ठरले. हौशी संगीतशौकिनांमध्ये हे वाद्य त्यामुळेच लवकर लोकप्रिय झाले.

जसे विसाव्या शतकाच्या पहिल्या-दुसऱ्या दशकापासून हार्मोनियमचे वेड वाढले, तसेच १९४४-४५नंतर महाराष्ट्रीय संगीतरसिकांमध्ये तबल्याचे वेड वाढू लागले. विशेषतः खाँसाहेब तिरकवां यांच्या तबलावादनाच्या आस्वादानंतर महाराष्ट्रात तबल्याची लोकप्रियता वाढू लागली (देवधर १९७२ : २५८).

### वाद्यनिर्मितीत मिरजच्या कारागिरांचे योगदान

१८६०पर्यंत महाराष्ट्रात वाद्ये फारशी बनत नसत. तंबोरा, सतार, बीन, दिलरुबा, ताऊस ही सर्व प्रकारची वाद्ये उत्तर हिंदुस्थानातून आणावी लागत. परंतु एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मिरज येथील फरीदसाहेब सतारमेकर (१८२७-१८९८) यांनी

सर्वप्रथम सतार बनवण्यास सुरुवात केली. फरीदसाहेब सतारमेकर यांचे कुटुंब शिकलगाराचे. पेशवाई काळापासून त्यांचा हत्यारे बनवण्याचा व्यवसाय होता. ब्रिटीश राजवट आल्यानंतर हत्यारांची मागणी घटली आणि हे शिकलगार लोक चाकू, कात्री, वस्तरे तयार करण्याचे, त्यांना धार लावण्याचे काम करून उदरनिर्वाह करू लागले. या काळात फरीदसाहेबांचा थोरला भाऊ मोहद्दिनसाहेब याने जोडधंदा म्हणून सारंगीचे खोके, तमाशासाठीची तंतुवाद्ये, भजनासाठीचे सुरसोटे बनवायला सुरुवात केली. फरीदसाहेब या भावाच्या हाताखाली तयार होत होते. त्यांना संगीताची आवड होती. त्यामुळे वाद्ये बनवण्याच्या कलेत त्यांनी विशेष रस घेतला. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात दक्षिण महाराष्ट्रातील मिरज, सांगली, इचलकरंजी या संस्थानांमध्ये राजाश्रयाच्या अपेक्षेने हरदास, गवई मोठ्या संख्येने येऊ लागले. या काळात तंबोरे-सतारी फार थोड्या गायकांकडे असत. कारण दळणवळणाची साधने नसलेल्या त्या काळात उत्तर भारतातून ही वाद्ये आणवणे फार खर्चिक असे. बहुतेक गायकांकडे स्थानिक लाकडी सुरसोटे असत. ही वाद्ये ते जीवापलीकडे जपत. या गायकांच्या वाद्यांमध्ये काही बिघाड झाला, तर आपणहून ते दुरुस्त करण्याचा उद्योग फरीदसाहेबांनी सुरू केला. यातून या वाद्यांच्या बनावटीचाही त्यांनी बारकाईने अभ्यास केला. काही वर्षांत वाद्यांची दुरुस्ती करण्याच्या त्यांच्या कसबामुळे दूरदूरहून त्यांच्याकडे वाद्ये दुरुस्तीसाठी येऊ लागली. मग त्यांनी स्वतः वाद्ये तयार करणे सुरू केले. वाद्यांसाठीच्या सगळ्या वस्तू, पदार्थ ते इतक्या वर्षांच्या अनुभवामुळे घरीच तयार करायला शिकले होते. सतारीची जव्हारी खोदण्याचे अत्यंत अवघड कसब त्यांनी हैदराबादहून आलेल्या महम्मद हसन या गायकाकडून अतिशय कौशल्याने हस्तगत केले. त्यानंतर तंबोरे, सतारी, दिलरुबा बनवणारे कारागीर म्हणून फरीदसाहेबांचा नावलौकिक महाराष्ट्रात सर्वत्र पसरू लागला. हा लौकिक एवढा वाढला की मिरजेचे संस्थानिक दुसरे बाळासाहेब यांना कायम अशी भीती वाटे की आपल्या संस्थानातल्या या कारागीराला कोणीतरी भुलवून अन्यत्र घेऊन जाईल. म्हणून फरीदसाहेबांना मिरज सोडण्यास बंदी होती.

फरीदसाहेबांच्या मुलांनी हा वाद्ये तयार करण्याचा व्यवसाय अधिक वाढवला. फरीदसाहेबांचा नातू हुसेनसाहेब यांच्या वाद्यांची कीर्ती तर देशभर पसरली. १९०१मध्ये विष्णु दिगंबर पलुस्करांनी लाहोर येथे संगीत महाविद्यालय सुरू केल्यानंतर त्यांना हवी असणारी सर्व वाद्ये मिरजेहूनच मागवली होती. पलुस्करांनी उत्तर भारतात फार मोठी किर्ती मिळवली. सोबत त्यांच्या वाद्यांचीही - आणि पर्यायाने मिरजेच्या वाद्ये तयार करणाऱ्या कारागिरांचीही - किर्ती देशभर झाली.

## संगीतकलेला तंत्रज्ञानाची जोड : ध्वनिमुद्रिका आणि रेडिओ

हिंदुस्थानी संगीतातील विविध घराण्यांच्या मोठमोठ्या गायकांचा महाराष्ट्रातला वावर, संगीत शिक्षण देणाऱ्या संस्था, संगीताविषयीची पुस्तके व नियतकालिके, हार्मोनियमसारख्या वादनसुलभ वाद्यांचा प्रसार, रंगभूमीवरून झालेला संगीताचा लोकप्रिय आविष्कार - या कारणांमुळे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात संगीतकला महाराष्ट्रीय समाजात सर्वदूर कशी पसरली हे आपण पाहिले. संगीताच्या या प्रसाराला आधुनिक तंत्रज्ञानाचीही जोड या काळात मिळाली. फोनोग्राफ, ग्रामोफोन रेकॉर्डस् आणि रेडिओ या माध्यमातून संगीत घराघरात पोहोचले.

मुखावाटे बाहेर पडून हवेत विरून जाणाऱ्या ध्वनीचे जतन करणारे नवे यंत्र 'फोनोग्राफ' अमेरिकेतील शास्त्रज्ञ थॉमस अल्वा एडिसन याने सर्वप्रथम १८७७मध्ये तयार केले होते. दंडगोलाकृती नळीच्या आत फासलेल्या मेणाच्या थरावर ध्वनीची स्मृती उमटवण्याचे तंत्र त्याने शोधून काढले. ही दंडगोलाकृती नळी नंतर यंत्रावर चढवून तिच्यावर मुद्रित झालेला ध्वनी हुबेहूब ऐकता येई. विशेष म्हणजे १८७७साली तयार झालेले हे यंत्र दुसऱ्याच वर्षी, १८७८मध्ये भारतात कलकत्त्याला पोहोचले होते. आणि नष्ट होणारा ध्वनी जतन करून ठेवणारे, इतकेच नव्हे तर पुन्हा कितीही वेळा तोच ध्वनी हुबेहूब ऐकवणारे हे यंत्र पाहून कलकत्त्याच्या लोकांना धक्का बसला होता (शर्मा २०१४ : ५३). या यंत्रात नंतर सुधारणा होत गेल्या आणि १८८८मध्ये नव्या पद्धतीचा फोनोग्राफ एडिसनच्या कंपनीने तयार केला. याच काळात अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल याच्या 'वोल्टा लॅबोरेटरी' या प्रयोगशाळेतही फोनोग्राफवर प्रयोग सुरू होते. सुरुवातीला ध्वनिमुद्रणासाठी वापरण्यात येणाऱ्या दंडगोलाकृती नळ्यांची जागा नंतर सपाट चकत्यांसारख्या दिसणाऱ्या तबकड्यांनी घेतली आणि पुढे फोनोग्राफची जागा ग्रामोफोनने घेतली. ग्रामोफोनवर वाजणाऱ्या तबकड्यांच्या आकाराच्या रेकॉर्ड्स १९००नंतर भारतात दिसू लागल्या. विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या दोन-तीन दशकांमध्ये सिलिंडर्सवाले फोनोग्राफ आणि तबकड्यांसह ग्रामोफोन या दोन्ही संगीतसाधनांचा भारतात मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला.

भारतात कलकत्त्यापाठोपाठ मुंबई, सिकंदराबाद, मद्रास अशा शहरांमध्ये फोनोग्राफच्या वितरकांनी दुकाने सुरू केली. मुंबईच्या काळबादेवी रोडवर वाद्यांची अनेक दुकाने होती. या दुकानांमध्ये १८९०पासून फोनोग्राफ आणि कोरी सिलिंडर्स विकणाऱ्या दुकानांची भर पडली. टी. एस. रामचंदर अँड ब्रदर्स हे एडिसन फोनोग्राफचे वितरक होते. एस्. रोज अँड कंपनी, शेरियार अस्पंदियार फोनोग्राफ कंपनी, १९०२मध्ये सुरू झालेले वल्लभदास रणछोडदास अँड कंपनी हे फोनोग्राफचे मोठे वितरक. कोऱ्या सिलिंडर्सवर गाणी रेकॉर्ड करून देण्याचा व्यवसायही सुरू झाला. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस

शेरियार फोनोग्राफ कंपनीत फोनोग्राफची किंमत होती ३० रुपये; कोऱ्या सिलिंडरची किंमत ३ रुपये आणि त्यावर गाणे रेकॉर्ड करून देण्याचा दरही ३ रुपये! (शर्मा २०१४ : ५७).

विसाव्या शतकाच्या प्रारंभी पाश्चात्य देशांतल्या रेकॉर्ड कंपन्यांची नजर भारतीय समाजाच्या 'संगीतग्रहणक्षमते'वर पडली. भारतात येणाऱ्या कोऱ्या रेकॉर्ड्स ध्वनिमुद्रित करून त्या मोठ्या प्रमाणावर ऐकल्या जात होत्या. रवींद्रनाथ टागोरांच्या कविता १८९०मध्येच सिलिंडर्सवर ध्वनिमुद्रित झाल्या होत्या. कलकत्त्यात नाटकांचे संवाद ध्वनिमुद्रित करून ते तालमींसाठी उपयोगात आणले जात होते (शर्मा २०१४ : ५३, ६१). तत्कालीन मराठी रंगभूमीवरचे सर्वात प्रसिद्ध नट भाऊराव कोल्हटकर यांचा १८९८दरम्यान मिरजेत मुक्काम असताना तेथील संस्थानिकांनी भाऊरावांच्या आवाजात नाटकांची पदे सिलिंडर्सवर ध्वनिमुद्रित करून घेतली. १८९८मध्ये कोल्हापूर येथे भरलेल्या विज्ञान प्रदर्शनात फोनोग्राफ मांडला होता (शर्मा २०१४ : ६१). भाऊरावांच्या आवाजातली नांदी ध्वनिमुद्रित असलेली एक सिलिंडर आजही उपलब्ध आहे (शर्मा २०१४ : १८७). थोडक्यात, या नव्या यंत्राचे भारतीयांकडून फारच उत्साहाने स्वागत झाले. भारतात ध्वनिमुद्रित संगीताच्या रेकॉर्ड्सना संभाव्य ग्राहकवर्ग फार मोठा आहे हे ओळखून या कंपन्यांनी भारतात येऊन इथल्या गायकांच्या आवाजातली गाणी सिलिंडर्सवर आणि तबकड्यांवर ध्वनिमुद्रित करून बाजारात विक्रीस आणली. रेकॉर्ड्सचे असे व्यावसायिक उत्पादन भारतात १९०२पासून सुरू झाले.

पाश्चात्य कंपन्यांचे तंत्रज्ञ भारतात येत; शहरोशहरी फिरून गवयांना गाठत आणि त्यांच्या आवाजात गाणी ध्वनिमुद्रित करून घेत. अशा गाण्यांच्या रेकॉर्ड्सनी भारतीय संगीताचा बाजार गजबजून गेला. महाराष्ट्रात संगीत कलेची लोकप्रियता वाढण्याचे दुसरे कारण या रेकॉर्ड्स हे होते. रहिमतखाँ, अब्दुल करीमखाँ यांच्यासारखे महान गायक, गोहरजान, मलकाजान, सुंदराबाई जाधव यांसारखे लोकप्रिय गायक आणि मराठी संगीत रंगभूमीवर गाजणारे केशवराव भोसले, मास्टर कृष्णराव, बालगंधर्व, दीनानाथ मंगेशकर यांच्यासारखे गायक-नट - अशा सर्व प्रकारच्या गायकांच्या ध्वनिमुद्रिका तयार होऊन बाजारात विकल्या जाऊ लागल्या. वीसतीस वर्षांपूर्वीपर्यंत केवळ राजदरबारी किंवा फार तर खाजगी मैफिलीत सहभागी झालेल्या मोजक्या श्रोत्यांच्या कानी गायकांचे स्वर पडत असत; त्यानंतर हे स्वर जाहीर जलशांमधून, थिएटर्समधून उमटू लागले. आणि आता रेकॉर्ड्स आणि रेडिओ यांच्या द्वारे सर्व जिज्ञासू रसिकांच्या घरांत या गायकांचे स्वर कायमस्वरूपी उमटू लागले. त्यामुळे रंगमंचावर गाईली जाणारी, मैफिलीतली गाणी हवी तेव्हा आणि हव्या तितक्या वेळा घराघरात वाजू लागली. मार्च १९११पर्यंत सिलिंडर्स आणि तबकड्या अशा दोन्ही रूपांत व्यावसायिक पद्धतीने सुमारे साडे आठ हजार

रेकॉर्ड्स भारतात निघाल्या होत्या (शर्मा २०१४ : ७२). मुंबई येथे पहिले रेडिओ स्टेशन खाजगी मालकीचे चिनॉय बंधूंनी १९२५मध्ये सुरू केले. १९३०-३१च्या सुमारास सरकारने हे रेडिओ स्टेशन स्वतःच्या ताब्यात घेतले (बाळकृष्ण कपिलेश्वरी १९७२ : ८७९). या काळात अनेक गायकांनी रेडिओवरून आपली कला सादर केली.

तंत्रज्ञानाचा प्रभाव कलेच्या आविष्कारपद्धतीवर व तिच्या एकंदर स्वरूपावरही पडत असतो. मैफिलीत सादर होणारे गाणे ध्वनिमुद्रित स्वरूपात रेकॉर्डवर किंवा रेडिओवरून सादर होऊ लागले, तेव्हा त्याचा परिणाम पारंपरिक गाण्यावर प्रामुख्याने दोन अंगांनी झाला (चंदावरकर २०१७ : ४२). पहिला परिणाम असा की सादरीकरणाच्या कालावधीवर मर्यादा आली. मैफिलीतले गाणे कितीही काळ चालू शकत असे. एकेक गाणे अर्धा-पाऊण तास देखील गाइले जाई. परंतु तबकडीची कालमर्यादा तीन मिनिटे वीस सेकंद ते पाच मिनिटे इतकी निश्चित होती. तेव्हा गायकांना एवढ्या कालावधीत आपल्या गायकीचे कसब दाखवून गाणे पूर्ण करणे आवश्यक होते. हे ज्यांना शक्य झाले, अशा गायकांच्या ध्वनिमुद्रिका अधिक निघाल्या. दुसरा परिणाम असा की पारंपरिक मैफिलीतल्या कलावंतासमोर श्रोते उपस्थित असत. गायकांच्या सादरीकरणावर श्रोत्यांकडून मिळणारा प्रतिसादही प्रभाव टाकत असे. पण ध्वनिमुद्रिकांसाठी किंवा रेडिओसाठी गाणारा कलावंत हा अदृश्य श्रोत्यांसाठी गाणे सादर करू लागला. या कारणामुळे अनेक जुनेजाणते गायक आपले गाणे ध्वनिमुद्रित करायला किंवा रेडिओवर गायला तयार नसत. अब्दुल करीमखाँ यांना अशा गाण्याचा आग्रह केला तर नकार देऊन ते म्हणत, "फत्तर के सामने हम नही गाते!" (बाळकृष्ण कपिलेश्वरी १९७२ : ८७९).

पण लवकरच बहुतेक गायकांचा हा विरोध मावळला आणि त्यांनी या तंत्रज्ञानाचा वापर करून घ्यायला सुरुवात केली. समाजात रागदारीवर आधारित ख्यालगायकीप्रमाणे टप्पा, ठुमरी, गझल, कव्वाली असे विविध गायनप्रकार प्रचलित होते. ठुमरी, लावणी, कव्वाली अशा गायनप्रकारांची लोकप्रियता तुलनेने अधिक होती. या प्रकारचे गायन करणाऱ्या अनेक कलावंतांनी या काळात केवळ रेकॉर्ड्सच्या माध्यमातून जनमनात आपले स्थान पक्के केले. राष्ट्रीय पातळीवरील गोहरजान, मलकाजान या गायिका किंवा मराठी संगीतसृष्टीतील सुंदराबाई जाधवसारखी गायिका ही याची उदाहरणे आहेत. एकीकडे विष्णू नारायण भातखंडे यांच्यासारखे संगीतज्ज्ञ हिंदुस्थानी संगीत परंपरेतील मोठमोठ्या गायकांचे मन वळवून, रेकॉर्डिंगची व्यवस्था करून त्यांची गाणी ध्वनिमुद्रित करून ठेवण्यासाठी अथक प्रयत्न करत होते; तर दुसरीकडे वरील लोकप्रिय गायकांच्या डझनावारी रेकॉर्डस् बाजारात धूम करत होत्या. विदेशातील अनेक कंपन्या तेव्हा भारतीय संगीतक्षेत्रात उतरल्या होत्या.

अब्दुल करीमखाँ यांच्यासारख्या ज्येष्ठ गायकासोबत रुबी या जर्मन कंपनीने

१९३५साली करार केला आणि मार्च १९३५मध्ये त्यांच्या आवाजात चौदा गाण्यांचे रेकॉर्डिंग केले. या रेकॉर्ड्स ताबडतोब खपल्याने पुन्हा डिसेंबर १९३५मध्ये आणखी सहा गाण्यांचे रेकॉर्डिंग केले (बाळकृष्ण कपिलेश्वरी १९७२ : ८७५). रहिमतखाँ, विलायतखाँ यांच्यापासून मोघुबाई कुर्डीकर-केसरबाई केरकर यांच्यापर्यंत अनेक ख्याल गायकांच्या ध्वनिमुद्रिका या कालखंडात निघाल्या.

गोहरजान ही मूळची कलकत्त्याची, त्या काळातली अतिशय लोकप्रिय गायिका, रेकॉर्ड्सच्या माध्यमातूनच देशभर तिचा आवाज पोहोचला. तिचे वैशिष्ट्य म्हणजे भारतातल्या वेगवेगळ्या प्रदेशांतल्या स्थानिक गायनपद्धतीचा अभ्यास करून, तिथल्या चिजा मिळवून ती आपल्या गाण्याला देशी रंग देत असे. महाराष्ट्रात ती मराठी नाट्यगीते देखील सादर करत असे. मुंबईत तिचा वावर नेहमी असे. अब्दुल करीम खाँ यांनी मुंबईत तिला अल्प काळ गाणे शिकवले होते. १९०२ ते १९२० या काळात गोहरजानच्या शेकडो ध्वनिमुद्रिका निघाल्या. अशा महाराष्ट्रातील प्रसिद्ध गायिका म्हणजे मेहबूबजान, सुंदराबाई जाधव, हिराबाई बडोदेकर या होत. मूळची सोलापूरची असलेली मेहबूबजान हिच्या सुमारे ३५ रेकॉर्ड्स निघाल्या. १९३०च्या सुमारास या रेकॉर्ड्स अतिशय प्रसिद्ध होत्या (राळेरासकर २०१५ : ६४-६५).

या काळातली गाण्याच्या रेकॉर्ड्समुळे अतिशय नावाजलेली दुसरी महाराष्ट्रीय गायिका म्हणजे सुंदराबाई जाधव. १९२१ ते १९३५ या काळात सुंदराबाईंचे नाव लावणीसम्राज्ञी म्हणून सर्वत्र दुमदुमीत होते. त्यांनी लावणीसोबतच ठुमरी, दादरा, गझल, कव्वाली आणि भजने या गायनप्रकारांमध्येही प्राविण्य मिळवले होते. "महाराष्ट्रीय गायिकांत सुंदराबाईइतकी परिणामकारक ठुमरी, दादरे, भजने दुसऱ्या कुणी गायिली नाहीत." असे केशवराव भोळे यांनी नमूद करून ठेवले आहे (केशवराव भोळे १९६२ : १०७). सुंदराबाईंचा आवाज लोकांच्या इतका पसंतीस उतरला की त्यांच्या रेकॉर्ड्सची विक्रमी विक्री झाल्याने एचएमव्ही कंपनीने या गायिकेचा सुवर्णपदक देऊन गौरव केला. एचएमव्ही, ओडियन, रीगल, कोलंबिया, यंग इंडिया इत्यादी ध्वनिमुद्रण कंपन्यांनी त्यांच्या एकूण १५० गाण्यांच्या ७५ रेकॉर्ड्स काढल्या. सुंदराबाईंप्रमाणेच हिराबाई बडोदेकर (१९०५-१९८९) यांच्याही गाण्याच्या रेकॉर्ड्स या काळात अतिशय गाजल्या.

संगीत नाटकांतील गाणी लोकप्रिय झाल्यामुळे त्यांच्याही रेकॉर्ड्स मोठ्या संख्येने निघू लागल्या. गाजलेली पदे अनेक गायकांच्या आवाजात ध्वनिमुद्रित करून कंपन्या प्रकाशित करू लागली. उदाहरणार्थ, १९११साली रंगभूमीवर आलेल्या संगीत 'मानापमान' या नाटकातील जवळजवळ सगळ्याच पदांच्या रेकॉर्ड्स निघाल्या होत्या. आणि त्यातली बहुतेक पदांच्या रेकॉर्ड्स एकाहून अधिक गायकांच्या आवाजात निघाल्या. यावरून या नाटकाची लोकप्रियता ध्यानात येते. बाबुराव जोशी यांनी 'संगीताने गाजलेली

रंगभूमी' या पुस्तकात १८८०पासून पुढील ९२ वर्षांतील ९७ नाटकांची सूची दिली आहे. या नाटकांतील पदे, त्यांच्या निघालेल्या रेकॉर्ड्स आणि त्यांचे गायक यांचाही सूचीत समावेश आहे (बाबुराव जोशी १९७४ : १८२-२१०). या सूचीवरून काही उद्बोधक तपशील ध्यानी येतो : 'मानापमान' या नाटकातील 'चंद्रिका ही जणू' या पदाच्या रेकॉर्ड्स अब्दुल करीमखाँ, बालगंधर्व, छोटा गंधर्व, अझमबाई पिसाळ, बापूराव पेंढारकर, आशा भोसले, विनायकबुवा पटवर्धन अशा सात गायकांच्या आवाजात निघाल्या. 'मानापमान' नाटकातल्या पदांच्या ६५ रेकॉर्ड्स, 'सौभद्र'मधील पदांच्या ५१ रेकॉर्ड्स आणि 'संगीत स्वयंवर' या नाटकातील पदांच्या ४३ रेकॉर्ड्स निघाल्या. गायक-नटांमध्ये बालगंधर्वांच्या आवाजातल्या ९६ पदांच्या रेकॉर्ड्सची नोंद आहे. त्याखालोखाल बापूराव पेंढारकर (४८ पदांच्या रेकॉर्ड्स) आणि हिराबाई बडोदेकर (२७ पदांच्या रेकॉर्ड्स) नोंदवल्या गेल्या आहेत. यावरून रंगभूमीवरील संगीताची त्या काळातील लोकप्रियता ध्वनिमुद्रण-तंत्रामुळे कशी वाढीस लागली हे स्पष्ट होते.

मात्र १९३०नंतर संगीत नाटकांना उतरती कळा लागली आणि त्यांची जागा चित्रपट या नव्याने उदयाला आलेल्या कलेने घेतली. १९३१पासून बोलपटांची निर्मिती होऊ लागल्यानंतर संगीत हा चित्रपटकलेचा अविभाज्य भाग बनला. महाराष्ट्रीय संगीतक्षेत्रातील नामवंत कलाकारांनी संगीत नाटकांप्रमाणेच चित्रपटांनाही संगीताचा साज चढवण्यात मोठी भूमिका बजावली. त्यामुळे या काळातील संगीताचा प्रवास नाटक आणि चित्रपट या दोन कलांच्या साथीने कसा झाला याचाही मागोवा घ्यावा लागतो.

## १०.५ इतिकथन

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातल्या संगीत कलेचा हा प्रवास आहे. कालप्रवाहात कोणतीही कला बदलत जाते. पालटत्या सामाजिक-सांस्कृतिक स्थितीच्या प्रभावातून हे बदल होतात. एकोणिसावे शतक हे एकंदर मराठी संस्कृतीच्या संदर्भात मोठ्या स्थित्यंतरांचे शतक होते. कलाक्षेत्रही याला अपवाद नव्हते. चित्रपट, शिल्पकला, नाटक या कलाप्रकारांप्रमाणेच संगीत कलेतही या काळात मोठी स्थित्यंतरे झाली. पण चित्र किंवा शिल्पकला यांच्यावर झाले त्याप्रमाणे संगीत कलेवर पाश्चात्त्य संस्कार फारसे झाले नाहीत. एकंदर भारतीय संगीत हे ब्रिटीश वसाहतकाळातही आपले भारतीयत्व टिकवून ठेवण्यात यशस्वी झाले, असे म्हणता येईल. पूर्वीपासून चालत आलेल्या महाराष्ट्राच्या संगीतपरंपरेत एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपासून बदल होण्यास सुरुवात झाली हे आपण पाहिले. परंतु हे बदल पाश्चात्त्य प्रभावातून झाले नव्हते. महाराष्ट्रात धृपदगायन मागे पडले, तरी लावणी, ठुमरी, कीर्तन यांसारखे पारंपरिक गायनप्रकार विसाव्या शतकातही टिकून होते. पण उत्तर भारतातील 'हिंदुस्थानी संगीत' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या

संगीत परंपरेचा प्रभाव या काळात महाराष्ट्रीय संगीतावर पडला; ख्यालगायकी ही संगीताची मध्यवर्ती धारा बनली आणि विसाव्या शतकात हिंदुस्थानी संगीत हेच महाराष्ट्रीय संगीत बनले.

महाराष्ट्रीय संगीत-कलावंतांनी हिंदुस्थानी संगीतातील विविध घराण्यांचे संगीत आत्मसात केले आणि त्या परंपरा पुढे चालवल्या; काही कलावंतांनी विविध घराण्यांतील गायनकौशल्यांचा मेळ घालून संगीताच्या नव्या वाटा निर्माण केल्या. या काळात भास्करबुवा बखल्यांपासून कुमार गंधर्वांपर्यंत हा प्रयोगशील नवनिर्मितीचा मार्ग चोखाळणारे कलावंत महाराष्ट्रात जन्माला आलेले दिसतात. याच काळात पाश्चात्त्य संगीताच्या धर्तीवर भारतीय संगीताचे शास्त्र रचावे, त्याचे शिक्षण आधुनिक पद्धतीने दिले जावे, असा ध्यास भातखंडे, पलुस्कर यांच्यासारख्या महाराष्ट्रीय संगीतकलावंतांनी घेतला. त्यातून विसाव्या शतकात हिंदुस्थानी संगीताचे शास्त्र उभे राहिले. त्याविषयीचे विपुल साहित्य प्रसिद्ध झाले. वाद्यांमध्ये संशोधन करून आवश्यक ते बदल करण्याच्या उपक्रमातही महाराष्ट्रीय संगीतप्रेमी अग्रेसर होते.

महाराष्ट्रात संगीत कला समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत प्रभावीपणे पोहचवण्यासाठी संगीत नाटक विशेषतः कारणीभूत ठरले. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपासून नाटक आणि संगीत या दोन कलाप्रकार परस्परांवर प्रभाव टाकत राहिले. हिंदुस्थानी संगीताने महाराष्ट्रीय समाजात मध्यवर्ती स्थान पटकावल्यानंतर मराठी संगीत रंगभूमीवरून या संगीताचा आविष्कार प्रामुख्याने होऊ लागला; किंबहुना त्यामुळेच हिंदुस्थानी संगीताला महाराष्ट्रीय समाजात मध्यवर्ती स्थान मिळाले, असेही म्हणता येईल. पुढे संगीत नाटकांचा भर ओसरल्यानंतर चित्रपटकलेचा विकास झाला. बोलपटांच्या उदयानंतर चित्रपटांमध्येही संगीताला विशेष स्थान मिळाले. १९३०नंतरच्या दोन दशकांपर्यंत आधी कोल्हापूर आणि त्यामागोमाग पुणे व मुंबई ही भारतीय चित्रपटनिर्मितीची प्रमुख केंद्रे होती. त्यामुळे या प्रदेशात प्रस्थापित असलेल्या संगीताचा आविष्कार या चित्रपटांमधून होऊ लागला. महाराष्ट्रीय संगीत-कलावंतांनी या दोन दशकांमध्ये चित्रपटांमधून केलेला संगीताविष्कार महत्त्वाचा होता. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात चित्रपटांनी संगीत कलेवर टाकलेला प्रभाव अधिक ठळक बनला.

❑❑❑



पंचदेवता
: राजा रवी वर्मा



हिंदू विवाहसोहळा : एम. व्ही. धुरंधर

# ११

# चित्रकलेतील स्थित्यंतरे

## ११.१. पूर्वकथन :

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रज सरकारने भारतात कलाशिक्षण देण्यास प्रारंभ केला. कलकत्ता (१८५४), मद्रास आणि मुंबई (१८५७) येथे सरकारने कला महाविद्यालये सुरू केली. भारतात राज्यकर्ते आणि धनिक यांच्या आश्रयाने चालत आलेली चित्रकलेची प्राचीन काळापासूनची परंपरा तर होतीच; पण प्रत्यक्ष समाजजीवनात घरे, देवळे, वाडे यांच्या भिंती चित्रांनी सुशोभित करण्याची रीतही अस्तित्वात होती. आदिवासींमध्ये घरांवर चित्रे रंगवण्याची प्रथा आजही अस्तित्वात आहे. ब्रिटिश राजवटीमध्ये भारतीय समाजातील चित्रसंस्कृतीला नवे वळण मिळाले.

इंग्रजांनी कला विद्यालये सुरू करण्याच्या कितीतरी आधी – अठराव्या शतकापासूनच – युरोपातील अनेक चित्रकार भारतात येऊन इथल्या देशी राज्यसंस्था अथवा इंग्रज सरकार यांच्या आश्रयाला राहून आपल्या चित्रकलेचा आविष्कार करत होते. या काळात भारताविषयीचे अधिकाधिक 'ज्ञान' विविध मार्गांनी मिळवण्याचे वसाहतवादी इंग्रज सरकारचे धोरण होते. नद्या-डोंगर, पक्षी-प्राणी, लेण्या-किल्ले, शहरी व ग्रामीण वस्त्या, विविध जातीजमातींचे लोक व त्यांचे पेहराव इत्यादी विषयांची या युरोपीय चित्रकारांनी काढलेली चित्रे सरकारसाठी माहितीचा एक विश्वासार्ह स्रोत होता.

पण याच चित्रांचा एतद्देशीय भारतीय समाजातही प्रसार होत होता. आणि त्यांच्या योगाने देशी कारागीर, कलावंत, चित्रकार यांचा पाश्चात्त्य चित्रकलेशी परिचय होऊ लागला. या चित्रकारांनी भारतीय पर्यावरणातील निसर्गदृश्ये आणि मंदिर स्थापत्य यांची वास्तववादी पद्धतीने चित्रे काढली. पारंपरिक भारतीय चित्रे ही द्वीमितीय होती, तर पाश्चात्त्य चित्रांची शैली त्रिमितीय होती. यथार्थदर्शन आणि छायाप्रकाश या तंत्रांच्या सहाय्याने काढल्या जाणाऱ्या या चित्रांद्वारे प्रत्यक्ष जीवनाचे प्रतिरुपण करणारी

वास्तववादी चित्रशैली भारतीयांना परिचित झाली. या चित्रांची शैली ही 'ॲकॅडेमिक शैली' म्हणून ओळखली जाते. इंग्लंडमध्ये 'ॲकॅडेमिझम' अशी संज्ञा प्रचलित होती. त्यावरून हे संबोधन आले असावे. वस्तू जशी दिसते तशी कागदावर उतरवणे हे या शैलीत अभिप्रेत होते. तात्त्विक दृष्ट्या या चित्रकारीमागे वास्तववादाचा विचार होता.

इंग्रजांच्या कला विद्यालयांतून आधुनिक पद्धतीने चित्रकलेचे प्रशिक्षण देण्यापूर्वीच अनेक देशी चित्रकार या युरोपीय चित्रकारांच्या चित्रशैलीला अनुसरत ॲकॅडेमिक शैली आत्मसात करू लागले होते. दुसरीकडे पारंपरिक हस्तलिखितांवरील चित्रे आणि देवळा-घरांच्या भिंतींवरील चित्रे रंगवण्याची परंपरा जिवंत होतीच. तेव्हा या देशी चित्रकारांच्या चित्रांमध्ये पारंपरिक आणि ॲकॅडेमिक अशा दोन्ही चित्रशैलींची सरमिसळ दिसून येते. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात कलकत्ता, पटणा, पुणे इत्यादी ठिकाणच्या लिथोग्राफ प्रेसमध्ये छापल्या जाणारी मुद्राचित्रे अशा सरमिसळीतून रेखाटली गेलेली दिसतात.

इंग्रजांनी सुरू केलेल्या कला विद्यालयांमध्ये सुरुवातीपासून हीच ॲकॅडेमिक शैली शिकवली गेली. त्यामुळे महाराष्ट्रातल्या चित्रकलेच्या इतिहासावर या शैलीचा मोठा ठसा उमटलेला आहे. कालांतराने चित्रकलेमध्ये नवे विचार, नव्या कल्पना यांचा प्रवेश झाला. त्यातून विसाव्या शतकाच्या प्रथमार्धात महाराष्ट्रात चित्रकलेच्या क्षेत्रात नवे प्रवाह निर्माण झाले.

एक ललित कला म्हणून चित्रकलेची वाढ आणि विकास होतानाच समाजजीवनातले चित्रकलेचे स्थान बदलत गेले. प्रसारमाध्यमे, जाहिराती, वस्तूंची आकर्षक वेष्टणे, भिंतीवरील शोभेची कॅलेंडरे, पुस्तकांची मुखपृष्ठे या सर्व ठिकाणी चित्रकलेने प्रवेश केला. त्यामुळे चित्रकलेला दैनंदिन लोकजीवनात स्थान मिळाले. विसाव्या शतकाच्या प्रथमार्धात चित्रकलेविषयी काही विशिष्ट कल्पना लोकप्रिय झाल्या; या कल्पनांनी समाजाचे दृश्यसंवेदन प्रभावित केले. ललित कला आणि प्रत्यक्ष जीवनव्यवहारातील उपयोजित कला या दोन्ही अंगांनी महाराष्ट्रातील चित्रकलेचा विचार येथे केला आहे.

## ११.२ औपचारिक शिक्षणक्रम आणि चित्रकलेतील नवे प्रवाह

जे. जे. कला विद्यालयातून ॲकॅडेमिक पद्धतीने आधुनिक चित्रकलेचे शिक्षण देण्यास प्रारंभ झाला. सुरुवातीला या संस्थांचे चालक व शिक्षक इंग्रज असत. यापैकी काही इंग्रजांना याची जाणीव होती की भारताला प्राचीन काळापासून स्वतःची चित्रकलेची एक प्रदीर्घ परंपरा आहे. कलकत्त्याच्या कला विद्यालयाचा संचालक हॅवेल किंवा मुंबईच्या जे. जे. कला विद्यालयाचा प्रमुख चार्ल्स ग्रिफिथ्स हे अशा मंडळींपैकी होते. १८९६मध्ये कलकत्त्याच्या कला विद्यालयाच्या प्रमुख पदाची सूत्रे हाती घेतलेल्या हॅवेल याने स्पष्टपणे अशी भूमिका घेतली की भारतीय चित्रकलेच्या विद्यार्थ्यांनी पाश्चात्त्य चित्रकलेचे

अंधानुकरण न करता आपल्या देशी समृद्ध चित्र-परंपरेचा अभ्यास करून आपली चित्रकला जोपासली पाहिजे. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात आनंद कुमारस्वामी, भगिनी निवेदिता, अबनीन्द्रनाथ, पर्सी ब्राउन इत्यादींनी कलेतील भारतीयत्वाचा पुरस्कार केला. कलेविषयीची पौर्वात्त्य सौंदर्यमूल्ये ही पाश्चात्त्य सौंदर्यमूल्यांपेक्षा पूर्ण भिन्न आहेत या भूमिकेतून त्यांनी चित्रकलेची पौर्वात्यवादी कल्पना मांडली. यातून चित्रकलेत भारतीय पुनरुज्जीवनवादी चळवळ सुरू झाली. कलकत्ता हे या चळवळीचे केंद्र बनले.

**ॲकॅडेमिक-वास्तववादी चित्रशैली**

मुंबईमध्ये चित्रकलेतील पुनरुज्जीवनवादी चळवळ इतकी प्रबळ बनली नाही. ग्रिफिथ्ससारख्या कलाशिक्षकाला भारतीय कलापरंपरेबद्दल आस्था होती. या आस्थेपोटीच त्याने १८७२-७५च्या दरम्यान अजिंठा लेण्यांमधील भित्तिचित्रांच्या प्रतिकृती आपल्या विद्यार्थ्यांकडून करवून घेतल्या होत्या. परंतु एकंदर मुंबईच्या जे. जे. कला विद्यालयात ब्रिटिश ॲकॅडेमिक शैलीचेच वर्चस्व राहिले. या विद्यालयातून विसाव्या शतकाच्या प्रारंभकाळी आबालाल रहमान, महादेव धुरंधर, श्रीपाद दामोदर सातवळेकर, ए. एक्स. त्रिंदाद, एस. एल. हळदणकर, एम. एफ. पीठावाला हे चित्रकार नावारूपाला आले. या सर्वांची चित्रशैली ॲकॅडेमिक होती. पौराणिक तसेच वास्तवातील व्यक्ती, वस्तू, निसर्गदृश्ये हे या चित्रकारांच्या चित्रांचे विषय होते. कलकत्ता हे भारतीय पुनरुज्जीवनवादी चित्रकलेचे, तर मुंबई हे पाश्चात्त्य ॲकॅडेमिक चित्रकलेचे केंद्र राहिले.

मुंबईत १८८८मध्ये स्थापन झालेल्या बॉम्बे आर्ट सोसायटी या संस्थेने चित्रकलेच्या प्रसाराला हातभार लावला. या संस्थेचे वार्षिक प्रदर्शन नियमितपणे भरत असे व या प्रदर्शनात अव्वल चित्रांना पारितोषिक दिले जाई. प्रदर्शनात तैलचित्रे, जलरंग चित्रे, मूर्तिकला, कोळसा व खडूची चित्रे (Black and White Pastels), शिल्पकृती (Architecture), छायाचित्रे, तरुण चित्रकार विभाग आणि बालचित्रकार विभाग असे सात विभाग असत. चित्रकलेशी संबंधित नक्षीचे विणकाम, गालिचे, भरतकाम वगैरे कलाकृतींचाही प्रदर्शनात समावेश असे. सोसायटीतर्फे क्वचित चित्रकलेविषयी व्याख्यानेही आयोजित केली जात. १९३४पर्यंत संस्थेचे हे उपक्रम नियमितपणे चालले. १९१० आणि १९३५मध्ये सोसायटीने विशेष अंक काढले (कलासेवक १९३५ : ४६२-४६३). १९१८मध्ये मुंबईत 'आर्ट सोसायटी ऑफ इंडिया' या संस्थेची स्थापना झाली. चित्रांची प्रदर्शने भरवणे, चित्रकलेतील नव्या प्रवाहांविषयी चर्चा घडवून आणणे इत्यादी उपक्रमांद्वारे समाजात चित्रसाक्षरता निर्माण करण्याचे कार्य या संस्थांकडून होत होते.

याच काळात, कला विद्यालयातील औपचारिक चित्रकला शिक्षण न घेतलेला, राजा रवी वर्मा हा चित्रकार भारतभर गाजला. राजा रवी वर्मांनी भारतीय पौराणिक व्यक्तिरेखा आणि पुराणांतील, मिथकांतील दृश्ये पाश्चात्त्य ॲकॅडेमिक शैलीत चितारली. रवी वर्मांचे

वास्तव्य १८९०नंतर प्रामुख्याने मुंबईत राहिले. त्यांनी स्थापन केलेला लिथोग्राफ प्रेस देखील आधी मुंबईत आणि नंतर लोणावळ्याजवळ मळवली येथे होता. येथे छापलेल्या रवी वर्मांच्या मुद्राचित्रांनी, कॅलेंडरांनी पुढली चाळीस-पन्नास वर्षे महाराष्ट्रीय समाजाच्या चित्र-संवेदनेवर खोलवरचा प्रभाव टाकला. या प्रभावाची चर्चा पुढे मुद्रित चित्रांच्या संदर्भात केली आहे.

याच काळात भारतीय जनमानसात राष्ट्रवादी विचार रुजू लागला होता. ब्रिटिश राजवट आणि त्यांची संस्कृती परकीय आणि म्हणूनच त्याज्य आहे, ही जाणीव दृढ होऊ लागली होती. आपली अस्मिता शोधण्यासाठी भारतीय परंपरा व इतिहास यांच्या अध्ययनाकडे ज्ञानक्षेत्रातील लोक वळू लागले होते. रवी वर्मांच्या पौराणिक विषयांवरील, देवदेवतांच्या चित्रांना, तसेच शिवाजी महाराजांसारख्या राष्ट्रपुरुषांच्या चित्रांना समाजात मिळालेल्या लोकप्रियतेमागे राष्ट्रवादी भावनेचा उदय हे देखील महत्त्वाचे कारण होते. रवी वर्मांनी ॲकॅडेमिक वास्तववादी शैली अनुसरली तरी त्यांचे चित्रविषय भारतीय राहिले. मुंबईच्या अनेक चित्रकारांनी रवी वर्मांपाठोपाठ हीच वाट चोखाळली.

अगदी जे. जे. कला महाविद्यालयातून चित्रकलेचे औपचारिक शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या चित्रकारांना देखील रवी वर्मांच्या चित्रांचा प्रभाव टाळता आला नाही. महादेव धुरंधर, एस. एल. हळदणकर यांच्या चित्रांवर हा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो.

### देशी चित्रशैलीला उजाळा

१९१९मध्ये जे. जे. कला विद्यालयाचे प्रमुख बनलेले कॅप्टन डब्ल्यू. इ. ग्लॅडस्टन सॉलोमन यांना हॅवेलप्रमाणेच पारंपरिक भारतीय चित्रकलेविषयी आस्था होती. "True work of the modern Indian artist is to revive the ancient and national methods of artistic expression and to revitalise and restore them," असे त्यांचे मत होते (Patel & Thorner 1995 : 187). तोवर जे. जे. कला विद्यालयात ब्रिटिश चित्रकलेच्या धर्तीवर तैलरंगात चित्रे रंगवण्यावर भर असे. सॉलोमन यांनी भारतीय पारंपरिक चित्रकलेप्रमाणे जलरंगात चित्रे रंगवण्याचे शिक्षण प्रामुख्याने दिले. एस. एल. हळदणकरांसारखे जलरंगातील पारंगत चित्रकार सॉलोमन यांच्या मार्गदर्शनाखाली शिकून तयार झाले. गुणवंत हणमंत नगरकर आणि जगन्नाथ मुरलीधर अहिवासी या चित्रकारांनी सॉलोमन यांना हवा असणारा भारतीय चित्रकलेचा आविष्कार अत्यंत दमदारपणे केला. नगरकरांवर अजिंठा शैलीचा प्रभाव होता, तर अहिवासी राजस्थानी व कांग्रा शैलीतील चित्रपरंपरा अनुसरत होते. सॉलोमन यांच्या मार्गदर्शनाखाली ही नवी 'बॉम्बे रिव्हायवलिस्ट' चित्रपरंपरा तयार झाली. १९१९ ते १९३६ या काळात सॉलोमन जे. जे. कला विद्यालयाचे प्रमुख होते. हा 'बॉम्बे रिव्हायवलिस्ट' चित्रकलेचा सुवर्णकाळ होता. राष्ट्रवादी जाणिवा व भारतीय आयडेंटीटीचा शोध या प्रेरणा या चित्रनिर्मितीमागे होत्या.

या काळात कलकत्त्यात देखील पुनरुज्जीवनवादी चित्रचळवळ ऐन भरात होती.

जे. जे. कला विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना भारतीय पुनरुज्जीवनवादी कलाशैलीचे शिक्षण दिले जावे या हेतूने सॉलोमन यांनी भारतीय कलाशैलीसाठी 'इंडियन डेकोरेटिव्ह पेंटिंग' या विषयाचा स्वतंत्र वर्ग स्थापन करून त्यावर मार्गदर्शक म्हणून जगन्नाथ अहिवासी यांची नेमणूक केली. या वर्गात प्रामुख्याने भित्तीचित्र, म्यूरल चित्रांविषयीचे शिक्षण दिले जाई. स्वतः सॉलोमन यांनी आपली पुस्तके आणि लेख यांच्याद्वारे भारतीय चित्रशैलीचे वेगळेपण आणि महत्त्व यांचे विवेचन केले. सॉलोमन यांच्या काळात जे. जे. स्कूलच्या इमारतीच्या सेंट्रल हॉलमध्ये 'The Re-establishment of the Goddess Art' या नावाचे एक भव्य म्यूरल उभारण्यात आले.

औंधचे राजे बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी अजिंठा लेण्यांतील चित्रांचा अभ्यास केला तेव्हा जे. जे. कला विद्यालयातल्या चांगल्या विद्यार्थ्यांना आपल्यासोबत अजिंठ्याला पाठवावे अशी विनंती त्यांनी या विद्यालयाचे शिक्षक महादेव धुरंधर यांच्याकडे केली. प्राचार्य सॉलोमन यांनी एम. व्ही. आठवले, बापू आपटे, केतकर, नांदणीकर अशा काही चित्रकारांना पाठवण्याची परवानगी धुरंधरांना दिली (अंबिका धुरंधर २०१० : ४५). एकदा बाबुराव पेंटर यांनी त्यांच्या 'सिंहगड' या मूकपटाचे मोठे होर्डिंग स्वतःच तैलरंगात तयार केले होते. मुंबईच्या ग्रँट रोड येथील नॉव्हेल्टी सिनेमागृहाच्या बाहेर लावलेले हे होर्डिंग सॉलोमन यांनी पाहिले. त्यांना ते इतके आवडले की आपल्या विद्यार्थ्यांना त्यांनी ते होर्डिंग पाहण्यासाठी आवर्जून पाठवले, अशीही आठवण सांगतात (ज्ञानेश्वर नाडकर्णी २००१ : २८). सॉलोमन आपल्या विद्यार्थ्यांवर देशी चित्रपरंपरेचे संस्कार होण्यासाठी किती प्रयत्नशील होते, हे अशा उदाहरणांवरून स्पष्ट होते.

मुंबईत अहिवासींच्या हाताखाली शिकलेल्या रसिकलाल पारीख, रविशंकर रावळ, भानू स्मार्त, ज. द. गोंधळेकर, नगरकर, चिमुलकर इत्यादी चित्रकारांनी पुढे मध्ययुगीन चित्रपरंपरेशी नाते सांगणाऱ्या पुनरुज्जीवनवादी चित्रशैलीत निर्मिती केली. मात्र यातून कलकत्त्यात जशी पुनरुज्जीवनवादी चित्रकलेची चळवळ निर्माण झाली, तसे काही मुंबईला घडले नाही. मुंबईच्या जे. जे. कला विद्यालयाची ओळख 'पाश्चात्त्य ॲकॅडेमिक चित्रशैलीचे शिक्षण-केंद्र' अशीच राहिली.

विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून जे. जे. कला विद्यालयातून बाहेर पडलेल्या अनेक चित्रकारांनी खाजगीरित्या चित्रकलेचे वर्ग चालवायला सुरुवात केली होती. कोल्हापूरला आबालाल रहमान यांच्यापासून चित्रकारांची एक दीर्घ परंपराच निर्माण झाली होती. १९३२-३४ या काळात दत्तोबा दळवी यांनी कोल्हापूरमध्ये 'दळवी'ज आर्ट इन्स्टिट्यूट' स्थापन केली. १९१५मध्ये चित्रकार केतकरांनी केतकर्स आर्ट इन्स्टिट्यूट स्थापन

केली. तर एम. व्ही. आठवले यांनी नागपूर येथे 'नागपूर स्कूल ऑफ आर्टस्' ही संस्था स्थापन केली. पुढे 'प्रोग्रेसिव्ह आर्टिस्ट्स ग्रुप' म्हणून ओळखल्या गेलेल्या बंडखोर चित्रकारांपैकी सय्यद हैदर रझा आणि अंबादास हरी गाडे यांनी चित्रकलेचे पहिले धडे आठवले यांच्या याच संस्थेमध्ये गिरवले (ज्ञानेश्वर नाडकर्णी २००१ : ८). 'बॉम्बे ग्रुप'चे सदस्य मोहन कुलकर्णी यांची गिरगावात 'मोहन आर्ट क्लब' ही संस्था होती. अशा अनेक संस्था मुंबईसह पुणे, बडोदा, इंदोर, कोल्हापूर या शहरी होत्या. सॉलोमन यांच्या प्रेरणेने पुनरुज्जीवित झालेली भारतीय चित्रशैलीची तंत्रे आणि ब्रिटिश ॲकॅडेमिक शैली अशा दोन्ही चित्रशैलींचे संमिश्र संस्कार या संस्थांमधून शिकाऊ चित्रकारांवर केले जात.

चित्रकलेच्या औपचारिक शिक्षणक्रमात सॉलोमन आणि त्यांचे शिष्य पारंपरिक भारतीय चित्रकलेची तत्त्वे पुनरुज्जीवित करू पाहात असताना शिक्षित मध्यमवर्गीय महाराष्ट्रीय लोकांच्या घरांच्या भिंतींवर मात्र पौराणिक देवदेवतांना, आख्यानांमधील कथनांना पाश्चात्त्य ॲकॅडेमिक शैलीत ढाळणाऱ्या राजा रवी वर्मा यांची चित्रे विसावली होती. आधुनिक समाजात कलेचा सार्वत्रिक प्रसार होऊन ती सर्व स्तरांपर्यंत पोहोचली की 'उच्चभ्रू' आणि 'लोकप्रिय-लोकानुनयी' अशा दोन तऱ्हांच्या कलाभिरुची निर्माण होत असतात. महाराष्ट्रातील चित्रकलेच्या बाबतीत हे विसाव्या शतकाच्या प्रथमार्धात घडून आले.

## ११.३ आधुनिकवादी चित्रकला

कॅप्टन सॉलोमन आणि त्यांचा शिष्य-संप्रदाय यांनी भारतीय चित्रपरंपरेचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न करूनही मुंबईच्या चित्रकलाविश्वावर असलेला ॲकॅडेमिक चित्रशैलीचा प्रभाव नाहीसा झाला नाही; उलट तीच या चित्रकलाविश्वाची ओळख राहिली. उलट १९३६मध्ये सॉलोमन जे. जे. कला विद्यालयाच्या प्राचार्य पदावरून दूर गेल्यानंतर अल्पावधीतच ही मुंबई-महाराष्ट्रातील भारतीय चित्रपरंपरेची पुनरुज्जीवनवादी धारा प्रभावहीन ठरली.

१९४०चे दशक हे कला-साहित्याच्या क्षेत्रात परिवर्तनाच्या नव्या वाटा शोधणारे दशक होते. पाश्चात्त्य देशांमध्ये निर्माण झालेले साम्यवादासारखे नवे विचारसंप्रदाय, फ्राइडच्या मानसशास्त्रीय सिद्धान्तांसारखे नवे ज्ञानप्रवाह, अस्तित्ववादासारखे तत्त्वज्ञान यांचा परिचय भारतीय ज्ञानव्यवहार आणि कलाव्यवहार यांत सहभागी. मंडळींना होऊ लागला होता. दृक्प्रत्ययवाद, प्रतिमावाद इत्यादी नव्या कलाविचारांची ओळख त्यांना होती. याच प्रभावातून १९४०नंतर मराठीत नवसाहित्याचा प्रवाह निर्माण झाला होता. तरुण पिढीतील चित्रकारांना मुंबईच्या कला विद्यालयातली प्रस्थापित ॲकॅडेमिक शैली आणि सॉलोमनप्रभृतींनी पुरस्कारिलेली पुनरुज्जीवनवादी शैली या दोन्ही शैलींचा अपुरेपणा बोचू लागला. नव्या जीवनातल्या जाणिवा प्रकट करण्यासाठी रंगरेषांची नवी

रूपे शोधण्यासाठी हे चित्रकार धडपडू लागले. नवेपणाची ही आस प्रत्येक काळातल्या जाणत्या कलावंताला लागलेली असते. आणि त्यातून त्या त्या काळाची वैशिष्ट्यपूर्ण कलामूल्ये, कलादृष्टी निर्माण होत असते.

अशी नवी कलादृष्टी मुंबईच्या चित्रकलाविश्वात निर्माण होण्यास प्रारंभ १९३६च्या आसपासच झाला. जे. जे. कला विद्यालयाच्या प्राचार्यपदी कॅप्टन सॉलोमन यांच्या जागी आलेले चार्ल्स जेरार्ड यांना चित्रकलेतील भारतीय पुनरुज्जीवनवादी विचार मान्य नव्हता. चित्रकारांनी अभिव्यक्तीचे नवनवे मार्ग शोधावेत यासाठी त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. रंगलेपनाची नवी तंत्रे आणली. पाश्चात्त्य आधुनिकवादी कलाचळवळीतील दृक्प्रत्ययवाद, अभिव्यक्तीवाद यांच्याशी जे. जे. कला विद्यालयातल्या विद्यार्थ्यांचा परिचय झाला. अहिवासी व नगरकर यांचे राजस्थानी चित्रपद्धती, म्यूरल, वॉश टेक्निक इत्यादी शिकवणारे वर्ग आता मागासलेले ठरले. विद्यार्थी त्याविरुद्ध नापसंती व्यक्त करू लागले (बहुळकर २०१५ : ५०).

कला विद्यालयाच्या औपचारिक शिक्षणक्रमाच्या बाहेरही चित्रकलेतील आधुनिकवादी कलामूल्यांचा प्रभाव वाढू लागला. १९३७ साली बॉम्बे आर्ट सोसायटीच्या वार्षिक प्रदर्शनात अमृता शेरगील यांच्या 'ग्रुप ऑफ यंग गर्ल्स' या चित्राला सुवर्णपदक मिळाले. या चित्राची शैली अभिव्यक्तीवादी होती. ही नव्या कलामूल्यांच्या आगमनाची नांदी होती. मुंबईप्रमाणे कलकत्त्यातही आधुनिकवादी चित्रकलेचा पुरस्कार करणारा कलकत्ता ग्रुप नावाचा चित्रकारांचा एक गट तयार झाला होता. पुनरुज्जीवनवादी, पौर्वात्यवादी चित्रपरंपरेविरुद्ध त्यांनी बंड केले होते. १९४४ व ४५ साली या गटातील चित्रकारांच्या चित्रांचे प्रदर्शन मुंबई येथे भरले. या प्रदर्शनातील चित्रांनी मुंबईतील तरुण चित्रकार बरेच प्रभावित झाले होते. १९३९मध्ये नाझींनी ज्यूंचा छळ सुरू केल्यानंतर युरोपातील तीन मोठे ज्यू चित्रसमीक्षक भारतात, मुंबईत आश्रयाला आले. त्यांची नावे : रुडी व्हॉन लायडन, इमॅन्युअल स्लेरिंजर आणि टाइम्सचे आर्ट डायरेक्टर वॉल्टर लँघॅमर. या तिघाही कलासमीक्षकांनी सातत्याने आधुनिकवादी चित्रविचाराचा पाठपुरावा केला. हा विचार अनुसरणाऱ्या चित्रकारांना प्रोत्साहन दिले (ज्ञानेश्वर नाडकर्णी २००१ : १२). त्याचाही तरुण चित्रकारांवर प्रभाव पडला.

कलकत्त्याच्या 'कलकत्ता ग्रुप'च्या धर्तीवर मुंबईतल्या चार्ल्स जेरार्ड यांच्या प्रभावळीतील चित्रकार-विद्यार्थ्यांनी आपल्या गटाला 'बॉम्बे ग्रुप' असे नाव धारण केले. १९४३च्या सुमारास हा गट अस्तित्वात होता. त्यात पी. टी. रेड्डी, मोहन कुलकर्णी, एम. टी. भोपळे, ए. ए. मजीर, क्लेमंट बाप्टिस्टा या चित्रकारांचा समावेश होता. या ग्रुपला 'यंग टर्क्स' (तरुण बंडखोर) असेही म्हणत (ज्ञानेश्वर नाडकर्णी २००१ : १-२). परंतु या गटाचे अस्तित्व फार काळ टिकले नाही. आणि चित्रनिर्मितीवर स्वतःचा स्वतंत्र असा

ठसाही या चित्रकारांना उमटवता आला नाही.

## प्रोग्रेसिव्ह आर्टिस्ट्स ग्रुपची स्थापना

याच दरम्यान, म्हणजे १९४२ ते ४८ या काळात भारतातले समाजजीवन, राजकीय जीवन फार मोठ्या उलथापालथींचे बनले होते. एकीकडे इंग्रजांविरुद्ध 'चले जाव' आंदोलन भारतभर पेटले होते. नव्या लोकशाहीवादी विचारांचे सरकार स्थापन करण्याच्या स्वप्नाने सर्वजण भारावून गेले होते. १९४५-४६मध्ये मुंबईत झालेल्या आरमाराच्या बंडाच्या रूपाने विद्रोहाचे एक नवेच रूप दिसले. कम्युनिस्ट पक्षाची चळवळ तरुणांना आकर्षित करत होती. सामाजिक समतेचे मूल्य प्रस्थापित करण्यासाठी संघर्ष करण्याची साम्यवादाने दिलेली हाक तरुण, संवेदनशील कलावंतांना भावली होती. एक नवे जग, नवे जीवन घडवण्याच्या प्रेरणेने या काळातले कलावंत, लेखक-कवी झपाटलेले दिसतात.



**क्रिशेन खन्ना : म. गांधींची हत्या - वृत्ताचे पडसाद (१९४८)**

अशा झपाटलेल्या सहा चित्रकारांनी १९४७मध्ये मुंबईत 'प्रोग्रेसिव्ह आर्टिस्ट्स ग्रुप' या गटाची स्थापना केली. फ्रान्सिस न्यूटन सूझा, मकबुल फिदा हुसेन, कृष्णाजी हौळाजी आरा, सय्यद हैदर रझा, हरी अंबादास गाडे आणि सदानंद बाकरे या चित्रकार-कलावंतांचा त्यात समावेश होता. सूझा हे या गटाचे प्रमुख प्रवर्तक व सूत्रधार होते. भारताच्या वेगवेगळ्या प्रांतांतून मुंबईत आलेले हे चित्रकार भिन्न भिन्न प्रवृत्तींचे कलावंत होते. त्यांच्या शैली भिन्न होत्या. परंतु त्या सर्वांमध्ये समान सूत्र म्हणजे, नव्या काळाची

स्पंदने टिपणारी कला त्यांना निर्माण करायची होती. त्यासाठी पारंपरिक चित्रविचाराविरुद्ध विद्रोह केला. विशेष म्हणजे या सहा चित्रकारांपैकी केवळ रझा आणि गाडे या चित्रकारांनी जे. जे. कला विद्यालयाचा जी. डी. आर्ट हा पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला होता. इतरांचा औपचारिक शिक्षणक्रमाशी संबंध नव्हता. सूझा यांना जेरार्डनी जे. जे. मधून काढून टाकले होते (ज्ञानेश्वर नाडकर्णी २००१ : १२).

मात्र या चित्रकारांनी तत्कालीन रूढ असलेल्या ॲकॅडेमिक आणि पुनरुज्जीवनवादी या दोन्ही चित्रशैलींना सर्वंकष नकार दिला.

१९५०च्या सुमारास 'प्रोग्रेसिव्ह' (प्रगतिशील) हा शब्द साम्यवादी चळवळीशी निगडित होता. या काळातील मुंबईतील बहुसंख्य कलावंत डाव्या विचाराने भारावलेले होते. मुंबईत प्रोग्रेसिव्ह रायटर्स असोसिएशन (प्रगतिशील लेखक संघ) होता. सज्जाद झहीर, ए. अहमद अब्बास, कृष्णचंद्र असे नामवंत लेखक १९४५-४६च्या सुमारास या संघटनेत सक्रीय होते. नाट्यकलेच्या क्षेत्रात १९४३-४४ मध्ये अली सरदार जाफरी, के. अहमद अब्बास इत्यादींनी 'इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशन' (इप्टा) ही संस्था स्थापन केली. प्रोग्रेसिव्ह आर्टिस्ट्स ग्रुपचे प्रमुख सूत्रधार सूझा हे देखील कम्युनिस्ट चळवळीशी संबंधित होते. गटाच्या स्थापनेपूर्वी सूझा यांच्या चित्रांचे प्रदर्शन किंग्ज सर्कल येथील साम्यवादी पक्षाच्या कचेरीत भरले होते. येथे किंवा खेतवाडीच्या पक्षाच्या प्रमुख कचेरीत, तर कधी गिरगावातल्या 'फ्रेंड्स ऑफ द सोविएत युनियन' या संघटनेच्या जागेत या गटाच्या बैठका होत (ज्ञानेश्वर नाडकर्णी २००१ : १०). पण प्रोग्रेसिव्ह आर्टिस्ट्स ग्रुपने साम्यवादी विचारात अडकून न राहता उदारमतवादी आधुनिकतेचा पुरस्कार केला. १९४९च्या प्रोग्रेसिव्ह आर्टिस्ट्स ग्रुपच्या जाहीरनाम्यात सूझांनी 'समाजाभिमुखता हे कलावंताचे एकमेव ध्येय असू शकत नाही, अशी भूमिका घेऊन कलावंताचे स्वातंत्र्य हे सर्वोच्च मूल्य मानले (ज्ञानेश्वर नाडकर्णी २००१ : ३४ आणि ३९).

एकीकडे पारंपरिक कलाविष्काराला नाकारताना 'स्व'-ओळखीचाही पेच (आयडेंटिटी क्रायसिस) या चित्रकारांमध्ये दिसतो. खरे तर तो या काळाचाच युगधर्म होता. परंपरेला नाकारताना स्वतःची ओळख नेमकी कशात आहे याविषयी या काळातील भारतीय कलावंत द्विधा वृत्तीत सापडलेले दिसतात. चित्रकलेच्या संदर्भात एकोणिसाव्या शतकापासून चालत आलेली ॲकॅडेमिक शैली ही ब्रिटिश वसाहतवादाची निदर्शक होती, तर पुनरुज्जीवनवादी चित्रशैली ही कालबाह्य परंपरा होती. या दोन्हींना नकार देताना आपले स्वत्व कोणत्या मार्गाने प्रकटावे याचा धांडोळा घेताना हे चित्रकार दिसतात. एकीकडे त्यांना भारतीय परंपरेचे नव्या संदर्भात पुनर्निर्माण करावेसे वाटत होते, आणि दुसरीकडे, आपल्या पिढीची संवेदना प्रभावीपणे प्रकट करणाऱ्या म्हणून समकालीन पाश्चात्त्य कलाजाणिवांचेही त्यांना आकर्षण वाटत होते.

प्रोग्रेसिव्ह आर्टिस्ट्स ग्रुपचे अस्तित्व फार काळ टिकले नाही. परंतु या गटातल्या चित्रकारांनी सतत नव्या आविष्कारशैलीचा घेतलेला शोध नंतरच्या पिढ्यांतील चित्रकारांसाठी प्रेरणादायी ठरला. १९५०नंतरच्या चित्रकलेवर प्रोग्रेसिव्ह आर्टिस्ट्स ग्रुपमधील चित्रकारांनी तर आपल्या निर्मितीचा ठसा उमटवला.

## ११.४ चित्रकलेचे नवे तंत्रज्ञानाधारित आविष्कार

एकीकडे एक ललित कला म्हणून चित्रकलेचा असा विकास होत असताना दुसरीकडे नव्या तंत्रमाध्यमाच्या सहाय्याने कॅलेंडर आर्ट, जाहिराती, पुस्तकांची-मासिकांची मुखपृष्ठे अशा रूपांत महाराष्ट्राच्या विविध समाज-स्तरांमध्ये 'चित्रे' पोहोचू लागली आणि त्यांच्याद्वारे समाजाचे दृश्यसंवेदन आकाराला येऊ लागले.

ब्रिटिश वसाहतकाळात एकंदर भारतीय कलाविष्कारावर नवनव्या तंत्रज्ञानाचा मोठा प्रभाव पडला. उदाहरणार्थ, छपाई व ध्वनिमुद्रण या तंत्रांमुळे अनुक्रमे चित्रकला व संगीत या कलांचे स्वरूप आमूलाग्र बदलले. चित्रे रंगवण्याची कला प्राचीन काळापासून होती. परंतु ही चित्रे मठ-मंदिरांच्या भिंतींवर असत. राजे-जहागीरदार यांच्या घरांच्या भिंतींवर शोभेसाठी त्यांना स्थान असे. पदरी चित्रकार बाळगून त्यांच्याकडून चित्रे काढवून घेणे धनिकांनाच शक्य असे.

एकोणिसाव्या शतकात मुद्रणतंत्राच्या आगमनानंतर हाताने रंगवलेली चित्रे छापली जाऊ लागली. एका चित्राच्या शेकडो-हजारो प्रती तयार करणे त्यामुळे सहज शक्य झाले. बाजारातल्या वस्तू आकर्षक वेष्टणात विकल्या जाऊ लागल्या. या वेष्टणांवर सजावटीसाठी चित्रे आली. पुस्तकांची मुखपृष्ठे रंगीत चित्रमय बनली. १९३०नंतर सर्वसामान्य घरांच्या भिंतींवर कॅलेंडरे आली. यामुळे एकेकाळी केवळ राजेरजवाड्यांच्या, धनिकांच्या दिवाणखान्यापुरती मर्यादित असणारी चित्रकला नव्या मुद्रण तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सर्वसामान्य लोकांच्या घरांपर्यंत पोहोचली. समाजाच्या दैनंदिन जीवनाचा एक भाग बनली.

चित्रे छापण्याची दोन तंत्र-साधने होती : वुडकट् प्रिंटिंग आणि लिथोग्राफ प्रेस. लाकडी ठोकळ्यांवर कोरलेला मजकूर अथवा चित्रे शाई लावून यंत्राच्या सहाय्याने कागदावर छापता येत असे. पण या छपाईत अचूकता व रेखीवपणा फारसा नसे. दुसरा प्रकार, लिथोग्राफ उर्फ शिळाछाप. या छापखान्यात एका विशिष्ट प्रकारच्या मऊ दगडावर चित्रे कोरून त्यांच्या सहाय्याने छपाई केली जाई. हा उत्तम प्रतीचा दगड जर्मनीत उपलब्ध होई. लिथोग्राफ छपाईचे तंत्रज्ञानही सर्वप्रथम जर्मनीमध्येच निर्माण झाले. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी लिथोग्राफ तंत्राचा युरोपात सर्वत्र प्रसार झाला. आणि त्याच दरम्यान ते भारतातही पोहोचले. १८२२मध्ये कलकत्त्याला, तर १८३०मध्ये पटण्याला लिथोग्राफ तंत्राने छपाई सुरू झाली (Neumayer & Schelberger, 2003 :

४-१). पश्चिम भारतात सर्वप्रथम शिळाछाप १८७८मध्ये पुण्याला विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी स्थापन केलेल्या चित्रशाळा प्रेसमध्ये सुरू झाले (देवगिरीकर १९४८ :). एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात लिथोग्राफ प्रेसवर छापलेली देवादिकांची, पौराणिक कथांची चित्रे भारतभर लोकप्रिय झाली होती असे दिसते. चित्रशाळेने छापलेल्या 'रामपंचायतन' या चित्राच्या महाराष्ट्रातील लोकप्रियतेची हकीगत प्रस्तुत ग्रंथाच्या पहिल्या खंडात दिलेली आहे. अगदी प्रारंभी काळ्या शाईत रेखाचित्रे छापली जात; लवकरच त्यांची जागा रंगीत चित्रांनी घेतली. छायाचित्रणकलेच्या उदयानंतर एकाच चित्रात एकाहून अधिक रंग उमटवण्याच्या तंत्रात आणखी सुधारणा झाली. या चित्रांना मागणी इतकी होती की इथले छापखाने त्यासाठी अपुरे पडत असत. कधी इथल्या छापखान्यांमधली चित्रे लोकांच्या पसंतीस येत नसत. या कारणांमुळे अनेक चित्रकार आपली चित्रे जर्मनी, ऑस्ट्रिया या देशांमध्ये पाठवून त्यांच्या प्रती छापवून घेत व इकडे विकत. 'जर्मन प्रिंट्स' या नावाने भारतात ही मुद्राचित्रे ओळखली जात.

या मुद्राचित्रांचा दर्जा अनेक गोष्टींवर अवलंबून असे : चित्र कोरण्यासाठी वापरला जाणारा दगड उत्तम प्रतीचा लागे. चित्राचे रेखांकन आणि रंगलेपन ही कौशल्याची कामे होती. पारंपरिक मार्गाने चित्रकारी शिकलेल्या सर्वच चित्रकारांच्या अंगी ही कौशल्ये असणे शक्य नव्हते. एका दगडावर काढलेल्या चित्राच्या सहाय्याने पाचशे प्रती छापता येत. त्याहून अधिक प्रती छापल्यास त्यांचा दर्जा चांगला येत नसे. अशा कारणांमुळे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात मुद्राचित्रे खूप छापली जात असली तरी त्यांपैकी फारच थोड्या चित्रांची निर्मिती उत्तम असे. अगदी जर्मनीहून छापवून आणलेल्या चित्रांचा दर्जाही बऱ्याचदा हिणकस असे. तरीही ही चित्रे तत्कालीन समाजात मोठ्या प्रमाणावर विकली जात. पौराणिक व देवदेवतांच्या तसबिरी यात प्रामुख्याने असत.

विशेष म्हणजे, इंग्रजांनी कलकत्ता आणि मुंबई येथे आर्टस्कूल स्थापन करून आधुनिक चित्रकारीचे शिक्षण देण्याच्या काही दशके आधीच भारतातल्या पारंपरिक चित्रकारांचा कलाविष्कार लिथोप्रेससारख्या आधुनिक तंत्रमाध्यमातून होऊ लागला होता. या चित्रकारांची चित्रशैली पारंपरिक होती, चित्रविषय पौराणिक होते, पण ज्या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ही चित्रे लोकांपर्यंत पोहोचत होती, ते तंत्रज्ञान मात्र आधुनिक होते. या काळात भारतातल्या वेगवेगळ्या शहरांमध्ये, राजेरजवाड्यांकडे काही युरोपीय चित्रकार आश्रयाला आले होते. त्यांच्या चित्रांच्या माध्यमातून आधुनिक चित्रकलेची थोडीफार तोंडओळख भारतीय चित्रकारांना होऊ लागली होती, हे खरे असले तरी आर्टस्कूलमधून वास्तववादी, रोमँटिक चित्रकलेचे प्रशिक्षण घेतलेले देशी चित्रकार अद्याप तयार व्हायचे होते.

## मुद्रित चित्रे आणि राजा रवी वर्मा

आधुनिक चित्रकलेचे औपचारिक शिक्षण न घेतलेला, परंतु तरीही १८८०-९०दरम्यान चित्रकार म्हणून भारतभर नावारूपाला आलेला चित्रकार म्हणजे राजा रवी वर्मा. रवी वर्मांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी भारतीय आणि पाश्चात्त्य चित्रकलेचा आपल्या पद्धतीने मेळ घातला. त्यांच्या चित्रांचे विषय भारतीय पौराणिक होते. रामायण-महाभारतातल्या आख्यानांमधले आणि जुन्या संस्कृत नाटकांमधले प्रसंग आणि व्यक्ती त्यांनी आपल्या चित्रांमधून चितारल्या. पण चित्ररेखाटन आणि रंगलेपन यासाठी त्यांनी वापरलेले तंत्र मात्र पाश्चात्त्य आधुनिक होते. त्यांची चित्रशैली वास्तववादी होती. युरोपीय वास्तववादी चित्रांचा त्यांच्यावर प्रभाव होता. जलरंगाप्रमाणेच तैलरंगातही त्यांनी चित्रे रंगवली. तैलरंगाचे आधुनिक तंत्र मुंबईच्या जे. जे. आर्टस्कूलमध्ये शिकवले जात असे. रवी वर्मांनी ते स्वतंत्रपणे आत्मसात केले. त्रावणकोर, बडोदा, औंध असे संस्थानिक आणि मुंबईचे धनिक यांनी राजा रवी वर्मांची चित्रे विकत घेतली, आणि या चित्रकाराची सर्वत्र प्रसिद्धी झाली.

याच काळात प्रसिद्ध पावलेल्या लिथोग्राफिक तंत्राद्वारे आपली चित्रे छापली जावीत अशी इच्छा राजा रवी वर्मा यांना होणे स्वाभाविक होते. त्या दिशेने त्यांचे प्रयत्नही सुरू होते. पुण्याच्या चित्रशाळेने राजा रवी वर्मा यांच्याशी करार करून त्यांची चित्रे छापण्याचा प्रयत्न केला होता. याचे विवेचन प्रस्तुत ग्रंथाच्या पहिल्या खंडात आले आहे. परंतु ते घडून आले नाही आणि त्यानंतर काही वर्षांनी, १८९२मध्ये राजा रवी वर्मांनी मुंबईचे एक धनाढ्य व्यापारी गोवर्धनदास माखनजी यांच्या भागिदारीत स्वतःचा लिथोप्रेस मुंबईत गिरगावात सुरू केला. १८९८मध्ये हा प्रेस गिरगावातून घाटकोपरला आणि १९०१मध्ये तेथून लोणावळ्याजवळ मळवली येथे स्थलांतरित झाला. चित्रकार म्हणून नावाजलेल्या रवी वर्मांला हा प्रेस व चित्रांचा व्यापार आर्थिकदृष्ट्या तोट्यात ढकलणारा ठरला. माखनजींनी आपले भांडवल काढून घेतले. अखेर रवी वर्मा प्रेसमधला जर्मन तंत्रज्ञ फ्रीट्झ स्लेइशर (Fritz Schleisher) याच्या ताब्यात रवी वर्मांनी आपल्या लिथोप्रेसची सगळी सूत्रे दिली (Neumayer & Schelberger, 2003 : 51-53). प्रेसवरचा मालकीहक्क सोडल्यानंतरही राजा रवी वर्मा स्लेइशरला चित्रांचा पुरवठा करत राहिले. रवी वर्मांचे १९०६मध्ये निधन झाल्यानंतरही या चित्रांचा कॉपीराइट स्लेइशरकडेच राहिला. जर्मन तंत्रज्ञाच्या निगराणीखाली छापल्या जाणाऱ्या रवी वर्मांच्या शेकडो चित्रांची विक्री पुढील काही दशके भारतभर सातत्याने होत राहिली. रवी वर्मांच्या या सुबक, रेखीव आणि आकर्षक रंगसंगतीने युक्त चित्रांनी भारतीय मुद्रित चित्रांच्या विश्वात नवा मानदंड प्रस्थापित केला.

रवी वर्मांच्या चित्रांना प्रस्थापित चित्रकार-कलावंतांकडून मान्यता कधीच मिळाली

नाही. त्यांनी पाश्चात्त्य वास्तववादी चित्रशैलीची भ्रष्ट नक्कल केली, असा आक्षेप घेण्यात आला. परंतु सर्वसामान्य जनतेत मात्र रवी वर्मांची चित्रे अतिशय लोकप्रिय झाली. घरोघरच्या भिंतींवर रवी वर्मांनी काढलेल्या लक्ष्मी, सरस्वती इत्यादी देव-देवतांची चित्रे दिसू लागली.

राजा रवी वर्मा मूळचे केरळमधील असले तरी त्यांच्यात आणि महाराष्ट्रीय समाजात अतिशय जवळिकीचे नाते आहे. हे नाते दुतर्फा आहे : महाराष्ट्राने जेवढे राजा रवी वर्मा यांच्या चित्रांना प्रभावित केले आहे, तेवढेच रवी वर्मांच्या चित्रकलेने महाराष्ट्रातल्या चित्रकलेला, दृश्यसंवेदनेला प्रभावित केले आहे. विसाव्या शतकाच्या प्रथमार्धात महाराष्ट्रीय समाजामध्ये चित्रकलेविषयी किंवा एकंदरच दृश्य कलामाध्यमांविषयी जी रुची विकसित झाली तिच्यावर रवी वर्मा यांच्या चित्रकलेचा खोलवरचा परिणाम होता.

राजा रवी वर्मांचे मुंबईत बराच काळ वास्तव्य राहिले. त्यांचा प्रेस देखील आधी मुंबईत व नंतर मळवलीला – म्हणजे महाराष्ट्रातच होता. त्यांनी बडोदा संस्थानमध्ये राहून गायकवाड महाराजांसाठी बरीच चित्रे काढली होती. रवी वर्मांनी पौराणिक कथांचे जे दृश्य जग कल्पिले, त्यावर मराठी संगीत नाटकांचा काही प्रमाणात का होईना प्रभाव होता, असा एक मतप्रवाह आहे. दीपक कन्नल यांनी म्हटले आहे की, रवी वर्मांच्या चित्रांवर मराठी संगीत नाटकांचा प्रभाव असल्याचा स्पष्ट पुरावा उपलब्ध नाही; परंतु रवी वर्मांनी १८९०मध्ये अण्णासाहेब किर्लोस्करांचे 'संगीत शाकुंतल' हे नाटक पाहिले होते. आणि रवी वर्मांनी शकुंतला आख्यानावर आधारित जी एकूण चार चित्रे काढली आहेत, त्यांपैकी दोन चित्रांमधली दृश्ये 'संगीत शाकुंतल'मधील संबंधित दृश्यांशी जुळणारी आहेत. हा मराठी संगीत रंगभूमीचा रवी वर्मांवरील प्रभावाचा अप्रत्यक्ष पुरावा म्हणता येईल. [Ratan Parimoo (Ed), 1998 : 37]. रवी वर्मांच्या 'बर्थ ऑफ शकुंतला'सारख्या काही चित्रांमध्ये रेखाटलेल्या व्यक्तींच्या देहबोलीवर तत्कालीन संगीत नाटकांतील अभिनेत्यांच्या नाट्यप्रवेशाची, देहबोलीची छाप दिसते.

रवी वर्मांच्या बऱ्याच चित्रांमधल्या व्यक्तींचे पेहराव महाराष्ट्रीय पद्धतीचे आहेत. त्यांच्या चित्रांतील सैरंध्री, दमयंती, तारामती यांच्या अंगावर नऊवारी लुगडी, पैठणी आहेत; तर 'हरिश्चंद्र-तारामती' या चित्रातल्या हरिश्चंद्राने धोतर महाराष्ट्रीय पद्धतीने नेसले आहे. "आसेतुहिमाचल भरतखंडाच्या सर्व प्रांतांतील पेहरावाच्या तऱ्हा पाहिल्या, त्यांत स्त्रियांची लुगडें नेसण्याची पद्धति महाराष्ट्रीयांचीच उत्तम आहे. अत्यंत उपयोगी प्रत्येक अवयवाला उठाव देणारी अशीच महाराष्ट्रीय स्त्रियांची नेसण्याची पद्धति आहे. तीच आम्हाला सर्वांत आवडली. म्हणून आम्हीं आमच्या सर्व पौराणिक चित्रांतील स्त्रियांना हीच पद्धति स्वीकारली आहे," असे रवी वर्मांचे म्हणणे होते (पंतप्रतिनिधी १९४६ : ४७१).

आणि याचा उलटही घडले आहे. म्हणजे रवी वर्मा यांच्या चित्रांनी विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकापासून महाराष्ट्रीय दृश्यकलेविषयीची रुची घडवली आहे. महाराष्ट्रात १९२५-३०पर्यंत वस्तूंच्या वेष्टणांवर छापली जाणारी चित्रे, कॅलेंडरवरील चित्रे इत्यादींवर रवी वर्मांच्याच चित्रांची छाप आढळते. रवी वर्मांनी आपल्या चित्रांतून उभे केलेले पौराणिक काळाचे देखावे नाटकांचे पडदे रंगवणाऱ्या चित्रकारांसमोर आदर्श ठरले. विसाव्या शतकाच्या पहिल्या दुसऱ्या दशकातील संगीत नाटकांतील नट, त्यांच्या वेशभूषा यांच्यावर रवी वर्मांच्या चित्रांची छाप दिसते. "किर्लोस्कर नाटक मंडळींची, विशेषतः बालगंधर्वांची नाटके पाहिली तर 'सौभद्र'सारख्या नाटकातील पुराणकालीन स्त्रीपुरुषांचे पोषाख हे रविवर्म्याच्या चित्रांतील तत्सम पोषाखांवर बेतलेले दिसतात...अर्जुन आणि कृष्ण यांचे अंगरखे, त्यांचे किरीट, सुभद्रा व रुक्मिणी यांची वस्त्रे ही सर्व कित्ता गिरवल्याप्रमाणे रविवर्म्याकडून उसनी घेतली आहेत याबद्दल शंका राहात नाही." (ज्ञानेश्वर नाडकर्णी २००१ : २४) पौराणिक काळातील वातावरणाला रवी वर्मांच्या कल्पेने दिलेले मूर्त रूप वर्षानुवर्षे मुद्रित चित्रांच्या, कॅलेंडरच्या माध्यमातून घराघरातल्या भिंतींवर प्रदर्शित होत राहिले. महाराष्ट्रीय मध्यमवर्गीयांच्या दोन पिढ्या या चित्रांनी प्रभावित केल्या होत्या. "आमच्या लहानपणी आमच्या घराच्या दिवाणखान्यात व माजघरात फ्रेम केलेले...रविवर्म्याचे लिथोग्राफ्स टांगलेले असत. राम-सीता, द्रौपदी, कृष्ण, शंतनु-मत्स्यगंधा, नळ-दमयंती यांच्या या गोंडस प्रतिकृती पाहत पाहत आम्ही लहानाचे मोठे झालो. आमची वडीलधारी जी मंडळी होती त्यांचा चित्रकलेकडे पाहायचा दृष्टिकोन रविवर्म्याच्या या चित्रांनी घडवला होता आणि कळतनकळत आम्ही बालबच्ची त्याच पठडीत वाढत होतो." (ज्ञानेश्वर नाडकर्णी २००१ : २३).

रवी वर्मांच्या चित्रातले कल्पनाविश्व किती प्रभावी होते हे त्यांच्या केवळ सरस्वतीच्या चित्राच्या उदाहरणावरूनही स्पष्ट होते. पारंपरिक पौराणिक कथांमध्ये सरस्वतीचे वाहन राजहंस हा पक्षी आहे. परंतु रवी वर्मांनी आपल्या सरस्वतीच्या चित्रात राजहंसाऐवजी मोर हा पक्षी आणला. आणि पुढे लोकस्मृतीमध्ये मोर हेच सरस्वतीचे वाहन म्हणून दृढ झाले (Neumayer & Schelberger, 2003 : 2-3).

१८९० पासूनच्या पुढच्या तीनचार दशकांमध्ये महाराष्ट्रातील संगीत नाटकांच्या रंगमंचीय नेपथ्यावरून आणि घरोघरी भिंतींवर टांगलेल्या रवी वर्मांच्या चित्रांमधून एकसारख्याच जाणिवांनी भारलेले दृश्य जग आविष्कृत होत होते. हे या काळाचेच दृश्य संवेदन होते असे म्हटले पाहिजे. ते जसे रंगभूमीवरून आणि चित्रांमधून प्रकटत होते, तसे प्रत्यक्ष जीवनातून देखील व्यक्त होत होते. मध्यमवर्गीयांच्या-धनिकांच्या लग्नसमारंभातल्या वेशभूषा, दागदागिने यांची निवडही याच सामायिक रुचीतून होत होती. रवी वर्मा यांच्यानंतर महादेव धुरंधर यांनी रंगवलेली स्त्रियांची, सण-उत्सवांची चित्रे

लोकप्रिय ठरली. पारंपरिक संस्कृतीचा दृश्य अवकाश धुरंधरांनी पुनरुज्जीवित केला. धुरंधरांच्या काळात रंगभूमीवर बालगंधर्वांचे युग सुरू होते. बालगंधर्व आणि धुरंधर या दोघांची जिवलग मैत्री होती. ज्ञानेश्वर नाडकर्णी म्हणतात, बालगंधर्व रंगमंचावर ज्या प्रकारचे स्त्रीवेष धारण करत त्याला समांतर असे धुरंधरांच्या चित्रांतले स्त्रीवेष असत. त्या दोघांनी एकमेकांवर गाढ प्रभाव टाकला (नाडकर्णी २००१ : २०). याला समांतर अशी आठवण महादेव धुरंधर यांची कन्या अंबिका धुरंधर यांनी सांगितली आहे : महादेव धुरंधर यांच्या मुलाचा विवाह बॅ. मुकुंदराव जयकर यांच्या मुलीशी झाला. या विवाह समारंभाला बालगंधर्व परगावी असल्यामुळे उपस्थित राहू शकले नाहीत. पण मागाहून मुंबईला आल्यावर बालगंधर्व आवर्जून धुरंधरांच्या घरी आले ते या विवाहासाठी खरेदी केलेले शालू आणि दागिने पाहण्यासाठी. शालू कोणत्या दुकानातून खरेदी केले याची माहिती बालगंधर्वांनी घेतली; आणि दोन अप्रतिम नथी त्यांना इतक्या आवडल्या की ते म्हणाले, "कोण हा कारागीर? ज्यानं हे अजब कौशल्य घडविलं? देवा, मला हा कारागीर पाहिजे आहे. माझ्या नाटकासाठी मला अशा नथी घडवायच्या आहेत. मी पुण्याहून परत आलो की, कंपनीच्या बिऱ्हाडी त्याला पाठवून द्या." अंबिकाबाई पुढे माहिती पुरवतात की जे. जे. कला विद्यालयात तेव्हा शिकत असलेल्या गोव्याच्या बांदिवडेकर नावाच्या धुरंधरांच्या विद्यार्थ्याने या नथी घडवल्या होत्या (अंबिका धुरंधर २०१० : ११७). रवी वर्मा, धुरंधर यांची चित्रे असोत, किंवा बालगंधर्वांची नाटके, मराठी संस्कृतीचे सामायिक असे दृश्य विश्व या सर्वांच्या निर्मितीतून, सादरीकरणातून आकाराला आले असे म्हटले पाहिजे.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात अनेक होतकरू चित्रकार रवी वर्मांच्या चित्रकलेचा आदर्श ठेवत होते. औंध संस्थानचे अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधी १९९४-९५च्या सुमारास मुंबईत राहात असताना त्यांना काही काळ रवी वर्मांचा प्रत्यक्ष सहवास घडला. चित्रकलेचे पहिले धडे पंतप्रतिनिधींनी रवी वर्मांच्या डोळ्यांसमोर गिरवले. महाराष्ट्राच्या लिथोग्राफ चित्रउद्योगात नावाजलेले एक चित्रकार दत्ताजी धनवटे यांनी १९०४मध्ये सर्वप्रथम मुंबईत पाऊल ठेवले तेव्हा त्यांचे ध्येय रवी वर्मांप्रमाणे चित्रकार होण्याचे होते (धनवटे १९५१ : ३६-३७). के. के. हेब्बर यांनी त्यांच्या आत्मचरित्रात लिहिले आहे की, ते लहानपणी भिंतींवर रवी वर्मांच्या चित्रांची नक्कल करत चित्रे रंगवीत (Ratan Parimoo 1998 : 41-42). अगदी आर्टस्कूलमध्ये औपचारिक शिक्षण घेणाऱ्या चित्रकारांमध्येही विसाव्या शतकाची पहिली दोन दशके रवी वर्मांच्या चित्रकारीचे आकर्षण होते. जे. जे. कला महाविद्यालयातून शिकून बाहेर पडलेल्या महादेव धुरंधर, अनंत माळी, एस. एल. हळदणकर, बाळमहाराज पंडित इत्यादी चित्रकारांवर रवी वर्मांच्या चित्रशैलीचा प्रभाव होता. मुंबईत दरवर्षी बॉम्बे आर्ट सोसायटीचे चित्र-प्रदर्शन भरत असे. या प्रदर्शनांमध्ये १८९२ ते ९६ या काळात प्रत्येक वर्षी रवी वर्मांची अनुक्रमे 'द स्टुडंट',

'दमयंती इन द जंगल', 'बर्थ ऑफ शकुंतला', 'टेम्प्रेस' ही चित्रे प्रदर्शित झाली. मुंबईच्या चित्रकारांवर या चित्रांचा प्रभाव पडला.

बॉम्बे आर्ट सोसायटीच्या १८९४च्या चित्र-प्रदर्शनात जे. जे. कला महाविद्यालयाचे विद्यार्थी महादेव धुरंधर यांचे 'संगीतशिक्षण' हे चित्र मांडले होते. गायिका अंजनीबाई मालपेकर यांच्या घरी भरलेल्या संगीत मैफलीत धुरंधरांनी या चित्राचे स्केच बनवले आणि नंतर त्या स्केचवरून चित्र तयार करून रंगवले. रवी वर्मांना हे चित्र प्रचंड आवडले. त्यांनी ते विकत घेऊन स्वतःच्या लिथोप्रेसमध्ये त्या चित्राच्या प्रती छापल्या (अंबिका धुरंधर २०१० : ९३-९४). तेव्हापासून धुरंधरांची चित्रेही मुद्रित होऊन विकली जाऊ लागली.

पुढे रवी वर्मांच्या नंतर मळवली लिथोप्रेसचा मालक बनलेल्या स्लेइशर याने महादेव धुरंधर यांच्याकडून सातत्याने नवनवी चित्रे काढून घेतली व ती आपल्या प्रेसमध्ये छापून विकली. समुद्रमंथनातून आलेली लक्ष्मी, मोरावर बसलेली वीणावादिनी सरस्वती, रामराज्याभिषेक, रामसीताविवाह, द्रौपदीस्वयंवरासाठी मत्स्यभेद, द्रौपदीवस्त्रहरण, बाळकृष्णाच्या लीला इत्यादी चित्रांचा यांत समावेश होता (अंबिका धुरंधर २०१० : ९५). रवी वर्मांच्या चित्रांप्रमाणेच धुरंधरांची ही चित्रे देखील लोकप्रिय ठरून मोठ्या प्रमाणावर विकली गेली.

रवी वर्मा-धुरंधर यांच्यानंतर महाराष्ट्रात ज्यांची चित्रे कॅलेंडरवर घराघरात झळकली त्यांचे नाव रघुवीर मुळगावकर (१९१८-१९७६). मुळगावकरांनी चित्रकलेचे कला विद्यालयातील औपचारिक शिक्षण घेतलेले नव्हते. ते मूळचे कोल्हापूरचे. प्रसिद्ध चित्रकार त्रिंदाद यांचे ते शेजारी. त्यांनीच मुळगावकरांना मुंबईला पाठवले. इथे ते एस. एम. पंडित यांच्याकडे काही काळ चित्रकला शिकले. राजा रवी वर्मा यांच्याप्रमाणेच मुळगावकरांनी देवदेवता आणि पौराणिक आख्यानांमधले प्रसंग चित्रांमधून रंगवले. कॅलेंडरवर छापली गेलेली ही चित्रे लोकांना अतिशय आवडली. रामदास स्वामी अंगुलीनिर्देश करत आहेत आणि शेजारी उभे असलेले शिवाजी महाराज त्या दिशेने पाहात आहेत हे मुळगावकरांचे चित्र आजही काही ठिकाणी भिंतींवर टांगलेले आढळते. मुळगावकरांनी कॅलेंडरवर काढलेली सुंदर स्त्री ही १९५०च्या सुमारास महाराष्ट्रात सौंदर्याचा मापदंड ठरली होती. रवी वर्मा-धुरंधर यांच्या चित्रांचे नाते ज्याप्रमाणे त्या काळातल्या बालगंधर्वांच्या संगीत नाटकांमधील प्रसंग, नट-नट्यांचे पोषाख आणि देहबोली यांच्याशी आहे, त्याचप्रमाणे मुळगावकरांच्या चित्रांचे नाते १९४०-५०च्या सुमारासच्या फडके-खांडेकर-माडखोलकर यांच्या कादंबऱ्यांतील नायिकांच्या सौंदर्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाची आहे. त्या काळात रूढ असलेल्या सौंदर्यकल्पना त्यातून व्यक्त होताना दिसतात.

## ११.५ छापील चित्रांचे विस्तारते जग

चित्रकाराने रंगवलेले एकच एक चित्र मुद्रणतंत्राच्या सहाय्याने अनेक पटींमध्ये निर्माण करणे शक्य झाल्यानंतर सामाजिक जीवनात सर्वत्र आकर्षक चित्रांनी सजवलेल्या वस्तू दिसू लागल्या होत्या. मुंबईत कापड उद्योग मोठ्या प्रमाणावर होता. कापडाच्या गठ्ठयांवर आकर्षक चित्रांची लेबले आवश्यक ठरली. इतरही वस्तूंच्या वेष्टणांवर, डबे आणि खोक्यांवरही अशी लेबले लावली जाऊ लागली. संगीत नाटकांच्या सचित्र आकर्षक जाहिराती असलेली हँडबिले वाटली जाऊ लागली. लवकरच वर्तमानपत्रे मासिके यांमध्ये चित्रे छापली जाऊ लागली. मासिकांची व पुस्तकांची मुखपृष्ठे चित्रांनी सजवली जाऊ लागली. चित्रकारांना समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत आपली कला पोहचवण्याची संधी यामुळे उपलब्ध झाली.

विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात पुणे शहरात चित्रशाळा प्रेसमधून चित्रांची छपाई शिकून बाहेर पडलेल्या कारागिरांनी सुरू केलेले छापखानेच पाचसहा होते. डेक्कन प्रिंटिंग प्रेस, मनोवेधक चित्रकला प्रेस हे पुण्यातले प्रसिद्ध छापखाने होते. दत्ताजी धनवटे यांनी चित्रशाळेत काही काळ रेखांकनाची नोकरी केली व १९११च्या सुमारास मुंबईची वाट धरली. तेव्हा मुंबई शहरात बोलटन प्रेस (ताडदेव), हाटे अँड कंपनी (भायखळा), रवीउदय विजय प्रेस (घाटकोपर), हे छापखाने भरभराटीला आलेले होते (धनवटे १९५१ : १००). या छापखान्यांमध्ये अनेक चित्रकार काम करत. धनवटे १९०५मध्ये पुण्याच्या चित्रशाळा प्रेसमध्ये नोकरीला लागले, तेव्हा चित्रशाळेचे चित्रकार अनंत मल्हार माळी हे होते. महादेव धुरंधरांचे जे. जे. कला महाविद्यालयातले विद्यार्थी बापू आपटे आणि व्यंकटेश नांदणीकर हे अनुक्रमे मळवलीच्या रवी वर्मा प्रेसमध्ये आणि घाटकोपरच्या रविउदय विजय प्रेसमध्ये लिथो आर्टिस्ट म्हणून नोकरी करत होते (अंबिका धुरंधर २०१० : ४५).

कंपन्यांना लागणारी वेष्टणांवरील चित्रे काढण्याचे काम मिळण्यासाठी छापखाने आणि त्यांचे चित्रकार यांची चढाओढ चाले. या स्पर्धेत मोठे चित्रकारही उतरत. उदाहरणार्थ, त्या काळी टाटा मिलच्या कापडगठ्ठयांच्या आवरणावर छापले गेलेले आणि अत्यंत लोकप्रिय झालेले 'दरजी छाप' लेबल. टाटा कंपनीने आपल्याला अपेक्षित असलेल्या लेबलमागची संकल्पना स्पष्ट करून भारतभरातल्या चित्रकारांना चित्र देण्यासाठी आवाहन केले. या स्पर्धेत महादेवराव धुरंधर, अनंत माळी हे देखील उतरले होते. त्यात दत्ताजी धनवटे या बोलटन प्रेसमधल्या तुलनेने नवख्या असलेल्या चित्रकाराचे चित्र निवडले गेले (धनवटे १९५१ : ११८-१२०). पुढे १९२१मध्ये या दत्ताजी धनवटे यांनी मुंबई सोडली आणि नागपुरात शिवराज प्रेस हा छापखाना सुरू केला. तत्पूर्वी नागपूरकडचे व्यापारी-कारखानदार लेबले, वेष्टणे छापण्यासाठी मुंबई-

पुण्याकडे येत असत.

एकोणिसाव्या शतकापासून लिथोप्रेसवर पुस्तके छापली जात. मराठीतले पहिले मुद्रक गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यात लिथोप्रेस होता. त्यांची प्रारंभीची सर्व पुस्तके शिळाप्रेसवर छापलेली आहेत. या तंत्रामध्ये दगडावर मजकूर कोरण्यासाठी उत्तम हस्ताक्षर असलेल्या व्यक्तींची गरज होती. पुढे टंकांच्या सहाय्याने पुस्तके छापण्याची रीत अधिक प्रमाणात रूढ झाल्यावर हँडबिले, पत्रके, जाहिराती यांसारखी कामे शिळाप्रेसवर होऊ लागली. त्यासाठी उत्तम हस्ताक्षर आणि अक्षरलेखनात कल्पक प्रयोगशीलता हे गुण असणाऱ्या कलावंतांची मागणी होती. अशा अक्षरलेखनाला (कॅलिग्राफी) विसाव्या शतकाच्या प्रथमार्धात अधिकच मागणी वाढली. त्या काळातले एक प्रसिद्ध कॅलिग्राफर म्हणजे दत्तात्रय सदाशिव पुराणिक उर्फ पेंटर पुराणिक. १९१३ ते १९५२ या काळात त्यांनी लिहिलेल्या जाहिराती वर्तमानपत्रे-नियतकालिकांमध्ये आणि भारतभरच्या इमारतींच्या भिंतींवर झळकत होत्या. 'डोंगरे बालामृत'च्या त्यांच्या जाहिरातींनी त्यांना नावलौकिक मिळवून दिला. पुराणिकांनी आपल्या व्यवसायाची सुरुवात १९०१च्या सुमारास पुण्याच्या ज्ञानचक्षू छापखान्यापासून केली. या छापखान्यात ते नोकरीस लागले तेव्हा तिथल्या लिथोप्रेसवर प्रामुख्याने नाटकांच्या जाहिराती छापल्या जात असत. किर्लोस्कर, वाशीमकर, दत्तोपंत हल्याळकर, माधवराव पाटणकर इत्यादी नाटक कंपन्यांच्या जाहिरातींचे काम येथे चाले. जाहिरातीसाठी अक्षरे कशी काढायची याचे शिक्षण पुराणिकांनी सर्वप्रथम या छापखान्यात 'लेखक' म्हणून असणाऱ्या जोशी यांच्या हाताखाली घेतले (पुराणिक १९८२ : २१). याच काळात जाहिरातींमध्ये मजकुराबरोबर चित्रांचा, छायाचित्रांचा समावेश होऊ लागला. दृश्यकलेचा हा नवा आविष्कार होता. मोठे नावाजलेले चित्रकार जाहिरात क्षेत्रात चित्रे काढू लागले. पुढे रघुवीर मुळगावकर (१९१८-१९७६) यांनी केलेल्या पोरवाल नेत्रांजन, डोंगरे बालामृत, जाई काजळ या जाहिराती फारच गाजल्या. जाई काजळाच्या जाहिरातीतल्या गुटगुटीत बाळासारखे आपले मूल असावे असे मध्यमवर्गीय आईवडिलांना वाटत असे. दीनानाथ दलाल (१९१६-१९७१) यांचे नाव मुखपृष्ठरचनेप्रमाणेच जाहिरात क्षेत्रातही नावाजले. धूतपापेश्वर, डोंगरे बालामृत, कोटा टाईल्स, कॅम्लिन, किर्लोस्कर ऑईल इंजिन इत्यादी त्यांनी केलेल्या जाहिराती प्रसिद्ध आहेत.

### कथाचित्रे (illustrations) आणि मुखपृष्ठे

विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून नियतकालिकांमध्ये छापील मजकुरासोबत छायाचित्रे आणि रेखाटने दिसू लागली. 'मासिक मनोरंजना'चा १९०९चा पहिला दिवाळी अंक त्यातील छायाचित्रांमुळे लोकांच्या अधिक लक्षात राहिला. महाराष्ट्रातील कर्ते पुरुष, वृत्तपत्रकार, महाराष्ट्राचे सुपुत्र, राजे, संस्थानिक, महिला यांच्या छायाचित्रांसोबतच

'महाराष्ट्राने अस्पृश्य मानलेली मंडळी' असे एक समूह छायाचित्रही या अंकात आहे.

कथा-कवितेतील आशयाला पूरक अशी कथाचित्रे किंवा आशयचित्रे (illustrations) छापण्याची पद्धत विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात सुरू झालेली दिसते. 'मासिक मनोरंजन' आणि हरि नारायण आपटे यांचे साप्ताहिक 'करमणूक' या नियतकालिकांनी सर्वप्रथम मराठीत चित्रे छापायला सुरुवात केली. 'करमणुकी'च्या १० मार्च १९०६च्या अंकात 'वकिलसाहेबांची होळी' या कथेसोबत कथाचित्र छापले आहे. 'करमणुकी'च्या काही अंकांत रंगीत चित्रेही छापलेली दिसतात.

महादेव धुरंधर यांच्यासारख्या त्या काळातल्या नावाजलेल्या चित्रकारानेही मासिकांसाठी कथाचित्रे मोठ्या प्रमाणावर काढली. १९०१ ते १९१४ या काळात पुरुषोत्तम विश्राम मावजी यांच्या 'सुवर्णमाला' या मासिकासाठी धुरंधरांनी पौराणिक विषयांवरची शेकडो चित्रे काढली. मावजी हे भाटिया समाजातील मुंबईतील एक प्रसिद्ध धनिक व्यापारी होते. साताऱ्याचे इतिहाससंशोधक द. ब. पारसनीस यांच्या 'इतिहास-संग्रह' या ऐतिहासिक संशोधनाविषयीच्या मासिकात आर्टपेपरवर अत्यंत देखणी चित्रे छापली जात. १९०८पासून हे मासिक सुरू झाले. 'इतिहास-संग्रहा'मध्ये धुरंधरांची 'ऐतिहासिक पुरुष व स्त्रिया' या शीर्षकाची चित्रमालिका छापलेली आहे. या मालिकेत मोगल, मराठे व राजपूत घराण्यांतील सम्राट अकबरापासून औरंगजेबापर्यंत, राजा मानसिंगपासून मिर्झाराजा जयसिंगापर्यंत, सूरजमल जाट याच्यापासून ते राजा तोडरमलपर्यंत, मालोजीराजे भोसले यांच्यापासून सातारच्या शाहू छत्रपतींपर्यंत, तंजावरच्या एकोजीराजांपासून सर्फोजीराजांपर्यंत, बाळाजी बाजीरावापासून थोरल्या माधवरावापर्यंत, नाना फडणवीसापासून ते महादजी शिंद्यांपर्यंत अनेक ऐतिहासिक पुरुषांच्या, तसेच जिजाबाई, येसूबाई, ताराबाई, झाशीची लक्ष्मीबाई, चांदबिबी, अहिल्यादेवी होळकर इत्यादी ऐतिहासिक स्त्रियांच्या चित्रांचा समावेश आहे. पुरुषोत्तम मावजी व पारसनीस हे मित्र होते. त्यामुळे ही चित्रमालिका 'सुवर्णमाला' या मासिकातही प्रसिद्ध झालेली आहे. 'बीसवी सदी' या मासिकाचे संपादक हाजी महंमद शिवजी यांनी धुरंधरांकडून उमर खय्यामच्या रुबायांवर आधारित चित्रमालिका तयार करवून घेतली. तर धुरंधरांनी तयार केलेली काव्यगायनाच्या मैफलीवरची वीस चित्रांची मालिका 'इलस्ट्रेटेड वीकली' या इंग्रजी साप्ताहिकात सलग पाच अंकांमध्ये छापून आली. महादेव धुरंधर यांनी मराठीसोबतच हिंदी, गुजराती, उर्दू, कानडी, तेलुगू या भाषांतील मासिकांसाठी अनेक चित्रे तयार केली, तसेच या भाषांतील पुस्तकांची मुखपृष्ठेही केली (अंबिका धुरंधर २०१० : ९६-९९).

१९३०नंतर मासिक-पुस्तकांच्या मुखपृष्ठांचे स्वरूप लक्षणीयरित्या बदलले. एकोणिसाव्या शतकापासून पुस्तकाच्या मुखपृष्ठावर पुस्तकाचे शीर्षक आणि लेखकाचे

नाव एवढा मजकूर छापलेला असे. सजावटीच्या दृष्टीने या मजकूराभोवती वेलबुट्टी किंवा इतर प्रकारचे नक्षीकाम वुडकट्स पद्धतीने छापले जाई. त्याला रेखाचित्रांची आणि त्यानंतर रंगीत चित्रांची जोड दिली जाऊ लागली. रंगीत चित्रे पुस्तकातील आशयाला अनुरूप असत. विसाव्या शतकात दुसऱ्या-तिसऱ्या दशकापासून ना. सी. फडके, ग. त्र्यं. माडखोलकर प्रणयरम्य, रोमँटिक वळणाच्या कादंबऱ्या मराठीत लोकप्रिय झाल्या. या कादंबऱ्यांच्या मुखपृष्ठांवर तरुण स्त्री-पुरुषांची चित्रे रेखाटली जाऊ लागली. प्रारंभी लिथोग्राफ तंत्राने ही मुखपृष्ठे तयार केली जात. १९४०नंतर ऑफसेट मुद्रणाचा उदय झाला. मुखपृष्ठांमध्ये अधिक सुबकपणा आला.

हा बदलता काळ रघुवीर मुळगावकर आणि दीनानाथ दलाल या चित्रकारांचा होता. मुळगावकर हे त्रिंदाद, एस. एम. पंडित यांच्याकडे चित्रकला शिकले, तर दलालांनी आधी मुंबईच्या केतकर आर्ट इन्स्टिट्यूटमधून शिक्षण घेऊन नंतर १९३७मध्ये जे. जे. कला विद्यालयातून जी. डी. आर्ट ही पदविका मिळवली. मुळगावकर-दलाल या दोघांच्या मुखपृष्ठांनी मराठी मासिक-पुस्तकांचा तोंडवळा पूर्णपणे बदलून टाकला. मुळगावकर हे राजा रवी वर्मांच्या पठडीतली चित्रे काढत. स्त्री-सौंदर्याच्या रूढ असलेल्या संकेतबद्ध कल्पना त्यांच्या चित्रांमधून पुन्हा पुन्हा अवतरताना दिसतात. विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून या सांकेतिक कल्पना रवी वर्मांची पौराणिक व्यक्तिरेखांची चित्रे आणि संगीत नाटकांमधील नटनट्यांच्या वेशभूषा यांद्वारे समाजात प्रस्थापित झाल्या होत्या. त्या कसोटीला उतरत असलेल्या मुळगावकरांच्या चित्रांना लोकाश्रय मोठ्या प्रमाणावर मिळाला.

दीनानाथ दलाल हे मुखपृष्ठरचनेमध्ये मुळगावकरांपेक्षा अधिक प्रयोगशील होते. दलाल १९३८पासूनच पुस्तकांची मुखपृष्ठे करू लागले. १९४३मध्ये त्यांनी दलाल आर्ट स्टुडिओची स्थापना केली. त्यांनी पुस्तकांसाठी आशयचित्रेही काढली. वि. वि. बोकील यांच्या कादंबऱ्यांचा नायक वसंत किंवा ना. धों. ताम्हणकरांचा गोट्या यांच्या व्यक्तिमत्त्वाला दलालांनी दृश्यरूप दिले. दलालांनी कादंबऱ्यांच्या आशयाला अनुरूप अशी चित्रे काढताना अनेक प्रयोग केले. कादंबरीची शीर्षके लिहिताना सुलेखनातही अर्थपूर्ण प्रयोग केले. १९४५मध्ये त्यांनी 'दीपावली'चा दिवाळी अंक सुरू केला. या अंकाच्या मुखपृष्ठ आणि आतील चित्रांमधून त्यांनी आपल्या चित्रांची वेगळी ओळख रसिकांवर ठसवली. दलाल आणि मुळगावकर यांनी आपल्या कारकीर्दीला सुरुवात १९४०च्या सुमारास केल्यामुळे त्यांच्या आरंभीच्या कार्याची येथे नोंद घेतली आहे. त्यांचे कार्य खरे बहरले ते १९५०नंतर. त्याचा मागोवा प्रस्तुत ग्रंथाच्या पुढील खंडात घेतला जाईल.

१९३०नंतर महाराष्ट्राच्या शहरी पांढरपेशा सामाजिक जीवनात स्त्री-पुरुषांतील निरपेक्ष मैत्री, प्रेम अशा मूल्यांचा प्रवेश झाला. रविकिरण मंडळाच्या कविता आणि ना.

सी. फडके यांच्या कादंबऱ्यांमधून स्त्री-पुरुष नात्याचे एक आदर्श स्वप्नाळू चित्र रंगवले जाऊ लागले. रवी वर्मांच्या चित्रांपासून प्रस्थापित झालेले सौंदर्य हे मूल्य आणि कविता-कादंबऱ्यांतून रंगवले जाणारे स्वातंत्र्याचे मूल्य यांचा एकत्रित मिलाफ मुळगावकरांपासून तर पुढे गजानन नारायण जाधव (१९१७-२००४) यांनी रंगवलेल्या मासिक-पुस्तकांच्या मुखपृष्ठांमध्ये झालेला दिसतो. तत्कालीन कादंबऱ्यांमध्ये स्त्रीसौंदर्याचे निकष म्हणून वर्णिल्या गेलेल्या 'चापेकळी नाक', 'धनुष्याकृती भुवया' इत्यादी लक्षणांना, हाती बॅडमिंटन किंवा टेनिसचे रॅकेट घेऊन खेळायला निघालेली तरुणी, मित्रासोबत सायकलवर बसून सहलीला निघालेली तरुणी किंवा गप्पा मारत बसलेल्या पती-पत्नींचा खाजगी अवकाश अशा नवमूल्यप्रेरित दृश्यांची जोड मिळाली.

ग. ना. जाधव कोल्हापूरचे. बाबुराव पेंटर, माधवराव बागल यांच्या हाताखाली ते चित्रकला शिकले. पुढे १९५३मध्ये श्री. गो. जांभळीकरांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी जे. जे. कला महाविद्यालयाची जी. डी. आर्ट पदविकाही मिळवली. पण त्यापूर्वीच १९३८पासून ते किर्लोस्कर प्रेसमध्ये चित्रकार म्हणून रुजू झाले होते. 'किर्लोस्कर' हे त्या काळातले उदारमतवादी, नवमतवादी विचारांचे मासिक म्हणून लोकप्रिय होत होते. तर 'स्त्री' हे खास स्त्रियांचे मासिक आणि 'मनोहर' हे युवकांचे पाक्षिक अशी ओळख निर्माण झाली होती. आधुनिक समता-स्वातंत्र्यवादी विचारांचा पुरस्कार करणारी ही मासिके वाचणे, त्यांचे वर्गणीदार असणे ही त्या काळातल्या नवशिक्षित मध्यमवर्गीयांमध्ये प्रतिष्ठेची बाब मानली जाऊ लागली होती. ग. ना. जाधव १९४४-४५पासून या मासिकांची मुखपृष्ठे तयार करू लागले. आतील साहित्याशी सुसंगत मूल्ये प्रकट करणारी ही चित्रे होती. प्रसिद्ध होणाऱ्या साहित्याशी सुसंगत अशी नव्या मूल्यांनी भारलेली चित्रे ग. ना. जाधव यांनी काढलेली दिसतात.

१९४० ते ५० या काळात महाराष्ट्रीय मध्यमवर्गीयांच्या घरांच्या भिंतींवरील कॅलेंडरे आणि मेजावरील मासिके यांवर दिसणाऱ्या लोकप्रिय चित्रांचे जग असे होते. यावर जुन्या ॲकॅडेमिक चित्रशैलीची छाप होती. पौराणिक आशय जाऊन त्याची जागा नव्या पांढरपेशा कुटुंबांतील दैनंदिन जीवनातील दृश्यांनी घेतली होती. पण वास्तववाद कायम होता. दुसरीकडे, जे. जे. कला विद्यालयासारख्या चित्रकला-शिक्षणाच्या प्रमुख केंद्रात, आणि एकंदरीत कलात्मक चित्रकलेच्या वर्तुळात मात्र चित्रकलेविषयीच्या सौंदर्यकल्पनांमध्ये पालट होत होता. एकोणिसाव्या शतकापासून चालत आलेली ॲकॅडेमिक शैली नाकारण्याकडे तरुण पिढीतील चित्रकारांचा कल होता. १९४०नंतर वास्तववाद मागे पडून आधुनिकवादी जाणिवांनी प्रभावित झालेल्या चित्रकलेचा उदय कसा होऊ लागला, चित्रकला मूर्ताकडून अमूर्ताकडे वळू लागली. यामुळे १९४०नंतर चित्रकलेतील नव्या चळवळी, प्रदर्शने यातून प्रकटणारी 'उच्च' अभिरुची आणि

सर्वसामान्य समाजातील चित्रांविषयीची लोकाभिरुची यांच्यात मोठी दरी निर्माण झालेली दिसते.

## ११.६ 'ओलेती' चित्राविषयीचा वाद

चित्रकलेविषयीच्या दोन स्तरांतील अभिरुचीमधल्या या दुराव्याचा एक परिणाम म्हणजे चित्रांविषयीच्या लोकसमजुती आणि त्यातून निर्माण झालेले वाद. महाराष्ट्रात कथाचित्रे आणि मुखपृष्ठांशिवाय मोठ्या चित्रकारांची चित्रे रंगीत छपाईसह संपूर्ण पानभर छापण्याचा उपक्रम १९२५साली 'रत्नाकर' मासिकाने सुरू केला. ऑक्टोबर १९२५च्या पहिल्याच अंकात "फ्रेम करून संग्रहीं ठेवण्यालायक असें एक सुंदर चित्र प्रत्येक अंकांत" प्रसिद्ध होणार असल्याची घोषणा करण्यात आली होती. 'रत्नाकर' मासिकाची रूपरेषा ना. सी. फडके यांनी आखली होती. साहित्यासोबतच संगीत, नाटक, चित्रपट, चित्रकला अशा विविध विषयांवर सर्वसामान्य वाचकांचा समजेल असे साहित्य छापण्याचे मासिकाचे धोरण होते. या मासिकात अशी चित्रे छापण्याची कल्पनाही ना. सी. फडके यांचीच असावी.

कलाविद्यालयांतून शिकून बाहेर पडलेल्या आणि चित्रकार म्हणून मान्यताप्राप्त झालेल्या चित्रकारांची चित्रे ही तोवर प्रदर्शनांमध्ये आणि मोठमोठ्या कलादालनांमध्ये मांडलेली असत. ही चित्रे नियमित अंकात छापण्याच्या 'रत्नाकर'च्या धोरणामुळे ती प्रदर्शनांना न जाणाऱ्या, चित्रकला विश्वापासून दूर असणाऱ्या मध्यमवर्गातील वाचकांपर्यंत पोहोचली. चित्रकलेतले नवनवे प्रवाह, त्यामुळे निर्माण होणाऱ्या नव्या चित्रसंकल्पना यांचा परिचय या वर्गातल्या लोकांना होऊ लागला. चित्रकलेविषयीची अभिरुची घडण्यास अशा प्रयोगांचा हातभार लागला. 'रत्नाकर'मधील या चित्रांमुळे समाजात एक चित्रप्रेमी रसिकांचा वर्ग तयार होऊ लागला होता असे दिसते. मे १९३६मध्ये सुरू झालेल्या 'ज्योत्स्ना' या मासिकाच्या जुलै १९३६च्या अंकात वाचकाचे एक पत्र छापले आहे. मासिक 'रत्नाकरा'प्रमाणे 'ज्योत्स्ने'नेही प्रत्येक अंकात तीन रंगी चित्र छापावं अशी इच्छा त्यात व्यक्त केलेली आहे. त्यासाठी अधिकची वर्गणी देण्याची तयारीही या वाचकाने दाखवली आहे.

पण छापलेली सर्वच चित्रे लोकांना आवडत असे नव्हे. प्रचलित लोकाभिरुचीला छेद देणारी चित्रे असतील तर त्यावरून वाद निर्माण होई. 'रत्नाकर' मासिकाने फेब्रुवारी १९२७च्या अंकात बॉम्बे आर्ट सोसायटीच्या ३६व्या प्रदर्शनात मांडलेले कलकत्त्याच्या मुजुमदार यांचे 'सत्यानाश' या शीर्षकाचे चित्र छापले. त्यात डोक्याला हात लावून पश्चातापदग्ध बसलेली जेमतेम वस्त्रांमधली घरगुती स्त्री दिसते. अशी आणखीही काही चित्रे 'रत्नाकरा'ने छापली. नोव्हेंबर-डिसेंबर १९२८च्या अंकाच्या मुखपृष्ठावर ठाकूरसिंग यांचे 'प्रणयिनीचा मनोभंग' हे चित्र छापले. तर जून-जुलै १९३०च्या अंकाच्या मुखपृष्ठावर



**ओलेती : एस. ठाकूर सिंग (१९२४)**

ठाकूरसिंग यांचेच 'ओलेती' हे चित्र छापले. यातली स्त्री पाठमोरी आहे. पैकी 'ओलेती' या चित्राचे निमित्त होऊन फार मोठे वादंग उठले.

खरे तर चित्रांमधील नग्नता महाराष्ट्रातील चित्ररसिकांना अपरिचित नव्हती. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस राजा रवी वर्मांनी काढलेल्या कृष्ण-गोपिकांच्या, विश्वामित्र-मेनकेच्या चित्रांमध्ये नग्न स्त्रियांचे दर्शन घडले होते. परंतु त्या चित्रांना पौराणिक आख्यानांचा आधार होता. त्यामुळे त्या चित्रांकडे पाहताना भारतीय लोकांच्या मनाला अश्लीलतेचा विचार शिवला नव्हता. धार्मिक, दैवी कल्पनांचा आधार बाजूला सारून ही नग्नता जेव्हा समकालीन समाजातल्या व्यक्तींच्या जीवनात दाखवली जाऊ लागली, तेव्हा मात्र त्याविरुद्ध लोकांच्या मनात संताप निर्माण झाला. वास्तववादी चित्रांमध्येच नव्हे, तर प्रतिकात्मक चित्रांमध्ये अमूर्त स्वरूपात दाखवलेली नग्नातही तत्कालीन समाजाने मान्य केली नाही. ज. द. गोंधळेकर यांनी 'सह्याद्रि' मासिकाच्या १९४०मधल्या 'सुखी संसार विशेषांका'च्या मुखपृष्ठावर वस्त्रविरहीत पती-पत्नी आणि त्यांचे मूल यांच्या परस्परांच्या हाताची साखळी करून उभ्या असणाऱ्या आकृत्या काढल्या होत्या. चित्र वास्तववादी प्रतिकात्मक, सूचक शैलीत होते. केवळ बाह्यरेषांच्या वळणांतून या तीन व्यक्तींचे शारीरिक आकार स्पष्ट केले होते. परंतु या चित्रालाही अश्लील ठरवून त्यावर 'धनुर्धारी', 'सकाळ', 'महाराष्ट्र विस्तार', 'झंकार' इत्यादी नियतकालिकांतून टीका करण्यात आली. या टीकेला उत्तर देण्यासाठी गोंधळेकरांनी 'प्रतीक-चित्र पाहण्याची खरी

दृष्टि' हा लेख लिहिला. त्यात प्रतीक-चित्रांमधील दृश्य सांकेतिक चिन्हांमधून प्रकटणाऱ्या अर्थाची संगती कशी लावली पाहिजे याविषयी चर्चा केली होती.

'ओलेती' या चित्रावर टीका करणारा लेख 'ज्ञानप्रकाश' मासिकात गं. गो. कानिटकर यांनी लिहिला. कलेतील श्लील-अश्लीलत्वावर चर्चा व्हावी या हेतूने 'रत्नाकर'नेच हा लेख पुनर्मुद्रित केला. त्यावर पुढे अनेकांनी लिहिले. सत्तरच्या दशकात 'वासुनाका' या कादंबरीत अश्लील लेखन केल्याबद्दल भाऊ पाध्ये यांच्यावर टीका करणाऱ्या आचार्य अत्रे यांनी १९३०मध्ये मात्र 'ओलेती'ची बाजू घेतली. "ओलेती'ची विटंबना' या लेखात त्यांनी चक्क फ्रॉइडच्या मानसशास्त्रीय विचारांचा आधार घेत चित्रातील नग्नतेचे समर्थन केले आहे. पु. श्री. काळे, बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी चित्रकलेमध्ये नग्नतेचे उपयोजन का केले जाते, एक कलात्मक मूल्य म्हणून त्याकडे कसे पाहिले पाहिजे याचे विवेचन केले आहे.

थोडक्यात, या वादांच्या निमित्ताने एरवी चित्रकलेपासून दूर असणाऱ्या समाजात चित्रकलेच्या सौंदर्यशास्त्राची चर्चा होऊ शकली. भिंतीवरील 'कॅलेंडर आर्ट' आणि प्रदर्शनांमध्ये मांडली जाणारी 'कलात्मक चित्रे' यांच्यातली तफावत वाढत असताना, मराठी मासिकांनी या प्रदर्शनांच्या चार भिंतींच्या आत मांडल्या गेलेल्या, समकालीन चित्रजाणिवांनी प्रेरित झालेल्या चित्रांना सर्वसामान्य वाचकांच्या घरा-घरात पोहोचवले. त्यावरील वादविवाद प्रकाशित केले. विसाव्या शतकाच्या प्रथमार्धाच्या अखेरीस समाजाला चित्रसाक्षर करण्याचे कार्य काही प्रमाणात तरी या मासिकांनी केले असे म्हटले पाहिजे.

## ११.७ इतिकथन

विसाव्या शतकात महाराष्ट्रात जे. जे. स्कूलच्या स्थापनेपासून चित्रकलेच्या क्षेत्रात ॲकॅडेमिक शैलीचा चित्रनिर्मितीचा प्रवाह सुरू झाला. भारतीय चित्रांची द्विमिती शैली मागे पडून पाश्चिमात्य त्रिमिती शैलीची चित्रकला वर्धिष्णू झाली. यथार्थदर्शन घडविणारी वास्तववादी चित्रशैली रूढ होऊ लागली. या काळात साम्यवादी विचारधारेच्या कलावंतांनी प्रागतिक चित्रकलेची चळवळ चालविली. याच काळात तंत्रज्ञानाधिष्ठित चित्रकलेचा उदय व प्रसार झाला. मुद्रित चित्रे घरोघरी भिंतीवर झळकू लागली. कथाचित्रांची त्यामुळे मोठ्या प्रमाणावर निर्मिती झाली. अगदी कॅलेंडरवर आणि जाहिरातींमध्येसुद्धा कलात्मक चित्रे छापली जाऊ लागली. रवि वर्मा, धुरंधर, मुळगावकर, दीनानाथ दलाल, बाबुराव पेंटर अशी चित्रकारांची एक नवी पिढी या कालखंडामध्ये पुढे आली. औंध व बडोदे संस्थानांनी चित्रकारांना लोकाश्रय दिला. कलेच्या सामाजिकीकरणाच्या दृष्टीने हा कालखंड निश्चितच पायाभरणी करणारा होता. चित्रकलेची अभिरूचीही रसग्रहण, समीक्षा आणि वाद यांनी अधिकाधिक संस्कारित होत गेली आहे. ही या कालखंडाची सर्वात मोठी फलश्रुती म्हटली पाहिजे.

❑❑❑

# १२

# उपसंहार

विसाव्या शतकाच्या पहिल्या पन्नास वर्षांतील महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, वाङ्मय व कला जीवनातील स्थित्यंतरांचा मागोवा आपण घेतला. भारताच्या व महाराष्ट्राच्या राजकीय व सांस्कृतिक प्रेरणा समान असल्यामुळे बऱ्याच ठिकाणी महाराष्ट्राची संदर्भचौकट ओलांडून भारतीय परिप्रेक्ष्यात आपण घटना-घडामोडींचा परामर्श घेतला आहे. मुळात महाराष्ट्राचे नेतृत्व हे समग्र भारताच्या पुनर्घटनेचा विचार करणारे असल्याने व भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे आणि चळवळीचे स्रोत महाराष्ट्रात असल्याने हे विवेचन अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळात फिरत राहिले आहे.

विसाव्या शतकारंभापासूनचा पन्नास वर्षांचा कालखंड हा संपूर्ण जगात राजकीय व वैचारिक उलथापालथी घडविणारा गतिमान काळ आहे. महाराष्ट्राच्या वैचारिक व सांस्कृतिक जीवनव्यवहारांवर आणि राजकीय घडामोडींवर त्यांचा कमीअधिक प्रभाव राहिला आहे. इंग्लंडमधल्या उदारमतवादी विचारांचा मराठी विचारवंतांवर गडद प्रभाव होता. व्यक्तिस्वातंत्र्य, विचार-स्वातंत्र्य व बुद्धिप्रामाण्य यावर आधारलेली विचारसरणी हा उदारमतवादाचा गाभा होता. व्यक्तीचे नैसर्गिक अधिकार सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक तेवढेच अधिकार शासनाकडे असावेत, असे मानणारी ही विचारधारा होती. जनतेचे प्रतिनिधी म्हणून संसदीय कामकाज चालवण्यावर व कायद्याच्या चौकटीत जबाबदारीने राज्यकारभार करण्यावर उदारमतवादी राज्यकर्त्यांचा भर होता. ब्रिटनमध्ये १८८३ साली 'फेबियन सोसायटी' स्थापन झाली होती. या सोसायटीने लोकशाही मूलतत्त्वे कायम ठेवून समाजवादाचा पुरस्कार केला होता. उदारमतवादाने हा बदल स्वीकारला व नागरी व आर्थिक क्षेत्रात किमान हस्तक्षेपाची भूमिका अंगीकारली. इंग्लंडमध्ये १९०५ साली उदारमतवादी विचारांचा लिबरल पक्ष सत्तेत आला. ब्रिटनमधल्या या सत्ताबदलामुळे संसदीय चौकटीतून बुद्धिनिष्ठ राजकारण करणाऱ्या ना. गोखले व काँग्रेसमधल्या नेमस्त पुढाऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. मोर्ले-मिंटो

सुधारणांचा प्रस्ताव व जबाबदार राज्यपद्धतीचा सुधारणांचा पहिला हप्ता देण्याच्या प्रक्रियेला त्यामुळे गती मिळाली होती. खुल्या अर्थव्यवस्थेमुळे श्रीमंत झालेल्या वर्गावर कर बसवून त्या उत्पन्नाचा शिक्षण, दळणवळण, आरोग्य सेवांसाठी विनियोग करण्याचे तत्त्व स्वीकृत झाले. भारतात कामगार कायद्यात सुधारणा होऊन कामगारांचे हक्क, कामकाजाच्या ठिकाणच्या प्राथमिक मानवी सुविधा इत्यादी घडामोडींमागे या फेबियन समाजवादी विचारप्रवाहाचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रभाव होता.

विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकात राष्ट्रीय काँग्रेसमध्ये सुरुवातीला फिरोजशहा मेथा आणि ना. गोपाळ कृष्ण गोखले यांचा व त्यानंतर लो. टिळकांचा प्रभाव होता. गोखल्यांचे राजकारण नेमस्त धाटणीचे तर टिळकांचे राजकारण जहाल विचारांचे होते. आचार्य जावडेकरांनी म्हटल्याप्रमाणे गोखल्यांचे राजकारण 'दरबारी राजकारण' होते; तर टिळकांचे राजकारण लोकसंग्रहावर अधिष्ठित होते. संसदीय राजकारण आणि जनचळवळीचे राजकारण ह्या दोन राजकीय शैलींचे वळण या शतकाच्या प्रारंभापासूनच महाराष्ट्राच्या अंगवळणी पडू लागले होते. ना. गोखल्यांचा वैचारिक पिंड न्या. रानडे यांच्या तालमीत तयार झाला होता.जबाबदार राज्यकारभारासाठी आपल्या लोकांना पात्र बनविण्यावर, राजकीय लोकशिक्षणातून जनतेला प्रबुद्ध बनविण्यावर न्या. रानडे भर देत असत. अर्ज, विनंत्या, प्रत्यक्ष सर्वेक्षणावर आधारित अहवाल यांच्या माध्यमातून कारभारी मंडळीसमोर प्रश्न मांडणे व कायदेशीर युक्तिवादातून जनतेचे हक्क पदरात पाडून घेणे ही नेमस्त राजकारणाची न्या. रानडे यांची शैली ना. गोखले यांनी अनुसरली होती. राजकीय स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक सुधारणांवर भर देणाऱ्या या नेमस्त पक्षापेक्षा टिळकांची भूमिका वेगळी होती. स्वराज्याच्या राजकारणाला अग्रक्रम द्यावा, सुधारणा ह्या क्रमश: होत राहातील अशी टिळकांची भूमिका होती. तसेच आमच्या धार्मिक वा सामाजिक सुधारणा आमच्या आम्ही करू; ब्रिटिशांनी त्यात हसक्षेप करू नये अशी त्यांची ठाम भूमिका होती. टिळकांच्या या भूमिकेमुळे त्यांना समाजातील सनातनी वर्गाचा उघड पाठिंबा मिळत होता. त्यांचा लोकसंग्रहही अधिक होता. त्यामुळेच गोखल्यांपेक्षा टिळकांची राजकीय लोकप्रियता व अनुयायांचे संख्याबळ मोठे होते. मात्र प्रत्येक कालखंडाची काही कोडी असतात; तसे कोडे टिळकांच्या बाबतीतही आढळून येते. १९०८ ते १९१४ या काळात टिळक राजद्रोहाच्या आरोपाखाली मंडालेच्या तुरुंगात असताना, त्यांच्या अनुपस्थितीत महाराष्ट्रात टिळकांचे अनुयायी निष्क्रिय होते. त्यांच्या अनुयायांनी या काळात कुठलाच राजकीय संघर्ष केला नाही, किंवा सार्वजनिक जीवनात राजकीय चळवळीची चेतना चिरंतन ठेवण्यासाठी संघटनात्मक प्रयत्न केल्याचे दिसत नाही.

टिळकांच्या मृत्यूनंतर या कालखंडातील राजकीय घडामोडींवर गांधीजींच्या विभूतिमत्वाचा आणि गांधीवादी तत्त्वज्ञानाचा गडद प्रभाव होता. गांधीजींनी गोखल्यांना

आपले राजकीय गुरू मानले असले तरी गांधीजींचे राजकीय तत्त्वज्ञान व कार्यशैली ही संपूर्णपणे वेगळी होती. सत्ताकारणाच्या राजकीय तत्त्वज्ञानाला गांधीजींनी एक नवे वळण दिले. ग्रीकांच्या स्टोईक तत्त्वज्ञानातील 'अराज्यवादा'शी गांधीजींचे तत्त्वज्ञान जवळ जाणारे होते. राज्यविरहित समाजाची संकल्पना हे स्टोईक तत्त्वज्ञानातले मध्यवर्ती आशयसूत्र होते. लिओ टॉलस्टॉय (१८२८-१९१०), रस्किन, थोरो यांच्या व्यक्तिवादी, निसर्गवादी व मानवतावादी विचारांचाही गांधीजींवर प्रभाव होता. प्रचलित समाजपद्धती युद्ध, दडपशाही आणि शोषण यावर उभारलेली आहे. तेथे नैतिक परिवर्तन हाच मार्ग यशस्वी ठरू शकतो, या टॉलस्टॉयच्या विचारांवर गांधीजींची श्रद्धा होती. राज्यसंस्था अहंभाव आणि अत्याचार यातून निर्माण होते; तिच्या कार्यात प्रेमभावनेला स्थान नसते असे टॉलस्टॉयचे मत होते. मुळात माणसांमधले परस्परसंबंध राजकीय नसतात, नैतिक असतात; सामाजिक आणि नैतिक दु:खांचे निर्मूलन राज्यसंस्था करू शकत नाही. म्हणून मनुष्याची न्यायबुद्धी आणि बुद्धिप्रामाण्याला वळण लावण्याला अराज्यवादी विचारांत महत्त्व दिले गेले होते. ईश्वर आणि माणूस यांच्यात समभाव निर्माण झाल्यास राज्यसंस्थेची गरज पडणार नाही, हा ख्रिस्ती तत्त्वज्ञानाचा विचार अराज्यवादी प्रमाण मानीत असत. लोकांनी क्रांती करून राज्यसंस्था नष्ट करावी असे म्हणणाऱ्या अराज्यवाद्यांनी राज्यसंस्थेच्या जागी कम्युनपद्धतीचा (ग्रामपंचायतीसारखी) पर्याय सुचविला होता. गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना या कल्पनेशी जुळणारी होती. अर्थोत्पादनाची, प्रशासनाची व न्यायाची स्वायत्तता असलेला ग्रामसमाज हे भारताच्या नवनिर्माणाचे गांधीजींचे स्वप्न होते. ग्राम हे संपूर्ण सार्वभौम सत्ता असलेले गणराज्य असावे, अशी गांधीजींची कल्पना होती. लोककेंद्री सहविचारांची ग्रामपंचायत असल्यावर या स्वायत्त ग्रामसमाजाला कायदा आणि सुरक्षिततेसाठी कुठल्याही वेगळ्या संघटनेची गरज राहाणार नाही, असे गांधीजींचे मत होते. स्वदेशीचा पुरस्कार, खादी ग्रामोद्योगातून आर्थिक स्वावलंबन, 'नई तालीम'च्या माध्यमातून नैतिक मूल्यांवर अधिष्ठित उपजीविकेसाठी आवश्यक कौशल्यशिक्षण, अस्पृश्योद्धाराच्या कार्यक्रमातून सामाजिक विषमतेचे निर्मूलन, ग्रामसफाई, दारूबंदी यातून स्वच्छता व आरोग्यशुद्धीच्या मूल्यधारणा रूजविण्याचा कार्यक्रम; सत्य, अहिंसा, प्रेम, साधनशुचिता, विश्वस्ताची संकल्पना, सत्याग्रह आणि कायदेभंगाचे राजकारण करून शस्त्रहीन राज्यक्रांतीकडे नेणारा राजकीय परिवर्तनाचा मार्ग हे गांधीजींच्या राजकारणाचे मूलाधार होते. गांधीजींनी कायदेभंग, सत्याग्रह, ग्रामोद्योग यांच्या माध्यमातून जी जनचळवळ चालविली होती, त्यातून या कालखंडात महाराष्ट्राचे राजकीय-सामाजिक नेतृत्व गणनेतृत्वात परिवर्तीत होण्याची प्रक्रिया गतिमान झाली. १९४२ च्या लढ्याने व भूमिगत चळवळीत गणनेतृत्त्वाने केलेली कामगिरी हे महाराष्ट्राच्या इतिहासातले एक महत्त्वाचे चैतन्यपर्व होते.

महाराष्ट्राच्या आणि संपूर्ण भारताच्या राजकारणात व समाजकारणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे व कार्याचे एक वेगळे स्थान आहे. हिंदू समाजातला जाती-जातीला दुरावा व अस्पृश्यता नष्ट करून एकवर्णीय हिंदू समाजाची पुनर्घटना करावी यासाठी त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केले. १९२७ च्या महाड परिषदेतल्या भाषणात त्यांनी या भूमिकेची स्पष्ट मांडणी केली होती. मात्र जबाबदार राज्यपद्धतीसाठी भारतीय जनतेला सत्ताकारणात अंशत: वाटा देण्याचा प्रस्ताव ब्रिटिशांकडून आला तेव्हा सायमन कमिशनला दिलेल्या साक्षीत त्यांनी नवी राजकीय भूमिका घेतली. अस्पृश्य समाज हा हिंदू समाजाचा अविभाज्य भाग आहे, याला संपूर्ण नकार देऊन या वंचित जनसमूहाच्या हक्कांच्या संरक्षणासाठी मुसलमान व ख्रिस्ती धर्मियांप्रमाणे स्वतंत्र स्थान देऊन राखीव जागा व राखीव मतदारसंघांची तरतूद करण्याची मागणी केली. पुढे धर्मांतराची घोषणा करून त्यांनी हिंदू धर्मापासून पूर्ण फारकत घेतली. डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वामुळे अस्पृश्यांमध्ये अस्मितेच्या प्रेरणा जागवल्या गेल्या व इतर समाजाच्या बरोबरीने सन्मानाचे स्थान प्राप्त होण्यासाठी घटनात्मक तरतूदी करून न्याय प्रस्थापनेतला मोठा टप्पा गाठता आला. भारतीय राजकारणात महाराष्ट्रातल्या अस्पृश्यता निवारणाच्या चळवळींत डॉ. आंबेडकर यांच्याखेरीज महर्षी शिंदे, शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, म. गांधी, श्री. म. माटे, बॅ. सावरकर, ठक्करबाप्पा इत्यादींनी सामाजिक समरसता निर्माण करण्यासाठी आपापल्या पद्धतीने पुढाकार घेतला होता. भारतीय राज्यघटनेत मागासवर्गीयांच्या हक्कांसाठी आणि राजकीय प्रतिनिधित्वासाठी करण्यात आलेल्या विशेष तरतूदींमागे महाराष्ट्रातल्या राजकीय व सामाजिक परिवर्तनाच्या चळवळींचा प्रभाव होता, हे महाराष्ट्राचे एक अनन्यसाधारण योगदान आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीबरोबरच भारत-पाकिस्तान फाळणी झाल्याने संपूर्ण भारतात दंगली उसळल्या. मुसलमानांकडे अविश्वासाने पाहिले जाऊ लागले. हिंदू-मुसलमान दंग्यांच्या पार्श्वभूमीवर स्वसंरक्षणार्थ हिंदूंनी काय करावे, याविषयीच्या चर्चा सुरु झाल्या. हिंदू संघटनांची प्रस्तुतता हा विषय चर्चेच्या केंद्रस्थानी आला. जातिनिरपेक्ष अशा काँग्रेस संघटनेशी निष्ठा असणाऱ्या पुरुषोत्तमदास टंडन सारख्या नेत्यानेही 'हिंदु संरक्षक दल' नावाची संघटना स्थापन केली. धनंजयराव गाडगीळांसारखे विचारवंतही यापुढे हिंदुत्व हेच Cohesive force सारखे राहील, असे म्हणू लागले होते. महात्मा गांधींनाही पायाशुद्ध हिंदू संघटनेची गरज वाटत होती. मात्र त्यांची भूमिका आक्रमक हिंदुत्ववादाची नव्हती. १९४७ साली काकासाहेब कालेलकर यांना लिहिलेल्या एका पत्रात गांधीजींनी आपली भूमिका स्पष्ट केली होती. 'हिंदू संघटनेची तर नेहमीच आवश्यकता आहे; परंतु हिंदु संघटन कृपण नसावे. अन्य धर्मांचा विरोध करणारे नसावे. हिंदु धर्म सुधारण्याकडे आणि विकसित करण्याकडे त्याचा उपयोग व्हावा. राजकारणाशी त्याचा संबंध नसावा.'

(कातगडे, १९६२, पृ. १२२ ) त्याचवेळी हिंदू महासभा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या संघटना जातीयतेने भारलेल्या आणि राष्ट्रीयतेची व्यापक दृष्टी नसलेल्या संघटना असल्याची बऱ्याच जणांची समजूत होती. स्वातंत्र्यप्राप्तीच्या काळात हिंदू-मुसलमानातील वैमनस्याविषयी मराठी माणसाच्या मनात सुरू असलेल्या वैचारिक द्वंद्वाचे एक प्रातिनिधिक दर्शन गंगाधरराव देशपांडे या काँग्रेसच्या निष्ठावान कार्यकर्त्याने पुंडलिकजी कातगडे या अनुयायाला लिहिलेल्या पत्रातून वाचायला मिळते. त्यांनी या पत्रात लिहिले आहे की, "मुसलमानांसारख्या अल्पसंख्यांकांच्या मुर्वतीखातर बहुसंख्यांकांच्या संस्कृतीला धोका येऊ देऊ नये एवढेच बहुसंख्य हिंदूंचे म्हणणे आहे. हिंदुस्थानात हिंदूंना बाटवण्याचा प्रकार पद्धतशीर चालू आहे. हा प्रकार बंद करण्याकरिता कोणीही मुसलमान संघटितरित्या प्रयत्न करीत नाही.. यातच राजकारणाची भर पडली. अल्पसंख्यांक म्हणून त्यांना खास हक्क मिळू लागले. याचा परिणाम थोडक्यात सांगावयाचे म्हणजे शुद्ध राष्ट्रीयत्वाचा लोप झाला व त्यांच्यामध्ये आक्रमणाची बुद्धी वाढली. त्याचा प्रतिबंध करण्याचे अनेक प्रयत्न झाले, पण पदरात काही पडले नाही. .. काँग्रेसचे धोरण मुसलमानांना खूश करण्याचे होते, त्याचा गैरफायदा मुसलमानांनी घेतला ही गोष्ट काही खोटी नाही... मुसलमानांमुळे उत्पन्न झालेला संशय व अविश्वास त्यांनीच आपल्या वर्तनाने दूर केला पाहिजे. तोंडाने ते काही म्हणत असले तरी पाकिस्तानबद्दल त्यांना वाटत असलेली आत्मीयता जाणे कठीण आहे. हिंदूंच्या शुद्ध संघटनेने हे काम सोपे होईल." (कातगडे, १९६२, पृ. १२२-१२३) हिंदू-मुस्लीम यांच्यातली तेढ हा महाराष्ट्राच्या सामाजिक पुनर्घटनेतला न सुटलेला तिढा स्वातंत्र्योत्तर काळातही कायम राहिला हे मात्र खरे.

राजकीय स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सामाजिक –धार्मिक समता प्रस्थापित होण्याचा मार्ग प्रशस्त होईल अशी राज्यघटना आपण स्वीकारल्याने महाराष्ट्रातले समाजजीवन अधिक प्रवाही होईल असा आशावाद निर्माण होणे स्वाभाविकच होते. भारतीय संविधानाने अस्पृश्यता संपविली आहे; समताधिष्ठित समाजवादी मूल्यांवर अधिष्ठित समाजरचनेच्या ध्येय्याप्रत जाणारी धर्मनिरपेक्ष राज्यघटना अस्तित्वात आली आहे; महाराष्ट्रात शिक्षण व समाजसुधारणेच्या चळवळींमुळे जातिभेदनिर्मूलनाला गती प्राप्त झाली आहे, असे सर्वसाधारण चित्र पुढे येते. मात्र जातिसंस्थेकडून वर्गसंस्थेकडे होणारा प्रवास सुरू झाला आहे, असे म्हणता येत नाही. उदारमतवादी वा साम्यवादी विचारांच्या बुद्धिवादी चळवळीतून जातिसंस्थेला पर्यायी अशी दुसरी समांतर प्रतिसंस्था निर्माण होऊ शकली नाही. "ज्या वर्गाशी देशातील सर्व वर्गाचे लोक लग्नव्यवहार करू शकतील; माणसाची योग्यता जन्मावरून नाही तर गुणकर्मावरून ठरवतील अशा उघड्या तोंडाची जात हिंदू समाजात निर्माण झाली तर जातिसंस्थेचा तिढा सुटेल, असा एक पर्याय डॉ. श्रीधर

व्यंकटेश केतकर यांनी सुचविला होता. मात्र शैक्षणिक आणि राजकीय सुधारणा होऊनही महाराष्ट्रात अशी पर्यायी समाजव्यवस्था निर्माण होऊ शकली नाही. धर्मनिरपेक्ष राज्याच्या नवनिर्माणामुळे जातीजातीत आंतरिक सलोखा निर्माण होईल व महाराष्ट्रातल्या जातीय राजकारणाचा ध्रुव वर्गीय राजकारणाकडे झुकेल का या प्रश्नाचे उत्तर पुढल्या तपासात आपल्याला शोधायचे आहे. स्त्री-पुरुष विषमतेच्या पारंपरिक समजुती जाऊन लिंगनिरपेक्ष मानुषतेची मूल्ये समाजात रुजतील व स्त्रियांचा सार्वजनिक जीवनव्यवहारातला खुला सहभाग वाढेल यादृष्टीने कोणत्या हालचाली झाल्या याचाही तपास करावयाचा आहे. नव्या लोकशाही राजवटीची एकूण कार्यपद्धती समताधिष्ठित मूल्यांवर अधिष्ठित राहिल्याने भांडवलदार व कामगारांचे वर्गलढे मावळतील अशा प्रकारची स्वप्ने प्रजासत्ताक भारतात व पुरोगामी महाराष्ट्रात कितपत पूर्ण झाली, याचाही तपास पुढल्या खंडातल्या विवेचनातून करावयाचा आहे. गांधीजींच्या प्रभावातून सुरू झालेल्या भूदान, ग्रामदान व सर्वोदयी चळवळी कशा आकार घेतात, त्याला लोकप्रतिसाद किती व कसा मिळतो; पंचवार्षिक नियोजनाची संकल्पना, पंचायतराज व्यवस्था, सहकार क्षेत्राचा विस्तार, स्वयंसेवी संस्था-संघटनांच्या परिवर्तनवादी चळवळी, शिक्षण, कला व साहित्यक्षेत्रातील नवे प्रवाह, भाषावार प्रांतरचनेमुळे मराठी भाषेचा विकास व त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील समाजजीवनाल झालेले बदल यांचा मागोवा पुढील खंडातून घेतला जाणार आहे.

हा कालखंड मराठी माणसाच्या संवेदनस्वभावाला पारंपरिक पठडीतून मुक्त करणारा आणि राजकीय-सामाजिक घडामोडींकडे अधिक सजगपणे पहायला, विचार करायला प्रवृत्त करणारा कालखंड आहे. या कालखंडात वृत्तपत्रे आणि नियतकालिकांची संख्यात्मक आणि गुणात्मक वाढ झाली. ध्येयवादी पत्रकारांनी ब्रिटिशांच्या आविष्कारस्वातंत्र्यावरील बंधनांना तोंड देत व्रतस्थपणे आपली पहारेकऱ्याची आणि लोकशिक्षकाची भूमिका निभावली. उपरोध, उपहास, वक्रोक्तीच्या शैलीतून सरकारी बंधनांवर गनिमी काव्याने मात करून वसाहतवादी सत्तेविरुद्ध आणि सामाजिक अपप्रवृत्तींवर प्रहार करण्याची लढाई सुरू ठेवली. श्रीमंतांपासून मध्यमवर्गीयांपर्यंत सर्व समाजगटातील लोकांनी कर्तव्यबुद्धीने आपापल्या परीने या वृत्तपत्रांना भांडवल पुरविण्यासाठी आश्रयदात्याची भूमिका निभावली. भयमुक्त आणि निर्भीड पत्रकारांच्या पाठीशी उभे राहण्याचा मराठी माणसाच्या स्वभावधर्माची ही प्रत्यकारी खूण म्हणायला हवी.

महाराष्ट्रातल्या राजकीय, सामाजिक, धार्मिक चळवळी आणि मराठी वाङ्मय यांचा अन्योन्य संबंध राहिल्याचे चित्र या कालखंडात पहायला मिळते. कधी राजकीय-सामाजिक चळवळींच्या प्रेरणेतून साहित्यनिर्मिती झाली, तर कधी साहित्यातून प्रेरणा

घेऊन राजकीय-सामाजिक चळवळींनी मार्गक्रमणा केलेली दिसून येते. मराठीतल्या निबंधात्मक गद्याने राजकीय-सामाजिक प्रश्नांची तात्त्विक, व्यावहारिक व पर्यायी दिशा दिग्दर्शन करणाऱ्या वैचारिक मुशी घडविण्याचे काम केले. नाटक, रंगभूमी व चित्रपट माध्यमांनी वसाहतवादी सत्तेविरुद्ध सुरू असलेल्या राजकीय लढ्यासाठी मराठी माणसाच्या मनातला क्षोभ जागवण्याचे काम केले. टिळक-गांधी-सावरकर यांच्या विचारांचे प्रतिनिधित्व करणारी पात्रसृष्टी निर्माण केली; पारंपरिक रूढींच्या चौकटीतून बाहेर पडण्यासाठी सुधारणावादी विचारांना कथनमूल्यांचे घाट चढविले; हिंदू-मुस्लीम ऐक्य, जातीय सलोखा, राष्ट्रीय एकात्मता ही आशयसूत्रे घेऊन साहित्यनिर्मिती झाली. साहित्य व रंगभूमीच्या माध्यमातून मराठी माणसाच्या स्वभावातला अध्यात्मवादाचा ध्रुव ऐहिकतावादाकडे वळविण्याचाही पद्धतशीर प्रयत्न करण्यात आला, हे या कालखंडाचे महत्त्वाचे योगदान आहे. सत्यशोधकीय व आंबेडकरी जलसे, कलापथके यातून लोकप्रतिभेच्या सामूहिक आविष्कारांचेही उत्स्फूर्त प्रयोग होऊन जनवादी सौंदर्यशास्त्राचे नवे रचनाबंध या कालखंडात निर्माण झाले. पुराणे, आख्यायिका, दंतकथा या सांस्कृतिक कोशात तयार झालेल्या आशयसूत्रांना सरावलेल्या श्रोतृसमाजाला विद्रोही जाणिवांतून अपरिचिताचा धक्का देणारे लोकजागरणाचे कार्यक्रम चळवळीतल्या शाहिरांनी केले. सामाजिक बदलांच्या पाठीमागचे हे चैतन्यस्त्रोत ही या कालखंडाची एक मोठी जमेची बाजू आहे. तुरुंगवास भोगत असताना कुढत न बसता मिळावलेला रिक्तावकाश या बंदिवानांनी सर्जनशील चिंतनाने भरून काढला. मंडालेच्या तुरुंगात लो. टिळकांनी 'गीतारहस्य' लिहिले, धुळ्याच्या तुरुंगात विनोबांनी गीताप्रवचने दिली, काकासाहेब गाडगीळांनी 'ग्यानबाचे अर्थशास्त्र' उलगडले, देवगिरीकरांनी फिलिपाइन्स, कोरिया, आयर्लंडच्या स्वातंत्र्याचा इतिहास कथन केला, आचार्य भागवतांनी बुद्धिझम, ख्रिश्चॅनिटी, इस्लामचे तत्त्वज्ञान निरूपित केले, जी. डी. बापू लाड यांनी मार्क्स-लेनीनचा समाजवाद समजावून घेतला, ना. ग. गोरे यांनी 'कारागृहाच्या भिंती'आडच्या रोजनिशीतून आत्मचिंतनाला शब्दरूप दिले अशी कितीतरी नाविन्यपूर्ण साहित्यनिर्मिती ही तुरुंगातून झाली. तुरुंगाचे आचार्यकुलात आणि लोकशाळेत झालेले रूपांतर ही या कालखंडातली एक वैशिष्ट्यपूर्ण घटना ठरली.

संगीत क्षेत्रात महाराष्ट्रातल्या कलावंतांनी उत्तर भारतीय व कर्नाटकी संगीताच्या परंपरा पचवून महाराष्ट्रात हिंदुस्थानी संगीताचा वारसा पुढे नेला. संगीतशास्त्राची पायाभरणी, संगीतशिक्षणासाठी गुरुकुलापासून विद्यालये स्थापण्यापर्यंत संस्थात्मक संरचना उभारण्याच्या दृष्टीने मराठी माणसाने पद्धतशीर प्रयत्न केला. हार्मोनियमची शास्त्रीय संगीताला जोड देण्यासाठी खुली संशोधक वृत्ती जोपासली. पाश्चिमात्य संगीताचे नवे वळण, ध्वनिमुद्रिका, रेडिओ, इ. तंत्रवैज्ञानिक साधनांचा खुल्या मनाने पुरस्कार

करून महाराष्ट्रात संगीताभिरुचीचे क्षेत्र विस्तारण्याचे काम या कालखंडात झाले. नाट्यसंगीत आणि चित्रपटसंगीतातून सांगितिक उपयोजनाचे अनेकविध आविष्कार या काळात पुढे आले. लोकसंगीत आणि आधुनिक संगीत यांचे सामंजस्यपूर्वक संम्मीलन घडविणारा कालखंड हे या काळाचे वैशिष्ट्यपूर्ण योगदान राहिले आहे.

या कालखंडात महाराष्ट्रात चित्रकलेचे एक नवे पर्व सुरू झालेले पहायला मिळते. ब्रिटिशांनी कलकत्ता आणि मुंबईत कला महाविद्यालये सुरू केल्यामुळे इंग्लंडमधल्या चित्रकलेतला 'ॲकॅडेमिझम' आणि 'आधुनिकवादी' चित्रकलेचे नवे प्रवाह महाराष्ट्रीय कलावंतांनी अनुसरले. मुद्रणकलेमुळे 'मुद्राचित्रां'चा, 'कथाचित्रां'चा नवा प्रयोग करण्याची संधी चित्रकारांना मिळाली. रवी वर्मा, धुरंधर, हळदणकर यांनी महाराष्ट्रात चित्रकलेची अभिरूची संवर्धित करण्यात मोठे योगदान दिले. कॅलेंडर, जाहिराती, पुस्तके, भिंती-देव्हाऱ्यात छापील चित्रे लावली जाऊ लागली. दिवाळी अंकात रंगीत चित्रे छापली जाऊ लागली. राजेरजवाडे आणि श्रीमंतांच्या दालनातील चित्रकला मध्यमवर्गीयांच्या घरा-ओसरीत पोहोचली. कलेच्या सामाजिकीकरणाच्या दृष्टीने हा टप्पा फार महत्त्वाचा होता. 'ओलेती'सारख्या चित्रामुळे श्लील-अश्लीलतेचा वाद रंगला. मराठी माणसाच्या अभिरूचीला मिळणारे हे धक्के त्याच्या कलादृष्टीचा पैस विस्तारण्यास कारणीभूत ठरले. या कालखंडात संगीत रंगभूमी बहरायला आली होती. रवी वर्म्याची चित्रे आणि संगीत रंगभूमीवरील नट-नट्यांचे कपडे, नेपथ्याचे पडदे यांच्यातल्या कलात्मक देवघेवीतून समकालीन कलाभिरूचीच्या अभिसरणाचे एक मनोद्य दर्शन पहायला मिळते. राष्ट्रीय चळचवळीने सामाजिक जीवनात आलेली गतिमानता, चित्रपट कलेमुळे संगीत नाटकांना लागलेली ओहोटी यातून मराठी कला संवदेनांत झालेल्या स्थित्यंतरांचे बारकावे प्रस्तुत अभ्यासात नोंदविलेले आहे. १९५० नंतरच्या साहित्य, समाज आणि कला क्षेत्रातील आमूलाग्र स्थित्यंतरांची नांदी म्हणून ह्या बदलाच्या खुणा पहायला मिळतात. इतिहासाच्या कालपटावर घटना-घडामोडींचा वेग सतत कमी-जास्त होत असतो, त्याचे सांस्कृतिक पडसाद मात्र संथ गतीने होत असतात, हे प्रस्तुत अभ्यासातून प्रकर्षाने लक्षात येते.

चाणक्याने 'पुराणम् इतिवृत्तम् आख्यायिकोदारणं धर्मशास्त्रम् अर्हशास्त्रम् च इति इतिहास:' अशी इतिहासाची व्याख्या केली होती. ऐतिहासिक स्थित्यंतरांत व्यक्ती, काळ आणि स्थळ यांचा परस्परसांघात साधला जात असतो, या व्याख्येनुसार इतिहासाच्या संदर्भचौकटीत बसणाऱ्या अनेक घटितांचा येथे परामर्श घेतला आहे. दुष्काळ, प्लेगच्या साथी, महायुद्धे, जातीय दंगली अशा नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती, वसाहतवादी सत्तेतले मोहरे, राजकीय पक्ष-संघटनांचे नेते, कामगार संघटनांचे संप, हरताळ, सामाजिक

परिषदा, शिक्षणसंस्थांमधले विविध विचारप्रवाह, वृत्तपत्रीय वृत्तांत, चरित्र-आत्मचरित्रातून तसेच साहित्य व कलांच्या अनुभवकथनांतून विखुरलेल्या ऐतिहासिक खुणांचा मागोवा या लेखनातून घेतला आहे. कालपटावरील बदलाच्या बाह्य खुणा वाचत असताना त्यामागची कारणमीमांसा, त्यामागचा विचारव्यूह वाचण्याचाही जमेल तसा प्रयत्न केला आहे; मात्र असे वाचन कधीच परिपूर्ण नसते, याची जाणीव आहे. ह्या वाचनातल्या अपुऱ्या जागा भरण्यासाठी व न उलगडले इतर पैलू प्रकाशात आणण्यासाठी खुला अवकाश आहे; त्यामुळे मर्मज्ञ वाचक-लेखकांनी पुढे येऊन विधायक सूचना कराव्यात व हा तपास पुढे नेणारा चर्चासंवाद वाढवावा ही विनंती.

❑❑❑

## परिशिष्ट १

# कालपट

१९०० : नोव्हेंबर – मॅक्समुल्लरचा मृत्यू; टिळकांचा केसरीत मृत्यूलेख.

: शिल्पकार गणपत काशिनाथ म्हात्रे यांचा पॅरिस प्रदर्शातील शिल्पासाठी गौरव.

१९०१ : जानेवारी १६ – न्या. रानडे यांचा मृत्यू

: जानेवारी २२ – व्हिक्टोरिया राणीचा मृत्यू. ७ वे एडवर्ड गादीवर आले.

: मे - मुंबई सरकारने जमीन महसुलाच्या कायद्याचा मसुदा प्रसिद्ध केला. टिळकांची बिलापाठीमागील इंग्रजांच्या छुप्या नीतीसंदर्भात लोकजागृती मोहीम.

: जून २८ – बाबामहाराज ट्रस्टचे विश्वस्त या नात्याने लोकमान्य टिळकांनी ताईमहाराजांसाठी दत्तकपुत्राची निवड केली. दत्तविधानानंतर वाद निर्माण झाला.

: मुंबईत पहिली मोटारगाडी आली. १९०८ पर्यंत मुंबईत २८१ मोटारी आल्या.

: मुंबई इलाख्यात जनगणनेचा कार्यक्रम.

: मुंबई विद्यापीठात एम. ए. च्या परीक्षेसाठी मराठीसह प्रादेशिक भाषांना स्थान.

१९०२ : जुलै ४ - स्वामी विवेकानंद यांनी इहलोकाचा निरोप घेतला. शंकराचार्यांनंतरचे दुसरे सत्यवचनी सत्पुरुष अशा शब्दांत टिळकांची 'केसरी'तून आदरांजली वाहिली.

: नोव्हेंबर५– ब्रिटिश सरकार व निझाम यांच्यात वऱ्हाड प्रांतासंबंधीचा करार.

: ना. गोपाळ कृष्ण गोखले यांची कायदेकौन्सिलवर निवड.

: भाषिक तत्त्वावर ओरिसाच्या प्रादेशिक एकीकरणाची मागणी.

१९०३ : ना. गोखले यांचे कायदेकौन्सिलात पहिले भाषण.

: लोकमान्य टिळकांचा 'The Arctic Home in the Vedas' ग्रंथ प्रसिद्ध.

: डिसेंबर १२ – बंगालच्या फाळणीची अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध.

: शारीर अस्वास्थ्यामुळे होळकर सरकारचा राजीनामा.

१९०४ : शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्यासाठी सहकारी पतसंस्था स्थापन करण्याचा कायदा.

: भारतीय विद्यापीठ कायदा अस्तित्वात. विद्यापीठांनी परीक्षामंडळापेक्षा अध्यापन करणारी संस्था म्हणून काम करण्याचा दृष्टिकोन .

१९०५ : लार्ड कर्झनने प्रथमच पुरातत्त्व विभागासाठी महासंचालकाची नेमणूक केली. या पुरातत्त्व विभागानेच पुढे १९२० साली मोहोंजदरो येथे उत्खनन करून सिंधू संस्कृतीचे अवशेष शोधून काढले.

: जून १२ - ना. गोखले यांनी 'भारत सेवक मंडळा'ची स्थापना केली.

: जुलै २० – बंगालची मुस्लिमबहुल पूर्व बंगाल आणि आसाम अशा दोन प्रांतात फाळणी. हिंदुस्थानात राष्ट्रवादी भावनेतून देशभर मोर्चे, धरणे, आंदोलने सुरु.

: ऑगस्ट ७ –बंगालच्या फाळणीचा निषेध करण्यासाठी सुरेंद्रनाथ बॅनर्जी आणि अन्य

राष्ट्रवाद्यांनी 'स्वदेशी' चळवळ सुरू केली.

: गोपाळ कृष्ण गोखले यांच्या अध्यक्षतेखाली बनारस येथे राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात 'स्वदेशी'ची चळवळ काँग्रेसचे अधिकृत धोरण असल्याचे घोषित.

: ऑक्टोबर ७ – दसऱ्याच्या मुहर्तावर पुण्यात सावरकर, चिंचाळकर या विद्यार्थ्यांनी विदेशी कपड्यांची होळी पेटवली.

: लेनीनच्या नेतृत्वाखालील पहिली रशियन राज्यक्रांती असफल ठरली.

: सातारा येथे तिसरे अ. भा. मराठी साहित्य संमेलन. अध्यक्ष: रघुनाथ पांडुरंग करंदीकर.

: पुणे येथे पहिले नाट्यसंमेलन. अध्यक्ष : ग. श्री. खापर्डे.

: आसाम,बिहार,सिंध आणि दक्षिण भारतात भाषावार प्रांत स्थापण्यासाठी संघटनात्मक चळवळी.

१९०६ : बाळ गंगाधर टिळक, बिपिनचंद्र पाल आणि लाला लजपतराय यांनी स्वदेशी, बहिष्कार आणि लोकसहभाग या तत्त्वांवर राष्ट्रीय राजकारणाची सूत्रे

: जुलै १७ – नागपूरात दादासाहेब खापर्डेच्या नेतृत्वाखाली विदेशी कापडांची होळी.

: ऑक्टोबर १ – सिमला करार- आगाखान यांची व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो यांचेकडे मुसलमानांसाठी स्वतंत्र मतदारसंघांची मागणी.

: डिसेंबर २६ – कलकत्ता अधिवेशनात काँग्रेसच्या उद्देशपत्रिकेत स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य प्रस्थापना या तीन मुद्द्यांना अग्रक्रम देण्याचा ठराव.

: डिसेंबर ३० – डाक्का येथे अखिल भारतीय मुस्लीम लीगची स्थापना.

: पुणे येथे चौथे अ.भा.मराठी साहित्य संमेलन; अध्यक्ष- वासुदेव गोविंद कानिटकर

: नाशिक येथे दुसरे नाट्यसंमेलन; अध्यक्ष – न. चिं. केळकर

१९०७ : ब्रिटिशांनी १९०७ ते १९१० या काळात आविष्कार स्वातंत्र्यावर गदा आणणारे कायदे केले. आणीबाणीचे अधिकार वापरून अनेक संघटना व वृत्तपत्रांवर बंदी.

: ११ मे राजद्रोहास प्रवृत्त केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्याचा कायदा लागू.

: ऑगस्ट २८ – ब्रिटिश सरकारकडून हिंदुस्थानच्या कायदेमंडळात भारतीय प्रतिनिधींची नेमणूक करण्याचा कायदेमंडळाच्या सचिवांना अधिकार.

: डिसेंबर २६-२७- सुरत येथे राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात ब्रिटिश प्रशासनावर संपूर्ण बहिष्कार घालण्याच्या मुद्यावरून टिळक व बिपीनचंद्र पाल यांचा 'जहाल' गट आणि गोखले व सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांचा 'मवाळ' गट यांच्यात वाद होऊन काँग्रेसमध्ये फूट. पुढे ९ वर्षे ही दुफळी कायम राहिली.

: ॲनी बेझंट थिऑसॉफिकल सोसायटीच्या अध्यक्ष. मद्रास येथे मुख्यालय.

: पुणे येथे ५ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन; अध्यक्ष– विष्णू मोरेश्वर महाजनी

: पुणे येथे ३ रे मराठी नाट्यसंमेलन; अध्यक्ष – कृ. प्र. खाडिलकर.

: मुंबई प्रेसिडेन्सीतून 'सिंध' आणि मद्रास प्रेसिडेन्सीतून 'आंध्र' अशी प्रांतीय काँग्रेसची स्थापना करून भाषावार प्रांतरचनेच्या भूमिकेचा पुरस्कार.

: मुंबईत विजेवर चालणारी ट्रॅम सुरू झाली.

: टिळकप्रणीत राष्ट्रीय शिक्षणासाठी समर्थ विद्यालयाची स्थापना.

: वंगभंगाच्या पार्श्वभूमीवर कृ. प्र. खाडिलकरांचे 'कीचकवध' नाटक रंगभूमीवर; काही प्रयोगानंतर सरकारने नाटकावर बंदी आणली.

१९०८ : एप्रिल ३०– बंगालच्या बॉम्बस्फोटापासून पुढील दोन वर्षांत बंगाल आणि महाराष्ट्रात क्रांतिकारी संघटनांच्या घातपाताच्या कारवाया.

: जून ८ - वृत्तपत्रांनी गुन्ह्यास चिथावणी देणारा मजकूर प्रसिद्ध केल्यास तसेच स्फोटक पदार्थ बाळगणाऱ्यांवर सक्त कारवाई करण्याचा कायदा लागू.(Newspapes -Incitement to offences-and Explosive Substances Act) संघटना करण्यास व जाहीर सभांना बंदी.

: जुलै २२ : टिळकांना राजद्रोहाच्या आरोपाखाली ६ वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा.

: जुलै २३ – टिळकांच्या शिक्षेच्या निषेधार्थ मुंबईतल्या गिरणी कामगारांचा सहा दिवसांचा संप व मुंबईत मजुरांचे दंगे.

: पुणे येथे ६ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन. अध्यक्ष: चिं. वि. वैद्य

: नाशिक येथे ४ थे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष : नी. वि. छत्रे.

: भाषिक तत्त्वावर बिहार प्रांतिक काँग्रेसची स्थापना.

१९०९ : मे २५ – भारतात सुप्रशासन आणण्याच्या हेतूने 'मोर्ले-मिंटो सुधारणा' प्रस्ताव.
: व्हाइसरॉय यांच्या कार्यकारी परिषदेवर सत्येंद्र प्रसन्न सिन्हा या पहिल्या भारतीय व्यक्तीची नेमणूक.
: कायदेमंडळाची पहिली निवडणुक. १३५ भारतीयांची निवड. राष्ट्रीय संघटनेचा अभाव असल्यामुळे मुस्लीम लीगला फारसे मतदान झाले नाही.
: मुंबईस 'कामगार हितवर्धक सभा' स्थापन. भिवाजी रामजी नरे, सीताराम केशव बोले व बॅ. हरिश्चंद्र आनंदराव तालचेरकर व मराठा ऐक्येच्छू सभा यांचा पुढाकार.
: बडोदे येथे ७ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन. अध्यक्ष – कान्होबा रणछोडदास कीर्तिकर.
: पुणे येथे ५ वे मराठी नाट्यसमेलन. अध्यक्ष : ग. कृ. गद्रे.
१९१० : जानेवारी ११ - न. चिं. केळकर केसरी व मराठा पत्राचे संपादक.
: वृत्तपत्र कायदा लागू. या कायद्यान्वये वृत्तप्रसारणाला मर्यादा. संघटना स्थापण्याचा व न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार रद्द. लो. टिळक, लाला लजपतराय, अजित सिंग तुरुंगात. काळ, राष्ट्रमत, हिंदू पंच या वृत्तपत्रांची मान्यता रद्द.
: दोराबजी टाटा यांनी हायड्रोइलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनी स्थापन केली.
: अलाहाबाद येथे काँग्रेसचे अधिवेशन.
: मंडालेच्या तुरुंगात लो. टिळकांचे 'गीतारहस्य' ग्रंथाचे लेखन पूर्ण.
: मध्यवर्ती सरकारने 'स्वतंत्र शिक्षण विभाग ' स्थापन केला.
: पुणे येथे ६ वे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष : चिं. ग. भानू
१९११ : हिंदुस्थानची जनगणना. भारताची लोकसंख्या ३० कोटी ३० लक्ष; मुंबई इलाख्याची लोकसंख्या १ कोटी ९६ लक्ष.
: लोणावळा धरणाची पायाभरणी.
: दोराबजी टाटा यांनी जमशेटपूर येथे पोलादप्रकल्प सुरू केला.
: मार्च ११: मुंबईत 'सोशल लीग सर्व्हिस' ही कामगार संघटना स्थापन. ना. म. जोशी, गोपाळ कृष्ण देवधर, नटेश अप्पाजी द्रवीड यांचा पुढाकार.
: कलकत्त्यास काँग्रेस अधिवेशन,
: डिसेंबर १२ – ब्रिटनचे सम्राट पंचम जॉर्ज यांचा दिल्ली दरबार. बादशहाने कलकत्त्याची राजधानी दिल्लीला नेण्याची घोषणा केली.
: मुंबई येथे ७ वे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष : विष्णू दिगंबर पलुस्कर
१९१२: इंग्लंड – जर्मनीत तणाव.

: मे १८ – मुंबईत 'पुंडलिक' या मराठी मूक चित्रपटाचे चित्रिकरण.

: अकोला येथे ८ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन. अध्यक्ष – ह. ना.आपटे

: अमरावती येथे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष – मो. वि. जोशी

१९१३ : मार्च २२ – बॅ. महमद अली जिना यांचा मुस्लीम लीगमध्ये प्रवेश.

: मे ३ – दादासाहेब फाळके दिग्दर्शित 'राजा हरिश्चंद्र' मूक चित्रपट प्रदर्शित. याच वर्षी नोव्हेंबरात त्यांचा 'सत्यवान सावित्री' हा मूकपट प्रदर्शित झाला.

: नोव्हेंबर १ – अमेरिकेतील सॅन्सफ्रॅन्सिको येथे भारतीय वंशाच्या तरुणांनी व विशेषत: शिखांनी ब्रिटिश प्रशासन उलथून पाडण्यासाठी शस्त्रास्त्रे पुरविणारी 'गदर' ही बंडखोर संघटना स्थापन केली. त्यात काही मराठी तरुणांचाही सहभाग.

: कराची येथे राष्ट्रीय कॉंग्रेसचे अधिवेशन

: रवींद्रनाथ टागोर यांचा नोबेल पुरस्काराने गौरव.

: दादासाहेब फाळके यांचा 'राजा हरिश्चंद्र' हा पहिला सिनेमा प्रसारित.

: पुणे ९ वे येथे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष – के. रा. छापखाने

: दिवाकरांची पहिली नाट्यछटा 'केसरी'तून प्रसिद्ध.

: सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे विधेयक पारित करण्यास ब्रिटिश शासनाचा नकार.

: मुंबईचे राज्यपाल सर जॉर्ज क्लार्क यांनी पुणे व अहमदाबाद येथे नवी विद्यापीठे स्थापन करण्याच्या इष्टतेचा विचार व्यक्त केला.

१९१४ : जून १७- लोकमान्य टिळक यांची मंडालेच्या तुरुंगातून सहा वर्षांनंतर सुटका.

: जुलै २८– पहिल्या महायुद्धाला सुरुवात. ऑस्ट्रियाने सर्वियाविरुद्ध युद्ध पुकारले. 'केसरी'तून कृ. प्र. खाडिलकर यांनी पहिल्या महायुद्धावर लेखमाला सुरू केली.

: ऑगस्ट १– जर्मनीने रशियाविरुद्ध युद्ध पुकारले.

: ऑगस्ट ३– जर्मनीने फ्रान्सविरुद्ध युद्ध घोषित केले.

: ऑगस्ट ४- इंग्लंड जर्मनीविरुद्ध युद्धात उतरले. त्यामुळे भारतही पहिल्या महायुद्धात ओढला गेला. युद्धामुळे राजकीय सुधारणांचा प्रस्ताव मागे पडला.

: सप्टेंबर २२ – मद्रासवर जर्मनीच्या जहाजांचा बॉम्बवर्षाव.

: सप्टेंबर २९ – हॉंगकॉंग, शांघाय, योकोहामा येथे प्रवेश न मिळाल्याने ३७६ भारतीय निर्वासीत कॅनडात पोहचले; तेथे प्रवेशासाठी बंदी. त्यानंतर ते समुद्रमार्गे भारतात परतले; व पंजाबात गदर पार्टीचे काम सुरू केले.

: पहिल्या महायुद्धामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत धान्याचा तुटवडा, भारतातून

गव्हाची मोठ्या प्रमाणात निर्यात, त्यामुळे महागाई वाढली, साठेबाजी व नफेखोरीचे प्रकार वाढले. भारताच्या महसुली उत्पन्नातील १५० दशलक्ष पौंड रकमेचा निधी लढाईसाठी वर्ग करण्यात आला. तूट भरून कढण्यासाठी देशी उद्योगांनी प्रयत्न केले.

: भारतीय विद्यापीठांत पदव्युत्तर अध्यापनाची सुविधा निर्माण झाली. पटणा, लखनौ, दिल्ली, म्हैसूर, हैद्राबाद व पुणे विद्यापीठांची स्थापना.

: पुणे १० वे येथे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष – शि. म. परांजपे

: नागपूर येथून 'महाराष्ट्र' साप्ताहिकाचे प्रकाशन. संपादक : गोपाळराव ओगले.

: सांगली येथे गजानन मिलची स्थापना.

: अमरावतीस हनुमान व्यायाम मंडळाची स्थापना.

: मुंबईस रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सची स्थापना.

: भारतात मोटारीच्या वापरास प्रारंभ.

: पनामा कालवा सुरू.

: मराठी वाङ्मयात वा. म. जोशी यांची 'आश्रमहरिणी' व चिं. वि. वैद्य यांची 'दुर्दैवी रंगू' या कादंबऱ्या; नाथमाधव यांची रायक्लब उर्फ सोनेरी टोळी प्रसिद्ध; ना. ह. आपटे यांच्या कथालेखनाचा प्रारंभ.

१९१५ : जानेवारी ९- म.गांधी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परतले. त्यांनी 'साबरमती आश्रमा'ची स्थापना केली.

: फेब्रुवारी १५ ते १८ – भारतीय मुसलमानांच्या पाचव्या बटालियनचे सिंगापूरला ब्रिटिशांविरुद्ध बंड. अनेक युरोपियन अधिकारी व नागरिक मारले गेले. त्यानंतर ही बटालियन बरखास्त करण्यात आली.

: फेब्रुवारी १९ – गोपाळ कृष्ण गोखले यांचे निधन.

: एप्रिल १५ ते जानेवारी १६ – गॅल्लीपोली इथे ब्रिटिशांचा सर्वंकष पाडाव; त्यात भारतीय पायदळाचे अनेक सैनिक प्राणास मुकले.

: मे १०– 'सर्व सुधारणांचे मूळ राजकीय सुधारणा' या विषयावर किर्लोस्कर नाट्यगृहात टिळकांचे भाषण..

: नोव्हेंबर ५ – सर फिरोजशहा मेहता यांचे निधन

: गुलाबराव महाराज यांचे निधन.

: अ. भा. हिंदू महासभा स्थापन.

: औंध संस्थानात ओगले बंधूंचा काच-कारखाना सुरू.

: मुंबई येथे ११ वे येथे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष – रे. ना. वा. टिळक

: मुंबई येथे ९ वे अ. भा. मराठी साहित्यसंमेलन, अध्यक्ष–मिरजेचे

संस्थानाधिपती गंगाधरराव पटवर्धन. शासकीय व्यवहारात मोडी लिपीला उत्तेजन देण्याबाबत ठराव.

: लो. टिळक यांचे 'गीतारहस्य'; त्रिं. ना. अत्रे यांचा 'गावगाडा'; हरिभाऊ आपटे यांची 'वज्राघात', वा. म. जोशी यांची 'रागिणी' व 'आधुनिक सुशिक्षितांचा वेदान्त', न. चिं. केळकर यांचे 'संगीत कृष्णार्जुन युद्ध' हे ग्रंथ प्रकाशित.

: आइन्स्टाईनचा सापेक्षतावादाचा सिद्धान्त जाहीर.

१९१६ : एप्रिल १६ – ब्रिटिश सैन्य इराकच्या सैन्याला शरण. सहा हजार सैनिक बंदिवान. अन्न, औषधे व इतर साधनसामुग्रीच्या अभावाने बगदादला हजारो भारतीय सैनिक मृत्यूमुखी. या नामुष्कीची जबाबदारी स्वीकारून भारतमंत्री चेंबरलेन यांचा राजीनामा.

: एप्रिल २८ – बेळगावला मुंबई प्रांतिक कॉंग्रेसची परिषद. लोकमान्य टिळक यांनी आयरिश संघटनेच्या धर्तीवर 'होमरूल लीग' स्थापन केली.

: मे - हिंदुस्थान सरकारने टी. एच्. हॉलंड यांच्या अध्यक्षतेखाली 'औद्योगिक आयोग' स्थापन केला. मदन मोहन मालवीय व दोराबजी टाटा हे दोन भारतीय सदस्य.

: जून १६ – जवाहरलाल नेहरू ॲनी बेझंट यांच्या 'होमरूल लीग'मध्ये दाखल.

: जून २४ – जहाल व मवाळांकडून वृत्तपत्र कायदा रद्द करण्याची मागणी.

: जुलै २२ – होमरूल चळवळीतली भाषणे राजद्रोहात्मक ठरवून टिळकांवर फिर्याद.

: जुलै २३ – लो. टिळक यांची षष्ट्यब्दीपूर्ती.

: सप्टेंबर – ॲनी बेझंट यांची मद्रास येथे समांतर 'होमरूल लीग' स्थापन.

: नोव्हेंबर ९ – लो. टिळक यांची राजद्रोहाच्या खटल्यातून निर्दोष मुक्तता.

: डिसेंबर १६ – नऊ वर्षांच्या दुफळीनंतर कॉंग्रेसमध्ये जहाल-मवाळ गटांचे एकीकरण. लो. टिळकांचा कॉंग्रेस प्रवेश. कॉंग्रेस व मुस्लीम लीग यांची युती घडवून आणणारा ऐतिहासिक 'लखनौ करार'. साम्राज्यांतर्गत स्वराज्य (Self-government) आणि मुसलमानांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी करण्यात आली. ॲनी बेझंट यांची कॉंग्रेसच्या अध्यक्षपदी निवड. कॉंग्रेसची पहिली महिला अध्यक्ष.

: पुणे १२ वे येथे मराठी नाट्यसमेलन. अध्यक्ष – शंकरराव मुझुमदार;

: बडोदे येथे अ. भा. संगीत परिषद.

: ब्राह्मणेतरांचे राजकीय हक्क जपण्यासाठी 'डेक्कन रयत असोशिएशन' स्थापन; वि. रा. शिंदे यांनी 'डिप्रेस्ड क्लास मिशन'ची स्थापना केली;

: मध्यवर्ती कायदेमंडळात मिश्र विवाहाला मान्यता देणारे पटेल विधेयक सादर.

: कोल्हापूरात राजर्षी शाहू महाराजांनी मिश्र विवाहाला मान्यता देणारा कायदा केला.

: धोंडो केशव कर्वे यांनी महिला विद्यापीठ स्थापन केले. बनारसला पं. मदनमोहन मालवीय यांनी हिंदू विश्वविद्यालय स्थापन केले. औरंगाबादला 'सरस्वती भवन पाठशाळा' स्थापन; पुणे येथे 'न्यू पूना कॉलेज' स्थापन, पुण्यात 'शिवाजी मराठा हायस्कूल' सुरू झाले.

: पुण्यात 'केंद्रीय जलसंशोधन केंद्रा'ची स्थापना.

: नाटककार गो. ब. देवल यांचे निधन.

: वा. म. जोशी यांच्या 'आश्रमहरिणी' व 'नवपुरुष करंडक' या कादंबऱ्या, गो. ब. देवल यांचे 'सं. संशयकल्लोळ' व कृ. प्र. खाडिलकर यांचे 'सं. स्वयंवर' ही नाटके प्रसिद्ध. 'केशवसुतांची कविता' काव्यसंग्रह प्रकाशित. संपा. काव्यरत्नावलीकार फडणीस.

१९१७ : रशियात लेनिनच्या नेतृत्वाखाली 'बोल्शेव्हिक क्रांती'.

: फेब्रुवारी १७ – मुंबई सरकारने महारांना लष्करात घ्यावे असा हुकूम काढला. वायव्य सरहद्द प्रांतात दोन महार बटालियन्स पाठविण्यात आल्या. भारतीयांनी लष्करात प्रवेश करावा असे लो.टिळकांचे आवाहन.

: मार्च १७ – महायुद्धात एक लाख भारतीय सैनिकांनी बगदाद काबीज केले.

: मार्च २० – विद्यार्थ्यांना राजकीय सभांना हजर रहाण्यास बंदी व त्यांना भडकविणाऱ्यांवर भारत संरक्षण कायद्याखाली कारवाई करण्याचा इशारा देणारे परिपत्रक जारी.

: मे १७ – नाशिकला श्रीनिवासशास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई काँग्रेसची प्रांतिक परिषद.

: जून १७ – मद्रास सरकारने बेझंटबाईंना स्थानबद्ध केले; टिळकांची केसरीतून टीकेची झोड.

: जुलै ६ – पुण्यात भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंडळाची स्थापना.

: जुलै १८ – एडविन मॉटेग्यू यांची भारतमंत्री म्हणून नेमणूक.

: जुलै १७ ते जून १९१८: भारतात प्लेगचे थैमान. ८ लाख माणसे मेली.

: ऑगस्ट २० – हिंदुस्थानला हप्त्याहप्त्याने जबाबदार सरकार देण्याची व प्रशासनात भारतीयांना प्रतिनिधित्व देण्याची भारतमंत्री मॉटेग्यू यांची घोषणा.

: ऑगस्ट – कलकत्ता काँग्रेसमध्ये विठ्ठल रामजी शिंदे यांच्या प्रयत्नाने 'अस्पृश्यता निवारणा'चा ठराव मंजूर.

: सप्टेंबर १७ – बेझंटबाईंची तुरुंगवासातून मुक्तता.

: ऑक्टोबर १७ – अलाहाबादला काँग्रेस आणि मुस्लीम लीगची संयुक्त परिषद. टिळक व बेझंटबाई गैरहजर राहिले.

: नोव्हेंबर १० – एडविन माँटेग्यू शिष्टमंडळ ६ महिन्यांच्या भारत दौऱ्यावर आले.

: नोव्हेंबर २७ – दिल्लीत टिळक – माँटेग्यू भेट.

: माँटेग्यु-चेम्सफर्ड सुधारणांची घोषणा.

: डिसेंबर – कलकत्ता येथे ॲनी बेझंट यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन. लोकमान्य टिळकांचे मिरवणूक काढून भव्य स्वागत.

: मुंबईत न्या. नारायण चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रांतिक शिक्षण परिषदेत भाषावार विद्यापीठे स्थापन करण्याची मागणी.

: ब्राह्मणेतर पक्षाची स्थापना.

: मुंबई शहरात ४७ संप.

: गांधीजींचा चंपारण्यचा निळीच्या शेतकऱ्यांचा सत्याग्रह व अहमदाबादच्या कामगारांचा लढा; जननेता म्हणून गांधीजींचा उदय.

: कोल्हापूर संस्थानात स्पृश्यास्पृश्यांना समान लेखणारा कायदा, बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची स्थापना.

: गाडगेबाबांनी पंढरपूरला चोखामेळा धर्मशाळा स्थापन केली.

: 'मराठा राष्ट्रीय संघ' स्थापन (संस्थापक: वि. रा. शिंदे)

: श्री. म. माटे यांच्या पुढाकाराने पुण्यात 'अस्पृश्यता निवारण मंडळा'ची स्थापना.

: रे. ना. वा. टिळक यांचा अमेरिकन मिशनचा राजीनामा व 'देवाचा दरबार' या संस्थेची स्थापना.

: मुंबईत गजानन भास्कर वैद्य यांनी 'हिंदू मिशनरी सोसायटी'स्थापन केली.

: यवतमाळ येथे 'हनुमान आखाडा' स्थापन.

: महाडला 'कोकण एज्युकेशन सोसायटी' स्थापन.

: पुण्यात 'शिवाजी मंदिर' संस्थेची स्थापना.

: धारवाडला कर्नाटक कॉलेजची स्थापना.

: दादाभाई नौरोजी यांचे निधन. अण्णाहेब पटवर्धन यांचे निधन.

: दादासाहेब फाळके यांचा 'लंका दहन' हा मूकपट प्रदर्शित.

: इंदूर येथे १० वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन. अध्यक्ष – गणेश जनार्दन आगाशे.

: पुणे येथे १३ वे मराठी नाट्यसमेलन. अध्यक्ष – कृ. प्र. खाडिलकर
: ना. सी. फडके यांची 'अल्ला हो अकबर' ही पहिली कादंबरी प्रसिद्ध.
: ह. ना. आपटे संपादित 'केशवसुतांची समग्र कविता' प्रसिद्ध.
: सयमक-निर्यमक कवितेचा वाद रंगला.

१९१८ : फेब्रुवारी ५ ते २२ – लोकमान्य टिळकांचा निधीसंकलनार्थ विदर्भ दौरा.१ लाखाहून अधिक रक्कम जमा.
: न. चिं. केळकर पुणे शहर म्युनिसिपालिटीचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष.
: मार्च – विलायतेस जाण्याकरिता न. चिं. केळकर यांनी केसरी व मराठा पत्राचे संपादकत्व सोडले.
: एप्रिल ४ – होमरुल लीगचे शिष्टमंडळ लंडनला निघाले असता बोटीवर लो. टिळकांसह शिष्टमंडळाची पारपत्रे रद्द करण्यात आली.
: न्या. सिडनी रौलट यांच्या अध्यक्षतेखाली ब्रिटिश सरकारने नेमलेल्या राजद्रोहविषयक समितीचा अहवाल प्रसिद्ध.
: एप्रिल २७ – दिल्लीत व्हॉईसरॉयने घेतलेल्या युद्धपरिषदेत लो. टिळक व ॲनी बेझंट यांना वगळले.
: जून १६ – गव्हर्नर विलिंग्डन यांनी मुंबई प्रांताची युद्ध परिषद बोलावली. टिळकांना निमंत्रण ; मात्र टिळकांनी 'स्वराज्य' व 'स्वरक्षण' ही अभेद्य जोडी फोडता येणार नसल्याचे भाषणात सांगितल्यावर गव्हर्नरने टिळकांना भाषणबंदी केली. गांधीजींच्या अध्यक्षतेखाली गव्हर्नरच्या निषेधाची सभा.
: जुलै ४ – 'भारतीय संविधानात्मक सुधारणा'चा मॉटेग्यू-चेम्सफर्ड अहवाल प्रसिद्ध. राष्ट्रीय पातळीवर सरकारात भागीदारी, प्रांतिक स्वायत्तता, स्थानिक स्वराज्य व महत्त्वाची खाती ब्रिटिशांकडे ठेवून इतर खाती भारतीयांकडे सोपविण्याचा प्रस्ताव.
: जुलै १८ – सरकारने लो. टिळकांवर भाषणबंदीचा हुकूम बजावला.
: ऑगस्ट २८ ते सप्टेंबर १ – मुंबईत हसन इमाम यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन.
: सप्टेंबर २२ – हैद्राबादला उस्मानिया विद्यापीठाची स्थापना.
: सप्टेंबर २४ – चिरोलवर खटल्यासाठी लो. टिळक विलायतेला.
: ऑक्टोबर, फ्लूच्या साथीत मुंबई इलाख्यात ६,३१,४१२ लोक मृत्यूमुखी.
: मुंबई, मध्यप्रांत व वऱ्हाडात दुष्काळामुळे अन्नधान्य टंचाई. मुंबई इलाख्यात बाजार लुटण्याचे प्रकार.

: नोव्हेंबर १ – मॉटेंग्यू-चेम्सफर्ड अहवालाच्या बाजूने मतप्रदर्शन करण्याकरिता सुरेंद्र बॅनर्जी यांनी मुंबईत नेमस्तांची राष्ट्रीय परिषद आयोजित केली. टी. बी. सप्रू व एम. आर. जयकर यांचा या परिषदेत सहभाग होता.

: नोव्हेंबर ११ – पहिल्या महायुद्धाची समाप्ती. युद्धकाळात भारतातून १ कोटी ४० लक्ष भारतीय स्वयंसेवकांचा सहभाग. ब्रिटिश सैन्यदलाच्या १७ % एवढे त्यांचे प्रमाण होते. युद्धात ६१ हजार भारतीय सैनिक ठार व ७० हजार सैनिक जखमी झाले.

: नोव्हेंबर – हिंदुस्थानातून परदेशात अन्नधान्याची निर्यात करण्यावर बंधने.

: हिंदुस्थानात वीजनिर्मितीसाठी राष्ट्रीय पातळीवर जलविद्युत सर्वेक्षण.

: बेझंट बाईंच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कलकत्त्याच्या कॉंग्रेस अधिवेशनात अस्पृश्यता निवारणाचा ठराव मंजूर.

: कोल्हापूर संस्थानात वतनदारी नष्ट करण्याचा कायदा.

: मुंबई शहरात ६१ संप.

: भारतीय नौदलात हिंदुस्थानी अधिकारी नियुक्तीस पात्र असल्याचे ठरविण्यात आले; मात्र नेमणुकीची प्रक्रिया इतकी संथ होती की, १९२८ पर्यंत दहा वर्षांत केवळ १७ भारतीय अधिकाऱ्यांची नौदलात नियुक्ती करण्यात आली.

: चिपळूण येथे परशुाम एज्युकेशन सोसायटी स्थापन.

: दादासाहेब फाळके यांचा 'श्रीकृष्णजन्म' मूक चित्रपट प्रदर्शित.

: पुण्यात गोखले गायन समाजाची स्थापना. श्री. शिवाजी मराठा सोसायटीची स्थापना.

: मुंबईत अ. ब. कोल्हटकर यांच्या 'संदेश' वृत्तपत्राचा प्रारंभ. पुण्यात वा. गो. आपटे यांच्या 'आनंद' मासिकाचा प्रारंभ.

: पुणे येथे १४ वे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष – बॅ. मुकुंदराव जयकर

: बालकवी ठोंबरे यांचे अपघाती निधन.

: मराठेशाहीच्या अस्ताला शंभर वर्षे पूर्ण. न. चिं. केळकर यांचे 'मराठे व इंग्रज' पुस्तक प्रसिद्ध.

: जानेवारी १९१७ ते ऑक्टोबर १९१८- महायुद्धात भारतीय सैनिकांची पॅलेस्टाइनला तुर्कांविरुद्ध मोठी कामगिरी.

: मुंबईस अस्पृश्यता निवारण परिषद'. अध्यक्ष : सयाजीराव गायकवाड; लो. टिळकांची उपस्थिती.

: डॉ. आंबेडकर यांची साऊथ बरो कमिशनपुढे साक्ष.

: ऑल इंडिया मराठा लीगची स्थापना.
: पुणे येथे शिवाजी मराठा सोसायटीची स्थापना. बाबूराव जगताप मुख्याध्यापक.
: बडोदे येथून भ. बा. पाळेकर यांचे 'जागृती' साप्ताहिक सुरू.
: लो. टिळक यांच्या अध्यक्षतेखाली कीर्तन संमेलन.
: शिर्डीचे साईबाबा समाधिस्त.
: इंग्लंडमध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार.
: मराठी भाषकांची नाग-विदर्भ निर्माण करण्याची मागणी.
: धोंडीराम ठेंगडी यांनी नागपूरला कामगार संघटना स्थापन केली.

१९१९ : जानेवारी - मुंबई शहरात कामगारांचे १८ संप. पैकी १५ दिवसांचा दीड लाख कामगारांचा मोठा संप. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात दोन कामगार ठार.

: लंडनच्या संसदेत सर एस. पी. सिन्हा या पहिल्या भारतीय अधिकाऱ्याची उपसचिव पदावर नियुक्ती.

: मार्च १८ – रौलट ॲक्ट. युद्धकाळात मार्शल लॉची तरतूद असणारा काळा कायदा. वृत्तपत्रांवर कडक निर्बंध. १९२२ साली हा कायदा मागे घेण्यात आला.

: एप्रिल १३ – जालियनवाला बाग हत्याकांड. ३७९ लोक ठार, १२०८ जखमी. पंजाबचा गव्हर्नर डायर याने मार्शल लॉ जारी केला.

: एप्रिल १६ – जालियनवाला बाग हत्याकांडाच्या पार्श्वभूमीवर रौलट ॲक्टच्या विरोधात गांधीजींचे संपूर्ण हिंदुस्थानात एक दिवसाचा हरताळ पाळण्याचे आवाहन.

: मे ३ ते २८ – तिसरे अँग्लो -अफगाण युद्ध.

: जून २८ – व्हर्सायचा तह. पहिले महायुद्ध संपल्यावर 'लीग ऑफ नेशन्स'ची स्थापना. तहावर भारताच्या व्हाईसरॉयची व संस्थापक सदस्य म्हणून बिकानेरच्या महाराजा गंगासिंग यांची स्वाक्षरी.

: सप्टेंबर – सिनफेन पक्षाची आयर्लंडमध्ये रणधुमाळी. रेल्वे कामगारांचा संप.

: सप्टेंबर – कलकत्त्याला काँग्रेसच्या खुल्या अधिवेशनात गांधीजींच्या 'स्वराज्य'लढ्याला ५ हजार सभासदांचा पाठिंबा. ब्रिटिश मालावर, ब्रिटिशांच्या शाळा, न्यायालये, निवडणुकांवर बहिष्कार घालून प्रशासन यंत्रणा ठप्प करण्याचा निर्णय.

: ऑक्टोबर – अमेरिकेत वॉशिंग्टन येथे आंतरराष्ट्रीय कामगार परिषद. परिषदेस हिंदुस्थानातील कामगारांचे प्रतिनिधित्व ना. म. जोशी यांनी केले.

: नोव्हेंबर २७ – लो. टिळक मायदेशी परतले.
: लो. टिळकांविरुद्ध 'चिरोल खटला', टिळकांविरुद्ध निकाल
: नोव्हेंबर २९ – मुंबईस गिरणी कामगारांनी टिळकांना मानपत्र अर्पण केले.
: डिसेंबर १८ – मद्रासमध्ये कामगार नेत्यांनी लो. टिळकांना मानपत्र दिले.
: डिसेंबर २३ – बादशहाचा जाहीरनामा. संस्थानिकांचे नरेंद्र मंडळ स्थापन करण्याची व राजकीय गुन्ह्यांची शिक्षा कमी करण्याचे धोरण.
: भारतीय मुस्लीमांची सर्वपक्षीय परिषद
: दादासाहेब फाळके यांचा 'कालियामर्दन' मूकपट प्रदर्शित.
: पुणे येथे १५ वे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष – चिं. वि. वैद्य
: पुण्याहून 'विजयी मराठा' या ब्राह्मणेतर चळवळीच्या वृत्तपत्राचा प्रारंभ
: पुण्याहून रा. द. पंत पराडकर संपादित 'लोकसंग्रह' व नागपूरहून म. कृ. पाध्ये संपादित 'उद्यम' नियतकालिकाचा प्रारंभ.
: म. गांधी यांनी 'यंग इंडिया' व 'नव जीवन' ही वृत्तपत्रे सुरू केली.
: अमळनेर येथे 'तत्त्वज्ञान मंदिर' स्थापन. सांगली येथे 'विलिंग्डन कॉलेज'ची स्थापना;
: सातारा येथे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या 'रयत शिक्षण संस्थे'ची स्थापना.
: कोल्हापूर येथे बाबूराव पेंटर यांची 'महाराष्ट्र फिल्म कंपनी' स्थापन. 'सैरंध्री' हा पहिला चित्रपट प्रदर्शित, स्त्री भूमिका स्त्रियांनीच करण्यास प्रारंभ.
: बालगंधर्व यांच्याकडे 'गंधर्व नाटक मंडळी'चे स्वामित्व.
: 'एकच प्याला', 'भावबंधन' या नाटकांचे पहिले प्रयोग, भा. वि. वरेरकर यांचे 'संन्याशाचा संसार' प्रसिद्ध.
: हरिभाऊ आपटे, राम गणेश गडकरी, रे. ना. वा. टिळक, डॉ. कीर्तिकर, ग. ज. आगाशे यांचे निधन.
: वि. ल. भावे यांचे 'महाराष्ट्र सारस्वत', वा. गो. आपटे यांचे 'सौंदर्य आणि ललितकला' ग्रंथ प्रसिद्ध.
: पॅरिस येथे शांतता परिषद.

१९२० : टिळकांनी 'लोकशाही काँग्रेस' पक्षाची स्थापना केली. तारा सिंग यांनी 'अकाली दला'ची स्थापना केली.
: खिलाफत चळवळीस प्रारंभ
: सांगली येथे श्री. कृ. कोल्हटकर यांच्या अध्यक्षतेखाली ज्योतिष संमेलन. लो. टिळकांची उपस्थिती.

: जानेवारी ३१ - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'मूकनायक' पाक्षिक सुरू केले.

: ऑगस्ट १ – मुंबई येथे लोकमान्य टिळक यांचे निधन.

: ऑगस्ट १ ते फेब्रुवारी १९२२ – गांधीजींच्या असहकार चळवळीला प्रारंभ. पहिल्या टप्प्यात जमीन महसूल भरण्यास नकार. साठ हजार सत्याग्रहींना तुरुंगवास.

: ऑगस्ट २४ – मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांचा संप. सेनापती बापटांनी पुण्याहून येऊन संपकऱ्यांचे नेतृत्व केले.

: ऑक्टोबर १७ –मानवेंद्र रॉय व त्यांची पत्नी एव्हलीन रॉय यांनी रशियात ताश्कंद येथे 'भारतीय कम्युनिस्ट पक्षा'ची स्थापना केली.

: ऑक्टोबर ३१- मुंबईत 'ऑल इंडिया ट्रेड युनियन कॉंग्रेस'ची स्थापना. मुंबईत लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली ट्रेड युनियन कॉंग्रेसचे पहिले अधिवेशन झाले.

: मुंबई शहरात ६३ संप.

: डिसेंबर १५ – मुळशी धरणाच्या विरोधात न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली मावळ्यांची जाहीर सभा.

: डिसेंबर – नागपूरला कॉंग्रेस अधिवेशन. अध्यक्ष – विजय राघवाचार्य. १४ हजार प्रतिनिधींनी एकमुखाने गांधीजींच्या सत्याग्रह चळवळीला पाठिंबा जाहीर केला गांधीजींनी ३१ डिसेंबर १९२१ पर्यंत 'स्वराज्य प्राप्ती'चे वचन दिले.

: ग्रामपंचायत कायदा.

: नवीन प्रांतिक कायदेमंडळ अस्तित्वात.

: अलीगड मुस्लीम विद्यापीठ स्थापन.

: कोल्हापूर येथे क्षात्र जगद्गुरू पीठाची स्थापना

: नागपूर येथे शाहू छत्रपती यांच्या अध्यक्षतेखाली अ.भा. बहिष्कृत परिषद.

: शाहू छत्रपती यांच्या पुढाकाराने 'ब्राह्मणेतर संघ' हा राजकीय पक्ष स्थापन.

: धार येथे मराठा शिक्षण परिषदेचे अधिवेशन.

: पुण्यात डॉ. केतकर व कु. कोहेन-शीलवती केतकर यांचा व्रात्यस्तोम विधीने विवाह.

: पुण्याहून शि. म. परांजपे संपादित 'स्वराज्य' पत्राचा प्रारंभ.

: किर्लोस्करवाडी येथून 'किर्लोस्कर खबर' मासिकाचा प्रारंभ.

: कृ. प्र. खाडिलकर यांनी मुंबईस 'लोकमान्य' पत्राचे संपादकत्व स्वीकारले;

'केसरी'चे संपादकत्व न.चिं. केळकर यांचेकडे.
: वाई येथे प्राज्ञ पाठशाळा मंडळाची स्थापना.
: पुणे येथे डॉ. श्री. व्यं. केतकर यांच्या 'ज्ञानकोश' निर्मितीचा प्रारंभ.
: पुण्याच्या भारतीय इतिहास संशोधक मंडळाचे त्रैमासिक सुरू.
: हैद्राबादहून 'निजाम विजय' साप्ताहिक सुरू.
: एच्. एम. व्ही कंपनी मार्फत गायनाच्या ध्वनिमुद्रिका प्रसृत करण्यास प्रारंभ.
: 'मनोरंजन'कार का. र. मित्र, कवी एकनाथ पांडुरंग रेंदाळकर, विष्णुबुवा जोग यांचे निधन.
: विनायकबुवा मसूरकर यांनी मसूर (सातारा) येथे ब्रह्मचारी आश्रम स्थापन केला.
: पुणे येथे १६ वे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष – वीर वामनराव जोशी.
: प्रस्तावित संविधानाच्या रचनेत देशभर भाषावार प्रांतरचनेचे तत्त्व स्वीकृत.
: मुंबई विद्यापीठाच्या बी. ए. शिक्षणक्रमात प्रादेशिक भाषांना स्थान.
१९२१ : जानेवारी १ – मॉटेंग्यू-चेम्सफर्ड सुधारणांच्या प्रस्तावास अनुसरून नवा "भारत प्रशासन कायदा' लागू झाला. या कायद्यामुळे प्रथमच द्विदल राज्यपद्धतीचा प्रयोग.
: नरेंद्र मंडळाची स्थापना.
: असहकार आंदोलन
: अहमदाबाद येथे राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन. अध्यक्ष – दास (तुरुंगात म्हणून हकीम अजमलखान); प्रांतिक काँग्रेस समित्यांची पुनर्रचना.
: मुळशी सत्याग्रह. विद्युतनिर्मिती प्रकल्पासाठीच्या धरणाला विरोध.
: भारतीय जनगणना. मुंबईची लोकसंख्या १ कोटी ९३ लाखांहून कमी.
: ऑगस्ट – मलबार किनाऱ्यावर सक्तीच्या धर्मांतराच्या प्रकारावरून मोपल्यांचे बंड. ब्रिटिश सरकारचा हस्तक्षेप, २००० ठार, ४५००० लोकांना तुरुंगवास.
: नोव्हेंबर १७ – ब्रिटनचा राजपुत्र प्रिन्स ऑफ वेल्सच्या भारतभेटीच्या प्रसंगी राष्ट्रीय सत्याग्रह. एका महिन्यात १४ हजार भारतीयांना तुरुंगवास.
: पुणे येथे टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, टिळक आयुर्वेद महाविद्यालय, महाराष्ट्रीय ग्रंथालय संघ स्थापन.
: पुणे येथे १७ वे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष – य. ना. टिपणीस
: नोव्हेंबर २६ - बडोदे येथे ११ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन. अध्यक्ष – नरसिंह चिंतामण केळकर, संमेलनात जप्त वाड्मय मुक्त करावे, भाषावार

प्रांतरचना व महाराष्ट्र विद्यापीठाची मागणी करणारे ठराव संमत.
: अ. वि. पटवर्धन संपादित 'संस्थानी स्वराज्य' साप्ताहिकाचा प्रारंभ.
: ल. रा. पांगारकर संपादित संत साहित्याला वाहिलेल्या 'मुमुक्षू' मासिकाचा प्रारंभ.
: रे. ना. वा. टिळक यांचे 'ख्रिस्तायन' प्रसिद्ध.
: बंगालात रवींद्रनाथ टागोर यांनी 'शांतिनिकेतन' व 'विश्वभारती' संस्था स्थापन.
: मालेगाव येथे हिंदू-मुसलमान दंगा.
: महादेवशास्त्री दिवेकर यांची 'आर्य संस्कृतीचा उत्कर्षापकर्ष' ही पुस्तिका जप्त.
: ग्वाल्हेर येथे 'मराठा शिक्षण परिषदे'चे अधिवेशन.
: वासुदेव बळवंत पटवर्धन, देवल सर्कसचे संस्थापक व्यंकटराव देवल यांचे निधन.
: काँग्रेसचा सर्व प्रांतांचे कामकाज व प्रकाशन स्थानिक भाषेतून करण्याचा निर्णय.
: दिनकरराव जवळकर यांना कोल्हापूर संस्थान सोडून जाण्याचा राजर्षी शाहू महाराजांचा आदेश .

१९२२ : फेब्रुवारी ५ ते ७ – गांधीजींच्या असहकार आंदोलनात सार्वत्रिक हिंसाचार. चौरी-चौरा हत्याकांडात २४ पोलीसांना ठार मारण्यात आले. गांधीजींनी चळवळ स्थगित करून १९२९ पर्यंत राजकारण संन्यास घेत असल्याची घोषणा केली.
: मार्च १० - असहकार आंदोलनात म. गांधींना अटक, ६ वर्षांची शिक्षा.
: एप्रिल – श्रीपाद अमृत डांगे यांची 'गांधी व्हर्सेस लेनीन' पुस्तिका प्रकाशित.
: मे ६ – राजर्षी शाहू महाराजांचे निधन.
: जुलै २०-२१ – कायदेभंग समितीसमोर न. चिं. केळकर यांची साक्ष.
: ऑगस्ट ४ – ब्रिटनचे पंतप्रधान लॉईड जॉर्ज यांचे लंडनच्या संसदेत ब्रिटिश नोकरशाही ही वसाहतवादी राजवटीची "पोलादी चौकट" (Steel frame) असून कुठल्याही परिस्थितीत भारताच्या जबाबदारीतून ब्रिटिशांना स्वत:ला मुक्त करवून घ्यावयाचे नाही, अशा आशयाचे भाषण.
: ऑगस्ट ५ – श्रीपाद अ. डांगे यांनी मुंबईहून 'सोशॅलिस्ट' साप्ताहिक सुरू केले.
: इंग्रज सरकारने महार बटालियनचे विसर्जन केले. अस्पृश्यांच्या लष्करभरतीवर बंदी.
: गया येथे राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन, अध्यक्ष: चित्तरंजनदास.

: पुणे येथे १८ वे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष – न्या. केशवराव कोरटकर
: पुणे येथे 'महाराष्ट्र शारदा मंडळा'ची स्थापना.
: भा. वि. वरेरकर यांचे 'सत्तेचे गुलाम' नाटक प्रसिद्ध.
: म. गांधींचे 'सत्याचे प्रयोग' आत्मकथन प्रसिद्ध.
: मुंबईत 'मौज सासाहिक' सुरू.
: शाहू छत्रपती, पंडिता रमाबाई, नटश्रेष्ठ गणपतराव जोशी, डॉ. पां. दा. गुणे, भास्करबुवा बखले, गायक रहिमत खॉं यांचे निधन.

१९२३: श्री. अ. डांगे व केशवराव जोगळेकर यांनी 'हिंदुस्थान लेबर पार्टी ऑफ इंडिया' पक्ष स्थापन केला. देशबंधू चित्तरंजनदास यांनी 'स्वराज्य पक्ष' स्थापन केला.
: 'स्वराज्य पक्षा'चे मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणुकांत २५ व मुंबई प्रांताच्या कायदेमंडळात २३ सदस्य निवडून आलेत. मोतीलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखालील कार्यगटाला व सी. आर. दास यांना कांही जागांवर यश मिळाले. महाराष्ट्रातील स्वराज्य पक्षाचे अध्यक्ष न. चिं. केळकर यांची मध्यभागामार्फत कायदेमंडळात निवड.
: मार्च ते सप्टेंबर – नागपूरला नाफेरवाद्यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह.
: ऑगस्ट – मदनमोहन मालवीय यांच्या अध्यक्षतेखाली अ. भा. हिंदू महासभेने राष्ट्रीय राजकारणात सक्रिय होण्याचा निर्णय घेतला.
ऑगस्ट ४ – मुंबई प्रांतांच्या कायदे मंडळात ब्राह्मणेतर पक्षाचे नेते सीताराम केशव बोले यांनी मांडलेला 'अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठे, धर्मशाळा, विद्यालये यात मुक्त प्रवेशा'चा ठराव संमत झाला.
: सार्वजनिक पाणवठे अस्पृश्यांना कायद्याने खुले; हिंदू महासभेचा अस्पृश्यता निवारणाचा ठराव.
: कोकोनाडा येथे राष्ट्रीय कॉंग्रेसचे अधिवेशन; अध्यक्ष – मौलाना महमदअली.
: व्हाईसरॉय लॉर्ड रिडिंग (कारकीर्द १९२१-१९२६) यांनी प्रथमच ICS परीक्षा एकाचवेळी दिल्ली आणि लंडन येथे घेण्याचे जाहीर केले.
: डिसेंबर २८ – डॉ. एन. एस. हर्डीकर यांनी 'हिंदुस्थान सेवादल' संघटना स्थापन.
: धुळे येथे 'न्यू प्रताप मिल्स' ची स्थापना.
: महाराष्ट्र फिल्म कंपनीचा दादासाहेब तोरणे दिग्दर्शित 'सिंहगड' हा तानाजी मालुसरे व शिवाजी महाराज यांच्या देशभक्तीवर मूक चित्रपट प्रदर्शित.
: आचार्य विनोबा भावे यांनी 'महाराष्ट्र धर्म' मासिक सुरू केले. कृ. प.

खाडिलकर यांनी मुंबईतून 'नवा काळ' वृत्तपत्र सुरू केले. सातारा येथून 'ऐक्य' साप्ताहिकाची सुरुवात.

: पुण्यात रविकिरण मंडळाची स्थापना.

: पुणे येथे १९ वे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष – श्री. नी. चापेकर

: नागपूर विद्यापीठाची स्थापना. नागपूरला 'विदर्भ साहित्य संघा'ची स्थापना.

: पुणे येथील शिवाजी मंदिरात शिल्पकार र. कृ. फडके यांनी तयार केलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पहिला अर्धपुतळा स्थापित.

: र. धों. कर्वे यांचे 'संततिनियमना'वरचे पुस्तक प्रकाशित.

१९२४ : कॉ. डांगे यांनी बोनसच्या प्रश्नावर मुंबईत कामगारांचा प्रचंड संप घडवून आणला.

: फेब्रुवारी २७ - हिंदुस्थान सरकारने श्रीपाद अमृत डांगे, मुझफर हुसेन, शौकत उस्मानी, नलिनी गुप्ता, सिंगारवेलु चेटियार, गुलाम हुसेन, एम. एन. रॉय व आर. सी. एल. शर्मा या आठ कम्युनिस्ट कार्यकर्त्यांवर इंग्लंडच्या बादशहाविरुद्ध कट रचल्याचा आरोप ठेवून कानपूर न्यायालयात खटला दाखल केला.

: जुलै २० - डॉ. आंबेडकर यांनी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' स्थापन केली.

: ऑक्टोबर ५ – खासेराव जाधव यांचे निधन.

: नोव्हेंबर – मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणुकीत काँग्रेसचे ४४ खासदार व अणे यांच्या काँग्रेस राष्ट्रीय पक्षाचे ११ खासदार निवडून आलेत.

: बेळगाव येथे राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन; अध्यक्ष – म. गांधी.

: कलकत्त्याचे शास्त्रज्ञ सत्येंद्रनाथ बोस आणि आइन्स्टाइन यांचा 'बोस आयन्स्टीन स्टॅटिस्टिक्स' हा शोधनिबंध प्रसिद्ध.

: सांगली येथे २० वे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष – बाबासाहेब घोरपडे.

१९२५ : महात्मा गांधींची निर्दोष मुक्तता.

: नोव्हेंबर १ – बंगालात 'मजूर स्वराज्य पक्षा'ची स्थापना. संस्थापक : हेमंतकुमार सरकार, कवी काझी नजरूल इस्लाम आणि मुझफ्फर अहमद.

: न. चिं. केळकर यांचा असेंब्लीच्या सभासदत्वाचा राजीनामा.

: दसऱ्याच्या मुहूर्तावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना.

: शिख गुरुद्वारा ॲक्ट; सर्व गुरुद्वारा एका मध्यवर्ती समितीच्या अखत्यारीत.

: कानपूर येथे राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन; अध्यक्ष – सरोजिनी नायडू

: शेतकऱ्यांच्या सावकारांकडून होणाऱ्या पिळवणूकीवर 'सावकारी पाश' चित्रपट

प्रदर्शित. बाबूराव पेंटर दिग्दर्शक. व्ही. शांताराम तरुण शेतकऱ्याच्या भूमिकेत.

१९२६ : जून १० – हिंदुस्थान सरकारने फ्रॅंक नॉईसच्या अध्यक्षतेखाली जकात मंडळ (टॅरिफ बोर्ड) स्थापन केले.

: नोव्हेंबर १- 'मजूर स्वराज्य पक्षा'चे 'अ. भा. कामगार शेतकरी पक्ष' असे नामांतर.

: डिसेंबर – गोहाटीस राष्ट्रीय कॉंग्रेसचे अधिवेशन.

: प्रतियोगी सहकार पक्षाची स्थापना. न. चिं. केळकर, श्री. अ. अणे, मुंजे, बॅ. जयकर यांचा पुढाकार.

: शेती समस्यांच्या अभ्यासासाठी रॉयल कमिशन स्थापन.

: मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणुकीत 'स्वराज्यवादी' आणि 'राष्ट्रवादी' पक्षांनी आघाडी घेतली. न. चिं. केळकर ले. असेंब्लीचे सदस्य.

: गोहत्ती येथे राष्ट्रीय कॉंग्रेसचे अधिवेशन; अध्यक्ष – श्रीनिवास अय्यंगार

: मुंबई येथे १२ वे अ. भा. मराठी साहित्यसंमेलन. अध्यक्ष – माधव विनायक किबे. महाराष्ट्र विद्यापीठ स्थापन करण्याबाबत ठराव. मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेतही पुणे येथे विद्यापीठ स्थापन करण्याची शिफारस.

: कोल्हापूर येथे २१ वे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष – दादासाहेब फाळके.

१९२७ : सायमन कमिशनची नियुक्ती.

: ब्रिटनमधील लेबर पार्टीकडून हिंदुस्थानला वसाहतीचे स्वराज्य देण्याची मागणी.

: जवाहरलाल नेहरू यांनी ब्रुसेल येथे साम्राज्यवादी परिषदेत सहभाग नोंदवला.

: मद्रास येथे राष्ट्रीय कॉंग्रेसचे अधिवेशन; अध्यक्ष – डॉ. अन्सारी. या अधिवेशनात वसाहतीच्या स्वराज्याऐवजी संपूर्ण स्वराज्याचे ध्येय घोषित करण्यात आले.

: फेब्रुवारी ८ - ग्रेट ब्रिटनमधील कम्युनिस्ट पार्टीचे फिलिप स्प्रॅट याने सच्चिदानंद विष्णु घाटे यांच्या सहकार्याने मुंबईत 'कामकरी शेतकरी पक्ष' स्थापन.

: मार्च १९-२० - महाड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली 'कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषदेचे' अधिवेशन व चवदार तळ्याचा सत्याग्रह.

: एप्रिल ३ - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'बहिष्कृत भारत' साप्ताहिक सुरू केले.

: मे १ – 'कामकरी व शेतकरी पक्षा'चे मुखपत्र साप्ताहिक 'क्रांति' मुंबईहून प्रसिद्ध

होऊ लागले. संपादक : शांताराम सावळाराम मिरजकर व जोगळेकर.

: मे २४ - श्रीपाद अमृत डांगे यांची तुरुंगातून सुटका.

: ऑगस्ट २८ – मुंबईत ब्राह्मणेतर पक्षाचे खास अधिवेशन.

: सप्टें. ०४ - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'समता समाज संघ' स्थापन केला.

: नोव्हें. २७ - म. फुले जन्मशताब्दी सोहळा,

: डिसें. २५-२७ - महाड येथे अस्पृश्यांची दुसरी सत्याग्रह परिषद

: पुणे येथे २२ वे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष – श्री, नी. चाफेकर

: पुणे येथे १३ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन. अध्यक्ष – श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

: 'नागपूर गिरणी मजदूर संघ' स्थापन.

१९२८ : फेब्रुवारी ३- मॉटेंग्यू-चेम्सफर्ड सुधारणांचे मूल्यमापन करण्यासाठी आलेल्या सायमन कमिशनचे भारतात राष्ट्रीय बहिष्कार व निदर्शनांनी त्यांचे स्वागत. ३० जूनला सायमन कमिशनचा अहवाल सादर.

: करवाढीविरोधात गांधीजींचा बार्डोलीत सत्याग्रह.

: एप्रिल २८ – श्रीधरपंत टिळक यांनी पुण्याच्या गायकवाड वाड्यात डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली समता संघाची स्थापना केली.

: मे २५ – पुणे येथे श्रीधरपंत टिळक यांची आत्महत्या.

: जून १६ – मुंबईचे गव्हर्नर लेस्ली विल्सन यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण केले.

: जुलै – पुणे येथे महाराष्ट्र विद्यापीठ संघाची स्थापना.

: ऑगस्ट ३० - समाजवादी स्वतंत्र भारताच्या उद्दिष्टपूर्तीसाठी नेताजी सुभाषचंद्र बोस आणि जवाहरलाल नेहरू यांनी काँग्रेसचा त्याग. गांधीजी राजकारणात पुन्हा सक्रिय.

: ऑगस्ट ३१ – लखनौला सर्वपक्षीय परिषदेत मोतीलाल नेहरू व टी. बी. सप्रू यांनी तयार केलेला राज्यघटनेचा मसुदा अर्थात 'नेहरू रिपोर्ट' स्वीकारण्यात आला. मात्र डिसेंबर महिन्यात झालेल्या बैठकीत बॅ. जिना यांचा नेहरू रिपोर्टमध्ये मुसलमानांना पुरेसे प्रतिनिधित्व नसल्याच्या मुद्द्यावरून सभात्याग . जिना यांनी आगाखान यांच्या सर्वपक्षीय मुस्लीम परिषदेचे सदस्यत्व पत्करले व स्वतंत्र मुस्लीम मतदार संघासाठी वचनबद्ध असल्याची घोषणा केली.

: सप्टेंबर २८ – क्रांतिकारक सूर्यसेन याचा चितगाव नौदलावर हल्ला; बंगाल व

उत्तरेत क्रांतिकारकांच्या हालचाली वाढल्या.

: कलकत्ता येथे राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन; अध्यक्ष – मोतीलाल नेहरू.

: पुणे येथे २३ वे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष – गिरिजाबाई केळकर

: ग्वाल्हेर येथे १४ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन. अध्यक्ष – माधव श्रीहरी अणे.

: जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्वपक्षीय संमेलनात एकभाषिक प्रांतांच्या पुनर्रचनेचा व प्रांतीय भाषेतून शिक्षण, रोजगार व कार्यालयीन कामकाज व्हावे, असा ठराव संमत.

: न. चिं. केळकर दिल्ली येथील दलितोद्धार परिषदेचे अध्यक्ष

: दिनकरराव जवळकर यांनी 'कैवारी' पत्र सुरु केले.

१९२९ : जागतिक मंदीचे घनदाट सावट.

: लाहोरला राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीचा ठराव.

; अध्यक्ष – जवाहरलाल नेहरू.

: मार्च २० -मिरत खटल्यात ३१ कम्युनिस्टांना अटक

: मार्च २९ – जिनांच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय मुस्लीम परिषदेचा १४ कलमी जाहीरनामा प्रसिद्ध; मुसलमानांसाठी स्वतंत्र मतदारसंघाच्या मागणीचा पुरस्कार.

: गिरणी कामगार युनियन – लाल बावट्याच्या संघटनेचा उदय.

: एप्रिल ८ – भगतसिंगाने दिल्लीच्या विधिमंडळावर बॉम्ब फेकला. उत्तर भारतात बॉम्ब तयार करण्याचे कारखाने सापडले.

: जुलै २३ – पुण्यात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली शेतकरी संघाची स्थापना. न. चिं. केळकरांचा पुढाकार.

: ऑक्टोबर ३१ – आयर्विन डिक्लरेशन – ब्रिटिश सरकारने प्रथमच भारताला 'वसाहतीचे स्वराज्य' प्रदान केले.राज्यघटनेच्या प्रश्नांची चर्चा करण्यासाठी गोलमेज परिषद भरविण्याची घोषणा. गांधीजींचे १४मागण्यांचे निवेदन सादर.

: नोव्हेंबर २ – काँग्रेससह विविध पक्षांनी आयर्विन डिक्लरेशनला संमती देणारा 'सर्वपक्षीय जाहीरनामा' प्रसृत केला.

: डिसेंबर २९-३१ – लाहोरच्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात जवाहरलाल नेहरूंच्या युवा गटाने 'आयर्विन डिक्लरेशन' आणि 'नेहरू कॉन्स्टिट्यूशन' ला नकार. 'संपूर्ण स्वराज्य', 'सविनय कायदेभंग' आणि 'गोलमेज परिषदेवर

बहिष्कार' या मुद्द्यांचा समावेश असलेला स्वतंत्र जाहीरनामा प्रसिद्ध केला.

: संपाचे वर्ष. कामगार तक्रार निवारण कायदा करण्यात आला.

: विवाहासंबंधी संमतीवयाचा कायदा. विवाहाच्या वेळी मुलीचे वय १४ वर्षे व मुलाचे वय १८ वर्षे असले पाहिजे.

: किसन फागुजी बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली दलित कामगारांची संघटना स्थापन.

: पुणे येथे २४ वे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष –(बालगंधर्व) नारायणराव राजहंस.

: बेळगाव येथे १५ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन. अध्यक्ष – शि. म. परांजपे.

१९३० : जागतिक महामंदी. ब्रह्मदेश, मलेशिया, सिलोनहून शेकडो भारतीय हिंदुस्थानात परतले. भारतीय अर्थव्यवस्था अडचणीत.

: अलाहाबादला सर महमद इकबाल (१८७७-१९३८) यांच्या अध्यक्षतेखाली मुस्लीम लीगचे वार्षिक अधिवेशन. मुसलमानांसाठी स्वतंत्र राष्ट्राची मागणी.

: जानेवारी २६ – काँग्रेसचा ब्रिटिशांपासून संपूर्ण मुक्तीचा- पूर्ण स्वराज्याचा- ठराव. स्वातंत्र्याचे घोषणापत्र वाचून पहिला 'पूर्ण स्वराज्यदिन' साजरा केला.

: फेब्रुवारी - कायदेभंगाची चळवळ. काँग्रेसच्या आदेशानुसार मध्यवर्ती कायदेमंडळ, मुंबई व मध्यप्रांत-वऱ्हाडच्या कायदेमंडळातील सभासदांचे राजीनामे.

: गांधीजींच्या सत्याग्रहात भाग घेऊ नये असे हैद्राबादच्या निजामाचे पत्रक.

: फेब्रुवारी ९ – वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस समितीच्या अध्यक्षपदी वीर वामनराव जोशी.

: फेब्रुवारी - शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली 'महाराष्ट्र काँग्रेस पक्ष' स्थापन.

: फेब्रुवारी ४ ते एप्रिल ३० – जीआयपी रेल्वे कामगारांचा संप

: मार्च २ – नाशिकच्या काळाराम मंदिरात डॉ. आंबेडकर यांचा मंदिरप्रवेश सत्याग्रह

: मार्च ७ – सरदार वल्लभभाई पटेल यांना अटक.

: मार्च १२ ते एप्रिल १५ – मिठाच्या सत्याग्रहाची दांडीयात्रा सुरू. म. गांधी, मोतीलाल नेहरू, जवाहरलाल नेहरू, व हजारो काँग्रेस कार्यकर्त्यांना अटक.

: एप्रिल – सोलापूर नगरपरिषदेच्या इमारतीवर तिरंगा फडकला. लष्करी कायदा जारी. गोळीबारात ९ जण ठार.

: एप्रिल ७ - न. चिं. केळकर यांचा ले. असेंब्लीच्या सभासदत्वाचा राजीनामा.

: मे १ – प्रतियोगिता सहकारी पक्षातर्फे नागपूरात स्वा. सावरकरांच्या जप्त वाङ्‌मयाचे जाहीर वाचन.

: मे १६ – वडाळ्याच्या मिठागारावर सविनय कायदेभंग करून धाड घालण्याच्या कार्यक्रमात स्त्रियांचा सर्वात मोठा सहभाग. कमलादेवी चट्टोपाध्याय यांना अटक.

: जुलै १० – पुसदजवळ बापूजी अणे यांच्या नेतृत्वाखाली जंगल सत्याग्रह. केशवराव हेडगेवारांचा सहभाग. १२ जुलैस डॉ. मुंजे यांनी कायदेभंग केला.

: जुलै २२ – अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर आणि अकोल्यात आषाढी एकादशीच्या मुहूर्तावर एकाचवेळी वीस-बावीस ठिकाणी जंगल सत्याग्रह.

: ऑगस्ट – नाशिक जिल्ह्यात बागलाण, कळवण तालुक्यात जंगल सत्याग्रह. ५ ऑगस्टच्या भिलवाड येथील जंगल सत्याग्रहात हजारो शेतकऱ्यांचा सहभाग.

: सप्टेंबर ५ – सातारा जिल्ह्यात बिळाशी गावात जंगल सत्याग्रह. खानदेशात ४२४ जंगल सत्याग्रहींना तुरुंगवास.

: सप्टेंबर २५ – पनवेलजवळ चिरनेर गावात शेतकऱ्यांच्या मोर्चावर गोळीबार; सात सत्याग्रहींचे बलिदान. ४७ सत्याग्रहींवर खटला. ११ जणांवर मामलेदार व पोलिसांच्या खुनाचा आरोप.

: सप्टेंबर – मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकांवर काँग्रेसचा बहिष्कार.

: खान अब्दुल गफार खान यांच्या नेतृत्वाखाली खिदमदगार संघटनेच्या पठाणांची कायदेभंगाची चळवळ.

: मुंबईत सहकारी तत्त्वावर देशातली पहिली विमाविषयक संस्था स्थापन.

: नोव्हेंबर १२ ते जानेवारी १९, १९३१ – लंडनला पहिली गोलमेज परिषद. पंचम जॉर्ज यांनी उद्‌घाटन केले. अध्यक्ष – रॅम्से मॅक्डोनाल्ड. ब्रिटिश संसदेचे प्रतिनिधी, १६ संस्थानिक व इतर लोकनेते अशा एकूण ८९ प्रतिनिधींचा सहभाग. त्यात महाराष्ट्रातून बॅ. जयकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ना. म. जोशी, बा. शि. मुंजे, अण्णासाहेब लठ्ठे , भास्करराव जाधव, श्रीपाद तांबे यांचा समावेश. काँग्रेस्चा गोलमेज परिषदेवर बहिष्कार.

: ब्राह्मणेतर पक्षात फूट; जेधे-जवळकर यांचा काँग्रेस प्रवेश.

: डिसेंबर – मानवेंद्रनाथ भारतात परत आले.

: डिसेंबर १२ – पुण्याच्या सत्याग्रहात बाबू गेनूचे परदेशी कापडाचे गठ्ठे वाहून नेणाऱ्या लॉरीखाली बलिदान.

: मुंबईच्या भेंडी बाजारात जातीय दंगल. पोलिस गोळीबारात ५ ठार, ५७ जखमी.

: चंद्रशेखर व्यंकटरमण यांना भौतिकशास्त्रातले 'रामण इफेक्ट' या संशोधनासाठी नोबेल पारितोषिक.

: शिवाजी महाराजांच्या तरुणपणीच्या धाडसी जीवनावर 'उदयकाल' हा चित्रपट प्रदर्शित. सेन्सॉर बोर्डाने आक्षेप घेतल्याने 'स्वराज्य-तोरण हे नाव बदलले.

: मुंबई येथे २५ वे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष –अनंत हरि गद्रे .

: मडगाव येथे १६ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन. अध्यक्ष – वामन मल्हार जोशी.

१९३१ : जानेवारी १२ – सोलापूरचे मल्लाप्पा धनशेट्टी, शिंदे, सारडा आणि अब्दुल रसूल कुर्बान हुसेन या चौघा राजबंद्यांना येरवडा तुरुंगात फाशी देण्यात आले.

: फेब्रुवारी ६ – मोतीलाल नेहरू यांचे निधन.

: मार्च १ – खंडेराव बागल यांचे कोल्हापूरात निधन

: मार्च ५ – गांधी-आयर्विन करारावर सह्या. गांधीजींनी 'कायदेभंगा'ची चळवळ थांबविण्याचे मान्य केले. काँग्रेसने गोलमेज परिषदेत सहभागी व्हायला संमती दिली.

: मार्च १६ – मुंबईत कम्युनिस्ट पुढारी बी. टी. रणदिवे यांनी गांधीजींच्या उपस्थितीत गांधी- आयर्विन कराराचा निषेध करून लाल बावटा फडकावला.

: मार्च २३ – भगतसिंग, राजगुरू, सुखदेव या क्रांतीवीरांना फाशी.

: मार्च ३१ – कराचीस वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन. डॉ. मेहमूद या नावाने एम. एन. रॉय यांची अधिवेशनाला हजेरी. 'हिंदुस्थान सेवादला'चे 'काँग्रेस सेवादल' असे नामांतर.

: मे २ व ३ – कुलाबा जिल्ह्यात शाहबाज येथे खासेसाहेब पवार यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई प्रांतिक ब्राह्मणेतर पक्षाचे ४ थे अधिवेशन.

: मे ९ – दिनकरराव जवळकर यांनी 'तेज' साप्ताहिक सुरू केले.

: मे - भोर संस्थानात प्रजा परिषदेचे अधिवेशन

: जून ६ – विठ्ठल रामजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बोरगावला वाळवे तालुका शेतकरी परिषद.

: जून २८ – सेनापती बापट यांची महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेसच्या अध्यक्षपदी निवड.

: जुलै २० – वासुदेव बळवंत गोगटे या पुण्याच्या फर्गसन महाविद्यालयाच्या

विद्यार्थ्याने हंगामी गव्हर्नर अर्नेस्ट हॉटसन यांचेवर गोळ्या झाडल्या. विद्यार्थ्यांनी 'वंदे मातरम्' च्या घोषणा दिल्या. वासुदेव गोगटे यास ८ वर्षे तुरुंगवासाची शिक्षा.

: सप्टेंबर ७ ते डिसेंबर १ – लंडनला दुसरी गोलमेज परिषद. काँग्रेसच्या वतीने एकमेव गांधीजींची उपस्थिती. अन्य सदस्यांमध्ये मुस्लीम लीगचे इकबाल, जिना, आगाखान; अस्पृश्यांचे प्रतिनिधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शिखांचे प्रतिनिधी मास्टर तारासिंग यांची उपस्थिती. संस्थानिकांनी संघराज्याऐवजी राज्यसंघाची (कॉन्फेडरेशन) मागणी केली; डॉ. आंबेडकर, श्रीनिवासन व एम. सी. राजा या दक्षिणेतल्या नेत्यांची अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी. गांधीजींनी युनायटेड स्टेट्सच्या रेडिओवरून भाषण करून भारतीयांच्या आकांक्षांना आंतरराष्ट्रीय पाठिंबा मागितला.

: ऑक्टोबर १२ – सेनापती बापट यांना ठाणे जिल्ह्यातील उंबरगाव येथे अटक; ७ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा.

: डिसेंबर – औंध संस्थानात प्रजापरिषदेच्या अधिवेशनात प्रातिनिधिक सभा स्थापन.

: आणीबाणीची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनात १० टक्के कपात.

: भारतीय जनगणना. मुंबई शहराची लोकसंख्या १९२१ नंतर १४ हजारांनी कमी होऊन ११,६१,४०० झाली.

: मुंबई महापालिकेत डॉ. आंबेडकर यांनी शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचा अस्पृश्य कामगारांचा संघ स्थापन केला.

: 'आलम आरा' पहिला बोलपट प्रसारित झाला.

: हैद्राबाद येथे १७ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन. अध्यक्ष – श्री. व्यं. केतकर

१९३२ : जानेवारी ४ – परदेशी कापडावर बहिष्कार घालणाऱ्या सविनय कायदेभंगाच्या दुसऱ्या फेरीत गांधीजींना अटक. एकूण ८० हजार सत्याग्रहींना तुरुंगवास.

: मे ३ – दिनकरराव जवळकर यांचे पुण्यात अकाली निधन.

: साखर उद्योगाला संरक्षण देणारे विधेयक मंजूर

: एडनला ब्रिटिश साम्राज्यांतर्गत भारताचा भाग म्हणून संलग्न करण्यात आले.

: ऑगस्ट १६ – ब्रिटिश पंतप्रधान रॅमसे मॅकडोनाल्ड यांनी भारताच्या विधिमंडळाच्या निवडणुकांसाठी मुस्लीम, शिख, ख्रिश्चन,अँग्लो इंडियन्स,

अनुसुचित जाती, युरोपियन्स, प्रांतिक व विशेष गट अशी जातीनिहाय स्वतंत्र मतदारसंघांची घोषणा केली. गांधीजींचे या निर्णयाच्या विरोधात २० सप्टेंबरपासून पुण्याला येरवडा जेलमध्ये उपोषण. हिंदू महासभेचाही या जातीय निवाड्याला प्रखर विरोध.

: ऑगस्ट १७ ते नोव्हेंबर ७ – लंडनच्या 'इंडियन लीग'ची हिंदुस्थानातल्या राजकीय परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी भारत भेट.

: सप्टेंबर २४ – अनुसूचित जातींसाठी स्वतंत्र मतदारसंघाऐवजी राखीव जागांची तरतूद सुचविणारा गांधी-आंबेडकर पुणे करार.

सप्टेंबर ३० – मुंबईत घनश्याम बिर्ला यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्यता निवारण संघ (हरिजन सेवक संघ) स्थापन.

: नोव्हेंबर १७ ते डिसेंबर २४ – लंडनला तिसरी गोलमेज परिषद काँग्रेस आणि मुस्लीम लीगमध्ये मतभेद झाल्यामुळे फिसकटली.

: १९३२ साली मुंबईत जातीय दंगलीत २१७ जणांचा मृत्यू व २७१३ जखमी.

: 'आयोध्येचा राजा' हा मराठी भाषेतला पहिला बोलपट प्रदर्शित झाला.

: कोल्हापूर येथे १८ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन. अध्यक्ष – महाराजा सयाजीराव गायकवाड

: मु. र. जयकर यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र युनिव्हर्सिटी कमिटीची स्थापना.

१९३३ : जानेवारी १० – नागपूरला मकरसंक्रांतीच्या मेळाव्यात सरसंघचालक हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही जातीय किंवा राजकीय संघटना नसल्याची ग्वाही दिली.

: 'द रॉयल इंडियन एअरफोर्स'ची स्थापना

: एप्रिल – हिंदुस्थान सरकारने ब्रिटनव्यतिरिक्त अन्य देशांतून येणाऱ्या कापडावर ७५ टक्के शुल्क आकारण्यास सुरुवात केली.

: जुलै ७-८ – मुंबईत शिक्षणविषयक परिषद; महाराष्ट्र विद्यापीठ स्थापनेबाबत बॅ. जयकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाचे राज्यपालांना निवेदन.

: नागपूर येथे १९ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन. अध्यक्ष – कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर.

: मुंबई येथे २६ वे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष – ना. रा. बामणगावकर

: डिसेंबर ९ – मुंबईचे गव्हर्नर सर फ्रेडरिक साइक्स पाच वर्षांची कारकीर्द संपवून विलायतेस परतले; त्यांच्या जागी लॉर्ड ब्रेबर्न गव्हर्नरपदी रूजू झाले.

१९३४ : 'द रॉयल इंडियन नेव्ही'ची स्थापना.

: चंद्रशेखर व्यंकट रमण यांनी 'इंडियन अकादेमी ऑफ सायन्स'ची स्थापना केली.

: जानेवारी १६ – बिहारला मोठा भूकंप. जनजीवन विस्कळीत.

: मध्यवर्ती कायदेमंडळासाठी अधिकृत निवडणूक. भारतीय महिलांना प्रथमच मताधिकार. कॉंग्रेसला बहुमत.

: जानेवारी २८ – मुंबईत कानपूरचे हरिहरनाथ शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली अ. भा. कापड गिरणी कामगारांची परिषद.

: फेब्रुवारी १५ – सोलापूरात कापड गिरणी कामगारांचा संप.

: एप्रिल ते मार्च १९३५ – मुंबई सरकारने आणीबाणीत वापरावयाच्या विशेषाधिकाराच्या कायद्याचा कालावधी वाढवला.

: मे १७ –आचार्य नरेंद्र देव यांच्या अध्यक्षतेखाली कॉंग्रेसमध्ये जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस, मानवेंद्रनाथ रॉय यांनी समाजवादी गटाची स्थापना केली.

: मे १८ ते २० – पाटणा येथे अ. भा. कॉंग्रेस समितीने सविनय कायदेभंग चळवळ मागे घेऊन कायदेमंडळात रितसर प्रवेश करण्याचे धोरण ठरविले.

: जुलै १ – 'महाराष्ट्र समाजवादी कॉंग्रेस' पक्षाची स्थापना.

: जुलै २७ – हिंदुस्थान सरकारने हिंदुस्थानातील कम्युनिस्ट पक्ष बेकायदा ठरविला.

: जुलै २८ – कॉंग्रेसचे जातिविषयक धोरण अमान्य झाल्यामुळे पं. मदनमोहन मालवीय व श्री. माधवराव अणे यांचे कॉंग्रेसमधील आपापल्या जागांचे राजीनामे.

: ऑगस्ट २ – बनारस येथे म. गांधी यांनी आपल्या हरिजन दौऱ्याची समाप्ती केली.

: ऑगस्ट ५ – शंकरराव देव यांनी सासवडला आश्रम स्थापन केला.

: ऑगस्ट ६ – लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे बंगालमधील क्रांतिकारकांविरुद्ध बील पास.

: ऑगस्ट ७ – वर्धा येथे म. गांधी यांचे साप्ताहिक उपोषण सुरू.

: सप्टेंबर ७ – पुणे येथे सर अकबर हैदरी यांच्या अध्यक्षतेखाली मुस्लीम परिषद.

: सप्टेंबर ९ – कामगार नेते ना. म. जोशी मजूर परिषदेकरिता जिन्हिवा येथे गेले.

: सप्टेंबर १७ – म. गांधी यांनी कॉंग्रेसने आपल्या अटी मान्य केल्या नाहीत तर आपण कॉंग्रेसचा त्याग करू अशा आशयाचे निवेदन प्रसिद्ध केले.

: सप्टेंबर २३ – लोकशाही स्वराज्य पक्षाने कॉंग्रेसशी केलेला ठराव रद्द केला.

: सप्टेंबर २४ – पुणे येथे बॉंब स्फोटाच्या खटल्याचा निकाल. लिमये व सुखटणकर यांना अनुक्रमे दीड व अडीच वर्षांची शिक्षा.

: सप्टेंबर २८ – पुणे येथे गोखले हॉलचे उद्घाटन. हस्ते कावसजी जहांगीर.

: सप्टेंबर ३० – बनारस येथे कॉंग्रेस सोशॅलिस्ट परिषद सुरू.

: ऑक्टोबर ४ – बडोदा येथे संपतराव गायकवाड यांचे निधन.

: ऑक्टोबर ६ – मुंबई येथे मुंबई व उपनगर जिल्ह्यांचे साहित्य संमेलन श्री.अर्जुनराव केळुस्कर यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

: ऑक्टोबर १२ – नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे बंधू श्री. शरच्चंद्र बोस लेजिस्लेटिव्ह असेंब्लीकरिता बिनविरोध निवडून आले.

: ऑक्टोबर १५ – सोलापूर येथे भूकंपाचे धक्के.

: ऑक्टोबर – मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणुका. मुंबई शहरातील मुसलमानांसाठी राखीव मतदारसंघातून बॅ. जिना यांची बिनविरोध निवड.

: ऑक्टोबर – राजेंद्रप्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत राष्ट्रीय कॉंग्रेसचे अधिवेशन. अधिवेशनानंतर कॉंग्रेसचे औपचारिक सदस्य रहाणार नसल्याचा गांधीजींचा निर्धार.

: बडोदे येथे २० वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन . अध्यक्ष – ना. गो. चापेकर

१९३५ : जानेवारी १३- महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेसच्या अध्यक्षपदी शंकरराव देवांची फेरनिवड.

: एप्रिल १- हिंदी रिझर्व बॅंकेची सुरुवात.

: दे. भ. नरीमन मुंबई कॉर्पोरेशनचे मेयर झाले.

: ४ - पुणे म्युनिसिपालिटीच्या असेंब्ली इमारतीवर राष्ट्रीय निशाण व जुन्या इमारतीवर भगवा झेंडा उभारण्याचा समारंभ.

: ऑगस्ट २ - ब्रिटिश सरकारने 'गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट' मंजूर केला. या कायद्यात प्रांतांना स्वायत्तता देण्याची तरतूद.

: सप्टेंबर ४ – जवाहरलाल नेहरू यांची तुरुंगातून सशर्त सुटका.

: डिसेंबर ७ – मुंबई प्रांतिक भूतारण बॅंकेची स्थापना.

: प्रेमचंद यांची 'गोदान' ही प्रसिद्ध वाङ्मयकृती प्रसिद्ध.

: इंदूर येथे २१ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन. अध्यक्ष – भवानराव श्रीनिवास पंतप्रतिनिधी

: पुणे येथे २७ वे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष – गोविंदराव टेंबे.

१९३६ : फैजपूर काँग्रेस. खेड्यात भरलेले पहिले अधिवेशन. पं. नेहरू अध्यक्ष. अधिवेशनात मानवेंद्रनाथ रॉय व जवाहरलाल नेहरू यांनी 'घटना परिषदे'ची कल्पना मांडली.

: मे - भारतमंत्र्यांची एप्रिल १९३७ पासून हिंदुस्थानला प्रांतिक स्वायत्तता देण्याची घोषणा.

: डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'स्वतंत्र मजूर पक्ष' स्थापन केला.

: मुंबईत भायखळ्याला जातीय दंगलीत ९४ ठार, ६२२ जखमी.

: प्रागतिक लेखक संघ स्थापन.

: जळगाव येथे २२ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन. अध्यक्ष – माधव ज्यूलियन.

: पुणे येथे २८ वे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष – शं. प. जोशी.

१९३७ : फेब्रुवारी २० –१९३५ च्या कायद्यानुसार हिंदुस्थानात प्रथमच प्रांतिक विधानसभा निवडणुका. काँग्रेसला सर्वाधिक ७० टक्के मतदारांची पसंती. मुस्लीम लीगला फारशी मते मिळाली नाहीत.

: मार्च १२ – मुंबई प्रांताच्या पंतप्रधानपदासाठी पक्षनेता म्हणून बाळासाहेब खेर यांची काँग्रेसकडून निवड ; मात्र खेर यांनी मंत्रिमंडळ बनविण्यास नकार दिल्यावर कपूर- कांबळी यांच्या कामचलाऊ मंत्रिमंडळाने अधिग्रहण केले. बाळासाहेब खेर यांनी अविश्वासाचा ठराव मांडल्यावर हे मंत्रिमंडळ गडगडले.

: एप्रिल १ – भारताची ११ प्रांतात प्रशासकीय पुनर्रचना. ब्रह्मदेश व एडनला स्वतंत्र ब्रिटिश वसाहतीचा दर्जा. प्रांतनिहाय स्व-प्रशासनाची योजना लागू. महिला व अस्पृश्यांना मताधिकार. ७ प्रांतात काँग्रेसची सत्ता स्थापन. प्रांतिक न्यायालये स्थापन.

: जून १ ते ३ – हैद्राबाद संस्थानात 'परतुड' येथे गोविंदराव नानल वकील यांच्या अध्यक्षतेखाली निजाम प्रांतीय महाराष्ट्र परिषद.

: ऑगस्ट २ - मुंबई इलाख्यात बाळासाहेब खेर यांच्या काँग्रेस मंत्रिमंडळाचे सत्ताग्रहण.

: सप्टेंबर ४ – श्रीपाद अमृत डांगे यांचे 'क्रांती' साप्ताहिक पुन्हा सुरु.

: सप्टेंबर २४ – सत्याग्रह मंडळ स्थापन करण्यासाठी हैद्राबादला गेलेल्या सेनापती बापट यांना निजामाने पकडून पुण्यात आणून सोडले.

: ऑक्टोबर – मुस्लीम लीगला मिळालेल्या अपयशामुळे जिनांनी पुढची १० वर्षे मुसलमानांची राष्ट्रीय संघटना बांधण्याचा देण्याचा संकल्प सोडला व

मुसलमानांसाठी स्वतंत्र राष्ट्रप्राप्तीच्या ध्येयप्राप्तीच्या दिशेने मार्गक्रमणा सुरू केली.

: ऑक्टोबर : नथुभाऊ पारोळेकर यांच्या अध्यक्षतेखाली 'संयुक्त खानदेश मजूर फेडरेशन'ची स्थापना.

: ऑक्टोबर १९ – मुंबई प्रांतात खेर मंत्रिमंडळाने कम्युनिस्टांवरील सर्व निर्बंधने रद्द केली.

: नागपुरात कम्युनिस्ट पक्षाची शाखा सुरू.

: ऑक्टोबर २४ – हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसतर्फे ५३५ जणांनी सत्याग्रह केला.

: मुंबईच्या कामाठीपुरा भागात झालेल्या जातीय दंगलीत ११ ठार, ८५ जखमी. अहमदनगर, नंदुरबार, धरणगाव येथेही जातीय दंगली झाल्या.

: कर्णावती (अहमदाबाद) येथे हिंदू महासभेचे वार्षिक अधिवेशन. स्वा. सावरकर अध्यक्ष, त्यानंतर सहा वर्षे सावरकर हेच अध्यक्ष.

: संपत्ती हक्क कायदा - हिंदू विधवांना वारसाहक्काखाली संपत्तीचा अधिकार,

: 'प्रभात' फिल्म कंपनीच्या 'संत तुकाराम' या मराठी चित्रपटाचा व्हेनिस चित्रपट महोत्सवात बहुमान.

: म. गांधींची वर्धा शिक्षण योजना व मूलोद्योग शिक्षण योजनेचा प्रारंभ.

१९३८ : जानेवारी १५ – महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेसच्या अध्यक्षपदी केशवराव जेधे यांची निवड.

: फेब्रुवारी १० – आनंद कृष्ण वाघमारे यांनी पुण्याहून 'मराठवाडा' साप्ताहिक प्रकाशित करावयास सुरुवात केली.

: फेब्रुवारी १८- १९ – हरिपुरा येथे कॉंग्रेसचे अधिवेशन. अध्यक्ष : सुभाषचंद्र बोस.

: सप्टेंबर २ – खेर मंत्रिमंडळाने कामगारांना संपाचा हक्क नाकारणारा कायदा केला.

: सप्टेंबर १० – धुळ्याला साने गुरुजींचे गिरणीमालकाच्या टाळेबंदीविरोधात उपोषण.

: ऑक्टोबर १ - मध्यप्रांत-वऱ्हाडच्या विधानसभेत सर्व मराठी भाषक जिल्ह्यांचा 'महाविदर्भ' नावाचा स्वतंत्र प्रांत निर्माण करण्याची मागणी करणारा ठराव संमत.

: ऑक्टोबर २० – नागपूरात केशवराव जेधे यांच्या अध्यक्षतेखाली मध्यप्रांत-वऱ्हाड ब्राह्मणेतर परिषदेचे ९ वे अधिवेशन. ब्राह्मणेतर पक्षाने कॉंग्रेसशी

एकजीव होऊन देशसेवेचा निर्णय घेतल्याने ब्राह्मणेतर पक्षाचा अस्त.

: हैद्राबाद संस्थानात आर्य समाजाची मुसलमानांच्या धर्मांतर मोहिमेची प्रतिक्रिया म्हणून दहा महिने शुद्धीकरणाची मोहिम.

: ऑक्टोबर ११ – हैद्राबादेतील हिंदू नागरी स्वातंत्र्य संघास मदत करण्यासाठी लो. टिळकांचे नातू गजानन विश्वनाथ केतकर यांनी पुण्यात 'हिंदू नि:शस्त्र प्रतिकार मंडळ' स्थापन केले.

: ऑक्टोबर १५ : स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे मराठी साहित्य संमेलनात विदर्भासह एकछत्री सलग मराठी राज्याच्या मागणीचा ठराव.

: नोव्हेंबर ७ – महाराष्ट्रात कामगारांचा एक दिवसाचा सार्वत्रिक संप.

: नोव्हेंबर १२ – जतचे राजे डफळे यांनी कायदेमंडळ स्थापन केले. डिसेंबरात गंगाधरराव देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली पहिली प्रजापरिषद.

: नोव्हेंबर १३ – औंधचे राजे बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांची 'ग्रामस्वराज्या'ची घोषणा. ग्रामराज्य पद्धतीची नवी राज्यघटना २१ जानेवारी १९३९ पासून अमलात.

: मुंबईतल्या जातीय दंगलीत १४ ठार, ९८ जखमी. १९ ऑगस्टला चिपळूणला जातीय दंगल.

: काँग्रेसच्या ध्येयधोरणांशी सुसंगत असा हिंदुस्थान मजदूर संघ स्थापन.

: मुंबई येथे २३ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन. अध्यक्ष – वि. दा. सावरकर

: पुणे येथे २९ वे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष – भा. वि. वरेरकर

१९३९ : मार्च ११ – खानदेशात 'पाळधी' येथे जातीय दंगल.

: मार्च २७ – प्रजा परिषदेचे संस्थापक अध्यक्ष माधवराव बागल यांच्यावर खटला, दोन वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा. १८ डिसेंबर १९४० ला मुक्तता.

: मार्च २९ - कोल्हापूरच्या महाराजांनी 'कोल्हापूर संस्थान प्रजापरिषद' बेकायदा ठरविली.

: एप्रिल १५ – सांगलीजवळ कुपवाड येथे डॉ. पट्टाभी सीतारामय्या यांच्या अध्यक्षतेखाली कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेचे अधिवेशन. महाराजांची संमती.

: एप्रिल २९ - सुभाषचंद्र बोस यांची त्रिपुरी काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड; मात्र गांधीजींशी मतभेद झाल्याने सुभाषचंद्रांचा राजीनामा..

: मे ३ – नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी फॉरवर्ड ब्लॉक पक्ष स्थापन केला. काँग्रेस कार्यकारिणीने सुभाषबाबूंना बंगाल प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून काम करण्यास अपात्र ठरविले, तसेच तीन वर्षांसाठी कुठलीही निवडणूक लढविण्यास बंदी घातली.

: जुलै ११ – हैद्राबादच्या निजामाने राजकीय सुधारणांची घोषणा केली. त्यानंतर १ ऑगस्टला आर्य समाज व हिंदू महासभेने आंदोलन थांबविले.

: सप्टेंबर ३ - दुसऱ्या महायुद्धास सुरुवात. व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांची आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाल्याची घोषणा. काँग्रेसने युद्धामागची भूमिका आणि तत्त्वज्ञान काय आहे, त्याचा खुलासा करण्याची मागणी केली.

: ऑक्टोबर ३ – मुंबई प्रांताच्या कायदेमंडळात कुळकायदा पारित. मात्र गव्हर्नरने मान्यता न दिल्याने अंमलबजावणी नाही.

: ऑक्टोबर १७ – व्हाइसरॉयने भारत ही ब्रिटनची वसाहत असल्याने ब्रिटनच्या बाजूने युद्धात उतरणे ही स्वाभाविक गोष्ट असल्याचा खुलासा केला; शिवाय युद्धानंतर १९३५ च्या भारत सरकार कायद्यात बदल होऊ शकतो, असे सूचित केले.

: ऑक्टोबर २२ - काँग्रेसने ब्रिटनला कोणत्याही प्रकारचा पाठिंबा न देण्याचा निर्णय घेतला. ३१ ऑक्टोबरपर्यंत काँग्रेस मंत्रिमंडळांनी राजीनामे द्यावेत असा आदेश देण्यात आला व हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याची मागणी केली.

: ऑक्टोबर २५ - मुंबई विधानसभेने शेतकरी कर्ज निवारण विधेयक संमत केले.

: भगतसिंगास फाशी.

: डिसेंबर २२ - मुस्लीम लीगने काँग्रेसपासून मुक्त झाल्याचा 'मुक्ती-दिन' साजरा केला व ब्रिटिश युद्धाला आपला विरोध नसल्याचे जाहीर केले.

: अहमदनगर येथे २४ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन. अध्यक्ष – द. वा. पोतदार

: नागपूर येथे ३० वे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष – त्र्यं. सी. कारखानीस.

: डेक्कन कॉलेज पदव्युत्तर संशोधन संस्थेची स्थापना, समाजशास्त्र व मानसशास्त्र विषयांचे विभाग सुरू.

१९४० : जानेवारी २६ - स्वातंत्र्यदिन साजरा.

: जानेवारी २८- मुंबई येथे संयुक्त महाराष्ट्र सभेची स्थापना.

: फेब्रुवारी १५ - महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसच्या अध्यक्षपदी न. वि. गाडगीळ यांची फेरनिवड.

: फेब्रुवारी ते एप्रिल – मुंबईत महागाईच्या प्रश्नावरून ६० कापड गिरण्यांतले कामगार संपावर; सोलापूरात हातमाग उद्योगातील मजुरांचा व नागपूरच्या मॉडेल गिरणी कामगारांचा संप. भारत संरक्षण कायद्याखाली मुंबईत श्रीपाद डांगे, बी. टी. रणदिवे, मिरजकर या कम्युनिस्ट नेत्यांना अटक. मुंबईत २९ मार्चला कामगारांवर गोळीबार. १२ एप्रिलला गिरणी कामगारांचा संप मागे.

: मार्च १८ ते २० – बिहारमध्ये रामगड येथे मौलाना अब्दुल कलाम आझाद यांच्या अध्यक्षतेखाली कॉंग्रेसचे वार्षिक अधिवेशन.

: मार्च २३ – लाहोरला मुस्लीम लीगचा स्वतंत्र पाकिस्तान प्राप्त करण्याचा संकल्प. गांधीजींचा फाळणीच्या प्रस्तावाला प्रखर विरोध.अखंड भारतासाठी कॉंग्रेसची आग्रही भूमिका. १९४० च्या राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अधिवेशनासाठी मौलाना आझाद यांची अध्यक्षपदी निवड करून हिंदू--मुस्लीम ऐक्याचा प्रतिकात्मक संदेश.

: एप्रिल १५ ते १८ – वर्धा येथे कॉंग्रेस कार्यकारिणीच्या सभेत पक्षात महिला विभाग सुरू करण्याचा निर्णय.

: एप्रिल २९ – सांगली संस्थान प्रजापरिषदेचे शहापुरात अधिवेशन.

: मे २४ – पुण्यात महाराष्ट्र एकीकरण परिषद.

: जून १८ – सुभाषचंद्र बोस यांचे रामभाऊ रुईकर यांच्या मदतीने अ. भा. फॉर्वर्ड ब्लॉकचे दुसरे अधिवेशन.

: जून २१ – राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. हेडगेवार यांचे निधन; त्यांचे उत्तराधिकारी म्हणून संघाची सूत्रे गोळवलकर गुरुजींकडे.

: जून २७ – सिमल्यात व्हाइसरॉय लिनलिथगोंचे जिना यांना मुस्लीम लीगच्या संमतीशिवाय ब्रिटिश हंगामी सरकार वा घटना मान्य करणार नसल्याचे आश्वासन.

: जुलै २ – नेताजी सुभाषचंद्र बोस यांना अटक व फॉरवर्ड ब्लॉक पक्षावर बंदी. यानंतर १९४१ साली सुभाषचंद्र बोस यांचे जर्मनीला पलायन व तेथून रेडिओप्रसारणाद्वारे भारतीयांना ब्रिटिश सत्तेविरुद्ध क्रांती करण्याचे आवाहन.

: ऑगस्ट ८ – व्हाइसरॉय लिनलिथगो यांची 'ऑगस्ट ऑफर'. युद्धानंतर भारतीयांना कार्यकारी परिषदेत जादा प्रतिनिधित्व; मुसलमान व अल्पसंख्यांकांना संरक्षण देण्याचे आश्वासन.

: ऑगस्ट १८ – वर्धा येथे बॅ. रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली महाविदर्भ सभेची स्थापना.

: ऑक्टोबर ११ ते १३ – वर्धा येथे काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत गांधीजींची युद्धविरोधी व्यक्तिगत सत्याग्रहाची घोषणा.पहिले सत्याग्रही म्हणून विनोबा भावे यांची निवड . सविनय कायदेभंगाच्या तिसऱ्या फेरीत जवाहरलाल नेहरू यांच्यासह २० हजार सत्याग्रहींना अटक.

: डिसेंबर - मानवेंद्रनाथ रॉय यांनी मुंबईत 'रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्षा'ची स्थापना.

: डिसेंबर ५ – सुभाषचंद्र बोस यांची कलकत्ता कारागृहातून सुटका व रहात्या घरी स्थानबद्ध.

: शीख व अस्पृश्य यांना व्हॉइसरॉयच्या कार्यकारिणीत प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे अशी सावरकरांची सरकारला आग्रहाची विनंती.

: रत्नागिरी येथे २५ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन. अध्यक्ष – ना. सी. फडके

: नाशिक येथे ३१ वे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष – गणपतराव बोडस

१९४१ : जानेवारी १७ - सुभाषचंद्र बोस यांचे कलकत्त्याहून पलायन व पेशावरमार्गे २एप्रिलला बर्लिन. आझाद हिंद नभोवाणीवरून भारतीयांना ब्रिटिशांविरुद्ध लढण्याचे आवाहन.

: जानेवारी ते मे - पूर्व आफ्रिकेत इटालियन सैन्यदलाच्या विरोधात भारतीय सैनिकांच्या दोन तुकड्या पाठविण्यात आल्या.

: फेब्रुवारी: हिंदुस्थान सरकारने साखर सल्लागार मंडळ स्थापन केले. महाराष्ट्राचा एकही प्रतिनिधी घेतला नाही.

: मार्च २४ – वसंतदादा पाटील यांना वैयक्तिक सत्याग्रहात सहा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा.

: जून २१ – वालचंद ग्रुपच्या 'सिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनी'च्या नौकाबांधणी उद्योगाचा विशाखापट्टणम् येथे डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते शिलान्यास.

: जून २२ – हिटलरचा रशियावर हल्ला.

: ऑगस्ट १६ – डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सिन्नरच्या परिषदेत वतनदार महार व मातंग यांनी महार वतनाच्या जमिनीवर सरकार वसूल करीत असलेली जुडी (कर) देऊ नये व वतनजमिनीचा ताबाही सोडू नये असे आवाहन केले.

: ऑगस्ट १४ – अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन रूझवेल्ट आणि ब्रिटनचे पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांनी दुसऱ्या महायुद्धानंतरच्या आंतरराष्ट्रीय राजकारणाची दिशा स्पष्ट करणारे ॲटलान्टिक चार्टरचे घोषणापत्र जारी केले.

गुलाम राष्ट्रांना स्वातंत्र्य प्रदान करणे, लष्करी बळाचा वापर टाळणे, व्यापारावरील निर्बंध उठवणे, सामाजिक-आर्थिक सुधारणांसाठी वैश्विक सहकार्य वाढविणे, भयमुक्त समाज निर्माण होण्यासाठी प्रयत्न करणे इत्यादी मुद्द्यांचा त्यात समावेश होता.

: सप्टेंबर – महारांना लष्करात प्रवेश देण्याची व महारांची रेजिमेंट उभारण्याची इंग्रज सरकारची घोषणा

: ऑक्टोबर २३ ते २८: मुंबईत जातीय दंगलीत १५ ठार, ४० जखमी.

: नोव्हेंबर – हिंदुस्थान सरकारने सर्वच उद्योगधंद्यांतील संप आणि टाळेबंदी यांना मनाई करणारा हुकूम काढला.

: नोव्हेंबर १८ – कोल्हापूरच्या महाराणी ताराबाईंना प्रतापसिंह या १ वर्षाच्या बालकास दत्तक घेण्यास हिंदुस्थान सरकारची परवानगी. दत्तकविधान होऊन दत्तकपुत्राचे नामकरण सहावे शिवाजी असे ठेवण्यात आले.

: डिसेंबर ७ – जपानचा अमेरिकेच्या पर्ल हार्बर या नाविक तळावर हल्ला. त्यात अमेरिकेची १८८ विमाने नष्ट , २४०२ लोक ठार, १२८२ जखमी. हल्ल्याचा बदला म्हणून अमेरिका अधिकृतपणे दुसऱ्या महायुद्धात उतरली.

: जनगणना अहवाल – मुंबई प्रांताची लोकसंख्या २,९५,०६,९६८; पैकी ग्रामीण भागात ६८.९ टक्के म्हणजे २,४७,८५,९०१ लोकसंख्या. मध्यप्रांत-वऱ्हाडाची लोकसंख्या १,९१,३१,६१५, पैकी ग्रामीण भागात ८६.५ टक्के म्हणजे २,४७,८५,९०१ लोकसंख्या. नागपूरची लोकसंख्या ३ लाख.

: पक्षीय राजकारणापासून अलिप्त राहून जातिधर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचा पुरस्कार करणारी तरुणांची 'राष्ट्रसेवादल' ही संघटना स्थापन. शिरुभाऊ लिमये आणि वि. म. हर्डीकर यांचा पुढाकार. एस. एम. जोशी यांची दलप्रमुख म्हणून निवड.

: सोलापूर येथे २६ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन. अध्यक्ष : वि. स. खांडेकर

: मुंबई येथे ३२ वे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष – प्र. के. अत्रे.

१९४२: जानेवारी २ - नेमस्त नेते तेजबहादूर सप्रू, बॅ. जयकर, श्रीनिवास शास्त्री इ. १२ जणांनी भारताला 'वसाहतीचे स्वराज्य' देऊन राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याची विनंती केली.

: फेब्रुवारी १५ – सिंगापुरात ब्रिटिश सैन्याची जपानी सैन्यासमोर शरणागती. ८० हजार भारतीय, ब्रिटिश व ऑस्ट्रेलियन सैनिक युद्धबंदी . जपानचे कैदी बनलेले हजारो सैनिक आझाद हिंद फौजेत सामील झाले.

: जपानी विमाने बॉबहल्ले करतील या भीतीने हजारो मुंबईकर आपापल्या गावी परतले. एकट्या रत्नागिरी जिल्ह्यात १ लाख २४ हजार मुंबईकर गावी परतले.

: अकाली दलाची आझाद पंजाबची मागणी.

: मार्च २३ ते एप्रिल १२ – महायुद्धात जपानने ब्रिटनच्या ताब्यातील सिंगापूर जिंकून घेतल्यानंतर भारतासोबत वाटाघाटी करण्याकरिता सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांची भारतभेट. २९ मार्च १९४२ रोजी क्रिप्स योजना जाहीर. त्यात भारतात लवकरच संघराज्याची निर्मिती करून वसाहतीचे स्वातंत्र्य दिले जाईल, युद्ध समाप्तीनंतर घटना समिती स्थापन करण्यात येईल, प्रांतांना व स्थानिक स्वराज्य संस्थांना सर्वाधिकार देण्यात येतील इत्यादी मुद्द्यांचा समावेश. गांधीजी व जिना यांनी ही योजना फेटाळली. १७ एप्रिलला क्रिप्स मायदेशी परत.

: मे - ब्रिटिशांचा महायुद्धात ब्रह्मदेशात पराभव. ९० हजार भारतीय अडकून पडले; भारतात परत येणाऱ्या एक हजार लोकांचा मृत्यू.

: मे १ – पुण्यात एक महिना राष्ट्रसेवादलाचे शिबीर. क्रांतिकारक पृथ्वीसिंह आझाद उद्घाटक.

- रघुनाथराव निंबाळकर हिंदुस्थान सरकारचे कामगार सल्लागार म्हणून नियुक्त.

: जून – फिल्ड मार्शल आर्चिबाल्ड बावेल नवे व्हाइसरॉय. युद्धकाळात मध्यवर्ती सरकारकडे सर्व अधिकारांचे केंद्रीकरण.

: जुलै - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची व्हाइसरॉय यांच्या कार्यकारिणीचे सदस्य व मजूरमंत्री म्हणून नियुक्ती.

: जुलै १८-१९ – नागपुरात 'अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशन'ची स्थापना. अस्पृश्यांच्या नवीन स्वतंत्र वसाहती स्थापन करण्याची तरतूद घटनेतच करावी, अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मागणी.

; जुलै १४ – महाराणी ताराबाईंनी कोल्हापूर राज्याची सूत्रे आपल्या हाती घेतली.

: ऑगस्ट ७ ते ९ – मुंबईत अ. भा. काँग्रेसच्या अधिवेशनात नेहरूंनी 'चले जाव'चा ठराव मांडला. गांधीजींची 'चले जाव' चळवळ सुरू. म. गांधी व महादेवभाई देसाई यांना अटक. १६ वेळा गोळीबार, ८ मृत्यूमुखी, ४४ जखमी.

: ऑगस्ट ते डिसेंबर - भारत छोडो आंदोलनाला हिंसक वळण. शासकीय

इमारती, रेल्वे यांच्यावर हल्ले, जाळपोळ. ब्रिटिशांचा बळाचा वापर. ३००० लोक मृत्यूमुखी, ६० हजार लोकांना अटक. ९ नोव्हेंबरला जयप्रकाश नारायण हजारीबाग तुरुंगातून निसटले व त्यांनी केंद्रीय समिती स्थापून चलेजाव चळवळीला दिशा दिली. १५ ऑगस्टला खानदेशात विद्यार्थ्यांच्या मोर्चावर गोळीबारात १ ठार; ९ सप्टेंबरला नंदुरबारला शिरिषकुमारसह ७ हुतात्मे; विदर्भात संत तुकडोजी महाराज यांना दोनदा अटक (९ व २८ ऑगस्ट), अमरावतीजवळ यावली येथे लष्करी कारवाईत ५ ठार, ६२ जणांना सक्तमजुरीची शिक्षा; अष्टी येथे ७ ठार, १० जणांना फाशी, ५४ जणांना जन्मठेप, १६ जणांना दीर्घ मुदतीचा तुरुंगवास आणि गावकऱ्यांकडून ५० हजारांचा सामुदायिक दंड वसूल. चिमूर येथे गोऱ्या सैनिकांचा महिलांवर बलात्कार. साताऱ्याजवळ भूमिगत कार्यकर्ते किसन वीर यांना अटक (१८ सप्टेंबर); सांगली, मिरजजवळ विश्रामबाग, नांद्रे, शेणोली, शिरवडे रेल्वे स्टेशन जाळले; २५ ऑक्टोबर ते फेब्रुवारी ४३ या काळात मुंबईत १३ वेळा बॉम्बस्फोट; अहमदनगर येथे चित्रपटगृहात बॉम्बस्फोट (२५ डिसेंबर), कोल्हापूर संस्थानात गारगोटी येथे भूमिगतांनी शस्त्रागार लुटले (१३ डिसेंबर). ग. प्र. प्रधान यांना १ वर्षाचा तुरुंगवास. बॉम्ब प्रकरणात पुण्यात ७ शाळकरी विद्यार्थ्यांना आणि साताऱ्यात ६ विद्यार्थ्यांना अटक.

: डिसेंबर २० – कलकत्त्यावर जपानची बॉम्बफेक.

: नाशिक येथे २७ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन. अध्यक्ष – प्रल्हाद केशव अत्रे.

१९४३: जानेवारी २१ – ट्रेड युनियन कार्यकर्त्यांच्या राजकीय प्रशिक्षणासाठी 'नवजीवन संघटने'ची स्थापना.

: 'छोडो भारत' आंदोलनात यशवंतराव चव्हाण यांना फलटणला अटक व ६ महिन्यांचा तुरुंगवास (१७ मे); कुंडलगावला बापूसाहेब नलावडे, नागनाथ नायकवाडी यांनी बँक लुटली ; पुण्यात कॅपिटॉल थिएटरात ठेवलेल्या बॉम्बमुळे कर्नल ए. एच्. हडसन व २ ब्रिटिश सैनिक ठार (जानेवारी २४); अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे यांना अटक (जनेवारी १४); मुंबईत काँग्रेसचे रेडिओ प्रसारण.

: जून १ ते ३ जून १९४६ – साताऱ्याला प्रति सरकार.

: जुलै ४ – नेताजी सुभाषचंद्र बोस यांची आझाद हिंद फौजेची स्थापना. जगन्नाथराव भोसले यांना आझाद हिंद सेनेत मेजर जनरल पदावर बढती.

: जुलै ३१ – स्वातंत्र्यवीर सावरकरांचा हिंदू महासभेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा. त्यांच्या जागी श्यामाप्रसाद मुखर्जी यांची अध्यक्षपदी निवड.

: ऑक्टोबर २१ – नेताजी सुभाषचंद्रांची सिंगापूर येथून आझाद हिंदुस्थानची घोषणा. हंगामी सरकार स्थापन. ब्रिटन व अमेरिकेविरुद्ध युद्ध पुकारल्याचेही जाहीर केले.

: ऑक्टोबर ३ - बॅ. मुकुंदराव जयकर यांच्या अध्यक्षतेखाली महाविदर्भ सभेचे दुसरे अधिवेशन.

: डिसेंबर – मुस्लीम लीगची कराचीत 'डिव्हाइड ॲण्ड क्विट'ची घोषणा.

: फिल्ड मार्शल आर्चिबाल्ड वावेल यांची व्हाईसरॉयपदी नेमणूक

: सांगली येथे २८ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन. अध्यक्ष – श्रीपाद महादेव माटे

: सांगली येथे ३३ वे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष – ना. वि. कुलकर्णी.

१९४४ : फेब्रुवारी २२ – कस्तुरबा गांधी यांचे पुण्याच्या आगाखान पॅलेसमध्ये निधन.

: मार्च १९ ते डिसेंबर २९ – आझाद हिंद सेना व जपानच्या फौजांनी इंफाळ (१९ मार्च), कोहिमा (२१ एप्रिल), निकोबार (२९ डिसेंबर) ताब्यात घेतले. निकोबार बेटाचे समारंभपूर्वक 'स्वराज्य बेट' असे नामांतर करण्यात आले.

: एप्रिल १४ – मुंबईत व्हिक्टोरिया गोदीतल्या जहाजातील स्फोटकांनी पेट घेतल्याने आग. अग्नीशमन दलाचे ६४ कर्मचारी मृत्यूमुखी.

: खानदेशात उत्तमराव पाटील व सहकाऱ्यांनी चिमठाने येथे साडेपाच लाखांचा खजिना लुटला (एप्रिल १४); जेजुरीच्या खंडोबाचे दागिने लुटले (जुलै २७)

: कोल्हापूरच्या पंतप्रधानपदी मिचेल साहेबाची नेमणूक.

: एप्रिल – ना. सी. फडके यांच्या चलेजाव चळवळीच्या पार्श्वभूमीवर लिहिलेल्या 'शाकुंतल' कादंबरीवर जप्ती व ५ सप्टेंबरला राजाराम महाविद्यालयातून बडतर्फी.

: मे ६ – वैद्यकीय कारणास्तव गांधीजींची आगाखान प्रासादाच्या तुरुंगातून सुटका.

: महायुद्धात रोमचा पराभव; दोस्त राष्ट्रांनी दुसरी आघाडी उघडली.

: जुलै १७ ते ३१ – दहा हजारांहून अधिक गोदीकामगार संपावर.

: जुलै २२ – हिंदू राष्ट्रदलाच्या स्वयंसेवकांची पाचगणी येथे गांधीजींच्या सभेत काळे झेंडे दाखवून निदर्शने.

: सप्टेंबर ३ – शिखांनी 'निषेध दिन' पाळला.

: सप्टेंबर ९ ते २७ – फाळणी टाळण्यासाठी गांधी व जिना यांच्यात चर्चा सुरू.
: सप्टेंबर २१ – वसंतदादा पाटील यांना तुरुंग फोडून पळून जाण्याचा गुन्हा केल्याबद्दल ६ वर्षांची सजा; २४ एप्रिल १९४६ ला तुरुंगातून सुटका.
: धुळे येथे २९ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन. अध्यक्ष – भा. वि. वरेरकर
: जळगाव येथे ३४ वे मराठी नाट्यसंमेलन. अध्यक्ष – माधवराव जोशी.
: राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ठरविण्यासाठी नेमलेल्या सार्जंट समितीची योजना जाहीर.

१९४५ : जानेवारी १८- हिंदुस्थान सरकारने आर. जी. सरैया यांच्या अध्यक्षतेखाली सहकारी तत्त्वावर विकास घडवून आणण्यासाठी १२ तज्ज्ञांची समिती नेमली.
: जानेवारी - नथुराम गोडसे यांनी 'अग्रणी' दैनिक सुरू केले.
: मे ४ - सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद फौजेची रंगून येथे शरणागती.
: मे ५ - मुंबईत अ. भा. शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे तिसरे अधिवेशन.
: मे ७ - महायुद्धात जर्मनीची शरणागती. हिटलरची आत्महत्या. दुसरे महायुद्ध समाप्त.
: मे २३ - उंबरगाव तालुक्यातील झरी येथे पाच हजार आदिवासींची परिषद. शामराव परुळेकरांचे वेठबिगारी गाडून टाकण्याचे आवाहन.
: जून १ - मुंबईत टाटा फंडामेंटल रिसर्च इन्स्टिट्यूटची स्थापना.
: जून १४ – व्हाइसरॉय वॉवेल यांचा भारतीयांनी हंगामी सरकार स्थापन करण्याचा प्रस्ताव; मात्र ब्रिटिश व्हाइसरॉय, सैन्यदल प्रमुख व कार्यकारी परिषद कायम राहील अशी अट.
: जून २५ ते जुलै १४ – व्हाइसरॉय वॉवेलच्या प्रस्तावावर विचारविनिमय करण्यासाठी २१ राजकीय नेत्यांची सिमला परिषद. अंतरिम सरकार स्थापन करताना मुसलमान व अनुसूचित जातींना प्रतिनिधित्व देण्याच्या मुद्यावरून मतभेद.
: जून २८ – मुंबईत मच्छिमारांची अखिल कोळी समाज मासळी उत्पादक सहकारी संस्था स्थापन.
: जुलै - इंग्लंडला क्लेमेंट अटली यांचे लिबरल पार्टीचे सरकार सत्तेत आले. नव्या सरकारची भारतातून त्वरित बाहेर पडण्याची भूमिका.
: ऑगस्ट ६ ते ९ – अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा (६ ऑगस्ट) व नागासाकी (९ ऑगस्ट) शहरे अणुबॉम्ब टाकून उध्वस्त केले.
: ऑगस्ट १५ – जपानची महायुद्धातून बिनाशर्त शरणागती. दुसऱ्या महायुद्धाची

समाप्ती. महायुद्धात २४००० भारतीय सैनिकांचे बलिदान. ५४ हजार सैनिक जखमी. हजारो बेपत्ता.

: सप्टेंबर २० ते २३ – काँग्रेस कमिटीची बैठक. गांधी आणि नेहरू यांनी ब्रिटिशांच्या अटींसह अंतरिम सरकार स्थापन करण्याचा प्रस्ताव फेटाळण्याचा निर्णय घेतला.

: डिसेंबर ते जानेवारी १९४६ - संसद स्थापनेसाठी झालेल्या निवडणुकात काँग्रेसने ९० टक्के जागा जिंकल्या; मुस्लीम लीगचा सर्व ३० राखीव जागांवर विजय.

१९४६ : फेब्रुवारी १८ - मुंबईत नौदलातील ३००० सैनिकांचा संप. २१ फेब्रुवारीला नौदल सैनिकांवर गोळीबार, त्यास गोळीबाराने उत्तर. नौदल सैनिकांच्या उठावामुळे २३ व २४ फेब्रुवारीस मध्य व उत्तर मुंबईत दंगली. २२८ लोक ठार १०४६ जखमी.

: सांगलीजवळ वाळवा येथे नागनाथ नायकवडी यांनी आझाद हिंद फौजेची भूमिगत चळवळ चालवली, त्यात पोलिस चकमकीत आझाद दलातील किसन अहीर व नानकसिंग यांना वीरगती लाभली.

: एप्रिल – जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली अंतरिम सरकार स्थापन. घटना परिषद स्थापन; मुस्लीम लीग पाकिस्तानच्या मागणीवर ठाम. मुंबई प्रांतात काँग्रेसचे मंत्रिमंडळ अधिकारारूढ. रामभाऊ रुईकर यांची कामगारांसाठीच्या राखीव मतदारसंघातून आमदारपदी निवड.

: मुंबई प्रांतात काँग्रेसचे बाळासाहेब खेर प्रधानमंत्री, मोरारजी देसाई गृह व महसूल मंत्री, वैकुंठभाई मेहता अर्थ, सहकार व ग्रामोद्योग मंत्री.

: मे - केशवराव जेधे यांनी मुंबई प्रांताच्या काँग्रेस अध्यक्षपदाची निवडणूक जिंकली.

: मे १२ - बेळगावच्या साहित्य समेलनात श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचा संयुक्त महाराष्ट्र राज्याचा ठराव

: जुलै ११ – मुंबईतील टपाल आणि तार खात्यातील कनिष्ठ श्रेणीतील कर्मचाऱ्यांचा व्ही. जी. दळवी यांच्या नेतृत्वाखाली संप.

: जुलै २५ - अमळनेर गिरणी कामगारांचा संप. पोलिस गोळीबारात ९ जण ठार. ६५ ते ७० जखमी.

: जुलै २६ - शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत महाराष्ट्र एकीकरण परिषद. : जुलै २७ – मुस्लीम लीगचा संप, निदर्शने, फुटिरतावादी भूमिकेवर

ठाम.

: जुलै २९ – मुंबईत मुस्लीम लीगच्या परिषदेत जिना यांनी १६ ऑगस्ट हा पाकिस्तान मिळविण्यासाठी कृती दिन म्हणून साजरा करण्याचे आवाहन केले.

: ऑगस्ट १६ : मुस्लीम लीगने हिंदूंच्या विरोधात दंगल,लूट, खून-मारामाऱ्यांचे सत्र सुरू केले. कलकत्त्यात जातीय दंगल उसळली. पाच दिवसात चार हजार लोक ठार झाले. १५००० जखमी. बंगाल, बिहार, पंजाबात हिंदू-मुस्लीम दंगली.

: सप्टेंबर १ - मुंबईत जातीय दंगलीत ३५ ठार, १७५ जखमी.

: सप्टेंबर २ – नेहरूंच्या अंतरिम सरकारने वस्तूंच्या किंमती नियंत्रित करण्यासाठी ए. डी.गोरवाला व धनंजयराव गाडगीळ यांची समिती नेमली.

